Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-079208

॥ श्री ॥

# निबंधमाला.

लेखक

## कै० विष्णु कृष्ण चिपळूणकर.

तिसरी आवृत्ति.

सम्पादक

वासुदेव विनायक साठे, बी. ए. (टिळक) मुख्याध्यापक, 'टिळक राष्ट्रीय पाठशाळा'.

मुद्रक व प्रकाशक

रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर येथें आपल्या, 'चित्रशाळा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

सन १९२६

x M501
E7
79208

# दोन शब्द.

———*———

के० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं **निबंधमाला** मासिक पुस्तक सन १८७४ च्या जानेवारीपासून सुरू केलें, व त्याचे एकंदर ८४ अंक काढून तें आपल्या हयातींतच बंद केलें. या अवधींत के० विष्णुशास्त्री यांचेवर कोणकोणते प्रसंग आले व त्यांतून ते पार कसे पडले यांचें वर्णन त्यांचे बंधु के० लक्ष्मणराव चिपळूणकर यांनीं त्यांच्या चरित्रांत चांगलें लिहिलें आहे. तें वाचकांनीं अवश्य वाचून पहावें. निबंधमाला मासिक पुस्तक शास्त्रीबुवांनीं एकट्यानेंच चालविलें असून त्यांत प्रारंभीं निबंध, नंतर सुभाषितें, विनोदमहादाख्यायिका व निबंधासंबंधांचा पत्रव्यवहार अशीं सदरें असत. यांपैकीं ' सुभाषितसंग्रह ' आणि 'विनोद महादाख्यायिका' हीं दोन वेगळीं पुस्तकरूपानें छापलेलीं आहेत. 'पत्रव्यवहार' मात्र आतां कोठें पहावयास मिळण्याचा संभव नाहीं.

मासिकरूपानें निबंधमाला छापल्यांनंतर त्यांतील निबंधाच्या आणखी दोन आवृत्ति निघाल्या; एक आर्यभूषण छापखान्यानें छापलेली व दुसरी रा.कृ. बा. मांडे यांनीं छापलेली. याखेरीज निबंधमालेंतील कांहीं लेख, व केसरी, शालापत्रक वगैरे इतर ठिकाणचे शास्त्रीबुवांचे कांहीं लेख रा. रा. खंडेराव भिकाजी बेलसरे यांनीं छापले होते, व 'आमच्या देशाची स्थिति' आणि 'इतिहास' हे दोन निबंध स्वतंत्र निघाले.

निबंधमालेची ही आवृत्ति छापण्याचें ठरलें तेव्हां चित्रशाळेच्या म्यानेजरांनीं या आवृत्तीचीं पक्कीं प्रुफें पाहण्याचें काम मजला सांगितलें व तें मीं पतकरलें. या कामाबद्दल चित्रशाळेचे मालकांकडून मला जो मोबदला मिळाला तोहि इतर ठिकाणीं असल्या कामाबद्दल मिळालेल्या मोबदल्याहून पुष्कळच चांगला मिळाला हें येथें आनंदानें नमूद केल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. असो. ही आवृत्ति छापण्याचें काम १९१५ च्या आगस्ट सप्टेंबरमध्यें जें सुरू झालें तें १९१७ च्या जूनमध्यें संपलें.

निबंधमालेची ही कांहीं प्रस्तावना नव्हे. केवळ चित्रशाळेनें छापलेल्या या आवृत्तीच्या प्रस्तावनेदाखल हे दोन शब्द आहेत. ते अधिक किती असणार ?

पुणें, ता. १२ जून १९१७.

**हरि रघुनाथ भागवत.**

# अनुक्रमणिका.


| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | **मराठी भाषेची सांप्रतची स्थिति.** उपोद्घात १, प्रस्तुत विषयाचे दोन विभाग १, आलीकडील विद्वानांचें मराठी भाषेविषयीं मत २, तिची खरी योग्यता; सांप्रतचा ऱ्हास, व त्याचीं कारणें २, तिच्या अभिवृद्धयर्थ लोक उपाय सुचवितात ते—त्यांचें खंडन ३, शंका— तिचें निवारण ४, आपल्या भाषेची कठिण स्थिति ५, तिच्या उत्कर्षाचे खरे उपाय ५, संस्कृत भाषेचें उत्कृष्ट साहाय्य ६, उपसंहार ६, भाषाभिवृद्धीची हल्लींची दशा ७, वर्तमानपत्रें ७, मासिक पुस्तकें ८, इतर ग्रंथ९, ते चांगले न होण्याचीं कारणें ९. | १—११. |
| २ | **प्रस्तुत मालेचा उद्देश.** सध्यांची चोहोंकडची गडबड १२, भाषेच्या संबंधानें उद्योग; पत्रें पुढें सरसावून पुस्तकें मागें पडल्याचीं कारणें १२, पत्रें व मासिक पुस्तकें यांचें विभक्त होणें १४, मासिक पुस्तकांचा इतिहास—नव्याजुन्यांची तुलना १४, अशा पुस्तकांची मूळ कल्पना; ती नीट न उचलल्यामुळें कित्येक पुस्तकांत आलेले मोठे दोष १५, मासिक पुस्तकाच्या खऱ्या स्वरूपाविषयीं मत; त्यांपासून झालेलें लोकहित १६, तसें इकडे होण्यास कोणती गोष्ट कमी आहे? १७, अशा पुस्तकांपासून आपणांस होणारे फायदे—१८, मराठीच्या द्वारें सामान्य लोकांस ज्ञान १८, ग्रंथाभिरुचीची वृद्धि २०, भाषेचें पुनरुज्जीवन, विटंबनानिवारण आणि अभिवृद्धीस आरंभ २०, आणखी एक उपयोग २१, पुनः सूचना २१. | ११—२२. |
| ३ | **विद्वत्त्व आणि कवित्व.** काव्यविवेचनशास्त्र; त्याचा आपल्या लोकांत अभाव २२, प्रकृत निबंधाचा विषय २३, कवितेच्या स्वरूपाविषयीं निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें २३, काव्याचें लक्षण; उदाहरणें २५, कवित्व ईश्वरी देणें होय; प्रासादिक कवितेचीं उदाहरणें २८, अशा कवितांतील चमत्कारिक खुबी २९—३०. | २२—३०. |

अंक विषय व तपशील पृष्ठ

४ विद्वत्त्व आणि कवित्व. ३०—४३

अवतरण ३०, कवित्वास विद्वत्त्व अनुकूल होय हा लोकभ्रम ३०, तर्कशास्त्राचा कवित्वाशीं अत्यंत विरोध; कवीचें मन आणि तत्त्वज्ञाचें मन; उदाहरण—चंद्र ३२, कल्पनेच्या विकासानंतर बुद्धीचा विकास ३४, कवित्वास आवश्यक गुण ३५, 'कवि' शब्दाची व्याख्या ३५, कवीचा मुख्य गुण—सहृदयता ३६, स्वभाववर्णन ३७, प्राचीन कवींच्या उत्कर्षाचीं कारणें ३९, इतर अप्रधान गुण ४०, दोहोंचा योग ४२, विद्वत्तेची गति कोठपर्यंत ? ४२, एकंदर सिद्धांत ४३.

५ संपत्तीचा उपभोग. ४३—५३.

विषयनिरूपण ४३, प्रस्तुत विषयावर तीन प्रकारचा मतभेद ४३, पहिलें मत; त्याचें समर्थन ४४, त्याचें खंडन ४५, निर्णय ४६, दुसऱ्या मताचें विवेचन ४६, तिसऱ्याचें विवेचन ४८, मुख्य विषय ४८, संपत्तीच्या उपभोगाचे प्रकार ४८, कृपण व विषयी ४९, मिजासी लोक ४९, रिकामपणाचें सुखावहत्व ५०, रिकामपणाचे अनर्थ ५१, संपत्तीच्या उपभोगाचा आणखी एक प्रकार—धर्म ५२, युरोपियन् लोकांचा कित्ता—एकंदर होणारें हित ५३.

६ इतिहास. ५४—६५.

प्रकृत विषयाचें स्वरूप ५४, 'इतिहास' शब्दाची व्युत्पत्ति, मूळचा व आतांचा अर्थ ५४, इकडच्या प्राचीन इतिहासाचा अभाव; त्याचीं कारणें ५४, उपलब्ध असणारे कांहीं ग्रंथ; त्यांवरून अनुमान ५५, या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती होण्याचीं दुसरीं साधनें ५६, इतिहासाची उत्पत्ति व प्रसार ५७, इतिहासाचा उपयोग; त्यावर आक्षेप घेणारे लोक ५८, पहिला उपयोग—जिज्ञासातृप्ति ६०, दुसरा उपयोग—सदुपदेश ६०, तिसरा—मनास प्रसन्नत्व व उन्नति ६१,

७ इतिहास. ६५—७४.

इतिहासाचा चवथा उपयोग—मनोरंजन ६५, पांचवा—नीतिज्ञान ६७, सहावा—मनाचें पोषण ६९,

अंक विषय व तपशील पृष्ठ

८ इतिहास. ( समाप्त ) ७५—९५.
आपल्या देशाविषयीं एकंदर जगाचें मत ७५, आपलें स्वतःचें मत ८२, 'घाशीराम कोतवाल;' 'पुण्याचें वर्णन' ८५, हिंदुस्थानच्या इतिहासाची इंग्रेजांस गोडी व माहिती ८८, आमची गोडी व माहिती ९०, उपसंहार ९२, लोकांस सूचना ९३.

९ भाषादूषण. ९५-१०८.
विषयोपक्षेप ९६, दूषणाचें स्वरूप ९६, त्याचीं कारणें ९७, त्याचा प्रचार ९९, इंग्रेजांचा व आमचा आपापल्या भाषांविषयीं अभिमान १०१, भाषादूषणाच्या कैवाऱ्यांस उत्तर १०२, इंग्रेजीच्या अनुकरणाची मर्यादा १०३, परभाषेचें साह्य १०४, भाषादूषणाचीं उदाहरणें १०५, शुद्धतेचें निश्चित प्रमाण १०८,

१० लेखनशुद्धि. १०८-११९.
उपोद्धात १०८, शास्त्र आणि रूढि १०९, व्याकरणाचें प्राधान्य १०९. भाषा आणि व्याकरण ११०, त्यांचा परस्पर संबंध ११०, मराठी भाषेची स्थिति १११, लेखनपद्धति बसविण्याचें साधन ११२, विषयाचीं तीन सदरें ११२, वर्णशुद्धि ११२, शब्दशुद्धि ११३, वाक्यशुद्धि ११५, सारांश ११९.

२६ भाषापद्धति. १२०-१५१.
विषयोपक्रम १२०. मराठी भाषेची यापूर्वीची स्थिति १२०,सध्याची स्थिति १२०,भाषापद्धति १२१, उत्तम पद्धतीचे गुण-शुद्धता १२१, साधेपणा १२२, सुबोधपणा १२४, इतर गुण-अवतरण १२७.

२७ भाषापद्धति. ( समाप्त ) १२९—१५१.
प्रस्तुत अंकाचा विषय १२९, भाषापद्धतींच्या भिन्नत्वाची उपपत्ति १२९, वरील भेदांत उत्तम कोणता या प्रश्नाचा विचार १२९, लोकमान्य ग्रंथांची भाषापद्धति १३०, सरळ व सोपी भाषा १३१, प्रौढ भाषासरणी १३५, इतर प्रकार १३८, इंग्रेजीच्या अनुकरणानें सुरू झालेल्या तऱ्हा १३८, गद्याची प्रवृत्ति १३९, नवे प्रकार १३९, विनोदात्मक लेख १४३, सृष्टिवर्णन १४४, आणखी कांही उतारे १४६.

| अंक | विषय व तपशील | पृष्ठ |
|---|---|---|
| ११ वाचन. | विषयस्वरूप १५२, व्युत्पत्ति १५२, दोन लाभ १५२, मनोरंजन १५२, इतर प्रकारांशीं तुलना १५४, दुसरा लाभ ज्ञान १५६, विशेषत: निरूपण १५७, मराठींतील ग्रंथसंग्रह १५७, हल्लींचा वाचनाचा प्रघात १५८, त्याची खरी रीत १६०. | १५२-१६२. |
| १२ भाषांतर. | 'भाषांतर' शब्दाचा इतिहास व व्याख्या १६२, पूर्वींचा भाषांतराचा प्रघात १६३, आलीकडील भाषांतरें १६४, भाषांतरकर्त्यांस लागणारीं साधनें १६५, भाषांतराचे प्रकार १६६, आणखी दोन विभाग १६६, गोष्टींचीं वगैरे भाषांतरें १६६, शास्त्रीय ग्रंथांचीं १६७, कविताग्रंथांचीं १६८, भाषांतराच्या उत्कृष्टत्वाचें प्रमाण १७७, एका आक्षेपाचें निवारण १७७. | १६२-१८०. |
| " निबंधमालाः—वर्ष पहिलें. | | १८०—१८६. |
| १३ लोकभ्रम. | विषयोपक्षेप १८६, भुतेंखेतें १८६, त्यांविषयीं लोकांच्या कल्पना १८८, त्यांचें आस्तित्व १८८, अंधार व ओसाड जागा यांची आवड १९०, दुसरे प्रत्यय १९१, भुतेंखेतें सारें थोतांड (सं०) १९२. | १८६—१९५. |
| १४ लोकभ्रम | शकुन १९५, या भ्रमाचा प्रचार १९५, निरनिराळे प्रकार—परदेशांतले १९५, आपल्या देशांतले १९७, शकुनाचा खरेपणा १९८, शंकेवर उत्तर १९९, या भ्रमापासून हानि २०१, परधर्मी लोकांचे अपशकुन २०१, आपल्यांतील प्रकार २०३, शकुनांवर विद्वानांचा विश्वास २०५, शंकानिवारण; सारांश २०६. | १९५—२०७. |
| १७ लोकभ्रम | ज्योतिष २०७, विषयस्वरूप २०७, प्रस्तुत शास्त्राच्या उदयाचीं कारणें २०७, त्याचा प्रचार— या प्रचाराचीं कारणें २१०, मुख्य विषय— आक्षेपावर उत्तर २११, ग्रहगति आणि संसारकृत्यें यांचा परस्पर संबंध असण्याचा संभव २१२, प्रत्यक्ष अनुभव २१४, दुसरे कांहीं | २०७—२२२. |

| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| | विचार २१५, कुतर्कांचें विवरण २१७, खऱ्या ज्योतिषांची योग्यता व उपयोग २१९. | |
| १६ गर्व. | | २२३—२४२. |
| | मानसशास्त्र २२३, प्रस्तुत विषयाचें स्वरूप २२३, त्याविषयीं वाचकांस होणाऱ्या कल्पना २२३, प्रकृत विवेचनाचा उद्देश—षड्रिपु २२४, गर्वाचीं दोन स्थानें २२५, दोषरूप गर्व २२५, अदोषरूप गर्व—२३०, योग्य रीतीचा गर्व २३०, दुसरे प्रकार—स्वाभिमान इ० २३८, प्रस्तुत मनोवृत्तीचें प्रयोजन २३९. | |
| १८ वक्तृत्व. | | २४२—२५८. |
| | विषयोपक्षेप २४२, 'वक्तृत्व' शब्दाची व्याख्या २४३, प्रस्तुत विषयाचे विभाग २४३, वक्तृत्वगुणाची उत्पत्ति २४३, तिचा लोकसत्तात्मक राज्याशीं संबंध २४५, उदाहरणें:—२४५, ग्रीस देश २४५, डिमॉस्थेनीस् २४७, रोम २४८, सिसरो २५०, इंग्लंड् २५३, बर्क २५५. | |
| १९ वक्तृत्व | | २५८—२७३. |
| | अवतरण २५८, प्रस्तुत अंकाचा विषय २५८, प्रस्तुत गुणाचा प्रचार २५९, त्याच्या अभिवृद्धीचें एक मोठें कारण २६०, त्याचें संस्कृत व असंस्कृत रूप २६०, प्रकृत विषयाचे तीन विभाग—प्राचीन काळ २६१, मध्यम काळ २६७, महाराष्ट्र देश २६७, वक्तृत्वविशिष्ट राजकारणी पुरुष—२६८. | |
| २० वक्तृत्व. | | २७४—२८८. |
| | प्रस्तुत अंकाचा विषय २७४, हिंदुधर्माचें उज्जीवन २७४, धर्मव्याख्यान २७५, आमच्या देशाचा अध्यात्म विचारांकडे कल २७६, इकडे सुरू झालेला एक नवा प्रकार २७७, त्याची प्रवृत्ति व मराठ्यांच्या उदयाशीं त्याचा संबंध २७७, 'कीर्तन' शब्दाचा अर्थ, व मूळ प्रकार २७८, तो सध्याच्या स्थितीस येऊन पोंचण्याचा क्रम २७९, या गुणांत नामांकितपणा पावलेले लोक २८३, राष्ट्राचें व भाषेचें झालेलें हित २८७. | |

| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| ११ वक्तृत्व. | प्रकृत विषयाचा तिसरा विभाग २८९, विषयोपक्षेप २८९, वक्तृत्वाची विद्यमान स्थिति २८९, बाल्यावस्था २९०, मागल्या स्थितींत व सध्यांच्यांत अंतर २९७, वक्तृत्वोत्तेजक सभा २९७, त्यांपासून अपेक्षित कार्य २९९, वक्तृत्वादि गुणांचें उत्तेज्यत्व ३००, दक्षिणा प्रैज कमिटी व आलीकडील इंग्रेजी शिक्षणक्रम यांचेंहि वैफल्य ('सं'०) ३०४. | २८९—३०६. |
| १२ वक्तृत्व. | अवतरणें ३०७, वक्तृत्व—गुणाच्या उत्कर्षाचा संभव ३०७, सध्यांची स्थिति ३०७, उत्कर्षाचीं साधनें ३०८. आलीकडील वक्ते ३१०. | ३०७—३२१. |
| १५ वक्तृत्व. | प्रस्तुत अंकाचा विषय ३२१, वक्त्याचे गुण ३२१, मनाचा शुद्धपणा ३२१. विद्वत्त्व ३२५, इतर गुण ३२६. वक्तृत्वापासून उपयोग ३२७. | ३२१—३२९. |
| १४ वक्तृत्व—पत्रास उत्तर | पत्र ३२९, उत्तर ३३४. | ३२९—३४९. |
| १४ निबंधमाला, वर्ष दुसरें. | | ३५०—३५२. |
| १५ ग्रंथांवर टीका. | ग्रंथसमृद्धि ३५३, ग्रंथकारांची स्थिति ३५३, ती सुधारण्यास उपाय ३५५, ग्रंथपरीक्षेचा हल्लींचा प्रकार ३५५, त्याचे परिणाम ३५७, प्रस्तुत विषयावर सामान्यतः विचार ३५८, त्याची हकीकत ३५८, टीका करणारांस आवश्यक गुण—मूळ ग्रंथाचें ज्ञान ३५९, सत्यप्रीति ३५९, शांत स्वभाव ३६०, सहृदयता ३६२, टीकेचे सामान्य प्रकार ३६३, खरा टीकाकर्ता ३६४, प्रस्तुत विषयाविषयीं लोकांच्या गैरसमजुती ३६५, चांगले टीकाकार निपजल्यापासून उपयोग ३७१. | ३५२—३७२. |
| १२ टॅपेस्ट् | 'टॅपेस्ट्' नाटकावर अभिप्राय ३७३—३७८. | ३७३—३७८. |
| ११ वेदार्थयत्न | प्रस्तुत अंकाचा विषय ३७९, प्राचीन विद्येचें उज्जीवन | ३७८—४००. |

| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| | ३७९, वेदग्रंथांच्या अभ्यासाचें महत्त्व व उपयोग ३७९, अन्य देशीय लोकांच्या संबंधानें ३७९, आपल्या संबंधानें ३८१, वेदांतील विषय ३८२, वेदांचा काळ ३८४, प्रस्तुत भाषांतर ३८६, त्यांतील विषयसंग्रह ३८६, न्यूनता व दोष ३८८, भाषेच्या संबंधाचे ३८८, अर्थांच्या संबंधाचे ३९०, उपसंहार ४००. | |
| **३८ रसायनशास्त्र.** | | ४०१—४०७. |
| | रसायनशास्त्र ४०१, प्रस्तुत विषयाचा विस्तार ४०१, पूर्वीचे ग्रंथ ४०१, प्रस्तुत ग्रंथाचें साहित्य ४०२, मुख्य विषय ४०२, भाषापद्धति ४०३, स्वतंत्र रचना ४०३, प्रयोग व प्रयोगांचें साहित्य ४०४, व्यावहारिक उदाहरणें व शिल्पक्रियांची माहिती ४०४, स्थलनिर्देश ४०५, उपसंहार ४०६, | |
| **४२ संस्कृत ग्रंथ.** | | ४०७—४४०. |
| | कौमुदी महोत्साह ४०८, गद्यपद्यावलि ४१५, भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश ४१८. | |
| **४४ मराठी पुस्तकें.** | | ४४०—४६१. |
| | सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट ४४१, विद्यार्थिबुद्धिवर्धिनी ४५७, जमाखर्चाची पद्धति ४५९. | |
| **४९ काव्येतिहास-संग्रह.** | | ४६२—४८८. |
| | मासिक पुस्तकांचा फैलाव ४६२, काव्येतिहास-संग्रह ४६३, याच्या उद्देशावर येणारे आक्षेप ४६३, पहिला—इतिहासावर ४६४, दुसरा—मराठी कवितेवर ४७३, तिसरा—संस्कृत कवितेवर ४७६, वरील तिन्ही विभागांविषयीं पृथक् विचार ४७८, पुस्तकाविषयीं अभिप्राय ४८५, उपसंहार ४८६. | |
| **५१ नवीन पुस्तकें अभिप्राय.** | | ४८८—५०६. |
| | अपभ्रष्टशब्दचंद्रिका ४८८, ज्ञानेश्वरी परिभाषा ५००. | |
| **६१ पत्राचें उत्तर.** | | ५०७—५१८. |
| | सदरील अंकाचा विषय ५०७, सदर्हू पत्र व छापण्याचीं कारणें ५०७, ' अपभ्रष्टशब्दचंद्रिके' वर पहिला आक्षेप—अव्याप्ति ५०९, दुसरा आक्षेप— अतिव्याप्ति ५१२, तिसरा आक्षेप— पुनरुक्तता ५१४, चवथा आक्षेप—अस्थानगतविस्तार ५१७, उपसंहार ५१८. | |

| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| ५३ नवीं पुस्तकें. | नवीन पुस्तकें ५१८, 'तुकारामबावाचे अभंगांतील निवडक वेंचे' ५१८, 'अमोलिक वैद्यक चातुर्य' ५२०, 'शकावलि' ५२२, अशा तऱ्हेच्या पुस्तकांची अवश्यकता ५२७. | ५१८—५२८. |
| ६० तारा नाटक. | प्रस्तुत अंकास स्वतंत्र विषय घेण्याचीं कारणें ५२९, 'तारा नाटक' ५३२, त्याचें संविधानक ५३३, संविधानकांतील दोष ५४०, मूळ नाटकांत केलेले फर-फार ५४५, इकडील रीतरिवाजास न जमणारे भाग ५४६, प्रस्तुत ग्रंथापासून एतद्देशीयांस उपयोग ५४९, मराठी पुस्तक या दृष्टीनें पाहतां प्रकृत नाटकांतील दोष ५५२, मासल्याकरतां उतारे ५५३. | ५२९—५५५. |
| २८ इंग्रेजी भाषा. | विषयोपक्षेप ५५६, प्रस्तुत विषयाचा उपयोग ५५६, इंग्रेजी भाषेची उत्पत्ति ५५६, तिचे घटकावयव ५५७, इंग्रजी भाषेंतील ग्रंथसंग्रह ५५९, गद्यात्मक ग्रंथांची प्रवृत्ति ५६०, तिची सुधारणा ५६०, गद्याचे प्रकार ५६४, निबंध ५६४, त्रैमासिकें ५६५, मेकॉले ५६८. | ५५६—५७१. |
| २९ इंग्रजी भाषा. | अवतरण ५७१, इंग्रेजी भाषेंतील इतिहाससंग्रह ५७१, त्याचे विभाग ५७१, इंग्लंडचा इतिहास ५७२, नामांकित इतिहासकार ५७३, अर्वाचीन युरोपियन् राष्ट्रांचा इतिहास ५७७, ग्रीक् व रोमन् लोकांचा इतिहास ५७७, विख्यात इतिहासकार ५७८, | ५७१—५८३. |
| ३० इंग्रजी भाषा. | प्रस्तुत अंकाचा विषय ५८४, इकडील राष्ट्रांचा इतिहास ५८४, तो यथार्थ लिहितां येण्यास अवश्य पाहिजे असणारे गुण ५८४, इकडील लोकांविषयीं माहिती ५८४, यथार्थ बुद्धि ५८७, या गुणांच्या अभावाचीं फळें ५९०. | ५८४—६०२. |
| ३२ इंग्रजी भाषा. | विषयोपन्यास ६०२, प्राच्य इतिहासाचे दोन भाग ६०२, पुढील लेखाचा विषय ६०३, अरब लोकांचा | ६०२—६२८. |

अंक विषय व तपशील पृष्ठें

इतिहास ६०३, इराण देशाचा इतिहास ६०६, हिंदुस्थानचा इतिहास ६१५.

३६ निबंधमाला वर्ष ३ रें ६२९—६६८.

३३ डॉक्टर जॉन्सन् ६६८—६८७.

प्रस्तुत विषयाचें अपूर्वत्व ६६८, त्यावर लिहिण्याचा उद्देश ६७२, जॉन्सन्चा जन्म व बाल्यावस्था ६७३, त्याचें अध्ययन ६७४, अभ्यासाचा प्रकार ६७५, बापाच्या मरणानंतर उपजीवनार्थ उद्योग ६७६, विवाह-विद्यालयस्थापन—लंडन् शहरास प्रस्थान ६८१, गॅरिक् ६८३.

३४ डॉक्टर जॉन्सन्. ६८८—७०६.

अवतरण ६८८, जॉन्सन्च्या विपत्तीचा आरंभ ६८८, तिचीं कारणें ६८८, त्या वेळचे विद्योपजीवि—जनांची स्थिति ६८९, जॉन्सन्चा उपजीवनार्थ उद्योग ६९२, त्याचीं काव्यें व नाटकें ६९२, इंग्रेजी भाषेचा कोश ६९७. ७०७—७११.

३५ डॉक्टर जॉन्सन्.

जॉन्सन्चे निबंध—'रँब्लर्' व 'ऐड्लर्' ७०७, 'रासेलस्' ७०८, वर्षासनाची नेमणूक ७१०.

३७ डॉक्टर जॉन्सन्. ७११—७३१.

जॉन्सन्चा उत्तरकाल ७११, 'क्लब' ची स्थापना ७१२, बॉस्वेल् ७१३, स्कॉट्लंड् देशावर मुशाफरी ७२३, शेक्स्पीयरची आवृत्ति ७२५, राज्यप्रकरणीं लेख ७२५, 'कविचरित्र' ७२६, अखेरची हकीकत ७२९,

३९ डॉक्टर जॉन्सन्. ७३१—७४६.

प्रस्तुत अंकाचा विषय ७३१, जॉन्सन्चें शरीर ७३१, पोषाखाचा वगैरे बेतबात ७३२, विक्षिप्तपणाचे प्रकार व जडलेल्या खोडी ७३२, स्वभाव ७३५, दयालुत्व ७३६, मानित्व ७३७, सत्यप्रीति ७३९, बुद्धिगुण ७३९, कल्पनाशक्ति ७३९, तर्कशक्ति ७४१, उपसंहार ७४३.

४० डॉक्टर जॉन्सन्. ७४६—७६०.

पूर्वचरित्रापासून बोध ७४६, सतत उद्योग ७४७, गृहाचार ७५४, धर्म ७५७.

| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| ४१ | **डॉक्टर जॉन्सन.** | ७६१—७७५. |
| | प्रस्तुत अंकाचा विषय ७६१, इंग्रेजी राष्ट्राचे गुण जॉन्सन्च्या ठायीं प्रतिबिंबित होण्याचें कारण ७६१, निश्चय ७६२, अभिमान ७६३, सदयत्व ७६४, धैर्य ७६५, स्वकीयांविषयीं व स्वदेशाविषयीं प्रेम ७६६, दोषांचा उल्लेख ७६९, तुटकपणा ७७०, ग्रह ७७१. | |
| ४३ | **डॉक्टर जॉन्सन.** | ७७५—७९४. |
| | प्रकृत अंकाचा विषय ७७५, लोकस्थितीचें द्विविध सादृश्य ७७५, जॉन्सन्च्या वेळीं लोकभाषेची व विद्येची स्थिति ७७६, महाराष्ट्रभाषा; कोश व व्याकरण ७७९, निबंधादि रचनापद्धति ७८१, या सादृश्यावरून घ्यावयाचा बोध ७८१, दुसरें राज्यपद्धतीचें सादृश्य ७८९. | |
| ४५ | **मोरोपंताची कविता.** | ७९५—८०७. |
| | प्रस्तुत निबंधाचें स्वरूप ७९५, त्यांत येणारे विषय ७९८, विवेचनाच्या विस्ताराबद्दल वगैरे वाचकांस सूचना ८०२, प्रस्तुत विषयाचे भाग ८०३, मोरोपंतावर आक्षेप ८०३, त्याच्या तर्फेचीं मतें ८०६. | |
| ४६ | **मोरोपंताची कविता.** | ८०७—८१७. |
| | विषयाचा उपक्षेप ८०७, पहिला आक्षेप—मराठी कविता केवळ भाषांतररूप होय ८०७, भाषांतररूप ग्रंथांचीं उदाहरणें ८०८, वरील वादाविषयींचीं अवांतर प्रमाणें ८०८, प्रत्यक्ष प्रमाण ८१०, दुसरा आक्षेप—अपरिचित शब्द ८१६. | |
| ४७ | **मोरोपंताची कविता.** | ८१८—८२७. |
| | सदरील अंकाचा विषय ८१८, यमक व प्रास ८१८, संस्कृत कवींचा प्रघात ८१८, इंग्रेजी कवींचा ८२१, वरील आक्षेपाचा ग्राह्य अंश ८२१, तो मोरोपंतावर कितपत लागू पडतो याविषयीं विचार ८२२, तत्कालीन पंडितांची अभिरुचि प्रस्तुत कवीस कितपत बाधक झाली याविषयीं विवरण ८२४. | |
| ५२ | **मोरोपंताची कविता.** | ८२७—८३९. |
| | मोरोपंतांच्या कवितेवरील आणखी कांहीं आक्षेपांचा विचार ८२७. | |

# अनुक्रमणिका.

| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| ५४ | **मोरोपंताची कविता.** | ८४०—८५१. |
| | विषयोपक्रम ८४०, 'केकावली' विषयीं रावबहादुरांचा अभिप्राय ८४०, त्यावर टीका ८४२. | |
| ५५ | **मोरोपंताची कविता.** | ८५१—८६२. |
| | मागील विषय पुढें चालू ८५१, द्वैत व अद्वैत मतें ८५१, त्यांच्या सत्यासत्यत्वाविषयीं विचार ८५३, अद्वैत मत हें 'खऱ्या' भक्तीचें कितपत विध्वंसक होय, याविषयीं विवेचन ८५३. | |
| ५६ | **मोरोपंताची कविता.** | ८६२—८७३. |
| | विषयोपन्यास ८६२, अर्वाचीन पांडित्याचा प्रकार ८६२, मिशनरींची स्थिति ८६३, विल्सन् साहेबांच्या लेखांवर दूषण ८६४, प्रस्तुत कवीविषयीं आणखी कांहीं मतें ८७२. | |
| ५७ | **मोरोपंताची कविता.** | ८७३—८८७ |
| | विषयोपन्यास ८७३, मोरोपंताच्या तर्फेची मंडळी ८७३, त्याच्या कवितेंतील मोठा विशेष ८७३, हा त्याच्या कीर्तीच्या प्रसारास कारण ८७४, यावरून त्याचें महाकवित्व कितपत ठरतें याविषयीं विचार ८७७, मोरोपंताच्या कवितेचें गहनत्व व दुर्बोधत्व ८८१, वरील मताची यथार्थता ८८१. | |
| ५८ | **मोरोपंताची कविता.** | ८८८—९०७. |
| | विषयोपक्षेप ८८८, लोकांची गतानुगतिकत्वाविषयीं प्रवृत्ति ८८८, मोरोपंताच्या काव्याचें अनेकार्थत्व ८९१, प्रस्तुत कवीचें पांडित्य ८९२, श्रीहर्षाची व त्याची तुलना ८९४, त्याच्या कवितेंतील अनेकार्थात्मक स्थळें ८९८, त्रेपन्नाव्या अंकांतील आर्येविषयीं विचार ९०४. | |
| ५९ | **मोरोपंताची कविता.** | ९०८—९२५. |
| | प्रस्तुत अंकाचा विषय ९०८, मोरोपंत हा कवि आहे कीं नाहीं हा वाद ९०८, याचें मूळ ९०९, चार आक्षेपात्मक उतारे व त्याविषयीं विचार ९१७. | |
| ६२ | **मोरोपंताची कविता.** | ९२६—९४९. |
| | चालू अंकाचा विषय ९२६, रा० ओक यांच्या पत्रास उत्तर ९२६, रा० कानेटकर यांच्या आक्षेपांचें परीक्षण ९४४. | |

| अंक | विषय व तपशील | पृष्ठें |
|---|---|---|
| ६३ | **मोरोपंताची कविता.** प्रस्तुत अंकाचा विषय ९४९, मोरोपंतास कवि ही संज्ञा लागेल कीं नाही याविषयीं विचार ९४९, प्रस्तुत कवीचें कवित्व गुण ९५२, त्याच्या कवितेंतील गुण ९५३, दोष ९६९, उपसंहार ९८१. | ९४९—९८२ |
| ७२ | **मोरोपंताची कविता.** प्रस्तुत अंकाचा विषय ९८२, रा० कानिटकर यांच्या दुसऱ्या पत्राचें उत्तर ९८३. | ९८२—१००३ |
| ४८ | **निबंधमाला वर्ष ४ थें** | १००४—१०३३. |
| ७२ | **निबंधमाला वर्ष साहावें** | १०३४—१०४६. |
| ६४ | **लोकहितवादी** विषयोपन्यास १०४७, लोकहितवादी १४९, त्यांच्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप १०५०, त्यांतील मतें १०५६, ग्रंथरचनेचा उद्देश १०५७. | १०४६—१०६०. |
| ६५ | **लोकहितवादी.** प्रस्तुत अंकाचा विषय १०६१, देशाची निकृष्ट स्थिति १०६१, अशा स्थितीचीं दोन स्वरूपें १०६२, त्यांपैकीं दुसरें आपल्या देशास लागू १०६५, वरील स्थिति प्राप्त होण्याचीं कारणें १०७०. | १०६१—१०७५. |
| ६६ | **लोकहितवादी.** आपल्या देशाचें प्राचीनत्व १०७६, त्याची सांप्रतची स्थिति व त्यासंबंधीं पाश्चात्य व तदनुयायी ग्रंथकारांचें मत १०७०, लोकहितवादींचें मत व त्याचें निरसन १०८०. | १०७६—१०८६. |
| ६७ | **लोकहितवादी.** विषयोपक्षेप-ब्राह्मण १०८६, प्रस्तुत लेखापासून होणारा गैरसमज १०८७, ब्राह्मण मुत्सदी १०८८. 'निबंधसंग्रहांतील उतारा १०९०, इंग्रेजी ग्रंथकारांचे अभिप्राय १०९२. | १०८६—१०९५. |
| ६८ | **लोकहितवादी.** दोन्ही अभिप्रायांची तुलना १०९५. 'लोकहितवादी'च्या अभिप्रायाचें खण्डन १०९७, प्रस्तुत विषयावर आमचें मत ११०७. | १०९५—११०९. |

अंक विषय व तपशील पृष्ठें

६९ लोकहितवादी. ११११—११२३
'लोकहितवादीं'चा जुन्या पंडिताविषयीं अभिप्राय१११० तो वाचून सकृद्दर्शनीं मनांत येणारे विचार १११३, शास्त्रविद्येवर ' लोकहितवादीं'चा आक्षेप—त्याचें निरसन १११६,

७० लोकहितवादी. ११२३—११३४.
' लोकहितवादीं'चा शास्त्रविद्येवर दुसरा आक्षेप—त्याचें निरसन '११२३, संस्कृत विद्येची उपयुक्तता ११२६, तिची व अर्वाचीन पाश्चात्य विद्येची तुलना ११२८, उपसंहार ११३३,

७१ लोकहितवादी. ११३५—११५१.
विषयोपन्यास ११३५, जुन्या पंडितांवर आक्षेप—वितण्डवाद ११३५, व्यवहारशून्यत्व ११४५, इतर दूषणें ११५०.

७३ लोकहितवादी. ११५१—११६०.
विषयोपक्षेप ११५१, हिंदुधर्म ११५२, 'निबंधसंग्रहा'-तील उतारा ११५४, भटांच्या अर्थशून्य अध्ययनाच्या संबंधानें विचार ११५६.

७४ लोकहितवादी. ११६१—११७५.
भटांवर दुसरा आक्षेप ११६०, भट आळशी ११६१, पोटें ११६७, दानधर्माच्या संबंधानें आक्षेप ११७१, पाश्चात्य राष्ट्रांत भटांचें माहात्म्य ११७२.

७५ लोकहितवादी. ११७५—११९२.
ब्राह्मणांचें प्रस्थ ११७५, हा मत्सरभाव उत्पन्न होण्याचीं कारणें ११७६, ब्राह्मणांची व इतर राष्ट्रांची तुलना ११७८, वस्तुस्थिति ११८१, इतरांच्या उच्च जातींच्या वर्तनांत व ब्राह्मणांच्या वर्तनांत अंतर ११८३, शेवटले दोन मुद्दे ११८५.

७६ लोकहितवादी. ११९२—१२०५.
उपसंहार ११९२, मागील विवेचनाचें तीव्रत्व ११९३, त्यांतील हेतु ११९४, इतर येणारे आक्षेप ११९८, निबंधसंग्रहां'तला उतारा १२००.

॥ श्री ॥

# नि बं ध मा ला.

## मराठी भाषेची सांप्रतची स्थिति.

तोयैरल्पैरपि करुणया भीमभानौ निदाघे
मालाकार! व्यरचि भवता या तरोरस्य पुष्टिः ।
सा किं शक्या जनयितुमिह प्रावृषेण्येन वारां
धारासारानपि विकिरता विश्वतो वारिदेन ॥ जगन्नाथराय.

अंक १ ला.—(१) उपोद्घात, (२) प्रस्तुत विषयाचे दोन विभाग, (३) अलीकडील विद्वानांचें मराठी भाषेविषयीं मत, (४) तिची खरी योग्यता; सांप्रतचा ऱ्हास, व त्याचीं कारणें, (५) तिच्या अभिवृद्ध्यर्थ लोक उपाय सुचवितात ते—त्यांचें खंडन, (६) शंका—तिचें निवारण, (७) आपल्या भाषेची कठिण स्थिति, (८) तिच्या उत्कर्षाचे खरे उपाय, (९) संस्कृत भाषेचें उत्कृष्ट साहाय्य, (१०) उपसंहार, (११) भाषाभिवृद्धीची हल्लींची दशा, (१२) वर्तमानपत्रें, (१३) मासिक पुस्तकें, (१४) इतर ग्रंथ, (१५) ते चांगले न होण्याचीं कारणें.

१. हा विषय मोठा अगत्याचा आहे. सध्यांच्या वेळीं तर त्याविषयीं विचार करणें फारच जरूर आहे. कां कीं ही वेळ देशाच्या व भाषेच्या स्थित्यंतराची होय. आजवर या दोहोंत जे फेरफार होत गेले ते सर्व मिळून त्यांची एकच अवस्था मानली असतां चिंता नाहीं. कारण दोहोंत जरी पुष्कळ उलथापालथी झाल्या, तरी यापुढें जें एकंदर अवस्थान्तर होण्याचा रंग दिसत आहे त्यापुढें ते कांहींच नाहींत ह्मटलें असतां चालेल. यास्तव या मोठ्या संधीस सुज्ञांनीं दोहोंच्या स्थितीकडे चांगलेंच लक्ष दिलें पाहिजे.

आतां एकंदर देशाचें अवस्थान्तर पुढील काळांत कोणत्या प्रकारचें होणार हा विषय प्रस्तुत निबंधाचा नव्हे. त्याविषयीं नुसत्या अटकळीही बांधण्यास मोठमोठ्या इतिहासवेत्त्यांस सुद्धां पंचाईत पडेल यांत संशय नाहीं. तेव्हां सामान्य जनांनीं तेथपर्यंत न भरकटतां ईश्वराच्या दयाळुत्वावर भरंवसा ठेवून स्वस्थ रहावें इतकीच गोष्ट. असो; पण भाषेची अभिवृद्धि ही देशाच्या उत्कर्षाचें एक मोठेंच साधन असून तें प्रयत्नाधीनही बरेंच आहे. यास्तव त्यासंबंधेंच येथें विचार करूं.

२. मराठी भाषेचा इतिहास—ह्मणजे ती कोणत्या भाषेपासून उत्पन्न झाली, केव्हां झाली, तींत पुढें कसकसे फेरफार होत गेले, वगैरे गहन गोष्टींचें निरूपण—येथें अप्रस्तुत होय. यास्तव त्याविषयीं येथें कांहीं न लिहितां सध्यां ती कोणत्या स्थितीस येऊन पोंचली

आहे, व ती सुधारण्याची आशा आहे कीं नाहीं, याविषयीं मात्र जे विचार सुचतात ते वाचकांस कळवितों.

३. वरील दोन गोष्टींविषयीं आमच्या लोकांत प्रमुख ह्मणविणारांचें बहुधा कायम मत केव्हांच ठरून गेलें आहेसें दिसतें. आह्मांस कित्येकांच्या तोंडून ऐकलेलें आठवतें की, मनांतील अभिप्राय खुबीदार रीतीनें स्पष्ट करण्यास मराठी अगदीं अप्रयोजक, तींत कांहीं जीव नाहीं. कित्येक शिक्षक इंग्रेजींतील अर्थ मराठींत समजून देतांना निरुपाय होऊन हात टेकतात; त्यांतून जे कोणी अंमळ चणचणीत असतात ते तर साफ सांगून जातात कीं, छे! मराठी भाषेंत याचें भाषान्तरच होऊं शकत नाहीं, आपली भाषा फार भिकार पडली. अलीकडील विद्वानांनीं तर जुन्या शास्त्री लोकांवरही चढ केली! त्यांस देशभाषेचा विटाळही सोसत नाहीं. दहा वीस वर्षांमागें शिकलेल्या लोकांस मराठींत ग्रंथ लिहिण्याची बरीच हौस वाटत असे; पण आतां ती भाषा कोणास डोळ्यांसमोरही नको! आपले अमूल्य विचार प्रदर्शित करणें झालेंच तर इंग्लिश भाषेहून हलक्या द्वारानें ते लोकांच्या मनांत शिरकविणें त्यांस अगदीं आवडत नाहीं. पण सद्धर्मोपदेश करतांना अगर देशहिताबद्दल बोध करणें झाल्यास असल्या अडाणी लोकांशीं जेव्हां गांठ पडतेच, तेव्हां त्यांस क्षणभर आपली योग्यता एकीकडे ठेवावी लागते. तरी अशा प्रसंगीं सुद्धां आपली मानहानि त्यांस सर्वथा सहन होत नाहीं. प्रतिपादन करावयाचे गहन अर्थ कोत्या मराठी भाषेस झेपण्यास कठिण असें वाटून विलायती शिक्षणाचे नवे शब्द त्यांस पदोपदीं आपल्या भाषणांत आणावे लागतात. हे अमूल्य शब्द प्रचारांत कसे झपाट्यानें येत चालले आहेत, बहुतेकांचें त्यांविषयीं मत कसें असतें, त्यांची उत्पत्ति कशापासून झाली आहे, वगैरे गोष्टींचें यथास्थित विवरण करणें या स्थलीं अशक्य आहे. पुढें प्रसंगानुसार एकाद्या निबंधांत त्याविषयीं विचार करूं.

४. पण आपल्या भाषेची वरच्याप्रमाणें विटंबना व अवहेलना करण्याचें आह्मांस अगदीं प्रयोजन दिसत नाहीं. जी भाषा बोलणाऱ्यांनीं दिल्लीअटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकारामरामदासांसारख्या भगवत्परायण साधूंनीं आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रथित केले, जीस मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवींनीं आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीनें संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरितां कोणत्याही अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाहीं अशी आमची खात्री आहे! हें मत कोणास उगीच फुशारकीचें वाटूं नये ह्मणून सर्वांस खात्रीनें कळवितों कीं, ज्या कोणास आपल्या भाषेची खरी योग्यता जाणण्याची इच्छा असेल त्यानें मोलस्वर्थ व क्यांडी यांच्या कोशांतील प्रस्तावना वाचून पहाव्या. विशेषतः मोलस्वर्थकृत कोश तर शुद्ध मराठी भाषेचें मार्मिक ज्ञान आपणास होऊं इच्छिणारास फारच उपयोगाचा आहे. तो मोठ्या परिश्रमानें व मोठ्या आस्थेनें तयार केला असून आपल्या भाषेचें विचित्र शब्दभांडार त्यांत समग्र भरलें आहे.—साधारण मताहून इतकें भिन्न मत त्यांचें कां बरें झालें? अर्थात् एवढ्याचकरितां कीं, कोश रचण्याच्या अचाट कामांत त्यांस सगळी भाषा धुंडाळणें अवश्य पडून तींतील सर्व गुण त्यांस स्पष्ट दिसून आले. पण मोलस्वर्थसारख्यांचें मत कसेंही असलें

तरी तें त्यांचें कोशांतल्या कोशांत. तें वाचून कोणीं पहावें ? किंवा आमच्या भाषेविषयीं आमचें मत असेल तेंच खरें, त्यांत साहेब कोण मत देणार ? असो; याप्रमाणें स्वभाषेच्या लज्जास्पद अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव आजपर्यंत मराठी भाषेची फारच हयगय होत गेली, व ज्यांनीं तिच्या अभिवृद्ध्यर्थ निरंतर उत्साहानें झटावें, त्यांच्यांत सुस्ती, कृत-कृत्यताबुद्धि, पंडितंमन्यता, वगैरे दोष अखंड वसल्यामुळें तिची मोठीच हानि होऊन ती क्षयाच्याच पंथास दिवसेंदिवस लागत चालली आहे.

५. या भावी अनर्थाच्या परिहारार्थ कित्येक जे उपाय सुचवितात ते मोठे मौजेचे आहेत. कोणी ह्मणतात, युनिवर्सिटीच्या वरच्या परीक्षांत मराठी भाषा पुनः घालावी, मात्रिक्युलेशन परीक्षेस मराठी भाषा आवश्यक करावी. युनिवर्सिटी स्थापन झाल्यापासून पहिलीं आठ दहा वर्षें वरील दोन्ही प्रकार चालू नव्हते काय ? बरें, मग तितक्या काळांत मराठी भाषेचें कोणतें मोठें हित झालें ? आपला ज्ञानौघ किती ग्रंथकारांनीं तींत ओतला ? पण इतकेंचसें काय ? आज वीस बावीस वर्षें दक्षिणाप्रैज कमिटी मराठी भाषेच्या हित-कर्त्यांस माळ घालण्यास सतत तत्परतेनें उभी नाहीं काय ? मग तिच्या सत्कृतीचा आदर करण्यास असे कोण आले, कीं ज्यांच्या बुद्धीस तिच्या कृपाकटाक्षाशिवाय स्फूर्तिच न होती ! युनिवर्सिटीचे किताबवाले तिच्या भजकांत किती सांपडतील ? अशा जबरदस्तीच्या उपायांचे पुरस्कर्ते जर क्षणभर विचार करतील तर त्यांस खचित कळून येईल कीं, जगांतील कित्येक भाषांस जी अभियुक्तता आली ती अशा बळजबरीनें व लालचीनें आली नाहीं ! कोणत्याही कामांत मनुष्य जो नांवालौकिकास चढतो तो वरच्यासारख्या कृत्रिम उपायांनीं कधींही चढत नाहीं; तसें होण्यास मूळचा अंकुरच पाहिजे. दुसरे कोणी ह्मणतात कीं, कोडतांतूनही मराठी भाषा काढण्याचा सरकार यत्न चालवीत आहे हें अगदीं गैर आहे. तिस तेथें थारा अवश्य असावा.—वकिलांच्या अर्ध्याबोबड्या वक्तृत्वानें,—त्यांच्या 'आक्टा' नें, 'च्याजर्या' नें, कैदीस 'संशयाचा फायदा' दिल्यानें—जर महाराष्ट्र भाषेची अभिवृद्धि होणार, तर तिचे खांब ह्मणून सुतारांनीं, शिंप्यांनींही कां पुढें होऊं नये हें आह्मांस समजत नाहीं ! असो; वरील आक्षेप आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् फार असमंजस वाटून ते आह्मांस उलट विचारतील कीं, तर मग मराठी भाषा बुडूं न देण्यास तजवीज तरी कोणती ? या प्रश्नावर आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, हल्लींची स्वभाषेविषयीं उपेक्षाबुद्धि जोंपर्यंत लोकांच्या मनांत अशीच राहील तोंपर्यंत कोणत्याहि उपायास लवमात्रही यश येणार नाहीं; पण जर कांहीं कारणानें ती कमी होत जाऊन नाहींशी झाली, तर वरील उपायांपैकीं एकाची सुद्धां बिलकूल गरज लागणार नाहीं. वरील दीर्घ प्रयत्न ह्मणजे क्षयरोगी माणसास बळेंच चालवून त्याच्या अंगीं शक्ति आणवूं पहाण्यासारखे आहेत. यास्तव ते केवळ व्यर्थ असून विशेष क्लेशकारक मात्र होत. पण जर ईश्वरी कृपेनें रोग्याच्या रोगाच्या मूळावर औषध पोंचलें, तर त्याच्या अवयवांस आलेली ग्लानि दूर करण्यास जसा यत्किं-चित्‌ही प्रयत्न नको; तद्वतच परभाषादूषणरूप जें क्षयाचें बीज आपल्या भाषेस लागून दिवसेंदिवस तीस खिळूं पहात आहे, तें जर कां एकदां दूर होईल, व विद्वानांची तिजकडे

प्रवृत्ति होईल, तर तिच्या अभिवृद्धीस आरंभ झाला म्हणून समजावें. पण हें जर होणार नाहीं, तर तिचा लय जितका लवकर होईल तितका बरा !

६. या ठिकाणीं आमच्या वाचणारांस एक मोठीच शंका येईल; तिचें निवारण केलें पाहिजे. ते विचारतील कीं, मराठीत मागेंहि दोन परभाषा—फारशी व आरबी—पुष्कळच मिसळल्या होत्या, मग आतां इंग्रेजीचेंच एवढें भय कसचें ? ही शंका सकृद्दर्शनीं खरी वाटते; पण अंमळसा बारीक विचार केला तर ती अगदीं शुष्क दिसेल. त्या परकी भाषांचा संबंध मराठीशीं ज्या प्रकारचा होता त्याहून इंग्रेजीचा संबंध फारच निराळा आहे. त्यांपैकीं आरबीचा संबंध तर दक्षिणेकडे मुसलमानांचेंच जोंपर्यंत प्राबल्य होतें तोंपर्यंतच असून आतां मुळींच नाहींसा झाला आहे; सध्या जे कांहीं आरबी शब्द आढळतात, ते फारशी भाषेच्या द्वारेंच आले असावे असें वाटतें. तसाच या दुसऱ्या भाषेचाही संबंध पेशव्यांच्या कारकिर्दीच्या अखेरपर्यंतच असून तेव्हांपासून नाहींसा झाला आहे. यास्तव चालू मराठी भाषेंतून जुने परकी शब्द गेल्या पन्नास वर्षांत शेंकडों निघून जाऊन कांहीं वर्षांनीं तर ते आणखीहि कमी होतील असें दिसतें. पेशव्यांच्या राज्यांत दप्तर फारशी भाषेंत ठेवीत असल्यानें व ब्राह्मण लोक पुष्कळ त्यांतच चाकरीस रहात यास्तव, त्या भाषेचे शब्द प्रचारांत पुष्कळ येऊं लागले. पण त्या वेळचे लोक फारशी ज्या रीतीनें शिकत तीपेक्षां आतांची इंग्रेजी शिकण्याची तऱ्हा फार वेगळी आहे. त्यांचा ती परभाषा शिकण्याचा उद्देश केवळ व्यावहारिक होता,—म्हणजे सरकारी काम बजावतां येण्यापुरतीच ती शिकत. सध्यांच्या लोकांत इंग्रेजींतील अनेक ग्रंथांत निष्णात झालेले विद्वान् जसे शेंकडों सांपडतील तसे त्या वेळेस अगोदर कोणी असलेच तर फार असतीलसें वाटत नाहीं. बहुतेक तर आतां जशी हिंदुस्थानी भाषा लोक शिकतात त्याप्रमाणेंच सरासरी बोलण्याचालण्यापुरतीच केवळ शिकत असतील असें दिसतें. तेव्हां अशा प्रकारें परभाषांचा संबंध कितीही काळ जरी असला, तरी त्यापासून चालू देश-भाषेस भीतीचें कांहींच कारण नाहीं हें उघड आहे.

पण इंग्लिश भाषेची गोष्ट तशी आहे काय ? या भाषेचें सामान्य ज्ञान तर आतांशा बहुधा प्रत्येक मनुष्यास जरूर झालें आहे. दिवसेंदिवस तर तींत निपुण होणें हा जीवनाचाच एक उपाय होऊं पहात आहे. चोहोंकडे प्रतिष्ठा मिरविण्याचें तर यासारखें सध्यां दुसरें साधनच नाहीं. तेव्हां तिचा जो हल्लीं फैलावा झाला आहे, व होत चालला आहे, त्यापुढें वर सांगितलेल्या भाषांची गोष्ट काय बोलावी ? इंग्लिश लोक आपल्या उत्कृष्ट भाषेचा साऱ्या भूमंडळावर प्रसार होत चालला आहे याचा अतिशयित गर्व वहातात, व तो त्यांचा गर्व यथार्थ आहे. आमच्या नुसत्या हिंदुस्थानांतच पाहिलें तर आमच्या तरुण विद्वानांस तिनें इतकें वेडावून टाकलें आहे कीं, त्यांस आपल्या आईबापांशीं, बायकांशीं, बहिणींशीं, चाकरांशीं सुद्धां शुद्ध व सरळ बोलण्याची मारामार पडते ! मग ग्रंथांतील भाषेविषयीं तर

१ हा तर्क आम्ही यावरून करितों कीं, मराठींत जे अजून शेंकडों फारशी व आरबी शब्द आहेत त्यांचे या भाषेंत कांहीं विलक्षण अर्थ होऊन गेले आहेत ! मोलस्वर्थकृत मराठी कोशांत अशा शब्दांचे मूळचे व अपभ्रंश अर्थ दिलेले आहेत, ते पहावे.

काय सांगावें ! त्यांच्या मनाचा जो व्यापार चालतो तो सारा इंग्रजी भाषेंत; तेव्हां देश-भाषेंत बोलणें किंवा लिहिणें झाल्यास तें भाषांतर होऊन निघायचें ! असो; तर या सर्व गोष्टींचा क्षणभर विचार केला असतां सहज ध्यानांत येईल कीं, मुसलमानांच्या सहवासानें आपल्या पेहेरावांत जितकी तफावत पडली तितकीच भाषेंतहि पडली. ह्मणजे मूळची साधी रीत जी दोनच वस्त्रें वापरण्याची ती जाऊन तीहून डौलाचा जो सध्यांचा आंगरखा, पागोटें, उपवस्त्र हा पोषाक जसा त्या लोकांपासून आपण उचलला, त्याप्रमाणेंच त्यांच्या भाषेंतून आपल्या भाषेंत कांहीं शब्द येऊन व तीस नवें वळण लागून तींत झोंकदारपणा व आवेश हे गुण मात्र जास्त आले. तेव्हां त्या भाषेच्या मिसळण्यानें आपल्या भाषेचें अहित न होतां हितच झालें, यांत संशय नाहीं. पण इंग्लिश भाषेचा प्रचार हाच आतां सार्वत्रिक होऊन मूळच्या भाषेचा लोप होऊं पहात आहे. कारण विचार, कल्पना यांची उत्पत्ति ज्या मना-पासून तेंच इंग्रेजी बनल्यावर मूळच्या भाषेची प्रधानता कोठें राहिली ? अर्थातच नाहीं; तीस सर्व प्रकारें गौणत्व येऊन इंग्रेजी जिकडे नेईल तिकडे जाणें तीस प्राप्त झालें.

७. वरील उपपादनावरून सर्वांच्या ध्यानांत सहज येईल कीं, सध्यां मराठी भाषा मोठ्या कचाटींत सांपडली आहे. इंग्रेजीसारख्या प्रबल परभाषेचा तिजवर अगदीं पगडा बसून तिचें स्वत्व ह्मणजे निराळेपणा नष्ट होण्याच्या बेतांत आहे. तेव्हां अजून जोंवर हें संकट अनिवार्य झालें नाहीं तोंवरच तिच्या कैवाऱ्यांस कंबर बांधण्याचा अवकाश आहे !

८. याप्रमाणें आपल्या भाषेच्या सध्यांच्या स्थितीविषयीं थोडेंबहुत निरूपण झालें. आतां तिचा उत्कर्ष होण्याची आशा आहे कीं नाहीं, याविषयीं आह्मांस जें वाटतें तें वाचकांस सादर करितों.

वरच्या आमच्या लिहिण्यावरून सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं इंग्रेजी विद्येचा जो एवढा फैलावा आपल्या लोकांत हल्लीं झाला आहे, व होत चालला आहे, तो आह्मांस अनिष्टसा वाटतो असें नाहीं तर त्याच्या योगानें त्या परभाषेचें वर्चस्व जें आपल्या मराठीवर होत चाललें आहे त्यापासून होणारा अनर्थ आह्मीं वाचकांस दाखविला. पण इत-केंच नव्हे. हा अनर्थ होतां होतां एवढा भयंकर होणार आहे कीं, शेवटीं त्याचें अनर्थत्वच नाहींसें होऊन आपल्या भाषेस इंग्रेजी विद्येपासून व भाषेपासून लाभ झाला या शब्दांतच कांहीं अर्थ रहाणार नाहीं. कारण जर सध्यांप्रमाणें इंग्रेजी शब्दांची व रचनेची आपल्या भाषेंत सतत भेसळ होत गेली—आणि जर कांहीं प्रतिबंधक कारण न झालें तर असेंच होणार हें कोणीही सांगेल !—तर तिचें रूप पालटतां पालटतां असें होईल कीं, ती इंग्रेजी-पासून निवडतां येणार नाहीं; व तिच्या मूळच्या रूपाचा मागमूसही रहाणार नाहीं. मग असें झाल्यावर 'आपल्या भाषेस असे असे लाभ झाले' असें ह्मणतांना 'आपल्या' या शब्दांत कांहीं अर्थ राहिला काय ? तसेंच मराठीस वर सांगितलेली सरूपतामुक्ति मिळाल्या-वर तिचा आधींचा देह कोठें राहिला ? व म्हणूनच मग अनर्थ तरी कसचा ! यास्तव मोक्ष-मुल्लरसाहेबांनीं आपल्या देशांतील लोकांस जो धर्माच्या बाबतींत उपदेश केला आहे, तोच आह्मी एतद्देशीय भाषांविषयीं त्यांस करतों. ह्मणजे जर आपण सर्व इंग्रेज व ख्रिस्ती बनलों,

तर आपला आपलेपणा अर्थातच समूळ विनष्ट झाला; मग आमच्या देशाचें आह्मीं पुनरुज्जीवन केलें हे शब्द सहजच विगतार्थ झाले! त्याप्रमाणेंच जर मराठी भाषा होतां होतां इंग्रेजीच बनली तर आपल्या लोकांचा तींत ग्रंथ लिहिल्याचा अटाट सर्व केवळ व्यर्थ झालासें होईल! यास्तव मराठींत इंग्रेजीची भेसळ होऊं देणें हें आपणांस लज्जास्पद आहे इतकेंच नव्हे, तर त्याच्या योगानें आपल्या सर्व प्रयत्नांचा शेवटीं विघातही होणार आहे.

इंग्लिश भाषेचा आह्मी द्वेष करीत नाहीं हें तर काय, पण आपल्या मराठीच्या उत्कर्षास ती मोठेंच साधन होईल अशी आमची खात्री आहे. सर्व जगांतील ज्ञानभांडार तींत सांठवलें असल्यामुळें तिचें साहाय्य मराठीसारख्या परिपक्व होऊं पहाणाऱ्या भाषेस जितकें होईल तितकें थोडें आहे! इतकेंच मात्र कीं, तें ज्ञानभांडार खुद्द आपलेंसें करून घेण्यास आपल्या भाषेचें स्वत्व ह्मणजे निराळेपण कायम राखलें पाहिजे. ज्याप्रमाणें तेच रस शरीरास हितावह होत, कीं जे शरीरप्रकृतीस मानवून जीवतत्त्वास धका लावणार नाहीत; त्याचप्रमाणें जे भाषांतरादि ग्रंथ भाषेच्या सरणीस अगदीं बरोबर उतरून तिच्या रचनेस यत्किंचित्ही अपाय न करतील तेच मात्र तीस वर्धक होतील. एरवींच्यांनीं जी तिची वृद्धि होईल ती केवळ वातमूलक स्थौल्याप्रमाणें होय. तिच्या योगानें तीस दुरून दिसण्यापुरती बळकटी आलीशी वाटेल खरी, पण वस्तुतः पहाणारापुढें तिच्या अंगीं आलेली क्षीणता क्षणमात्रही झांकली जाणार नाहीं. तर मराठी भाषेच्या हितकर्त्या विद्वानांनीं हें पक्कें लक्षांत वागवावें कीं, इंग्रेजींतील केवळ अर्थ मात्र घेऊन त्यास शुद्ध मराठीच्या सांच्यांत त्यांनीं ओतलें पाहिजे. अशा तऱ्हेचे ग्रंथ बनले असतां ते भाषेस फारच हितावह होऊन भूषणप्रद होतील,

९. आपल्या भाषेस दुसरी उत्कृष्ट सोय ही आहे कीं, तीस प्रसंगानुरोधानें प्रौढता देण्यास व शास्त्रपरिभाषेचे शब्द नवे बनवण्यास संस्कृत भाषेचे साहित्य तीस अनुकूल आहे. कित्येक शास्त्रें अगोदर संस्कृतांतच असल्यामुळें त्यांची परिभाषा तर ठरलीच आहे. पण दुसरीं जीं अनेक अलीकडे युरोपियन लोकांनीं काढलीं आहेत त्यांवरहि ग्रंथ लिहिण्यास मराठींत कांहींच अडचण पडणार नाहीं. ही उत्तम सोय नसती तर 'मेडिटरेनियन्', 'आट्मसफीयर', 'रिफ्राक्शन्', असे कर्णकटु अडाणी शब्द मराठींत घेणें भाग पडतें; व 'भूमध्यसमुद्र', 'वातावरण', 'वक्रीभवन', अशा मूळच्या इंग्रेजी शब्दांसहि प्रौढतेंत व वर्णसौंदर्यांत लाजविणाऱ्या शब्दांस आपण अंतरलों असतों. शिवाय संस्कृत भाषेंत काव्यादि ग्रंथांचा भरणाही पुष्कळ असल्यामुळें तिचेंही साहाय्य वरच्या इंग्रेजीप्रमाणें आपल्या भाषेस पुष्कळच होणार आहे. मराठींत प्रवीण होऊं पहाणारास निदान काव्यव्युत्पत्तीपुरतें तरीं संस्कृत भाषेचें ज्ञान अवश्यमेव हवेंच, कारण दोहोंचा संबंध निकट असल्यामुळें मूळच्या भाषेशिवाय चालू भाषेचें ज्ञान पुरतेपणीं होणें कठिण आहे. आतां इंग्रेजींत व संस्कृतांत मराठी भाषेच्या उत्कर्षास कारणभूत होण्याच्या संबंधानें एक मात्र मोठा भेद आहे. तो अर्थात् हाच कीं, पहिली सर्व प्रकारें परभाषा पडल्यानें तिच्या धर्तीवर जाणें जसें तीस अत्यंत दूषणार्ह होणार आहे, तसें ती दुसरीच्या पद्धतीवर पडली असतां केवळ तितकें होणार नाहीं.

१०. याप्रमाणें आपल्या भाषेची अभिवृद्धि होण्यास एकीकडून संस्कृत व एकीकडून

इंग्रेजी अशा दोहोंचा आधार तीस बळकट सांपडला पाहिजे. तशीच तिसरी गोष्ट ही आहे कीं, ती सांप्रत जितपत स्थितीस येऊन पोंचली आहे तीही तिची वृद्धि होण्यास पुष्कळ अनुकूल आहे. सध्यां जर ती केवळ अडाणी अवस्थेंतच असती, तर इंग्लिश व संस्कृत अशा प्रौढ भाषांपासूनहि तीस कांहींएक नफा न होता. पण दैवयोगानें अनेक कारणांस्तव ती आधींच पुष्कळ नांवारूपास आली आहे. यास्तव अशा स्थितींतही तिची हेळसांड केली असतां आपणांवर फारच दोष येईल यांत संशय नाहीं.

११. आतां आपल्या भाषेच्या वृद्ध्यर्थ अलीकडे कितपत उद्योग झाला व सध्यां कितपत चालू आहे याविषयीं कांहीं लिहून प्रस्तुत विषय पुरा करितों.

गेल्या पन्नास वर्षांत सरकारानें विद्यावृद्ध्यर्थ किती खटपट केली ती सर्वांस माहीत आहेच; तीविषयीं येथें सविस्तर लिहिणें नको. कोश व व्याकरण या दोहोंशिवाय भाषेस ठरीवपणा येत नाहीं, यास्तव सरकारानें पहिल्यानें तीं तयार करवून भाषेच्या उत्कर्षास प्रथम पाया घातला. पुढें हळू हळू गद्यग्रंथांची प्रवृत्ति पडून ते वाढविण्याकरितां सरकारानें कित्येक उत्तेजनाचे उपाय करून ठेविले. ते अजूनही चालू आहेत. या सर्व स्तुत्य प्रयत्नांस बरेंच यशही आलें; व लोकांत समजूत व उपयुक्त ज्ञान यांचा बराच प्रसार झाला. पण अलीकडे आठ दहा वर्षांत इंग्रेजीचा अभ्यास मनस्वी होत गेल्यानें एका मोठ्या अनिष्टास आरंभ झाला. तें अर्थातच भाषेचें दूषण होय. या दूषणाचा प्रसार निष्प्रतिबंध सतत चालल्यानें सध्यांच कितपत अनर्थ झाला आहे, व पुढें कोठपर्यंत पोंचणार, याविषयीं निबंधारंभीं आम्हीं लिहिलेंच आहे. असो; सध्यांच्या काळींहि मराठीच्या तर्फेनें बराच उद्योग चालला आहे. एक पत्र व पुस्तक-कर्त्यांचा; आणि दुसरा स्वतंत्र ग्रंथकारांचा. या दोहोंच्याही संबंधें अनुक्रमें विचार करूं.

१२. पहिल्यानें वर्तमानपत्रें. हीं आतांशा चोहोंकडे निघूं लागून पुष्कळ झालीं आहेत. हेंच आपल्या लोकांत विद्या अतोनात झाल्याचें एक मोठें चिन्ह होय असा पुष्कळांचा समज आहे. पण आम्हांस तसें वाटत नाहीं. सध्यां जो उठला तो इंग्रेजी शिकूं लागतो हें जितपत विद्याभिरुचीचें चिन्ह होय, किंवा किरकोळ जिनसांच्या विक्रीचीं पुष्कळ दुकानें या शहरांत नवीं झालेलीं दृष्टीस पडतात हें जितपत त्यांतील संपत्ति वाढल्याचें दर्शक होय, तितपतच वरील फैलावा विद्यावृद्धीचा सूचक होय असें आम्हांस वाटतें. हीं इतकीं वाढल्याचें कारण साधारण ज्ञान लोकांत बरेंच वाढलें, हें एक आहे खरें; पण दुसरें मोठें कारण आम्हांस हें वाटतें कीं, एकानें केलें म्हणजे दुसऱ्यानें करूं लागावें हा कच्चा समजुतीचा प्रकार. या अल्प समजुतीचीं दुसरींही उदाहरणें दृष्टीस पडतात. जिकडे तिकडे वक्तृत्वोत्तेजक सभा, पुस्तकालयें, वगैरेंची स्थापना; 'मुक्तामाले' च्या धाटणीवर केलेल्या शेंकडों पानचट गोष्टी, 'परशियन नैट्स,' 'नेटीव नैट्स,' 'सवाईमाधवरावावर नाटक,' इत्यादि सर्व उक्त अनुकरणेच्छेचीं उदाहरणें होत. असो; आतां हें खरें कीं, ही अनुकरणेच्छा मनुष्यमात्रास स्वाभाविक आहे; पण आपली योग्यता, शक्ति वगैरे न जाणून केवळ दुसऱ्याचें पाहूनच करण्याची जी बुद्धि ती मनाच्या पराधीनत्वाची व कोतेपणाचीच दर्शक

होय यांत संशय नाहीं. असो; पण सांप्रतकाळीं वर्तमानपत्रांचा सुकाळ होण्याचीं कशींही कारणें असलीं तरी त्यांपासून आपल्या भाषेला पुष्कळ उपयोग होण्यास तीं साधनें झालीं आहेत ही आमची खात्री आहे. सुमारें आठ दहा वर्षांपूर्वीं उत्कृष्ट पत्रें जितपत चालत होतीं तितपत आतां अगदीं सामान्य प्रतीचीं आहेत तीं चालतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कित्येक तर मोठ्याच योग्यतेस चढलीं आहेत, हेंही येथें लिहिण्यास आह्मांस आनंद वाटतो. आतां त्यांतील मराठी भाषा नेहमीं शुद्धच असते असें नाहीं, पूर्वोक्त दूषितत्वाचा प्रकार त्यांत नजरेस येतो हें खरें आहे; पण यासंबंधेंही त्यांत सुधारणा होत चालली आहे, व कांहीं काळानें पुष्कळ होईल असा आह्मांस अजमास दिसतो.

१३. दुसरीं मासिक पुस्तकें. यांपैकीं एकाविषयीं तर आह्मांस लिहितांच येत नाहीं. दुसरीं तीन आहेत. त्यांपैकीं दोन सुमारें दोन वर्षांमागें निघूं लागून बहुधा तिसऱ्याच्याच धाटणीवर चालू झालीं आहेत. हें तिसरेंच त्या तिहींत कालाच्या व योग्यतेच्या मानानें श्रेष्ठ आहे. त्याची भाषा शुद्ध व प्रौढ असून त्यांतील विषयहि महत्त्वाचे असतात. तारखेच्या तारखेस अंक काढून वर्गणीदारांच्या टपक्यांतून सुटावें एवढीच इच्छा न धरतां हातीं घेतलेल्या कामाचा बोज त्यास चांगला कळतोसें स्पष्ट दिसतें. त्यांतील लेखांवरून लिहिणारांचा देशाभिमान, निर्भीडपणा, निर्मत्सरता, गुणग्राहित्व, वगैरे उत्कृष्ट गुण सर्व व्यक्त होतात. दुसरीं जीं दोन सांगितलीं तीं एकंदरींत पहातां बरींच आहेत; तरी त्यांत सुधारणा करण्यास पुष्कळ जागा आहे असें आह्मांस वाटतें. एकाची भाषा शुद्ध असते; पण ज्याच्या त्याच्यावर हत्यार धरण्याचा जो त्यानें बाणा उचलला आहे तो विचारी मनुष्यास खास आवडणार नाहीं. त्याच्या योगानें त्याची योग्यता मात्र कमी होऊन दुसऱ्यास फजीत करण्याचा जो त्याचा उद्देश तो सिद्धीस न जातां उलटा फसून मात्र जातो. मोठमोठ्या इंग्रेजी ग्रंथकारांची कोणास खोंचा मारण्याची रीत किती संभावितपणाची व किती रामबाण असते हें त्यास ठाऊक असेलच, तर तिचेंच अनुकरण करण्यास आह्मी त्यास शिफारस करतों. शत्रूचा पाडाव करणें असल्यास हातांतील शस्त्राची धार जितकी उपयोगीं पडेल तितका तीशिवाय नुसता मनगटाचा जोर कामास येणार नाहीं हें त्यानें पक्कें लक्षांत ठेवावें. आतां आपल्या धर्माच्या तर्फेनें भांडून त्याच्या प्रतिपक्ष्यांचें खंडण करणें हाच जर त्याचा उद्देश असेल तर तो आमच्या लोकांस कांहींसा मानवेल यांत संशय नाहीं; व पाद्री, बाटे वगैरे लोकांच्या जो तोंडीं लागेल त्यानें कांहीं अंशीं जशास तसें केल्यावांचूनहि उपाय नाहीं हें खरें आहे. तरी या कामींहि आमच्या देशबंधूनें आपली इतकी विटंबना करून घ्यावी हें आह्मांस सहन होत नाहीं. हा दोष राहिलेल्या दुसऱ्या पुस्तकांत मात्र अगदीं दिसत नाहीं. पण त्यांत भाषाशुद्धीकडे चांगली नजर दिलेली नसते. शिवाय विषयांचीही निवड ह्मणण्यासारखी चांगली नसते. ज्या विषयांची माहिती वाचकांस मजेची वाटून उपयोगाची होईल, असेच विषय प्राय: मासिक पुस्तकांतून असावे. तादृश प्रसिद्ध नसणाऱ्या पुरुषांचीं चरित्रें, दूर देशांचें वर्णन, मराठींत नीरस वाटणारीं भाषांतरें हीं त्यांत कामाचीं नाहींत. असो; एकंदरींत सर्वांपासून भाषेस बराच फायदा होईलसा सुमार दिसतो.

१४. आतां एका प्रकरणाविषयीं मात्र विचार करावयाचा राहिला. तें इतर ग्रंथांचा भरणा आपल्या भाषेंत जो कांहीं झाला आहे व होत आहे त्याविषयीं होय. हा भरणा जरी अद्याप मोठासा झाला ह्मणतां येत नाहीं, तरी त्या सर्वांविषयीं यथायोग्य लिहिणें बऱ्याच वेळाचें व विचाराचें काम आहे. यास्तव त्याविषयीं येथें विशेषत: कांहीं न लिहितां सामान्यत: कांहीं निरूपण करतों.

इंग्लिश भाषेंत पहिल्यानेंच गति होऊन तींतील सुरस ग्रंथांची आपल्या लोकांस जेव्हां गोडी लागली, तेव्हां त्यांसारखें आपल्याहि भाषेंत कांहीं करावें अशी त्यांस सहजच मोठी हौस वाटली. मग पुष्कळांनीं हा उद्देश भाषांतरद्वारां सिद्धीस नेला. यांच्या योगानें लोकांचें पुष्कळ हित झालें, व इंग्रेजी भाषेची योग्यता सर्वांस स्पष्टपणें कळून आली. पुढें कित्येकांनीं यावरहि तोड करण्याचें मनांत आणिलें. कोणीं इंग्रेजी ग्रंथांच्या नमुन्यावर कल्पित कथा, नाटकें, व इतर ग्रंथ केले; व कोणीं इंग्रेजींतीलच गोष्टींचें देशाचारानुरोधानें रूपांतर करून मराठी ग्रंथ बनवले. तशींच संस्कृतांतूनहि काव्यादि ग्रंथांचीं भाषांतरें होऊन भाषेची व रसिकत्वाची लोकांत वृद्धि होण्यास बरींच कारणें झालीं. असो; याप्रमाणें तऱ्हेतऱ्हेचे ग्रंथ होऊन मराठीस पुष्कळ शोभा येत चालली होती. पण पुढें हळू हळू विद्वानांची तिजवर अवकृपा होऊं लागून पहिलें मान फिरतां फिरतां आतां अगदीं फिरून गेलें. तिचीं सूत्रें ज्यांनीं हातांत वागवावीं त्यांनीं तीस सोडल्यापासून तिजवरची कळा उडत चालली. तिच्याविषयीं कळकळ बाळगणारे असे कोणी राहिलेच नाहींत. नाहीं ह्मणण्यास सध्यां दोघांचा मात्र आश्रय तीस उरला आहे. एक पाद्री लोकांचा; व दुसरा तिजवर उपजीवन करणाऱ्या ग्रंथादि कर्त्यांचा. पण या आश्रयाची योग्यता कितपत आहे हें सांगणें नको. मिशनरी लोकांच्या लेखांत तर मराठीचें रूप कित्येक ठिकाणीं असें चित्रविचित्र दृष्टीस पडतें कीं, 'ती बेबलच्या बुरूजावरील भाषेचीच बहीण' शोभेल! ती समजण्यास धोतर नेसलेला, शालजोडी पांघरलेला व डोक्यावर साहेबी टोपी घातलेला महाराष्ट्रसंस्कृतांग्लभौमभाषाभिज्ञ महापंडितच आणून पुढें उभा केला पाहिजे! दुसरा मोठा आधार अर्थलुब्ध लोकांचा. अशांचे ग्रंथ कित्येक असे भासलेदार आहेत कीं, त्यांत चोहोंकडे हिंडलें असतांही अर्थाचा पत्ता लागत नाहीं. दुसऱ्यांचें इकडून तिकडून चोरून आणून सरासरी पानांची भरती करून दिलेली असते.

१५. पण यावरून सध्यां छापलीं जाणारीं सारीं पुस्तकें येथून तेथून अगदीं नादान असतात असा आमच्या लिहिण्याचा अभिप्राय कोणी समजूं नये. तरी सत्परीक्षकांचा बहुधा अभावच असल्यामुळें चांगल्यांस व वाईटांस हल्लीं एकाच पंक्तींत बसणें येतें हें खरें. सध्यां लिहिण्याची हौस एकंदर लोकांत पुष्कळांच्या ठायीं दृष्टीस पडते; तेव्हां या सर्वांचे लेख सारख्याच योग्यतेचे असतील हें तर मुळींच संभवत नाहीं. न्यूनाधिकभाव वस्तुगत्याच असायचा. पण हा समजावा कोणास? स्वत:च्या रूपाची आपल्याच डोळ्यास प्रतीति पडणें जसें केवळ अशक्य, तसेंच आपल्या ठायींचे गुण उत्कृष्ट असले तरी ते आपले आपणास पहिल्यानेंच कळणें स्वभावींच शक्य नव्हे. हें ज्ञान पहिल्याचें जसें आरशानें वगैरे होतें तसें

दुसऱ्याचें यथार्थोपकीनें होतें. येथवर दोहोंचें सादृश्य ठीक आहे; पण पुढें त्यांत एकासंबंधानें मोठाच भेद नजरेस येतो. तो हा कीं, पहिला प्रत्यय करणें असें अगदीं सुलभ आहे तसें दुसऱ्याचें नाहीं. अगोदर यथार्थ ज्ञान कठिण; मग त्याहून एके पक्षीं निर्मत्सरता, व दुसरे पक्षीं स्पष्टवक्तेपणा हा तर विरळच. सारांश, ग्रंथांची यथार्थ परीक्षा करणारे असले, म्हणजे चांगल्यावाईटाची तेव्हांच निवड होते; व चांगल्यांस उत्तेजन मिळून भाषेचें उत्तरोत्तर हित होत जातें. पण सध्यांची स्थिति त्या प्रकारची नसून कांहीं विलक्षणच आहे. ग्रंथकर्त्यास प्रसिद्ध होण्याचे तीन मार्ग आहेत. एक त्यानें स्वत:च्या जोखमविर आपलें पुस्तक छापावें,- म्हणजे लोकांकडून आश्रय मिळाला तर नशीब, नाहीं तर सरासरी छापणावळ तरी काढ- ण्यापुरते कोणा विद्याखात्यांतील अधिकाऱ्याचें आर्जव करावें. या मार्गानें अवलंबन ज्यास पैशाची कमताई आहे त्याच्या हातून तर अर्थात् होतच नाहीं. तेव्हां नुसत्या प्रसिद्धीचा मार्गहि पैशाखेरीज कोणास अनुकूल नाहीं, व यामुळें कोणाचे ठायीं कसाही गुण असला तरी ठिकाणच्या ठिकाणींच मुरून जाण्याखेरीज त्यास गत्यंतर नाहीं. दुसरा मार्ग दक्षिणा- प्रैज कमिटी. हा मार्ग वरच्याहून सोईवार खरा; पण या सभेकडे आपला ग्रंथ पाठवि- ण्याचा धीर येण्यास ग्रंथकर्त्यास आपली योग्यता बक्षिसापुरती आहे एवढा तरी भरंवसा पक्का असला पाहिजे. हा त्यास कसा यावा ? कोणाच्या अंगीं योग्यता वास्तविक अस- तांहि ती त्यास परप्रत्ययाशिवाय भासत नाहीं, व कोणाच्या अंगीं ती थोडी असतां किंवा मुळींच नसतांहि स्वाभिमानास्तव मोठी वाटते. यास्तव प्रस्तुत उद्देश पुरता सिद्धीस जात नाहीं. तिसरा मार्ग विद्याखात्याचे मुख्य अधिकारी यांकडे अर्ज. येथें तरी बरचीच अडचण–म्हणजे आपल्या योग्यतेचा पक्का भरंवसा आधीं असणें, ही आहेच; पण एवढीच असती तर पुरवती ! एखाद्या चांगल्या अभिज्ञाकडून आपला ग्रंथ मान्य होईल कीं नाहीं याविषयीं अभिप्राय घेतां येतो; पण इतकी तयारी करूनहि वरील अधिकारी तो पसंत करतातच असा काय नेम आहे ? त्यांचा अनन्यभाव दोघां दुसऱ्या कामगारांवर. ते सांगतील तो अखेरचा निकाल. इंग्रेजी वैद्यकांत निष्णात म्हणविलेल्या डाक्तरांचा अभिप्राय जसा वज्रलेप, त्यावर कोणाची कोटीच चालणें नाहीं; त्याचप्रमाणें वरील दोघांचें मत जें एकदां ठरेल तें कायम, त्यांत चुकीचा संभवच रहात नाहीं ! आमचें सरकार त्यांस हुद्द्याचा किताब देतें त्याबरोबरच इटली देशाच्या पोपाप्रमाणें त्यांस प्रमादराहित्याचा महा अधिकारही देत नसेल ना ! ! कोणीं सांगावें ?——पण सामान्यजनाच्या समजुतीस तर त्यांच्या प्रमादाभावाचा व सर्वज्ञतेचा त्यांच्या अभिप्रायांशीं मेळ घालतां घालवत नाहीं असें अनेक वेळां होतें ! ग्रंथकर्त्यानें डोळ्यांत तेल घालून व कितीहि अचाट श्रम करून ग्रंथ तयार केला असो; त्याची योग्यता एका क्षणार्धांत ओळखून एका टाकासरसा त्याचा निकाल फाडकन् पाडण्याची त्यांची शर्थ खरी ! एरवीं साधारणरीत्या पाहिलें तर कामाका- जास ठेवलेल्या चाकरमाणसांशीं त्यांच्या भाषाज्ञानाचा प्रकाश पडत नाहीं, सरासरी खुणा- खाणांनींच व्यापार चालतो; सभासदाच्या नात्यानें एखाद्या पुस्तकावर मत देणें आल्यास दुसऱ्याच्या—व विशेषत: चिटणीसांच्याच—अभिप्रायावर निर्वाह करणें भाग पडून तें एका

ओळीवर कधींहि लांबत नाही; पण एखाद्या हतभाग्य ग्रंथकाराचें दुर्दैव उभें राहून त्याच्या श्रमांचा निकाल जेव्हां त्यांस स्वतंत्रतेनें करणें पडतें, तेव्हां त्यांस अकस्मात् कोठून स्फूर्ति होत असेल ती परमेश्वर जाणे! या घडघडीत अंधाराची जेव्हां जेव्हां आह्मांस आठवण होते, तेव्हां तेव्हां सरकारच्या असमंजसपणास किंवा जात्यभिमानास, अथवा या कामगारांच्या धृष्टतेस, यांतून कशास जास्त हंसावें हें आह्मांस कळत नाहीं! हा एक प्रकार तर शुद्ध अज्ञानाचा व घमेंडीचा झाला. आतां दुसरा प्रकार जो आह्मी सांगणार तो यासारखा केवळ हास्यास्पद नाहीं; तरी अनर्थमूलक होय यांत संशय नाहीं. या दुसऱ्या सरकारतर्फेच्या परीक्षकास देशभाषेचें ज्ञान उत्कृष्ट आहे खरें; पण लिहिण्यास खेद वाटतो कीं, ग्रंथाच्या व्याकरणशुद्धीपलीकडे त्याचें लक्षच पोंचत नाहीं. गद्य असो, पद्य असो, शास्त्रीय विषय असो; त्यांत ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा, अनुस्वार, शुद्ध प्रयोग, इतकीं त्यानें बसवलेल्या नियमांस अनुसरून असलीं कीं ग्रंथ चांगला; नाहीं तर वाईट. असो, याप्रमाणें सरकारतर्फे ज्यांच्या हातून ग्रंथांची पारख होते ते त्या कामास यथायोग्य नसल्यामुळें भाषेचे फार हाल होतात. जे ग्रंथ छापखान्यांतून निघून लोकांचे हातीं पडल्यावर लवकरच वाण्याच्या घरीं वास करावयास योग्य, अशांचें मोठ्या चमत्कारानें दैव उघडून त्यांची शाळांतून गर्जना ऐकूं येते; व ज्यांची चोहोंकडे मानमान्यता व्हावी त्यांचीं फारशी पुस्तापारखही न होऊन ते कोनाकोपऱ्यांत कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडतात. असा उलटा न्याय झाल्याचीं उदाहरणें आमच्या अभिज्ञ वाचकांस ठाऊक असतीलच; वास्तव वरील उल्लेखांत केवळ अत्युक्ति केली नाहीं अशी त्यांची खचित खात्री होईल. असो; आतां या अनर्थाच्या परिहारार्थ आह्मांस एकच कांहीं अंशीं आपल्या हातचा असा उपाय सुचतो तो येथें सांगतों. पत्रकर्त्यांनीं व मासिकपुस्तककारांनीं सध्यांप्रमाणें नुसती उडवाउडव न करितां जे ग्रंथ त्यांकडे येतील त्यांवर निर्भीडपणानें व निष्पक्षपातबुद्धीनें आपले अभिप्राय प्रगट करावे. तसेंच चांगले असून मागें पडलेल्या ग्रंथांचीहि योग्यता लोकांस लक्षांत आणून देण्याचा यत्न करून फुकट मिरवणाऱ्या हल्लींच्या ग्रंथांची चांगली चर्चा करावी हें कृत्य भाषेस किती हितावह होईल हें सांगणें नको.

---

## प्रस्तुत मालेचा उद्देश.

पिबामः शास्त्रौघान्! उत विविधकाव्यामृतरसान्! भर्तृहरि.

अंक २ रा.—(१) सध्यांची चोहोंकडची गडबड. (२) भाषेच्या संबंधानें उद्योग; पत्रें पुढें सरसावून पुस्तकें मागें पडल्याचीं कारणें. (३) पत्रें व मासिक पुस्तकें यांचें विभक्त होणें (४) मासिक पुस्तकांचा इतिहास—नव्या जुन्यांची तुलना. (५) अशा पुस्तकांची मूळ कल्पना; ती नीट न उचलल्यामुळें कित्येक पुस्तकांत आलेले मोठे दोष. (६) मासिक पुस्तकाच्या खऱ्या स्वरूपाविषयीं मत; त्यापासून झालेलें लोकहित. (७) तसें हल्लीं होण्यास कोणती गोष्ट कमी आहे? (८) अशा पुस्तकांपासून आपणांस होणारे फायदे—(९) मराठीच्या द्वारें सामान्य लोकांस ज्ञान. (१०) ग्रंथाभिरुचीची वृद्धि. (११) भाषेचें पुनरुज्जीवन, विटंबनानिवारण, आणि अभिवृद्धीस आरंभ. (१२) आणखी एक उपयोग. (१३) पुनः सूचना.

मागील अंकांत मराठी भाषेचें एकंदर स्वरूप व ती सध्यांच्या काळीं कोणत्या स्थितीस येऊन पोंचली आहे याविषयीं थोडेंसें निरूपण केलें. आतां यांत सांप्रत पुस्तक सुरू करण्याचा हेतु काय याविषयीं पहिल्याहून जास्त विस्तारानें येथें लिहितों.

१. अलीकडे दोन तीन वर्षांत चोहोंकडे मोठी गडबड होऊन गेली आहे. पूर्वीप्रमाणें केवळ वाक्पांडित्य न चालतां देशहितार्थ पुष्कळ उद्योग जिकडे तिकडे खरोखरीं होऊं लागला आहे हें मोठें सुचिन्ह होय. लोकशिक्षण, वर्तमानपत्रें यांचा पुष्कळ फैलावा होऊन लोकांत ज्ञान व समजूत हीं दिवसेंदिवस वाढत चाललीं आहेत. आपलें शहाणें इंग्रजसरकार आपल्या पाठीवर असतां आतां आपणांस काय कमी ? दिवसेंदिवस हिंदुस्थानची संपत्ति वाढून उत्तरोत्तर तीस इंद्रभुवनाचें साम्य येत चाललें आहे; आज आगगाडी झाली, उद्यां तारायंत्र झालें, परवां सूर्यकिरणांनीं क्षणार्धांत तसबीर काढण्याची अलौकिक कला या देशांत आली.—अहो काय आमचें भाग्य ! पेशवाईंत कोणाच्या स्वप्नीं तरी या गोष्टी होत्या काय ? आज हजारों वर्षें जीं हिंदुस्थानचीं गेलीं ती एक महाराात्रच गेली, आज परमेश्वरानें महाभाग्याचा सुदिन दाखविला;–असे प्रमादजनित उद्गार नुकते नुकते ऐकूं येत होते, त्यांचा घोष अजून आमचे कानांत घुमतो आहे ! पण या समजुती आतां बऱ्याच पालटत चालल्या आहेत; विलायतेंतील कांहीं थोड्या थोर लोकांचीं कशीही मतें असलीं, तरी चार हजार कोसांवरून या उष्ण देशांत येऊन व गेलीं शंभर वर्षें सतत युद्धप्रसंग करून जे लोक आपले धनी होऊन बसले त्यांनीं एवढी यातायात केवळ परोपकारबुद्धीनें केली नाहीं, व हिंदुस्थानचें राज्य करण्यांत या देशाच्या हिताव्यतिरिक्त त्यांचे कांहीं तरी हेतु असावे, हें आतां सर्वांच्या मनांत वागूं लागलें आहे. असो; वरच्या लिहिण्यानें हल्लींच्या राज्याचा आह्मी द्वेष करतों, किंवा त्यानें आपल्या देशावर जे अपरिमित उपकार आजपर्यंत केले व अजूनही करीत आहे ते आह्मी जाणीत नाहीं, असें नाहीं. आह्मांस तर असें वाटतें कीं, असे विचार करण्याची आमच्या अंगीं शक्ति आणून त्यांचा उल्लेख उघडपणें करण्याची जी मोकळीक आमचे सरकार आह्मांस देत आहे, यापरतें औदार्य कोणतेंहि नाहीं ! तें मनांत येऊन वरच्या सारखे लेख लिहितांना कृतघ्नत्वशंकेनें लेखणी वरचेवर अडखळते. असो; वरील लेखांत आमच्या लोकांची कच्ची समजूत, व आपण सुस्त बसलों तरी देशाची भरभर आपोआप चालणार आहे हें वेडें मत, या दोहोंवर आमचा मुख्यतः रोख होता; पण हीं दोन्ही आतां कमी होऊन स्वतःच्या उद्योगाखेरीज राज्यकर्त्यांचें शहाणपण व उदारपण हीं आपल्या कामास येणार नाहींत असें लोकांस भासूं लागलें आहे.

२. सध्यां भाषेच्या संबंधानें जो उद्योग चालू आहे तो मुख्यतः वर्तमानपत्रांच्या रूपानें चालतो आहे. यांत गेल्या आठ दहा वर्षांत जितकी सुधारणा झाली व दिवसेंदिवस होत आहे, तशी मासिक पुस्तकांत व इतर ग्रंथांत म्हणण्यासारखी झाली नाहीं व होतही नाहीं, ही गोष्ट एका प्रकारें आश्चर्याची होय. कां कीं, इतक्यां काळांत साधारणतः विद्येचा इतका फैलावा झाला असतां व तिचीं साधनें इतकीं वाढलीं असतां वर्तमानपत्रांची जशी भरभर झाली तशी पुस्तकांचीच कां होऊं नये ? असें होण्यास दोन तीन गोष्टी कारणभूत,

झाल्या आहेत असें आह्मांस वाटतें. एक तर मागील अंकांत सांगितलेली विद्वान् लोकांची मराठी भाषेविषयींची उपेक्षाबुद्धि. दुसरें वर्तमानपत्रेंच वाचण्याकडे जुन्या नव्या अशा एकंदर लोकांची प्रवृत्ति. ही प्रवृत्तिच वर्तमानपत्रांच्या एवढ्या उत्कर्षाचें कारण व कार्यही होय;– ह्मणजे तिच्यामुळें त्यांचा एवढा फैलावा झाला व होत आहे; व हा फैलावा झाल्याकारणानें ती अधिक प्रबळही झाली आहे. लोकांच्या सामान्यतः ज्या नव्या समजुती झालेल्या दृष्टीस पडतात त्या सर्वांस हीं पत्रें कारण होत, व एका प्रकारचें ज्ञानही लोकांत प्रसृत करण्यास तीं उपयोगीं पडतात. यास्तव त्यांची वृद्धि एके रीतीनें अत्यंत अभिनंदनीय होय. तरी वर्तमानपत्रांची योग्यता लोक वास्तविकपणें जाणीत नाहींत हें येथें लिहिणें अवश्य वाटतें. त्यांची समजूत अशी झाली आहे कीं, ज्ञानप्राप्तीचें परमस्थान ह्मणजे हीं पत्रें होत; त्यांच्या पलीकडे ज्ञानाचा मार्गच नाहीं. या समजुतीचें उत्कृष्ट प्रमाण पुस्तकालयांची जी स्थिति दृष्टीस पडते ती होय. पुस्तकगृह हें सुधारणुकीचें एक मोठें कलम आहे असें जाणून त्यांची स्थापना लहानसहान गांवांतून सुद्धां झाल्याचें वरचेवर वाचण्यांत येतें. पण स्थापनाचा समारंभ होऊन त्यावर एकदां अक्षता पडल्या कीं आटपलें; तेव्हांपासून त्यांची चालना फार करून केर झाडणाऱ्या गड्याच्या हातूनच कधींमधीं होत असेल ती असेल. त्यांच्याहून मऊ हाताचा स्पर्श पुस्तकांस बहुधा होत असेलसा दिसत नाहीं. असो;. याप्रमाणें मोठमोठे ग्रंथ नीट लक्ष्यपूर्वक वाचून ज्ञानभांडार सांठविण्यापेक्षां वर्तमानपत्रांतीलच क्षणिक महत्त्वाच्या गोष्टी मनास सहजरीत्या करमणूक करून घटकाभर गप्पा मारण्यास उपयोगीं पडण्याकरितां लोक वाचतात व ही ढब पडून गेल्यामुळें अर्थातच पत्रें पुष्कळ वाढून पुस्तकें मागें पडलीं. तिसरें कारण वर्तमानपत्रें चालविणें पुस्तकांहून पुष्कळ सोपें पडतें हेंही असावें. बातम्या वगैरे तर सारी पत्रें एकमेकांतून घेतातच; शिवाय नोटिशी, पत्रें, जाहिराती यांनींहि पुष्कळ भाग साजरा होऊन खेरीज मिळकतही होते. येऊन जाऊन पत्रप्रकाशकास स्वतःचा असा मजकूर दर खेपेस पराकाष्ठा दोन तीन घरें घालणें येतें. तो लिहिण्यास नेहमीं कोहींना कांहीं तरी लौकिक विषय बहुधा उपस्थित झालेला असतोच; व इतरांनीं प्रकट केलेले विचारहि त्या संबंधें त्यास उपयोगीं पडण्यासारखे असतातच. पण या सर्वांहून मोठी गोष्ट ही कीं, वर्तमानपत्रांतील मजकूर कसाही असला तरी तो लोकांपुढें फार वेळ रहात नाहीं. वाचणारे आधीं तो भराभर वाचून जातात; व पुढील अंक आला कीं मागचा मागें पडून जातो. पण पुस्तकांची गोष्ट फार वेगळी. त्यांत दर वेळेस कांहीं तरी नवें असावें लागतें; व इतर पुस्तकांतील उतारे त्यांत राजरोस घेतां येत नाहींत. शिवाय त्यांत जो लेख एकदां पडला तो पडला, त्याची चर्चा होण्याचा पुष्कळ दिवस संबंध असतो; कां कीं, वर्तमानपत्रांप्रमाणें तो वर्षासहामहिन्यांत वाण्याचें दुकान पाहून प्रायः निर्भय होत नाहीं. याप्रमाणें पुस्तकाचीं इतकीं सर्व पानें स्वतःच्या मजकुरानें भरून शिवाय त्यांत दोष न रहाण्याविषयीं मोठी खबरदारी ठेवावी लागते.

पुस्तकें मागें पडल्याचीं आमच्या मतें हीं तीन कारणें होत. यांपैकीं पहिलीं दोन पुस्तकांच्या वृद्धीस फारच प्रतिबंधक आहेत; पण तीं नाहींशीं झालीं तर तिसरें मुळींच

उरणार नाहीं. असो; अतां पुस्तकांची वृद्धि होणें देशसुधारणुकेस किती आवश्यक आहे, तीं कशानें होते, वगैरे गोष्टींविषयीं विचार करूं.

३. कांहीं वर्षांमागें वर्तमानपत्रांतून सर्व प्रकारच्या गोष्टी असत,—म्हणजे वर्तमानें व्यापारासंबंधीं माहिती, देशस्थितीवर विचार इत्यादि आतांप्रमाणें असून शिवाय भाषेसंबंधींही मजकूर असे. निबंध, पुस्तकावर टीका वगैरे पत्रकर्ते लिहीत, व इतर लोकहि तसा मजकूर प्रसिद्ध करण्याकरितां त्यांकडे पाठवीत. पण आतांशा तसा प्रकार मुळींच नजरेस येत नाहीं. हें पत्रांच्या नांवाखालीं जी प्रतिज्ञा असते तिशीं विसंगत दिसतें; व ज्या सदरांस पुढारीपणाचा मान दिला असतो त्याची दाद वर्षानवर्षे लागत नाहीं हें मोठें हास्यास्पदही होय. आतां हा विसंगतपणा वाचकांस जर भासत नाहीं, तर पत्रकर्त्यांनीं तरी त्याबद्दल कशाला उठाठेव करावी, हें खरें आहे. पण जर वाचकांचें त्यावांचून चालतें, व पत्रकर्त्यांसहि त्याबद्दल उठाठेव करण्याचें नको, तर वर सांगितलेलें सदर मुळींच कां काढून टाकूं नये?—किंवा तें उगीच ठेवावयाचें तर दुसऱ्या तिहींच्या शेवटीं घालावें, हें तरी कांहीं बरें; असो; याप्रमाणें भाषेसंबंधी विषयांत वर्तमानपत्रांतून अलीकडे अगदीं थारा नाहींसा झाला आहे ही गोष्ट एके प्रकारें फार चांगली झाली. कारण, पत्रकर्त्यांनीं आपली हद्द नीट रेखून खुद्द भाषेचा विषय–जो वास्तविक त्यांचा नव्हे—तो निराळा केला. तो अर्थातच आतां मासिक पुस्तकें व इतर ग्रंथ करणारांकडे आला. यास्तव आह्मी अशी उमेद बाळगतों कीं, वर्तमानपत्रकर्त्यांनीं आपलें काम जसें खबरदारीनें सांभाळलें आहे तसेंच आमचे पुस्तककर्तेहि करून मागें पडल्याचा जो टपका त्यांवर आहे तो ते लवकरच काढून टाकतील.

४. या ठिकाणीं मासिक पुस्तकांचा इतिहास–म्हणजे हा प्रघात इकडे केव्हां कोणीं पाडला, तीं पहिल्यानें कोणत्या प्रकारचीं होतीं व त्यांचें स्वरूप आतां कसें आहे, वगैरे गोष्टींविषयीं पूर्णपणें लिहिणें आमच्या मनांत होतें. पण तीं पुस्तकें आमच्यापाशीं सगळीं नसल्यामुळें व त्यांविषयींची विशेष माहिती होण्याचाही आह्मांस कधीं योग न आल्यामुळें तें आमच्यानें करवत नाहीं. तरी जवळ असणाऱ्या सामग्रीवरून आह्मांस जें कांहीं वाटतें तें येथें वाचकांस सादर करितों. हा प्रघात पहिल्यानें बाळ गंगाधर शास्त्री नामें करून जो प्रसिद्ध विद्वान् आपणांमध्यें प्रथम होऊन गेला त्यानें घातला असें दिसतें. ते 'त्रैमासिक ज्ञानदर्शन' नांवाचें एक पुस्तक काढीत होते. तशींच त्या वेळेस 'दिग्दर्शन', 'चंद्रिका' 'ज्ञानप्रसारक' हींही मासिक पुस्तकें निघत असत. या सर्वांवरून त्या वेळेस इंग्रेजी भाषेच्या द्वारें जें ज्ञान आपणांस नुकतें होऊं लागलें होतें तें आपल्या भाषेच्या द्वारें प्रगट करण्याची पुष्कळांस हौस होती असें दिसतें. वरील सर्व पुस्तकें त्या वेळेस लोकांस फार आवडत होतीं; कारण इंग्रेजी विद्येचा त्या वेळेस थोडथोडा नुकता प्रचार होऊं लागला असल्यामुळें वर्तमानपत्रेंही थोडींच निघत, यामुळें एकंदर लोकांस ज्ञानाचा मार्ग हाच काय तो एक

१ या प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र 'नवचरित्र' नामक पुस्तकांत थोडेंसें लिहिलें आहे तें वाचण्यास आमच्या वाचकांस आह्मी शिफारस करतों.

होता. तसेंच या पुस्तकांतून मनोरंजनाचे व अनेक प्रकारची माहिती होण्यासारखे विषयही असत. अलीकडे जीं थोडीं पुस्तकें चालू आहेत तीं तरी त्यांच्याच धाटणीवर मुख्यतः निघालीं आहेतसें दिसतें. यांची व पूर्वींच्यांची तुलना करून कित्येकांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, पूर्वींच्यांची सर यांत कांहींच येणार नाहीं. हें मत आह्मांस बहुतेक अंशीं अत्युक्तीचें दिसतें. दोहोंची निष्पक्षपातबुद्धीनें जर परीक्षा केली तर वरील मतास कोणी फारकरून मिळणार नाहीं अशी आह्मांस खात्री वाटते. आतां हें खरें कीं अशीं पुस्तकें अजून फारच थोडीं निघतात, व हल्लींच्या विद्याप्रसाराच्या मानानें तीं जशीं उत्कृष्ट चालावीं तशींही चालत नाहींत. तरी गेल्या वीस वर्षांत आमच्या लोकांच्या बुद्धीची तीव्रता कमी होऊन तीस विशेष मौढ आलें असेलसें आमचें मन अगदीं घेत नाहीं!

५ मासिक पुस्तकांची कल्पना फार अलीकडची आहे. खुद्द इंग्लंड देशांतच तीं निघाल्यास सुमारें दीडशें वर्षे झालीं. आडिसन् नामक कवि पहिल्यानें नामांकित निबंधकार झाला; त्याच्यापुढें जॉन्सन्, गोल्डस्मिथ्, वगैरे झाले. यांचे निबंध अगदीं लहान— म्हणजे सामान्य पुस्तकाचीं दोन तीन पृष्ठें इतकेच—असत. पण पुढें या शतकाच्या आरंभीं तें मान फिरलें. तोंपर्यंत एकंदर लोकांत ज्ञानाची पुष्कळ वृद्धि होत गेल्यामुळें पहिले निबंध फारच लहान वाटून ते सरासरी लहानशा पुस्तकाएवढे मोठे निघूं लागले. या अलीकडील निबंधकारांत मॅकॉले हा फार प्रख्यात झाला. याच्यापुढेंहि अर्थात् तोच मोठमोठे निबंध लिहिण्याचा क्रम अजून चालू आहे. असो; हें इतकें येथें लिहिण्याचें कारण हेंच कीं, वरील निबंधकाराचें अनुकरण करतांना आमचे मासिकपुस्तककार देशस्थितीचा नीट विचार करीत नाहींत. पहा कीं, मागील पुस्तकांत अग्रगण्य असें जांभेकर यांचें 'त्रैमासिक ज्ञानदर्शन' हेंच असे. 'त्रैमासिक', या शब्दावरूनच तें विलायतेंतील 'एडिन्बरो', 'क्वार्टरली' अशा पुस्तकांच्या नमुन्यावर येथें सुरू केलें होतें हें स्पष्ट आहे. ज्यांची बुद्धि एवढी विशाळ होती कीं, एकोणिसाव्या वर्षी विद्यालयांत विद्यागुरु होऊन तें काम वजनदारीनें चालविण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य आलें, त्यास 'एडिन्बरो' त्रैमासिकासारख्या पुस्तकांतहि लिहिणें मोठेंसें कठीण नव्हतें; पण त्यांची मोठी बुद्धि व विद्वत्ता ही त्यांच्या वाचकांस काय होय! त्यांच्याकरितां ह्मणून जर पुस्तक चालवायाचें, तर त्यांतील विषयांचें ग्रहण करण्यास त्यांची बुद्धि समर्थ होईल कीं नाहीं हा विचार पहिल्यानें करावयास नको काय! भूगर्भ,-शास्त्र, नीतिशास्त्र, युरोपखंडाचा इतिहास इत्यादि विषय समजण्यापुरती त्या काळीं कितीकांची बुद्धि पोक्त असेल! एवढाले विषय अजूनही आमच्या मासिक पुस्तकांतून खास शोभणार नाहींत. हीच चूक सध्यांच्याही पुस्तकांतून दृष्टीस पडते. अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, असे या पुस्तकांतील विषय कोण वाचीत असतील ते असोत! ज्यांनीं इंग्रेजींत ते विषय समजून घेतले आहेत त्यांस तर त्यांतून ते वाचण्याची गरज नाहींच; व ज्यांस इंग्रेजी कळत नाहीं त्यांस हे किती गोड लागत असतील कोण जाणें! त्यांतून इंग्रेजी तर्कशास्त्रावरून मराठींत त्या विषयावर ग्रंथ लिहिणें हें तर आह्मांस फारच विलक्षण वाटतें! एक तर या शास्त्राचा व्यवहारदृष्ट्या प्रायः मुळींच उपयोग नाहीं—ह्मणजे तर्कशास्त्र उत्तम पढिलें कीं सर्व खोटीं

मतें नाहींशीं होऊन मन सत्यमय होतें असें नाहीं व हें शास्त्र न पढतांहि पुष्कळांची सत्यासत्यविवेचनशक्ति प्रखर असते असेंहि पण आढळतें. दुसरें असें कीं, या शास्त्रावर संस्कृतांत ग्रंथ असल्यामुळें याच द्वारें त्याचें ज्ञान वाचकांस करून दिलें तर त्यापासून मराठी वाचकांस अधिक उपयोग होणार आहे. असो; याप्रमाणें वरच्यासारख्या गहन शास्त्रांवर लिहिण्याचा जो उद्योग आमचे मासिक पुस्तककर्ते करतात तो आह्मांस अगदीं व्यर्थ वाटतो. तरी पण अशीं शास्त्रें सुद्धां त्यांतून अगदींच असूं नयेत असें आमचें मत नाहीं. तीं कोणत्या प्रकारें असावीं हें खालीं लिहिण्यांत येईल.

६. तर मग मासिक पुस्तक असावें तरी कसें ? त्याचा उद्देश कोणता ? वगैरे सहजच विचारणें येतें. याविषयीं आह्मांस जें वाटतें तें येथें लिहितों. मासिक पुस्तकाचा उद्देश बहुश्रुतपणा होय---म्हणजे तीं वाचलीं असतां थोड्या वेळांत सहज मौजेनें पुष्कळ ज्ञान नानाविध विषयांचें व्हावें. हें ज्ञान त्या त्या विषयावरील मोठमोठे ग्रंथ वाचूनही होतेंच,---व पूर्ण ज्ञान होण्यास ते मोठेच ग्रंथ वाचले पाहिजेत---पण वाचकांस सामान्यतः हा मार्ग फार कठिण व कंटाळवाणा वाटून त्यांची उमेद खचते, व निराश होऊन तो उद्योगच ते बहुधा सोडून देतात. यास्तव मोठमोठ्या कठिण पहाडांतून घाट बांधले असतां वाटसरांची जी सोय होते तीच ज्ञानेच्छु लोकांस मासिक पुस्तकांनीं होते;--ह्मणजे मोठमोठे गहन विषयही सामान्य बुद्धीच्या लोकांस सुद्धां गम्य होऊन,पुनः श्रम होत नाहींत.असा सहज रीतीनें एकदां प्रवेश झाला ह्मणजे पुढील मार्ग क्रमण्यास उमेद येऊन तितके आयास पडत नाहींत. हा प्रकार फार प्राचीन काळीं किंबहुना पांचशें वर्षांपूर्वी युरोपखंडांतही मुळींच अशक्य होता. कारण मुद्रणकलेचें ज्ञान त्या वेळेस नसल्यामुळें कोणीं तसे दिग्दर्शनरूप ग्रंथ केले असते तरी त्यांचा लोकांत प्रसार होणें फारच कठिण होतें. पण हल्लींच्या काळीं वरील कला पूर्ण दशेस आल्यामुळें, व दुसऱ्याही शेंकडो सोयी नव्या झाल्यामुळें, ज्ञानाचा प्रसार आतां फारच त्वरेनें होऊं लागला आहे. व्यापारास कोणताही अटकाव न राहून पृथ्वीवरील सर्व देशांत सर्व देशांतील जिन्नस जसे सुलभ झाले आहेत, त्याप्रमाणेंच ज्ञानाचा लाभही सध्यांच्या काळीं सर्वथा निष्प्रतिबंध झाला आहे. देशविशेष किंवा स्थितिविशेष आतां पूर्वीप्रमाणें ज्ञानप्राप्तीस अनुकूल किंवा प्रतिकूल असा राहिला नाहीं. मनुष्य राजधानीसारख्या टोलेजंग शहरांत असो, कीं भिकार खेड्यांत असो; घरचा मोठा संपन्न असो, कीं विपत्तीत असो; ज्यास त्यास ज्ञान संपादन करण्याची सांप्रतच्या काळीं उत्कृष्ट सोय झाली आहे. या सत्कृत्याच्या संबंधानें मनुष्याच्या हातून जेवढें होण्यासारखें होतें तेवढे बहुधा आतां झालें आहे. नाहीं ह्मणण्यास आतां दोन मात्र जबरदस्त अडथळे ज्ञानाच्या मार्गांत अजून राहिले आहेत;--एक आळस व दुसरा ढपणा. यांपुढें मात्र छापखाने, आगगाड्या, आगबोटी, इत्यादि ज्ञानप्रसाराचीं साधनें सारीं नाइलाज होऊन हात टेंकतात ! पण इंग्लंडासारख्या देशांत हेंही ह्मणतां येणार नाहीं. आळशी

१ तर्कशास्त्राच्या उपयुक्ततेविषयीं एवढें निक्षून मत आह्मीं आधाराशिवाय लिहिलें नाहीं. याविषयीं ज्यास संशय असेल त्यानें मेकॉलेचा ' लॉर्ड बेकन् ' निबंध पहावा.

लोकांची मिजास सांभाळूनही त्यांस ज्ञानाच्या मार्गांत ओढण्यास कादंबऱ्या, नाटकें वगैरे पुस्तकांची रेलचेल होत असून शिवाय नाटकप्रयोग, भाषणसमारंभ इत्यादि त्याहूनही कमी श्रमाचे प्रकार निरंतर चालू आहेत. मोठा ढ असला तरी तेथें वरचेवर डोळ्यांसमोरून व कानांवरून जाणाऱ्या गोष्टी त्याचे मनांत कांहींना कांहीं तरी बिंबतीलच. सारांश, प्राचीन काळीं महापंडित होणें जितकें कठिण होतें तितकेंच आतां महाशंख होणें कठिण झालें आहे !

७. वरील गोष्ट मुख्यत: इंग्लंडासारख्या देशाची झाली. तिची प्रचीती या देशांतही अलीकडे येत चालली आहे. गेल्या दहा वीस वर्षांत वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, इतर ग्रंथ पुष्कळ वाढल्यानें व मुख्यत: इंग्रेजी भाषेच्या अभ्यासाच्या योगानें साधारण गोष्टींचें ज्ञान पुष्कळ वाढून लोकांच्या समजुतींतही पुष्कळ फेर पडत चालला आहे. पण इंग्रज लोकांच्या सहवासामुळें ज्ञानप्रसार करण्याचीं जीं त्यांचीं उत्कृष्ट साधनें आपणांस अनुकूल झालीं आहेत, त्यांच्या मानानें पहातां वर झालें तें कांहींच झालें नाहीं असें म्हटलें पाहिजे. वरील साधनांचा ते जितका उपयोग करून घेतात त्याचा लक्षांश करून घेण्यापुरती जर आपल्या लोकांत हिंमत असती, तर आजपर्यंत आपल्या देशांतील चालू भाषा, व त्यांत विशेषत: मराठी भाषा आज फारच निराळ्या स्थितींत असती. इतकेंच पहा कीं, इंग्रेज लोकांस संस्कृत भाषेचा शोध[१] लागून नुकतीं पन्नास पाउणशें वर्षें झालीं; पण एवढ्याशा काळांत त्या भाषेच्या संबंधें त्यांनीं किती उद्योग केला ! व अजूनहि किती चालला आहे ! आमच्या देशांतील लक्ष्मी जशी तिकडे जाऊन भरली, तशीच तीहून अमूल्य अशी आमची विद्याही तिकडेच लुटून नेऊन यापुढें तिचें महापीठ तिकडेच स्थापिलें जाणार असा अजमास दिसतो. पण आह्मी असे बहादर कीं, पहिल्या गोष्टीबद्दल कधीं स्वप्नींही खेद न होऊन जसे नेहमीं चैनींत असतों, तसेंच दुसरीविषयींही बेफिकीर असून मांजरपाटी कापडाप्रमाणें आमच्याच मालाच्या रूपांतराचें पुन: रूपांतर करून तें चोहोंकडे मिरवितों. भट्टाचार्य हौग साहेबांनीं आमच्या वेदांचीं मर्में काढलीं--कीं धांवला आमचा 'देशहितेच्छु' पुढें ! साहेबमजकुरांस तीं व्याख्यानें लिहितांना इतका गर्व वाटला नसेल, पण त्यांचा महाप्रसाद झेलून तो आपल्या देशबांधवांस नजर केल्यानें त्यांवर अपार उपकार केल्याची वरील 'हितेच्छु'स केवढी धन्य वाटली असेल ! हें वेदांसारख्या विस्तीर्ण व दुर्बोध ग्रंथांविषयीं झालें. आतां दुसरी मौज पहा. आमच्या भाषेंत कांहीं वर्षांपूर्वी 'वेताळपंचविशी' चें भाषांतर झालें. पण झालें कसें ! संस्कृतांतून थेट मराठींत काय ? नाहीं ! भाषांतरकर्ते प्रस्तावनेंत ती परंपरा लिहितात:—हा ग्रंथ मूळचा संस्कृत; त्या भाषेंतून याचा तर्जुमा फारशी भाषेंत झाला; तींतून इंग्रेजींत; आणि शेवटीं इंग्रेजींतून मराठींत ! ! केवढा द्राविडी प्राणायाम हा !

---

१ 'संस्कृत भाषेचा शोध' हे शब्द आमच्या मराठी वाचकांस चमत्कारिक भासतील. त्यांस येथें सांगणें अवश्य आहे कीं, कलकत्त्यास सर विल्यम् जोन्स् नामें जो विद्वान् न्यायाधीश मागें होता त्यानें सन १७८९ या वर्षी 'शाकुंतल' नाटकाचें भाषांतर प्रसिद्ध करून युरोपांतील पंडितांचें मन आपल्या अन्वर्थ 'संस्कृत' भाषेकडे वेधविलें. तेव्हांपासून युरोपियन विद्वानांची प्रवृत्ति तिजकडे झाली.

इंग्रेजी भाषा ह्मणजे महातीर्थ होय; तींतून आल्याखेरीज कोणत्याही ग्रंथास पवित्रता येणें नाहीं! असो; आपल्या मराठी भाषेविषयीं पाहिलें तरी देखील तिच्या संबंधाचें मुख्य अचाट काम, ह्मणजे कोश, हे इंग्रेजांनींच आपणाकरितां करून ठेवले आहेत. या कोशाची योग्यता अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव आमचे लोक फारशी मानीत नाहींत; पण आमची अशी खात्री आहे कीं, त्यांनीं महाराष्ट्र भाषेवर जे उपकार करून ठेवले आहेत त्यास पार नाहीं! ते तयार करतांना शास्त्री लोकांचें साहाय्य पुष्कळ घेतलें, व दोघां साहेबांस त्या कामाबद्दल सरकारानें मोठें बक्षीसही दिलें, हें खरें आहे; पण येवढ्यावरूनच नाक मुरडण्यास कारण तें कोणतें झालें! तितकें किंवा त्याहून चौपट साहाय्य मिळालें असतें तरी येवढें काम अंगावर घेण्यास आमचे विद्वान् कितीक तयार होते? एखादें मोठें कृत्य करण्याचा बेत करून तें आमच्या लोकांनीं तडीस नेलें असें कोणतें सांपडेल? आमच्या आरंभशूरत्वाचीं कृत्यें एक दोन आहेत काय! सारांश, आपल्या अंगीं गुण नसणें हें एकपरी वाईट; पण ते दुसऱ्याचे ठायीं दिसत असताही त्याचे गुणत्व न भासणें ह्मणजे अंधत्वाची व दुराग्रहाची पराकाष्ठा होय.

हें कांहींसें विषयांतर झालें. तरी त्याच्या योगानें वर सांगितलेल्या गोष्टी जर आमच्या वाचकांच्या मनावर ठसतील तर त्याबद्दल आलेला दोषही आह्मी खुशाल पतकरूं. एकंदरीत आमचें आमच्या लोकांस एवढेंच सांगणें आहे कीं, इंग्लिश लोकांच्या उत्कर्षाचा नुसता हेवा करण्यापेक्षां त्यास कारणभूत जे त्यांचे अनेक गुण त्यांचा मत्सर करणें फार समंजस व अत्यंत हितावह होय. असो; तेव्हां आपल्या सुदैवानें ज्ञानप्रसाराचीं जीं अमोलिक साधनें आज आपणास अनुकूल आहेत त्यांचा उपयोग अद्याप व्हावा तसा झाला नाहीं. हें मनांत वागवून तो करून घेण्यांत आमच्या देशबंधूंनीं अगदीं कसर करूं नये. असें केलें असतां त्यांनीं आपला धर्म जागविला व आपणांस व आपल्या देशास मोठें भूषण आणलें असें होईल.

८. वर मासिक पुस्तकाच्या स्वरूपाविषयीं आह्मीं आपलें मत प्रदर्शित केलें आहे, त्याचप्रमाणें हें पुस्तक करण्याचा आमचा बेत आहे हें सांगायास नकोच. हें प्रस्तुत मालेच्या उद्देशाविषयीं मुख्यत: झालें. आतां अशा पुस्तकांपासून उपयोग कोणकोणते घडणारे आहेत याविषयीं लिहितों.

९. सध्यां असें झालें आहे कीं, मराठी लिहिण्याची इच्छा आहे एकास व शक्ति आहे दुसऱ्यांस. वर्तमानपत्रांत लिहिणारे, त्यांकडे पत्रें पाठविणारे, तसेच या भाषेंत चांगले वाईट ग्रंथ करणारे, हे सर्व लोक बहुधा अर्धेमुर्धे शिकलेले व मराठी वर्तमानपत्रें, पुस्तकें यांवरून ज्ञान संपादन करणारे असे आहेत. सध्यां मराठीस मोठा आधार ह्मटला ह्मणजे अशांचाच आहे. हें पहिल्याविषयीं झालें. आतां दुसरे जे आहेत त्यांस सर्व गोष्टी अनुकूल आहेत; पण इच्छा मुळींच नाहीं. सरकारानें त्यांस इंग्रेजींत वाकबगार केलें; संस्कृतादि अभियुक्त भाषांतही पुष्कळ गति करून दिली, नानाविध विषयांचीही थोडी बहुत बरीच माहिती करविली;—एकंदरीत उद्देश काय कीं, त्यांस कोणीकडे जरी फेंकलें, तरी त्यांनीं कचरूं

नये. पण एवढा जामानिमा करून व शेवटीं चान्सेलरसाहेबांनीं पाठ थोपटून यांचें विसर्जन झाल्यावर हे करतात काय ? त्यांस वाटतें कीं, आज आपण विद्येच्या कडेस लागलों, देशास अक्षय भूषण आणलें, तेव्हां आतां दुसरें काय कर्तव्य उरलें ? आपल्या कडकडीत व सतत जागृत असणाऱ्या तर्कशास्त्राच्या कोट्यांनीं जनाज्ञानांधकाराचा ध्वंस करण्याची परम दीक्षा धारण करून हे आपल्या देशबंधूंपुढें आपलें अगाध ज्ञान मिरवीत फिरतात. यथासुख आयुष्य-क्रमण करावें हा त्यांचा एक मोठा सिद्धांत आहेसा दिसतो. मराठींत ग्रंथ लिहून आपल्या इंग्रेजी विद्वत्तेस बट्टा आणणें हें तर त्यांस अगदीं आवडत नाहींच; तरी प्रसंग आल्यास ते आपल्या महासनावरून मराठीतील ग्रंथावर अभिप्राय देतात. पण तेही अडाणी लोकांच्या भाषेंत त्यांस समजतीलसे नव्हेत ! तर फर्डेशाई इंग्रेजींत ! ग्रंथकार होऊन लोकांचा प्रसाद जोडणें हें त्यांस हलक्या मनुष्याचें काम वाटून तें त्यांस कधीं पत्करत नाहीं; हवें तर आपल्या किताबाच्या झोंकांत ते इंग्रेजींत कोणाला ' मूर्ख ', कोणाला ' परिकट ', कोणाला ' अप्रयोजक ' असे अभिप्राय देतील; फारच कृपा झाली तर ' हा ग्रंथ बरा आहे ' अशी गुळमुळीत शिफारस करतील. सारांश, प्राचीनकाळीं रोम शहरांत प्याट्रिशियन् (महाजन) आणि प्लीबियन् ( सामान्यजन ) यांमध्यें जसा द्वंद्वभाव होता, तसाच सांप्रतकाळीं विद्यालयांतून पसार झालेल्या लोकांचा व इतरांचा आहे. हें लिहिणें पुष्कळांस उगीच फुगवून लिहिलेलें व अगदीं गैरवाजवी असें वाटेल हें आह्मी जाणतों; व असें वाटण्याचें कारणही उघडच आहे कीं, नवीन विद्वानांविषयीं लोकांच्या मनांत सामान्यत: मोठी आदराची बुद्धि वागते, त्यांस नांव ठेवण्यास कोणी सहसा धजावत नाहीं. पण आजपर्यंत असा प्रकार घडला नाहीं एवढ्याच वरून आतांही तो घडूं नये हा कोण न्याय ? भारवीनें ह्मटलें आहे—

हितं मनोहारि च दुर्लभं वच:

' हितकर आणि मनोहरही असें भाषण दुर्लभ. ' हेंच वचन आह्मांस सध्यां मान्य आहे; व आमचे समंजस वाचकही वरच्यासारखे आमचे लेख वाचतांना तेंच ध्यानांत सतत ठेवतील अशी आमची आशा आहे.

तेव्हां प्रस्तुत निबंधांनीं अशा दुसऱ्या लोकांस—कीं ज्यांस विद्यालयांतील शिक्षणाचा वगैरे लाभ न घडल्यानें ज्ञानाचा मार्ग खुला नाहीं त्यांस—अनेक गोष्टींचें ज्ञान व्हावें हा एक ते लिहिण्याचा उद्देश आहे. संस्कृत व विशेषत: इंग्रजी भाषेंत जें अगाध ज्ञान भरलें आहे, त्याचा पाट फोडून जर आपल्या भाषेकडे वळवितां येईल तर केवढी मजा होईल ! सध्यांच्या काळीं इंग्रजी विद्या पुरी शिकण्यापुरतें सामर्थ्य पैशाच्या अडचणीमुळें आपणांत फारच थोड्यांस असतें, व पुष्कळांस तेंहि अनुकूल असून दुसऱ्या कित्येक कारणांनीं विद्याभ्यास सोडून द्यावा लागतो. तेव्हां ज्ञानाचे खरे भोक्ते असे एकंदर लोकांच्या मानानें पहातां सध्यां अगदींच थोडे आहेत यांत संशय नाहीं. बाकीचे एकंदर लोक अज्ञान व तज्जन्य जे अनर्थ ह्मणजे दुर्मतें, आळस व दुराचरण—त्यांत बुडून राहिले आहेत. इंग्लंडांत ज्ञानसंपादनाच्या सोयी उत्कृष्ट असल्यामुळें तेथील मजुरांस जें ज्ञान असेल तें या लोकांपैकीं मोठे शहाणे

ह्मणविणारांसही नाहीं. ही केवढी दुःखाची गोष्ट आहे! त्यांतून विशेष वाईट वाटण्याचें कारण हें कीं, आमच्या लोकांत कितीही दोष असले, तरी बुद्धीचा मंदपणा हा आमचा अत्यंत तिरस्कार करणारांच्यांनींही आमच्या माथीं मारवणार नाहीं! चलाखपणांत आह्मी कोणत्याही लोकांस हार जाणार नाहीं अशी आमची खात्री आहे;—आमच्या बुद्धीचे प्रभाव जगाच्या इतिहासावर अक्षय खोदलेले आहेत; व चंद्र सूर्य आहेत तोंवर त्यांचा झेंडा मिरवत राहील!

१०. अशा ग्रंथांपासून लोकांत सदभिरुचीचा प्रसार होऊन ग्रंथ वाचण्याची त्यांस गोडी लागण्याचा जितका संभव आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही उपायापासून नाहीं. ही सदभिरुचि राष्ट्रास किती हितकर आहे हें इतिहास वाचणारांस माहीत असेलच. अडाणी व सुधारलेल्या राष्ट्रांत मोठा भेद हाच होय असें ह्मटलें असतां चालेल. ही जेथें असेल तेथें विद्येचा व कलांचा उत्कर्ष, सभ्य चालचलणूक; वगैरे अर्थात् आलीच. ही आपणांतही प्राचीनकाळीं होतीच, पण परराजांची सत्ता येथें अखंड झाल्यामुळें तिचा अस्त झाला. पण सध्यांच्या उदार व शहाण्या सरकारच्या अमलांत तिचें पुनरुज्जीवन होण्याचा पुष्कळ संभव आहे. असो; याप्रमाणें अशा ग्रंथांतून पुस्तक चांगलें कोणतें, व वाईट कोणतें, त्यांतील गुणदोष काय, वगैरे गोष्टींचें निरूपण वरचेवर होत गेलें, ह्मणजे त्यापासून लोकांस, ग्रंथकारांस व भाषेस फार उपयोग होतो. लोकांत मार्मिकपणा वाढून त्यांस विचार करण्याची संवय लागते, पुस्तकांची परीक्षा अगोदर झालेली असली ह्मणजे त्यांस तीं घेण्यास सोईवार पडतें; मग अर्थातच चांगल्या ग्रंथकारांस तेव्हांच आश्रय मिळून वाईट पुस्तकें निवडलीं जातात; आणि इतकें झालें ह्मणजे भाषेंत सहजच चांगल्या ग्रंथांची समृद्धि होऊन उत्तरोत्तर तींत चांगले ग्रंथकार निपजतात. याप्रमाणें ज्ञानाची वृद्धि होत जाऊन चांगल्या ग्रंथकारांची दैना उडते.

११. वरील दोन उपयोग अशा ग्रंथांपासून सामान्यतः होणारे सांगितले. पण मराठी भाषेच्या सध्यांच्या स्थितीकडे पहातां, असे ग्रंथ तर तीस अगदीं हवेतच; त्यावांचून तिजवर मोठाले अनर्थ गुदरणारे आहेत;–फार तर काय, पण आतां जर तिनें जीव धरला नाहीं, तर थोड्याच काळांत तिची समाप्ति होईल! घरीं दारीं, उठल्या, बसल्या, इंग्रेजी तर हल्लीं सुद्धां बरीच झाली आहे. आफिसांतून जाणारे लोक, इंग्रेजीचा खरा खोटा बाणा बाळगणारे लोक अशांच्या जिव्हाग्रीं तर इंग्रेजीनें अक्षयीं वास केलेला असतोच. पण कित्येक बहादर तर असे आहेत कीं, धेडगुजरी मराठी तोंडांत बसण्याचें कारण जें इंग्रेजीचें ज्ञान त्याचाही पण त्यांस गंव नसतो! असो; तेव्हां मराठी बुडण्याचीं हीं सर्व भयंकर चिन्हें नव्हेत काय? देशाभिमान, स्वदेशीय व्यापार, सुधारणा, इत्यादि प्रकरणीं सध्यां चोहोंकडे एवढी गडबड चालली असतां, बिचाऱ्या मराठी भाषेची कोठेंच दाद लागूं नये, हा केवढा चमत्कार आहे? तिजकडे अगदीं दुर्लक्ष करून तिची परभाषेच्या पायीं अनिवार विटंबना करण्यासही कारण होणें हें आमच्या देशाभिमानी विद्वानांस केवढें भूषण होणार आहे! असो; या संबंधानें गेल्या अंकांत आह्मीं बराच विस्तार केला आहे. यास्तव येथें आणखी लिहीत नाहीं.

तेव्हां एकंदर सांगण्याची गोष्ट इतकीच कीं, या आणीबाणीच्या वेळीं मराठीस जें साहाय्य होईल तें तीस अनेक प्रकारांनीं उपयोगीं पडणारें आहे !-एक तर तिचें पुनरुज्जीवन झाल्यासारखें होईल; तसेंच विटंबना निवारण होईल; आणि शिवाय ग्रंथसमृद्धि होऊन ती उत्कर्षाच्या मार्गास लागेल !

१२. शेवटीं स्वतःच्याही संबंधें येथें कांहीं लिहिणें इष्ट वाटतें. तें इतकें कीं, आमच्या या लेखांवरून मराठी भाषेची योग्यता किती आहे हें जर लोकांस कळून येईल तर आम्हीं एक मोठेंच काम बजावलें असें आम्ही समजूं. आपल्या भाषेच्या अंगीं अर्थव्यंजकता, वर्णसौंदर्य फार कमी आहे,-किंबहुना नसल्यासारखेंच आहे-हा अलीकडील विद्वानांचा ग्रह कांहीं अंशीं तरी मोडून टाकण्यास जर आमचे निबंध कारण झाले, तर आमच्या हातून देशहिताचें एक मोठेंच कृत्य घडलेंसें आम्ही मानूं. तसेंच विद्यालयांतून शिकलेल्या लोकांवर इतके दिवस जो उगीच बसण्याचा आरोप लोक ठेवीत असत तो उडून आमचा प्रभाव लोकांस यापुढें जर दाखविण्यांत येऊं लागला, तर हेंही आम्हांस मोठेंच भूषण झालेंसें होईल. असो, आतां शेवटीं पुनः एकवार पहिलीच सूचना येथें करून लिहिणें आटपतों.

१३. या व मागील निबंधांत पुस्तकांवर, ग्रंथकारांवर वगैरे जेथें जेथें आम्हांस कांहीं विरुद्ध लिहिणें अवश्य वाटलें, तेथें तेथें तें आम्हीं स्पष्ट व निर्भीडपणें लिहिलें आहे. याबद्दल कोणास वाईट वाटल्यास आमचा उपाय नाहीं. एखाद्या गोष्टीविषयीं जो स्वतंत्रपणें विचार करील, व ते लोकांस मोकळ्या मनानें जो प्रदर्शित करील, त्याचे अभिप्राय सर्वांच्या अभिप्रायांशीं नेहमीं जुळतीलच, किंवा ते सर्वांस सारखे आवडतील, असें कदापि घडणार नाहीं. तरी ते अभिप्राय आम्ही केवळ सत्यनिरूपणाच्याच उद्देशानें लिहूं अशी आमची खात्री आहे. व आम्ही दुसऱ्यास वाजवी रीतीनें नांवें ठेवण्यास ज्याप्रमाणें मागें पुढें पाहणार नाहीं, त्याच-प्रमाणें दुसऱ्यांनीं आमच्या लेखांविरुद्ध मतें प्रदर्शित केल्यास त्यांत आम्हांसही अगदीं वाईट वाटणार नाहीं. आपणास जें खरें वाटतें तें स्पष्टपणें लिहिण्यास जो भितो, किंवा तसें आपणाविरुद्ध कोणीं लिहिलेलें ज्यास आवडत नाहीं, तो खरा सत्यनिष्ठ नव्हे असें आम्ही समजतों ! आतां अशा रीतीनें प्रदर्शित केलेलें मत कदाचित् अगदीं खोटें ठरेल; पण तसें ठरलें असतांही तो मनुष्य प्रशस्यच होय; कां तर ती तसें न करता, तर सत्याचा निवाडा होताना. मिल्टन् कवीनें ह्मटलें आहे कीं, 'चुकलेल्या मतांतूनच खरें मत पुढें निघतें.' तर हें उत्कृष्ट वचन आमच्या होतकरू विद्वानांनीं नेहमीं लक्षांत ठेवावें. दुसरें असें कीं, ज्यांवर पुष्कळ प्रकारांनीं मतभेद होण्याचा संभव असे जे भाषेच्या संबंधाचे वगैरे विषय त्यांवर कोणीं आपले विचार प्रगट केले असतां, त्यांवर इतरांची जर कांहींच चर्चा झाली नाहीं, तर त्यांत त्या लिहिणारास हर्ष मानण्याचें कारण मुळीच नाहीं ! उलटें त्याबद्दल त्यास वाईटच वाटणें योग्य आहे; कारण तशानें त्याचा लेख त्याच्याच पाशीं राहिला असें होतें. जॉन्सन् ह्मणतो, 'ग्रंथकारास उपेक्षेसारखें भयाचें कारण कोणतें

१ 'Error is but an opinion in the making'—Milton.

नाहीं. ' यास्तव आह्मी सर्वांस आणखी एकदां शेवटीं असें सुचवितों की, आमच्या विरुद्ध जर कोणाचे अभिप्राय येतील तर ते आह्मी मोठ्या प्रेमानें वाचूं. व ते लिहिणाराचे आभार मानून आमच्या बुद्धीनें जें त्यांवर आह्मांस प्रत्युत्तर देणें सुचेल तें देऊन आमच्या दीन भाषेचा भाग्योदय झाला असें समजूं !

---

## विद्वत्त्व आणि कवित्व.

---

सौवर्णानि सरोजानि निर्मातुं सन्ति शिल्पिनः ।
तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः ॥[२]

अंक ३ रा.—( १ ) काव्यविवेचनशास्त्र; त्याचा आपल्या लोकांत अभाव. ( २ ) प्रकृत निबंधाचा विषय. ( ३ ) कवितेच्या स्वरूपाविषयीं निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें. ( ४ ) काव्याचें लक्षण; उदाहरणें. ( ५ ) कवित्व ईश्वरी देणें होय; प्रासादिक कवितेचीं उदाहरणें. ( ६ ) अशा कवितांतील चमत्कारिक खुबी. ( ७ )—

१. काव्यविवेचनविषयक ग्रंथ इंग्रेजी भाषेप्रमाणें संस्कृतांत नसल्यामुळें काव्याचें स्वरूप काय, कवीस कोणते गुण अवश्य पाहिजेत, कवित्व ही ईश्वरी देणगी होय किंवा ती प्रयत्नाधीन आहे, वगैरे गोष्टींचें निरूपण केलेलें त्या भाषेंत कोठें सांपडत नाहीं. यावरून वरील विषयांवर संस्कृतांत कोठें कांहींच लिहिलेलें नाहीं असा ह्मणण्याचा अर्थ नाहीं. साहित्यग्रंथांतून तसेंच कोठें कोठें काव्यांतून नाटकांतून वगैरे यासंबंधें मोठे मार्मिक विचार प्रकट केलेले आढळतात. आणि ज्या आपल्या देशाचें भाषावैभव मुख्य कविताच होय, व ज्यांत ती इतक्या परिपक्क दशेस येऊन पोंचलेली दृष्टीस पडते त्यांतील लोकांच्या मनांत वरील विचार येऊन त्यांचा उल्लेख जागजागीं दृष्टीस पडतो यांत कांहीं नवलही नाहीं;–तसा तो नसता ह्मणजे मात्र मोठ्या आश्चर्याची गोष्ट होती ! असो; तरी या विषयाचें विवेचन अलीकडे इंग्लंड वगैरे देशांत जितपत झालें तितपत या पूर्वी कोठें–ह्मणजे आपल्या देशांत, किंवा ग्रीस, इटाली देशांतही–झालें नसेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आपल्या लोकांत तर या काव्यविवेचनशास्त्राचा आलीकडे मुळींच लय झाला आहे असें ह्मटल्यास हरकत

---

१ 'To an author nothing is more dangerous than neglect.' —Johnson.

२ " सोन्याचीं कमलें कारागिरांच्या हातून होतील; पण त्यांत सुगंध निर्माण करणें ही करामत एका ब्रह्मदेवाचीच ! "

नाहीं. आपल्या जुन्या पंडितांस काव्याभिरुचि कितपत असते हें त्यांच्या संस्कृत कवितेवरून, त्यांच्या टीकांवरून, व संभाषणप्रसंगीं मोठमोठ्या संस्कृत कवींच्या ग्रंथांतून ज्या प्रकारचीं सुभाषितें ते काढतात, त्यांवरून अगदीं स्पष्ट दिसून येतें. युरोपांतील सामान्य पंडितांस आमचे काव्यग्रंथ जसे समजतात तसे इकडील मोठमोठ्या शास्त्र्यांसही अगदींच समजत नाहींत; व त्यांतील अप्रतिम रसाचा आस्वाद घेण्यास जर हे परस्थ लोक आह्मांस न शिकवते तर तो आह्मांस कधींही समजताना यांतही अगदीं संशय नाहीं ! सारांश, या शास्त्राची चांगली माहिती ज्यास करून घेणें असेल त्यानें या विषयावरील इंग्रेजी ग्रंथ वाचून त्यांचें सतत मनन केलें पाहिजे. तें केलें असतां काव्यांचें मर्म जाणण्याची त्याच्या अंगीं उत्कृष्ट शक्ति येऊन आनंदाचें एक मोठें साधन त्यानें अक्षयीं आपलेंसें करून ठेवल्याप्रमाणें होईल.

२. या निबंधांत काव्याविषयीं सविस्तर विवरण करण्याचा उद्देश नाहीं. यांत येवढ्याच गोष्टीचा विचार करणें आहे कीं, कवित्व आणि विद्वत्त्व यांचा वस्तुत: कांहीं संबंध आहे कीं नाहीं;–ह्मणजे विद्वान् झाला कीं तो कवि झालाच, किंवा कवि असला कीं तो विद्वान् असावयाचाच असा कांहीं नित्य संबंध आहे किंवा काय ! याविषयीं समजूत होण्यास मराठी वाचकांकरतां अद्याप कोठें कांहींही लिहिलेलें आढळत नाहीं; यास्तव हा विषय त्यांस अगदीं नवा व त्यामुळें विशेष मजेचा वाटेल असें जाणून त्याविषयीं या अंकांत लिहितों.

३. आतां पहिल्यानें कविता ह्मणजे काय याविषयीं विचार करूं. कवितेचें खरें स्वरूप आपल्या लोकांत अजूनहि फारच थोड्यांस समजतें. बाकीच्यांनीं त्याविषयीं कधींही नीट विचार केला नसल्यामुळें, व हा विचार करण्याची योग्यताही बहुतेकांस नसल्यामुळें, कवितेविषयीं त्यांच्या निरनिराळ्या समजुती असतात. जे अगदींच अप्रबुद्ध आहेत त्यांची समजूत तर अर्थात् हीच असते कीं, छंदोबद्ध पदरचना ह्मणजे पद्य हीच कविता. मग या पद्यांत कांहीं कां असेना ! अमरकोशाचे श्लोक, भर्तृहरीच्या कारिका, वाग्भट्टाचे वैद्यकावरील श्लोक, अलीकडे मुलांकरतां केलेले पद्यरूप लहान इतिहास, हीं सर्व त्यांच्या मतें कवितेखालींच मोडतात. उद्यां बाजारांतील सर्व जिनसांच्या भावांचें कोष्टक जर कोणी कवीनें पद्यरूप केलें, तर त्या कोष्टकासही रघुवंशाबरोबर व शेक्सपीयर कवीच्या नाटकांबरोबर ते काव्याच्या वर्गांत सामील करतील ! सारांश, कवितेचें स्वरूप ते तिच्या नेहमींच्या वेषावरून मात्र जाणतात. जर तिनें गद्याचा वेष घेतला, किंवा गद्यानें तिचा वेष घेतला, तर दोहों ठिकाणीं ते फसून जातात. असो; हा एक प्रकार झाला. याहून वरची पायरी यमक, प्रास इत्यादिकांच्या भोक्त्यांची. यांच्या मतें ज्या पद्यांत यमकांची, प्रासांची वगैरे खूप रेलचेल असेल ती उत्कृष्ट कविता. ही परीक्षा ह्मणजे स्त्रियांचें रूप त्यांच्या अंगावरच्या डागदागिन्यांवर लेखण्यासारखी होय. या लोकांच्या मतें अर्थातच मोरोपंतासारखा कवि आजपर्यंत झाला नाहीं व पुढें होणार नाहीं ! पण त्यांस एवढें समजत नाहीं कीं, यमकांची, प्रासांची गर्दी ही जरी एका प्रकारच्या बुद्धीची दर्शक होय, तरी ही बुद्धि व

कवित्व हीं एक नव्हेत. अष्टावधानी, अठरा अवधानी असा मनुष्य असला ह्मणजे असा तो महाबुद्धिमान् असतोच असा नेम नाहीं; किंवा उत्कृष्ट कसरतवाला असला कीं,तो मोठा शूर असून सेनाधिपत्यास नेहमीं योग्य असेलच असाहि नेम सांगतां येणार नाहीं; त्याप्रमाणेंच मोठमोठीं यमकें, चमत्कारिक प्रास हीं साधतां येणें हें कवित्वाचें दर्शकच होय असें ह्मणणें व्यर्थ आहे. अशा यमकप्रासप्रचुर पद्यांपासून मनास मोठा चमत्कार वाटेल यांत संशय नाहीं; पण तो चमत्कार वरच्या दोघां मनुष्यांची कृति पाहून जसा वाटेल तसाच. त्यांपासून खरा उपयोग फार थोडा आहे, ह्मणजे मनास कांहीं वेळ मौज वाटेल इतकाच ! याहूनही वरची पायरी श्लेषप्रिय दुर्विदग्ध लोकांची. या तिसऱ्या वर्गांत सर्व जुन्या शास्त्र्यांस घातलें असतां चालेल. यांस खऱ्या कवितेचें रमणीयत्व व तिचे मुग्धविलास अगदींच कळत नाहींत ! न्यायमीमांसादि शास्त्रांतील कोट्यांत घडून पूर्वपक्ष उत्तरपक्ष यांची परस्परांत नेहमीं झटापट करणाऱ्या या प्रचंड मल्लांचें उग्र रूप पाहतांच बिचाऱ्या कवितेचा थरकांप होतो ! अशा दांडगाईची तीस कधीं संवय नसल्यामुळें ती त्यांच्या हातीं सांपडतांच बहुधा मृतप्राय होते ! मग पुढची गोष्ट कशाला हवी ? हे तिची परीक्षा ह्मणजे एखाद्या शास्त्रवादाप्रमाणें करणार, ह्मणजे कोट्यांवर कोट्या लढवून जसें त्यांचें पीठनपीठ करून सोडायाचें, तशीच कवितेचीही दशा ! तिची ताणाताण करून तींतील पदांवर नानातऱ्हेचें चित्रविचित्र अर्थ बसवायाचे. शृंगाराचा वैराग्यपर; वैराग्याचा शृंगारपर असा चमत्कारिक अर्थ करून बिचाऱ्या कवीच्या स्वप्नींही आली नसेल अशी त्याच्या ग्रंथाची दुर्दशा करून सोडावयाची. शंकराचार्यांच्या नांवावर 'आनंदलहरी' व 'अमरुशतक' ह्मणून दोन उत्कृष्ट काव्यें संस्कृतांत प्रसिद्ध आहेत. या दोहोंत शृंगाराचा विषय आहे पण आमच्या पंडितांस शब्दाचें प्रसंगार्थत्व व एकार्थत्व कधींही सहन होत नसतात. त्यांच्यांतून एकानें आपली तीव्र बुद्धि खर्चून व एकाक्षरी कोशाचें बहुधा बळकट पाठबळ घेऊन वरील काव्यांतील शब्दांचा रंगेलपणा काढून टाकून खऱ्या रसिकाबरोबर त्यांस वैराग्यांत लोटून दिलें आहे ! हाच प्रकार एका शहाण्या टीकाकारानें 'शाकुंतल' नाटकांतील आरंभींच्या श्लोकाशीं केला आहे असेंही ऐकण्यांत येतें. पण इतक्यावरच गोष्ट गेली असेल तर कालिदासाचें मोठें भाग्यच मोजलें पाहिजे! कां कीं न जाणों, त्याचें तें सगळें नाटकचें नाटक स्वतःस न कळतां वैराग्यपर अर्थाचेंही बांधलें गेलें असून दोन हजार वर्षांनीं त्याचा गर्भितार्थ जर या विशालबुद्धि टीकाकारानें काढला असता, तर एवढें नाटक रचूनही त्याचा अर्थ स्वतःसच नीट न कळल्याचें मोठें अज्ञान आपल्या महाकवीच्या पदरीं आलें असतें ! असा बुद्धीचा व काळाचा अपव्यय केल्याचें आणखीही एक अलीकडचें उदाहरण येथें सांगितल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. तें पुष्कळांस सहज प्रत्यक्ष पहातां येईल. आमचे मराठीचे वैय्याकरण व प्रसिद्ध ग्रंथकार दादोबा पांडुरंग यांनीं 'केकावली' वर सुमारें आठ दहा वर्षांपूर्वी एक भली लांब टीका करून ती प्रसिद्ध केली हें सर्वांस माहीत असेलच. त्यांत त्यांनीं बुद्धबा आड रानांत शिरून केलेले विलक्षण अर्थ पुष्कळ आहेत. त्यांवर यापूर्वी पुष्कळ चर्चा मागेंच झाली; व तींत एवढ्या मोठ्या ग्रंथकाराची व लोकोपकारी सद्गृहस्थाची होऊं नये

अशी चारगटपणाची विनाकारण पुष्कळ विटंबनाही झाली हेंही येथें लिहिणें आह्मांस वाजवी वाटतें. असो; त्या टीकेच्या संबंधानें प्रस्तुत प्रसंगीं लिहावयाचें तें हेंच कीं, तींत पहिल्या केकेवर व्याख्या देतांना दादोबांनीं वरील अप्रयोजक टीकाकारांचा बाणा उचलला आहे. पहिल्या मंगलाचरणरूप केकेचा अर्थ अगदीं उघड असतां तीवर पंचवीस तीस पानें व्याख्या देऊन तिचा अर्थ वेदान्तपर लावला आहे ! असो; तेव्हां श्लेष ह्मणजे कवितेचा जीव प्राण, व पांडित्याचा परमोत्कर्ष ह्मणजे चार वर्षांच्या पोराच्या बोलण्यांतही निरनिराळे अर्थ काढणें, असें मानणारांचा हा तिसरा वर्ग झाला. आतां याहूनही वरचा वर्ग नादलुब्ध लोकांचा. यांच्या मतें कवितेचें सर्वस्व पदरचनेंतील माधुर्य होय. शब्द अंमळ थाटमाटाचे घातलेले असून ते कानास गोड लागतीलसे असले कीं झाली उत्कृष्ट कविता. ही परीक्षा ह्मणजे स्त्रियांच्या रूपाचें मान त्यांच्या गळ्यावर ह्मणजे मधुर स्वरावर बसविण्यासारखें असमंजस आहे. मधुर रचना हें उत्कृष्ट कवितेचें एक अंग खरें; पण तिचें सर्वस्व नव्हे. या प्रमाणें निरनिराळे लोकांचीं कवित्वाविषयींचीं भिन्न भिन्न मतें सांगितलीं. पण एवढ्यांतच सर्वांचा समावेश होत नाहीं. या चौघांशिवाय बाकीचे जे कोणी आहेत त्यांचा कशाविषयींच आग्रह नसतो. त्यांचा अभिप्राय नेहमीं चारचौघां विद्वानांसारखा पडायाचा,—ह्मणजे ते जें ह्मणतील त्यांचा अनुवाद करणें हेंच त्यांचें मत ! ते स्वतः ह्मणून कधीं विचार करायाचे नाहींत. ढालीसारखीं पागोटीं जाऊन चंबूंचा प्रघात पडला, गजरेदार आंगरखे जाऊन पोकळ आंगरख्यांची भास पडली, हें पाहून विद्वानांच्या अभिरुचीस ते जसे अनुसरत गेले, त्याप्रमाणें त्यांचीं सर्व गोष्टींविषयीं मतें वरचेवर फिरत असतात. तीं अशीं बेचूक कीं, कोणी मनुष्य जर खेडेगांवांत जाऊन राहिला किंवा देशांतरास गेला असला तर पुनः शहरास परत आल्यावर अशा मनुष्यांशीं त्यानें चार घटका प्रसंग केला कीं पुरे, त्यास तोंपर्यंत झालेल्या फेरफारांची सगळी माहिती तेव्हांच व्हावयाची ! असे लोक जर विद्वानांच्या समाजांत मेजवानीस बसले असले तर त्यांचें लक्ष नेहमीं विद्वानांच्या तोंडाकडे असेल, व त्यांच्या तोंडावर जसे रुचिभेदेंकरून विकार झालेले दृष्टीस पडतील, तसे हुबेहूब आपल्याही तोंडावर ते उठवितील,—ह्मणजे प्रसंगानुसार साखरेच्याही पदार्थाला तोंड आंबट करतील, किंवा एखादा तुरट पदार्थ मोठा मिष्ट ह्मणून त्याचा स्वाद वाखाणतील ! सारांश, अजून आपल्या लोकांत खरे परीक्षक फारच थोडे आहेत; व यामुळें काव्य ह्मणजे काय हें एकंदर लोकांस कांहींच कळत नाहीं.

४. काव्याचें बरोबर थोडक्यांत लक्षण देणें फार कठिण आहे. तें इंग्रज ग्रंथकारांनीं पांच पंचवीस प्रकारांनीं दिलें आहे. तरी आपल्या संस्कृत ग्रंथांतील ' रसात्मकं काव्यम् ' ह्मणजे रसयुक्त तें काव्य हें लक्षण सध्यांच्या पक्षीं आपणांस पुरें आहे. हें लक्षण ध्यानांत धरलें असतां वरील सर्व भ्रांति दूर होतील, ह्मणजे काव्यास पद्यरचना, यमक, प्रास, श्लेष किंबहुना वर्णमाधुर्य हीं अवश्य हवींच असा कांहीं नेम नाहीं हें तेव्हांच लक्षांत येईल. अशा प्रकारचीं काव्यें आपल्या मराठींतही नाहींतशीं नाहींत. हीं उदाहरणें पहा—

" कोणी एक ओगलजी नांवाचा गृहस्थ काश्मीर देशीं राहात होता. तो वैशाख-

मासीं एके दिवशीं संध्याकाळीं आपला मुलगा आन्या यास संगातीं घेऊन एके लहान डोंगरीवर बसला आहे, आणि तेथून समोर दृष्टीस पडताहेत ते रमणीय पदार्थ त्यांस दाखवितो आहे. ते वेळीं सूर्य अस्तास जात होता, तेव्हां त्यास अशी कल्पना झाली कीं, तो सर्व विश्वाला सोनेरी रंगाचें वस्त्र पांघरवून चालला आहे काय! किंवा हे डोंगर सोन्याचेच आहेत काय! अशा अशा कल्पना करीत ते सुख घेत बसले असतां, तितक्यांत तिकडून एक धनगर आपला कळप चारणीवरून घराकडे वळवून चालला होता; त्यानें सुस्वर गायन केलें, तें त्या बापलेंकांच्या कानीं पडून ते तिकडे पाहूं लागले." बाळमित्र–काटेआड.

## ऋतूंचें वर्णन.

"बाळा नुकताच शेकून आणि ओले गव्हांच्या ओंब्या खाऊन आलेला होता, आणि ह्मणतो 'अहाहा! असा सदां हिंवाळाच असता तर बरें होतें! याचें सुख काय सांगूं! ह्यांत नद्यांचें पाणी किती स्वच्छ आणि किती मिष्ट! लोंकरी वस्त्रें काय सुख देतात! पोटांत भूक, अन्नास रुचि, आणि निद्रा तरी काय गाढ येते ती!' तें ऐकून गोविंदशेट, त्याचा बाप, त्यास ह्मणाला, 'बरें तर, ह्मणतोस असेंच स्मरणवहींत लिहून ठेव.' बाळानें तसें केलें. पुढें हिंवाळा निघून गेला, आणि उन्हाळा आला. तेव्हां संपूर्ण वृक्ष पालवी फुटून फलपुष्पयुक्त झाले आहेत; वायु मंद सुगंध शीतळ वहात आहे; लोक चंदनाच्या उट्या घेऊन गळ्यांत पुष्पांच्या माळा घालून फिरताहेत, व नानाप्रकारचे शीतळ उपचार करताहेत; बागांमध्यें कारंजीं उडविताहेत; त्यांचे तुषार अंगांस लागून अत्यंत सुख करताहेत, तसेंच पिकलेलीं फळें, आंबे, फणस, जांब, अंजीर, द्राक्षें इत्यादिक जिव्हेस अमृतासारखी रुचि देताहेत. तें सर्व सुख पाहून बाळा ह्मणतो, 'अहाहा! असाच सदां उन्हाळा असता तर बरें होतें.' गोविंदशेट ह्मणाला, 'मुला, ह्मणतोस असेंच स्मरणवहीवर लिहून ठेव.' बाळानें तसें केलें. नंतर पावसाळा आला. त्या समयीं जिकडे तिकडे हिरवीं चार गवतें व नानाप्रकारचीं झाडें उगवलीं आहेत; नद्यांचे प्रवाह चालले आहेत; शाकभाज्या पुष्कळ झालेल्या आहेत; जिकडे तिकडे पाणी जमलें आहे; त्यांतून कागदांचीं तारवें करून मुलें पोहविताहेत; डोईवर छत्र्या, सखलादीच्या टोप्या घेऊन पावसांतून लोक चालले आहेत; पुढें शेतें पिकलीं, त्यांत नानाप्रकारचीं धान्यें झालीं आहेत. तें पाहून बाळा ह्मणाला, 'बाबा, काय चमत्कार हा! हा पावसाळा सदां असाच असता तर बरें होतें!' बाप ह्मणाला, 'मुला, हें त्या वहींत लिहून ठेव!' बाळानें तसें केलें." किस्सा–तीन काळ.

अशीं काव्यें या ग्रंथांत पुष्कळच आहेत; फार तर काय, पण हें सगळें पुस्तक काव्यमयच आहे असें ह्मटलें असतां चालेल. हें मूळचें एका मॅडम बाईनें केलें असून या ग्रंथाची सर्व जगभर प्रसिद्धि झाली आहे. आपल्या मराठींत तर हें भाषांतर इतकें उत्कृष्ट उतरलें आहे कीं, तें परभाषेंतलें असेलशी शंका सुद्धां येत नाहीं. हें पुस्तक वाचलें असतां मराठीची दुर्दशा वीस पंचवीस वर्षांत किती झाली हें पुरतेपणीं चित्तावर ठसून फार वाईट वाटतें, व पुढील पंचवीस वर्षांकडे नजर देण्यास भय वाटतें! असो; या प्रसंगीं आमच्या भाषेच्या

हितचिंतकांस हा ग्रंथ वरचेवर वाचण्याची फार फार शिफारस केल्यावांचून आमच्यानें पुढें लिहवत नाहीं!

असेच उतारे ' इसापनीति, ' ' आरबी भाषेंतील गोष्टी, ' ' मुक्तामाला, ' ' थोरले माधवराव, ' जयपाळ, ' अशा ग्रंथांतूनही आणखी हवे तितके घेतां येतील.

वरील दोन काव्यें वाचून आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् असमंजसपणानें हंसूं येईल; पण त्यांनीं पक्कें समजावें कीं, असें जोंपर्यंत होईल, व त्यांत त्यांस अंत:करणास लागण्यासारखें कांहींच भासणार नाहीं, तोंपर्यंत कवितेचा स्वाद त्यांस मुळींच कळला नाहीं! तसेंच आमच्या वाचकांत जर कोणी शास्त्री असतील तर त्यांसही वरील गोष्टींचा मोठाच चमत्कार वाटेल! आपण कांहीं भलतेंच भ्रांतींत वाचीत आहों, किंवा हें लिहिणारानें तरी कांहीं भलतेंच भ्रांतींत लिहिलें असावें, अशा कल्पना त्यांस बहुधां कराव्या लागतील! पण दोघांपैकीं भ्रांतींत कोणीच नाहीं हें दाखविण्याकरितां त्यांच्या परिचयांतलाच असा एक उतारा येथें घेतों—

तत्तु तीरं समासाद्य तमसाया मुनिस्तदा।
शिष्यमाह स्थितं पार्श्वे दृष्ट्वा तीर्थमकर्दमम्॥
अकर्दमामिदं तीर्थं भारद्वाज निशामय।
रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा॥
इदं तीर्थ-समं सौम्यं सुजलं सूक्ष्मवालुकम्।
न्यस्यतां कलशस्तात दीयतां वल्कलं मम॥ बालकांड—सर्ग २.

हें आद्यकवीचें काव्य कोणास ' रमणीय ' वाटत नाहीं? व कोणाचें चित्त ' प्रसन्न ' व 'सौम्य' करीत नाहीं? वास्तविक पहातां यांत येवढें काय आहे बरें? गांवढळ कुणब्यांसहि ज्या गोष्टी दररोज दृष्टीस पडतात त्याच येथें वर्णिल्या आहेत. पण ह्मणूनच हीं पद्यें येवढीं रमणीय झालीं आहेत! तीं समजण्यास यत्किंचितही श्रम न पडून प्रत्येक मनुष्याच्या मनांत अशी नदी पाहिली असतां ज्या कल्पना सहज भरतात त्याच येथें कवीनें अगदीं साध्या रीतीनें बोलून दाखविल्या आहेत. या वर्णनांत एक मात्र अलंकार घातला आहे,—किंवा घातला आहे ह्मणण्यापेक्षां आला आहे हेंच ह्मणणें बरोबर आहे. कां कीं, तो इतका सहज आला आहे,—व ह्मणूनच त्या ठिकाणीं इतका शोभतो—कीं, तो आणण्यास कवीस यत्किंचितही प्रयत्न पडला नसावा. असो; एकंदरींत या काव्याची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे! ज्यानें आजपर्यंत कोट्यवधि मनुष्यांचें रंजन करून त्यांच्या प्रशंसेचें मोर्तब जें जसें काय काळास दाखवीत आहे त्या काव्यास येथच्या स्तुतीच्या दोन शब्दांनीं किती थोरवी येणार!

याचप्रमाणें पुढें क्रौंच पक्ष्याचा वृत्तान्त लिहिला आहे तोहि किती हृदयंगम आहे! तो वाचूनही ज्याची वृत्ति पहिल्याप्रमाणेंच तटस्थ राहील त्यास देण्यास दुसऱ्या कोणाची उपमा साजणार नाहीं,—एक त्या निषादाची ( कोळ्याची ) च साजेल!

तेव्हां एकंदर सांगायाचें काय कीं, सत्काव्यास पद्यरचना, यमक, प्रास, श्लेष,

किंबहुना वर्णमाधुर्यही, यांपैकीं कोणाची सुद्धां बिलकूल गरज नाहीं! जें वाचल्यानें किंवा ऐकिल्यानें मनाच्या वृत्ति प्रसन्न होऊन तो तो रस अंतःकरणांत सहज बिंबून जातो त्यास काव्य ह्मणावें. पण हें जर होत नाहीं, तर छंद, यमक, श्लेष, मृदुत्व यांविषयींची सर्व खटपट व्यर्थ!

५. वरील सर्व गोष्टींचा यथास्थित विचार केला असतां लक्षांत येईल कीं, कवित्व हें अंगीं आणूं जातां येणारें नव्हे; तें ईश्वराचेंच देणें होय. वास्तव सौन्दर्य, सुस्वर, इत्यादि मनुष्याच्या अस्वाधीन असणारे गुण बळेंच आपले ठायीं आणणारांच्या प्रयत्नांस जितपत यश येतें, तितपतच अशा दांडगाईनें कवि होऊं पहाणारांचा प्रयत्न सिद्धीस जातो; ह्मणजे नुसत्या छानछुकींत व सुरेखपणांत जितकें अंतर, तितकेंच कृत्रिम प्रकारांनीं आणलेल्या शोभेंत व खऱ्या कवित्वांत! आणि ज्याप्रमाणें छानछूक ही बहुधा हवें त्यांस प्रयत्नांतीं साधण्या-सारखी असते, त्याचप्रमाणें कवितेचा बाह्य वेष ह्मणजे छंद, मृदुरचना इत्यादिही सामान्य बुद्धीच्या सर्व लोकांस बहुधा साधतां येईल. आतां हें सर्व कोणास अधिक, कोणास कमी, असें साधेल खरें, पण तें फार फार उत्कृष्ट साधलें तरी खऱ्या रसिकास त्यापासून तशी बहार वाटणार नाहीं; कीं जशी अगदीं साध्या पण अस्सल अशा कवितेच्या चुटक्यानें वाटेल! उदाहरणः—

वर्षावावीण सागर जैसा जळें निर्भर।
तैसाचि निरुपचार संतोषी जो॥
व्यापक आणि उदास जसें कां आकाश।
तैसें जयाचें मानस सर्वत्र गा॥
संसारव्यथे फिटला जो नैराश्यें निवटला।
व्याधाहातोनि सुटला विहंग जैसा॥
घरींचियां उजेड करावा परकियां अंधार पाडावा।
हें नेणेंचि गा पांडवा दीप जैसा॥
जो खांडावया घाव घाली कां लावणी जेणें केली।
दोघां एकचि सावली दे वृक्ष जैसा॥
जो निंदेतें नेघे स्तुतीनें न श्लाघे।
आकाशा न लागे लेप जैसा॥ ज्ञानेश्वरी.

हें भगवद्भक्तांचें वर्णन केवढें उदात्त आहे! व यांत छंद, पदरचना, वगैरे अगदीं साधी असल्यामुळें तर हें फारच शोभतें. अशा ठिकाणीं संस्कृतांतले शिखरिणी, मंदाक्रांता वगैरे झोकदार मोठाले छंद, किंवा मराठींतली साकी, दिंडी इत्यादि मंजुळ वृत्तें अगदींच कामास पडतीं ना!

दुसरें:—

कां रे नाठविसी कृपाळु देवासी। पोशीतो जगासी एकलाची॥
फुटे तरुवर उष्णकाळमासीं। जीवन तयासीं कोण घाली॥
बाळा दुग्ध कोणीं केलेंसे उत्पत्ती। वाढवी श्रीपती सर्वे दोन्ही॥
तुका ह्मणे त्याचें नांव विश्वंभर। करा निरंतर ध्यान त्याचें॥

ऐसे संत झाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥
स्नान संध्या बुडवीली । पुढें भांग ओढवली ॥
भांगभुर्का हें साधन । पचनीं पडे मद्यपान ॥
तुका म्हणे अवघें सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥
आली सिंहस्थ पर्वणी न्हाव्यां भटां झाली धणी ॥
अंतरीं पापाच्या कोटी । वरी बोडी डोयी दाढी ॥
जें बोडिलें तें निघालें । सांग काय पालटलें ॥
पाप गेल्याची खूण । नाहीं पालटले अवगुण ॥
भक्तिभावेंवीण । तुका म्हणे अवघा शीण ॥
अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥
आत्माअनुभवीं चोखाळिल्या वाटा । त्याच्या माथां जटा असो नसो ॥
परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक । त्याचे अंगा राख असो नसो ॥
परद्रव्या आंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका म्हणे ॥

आणखी एकः—

( वनाचें वर्णन ) देखे प्रचंड महागिरी विशाळ पर्वताचिया दरी ।
जळें तुंबलीं सरितासरीं समुद्रतुल्य अगाध ॥
नाना वृक्षांचीं अचाट दाटें लागलीं घनदाट ।
माजीं निर्झरोदकाचे पाट सरोवैरा धांवती ॥
माथां उचलूनी दिनकर छायें रक्षिला अंधकार ।
माजीं श्वापदगणांचे भार सुखावले सुखवस्ती ॥
( नदीचें वर्णन ) नदी मालिनी पवित्रजीवनी वाहे जैशी देवतटिनी ।
तरंगलिंगें सुफेनसुमनीं सुपूजितें शोभती ॥
( पुढील वृत्तांत ) मग गर्जूनि नराधीशें म्हणितलें आश्रमीं कोण असे ।
हें परिसोनि इंदिरावेशें लावण्यकलिका प्रगटली ॥
कनकलतिका सौदामिनी कीं चंद्रकलिका तनुधारिणी ।
सुवर्णकेतकीपत्रवर्णी सुवर्णखाणी हरिणाक्षी ॥ मुक्तेश्वर.

६. येवढे उतारे पुरेत. यांवरून खऱ्या कवित्वाचें स्वरूप वाचकांच्या लक्षांत येईल. तें हेंच कीं, इतर कोणत्याही गोष्टींचें साहाय्य न घेतां अर्थाच्याच केवळ अंगभूत सौन्दर्यानें व तद्व्यंजक शब्दांच्या अपूर्व सौष्ठवानें मनास चमत्कार भासविण्याची शक्ति. ही शक्ति कवीशिवाय इतरास समजणें अशक्य होय. फार तर काय, पण कवीची कवीसही ती सांगतां येणार नाहीं! व म्हणूनच या शक्तीस कवि व इतर लोक ईश्वरी प्रेरणा म्हणतात! सामान्य मनुष्याची अक्कल व प्रयत्न कवितेच्या बाह्यांगांपर्यंत मात्र पोंचेल; व म्हणून काव्यांत रस आणावयाचा असल्यास चांगलीं मोठालीं वृत्तें, अर्थालंकार, शब्दालंकार इत्यादिकांचें मजबूत साह्य घेतल्याखेरीज त्यांचें कधींही चालणार नाहीं. पण वरील उतारे पहा बरें! त्यांस असें बाहेरचें साहित्य लवमात्रही लागलें नाहीं. छंद, ओवी व अभंग—ज्यांत इतर छंदांप्रमाणें मोठेंसें माधुर्य आहे असें नाहीं; व ज्यांची रचना साऱ्या वृत्तांत अगदीं सोपी असल्यामुळें गद्यांत व जींत फारसा फेर नाहीं; शब्दालंकार पाहिला तर शेवटलें एकाक्षरी यमक येवढाच;

आणि अर्थालंकारही मोठ्या प्रयासानें उत्कृष्ट निवडून घातले आहेत असेंही नाहीं. बरें, अशा कवितेचा विषय तरी कांहीं अपूर्व असतो काय ? कांहीं नाहीं; ज्या गोष्टी चारचौघांस नेहमींच्या माहीत असतात त्याच प्रायः तींत असतात ! पण कवीच्या वाणीनें त्या निघाल्या कीं पुरे; जादूगिराच्या कांडीनें त्याच पदार्थांस जशी अपूर्वता प्राप्त होते, त्याप्रमाणें अशा नेहमींच्या गोष्टींसही कांहीं अपूर्व शोभा येते ! एरवींचीं पद्यें कितीही उत्कृष्ट असलीं, तरी त्यांचा एकदोनदां वाचतांच कंटाळा येऊन जातो; पण अशांचें साधें सौन्दर्य शेंकडोंदां वाच-ल्यानेंही कमी न भासतां वाचकांस

प्रतिक्षण नवीच दे रुचि——

७. असो; याप्रमाणें स्वतःसिद्ध अशा महाकवींच्या कवितेचें स्वरूप वर लिहिलें आहे त्यावरून आमच्या वाचकांच्या मनांत बरेंच आलें असेल असें आह्मांस वाटतें. येथवर हातीं घेतलेल्या विषयाचा अर्धा भाग—ह्मणजे कवित्व ह्मणजे काय याविषयीं बराच विचार झाला. पण बाकीचा सर्व विषय थोडक्यांत आटपण्यासारखा नव्हे, ह्मणून सध्या येथेंच थांबून पुढील खेपेस तो पुरा करूं.

---

हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता
जनः स्पर्धालुश्चेदहह कविना वश्यवचसा ।
भवेदद्य श्वो वा किमिह बहुना पापिनि कलौ
घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः ॥[1] भवभूति.

अंक ४ था.—(१) अवतरण. (२) कवित्वास विद्वत्त्व अनुकूल होय हा लोकभ्रम. (३) तर्क-शास्त्राचा कवित्वाशीं अत्यंत विरोध; कवींचें मन आणि तत्त्वज्ञाचें मन; उदाहरण—चंद्र. (४) कल्प-नेच्या विकासानंतर बुद्धीचा विकास. (५) कवित्वास आवश्यक गुण. (६) 'कवि' शब्दाची व्याख्या. (७) कवीचा मुख्य गुण—सहृदयता—(८) स्वभाववर्णन. (९) प्राचीन कवींच्या उत्क-र्षाचीं कारणें. (१०) इतर अप्रधान गुण. (११) दोहोंचा योग. (१२) विद्वत्तेची गति कोठपर्यंत ? (१३) एकंदर सिद्धांत.

१. मागील अंकांत अस्सल कवित्वाचें कांहीं स्वरूप सांगितलें. आतां कृत्रिम कवि-तेचें—ह्मणजे मूळची कवित्वस्फूर्ति नसतां विद्वत्तेच्याच जोरावर रचलेल्या काव्यांचें—निरूपण करितों.

२. या विषयाच्या संबंधानें आपल्या लोकांत पुष्कळ दिवसांपासून एक मोठाच भ्रम माजला आहे. तो अर्थात् विद्वत्त्व आणि कवित्व यांचा परस्पर अभेद. फार तर काय, पण 'कवि' या शब्दाचा अर्थ 'शहाणा' असाही पुढें होऊन गेला. आतां असें होण्याचें कारण काय असें जर कोणी विचारील तर तेंही सांगणें कठिण आहेसें नाहीं. विद्यासंपाद-

---

१ " ओढून ताणून शब्दांची जुळवाजुळव करणारा मनुष्य सरस्वती ज्यांस प्रसन्न आहे अशा महाकवीशीं जर स्पर्धा करू लागला; तर आज उद्यां मडकीं घडणाऱ्या कुंभाराचा व त्रिभुवनास ज्यानें निर्माण केलें त्या महादेवाचाही कलह लागेल !! कोणीं सांगावें ! "

नाचा मार्ग पूर्वीचा असा कांहीं चमत्कारिक होता कीं, मनुष्यानें एक अगदींच विद्येशिवाय रहावें किंवा तिच्या सर्व शाखांचें पूर्ण अध्ययन तरी करावें; मध्यंतरीं ह्मणून मुळींच मार्ग नव्हता. तेव्हां जे नामांकित कवि होत ते अर्थात्च या दुसऱ्या वर्गांतलेच असत. पण गुरूच्या घरीं बारा किंवा याहूनही अधिक वर्षे राहून त्यांनीं नुसतीं काव्येंच पढून न रहातां व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रांत—कीं जीं कवीस कांहीं उपयोगाचीं नाहींत, किंबहुना कवित्वास अपायकारकही होत, त्यांतही त्यांस पारंगत व्हावें लागे. यास्तव जे कवि निपजत ते अर्थात् अशा विद्वानांतूनच. तेव्हां सहजच कवि असला कीं तो विद्वान् असायचाच असें लोकांच्या नेहमीं दृष्टीस पडे. पण याच शब्दांचा जर व्यत्यास केला—ह्मणजे विद्वान् कवि असतात असें ह्मटलें—तर नेहमीं चालेलच असें नाहीं; या गोष्टीचा त्यांनीं नीट विचार केला नाहीं! असो; पुढें पुढें तर ह्मणजे माघ, श्रीहर्ष यांच्या वेळीं, कवित्वास शास्त्राध्ययन अवश्यच झालें. या कवींच्या ग्रंथांतून व्याकरण, न्याय, मीमांसा, किंबहुना वैद्यक, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचाही संबंध आणलेला असतो. असें होतां होतां आलीकडे तर 'रंडागीतानि काव्यानि' येथपर्यंत येऊन मजल टेकली! असो; हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार आलीकडे सुरू झालेल्या इंग्रेजी विद्येचा. ही विद्याही मागील संस्कृत विद्येप्रमाणेंच कवित्वास अत्यंत अनुकूल आहे, किंबहुना तीशिवाय चांगली कविता करतां येणें अशक्य होय, असा एकंदर लोकांचा समज झाला आहेसा दिसतो. अथवा हेंचसें काय; एकंदर सर्व गुणांचें अधिष्ठान इंग्रेजी विद्वत्ता होय असा या अप्रबुद्ध लोकांनीं सिद्धांत केला आहेसा वाटतो! त्यांच्या मतें ही नवी विद्वत्ता ह्मणजे कांहीं मोठी अजब चीज होय! ही जवळ असली कीं, त्या मनुष्यानें सभाग्रभागीं उभें राहून बृहस्पतीप्रमाणें श्रोत्यांस आपल्या वक्तृत्वानें थक्क करून टाकावें, कालिदासाप्रमाणें जगास चिरकाळ मोहणारी कविता करावी, शाक्यमुनीप्रमाणें मानसिक व्यापारांची उपपत्ति काढावी, इत्यादि अनेक परस्परविरुद्ध शक्ति अशांच्या ठायीं अवश्यमेव आल्याच असें हे समजतात. फार तर काय, पण चार पांच वर्षे विद्यालयांत घालविलीं कीं, पृथ्वीवरील व्यापाराची घडामोड, राज्यव्यवस्था इत्यादि गोष्टींत किंबहुना युद्धकलादिकांतही निपुणता प्राप्त होते असा सुद्धां कित्येकांचा समज असेल. उद्यां जर गायनविद्येचा अभ्यास करावयाचें कोणाच्या मनांत आलें, कीं उत्कृष्ट पाकसिद्धि करायाची असली, तर तो एखाद्या विद्वानाची गांठ घेईल! सारांश,

प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां
पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः ॥

"सर्व गुण एके ठिकाणीं ठेवण्याविषयीं विधात्याची इच्छा दिसत नाहीं,—तर याच्या

---

१ शास्त्रीय कोट्यांत घटून त्याखेरीज दुसरें ज्यांस कांहीं रुचेनासेंच झालें असे आपल्या देशांतील जुने पंडित वरील वाक्यानें काव्याच्या अप्रतिम रसास तुच्छ करूं पहातात. यावरून त्यांची रसिकता स्पष्टच दिसते.

उलट दिसतें." असें सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी जें कालिदासास वाटलें, व अगदीं आलीकडेपर्यंत लोकांस वाटत असे, तें सध्यांच्या काळीं एकाएकीं खोटें ठरत चाललें कीं काय कोण जाणे असें एखाद्यास वाटेल! मागील काळीं होमर्, थुसिडिडीस्, आरिस्टॉटल्, आलेक्झांडर्, असे नामांकित पुरुष निपजायास फार दीर्घकाळ लागे, व शिवाय एकेकाच्या ठायीं एकेकच गुण मोठ्या प्रयासानें वास करी; पण इंग्रेजांची सत्ता येथें होऊन त्यांची विद्या इकडे नुकतीच संचार करूं लागली तों सगळेंच मान एकदम फिरलें! शिल्पशास्त्र मोठ्या उत्कृष्ट दशेस येऊन आलीकडे जसे अद्‌भुत चमत्कार चोहोंकडे दृष्टीस पडतात, त्याहीपेक्षां बुद्धीचे चमत्कार फारच मोठाले दिसूं लागले आहेत. मनुष्याच्या मनास फार थोड्या काळांत पूर्णत्व येऊन त्यांत हरएक गुणांचा सहज समावेश व्हावा असें झालें आहे. असो; ईश्वरकृपेंकरून एवढा प्रकाशाचा लोट आमच्या देशास सहन होवो म्हणजे झालें!

वरील लेखावर पुष्कळांचे पुष्कळ आक्षेप निघतील हें आह्मी जाणतों. तरी त्या सर्वांचें निराकरण करण्यास पुष्कळ जागा लागून तें या प्रसंगासही उचित नाहीं असें समजून त्या संबंधें येथें कांहीं लिहीत नाहीं. वरच्या लिहिण्यांतील मुख्य मुद्दा हा आहे कीं, कवित्वास विद्वत्तेची अगदीं गरज नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांत पुरतेपणीं गति होणें हें कवित्वास अनुकूल होणार नाहीं हें तर काय, पण अगदीं साक्षात् प्रतिकूलच बहुधा होणार आहे. तर्कशास्त्रासारखें तर कवित्वास अपाय करणारें कांहींच नाहीं!

३. हें वाचून आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस मोठें आश्चर्य वाटेल; व कांहीं तरी विलक्षण मत स्थापण्याच्या बुद्धीनें आह्मीं हें लिहिलें आहे असेंही कित्येकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. यास्तव एका अनुभविक ग्रंथकाराचें प्रमाण येथें त्यांस दाखविणें अवश्य वाटतें—

**नटः**—नन्वयं ( कविः ) प्रमाणप्रवीणोऽपि श्रूयते। तदिह चंद्रिकाचंडातपयोरिव कवितातार्किकत्वयोरेकाधिकरणतामालोक्य विस्मितोऽस्मि।

**सूत्रधारः**—क इह विस्मयः।

येषां कोमलकाव्यकौशलकलालीलावती भारती
तेषां कर्कशतर्कवक्रवचनोद्गारेऽपि किं हीयते।
यैः कांताकुचमंडले कररुहाः सानंदमारोपिता-
स्तैः किं मत्तकरींद्रकुंभशिखरे नारोपणीयाः शराः॥ प्रसन्नराघव नाटक.

"**नट**—हा कवि तर्कशास्त्रांतहि मोठा प्रवीण आहे ह्मणून ऐकतों. तर चांदणें व कडक ऊन हीं जशीं एकत्र असावीं त्याप्रमाणें याचें कवित्व व तर्कशक्ति एके ठिकाणीं पाहून मला मोठा चमत्कार वाटतो!"

---

१ हा काळ अगदीं निश्चित ह्मणून आह्मीं येथें लिहिला नव्हे. पण ज्या अर्थी थोरल्या विक्रमादित्य राजाची व आपल्या कवीची तोडातोड अजून कोणीं पक्केपणीं केली नाहीं, त्या अर्थी तसें होईपर्यंत लोकवादासच अनुसरणें आह्मांस प्रशस्त वाटतें.

" सूत्रधार–यांत कसचा चमत्कार ! अरे, ज्यांची वाणी कोमल काव्यरचना प्रसवते, तीतूनच तर्कशास्त्राचीं तीक्ष्ण वचनेंही निघालीं असतां कोणती हानि झाली ?–ज्यांनीं कांताकुचमंडलीं आनंदेंकरून नखें रोंविलीं, त्यांसच मदोन्मत्त झालेल्या हत्तीच्या गंडस्थळावरही बाण हाणण्यास कांहीं कठिण आहे काय ?"

याप्रमाणें सुमारें सात आठशें वर्षांपूर्वींच जयदेवासही ' कवितेचा व तार्किकत्वाचा ' विरोध भासला. तेव्हां हें मत आह्मीं बळेंच स्वकपोलकल्पित काढलें आहे असें नाहीं अशी आमच्या सुज्ञ वाचकांची खचीत खात्री होईल. आणि या विषयाचा जो अंमळ बारकाईनें विचार करील त्यास खचीत कळून येईल कीं, कवीचें मन व तत्त्वज्ञाचें मन स्वभावतःच परस्परविरुद्ध होय. कवीच्या मनांत पदार्थमात्राच्या दर्शनानें कल्पनेचे नानाविध तरंग उठत असतात. ते अर्थातच बहुधा भासमय असतात. तत्त्वज्ञाचें मन पदार्थमात्राच्या वास्तविक स्वरूपाच्या शोधाकडे लागलेलें असतें; यास्तव सर्व भासमय कल्पनांचा निरास करून तें निवळ सत्याकडेच जातें. कवींचें काम ब्रह्मदेवाप्रमाणें चित्रविचित्र कल्पनासृष्टि बनविण्याचें असतें. तत्त्वज्ञाचें रसायनवेत्त्याप्रमाणें पदार्थमात्राचें पृथक्करण करण्याचें असतें. सारांश, पहिल्याचा विषय कल्पना व दुसऱ्याचा विषय सत्यासत्यविवेचन. ही भिन्नता विशेष स्पष्ट करण्याकरितां एक थोडेंसें उदाहरण येथें घेतों. साऱ्या सृष्टींत चंद्राहून रमणीय पदार्थ नाहीं. आतां याकडे कवीची व तत्त्वज्ञाची मनःप्रवृत्ति कशी होते ती बघा ! ग्रीक व रोमन लोकांनीं चंद्राच्या सौंदर्यावरून व सौम्यत्वावरून त्यास स्त्री कल्पिलें. त्यांच्या कथासमूहांत ही स्त्री पारधीण असून धनुष्य व भाता घेऊन ही वनांत पशूंमागें धांवते आहे असें वर्णन आढळतें. आपल्या कथासमूहांत तर अशा कल्पनांची गर्दीच आहे. समुद्रांतून उगवलासा दिसतो म्हणून त्यांतून निघालेलें एक रत्न; तो उगवतांच कुमुदिनी ( जणों काय हर्षानें ) विकसतात ह्मणून त्यांचा पति; रात्रींच त्याचे किरण प्रकाशमान होतात म्हणून तिचा नवरा; त्याच्या बिंबावर हरणाची आकृति दिसते ह्मणून मृगांक; त्यास पाहतांच समुद्रास ( जसें काय आनंदाचें ) भरतें येतें, ह्मणून ( दुसऱ्या कल्पनेनें ) त्याचा मित्र; याचप्रमाणें अंधकाराचा शत्रु, राहूचा द्वेष्य, इत्यादि संबंधही त्याजवर आले. त्याचे किरण नेत्रांस व शरीरास सुखद होत ह्मणून शीतकर, चंद्रकांतांस द्रवविणारा, इत्यादि कल्पनाही त्यावर बसल्या. आतां या मनोरम भ्रमांचें तत्त्वज्ञ कसें निरसन करून टाकतो पहा ! चंद्र स द्वीपापासून लाखों कोस दूर आहे हें जाणून तो समुद्रोत्थ रत्न नव्हे असा तो निश्चय करतो; समुद्राची भरती, कमलांचा विकास, हीं आकर्षणादि सृष्टिव्यापारांचीं फलें होत; हरण दिसतें ती चंद्रावरील पर्वतांची छाया; राहु ह्मणतात ती पृथ्वीची छाया; अशा उपपत्ति तो करीत जातो. शेवटीं चंद्राचे किरण थंडगार आहेत हा लोकानुभवही त्यास सहन न होऊन उष्णतामापक यंत्रानें तो चंद्रकिरणांची उष्णता काढतो ! !—झालें ! याप्रमाणें कविपरंपरेनें उभारलेल्या सुंदर मंदिराचा हा कविप्रातिपक्षी आपल्या दुर्बिणीनें व उष्णतामापक यंत्रानें समूळ विध्वंस करून सर्व सृष्टि उजाड करून सोडतो. वरील उताऱ्यांत कवितेस चांदण्याची व विचारशक्तीस कडक उनाची जी उपमा जयदेवानें दिली आहे तीही मोठी सरस व समर्पक होय. एक–

तर चांदणें शांत व रमणीय असतें; आणि ऊन उपयोगाचें खरें, पण त्याची झळई कोणास आवडत नाहीं. तसेंच कविता समजण्यास सोपी असते, मनाचें रंजन करते, आणि मनास शांति देते; पण शास्त्रावरील ग्रंथ अगोदर दुर्बोध, व समजल्यावरही त्यांपासून मनास प्रगल्भता येते, त्याचें रंजन होत नाहीं; आणि वादाचे ग्रंथ असले तर त्यांपासून चित्तास शांत न होतां उलटी क्षुब्धच होते. हें एक सादृश्य. दुसरें सादृश्य हें कीं, चांदण्यांत पदार्थ स्पष्ट न दिसल्यामुळें कल्पनाशक्तीस अवकाश सांपडून अवास्तव भासांत रंगण्यास मनास सांपडतें; पण कडकडीत उनांत पदार्थ अगदींच स्पष्ट दिसल्यामुळें कल्पनेस सवडच न सांपडून त्यांचें वास्तविक स्वरूप सहज दृष्टिगोचर होण्यासारखें असतें. हीच गोष्ट कल्पनेच्या द्वारें झालेल्या ज्ञानास व बुद्धीच्या द्वारें झालेल्या ज्ञानास यथानुक्रम लागते.

४. वरील उपपादनावरून दुसरी अशीही गोष्ट आमच्या सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येईल कीं बुद्धीची प्रगल्भता ही कल्पनाविकासाच्या पुढली मनाची दशा होय;—म्हणजे आरंभीं कल्पनेचा विकास होऊं लागून त्यापुढें बुद्धि विकास पावूं लागते. या गोष्टीचा अनुभव फार थोडक्यांत आहे. लहानपणीं मुलांस खुळखुळ्याची, दिव्याच्या ज्योतीची, चांदोबाची जी मौज वाटत असते, तिचें बीज हेंच होय कीं, त्या वेळेस त्यांची कल्पनाशक्ति हळूं हळूं विकास पावूं लागत असते. त्यांस भुताखेतांच्या, राक्षसांच्या गोष्टींची फार मजा वाटते, काळोखांत जाण्यास ती फार भितात, याचें तरी कारण हेंच,–कीं त्यांची कल्पना मोठी जागृत असून विचारशक्ति बहुधा निद्रिस्त असते. पण पुढें जसजसें त्यांस कळूं लागतें, तसतसा हा गोष्टवेल्हाळपणा कमी कमी होत जाऊन सारासारविचार म्हणजे तथ्य कशांत आहे कशांत नाहीं वगैरे विवेचन तीं करूं लागतात. पुष्कळांस स्वतःच्या अनुभवावरून आठवत असेल कीं, लहानपणीं इसापनीतींतील गोष्टींची फारच मौज वाटून तात्पर्य वाचतांना कंटाळा उठे; पण तो कल्पनेचा काळ जाऊन त्यापुढील दशा मनावर येऊं लागल्यामुळें हल्लीं बरच्या विरुद्ध अनुभव येतो;– म्हणजे गोष्टीपेक्षां तात्पर्यावर विशेष नजर असते ! असो; आतां हा प्रकार प्रत्येक व्यक्तिभूत मनुष्यांत जसा आढळतो, तसाच पण एकंदर राष्ट्रांनही आढळतो. पहा, सर्व लोकांत अगदीं पहिले ग्रंथ[१] झटले म्हणजे कवितेचे असतात; आणि हे केवळ अनुक्रमानेंच पहिले असतात असें नव्हे, तर योग्यतेनेंही अग्रगण्य असतात. या दोन्ही गोष्टींचें कारण अर्थात् हेंच कीं, त्या अप्रबुद्धतेच्या काळीं कल्पनाशक्ति जशी उद्दाम आणि अनावर असते, तशी पुढें कधींही असत नाहीं. विद्वत्ता म्हणजे सर्व गुणांचें निधान मानणाऱ्या लोकांस होमर किंवा वाल्मीकि, व्यास यांसारखे पुढें कवि झाले नाहींत या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत असेल ! पण असें होण्याचें कारण वर जें सांगितलें आहे तें लक्षांत आणलें असतां विस्मयास मुळींच जागा रहाणार नाहीं. तें मन्वंतर निराळें होतें आणि

१ हा शब्द येथें 'पुस्तक' या अर्थी योजला नाहीं; तर त्याचा मूळचा अर्थ–'जुळलेला मजकूर' हाच येथें घ्यावयाचा. वेदांच्या वेळेस किंवा होमरच्या वेळेस लेखनकला होती कीं नाहीं, या भानगडींत पडण्याची येथें जरूर नाहीं.

आतांचें निराळें आहे. त्या काळीं कल्पनेचेंच बहुधा प्राबल्य असल्यामुळें तसले जगद्वंद्य काव्य-ग्रंथ त्या वेळीं निर्माण झाले. पण आतां कल्पना जाऊन तिच्या जागीं विवेचनशक्तीचा जोर दिवसांदिवस होत चालल्यामुळें तें सामर्थ्य गेलें, आणि नानाविध शास्त्रांचा प्रादुर्भाव झाला. अंतरालांत काय काय चमत्कार आहेत, पृथ्वीच्या पोटांतील रचना कसकशी आहे, मनोवृत्तीचे व्यापार कोणकोणत्या नियमांनीं चालतात, वगैरे गोष्टींच्या शोधाकडे आलीकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ति झाली. पहिला काळ वसंतमासांप्रमाणें पालवीचा, मोहोराचा व फुलाचा होय; आणि हा पुढील शरन्मासांप्रमाणें फलधान्यसमृद्धीचा होय. तेव्हां दोहोंचें एकाधिकरणत्व ह्मणजे एके ठिकाणीं असणें वस्तुगत्याच शक्य नव्हे !

५. या सर्व गोष्टींचा यथास्थित विचार केला असतां ' सुधारणा कवितेस प्रतिकूळ होय, ' ' तिची वाढ सज्ञानतेच्या काळीं खुंटते ' वगैरे सकृद्दर्शनीं विलक्षण दिसणाऱ्या वाक्यांचा अर्थ आमच्या वाचकांच्या नीट लक्षांत येऊन त्यांची सत्यता त्यांच्या मनावर चांगली ठसेल. असो; आतां कवीचें लक्षण काय, त्याच्या अंगीं कोणते गुण प्राधान्येंकरून पाहिजेत, कोणते गौणत्वेंकरून हवेत, याविषयीं विचार करूं. तेणेंकरून प्रस्तुत विषयाची विशेष फोड होईल.

६. ' कवि ' शब्दाचा धात्वर्थ[1] पाहिला तर ' गाणारा ' असा आहे. हा आलीकडच्या काळीं अर्थातच नेहमीं लागू पडेल असें नाहीं; कारण गाणें हें निराळें कसबच होऊन बसलें आहे. पण प्राचीनकाळीं सर्व देशांत, व अजूनही तशी स्थिति जेथें असेल तेथें कवि हेच गाणारे व वाजवणारे असत. संस्कृत नाटकांतून हा पूर्वीचा प्रकार दाखविलेला असतो. राजांपाशीं स्तुतिपाठक असत, त्यांस नाटकाच्या परिभाषेंत ' वैतालिक ' ह्मणत, आणि एरवीं ' बंदिजन ' ही ह्मणत. दैत्यगुरु शुक्राचार्यांस याच कारणास्तव ' कवि ' ' काव्य ' हीं नांवें होतीं. ग्रीक लोकांत ' ऱ्हापसोडिस्ट्स् ( Rhapsodists ) नांवाचे लोक असत, त्यांचा धंदा होमर वगैरे प्राचीन सर्वमान्य कवींचीं काव्यें गाऊन व वाद्यांवर वाजवून तोंडपाठ ह्मणावीं हा असे. हे काव्यपठक कोणी कोणी स्वतःहि काव्यें रचीत. असो; याप्रमाणें लेखनकला त्यावेळीं नसतांही आपल्या वेदांप्रमाणें तीं काव्यें पठकपरंपरेनें त्या लोकांत राहिलीं. असो; ही गोष्ट प्राचीन काळची झाली. पण इतकेंही लांब जाण्याची गरज नाहीं. हा प्रकार सध्यांही इकडच्या प्रांतीं नुकता दृष्टीस पडत असे. पेशव्यांच्या वेळेस लावण्या, पवाडे या छंदांवर शाईर कवनें रचून आपणच गात; व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्या वेळीं त्यांची संभावना होत असे. ही कविता अजूनही पठकपरंपरेनें आपणांत राहिली आहे. ही छापून ठार बुडूं न देणें हें देशाभिमानी लोकांस मोठें भूषणास्पद होईल आणि असें केल्यानें भाषाभिज्ञांवर व रसिकांवरही लहान उपकार होईलसें नाहीं. असो; तेव्हां या रीतीनें ' कवि ' शब्दाची आपल्या देशांत रूढि झाली. इंग्रजी भाषेंत एतदर्थवाचक जो शब्द[2] आहे

१ कु—' गायन करणें. '

२ Poet—poeo ' I make '

त्याचा अर्थ ' करणारा ' असा होतो. यास्तव कवि ह्मणजे कल्पनासृष्टि बनवणारा असा त्या भाषेंतला मूळचा अर्थ होय असें सामान्यत: लोक समजतात. पण येवढा खोल अर्थ त्या अडाणी लोकांच्या मनांत प्रथमत: आला असेल असें आह्मांस वाटत नाहीं. तर आपल्या ' कवि ' शब्दाप्रमाणेंच ' करणारा ' ह्मणजे ' पद्यें जुळणारा ' इतकाच अर्थ त्यावेळीं मूळचा असेल हें मानणें आमच्या मतें अधिक सयुक्तिक होय. असो; येथवर नुसत्या शब्दाची व्याख्या झाली. आतां कवीस अवश्य गुण कोणते पाहिजेत वगैरे गोष्टींविषयीं विचार करूं.

७. कवीच्या अंगीं मुख्य गुण सहृदयता पाहिजे:—ह्मणजे हृदयाच्या शृंगारवीर—करुणादि ज्या नानाविध वृत्ति त्या त्यास अत्यंत सूक्ष्मत्वानें व स्पष्टत्वानें भासल्या पाहिजेत. वरील निरनिराळ्या वृत्तींचा विषय इंद्रियगोचर होतांच कवीचें मन क्षुब्ध होऊन जातें, आणि त्या खळाळीसरसे जे उद्गार आपोआप निघून जातात तेच खरी व अस्सल कविता होते.[१] याचें अत्युत्कृष्ट उदाहरण आपल्या आद्यकवीचा क्रौंचवधनिमित्तक करुणोद्गार होय हें आमच्या वाचकांस मागील अंकावरून आठवेलच ! तसेंच मराठी कवितेंत पहातां असे उत्कृष्ट मासले विशेषेंकरून तुकारामाचेच अभंग होत हेंही सर्वांच्या ध्यानांत येईल. हा कवि मनाचा मोठा प्रेमळ, साधा, मोकळा व थोर असल्यामुळें कोणत्याही प्रसंगाचे त्याचे अभंग असोत, त्यांत तो तो रस जसा काय भरपूर भरलेला असतो; व ह्मणूनच ते आपल्या लोकांस आज दोन अडीचशें वर्षें येवढे प्रिय होऊन राहिले आहेत; आणि जोंपर्यंत त्यांचा आधार जी मराठी भाषा ती या जगांत राहील तोंपर्यंत आपल्या नांवाप्रमाणें ते खरोखरच ' अभंग ' राहणारे आहेत. असो; तेव्हां निरनिराळ्या वृत्ति पूर्णपणें ज्यांत प्रतिबिंबित होतील असें अंत:करण कवीचें असायास पाहिजे; ह्मणजे सहृदयता हें कवित्वाचें मुख्य लक्षण होय. हें ज्याच्या ठायीं वसत नाहीं त्याची बुद्धि कितीही प्रचंड असली तरी ती त्यास या ठिकाणीं अगदीं कामास पडायाची नाहीं अशा विषयींचीं उदाहरणें आपल्या देशांतलीं देणें अशक्य होय; कां कीं, आपल्या प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारांची माहितीच आपणांपाशीं मुळींच नाहीं म्हटलें असतां चालेल. यास्तव दुसऱ्या देशांतीलच उदाहरणें सांगणें अवश्य आहे. प्राचीन रोमन लोकांत सिसरो ह्मणून एक महावक्ता होऊन गेला हें आमच्या मराठी वाचकांसही बहुधा विदित असेलच. हा सिसरो सांस्थानिक कामांतही मोठा हुशार असून शिवाय महाविद्वानही होता. यानें क्याटिलैनच्या बंडाचा मोड करून रोम शहर बचावलें, व एकंदर राज्यही त्यानें त्या संकटसमयीं वांचविलें ह्मणण्यास हरकत नाहीं. तसेंच यानें ल्याटिन भाषेंत शेंकडों मोठमोठे ग्रंथ रचून ठेवले होते; पण त्यांचा एक विसांश मात्र आतां उरला आहे. असो; पण सांगायाचें काय कीं हा येवढा नामांकित विद्वान् व शिवाय वक्ता असतांही, याची कविता इतकी भिकार आहे कीं तिला तें नांव सुद्धां शोभत नाहीं ! त्याला मात्र स्वाभिमानास्तव तिची योग्यता मोठी वाटे, पण

---

१ वर्डस्वर्थ नामक इंग्रेजी कवीनें असें कवित्वाचें लक्षण केलें आहे:—" Poetry is the spontaneous overflow of powerful feelings. "

बाकी सर्वांस ती आजपर्यंत अगदीं नादान वाटत आली आहे ! हें उदाहरण मोठें म्हणून आह्मीं येथें एकच घेतलें. दुसरींही अशीं पुष्कळ आहेत; पण तीं सर्व येथें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. आतां दुसऱ्या देशांतील कांहीं थोडीं सांगतों. जॅानसन्, पोप, ड्रायडन् हे ग्रंथकार केवढे थोर होऊन गेले हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. यांपैकीं शेवटल्या दोघांनीं तर आपआपला सारा जन्म कविता लिहिण्यांतच घालविला; व तिघेही आपआपल्या काळीं बाकीच्या कवींत अग्रगण्य होते. पण आतां यांस फारसा मान नाहीं; कोणी कोणी तर हे मुळींच कवि नव्हेत असें सुद्धां म्हणायास भीत नाहींत ! बरें तर, हीं सर्व उदाहरणें महाविद्वान् असून मुळींच कवि नसणारांचीं—किंवा निदान महाकवि नसणारांचीं—झालीं. पण इतकेंच नव्हे. याहूनही चमत्काराची एक गोष्ट वारंवार आढळण्यांत येते, ती ही कीं, समयविशेषेंकरून खऱ्या कवीचें सुद्धां कवित्व कमी जास्त होतें;—ह्मणजे एखादें काव्य एखाद्या वेळीं उत्कृष्ट साधून जातें, पण दुसऱ्या वेळीं कांहीं केल्या तसें उतरत नाहीं. मिल्टन् कवीनें आपणाविषयीं असें लिहिलें आहे कीं, माझी प्रतिभा वर्षाच्या कांहीं महिन्यांत विशेष उज्ज्वल असे, व या धोरणावर तो काव्यरचना करीत असे. पोपविषयीं जॅान्सन् यानें असें लिहिलें आहे कीं, यानें वीस वर्षांचा असतां जितकी उत्कृष्ट कविता केली त्याहून वरचढ अशी पुढें त्यास साधलीच नाहीं. त्याप्रमाणेंच बैरन् यानेंही पंचवीस तीस वर्षांच्या वयांत जी कविता रचिली ती फारच उत्कृष्ट उतरली; तशी त्यास पुढें साधली नाहीं इतकेंच नव्हे, तर ती पहिलीच्या मानानें पुष्कळच हलकी ठरली. असो; तेव्हां या सर्व गोष्टींवरून काय बरें स्पष्ट दिसतें ? अर्थात् हेंच कीं, कवित्वाचें तत्त्व सहृदयता होय. ही ग्रंथांत जशी कमीजास्त असते त्याप्रमाणें त्या ग्रंथास काव्यत्व येतें. आणि ही आपल्या अंगीं बळेंच आणूं जातां येणारी नव्हे हें तर काय, पण ती आपले ठायीं असतांही नेहमीं आटोक्यांत रहाणारी नव्हे !

८. तेव्हां इतर मनुष्यांत व कवींत मुख्य विशेष ह्मणून हाच कीं, कवीच्या ठायीं सहृदयता अत्यंत असते. ही येवढी मुद्द्याची गोष्ट नीट ध्यानांत धरली असतां ह्या विषय सर्वांस अगदीं उघड होईल. पहा कीं, ही सहृदयता म्हणजे अंतःकरणाचा कोमळपणा तरुण वयांत मनुष्यास फार असतो, व तसाच अर्थात् अज्ञानावस्थेंत असणाऱ्या राष्ट्रांतही फार असतो. ह्मणूनच लहान वयांत अंतःकरणवृत्ति सुक्षोभ असून नाटकें, कादंबऱ्या, काव्यें अशा ग्रंथांचा अतोनात नाद लागतो; आणि राष्ट्राच्याही आद्यावस्थेंत उत्कृष्ट कविता उदयास पावते. पण या सौम्य वृत्ति मनुष्यांत व राष्ट्रांत प्रौढ वयाच्या सुमारास मावळूं लागून शेवटीं बहुधा अगदींच नाहींशा होतात; व त्यात्याप्रमाणें विचारशक्तीचें प्राबल्य होत जाऊन कवित्वाचा ऱ्हास होतो. त्या मूळच्या साध्या काळांत झालेल्या कवींस दुसरी सोयही ही होती कीं, सृष्टीच्या व मानवी स्वभावाच्या केवळ मूळच्या स्वरूपाशीं त्यांचा नेहमीं परिचय असे; आतांप्रमाणें दोहोंवर त्या काळीं कृत्रिमता आली नव्हती. यास्तव दोहोंची प्रतिमा त्यांच्या विशद मनावर जशी काय सहज ठसून जाऊन ती वर्णनद्वारा त्यांच्या ग्रंथांत प्रगट झाली. पण पुढील कवींच्या मनावर ती अर्थातच पहिल्यांच्या प्रमाणें

यथास्थित न उठल्यामुळें स्वभाववर्णन त्यांस पहिल्यांसारखें साधलें नाही. असें होतां होतां शेवटीं तर स्वभाववर्णन अगदींच सुटून कविता केवळ सामान्य व्यवहारिक कलेप्रमाणें गणमात्रा जुळण्याचेंच काम होऊन बसली. पहिले कवि स्वानुभूत गोष्टींचें व मनोवृत्तींचें वर्णन करीत; पण पुढील काळीं कीर्तीच्या किंवा पैशाच्या लोभास्तव जेव्हां काव्यें रचण्याचा प्रघात पडला, व कविता करणें हा एक धंदाच झाला, तेव्हां स्वानुभव हा कवींस नकोसाच झाला. कवितेस सहृदयत्वापेक्षां बुद्धीची व मेहनतीचीच विशेष गरज लागूं लागली. ह्मणजे आर्यांच्या कवितेचें जें सार्थ अर्थसौंदर्य तें जाऊन त्याच्या जागीं मोठमोठीं मजेदार वृत्तें, पदांचें लालित्य व माधुर्य, अर्थालंकार, शब्दालंकार, असा थाटमाट हळूं हळूं झाला. जे पदार्थ, जे सृष्टि चमत्कार कधीं यावज्जन्म पाहिले नाहींत, ज्या मनाच्या वृत्ति किंवा जे अंतःकरणाचे विकार कधींही साक्षात् अनुभवास आले नाहींत, किंबहुना येण्याची योग्यताही नाहीं, त्यांवरही या पुढील कवींनीं धाड घालून त्यांचें वर्णन आपल्या ग्रंथांतून आणलें आहे. हें एक असो. पण याहून उपहासास्पद गोष्ट काय कीं, जे सृष्टींतील पदार्थ सहज पाहण्यासारखे असतात त्यांचेंही वर्णन यांनीं यथावत् केलेलें नसतें. होमरच्या 'इलियड' नामक जगन्मान्य काव्याचें पोप कवीनें इंग्रेजींत भाषांतर केलें. त्यांतील आठव्या सर्गाच्या शेवटीं चांदण्या रात्रीचें वर्णन आहे. तें इंग्रेजींत इतकें चुकलेलें आहे कीं, मेकॉलेच्या मतें, 'त्यांत जितक्या चुका आहेत तितक्या साऱ्या 'इलियडां' त सांपडावयाच्या नाहींत.' तसेंच ड्रायडन् यानें एका नाटकांत एके प्रसंगीं रात्रीचें वर्णन केलें आहे; त्याची मागें मोठी वाहवा होती, व तसें वर्णन कोणत्याही कवीस साधलें नाहीं असें जॉनसन्सारख्या महारासिकांचें मत होतें. पण तेंच आतां 'अप्रयोजक, व आंत शब्दगौरव मात्र मोठें असून अर्थशून्य' असें ठरलें आहे.[२] पुढील पुढील संस्कृत कवींचीं वर्णनेंही जीं

१ तें वर्णन येणेंप्रमाणें:—

As when the moon, refulgent lamp of night,
O'er heaven's clear azure spreads her sacred light,
When not a breath disturbs the deep serene,
And not a cloud o'ercasts the solemn scene,
Around her throne the vivid planets roll,
And stars unnumbered gild the glowing pole,
O'er the dark trees a yellower verdure shed,
And tip with silver every mountain's head;
Then shine the dales, the rocks in prospect rise,
A flood of glory bursts from all the skies;
The conscious swains, rejoicing in the sight,
Eye the blue vault, and bless the useful light.

२ तें हें—

इतकीं नीरस उतरलीं आहेत त्याचें तरी कारण हेंच. एकदां अनादिसिद्ध ज्या उपमा ठरून गेल्या, जे कविसंकेत एकदांचे कायम बसून गेले, त्यांचीच पुनरुक्ति, किंवा स्वतःच्या वेड्यावांकड्या अत्युक्तिरूप विलक्षण कल्पना यांनीं त्यांच्या कृति भरलेल्या असतात. बाह्य-सृष्टीचें किंवा अंतःसृष्टीचें अवलोकन ह्मणजे काय हें या बिचाऱ्यांच्या कधीं स्वप्नींही आलें नसेल ! जुन्या कवींनी केलेल्या वर्णनांवरून सरासरी आपलीं वर्णनें बनवायाचीं, मग तीं कशीं चांगलीं उतरावीं ? अगोदर मोठमोठ्या कवींनी केलेलीं वर्णनेंही हुबेहूब उतरत नाहींत,—ह्मणजे ते ते पदार्थ प्रत्यक्ष पाहून जी कल्पना मनांत भरते ती नुसत्या वर्णनां-वरून कधींही भरत नाहीं. मग या वर्णनावरूनच जीं प्रतिवर्णनें उतरावयाचीं त्यांच्यांत तथ्य व रस कितपत राहील ! अर्थात् छायेच्या प्रतिच्छायेंत व मूळच्या रूपांत जितपत अंतर तितपतच त्या दोहोंतें ! अशा प्रतिकवींचीं वर्णनें ह्मणजे जन्मांधानें जसें वनश्रीचें वर्णन करावें, किंवा दुसऱ्या एका तऱ्हेच्या मनुष्यानें शृंगार वर्णावा, त्याप्रमाणेंच सर्वथा हास्यास्पद होत.

९. तेव्हां जुन्या कवींचीं काव्यें येवढीं उत्कृष्ट उतरण्याचीं हीं कारणें होत. एक तर त्या काळीं कल्पनेचें मोठें प्राबल्य असल्यामुळें तें त्यांच्या कवित्वास अत्यंत पोषक झालें; दुसरें, बाह्यसृष्टीचें व अंतःसृष्टीचें मूळचें शुद्ध स्वरूप त्यांच्या नेहमीं दृष्टीस पडल्यामुळें त्यांच्या कृत्रिमसंस्काररहित शुद्ध मनावर ' रंगः शुक्लपटे यथा ' ( जसा पांढऱ्या स्वच्छ कापडावर रंग ) या न्यायानें त्यांचा ठसा सहजपणें पूर्ण उमटला; तसेंच तिसरेंही कारण अर्थात् हें कीं, त्या कवींच्या मनोवृत्ति व हृदयवृत्ति केवळ स्वानुभूत असल्यामुळें त्यांचा आविर्भाव तसाच यथास्थित व स्पष्ट त्यांच्या ग्रंथांत झाला. पदार्थविज्ञानांत सांगितलेला पाण्याचा धर्म सर्वांस माहीतच असेल कीं, तें जितक्या उंचीवर मूळचें असतें तेथपर्यंतच तें चढतें. हाच नियम अंतःकरण-वृत्तींसही लागतो. ज्या वृत्ति हृदयासच अगोदर भासल्या

All things are hushed as Nature's self lay dead,
The mountains seem to nod their drowsy head.
The little birds in dreams their songs repeat,
And sleeping flowers beneath the night-dew sweat,
Even Lust and Envy sleep; yet Love denies,
Rest to my soul, and slumber to my eyes.

*Indian Emperor*

('These lines are vague, bombastic and senseless'—
Wordsworth.)

२ छायेच्या प्रतिच्छायेचें उदाहरण सृष्टींत दृष्टिगोचर होणारें एक मोठें आहेः—तें चंद्राची कोर दिसत असतां अवशिष्ट बिंबावर जो प्रकाश दिसतो तो होय. सूर्याचा पृथ्वीवरील प्रकाश चंद्र-बिंबावर परावर्तन पावून त्याचें पुनः पृथ्वीवर परावर्तन झाल्यानें वरील कंधक प्रकाश दिसतो.—हा दृष्टान्त मूळच्या अनुभवसिद्ध वर्णनांत व वर्णनाच्या प्रतिवर्णनांत किती भेद होतो हें दाखविण्यास उपयोगीं पडेल !

नाहींत त्यांचें वाग्द्वारां वर्णनही अगदीं रसशून्य उतरल्यास काय नवल ? ज्यानें वियोग-दुःख कधीं अनुभविलें नाहीं त्यानें पुत्रशोकादिकांचें वर्णन केल्यास, ज्याचा काळ नेहमीं ऐषआरामींत जाणार त्यानें युद्धादि प्रसंग वर्णिल्यास, वसंतांतली गार झुळूक घेणारानें समुद्रा-वरील तुफानाचें वर्णन करूं गेल्यास, तें किती उत्कृष्ट उतरेल हें कोणी सांगेल ! ज्यानें पर्वतींहून मोठा डोंगर पाहिला नाहीं त्यानें हिमालयाचें वर्णन करूं जाणें, ज्यानें मुळा-मुठाच काय त्या मोठ्या नद्या पाहिल्या त्यानें गंगायमुनांसारख्या महानद्यांच्या वर्णनास हात घालणें, म्हणजे भांबुरड्यावरून लंडन शहराची कल्पना बांधणें होय ! असो; तेव्हां वर्णावयाच्या गोष्टींचा साक्षात् अनुभव कवीस अगदीं अवश्य पाहिजे.

१०. कवीस प्राधान्यें करून ज्या गोष्टी पाहिजेत त्या या वर सांगितल्या. यांखेरीज बाकीच्या ज्या राहिल्या—म्हणजे पदलालित्य, मृदुत्व, माधुर्य, सरळ अन्वय, व्याकरण-शुद्धता, छंदांची निर्दोष व्यवस्था, इत्यादि—त्या एके रीतीनें गौणच होत. या नसल्यानें काव्याची शोभा कमी होते खरी, पण याच नुसत्या असल्यानें ती येते असेंही नाहीं. दुसरें असें कीं, अगदीं सुमारवट बुद्धीच्या मनुष्यासही हे गौण काव्यगुण साधण्यासारखे आहेत; पण वरील तसे नव्हेत. ते पुष्कळ अंशीं मूळचेच अंगीं बसले पाहिजेत, व कांहीं अंशीं स्थितिविशेष व प्रसंगविशेष यांच्या योगानें त्यांचा उत्कर्ष व्हावयास पाहिजे. आरंभींच्या मोठमोठ्या कवींचीं काव्यें पाहिलीं, तर त्यांत वरील पदलालित्यादि गुण फारसे सांपडणार नाहींत. 'रामायणा' चा छंद येथून तेथून एक अनुष्टुप् आहे, व शब्दांच्या रचनेकडे वगैरे त्यांत विशेष लक्ष अगदींच दिलेलें आढळत नाहीं. 'महाभारतां' तही तोच प्रकार. त्यांत मधून मधून मोठाले छंद कोठें कोठें आहेत, पण त्यांत छंदोभंगादि दोष हवे तितके आहेत. तिसरें प्रसिद्ध पुराण जें 'भागवत' त्यांत मात्र मोठाले छंद, अलंकार वगैरे सांपडतात, व यास्तव तें अर्वाचीन आहे असें पंडितांचें मत आहे. इंग्लिश लोकांच्या अभिमानाचें परम स्थान होऊन बसलेला जो शेक्सपीयर —कीं जो इंग्लंडचा कवि नव्हे, तर साऱ्या मनुष्य-जातीचा होय[१], असें युरोपांतील पंडित ह्मणतात—त्याचे ग्रंथही याच सदराखालीं मोड-तात. या बोवांनीं तर कोणत्या दोषास ह्मणजे आपल्या अजरामर कृतींत थारा दिला नाहीं असें प्रायः आढळणार नाहीं !—एकवचनी क्रियापद बहुवचनान्त कर्त्यांशीं जोडलें तर आहे; बोहेमिया देशास बेट करून त्याच्या किनाऱ्यावर जहाज तर उतरविलें आहे; ट्रोजन लोकांच्या हेक्टर नामक वीराकडून शेंकडों वर्षें पुढें झालेल्या आरिस्टॉटलचें एके प्रसंगीं वचन तर म्हणविलें आहे;—याप्रमाणें या वाग्देवतेच्या लालाचीही थोडीशी

१ या ह्मणण्याचा अर्थ असा कीं असे पुरुष फार विरळा होतात. असे काल केव्हां केव्हां प्रकट करून ईश्वर आपली विभूति दाखवितो. यास्तव अमुकच देशांत ते जन्मास आले ही केवळ साहजिकच गोष्ट असून तीबद्दल त्याच देशविशेषास गर्वाचें कारण नाहीं; कां तर ती कृपा एकंदर मानवजातीवर झाली असें समजायाचें.

लीला वर्णन केली[1] ! बरें, माधुर्य, मार्दव, प्रसाद वगैरे इतर गुण जर कोणी पाहूं लागेल, तर या संबंधेंही शेक्सपीयरच्या ग्रंथांत त्याचें समाधान होईलसें आह्मांस वाटत नाहीं. या कवीच्या पुढल्या काळीं—ह्मणजे ड्रायडन्, पोप, जॉनसन् यांच्या वेळीं—तर वरच्या उलट गुण, ह्मणजे कार्कश्य, क्लिष्टत्व, यांस्तव यास कोणचि विचारीत नसे; व आतां जरी हा कवी येवढा लोकप्रिय होऊन गेला आहे तरी दुर्बोध अर्थांचीं याच्या नाटकांत पुष्कळ स्थळें आहेत हें हवें त्यास सहज दिसून येईल. पण येवढयानेंच झालें नाहीं. आणखीही दोन मोठाले दोष या कविशिरोमणींच्या माथीं मारले पाहिजेत. एक श्लेषयोजनेची अतोनात हौस; आणि दुसरा दोष अश्लिलत्व. जॉनसन् यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, ' श्लेषाची संधि सांपडली असतां ती आपल्या कवीस कधीं फुकट दवडवत नाहीं[2]. ' तसेंच अश्लीलत्व म्हणजे चावटपणा. हा शेक्सपीयरच्या मोठमोठ्या नाटकांतूनही खुशाल उघडपणें मोटमोटया पात्रांनीं सुद्धां केलेला असतो. याचा प्रत्यय आमच्या मराठी वाचकांस घेणें असेल तर त्यांनीं कैलासवासी महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं केलेलें ' अथेल्लो ' चें भाषांतर पहावें. तें पाहिलें असतां आमच्या कांहीं संस्कृत कवींच्या शृंगार–वर्णनाच्या योगानें अंगावर शहारा आणणाऱ्या[3] डॉक्टर हाल् प्रभृति सोंवळ्या साहेबांच्या ढोंगाचा आमच्या लोकांस चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं ! असो; या वादाच्या संबंधानें एका थोर निष्पक्षपात इंग्रेज ग्रंथकाराचा अभिप्राय येथें दाखवून हें प्रकरण संपवितों. शेक्सपीयर कवीनें कांहीं लहान काव्येंही लिहिलीं आहेत; त्यांस उद्देशून हालम् साहेबांनीं ह्मटलें आहे कीं, हे ग्रंथ या कवीच्या विशाल कीर्तीस कलंकरूप होत; हे यानें लिहिले नसते तर बरें होतें. असो; पण या सर्वांपेक्षांही अधिक सदोष कविता पाहणें असल्यास आमची मराठी होय; तींतील बहुतेक कवींस व्याकरणाची, छंदांची वगैरे ओळख सुद्धां नव्हती असें ह्मणण्यास हरकत नाहीं; मग पदलालित्य, अर्थगांभीर्य वगैरे काव्यगुणांची तर गोष्टच नको ! प्रसाद हा गुणही त्यांच्या कवितेंत सर्वत्र आढळतोच असाही नेम नाहीं. या सर्व कवींत वामन पंडित मोठा विद्वान् होता ह्मणून लौकिक आहे; पण या कवीनेंही

---

१ व्याकरणदोषाचें फार प्रसिद्ध उदाहरण ' ज्युलियस् सीझर् ' नाटकांत आहे—' There *is tears* for his love. '—प्रस्तुत कवीच्या भूगोलज्ञानाविषयीं जॉनसन् एके ठिकाणीं टिपेंत ह्मणतो—'Our author seldom escapes well when he is entangled in Geography !' ('आपले कवि भूगोलच्या जाळ्यांत अडकले असतां बहुधां बरेपणीं निभावत नाहींत !') —आरिस्टॉटल् शिकंदर बादशहाचा गुरु होता ही गोष्ट आमच्या वाचकांस बहुधा विदित असेलच, वास्तव या तत्ववेत्याचें वाक्य हेक्टरानें आपल्या भाषणांत आणणें म्हणजे भीमानें कालिदासाचा श्लोक म्हणण्याप्रमाणें हास्यास्पद आहे ! !

२ Our author can never resist the temptation of a pun.

३ हे साहेब दहापंधरा वर्षांमागें कलकत्याकडे विद्यागुरु होते. यांनीं सुबंधु कवीच्या ' वासवदत्ते 'चें प्रकाशन केलें. या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत या साहेबांनीं संस्कृत कवींवर व एकंदर हिंदु लोकांवर मोठा कटाक्ष उडविला आहे. यासंबंधानें शालापत्रक, पुस्तक १३ अंक ८ वाचकांनीं पहावा.

पांडित्य त्याच्या काव्यांत चांगलेसें दिसत नाहीं. अर्थ पुष्कळ ठिकाणीं क्लिष्ट असून शिवाय पदरचनेविषयींही पंडितांनीं मोठीशी खटपट केलेली कोठेंही नजरेस येत नाहीं. असो; तेव्हां एकंदर सिद्ध काय करायचें कीं, हे पदलालित्यादि गुण काव्यास शोभादायक खरे, पण ते काव्याचें सर्वस्व नव्हेत. त्यांचा बहुधा अभावच असतांही जगास ज्यांचे ग्रंथ चिरकाळ मान्य होऊन राहिले आहेत अशा महाकवींचीं वर उदाहरणें सांगितलीं. त्यांवरून पूर्वोक्त गुण केवळ गौण होत हें आमच्या वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

११. पण ते गौण आहेत ह्मणून त्यांची गरज नाहीं असा अर्थ समजावयाचा नाहीं. केवळ त्यांच्याच योगानें ग्रंथास काव्यत्व येणार नाहीं हें खरें, पण सत्काव्याशीं जर त्यांचा योग झाला तर ते त्याचें रमणीयत्व फारच वाढवितील यांत तिळमात्रही संदेह नाहीं. याशिवायही काव्याचें सौंदर्य भासणें, किंबहुना एतद्विरुद्ध दोषांनीं ग्रस्त झालेल्या ग्रंथांतही कवित्वाची लकेर उमगणें, हें महारसिकांशिवाय दुसऱ्यांचें सामर्थ्य नव्हे; पण सामान्य जनांस जर रमविणें असेल तर रत्न जसें कोंदणांत बसवायाचें, तसेंच काव्यास वर सांगितलेल्या साधनांचा अवश्य उपयोग करून घेतला पाहिजे. हाच प्रकार व्हर्जिल वगैरे ल्याटिन् व कालिदासादि संस्कृत कवींच्या ग्रंथांतून आहे; व ह्मणूनच त्यांचीं काव्यें मोठ्या मार्मिक रसिकांस जशीं रिझवितात तशींच सामान्यजनांसही आजपर्यंत आनंद देत आलीं आहेत.

१२.– याप्रमाणें कवीस प्राधान्येंकरून कोणते व गौणत्वेंकरून कोणते गुण अवश्य हवेत याविषयीं बरेंच लांब विवरण झालें. हें यथास्थित ज्यांच्या मनांत भरलें असेल त्यांस प्रस्तुत विषयाचा तेव्हांच उलगडा पाडतां येईल. तो असा कीं, प्रधान जे गुण आहेत—ह्मणजे सहृदयता व तज्जन्य स्वभाववर्णन करण्याची शक्ति—हीं शेंकडों ग्रंथांचें अध्ययन करून त्यांचें ज्यानें पीठ करून सोडलें व मोठा वादचंचु किंवा महान् ग्रंथकार झाला त्यास सुद्धां त्याच्या विद्वत्तेच्या योगानें लेशमात्रही येणार नाहींत. मोठा मोठा विद्वान् झाला तरी जसा मनुष्य चित्रकलेंत किंवा गायन अथवा वादनकलेंत निपुण झालाच असें होत नाहीं, तशीच गोष्ट कवित्वाची होय. रत्नपारख्याची जशी एका प्रकारची नजर असते, ती शिकवून येणारी नव्हे; व तशीच चित्रकलेचें किंवा वादनकलेचें मर्म समजण्याची शक्ति जशी एखाद्याचेच ठायीं ईश्वरानें ठेविली असते; तशीच कवितेचीही गोष्ट आहे. पण इतकेंच नव्हे. अशा प्रचंड पंडितांस जातीनें कविता करतां येणार नाहीं हें तर आहेच; पण शिवाय तिची परीक्षा किंवा आस्वादन हेंही त्यास नियमानें शक्य असेलच असेंही ह्मणवणार नाहीं. याचीं उदाहरणें, इंग्लंडांत मागल्या शतकांत होऊन गेलेला जॉनसन् हा कांहीं अंशी होय; व इकडे अलीकडील आपले जुने शास्त्री प्राय: सर्वथा होत. बाह्यसृष्टीचें वर्णन कर्तव्य असतां तो प्रदेश घटकाभर प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिला असतां जी त्याविषयीं मनांत कल्पना भरेल ती जशी नकाशांवरून किंवा वर्णनांवरून पुष्कळ दिवस अभ्यास केल्यानेंही येणारी नव्हे; त्याप्रमाणेंच अंत:सृष्टीचीही गोष्ट होय. त्या त्या रसाच्या विषयाच्या साक्षात् अनुभवानें जें स्वरूप लक्षांत येईल तें नुसत्या कोरड्या वर्णनांच्या वारंवार वाचनानेंही आलेंच

तर अगदीं अस्पष्ट येईल. सारांश, कवित्वास किंबहुना रसिकतेसही विद्वत्ता अगदीं कारण नाहीं. उलटी ती मागें सांगितल्याप्रमाणें दोहोंस स्वभावतः विरुद्धच होय असेंही म्हटलें पाहिजे. तिचा उपयोग झालाच तर कवितेचे वर सांगितलेले बाह्य व अप्रधान गुण तिच्या योगानें कदाचित् मोठ्या श्रमानें साधतां येतील, इतकाच. पण तिच्या तत्त्वापर्यंत तिची गति कदापिही पोंचणार नाहीं!

१३. तेव्हां एकंदर सिद्धान्त हा. जो जात्या कवि आहे तो कदाचित् विद्वान्ही असेल---जसे कालिदास, जगन्नाथराय, मिल्टन्, बायरन् इत्यादि; किंवा नसेलही---जसे शेक्सपीयर, बेर्न्स्[1], तुकाराम इत्यादि. पण जितकी जितकी विद्वत्ता अधिक तितकें तितकें कवित्व अधिक ही मात्र मोठी चूक. या पक्षाचीं कांहीं उदाहरणें मागें सांगितलीं आहेतच--सिसरो, जॉनसन्, आपले जुने शास्त्री. पण हीं फार कां देतां येत नाहींत याचें कारण अंमळ विचार करील त्यास तेव्हांच उमगेल;--तें विद्वत्तेस सर्वगुणाधिष्ठित मानणाऱ्या भोळ्या भाविकांस मोठें जाचेल यांत संशय नाहीं. तें आह्मी येथें उघड लिहीत नाहीं; तें येवढ्यानेंच सुचवितों कीं, असें होणें हें त्या विद्वानांच्या गर्वास किंवा मूर्खपणास योग्य शासन झालें; व या योगानें त्यांनीं पुढील लोकांस चांगला शहाणपणाचा मार्ग दाखवून ठेवला!

---

## संपत्तीचा उपभोग.

**अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यम्॥[2] शंकराचार्य.**

अंक ५--(१) विषयनिरूपण (२) प्रस्तुत विषयावर तीन प्रकारचा मतभेद (३) पहिलें मत; त्याचें समर्थन (४) त्याचें खंडन (५) निर्णय (६) दुसऱ्या मताचें विवेचन (७) तिसऱ्याचें विवेचन (८) मुख्य विषय. (९) संपत्तीच्या उपभोगाचे प्रकार (१०) कृपण व विषयी (११) मिरासी लोक (१२) रिकामपणाचें सुखावहत्व (१३) रिकामपणाचे अनर्थ (१४) संपत्तीच्या उपभोगाचा आणखी एक प्रकार---धर्म (१५) युरोपियन लोकांचा कित्ता---एकंदर होणारें हित.

१. या विषयावर आपल्या लोकांत, विशेषेंकरून जुन्या मंडळींत, मोठीं विलक्षण मतें त्यांच्या मनानें घेतलेलीं आढळतात. हीं अर्थातच पिढ्यानपिढ्या कायम चालून विचार करण्याची कधीं संवय नसल्यामुळें आपल्या लोकांच्या मनांतून कधीं ढळलीं नाहींत. पण सध्यांच्या काळीं त्यांचा खरेखोटेपणा विचारांतीं ठरविणें अवश्य आहे. यास्तव या विषयाच्या संबंधें आमच्या ज्या समजुती झाल्या आहेत त्या येथें प्रगट करितों.

२. अर्थशास्त्राची उत्पत्ति होऊन त्याचा युरोपखंडांत सर्वत्र प्रसार झाल्यापासून या विषयाच्या संबंधें लोकमत अगदीं फिरून गेलें आहे. प्राचीन काळीं महाज्ञानी ह्मणविणारांनीं

---

१ हा स्वशिक्षित कवि स्कॉटलंड देशांत गेल्या शतकांत होऊन गेला. हा अगदीं गरीब असून याचा सारा जन्म शेतकींत गेला.

२ याचा अर्थ पुढें आलाच आहे.

संपत्तीस जसें नेहमीं तुच्छ करूं पहावें; व सुमारें गेल्या शतकापर्यंत ती अनर्थमूलक, व विशेषत: एकंदर राष्ट्रास अत्यंत अपायकारक असें मानण्याकडे जसा सुज्ञ लोकांचा कल होता; तसेंच हल्लींच्या काळीं संपत्तीविषयीं लोकांच्या मनानें वरच्याच्या अगदीं उलट अशा समजुती ग्रहण केल्या आहेत. संपत्ति ह्मणजे सर्व सुखाचें व समाधानाचें परम स्थान होय; तिचा लोभ धरण्यांत कांहीं वाईट नाहीं इतकेंच नव्हे, तर तिजविषयींचें प्रेम मोठें प्रतिष्ठादायक होय; असा सर्वांचा अलीकडे सिद्धान्त होऊन गेला आहेसा दिसतो ! असो; तेव्हां आजपर्यंत संपत्तीच्या संबंधें लोकमतांत इतके प्रकार झाले. प्रस्तुत निबंधांत वरील सर्व मतें खरीं आहेत व खोटींही आहेत हें दाखवायाचें आहे.

३. आतां पहिल्यानें प्राचीन मत. सर्व देशांतील महाज्ञानी लोकांचें प्राचीन काळीं असें मत होतें कीं, संपत्ति ही सर्व प्रकारें अनिष्टाचें मूळ होय. इहलोकीं तर तिजपासून तिच्या मालकास निरंतर श्रम, काळजी, दौर्बल्य हीं मात्र पैदा होऊन शिवाय याहूनही अत्यंत भयंकर काय कीं, संपत्तीच्या करितां तिच्या जोरावर केलेलीं महापातकें त्यास परलोकीं अक्षय नरकवास घडण्यास कारण होतात. याप्रमाणें सुखाच्या आशेस गुंतून मनुष्य धनासाठीं जी सारखी यातायात करीत असतें त्याप्रमाणें त्यास कसलाच लाभ न होतां व्यर्थ शीण मात्र होऊन संतोषसुखास तें मुकतें; व शिवाय परमार्थास मोठाच धक्का बसतो ! यास्तव सर्व प्राचीन तत्त्वज्ञांचा धनावर मोठा कटाक्ष होता; व यास्तव दारिद्र्यांत व संतोषांत किती सुख आहे तें ते मोठ्या उत्सुकतेनें सांगत. आपले आचार्य ' मोहमुद्गरा ' त आरंभींच हा उपदेश करतात:—

मूढ जहीहि धनागमतृष्णां कुरु तनुबुद्धे मनसि वितृष्णाम् ।
यल्लभसे निजकर्मोपात्तं वित्तं तेन विनोदय चित्तम् ॥
अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यम् ।
पुत्रादपि धनभाजां भीतिः सर्वत्रैषा कथिता नीतिः ॥

" बारे मूढा ! ही धनतृष्णा सोड. अरे वेड्या ! मनांत संतोषरूप समाधानवृत्ति धारण कर. पूर्वकर्मानुरूप जेवढें तुला मिळेल तेवढ्यांतच आनंद मानून ऐस.

अर्थ हा अनर्थावह आहे असें नेहमीं समजत जा. त्यापासून खरोखर सुखाचा लेशही प्राप्त होणार नाहीं. पहा कीं धनवान् पुरुषास प्रत्यक्ष पुत्रापासूनही भीति आहे; मग दुसरें तर काय ? तस्मात् हा उपदेश चांगला चित्तांत ठसूं दे. हाच आजपर्यंत ज्ञाते पुरुष सर्वांस सांगत आले आहेत."

असाच उपदेश कित्येक संस्कृत काव्यांतून व साऱ्या मराठी कवितेंत आहे. ग्रीक व रोमन लोकांतही धनास तुच्छ मानणारे पुष्कळ थोर लोक होऊन गेले. त्या सर्वांत सॉक्रेटीस हा अग्रगण्य होय. हा साऱ्या जन्मभर अकिंचन राहिला. एकेसमयीं एका श्रीमान् गृहस्थाचें ऐश्वर्य व थाटमाट पाहून हा ह्मणाला, " मला ज्यांची गरज नाहीं, ज्यांवांचून माझें खुशाल चालतें, असे येथें किती पदार्थ आहेत !" दुसऱ्या अशाच प्रसंगीं त्यानें ह्मटलें, "मी या

श्रीमंतांपेक्षां किती सुखी आहे ! यांस येवढें संभाळण्यास केवढे आयास पडतात ! केवढी काळजी वहावी लागते ! " असो; तेव्हां यावरून प्राचीन ज्ञात्या पुरुषांचा एकंदर रोंख तेव्हांच दिसून येतो.

आतां वरील मत खरें आहे व खोटेंही आहे हें सहज दाखवितां येईल. खरें असें कीं, वर सांगितलेले धनाचे अनर्थ सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिले आहेत;—ह्मणजे तें प्राप्त झाल्याच्या योगानें मनुष्य मदांध होतो, त्यास नानातऱ्हेचे ढंग सुचतात, व्यसनांस वश होऊन तो अनन्वित कृत्यें करूं लागतो, इत्यादि प्रकार झालेले ज्यानें पाहिले नाहींत असा मनुष्य सांपडणें नाहीं ! श्रीमंतांच्या घरोघर दुराचार व गृहच्छिद्रें किती असतात हें जवळ जवळच्या लोकांस तरी पूर्णपणें विदित असतें. श्रीमंतीच्या जोरावर हवी तेथें सत्ता चालते, अनेक प्रकारचीं दुष्कर्में बिनधोक करतां येतात, प्रसंगीं न्यायाधीशांची, डॉक्टर साहेबांची मूठ दाबायास सांपडते, हें कोणास सांगायास पाहिजे ? असो, तर हीं सर्व अनिष्टें धनजन्य नव्हेत काय ? बरें, आपले छंद पुरविण्याकरितां इतकी दुसऱ्यांस पीडा देऊन तो संपत्तीचा उपभोक्ता तरी सुख पावतो काय ? आपणापाशीं अपार संपत्ति आहे, हजारों चाकर माणसें आपल्या शब्दावर झुलताहेत, हवा तो सुखाचा पदार्थ ह्मटल्या वेळेस तयार आहे, इच्छेस कोठेंही अटकाव नाहीं; इतकें असून असे किती लोक सांपडतील, कीं ज्यांस असें वाटत असेल, अहो, आह्मांसारखें सुख व समाधान कोणास आहे ? आह्मांस यत्किंचित् तरी दुःख आहे काय ? लेशमात्रही काळजी आहे काय ? अहाहा ! काय संपत्तीचा प्रभाव ! ती जसजशी मिळत गेली तसतसे आह्मी आनंदसागरांत बुडतच चाललों !—अरेरे ! असें त्यांच्यानें ह्मणवतें तर मग काय हवें होतें ! ज्यांस त्यांची खरी स्थिति माहीत नाहीं अशा अज्ञान लोकांस त्यांची स्थिति अशीच वाटते खरी; पण काय ? दुरून डोंगर साजरे. अंतस्थ प्रकार कसा काय आहे तो जो अंमळ विचारपूर्वक पाहील, त्याची खात्री होईल कीं, शेतांत रात्रंदिवस खपणाऱ्या कुणब्यानेंही त्यांच्या श्रीमंतीचा हेवा करूं नये ! सदासर्वदा दुखणीं, त्यामुळें शरीरास आलेला दुबळेपणा, व्यायाम नसल्यामुळें केव्हां केव्हां पाय जाणें, उद्योग काडीचाही नसल्यामुळें मनास नेहमीं कंटाळा, सुखोपभोगांचा नित्य सेवनानें आलेला वीट, करमणूक दुसरी कांहींच नसल्यामुळें दुर्व्यसनांत आसक्ति व तिचे परिणाम शरीरास व मनास अस्वस्थता, तसेंच निरंतर कलह, सदोदित भय, इत्यादिक हे श्रीमंतीचे सोहळे होत ! तेव्हां हें सर्व जाणत असतांही ' धनागमाची तृष्णा मूढा ' शिवाय कोण धरील ?

४. पण वरील निरूपण केवळ एकदेशतः झालें. संपत्तीपासून वर सांगितलेले महान अनर्थ घडतात खरे. पण त्याप्रमाणेंच तिजपासून महान् लाभही होत नाहींत काय ? केवळ स्वतःच्याच संबंधानें पाहिलें, तरी दारिद्र्याच्या नानाविध विपत्तींपासून तें आपणास सोडवितें. हाच काय आधीं थोडा लाभ आहे ? मनुष्य केवढाही मोठा तत्त्वज्ञ झाला, तरी भुकेची तजवीज केल्यावांचून त्यास गत्यंतर नाहीं ! तसेंच थंडी, वारा, पाऊस, ऊन यांस तरी वेदांताची भीड पडून तन्निष्ठाची तीं क्षणभर तरी गय करतील असेंही नाहीं ! तेव्हां जीवि-

तास केवळ आवश्यक जीं अन्न, वस्त्र, घर इत्यादि तीं ज्याच्या योगानें आपणास प्राप्त होतात, व ज्याच्यामुळें ते पदार्थ दिवसोंदिवस अधिक सोईवार बनताहेत, त्याचा संग्रह व्यर्थ कसा ह्मणावा ? शिवाय, निर्धन पुरुषास कोठेंही मान नसतो, त्यास सर्व तुच्छ करतात; त्याजवर धनवान् लोक अनेक वेळां बिनदाद जुलूम करूं शकतात; त्याच्या अंगीं उत्कृष्ट गुण असले तरी त्यांचा सर्वथा लोप होऊन जाण्याचाही पुष्कळ संभव असतो; चोरी, चाहाडी वगैरे गोष्टीही हलक्यांच्या संगतीनें व पैशाच्या लालचीनें त्यांच्या अंगीं जडतात; तेव्हां हीं तरी लहान अनिष्टें आहेत काय ? तसेंच परोपकारादि जीं परमार्थसाधनें तींही संपत्ती-शिवाय तशीं प्रशस्तपणें घडत नाहींत. आतां दुर्बलता, दुराचारप्रवृत्ति, वगैरे जे अनर्थ सांगितले त्यांचा तरी संपत्तीशीं कार्यकारणरूप संबंध नित्यत्वानें राहतो काय ? कांहीं नाहीं. मोटी राजसत्ता भोगीत असतांही वरील विकारांपासून मुक्त असलेल्यांचीं उदाहरणें इतिहासांत थोडीं आहेत असें नाहीं; फार तर काय, पण आपला इतिहास जरी फारच थोडा माहीत आहे तरी त्यांत सुद्धां अशीं रत्नें आलीं आहेत ! असो; तेव्हां पैशापासून जसे अनर्थ होतात ह्मणून वर लिहिलें, त्याप्रमाणेंच त्यापासून लाभही पण होतात.

५. याप्रमाणें दोन्ही पक्षांचे साधक बाधक विचार वर प्रदर्शित केले. त्यांवरून सुज्ञ मनुष्याची खात्री होईल कीं, मनुष्यांच्या कृतीबद्दलचा दोष बिचाऱ्या संपत्तीवर ठेवणें गैर आहे. एकादें उत्तम शस्त्र आहे तर त्याचा योग्य ठिकाणीं उपयोग करणें किंवा भलतेंच करून चोहोंकडे हाहाकार उठविणें जसें सर्वथा त्याच्या मालकाच्या स्वाधीन आहे, तसेंच संपत्ती-चेंही होय. अथवा आणखी अग्नीचें उदाहरण घ्या. तो जर आपल्या अटकेंत ठेवून त्याची नीट योजना केली, तर त्यापासून पाकनिष्पत्ति, प्रकाश, इत्यादि अनेक कार्यें करून घेतां येतात; पण जर एक ठिणगी गवताच्या गंजीवर टाकून दिली, किंवा घरास कोलीत लावलें, तर केवढा अनर्थ होतो बरें ! तर या उदाहरणांत शस्त्र व अग्नि हीं केवळ मध्यस्थ होत. लाभ व हानि हीं दोन्हीही त्यांच्या हातीं नाहींत. तीं केवळ साधनें असून योजक जसा भेटेल त्याप्रमाणें तीं वर्तणारीं आहेत. वास्तव याच न्यायानें संपत्तीची स्तुति व निंदा हीं दोन्ही व्यर्थ होत ! सारांश,

येन श्रियः संश्रयदोषरूढं
स्वभावलोलेत्ययशः प्रमृष्टम्[१]

या श्लोकांत कालिदासानें श्रीच्या ह्मणजे संपत्तीच्या चंचलतेविषयीं जें ह्मटलें आहे तेंच तिच्या अनर्थावहत्वाकडे लावलें असतां वरील वादाचा थोडक्यांत निर्णय होईल !

वर व्यक्तिभूत ह्मणजे एकेक मनुष्याच्या संबंधें संपत्तीचा विचार झाला. आतां एकंदर राष्ट्राच्या संबंधानें पाहूं. गेल्या शतकाच्या सुमार अखेरपर्यंत सर्वांचें याविषयीं असें मत होतें कीं, राष्ट्रांत संपत्ति फार झाली ह्मणजे त्याच्या ऱ्हासास आरंभ झाला ह्मणून समजावें.

---

१ 'ज्यानें स्वभावतःच चंचल हा जो लक्ष्मीवरचा अपवाद तो तीस आपले ठायीं निरंतर स्थिर करून काढून टाकिला.' सारांश, लक्ष्मी स्थिर राहत नाहीं हा तिचा दोष नव्हे, तर ज्यापासून ती जाते त्याचा होय; तो जर मतिमंद किंवा दुबळा असेल तर त्यास तिनें काय करावें ?

पैसा फार फार होत चालला ह्मणजे त्याच मानानें ऐषआराम, इष्कीबाजी ही वाढते. ही जसजशी वाढत जाते त्या त्या प्रमाणें लोक दुर्बळ, व्यसनासक्त, अभिमानहीन असे होऊं लागतात. अशी एकंदर राष्ट्राची स्थिति झाली ह्मणजे मग अर्थातच त्यावर परचक्रें येऊं लागून त्याचा टिकाव निघेनासा होतो, आणि लवकरच तें परराजांचें अंकित होतें. आजपर्यंत जेवढीं राष्ट्रें उदयास चढलीं त्या सर्वांची शेवटीं अशी दशा झाली, आणि सर्वांच्या मोडकळीस धनसमृद्धीनें पाया घातला. असो; याप्रमाणें त्यांचें ह्मणणें असे. आतां हेंही वरच्याप्रमाणेंच अंशतः खरें आहे; कारण संपत्ति फार झाली ह्मणजे वरील वाईट परिणाम व्हावे हें पुष्कळ अंशीं स्वाभाविकच आहे. संपत्ति हें एका तऱ्हेचें मद्यच आहे; तें आपला गुण केल्याखेरीज बहुधा सोडणार नाहीं. संस्कृतांत• एक ह्मण आहे, ' ऋद्धिश्चित्तविकारिणी ' ह्मणजे ' धनाची विपुलता ही चित्तास विकार करणारी आहे. ' असो; पण जो शहाणा आहे तो जसा धनानें केवळ मदांध होऊन जात नाहीं, त्याप्रमाणेंच ज्या राष्ट्राची राज्यरीति उत्कृष्ट आहे त्यास धनाची समृद्धि कांहींही अपाय न करतां उलटी अधिकच बलाढ्य करते. यास उदाहरण अलीकडचीं इंग्लंड, फ्रान्स, प्रशिया इत्यादि राज्यें होत. तशींच प्राचीन काळचीं रोम, कार्थेज हींही होतीं. रोमच्या संस्थानाचा पाया इतका मजबूत होता कीं, तें दोन हजार वर्षांवर टिकलें; आणि त्यांत संपत्तीचा शिरकाव होऊन तें तिचें आगर होऊन बसल्यावरही कित्येक शतकेंपर्यंत त्यानें शत्रूंस दाद दिली नाहीं. कार्थेजचें उदाहरण तर रोमच्याहूनही चांगलें आहे. ज्या संपत्तीविषयीं राज्यास हानिप्रद ह्मणून सध्यां बोलणें चाललें आहे त्या संपत्तीच्याच खुद्द जोरावर कार्थेजचें संस्थान बलाढ्य झालें होतें; आणि तिच्या योगानें तें हतवीर्य झालें नाहीं हें तर काय, पण त्यानें रोमसारख्या लढाईंत कसलेल्या संस्थानाशीं गांठ घालून त्यास रसातळास मिळविण्याच्या लागास आणलें होतें. बरें, शेवटीं शेवटीं तरी धनविपुलतेमुळें तें निर्बळ झालें असेल ह्मटलें, तर तसेंही नाहीं! त्याची अंतस्थ रचना अशी उत्कृष्ट होती कीं, आरंभीं त्यांच्यांत जी शक्ति व जी हिंमत होती ती शेवटपर्यंत हालली नाहीं. अगदीं अखेरची वेळ येऊन ठेपे तोंपर्यंत तें रोमन लोकांशीं कसें निकरानें लढत होतें तें सर्व इतिहासवेत्त्यांस विदितच आहे. असो; या उदाहरणांवरून स्पष्ट दिसेल कीं, राज्य मोडकळीस आणण्याचा दोष संपत्तीवरच सर्वथा ठेवणें बरोबर नव्हे. आतां उलटपक्षीं पहा कीं, जेथें संपत्तीचें वारें नाहीं, किंवा लागूं दिलें नाहीं, तेथचा प्रकार कसा काय आहे. संपत्तीचें वारें सृष्टीच्या आरंभापासूनही आजपर्यंत कसें तें मुळींच लागलें नाहीं, असे देश पृथ्वीवर पुष्कळ आहेत. आफ्रिकेंतील बहुतेक देश, तसेंच कांहीं अमेरिकेंतील देश, पासिफिक महासागरांतील बेटें, यांतील लोक अजूनही आद्यावस्थेंतच आहेत. बरें, मग दारिद्र्याच्या जोरावर त्यांच्यांत मोठीं टोलेजंग अशीं राज्यें किंवा संस्थानें कितीक उठलीं? हें एक झालें. दुसरें उदाहरण स्पार्टन लोकांचें. यांचा राज्यव्यवस्थापक जो नामांकित लायकर्गस त्यानें यांस संपत्तीचें कधीं वारें लागूं नये ह्मणून मुद्दाम मोठे कडक कायदे करून ठेवले होते; व ते बहुधा शेवटपर्यंत चांगले अंमलांत होते. बरें, मग परिणाम काय झाला? स्पार्टन लोकांनीं कांहीं दिवस ग्रीसदेशावर प्रभुत्व मिरविलें खरें; पण तसेंच तितकी खटपट न करतां

आथिनियन, थीबन, मासिडोनियन लोकांनींही त्यांच्यापेक्षां अधिक काळ गाजविलें! बरें, तितकें असूनही पुढें जेव्हां रोमन लोकांनीं सगळा ग्रीस देश सहज आपल्या हाताखालीं घातला, तेव्हांही त्या लोकांचें संपत्तीनें कमजोर न झालेलें वीर्य कोणीकडे गेलें? असो; तेव्हां एकंदर काय कीं, संपत्तीची विपुलता ही उत्कर्षास किंवा अपायास कारण होणें हें राज्याच्या अगर संस्थानाच्या अंगच्या मजबुतीवर आहे; व म्हणूनच तीं बुडाल्याचें अपेश तिच्यावर घालणें बरोबर नव्हे.

७. याप्रमाणें पहिल्या दोन मतांचा विचार झाला. आतां तिसऱ्यांत किती तथ्य आहे तें पाहूं. हें मत अलीकडील नव्या लोकांचें आहे. या लोकांच्या मनाच्या स्थिती-विषयीं जर नीट विचार केला तर तेव्हांच लक्षांत येईल कीं, सध्यां ती मोठी चमत्कारिक झाली आहे. जुने विचार, जुनीं मतें यांची भास आतां बुडाली, यास्तव त्यांस अनुसरणें त्यांस नीट वाटत नाहीं. बरें, नवींच सर्वथा ग्रहण करावीं, तर तसेंही करणें अजून प्रशस्त झालें नाहीं. यास्तव दोहोंच्या मध्यें लोंबणें त्यांस प्राप्त झालें आहे. जुनें तेवढें बहुधा वेडगळ, कोत्या समजुतीचें; आणि युरोपियन लोकांच्या संबंधाचें जें जें असेल तें तें शहाणपणाचें, आदरास पात्र, अशा कांहीं सरासरी त्यांच्या कल्पना झालेल्या असतात. पण एक चांगलें कां व दुसरें वाईट कां, किंवा तीं खरोखरीच वाईट किंवा चांगलीं आहेत कीं नाहींत, हें जर त्यांस विचारलें, तर सोनेरी सांखळीचें घड्याळ गळ्यांत अडकविलें असतां चांगलें कां दिसावें, किंवा मराठी जोडा टाकून विलायती बूट घालण्यांत नफा कोणता, याचीं कारणें ते जितपत सांगतील तितपतच याचींही सांगूं शकतील! असो; तेव्हां आजपर्यंत धनसंचयाच्या निषेधाविषयीं पूर्वीच्या लोकांचीं जीं मतें होतीं, तीं सर्वथैव खोटीं असा निश्चय करून पैसा जोडणें म्हणजे एक मनुष्याचें कर्तव्यच आहे अशी यांची समजूत झाली आहेशी दिसते. आतां पैसा जवळ असल्याशिवाय निर्वाह होणें व सुखासमाधानानें असणें कठिण आहे हें मागें एकदां आम्हीं सांगितलेंच आहे; व म्हणून तो बाळगून ठेवणें जरूर आहे हेंही आम्हीं मागें दर्शविलेंच आहे. पण तो सुखाचें व समाधानाचें मोठें साधन होय अशा समजुतीनें त्याविषयीं मोठें प्रेम प्रकट करणें किंबहुना त्याचा हव्यास धरणें, ही बुद्धि कृपणासारख्या नीच प्राण्यासच योग्य! सारांश; संपत्ति ही जरी सुखाचें साधन आहे, तरी तिजविषयीं अनिवार तृष्णा उत्पन्न होइपर्यंत तिला जिवाशीं धरणें हें परम दुःखास कारण होईल यांत संशय नाहीं; व अशा पुरुषाच्या हातून तिचा स्वहितार्थ किंवा परहितार्थ कसाही विनियोग होणार नाहीं हेंही उघड आहे. संपत्ति ही केवळ साधन आहे, साध्य म्हणजे साक्षात् उपभोग्य वस्तु नव्हे, हेंही ज्यास कळेनासें झालें त्यापरता मूर्ख व हतभाग्य कोण!

८. येथवर नुसत्या संपत्तीच्या संबंधानें सामान्यतः विचार झाला. आतां प्रस्तुत निबंधाचा मुख्य विषय जो तिचा उपभोग त्याविषयीं लिहितों.

९. संपत्ति ही सर्वांस इष्ट आहे, व प्रायः सर्वांचा तत्प्राप्त्यर्थ उद्योग चालू आहे हें सांगायास नकोच. तसेंच तिजकरतां जे सतत श्रम करायाचे ते तरी तिच्यामुळें आपण

सुखी व्हावें येवढ्याचकरितां हेंही उघड आहे. बरें, तर आतां या स्थलीं इतकाच विचार करायाचा कीं, संपत्ति मिळूनही सुखलाभाचा जो हेतु तो कितीकांचा सफळ होतो.

१०. या संपत्तिसुखाविषयीं मनुष्यामनुष्यांच्या निरनिराळ्याच समजुती असतात. पहिल्यानें कृपणबोवा हे आपल्या नांवानुरूप संपत्तीविषयीं पराकाष्ठेचे 'कृपाळू' असतात. त्यांस तिचा वियोग लवभर सहन होत नसतो. पैशास पैसा, कवडीस कवडी जोडून ते आपल्या देवतेची अशी सेवा करतात, कीं त्यांच्या जोगवणीस कसचीही उपमा साजत नाहीं. या निःसीम भक्तीच्या उपहासपर जेथें गोष्टी व म्हणी नाहींत असा पृथ्वीवर एकही देश नसेल. खरोखर, जर दुसऱ्या एखाद्या गोलावरील मनुष्य आपल्या पृथ्वीवर बहुधा कांहीं दिवस येऊन राहिला असें कल्पिलें, तर कृपणाची कृति त्यास केवळ अतर्क्य वाटेल! निरंतर कष्ट करून जोडायाचें, नेहमीं जिवापलीकडे जतन तर करायाचें, पण त्यापासून लाभ करून घेण्याची कल्पनाही सहन व्हावयाची नाहीं! या वेडेपणास तो काय बरें ह्मणेल! त्यास खरोखर वाटेल कीं यास कोणाचा तरी शाप आहे; एरवीं येवढी भूल चांगल्या जाणत्या मनुष्यास कशी पडेल!! असो; तर या मूढ अनुकंपनीय जनास संपत्तीचा उपभोग केवळ दर्शनमात्रेंकरून. हा उपभोगाचा एक प्रकार झाला. यांत सुखोत्पत्तीचा इष्ट हेतु खरोखर सिद्ध झालासें ह्मणतां येत नाहीं हें उघडच आहे. दुसरा प्रकार विषयवासनातृप्तीचा. मनुष्यमात्राची स्वभावतःच इकडे प्रवृत्ति असल्यामुळें संपत्तीचा विनियोग अशाच प्रकारचा पुष्कळ होतो. आतां हा जर समर्याद असेल तर त्यांत कांहीं वाईट नाहीं. धर्माच्या व नीतीच्या आड न येतां परमेश्वरानें जे हजारों सुखाचे पदार्थ या पृथ्वीवर निर्माण केले आहेत त्यांचें सुख घेणें हें अगदीं रास्त आहे; फार तर काय, आपल्या शास्त्राप्रमाणें असें करणें हें तिसऱ्या पुरुषार्थाचें साधन करणें होय. आणि विचार करून पहातां जगदीशाचें सूत्रही असेंच दिसतें. का तर, इंद्रियजन्य सुख जोंवर मर्यादाकलित असतें, तोंवरच त्याचें सुखत्व रहातें. ती मर्यादा उल्लंघिलीशी झाली, कीं लागलीच तेंच दुःखरूप होऊं लागतें. पण मनुष्याच्या मूर्खत्वानें ह्मणा, अगर वाईटाकडे त्याचा कल्ल विशेष ह्मणून ह्मणा, हें इंद्रियजन्य सुख त्याच्यानें बहुधां आटोक्यांत ठेववत नाहीं. त्यांत अतिशय भडकून जाऊन तो बहुश: आपणास मोठ्या भयंकर विपत्तींत पाडून घेतो, आणि संपत्तीचा यथायोग्य उपभोग करून जितके सुखी होतात त्यांहून तिच्यापाशीं वर सांगितल्याप्रमाणें अनर्थांतच पडणारे फार—किंबहुना शंभरांत निदान नव्वद तरी ह्मटलें असतां चालेल—यास्तव यावरच मुख्य रोख ठेवून प्राचीन सुज्ञ लोक धनाचा पूर्वोक्तरीत्या निषेध करीत. असो; तेव्हां हा दुसरा प्रकारही बहुधां सुखावह होत नाहीं.

११. आतां या दोन्ही अपव्ययांखेरीज संपत्तीच्या उपभोगाचे दुसरे कोणते मार्ग आहेत ते पाहूं. या ठिकाणीं आपल्या जुन्या लोकांच्या कांहीं विलक्षण समजुतींचें स्वरूप उघड करणें अवश्य वाटतें. वरच्या दोन्ही वाईट मार्गांचें अवलंबन न करतांही पुष्कळ आपल्या धनाचा असमंजसपणानें विनियोग करतात. तो काय? तर अतोनात मिजास वाढविणें. ही मिजास मुसलमानांचीं आह्मांस लागली असावी असें वाटतें. हिचा एकंदर रोख पाहिला तर हा दिसतो कीं, अगदीं इकडचें इकडे न हालतां निवळ रिकामपणांत वेळ घाल-

विषें ह्मणजे सुखाचें शिखर ! ताटावरचें पाटावर, पाटावरचें, ताटावर; बसायाच्या ठिकाणीं जिकडे पहावाचा दृष्टि लागेल तिकडे तक्के, लोड आहेतच; अंमळ इकडे तिकडे हिंडणें झालें तर रथ, पालख्या इत्यादि वाहनांची तयारी; वस्त्रें नेसवायास, पांघरावयास, सांवरावयास माणसें; स्नान घालण्यास, अंग चोळण्यास, हात धुण्यास, जेथें तेथें चाकर; फार, इतकेंही होऊन तऱ्हे तऱ्हेची चाकरी घेतल्यामुळें झालेला शीण घालविण्यासच कीं काय, कोण जाणे,—निद्रासमयीं पाय चेपणें, अंग रगडणें हें पुनः आहेच ! हा श्रीमंतांच्या सोहळ्यांचा नित्यक्रम. सुखाची परमावधि त्यांच्या व लोकांच्या मतें काय ती हीच. आपल्या भाषेंत 'सुखी' व 'श्रीमंत' हे शब्द तर पर्यायच होऊन बसले आहेत; यावरून प्रस्तुत विषयावर लोकांचीं मतें कशीं आहेत हें दिसून येतें. मागील लोकांच्या श्रीमंतीचीं वर्णनें बहुधा सर्वांनीं ऐकिलीं असतीलच—" अहो काय तो दैवशाली ! त्यास बाहेरचें ऊन कधीं माहीत नव्हतें, त्याच्या पायास कधीं खडा लागला नाहीं, कधीं पेटचें पाणी हललें नाहीं. श्रीमंती अशी त्यांनी भोगली ! चारी ठाव चमचमीत भोजन करावें, आणि खुशाल निजावें. शेंकडों माणसें सेवेस तत्पर असत. त्यांस इकडचें तिकडे हलायासही लागत नसे ! " वाः ! किती अपरंपार सुख हें हो ! पण याचा परिणाम लवकरच कसा होतो असे हेंही येथें सांगितलें पाहिजे. गाड्या, घोडे, पालख्या यांनींच वाहनाचें काम सर्वथा पत्करल्यावर, मग ईश्वरदत्त जें वाहन तें कशाला राहील ? तेव्हां पायांनीं जावें. शरीरांतील कोठ्यास नेहमीं पक्वान्नें पचवायाचीं, व व्यायाम ह्मटला तर जेवतांना पानावरचा हात तोंडाशीं न्यायचा अशा प्रकारचा काय अवश्य घडेल तेवढाच काय तो; तेव्हां अर्थातच पक्वान्नांनीं आपल्या आश्रितवर्गांस—निरनिराळ्या रोगांस—निमंत्रण करावें ! याप्रमाणें लुळे व रोगी बनल्यावर मग तर श्रीमंतीचे विलास अधिकच. यापूर्वी नुसते चाकरच सेवेस तत्पर असत; आतां आणखी त्यांत वैद्यही सामील व्हावयाचे. आधींच राजश्रींचा आहार नाजूक; मग ही स्थिति प्राप्त झाल्यावर तर कांहीं पुसूंच नये. असो, याप्रमाणें निरंतर उपचार चालले असतां शेवटीं अशी अवस्था होते कीं, सर्व श्रीमंतीच्या सोहळ्यांच्या त्या वेळेस कळस होतो कीं इतःपर हलायास चालायास कांहींच नको !—अरेरे केवढें मूर्खत्व हें ! केवढा वेडेपणा ! ईश्वरानें हस्तपादादि जे अवयव दिले ते आपल्या स्वाधीन ठेवून त्यांस दृढतर करायाचें टाकून मुद्दाम पराधीनपणा पत्करायाचा, हा एकेरी मूर्खपणा; त्यांतून त्याचें आणखी भूषण मिरवायाचें ह्मणजे तर त्याची सीमाच ! कांहीं न करतां स्वस्थ पडून असणें हेंच जर श्रीमंतीचें स्वरूप, तर मग मनुष्याची अंत्यावस्था ह्मणजे खरोखरी स्वर्गस्थितीच ह्मटली असतां चालेल !

१२. येथवर या समजुतीच्या मूर्खपणाबद्दल लिहिलें. आतां हें क्रियाशून्यत्व वस्तुतः सुखदायक आहे किंवा होणें शक्य तरी आहे काय याविषयीं विचार करूं. रिकामपणीं सुस्त बसल्यापासून किती वेळपर्यंत सुख होतें याचा अनुभव बहुधा प्रत्येकास असेल. याचें एक थोडेसें उदाहरण घेतों. आठ पंधरा दिवसांची, किंवा महिन्या दोन महिन्यांची सुटी झाली असतां विद्यार्थ्यांस पहिल्यानें केवढा आनंद होतो ! त्यांस वाटतें, कीं, इतके दिवस आतां खुशाल घरीं बसायास व मौज मारायास सांपडेल ! असें वाटून पहिले चार पांच दिवस

त्यांस फार बहारीचे वाटतात; पण पुढें लागलीच असा कंटाळा येऊं लागतो कीं, दिवस जातां जात नाहींत; आणि शेवटीं शेवटीं इतका त्रास आलेला असतो कीं, पुनः शाळेंत जाण्याच्या दिवशीं सर्वांस मोठी हुषारी वाटते. या पोरपणाच्या अनुभवांत सर्व सुखदुःखांची किल्ली आहे ! नुसतेंच सुख असा कांहीं पदार्थ नाहीं. तें भासण्यास दुःखाचा अनुभव लागत असला पाहिजे. जोंवर पोटांत भूक आहे तोंवरच जेवण्याचें सुख, ताहान आहे तोंवरच पाणी पिण्याचें, थंडी आहे तोंवरच उष्णतेचें, उकाडा होत आहे तोंवरच शीतळ उपचारांचें. याप्रमाणेंच श्रम आणि विश्रांति हेंही द्वंद्व परस्परसापेक्ष आहे. विश्रांतीचा अनुभव आहे तोंवर श्रम सुखदायक वाटतो, आणि श्रमाचा अनुभव आहे तोंवरच विश्रांतीचें सुख भासतें. हें सर्व जर खरें आहे, तर उद्योग केल्यावांचून रिकामपणाच्या सुखाची आशा करणें आणि श्रम केल्यावांचून विश्रांतिसुख मिळवूं पहाणें, ह्मणजे निरभ्र आकाशापासून वृष्टीची अपेक्षा करण्यासारखें असमंजस नव्हे काय ? ताहानेल्यास पाणी सुखकर, उन्हांतून आलेल्यास सावली गोड वाटते, ह्मणून जर कोणी मनुष्य पाणी पिण्यांत सुख आहे येवढेंच घेऊन सारखा पाणी पीत बसला, किंवा सावली गोड वाटते येवढाच अर्थ उचलून सुखाच्या आशेनें निरंतर सावलींत बसला, तर आपण त्यास केवढा मूर्ख ह्मणूं ! पण वर वर्णिलेला श्रीमंतीचा प्रकार थेट यासारखाच आहे हें स्पष्ट आहे. असो; तेव्हां एकंदर सिद्ध काय होतें कीं, उद्योगाखेरीज रिकामपण हें सुख नव्हे हें तर काय, पण महादुःखच आहे; कसें ? तर रिकामपणाशिवाय सतत उद्योग जसा अत्यंत दुःखदायक होईल तसा ! यास्तवच एका सुज्ञ व चतुर ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, " सतत विश्रांति हें स्वर्गींचें मोठें सुख आहे असें लोक ह्मणोत; मी तर नरकांतल्या ज्या महा घोर यातना त्यांत तीस गणितों. "

१३. याप्रमाणें रिकामपण सुखास कितपत कारण व्हावें याविषयीं विचार झाला. पण इतकेंच नव्हे. रिकामपणापासून महान् अनर्थही आहेत हेंही पुढच्यावरून दिसेल. इंग्रेजींत एक ह्मण आहे कीं, " रिकाम्या मनांत सैतान आपला कारखाना घालतो. "[१] याचा अर्थ काय कीं, मनुष्यास अगदीं रिकामपण सांपडलें कीं त्यांस नानाप्रकारचे कुमार्ग सुचतात. हें ठीकच आहे. कारण मनुष्याच्या शरीरांतले व्यापार जसे कधीं खळत नाहींत, त्याचप्रमाणें त्याच्या मनाचेही सारखे चाललेले असतात. एरवींच्या मनुष्यांचे ईश्वराच्या योजनेनेंच शरीराचे व मनाचे व्यापार सदोदित चालू रहातात; कारण श्रमाशिवाय चरितार्थच न चालल्यानें त्यांच्या दोहोंचाही चाळा नेहमीं चालू असावा लागतोच. पण श्रम न करितांही कांहीं थोड्या ( एकंदर लोकांच्या मतें ' भाग्यवान् ' अशा ) लोकांचें चालतें तेव्हां अर्थातच त्यांचें शरीर व मन हीं दोन्ही इतरांच्या मानानें व्यापारशून्य रहातात. पण अगदीं व्यापार नाहीं अशी मनाची अवस्था कधीं असूं शकत नाहीं. यास्तव सहजच नानातऱ्हेचे ढंग, व व्यसनें त्यांस जडतात. तीं पैशाच्या जोरावर चालली जातात; आणि तशा प्रकारची मंडळी लवकरच त्यांभोंवतीं जमतात. अशी एकदां कुमार्गाकडे प्रवृत्ति होऊन निरंतर तोच ध्यास लागल्यावर मग काय विचारावें ! कोणी कवि ह्मणतो,

---

[१] 'An idle brain is Satan's workshop.

यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ॥

"तारुण्य, धनाढ्यता, अधिकार आणि अविचार या चौकड्यापैकीं एक एक मनुष्याचा फडशा पाडण्यास पुरे आहे; मग चारी एकत्र मिळाल्यावर तर काय होईल!" वास्तवीक ज्ञानसंपन्न असला तरी मनुष्य तसाच परिपक्व झाल्याखेरीज त्याच्या हातून वनवासांतही तपश्चरण होणार नाहीं. हें 'रासेलस' तल्या जोग्याच्या गोष्टींत जॉनसन् यानें सुचविलें आहे; आणि 'शांतिशतक' कारहि असेंच सांगतो,

वनेषु दोषाः प्रभवंति रागिणां । गृहेषु पंचेंद्रियनिग्रहस्तपः ।
अकुत्सिते कर्मणि यः प्रवर्तते । निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् ॥

"ज्यांच्या मनांत पूर्ण वैराग्य बाणलें नाहीं अशांकडून वनांतही मानसिक दोष घडतात; आणि जो घरींच असून इंद्रियनिग्रह करतो त्यास तप घडतें. सारांश, अनिंद्य कर्मे जो आचरतो, आणि विषयलोभापासून दूर रहातो त्यास त्याचें घरही तपोवनतुल्य होय!" सारांश, एकांतवासांतही मन शुद्ध ठेवणें कठिण आहे; त्यास अवकाश सांपडला कीं तें दुर्वासनांस वश होतें. आपल्या धर्मांत कर्ममार्गाचा जो एवढा खटाटोप विहित केला आहे त्यानें बीज हेंच होय.

१४. आतां आणखी एक मात्र संपत्तीचा उपभोग सांगणें राहिला. तो धर्म होय. त्यास उपभोग ह्मणणें हें सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण उपभोग ह्मणजे सुख हाच अर्थ जर आहे, तर धनाचा विनियोग धर्माकडे करणें हाही त्याचा उपभोगच होय. का कीं, धर्म करणारास त्यापासून फार समाधान वाटतें. वास्तविक पहातां संपत्तीचा अत्यंत थोर उपयोग ह्मणजे ती परोपकारीं लावणें हाच होय; यास्तव तशा महात्म्यांस अशा विनियोगानें जें चित्तास सुख होत असेल त्यास दुसऱ्या कशाची उपमा साजणार नाहीं! परोपरचिया भूषणांनीं आपलें शरीर लेववून त्यांत संतोष मानणें ही प्राकृत जनांची कोती समजूत होय; तिचें सुख केवळ नेत्रांनींच घेणें हा अत्यंत मूढ व नीच जो प्राणी कृपण त्याचा प्रकार; आणि धनाचा व्यय केवळ स्वार्थपरैकबुद्धीनें विषयोपभोगांकडेच करणें, व त्याच्या जोरावर अनेक अनन्वित कृत्यें करणें हें तर मानवजातीस कलंक लावणाऱ्या पशूंचें व राक्षसांचें कर्म होय! सत्पुरुषांच्या हातून संपत्तीचा वेंच फार निराळ्या तऱ्हेनें होतो. भर्तृहरि ह्मणतो,—

श्रोत्रं श्रुतेनैव न कुंडलेन । दानेन पाणिर्नतु कंकणेन ॥
विभाति कायः करुणापराणां । परोपकारैर्नतु चंदनेन ॥

"कर्ण हे सच्छास्त्रश्रवणानेंच शोभतात, कुंडलांनीं नाहीं; हात दानानें शोभतो, कंकणानें नाहीं आणि जे दयाशील आहेत त्यांचा देह परोपकारांनीं शोभतो, चंदनानें शोभत नाहीं!" असो; तेव्हां हाच उपभोगप्रकार सर्वांत श्रेष्ठ होय हें उघड आहे. पण धर्म करण्यांत एका गोष्टीकडे अवश्य लक्ष पोंचवावें लागतें; ती गोष्ट पात्रापात्रत्व–विचार होय. जर पात्रीं दान घडलें तरच तें उत्तम; नाहीं तर भलत्या सलत्यासच तें घडलें असतां व्यर्थ जातें आणि अपात्रीं झालें तर उलटा दाताच दोषांत पडतो. आतां आलीकडे पात्रापात्रत्वविषयींचे विचार पहिल्यापेक्षां चांगले झाले आहेत हें सर्वांस माहीत आहेच. त्याविषयीं विशेष लिहिणें नको. यापूर्वी ब्राह्मणांची विशेषतः भटांची सर्वथा भर करण्यांत लोक

पुण्य मानीत असत; पण आतां समदृष्टीनें पहातां सर्व विपन्न मनुष्यें धर्मास सारखींच सत्पात्र आहेत अशी उत्तम समजूत पहिलीच्या जागीं आली. पण या नव्या समजुतीनें धर्मबुद्धि वाढली, किंवा पहिल्या इतकीच राहून ती दुसऱ्या चांगल्या मार्गास लागली, असें मात्र दृष्टीस पडत नाहीं. दुष्काळादि कहरांत सांपडलेले हजारों लोक तर धर्मास अत्यंत पात्र ना! पण धर्माविषयींचीं सर्वांचीं मतें एवढीं सुधारलीं असतांही म्हणण्यासारखें दातृत्वाचें श्रेय कितीक घेतात? तेव्हां एकंदरींत पहातां आमच्या नव्या लोकांची चाल ही दिसते कीं, पथ्यावर पडण्यापुरती मात्र ते सुधारणा उचलितात! असो; या धर्मांच्या संबंधानें दुसरी अशीही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, मुळींच हातचा पैसा न सुटण्यापेक्षां कीर्तीच्याही हेतूनें धर्म झालेला बरा; पण तो खरा धर्म नव्हे. कां तर, तितका परोपकार कीर्तीसाठीं विकल्यासारखें तें होतें. खरा धर्म तोच, कीं जो अंतःकरणाच्या कळवळ्यानें व निरपेक्ष बुद्धीनें केला असतो; व असाच त्या करणारास अत्यंत सुख देतो यांत संशय नाहीं.

१५. याप्रमाणें संपत्तीच्या उपभोगाचे निरनिराळे प्रकार सांगून प्रत्येकापासून उपभोक्त्यास सुख किती होत असतें हेंही लिहिलें. आतां शेवटीं इतकेंच सांगतों कीं, ऐश्वर्य काय तें आम्हींच भोगावें, हा मूर्खपणाचा अभिमान सोडून देऊन जर आमचे राजेरजवाडे आणि इतर श्रीमान् गृहस्थ यासंबंधें युरोपियन लोकांचा कित्ता उचलतील तर तो त्यांस फार हितावह होईल. या म्हणण्याचा अर्थ असा नाहीं, कीं ते सर्वच आपल्या पैशाचा चांगला व्यय करीत असतील, किंवा जें जो करतात तो चांगलाच असतो. या देशांत जी त्यांची कृति दृष्टीस पडते, तीवरून सहज तर्क करतां येतो कीं, येथल्याप्रमाणेंच तेथेंही मडम साहेब बुरणेर साहेब यांचेंच खऱ्या साहेबांवर प्राबल्य चालत असेल; खुर्च्या वगैरे हरएक सामान, कापड, चोपड यांतच पुष्कळ पैसा नासत असेल; शिवाय मद्यादिकांचें सेवन; व्यभिचाराऐवजीं राजरोस बॉल नांवाचे नाच, वगैरे मूर्खपणाचे, आणखीही अनेक प्रकार चालू असतील! तसेंच येथल्या आचरणावरून पहातां दुष्काळ—युद्धादि प्रसंगीं लोकांस मदत करण्याचेंही मान तेथें बहुतेकांचें तितपतच असेलसें दिसतें. असो, या प्रकारांविषयीं आम्ही बोलत नाहीं. त्यांजपासून ग्रहण करावयाचे गुण हे कीं, तक्केलोडांशीं बसण्यांत व इकडची काडी इकडे न करण्यांत प्रतिष्ठा न मानतां त्यांसारखे यांनीं व्यायाम करावे, देशाटनें करावीं, तसेंच अक्षरशून्य व नेहमीं रिकामें रहाण्यांत भूषण न मानतां त्यांसारखे विद्यानिपुण होऊन जगांत नांव राखण्याची उमेद धरावी. दानशूरत्वांत त्यांस आमच्या पारशी देशबंधूंचें—कीं, ज्यांचा धर्म आणि जीवित महासंकटसमयीं वांचविल्याबद्दलचें या देशाचें ऋण जे कृतज्ञताबुद्धीनें अनेक प्रकारांनीं फेडीत आहेत त्यांचें—आणि विशेषतः त्यांस व एकंदर मनुष्यजातीस भूषणरूप जो महात्मा त्यांच्यांत होऊन गेला त्याचें उत्कृष्ट उदाहरण आहेच. तर याप्रमाणें जर आमचे लोक आपलें वर्तन सुधारतील, तर संतत संपत यांचा विरोध जो आमच्या लोकांस दैवमत्सरकृत वाटतो तो तेव्हांच नाहींसा होऊन, पूर्वीं भगवा झेंडा व जरीपटका रणांत नाचवून त्यांच्या पूर्वजांनीं जी कीर्ति मिळविली तीस अजूनही ते उज्ज्वल करतील!

# इतिहास.

कोऽन्यः कालमतिक्रान्तं नेतुं प्रत्यक्षतां क्षमः ।
कविप्रजापतींस्त्यक्त्वा रम्यनिर्माणशालिनः ॥ राजतरंगिणी[1].

अंक ६—(१) प्रकृत विषयाचें स्वरूप. (२) 'इतिहास' शब्दाची व्युत्पत्ति; मूळचा व आतांचा अर्थ. (३) आमच्या प्राचीन इतिहासाचा अभाव; त्याचीं कारणें. (४) उपलब्ध असणारे कांहीं ग्रंथ. त्यांवरून अनुमान; (५) या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती होण्याचीं दुसरीं साधनें. (६) इतिहासाची उत्पत्ति व प्रकार. (७) इतिहासाचा उपयोग; त्यावर आक्षेप घेणारे लोक. (८) पहिला उपयोग—जिज्ञासातृप्ति. (९) दुसरा उपयोग—सदुपदेश. (१०) तिसरा—मनास प्रगल्भत्व व व्याप्ति.

१. हा विषय मोठा दांडगा आहे. यावर जितकें लिहावें तितकें थोडेंच. कारण मूळ विषयच अगोदर मोठा असून त्याचीं अंगें उपांगेंही अनेक आहेत. तीं अशीं कीं, यावर लिहिणारानें जगाच्या इतिहासावर एकंदर नजर पोंचविली पाहिजे; असें केल्यानें त्यास जे मुख्य मोठमोठे सिद्धान्त सामान्यतः दिसतात त्यांचा उल्लेख केला पाहिजे; नंतर प्रत्येक मोठमोठ्या राष्ट्राच्या इतिहासाकडे विशेषतः दृष्टि देऊन त्याच्या विषयीं लिहिलें पाहिजे. तसेंच भूगोल व कालज्ञान—कीं ज्यांस इतिहासाचीं नेत्रें म्हणतात—त्यांविषयीं; देशांच्या स्थितिविशेषाचीं फळें—म्हणजे अमुक अमुक देशाची रचना अशा अशा प्रकारची असल्यामुळें असे असे परिणाम उद्भवले,—याविषयीं; विद्याकलादिकांचा उत्कर्ष कसकसा होत गेला, तो प्रकार; किंबहुना रीत, रिवाज पेहेराव, वगैरे लहानसान गोष्टी; यांविषयीं सुद्धां इतिहासांत माहिती आली पाहिजे. सारांश, इतिहास म्हणजे इतिवृत्त. मूळारंभापासून आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या सर्वांचें टिपण ज्या ग्रंथांत केलें असतें त्याचें नांव इतिहास.

२. आतां पहिल्यानें या शब्दाची व्युत्पत्ति अंमळ चमत्कारिक आहे म्हणून सांगतों. या शब्दाचे घटकावयव तीन शब्द आहेत—'इति—ह—आस.' यांचा अर्थ 'याप्रमाणें झालें' असा आहे[2]. तेव्हां या शब्दाचा अर्थ 'मागें घडलेला वृत्तांत' असा आहे. पण मूळच्या व आतांच्या अर्थांत एक मोठा भेद झाला आहे. या शब्दाचा मूळचा अर्थ पुराणांतील उपकथा म्हणजे आख्यान गोष्ट असा होता—जशा धर्मराजास वगैरे निरनिराळ्या प्रसंगीं ऋषींनीं सांगितलेल्या प्राचीन राजांच्या गोष्टी. पण हल्लीं 'इतिहास' हा शब्द 'बखर' या अर्थी योजतात. तेव्हां दोहोंतला भेद उघडच आहे कीं, पहिल्यास प्रमाण केवळ ऋषींचे पुराणांतील लेखच काय ते होत; पण दुसऱ्यांस त्यांहून सबळ असे अनेक आधार लागतात.

३. वर जो 'इतिहास' शब्दाचा जुना अर्थ सांगितला त्यांवरून स्पष्ट दिसतें कीं,

१ "रम्य ग्रंथसृष्टि निर्मिणारे प्रतिभावंतच असे जे कवि त्यांवांचून पुरातन काळची स्थिति पुनः दृष्टिगोचर करण्याचें कोणा दुसऱ्याचें सामर्थ्य आहे?"

२. या शब्दांत 'ह' हें केवळ अव्यय आहे. याचा प्रयोग वेदादि जुन्या ग्रंथांतून आढळतो.

अर्वाचीन अर्थी तो शब्द ज्यांस लागेल असे ग्रंथ आपल्या देशांत प्राचीनकाळीं नव्हते; म्हणजे ग्रीक व रोमन लोकांत सप्रमाण व खरे इतिहास लिहिण्याची जशी पुढें प्रवृत्ति पडली, तशी इकडे कधींही पडली असेलशी दिसत नाहीं. हा एके रीतीनें मोठा चमत्कार आहे. कारण जे प्राचीन हिंदु लोक त्या वेळेस सर्व राष्ट्रांत हरएक प्रकारें अग्रगण्य होते, ज्यांच्यांत विद्या तर प्रत्येक रूपानें पूर्ण अवतरली होती, त्यांच्या हातून येवढें हेंच एक अंग सुटावें ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? आहे खरी. तथापि तीबद्दल कांहीं कारणें सांगतां येतील असें आम्हांस वाटतें. इतिहासाचा उद्भव केव्हां होऊं लागतो याविषयीं जर आपण थोडा विचार केला, तर असें दिसून येईल कीं, ज्या वेळेस राष्ट्रांत मोठ्या लढाया, मोठ्या राजक्रांति वगैरे कांहीं मोठमोठ्या गोष्टी घडतात तेव्हां. आथेन्स, रोम, इंग्लंड, येथील लोकांत; तसेंच मुसलमान, मोंगल, मराठे या लोकांतही, घडलेल्या गोष्टींचें वृत्त लिहून ठेवण्याची प्रवृत्ति अशाच प्रसंगीं पडली. असो; तेव्हां हें जर खरें आहे, तर प्राचीन हिंदु लोकांत इतिहासग्रंथांचा अभाव का राहिला याचें कारण बरेंच स्पष्ट होईल. त्यांच्या देशाच्या चतुःसीमा बहुधां अलंघ्यच असल्यामुळें प्राचीन चिनी लोकांप्रमाणेंच आपले पूर्वजही आपल्या ठिकाणींच स्वस्थ सुखरूप होते. ग्रीक, रोमन वगैरे लोकांचा शेजारच्या राष्ट्रांशीं जसा नेहमीं संबंध पडेच, तसें येथें मुळींच नसल्याच्या योगानें परराष्ट्रांशीं युद्धादि प्रसंग प्राचीन हिंदु लोकांचे कधींच घडले नाहींत. देशांतल्या देशांतच राजेरजवाड्यांच्या एकमेकांशीं लढाया होत असतील खऱ्या, तरी इतिहासरूपानें त्यांचें वर्णन करावें अशा तऱ्हेच्या त्या कधींही झाल्या असतीलशा वाटत नाहींत. कारण त्या वेळचे जे कांहीं संस्कृत ग्रंथ अजून उपलब्ध आहेत त्यांत अनेक राजे स्वतंत्रपणें राज्य करीत असल्याचे उल्लेख आढळतात; पण एकानें सार्वभौमत्व पावून बाकीच्यांस पादाक्रांत करून टाकिलें आहे असें कोठें आढळत नाहीं. असो; तेव्हां मोठे युद्धप्रसंग, मोठ्या राजक्रांति, वगैरे जी इतिहासाची सामग्री ती नसल्यामुळें इतिहास लिहून ठेवण्याचा पाठ इकडे पडला नसेल असें वाटतें. दुसरें एक मोठें कारण असेंही दिसतें कीं, आपल्या लोकांच्या मनाचा एकंदर कल निवृत्तिमार्गाकडे जेवढा दृष्टीस पडतो तेवढा प्रवृत्तिमार्गाकडे नाहीं. जग सर्व मिथ्या आहे, प्रपंचांतील सर्व व्यवहार लटके आहेत, अवघा ईश्वरी मायेचा गोंधळ आहे,

दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें
धरील मन आधिनें बहु परिश्रमे चाकसें।

असे विचार ज्यांच्या मनांत नेहमीं घोळायाचे, ज्यांचा परमार्थाकडेच विशेष ओढा, अशा लोकांस रक्तपात, राज्यांच्या घडामोडी वगैरे गोष्टींचीं वर्णनें करून नरस्तुति गात बसण्याचा कंटाळा असल्यास काय नवल? असो; तर आपल्या देशांत इतिहासकार न झाल्याचीं हीं दोन मोठीं कारणें आम्हांस वाटतात.

४. वर प्राचीन हिंदु लोकांत इतिहास लिहिण्याचा परिपाठ नव्हता म्हणून म्हटलें, यावरून त्यांविषयींची माहिती मिळण्यास मुळींच मार्ग उरला नाहीं असें समजायाचें नाहीं. निबंधाच्या अग्रभागीं जें पद्य घातलें आहे त्यावरूनच मार्मिक वाचणाराच्या सहज

लक्षांत येईल कीं, इतिहासाची योग्यता आपले लोक जाणत नव्हते असें नाहीं. संस्कृतांत चांगले इतिहास नाहींत खरे, तरी पूर्वी घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याचा नाद आपणांस अगदीं नव्हता असें नाहीं. वर ज्यांतून उतारा घेतला आहे तो 'राजतरंगिणी' ग्रंथच याविषयीं मोठें प्रमाण आहे. यांत काश्मीर देशाच्या राजांचें वर्णन अगदीं मूळारंभापासून तों तहत अकबर बादशहानें तो देश काबीज केला येथपर्यंत आहे. हा इतिहास निरनिराळ्या पंडितांनीं आपआपल्या वेळेपर्यंत आणून पोंचविला आहे. संस्कृत ग्रंथकारांचे शक बसविण्यास हा ग्रंथ फार उपयोगी पडतो. असाच दुसरा इतिहासरूप संस्कृत ग्रंथ आह्मांस कांहीं वर्षांपूर्वी पाहिलेला आठवतो; त्यांत बंगाल्याकडील मोंगलांच्या राजांचा वृत्तांत लिहिला होता. 'विविधज्ञानविस्तारां' त काशिराजनामक पंडितानें लिहिलेला पानपतच्या लढाईविषयींचा मजकूरही पुष्कळांनीं वाचला असेलच. तो जरी नबाबाच्या सांगण्यावरून त्या पंडितानें फारशी भाषेंत लिहिला, तरी या दोन्ही गोष्टींनीं आमच्या वरच्या ह्मणण्यास बाध येत नाहीं. उलट्या या दोन्ही आमच्या हिंदु लोकांस—व विशेषत: ब्राह्मणांस—भूषणास्पदच होत. एक तर पदरच्या मुनशांस टाकून त्या नबाबानें वरच्या पंडितासच तो वृत्तांत लिहावयास सांगितला. यावरून त्याचें त्या भाषेंत अत्यंत निपुणत्व दिसून येतें. आणि दुसरें, चांगला इतिहास लिहिण्यापुरती त्याच्या अंगीं शक्ति व हौसही होती असें ह्मटलें पाहिजे. हौस होती असें ह्मणण्याचें कारण उघडच आहे कीं, ती नसती तर स्वदेशियांचा त्या घोर युद्धांत जो अगदीं मोड झाला—कीं जो या देशास अजून भोंवतो आहे, आणि यापुढें तर कोणत्या परिणामास नेऊन पोंचवील, ईश्वर जाणे!—त्याची हकीकत लिहिण्याचें काम कोणीही हिंदु खचित पतकरताना! असो; तेव्हां इतिहास लिहिण्याचा आपल्या लोकांस अगदीं नाद नाहींसा नव्हता हें वरील उदाहरणांवरून दिसून येईल. व आह्मांस असेंही वाटतें कीं, आपल्याकडे इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति कमी तर खरीच; परंतु वरच्यासारखे फुटकळ ग्रंथ पूर्वी पुष्कळ लिहिलेले असतील. त्यांचा कालगत्या लोप होऊन त्यांतले अजूनही कदाचित् कोठें सांपडण्यासारखे असतील. हा आमचा तर्क खरा असला, तरी आमच्या लोकांस त्यापासून मोठासा उपयोग नाहीं हें उघड आहे. नानाप्रकारचे शोध करण्याच्या वगैरे सर्व कामांचा मक्ता आह्मीं आमच्या राज्यकर्त्यांस देऊन टाकला आहे. त्यांनीं ते. शोध करून विलायतेस नेऊन तेथून, मोक्षमुल्लर, डॉक्टर हौग् अशांच्या शिक्क्या–मोर्तबासहित ते इकडे आले, ह्मणजे मग ते आमच्या अज्ञान व भोळ्या देशबंधूंपुढें मोठ्या पांडित्याचा आव घालून झोकानें मिरविण्याचें आमचें काम!

५. पण इतकेंच नव्हे. आपल्या देशाचा प्राचीन इतिहास वरच्या सारख्या ग्रंथांवरून तर समजतोच; पण याखेरीज दुसरींही कित्येक साधनें तो समजण्याचीं आहेत. प्राचीन ग्रीक व रोमन लोक मोठे शोधक असत: त्यांस आपल्या देशाची जरी चांगलीशी माहिती नव्हती; तरी उत्तरेकडील भागांविषयीं त्यांच्या कित्येक ग्रंथांतून लेख आढळतात. ते तेथील प्राचीन इतिहासाची माहिती होण्यास कांहींसें साधन आहेत.

ईजिप्ट ( मिश्र ) देशांत टॉलेमी ह्मणून एक मोठा नामांकित भूगोलवेत्ता होऊन गेला. त्याचे ग्रंथ, तसेच चिनी लोकांचे[1] ग्रंथ, यांवरूनही प्राचीन हिंदुस्थानाविषयीं बरीच माहिती मिळते. त्याप्रमाणें पूर्वीचे जयस्तंभ, ताम्रपत्रें, लेणीं, वगैरेही पूर्वीच्या काळचें ज्ञान होण्यास कांहींशीं साधन होतात. याशिवाय ' मुद्राराक्षस, ' ' मृच्छकटिक, ' अशा ऐतिहासिक नाटकांवरून वगैरेही प्रसंगविशेषीं प्राचीन इतिहासाच्या कांहीं गोष्टी कळतात. सारांश, आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती याप्रमाणें तुटक तुटक मात्र होण्याची सध्यां सोय आहे. पहिल्यापासून अनुक्रमानें लिहिलेले इतिहास जर असते, तर जसें पूर्ण ज्ञान होतें, तसें होण्याची आतां मुळींच आशा नको !

६. याप्रमाणें इतिहासाचा अभाव हें आपल्या प्राचीन विद्येचें मोठेंच व्यंग होय. आतां हें शास्त्र केव्हां व कोठें प्रथमतः उत्पन्न झालें, त्याचा प्रसार कसा झाला, यांविषयीं लिहितों.

साऱ्या जगांत ज्ञानाचा प्रसार जो झाला आहे त्याचे उगम मुख्यतः दोन होत. एक हिंदुस्थान; आणि दुसरा ग्रीस देश. पहिला देश जसा एशियाखंडाचें नाकें होतें, तसा दुसरा देश युरोपाचें होतें. अर्वाचीन काळीं युरोपांतील सर्व देशांत जी सुधारणा झाली आहे तिचें मूळ केवळ ग्रीस देश होय. विद्याकलादिकांची आलीकडे इंग्लंड वगैरे देशांत पुष्कळ वृद्धि झाली, व दिवसेंदिवस होत आहे हें खरें आहे, पण सर्वांचें आदिपीठ पाहिलें असतां वर सांगितलेला देशच होय. असो; तर युरोपांत जी इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति पडली आहे तिचेंही कारण ग्रीस देशच होय. या देशांत हिरॉडटस् हा पहिला इतिहासकार झाला. यास्तव होमर यास आद्यकवि हें पद जसें जोडतात, तसें यास आद्य इतिहासकार ह्मणतात. ग्रीक लोकांचें पारसीकांशीं[2] मोठें दारुण युद्ध ज्या काळीं चाललें होतें त्याच काळांत हा जन्मला. यानें दूरदूरच्या देशीं प्रवास करून आपल्या इतिहासास उपयोगीं पडेलशी पुष्कळ माहिती मिळविली, आणि ग्रीक भाषेंत पहिल्यानें इतिहास रचिला. तो त्यानें ' ऑलिंपिक गेम्स ' नांवाचे पांच पांच वर्षांनीं जे सार्वजनिक उत्सव होत असत त्यांतील एका प्रसंगीं आपल्या देशबंधूंपुढें वाचला. त्यांतील विषयच अगोदर देशाभिमानाचा—ह्मणजे ग्रीक लोकांच्या पराक्रमांचें वर्णन असल्यामुळें, व इतरही चमत्कारिक माहिती मोठ्या चातुर्यानें आंत घातली असल्यामुळें, तो ग्रंथ सर्व लोकांस फारच प्रिय झाला. इतका कीं, त्यांच्यांत नऊ ज्या विद्याधिदेवता मानिल्या असत त्यांचीं नांवें त्या ग्रंथाच्या नऊ सर्गांस जमलेल्या समाजानें लागलींच ठेवलीं. याच प्रसंगीं दुसरीही एक चमत्कारिक

---

१ चिनी लोकांस हिंदुस्थानाविषयीं लिहिण्याची गरज कां पडली हें समजण्यास शालापत्रक पुस्तक १३, अंक २ पहावा.

२ पारसीक ह्मणजे प्राचीन पारशी लोक. ' पारशी ' ' इराणी ' हे अगदींच अर्वाचीन शब्द असल्यामुळें कालिदास, बाण इत्यादि आपल्या जुन्या कवींस ते लोक ज्या नांवानें माहीत होते तोच शब्द येथें योजणें प्रशस्त वाटतें.—' पारसीकांस्ततो जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना—रघुवंश ४

गोष्ट अशी सांगतात कीं, वर सांगितलेला इतिहास हिरॉडटस् वाचीत असतां त्या समाजांत एका नऊ वर्षांच्या मुलास इतका गहिंवर आला कीं, तो आंसवें ढाळूं लागला. तें त्या इतिहासकर्त्यानें पाहून त्या मुलाच्या बापपाशीं असें भाकित केलें कीं, हा तुमचा मुलगा पुढें मोठा नामांकित इतिहासकार निपजेल! आणि खरोखरीच तसें घडून आलें. तो लहान मुलगा पुढें ग्रीस देशांतला, किंबहुना साऱ्या जगांतला, अत्युत्कृष्ट इतिहासकार थुसिडिडीज् झाला! असो; याप्रमाणें आणखीही कित्येक इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेले. त्या सर्वांत वरच्या दोहोंसारखा विख्यात झटला ह्मणजे सॅाक्रेटीस् याचा शिष्य जिनोफन् हा तिसरा होय. ग्रीक लोकांच्या वीर्याचा व वैभवाचा अस्त झाल्यावर पुढें रोमन लोकांची भरभर झाली. तेव्हां त्यांच्यातही कित्येक मोठमोठे इतिहासकार झाले; लिव्ही, सालस्ट, सीजर, प्लुटार्क्, टासिटस् इत्यादि. पुढें रोमन लोकांनींही हजार दीड हजार वर्षे राज्यवैभव भोगल्यावर त्यांची सद्दी संपली; आणि आरब व तुर्क लोक यांचें दैव उदयास आलें. या आरबांचें त्यांच्या शौर्याखेरीज त्यांचें स्वतःचेंच असें थोडेंच निघेल! धर्म तर यहुदी व ख्रिस्ती यांच्या धर्मांची भेसळ करून व कांहीं पदरचें घालून सरासरी बनवलेला; तसेंच विद्या व कला याही ग्रीक व हिंदु लोकांच्याच घेऊन यांनीं आपल्या ह्मणून ह्मणविलेल्या आहेत. तेव्हां सदरहूप्रमाणेंच इतिहास लिहिण्याचा प्रघातही त्यांचाच मूळचा असेलसें दिसत नाहीं; तो त्यांनीं ग्रीक लोकांपासून घेतला असावा. असो; याप्रमाणें इतिहासाची उत्पत्ति होऊन त्याचा प्रसार जगांत झाला. अलीकडील इंग्लिश वगैरे लोकांनीं तर थेट ग्रीक व रोमन लोकांपासूनच तो उचलला हें वर सांगण्यांत आलेंच आहे; व हल्लींच्या काळीं हेच लोक बाकी सर्वांहून ज्ञानसंपन्न विशेष असल्यामुळें तो लिहिण्याची उत्कृष्ट पद्धति यांच्यांतच आहे. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, हल्लीं सगळ्या भूगोलाची माहिती झाली असल्यामुळें इतर सर्व देशांचेही इतिहास त्यांनीं लिहून ठेवले आहेत.

७. याप्रमाणें प्रस्तुत विषयास उपोद्घातरूपानें जी माहिती सांगणें अवश्य होतें ती सांगितली. आतां खुद्द विषयाविषयीं विचार करूं. पहिल्यानें इतिहासाचा उपयोग काय? हा प्रश्न दिसतांच असमंजस दिसून कोणी करीत नसतीलसें प्रथमतः वाटतें. कां कीं, दुसरा कोणताही उपयोग नाहीं झटला, तरी मनुष्याच्या मनास अत्यंत स्वाभाविक अशी जी जिज्ञासा ती तरी त्याच्या योगानें तृप्त होते हाच काय थोडा उपयोग आहे! हा अगदीं निदानपक्षींचा उपयोग सांगितला,--दुसरे जे इतिहास वाचल्यापासून मोठमोठे नफे आहेत ते पुढें सांगण्यांत येतीलच. असो; पण असें असतांही इतिहासांत ज्यांस कांहीं एक अर्थ दिसत नाहीं, जे त्याचा तिरस्कार करतात, असे मनुष्य पुष्कळ आढळतात. ज्यांच्या मनांत ज्ञानानें कधीं प्रवेश केला नाहीं, किंवा तो व्हावा असा ज्यांविषयीं ईश्वरी संकेतच दिसत नाहीं, अशांनीं वरील मतें प्रगट केल्यास कांहीं नवल नाहीं. पण नवल हें कीं, ज्यांच्या ठायीं विचारशक्ति चांगली प्रखर दृष्टीस पडते, जे समंजसतेचा मोठा आव बाळगतात, अशांमध्येंही इतिहासावरची अप्रीति पुष्कळ वेळां दृष्टीस पडते. इंग्रेज लोकांतला प्रसिद्ध ग्रंथकार

जॉनसन् हा अशाविषयींचें, एक मोठें उदाहरण आहे. एकंदर इतिहासाविषयीं, व विशेषत: प्राचीन इतिहासाविषयीं, हा आपला तिरस्कार वारंवार प्रकट करीत असे. या थोर ग्रंथकाराच्या कित्येक विलक्षण समजुती होत्या, व जे हेकटपणाचे कित्येक ग्रह त्याच्या मनास साऱ्या जन्मभर खिळून राहिले होते, त्यांपैकींच वरचा एक होय. असो; आपणांमध्येंही असे पुष्कळ ह्मणणारे सांपडतील कीं, "अहो! मागील काळाशीं आपणाला काय करायाचें आहे? ते लोक गेले, मेले, पार झाले; आतां त्यांची कर्मकटकट आपणांस कशाला हवी? बाजीरावानें दिल्ली घेतली, नाना फडनविसानें अशी अशी युक्ति लढविली,—आपणाला त्यांत काय लभ्य आहे? सध्यां चाललें आहे तें खरें! ज्यांत आपला कांहीं नफाही नाहीं व तोटाही नाहीं, अशा मागच्या गोष्टी मिळवायाच्या, जुने लेख पाहायाचे, वगैरे जी विनाकारण यातायात करायाची तींत काय अर्थ? साहेब लोकांस कांहीं उद्योग नसतो, त्यांचीं हीं कामें! असा रिकामा उद्योग कोणी करीत बसावें? त्यांत निष्पन्न काय?" खरेंच! जीवमान आहे तोंवर खाऊन ध्यावें, पिऊन ध्यावें; दुपारची वामकुक्षी चुकूं देऊं नये, संध्याकाळच्या खाशा वेळीं शानदारसा पोषाक करून बाहेर पडावें; मग गंध्याचें दुकान, किंवा (विद्येचा षोक अथवा सुधारणेंत पुढारीपणा दाखविणें असल्यास) लायब्ररी, अशा ठिकाणीं चार घटका साऱ्या जगाच्या उलाढाली करून नंतर रमत रमत घरीं यावें; अशा प्रकारचा स्तुत्य आयुष्यक्रम ज्यांनीं निरंतर अबाधित चालवावा, अशा थोर लोकांपुढें बाजीराव काय आणि मोठा शिकंदर बादशाहा झाला ह्मणून तो तरी काय!! जन्मास आल्याचें चीज जर कोणास करून घेणें असेल, तर त्यांनीं अशाच सद्गुरूंचे पाय धरावे; कां कीं, एकंदर तत्त्व असें यांनींच ओळखलें! मग काय उशीर? तुकारामबोवा ह्मणतात, अशांची थोरवी काय वर्णावी!—

आपणासारिखे करिती तात्काळ
नाहीं काळ वेळ तयांलागीं ॥[१]

असो; तर याप्रमाणें इतिहासास नाक मुरडणारे वर सांगितलेले दोन प्रकारचे लोक असतात. एक वरचे वामकुक्षीवाले. यांच्या मतांत तर अर्थातच मुळींच अर्थ नाहीं; व त्यांचें मत कोणीं न मानलें तर त्यांतही त्यांस मोठी मानहानि झालीशी वाटणार आहे असेंही नाहीं! त्यांचें चमचमीत भोजन, वामकुक्षी, तंबाखू, गप्पा, यांस जोंपर्यंत कांहीं हरकत होत नाहीं, तोंपर्यंत इतर कशासही ते मोजीत नाहींत! हा एक वर्ग, व हा फार मोठा आहे यांत संशय नाहीं. दुसरा वर्ग जॉनसन्सारख्या दुराग्रही व स्थूलबुद्धि लोकांचा. यांचीं मतें इतर विषयांवर केवढींही मान्य असलीं, तरी ज्यांवर त्यांनीं कधीं व्यासंग केला नाहीं, व ज्यांचा आस्वाद घेण्यास त्यांची स्थूलबुद्धि स्वभावतःच समर्थ नाहीं, अशा विषयांवरचीं त्यांचीं मतें असमंजस मानण्यास कांहीं हरकत नाहीं; कित्येक इंग्लिश कवींच्या ग्रंथांवर दिलेले अभिप्राय जॉनसन्चे जितपत खरे आहेत, किंवा गाण्याबजावण्यावर त्यानें आपलें मत

१ वरचा अभंग कवीनें असा व्याजोक्तीनें लिहिला नाहीं. त्याचा मूळचा अर्थ सरळच आहे. पण मुळांतल्या सारख्याच प्रसंगीं लोक तो भाषणांत आणतात, हें बहुधा सर्वांस माहीत असेलच.

दिलें असतें तर तें जितपत यथार्थ असण्याचा संभव होता, तितपतच त्याचें प्रस्तुत विषयावरचें मत ग्राह्य होय! असो; तेव्हां या दोन्ही लोकांचे आक्षेप मनास आणण्यासारखे नाहींत. आतां इतिहासाचे उपयोग कोणकोणते आहेत यांविषयीं लिहितों.

८. एक तर वर सांगण्यांत आलाच आहे. कोणता? तर जिज्ञासातृप्ति. ईश्वरानें ही मनोवृत्ति मनुष्याच्या ठायीं मोठी प्रबळ ठेविली आहे. हिचा अंगचा जोर कितपत आहे हें सुधारणेच्या काळीं चांगलें दिसून येत नाहीं. कां कीं, अशा काळीं मनुष्याच्या मनाची मूळची कळा त्याच्या शरीराप्रमाणें लोकाचाराखालीं पुष्कळ दबली जाते; ह्मणजे मूळची जशी तिची स्वेच्छाप्रवृत्ति असते तशी पुढच्या काळीं रहात नाहीं. पहा बरें, मनुष्याचा अंतरालांतील गोलांशीं काय संबंध आहे? पृथ्वी फिरत असली कीं सूर्य फिरत असला, चंद्र स्वयंप्रकाश असला कीं परप्रकाशित असला, ग्रहमालेचा मध्य पृथ्वी असली कीं सूर्य असला, तारे कितीही असले, कांहींही असले, तरी त्यांत मनुष्याचें काय बरें हिताहित आहे? मागें सूर्य फिरतो असें लोक मानीत होते, आतां पृथ्वी फिरते असें लोक मानतात, ह्मणून मनुष्यें काय रोग्याचीं निरोगी झालीं, कीं दरिद्र्याचीं संपन्न होऊन बसलीं? एवढी उठाठेव करून–दुर्बिणीची कल्पना काढून, नानाप्रकारचीं गणितें करून, निरनिराळीं प्रमाणें एकत्र करून– ज्योतिष्यांस किंवा जगास कोणता फायदा झाला?–खरें आहे. एका कवडीचाही झाला नाहीं! हाच उपदेश सर्व मनुष्यांत शहाणा ह्मणून जो निवडला गेला त्या सॉक्रेटिसानें आपल्या शिष्यांस व सर्व जगास केला. पण एवढ्या महापंडिताच्या सांगण्यानेंही लोक राहिले आहेत काय? सूर्यबिंबाचा चंद्रानें ग्रास केला, किंवा शुक्र सूर्याच्या आड आला, कीं लोक कोणी हिंदुस्थानांत, कोणी अमेरिकेंत, कोणी दक्षिण समुद्रांत, धांव घेतातच कीं नाहींत? जिवावर उदार होऊन केवळ जिज्ञासाप्रेरित होत्साते तोफेच्या गोळ्यांत बसून चंद्रलोकांवर स्वारी करतात कीं नाहींत[१]? असो; तेव्हां मनुष्यमात्राचे ठायीं जिज्ञासा ही मोठी उच्छृंखल आहे. हिचा मुळींच अभाव असता तर जगाच्या मूळच्या स्थितींत आज फारसा फरक पडतांना हें उघड आहे. असो; तेव्हां सांगायाचें काय कीं, अंतरालांतील दूरदूरच्या गोलांविषयींही जर मनुष्याच्या मनांत जिज्ञासा उत्पन्न होते, तर ज्या गोलावर तो वास करतो त्यावर निरनिराळ्या ठिकाणीं काय काय वृत्तांत घडले ते समजून घेण्याची त्यास उत्कंठा होणार नाहीं काय?

९. वर सांगितलेला इतिहासाचा उपयोग सर्वांत पहिला, साधा व लहान असा होय. तरी इतिहासाची प्रवृत्ति मूळारंभीं पडण्यास तोच कारण आहे असें दिसून येईल. त्याहून वरचढ दुसरा उपयोग ह्मटला ह्मणजे नीतिबोध. सज्जनांचा जय व दुर्जनांचा अपजय असेंच जरी नेहमीं इतिहासांत आढळत नाहीं, तरी एकंदरींत परिणाम असाच दृष्टीस पडतो. शिवाय दुसरें हेंही लक्षांत येतें कीं, भलेपणानें वागूनही जरी नेहमीं परिणाम लागतोच

१ हें वर्तमान हल्लीं कित्येक पत्रांतून समजतें. तें खरें असेलसें बहुधा वाटत नाहीं. तरी मनुष्याचें धाडस व जिज्ञासा हीं काय करवाल याचा नेम सांगवत नाहीं!

असें नाहीं, तरी पण दुष्टपणा केल्यानें तर तो नाहींच नाहीं लागत! मनुष्याचें सर्व प्रकारें हित होणें तें केवळ याच मार्गानें व्हावयाचें; कुमार्गानें तें व्हावें हें वस्तुगत्याच शक्य नव्हे. याप्रमाणेंच मोठ्या प्रसंगींहि ज्यांचें धैर्यबळ ढळत नाहीं असे थोर पुरुष तर विपत्तींतही जें सुख पावतात तें दुष्ट व कुत्सित मनाच्या लोकांस मोठ्या भाग्यशालीपणांतही लाधत नाहीं. सारांश, या संसाररूप महानाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपआपलीं भूमिका आटपून निष्क्रमण करतीं झालीं हें चित्तावर चांगलें ठसलें असतां चांगला मार्ग कोणता, वाईट कोणता हें सुज्ञ मनुष्यास सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे हेंही कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोडक्यांत त्यांस आलासा होतो; त्याच्या योगानें त्याची दृष्टि फांकते; आणि तो जर तसा समजुतीचा व दृढ निश्चयाचा असेल, तर लवकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून खलाशी लोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करतात, त्याप्रमाणें तो त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून तदनुरूप आपलें आयुष्य क्रमण करतो. याप्रमाणें इतिहासापासून सदुपदेश प्राप्त होतो, व ह्मणूनच एका थोर ग्रंथकारानें 'इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय' असें यथार्थ ह्मटलें आहे.

१०. इतिहास हा मनास उन्नति व प्रसन्नतवही देणारा आहे. ह्मणजे त्याच्या निरंतर वाचनानें चित्त शांत व स्थिर रहातें, आणि थोर होतें. याचें कारण उघड आहे. एका चतुर ग्रंथकाराचें असें वचन आहे कीं, 'इतिहास ह्मणजे या जगांत जे महापुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें आहे. ह्मणजे अशा पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं त्यांनींच इतिहास भरला आहे; तीं काढून निराळीं केलीं तर त्यांत काय उरेल? अर्थात् कांहीं नाहीं. तेव्हां आजपर्यंत या जगतीस भूषणभूत जीं रत्नें निरनिराळ्या देशांत निपजलीं त्यांचा सहवास जर अक्षयीं घडेल, तर त्यापरता लाभ कोणता? प्लूटार्क नामें करून एक नामांकित इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेला, त्याचा अत्यंत प्रसिद्ध व सर्व जगाचा प्रीतिमात्र झालेला असा ग्रंथ 'थोर लोकांचीं चरित्रें' या नांवाचा आहे. यांत त्यानें ग्रीस व इटाली देशांत जीं मोठमोठीं प्रकरणें होऊन गेलीं त्यांचा वृत्तांत लिहिला आहे. त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें असें ह्मटलें आहे कीं, मला या लोकांच्या उज्ज्वल चरित्रांचें मनन केल्यापासून जो लाभ झाला तो सांगतां पुरवणार नाहीं; जेव्हां जेव्हां कांहीं अनुचित कृत्यांकडे माझ्या मनाचा कल होई, किंवा सदाचरणाविषयींचा उत्साह कमी झालासा वाटे, तेव्हां तेव्हां मी यांचीं चरित्रें वाचीं; तेणें करून मला पुनः हुशारी वाटे. असो; सत्समागमाचा महिमा असाच आहे. आपल्या मराठी व संस्कृत कवींनी या माहिम्याविषयीं निरनिराळ्या कथानकांनीं व दृष्टांतांनीं पुष्कळ लिहिलें आहे. या दृष्टांतांपैकीं तुकारामादि मराठी कवींची फार आवडती जी लोहपरिसाची उपमा ती या ठिकाणीं फार सुंदर व समर्पक होय. लोखंड मूळचें किती हलकें असतें व दिसण्यांत किती भिकार दिसतें! पण परिसाशीं वरच्यावर संघट्टन जसजसें घडेल तसतसें त्याचें सर्व धातूंत श्रेष्ठ व यथार्थनाम जें सुवर्ण तें बनत जातें! आणि वस्तुतः मनुष्य

कसाही चांगला वाईट निपजणें हें पुष्कळ अंशीं ज्या ज्या स्थिति त्यास प्राप्त होत जातात त्यांचेंच फळ असतें. कोणी कोणी तर तें सर्वथैव त्यांचें फळ होय असें मुद्दां ह्मणतात. इंग्लंडांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वी लॉक् नामें करून एक मोठा विख्यात तत्त्वज्ञ होऊन गेला त्यानें हें मत स्थापलें. या मताच्या लोकांचें ह्मणणें असें आहे कीं, मनुष्याचें मन हें आरंभीं एखाद्या स्वच्छ आरशाप्रमाणें किंवा कोऱ्या कागदासारखें शुद्ध असतें. त्यास प्राक्तन संस्कार ह्मणजे आधींचे बरे वाईट विकार कोणतेच घडलेले नसतात. ते पुढें ज्याच्या त्याच्या स्थितिविशेषानुरूप त्यास जडून त्याचा कल चांगल्याकडे किंवा वाइटाकडे फिरतो. असो; हें कांहींही असो. पण इतकें खचित आहे कीं, या पुरुषाच्या स्थितिप्रमाणें मन बहुधा चांगले वाईट विकार पावत असतें. संस्कृतांत एक वाक्य आहे—

अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति ।

“ गवताशिवाय एकाद्या जाग्यावर जर अग्नि पडला, तर तो आपोआपच विझून जातो. ” याप्रमाणेंच मनुष्याचे चांगले वाईट गुण पूर्णपणें विकास पावण्यास तशा प्रकारची स्थिति त्यास अनुकूल असावी लागते. पहा बरें, सध्यां आपल्या देशांत शिवाजीसारखा किंवा हैदरासारखा राज्यकर्ता कां निपजत नाहीं ! किंवा नाना फडनविसासारखा राजकारणी पुरुष कां होत नाहीं ! कारण उघडच आहे कीं, तसे गुण असले तरी त्यांचा विकास होण्यास हल्लींच्या स्थितींत मुळींच अवकाश नाहीं. असो; तेव्हां एखाद्या अंगच्या गुणाचा उत्कर्ष व्हावयास तशीतशी स्थिति मनुष्यास अनुकूल असावी लागते. या स्थितिविशेषांतील एक मोठी गोष्ट तशा मनुष्याची संगत हा एक होय. जगांत जे मोठमोठे लोक होऊन गेले ते त्यांस तशी संगत नसती तर कधीं न होते. अगदीं अलीकडचेंच एक उदाहरण घ्या. इंग्लंडांतला आलीकडचा मोठा प्रसिद्ध ग्रंथकार जॉन् स्टुअर्ट् मिल्, जो गेल्या वर्षी मरण पावला, त्यास जर त्याच्या बापाची संगति नसती तर त्याची बुद्धि एवढी परिपक्व झाली असती काय ! खचित झाली नसती. तो बुद्धिमानच होता, त्यापक्षीं तो कसा तरी प्रसिद्धीस येता यांत संशय नाहीं; पण येवढ्या योग्यतेस तो एरवीं कधीं चढता ना. हें याच ग्रंथकारानें आपल्या नुकत्या प्रसिद्ध झालेल्या ‘स्व-रचित चरित्रा’ त स्वतः कबूल केलें आहे. या ग्रंथांत तो ह्मणतो कीं, बापाच्या शिक्षेमुळें मी पंचवीस वर्षें अगोदर जन्मून जितकें ज्ञान मला झालें असतें तितकें झालें. असो; याप्रमाणें प्राचीन काळचे शिकंदर, हानिबॉल, सिपिओ, इत्यादि व आलीकडचे आपल्या देशांतले थोरला बाजीराव, टिपू सुलतान यांचींही उदाहरणें देतां येतील. तेव्हां संगतिविशेषाचें फळ अतर्क्य होय. याचें तरी कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं. मनुष्य जन्मून त्यास जगांतील व्यवहार थोडेबहुत करूं लागते ह्मणजे त्याच्या हातून कांहींना कांहीं तरी व्यापार अवश्य झालाच पाहिजे. त्यास सर्वथा निर्व्यापार असें कधींच रहातां येणार नाहीं. असें जर आहे तर मग त्यानें कोणतें आचरण करावें ! अर्थात् जवळच्या चारचौघांचें जें पाहील तेंच. हें अगदीं स्वभावास अनुसरून आहे. वास्तवच मुलांस आईबापांचे जितके गुण लागतात—त्यांतूनही विशेषतः आईचे

—तितके दुसऱ्या कोणाचे लागत नाहींत. असो; तर अनुकरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति जर येवढी साहजिक व बलवत्तर आहे तर ल्हानपणापासून इतिहास, चरित्रें वगैरे वाचण्याची जर त्यास गोडी लागेल तर ती त्यास किती हितावह होईल बरें! सज्जन व थोर मनुष्यांशीं निरंतर सहवास असणें हें हजारांमध्यें एखाद्याचें कदाचित् भाग्य असेल; बाकीच्यांस वरच्याविरुद्ध लोकांशींच नेहेमीं प्रसंग! तेव्हां अशांची संगति जो गुण अवश्य करील तो नाहींसा होऊन सदाचरणप्रीति व खरा थोरपणा मनांत बिंबण्यास वरच्याखेरीज दुसरें कोणतें साधन आहे? दुसरें असें कीं, वरच्यासारखे थोर लोक कोणत्याही देशांत ईश्वरकृपेनें एखादे वेळेसच उत्पन्न होतात. व तेव्हां त्यांचा वर्तनक्रम पाहून दुसरेही कित्येक त्यांचा कित्ता उचलून योग्यतेस चढतात. पण तेवढा काळ गेला कीं आटपलें! इतिहास, चरित्रें वगैरे लिहिण्याचा प्रघात नसला ह्मणजे पांचपन्नास वर्षांत त्यांची आठवणही पार बुजून जाते! मग पुढील लोकांच्या ठायीं उत्साह कसा उत्पन्न व्हावा? व देशाची पहिली थोरवी तरी कशी रहावी?—वर इतिहासाची अवहेलना करणारे जे सांगितले त्यांस एवढें विचारावें कीं, इतिहासापासून दुसरा बिलकुल कांहीं एक फायदा नसला तरी ह्याच एक काय लहान आहे? होमरकवीनें आकिलिसाचा पराक्रम वर्णिला नसता तर शिकंदर होता काय? व्यासानें पांडवांचें चरित्र गाइलें नसतें तर शिवाजी उत्पन्न होऊन त्यानें यवनांपासून राज्यश्री माघारी हरण केली असती काय? शिकंदराचा इतिहास नसता तर सीझर कशाला होता? सीझराचा नसता तर नेपोलियन कशाला होता? शिवाजी महाराजांची कीर्ति जर मागें न रहाती, तर त्यांच्या पुत्राचा वध होऊन, राजकुल व राजधानी शत्रूच्या कबजांत सांपडून, सर्व शून्याकार झालें असतांही मराठ्यांनीं दिल्लीच्या अवरंगजेबास पुरेपुरेसें करून मोठ्या कष्टानें व मोठ्या शर्थेनें अहमदनगरास कशाला पळवून लाविलें असतें? थोरल्या बाजीराव साहेबांनीं घरचें दाभाड्याचें बंड मोडून दिल्लीच्या मोंगलाची व हैद्राबादच्या नबाबाची[1] कशाला खोड मोडली असती? चिमाजी आप्पानें फिरंग्यास कशाला जेरीस आणलें असतें? राघोबा भरारी[2] गिलच्यांस अटकेपार कशास पळवून लावता? थोरला माधवराव साऱ्या जगास भारी असणाऱ्या इंग्रजांसही जो भारी झाला, त्या हैदरास वरचेवर कसा तुडवून टाकता? सरतेशेवटीं भेकड, मूर्ख, बायक्या असा धनी पेशव्यांच्या कुळास अक्षय कलंक लावून पळत सुटला असतां, शत्रूंवर एकटा चालत जाऊन समशेरबहादुर गोकलखा[3] अष्ट्यास कसा पडता?

---

१ ह्यास ज्यास निजाम ह्मणतात त्यास आपले आजे पणजे नबाब ह्मणत. ते आपणांस दिल्लीपतीचे अंकित म्हणवीत म्हणून त्यांचें तें नांव ठीक होतें. 'निजाम' हें नांव वास्तविक पहातां अप्रयोजक आहे. साऱ्या पेशव्यांस 'माधवराव' किंवा 'बाजीराव' म्हणण्यासारखें हें होय!

२. इंग्लंडच्या कित्येक जुन्या राजांस जशीं त्यांच्या गुणांवरून उपपदें दिलीं असत, किंवा नेपोलियनच्या शिपायांनीं त्याचें नांव जसें "लिट्ल् कार्पोरेल्" (छोटा नाईक) असें आवडीनें ठेवलें होतें, तसें राघोबादादाच्या रणवेगावरून त्यास 'राघोबा भरारी' असें म्हणत.—ही गोष्ट व पुढील टिपेंतील माहिती एका वृद्ध मनुष्यापासून आम्हांस मिळाली.

३. बापू गोखल्यापाशीं जे आरब होते ते त्यास 'गोकलखा' असें त्याच्या शौर्यावरून म्हणत.

असो; तेव्हां अनुकरणाचें फल कांहीं विलक्षण आहे ! पण ते पुरष होऊन गेल्यावर त्यांचें स्मरण पुढें कोणासच होत नाहीं. यास्तव इतिहास असावे लागतात; कीं देशाची स्थिति जरी अगदीं बदलून गेली, तरी ते वाचून पुढेंमागें कोणास तरी त्यांपासून उत्साह व प्रेरणा प्राप्त होते. ग्रीसचें, रोमचें, व आलीकडील इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांचीं राज्यें इतके दिवस टिकल्याचें हें एक कारण असावें यांत संशय नाहीं. पण कोणी ह्मणतील कीं, सर्वांसच लढाऊ व राजकारणी पुरुष होण्याचें कोठें अनुकूल असतें ? नसतें खरें. पण ह्मणून काय झालें ? इतिहासाच्या उपयोग कमी झाला काय ? पृथ्वीवर हजारों लाखों लोक गुरूचे उपग्रह व शनीचें कडें दुर्बिणींतून वरचेवर बघतात; मग त्यांस ते उपग्रह व कडें आपल्या ताब्यांत येतील असें वाटत असतें काय ? नाहीं. ते उपग्रह व तें कडें पाहून विश्व रचणाऱ्या चतुर कारागिराचें जर वैभव त्यांच्या मनांत बिंबलें तर तो लाभ उपग्रह व कडें हीं ताब्यांत आल्यापेक्षांही शतगुणित अधिक नव्हे काय ? तद्वतच नेपोलियन बादशहाचे किंवा शिवाजीचे पराक्रम वाचून जर त्यांस वाटलें कीं, अहाहा ! मनुष्याच्या बुद्धीचा प्रभाव केवढा आहे !—कधीं कधीं एकट्याच मनुष्याच्या हातीं किती लोकांचें कल्याण व नाश करण्याचें असतें !—पहा ! येवढा युरोप हाताखालीं आला असतांही त्या नेपोलियनास संतोष ह्मणून झालाच नाहीं, व शेवटीं एका दीडवर्षांत त्याची काय दशा झाली ! मोठमोठे राजे ज्याचे आंत होऊन ज्यास थरथरां कापत होते तोच दैवानें एक झोला देतांच अफाट समुद्रांत एका भयाण बेटांत जाऊन पडला, आणि जें शरीर जिवंतपणीं साऱ्या युरोपास दणाणवीत होतें तेंच एका दगडाखालचें खणून आणून त्याच्याच राजधानींत समारंभानें पुरण्यास त्याच्या शत्रूंची परवानगी मागावी लागली ! अरेरे ! लक्षावधि मनुष्यांच्या प्राणांचा नाश करून यानें कोणती जोड केली ! एवढ्या अचाट बुद्धीबरोबर परोपकाराची इच्छा जर याचे ठायीं तिळभरही असती, तर जगाचें केवढें हित होतें !—शिवाजीचें चरित्र पहा ! बापानें टाकलेल्या आईबरोबर पुनवडीस ठेवला असतां दादोजी कोंडदेवानें लहानपणीं थोडें बहुत जें त्यास कांहीं शिकवलें तेवढ्याच ज्ञानानें पुढें केवढें अकांडतांडव केलें ! जे लोक मागेंही कधीं प्रसिद्धीस आले नव्हते व पुढेंही लवकरच पुनः अप्रसिद्ध झाले, ज्यांच्या अंगीं बाहेरून शरीराचें किंवा बुद्धीचेंही सामर्थ्य दृष्टीस पडत नाहीं, अशांच्या ठायीं आपणांस अत्यंत उपयोगीं पडतील्से गुण ओळखून त्यांस त्यानें आपले जिवलग संवगडे केले. त्यांच्या बळावर जी हिंदूंची राजसत्ता सुमारें हजार वर्षें अस्तास गेली होती तिचा अरुणोदय मावळच्या डोंगरांवर पुनः झाला ! थरमॉपिलीच्या लियोनिडसास त्यांच्या तानाजीनें व सूर्याजीनें लाजविलें ! सर्व पृथ्वीभर ज्या शहराच्या मातब्बरीची प्रसिद्धि होती, जें मोंगलांच्या राजश्रीचें केवळ कुंकू होतें, तें शहर त्यांनीं दोनदां सावकाश लुटलें. विजापुरास तर हूंहूं ह्मणतां चिरडून टाकून गर्वानें माजलेल्या मोंगलांस त्यांनीं असा उच्छाद दिला कीं, शिवाजी एक आहे कीं दोन आहेत असें त्यांस भासविलें ! तेव्हां केवढें सामर्थ्य हें ! व याहीपेक्षां बाळाजीच्यासारखें काय, कीं तिचा केवढा सद्व्यय झाला !—तेव्हां मोठी बुद्धि असण्यापेक्षां सदाचरणप्रीति असणें हेंच विशेष हितकारक आहे. मनुष्याच्या मनाचा असा चमत्कार आहे कीं, ' लाभा-

लोभः प्रवर्तते '—' जसा जसा लाभ होत जातो तसा तसा लोभही वाढतो!' तेव्हां आहे त्यांत संतोष मानून राहणारा मजूरही मोठ्या बादशहापेक्षां सुखी असेल यांत संशय नाहीं! याप्रमाणें शहाणपणाच्या अनेक गोष्टी जर त्याच्या मनांत ठसून गेल्या, तर मोठा अधिकार मिळाल्यापेक्षांही त्यास अधिक लाभ होणार नाहीं काय? असो; तर इतिहासापासून मनास शांति व उन्नतत्व प्राप्त होतें हा एक त्यापासून मोठा लाभ आहे.

---

लंकापतेः[1] संकुचितं यशो यत् यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः।
स सर्व एवाद्यकवेः प्रभावो न कोपनीयाः कवयः क्षितींद्रैः॥ १॥ बिल्हण.

अंक ७ वा—(१) इतिहासाचा चवथा उपयोग—मनोरंजन. (२) पांचवा—नीतिज्ञान. (३) सहावा—मनाचें पोषण.

१. इतिहासापासून चवथा उपयोग मनाचें रंजन. निरनिराळ्या देशांत घडलेले वृत्तांत समजल्यानें व त्यांचें मनन केल्यानें मागें सांगितल्याप्रमाणें जिज्ञासावृत्तीचें समाधान तर होतेंच, पण जर ते इतिहास तशा शैलीनें लिहिले असतील तर त्यांच्या वाचनानें वाचकांस आल्हादही होईल. असे इतिहासग्रंथ ग्रीक, ल्याटिन, फारशी या भाषांत आहेत. तसेंच अलीकडे इंग्लिश भाषेत झालेले ह्यूम, गिबन्, मेकॉले यांचेही ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध आहेतच. अशा इतिहासांची भाषासरणी, यथास्थित ग्रंथरचना, कथानकाची जुळणी, गहन विचार, तऱ्हेतऱ्हेची माहिती मध्यें घालून देण्याची खुबी, यांच्या योगानें सर्व प्रकारच्या वाचणारांस ते मान्य होतात. ज्यांस केवळ भाषाच शिकायाची असते त्यांस तिचें अत्यंत रमणीय रूप त्यांत पाहायास सांपडतें, ज्यांस विषयाची मांडणी कशी करावी याची समजूत करून घ्यायची असते त्यांस ती धाटणी त्यांतून उचलतां येते, केवळ गोष्टवेल्हाळच जे असतात त्यांस कादंबऱ्यांप्रमाणें त्यांत चमत्कृति भासते, जे तत्त्वजिज्ञासु असतात त्यांस पोक्तपणाचे व खोल असे विचार त्यांत सादर केले असतात, आणि ज्यांस चमत्कारिक व मौजेच्या गोष्टींचा संग्रह करावासा वाटतो त्यांस तो त्यांतून सहज करतां येतो. याप्रमाणें इतिहास अनेक प्रकारांनीं मनोवेधक होतो. कादंबऱ्या वाचतांना श्रम न होतां जशी करमणूक होते तशीच बहुधां अलीकडील कित्येक उत्कृष्ट इतिहासांनीं होते; व वास्तवच अलीकडे इतिहास वाचण्याची प्रवृत्ति पडून तो सर्वांस सामान्यतः जितका माहीत असतो तितका पूर्वी कधींही नसेल. ही गोष्ट दोहीं तऱ्हेनें नफ्याची झाली. एक तर इतिहासाचें ज्ञान सर्वांस उपयोगी आहे ह्मणून; आणि दुसरें असें कीं, त्यामुळें कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांकडेच जो लोकांचा पूर्वी ओढा होता तो कमी झाला. मनोरंजनाचा दुसरा प्रकार कांहींच अनुकूल नसल्यामुळें पूर्वी लोकांचा कादंबऱ्यांकडेच विशेषतः भर असे; व यामुळें मुख्यत्वेंकरून तरुण लोकांस त्या फार अनर्थावह होत. त्या वाचणारे बहुधां तरुण वयाचेच असायाचे, व लिहिणारेही तसेच;

---

१ "लंकेचा राजा रावण याची कीर्ति थोडी, व रामराजाचें यश विशाल, हा प्रभाव अवघा आद्यकवीचा (वाल्मीकीचा) होय! यास्तव मोठे राजे जरी झाले तरी त्यांनीं कवींशीं नम्रच असावें!"

मग काय विचारावें ? त्या वयांत अंतःकरणवृत्ति अत्यंत सुक्षोभ असल्यामुळें अद्भुत असंभवी गोष्टींत मन रंगून शृंगारवीरादि रस, जे त्यांत अतिशयोक्तीनें वर्णिले असतात त्यांत तल्लीन होऊन मन भडकून जाई. डॉन् क्विक्सोट[1] किंवा रासेलसांतील ज्योतिषी यांची जशी अवस्था होऊन गेली तशाच प्रकारची बहुधा या वाचकांची होण्याचा संभव असे. म्हणजे विलक्षण कल्पना व चमत्कारिक तरंग मनांत नेहमीं भरून लौकिक व्यवहारास हे मनुष्य अगदीं कामाचे नाहींत असे होत. शिवाय मन बिघडण्यास व त्यास अगदीं निःसत्व करून टाकण्यासही कादंबऱ्या कारण होत. याचें उदाहरण आपल्या मराठींतीलच कित्येक कादंबऱ्या व नाटकें आहेत. व इंग्लंडांत सर वॉल्टर स्कॉट यांच्या पूर्वी जे कित्येक कादंबरीकार होऊन गेले त्यांपैकीं मोठे नामांकित होते ते सुद्धां महाचावट होते. पण या चावटागिरीचा अगदी कळस झालेला ज्यास पहाणें असेल त्यानें ' डिक्यामेरॉन् ' व ' हेप्त्यामेरॉन् ' हे ग्रंथ पाहावे. पहिला बोकेशियो नामक इटालियन ग्रंथकारानें रचला व दुसरा त्याच्या नमुन्यावर एका फ्रेंच बाईनें रचिला. पहिला ग्रंथ रचण्याचा प्रसंग मोठा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. फ्लॉरेन्स ( हें नांव विशेषतः इकडच्या लोकांच्या मनांशीं पुष्कळ दिवस खिळून राहील ! ) या नांवाच्या शहरीं एके समयीं मोठी पटकी उठली असतां तेथील सात तरुण स्त्रिया व तीन तरुण पुरुष अशीं दहाजणें गांवाबाहेर एका बागेंत जाऊन कांहीं दिवस राहिलीं. तेथें त्यांनीं परस्परांस करमणूक करण्याकरितां ज्या चमत्कारिक गोष्टी सांगितल्या त्या एकंदर मिळून हा ग्रंथ झाला आहे. दुसरा ग्रंथ तर वर सांगितल्याप्रमाणें एका स्त्रीनेंच लिहिला असून त्यांत सांगितलेल्या कित्येक गोष्टी तिनें स्वानुभवावरून लिहिल्या आहेत ! असो; इतकी बारीक माहिती येथें सांगण्याचा हेतु इतकाच कीं, या दोन ग्रंथांवरून सर्व सुधारणेचें आगर जें युरोपखंड, सर्व सदाचरणाचें आगर जो ख्रिस्ती धर्म, सर्व सद्गुणांचें आगर ज्या तिकडील कुलीन स्त्रिया, त्या सर्वांचें किंचित् स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षांत यावें ! पण ही गोष्ट इतालियन व फ्रेंच लोक, जे नखरेबाज व इष्की म्हणून साऱ्या युरोपखंडांत निवडले आहेत, त्यांविषयीं झाली. आतां आपले धनी इंग्रेज लोक, ज्यांच्या मतें नीति व सदाचरण यांचें केवळ निधानच ते होत, त्यांच्यांत तरी वरील पुस्तकांचा कितपत तिटकारा आहे तो पाहूं. यास प्रमाण दोनच गोष्टींचें पुरें आहे. पहिलें हें कीं, त्यांचे आद्यकवि जे चॉसर त्यांनींच ' डिक्यामेरॉन् ' मधल्या कित्येक गोष्टींचें कवितारूपानें निबंधन केलें आहे. यावरून त्या इटालियन ग्रंथाचा सदाचरणी इंग्लिश लोकांत किती लवकर व केवढा प्रसार झाला हें समजतें. दुसरी गोष्ट, अगदीं अलीकडे ड्रैडन व पोप यांनींही तोच प्रकार केला

१. हा जगद्विख्यात ग्रंथ एका स्पानिश ग्रंथकारानें दिवाणी तुरुंगांत असतां आपल्या करमणुकीकरितां लिहिला. यांतील नायकाचेंच नांव ग्रंथास ठेवलें आहे. यानें ' नाईट ' लोकांच्या गोष्टी इतक्या वाचल्या कीं, त्यांनीं याला वेड लागून आपणही त्यांसारखे अद्भुत पराक्रम करावे असें याच्या मनांत आलें; व तसें करण्यास तो बाहेर पडला असतां त्यावर जे प्रसंग गुदरले ते या ग्रंथांत वर्णिले आहेत. यांत हास्यरस चोहोंकडे भरपूर आहे.

xM50
E7

आहे. असो; येथें लेखणीनें बरीच धांव घेतली; पण वरील माहिती आमच्या कोणत्याही वाचकांस नकोशी वाटेल असें आह्मांस वाटत नाहीं ! तेव्हां मन बिघडणें हा कादंबऱ्यांपासून होणारा एक अनर्थ आहे. दुसरा अनर्थ मनाचें दौर्बल्य. कादंबऱ्याच वाचण्याची ज्यास एकदां चटक लागते त्यास मग दुसरें कांहींच वाचावेंसें वाटत नाहीं. कादंबऱ्या भराभर वाचायाच्या, व त्यांत समजण्यासही कांहीं कठिण नसतें; यास्तव विद्या काय ती हीच असें वाचणारास वाटूं लागून त्याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ त्यांचा त्यांस त्रासच येऊं लागतो. त्यांत शिकणारानें आपली मति शिरकवावी लागते, कारण ते कठिण व गहन विषय पडले; पण तें याच्यानें होत नाहीं. अशी एकदां संवय पडून गेली ह्मणजे मग ती कधींही मोडतां येत नाहीं. याप्रमाणें वाजवीपेक्षां जास्त असा हा कादंबऱ्यांचा नाद लागला असतां तो मनास अपाय करतो. तें अगदीं निःसत्त्व होऊन जाऊन कोणतेंही श्रमाचें काम त्यांस झेपेनासें होतें.

पण मनोरंजक इतिहासाच्या योगानें वरील तिन्ही अनर्थ टळून कादंबऱ्यांचें तर कार्य होतें. त्यांत निवळ सत्यच लिहावयाचें असतें, यास्तव भुताराक्षसाच्या, 'नाइट' लोकांच्या, अशा विलक्षण प्रकारच्या अद्‌भुत गोष्टी त्यांत येत नाहींत. तरी पण त्यांत अद्‌भुत रस नसतो असें नाहीं. नेपोलियनासारख्या वीरांच्या, वॉट्सारख्या कल्पकांच्या, बेकन्सारख्या तत्त्वज्ञांच्या चरित्रांत अद्‌भुत रसास काय उणीव आहे ! पण दोहोंत फरक किती आहे तो पहा ! पहिल्या वाचून जसे पुष्कळ अनिष्ट झाले तसे दुसऱ्यांच्या योगानें कधीं तरी होतील काय ? दुसरी गोष्ट मन बिघडणें. हेंही इतिहासवाचनानें होण्याचा अगदीं संभव नाहीं हें उघडच आहे. तिसरें मनाचें क्षीणत्व. हें इतिहासवाचनानें होण्याचा संभव मुळींच नाहीं हें तर काय, पण जसजसा इतिहासाचा कोणास नाद लागत जाईल, तसतसें त्याचें मन विशाल व विचारक्षमच होत जाईल. फार तर काय, पण त्यास हा नाद लागला हेंच वरील दोहोंचें मोठें चिन्ह होय ! तर याप्रमाणें इतिहास हा सर्व प्रकारें हितकर असून कादंबऱ्यांप्रमाणें त्यापासून कोणताही अपाय होण्याचा संभव नाहीं. शिवाय सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, इतिहास अक्षरशः खरा असल्यामुळें त्यांतील गोष्टी जशा मनावर पक्क्या ठसल्या जातात, तशा कादंबऱ्यांतील ठसत नाहींत.

२. इतिहासापासून पांचवा उपयोग राज्यकारणी पुरुषांस ह्मणजे मुत्सद्यांस होय. इतिहासाचा मुख्य उपयोग वास्तविक पहातां हाच असून याचकरितां इतिहासकार पूर्ववृत्त लिहून ठेवतात. व्यक्तिभूत मनुष्यास जितका चरित्रांचा उपयोग तितकाच मुत्सद्यांस इतिहासाचा; ह्मणजे 'पुढच्यास ठेंच मागला शहाणा' या मराठी ह्मणीप्रमाणें पूर्वी होऊन गेलेल्या मनुष्यांचा अनुभव जसा पुढऱ्यांस उपयोगीं पडतो, त्याचप्रमाणें या पृथ्वीवर आज-

---

१. चॉसरचे व ड्रायडनचे ग्रंथ सहज मिळण्यासारखे नाहींत; त्यांतून पहिल्याचे तर समजण्यासारखेही नाहींत. यास्तव वरील गोष्टीचा ज्यास प्रत्यय घेणें असेल त्यानें पोपचें 'January and May.' हें काव्य पहावें

पर्यंत जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांचा अनुभव हल्लींच्यांस कामास येतो. राज्यास हितकर गोष्टी कोणत्या, अपायकारक कोणत्या, त्यांवर अनिष्टें आलीं असतां कोणत्या युक्तिप्रयुक्तीनें त्यांचें निवारण करावें, तंटे बखेडे कशामुळें उत्पन्न होतात, प्रजेस सुखी ठेवण्याचे मार्ग कोणते, कायदेकानू कशा प्रकारचे असावे, वगैरे शेंकडों गोष्टी पूर्वीच्या इतिहासावरून सध्यांच्या राज्यकर्त्यांस समजल्या आहेत. एकादें जुनाट वडाचें झाड अवाढव्य विस्तार पावून शेवटीं वठलें असतां त्याचे नवे सोट जसे वाढत जाऊन मूळच्या झाडाच्या जागीं होतात, त्याचप्रमाणें रोमच्या अफाट पसरलेल्या बादशाहींतून हळू हळू आलीकडचीं युरोपांतील अनेक राज्यें उद्भवलीं. भाषा, रीतरिवाज वगैरेंचें मूळ जसें तें राज्य होय, तसेंच राज्यव्यवस्थेचा पायाही सध्यांच्या राष्ट्रांचा तेथपासूनच आहे. हा बळकट आधार नसता, तर युरोपाची स्थिति आज कोणत्या प्रकारची असती हें सांगणें कठिण आहे! पहा बरें, पंधराव्या शतकांत ग्रीक व रोमन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रसार युरोपभर होतांच त्या खंडांतील सगळ्या राष्ट्रांस एकदम किती जोर आला! हरएक गोष्टींत तेथील लोकांचा पगडा साऱ्या पृथ्वीवर जो तेव्हांपासून बसला आहे त्यास मुख्य कारण पाहूं जातां वर सांगितलेल्या प्राचीन राष्ट्रांनीं ग्रंथांत सांठवून ठेवलेलें अमोलिक ज्ञानभांडार एकदम त्यांच्या हातास जें लागलें तेंच होय. राज्यरीति, सैन्यव्यवस्था, कायदेकानू वगैरे सर्व वरील जुन्या लोकांमध्येंच पूर्ण दशेस आलीं असल्यामुळें तीं अलीकडील राष्ट्रांस आयतींच उपयोगीं पडलीं. तेव्हां हा त्यांस केवढा लाभ झाला! पूर्वीं नाशिरवान नामें करून एका पारसदेशाच्या राजानें मुद्दाम एक वकील हिंदुस्थानांत पाठवून आपल्या संस्कृत 'हितोपदेशा'चें फारशी भाषेंत भाषांतर करविलें, रोमच्या सेनेट सभेनें तसेच तीन वकील अथेन्स शहरास पाठवून तेथून सोलनचे कायदे आणविले; लैकर्गसही स्पार्टन लोकांस राज्यव्यवस्थेचे नियम बांधून द्यावे या उद्देशानें एशिया मैनर, इजिप्त या दूरदूरच्या देशांस जाऊन हिंदुस्थानांतही आला होता असें ह्मणतात;—असे दीर्घ प्रयत्न त्या वेळच्या लोकांस राज्यनीतिविषयक ज्ञान मिळायास पडत असत! आणि तेवढेही त्या ज्ञानाची योग्यता जाणून लोक करीत! मग आलीकडच्या हजारों नव्या सोईंच्या योगानें तेंच अमोलिक-ज्ञान जर सर्वांस सुलभ झालें आहे, तर हा लाभ लहानसान काय? मागें इतिहासाचे जे आक्षेपक सांगितले ते एवढाही विचार करीत नाहींत, कीं मुळांशिवाय जशी झाडाची स्थिति संभवत नाहीं, किंवा पायावांचून जसें घर रहाणें अशक्य, त्याचप्रमाणेंच प्राचीन स्थितीशिवाय कोणत्याही राष्ट्राची त्या त्या वेळची नवी स्थिति आली नसते. नुसत्या वरवर पहाणाराची दृष्टि मुळापर्यंत न पोंचल्यामुळें त्यास वाटतें कीं, सध्यां जें रूप दिसतें आहे तें स्वयंभूव आहे. यास आदिकारण किंवा आधारभूत असें कांहींच नाहीं. ही मूर्ख समजूत मनांत धरून असे लोक आपल्या अज्ञानास,

---

१. संस्कृत ग्रंथांचा कालक्रम बसण्यास कांहीं गोष्टी ठोकीव माहीत आहेत—असें शिकंदराची स्वारी, काश्मीरच्या श्रीहर्षराजाचा शक सन ११११, चिनी प्रवाशांचे ग्रंथ. यांपैकींच वरील राजाचा शक (सुमारें इ० स० ५६०) हा आहे. यावरून कालिदासादिकांसही जे आठव्या शतकापर्यंत ओढतात त्यांनीं अंमळ जपून लिहावें.

अरसिकतेस, किंवा आळसास इतिहासाचा मुळीं तिरस्कारच करून लपवूं पाहतात. असो; तेव्हां एखाद्या राष्ट्राविषयीं पूर्ण साद्यंत ज्ञान ज्यास संपादन करायाचें असेल, त्यास त्याची त्या वेळचीच स्थिति पाहिल्यानें तें कधीं होणार नाहीं. अगदीं मूळारंभापासून कसकसे फेरफार होत गेले ते पूर्णपणें जेव्हां तो लक्षांत आणलि तेव्हांच त्या वेळच्या स्थितीविषयीं त्यास यथार्थ ज्ञान होईल. तसेंच त्याच्या भावी स्थितीविषयीं जर त्यास अटकळी बांधायाच्या असतील तर तेंही वरील समग्र ज्ञान असल्याखेरजि त्याच्यानें होणार नाहीं.

३. इतिहासाचा शेवटला एकंदर उपयोग ह्मटला ह्मणजे मनाचें पोषण होय. ह्मणजे त्याच्या वाचनानें व मननानें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ दशेस पोंचतात. एक तर स्मरणशक्ति, शक, मिति, स्थलांचीं नांवें, मनुष्यांचीं नांवें, एकंदर मजकूर हीं अगदीं बरोबर ध्यानांत ठेवावीं लागल्यामुळें या शक्तीचें काम पडून ती उत्तरोत्तर अवश्य वाढत जाते. दुसरी कल्पनाशक्ति. इतिहास ह्मणजे अर्थांतच गत गोष्टींचा वृत्तांत असल्यामुळें तो मनांत यथास्थित आणण्यास कल्पनेचें काम पडतें. ज्या काळचा, ज्या देशाचा इतिहास वाचायाचा, त्याची विशेष स्थिति पूर्णपणें लक्षांत आणल्यावांचून तो कधीं समजत नसतो; यास्तव तसें होण्यास वाचणाराची कल्पनाशक्ति चांगली चलाख असावी लागते. ही चलाख कल्पना व मोठी पोक्त किंवा सूक्ष्म बुद्धि हीं एक नव्हेत. यास्तवच कविता, कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांचा तिरस्कार करणारे जसे मोठे बुद्धिमानही आढळतात, तद्वतच मागें सांगितल्याप्रमाणें जॉनसन् सारखे इतिहासास तुच्छ करणारे पंडितही आढळतात. पण या त्यांच्या अवहेलनेनें ते स्वतःस जितका अपाय करून घेतात तितका वरील कवितादिकांच्या अधिदेवतांस होत नाहीं! त्यांचें मनोहर सौंदर्य लेशमात्रही कमी होत नाहीं, व त्यांच्या रसलुब्ध खऱ्या भजकांतूनही एकाची सुद्धां भक्ति लवमात्रही उडत नाहीं. हे अवहेलना करणारे मात्र कल्पनेचे जड ठरून वृद्धप्रमदान्यायानें उपहास्य होतात. पुरूरवा राजानें उर्वशीस प्रथमच पाहिलें असतां तिला निर्माण केल्याच्या संबंधानें तो ब्रह्मदेवास उद्देशून जें ह्मणतो तेंच अशा पंडितांस निराळ्या संबंधानें लागेल![1] असो; तेव्हां इतिहास—त्यांतूनही विशेषतः दूरच्या देशांचा किंवा काळाचा—यथास्थित समजण्यास व त्याची पुरतेपणीं गोडी लागण्यास वाचकाची कल्पना जागृत असली पाहिजे. असें असल्याविना त्या त्या इतिहासपात्राशीं तादात्म्य

---

१ अस्याः सर्गविधौ प्रजापतिरभूच्चंद्रो नु कांतिप्रदः
शृंगारैकरसः स्वयं नु मदनो मासो नु पुष्पाकरः।
वेदाभ्यासजडः कथं नु विषयव्यावृत्तकौतूहलो
निर्मातुं प्रभवेन्मनोहरमिदं रूपं पुराणो मुनिः॥

विक्रमोर्वशीय. अंक १.

"हिला निर्माण करतेवेळीं चंद्र प्रजापति झाला असावा, किंवा वसंत झाला असावा, अथवा एक्या शृंगारांतच जो नेहमीं रमतो असा साक्षात् मदनच प्रजापति होऊन त्यानें हिला घडली असावी! कां कीं, सदासर्वकाळ वेद घोकून घोकून ज्याच्या बुद्धीस जाड्य आलें, व ज्यास विषयांची प्रीति मावळली झाली, तो जुनाट कवि (ब्रह्मदेव) असें मनोहर रूप उत्पन्न करण्यास कसा समर्थ होईल?

पाहून तो तो वृत्तांत केवळ प्रत्यक्षसा मनास भासणें हें घडत नाहीं. तेव्हां ही शक्ति इतिहास वाचणाराच्या अंगीं मूळची असली पाहिजे. ती असली ह्मणजे मग अर्थातच याच वाचनानें ती पुढें वृद्धिंगतही होत जाते. इतिहासांत नानाप्रकारचे देश, पुरुष, प्रसंग यांचें वर्णन असल्यामुळें कल्पनाशक्तीस रमण्यास हवा तेवढा अवकाश सांपडतो; व त्यामुळें तिचें अर्थातच अधिकाधिक पोषण होत जातें. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, इतिहासांतील हकीकत सगळी अक्षरशः खरी असल्यामुळें–कारण तशी ती असेल तरच तो इतिहास–कादंबऱ्यांच्या असत्यतेमुळें जो एके रीतीनें त्यांपासून मनास खेद होतो तो यापासून होत नाहीं. पहा बरें, 'आरबी भाषेंतील गोष्टी'तल्या सिंदबाद दर्यावर्दीच्या निरनिराळ्या सफरी वाचल्या असतां मनास मोठा चमत्कार वाटून कल्पनाशक्ति त्यांत अगदीं चूर होऊन जाते! पण काय! वाचणें संपतांच लागलेंच मनांत येतें कीं, या सर्व गोष्टी मोठ्या मौजेच्या खऱ्या, पण शेवटी काय––येथून तेथून खोट्या! पण तेंच कोलंबसाच्या सफरी वाचा; ह्मणजे मनीची कशी स्थिति होते! पहिल्याच्या सफरी आजपर्यंत लक्षावधि लोकांनीं वाचल्या असतील, व तशाच दुसऱ्याच्याही वाचल्या असतील; पण पहिल्या वाचल्याबरोबर कोणी मनुष्य गलबत तयार करून त्याच्यासारखे हिरे आणण्यास निघाला असें वाटत् नाहीं; पण दुसऱ्याचा परिणाम काय झाला तो कोणासही–विशेषतः हिंदूंस तर–सांगायास नकोच! त्याच जगत्प्रसिद्ध पुस्तकांत अल्लादिनाच्या वाड्याचें वर्णन आहे; आणि इतिहासांत ताजमहालाचें वर्णन आहे. पण दोहोंच्या वाचनानें वाचकांच्या मनांत किती भिन्न वृत्ति उद्भवतात! याप्रमाणेंच यक्षांनीं, राक्षसांनीं केलेलीं अद्भुत कृत्येंही त्यांत घातलीं आहेत; पण तीं वाचून मनास कांहीं वेळ करमणूक होते इतकेंच. इकडे वायुवेगानें चालणारे अग्निरथ, तेलाशिवाय, वत्तीशिवाय जळणारे दिवे, एक ठोका मुंबईस तर दुसरा ठोका लंडनास अशी मनाच्या वेगानें धांवणारी वीज, हत्तीच्या अंगासारख्या धोंडी एकावर एक रचून उभारलेले मनुष्यकृतीचे पर्वत–कीं जे आतां जितके जुने भासतात तितकेच हिरॉडटसास भासले,–डोंगर कोस कोस पोंखरून कोरून काढलेलीं विशाल मंदिरें–ज्यांनीं आपल्या प्रचंडतेपुढें निष्ठुर, हेकेखोर व दुराग्रही अशा यवनांसही हात टेंकावयास लावून त्यांकडून त्यांचा दुष्ट हट्ट सोडविला,–– इत्यादि मानवी बुद्धीचे व प्रयत्नाचे अद्भुत प्रभाव जेव्हां मनुष्य पहातो तेव्हां त्यांस वरील खोट्या गोष्टी पोरकट वाटूं लागतात! असो; तेव्हां सांगायाचें तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या मनास स्वभावतःच सत्य आवडत असतें, यास्तव खऱ्या इतिहासाकडे त्याची प्रवृत्ति जितकी सहज व जितक्या प्रेमानें होईल तितकी कल्पित कादंबऱ्यांकडे होणार नाहीं. व ह्मणूनच मनुष्याची कल्पना इतिहासवृत्तांतांत मोठ्या आवडीनें निःशंक रमते; कारण त्यांत असत्यतादोष मुळींच नसल्यामुळें तींत यथेच्छ विहार केल्याचा तीस अगदीं शीण वाटत नाहीं. तसेंच इतिहासांतील विषय पुष्कळ प्रत्यक्ष इंद्रियगोचर होण्यासारखे असल्यामुळें त्यांचा ठसा मनावर जितका ठळठळीत उठण्यासारखा असतो तितका कल्पित कथांतील विषयांचा अर्थातच नसतो. असो; तर याप्रमाणें कल्पनाशक्तीस रंजविण्याच्या संबंधानें कादंबऱ्यांत व इतिहासांत इतकें अंतर आहे. तेव्हां इतिहासाच्या वाचनानें वाढली जाणारी दुसरी मानसिक

शक्ति कल्पना होय. तिसरी विचारशक्ति. ही इतिहासाच्या ज्ञानानें वाढते हें अगदीं उघड आहे,—फार तर काय, पण हें नुसतें लिहिणें ह्मणजे सुद्धां 'सूर्य तेजाळ आहे,' 'पाण्याच्या अंगीं प्रवाहित्वधर्म आहे,' इत्यादि वाक्यांप्रमाणें अत्यंत प्रसिद्ध अर्थाचा अनुवाद केल्याप्रमाणें असमंजस दिसतें. तथापि ती कां वाढते व कशी वाढते यावर अंमळ विस्तार करणें जरूर आहे. एक तर इतिहासांत तऱ्हेतऱ्हेची माहिती असल्यामुळें मनाच्या कोठारांत पुष्कळ नव्या गोष्टींचा भरणा होतो. त्या तर्क चालविण्यास किंवा हातीं घेतलेल्या विषयास वैचित्र्य किंवा विशदत्व देण्यास उपयोगीं पडतात. दुसरें इतिहासांत निरनिराळ्या पात्रांचे निराळे गुणदोष, निरनिराळे स्वभाव, निरनिराळ्या कृति स्पष्ट दाखविल्या असतात. यास्तव मानवी स्वभावाचीं अनेकविध अशीं चित्रविचित्र रूपें वाचकांच्या दृष्टीस पडून त्यांचें व्यवहारांत अत्यंत उपयोगी असें मार्मिक व पूर्ण ज्ञान त्यांस होतें. निरनिराळ्या देशांतील लोकस्थिति, राज्यव्यवस्था, रीतरिवाज, धर्मादि विषयांवर समजुती, वगैरे कळल्या असतां मनुष्याची नजर दूरवर फांकते. त्यामुळें बुद्धीची पोंच वाढून एकंदर वस्तुमात्राविषयीं त्यास पहिल्याहून विशेष यथार्थज्ञान होऊं लागतें. एकच स्थितिविशेष नेहमीं दृष्टीसमोर असल्याच्या योगानें बुद्धीवर जो संकुचितत्वाचा वाईट संस्कार घडलेला असतो तो मोडण्यास दोनच मार्ग आहेत; एक देशोदेशीं हिंडून परराष्ट्रांविषयीं प्रत्यक्ष माहिती करून घेणें; आणि याच्या खालोखालचा दुसरा मार्ग ह्मटला ह्मणजे अर्थातच तसें ज्यांनीं केलें आहे त्यांपासून भाषणद्वारा किंवा लेखनद्वारा तें ज्ञान मिळविणें. आतां पहिला मार्ग व दुसऱ्यांतील पहिली सोय हीं फारच थोड्यांस अनुकूळ असतात; यास्तव एकंदर लोकांच्या उपयोगाचा मार्ग ह्मटला ह्मणजे इतिहास, देशांतरवर्णनें, प्रवासाच्या हकीकती वगैरेच होत. यांचा यथास्थित अभ्यास केला असतां कूपमंडूक किंवा उंबरांतले किडे यांसारखी सदोदित अवस्था असल्याच्या योगानें ज्या मूर्ख समजुती व जे दुराग्रह मनास स्वभावतःच जडून काळेंकरून त्यांस अगदीं खिळून जातात ते दूर होतात. शहाणे काय ते आह्मी; रीतभात उत्तम ह्मणजे काय ती आमचीच; सर्व सुधारणेचें आगर ह्मणजे आमचाच देश; खरा व सदाचरणप्रवर्तक असा आमचाच धर्म–बाकीच्यांचें ह्मणजे निवळ थोतांड व लोक भ्रष्ट–; देवाचे एकुलते एक लाडके असे आह्मीच; त्यानें आमच्याच भूमींत अवतरून आपलें शुभवर्तमान इतर सर्व पापमग्न व मरणोत्तर अक्षय नरकाचे धनी होणाऱ्या लोकांस जाहीर करण्याचा आह्मांस अधिकार दिला; आमची भाषा उत्तम; आमची विद्या, आमच्या कला याच बाकीच्या साऱ्या जगास वंद्य;–फार तर काय, पण आमची पोषाकाची तऱ्हा, आमची जेवणाखाणाची तऱ्हा, आमची तोंड धुण्याची तऱ्हा, ही सुद्धां सर्वांत उत्कृष्ट; अशा प्रकारच्या ज्या निराधार कोत्या समजुती त्या नाहींशा होऊन इतिहासाच्या योगानें आपणांविषयीं व इतर राष्ट्रांविषयीं यथार्थ ज्ञान वाचकांस होतें.[१]

१. इतिहासापासून मनास जें शिक्षण मिळायाचें त्याचा उत्कृष्ट भाग वरील होय. हें यथार्थ ज्ञान मोठी निष्पक्षपात व उदार बुद्धि धारण केली, किंवा प्रत्यक्ष तो देश पाहिला, किंबहुना तेथे राहून तेथील विद्येचेंही अध्ययन केलें, तरीही नियमानें येईलच असें नाहीं. याचें उत्कृष्ट प्रमाण ज्यास पहावयाचें असेल त्यानें हिंदुस्थानचा इतिहासकार मिलप्रसिद्ध ग्रंथकार मेकॉले,'वास्तवदत्तेचे'

आपली मोठी मानवजाति जी साऱ्या भूमंडळावर पसरली आहे,व एकेक राष्ट्र केवढेंही ज्ञानसंपन्न किंवा थोर असलें तरी तें जिचा केवळ एक कोपरा असतें, तिचें सर्वांशीं जेव्हां पर्यालोचन करावें तेव्हांच तिचें एकंदर खरें स्वरूप लक्षांत येतें. मनुष्यस्वभावाच्या नित्य व शाश्वत स्वरूपापासून त्याचें आगंतुक ह्मणजे देशकालविशेषजन्य स्वरूप निवडता येण्यास अर्थात् असेंच एकंदर सर्व राष्ट्रांचें मनानें आकलन झालें पाहिजे. असो; तेव्हां मनाचा स्वप्रदेश वाढवून कोत्या समजुतींपासून व भ्रमांपासून इतिहास त्यांस मुक्त करितो, व आपणांविषयीं व इतरांविषयीं यथार्थबुद्धि मनांत आणून देऊन इतरांशीं सलोख्यानें वागण्यास तो आपणांस शिकवितो हाही त्याच्या अध्ययनानें होणारा एक मोठा लाभ आहे. इंग्रेजांचें राज्य या देशांत होऊन इतके दिवस टिकलें, व पुढेंही बहुधा चिरकाल असेंच अबाधित चालेल, याचें एक मोठें कारण वरील गोष्टीच्या संबंधें त्याच्यांत व मुसलमानांत जो मोठा भेद दृष्टीस पडतो तो होय यांत संशय नाहीं. इतिहासाच्या योगानें राजकारणाच्या संबंधें विचारशक्ति वाढते हेंही वरील कलमांत सांगण्यांत आलेंच आहे. पण तें खुद्द राज्यकर्त्यांसच लागून होतें. प्रस्तुत प्रसंगीं हेंही दाखवायाचें आहे कीं, ज्याच्या हातीं राज्याधिकार लहान थोडा सुद्धां नाहीं अशा घरीं बसून असणाऱ्या सुखवस्तु मनुष्यासही तशा प्रकारचें मार्मिक ज्ञान इतिहासापासून होईल. सध्यां इंग्लंडांत वगैरे अशा प्रकारचे विचार करणारे व अशा विषयांवर ग्रंथ लिहिणारे लोक सगळे मुत्सद्दीच असतात असें नाहीं; तर वर सांगितले तसे सुखवस्तु असणारे लोकही अशा विचारांत मग्न असतात. तेव्हां हा विषय राज्यकारणी पुरुषांचाच केवळ आहे असें नव्हे; अगदीं सामान्य मनुष्यांसही तो विचारार्ह आहे. राज्यप्रकारांपैकीं[1] उत्कृष्ट कोणता, किंवा अमुक अमुक देशास कोणकोणता विशेष हितकर; प्रजेस राजानें अगदीं अटकावांत ठेवावें कीं मोकळीक द्यावी, द्यावी तर कोठपर्यंत; राज्याचें हित होत असलें तर अनीति आचरावी कीं नाहीं, आचरली असतां तिचा परिणाम काय होईल; देशाच्या स्थितिविशेषाचे परिणाम एकंदर सर्व लोकांच्या मनावर व स्थितीवर काय होतात; राज्याचा आणि धर्मखात्याचा कितपत संबंध असावा; राजानें प्रजेवर धर्माच्या बाबतींत सक्ती करावी कीं करूं नये; अशा रीतीचे शेंकडों विषय एकंदर सर्व लोकांच्या संबंधाचे आहेत; यास्तव यांवर इंग्लंड वगैरे देशांतून सारखी वाटाघाट चालू आहे. गेल्या शतकाच्या शेवटीं फ्रान्स देशांत जी मोठी धामधूम झाली त्या वेळेस सर्व युरोप व अमेरिका अगदीं गलबलून गेलीं; व सर्वांच्या तोंडीं लोकसत्ताक संस्थान चांगलें

---

प्रकाशक डॉक्टर हॉल यांचे ग्रंथ पहावे! यांनीं आमच्या देशाच्या संबंधानें कित्येक ठिकाणीं इतका शहाणपणाचा मजकूर लिहिला आहे कीं, तसा जर कोणी हिंदू त्यांच्या देशाच्या संबंधें लिहिता, तर हेच ग्रंथकार त्यास पोरापेक्षां पोर ठरवितें, व त्यास कोठें तोंड काढूं देतेना!

१. या शब्दाचा अर्थ आमच्या मराठी वाचकांस अंमळ फोडून सांगितला पाहिजे. हिंदुस्थानांत व साऱ्या एशियाखंडांत पूर्वींपासून तों तहत आजपर्यंत राजाच्या सत्तेखेरीज दुसरी सत्ता कोणास माहीत नाहीं. पण युरोपांत अल्पजनसत्ताक, प्रजासत्ताक, लोकसत्ताक असे अनेक संस्थानाचे प्रकार होते, व अजूनहि प्रसंगानुसार स्थापित होतात.

कीं एकराजक चांगलें हा वाद झाला. त्या प्रसंगीं त्या मोठ्या विषयावर शेंकडों ग्रंथ झाले; पण ते आतां सर्व बुडून विख्यात वक्ता जो बर्क त्याचा ग्रंथ ' फ्रान्सच्या राज्यक्रांतीवर विचार ' येवढा मात्र अजून सर्वत्र प्रसिद्ध आहे. या ग्रंथावरून त्या थोर तत्त्वज्ञाची विशाल बुद्धि स्पष्ट दिसून येते. या ग्रंथाविषयीं दुसरी विशेषतः सांगायाची गोष्ट काय कीं, त्यांत ज्या कित्येक गोष्टींविषयीं मागील इतिहासाच्या अनुभवावरून त्या ग्रंथकारानें भाकीत केलें होतें तें पुढें बरोबर मिळून आलें. असो; वरील शेवटल्या गोष्टीवरून इतिहासाची थोरवी सर्वांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं; आणि सर्वांच्या, व विशेषतः राज्यकर्त्यांच्या, उपयोगी इतिहासाचें ज्ञान किती पडण्यासारखें आहे हेंही त्यांवरून दिसून येईल. कोणी कोणी तर यावरून असेंही ह्मणतात कीं, कांहीं काळानें इतिहासज्ञांस पूर्वींच्या अनुभवावर पुढें अमुक अमुक देशाची कसकशी स्थिति होईल याविषयीं अगोदर भाकीत करण्याची सुद्धां शक्ति येईल. असो; या शिवाय आणखीही एका प्रकारें विचारशक्ति वाढते. तो हा कीं, सगळ्या जगाचा इतिहास पहिल्यापासून आजपर्यंत सगळा एकदम मनांत आणला असतां जगदीशाचें वैभव त्यांत दिसून येतें. अगदीं प्राचीन राष्ट्रांची मूळची स्थिति कशी होती, व ती पुढें क्रमाक्रमानें कालगत्या कशी पालटत गेली, आणि असें होतां होतां हल्लींच्या काळीं जग कोणत्या स्थितीस येऊन पोंचलें आहे, याचा जो यथास्थित विचार करील त्यास एकंदर जगाच्या रहाटीचा रोंख सुधारणुकेकडे आहे असें खास दिसून येईल. या ह्मणण्यास रानटी लोकांनीं रोमन बादशाहीची धूळधाण करून टाकली, ख्रिस्ताच्या जन्मभूमीनिमित्त कोट्यवधि युरोपियन लोक मरून शेवटीं त्यासच मुसलमानांनीं माघारीं पिटून लावलें, फ्रान्स देशांत दंगा होऊन त्याची व त्याबरोबर सगळ्या युरोपखंडाची नासाडी झाली, वगैरे गोष्टी सकृद्दर्शनीं विरुद्धशा वाटतात; पण याच अनर्थांचे पुढें परिणाम कसे झाले याचा जो अमळ विचार करील त्यास कळून येईल कीं, ते अनर्थ केवळ तात्कालिक असून त्यांपासून जगाचें चिरकाल कल्याण झालें आहे. सध्यां जी पृथ्वीवरील सुधारलेल्या देशांची स्थिति आहे तिजमध्यें व चारपांचशें वर्षांमागें जी होती तींत जमीनअस्मानाचा फरक झाला आहे असें ह्मटलें असतां चालेल. हल्लीं अगदीं सामान्य मनुष्यास अशीं शेंकडों सुखें व सोई प्राप्त झाल्या आहेत, कीं ज्या त्या वेळीं मोठ्या बादशहास अनुकूल नव्हत्या. सध्यां पोरांसोरांस अशा कित्येक गोष्टी माहीत आहेत, कीं ज्या त्या वेळच्या मोठमोठ्या पंडितांच्या व तत्त्वज्ञांच्या स्वप्नींही कधीं आल्या नसतील. प्राचीन काळीं पक्षवायुग्रस्त शरीराप्रमाणें जगाची अवस्था होती; ह्मणजे एका भागाचें सुखःदुखज्ञान दुसऱ्यास पोंचण्याचा बिलकूल मार्ग नसे. यास्तव जवळजवळचे देश सुद्धां परस्परांविषयीं उदासीन असत. ग्रीक लोकांचें व पारसीकांचें युद्ध अनेक वेळां मोठ्या निकराचें झालें; पण एकीकडे रोमन वगैरे लोक व दुसरीकडे हिंदु वगैरे, अगदीं गार होते. तसेंच दुसऱ्या पक्षीं हानिबॉलानें रोमचें राज्य हालवून दिलें, किंवा इकडे बौद्धधर्मी लोकांस ब्राह्मणांनीं तिबेटांत, लंकेंत, चिनांत हद्दपार करून घालवलें, पण ग्रीक लोक आपल्या ठिकाणीं स्वस्थ. पण आतां कसा चमत्कार झाला आहे तो पहा ! अमेरिकेंत लोक भांडतात—एक

होतात; आणि त्यांच्या संबंधानें पातालवासी जे मुंबईचे शेटसावकार ते त्या भांडणाच्या योगानें एकदम कोळ्याधीश होतात, आणि भांडण एकाएकीं मिटतांच फरोफर शेणाचे दिवे लागतात!—सारांश, तारायंत्राची तार जशी सध्या पृथ्वीच्या एका टोंकाशीं हालविली असतां दुसऱ्या टोंकापर्यंत ती हालत जाते, त्याप्रमाणें एका भागाचें सुखदुःख तत्क्षणीं दुसऱ्या भागाच्या अनुभवास येतें; किंवा बरवें सादृश्य घेणें घेतलें तर निरोगी मनुष्याच्या शरीराच्या कोणत्याही भागास झालेलें ज्ञान जसें तत्क्षणीं सार्वत्रिक होतें तसा प्रकार होतो. असो; तेव्हां हा सर्व प्रकार जेव्हां लक्षांत येतो, व एकंदर जगाचा क्रम दिवसोंदिवस सज्ञान व सुखी होण्याचा आहे असें त्यांवरून समजतें, तेव्हां धर्मशील पुरुषास मोठी उमेद येऊन त्यांची परमेश्वराचे ठायीं भक्ति दृढ होते.

याप्रमाणें या अचाट विषयाचें आमच्या वाचकांस किंचित् दिग्दर्शन करविलें. या विषयास साजेलसें पूर्ण निरूपण करणें म्हणजे सामान्य मनुष्याचें काम नव्हे. त्यास ग्रंथावलोकन पुष्कळ पाहिजे, जगाचा अनुभवही पुष्कळ हवा, आणि शिवाय विषय प्रतिपादन करण्याची शैलीही उत्कृष्ट साधलेली पाहिजे. हीं सर्व प्रस्तुत लिहिणाराच्या अंगीं आहेत असें त्यास अगदीं वाटत नाहीं. परंतु तीं सध्यांच्या वाचकांच्या मानानें पहातां त्यांसही हवीं आहेत, किंवा त्यांपासून त्यांस हल्लींच्या स्थितींत उपयोग होणार आहे, असेंही पण त्यास वाटत नाहीं. वाचकांचें ज्ञान व विचारक्षमता जसजशी वाढत जाते त्याच मानानें त्यांची सेवा करण्यास तसे ग्रंथकारही अवश्य निपजत जातात; यास्तव आमचे इकडील वाचक इंग्लंडांतील वाचकांच्या तोडीचे होताहेत तोंपर्यंत आपणांत बर्क, मेकॉले, मिल यांसारखे लिहिणारेही खास निपजतील यांत संशय नाहीं! या दोन्ही गोष्टी परस्परसापेक्ष होत हें उघडच आहे. असो; तेव्हां सध्यांच्या स्थितीप्रमाणें आमच्या मराठी वाचकांस प्रस्तुत निरूपण पुरें आहे असें आम्हांस वाटतें. या व मागील अंकांत सांगितलेले इतिहासाचे उपयोग नीट मनांत भरून त्याच्या अभ्यासाकडे जर त्यांतून कित्येकांची प्रवृत्ति होईल तर या लेखाचे श्रम फुकट गेले असें होणार नाहीं.

येथवर इतिहासाविषयी सामान्यतः विचार झाला. पुढील अंकांत विशेषतः आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं चार शब्द बोलूं.

---

गे यत्र स्थेमानं दधुरतिभयभ्रांतनयना गलद्दानोद्रेकभ्रमदलिकदंबाः करटिनः ।
लुठन्मुक्ताभारे भवति परलोकं गतवतो हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः॥

मामिनीविलास.

**अंक ८ वा**—( १ ) आपल्या देशाविषयीं एकंदर जगाचें मत. ( २ ) आपलें स्वतःचें मत. ( ३ ) 'घाशीराम कोतवाल;' 'पुण्याचें वर्णन.' ( ४ ) हिंदुस्थानच्या इतिहासाची इंग्रेजांस गोडी व माहिती. ( ५ ) आमची गोडी व माहिती. ( ६ ) उपसंहार. ( ७ ) लोकांस सूचना.

मागील अंकाच्या शेवटीं सुचविल्याप्रमाणें यांत आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं–ह्मणजे या विषयावर इंग्रेजींत व मराठींत जे ग्रंथ आहेत ते कसे आहेत, सध्यां एकंदर लोकांस इतिहासाचें ज्ञान कितपत आहे, त्याची योग्यता त्यांस कितपत कळते वगैरे विषयीं–लिहावयाचें आहे. आतां या विषयासच खुद्द आरंभ करायाच्या पूर्वीं एका मोठ्या गोष्टी-विषयीं बरेंच लिहिलें पाहिजे. ही गोष्ट हिंदुस्थानाविषयीं एकंदर जगाचें मत. हें चांगलें लक्षांत आलें असतां पुढील विषय पुरतेपणीं ध्यानांत येण्यास अगदीं सोपें पडेल.

१. अलीकडे पन्नास पाउणशें वर्षांत या देशाची स्थिति मोठी चमत्कारिक होऊन गेली आहे. त्यास फार दिवसांनीं मोठ्या सुदैवानें जें स्वराज्याचें वारें लागलें होतें तें एकाएकीं नाहींसें होऊन तो हल्लीं एका टोंकापासून तों दुसऱ्या टोंकापर्यंत परराज्याच्या सत्तेखालीं आला आहे. असें पूर्ण पराधीनत्व त्यास यापूर्वीं कधींही आलें असेलसें दिसत नाहीं. आणि याहूनही विशेष खेदास्पद काय कीं, हींतून मुक्त होऊन त्यास पुनः वर डोकें उचलण्याचा बहुधा प्रसंगही इतःपर येईलसा वाटत नाहीं. सध्यांच्या अत्यंत कष्टावस्थेंत इंग्रेजांच्या तरवारींच्या तिखट धारांशीं दयार्द्रतेचा जो कांहीं थोडा बहुत अंश मिश्रित असेल तेवढेंच बहुतकरून आह्मांस त्राण उरलें आहे! असो; पण हीही दशा कदाचित् सद्य होती. कां कीं, 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण'[2] या न्यायानेंच एकंदर जगाची रहाटी चालली आहे. जो मनुष्य, जें कुळ, किंवा जें राष्ट्र आज भाग्याच्या परम शिखरास चढलेलें असतें तेंच उद्यां एकाएकीं डबघाईस येऊन परवां त्याचा मागमूसही मागें रहात नाहीं. पहा बरें, 'ग्रीक' या नुसत्या नांवाबरोबर किती कल्पना एकदम मनांत उभ्या रहातात! ज्या देशैकनिष्ठ वीर्यापुढें झर्सीज राजाचें असंख्यात सैन्य भुसासारखें उडून गेलें, तें वीर्य; सारें जग अजूनही ज्यांच्या योगानें थक्क होतें असें वाक्चातुर्य व बुद्धि; मोठमोठ्या राजांस ज्याचा धाक पडावा असें उत्साहोद्दीपक वक्तृत्व; प्रत्यक्ष पाषाणास बोलता चालता करण्याची अपूर्व करामत; इत्यादि कल्पना वरील नांवाच्या केवळ उच्चाराबरोबर एकसमयावच्छेदेंकरून मनांत प्रवेश करतात! व यामुळेंच हें नांव आजपर्यंत सर्वांच्या कानास अमृतासारखें मधुर

---

१. "ज्या गुहेपुढें आलें असतां मदोन्मत्त हत्तींनीं भय पावून क्षणभरही तेथें न ठरतां दूर पळून जावें, जींत हत्तींच्या गंडस्थळांतील मोत्यांचा खच पडला आहे, त्याच सिंहाच्या गुहेंत आतां भालूची गर्जना ऐकूं येते! शिवशिव!!"

२. 'चाकाच्या धावेप्रमाणें मनुष्याची स्थिति वरचेवर पालटत असते,—म्हणजे एकदां खालीं होते, पुनः वर होते.'

लागत आलें आहे. फार तर काय, पण या चिमुकल्या देशाचा—कीं ज्याचा एकंदर विस्तार येथील एखाद्या जिल्ह्याइतका सुद्धां नसेल, त्याचा—इतिहास सर्व जगास एखाद्या महातीर्थाप्रमाणें पावन व तारकच जणों काय झाला आहे. यानेंच नुकतें सगळ्या युरोपास दीर्घकालिक महानिद्रेंतून एकदम जागविलें, व त्याचा प्रचार व प्रसाद जेथें जेथें होत जाईल तेथें तेथें त्याच्या मागोमाग विद्या व कला या आल्याच असें समजावें. आजवर जे युरोपांत व अमेरिकेंत थोर थोर लोक होऊन गेले त्यांपैकीं ज्याच्या बुद्धीनें येथून पेट घेतला नाहीं असा कदाचित् एकही मनुष्य सांपडणार नाहीं. असो; पण याच ग्रीक लोकांची लवकरच काय दशा होऊन गेली! ज्या मासिडोनियन् लोकांस ते आपणांहून अत्यंत हीन समजून त्यांची अवगणना करीत तेच साऱ्या ग्रीस देशास शिरजोर झाले; त्यानंतर अक्षरशून्य जे रोमचे दांडगे शिपाई त्यांनीं सहज तो सगळा देश सर केला आणि त्यांच्या मागून तर वाळवंटांतून भटकणारे जे आरब त्यांची एक टोळी इकडे येऊन त्यांनीं मूर्ति फोडण्यास व सगळ्या देशाची धूळदाण करण्यास आरंभ केला. लक्ष्मीच्या चंचलतेचें व दैवाच्या अस्थिरपणाचें आणखी उदाहरण हवें असल्यास रोमचेंही आहे! या शहराच्या इतिहासापेक्षां चमत्कारास्पद दुसरें काय आहे! रॉम्युलसानें जी मर्यादा पहिल्यानें नांगरानें आंखून दिली तीच वाढतां वाढतां कोठपर्यंत वाढली! त्या वेळेस माहीत असलेलें सारें जग तींत आलें! पण येवढें होऊनही शेवटीं काय राहिलें? ज्या रोमन लोकांचा मागें पाय म्हणून कोठें कधींही आलाच नाहीं; ज्यांचें धैर्य असें अढळ कीं, केनीच्या मोठ्या लढाईत हानिबालानें त्यांचे बहुधा हातपायच मोडून टाकले असतांही जे यत्किंचित्ही न डगमगतां जो कोणी शत्रूस शरण जाण्याची मसलत काढील त्यास मारून टाकावें असा ज्यांनीं नियम केला, ज्या वीरांचा अद्भुत पराक्रम ऐकून इजिप्ट, हिंदुस्थान अशा दूरदूरच्या देशांतूनही त्यांकडे वकील येत; त्यांसच शेवटीं रानटी जे गॉल, व्यांडल, गॉथ, हून्स, आरब, तुर्क, अशा लोकांपुढें थरथरां कांपावें लागलें! असो; तर याप्रमाणें हें कालचक्र सतत फिरत आहे! याच्या सपाट्यांत कोणाचें काय होईल याचा काय नेम आहे! तेव्हां आमचे पूर्वज केवढेही थोर असले, व सध्यां आम्ही कितीही नीच पदवीस आलों असलों, तरी त्यांत चमत्कार कसचा? जी गति ग्रीक व रोमन लोकांसही चुकली नाहीं तीच हिंदूंसही प्राप्त झाली असल्यास नवल कसचें? याप्रमाणें सध्यांच्या पक्षीं मनाचें समाधान करून घेण्यास सवड झाली असती; आणि आमच्या पूर्वांच्या वैभवाकडे पाहून आमचा मान चोहोंकडे अद्याप असता! पण हें तरी कोठें आहे? आमच्या देशाविषयीं व आमच्या लोकांविषयीं एकंदर जगाच्या कशा समजुती आहेत त्या येथें विशेष सांगायला पाहिजेत असें नाहीं. मोठमोठ्या नामांकित इंग्रेज ग्रंथकारांच्या ग्रंथांत. हिंदुस्थानासंबंधीं कांहीं प्रकरण निघालें असतां, पार्लमेंट सभेंत, येशू ख्रिस्तानें वरद हस्त डोईवर

---

१. ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. मुसलमानांच्या संबंधानें 'रूमशाम' हा शब्दही आमच्यांत आला आहे. तुर्कस्थानच्या सुलतानास ते हा शब्द लावतात. तसेंच एका हिंदु चालीच्या कृत्रिम भूगोलावर 'रोमकपत्तनम्' असें नांव पाहिलेलें आम्हांस आठवतें!

ठेवून सर्वज्ञ केलेल्या मिशनरी लोकांच्या मोलवान भाषणांत, त्यांच्या प्रसादानें सर्वज्ञतेची झुळूक ज्यांच्यावरून गेली अशा येशूच्या कळपांत जाऊन फसलेल्या बिचाऱ्या बाळ्यांच्या दांभिक बोलण्यांत, किंवा ख्रिस्ताच्या शरीराचें व रक्ताचें भोजन पुरतेंच अर्धेमुर्धे मेंढे बनून कळपांत शिरलेल्या लबाड लांडग्यांच्या कपटव्याख्यानांत, वगैरे जिकडे तिकडे एक घोष ऐकूं येतो ! त्याचा सारांश हा कीं, आह्मांसारखे मूर्ख, वेडगळ, भित्रे, लबाड, दुराचारी असे आह्मीच ! इंग्लंडांत अगोदर हिंदुस्थानाचें नांव निघालें कीं, लोकांच्या कपाळास तिडीक उठते; पण त्यांतूनही आमच्या देशास आपल्या वास्तव्यानें भूषित करण्यास व आह्मांवर उपकार करण्याच्या बुद्धीनें जे कोणी इकडे येतात, ते येतांना मेकॉले साहेबांचे ' लॉर्ड क्लाइव ' 'वॉरन् हेस्टिंग्स् ' हे निबंध रेल्वे स्टेशनांवर विकत घेऊन वाचीत असतील ! साहेबांची वृत्ति मूळची सौम्य व ज्ञानही अगाध असतेंच; त्यांतून हे सुंदर निबंध वाचल्यावर तर हिंदुस्थानावर पाऊल ठेवतांच त्यांच्या मनांत अशा वृत्ति उद्भवत असतील:—' अहो ! क्लाइव व हेस्टिंग्स् यांस इतके श्रम तरी पडले ! मी असतों तर एका सपाट्यास साऱ्या हिंदूंस चीत करून दिलें असतें ! मी एक शब्द बोलेन तर त्यांचे सगळे ग्रंथ त्यांस कस्पटाप्रमाणें वाटवीन !' आह्मांस खचीत वाटतें कीं, मोठमोठ्या वरिष्ठ कामदारांपासून तों रेल्वेच्या यःकश्चित् गार्डांपर्यंत जो अरेरावपणा सर्वांत दृष्टीस पडतो तो इंग्रेज लोकांच्या अंगच्या उद्दामपणामुळें व त्यांचें हिंदुस्थानावर प्रभुत्व झालें आहे यामुळेंच केवळ आलेला नव्हे. हिंदु ह्मणजे काय कस्पटापेक्षां कस्पट, अधमांहून अधम, मूर्खांपेक्षां मूर्ख असे जे वेडगळ समज साऱ्या लोकांचे झाले आहेत, व जे अधिकाधिक दृढ करण्याविषयीं ज्याचा त्याचा यत्न चालू आहे, त्यांचें जर आमचे लोक खंडण करतील, आणि आपली योग्यता प्रकट करतील तर वरील दांडगेपणा बराच कमी होईल यांत संशय नाहीं. याविषयीं दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांची खात्री होईल. सर्व इतिहासज्ञांस, किंबहुना इकडील सर्व लोकांस, सर् जॉन् मालकम् साहेबांचें नांव ठाऊक असेलच. अव्वल इंग्रेजींत ज्या साहेबांचीं नांवें या प्रांतांत आबालवृद्धांस माहीत होतीं, व ज्यांवर एकंदर लोकांचाही लोभ जडला असे, त्यांत अल्पिष्टन्च्या खालोखाल सदर्हू मालकम् साहेबांचेंच नांव होतें. या भल्या साहेबानें आपणाविषयीं हा मजकूर लिहिला आहे—

" माझी स्वतःची एतद्देशीय लोकांविषयीं पहिल्यानें काय समजूत होती ती अजून मला आठवते,—व ती आठवली असतां माझी मला मोठी शरम वाटते ! ती अशी होती कीं, माझ्या हाताखालीं जे नेटिव कामगार आहेत ते माझ्यापेक्षां सर्व प्रकारें किती हलके आहेत ! असें मला बरेच दिवस वाटत असे; पण जसजसें येथील लोकांविषयीं व माझे स्वतःविषयीं मला अधिकाधिक कळूं लागलें तसतसा आमच्यामधील भेद कमी कमी होत गेला. आमचे इंग्रेज लोक आपल्या श्रेष्ठपणाचा मोठा डौल मिरवितात हें मीं पुष्कळ ठिकाणीं पाहिलें आहे व ऐकलेंही आहे, पण युरोपांतील व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रतीच्या लोकांची त्यांच्या त्यांच्या मानानें परस्पर तुलना केली; तर तिकडच्या लोकांस गर्व मिरविण्यास मोठेंसें कारण दिसेल असें वाटत नाहीं ! तसेंच सगळ्या हिंदूंविषयीं एकंदर सरसकट

चें मत ज्यांच्या त्यांच्या तोंडून ऐकूं येतें, कीं ते सारे लोक येथून तेथून लुचे, लबाड आहेत, त्यांची भल्यानें संगत करूं नये; आणि ते बुद्धीचे इतके मंद आहेत कीं विद्याभ्यासाच्या योगानें ज्यांचीं मनें विशाल व उदार झालीं अशा युरोपियन् लोकांच्या संभाषणास व स्नेहास ते अगदीं लायक नाहींत, हेंही मला बिलकूल मान्य नाहीं.[1] '

दुसरें उदाहरण कोलबूक नामक प्रख्यात संस्कृतज्ञाचें. आपल्या प्राचीन विद्येवर व्यासंग करून तिची माहिती युरोपांत ज्यांनीं करून दिली, त्या पंडितांच्या मालिकेंत याची गणना मोठी आहे. असें असतां याच साहेबाचे आर्षीचे उद्गार येथें दाखल केले असतां सर्वांस मोठा चमत्कार वाटेल; व ते पुनः वाचून कोलब्रूक साहेबास स्वतःही अनेक वेळां खचीत लाज वाटली असेल! ज्याची पुढें संस्कृतावर येवढी भक्ति जडली, व फारशी वगैरे भाषांशींही ज्यानें चांगला परिचय केला, त्यानेंच विल्किन्स् नामक संस्कृतज्ञास 'संस्कृताचें वेड डोक्यांत शिरलेला' असें म्हणावें. 'एशियाटिक मिसलेनि' म्हणून एक बंगाल्यांत पुस्तक काढीत असत त्यास 'वेडगळ मजकुराचें आगर', 'ऐन अकबरी' ग्रंथास 'हा नुसता उकिरडा आहे, यांत एकादें दुसरें मोतीं सांपडेल न सांपडेल' असें म्हणावें ही केवढी चमत्काराची गोष्ट! या दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांस स्पष्ट दिसून येईल कीं एकंदर जगास आमच्या देशाविषयीं यथार्थ ज्ञान बिलकूल नाहीं. तसेंच यावरून आह्मांस असेंही खचीत वाटतें कीं, जे जे युरोपियन् लोक येथें येऊन पुनः माघारीं गेले व जातात, त्यांच्या हिंदूं-विषयीं पहिल्या समजुतींत फारच तफावत पडत असेल! नाहीं अशी मेकॉलेसारख्या दुराग्रही व कोत्या मनाच्या लोकांची किंवा युरोपांतून शुभवर्तमान घेऊन येऊन तें बहुधा असेंचें तसेंच गुंडाळून माघारीं न्यावें लागल्यामुळें निराश झालेल्या मिशनरी लोकांची मात्र समजूत पालटत नसेल! मग हे सद्गृहस्थ तिकडे गेल्यावर आपलें सर्व पांडित्य हिंदूंवर खुशाल बिनधोक ओतीत असतील. तिकडे अगोदर हिंदुस्थानाविषयीं माहिती इतकी अबर कीं, शिंदा हिंदु कीं मुसलमान यांची भ्रांत, हैदर दिल्लीस राज्य करीत होता कीं त्रावण-कोरास करीत होता कोण जाणे! मुंबईस एखाद्यास पत्र लिहिलें असतां मद्रासेस व कल-कत्त्यास असणाऱ्या इष्टमित्रांचा समाचार त्यास पुसायाचा! केवळ नकाशाकडे पाहून किंवा इतिहासाच्या चार ओळी वाचून जी माहिती मिळायची तिची इतकी भ्रांत; मग अशा लोकांस हिंदुधर्माची, हिंदूंच्या विद्येची, त्यांच्या भाषांची वगैरे माहिती कितपत असेल हें सांगावयास नकोच! फार कशाला, अजूनही हा प्रकार थोडेंकडे दृष्टीस पडत नाहीं काय! संस्कृतामध्यें ओ का ठो करतां येत नसतांही हिंदुधर्माविषयीं सव्वासव्वा हात गप्पा झोंकणारे पाद्रीसाहेब कोणीं पाहिले नाहींत! 'पंचतंत्र' या महाग्रंथाचें अक्टोविकट अध्ययन करून खासे पी. एच्. डी बनून आलेले चारी वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें, यांत पारंगत झालेले श्वेतद्वीपीय व शर्मण्यदेशीय शास्त्री कोणास माहीत नाहींत! पण अंः यांत काय आहे! संस्कृतचसें काय, एशियाखंडांतील झाडून साऱ्या भाषांत ज्यांचा कोणी हात धरणारा

1. Brigge's Letters XXIII.

नाहीं असे 'पूर्वदेशीय भाषांचा बाणा बाळगणारे' ही युरोपांत तयार होऊन इकडे येत नाहींत काय ? त्यांस तुह्मी आरबी विचारा, फारशी विचारा, चिनी विचारा; सगळ्यांत तयारी ! प्रश्न करण्याचा अवकाश ! साहेबांची बुद्धि येथवर फांकली असल्यावर मग युनिव्हर्सिटींत मराठीचीं बुकें नेमीतांना 'विद्येपासून लाभ आणि संतोष ', ' ईश्वरी ज्ञान ' वगैरे लाखों ग्रंथ त्यांनीं निवडल्यास, किंवा 'दक्षिणा-प्रैज-कमिटी'कडे कसाही गद्यपद्यात्मक ग्रंथ येवो, त्यावर फाडकन् न्यायाच्या तराजूंत जोखलेलें मत साहेबांनीं दिल्यास आश्चर्य कोणतें ? वा: ! एकूण अक्कल हा जिन्नस हल्लींच्या काळीं युरोपखंडांत जितका रगड पिकतो तितका एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी कधीं कोठेंही पिकला नसेल ! ! हा देवानें आपल्या आवडत्या लोकांवर एकदम महाप्रसाद केला असेल, किंवा त्यांच्या पुत्रानें आपलें शुभवर्तमान भूमंडळावर फैलावलेंसें पाहून खुष होऊन आकाशांतून हें अपूर्व पारितोषिक पाठवून दिलें असेल कोण जाणे ! असो, तेव्हां सांगायचें काय कीं, असे अरण्यपंडित इंग्लंडांत गेल्यावर 'एरंडोऽपि द्रुमायते' या न्यायानें तेथें मोठी प्रतिष्ठा व विद्वत्तेबद्दल मान पावतात. मग काय, सांगतील ती पूर्वदिशा ! कोणत्याही लोकांस इतरांचा मोठेपणा व थोरवीचें वर्णन कधीं सहन होत नसतेंच; त्यांतून हिंदूंसारखे लोक, जे त्यांच्या सत्तेखालीं आलेले, त्यांचें वर्णन काय करावयाचें आहे ? वास्तव लोकांस हंसवायासाठीं व आपण किती थोर आहों हें त्यांस समजविण्यासाठीं हिंदूंचा जितका पाडाव करावा तितका इष्टच ! त्यांतून दुसरें काय झालें आहे कीं, हिंदूंचा फार प्राचीन काळापासून संपत्तीविषयीं, कलांविषयीं, विद्येविषयीं वगैरे मोठा लौकिक इतका कीं, युरोपांतील सर्व राष्ट्रें तिकडून आलेले अमोलिक जिन्नस पाहून हिंदुस्थानाविषयीं केवळ वेडीं होऊन गेलीं होतीं. कोलंबस अमेरिकेजवळील बेटांस जाऊन लागला, पण त्यास आपण हिंदुस्थानच शोधून काढला असें वाटून त्यानें त्यास तेंच नांव दिलें, तें अद्याप चालत आहे. तसेंच ग्रीक व रोमन लोकांतही आमच्या पूर्वजांची मोठी ख्याति होती असें त्यांच्या ग्रंथांवरून वगैरे दिसतें.[१] तेव्हां येवढ्या नामांकित लोकांचें नाक खालीं करून ते अत्यंत नीच आहेत हें दाखविलें ह्मणजे इंग्रज लोक मोठे थोर कसे नाहीं झाले ? अर्थांतच झाले ! ख्रिस्ती धर्माकरितां वेडे होऊन गेलेल्या मिशनरी लोकांनीं हिंदूंविषयीं एकंदरींत, व विशेषत: धर्माच्यासंबंधानें, हवी तितकी बडबड केली तरी ती त्यांच्या थोरपणास व त्यांच्या येशूच्या नांवास शोभते खरी; पण सत्याचा, न्यायाचा व विद्वत्तेचा बाणा बाळगणाऱ्या अशा मोठमोठ्या ग्रंथकारांनींही आमच्या देशाविषयीं झोटिंगपाच्छाहीचा

१ शिकंदर बादशहा हिंदुस्थानांत आला होता तेव्हां येथील लोकांचें ज्ञान व चातुर्य पाहून तो चकित झाला, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेंच अनेक ग्रीक व रोमन ग्रंथकारांनीं हिंदुस्थानाविषयीं लिहिलें असून येथील लोकांविषयीं त्यांच्या मनांत आदराची बुद्धि पुष्कळ वागत असावी असें दिसतें. पोप कवीनें 'टॅंपल् ऑफ् फेम' [कीर्तिमंदिर] या नांवाच्या काव्यांत पूर्वदेशीय विद्वत्समाजांत ब्राह्मणांस घातलें आहे:—

'—The sage Chaldeans robed in white appeared,
And Brahmans, deep in desert woods revered.

मजकूर लिहावा हा केवढा चमत्कार आहे ? मेकॉलेसाहेब मोठया तीव्र बुद्धीचा, बहुश्रुतपणाचा, रसिकतेचा व निःपक्षपातपणाचा बाणा मारीत असतां हिंदुस्थानाच्यासंबंधानें जेथें जेथें त्यांनीं कांहीं ह्मणून लिहिलें आहे, तेथें तेथें अत्यंत दुराग्रह-किंबहुना पोरकटपणाही-त्यांनीं प्रकट केला आहे. त्यांची माहिती केवढी जबर होती हें त्यांस दहा बारा भाषा येत होत्या यावरून व त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट दिसतेंच. दृष्टान्त देण्याविषयीं तर त्यांची हद्द होती. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांतून, अर्वाचीन युरोपांतील भाषांतल्या ग्रंथांतून, किंबहुना फारशी वगैरे इकडील ग्रंथांतूनही ते त्यांनीं प्रसंगवशात् दिले आहेत. पण नाहीं असा संस्कृतांतून ! त्यांच्या तडाक्यांतून आमच्या कालिदासाचें 'शाकुंतल' नाटक, कीं ज्याचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध होतांच श्लेजेल्, हंबोल्ड्, गेटी अशा महापंडितांस त्यानें गर्क करून टाकलें तें चुकलें असेल असें मुळींच संभवत नाहीं. त्यांतून साहेबमजकूर आमच्या देशांत तीन चार वर्षें येऊन राहिलेही होते. पण कांहीं नाहीं. फारशी ग्रंथांचा संबंध जसा त्यांनीं आपली माहिती दाखविण्याकरितां आपल्या ग्रंथांत कोठें कोठें आणला आहे, व फर्दोशी, शेक सादी वगैरे कवींचीं नांवें मोठ्या प्रेमानें आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं आणलीं आहेत, तशीं हिंदुकवींचीं मात्र बिलकूल कोठें नाहींत. आह्मांस खचीत वाटतें कीं, त्यांनीं 'शाकुंतला'चें भाषांतर जें एखादे वेळेस कधीं वाचलें असेल, तें त्यांचे बंधु जेम्स् मिल् इतिहासकार यांच्यासारखें घूकदृष्टीनेंच वाचलें असेल ! बरें, तें इतके दिवस बंगाल्यांत राहिले तेव्हां नंदकुमाराच्या देशबांधवांची वर्तणूक त्यांनीं 'वॉरन् हेस्टिंग्स्' या निबंधांत लिहिली आहे तशीच त्यांच्या नजरेस आली असेल काय ? ह्मणजे लहानापासून थोरापर्यंत सर्वच लबाड, ठक, मूर्ख असे त्यांस आढळले असतील काय ? तसेंच जेवढा टापू त्यांनीं पाहिला असेल तेवढ्यांत कोणत्याही संबंधानें चांगलें ह्मणण्यासारखें त्यांत कांहींच दिसलें नसेल ? काय असेल तें असो. गरीब बिचारा हिंदुस्थान ! त्याच्या धर्माची तर सर्वांनीं पायमल्ली करावीच—'टुमी हिंडु लोक' करणाऱ्या पाद्रीसाहेबापासून तों मोठ्या लाटसाहेबापर्यंत—त्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथकारानेंही एके ठिकाणीं आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें त्यावर वर्षाव केलाच आहे. त्याचा अंमळशानें उल्लेख करूं;—पण नवल पहा काय कीं, आमच्या देशाची संपत्तिही साहेबमजकुरांस सहन झाली नाहीं ! ! त्यांनीं वर सांगितलेल्या सर्वप्रसिद्ध निबंधांत असा मजकूर लिहिला आहे—" मोठ्या शहाण्या व्यापाऱ्यांसही हिंदुस्थानांतील संपत्तीचा मोठा भ्रम असे. त्यांच्या मनांत अशा वेड्या कल्पना घोळत कीं, हिंदुस्थानांत हिऱ्यांचीं जोतीं, रत्नांचे खांब, सोन्याचे वाडे असे आहेत; पण खरोखरी पहातां हा सगळा भ्रम होता. युरोपांत पोर्तुगाल देश, किंवा त्याहूनही ऐर्लंड देश भिकारी समजतात, पण हिंदुस्थान तर आयर्लंडाहूनही भिकारी आहे ! ! !" लॉर्डसाहेबांचें हें महावचन ऐकून आमचे वाचक खरोखर भांबावून जातील !—काय ? हिंदुस्थान आणि भिकारी !—वा: ! दिवसां ढवळ्या साऱ्या जगाच्या डोळ्यांत माती टाकण्याचें हें साहेबांचें धाडस त्यांचें त्यांसच शोभो ! हिंदुस्थान जर दरिद्री झाला तर मेकॉले साहेबांचा देश कशानें श्रीमंत झाला कोण जाणे ? शिशाच्या व कोळशांच्या खाणींनीं तर नाहींना ! कोणीं नाहीं ह्मणावें ? उद्यां मेकॉलेसाहेब

यांचे एखादे बंधु साऱ्या जगास कदाचित् जाहीर करतील कीं, 'अहो ! हिमालय विषयीं मोठ्या भूगोलवेत्त्यांसही मोठी भ्रांति आहे. आमच्या इंग्लंडांतील एखादें लहानसें टेंकाड त्यास उंचींत हटवून टाकील ! तसेंच गंगा, ब्रह्मपुत्रा यांची सारे लोक रिकामी बढाई सांगतात. आमच्या लंडनांतलें एखादें गटार पुढें होईल तर त्यांस मागें सारून देईल !'—जुलमी राजांनीं प्रजा चरकांतून पिळून काढल्यामुळें येथील लोकांस अगदीं त्राण उरलें नसतें असें जर आमच्या साहेबांचें ह्मणणें असेल, तर वरील वाक्य क्लैव, हेस्टिंग्स् अशांच्या देशबंधूस फारच नामी शोभतें ह्मणायाचें ! असो; या वरील मतावर आणखी विस्तार येथें करीत नाहीं; तें आमच्या वाचकांवरच आह्मी सोंपवून देतों. आतां वरील महाविद्वान् साहेबांचें आमच्या बिचाऱ्या धर्मावरील मत ऐका. सरकारानें प्रजेवर धर्माच्या बाबतींत सक्ती करावी कीं नाहीं असा विषय चालला असतां तदनुरोधानें मेकॉले साहेब हिंदुस्थानाविषयीं लिहितात—"परधर्म जबरीनें लोकांवर बसविला असतां जेथें त्यांचें अपरिमित कल्याण होईल असा देश हिंदुस्थानाखेरीज कदाचित् दुसरा कोठेंही सांपडणार नाहीं. तेथील धर्मासारखा नीचतेस पोंचलेला धर्म साऱ्या पृथ्वीवर कोठेंही नाहीं. त्याचा समूळ उच्छेद करून ख्रिस्ती धर्माचें अत्यंत हीन काळीं अत्यंत हीन जें स्वरूप कधीं कोठें चालू असेल तें त्याच्या जागीं आणून बसविलें असतांही त्या देशांतील लोकांचें आतोनात हित होणार आहे !"[1] वा: ! येथें तर आमच्या साहेबांनीं आपल्या सर्वज्ञतेची पराकाष्ठाच दाखविली ! आमच्या देशाकरितां राज्यसंबंधाचे कायदे करण्याच्या कामांत हे साहेब पुढारी होते, व सध्यां चोहोंकडे चालू असणारी शिक्षणपद्धतिही त्यांनींच घालून दिली, या डौलावर जाऊन आमच्या धर्मावरही ते घसरले नसतील ना ! वरील त्यांच्या लेखावरून पहातां हे साहेब येशूचे पुरे भक्त असून आमच्या धर्मांतला त्यांस खडान् खडा माहीत होता याविषयीं आह्मांस संशयच उरला नाहीं ! साहेबांचें लिहिणें कोठेंही पहा; तें अर्धबोबड्या मनुष्यासारखें अर्धेंमुर्धें कधीं नसायचेंच. त्यांतून हिंदुस्थानासारख्या देशाविषयीं तर तें अगदीं निक्षूनच असायाचें. त्यांची व त्यांच्या देशबंधूंची खात्रीच होऊन गेली आहे कीं, आमच्या देशाविषयीं कितीही वाईट लिहिलें तरी तें पुरें नाहींच होत ! मग कशाला कसर करा ? मानवी भाषेनें जेथवर ह्मणून निंदा व्यक्त करतां येते तेथवर तिचें सत्त्व बघून बिचाऱ्या हिंदुस्थानावर वर्षाव ! ही मजा ज्यास पुरतेपणीं पहायाची असेल त्यांनीं जेम्स् मिल्ल् साहेबांचा 'हिंदुस्थानचा इतिहास' पहावा. यांनीं तर इतिहास लिहिण्याची नवीच तऱ्हा जगांत प्रगट केली. इतिहासकार इंग्लंडांत; ज्याचा इतिहास लिहावयाचा तो देश सात आठ हजार कोस दूर; तेथील लोक काळे का गोरे कधीं पाहिले नाहींत; तेथील भाषांच्या ज्ञानाच्या नांवानें तर आंवळ्यायेवढेंच ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं; अशा थाटानें हे साहेब इतिहास रचावयास बसले. बरें, इतकेंही नाही ह्मटलें; येथील देशाची हकीकत ज्यांनीं लिहिली त्यांच्या लेखांवरच निर्वाह करून इतिहासकारानें आपलें बुद्धिकौशल्य योजून निदान निपक्षःपातबुद्धीनें खरा मजकूर तरी

1. '*Gladstone on Church and State.*'

लिहिला असेल ह्मणावें ! पण तसें तर बिलकूल नाहीं. स्वतः हिंदुस्थानाविषयीं माहिती तर मेकॉले साहेबांच्याच तोंडीची, तेव्हां दुसऱ्याचे लेख तर पाहायाला हवेच; पण खुबी काय करायाची ? जेवढें ह्मणून हिंदूंच्या विरुद्ध लिहिलेलें सांपडेल तितकें मात्र घ्यावयाचें; पण त्याच ग्रंथकारानें त्यांविषयीं जेवढा प्रशंसेचा मजकूर लिहिला असेल तेवढाच नेमका गाळायाचा ! येवढी सगळी सामग्री असल्यावर मग हा इतिहास किती उत्कृष्ट उतरला असेल हें सांगायास नकोच ! या थोर इंग्रेज इतिहासकाराच्या मनांत आमच्या हिंदुस्थानाविषयीं केवढी बळकट अढी होती ती थोडक्या उदाहरणांवरून वाचकांस कळवितों. सारें जग ज्यांस पाहून विस्मय पावतें अशा ढाकाच्या मलमली, आग्र्याचा ताजमहाल, कालिदासाचें 'शाकुंतल नाटक,' वेरुळचीं लेणीं, हीं सुद्धां साहेबांच्या पसंतीस उतरलीं नाहींत ! ! लेण्यांविषयीं त्यांनीं एक तर्क सुचविला आहे तो मोठ्या मौजेचा आहे. साहेबांची कल्पना अशी धांवते कीं, हीं लेणीं कदाचित् भुईंतूनच स्वयंभू वर निघालीं असतील किंवा आकाशांतील ढगांतून खालीं कोसळलीं असतील ! ! ! विलायती कल्पना खरी ! असो; तेव्हां असे दिव्य इतिहास वाचून एकंदर जग आमच्याविषयीं कल्पना बांधणार ! मग त्यांत आमच्याविषयीं त्या आतांप्रमाणें अत्यंत मूर्खत्वाच्या असल्यास नवल काय ?

२. पण वरच्याहूनही विशेष मूर्खपणाचा व लज्जेचा प्रकार अजून सांगणें आहे. तो कोणता, तर खुद्द आपल्याच देशांतला. हिंदुस्थानाशीं येवढा निकट संबंध झाला असतांही इंग्रेजांस, व तद्द्वारेंच काय तें इतरांस ज्ञान होणार यास्तव बाकीच्या एकंदर जगास, त्याविषयीं यथार्थ ज्ञान बिलकुल नाहीं यांत वास्तविक पहातां मोठेंसें आश्चर्य नाहीं. कारण आह्मांत व इंग्रेजांत हरएक गोष्टींत मनस्वी अंतर आहे. इंग्रेज तरवारीच्या जोरानें अरेराव झालेले, आह्मी हतवीर्य होऊन त्यांचे बंदे बनलेलों; आह्मी मूर्तिपूजक, ते मूर्तिभंजक; आह्मी फार झालें तर बायकांस बरोबरीनें वागविणारे, त्यांच्यांत तर मडमसाहेब ह्मणजे प्रतिदैवत; आह्मांस तर कीडमुंगीच्या हत्येनेंही अंगावर शहारा येणार, व प्राणांत ओढवला तरी मद्यास शिवणें नाहीं; त्यांच्यांत तर दोहोंसही मनाई नाहीं हें तर काय, पण दोनही पदार्थ अनुक्रमें करून त्यांच्या पैगंबराचें शरीर व रक्त मानले असून स्वर्गारोहणाची पहिली पायरीच होत; आमच्या स्त्रियांस परपुरुषाचें वारें सुद्धां पातिव्रत्य-भंजक; त्यांच्यांत हें तर काय, पण मोठ्या शृंगारवेषानें परक्याबरोबर नृत्य करणें हें अत्यंत प्रतिष्ठादायक ! या प्रमाणें हजारों गोष्टींत आह्मांत व इंग्रेजांत रात्रंदिसाचें अंतर असतां इंग्रेजांनीं आपल्या अत्युच्च पदापासून खालीं येऊन हिंदूंशीं स्नेह करावा व त्यांविषयीं यथार्थ ज्ञान संपादावें हें व्हावें कसें ? हें ज्ञान त्यांस क्रमाक्रमानें होत जाईल खरें; पण मिल्, मेकॉले, हे पुरते लबाड ठरण्यास आणखी शंभर दिडशें वर्षें तरी हवींत असें आह्मांस वाटतें ! तेव्हां मुसलमानांचा व आमचा जितपत हल्लीं स्नेहभाव झालेला दृष्टीस पडतो तितका कदाचित् आमचा व इंग्रेजांचा होईल. पण तेथपर्यंत वर लिहिल्यासारखीं मतें मोठे ज्ञाते ह्मणविणाऱ्या साहेबांच्याही मनांतून निघावाचीं नाहींत. तर याप्रमाणें परदेशस्थ लोकांच्या समजुती आमच्या

विषयीं कितीही वाईट असल्या, व कशाही हेकटपणाच्या असल्या तरी त्यांस सवड आहे; पण तशाच, किंबहुना त्याहूनही बेडगळ, अशा जर आपणच आपणांविषयीं वागवूं लागलों, तर मग केवढ्या आश्चर्याची गोष्ट ! आमची पुष्कळ दिवसांपासून पक्की खात्री होऊन गेली आहे कीं, इंग्रेज लोकांच्या अज्ञानानें व दुराग्रहानें, ख्रिस्ती भटांच्या मतलबी व हेकटपणाच्या उपदेशानें, त्यांच्या पुढें पुढें करणाऱ्या बाळ्यांच्या व लबाड शिष्यांच्या मूर्ख व्याख्यानांनीं, सुशिक्षित म्हणविणाऱ्या अर्धबोबड्या लोकांच्या पोकळ शब्दपांडित्यानें, एकंदर देशांत स्वतःविषयींच्या दुर्मताचें जें महाजाल चोहोंकडे पसरलें आहे, तें पार नाहींसें करून लोकांचीं मनें साफ दुरुस्त करणें म्हणजे ग्रीक लोकांच्या हर्क्युलीसानें ऑजियस् राजाच्या तबेल्यांत फार दिवस बिन्हाड करून राहिलेली लीद व घाण दोन नद्या धरून आंत सोडून जशी पार धुवून टाकली, तसेंच एखाद्या अचाट महावीरानें उठून येथें केल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं ! ज्या गोष्टी घडधडीत डोळ्यांपुढें जणों काय प्रत्यक्ष दिसणाऱ्या आहेत त्या सुद्धां नाहींशा म्हणून वरील लबाड व मूर्ख लोकांनीं पंचतंत्रांतील तीन धूर्तांच्या गोष्टीप्रमाणें आमच्या डोळ्यांत माती फेंकली आहे ! त्या धूर्तांनीं त्या भोळ्या ब्राह्मणास फसवून प्रत्यक्ष पशूवर जशी कुत्र्याची भ्रांति करविली, त्याप्रमाणें आमचे पूर्वज सर्व राष्ट्रांत अग्रगण्य असतां व साऱ्या जगाचे गुरु असतां त्यांच्या पदरीं या कुत्सित लोकांनीं बेडगळपणा व मूर्खपणा बांधला आहे. बरें, हेंही असो; पण प्रत्यक्ष आमच्या पदरीं हल्लींही ते मंदता, क्रूरता, भीरुत्व इत्यादि दोष बांधूं पाहत आहेत, तेव्हां त्यांच्या धाडसास काय म्हणावें ? युनिवर्सिटी स्थापन होऊन नुकतीं पंधरा सोळा वर्षें होताहेत तोंच ज्या लोकांत किताबी विद्वान् पैशापासरी या भोलानें विकूं लागले, ज्यांनी खुद्द विलायतेंतही बुद्धिमान् म्हणून नाक मिरविणाऱ्या लोकांचा पहिल्याच सपाट्यास त्यांच्याच भाषेंत नक्षा उतरविला, ज्यांच्यांत न्यूटन् सारख्या महापंडितांच्या ग्रंथावरही कोटि चालविणारे आढळतात, तेच लोक ' बुद्धिमंद असून विद्वान् युरोपियनांच्या संभाषणास व स्नेहास लायक नाहींत ! ! ' ज्यांच्यांत प्रत्यहीं लक्षावधि निरपराध प्राण्यांचा वध होत आहे, ज्यांच्यांत मद्याचा तर कधीं कोणीच निषेध केला नसून ज्यांची मगरूरी इतकी कीं, केवळ बोलतां बोलतां ज्यांनीं हातघाईस यावें, उन्मत्त पशूंप्रमाणें मोठे विद्वान् म्हणविणारांनींही द्वंद्वयुद्धें करावीं, ज्यांची सुधारलेली करमणूक म्हटली तर ' पिज्यन् शुटिंग् ' म्हणजे खबुतरांच्या करंड्याचें झांकण उघडें करून तीं बिचारीं पाखरें वर उडूं लागलीं असतां त्यांच्या नाजुक अंगांत छरे रोंवायाचे अशा प्रकारची, धर्माच्या कलहांत ज्यांनीं लक्षावधि लोकांचे प्राण घेतले, ज्यांच्या पवित्र शास्त्रानें अंगांत इतकी दया संचरते कीं, सगळें खंडचें खंड जी उजाड करण्यास प्रवृत्त करून मूर्तिपूजक काळ्या नीग्रो लोकांवर धाड घालून जनावरांप्रमाणें त्यांचा राजरोस विक्रय केला असतांही जीस बाध येत नाहीं, ताडावर चढणाऱ्या काळ्या माणसांचीं ज्यांच्या अपूर्व ज्ञानदृष्टीनें माकडें बनून जे त्यांवर छऱ्यांची सहज लीलेनें कृपा करतात, अशा अत्यंत सुशील, अत्यंत दयाळू, अत्यंत धार्मिक, ' एका गालावर मारली तर दुसरा गाल पुढें करणाऱ्या ' देवाच्या आवडत्या पवित्र लोकांपुढें आमच्या बिचाऱ्या हतभाग्य हिंदूंचा काय पाड ? तसेंच

आह्मी भेकड ! ! खरेंच, वसईच्या किल्ल्यावर भगवा झेंडा रोंवतांना भेदरलेल्या एखाद्या पेद्रूला[1], किंवा सुमारें शंभर वर्षांपूर्वी वडगांव मुक्कामीं दांतीं तृण धरायास लावलेल्या एखाद्या टोपीवाल्यास विचारलें असतें तर तो आमच्या: भेकडपणाचें फार फार छान वर्णन करता ! ! फार लांब नको; 'नाना' ह्मणतांच × × वर कांटा उभा राहिलेले अजूनही शूर साहेब शेंकडों सांपडतील ! असो, तेव्हां अशा धडधडीत सर्वांदेखतां झालेल्या व होणाऱ्या गोष्टीही ज्या दुरभिमानांध लोकांस दिसत नाहींत त्यांस काय ह्मणावें ? ही तर दुराग्रहाची व मूर्खत्वाची पराकाष्ठाच; पण जे आमचे लोक अशा फू करतां उडून जाणाऱ्या पोकळ शब्द-पांडित्यानेंही फसतात त्यांची तर केवढी बहादुरी ! आमच्या लोकांत सध्यां जर स्वतः-विषयीं समजुती पाहिल्या तर अशा आहेत—'अहो ! आह्मी कसचे लोक हो ! आह्मी कां शूर आहों, कां विद्वान् आहों, कां सदाचारी आहों, कां सद्धर्मी आहों ? आमचे पूर्वज तरी कसले ? त्यांनीं ग्रीक व रोमन लोकांप्रमाणें राज्यें काबीज केलीं, कां हल्लींच्या इंग्रेजांप्रमाणें आगगाड्या काढल्या, तारायंत्रें रोंवलीं, कां कलाकौशल्य वाढविलें ? काय केलें ? आमचा धर्म काय, आमचीं शास्त्रें काय, आमचें ज्ञान काय ! सगळें येथून तेथून वेडगळपणाचें ! या सर्वांचा जेव्हां समूळ उच्छेद होईल तेव्हां कोठें हिंदुस्थानास कांहीं सुधारणुकेची कळा येऊं लागेल !' पाद्री भटांनीं, मेकॉलेसारख्या लहान तोंडीं मोठा घांस घेणाऱ्या अप्रयोजक ग्रंथकारांनीं, स्वभाषा धेडगुजरी बोलूं लागण्यापुरतें किंवा गिचमीड फर्डेशाई सही करण्यापुरतेंच इंग्रेजीचें चुटपुटतें ज्ञान मिळवून तेवढ्यावरच मोठ्या पांडित्याचा आव घालणाऱ्या आमच्या आलीकडच्या नव्या विद्वानांच्या कोत्या समजुतींनीं, वगैरे जीं वरच्यासारखीं कुत्सित मतें चोहोंकडे माजविलीं आहेत त्यांचें पूर्ण खंडन केल्यास एक स्वतंत्र ग्रंथच बनेल; पण तसें करणें प्रस्तुत स्थलीं इष्ट नसून तें कोणत्याही सामान्य समजुतीच्या मनुष्यास मोठेंसें कठीण पडेल असेंही वाटत नाहीं; यास्तव त्यासंबंधें येथें कांहीं विशेष लिहीत नाहीं. आमच्या लोकांस इतकेंच सुचवितों कीं, केवळ स्वार्थसाधू मिशनरी लोकांच्या किंवा अजाणत्या हटवादी इंग्रेज ग्रंथकारांच्या ह्मणण्यावरून आपली पारख करून घेणें हें अप्रयोजकपणाचें व आपणांस अत्यंत लज्जास्पद असें कृत्य आहे. वरील साहसी लोकांचें अज्ञान व दुराग्रह त्यांच्या पदरांत घालून त्यांस चीप न बसवितां जर त्यांच्या अद्वातद्वा बडबडीस आपण उलटी मानच डोलवीत गेलों, तर मग आपण जसे शरीरानें परकी लोकांचे गुलाम झालों आहों तसेंच मनानेंही झालेले होऊं ! फार काय, पण आपले धनी इंग्रेज हे दुसरें मोठें स्वातंत्र्य जें आपणांस उदारपणानें देताहेत त्यासही आपण पात्र नाहीं असें होईल ! आपले दोष आपणांस जितके कळतील तितकें चांगलेंच, व ते जो कोणी आपणांस दाखवील तो मोठा दावेदारी असला तरी सुद्धां मनःपूर्वक अभार मानण्यासच तो योग्य होय, हें आह्मी पक्कें जाणतों; पण जो दुष्ट आमच्या सर्व गुणांसही

१. हा शब्द Pedro या फिरंगी शब्दापासून निघाला कीं काय कोण जाणे ? असला तर वरच्या प्रसंगीं कदाचित् निघाला असेल.

दोषांचें रूप देऊन व दोषांचें अत्युक्तीनें वर्णन करून आह्मी राक्षसतुल्य किंवा पशुतुल्य आहों असें जगास भासवूं पाहील त्याचे चांगले दांतच पाडणें आपणांस उचित आहे. पण तसें करण्याचें टाकून देऊन आपल्या स्वदेशाच्या निंदेंतच जर आपणांस पुरुषार्थ वाटूं लागला व त्या मूर्खांचे आपण उलटे साह्यकारी झालों, तर मग आपल्या सत्यनिष्ठेची व शहाणपणाची पराकाष्ठाच झाली असें ह्मटलें पाहिजे ! आमच्या विद्येविषयीं, आमच्या धर्माविषयीं, आमच्या इतिहासाविषयीं जर यथार्थ ज्ञान कोणास हवें असेल, तर तें त्यानें मेकॉलेपासून—ज्याचें इकडील भाषांचें ज्ञान येवढें अगाध होतें कीं, Ali-Nagor or Port of God असें आपल्या सर्वज्ञतेच्या घमेंडींत अप्रयोजक भाषांतर करून ज्यांनीं आपलें अज्ञान व धाडस साऱ्या जगास विदित मात्र केलें,—किंवा मुंबईच्या डॉक्टर विल्सन्-सारख्या हिंदु धर्माचें, मुसलमानी धर्माचें, पारशी धर्माचें, एका सपाट्यासरसें एकदम खंडन करून देण्याऱ्या अपूर्व विद्वान् मिशनरीपासून, किंवा मॉरिस्सारख्या छोटेखानी इतिहासकारापासून तें करून घेणें ह्मणजे आमच्या परसांत भाजी कोणती आहे किंवा तळघरांत भांडीं कोणतीं आहेत तीं समजून घेण्यास इंग्लंडांतल्या किंवा अमेरिकेंतल्या एखाद्या मोठ्या प्रसिद्ध भूगोलवेत्त्याकडे जाण्यासारखें हास्यास्पद होय ! ज्या इंग्लिश लोकांचा येवढा बाणा आहे कीं, त्यांच्या भाषेचा नुसता उच्चारही एका इंग्रेजाशिवाय दुसऱ्या कोणास—प्रत्यक्ष स्कॉटलंडांतल्या त्यांच्यांत हरहमेश वागलेल्या मनुष्यासही—साध्य नाहीं, त्यांसच येवढेंही कळत नाहीं कीं हजारों कोसांवरून दूर आह्मी हिंदूंच्या भाषांविषयीं, विद्येविषयीं, धर्माविषयीं, किंवा अत्यंत हृद्गत गोष्टींविषयींही बेधडक हवा तसा मजकूर लिहितों हें काय ! हा केवढा चमत्कार आहे ! आणि अशा पोरकट बडबडीसही जे आह्मी महाप्रसाद ह्मणून झेलतों त्या आमच्या शहाणपणाची तर किती तारीफ करावी !

३. गेलीं पंचवीस तीस वर्षे वरील लोकांनीं, विशेषतः मिशनरींनीं, बरेंच राज्य भोगलें. त्यांनीं ह्मणावी ती पूर्वदिशा होऊन त्यांच्या पोरकट गोष्टींनीं भरलेल्या पवित्र शुभवर्तमानाची बरीच चोहोंकडे भरभर झाली. येशूख्रिस्ताच्या कळपांत जरी महार, मांग वगैरे हीन जातींतले लोकच काय ते शारीर भुकेनेंच केवळ प्रेरित होतसाते शिरले, तरी एकंदर सुशिक्षित ह्मणविलेल्या लोकांच्या मनांत ख्रिस्ती धर्माविषयीं बराच अभाव होता. त्या धर्माविषयीं व तो आचरणाऱ्या सुधारलेल्या इंग्रेज लोकांविषयीं त्यांच्या ठायीं एकंदरींत मोठी आदराची बुद्धि वागत असे. इंग्रेजी ह्मटलें कीं त्यांत सर्व गुणांचा समावेश झाला. त्यांस इकडील सर्व गोष्टींची मोठी लाज वाटूं लागली. इंग्रेजीशिवाय तर पाणीही प्यावयाचें नाहीं, तितकें अनुकूल नसलें तर निदान मधून तरी इंग्रेजी शब्द बोलण्यांत जितके आणवतील तितके आणायाचे, निदानपक्षीं 'प्यारी', 'घोरा', 'गारव' अशी तरी इंग्रेजीची उगीच झांक दाखवायाची; मराठी विसरून गेल्यांत मोठी प्रतिष्ठा; गाडींत बसलें असतां कोच-मिळास स्वतःच्या पदवीस चढवून जातीनें सारथ्य, पाटलून, बूट वगैरे मिरविण्यांत कांहीं विलक्षण थोरपण; किंबहुना याहूनही निंदास्पद व लज्जास्पद दुसरे विलायतेकडून इकडे

आलेले ढंग करण्यांत मोठें भूषण;—इत्यादि प्रकार त्या वेळेस विशेष चालू असत. ते अजूनही अगदीं मोडले नाहींतच; पण ते आतां अंमळ जुने झाल्यामुळें व एकंदर लोकांत ज्ञान व समजूत हींही अंमळ जास्त वाढल्यानें, त्यांचें प्राबल्य आतां पहिल्यासारखें नाहीं. सुमारें आठ दहा वर्षांमागेंच इंग्रेजी या नांवाला जितका मान होता तितका आतां नाहीं. त्या वेळच्या पत्रांतून, पुस्तकांतून त्या वेळची स्थिति स्पष्ट दिसते. माजी मोरोबा कानोबा, स्मॉलकॉज कोर्टाचे जज्ज, यांनीं सुमारें दहा अकरा वर्षांपूर्वी 'घाशीराम कोतवाल' या नांवाची एक कादंबरी रचली होती; ती वर सांगितलेल्या पुस्तकाचाच एक मासला होता. हिचा सध्यां विशेष प्रचार नाहीं; तरी येवढ्या मोठ्या हुद्देदारानें ती केली असल्याबद्दल तिचें नांव अजून पुष्कळांस माहीत असेल. हींत हिंदूंस व विशेषतः महाराष्ट्राकडील लोकांस, रानटी, मूर्ख, वेडगळ असे दाखविण्याचा ग्रंथकाराचा उद्देश होता; व शहाणपणा काय तो इंग्रेजांत! फार तर काय, पण जे मुसलमान अजूनही अक्षरशून्य, मंद असे सर्वत्र प्रसिद्ध आहेत त्यांचें सुद्धां ज्ञान आपल्या लोकांपेक्षां विशेष दाखविलें आहे. ह्या कादंबरीवर (सदरील ग्रंथास येवढें नांव तरी केवळ मुरवतीस्तवच द्यावयाचें!) शालापत्रकांत[1] आमच्या एका कालेजकर मित्रानें फार नामी बरबरीत अशी एक टीका केली आहे; ती सर्व रसिक व देशाभिमानी अशा आमच्या वाचकांस लक्षपूर्वक वाचण्यास आह्मी शिफारस करतों. असो; अशाच प्रकारचें पण अंमळ निराळ्या तऱ्हेचें, असें दुसरेंही एक पुस्तक सहा सात वर्षांमागें प्रसिद्ध झालें आहे. तें 'पुण्याचें वर्णन' होय. हें पुस्तक पुष्कळांनीं वाचलें असेल; पण लिहिण्यास फार खेद वाटतो कीं, या महाविद्वान् व अत्यंत थोर ग्रंथकारांची जशी शोभा करणें हवी होती तशी कोणीं केली नाहीं! यांची विशेष माहिती आह्मांस बिलकूल नाहीं; पण त्यांच्या प्रस्तुतच्या ग्रंथावरूनच हे मिशनरी लोकांच्या हाताखालीं शिकले असून त्यांचा उपदेश मनांत पूर्ण बिंबलेल्या शिष्यवर्गापैकीं आहेत हें स्पष्ट दिसतें. असें गुरुमुख असल्याखेरीज 'बेबल्चा बुरूज;' सहा दिवस सतत खपून देवानें पृथ्वी घडली व सातव्या दिवशीं दमून विश्रांति घेतली; आमच्या आईबापांच्या तऱ्हेवाईक अपराधाबद्दल आह्मांस भलत्याच ठिकाणीं भयंकर दंड; नोहाच्या एका पोरानें आफ्रिकाखंड, दुसऱ्यानें युरोप, तिसऱ्यानें एशिया, अशीं तीन्ही खंडें तिघांनीं वसविलीं (अमेरिकेची व पासिफिक महासागरांतील बेटांची काय वाट झाली असेल ती असो!); पवित्र शास्त्रांतील देव सहाव्या दिवसाच्या शेवटीं खोरें कुदळ ठेवून जो निजला तो सार्वजनिक पुनरुत्थानाच्या दिवशीं पुन: उठणार, तोंवर सगळे पापपुण्याचे खटले तसेच तुंबवून ठेवून त्या एका दिवशीं फडाफड कोट्यानुकोटी मनुष्यांचा निवाडा आपण व आपला प्रिय पुत्र असे बापलेक मिळून करणार; तेव्हां देवाचे लाडके ख्रिस्ती लोक भराभर आपआपलीं थडगीं फोडून आयतेच बाहेर निघतील; (पण हिंदूंसारखे दहन पावलेले, पारशांसारखे गिधाड, घारी, यांच्या पोटांत राहिलेले, तसेच समुद्रांत बुडालेले, वाघांनीं वगैरे खाल्लेल्या लोकांची त्या वेळेस

[1] १ फेब्रुवारी १८६६.

'आकाशांतला बाप' काय तडजोड काढील ती काढो!) इत्यादि ख्रिस्त्या धर्मांचीं रहस्यें पुरतेपणीं कळून आमच्या ग्रंथकर्त्याच्या हृदयांत एरवीं येवढा प्रकाश कसा फांकता? सद्धर्माची येवढी बळकट प्रतीति घडली असतां येशूच्या शरीराचें व रक्ताचें पवित्र भोजन करून मोठ्या सुदैवानें हातीं लागलेलें खरें मौल्यवान् मोतीं, ते कां स्वीकारीत नाहींत कोण जाणे! तसें होऊन ते जर कोठें मेंढपाळ बनले असते, तर सांप्रत पुस्तकांत जो त्यांनीं जागोजाग चारगटपणा केला आहे तो त्यांस पुरतेपणीं शोभता, व ज्या हतभाग्य वाचकांकरतां त्यांनीं सद्धर्माचे विचार इतके भरपूर जिकडे तिकडे ओतून दिले आहेत त्यांच्या मनावरही ते कांहीं अंशीं तरी ठसते. पण तसें न झाल्यामुळें वाचकांस सहजच असा अंदेशा येतो, कीं आपल्या उपदेशकांस फसविल्याबद्दल त्यांचें कांहीं तरी समाधान करण्याकरतां, किंवा वर सांगितलेल्या भोजनाची मोकळीक त्यांच्या प्रसादानें आपणास मिळाली अशा कृतज्ञत्व-बुद्धीनें, अगर डॉक्टर् उईलसन् प्रभृति आपल्या सद्धर्मी आश्रयदात्यांस बरवेवर हंसवून त्यांनीं पुष्कळ प्रती घेतल्यासारखी त्यांची कांहीं तरी सेवा करावी, असे उद्देश मनांत धरून हे वर्णनकर्ते ग्रंथरचना करण्यास बसले असावे! कसेंही असो; पण हें अमोलिक पुस्तक वाचलें असतां एक मोठीच गोष्ट मनावर पक्की ठसते. ती ही कीं, ख्रिस्ती शास्त्राचें अध्ययन केलें असतां 'मोलवान मोतीं' हातीं लागून बाकीचे सर्व धर्म एकदम कस्पटासारखे भासूं लागतात. हा 'मोलवान' लाभ तर आहेच; पण बुद्धीची आतोनात तीव्रता प्राप्त होऊन सर्वज्ञतेचीही थोडी बहुत छाया मनुष्यावर पडते! राज्यव्यवस्थेचें, सैन्यव्यवस्थेचें, शहरच्या मांडणीचें वगैरे पूर्ण ज्ञान एकदम होऊन जिकडे पहावें तिकडे चुकाच चुका मनुष्याच्या नजरेस येऊं लागतात! अरेरे, काय थोड्यानें गेलें! पेशव्यांनी येवढें सैन्य ठेवायाची, येवढे गुणी लोक पदरीं बाळगायाची वगैरे व्यर्थ खटपट न करतां विलायतेहून एक दोन पाद्री जर आणवले असते, तर त्यांनीं असे दिव्य शिष्य तयार करून दिले असते कीं, त्यांच्या हातून फत्ते म्हणून झाल्याशिवाय राहिलीच नसती! एका चार पांच वर्षांत त्यांनीं त्यांस युद्धकलेंत, राजनीतीच्या कामांत, शहरांच्या बांधणीच्या कामांत वगैरे असे तरबेज केलें असतें कीं, त्यांनीं कोणाची मात्रा चालूं दिली नसती! नाहीं तर आतां पहा. पर्वतीचें तळें काय बांधलें आहे, ते साडेतीन शहाणे काय, त्यांच्या मसलती काय, पेशवे किती अप्रयोजक, 'अंगास तीन चिमट्या राख लावून पळालेंच तर कोणत्या उद्देशानें पळावें?' 'उघडे बोडकें होऊन पावसांत जाऊन वेड्यासारखें बसूं नये' येवढेंही त्यांस कळलें नाहीं!! असो; एकंदरींत आमच्या बिचाऱ्या पेशव्यांच्या राजधानीचें वर्णन करण्यास येवढ्या ख्रिस्तभक्ता-खेरीज दुसरा कोणी मिळाला नाहीं याचें आम्हांस फार वाईट वाटतें. तसेंच चमत्कारही असा वाटतो कीं, ज्यानें पांच सहा वर्षें या उद्योगामागें लागून येवढी जुनी माहिती मिळविली त्यानें पेशव्यांविषयीं, नानाफडनविसाविषयीं वगैरे प्रस्तुत ग्रंथांत दाखल केलेल्या पोरकट अप्रयोजक गोष्टींखेरीज दुसऱ्या कोणत्याच गोष्टी बिलकुल ऐकल्या नाहींत! पण आमच्या शहाण्या वर्णनकर्त्यास बहुधा असें वाटलें असावें कीं, स्वतः मूर्तिपूजक असून त्या अत्यंत घोर पापमार्गाचे पुरस्कर्ते असल्यामुळें पवित्र शास्त्राच्या वचनाप्रमाणें जे अक्षय नर-

काचे धनी झाले अशा महापातकी लोकांचें, तसेंच शेषाच्या मस्तकावर पृथ्वी, राहु केतु चंद्रसूर्यांचे वैरी, पृथ्वी स्थिर, सूर्य फिरणारा असें मानणाऱ्या महामूर्ख लोकांचें, काय वर्णन करावयाचें आहे ! हल्लींच्या काळचें एखादें पोर त्यांस ज्ञान शिकविण्यास समर्थ झालें असतें ! असें वाटून जगाचे खरे कल्याणकर्ते, अकटो विकट ज्ञानसंपन्न असे मिचेल साहेब, गार्डनर साहेब, व जोतीबा फुले प्रभृति त्यांचे सच्छिष्यमणि अशांच्या नांवांनीं आपल्या पुस्तकास पवित्र करून मधून मधून पवित्र शास्त्रांतील अति सुंदर ओंव्या ' बेबलच्या बुरुजा ' सारखे अत्यंत सरस दृष्टांत, आमच्या ग्रंथकारानें मोठ्या प्रेमानें मधेंमधें गोंवून दिले असावे ! असो; एकंदरींत हा ग्रंथ वाचला असतां मिशनरी लोकांच्या शिक्षणानें बुद्धि केवढी फांकते, सत्यनिष्ठा केवढी वाढते, वगैरे गोष्टी स्पष्ट दिसून येतात. तसेंच वरील दोन्ही ग्रंथांवरून इंग्रेजी विद्येचा फैलाव होऊन एकंदर लोकांच्या मनाची पोंच किती वाढली, व त्यांचें ज्ञान किती खोल आहे, याचा चांगला अजमास होतो !

४. येथवर जें वर लिहिण्यांत आलें आहे त्याचा चांगला विचार केला असतां आमच्या देशाच्या इतिहासाची एकंदर सर्व लोकांस व आमची आम्हांसच किती गोडी लागण्याचा संभव आहे हें सहजच लक्षांत येईल. उघड आहे; उद्यां जर एखाद्यानें मोठे परिश्रम करून नीग्रो लोकांचा इतिहास जगांत प्रसिद्ध केला तर तो घेणारे व वाचणारे किती मिळतील बरें ! वस्तुत: पहातां वरचाही दाखला अगदीं बरोबर आहे असें ह्मणतां येणार नाहीं. नीग्रो लोकांविषयीं सर्वांचा, व विशेषत: इंग्रेजांचा, जितका कळवळा आहे तितका त्यांशीं समवर्ण व एकंदर जगाच्या मतें त्यांच्याच योग्यतेचे असे जे आह्मी त्यांविषयीं आहे कीं नाहीं हें कोणालाही सांगायाला नको. ज्या पार्लमेंटानें नीग्रो लोकांच्या दास्यमुक्त्यर्थ कोट्यवधि रुपये खर्चले तींतच फॅसेट्, ब्राइट् या वक्त्यांच्या भाषणांचा किती जयजयकार होतो हें सर्वांस माहीत आहेच ! नामांकित कवि लॉर्ड बायरन् यांनीं त्याच सभेंत एक विनोदाचें भाषण केलें तें प्रकृत स्थलीं फार समर्पक आहे. ऐरिश लोकांच्या वतीनें कोणी सभासद तेथें भांडत असतां हे एकीकडे वळून आपल्या जवळच्या लोकांस ह्मणाले, " ह्या ऐरिश लोकांचा वर्ण गोरा आहे हें त्यांचें केवढें दुर्भाग्य आहे ! हेच जर काळे असते तर त्यांच्या मुक्त्यर्थ याच सभेनें केवढा खटाटोप केला असता ! " असो; तर याप्रमाणें साऱ्या जगांत अज्ञान, दुराचारी, वेडगळ ह्मणून जे निवडले गेले त्यांविषयीं माहिती कोण करून घेतो ? कोणी घेतलीच, तर मेकॉले, हॉल यांच्याप्रमाणें केवळ उपहास व तिरस्कार करण्याच्या बुद्धीनेंच घेतात ! मेकॉले साहेबांनीं ' लॉर्ड क्लाइव 'च्या आरंभीं वरच्याच गोष्टीविषयीं मोठें आश्चर्य दाखविलें आहे, व क्लाइव प्रभृति वीरांनीं येथें जे मोठमोठे पराक्रम केले ते कोणासही वाचावेसे कां वाटूं नयेत याचें कारण आह्मांस बिलकुल समजत नाहीं असें ते ह्मणतात. पण कारण उघडच आहे. त्यांनींच स्वत: आपल्या निबंधांत जर हिंदूंस परम नीच, परम दुर्बळ असे सिद्ध करून दाखविले आहेत, तर अशा तृणप्राय लोकांवर मोठे अद्भुत जय मिळविले ह्मणून नवल कसचें असें अर्थातच त्यांचे शहाणे देशबांधव समजत असतील ! आबिसिनियाची मोहीम, अशांटी लोकांची लढाई या जितक्या प्रेमानें लोक वाचतील तितक्याच प्रेमानें अर्थात् हिंदु-

स्थानचाही इतिहास वाचतील. आणि हा लोकांचा तिरस्कार त्यांच्या दोन्ही निबंधांनींही तिळमात्र तरी कमी झाला असेल असेंही पण आह्मांस वाटत नाहीं. असो; तर याप्रमाणें आमच्या देशाचा इतिहास परकी लोकांस केवळ तिरस्कारास्पद आहे. आणि आमच्या देशाच्या संबंधें त्यांचे स्वतःचे पराक्रम वाचण्याचीही जर त्यांस हौस वाटत नाहीं, तर खुद्द आमच्याच संबंधाचा इतिहास त्यांस किती रुचेल हें सांगायासही नको! हा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो. 'हिंदुस्थानचा इतिहास' असें ठळठळीत नांव वर घातलेल्या ग्रंथांतून बहुतेकांत खुद्द हिंदुस्थानाविषयीं किती माहिती असते हें सर्वांस ठाऊक असेलच! उदाहरणार्थ सध्यां चोहोंकडे चालू असणारा मॉरिस् साहेबांचा इतिहास पहा. या साहेबांनीं अगदीं मुळापासून तों तहत इ० सन १७३९ पर्यंतचा इतिहास सरासरी तीस पसतीस पानांत ओढून टाकून बाकीचा सर्व इंग्रेजांच्या मजकुरानें भरला आहे. पेशव्यांचें तर त्यांत बिलकुल नांव सुद्धां नाहीं, आणि ज्या मुसलमानी घराण्यांनीं हिंदुस्थानावर कित्येक वर्षें प्रभुत्व भोगलें त्यांची हकीकत कोणाची दोन ओळी, कोणाची चार ओळी देऊन मनुष्याचा आपल्या कीर्तीविषयींचा गर्व किती व्यर्थ आहे हें प्रकट केलें आहे! अकबराचा पन्नास वर्षांचा इतिहास एका पानांत भरला आहे. आमच्या शिवाजीची दशा तर कांहीं पुसूंच नये! तो चोर होता येथून आरंभ करून त्यानें केलेला प्रसिद्ध खून मात्र सविस्तर वर्णन केला आहे, आणि बाकीच्या गोष्टींची कल्पना करणें वाचकांवरच सोंपवून दिलें आहे. असा एकंदर मजकूर सुमारें दोन अडीच पानें आहे. पण तेवढ्यांत या विद्वान् इतिहासकारानें शंभर चुका केल्या आहेत! शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दहा वर्षें अगोदर ओढला आहे, अफजुलखानास तीन वर्षें उशीरानें मारविला आहे, संभाजीचा वध वगैरे गोष्टी शिवाजी जिवंत असतांच घडविल्या आहेत! बरें येवढी घाई व इतक्या चुका करून साहेब पुढें धांवले तरी कोठें? अर्थातच मेजर् लॅारेन्स, कर्नेल मॉनसन्, लेफ्टेनंट्—अशा महावीर्यशाली शूरांचे पोंवाडे गाण्यास! खरेंच, 'स्वजातिर्दुरतिक्रमा'! तेथें कोणाचा उपाय आहे!! परवां सहज 'पेनी सैक्लोपीडिया' नांवाच्या सर्वसंग्रहरूप ग्रंथांत मराठ्यांचा इतिहास कसा काय दिला आहे ह्मणून पाहिलें. तों कांहीं अपूर्वच माहिती मिळाली! बाळाजी विश्वनाथाचा पुत्र बाळाजी बाजीराव; धाकट्या माधवरावाचें खरें नांव शिवाजी माधवराव; त्याचा पुत्र दुसरा बाजीराव!!! कां, कशी ऋाशी माहिती आहे! पण इतकें कशाला, प्रत्यक्ष आमच्या युनिवर्सिटींतही हा प्रकार दृष्टीस पडतो. बी. ए. सारख्या परीक्षेस मराठ्यांच्या इतिहासावर असे प्रश्न असतात—'पेशव्यांची वंशावळी लिहा,' 'पानपतची लढाई केव्हां कोठें व कोणांमध्यें झाली? तिचे परिणाम काय झाले?'—केवढे जाड प्रश्न हे! आह्मांस खचीत वाटतें कीं, असे प्रश्न देणाऱ्या परीक्षकापेक्षां आमच्या मराठी शाळेंतल्या 'महाराष्ट्रदेश' शिकणाऱ्या मुलांस मराठ्यांच्या इतिहासाची माहिती पुष्कळ ज्यास्त असते. असो; तेव्हां एकंदरींत आमच्या देशाकडे इंग्रेजांचें फारच दुर्लक्ष व फारच तिरस्कार! मेकॉले साहेबांनीं आपल्या दोन निबंधांत जसें केलें आहे त्याप्रमाणें जेव्हां त्यांस हरबऱ्याच्या झाडावर चढवावें, तेव्हां एतद्देशीय इतिहासाचा वगैरे ग्रंथ त्यांस पहावासा वाटतो. आमच्या

एका कॉलेजबंधूनें पांच सहा वर्षांपूर्वी येथील 'यंग मेन्स् असोशिएशन्' (ही सभा अजून आहे कीं नाहीं हें बाहेरचे लोकांस सांगावाला नकोच! पुढें 'ग्रांट् डफ्कृत मराठ्यांच्या इतिहासावर टीका' या नांवाचा एक उत्कृष्ट निबंध वाचला, त्यांत त्यानें एका इंग्रेजी पत्रांतून घेतलेली सदर्हू साहेबांची हकीकत वाचली. ती तर आमच्या वरच्या लेखास फारच मजबुती आणते. तीत मराठ्यांच्या इतिहासकारास आपला ग्रंथ छापून बाहेर काढण्यास केवढा भगीरथ प्रयत्न पडला—किती छापखानवाल्यांचें आर्जव करावें लागलें, किती मोठमोठ्या लोकांच्या भिडा खर्ची घालाव्या लागल्या—हें सविस्तर लिहिलें आहे. या प्रसंगीचा मरे (छापखानेवाला) व डफ् यांचा संवाद मोठा लक्षांत ठेवण्यासारखा झाला. तो डफ् साहेबानें स्वतः असा लिहून ठेवला आहे—"त्यानें मला सांगितलें कीं, जर तुह्मी ग्रंथाचें नांव बदलाल तर आह्मी तो छापूं. मी ह्मटलें कीं, हा ग्रंथ मराठ्यांची बखर आहे, वास्तव 'मराठ्यांचा इतिहास' हेंच नांव त्यास योग्य आहे. तो ह्मणाला, तें खरें; परंतु मराठ्यांची यत्किंचित् तरी माहिती कोणास आहे! त्यास मी उत्तर दिलें, 'हें पुस्तक करण्याचें कारण काय तें तेंच; मराठ्यांची माहिती लोकांस फार थोडी आहे.' मरेनें उत्तर केलें, 'ठीक, तुह्मी ह्मणतां तें खरें आहे; पण माहिती असावी अशी तरी इच्छा कोणास आहे! तुह्मी या ग्रंथाचें नांव 'मोगलांचा पाडाव किंवा इंग्रेज लोकांचा उत्कर्ष' असें ठेवल्यास तें ठीक होईल. परंतु 'मराठ्यांची बखर!' छे, हें पुस्तक कोणी विकत घेणार नाही!' मरे साहेबांचें भाकीत अक्षरशः खरें झालें. हिंदुस्थान लुटून जे गब्बर झाले त्या कोर्ट ऑफ् डायरेक्टरसंच्या सभासदांनीच मुळीं बर्कीस प्रती घेतल्या. पण त्या पावल्याचें उत्तरही पाठविलें नाहीं. मग इतर लोकांत या बखरीचा किती खप झाला असेल हें सांगावयासच नको. डफ साहेब शेवटीं लिहितात, "हा जो मी येवढा खटाटोप केला त्यांत मला कवडीचाही फायदा न होतां उलट ११७०० पेक्षां ज्यास्ती रुपयांस मात्र मी बुडालों."

५. वरील गोष्टींवरून इंग्रजांस आमच्या देशाचें ज्ञान कितपत आहे व तें मिळविण्याची इच्छा तरी कितपत आहे हें आमच्या वाचकांस पुरतेपणीं कळल्यावांचून राहणार नाही. तरी त्याबद्दल त्यांस मोठेसें नांव आह्मांस ठेवतां येत नाहीं. ज्या त्या प्रकरणीं मोठी घमेंडी मारण्याची जी त्यांस संवय लागून गेली आहे, तिचा अप्रयोजकपणा वर दाखल केलेल्या गोष्टींवरून उघड दिसेल खरा; पण ज्या देशाशी ते अगदीं अपरिचित, जेथील रीतभात, भाषा, लोकांच्या समजुती वगैरे त्यांच्याहून फारच वेगळ्या त्याचा इतिहास वाचण्याची त्यांस गोडी कशी लागावी! 'अहिल्याबाई' 'माधवराव' हीं नांवें जशी आह्मांस गोड लागतात, तशीं 'Aila Bye,' 'Madhoo Rao'—ज्यांचा उच्चारही त्यांच्या भाषेनें होणें कठीण, व झाला तरी कानास कर्कश लागणारा,— हीं त्यांस तशीं न लागून त्यांचा त्यांस त्रास येत असल्यास नवल काय! असो, तर न्यूहॉलंडचा किंवा अमेरिकेचा इतिहास जसा आह्मांस तसाच आमचा इतिहास त्यांना होय; व वास्तव त्यांची त्यावर अप्रीति असल्यास त्यांत कांहीं विलक्षण नाहीं. पण हीच अप्रीति खुद्द आम-

च्यांत्च असल्यास मग तर काय ह्मणावें? आमच्या देशचे प्रख्यात वीर होऊन गेल्यास अजून शंभरही वर्षे होऊन गेलीं नाहींत–खुद्द आमच्या आमच्या आठवणींतही आमचें राजतेज शेव-टच्या धूमावस्थेंतून एकाएकीं प्रज्वलित होऊन त्याच्या प्रचंड लोळानें सगळ्या हिंदुस्थानास धाक दाखविला, व सगळें जग त्याकडे आश्चर्यानें स्तब्ध होत्सातें पाहत राहिलें! तरी आमची देश-प्रीति व बुद्धीची तीव्रता केवढी! आह्मी केवळ हवालदील होऊन एकमेकांस साशंक विचारतों! 'काय हो आह्मी कसचे लोक-किती भित्रे, केवढे भागूबाई, आह्मांस हवें त्यानें खुशाल तुडवावें! आमच्यांत वीर असे हाका मारायला झाले कधीं! आमचे वीर ह्मटले ह्मणजे बाजीरावासारखे बंदुकीच्या बाराला भिणारे! मेकॉले साहेबांनीं बकऱ्यांची उपमा आह्मांस दिली आहे तीं ठीक!!' वर शौर्याच्या संबंधानें आमच्या तर्कशास्त्राचे तारे तुटले! तसेंच प्रत्येक गोष्टीच्या संबंधानेंही हरहंमेश तुटत असतात! मेकॉले, मिल्‌, पाद्री साहेब यांच्या सुविचारांचें अखंड सेवन केल्यानें बुद्धींत आतोनात प्रकाश कोंदून तो वरील रूपानें लोककल्याणार्थ बाहेर पड-तांना पुष्कळांनीं पाहिला असेल; किंवा त्याचें स्थिर रूप कोणास पाहणें असल्यास तो हेतु मागें सांगितलेले दोन अनुपम ग्रंथ सहज पूर्ण करतील. एकंदर हिंदु लोकांचा थडक्यांत पराभव करून टाकून अल्पायासानें अरण्यपांडित्य ज्यास मिरविणें असेल त्यास वरील कोठारांत हवीं तितकीं अपूर्व शस्त्रास्त्रें सांपडतील! असो; उपाय काय? सांप्रतच्या स्थितींत जाळ्यांत अडकलेल्या वाघाप्रमाणें जो जो मानभंग होईल तो तो आमच्या देशास सोसणें भाग आहे. मेकॉलेच्या देशबांधवांची आमच्या काळ्या लोकांवर जशी सहज लीलेनें चाब-कांची, छऱ्यांची वगैरे कृपा होते, तशीच त्यांच्यासारख्या महापंडितांची आमच्या विद्यादिकां-वरही होते हें अनुरूपच आहे! अशांच्या फडेंशाईपुढें आमच्या बिचाऱ्या हिंदु लेखणीनें टिकाव धरावा हें मुळींच संभवत नाहीं; तरी तिच्या सपाट्यानें अगदीं गतप्राणच न होऊन ज्यांच्यांत अजून थोडी धुगधुगी तरी उरली असेल त्यांस जिववण्याचा यथाशक्ति यत्न करणें आह्मांस योग्य वाटतें. यास्तव आह्मी अशांस इतकेंच सांगणार कीं, बाबांनों! ज्यांच्यांत पाणिनि, वाल्मीकि, कालिदास, आर्यभट्ट, भास्कराचार्य, गदाधरभट्ट, वगैरे असंख्यात धेंडें निपजलीं, त्या लोकांची केवळ मूर्खांतच गणना करणें कठीण आहे. ज्यांच्यांत रामपांडवादिक नाहीं धरले तरी विक्रमादित्य, इतिहासप्रसिद्ध पोरस, शिवाजी, बाजीराव, यशवंतराव, रणजितसिंग, विजेच्या गतीनें सैन्यासहवर्तमान धांवणारा परवांचा शूर, असे तरवारबहाद्दर होऊन गेले ते केवळ 'मेंढ्या'च असतीलसें नाहीं; तसेंच ज्यांच्यांत तुकाराम, रामदास, किंवा रामशास्त्री, माधवराव असे निष्पाप महात्मे; व रमाबाई, अहल्याबाई, अशी भूतलास भूषित व पवित्र करणारीं स्त्रीरत्नें निर्माण झालीं, त्याच लोकांस अघोर, पातकी, दुराचारी, निर्दय ह्मणणें ह्मणजे शुद्ध दांडगाई आहे; आणि जो धर्म सर्वांत प्राचीन असून शंकराचार्यासारख्यांनीं ज्यांच्या रक्षणार्थ आपली बुद्धि खर्चली तो मेकॉले, रेवरेंड विलसन्‌ किंवा जोतीबांसारखे त्यांचे कल्याण, अशांच्या बडबडीनें व शुष्क तर्कांनीं ऱ्हास पावेल हें मुळींच संभवत नाहीं! वरील गोष्टी इतक्या धडधडीत स्पष्ट दिसत असतांही आमच्या लोकांस त्या आलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत; हें तर काय पण आपणांस अधिकाधिक

कुत्सित ह्मणून घेण्यांतच पुष्कळांस कांहीं विलक्षण प्रतिष्ठा वाटते. 'हिंदु' हा शब्द 'मूर्ख' शब्दाशीं केवळ समानार्थच होय असें ते समजतात, आणि त्यांतून जितकें सुटून जातां येईल तितकें जाण्याचा बहुतेकांचा प्रयत्न दृष्टीस पडतो. हा हिंदुत्वाचा द्वेष कित्येकांच्या-ठायीं इतका जागृत असतो कीं, पोषाक, रीतरिवाज, आचार वगैरे गोष्टींत सर्व प्रकारें इंग्रेजांचा नमुना उचलला असल्यामुळें त्यांच्या पूर्वस्थितीची एक मात्र काय ती मोठी खूण त्यांच्यांत राहिली असते—ती अर्थातच काळा रंग होय. हा जाण्याचा जर एखादा अपूर्व उपाय इंग्लिश लोक काढतील, तर आमच्या देशांत त्यांचे पुष्कळ नवे बंधु बनतील! असो. तर याप्रमाणें दिवसेंदिवस आमची स्थिति मोठी विलक्षण होत चालली आहे. आमची मूळची स्थिति तर आह्मांला नकोच; पिसें लावून थोरांच्या मंडळींत शिरूं पाहतों, पण ते तर आह्मांस नीग्रो, हॉटेंटॉट अशांच्याच पंक्तीस सरासरी बसवितात! चोहोंकडे इंग्रेजी माजल्यानें आमची भाषा आह्मांस येईनाशी झाली, देशाभिमान सहजच विगलित झाला,—कारण चांगलें ह्मणण्यासारखें आमच्यांत कांहींच नसून दोष ठेवण्यासारखेंच सारें पडलें, तेव्हां त्याचा अभिमान ह्मणजे दुरभिमानच होय!—धर्माची तर अशी लाज वाटूं लागली कीं, कांहीं बोलण्याची सोय नाहीं. तेव्हां एकंदरींत देश नाहीं, भाषा नाहीं, धर्म नाहीं, रीतरिवाज नाहीं, असें पोरकें राष्ट्र आह्मी सध्यांच्या स्थितींत झालों आहों! असें झाल्यामुळें जो कोणी पूर्वींच्या संबंधाचें कांहीं चांगलें ह्मणेल तो एक वेडगळ तरी असेल किंवा मूर्ख तरी असावा असा एकंदर लोकांचा ग्रह होऊन गेला आहे. वर 'मराठ्यांच्या इतिहासावर टीका' ह्मणून एका निबंधाचा आह्मीं उल्लेख केला; त्याचा त्या माजी सभेनें व एकंदर लोकांनी वर सांगितल्या प्रकारेंच आदर केला; ह्मणजे अशा निबंधांपासून तादृश कांहीं उपयोग नाहीं असा त्या ठिकाणींच लिहिणारास सभेचा अभिप्राय मिळून पुढें त्यानें तो छापला असतां आज सात वर्षें बहुधां जसाचा तसाच छापखान्यांत लोळत पडला आहे. पण इतक्यानेंच झालें नाहीं; ज्या रात्रीं तो वाचला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं 'ज्ञानप्रकाशांत' एकानें पत्र पाठवून सर्वांस कळविलें कीं, त्या निबंधांत कांहीं जीव नव्हता; आणि सभेंत अध्यक्षांनीं वगैरे जी त्याची कांहीं तारीफ केली तो सर्व प्रकार 'पंचतंत्रां'तील 'पूर्वं तावदहं मूर्खो......सर्वं वै मूर्खमंडलम्' असा झाला! असो; वरील गोष्टीवरून आपल्या इतिहासाची आमच्या लोकांस एकंदरींत किती गोडी आहे ती स्पष्ट दिसून येते. तसेंच आमच्यांत विद्वान् ह्मणविणारांसही त्याची किती माहिती असते व माहिती करून घेण्याची इच्छा तरी कितपत असते, तीही येथें विशेषतः सांगावयास पाहिजे असें नाहीं.

६. असो. प्रस्तुत निबंधांत ज्या विषयाचें विवेचन करावयाचें होतें त्याच्या नुसत्या प्रस्तावनेदाखलच सरासरी इतका मजकूर लिहावा लागला. आतां यापुढें मुख्य विषयावरच जर आणखी लिहूं लागलों, तर त्याचें जसें व्हावें तसें अध्ययन जरी अजून आमचें मुळींच झालें नाहीं, तरी सुद्धां पुष्कळ लिहिण्यास सांपडेल आणि हा विषय हिंदूंसच स्वतः झटला ह्मणजे मोठा मोहक पडला, यास्तव आरंभ केला असतां एकाएकीं तो सोडतां येणेंही कठीण.

पण आमच्या वाचकांस इतका लांब मजकूर वाचूनही अगोदर कदाचित् कंटाळाच आला असेल असें आह्मांस वाटतें; यास्तव इकडूनही पहातां सांप्रत विषय, येथेंच तसा तहकूब ठेवणें आह्मांस बरें वाटतें. या खेपेस आमच्या देशाविषयीं ज्यांपासून माहिती आह्मांस मिळते,—कीं, जी बहुधां 'बाबावाक्यं प्रमाणम्' या न्यायानेंच आपण गृहीत धरून चालतों,—त्यांस ती खरी मिळण्याचा संभव किती, व यास्तव ती आपण किती जपून मान्य केली पाहिजे, ही एक मोठी मुद्याची गोष्ट जर या अंकावरून आमच्या वाचकांच्या मनावर पक्की ठसेल, तर एक मोठीच गोष्ट मिळविलीशी होईल. तसेंच मनोरंजनांत आपल्या देशाचा इतिहास कोणत्याही दुसऱ्या देशाच्या इतिहासाहून उणा नाहीं हेंही जर या एकंदर निबंधावरून वाचकांच्या लक्षांत येईल, तर तेवढ्यानेंही तो लिहिल्याचा हेतु सफळ झालासें होईल. असो; तरी लिहावयाच्या एक दोन मोठ्याच गोष्टी राहिल्या; त्यांतील पहिली ही कीं, प्रस्तुतचे इंग्रेजी इतिहास फारच अपुरते असतात,–ह्मणजे संस्थानिक वृत्तांताखेरीज आमच्या विद्या, कला, स्थिति, रीति, वगैरेविषयीं त्यांत बिलकुल एक अक्षरही असत नाहीं. दुसरी ही कीं, आमच्या मराठींत इतिहास चांगला वाचण्याजोगा ह्मटला तर मुळींच नाहीं, व एकंदर लोकांत त्याविषयीं येवढें अज्ञान असण्याचें एक मोठें कारण तेंच आहे. यासारख्या आणखी दुसऱ्या कांहीं न्यूनता मागें एकदोन वेळां सांगितलेल्या 'ग्रांट् डफवर टीका' नांवाच्या निबंधांत चांगल्या रीतीनें दाखविल्या आहेत, त्या प्रस्तुत निबंधाच्या परिशेषार्थ वाचकांनीं पहाव्या. तसेंच मराठींतील विद्यमान इतिहासांवर शालापत्रकाच्याही एका अंकांत कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत तेही वाचण्यास आह्मी त्यांस शिफारस करतों. आतां सरते शेवटीं एकंदर लोकांस या विषयाच्या संबंधानें कांहीं सूचना करण्याजोग्या आहेत त्या येथें लिहून हा अंक पुरा करतों.

७. वर जें इतकें विवरण केलें त्यावरून आपल्या देशाचा इतिहास चांगला होऊन त्याची सर्वांस माहिती झाली असतां किती उपयोग होणार आहे हें सर्वांच्या ध्यानांत आलेंच असेल. यास्तव ज्यांस तशी माहिती मिळण्याचा संभव असेल त्यांनीं ती बुडूं न देतां तिचा संग्रह ठेवावा. आमचीं जुनीं लहान मोठीं राज्यें अजून साऱ्या देशभर पुष्कळ आहेत; तर त्यांचा स्वाहा जोंवर झाला नाहीं तोंवर तरी लोकांनीं सावध होऊन आपल्या लुकत्या होऊन गेलेल्या पराक्रमी पूर्वजांची येवढी तरी सेवा करावी. असें केलें असतां आपला देशाभिमान जागविलासा होऊन आपल्या वाडवडिलांचे उपकार

---

१. हा निबंध व मागें सांगितलेली 'घाशीराम कोतवाल'वर टीका हीं आमचे कॉलेजबंधु रा० रा० नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं रचिलीं. हे 'माधवराव पेशवे व जयपाळ' या सर्वमान्य नाटकाचे कर्ते रा० रा० विनायक जनार्दन कीर्तने यांचे धाकटे बंधु. यांची लिहिण्याची पद्धति तारीफ करण्यासारखी असून विषयाचें निरूपण प्रौढ व मार्मिक रीतीनें करण्याची यांची शैली उत्कृष्ट आहे. प्रस्तुत निबंधाच्या संबंधानें वरील दोन्ही लेख वाचले असतां वाचकांस हितावह होतील.

२. पुस्तक १२ अंक ५.

फेडलेसे होतील;—कारण त्यांची कीर्ति वाढवणें जर आपल्या हातून होत नाहीं, तर तिचें रक्षण करून ती बुडूं न देणें हें तरी आपण श्रेय घ्यावें; आणि हें पहिल्यापेक्षां पुष्कळ सोपेंही आहे हें उघड आहे. आतां हें कृत्य आपले सध्यांचे धनी इंग्रेज लोक यांच्या विरुद्ध केलेसें होईल, किंवा केलेसें ते समजतील, याविषयीं बिलकुल संशय धरण्यास जागा नाहीं. ते इतर संबंधानें कसेही असले, तरी येवढ्यांत तरी अत्यंत उदार आहेत. फार तर काय, पण त्यांनींच जर ही माहिती मिळवून ठेवली नसती, तर माधवराव काय, आणि बाळाजी विश्वनाथ काय, सर्व आतांपर्यंत आपणांस एकच होऊन गेलें असतें! शिवाय दुसरें असें कीं, अशी माहिती ग्रांट् डफ्, मालकम् अशांच्या ग्रंथांत कांहीं आहे खरी; पण ती केवळ राजकीय संबंधांची. पूर्वींची किरकोळ माहिती जागोजागच्या लोकांस जशी अजूनही असेल तशी सर्व अगोदर त्यांस कळली नसेल हें एक; आणि दुसरें, ती सर्व त्यांस आपापल्या ग्रंथांत घालतांही आली नाहीं. अशा माहितीचा वास्तविक निराळाच ग्रंथ असला पाहिजे, व 'पिक्टोरियल् ह्यांडबुक् ऑफ लंडन्' अशा तऱ्हेचे निराळेच ग्रंथ इंग्लंडांत वगैरे करतात. तसें आमच्या 'पुण्याच्या वर्णनां'त असेलसें पाहिल्याबरोबर सर्वांस वाटतें; पण ग्रंथकर्ते ब्राह्मण धर्माचे, व तेव्हां अर्थातच पेशव्यांचे वगैरेही शत्रु असल्यामुळें त्यांचें जिच्या योगानें गौरव होईल अशी एक सुद्धां गोष्ट त्यांनीं आपल्या ग्रंथांत दाखल केली नाहीं. फुलांतून मधमाशा मध काढतात, पण त्यांतूनच दुसरे किडे विष काढतात, याप्रमाणेंच त्यांनीं कृति केली! असो; येथें शेवटीं इतकेंच सुचवितों कीं, आमच्या मराठी शहरांची जर यापुढें अशींच कोणीं वर्णनें रचिलीं तर तें काम पुरें होईपर्यंत तो रचणारा मोठा भाविक ख्रिस्ती असला तरी त्यानें आपलें पवित्र शास्त्र तोंपर्यंत एकीकडे गुंडाळूनच ठेवावें! असो; तेव्हां आमच्या लोकांस यासंबंधानें हीच सूचना करावयाची कीं, अशी माहिती कितीही क्षुल्लक वाटली, तरी तिचा त्यांनीं नीट संग्रह करून ठेवावा; कां कीं, कधीं कधीं एखाद्या अशा क्षुल्लक गोष्टींतही असें तात्पर्य असेल कीं तिच्या योगानें कदाचित् इतिहासही फिरूं शकेल! त्यांतूनही नेटिव संस्थानांतून दप्तरी माहिती किंवा जुने लेख ज्यांपाशीं असतील त्यांनीं तर तीं फारच जपून ठेवावीं. अशा प्रकारचा उद्योग आमचे बंधु 'विविधज्ञानविस्तार' कर्ते यांनीं करण्याचें मनावर घेतलें होतें. पण लोकांच्या अज्ञानास्तव, हयगयीमुळें, किंवा वेड्या समजुतीमुळें त्यांस त्यांत फारसें कोणीं सहाय्य केलें नाहीं असें दिसतें. हा प्रकार अत्यंत शोचनीय होय. असो; याखेरीज जुन्या माहितीचा आणखी एक मार्ग सध्यां तादृश प्रसिद्ध नसणारे इंग्रेजी ग्रंथ होत. गेल्या शंभर दीडशें वर्षांत इकडे आलेल्या इंग्रेज लोकांनीं लिहून ठेवलेले पुष्कळ ग्रंथ आहेत, ते कधींमधीं दृष्टीस पडतात. त्या काळीं आपली स्थिति फार निराळ्या तऱ्हेची असल्यामुळें कित्येक तर इतके तल्लीन होऊन गेले होते कीं, त्यांचीं मूळचीं मतें जाऊन बहुतेक आमच्यासारखींच झालीं होतीं. अशांस सर् जेम्स् म्याकिंटाश् जे कांहीं दिवस मुंबईचे रेकॉर्डर (न्यायाधीश) होते त्यांनीं 'ब्राह्मण बनलेले युरोपियन'[1] असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. वास्तविक पाहतां यांत

1. 'Brahmanised Europeans.'

कांहीं आश्चर्य नाहीं. कां कीं, त्या काळीं हल्लींप्रमाणें ब्राह्मण्य हें रेल्वेच्या गार्डांच्या पायांवारीं जात नव्हतें; तर गजमस्तकारूढ झालेलें, किंवा अश्वारूढ होऊन शत्रूंवर गर्जणारें अशांपैकीं होतें! अजूनही वृद्ध लोकांच्या तोंडून जें आपण ऐकतों, कीं पहिले साहेब फार दयाळू असत, इकडच्या लोकांचा ते फार बोज ठेवीत, तें खोटें नव्हे. आतांप्रमाणें चुटपुटती विलायतेस परीक्षा देऊन व येतांना मेकॉलेचे दोन निबंध वाचून अरेराव होऊन आलेले ते नसत. त्यांस लोकांच्या अनुरोधानें वागणें पडे. असो; तर अशांच्या ग्रंथांत आपणांस अनुकूल असा पुष्कळ मजकूर सांपडतो. मालकम् साहेबाचा वर एक लेख लिहिला आहेच; व अहिल्याबाईचें त्यानें किती चरित्र मिळवून लिहून ठेवलें आहे तेंही बहुतेकांस विदित असेलच. तसेंच 'विविधज्ञानविस्तारा' च्या एका अंकांत स्कॉट् नामक एका ग्रंथकाराचा अफझुलखानाच्या वधाविषयींचा मजकूरही पुष्कळांनीं वाचला असेल. अजूनही हिंदूंचे पक्षपाती इंग्रेज लोक कित्येक सांपडतील. 'तारा,' 'सीता' 'ठगाची जबानी' या सर्वप्रसिद्ध ग्रंथांचे कर्ते क्याप्टन् मेडोज् टेलर् हे अशांत अग्रगण्य होत. यांनीं नुकताच एक हिंदुस्थानचा इतिहास स्वभाषेंत लिहून प्रसिद्ध केला आहे; त्यांत सर्व भागांचें यथास्थित विवरण केलें असून मॉरिस्, मेकॉले, मिल् यांच्यापेक्षां फार निराळ्या तऱ्हेचीं मतें त्यांत प्रदर्शित केलीं आहेत. अशाच तऱ्हेचे आणखी एक दोन लहान इतिहास अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. असो; तर गेल्या काळाविषयीं चमत्कारिक व खरी माहिती मिळण्याचा हा तिसरा मार्ग आहे. तर याप्रमाणें असत्यरूप व भ्रांतिरूप धुकें जें या देशभर आजपर्यंत पसरून राहिलें आहे त्याचें निरसन करून सत्यरूप सूर्याचा व ज्ञानाचा खरा उदय अजूनही व्हावा अशी आजची तर स्थिति आहे.

---

# भाषादूषण.

अहो कष्टं सापि प्रतिदिनमधोऽधः प्रविशति।[1] भर्तृहरि.

अंक ९—(१) विषयोपक्षेप. (२) दूषणाचें स्वरूप. (३) त्याचीं कारणें. (४) त्याचा प्रचार. (५) इंग्रेजांचा व आमचा आपापल्या भाषांविषयीं अभिमान. (६) भाषादूषणाच्या कैवाऱ्यांस उत्तर. (७) इंग्रेजांच्या अनुकरणाची मर्यादा. (८) परभाषेचें साह्य. (९) भाषादूषणाचीं उदाहरणें. (१०) शुद्धतेचें निश्चित प्रमाण.

प्रस्तुत मालेच्या पहिल्या अंकांत आमच्या मराठी भाषेची विद्यमान स्थिति कशी आहे तीविषयीं सामान्यतः लिहून इंग्रेजी भाषेच्या संसर्गानें तीस केवढा अपाय घडत आहे याविषयींही सामान्यतः लिहिलें होतें. व पुढील एखादे प्रसंगीं त्या विषयावर सविस्तर लिहिण्याचें तेथें आह्मीं सुचविलें होतें. त्याप्रमाणें या अंकांत लिहितों.

---

१. "अहा! काय सांगावें! तीही आतां दिवसानुदिवस लयास जात चालली!"

१. भाषेचें दूषण ह्मणजे तिचें खराब होणें. प्रस्तुत निबंधांत या दूषणाचें स्वरूप, त्याचें कारण, त्याचा प्रचार, इत्यादि सांगून शेवटीं त्याचीं ग्रंथांतून उदाहरणें दाखवूं. तसेंच त्याविषयीं लोकांचें मत एकंदर कसें आहे तेंही लिहून त्यापासून होणारे अनर्थ कळवूं.

२. आतां पहिल्यानें हें दूषण ह्मणजे काय ? तर अर्थातच आपल्या भाषेंत परभाषेंतील ह्मणजे प्रस्तुत प्रसंगीं इंग्रेजी भाषेंतील शब्दांचा अनिवार संकर होणें; व तिची मूळची रचना सुटून ती अगदीं परकी जी इंग्रेजी भाषा तिच्या धर्तीवर पडणें. वर इंग्रेजी भाषेंतील शब्द ह्मणून ह्मटलें त्याचा अर्थ केवळ अक्षरशः घ्यावयाचा नाहीं. तसा कांहीं अंशीं घ्याव-याचाच—कारण 'इष्टेट्,' 'इस्कूल,' 'पाइंट,' 'रजिष्टर' वगैरे पुष्कळ मंजूळ शब्द इतक्यांतच घरोघर होऊन बायकांपर्यंत व पोरांपर्यंत सुद्धां गेले आहेत! पण आमचा मुख्य रोख त्यांवर नव्हे. वरील शब्द कितीही मराठींत आले तरी त्यांपासून तीस तादृश भय नाहीं, एक तर ते बोलून चालून परकी पडले, तेव्हां त्यांस खुद्द मराठीच असें कोणी ह्मणणार नाहीं, व त्यांचीही तींत घुसण्याची इच्छा नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, त्यांतून कित्येकांचें मराठींत असणाऱ्या शब्दांनीं कामही होणारें नव्हे; यास्तव लांबलचक नवे शब्द जे उगाच श्रम घेऊन ओतून काढावे, त्यापेक्षां हेच कां असेनात ? इंग्रेजांस जर आमचे Khutput, bandobast, pacca, ghee, असे शब्द चालतात, तर आह्मांसही 'बुक,' 'टेबल,' 'नाटपेड' वगैरे शब्द खुशाल चालवून घेतां येतील. पण या शब्दांविषयीं आह्मांस विशेषतः बोलणें नाहीं. तर जे धड इंग्रेजी नव्हेत धड मराठी नव्हेत; ज्यांचा अर्थ इंग्रेजी आणि उच्चार मराठी; असे अर्धे कच्चे मराठींत उतरलेले जे शेंकडों शब्द सध्यां मोठाल्या ग्रंथांतून, मासिक पुस्तकांतून, वर्तमानपत्रांतून, हजारों नवीन तरुण लोकांच्या भाषणांत हमेश आढ-ळतात अशा शब्दांवर आमचें मुख्यतः धोरण आहे. पण इतकेंच नव्हे. नुसते निरनिराळे शब्दच असे अर्धजातीय असतात असें नाहीं, तर एकंदर वाक्याची, किंबहुना एकंदर ग्रंथाची, रचनाही शुद्ध इंग्रेजीच असते. ह्मणजे लिपि पाहिली तर मराठी, अक्षरांचा उच्चार मराठीसारखाच, पण अर्थ पाहूं जावें तो अर्धामुर्धा कळतो, किंवा कधीं कधीं मुळींच कळत नाहीं. कायद्याचीं जीं मराठींत कांहीं पुस्तकें झालीं आहेत त्यांची मौज पुष्कळांस अनुभवा-वरून किंवा निदान ऐकून तरी माहीत असेलच ! त्यांतील भाषांतर इतकें सुरेख झालें असतें कीं, कोठें कोठें तें समजण्यास फार जड जातें इतकेंच नव्हे; तर जेथें अर्थ काढण्याची अतिशय मुष्कील पडते तेथें मूळचें इंग्रेजी जेव्हां कोणापासून समजून घ्यावें तेव्हां अर्थ उकलतो ! आमच्यांत असे फर्डे बोलणारे शेंकडों सांपडतील कीं, त्यांच्या बोलण्याचा अर्थ पुनः नीट मराठींतच करण्यास दुभाष्या ठेवल्यावांचून सोय नाहीं. खरेंच, ज्यांनीं अष्टौप्रहर इंग्रेजीचा ध्यास घेऊन तीस केवळ आपलीशी करून टाकली, ज्यांच्या जिव्हाग्रीं त्या भाषेनें सतत वास करावा, तिच्या प्रसादेंकरून ज्यांचें मन सुप्रकाशित झाल्यामुळें एका हाड काळ्या रंगाखेरीज त्यांच्या ठायीं इकडचा ह्मणून दुसरा मागमूसही उरला नाहीं, त्यांच्या हातीं मराठी पुस्तक किंवा वर्तमानपत्र दृष्टीस पडलें, किंवा एक शुद्ध मराठी वाक्य त्यांच्या तोंडून

निघालें, तर मग राहिलें काय ? त्यांच्या इंग्रेजी ज्ञानास कलंक लागला नाहीं काय ? असो; वरील समजूत केवढी थोर आहे याविषयीं येथें वाद करण्याचें प्रयोजन नाहीं. इंग्रेजींत थोडीबहुत गति होतांच पाद्रींच्यासारखें किंवा बाट्यासारखें धेडगुजरी बोलण्यांत ज्यांस प्रतिष्ठा वाटत असेल त्यांस वाटो; आम्हांस तर हा प्रकार मूर्खतेचा व अत्यंत लज्जास्पद असा वाटतो.

३. आतां हें भाषादूषण जें चोहोंकडे येवढें फैलावलें आहे कीं कांहीं थोड्या नामांकित ग्रंथकारांखेरीज जें बाकी सर्वांच्या ग्रंथांत थोडें बहुत तरी आढळतेंच, मराठी भाषेच्या अभिवृद्धीस साह्य व्हावें, म्हणून चालू केलेल्या मासिक पुस्तकांसही जें सर्वथा सोडीत नाहीं, वर्तमानपत्रांस तर बहुधां ज्याची फारशी पर्वाही वाटत नाहीं, नवीन इंग्रेजी विद्वानांच्या भाषणांत व व्याख्यानांत तर जें प्रत्यक्ष मूर्तिमंत जणों काय उभेंच असतें, तें उत्पन्न तरी कशापासून झालें, व त्याचा येवढा प्रचार कसा होत गेला याविषयीं थोडासा विचार करूं. पहिल्या दोन अंकांत लिहिल्याप्रमाणें इंग्रेजी भाषेचा सार्वत्रिक अभ्यास त्यास कारण झाला हें एक उघडच आहे. पण हेंच काय तें एक कारण झालें असें ह्मणतां येत नाहीं. दुसऱ्या भाषेचा पुष्कळ प्रचार झाला कीं पहिली अगदीं बिघडून जावीच असें जर असतें, तर ज्या भाषेनें आमच्या भाषेची दुर्दशा करून टाकली तिचीच आजपर्यंत कांहीं विलक्षण स्थिति झाली असती ! गेल्या दोनतीनशें वर्षांत ग्रीक व ल्याटिन भाषांचा प्रचार इंग्लंडांत अतोनात झाला आहे; फ्रेंच, इटालियन वगैरे अर्वाचीन भाषाही नेहेमीच्या दळणवळणाच्या योगानें तेथील लोकांस पुष्कळ परिचित आहेत; बाकीच्या युरोपियन भाषाही व्यापाराच्या वगैरे संबंधानें पुष्कळांस माहीत असतात; फार तर काय पण वरील व्यापाराच्याच संबंधानें ज्यांतले शब्द इंग्रेजींत आले नाहींत अशा भाषा साऱ्या पृथ्वीवर थोड्याच असतील. बरें, मग एका इंग्रेजीनेंच जर आमच्या मराठीची येवढी हैराणगत करून सोडली, तर वरच्यासारख्या तडाक्यांत ती सांपडली असतां तिची काय अवस्था होऊन जाईल कोण जाणे ! असो. तर परभाषेचा केवळ संसर्गच मराठी भाषेस बाधक झाला असें ह्मणतां येत नाहीं. तिच्या दुर्दशेचें खरें कारण वरच्या वाक्यांतच गर्भित होतें. तें काय ? तर अर्थातच आपल्या लोकांच्या मनांत तिजविषयीं मुळींच अभिमान नसणें हें होय. जे आमचे लोक विलायतेस गेले कीं तेथें डोळे चक्क होऊन आपल्या देशाची बहुतेक आठवणही विसरून जातात, आणि निरुपायास्तव पुनः माघारी आले असतां येथील सर्व गोष्टींची त्यांस लाज वाटूं लागते, त्यांसच इंग्रेजी भाषेचें ज्ञान झालें असतां मराठीची सर्वोपरी लाज वाटूं लागावी हें अनुरूपच आहे ! त्यांस साहेबी तुमान, साहेबी बूट, साहेबी डगला, साहेबी दाढी यांचा वियोग जसा केवळ दुःसह होतो, त्याप्रमाणेंच यांसही विलायती शब्द, विलायती वाक्यरचना यांचा सहसा त्याग करवत नाहीं. पण इंग्रेज पहा ! त्यांचें भ्रमण साऱ्या जगभर आहे, हव्या तेवढ्या उलाढाली त्यांच्या जेथें तेथें चालल्या आहेत; पण आपल्या देशास माघारी आले कीं, पुनः इंग्रेजचे इंग्रेजच ! त्याचप्रमाणें इतक्या भाषा इंग्रेजीशीं मिसळल्या असतांही ती कायमची कायमच ! असो; तर ज्या अभिमानहीनतेनें व इतर प्रकारांनीं एकंदर देशाची दुर्दशा होऊन गेली आहे, तीमुळेंच आमच्या भाषेचीही अशी दशा झाली आहे. तिसरें कारण उपेक्षा

किंबहुना तिरस्कारही ह्मटला असतां चालेल. ज्या गोष्टीविषयीं आपणांस लवलेशही अभिमान नसतो तिजविषयीं उपेक्षेची किंवा तिरस्काराचीही बुद्धि मनांत वागत असल्यास कांहीं नवल नाहीं. असाच आमच्या लोकांचाही प्रकार आहे. त्यांस मराठी भाषेविषयीं केवढी कळकळ आहे हें त्या भाषेंत ग्रंथ करून ज्यांनी प्रसिद्ध केले असतील त्यांच्या अनुभवास बहुतकरून पक्केपणीं आलें असेल. तसेंच ग्रंथाची पारखही त्यांस मोठी उत्तमच आहे असें ह्मटलें पाहिजे. हल्लीं पुस्तकांचा जो खप होतो तो तादृश त्यांच्या गुणांवरून होतो असें नाहीं, तर आर्जव व शिफारस यांनी एरवीं जशीं कामें होतात तसेंच येथेंही चालतें. सर्व लोकांच्या आश्रयास पात्र असून केरांत पडलेलीं पुस्तकें आह्मांस पुष्कळ दाखवितां येतील, व तसाच त्याच्या उलटही प्रकार दाखविण्यास कांहीं कठिण पडणार नाहीं. मोठी उठाठेव करून लोकहितार्थ श्रम केले असतांही त्याप्रमाणें प्राप्ति तर कांहीं झाली नाहीं, पण उलटा भुर्दंड भरावा लागला असे हतभाग्य ग्रंथकार आह्मांमध्यें थोडे थोडके असतीलसें नाहीं. एकच सर्वप्रसिद्ध उदाहरण घेतों. ' राणीचें पुस्तक ' ह्मणून एक ग्रंथ सुमारें तीन चार वर्षांमागें प्रसिद्ध झाला तो सर्वांस माहीत असेलच. तें त्यांचें गोड नांव, सोनेरी पुट्टा, ग्रंथार्पणपत्र, मधून मधून नामी चित्रें; शेवटीं बड्या बड्या आश्रयदात्यांच्या नांवाची लांब मालिका, हीं सर्व पाहिलीं असतां डोळे दिपून जाऊन एखाद्या बड्या दरबाराची आठवण होते. पण आंत वाचूं लागावें तों मजकूर काय, ती भाषापद्धति काय, कविता काय, बडा दरबार पाहून डोळे वक्र झाल्यावर बड्या स्टार् ऑफ् इंडियांचीं, बड्या खानबहादुरांचीं भाषणें ऐकून अंतःकरण जितकें गार होऊन जातें, तितकेंच वरील मजकुरानें होतें. एवढा थाटमाट ज्या पुस्तकाचा त्याचा आदर केवढा झाला असेल तें वाचकांनींच मनांत आणावें, ' राणीचें पुस्तक ' ! मग काय, साऱ्या जगास व त्यांत हिंदुस्थानास तें सर्वोपरी वंद्य झालें ! आतां याच्याच उलट दुसरा प्रकार पहा. ' सर्वसंग्रह ' नांवाचें एक अत्यंत उपयुक्त मासिक पुस्तक सुमारें सहा सात वर्षे चालून तें बंद झाल्यास आज तितकींच वर्षे झालीं. तें आजपर्यंत चाललें असतें तर आपल्या मराठी कवींच्या सर्व ग्रंथांचा बहुधा जीर्णोद्धार झाला असता; आणि त्या पुस्तककाराचा येवढा खर्च, मेहनत व आस्था यांचें चीज झालें असतें. येवढा उद्योग पुनः उभा रहाणें परम दुर्घटच; पण त्यांतून जरी यथाकथंचित् यापुढें तो राहिलाच, तरी तुकत्या कांहीं दिवसांपर्यंत जें त्यास अत्युत्तम साहाय्य होण्यासारखें होतें तेंही आतां समूळ नाहींसें झालें. वरील शब्द आमच्या साऱ्या वाचकांस लवकर समजतीलसें वाटत नाहीं, यास्तव त्यांच्या स्पष्टीकरणार्थ येथें सांगतों कीं, थोड्या दिवसांमागें कैलासवासी झालेले रा॰ रा॰ परशुरामपंततात्या गोडबोले, ज्यांच्या विद्वत्तेस्तव, सुस्वभावास्तव व मराठी भाषेवर आणि कवितेवर जे त्यांनीं मोठे उपकार करून ठेवले आहेत त्यांस्तव वरील गोष्ट ऐकून सर्व हळहळले असतील, ते वरील 'सर्वसंग्रहा'चें काम करीत असत. या कामास यांच्या इतका वाकबगार पुरुष दुसरा कोणी नव्हता हें सर्वांस माहीत आहेच; व याचें कारण मराठी कवितेचाच सर्व जन्मभर त्यांनीं मुख्यत्वें व्यासंग केला होता हें होय. यांनीं तिच्या प्रीत्यर्थ जे श्रम केले ते जर केले नसते तर मराठी कवितेचें ज्ञान आमच्या लोकांस आज कितपत असतें याचा मोठा संशयच वाटतो.

असो; तर इत:पर या उद्योगाचे बहुतेक हातपायच मोडले असें ह्मणण्यास चिंता नाहीं. *सेलर हौस, †सोन्याच्या तोफा वगैरे कीर्तिदायक कृत्यांकडे जो पैसा खर्च झाला त्याच्या एका सहस्रांशानें वरील पुस्तकाचा इष्ट हेतु सिद्धीस गेला असता, व देशावर फार मोठे उपकार झाले असते. पण आतां बोलून उपयोग काय? गोष्ट गेली ती गेली! अशा उत्कृष्ट पुस्तकाचा सरकारानें आपला आश्रय तोडला हें त्यांस कितीही भूषणार्ह असो, पण एकंदर लोकांच्या समंजसतेस, रसिकतेस आणि उदारत्वास हें चिरकाळ लांछन लागून गेलें यांत संशय नाहीं! असो; तर याप्रमाणें वशिल्याचा आणि आर्जवाचा या जगांत कांहीं विलक्षण जोर चालतो! एरवीं अगदीं नादान असणारें पुस्तक सर्वांच्या आश्रयास पात्र होतें, आणि खरोखरी जें अत्यंत उपयोगाचें व सर्वांच्या आश्रयास पात्र त्यास कोणी वर डोकेंही काढूं देत नाहीं. असो; तर चांगल्या ग्रंथांचीही अत्यंत शोचनीय उपेक्षा आणि तिरस्कार हे आपल्या भाषेची येवढी खराबी होण्याचें तिसरें कारण होय.

४. आतां या भाषादूषणाचे निरनिराळे कसे प्रकार आहेत ते दाखवितों. हे मुख्यत: तीन आहेत. पाहिला प्रकार ह्मटला ह्मणजे चांगले शुद्ध मराठी शब्द, पण त्यांस इंग्रेजीचें स्वरूप दिलेलें—जसें, 'ग्रंथकाराच्या विद्वत्तेची हा ग्रंथ साक्ष देत आहे,' 'मी आपले विचार सभेपुढें ठेवतों अ॰ मांडतों,' 'त्याच्या भाषणाचा ठसा सर्वांवर उठला,' 'हा निराळा प्रश्न आहे,' 'परीक्षेचा परिणाम,' 'मुलांचें भक्ष्य' इत्यादि. दुसरा प्रकार संस्कृत शब्द, पण त्यांचा मूळचा अर्थ सोडून देऊन भलत्याच रीतीनें त्यांचा प्रयोग केलेला—जसें, 'स्वकपोलकल्पित ग्रंथ,' 'तूं त्यांजवर कां नेहमीं अवलंबून राहतोस?' 'निरुपद्रवी' इत्यादि. तिसरा प्रकार नवेच बनवलेले संस्कृत शब्द—जसें, 'साल्हादाश्चर्य,' 'महत्त्वाकांक्षा,' 'आईबापांशीं आज्ञाधारकपणानें वागावें हें मुलांचें मुख्य कर्तव्यकर्म आहे,' इत्यादि. हे तिसऱ्या प्रकारचे शब्द

---

* सेलर हौस:—[ Sailors' Home. ]

मुंबईस अपोलो बंदराकडे जातांना डाव्या बाजूस एक भव्य दगडी पश्चिमाभिमुख इमारत आहे. हिच्या पायाचा दगड प्रथम हॉर्नबी रोडवर ड्यूक ऑफ् एडिंबरो यांच्या हस्तें बसविला होता. पण पुढें तो तेथून काढून हल्लींच्या ठिकाणीं आणून, बांधकामास २८ फेब्रुआरी १८७२ रोजीं सुरवात केली. हें काम २९ फेब्रुआरी १८७६ रोजीं संपलें. खर्च सुमारें पावणेचार लक्ष (३,६६,६२९) रुपये आला; पैकीं दोन लाख रुपये माजी श्री॰ खंडेराव गायकवाड यांनीं दिले. ही इमारत १८७६ सालीं लॉर्ड लिटन् यांनीं उघडली.

† सोन्याच्या तोफा:—[ Gold and Silver Guns. ]

बडोद्यास 'नझरबाग' राजवाड्याजवळच्या बागेत दोन सोन्याच्या व दोन चांदीच्या तोफा आहेत. चांदीच्या तोफा खरोखर श्री॰ खंडेरावांनीं ओतविल्या होत्या. परंतु त्यांचे बंधू श्री॰ मल्हारराव यांनीं त्यांवर आपलें नांव कोरविलें व चुरशीमुळें आणखी दोन सोन्याच्या तोफाही ओतविल्या. सोन्याच्या तोफा चांदीच्या गाड्यावर व चांदीच्या तोफा सोन्याच्या गाड्यावर ठेवल्या असून त्या गाड्या ओढणाऱ्या खिल्लारी बैलांचीं शिंगें रत्नाभरणांनीं शृंगारीत असत. गायकवाडी उधळपट्टीच्या अतिरेकाचें हें एक नमुनेदार उदाहरण होय.

—संपादक

एकदां जे ठरून बसले आहेत ते आहेत. दुसरें तिसरें बुक शिकायाला लागल्यापासून डिक्शनरींतले शब्द जे एकदां पेरांच्या तोंडांत बसून जातात ते अगदीं शेवटपर्यंत. ते खरे शब्द आहेत, किंवा त्यांच्यापेक्षां शुद्ध मराठी असे शब्द सांपडतील कीं नाहीं, हा विचार कोणीही करीत नाहीं, व करण्याची गरजही कोणास पडत नाहीं. 'त्याचें भाषण ऐकून सर्वांस साल्हादाश्चर्य वाटलें'—या वेडयावांकडया वाक्यापेक्षां—'सर्वांनीं मोठी वाहवा केली,'—'सारे तोंडांत बोट घालून राहिले' वगैरे साहजिक वाक्यें किती शोभतात ! 'शिवाजीस महत्त्वाकांक्षा होती' यापेक्षां त्यास 'राज्यलोभ होता' हें वाक्य; किंवा शेवटल्या वेडयावांकडया वाक्यापेक्षां 'आईबापांच्या आज्ञेंत चालावें हा मुलांचा धर्म होय' हें वाक्य किती चांगलें दिसतें ! पण इतका विचार कोणीं करावा ! एकदां अनादिसिद्ध परंपरेनें जी वरील शब्दांस वहिवाट मिळाली आहे ती आहे. मोटमोठया ग्रंथांतून, भर सभेंत, वर्तमानपत्रांत, एरवींच्या बोलण्यांत वरील शब्द व वाक्यें उच्चारण्यास कोणासही तिळप्राय सुद्धां शंका वाटत नाहीं. वक्ते व्याख्यान देण्यास उठले कीं अगोदर सर्वांस विनंति करतात कीं, 'मी तुह्मांपुढें आपले विचार ठेवतों,' किंवा हेंही तितकें पसंतीस न पडून याहूनही छानी करण्याचें मनांत आल्यास '—विचार मांडतों' असें उत्कृष्ट मराठी बोलून आपल्या मोलवान वक्तृत्वास आरंभ करतात ! बरें पण, त्यांच्यापुढें मेज तरी उभें केलें असतें ! नाहीं तर विचारांस खालीं आधार न सांपडल्यामुळें बिचारे श्रोत्यांकडे घरंगळत जायचे ! पुढें वक्तेमहाराज या विषयाकडे वळतात, त्या विषयाकडे वळतात, किंवा एकाच विषयाचें एकदां काळें अंग, दुसऱ्यानें गोरें अंग, असें आपल्या प्रिय श्रोत्यांस अनुक्रमें करून दाखवितात ! ग्रंथकर्त्यांची तरी झांक वक्त्यांहून कमी असते असें नाहीं. कोणी ह्मणतील न जाणो, कीं पुस्तकांतील मजकूर इकडून तिकडून उपटला असेल, यास्तव मुख्यपत्रावरच ठळठळीत अक्षरांनीं ते जगास जाहीर करतात, कीं पुढील ग्रंथ असा तसा नव्हे—हा आहे स्वकपोलकल्पित, 'खुद्द आमच्या गालांतून काढलेला !' भाषेचें तिसरें वसतिस्थान न्यायाधीशांच्या कचेऱ्या. या ठिकाणचा मराठी भाषेच्या कैवाऱ्यांस मोठा अभाव आहे. पण तेथें तर जी तिची विटंबना होते तीस पारच नाहीं ! शेंकडों इंग्रेजी शब्दांची भेसळ, त्यांहून दुःसह असा वर सांगितल्यासारखा घेडगुजरी मराठीचा प्रकार, न्यायासनीं बसलेल्या अधिकाऱ्यांकडून तर तिचा उच्चारही नीट होऊं नये. फार तर काय, पण मराठी भाषा जर मूर्तिमंत अवतरली, तर सगळ्या कोर्टांवर बेअब्रू केल्याची फिर्याद तीस पहिल्यानें करावी लागेल ! तिच्या शब्दांचे, वाक्यांचे, उच्चाराचे जे तेथें प्रत्यहीं खून पडतात तितके एका वर्षांत साऱ्या पृथ्वीवर पडत नसतील ! प्रत्यक्ष न्यायदंड धारण करणाऱ्या कोर्टांकडूनच असा वाक्प्रवाह वहातो, " अरे ! त्यानें तुला मारलें, तर तूं त्या वेळेस आवाज कां केला नाहीं ? ' ' तूं त्या वेळेस सूर्यांत उभा होतास ? ' ! ! बरें हें एक असो; पण परभाषेची सबब ज्यांस लागू पडत नाहीं अशा नेटिव वकीलांची तरी स्वभाषेवर केवढी आस्था असते ! मागें कायद्यांच्या भाषांतराचा प्रकार वर्णिला आहे तो याविषयीं एक प्रमाण आहेच; आणि दुसरें त्यांचें कोडतांतील वक्तृत्व, ' अमुक अमुक आक्टाअन्वयें ' ( ' आक्टा ' चा आणि " अन्वया ' चा मोठाच गोड अन्वय हा ! ) ' कैदीस संशयाचा फायदा दिला

पाहिजे,' 'या साक्षीदाराच्या जबानीस पुष्कळ वजन दिलें पाहिजे,' अशा प्रकारच्या सुंदर रूपानें मराठी भाषा कोठतांतून प्रगट झालेली दृष्टीस पडते. असो; तर याप्रमाणें येवढ्या उंच उंच शिखरांहूनही आमच्या भाषेचा प्रवाह जर असा अत्यंत दूषित होत्साताच खालीं येतो, तर नाटकवाल्यांसारख्या आशिक्षित लोकांतही तो तसाच दिसत असल्यास कांहीं आश्चर्य नाहीं. ' नाटककार कंपनी ' 'नारायणरावाच्या मृत्यूचा फार्स ' असे अशुद्ध, दूषित आणि परम उद्वेगकारक शब्द ज्या छापखान्यांत त्यांच्या जाहिराती छापतात त्यांस किंवा ज्या पत्रांतून त्यांच्या नोटिशी घातलेल्या असतात त्यांस, कसेही भूषणास्पद असोत; पण बहुधा अक्षरशून्य असणाऱ्या आमच्या ' नाटककार ' मंडळ्यांस आह्मांस त्यांबद्दल मोठासा दोष लावतां येत नाहीं. असो; तर याप्रमाणें मोठ्या विद्वान् ह्मणविणाऱ्या ग्रंथकारांपासून तों अगदीं नाटकवाल्या मंडळीपर्यंत, किंबहुना सुतारांपर्यंत, शिंप्यांपर्यंत आमच्या भाषेची अशी पायमल्ली व्हावी हा मोठा चमत्कार नव्हे काय ? चार पांच वर्षांपूर्वी युनिवर्सिटीच्या वरच्या परीक्षांतून मराठी भाषा काढली तेव्हां चोहोंकडे मोठा गवगवा होऊन त्याबद्दल कित्येक वर्तमानपत्रांतून, मासिक पुस्तकांतून, व आमच्या विद्वान् मंडळींत ज्याच्या त्याच्या तोंडीं तो वाद झाला व पुष्कळांनीं मराठी भाषेच्या संबंधें पक्षकारीपणा त्या प्रसंगीं प्रदर्शित केला. पण शेवटीं फल काय ? कांहीं नाहीं. त्याच सुमारास दुसरा एक मोठा वाद उत्पन्न होऊन त्याच्या संबंधानें आतां जसें चोहोंकडे गार होऊन गेलें आहे तसेंच याविषयींही झालें. नवे इंग्रेजी शब्द प्रचारांत आणण्याची, किंवा घेडगुजरी बोलण्याची त्या वेळेस जितकी कोणास शरम वाटत नव्हती तितकीच आतांही वाटत नाहीं. ज्या पत्रांनीं त्या प्रसंगीं स्वभाषेच्या कैवारानें वादामध्यें पुढारीपणा पतकरला, त्यांची तरी लिहिण्याची पद्धति तेव्हांपासून किती शुद्ध झाली असेल हें सांगवत नाहीं. एकंदरीत, ' वचने का दरिद्रता ' या न्यायास आमचे लोक हरएक प्रसंगीं फार अनुसरतात !

५. असो; वरच्या लिहिण्यावरून एकंदरींत पहातां मराठी भाषेच्या शुद्धीकडे कोणाचेंही विशेष लक्ष नाहीं असें दिसून येईल. आपला व इंग्रेजांचा वर्णसंकर होऊन प्रभूच्या शरीराचें व रक्ताचें एका मेळ्यांत यथेच्छ भोजन करतां येईल त्या सुदिनाची आमच्या मधले पुष्कळ शहाणे लोक जशी वाट पहात आहेत तशीच दोहोंच्या भाषांच्या संकराचीही आमचे विद्वान् वाट पहात नसतील मा ! पण त्यांनीं पक्कें समजून ठेवावें कीं, वरील गोष्ट होणें परम दुर्घट आहे. आमच्या लोकांची इंग्रेजांत मिसळण्याची जितकी इच्छा आहे, तितकाच तसें करण्याविषयीं इंग्रेजांचा तिरस्कार आहे. याप्रमाणेंच इंग्रेजीच्या संपर्कानें आमच्या मराठीचा मात्र नाश होण्याचा संभव आहे. इंग्रेजांस एकंदर सर्व गोष्टींप्रमाणें आपल्या भाषेविषयीं केवढा अभिमान आहे हें मागील अंकांत एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. आपणांत जशी ह्मण आहे कीं, तीर्थी गेल्याखेरीज मुंडन होत नाहीं त्याप्रमाणें ज्यांस पक्कें इंग्रेजी शिकायाचें असेल त्यानें लंडन शहरचाच वास पतकरला पाहिजे; हें तर काय, पण असें करूनही ती भाषा साध्य होईलच असें नाहीं; इंग्लिश उच्चार अगदीं बेचूक करणें व ती भाषा बेचूक लिहिणें हें जो इंग्लंडांत जन्मला त्यासच केवळ साध्य होय असें ते लोक ह्मणतात. प्रसिद्ध

सर वॉल्टर स्कॉट् व इतिहासकार रॉबर्टसन यांच्याही ग्रंथांत अशा इंग्रजीच्या चुका आहेत कीं, लंडनांतलें एखादें पोर त्या शुद्ध करील, असें एके ठिकाणीं मेकॉलेनें लिहिलें आहे असें असल्यावर मग या ठिकाणीं आह्मां नेटिवांचा काय पाड? असो; तर इंग्रजांस आपल्या भाषेचा अभिमान येवढा जागृत आहे. पण आह्मी पहा! साहेबांच्या अशुद्ध लिहिण्याचा व उच्चारांचा आह्मांस राग व तिरस्कार न येतां उलटें त्यांचें अनुकरण करण्यांत आह्मांस प्रतिष्ठा वाटते. हें लोकांच्या देशाभिमानास व भाषाभिमानास मोठें लांछन होय. तसाच दुसरा हाही मोठा चमत्कार आहे कीं, जे इंग्रेज लोक आपल्या भाषेविषयीं येवढा मत्सर मनांत वागवितात तेच इतर भाषांच्या ज्ञानाविषयीं घमेंडी बाळगण्यांत यत्किंचितही कसर करीत नाहींत. नेटिवास इंग्रेजीचा प्रोफेसर करणें तर फारच दूर, पण प्रत्यक्ष संस्कृताचाही करण्यास मोठीच वाटाघाट करावी लागते, पण युरोपियनास इकडील कोणत्याही भाषेचें आधिपत्य देण्यास काडीमात्रही विचार पडत नाहीं! प्रोफेसर बेलैसे साहेबांनीं 'Indian English Corrected' असें कुत्सितपणाचें नांव देऊन त्यांत शाळेंतील पोरें वगैरे ज्या चुका करतात त्या खोडून शुद्ध केल्या आहेत. पण त्याच साहेबांनीं स्वतः एक मराठी बूक करून त्यांत जी शब्दरचना व वाक्यरचना केली आहे तीस तोड नाहीं! त्यांतील एका धड्याचें नांव अजून आह्मांस आठवतें. तें 'पिवळा वामनमूर्ती' असें आहे. आमच्या वाचकांस या शब्दांचा अर्थ करण्यास बराच गोंधळ पडेल अशी आमची खात्री आहे; तसेंच आह्मांसही क्षणभर झालें. पण वर पहातों तों इंग्रेजींत The Yellow dwarf असे शब्द होते. तेव्हां साहेबांच्या अगाध ज्ञानाची आह्मांस एकदम प्रतीति होऊन आह्मी क्षणभर चकित होऊन राहिलों. असो; पण अशीं शब्दरत्नें व वाक्यरत्नें ज्यांस यथेच्छ हवीं असतील त्यानें पाश्चिमात्य लोकांचें भाषण किंवा लिहिणें यांकडे अंमळ लक्ष पुरवावें म्हणजे झालें. येथील बंडावरील बागेंत आंत उतरण्याच्या ठिकाणीं आमच्या लोकांकरितां एक पाटी लावली आहे तीवर लेख असा आहे—'येथील झाडांस व पुष्पांस कोणी हात लावूं नये.' येवढा शब्द झेपत नव्हता तर साहेबांनीं साधा मराठी शब्द घालावयाचा होता! असो; तर चमत्कार काय कीं, मनुष्यस्वभावांत असा विरोध अनेक वेळां दृष्टीस पडतो.

६. याप्रमाणें हल्लीं अनेक प्रकारांनीं मराठी भाषा दूषित होत चालली आहे. याचीं कित्येक कारणें मागें एकदां सांगितलीं आहेतच; आतां या दूषणांसही भूषण मानणाऱ्या कित्येक लोकांचें काय म्हणणें आहे तें सांगतों. कित्येकांस असें वाटतें कीं 'विचार मांडतों' 'ग्रंथ साक्ष देत आहे' वगैरे प्रयोग अप्रशस्त कां मानावे? इंग्रेजींतही तोच अर्थ त्या शब्दांनीं व्यक्त होतो; मग इंग्रेजींत जर ते वाईट दिसत नाहींत व तशी रूढि पडून गेली आहे, तर मग मराठींतही ते आणल्यास काय बिघडलें? हें म्हणणें सकृद्दर्शनीं समंजस वाटतें; पण अंमळ विचार केला असतां सहज लक्षांत येईल कीं, हें गोड तत्त्वज्ञान यथेच्छ चालविलें असतां साऱ्या भाषांचा एकदम लय होणार आहे; मराठींत आपण म्हणतों 'थंडी वाजते' 'मी वाट पहात आहें,' 'त्यानें मार खाल्ला;' मग इंग्रेजींत 'frost rings,' 'I am looking at your way,' 'He ate beating' असें म्हणण्यास

न्काय हरकत आहे ? मराठींत जर तोच अर्थ व्यक्त होतो, वाक्य वाईट दिसत नाहीं, व अगदीं रूढ होऊन गेलें आहे, तर लंडनांत भर पार्लमेंट सभेंत अशी वाक्यें बोलण्यास काय हरकत आहे ? पण इतकेंच नव्हे; तर साऱ्या पृथ्वीवर जेवढ्या ह्मणून भाषा आहेत त्यांत वरील अर्थ ज्या शब्दांनीं व्यक्त करीत असतील त्यांचें हव्या त्या भाषेंत शब्दशः भाषांतर करून बोलण्यास काय बिघडलें ? कांहीं नाहीं. आणि खरोखरच अर्थदृष्ट्या कांहीं बिघडलें नाहीं. पण भाषेंत जें शुद्धाशुद्ध ठरवितात तें केवळ अर्थावरच कधीं ठरत नसतें. प्रत्येक भाषेला ' इडियम ' ह्मणजे शब्दाचा किंवा वाक्यांचा प्रयोगविशेष ह्मणून एक निराळेंच तंत्र असतें; तें भाषेचा बहुधां जीवप्राण होय, त्यांत लवमात्रही इकडचें तिकडे होतां कामास नये. भाषेचा शुद्धाशुद्धपणा मुख्यतः त्यांवर धरतात, व तिचें स्वारस्यही सगळें त्यांवरच असतें. यास्तव तत्त्वज्ञानांत शिरून त्याची ह्यगय लवमात्रही करतां येत नाहीं. आणि वस्तुतः पहातां हें ठीकच आहे. प्रत्येक राष्ट्रास त्याचा स्वतःचा जसा निराळा पोषाक, निराळा धर्म, निराळा रीतरिवाज असतो, तसाच वरील प्रयोगविशेषही असतो. उद्यां जर कोणीं आपणांस असा उपदेश केला कीं, अहो, तुह्मी पागोटीं घालतां तीं कशाकरतां ? डोक्यावर कांहीं असावें येवढ्याच करतांना ? मग साहेबांसारख्या टोप्या कां घालाना ? किंवा मुसलमानांत चुलत बहिणीशीं लग्न करतात, मिसर देशांत प्रत्यक्ष सख्या बहिणीशींही करीत, येवढ्यावरूनच जर कोणी इतर देशांत तशा व्यभिचाराबद्दल कोर्टांत सबब सांगूं लागला, तर त्यास कोर्ट काय उत्तर देईल ? आपण येथें हातानें जेवतों ह्मणून इंग्लंडांतल्या खाणावळींतही तसेंच करून तेथील बुटणेराशीं जर मोठ्या निकरानें वाद करूं लागलों, तर तेथील लोक आपणांस काय ह्मणतील ? असो; तर हीच गोष्ट भाषेसही लागते. तिचे प्रयोग जे एकदां ठरून गेले ते शिरसा वंद्य मानूनच चाललें पाहिजे. तेथें तर्कशास्त्राची मात्रा चालणें नाहीं.

७ तरी एका मोठ्या गोष्टीचा आणखी विचार केला पाहिजे. ती ही कीं, जे शब्द व जी रचना आपल्या भाषेंत नाहीं ती आणायाची असल्यास काय तोड करावी ? रसायन, दर्शनानुशासन, भूगोल, अर्थशास्त्र वगैरेंतील पारिभाषिक शब्दांची मराठींत काय तजवीज करावी ? याविषयीं आमच्या पहिल्या अंकांत एके ठिकाणीं लिहिलेंच आहे; कीं संस्कृत भाषेचें साह्य आपल्या भाषेस असल्यामुळें या संबंधें बहुधां पंचाईत पडण्यासारखी नाहीं. ह्मणजे इंग्रेजींत ज्याप्रमाणें ग्रीक भाषेंतून नव्या शास्त्रांचीं नांवें बनवतात त्याप्रमाणें आपल्या मराठीस संस्कृताची अत्युत्कृष्ट सोय आहे. यास्तव कोणीं कोणीं ग्रंथकारांनीं अशा ग्रंथांत मूळचीं इंग्रेजीच जीं नांवें ठेवलीं आहेत तें बरोबर नाहीं असें आह्मांस वाटतें. थोड्या यत्नानें त्यांसारखीं किंबहुना त्यांहूनही उत्कृष्ट अशी नांवें संस्कृतांतून साधतां आलीं असतीं. हा एक प्रकार झाला, दुसरा प्रकार ग्रंथरचनेचा. मराठींत मूळचे ह्मणजे कायते छंदोबद्धच ग्रंथ आहेत; गद्य ग्रंथ ह्मटले ह्मणजे पंचोपाख्यानासारखे तीन चार गोष्टींचें ग्रंथ आणि बखरी. यास्तव इंग्रेजींतल्यासारखे शास्त्रीय ग्रंथ, व्याख्यानें, निबंध वगैरे लिहितांना ग्रंथाची एकंदर रचना इंग्रेजी ग्रंथांच्याच धाटणीवर केली पाहिजे. ह्मणजे मजकूर कलमवार लिहून

विरामचिन्हें हीं जशीं इंग्रेजीच्या नमुन्यावर मराठींत मांडतात, त्याप्रमाणेंच लिहिण्याचा एकंदर झोंकही बहुधा इंग्रेजीसारखाच आणल्याशिवाय गत्यंतर नाहीं. यास्तव ऐवढ्यापुरतें इंग्रेजीचें अनुकरण करण्यास चिंता नाहीं असें आह्मांस वाटतें,—कारण तसा मूळचा प्रकार आपल्या भाषेंत मुळींच नाहीं. याप्रमाणेंच ज्या कल्पना आपणांत पूर्वींच्या नव्हत्या त्यांचे द्योतक जे ' देशाभिमान, ' 'लोककल्याण, ' ' सुधारणा ' वगैरे शब्द ते जरी अगदीं नवे बनवले आहेत तरी ते ग्रंथांत घालण्यास कांहीं हरकत नाहीं. ' अशी आमची आशा आहे, ' ' लिहिण्यास आनंद वाटतो कीं, ' अशा प्रकारचे जे नवे संप्रदाय अलीकडे प्रचारांत आले आहेत तेही आपणांत पूर्वी नसल्यामुळें आहेत तसेच ठेवण्यास कांहीं चिंता नाहीं असें आह्मांस वाटतें.

८, याप्रमाणें आमच्या मतें जेथपर्यंत इंग्रेजीचें अनुकरण करण्यास हरकत नाहीं तितकीच मर्यादा सांगितली; हिच्या पलीकडे जें विनाकारण तिचें अनुकरण तें अनर्थावह होय यांत संशय नाहीं. परभाषेचें साह्य कोणत्याही भाषेनें कोठवर घ्यावें याविषयीं महाविख्यात इंग्रेजी ग्रंथकार जो ड्रायडन् त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, तें साह्य त्या भाषेवरच उलटून जबरदस्ती करूं लागेल येथवर घेऊं नये. भाषेची उणीव नाहीशी करून तें तिच्या खरोखर उपयोगीं पडेल इतकेंच तें असावें. नाहीं तर आपल्या देशाची जशी स्थिती झाली आहे तशीच होण्याचा संभव. मराठ्यांचा इतिहास ज्यांनीं समग्र वाचला असेल त्यांस नाना फडनविसाची राज्यनीति माहीतच असेल. परराज्यांचा अपहार करण्याची हिकमत पहिल्यानें काढणारा पहिला गव्हर्नर जनरल जो हेस्टिंग्स त्यानें इंग्लिशांचा पगडा सगळ्या मुलखांत करण्याकरितां ' सब्सिडियरी आलायन्स ' ह्मणजे आपलें सैन्य दुसऱ्या राजांपाशीं चाकरीस ठेवण्याचा तह हा प्रकार काढला. असा तह करण्याविषयीं त्याचा व पुढील गव्हर्नरांचा नानास आग्रह चालला होता. पण त्यास त्यांतला मतलब कळून एकंदर राज्याची जरी त्या वेळेस फारच तारांबळ झाली होती तरी तो कबूल झाला नाहीं. त्यानें अनेक निकडीच्या प्रसंगीं त्यांचें साहाय्य मात्र मागितलें; पण तें इंग्लिशांनीं कधीं दिलें नाहीं. पण पुढें नाना मरण पावून दोन वर्षेंही पुरतीं लोटलीं नाहींत तोंच शेवटल्या पळपुट्या पेशव्यानें इंग्रेजांचा फार दिवस मनांत धरलेला हेतु वसई मुक्कामीं शेवटास नेला. तेथील तहावर जी त्यानें सही केली ती पुढें झालेल्या राज्याच्या राजीनाम्यावरच केली असें ह्मटलें असतां चालेल. असो; तर आमच्या भाषेचीही जर तीच गति न होऊं देण्याचें आमच्या लोकांच्या मनांत असेल तर इंग्रेजीचा मराठीशीं जो दिवसेंदिवस अधिकाधिक निकट संबंध होऊं पहात आहे त्यास त्यांनीं फार जपलें पाहिजे. या संबंधास वर जी मर्यादा सांगितली तिसही मराठ्यांच्या इतिहासांतलें वरच्यासारखेंच सादृश्य दाखवितां येईल. मराठ्यांच्या लष्करांत मुसलमान, युरोपियन वगैरे सुद्धां असत; महादजी शिंद्यानें तर इंग्रेजांच्या सारखीं पलटणें तयार करून त्यांस त्यांच्यासारखी कवायत शिकविली होती, व तोफखानाही संग्रहास ठेवला होता. त्याचा त्यास फार उपयोग झाला, व तो आणखी बरींच वर्षे वांचता तर त्याच्या योगानें तो काय करता हें सांगवत नाहीं! तर याप्रमाणें कांहीं बेताचें इंग्रेजी

शब्द मराठींत घेतले असतां, व तींतील ग्रंथरचनाही तींत उतरली असतां तीस अपाय न होतां तिचें हितच होईल. इतकेंच मात्र कीं, यांस मूळच्या भाषेहून शिरजोर होऊं देतां कामास नाहीं.

९. याप्रमाणें प्रस्तुत विषयाविषयीं सामान्यत: विचार झाला. आतां भाषादूषणाचीं कांहीं उदाहरणें देतों. एक आपल्याच लोकांच्या ग्रंथांतलीं; आणि दुसरीं परकी लोकांच्या ग्रंथांतून. पहिल्या प्रकारच्या ग्रंथांच्या उदाहरणार्थ रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें प्रसिद्ध पुस्तक ' हिंदुस्थानचा इतिहास ' हें घेऊं. हें भाषांतर आज सुमारें पंधरा वर्षें प्रसिद्ध असून युनिव्हर्सिटींत बी. ए. परीक्षेस मराठीकडे नेमलें असे. शिवाय हेंही लक्षांत आणलें पाहिजे कीं, जेव्हां हें लिहिलें त्या वेळेस इंग्रेजीचा प्रसार आतांप्रमाणें झाला नसल्यामुळें मराठी भाषा हल्लींच्या इतकी तेव्हां दूषित झाली नव्हती—

" ( भा. २ पृ. ३५१ ) पुढें त्यानें आणखी एक तसाच प्रयत्न केला, तो विशेष मोठा होता. त्याचा प्रकार—शाहूचें दैव खुलल्यामुळें मराठ्यांच्या गादीचा दुसरा वारीस संभाजी हा झांकून गेला होता, तथापि त्यानें आपल्या राज्याची गादी कोल्हापूर येथें स्थापिली होती, आणि तो आपल्या वंशाचें दक्षिणेकडील राज्य हातांत राखून सगळ्या राज्याविषयीं वारसा सांगतच होता. असीफजानें, त्याचा पक्ष विधिपूर्वक उचलिला असें न दाखवितां, मराठ्यांस आपल्या देशासंबंधीं जी खंडणी द्यावयाची होती ती कोणास द्यावी, अशा संशयांत पडल्यासारखें ढोंग केलें; आणि उभयपक्षींच्या लोकांस आपल्या हक्कांची शाबिदी दाखविण्याविषयीं सांगितलें. या त्याच्या मागण्यानें शाहूस फार क्रोध आला. तो राग काढण्यास बाजीराव हें त्यास तयारच साधन मिळालें. इ०

" ( पृ. २३७ ) शिवाजी हा मोठ्या सरदाराचा मुलगा असून, त्यानें प्रथम धाडशी व कपटी अशा चोरांच्या सरदारांचा वेष धरून संसार आरंभिला; पण परंतु पुढें पक्क दशेस येऊन तो मोठा कुशल सरदार व शहाणा राज्यकर्ता होऊन गेला. तो जी आपली कीर्ति ठेवून गेला, तिची बरोबरी अथवा तिच्या जवळ जवळ चालही त्याच्या देशबांधवांतून अद्यापि कोणी एकानेंही केली नाहीं. जवळच्या देशांची स्थिति गडबडलेली होती, त्यामुळें ज्या संधि मिळाल्या त्यांयोगेंकरून यापेक्षां कमी बुद्धिमान् सरदारही कदाचित् आपलें हित करून घेता; परंतु धर्माविषयीं श्रद्धा जागृत करून तिच्या द्वारानें मराठे लोकांत स्वदेशाभिमान उत्पन्न करणें, आणि त्या योगानें औरंगजेबानें मुसलमानी धर्माविषयीं दुराग्रह धरून हिंदूंचे छळ करणें इत्यादि ज्या कांहीं चुक्या केल्या, त्यांची संधि साधून आपला फायदा करून घेणें, हें काम करण्यास शिवाजीसारखाच बुद्धिमान् पाहिजे होता. इ०

" ( कित्ता ) शिवाजी प्रथम चकित झाला होता, तो सांवरून पुन: लढाई करूं लागला; तेव्हां आपली सामग्री शिवाजीनें मारून नेली असें पाहून नाइलाज होऊन दिल्लीकरानें विजापुरचा वेढा उठविला.

"(भा. २ पृ. २७५) या सर्व भारी मेहेनतीच्या कामांचा विचार करीत असतां, त्याच्या उतार वयामध्यें ज्या ज्या संकटांनीं व दुःखांनीं त्यावर आच्छादन पडलें होतें त्यांतून त्यानें मोठ्या धैर्यानें आपलें डोकें कसें वर काढलें, याविषयीं त्याची स्तुति न करणें हें अशक्य आहे.

"(—पृ. २८७) हे बंदोबस्त होऊन फार वेळ झाला नाहीं, इतक्यांत आपला अंतकाळ जवळ येत आहे असें त्यास समजलें. त्या भयंकर प्रसंगीं त्याणें शाहजादा अझीम यास स्वतः पत्र लिहिलें किंवा सांगून दुसऱ्याच्या हातून लिहविलें आहे; त्यांत ऐहिक उपदेश व निर्वाणचीं भाषणें असून मधून मधून कांहीं तुटक तुटक वाक्यें आहेत; त्यांत जे पश्चात्तापाचे उद्गार आणि परलोकची भीति यांहींकरून त्याचें अंतःकरण गलबललें होतें, तीं बाहेर पडलीं आहेत." इ॰ इ॰

वरच्यासारख्या भाषेचा प्रकार प्रस्तुत भाषांतरांत येथून तेथून आहे. मधून मधून भाषांतर चांगलें आहे खरें, व कोठें कोठें शब्दही चांगले निवडून घेण्यासारखे घातले आहेत; पण ज्यांकरितां हें भाषांतर ग्रंथकारानें केलें त्यांस याचा काडी इतकाही उपयोग होण्यासारखा नाहीं असें ह्मटल्यास हरकत नाहीं. असे इतिहासग्रंथ असल्यावर एकंदर लोकांचे ठायीं इतिहासाचें येवढें अज्ञान असल्यास नवल काय !

आतां दुसऱ्या प्रकारचे ह्मणजे परकी लोकांचे ग्रंथ पाहूं. यांच्या उदाहरणार्थ 'साधारण प्रार्थना' हें पुस्तक घेऊं. ख्रिस्ती 'दीक्षितां' च्या मंडळीनें तयार केलेलें हें पवित्र पुस्तक सैतानानें आमच्या डोळ्यांवर झांपड घातलें असल्यामुळें आह्मांस चांगलें वाटत नसेल तर नकळे; पण आमचा आह्मांस जो त्याचा अनुभव वाटतो तो मनोभावानें आह्मी आमच्या वाचकांस कळवितों; आह्मीं हें पुस्तक सगळें वाचलें नाहीं हें मोकळे मनानें कबूल करतों; फार तर काय, पण एक पानही आमच्यानें सबंध वाचून जाववलें नाहीं. असो यांत काय गुण असेल तो असो ! तरी इकडून तिकडून चाळून पहातां या पुस्तकापासून दोन चार फार चांगले उपयोग होतीलसें आह्मांस वाटलें. एक ज्यास झोंप येत नसेल त्यानें हें हातीं घ्यावें, ह्मणजे दोन चार वाक्यांत झोंप ठेवलेली; कोणास जर करमेनासें झालें तर चार घटका त्यास खों खों हंसविण्यास यासारखें साधन नाहीं; कोणाला जर वर्षा सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा द्यावयाची असली, आणि तो तर प्रकृतीनें अशक्त आहे, तर हें पुस्तक सबंध वाचणें त्या शिक्षेच्या मोबदला दिल्यास चालेल; किंवा अशुद्ध वाक्यें शुद्ध करण्यास विद्यार्थ्यांस जर द्यावयाचीं असलीं, तर हें पुस्तक बाळगलें असतां दुसरीकडे बघण्याची बिलकुल गरज राहणार नाहीं !

मागील पुस्तक अंमळ इकडे तिकडे वाचण्याचे तरी आह्मांस श्रम पडले; पण तेही श्रम प्रस्तुत ग्रंथाचे दयाळु कर्ते आह्मांस देत नाहींत. खरोखरी पहातां 'साधारण प्रार्थने'चें मुखपत्रही आमच्या उपयोगीं पडण्यासारखें आहे; पण तसें करणें फारच अप्रतिष्ठित जाणून प्रस्तावनेंतले थोडके चुटके वाचकांस सादर करतों—

" इंग्लंड देशाच्या मंडळीनें पहिलें मंडळींतील भजनाचें पुस्तक रचिलें, त्या वेळापासून त्यांतील गोष्टींहून ज्या भिन्न आहेत त्या हटानें नाकारणें, अथवा सहज अंगीकारणें, ह्या दोन्ही गोष्टी न करतां मध्यम क्रम धरिला, यांत मोठा शहाणपणा दाखविला आहे. कारण आह्मांस अनुभवावरून असें समजून आलें आहे कीं, ज्या गोष्टी विचारपूर्वक स्थापित आहेत, त्यांत फेरफार करण्याचें अगत्य नसून पालट केल्यावरून अनेक प्रकारच्या अडचणी लागल्या आहेत, आणि अशा फेरफारानें ज्या गोष्टी दूर करण्याच्या होत्या त्यांपेक्षां अडचणी फार व अधिक मोठ्या लागल्या आहेत. " इ० इ०

" सकाळची व संध्याकाळची प्रार्थना मंडळस्थानांत, भजनस्थानांत, अथवा कठड्यांत ज्या ठिकाणीं ह्मणत आले आहेत, तेथेंच ह्या प्रदेशांतील धर्माधिकाऱ्यानें निराळा हुकूम दिल्हा नसल्यास ह्मणावी. आणखी कठडे मागल्या काळाप्रमाणें राहूं द्यावे. "

" आणि लक्षांत ठेवावें कीं साहावा एडवर्ड राजा याच्या दुसऱ्या वर्षी पार्लिमेंताच्या अधिकारानें या इंग्लंडच्या मंडळींत जीं मंडळीचीं व आचार्यांचीं भूषणें चालत होतीं, तींच आचार्यत्व करण्यांत नेहमीं राखून उपयोगास लावायाचीं आहेत. "

सकाळची प्रार्थना—

" माझ्या पातकापासून आपलें मुख आवरून घे; व माझे सर्व अन्याय पुसून टाक. गीत ५१. ९.

" देवाचे यज्ञ ह्मणजे फुटलेला आत्मा, फुटलेलें व नम्र झालेलें हृदय, हे देवा, तूं तुच्छ मानणार नाहींस. गीत ५१. १७.

" आपलीं वस्त्रें नका, तर आपलें हृदय फाडा; आणि परमेश्वर जो तुमचा देव त्याकडे फिरा; कां कीं तो कृपाळू व दयाळू, मंदक्रोध व फार मायाळू आहे, आणि विपत्तीविषयीं अनुतापी आहे. योएल २. १३.

" पश्चात्ताप करा, कां कीं आकाशाचें राज्य जवळ आलें आहे. मात्थी ३. २.

आणखी एकच लहानसा उतारा घेतों—

" शुभ्रसप्तकांतील सोमवार—

" देवा, त्वां या समयानुसार आपल्या पवित्र आत्म्याचा प्रकाश पाठवून आपल्या विश्वासू लोकांच्या अंतःकरणांस शिकविलें तसें आह्मांस त्याच आत्म्यानें हरएक गोष्टींत यथार्थ समज प्राप्त होऊन त्याच्या पवित्र सांत्वनावरून सर्वकाळ आनंद करावा असें कर; आमचा तारणारा ख्रिस्त येशू याच्या पुण्यास्तव, जो तुजबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यांत एकच देव निरंतर असून युगोयुगीं जगतो, व राज्य करितो. आमेन. "

वरील वाक्यें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस समजलीं असतील तीं असोत; आह्मांस तर या भाषांतरासारखाच त्याचा हेतुही बिलकुल कळत नाहीं. मराठींत भाषांतर ह्मणजे काय ? ज्यांस इंग्रेजी ग्रंथ कळत नाहीं त्यांस त्यांतील अर्थ मराठी भाषेनें कळावा हाच त्याचा उद्देश कीं नाहीं ? हा उद्देश ख्रिस्ती लोकांनीं जीं शेंकडों भाषांतरें आजपर्यंत

केलीं व अजून करीत आहेत, त्यांच्यापैकीं कितीएकांनीं सिद्धीस जातो बरें! प्रस्तुतच्या इतकींच जर तीं सर्व उतरलीं असलीं, तर ते ग्रंथ मूळचे इंग्रेजीचे इंग्रेजींतच ठेवणें फार बरें होतें असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. भाषांतर उतरण्याचा व छापण्याचा तरी अट्टाहासानें वांचता! असो; पण येवढी उघड गोष्टही आमच्या ख्रिस्त-भक्तांस दिसत नाहीं; त्यांस वाटतें कीं आपल्या सद्धर्मांतील ग्रंथ देवनागरी लिपींत नुसते लोकांच्या दृष्टीस पडले तरी तेवढ्यानेंही त्यांचें तारण होईल! असें त्यांचें मत असल्यास आह्मी त्यांस एक सूचना करतों कीं, आलीकडे भराभर बेरजि, गुणाकार वगैरे करण्याचीं जशीं यंत्रें केलीं आहेत तसें एका बाजूला मराठी व्याकरण व दुसऱ्या बाजूस मराठी कोश अशीं आंत घालून भराभर भाषांतरें तयार होण्याचें त्यांनीं एक यंत्र तयार करावें. ह्मणजे तेणेंकरून त्यांच्या शुभवर्तमानाच्या कृत्याचा फार त्वरित जगावर प्रसार होईल!

१० आतां सरतेशेवटीं बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या मराठी भाषेच्या शुद्धतेचें एक निश्चित प्रमाण तरी कोणतें धरावें तें सांगतों. एक मराठी कवि व दुसरें प्रमाण आपल्या स्त्रिया वगैरे. पहिल्यांच्या भाषेंत परभाषेच्या संस्काराची बिलकूल शंकाही नाहीं हें उघड आहे; यास्तव त्यांत जे शब्द व जे प्रयोग आढळतील ते अर्थातच अत्यंत शुद्ध होत. दुसरें प्रमाण तरी तसेंच मजबूत आहे. आपल्या बायकांच्या भाषेस अजून आपल्याप्रमाणें परभाषेचा विकार जडला नाहीं यास्तव त्यांचें बोलणें अगदीं शुद्ध मराठी धरण्यास चिंता नाहीं. असेंच वृद्ध मनुष्यांचें, व ज्यांस इंग्रेजीचा गंधही लागला नाहीं अशा एकंदर सर्व लोकांचेंही बोलणें शुद्धतेचें उत्कृष्ट प्रमाण होय. अशांस समजण्यासारखा जो ग्रंथ झाला त्याच्या शुद्धतेविषयीं मग जास्ती बोलणेंच उरलें नाहीं. यास्तव जो कोणी मराठी लिहील त्यानें जर नेहेमी हें मनांत ठेवलें कीं, हें वाक्य मी जर इंग्रेजी न समजणाऱ्या एखाद्या मनुष्यापुढें वाचून दाखविलें तर तें त्यास कितपत समजेल, तर सध्यांचा भाषादूषणाचा दोष हळूं हळूं अगदीं नाहींसा होऊन जाईल. ईश्वर करो, आणि आमच्या ग्रंथकारांच्या ठायीं स्वभाषेच्या शुद्धतेविषयीं असा अभिमान सतत जागृत राहो!

---

## लेखनशुद्धि.

लिपेर्यथावद्ग्रहणेन वाङ्मयं नदीमुखेनेव समुद्रमाविशत्[1]। रघुवंश.

अंक १०—(१) उपोद्घात. (२) शास्त्र आणि रूढि. (३) व्याकरणाचें प्राधान्य. (४) भाषा आणि व्याकरण. (५) त्यांचा परस्पर संबंध. (६) मराठी भाषेची स्थिति. (७) लेखनपद्धति बसविण्याचें साधन. (८) विषयाचीं तीन सदरें. (९) वर्णशुद्धि. (१०) शब्दशुद्धि. (११) वाक्यशुद्धि. (१२) सारांश.

१. लेखनशुद्धि ह्मणजे शुद्ध लिहिण्याची पद्धति. हीविषयीं सध्यां बरेच नियम

---

१. "लिपी ह्मणजे बाराखड्या चांगल्या शिकून हा [रघु] नदीच्या मुखानें जसें अफाट समुद्रांत शिरावें त्याप्रमाणें विद्येंत शिरला."

ठरले आहेत; आणि शुद्ध कसें लिहावें, ह्मणजे ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार वगैरे विषयीं विद्यार्थ्यांकरितां लहान पुस्तकेंही कांहीं झालीं आहेत. याविषयीं आह्मांस कांहीं विशेष लिहिणें नाहीं. तरी या विषयाच्या संबंधाच्या आणखी कांहीं गोष्टी आहेत त्यांविषयीं विचार करणें अवश्य आहे. त्यांविषयीं पूर्णपणें असें विवेचन आजपर्यंत कोणींच केलेलें नाहीं. असें समजून या अंकांत त्यांविषयीं कांहीं विचार प्रदर्शित करतों.

२. कोणत्याही आचाराची शुद्धता ह्मणजे तो बरोबर आहे कीं नाहीं याचा निर्णय नेहेमी दोन गोष्टींवरून होतो. एक शास्त्र आणि दुसरी रूढि. शास्त्र ह्मणजे तत्त्ववेत्त्या पुरुषांनीं चांगला विचार करून घालून दिलेले नियम; आणि रूढि ह्मणजे कालगत्या पडलेला प्रचार. या दोहोंचा अगदीं प्रथमारंभीं अर्थातच पूर्ण मिलाफ असतो, किंवा निदान पुष्कळ असतो; पुढें हळू हळू रूढि ढिली पडत जाऊन कधीं कधीं तीं शास्त्राच्या अगदीं उलटही होते. हा प्रकार लोकव्यवहारांत, धर्मांत, वगैरे जेथें तेथें दृष्टीस पडतो. असो; तर याप्रमाणेंच प्रस्तुत विषयाचाही विचार आहे. अमुक लिहिणें शुद्ध आणि अमुक अशुद्ध याचा निश्चय झटला ह्मणजे एक शास्त्रावरून ह्मणजे व्याकरणावरून; आणि दुसरा रूढीवरून ह्मणजे बोलण्यांत किंवा लिहिण्यांत तसा प्रयोग होतो यावरून. जेथें दोन्ही प्रकार जमतात तेथें ठीकच आहे; पण जेथें दोहोंचा विरोध येतो, तेथें बरीक मोठी पंचाईत येते. व अशा ठिकाणीं कोणता मार्ग काढावा ?

३. आतां खरोखरी झटलें असतां असा वाद जेथें उत्पन्न होतो तेथें व्याकरणाप्रमाणें निर्णय करावा; ह्मणजे जो शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग व्याकरणाच्या नियमांस अनुसरून असेल तोच खरा ह्मणावा. असें केलें असतां भाषा निर्दोष होऊन तींत चोहोंकडे सारखा मेळ बसेल; आणि यामुळें शिकणारास व शिकविणारास दोघांसही ती ज्यास्त सुलभ होईल. याप्रमाणेंच तिचें बाह्य स्वरूप चांगलें नीटनेटकें होईल. पण वरील प्रकार जर सर्वथैव चालवला, त्यास कांहींच नियमित मर्यादा केली नाहीं, तर भाषेची मोठीच हानि होईल. तिचा स्वेच्छाप्रचार बंद होऊन ती व्याकरणाच्या सूत्रांनीं जशी कांहीं अगदीं बद्ध होऊन जाईल. आणि तिचें स्वरूप कांहीं तऱ्हेवाईक, बोजड अशा प्रकारचें होऊन कृत्रिमतेचा मोठा दोष तिजवर सर्वथा येईल. ह्मणजे चालत्या बोलत्या माणसांत आणि मनुष्याचा पुतळा करून त्याच्याकडून नेहेमीचे व्यापार यांत्रिक शक्तीनें करविले असतां त्यांत, या दोहोंत जितका भेद दिसेल तितकाच स्वेच्छाप्रचार जिला आहे अशा भाषेंत आणि व्याकरणानें चोहोंकडून बांधून टाकलेल्या भाषेंत दृष्टीस पडेल. सारांश पावसाचें पाणी जसें अगदीं शुद्ध असतें खरें पण अगदीं बेचव लागतें, आणि निर्वाहास अगदीं उपयोगाचें नाहीं, त्याप्रमाणेंच वर कल्पिलेली शुद्ध भाषा होय; पण तेंच पाणी जमिनीवरून वाहून त्यांत तींतील अनेक द्रव्यें मिसळलीं असतां तें दूषित होतें खरें, पण मधुर होऊन सेवनीय होतें. त्याप्रमाणेंच स्वच्छंदानें चालणाऱ्या भाषेची गोष्ट होय. वैयाकरणाच्या दृष्टीस जे तिचे दूषणप्रकार दिसतात तेच तिच्या अंगीं अर्थव्यंजकता, माधुर्य, चलखपणा वगैरे गुण आणणारे असतात.

४. पण इतकेंच नव्हे. वर व्याकरण प्रधान आहे म्हणून सांगितलें त्यामुळें केवळ भाषेच्या प्रचारावरूनच शब्दांचा किंवा वाक्यांचा प्रयोग शुद्ध मानणें बरोबर नाहीं हें खरें; पण एके रीतीनें पहातां प्रचाराकडेच मोठी प्रधानता येते. ती अशी कीं, न्यायदृष्ट्या जरी व्याकरणावरूनच प्रयोगाची शुद्धता मानणें बरोबर आहे; तरी कालदृष्ट्या प्रचारासच अधिक मान दिला पाहिजे, कारण व्याकरणाची उत्पत्ति जर पाहिली तर ती भाषेच्या फारच मागून होते. आणि जेवढीं म्हणून शास्त्रें आहेत त्यांस तरी हीच गोष्ट लागते; कीं प्रचार आधीं; आणि मग त्यांवर विचार करून कांहीं नियम बसवून ते नियम हळू हळू पूर्ण झाले, म्हणजे तें शास्त्र होतात. असें तर खचीत झालें नाहीं, कीं वैयाकरण अध्यक्षस्थानीं बसून सर्व राष्ट्र त्याच्यापुढें हात जोडून उभें राहून त्याचीं सूत्रें त्यांनीं उतरून घेतलीं, आणि घरोघर जाऊन त्या सूत्रांप्रमाणें बिनचूक बोलण्यास आरंभ केला ! तसेंच जेथें जेथें एखादी पंचाईत पडूं लागेल तेथें तेथें बोलतांना तसेंच अर्धें थांबून वैयाकरणांकडे आले, आणि विचारूं लागले, कीं, महाराज अमुक अमुक शब्दाला विभक्तिप्रत्यय नीट लागत नाहीं, किंवा अमुका-पासून अमुक अर्थी तद्धित साधतां येत नाहीं, तर या ठिकाणीं तुह्मी काय निर्णय देता तो द्या; म्हणजे त्याप्रमाणें मी एका मनुष्याशीं बोलतांना अर्धेच वाक्य टाकून आलों आहे तें जाऊन पुरतें करीन ! असा तर प्रकार खचीत झाला नाहींना ? ज्यास जसा त्या वेळेस प्रत्यय लावतां आला, किंवा प्रयोग करतां आला, तसाच त्यानें दामटला असेल यांत संशय नाहीं. लहान मुलें जेव्हां पहिल्यानें बोलूं लागतात तेव्हां ‘ करला ’ ‘ मरला ’ असे भूत-काळ, किंवा ‘बुवा’—‘बुवे’ अशा अशा प्रकारचीं अनेकवचनें वगैरे रूपें प्रयोग–सादृश्या-वरून साधतात हें पुष्कळांच्या लक्षांत असेलच; व याप्रमाणेंच पहिल्या पहिल्यानें भाषेचा उद्भव हळूं हळूं होत गेला यांत संशय नाहीं. त्या वेळेस आष्टाध्यायीच्या अमुक अमुक सूत्रावर अमुक अमुक वार्तिक आहे तस्मात् हा प्रयोग अशुद्ध आहे, असें म्हणण्यास मुळींच जागा नव्हती हें उघड आहे. तेव्हां भाषेंत व व्याकरणांत इतकें अंतर आहे ! भाषा केव्हां उत्पन्न झाली, कशी झाली, व कोठें झाली याचा विचार म्हटला म्हणजे पर्वत केव्हां उत्पन्न झाले, समुद्र केव्हां पाण्यानें भरला या गोष्टींच्या शोधाइतकाच गहन आहे ! आणि व्याक-रणांची उत्पत्ति तर सर्व भाषांची सांगतां येईल; मग कित्येकांची तर अगदीं अलीकडे झाली आहे, आणि अजून अशाही शेंकडों भाषा असतील कीं ज्यांस व्याकरणाची ओळ-खही नाहीं !

५. वरील उपपादनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, भाषा ही बहुधां अनादि आहे; तेव्हां कायद्याप्रमाणें वहिवाट जर पाहिली तर व्याकरणाच्या तर्फे फैसला न होतां प्रचाराच्या तर्फे होईल. जे प्रयोग शेंकडों वर्षें बसून गेले आहेत, कीं भाषेचा आणि त्यांचा जणों काय एकच जीव होऊन गेला आहे, त्यांस व्याकरणानें उपटून टाकण्याचा यत्न करणें म्हणजे इंजनेरास सडक बांधायाची असतां त्यानें मधील डोंगर व पर्वत उपटून दूर फेंकून देण्यासारखेंच कृत्य आहे ! ज्यांचीं मुळें अगदीं भाषेच्या मुळांइतकींच बहुतेक पोंचलीं आहेत असे प्रयोग वैयाकरणांनीं कितीही आपली शक्ति वेंचली तरी कसे निघतील !

फार झालें तर, आपल्या व्याकरणांत मोठमोठ्या डोळ्यांत भसकन जाणाऱ्या अक्षरांनीं तो अमुक अमुक प्रयोगास निषिद्ध करून त्यांवर बहिष्कार टाकील; पण रोमच्या पोपमहाराजांच्या बहिष्कारास यत्किंचित्‌ही न जुमानतां त्यांची आज्ञा एकीकडे झुगारून देऊन पृथ्वी जशी फिरतेच आहे,—फार तर काय, पण त्या युरोपियन शंकराचार्यांचा व्ह्याटिकन् नामक सुंदर मठ व प्रत्यक्ष धर्ममूर्ति स्वत: यांसही तिजबरोबर फिरावें लागतेंच, त्याप्रमाणेंच अशा जुलमी व्याकरणकर्त्यांचीही फजिती होते[1] ! वास्तवच संस्कृत वैयाकरणांचा पहिला मोठा सिद्धांत हा आहे कीं, ' प्रयोग शरणा वैयाकरणा: '. वैयाकरण हे प्रयोगाचे बांधील आहेत, त्यांच्यापुढें यांचें शहाणपण खुंटतें. ते जसे असतील तसेच घेऊन यांस चाललें पाहिजे, त्यांशीं दांडगाई करून: कांहीं उपयोग नाहीं. भाषा ही कोणी महानदीच होय. हिचा प्रवाह सतत वेगानें धांवणारा व अत्यंत उच्छृंखल असा असतो. यास्तव त्यास रोध करणारीं जीं धरणें, पूल वगैरे बांधणें तीं फार जपून बांधावीं लागतात. हीं जर तिच्या अनुरोधानें बांधलीं, अशीं कीं तिच्या स्वच्छंद गतीस तीं प्रतिबंधक न होत, तरच त्यांचा कांहीं टिकाव ! नाहीं तर वैयाकरणरूप इंजनेरांनीं आपली सगळी कर्तबगारी खर्चून जरी आपल्या मतें मोठें भक्कम काम केलें असलें, तरी एखादे दिवशीं इंजनेरसाहेब खुद्द पुलावर उभे राहून नदीवेगास हंसत असतांच वेळेनुसार धडाड होऊन नदी आपलें सामर्थ्य प्रकट करायची ! असो; तर जसें शहर नदीच्या अनुरोधानें वसतें; शहराच्या अनुरोधानें नदी वहात नाहीं; त्याप्रमाणेंच भाषेच्या अनुरोधानेंच व्याकरणानें नेहेमी चाललें पाहिजे, त्याच्या अनुरोधानें ती कधीं चालायाची नाहीं !

६. जो व्याकरण नवें करूं जाईल किंवा भाषेचें शोधन करण्याच्या वगैरे खटपटीस पडेल त्यानें वरील गोष्टी चांगल्या पक्केपणीं ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. पण त्यांकडे आपल्या भाषेंत सर्वथा लक्ष दिलेलें दिसत नाहीं. भाषेंतील रूढ शब्द, रूढ प्रयोग यांस बळेंच फिरविण्याचा आज बरींच वर्षे उद्योग चालू आहे. याविषयीं पुढें विशेषतः लिहिण्यांत येईल. सध्यां इतकेंच सुचवितों कीं, मागील कलमांत भाषेच्या प्राबल्याविषयीं जें लिहिलें तें आपल्या मराठी भाषेस तर फारच लागू पडतें. संस्कृत, इंग्लिश वगैरे भाषा व्याकरणाच्या अटकावांत आज शेंकडों वर्षे तरी आहेत. पण आमच्या मराठीस तो संस्कार नुकता नुकता लागत चालला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तिचें नियमन करण्यास्तव आमच्या पाणिनीनें उद्योग केल्यासच नुकतीं कोठें चाळीस वर्षे होत आहेत. त्याच्या आधींचा सर्व काळ तर तीस कोणतेंच बंधन माहीत नव्हतें. अजून तरी वरील दोन भाषांप्रमाणें तींत कोणी मोठे नामांकित ग्रंथकार होऊन तिचे प्रयोग त्यांनीं बसवून टाकले आहेत असेंही

---

१. वरील संबंध आमच्या साऱ्या वाचकांच्या लक्षांत येण्यासारखा नाहीं; यास्तव तो फोडून सांगितला पाहिजे. ग्यालिलिओनें पृथ्वीच्या गतीचें नवेंच मत काढल्याबद्दल त्याचा पोपमहाराजांनीं छळ केला हें सर्वांस माहीत असेलच; पण इतक्यानेंच झालें नाहीं. त्या खिस्ताच्या प्रतिनिधीनें लवकरच एक आज्ञापत्र काढलें, कीं पृथ्वीनें फिरूं नये ! ! ! या एकंदर वृत्तांतावरून खिस्ती धर्मानें अंगीं येणाऱ्या शांतीचें व ज्ञानाचें स्वरूप उत्कृष्ट दृष्टीस पडतें !

झालें नाहीं. तिचा प्रचार अजून बहुधा स्वच्छंद वृत्तीचाच आहे. यास्तव तिला जीं बंधनें करायाचीं तीं फार जपून केलीं पाहिजेत. तरच तीं कांहीं निभावून भाषेचें हित होईल.

७. आपल्या भाषेच्या मूळ भाषा ह्मटल्या ह्मणजे बालभाषा, संस्कृत, फारशी व आरबी या होत; यास्तव तिची लेखनपद्धति बसविण्यास या चारी भाषांचें चांगलें ज्ञान अगोदर अवश्य पाहिजे. हे अजूनपर्यंत कोणीं ह्मणण्यासारखें संपादन केलेलें आह्मांस माहीत नाहीं. आलीकडे युनिव्हर्सिटीच्या परीक्षांत संस्कृत घातल्यामुळें त्याचा प्रचार बराच होऊन हें एक अंग पुष्कळांस साध्य झालें आहे खरें. पण याखेरीज बाकीच्या तिहींचें ज्ञान फारच थोडक्यांस असेल. मोलस्वर्थच्या कोशांत मात्र शब्दव्युत्पत्ति देतांना वरील भाषांतील मूळचीं रूपें पुष्कळ ठिकाणीं दिलीं आहेत. पण त्यावर आज सुमारें पन्नास वर्षांत याविषयीं कोणीं यत्किंचित्‌ही विचार केला आहेसा दिसत नाहीं. आह्मीं सहाव्या अंकाच्या शेवटीं ज्या थोड्या चुका दाखविल्या आहेत त्यांवरून पहातां या कोशांत फेरफार करण्यास बराच जागा अजून असेल यांत अगदीं संशय नाहीं, असें आह्मांस वाटतें. तर आमच्या भाषेच्या हितचिंतकांस आह्मी येथें इतकेंच सुचवितों कीं, ज्यांस वरील भाषांचें ज्ञान असेल त्यांनीं तें प्रस्तुत विषयास लावून तिची व्युत्पत्ति व लेखनपद्धति हीं जर सुधारलीं तर त्यांच्या ज्ञानाचें चांगलें चीज होणार आहे!

८. आतां प्रस्तुत विषयाचीं तीन सदरें करून त्यांविषयीं विचार करूं. एक वर्णशुद्धि, दुसरी शब्दशुद्धि आणि तिसरी वाक्यशुद्धि. वर्णशुद्धि ह्मणजे मराठी भाषा सध्यां जशी लिहितात ती तऱ्हा बरोबर आहे कीं नाहीं; असाच शब्दांविषयीं व वाक्यांविषयींही विचार करायाचा.

९. वर्णशुद्धीविषयीं एकंदरींत पहातां सध्यांची पद्धत बहुत करून बरोबर आहे असें आह्मांस वाटतें. वीस पंचवीस वर्षांपूर्वीं 'स्थ' च्या जागीं 'स्त,' 'च' चा दंततालव्य उच्चार कर्तव्य असतां त्याच्या मागें टिंब द्यायचें, वगैरे जे विलक्षण प्रकार चालू होते ते आतां कोठेंही दृष्टीस पडत नाहींत. इंग्रेजींतील 'ट' 'ड' याच्या जागीं 'त' 'द' असें लिहिण्याचा परिपाठही आलीकडे अंमळ माजीच पडला असें दिसतें. 'स्कातलंद' 'ग्रान्स्लेतर' 'वाशिंग्तन्' वगैरे रूपें सरकारी मराठी पुस्तकांतून व मिशनरींच्या ग्रंथांतून अगदीं नेहेमी आढळतात खरीं. पण बाकीच्या पुस्तकांतून वरील नियम तितका अबाधित चालत नाहीं. 'इंग्लंड,' 'आक्टोबर' अशींच रूपें बोलण्यांत व लिहिण्यांत आलीकडे चालू झालीं आहेत हे वरील तिन्ही फेरफार फार समंजस झाले. तरी अद्याप कित्येक शब्दांविषयीं

---

१. हा विलक्षण प्रघात कशामुळें पडला असेल तो असो! 'इंग्लंड' शब्दाचें 'इंग्लंद' असें जें रूपांतर करायाचें तें मराठींत 'ड' नाहीं ह्मणून, किंवा तसा उच्चार आह्मी नेहेमी करतों ह्मणून, काय असेल तें असो! आमच्या लिपींत तर 'ड' आहेच, व इंग्रेजी शब्दांचाही उच्चार 'बटाटा,' 'पोष्ट,' 'अलिप्टन,' असाच आमचे लोक करीत आले आहेत. एक मात्र कारण दिसतें, कीं इंग्रेजींत 'त' नसल्यानें Calcutta असें इंग्रेज लोक त्या शब्दाचें रूपांतर करतात, तेव्हां असे शब्द पुनः मराठींत आणले असतां 'ट' चा पुनः 'त' करावा लागतो. पण या इंग्रेजी लिपीच्या उणिवेबद्दल मराठीला काय ह्मणून तिसऱ्या ठिकाणीं प्रायश्चित्त!!

लिहिण्यांत घरसोड दिसते. उदाहरणार्थ ' पाहणें, ' ' पाणी '. पहिला शब्द कोणी 'पहाणें' असाही लिहितात; व दुसऱ्यावर बहुधां कोणी अनुस्वार देत नाहींत. पण हे शब्द मूळ कशापासून अपभ्रंश पावले आहेत हें जर पाहिलें, तर ' पाहणें,' ' पाणीं ' हेंच बरोबर आहे असें सर्वांच्या लक्षांत येईल. पहिल्याचें मूळ रूप ' पश्य ' असें आहे; तेव्हां ' साप,' ' आख ' याप्रमाणें यांचा अपभ्रंश ' पाह ' असाच होईल; ' पहा ' असा कदापि होणार नाहीं. तसेंच ' पानीयम् ' याच्या शेवटीं नासिक्य वर्ण असल्यामुळें ' रामें,' ' गांव,' 'में' याप्रमाणेंच ' पाणीं ' असें लिहून अनुस्वार ठेवणें बरोबर आहे. असो; तर याप्रमाणें मूळ व्युत्पत्तीचा जर विचार केला, तर पुष्कळ शब्दांचीं शुद्ध व ग्राह्य रूपें कोणतीं तीं चांगलीं समजतील. आतां वरच्याशिवाय आणखी एक वर्णशुद्धीविषयींचा प्रकार सांगणें राहिला आहे. तो हा कीं, एरवीं लोक सामान्यतः जसा उच्चार करतात त्यास अनुसरून न लिहितां भलतेंच रूप लिहिणें. जसें, ' सोई ' ' सवई ' ' रुचिकर ' ' तव्यत ' इत्यादि. हेच शब्द जसे आपण ह्मणतों तसेच ह्मणजे अनुक्रमेंकरून ' सोय ' ' सवय ' ' रुचकर,' ' तब्येत ' असेच लिहिणें विशेष प्रशस्त आहे असें आह्मांस वाटतें.

१०. दुसरें सदर शब्दशुद्धि. हीविषयींही सध्यां बराच घोंटाळा आहे. मराठींत संस्कृतांतूनच जे शब्द आले आहेत त्यांचीं कोणी मुळाप्रमाणेंच शुद्ध रूपें लिहितात व कोणी मराठीप्रमाणेंच लिहितात. तरी ज्या ग्रंथकारांस मानमान्यता आहे ते बहुधां पहिलीच पद्धति उचलतात; दुसरीस अनुसरणारे थोडे, आणि ज्यांस विशेष मान नाहीं असे. उदाहरणार्थ ' जन्म ' शब्द घ्या. हा संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे, आणि मराठींत पुल्लिंगी आहे, तरी ' त्याचा जन्म झाला ' असें न ह्मणतां ' त्याचें जन्म झालें ' असें लिहिण्याचा सध्यां बहुधां अगदीं परिपाठ पडून गेला आहे. ' जें वस्तु,' ' ती वीणा,' किंबहुना ' तो स्वप्न ' असेंही कोणी अगदीं संस्कृताच्या पद्धतीवर पडून लिहितात. पण हा प्रकार आमच्या बुद्धीनें सर्वथा प्रशस्त नव्हे. एक तर मराठी भाषा संस्कृताहून भिन्न आहे; यास्तव ही तिची भिन्नता जितकी कायम राहील तितकी अवश्य राखली पाहिजे. नाहीं तर फारशी भाषेविषयीं जसें सांगतात कीं ती अर्धीमुर्धी आरबीच आहे; त्याप्रमाणें आपल्या भाषेची दशा होऊन तिचें स्वातंत्र्य नष्ट व्हावयाचें. दुसरें, जर याप्रमाणें मूळ संस्कृत शुद्ध ह्मणून त्याचेंच अनुसरण करण्यास एकदां आरंभ केला, तर मग हा प्रकार चालवावा तरी कोठपर्यंत? शेंकडों शब्दांचीं रूपें बदलून टाकून त्यांस नीटनेटकें करावें लागेल! ' मी जेवणा अनंतर निजतों ', ' हें घडणें दुरापास्त आहे,' ' ही तुला कोठून अवदशा आठवली? ' ' मला स्वप्न पडला ' ' त्यानें वीणा वाजविली ' ' इंग्लंडांत विदुषी स्त्रिया पुष्कळ आहेत ' असे प्रयोग करणें भाग पडून सगळी भाषाची भाषा उसकटावी लागेल. शिवाय, संस्कृतापासून आलेल्या शब्दांस याप्रमाणें पूर्वस्थिति दिली तर मग फारशी व आरबी शब्दांनीं तरी काय केलें आहे! त्यांचींही मूळचीं रूपें व मूळचे अर्थ पुनः आणावे लागून सगळा येथून तेथून गोंधळच गोंधळ होऊन जाईल. तेव्हां प्रशस्त मार्ग हाच दिसतो कीं, जशीं रूपें एकदां भाषेंत रूढ होऊन गेलीं आहेत तशींच कायम राखावीं. ज्यांस संस्कृत, फारशी किंवा

आरबी भाषा पूर्ण अवगत आहेत त्यांस सध्यांचीं मराठींतील विलक्षण रूपें व विलक्षण अर्थ पाहून मनास नीट वाटणार नाहीं, व तीं पुनः पहिल्यासारखीं करावींशीं वाटतील; पण तशा शब्दांचें जर नुसतें सध्यांचेंच रूप मनांत आणलें तर कांहीं विलक्षण वाटणार नाहीं. पहा कीं, 'त्याला रूपवान् बायको मिळाली' हें वाक्य 'त्याला चांगला बायको मिळाली' यासारखेंच वस्तुतः अशुद्ध आहे, व ह्मणूनच दुसरें वाक्य मराठी जाणणाऱ्या मनुष्यास जसें कानास अतिशय वाईट लागेल, तसेंच पहिलें संस्कृतज्ञास लागेल यांत आश्चर्य नाहीं! तरी तें केवळ प्रचारांत आलें असल्यामुळें त्यास अगदीं काढून टाकणें आह्मांस बरोबर वाटत नाहीं. ज्या संस्कृतज्ञास तें अगदीं दुःसह होत असेल त्यानें त्या वाक्याकडे केवळ मराठीच्या दृष्टीनें पहावें, ह्मणजे त्यांस त्यात कांहीं वावगें दिसणार नाही. तें असें कीं, 'त्यांस सुंदर बायको मिळाली' यांत जसें कांहीं वाईट नाहीं, तसेंच 'सुंदर' या जागीं 'रूपवान्' हा शब्द केवळ विशेषणाप्रमाणें घातला आहे असें जर पाहिलें, तर त्यांत काय वांकडें आहे! तर याप्रमाणें चालू असणारीं रूपें जशींचीं तशींच ठेवणें आह्मांस बरें वाटतें. फार तर काय, पण 'तिकीट,' 'नाटपेट' 'गव्हार' वगैरे अगदीं आलीकडे सुरू झालेल्या इंग्रेजी शब्दांचींही रूपें बिघडविणें आह्मांस नीट वाटत नाहीं. असो; तर हें दुसरें कारण झालें. तिसरें असें कीं, वर सांगितलेला प्रकार सोपा असल्यामुळें तो सर्वांस साध्य आहे, व यामुळें भाषेंत जो एकदां चोहोंकडे जम बसून जाईल तो जाईल. लेखनशुद्धि ही एकदां रूढीवर ठरली, ह्मणजे अमुक शब्द कसा लिहावा यांविषयीं कोणास यत्किंचित्ही पंचाईत पडणार नाहीं. त्या त्या शब्दाचा जसजसा उच्चार होत असेल तसतसा तो खुशालपणें लिहावयास सांपडेल. त्यास संस्कृताचा किंवा आरबीचा अभ्यास करण्याची मुळींच गरज पडणार नाहीं.

याप्रमाणें शब्दशुद्धीविषयीं विचार कर्तव्य असतां रूढीवरच बहुधां अवलंबन करावें हें अनेक कारणांनीं प्रशस्त होय असें आह्मांस वाटतें. तरी प्रसंगविशेषीं वरील नियम मोडल्यास कांहीं हरकत नाहीं. 'मध्यान्हरात्र,' 'अहोरात्र अहोदिवस,' 'परस्वाधीन' वगैरे जे मुळींच अर्थासंगतीचे शब्द आहेत ते काढून 'मध्यरात्र,' 'अहोरात्र' 'पराधीन' वगैरे शुद्ध रूपें त्यांच्या जागीं घालावीं यास आह्मी कबूल आहों. तसेंच 'अंधःकार,' 'हाहाःकार,' 'दीपोत्साह' वगैरे शब्दांचीं 'अंधकार,' 'हाहाकार' 'दीपोत्सव' अशीं व्याकरणरीत्या शुद्ध रूपें लिहावीं हेंही आह्मांस ठीक वाटतें. तसेंच आलीकडे अगदीं नवे शब्द जे साधले असतील किंवा यापुढें साधावे लागतील त्यांविषयींही शुद्धाशुद्धतेबद्दलचा विचार करण्यास आपण मुखत्यार आहों. पण जे एकदां रूढ होऊन बसले त्यांशीं दांडगाई करण्यांत आह्मांस मोठासा शहाणपणा वाटत नाहीं. येवढे पाणिन्यादि समर्थ व्याकरणकार पण त्यांसही छांदस व आर्ष प्रयोगांपुढें हात जोडावे लागले, व 'पृषोदरादित्वात्संभुः',

१. ज्या शब्दांच्या व्युत्पत्तीचा कांहींच थांग लागत नाहीं त्यांस ढकलून देण्याकरितां वरील वर्ग संस्कृत वैयाकरणांनीं एक जबरदस्त करून ठेवला आहे. वरील सूत्राचा अर्थ असा कीं, 'पृषोदर' या अव्युत्पन्न शब्दाचेंच हें बांड, मग यास व्युत्पत्ति कसची! रोम्युलसानें चोर, दरवडेखोर, खुनी अशा मनुष्यांकरतां केलेली गुहाच ही!

अशा प्रकारच्या हिकमती कराव्या लागल्या. इंग्रेजींतही असा घोंटाळा नाहींसा नाहीं. पण हेंचसें काय, सर्व भाषांत तो वस्तुगत्याच असायाचा. वैयाकरणाच्या मनांत साऱ्या भाषेंत जिकडे तिकडे उत्कृष्ट व्यवस्था होऊन वेडें वांकडें कोठें कांहीं दिसूं नये असें असतें. पण तें होतें कसें ? नदी जशी उगमापासून निघाली कीं जिकडे तिला सखल प्रदेश सांपडेल तिकडेच वहात जाते, व तिचें पात्र पुढें मोठें होऊन जसें तुफान वाहूं लागतें, त्याप्रमाणेंच भाषेचीही गोष्ट आहे. तिच्या उच्छृंखल वेगास जर बळेंच रोध करण्याचा प्रयत्न केला, तर तो सिद्धीस जाईलच असा बिलकुल नेम सांगवत नाहीं. शंभर वाटेनें अशा बांधाऱ्यांची गति नर्मदा, कृष्णा वगैरेंचा बोभाट जसा वरचेवर ऐकूं येतो तशीच व्हावयाची !

११. तिसरें सदर वाक्यशुद्धि. मराठींत प्रयोगांचा घोंटाळा किती आहे तो पुष्कळांस माहीत असेलच. 'बाजीरावास पुणें द्यावें लागलें' इत्यादि प्रयोगांची बाटाघाट आज कित्येक वर्षें चालू आहे; तरी त्यांविषयीं अजून पक्का निश्चय कोणताच होत नाहीं. तसेंच 'त्यानें त्या पोरीस मारिली,' 'मी अंघोळ केलों' 'त्यानें तुला लहानाचा मोठा केला,' 'तुह्मी जेवलांत ?' वगैरे विलक्षण प्रयोगांविषयींही मोठाच वाद आहे. मराठी भाषेचें नियमन करण्यांत अग्रभागीं गणण्यास योग्य अशा एका गृहस्थानें वरील प्रयोगांस केवळ अशुद्ध ठरवून त्यांस आपल्या नजरेखालून जाणाऱ्या ग्रंथांत बिलकुल थारा दिलेला नाहीं. हें त्याचें मत व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे. कां कीं, वरील प्रयोग शुद्धरीतीनें ह्मटले ह्मणजे, 'त्यानें त्या पोरीस मारिलें' अ० 'त्यानें ती पोर मारली,' 'मी अंघोळ केली,' 'त्यानें तुला लहानाचें मोठें केलें,' 'तुह्मी जेवलां ?' असेच असावे. तसेंच 'तो पुराण पठन करतो,' 'माझें वाक्य श्रवण कर,' 'त्यानें आज चार दिवस अन्न ग्रहण केलें नाहीं' या प्रयोगांसही अशुद्धच ठरवून त्यानें त्यांचे जागीं 'तो पुराणाचें पठन करतो,' 'माझ्या वाक्याचें श्रवण कर,' 'त्यानें आज चार दिवस अन्नाचें ग्रहण केलें नाहीं' असे प्रयोग घातले आहेत. हा व्याकरणाविषयींचा येवढा पक्षपात आमच्या मतें यथायोग्य नव्हे. व्याकरणाचा हक्क एके रीतीनें खरा आहे; पण दुसऱ्या रीतीनें पहातां भाषाप्रचाराचाही तितकाच, किंबहुना अधिकही, हक्क पोंचत नाहीं काय ? या दोहोंच्या हक्कांविषयीं वर सविस्तर लिहिलेंच आहे, व व्याकरणासच सर्वथा अनुसरलें असतां केवढ्या अडचणी प्राप्त होणाऱ्या आहेत हेंही आमच्या वाचकांस मागील लेखावरून पुरतेपणीं कळलेंच असेल. तेव्हां सदरहू गृहस्थानें वरील अपवादक प्रयोगांस अशुद्धच ह्मणून जें निखालस ठरवलें आहे तें आह्मांस मान्य नाहीं. व्याकरणदृष्ट्या ते अशुद्ध होत हें आह्मी अजून कबूल करतों, पण रूढिदृष्ट्या ते अत्यंत शुद्ध आहेत. ज्याची व्याकरणावर मोठी भक्ति असेल त्यानें वरील प्रयोग व्याकरण-शुद्धरीतीनें हवे तर लिहावे; पण रूढीस अनुसरून हजारों सुशिक्षित लोकांच्या बोलण्या-प्रमाणें व अभियुक्त कवींच्या लेखांप्रमाणें जरी त्यानें वरीलच प्रयोग लिहिले, तरी त्यांस अशुद्ध ह्मणण्यास कोणासही अधिकार नाहीं !

वर 'अभियुक्त कवींच्या लेखांप्रमाणें' असें ह्मटलें आहे त्यावर एक मोठा आक्षेप निघण्यासारखा आहे. त्याचें येथें समाधान केलें पाहिजे. मराठी कवींच्या मालिकेंत कवि-

त्याच्या संबंधानें ज्याची गणना मोठी आहे, व शुद्धतेविषयीं तर जो सर्वांत पहिलाच गणिला पाहिजे, त्या मोरोपंताच्या कवितेंत व्याकरणाविषयीं व संस्कृताविषयीं मोठा पक्षपात आढळतो. वर ज्या प्रयोगांच्या कैवारानें आह्मीं लिहिलें ते वरील नामांकित कवीनेंही आपल्या ग्रंथांतून काढले आहेतसें दिसतें—

पार्थ ह्मणे "तूं मुनिनीं चित्तीं पदरिक्षयार्थ धरिलास!" उद्योगपर्व १.
वरिलासि मत्सखीनें ज्यांही वरिलासि तूं मनें...। आदिपर्व १०.
जाउनि तो सूत वदे कृष्णे घृतांत तूं स्वयें धर्में!
हारविलीस सुयोधनसद्नाप्रति ये करावया कर्में॥ सभापर्व ४.

इत्यादि रूढीविरुद्ध व शुद्ध व्याकरणास अनुसरून केलेले प्रयोग सर्वांस माहीत असतीलच. याप्रमाणेंच एकंदरींत संस्कृत व्याकरणाच्या शुद्ध पद्धतीवर मराठी भाषा नेण्याचा प्रस्तुत कवीचा रोंख जेथें तेथें दृष्टीस पडतो—

(१) ऐसा स्वप्न विलोकुनि तो श्रीमान् कर्ण जाहला जागा। वनपर्व १४.
कृपभोजद्रौणि तिघे पाहुनि राजासि दीन आरडले।
ते राजदार जैसे तैसे तेही ह्मणोनि हा रडले॥ स्त्रीपर्व १.
पांडवगुणवर्णन तें विदुरमनोधारणार्थ हें साचें।
वरि सरस आंत नीरस मद्भाषण मित्र होय फेंसाचें॥ आदिपर्व ३५.
वास करुनि परमात्मा सकळां भूतांत एक पूर्ण वसे।
जो तोचि आपणांत हि आकाश जसा घटांत तेंवि असे॥ मंत्रभागवत ११.
तों ये तेथ पहावयासि उदरीं ज्याचें तिच्या जन्म ती। बृहद्दशम ५५.
दुर्योधन पंचाक्षरिमंत्रें परमोग्रभूतसा खवळे। सभापर्व ३.
सावध होउनि करिसिल जरि लोकप्रत्ययार्थ हे शपथ। भारती रामायण.
(२) ते नंदयशोदोद्भवे[1] रात्रीला नेणतीच सरलीला। भागवत १०.
(३) स्मरोनि कृतमंतुलों न कविता वधू-स्वीकृती
कराल तरि आयका प्रभु खराच मी दुष्कृती। केकावली.
घाली घृतांत सैंधव दुग्धीं जंबीर पायसीं कथिका।
मथि कामशर जया त्या राम ह्मणे साधुमोक्षसत्पथिका॥ बृहद्दशम ८६.
(४) त्वां हे पांच पति कसे वश केले भजति सर्व एकीतें
थोडें याहुनि पाहुनि नटती[3] कादंबिनीस केकी तें॥ वनपर्व ६.

वरील सर्व प्रयोगांवरून मोरोपंताचा एकंदर रोंख तेव्हांच दृष्टीस पडतो. तो अर्थात् हाच कीं, मराठी भाषेस जितकी व्याकरणशुद्धता आणतां येईल तितकी आणायाची. पण

---

१. 'नंदयशोदोद्भव' हा द्वंद्वसमास होय. याचा संस्कृतांत असा नियम आहे कीं, शेवटल्या पदाचें लिंग साऱ्या समासास लागतें. या नियमासच अनुसरून सगळा सामासिक शब्द येथें पुल्लिंगी करून 'ते' या पुल्लिंगी बहुवचनान्त सर्वनामाशीं कवीनें अन्वय केला आहे.

२. हा प्रयोगही संस्कृताच्या पद्धतीवरच केला आहे. संस्कृतांत 'राजानें त्यास प्रधान केला,' 'मनुष्यानें सुज्ञ असावें' असे प्रयोग न होतां 'राजानें त्यास प्रधानास केला,' 'मनुष्यानें सुज्ञानें असावें' असे होत असतात. असाच प्रकार वरील दोन पद्यांत केला आहे.

३. 'नट्' नाचणें या संस्कृत धातूवरून वरील क्रियापदाचा अर्थ 'नाचतात' असा होतो. संस्कृताच्या पद्धतीवर केलेल्या अशा प्रयोगास Sanscritism असें इंग्रेजींत ह्मणतां येईल.

इतकेंच नव्हे; वरील उदाहरणांवरून हेंही सहज लक्षांत येईल कीं, संस्कृतांतील व्याकरण-प्रयोगही मराठी कवितेंत आणण्याचा त्यानें यत्न केला आहे. हें पूर्वीच्या एकाही मराठी कवीनें मुळींच केलें नसल्यामुळें या शेवटल्या कवीचा यांत मोठा धटिपणा उघड दिसतो. पण हेंचसें काय; प्रस्तुत मालेच्या चवथ्या अंकांत सांगितल्याप्रमाणें आमचे बाकीचे महाराष्ट्र कवि बहुतेक सारे व्याकरणापासून केवळ अलिप्त होते असें ह्मणण्यासही कांहीं हरकत नाहीं. त्यांत अगोदर विद्वान् ह्मणण्यासारखे तीन चारच निघतील; आणि व्याकरणास बुद्धिपुरःसर अनुसरलेला आह्मांस एक मोरोपंतच दिसतो. बाकीच्यांची कोणाचीही व्याकरणाकडे तशी करडी नजर दिसत नाहीं.' असो; तर हा महाप्रसिद्ध कविही आमच्या पक्षाचा आहे असा वाद करण्यास वरील लोकांस सवड राहून ते ह्मणतील कीं, ज्या अर्थी या कवीनेंही असे शुद्ध प्रयोग मराठींत बरेंच घातले आहेत, त्या अर्थी यापुढें आपणही

---

१. वामनपंडिताच्या ग्रंथांतून जागोजाग अशुद्धें आढळतात—

कैकयीच्या ये गृहा सानुरागें ।
दे भूमी विप्रप्रवरोत्तमातें ।
करी बळीं स्वात्मनिवेदनातें ।
असा मी त्या मातें पुनित करिशी तूं जननिये ।
बस तुं मौन्यपणें अथवा उगा ।

या शेवटच्या एका लहानशा चरणांत तर बहुधा शब्दांइतक्याच चुका आहेत—(१) 'तुं' याबद्दल 'तूं' असावें. (२) 'मौन्य' हा शब्द अगदीं अशुद्ध आहे, खरा शब्द 'मौन' ('मुनि' पासून तद्धित) होय. (३) तो विशेषण नव्हे, यास्तव 'पण' हा प्रत्यय त्यास लागणें नाहीं. (४) 'अथवा उगा' याचा कांहींच अर्थ दिसत नाहीं—'मौन धर' आणि 'उगा बस' हीं दोन्ही केवळ समानार्थक होत !

रघुनाथपंडितांतही 'नाडीज्ञान जयाचें,' 'करुनि मज रवाना' वगैरे भाषाशुद्धीकडे बरेंच दुर्लक्ष आढळतें.

असो; वर इतर कवींचे दोष दाखविले त्याप्रमाणेंच खुद्द मोरोपंताचेही कांहीं दाखविले पाहिजेत. हें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस बहुधा अशक्य वाटेल. कां कीं, या शेवटच्या कवीचा वर सांगितल्याप्रमाणें व्याकरणशुद्धतेविषयीं ह्मटला ह्मणजे मोठाच बाणा आहे, व तसा त्याचा लौकिकही आहे. परंतु पुढें पहा—

ऐसें ह्मणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी ह्मणे अयि ते ।
कथमेवमुक्तमदयं त्वदयं किमनुष्ठितुं क्षमोदयिते ॥ आदिपर्व २९.

'अनुष्ठितुं' ही अर्थातच मोठी चूक आहे. शुद्ध रूप 'अनुष्ठातुं' हें होय. पण 'अनुष्ठित' या भूतकालवाचक धातुसाधितावरून आपला कवि येथें चकला !—

तसेंच एके ठिकाणीं 'पुनीत' असें अशुद्ध रूप वाचल्याचें आह्मांस आठवतें. स्थल पक्कें माहीत नाहीं, तें अर्थातच 'पूत' असें असावें, 'पुनाति' या रूपावरून कवि फसला हें उघडच आहे. अथवा वरील वामनपंडिताच्या चरणावरूनही ही चुकी झाली असल्याचें संभवतें.

मोरोपंताची व्युत्पत्ति केवळ पुराणिकाइतकीच असल्यामुळें वरील चुका त्याच्या हातून घडल्या यांत कांहीं आश्चर्य नाहीं ! आतांप्रमाणें लहान सुलभ व्याकरणग्रंथ त्या वेळेस नव्हते हें लक्षांत आणलें पाहिजे. तसेंच 'वैयाकरणास्तृणवः' ही गम्मतही आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस बहुधा माहीत असेलच ! !

तोच क्रम चालवला असतां कांहीं काळानें रूढीही फिरवून टाकतां येईल. हें म्हणणें सकृद्दर्शनी कोणास समंजस वाटेल; पण वास्तविक पाहिलें असतां कळून येईल कीं, ही केवळ भ्रांति आहे. गद्य भाषेत व पद्य भाषेत नेहेमी फार अंतर असतें. दोहोंचे नियम अगदीं निराळे; एकांत असा प्रयोग करतात म्हणून दुसऱ्यांत तो केला असतां कधीं शोभणार नाहीं. मोरोपंतानें वरील प्रयोग जरी आपल्या काव्यांत निर्भयपणें केले आहेत, तरी बोलण्याचालण्याच्या भाषेंत ' मीं तूं मारिलास,' त्याचें मी धरलों,' ' मीं असा स्वप्न पाहिला,' ' तो माझा मित्र आहे,' ' त्यानें त्याला शहाण्यास केलें ' असे प्रयोग तो करीत असेल काय ? इंग्रजांत ऱ्हस्वाचें दीर्घ, दीर्घाचें ऱ्हस्व हवें तसें छंदोऽनुरोधानें करतात, म्हणून बोलतांनाही तसेंच काय ? कालिदासानें

*तं पातयां प्रथममास पपात पश्चात् । —रघुवंश

असें काव्यांत घातलें म्हणून तो नेहेमीच्या बोलण्यांतही आपला निरंकुशत्वाचा[1] हक्क चालवीत असेल काय ? अर्थातच नाहीं. तेव्हां पद्यरचनेंतील प्रयोगांवरून गद्यांतील प्रयोगांस कांहीं आधार मिळत नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, कवींचा एकंदर परिपाठच आहे कीं, बोलण्याचालण्याच्या भाषेपासून जितकी करवेल तितकी कवितेची भाषा निराळी करावयाची. प्रकृत व्यवहारांत जी नेहेमी भाषा चालू असते तिच्याच रूपानें कविता लिहिल्यास ती केवळ हास्यास्पद दिसते. यास्तव विभक्तिप्रत्ययांत, वाक्यरचनेंत वगैरे जेथें तेथें कवितेचें स्वरूप गद्याहून नेहेमी भिन्न करतात, व छंदोऽनुरोधानें वगैरे तें आपोआपही होतेंच. मिल्टन् कवीच्या 'प्यारडैस' ' लॉस्ट ' काव्यावर आडिसन नामक प्रख्यात निबंधकारानें जे सर्वप्रसिद्ध निबंध लिहिले आहेत त्यांतील एकांत त्यानें कवितेची भाषा प्रौढ करण्याचे दोन तीन उपाय सांगितले आहेत. त्यांतील एक हा आहे कीं, परभाषेंतील प्रयोग आपल्या भाषेंत घ्यावे; कीं तेणेंकरून काव्यरचना गद्याहून निराळी होऊन त्या भाषेचा प्रौढपणा आपल्या भाषेंत उतरतो. आपल्या मराठीस जशी संस्कृत तशी इंग्रेजीस ल्याटिन् भाषा होय; यास्तव मोरोपंताप्रमाणें मिल्टन् कवीनें त्या प्रौढ भाषेंतील प्रयोग आपल्या काव्यांत कित्येक जागीं उतरले आहेत. आतां आपल्या कवीनें आडिसनचे निबंध न वाचतां वरील गोष्ट त्यास कशी सुचली, याचें आमच्या वाचकांस कदाचित् मोठें आश्चर्य वाटेल; त्यांतून विशेषतः काय झालें आहे कीं, तसा प्रयत्न पूर्वीच्या मराठी कवींतून कोणींही–खुद्द वामनपंडितानेंही–बिलकुल केला नाहीं. पण वर सांगितलेल्या दुसऱ्या कारणावरूनच या शंकेचें समाधान होईल. म्हणजे आडिसन यानें निबंध लिहिण्यापूर्वीच जसा तो प्रकार तिकडे मिल्टन् यानें केला, तसाच इकडे इतक्या अंतरावर आपल्या कवीनेंही केला; आडिसनचे निबंध नवल्यामधेंच राहिले ! वस्तुतः जर पाहिलें तर वरील गोष्टीचें कारण असें आहे कीं, नियम हे सामान्य मनुष्यांच्याच उपयोगार्थ होत; जे जात्याच महाबुद्धिमान् असतात त्यांस अन्य-

---

* " प्रथम त्याला पाडलें, मग ( आपण ) पडला. " —संपादक.

१. ' निरंकुशाः कवयः ' ' कवि जे जे प्रयोग करतील ते ते चालणारे आहेत ' अशी संस्कृतांत एक म्हण आहे. इंग्रेजींत याच अर्थी Poetical license म्हणतात.

स्कृत नियमांची मुळींच गरज पडत नाहीं. त्यांचेंच स्वतउद्‌भूत ज्ञान त्यांस नियमांच्या जागीं होतें. 'लीलावतीनां सहजा विलासाः' 'स्त्रियांचे विलास त्यांस आपोआप प्राप्त होतात' असें भर्तृहरीनें ह्मटलें आहे. तीच गोष्ट वरच्यांसारख्या महाकवींस लागते. ह्मणजे स्त्रियांस यौवनदशा आली असतां विलास जसे मागून आपोआप आलेच, त्याप्रमाणेंच कवींची बुद्धि एकदां प्रौढदशेस आली कीं, तिचे जगास मोहनी घालणारे विलासही सहजच प्रकट होतात! तीस शिक्षणाची गरज पडत नाहीं.

असो; तर या दोन कारणांवरून मोरोपंतानें आपल्या कवितेंत कसेंही व्याकरण आणलें असलें, तरी तें चालू गद्य भाषेस अगदीं उपयोगीं पडणार नाहीं. काव्य रचणारांनीं हवी तर त्याची पद्धति पुढें चालवावी; पण गद्यरचना करणारानें तीस अनुसरतां कामा नये. जी वेडी वांकडी रचना कवितेस शोभा देते तीच गद्यास हास्यास्पद मात्र करील. ठीकच आहे; पहा कीं, कलावंतीण आपल्या गायनानें व नृत्यानें रसिक विलासी जनांस तल्लीन करून टाकते; ह्मणून नेहेमी बोलतांनाही जर ती गाऊनच बोलेल किंवा एरवीं चालतांना नाचतच जाईल, तर तें उपहासास्पद होणार नाहीं काय? हीच गोष्ट भाषेस लागते. कविता-रूपानें ती प्रकट झाली असतां जे जे विलास ती करील ते ते तीस शोभतच जातील, व तितकी तितकी तिचे ठायीं रममाण होणाऱ्या रसिकांस ती अधिकच प्रिय होईल; पण एर-वींच्या गद्य रूपास ह्मटलें ह्मणजे तिचें स्वरूप जितकें सरळ व साधें असेल तितकें चांगलें!

१२. याप्रमाणें मागें केलेल्या तिन्ही सदरांचा विचार झाला. या महत्त्वाच्या विषयावर आजपर्यंत ऊहापोहपूर्वक कोणींच विचार केलासा दिसत नाहीं; यास्तव प्रकृत निबंधांत त्यासंबंधानें जे कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत त्यांकडे आमच्या भाषेच्या मार्मिक ज्ञात्यांनीं चांगलें लक्ष पुरवावें अशी त्यांस आह्मी सूचना करतों. हा अशा संबंधाचा पहि-लाच लेख आहे, यास्तव आमच्या लक्षांत न आलेल्या गोष्टी यांत कित्येक घालायाच्या राहिल्या असतील; किंवा घातल्या आहेत त्यांत फेरफार करणेंही कदाचित् जरूर पडेल. तरी सदरील निबंधानें या अगत्याच्या विषयाकडे जर आमच्या लोकांचें लक्ष लागेल तर तेवढेंही आह्मांस बस्स आहे. असो; आतां या अंकांत एकंदर आपणाकडून आह्मीं काय सिद्ध केलें तें थोडक्यांत सांगतों. भाषेचें ह्मणजे पडून गेलेल्या रूढीचें सामर्थ्य केवढें आहे व त्यापुढें व्याकरण किती पंगु, हें दाखवून तीस अटकाव करूं जाणें हें किती वेडेपणाचें काम आहे तें दर्शविलें. त्यावरून असें समजायाचें कीं, जेथें रूढीचा आणि व्याकरणाचा विरोध पडतो तेथें 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' 'शास्त्राहून रूढि प्रबळ आहे' याच वचनास प्रायः अनु-सरणें उत्तम. तसेंच वर्ण, शब्द, किंवा वाक्य हीं कशीं लिहावीं असा जेथें ह्मणून संदेह पडेल तेथें फार करून केवळ उच्चारावरच प्रमाण धरून चालावें. हा नियम अत्यंत सयुक्तिक, साधा, आणि सोपा असून यामुळें लेखी भाषेंत चोहोंकडे एकदम मेळ बसून जाईल हें उघड आहे.

# भाषापद्धति.

अंतर्गूढानर्थानव्यंजयतः प्रसादरहितस्य ।
संदर्भस्य नदस्य च न रसः प्रीत्यै रसज्ञानाम् ॥ आर्यासप्तशती ॥

अंक २६—( १ ) विषयोपक्रम. ( २ ) मराठी भाषेची या पूर्वीची स्थिति. ( ३ ) सध्याची स्थिति. ( ४ ) भाषापद्धति. (५) उत्तम पद्धतीचे गुण—शुद्धता. (६) साधेपणा. (७) सुबोधपणा. (८) इतर गुण—अवतरण.

१. भाषापद्धति ह्मणजे बोलण्यांत किंवा लिहिण्यांत जी शब्दयोजना होते तिचा प्रकार. या विषयावर मराठींत अद्याप कोणी कांहींच विवेचन केलेलें नाहीं; फार तर काय; वरील विषयाचें स्वरूपही पुष्कळांस अद्याप माहीत नसेल. यास्तव प्रस्तुत अंकांत या चित्त-वेधक विषयाचें निरूपण करून उदाहरणद्वारा तो परिस्फुट करण्याचें योजिलें आहे.

२. भाषापद्धति ह्मणजे काय हें वर सांगितलेंच आहे. ही आमच्या साधारण लोकांस माहीत नसण्याचें कारण उघडच आहे कीं, आलीकडील वीस पंचवीस वर्षांपूर्वी आमच्या भाषेची स्थिति कांहीं विलक्षणच होती. तींत ग्रंथ ह्मटले ह्मणजे सगळे पद्यरूपच असून गद्याचा प्रकार काय तो बखरींत मात्र असे. या बखरींत इतिहासवृत्तांत, पौराणिककथा, व सिंहासनबत्तिशी, शुकबहात्तरी वगैरे गोष्टी असा विषय असे. त्या साऱ्या मोडींत लिहिल्या असून त्या लिपीच्या रीतीप्रमाणें त्यांत ऱ्हस्वदीर्घाचा, अनुस्वारांचा वगैरे अर्थातच बिलकुल विचार नसे. मग वाक्यरचना व शब्दांची आवडनिवड वगैरे गोष्टी तर दूरच राहिल्या. तर याप्रमाणें इंग्लिश वगैरे भाषांतून वाक्यरचना, विरामचिन्हपद्धति, लेखनशुद्धि, इत्यादिकांचे नियम ठरून जाऊन नंतर भाषापद्धतीचे निरनिराळे प्रकार जसे उदयास आले, त्याप्रमाणें आमच्या जुन्या मराठी भाषेंत कांहींच झालें नाहीं. संस्कृतांतील गद्य जसें पद्यरचनेच्याच घाटणीवर पुष्कळ अंशीं असून विरामादिकांचेंही त्यास चांगलेंसें बंधन नाहीं, त्याप्रमाणेंच वरील बखरींतील मराठी भाषा कांहीं कवितेच्या घाटणीवर कांहीं लोकव्यवहारास अनुसरून अशी अर्धवट होती. महाराष्ट्रराज्यकर्त्यांनीं, एक, त्यांस मुळींच न फावल्यामुळें, व दुसरें त्यांच्या मूळ पुरुषाप्रमाणें देशाभिमानाचा आवेश त्यांचे ठायीं पुढें न राहिल्यामुळें, देशभाषे-कडे ह्मणण्यासारखें कांहींच लक्ष दिलें नाहीं; स्वराज्यच होतें, त्यापक्षीं अवांतर पुष्कळ प्रकारांनीं मराठी भाषेची अभिवृद्धि झाली खरी; तरी तिची व्यवस्था होऊन तिचें नियमन होणें हें गेल्या तीस चाळीस वर्षांतच काय झालें तें झालें. या नियमनाविषयीं मागें एक दोन ठिकाणीं बरेंच लिहिलें आहे. असो; आतां मराठी भाषेची सध्यां जी स्थिति आहे तिच्या संबंधानें प्रस्तुत विषयाविषयीं विचार करूं.

३. गेल्या वीस पंचवीस वर्षांत इंग्रेजी विद्येचा इकडे पुष्कळ फैलावा झाल्यामुळें त्या भाषेच्या द्वारें अनेक विषयांचें आपल्या लोकांस ज्ञान झालें. त्या भाषेंत हरएक विषयां-

१ "ज्याचा अंतस्थ अर्थ [ विचार—पदार्थ ] स्पष्ट दिसत नाहीं व ज्यांत प्रसाद [ सुबोधत्व—स्वच्छपणा ] नाहीं अशा प्रबंधाचा व नदीचा रस [ सौंदर्य—उदक ] खरे रसज्ञ जे असतात त्यांस आनंद देत नाहीं."

वर मोटमोठ्या बुद्धिमान् पुरुषांनीं वर्षांचीं वर्षे खपून पुष्कळ उत्तम ग्रंथ लिहून ठेवले असल्यामुळें व त्यांतील अर्थनिरूपणाची तऱ्हाही इकडच्यापेक्षां पुष्कळ निराळी असल्यामुळें आमच्या नव्या लोकांस विद्येचा एक मोठा नवाच मार्ग सांपडल्यासारखा झाला. या मार्गांत ज्ञानरूप उत्तम संपत्तीचा जो त्यांस लाभ झाला तो आपल्या देशबांधवांसही करून देण्याची त्यांस सहजच इच्छा होऊन त्यांनीं देशभाषेंत ग्रंथरचना करण्यास आरंभ केला. हे जे त्यांनीं ग्रंथ केले ते तीन प्रकारचे होत. एक इंग्रेजी ग्रंथांचीं भाषांतरें; दुसरें इंग्रेजी ग्रंथांच्या आधारें तयार केलेले; आणि तिसरे इंग्रेजींतील नमुन्यावर एतद्देशीय भाषेंत नवे रचलेले असे कादंबरीनाटकादिक. याखेरीज इतर कांहीं विषयांवरही आमच्या भाषेंत ग्रंथ झाले. या सर्वांच्या योगानें भाषेचें बरेंच नियमन होऊन ती सुधारण्याच्या मार्गास लागली. अद्यापही या उत्कर्षस्थितीचा नुकता आरंभच आहे; कां कीं संस्कृत, इंग्रेजी वगैरे अभियुक्त भाषांतल्याप्रमाणें मराठींत अद्याप कोणा मोठ्या ग्रंथकारांचे ग्रंथ झाले आहेत असें नाहीं. असो; तरी प्रस्तुत विषय सुबोध करून देतां येण्याजोगे हल्लींच्या स्थितींतही तींत बरेच प्रकार आहेत.

४. प्रस्तुत विषयाकडे आमच्या लोकांचें नुकतें लक्ष लागत चाललें आहे. आलीकडे मराठी लिहिण्याचा प्रघात दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें अमुक पद्धति चांगली व अमुक वाईट असें तारतम्य अर्थातच सर्वांस भासूं लागलें आहे. मागें जसें केवळ अर्थबोधनावरच नजर देऊन लोक लिहीत असत तसें आतां नाहीं. मनांतील अभिप्राय व्यक्त करून शिवाय तो चांगल्या शब्दांनीं व खुबदार रीतीनें वाचणारांच्या मनांत भरावा अशी इच्छा बहुधां साऱ्या लिहिणारांच्या ठायीं आलीकडे वागूं लागली आहे. वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें हीं हल्लीं पुष्कळ वाढून निरनिराळ्या तऱ्हेचे ग्रंथही दर वर्षीं पुष्कळ तयार होत आहेत. यावरून मराठी लिहिण्याचा प्रघात आलीकडे किती वाढला आहे व आपल्या भाषेची अभिवृद्धिही कशी होत चालली आहे हें सहज दिसून येतें. शिवाय आलीकडे इंग्लिश व संस्कृत या भाषांचाही चोहोंकडे पुष्कळ अभ्यास वाढल्यानें आपल्या भाषेस अनेक प्रकारांनीं पुष्कळच साहाय्य झालें आहे. तेव्हां एकंदरींत महाराष्ट्र-भाषेची स्थिति सध्यां बरीच सुधरत चालल्यामुळें तींत ग्रंथरचना करणारांनीं प्रकृत विषयाकडे चांगलें लक्ष पोंचविणें अगदीं अवश्य आहे. यास्तव भाषापद्धति उत्तम कोणती, व तीन निरनिराळ्या तऱ्हा कोणत्या, याविषयीं पुढें विवेचन करून विद्यमान ग्रंथसंग्रहांतून उदाहरणें देऊं.

५. आतां पहिल्यानें उत्तम भाषापद्धतीचें स्वरूप काय याचें निरूपण करतों. ही भाषापद्धति ग्रंथरचनेच्या अनेक गुणांचें फल होय. हे गुण आतां क्रमवार सांगतों. यांत पहिला गुण ह्मटला ह्मणजे शुद्धता होय. शुद्धता ह्मणजे अगोदर वर्ण, शब्द, व वाक्य या तिन्ही प्रकारांनीं रचना निर्दोष असणें हें होय. या विषयावर प्रस्तुत मालेचा एक सबंध अंक मागें लिहिला असून त्यांत वरील तिन्ही सदरांचा बराच सविस्तर विचार केला आहे. त्यावरून वरील प्रकारची निर्दोषता ग्रंथरचनेंत आणण्यास काय करायास पाहिजे याविषयीं आमचे विचार वाचकांस कळलेच आहेत. आतां हें खरें आहे कीं, संस्कृत किंवा इंग्रेजी वगैरे परिपक्व झालेल्या भाषांस मोटमोठ्या कोशकारांनीं, वैयाकरणांनीं व महान् महान् अभियुक्त

ग्रंथकर्त्यांनी पुष्कळ परिश्रम करून जसा निश्चितपणा आणलेला आहे तसें आमच्या मराठीस अद्याप ह्मणण्यासारखें कांहींच झालें नाहीं; व त्यामुळें वरील भाषांप्रमाणें तिचे प्रयोगही ठरून गेले नाहींत. यास्तव शुद्धाशुद्धतेविषयीं पुष्कळ ठिकाणीं निर्णय झाला नसल्यामुळें लिहिणारांचा अनेक स्थळीं प्रयोगभेद आढळण्यांत येतो. असो; तरी आपल्या भाषेचा प्रचार सध्यांसारखाच पुढें जर पुष्कळ वाढत जाईल तर हल्लींची गैरसोय हळूं हळूं मोडत जाऊन तिचे ठायीं विशेष शुद्धता न आली तरी निदान निश्चितपणा तरी अधिक येईल यांत संदेह नाहीं. असो; तर वर सांगितलेल्या शुद्धतेचें हें एक अंग झालें;—ह्मणजे व्याकरणदृष्ट्या भाषा शुद्ध असावी. दुसरें अंग ग्राम्यता ह्मणजे गांवढळपणा किंवा भाषासंकर ह्मणजे परभाषेंतील प्रयोग आपल्या भाषेंत आणणें, हे प्रकार नसून रचना सभ्य व भाषासरणीस पूर्ण अनुसरून असावी हें होय. या दुसऱ्या प्रकाराविषयींही प्रस्तुत पुस्तकांतील एका अंकांत बरेंच विवरण केलें आहे. तेथें सध्यां चोहोंकडे चालू असणाऱ्या भाषासंकराचीं कारणें, त्याचें स्वरूप, वगैरेविषयीं लिहून या दोषांचें निरसन करण्यास उपाय काय तोही सांगितला आहे. तर याप्रमाणें वरील दोन्ही प्रकारचे दोष जींत बिलकुल नाहींत ती भाषापद्धति शुद्ध होय.

६. उत्तम भाषापद्धतीचा दुसरा गुण साधेपणा. हा गुण साऱ्या कलांत, किंबहुना हरएक गोष्टींत, मोठ्या शोभेस कारण होऊन यथार्थ परीक्षकांस अत्यंत मान्य होतो. तसें त्याच्या विरुद्ध गुण जें कृत्रिमत्व तें कधीं होत नसतें. जे अनभिज्ञ असतात त्यांस साधेपणापेक्षां थाटमाट जास्त आवडतो खरा; पण त्यांचीही वरील प्रीति बहुतकरून फार दिवस टिकत नाहीं. गोड अन्नाचा जसा जिभेस लवकरच वीट येतो, पण साध्या पदार्थांचें तसें कधीं होत नाहीं; त्याचप्रमाणें कोणत्याही गोष्टींत स्वभावजन्य शोभाच जशी फार वेळ टिकते तशी कृत्रिम असून जी प्रयासानें आणलेली असते ती टिकत नाहीं. हीच गोष्ट सांप्रत विषयासही लागते. जी शब्दरचना अगदीं साधी असते, ह्मणजे विवक्षित अर्थ जींत केवळ सरळ रीतीनें व्यक्त केलेला असतो, तीच रसिक वाचकांस पसंत होऊन कितीही काळ लोटला तरी तिच्या रमणीयत्वाची हानि होत नाहीं. आजपर्यंत सहस्रावधि वर्षे ज्यांची कीर्ति चालत आली आहे अशा सर्व देशांतील महाकवींच्या कृतींत वरील सरळ रचनेचा गुण स्पष्ट दृष्टीस पडतो. या गुणास संस्कृतांतील साहित्यग्रंथांत 'प्रसाद' असें पारिभाषिक नांव आहे. या लहानशा सुंदर शब्दावरून आमच्या पूर्वजांचें चातुर्य पूर्ण दिसून येतें. यांत विवक्षित अर्थाचें व्यंजकत्व किती उत्कृष्ट तऱ्हेचें आहे, व त्यावर कवित्वाची झांक तरी किती बहारीची आहे! 'प्रसाद' या शब्दाचा मूळ अर्थ 'स्वच्छपणा,' 'निवळपणा' असा आहे; व तो शरत्कालच्या वगैरे उदकास लावतात.[१] तेथून हा शब्द साहित्यकारांनी घेऊन कवींच्या सरस्वतीस लावला

१. जसें 'रघुवंश' चवथा सर्ग—

प्रससादोदयादंभः कुंभयोनेर्महौजसः ।

तसेंच मागें अंक पृष्ठ १०—

इदं तीर्थं-समं सौम्यं सुजलं सूक्ष्मवालुकम् ।
रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा ॥

निबंधारंभींच्या पद्यांत तर प्रस्तुत शब्द दोन्ही अर्थी श्लेषपर योजिला आहे.

आहे. असो; तर ज्याप्रमाणें पर्वतावरील झऱ्यांचें किंवा कित्येक उत्तम नद्यांचें पाणी निवळशंख असून पुन: खोलही असतें, त्याचप्रमाणें अवघ्या जगास आल्हादप्रद झालेल्या ज्या होमर, कालिदास, प्रभृति कवीश्वरांच्या कृति, त्यांतही प्रसन्नार्थत्व व गांभीर्य हे गुण साहचर्यानें सांपडतात. असो; गद्यग्रंथकारांचीही अशीच गोष्ट आहे. उदाहरणार्थ इंग्लिश भाषेंत पहा. हींत जे ग्रंथकार आजपर्यंत झाले त्या सर्वांत आडिसन् याची प्रमुखत्वानें गणना आहे. याचे 'स्पेक्टेटर' नामक पुस्तकांतील निबंध जेव्हां पहिल्यानें निघूं लागले तेव्हां त्यांतील सुरस, प्रौढ, व प्रसंगवशात् विनोदात्मक असणारा अर्थ, शुद्ध व सरळ भाषापद्धति, चमत्कारिक व गहन विषय, या सर्वांच्या योगानें ते सर्वांस एकदम प्रिय होऊन जाऊन तेव्हांपासून जी त्यांची ख्याति चालत आली ती आज दोन शतकें सारखी चालली आहे; व जोंवर या पृथ्वीवर इंग्लिश भाषा राहील तोंवर वरील ग्रंथकाराचे लेख बुडायाचे नाहींत असा खात्रीचा अभिप्राय मोठमोठ्यांनीं प्रदर्शित केला आहे. आडिसनूच्या पुढें जॉन्सन् गोल्ड्स्मिथ् वगैरे कित्येक मोठमोठे निबंधकार झाले, व त्यांचे निबंध आंतील मजकुराच्या संबंधानें पाहतां 'स्पेक्टेटर' पेक्षां कमी योग्यतेचे आहेत असें नाहीं; तरी सदरील निबंधांची पद्धति पहिल्यानें काढून ज्यानें लोकप्रीतीस पात्र केली त्याची सर पुढच्यांपैकीं कोणासही आली नाहीं.[1] असें होण्याचें एक मोठें कारण प्रस्तुत भाषापद्धतिच होय. जॉन्सन्सारख्याच्या निबंधांत 'स्पेक्टेटर' ग्रंथापेक्षां अधिक गहन प्रतिपादन जरी असलें, तरी वरील ग्रंथांत शब्दरचनेची जी अपूर्व करामत आहे ती दुसऱ्या कोठेंही नाहीं;[2] व त्यामुळेंच एकंदर सर्व वाचकांस वरील निबंध जितके प्रिय होतात तितके दुसऱ्या ग्रंथकारांचे होत नाहींत. सारांश, ज्याप्रमाणें स्वच्छ हंडींत किंवा लखलखीत कंदिलांत दिवा लावला ह्मणजे त्याचा प्रकाश बाहेर उजळ पडून त्यांस अधिक शोभाही येते, त्याचप्रमाणें आंतील अर्थ सुंदर असून ग्रंथाची शब्दरचनाही जर प्रसादगुणेंकरून युक्त असेल तर तो अर्थ एरवींपेक्षां अधिक खुलेल हें उघडच आहे !

---

१. खुद्द जॉन्सन्नेंच मत्सरभाव सोडून एके ठिकाणीं आडिसन्विषयीं ह्मटलें आहे—" He is the Raphael of essay-writers " ( हा निबंधकारांतला रेफीलच होय ). या उपमेंत जॉन्सन् यानें 'स्पेक्टेटर' ग्रंथांतील शब्दलालित्य, अर्थसौरस्य, व मनुष्यस्वभावाचें हुबेहुब वर्णन, हे तिन्ही गुण एका शब्दांत सुचविले आहेत.

२. जॉन्सन् यानें वरील कवीच्या चरित्रांत वरील ग्रंथांतील भाषापद्धतीची जी तारीफ केली आहे ती अगदीं यथार्थ असल्यामुळें सर्वांच्या तोंडीं बसून गेल्यासारखी झाली आहे. ती ही होय—

" Whoever wishes to attain an English style, familiar but not coarse, and elegant but not ostentatious, must give his days and nights to the volumes of Addison. "

(" ज्या कोणास इंग्रेज़ी भाषा लिहिण्याची अशी तऱ्हा उचलायाची असेल, कीं-जी प्रचारांतील असून प्रौढही पण असावी, आणि चटकदार असून पुनः डौलाची दिसूं नये, त्यानें रात्रंदिवस आडिसन्च्या ग्रंथांचा घ्यास घेतला पाहिजे. ")

७. उत्कृष्ट भाषापद्धतीचा तिसरा गुण सुबोधत्व होय. हा वस्तुतः पहातां वरच्याहून फारसा निराळा नाहीं; त्याच्याच अनुषंगानें येणारा किंवा त्याचें कार्यच तो होय. कारण शब्दरचना सोपी असून जेथें वाक्यांची संगति घोंटाळ्याची नसते तेथें अर्थबोध होण्यास अगदीं आयास पडत नसतात. जसजसें वाचीत जावें तसतसें सर्व भराभर समजत जातें. पण पुष्कळ विषय असे आहेत कीं, जे स्वरूपतःच सुबोध नसल्यामुळें सोप्या भाषेनें लिहितांच येत नाहींत. त्यांचें निरूपण करणें असल्यास व्यावहारिक साधी भाषा तादृश उपयोगीं पडत नाहीं. कारण एक तर जे शास्त्रादि विषय व्यवहारापासून अत्यंत भिन्न त्यांतील कल्पना बोलण्याचालण्याच्या साधारण भाषेनें व्यक्त करतां येणें अशक्यच होय; आणि दुसरें असें कीं, वरच्यासारख्या विषयांच्या प्रगल्भतेस झटलें ह्मणजे प्रौढ भाषेचीच योजना करणें अवश्य होय. तर याप्रमाणें कांहीं अंशीं निरुपायास्तव व कांहीं अंशीं विषयाच्या प्रौढतेमुळें भाषेंत कधीं कधीं दुर्बोधता आणल्यावांचून चालत नाहीं. संस्कृतासारख्या परिपक्क भाषांतून पारिभाषिक शब्द व कांहीं भाषापद्धति ही घ्यावी लागते. असो; पण हा प्रकार निराळा; याविषयीं अंमळ पुढें विशेष लिहिण्यांत येईलच. वरच्यासारख्या विषयांखेरीज इतर जे व्यावहारिक विषय असतील ते लिहितांना भाषा अगदीं सुबोधच असावी. ती अशी कीं, शब्द अगदीं प्रचारांतले घातले असून वाक्यांत दूरान्वय नसावा—ह्मणजे एक शब्द येथें तर त्याचा ज्याच्याशीं संबंध तो शब्द त्याहून फार दूर, असें नसावें. वाक्याच्या निरनिराळ्या अवयवांचा अन्वय वाचल्याबरोबर तेव्हांच लक्षांत यावा; व तें फार लांबलचक व गुंतागुंतीचेंही नसावें. शिवाय विषयाचें जें विवरण करायाचें तेंही व्यवस्थेनें झालें पाहिजे. ह्मणजे त्याचे यथार्थ भाग विभाग करून त्यांचा क्रमवार यथास्थित रीतीनें विचार केलेला असावा. सारांश, सुबोध भाषापद्धति ह्मणजे अशी कीं, ग्रंथ वाचूं लागलें असतां वाचण्यासरसा आंतील मजकूर भराभर समजत जावा, व मजकूर समजल्याबरोबर विषयाचीही सहज रीतीनें फोड होत जावी.[१]

या ठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें एका गोष्टीचा विशेषेंकरून विचार करणें अवश्य आहे. ती गोष्ट ही कीं, मराठी बोलण्यांत किंवा लिहिण्यांत संस्कृत शब्द आणावे कीं नाहीं, याविषयीं पुष्कळ लोकांचीं निरनिराळीं मतें आढळण्यांत येतात. कोणी ह्मणतात,

---

१ इंग्रेजी भाषेंत शेंकडों महान् महान् ग्रंथकारांनीं मोठमोठे नामांकित ग्रंथ लिहून ठेवले आहेत; तेव्हां वरील भाषापद्धतीचा गुण त्यांपैकीं पुष्कळांत उत्तम प्रकारचा सांपडतो हें सहजच आहे. पण या सर्वांत वरील गुणाचें सर्वोत्कृष्ट उदाहरण झटलें तर मेकॉलेच्या पेक्षां दुसरें कदाचित् कोणतेंच सांपडणार नाहीं. या ग्रंथकारानें ग्रंथरचनेची कला केवळ शिखरास नेऊन पोंचविली असें झटलें असतां चालेल. इतिहासासारख्या रुक्ष व गहन विषयासही त्यानें आपल्या रचनाचातुर्याच्या योगानें इतकी मनोवेधकता आणली आहे कीं, कादंबरीनाटकादि ग्रंथांप्रमाणें त्याच्या वाचनाविषयीं वाचकांस उत्कंठा उत्पन्न होते. प्रस्तुत ग्रंथकाराच्या लेखांतील प्रकृत गुणाविषयीं कोणीं असें लिहिलें आहे कीं, त्याचें वाक्य समजण्यास दोनदां कधींही वाचावें लागत नाहीं, त्यांतील अर्थग्रहण पूर्ण होण्यास मात्र तसें केव्हां केव्हां करावें लागतें!

निवळ प्राकृत शब्द योजल्यानें भाषेंत प्रौढता किंवा सरसत्व हें बिलकुल येत नाहीं; यास्तव संस्कृत शब्दांची रेलचेल जितकी असेल तितकी चांगली. हें मत फारकरून जुन्या शास्त्री लोकांचें व आलीकडच्या लोकांत शास्त्रित्वाचा किंवा संस्कृतज्ञतेचा मान चोहोंकडे मिरविण्याची ज्यांस विशेष हौस वाटत असते अशांचें होय. हें एक झालें. दुसरें मत काय आहे कीं, संस्कृत शब्द अगदीं कामाचे नाहींत. मराठी भाषा ह्मणायाची, मग तींत संस्कृत शब्द कां? मोठमोठाले संस्कृत शब्द घालून कोणास न समजेलशी डौलाची रचना करणें यापेक्षां साधे मराठी शब्द योजणें हेंच चांगलें. बोलणें किंवा लिहिणें तें असें असावें कीं जें हवें त्यांस सहज कळेल. हें दुसरें मत आलीकडील बहुतेक लोकांचें झालें आहे. तें इतकें कीं कोणताही नवा ग्रंथ झाला की, पहिल्यानें अगोदर त्याच्या भाषापद्धतीचा विचार होतो. तींत संस्कृत शब्दांचा बराचसा भरणा दृष्टीस पडला कीं, लागलीच त्या पुस्तकावर बहुतेकांची इतराजी होते. पण इतकेंच नव्हे. वरील मत जसें गद्यग्रंथाविषयीं पुष्कळ लोक प्रदर्शित करितात, त्याचप्रमाणें पद्यग्रंथाविषयीं ह्मणजे कवितेविषयींही तें आढळण्यांत येतें. आलीकडे दहा पंधरा वर्षांत झालेली मराठी कविता ज्यांनीं उगीच वरवर पाहिली असेल त्यांच्याही ध्यानांत वरील गोष्ट तेव्हांच आल्यावांचून राहणार नाहीं. या नव्या कवींचीं कवितेविषयींचीं मतें नव्या तऱ्हेचीं असल्यामुळें त्यांच्या कृतींत संस्कृताचा द्वेष पूर्णपणें नजरेस येतो. कोल्हटकरांच्या 'लहान मुंगी' वरील कवितेपासून तों तहत 'राजा शिवाजी' काव्यापर्यंत सारखाच प्रकार दृष्टीस पडतो; तो हा कीं, संस्कृत शब्दांस बिलकूल थारा न देतां निवळ मराठी शब्द योजायाचे. मग अशा रचनेमुळें काव्यास भिकारपणा किंबहुना पोरकटपणा आला तरी कांहीं हरकत नाहीं. नव्या विद्वान् मंडळीचा जुन्या मराठी कवींतून बहुतेकांविषयीं व त्यांतून मोरोपंताविषयीं जो बळकट ग्रह होऊन बसला आहे, कीं त्याची कविता अगदीं नादान, तींत बिलकुल जीव नाहीं, तो उत्पन्न होण्यास तरी वरीलच कारण झालें आहे. मोरोपंताचा संस्कृत भाषेकडे विशेष ओढा असून तींतील शब्द, प्रयोग, व रचना, महाराष्ट्रभाषेंत पुष्कळ आणण्याचा त्यानें यत्न केला आहे,—येवढ्यावरूनच त्याच्या काव्यरचनेस नाक मुरडणें हें आलीकडील रसिकवर्गांचें एक पहिलें मोठें कलम ठरून गेलें आहे.[१] असो; तर याप्रमाणें संस्कृत शब्दांचा मुळीं प्रयोग न करतां निवळ मराठी शब्दच घालीत जावे असें मानणारे हे दुसरे लोक झाले. आतां तिसऱ्यांचें जें मत आहे तें वरील दोहोंत तोडजोड करून बनलेलें आहे. तें असें आहे कीं दोन्ही शब्द घातले तरी कांहीं चिंता नाहीं; पण असा मात्र निर्बंध असावा कीं, जेथें मराठी शब्द अगोदर आहेच तेथें विनाकारण

१. आमच्या देशाविषयींच्या हजारों गोष्टींविषयीं आमच्या विद्वान् व शोधक ह्मणविणाऱ्या नव्या लोकांचे जे विलक्षण ग्रह आज दीर्घकाळ होऊन बसले आहेत त्यांचा एक उत्कृष्ट मासला प्रस्तुत कवीविषयीं जीं मतें पुष्कळांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत आढळतात तीं होत. त्यांविषयीं सविस्तर विवरण करून त्यांच्या यथार्थत्वाची परीक्षा करणें ह्मटलें ह्मणजे एका मोठ्या स्वतंत्र ग्रंथाचाच विषय होय. असो; प्रस्तुत मालेत वरील उपयुक्त विषयाचें अवकाशानुसार निरूपण करण्याचें आमच्या मनांत आहे.

संस्कृत शब्द नवा आणूं नये. जेथें उपायच नाहीं तेथें मात्र तो घालण्यास हरकत नाहीं.

याप्रमाणें प्रस्तुत विषयाविषयीं निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें आहेत. हीं अर्थातच सर्वथा अयथार्थ आहेत असें नाहीं. कोणतें कसेंही मत असलें तरी त्यांत बहुतकरून सत्याचा अंश जसा थोडाबहुत असतोच असतो, तसाच तो वरील तिहींतही आहे. संस्कृत भाषेचा पक्ष उचलणारांचें जें ह्मणणें कीं तिच्या साह्यानें मराठीस प्रौढता व सरसत्व हे गुण येतात हें जसें खरें आहे, त्याचप्रमाणें महाराष्ट्र भाषेच्या पक्षकारांचें जें ह्मणणें कीं संस्कृताचें मिश्रण अतिशय होणें बरोबर नाहीं हेंही खरें आहे. कारण तसें झालें ह्मणजे मूळच्या भाषेचें मातेरें होऊन जाईल हें उघडच आहे. तसेंच तिसऱ्या मताच्या पुरस्कर्त्यांचा जो मुद्दा कीं विनाकारण परभाषेचा प्रवेश होऊं न देतां तो जितका अवश्य असेल तितकाच मात्र होऊं द्यावा हेंही वस्तुतः पाहतां नीटच आहे. पण इतकेंच ह्मणून न राहतां वरील पक्षकार आपापल्या मतांचें निरपेक्षत्वानें विधान करूं पहातात यामुळें त्यांवर असमंजसतेचा दोष येतो. आपापलें ह्मणणें जेथवर सत्यत्वाला व समंजसतेला अनुसरून आहे तेथपर्यंतच जर ते त्याचा आग्रह धरतील तर तो चालणार आहे. तो अगदीं शेवटपर्यंत नेऊन पोंचविल्यानें वर सांगितल्याप्रमाणें अनर्थ होतो. असो; तर वरील वादाचा जो प्रांजल बुद्धीनें विचार करील त्यास बहुधा असा निर्णय करावा लागेल कीं, संस्कृत शब्दांवर व प्रयोगांवर आलीकडील लोकांचा जो विशेष कटाक्ष आढळण्यांत येतो तो सर्व प्रकारें बरोबर नाहीं. संस्कृत भाषा मराठीहून तर काय, पण जगांतील सर्व भाषांहूनही सुरस व प्रौढ असल्यामुळें तिच्या साह्यानें देशभाषेस अतिशय शोभा येऊन तिला विशेष परिपक्वतेस पोंचविण्यासही ती कारण होईल हें कोणाही समंजस मनुष्यास कबूल करणें भाग आहे.

पण वरील तिन्ही मतांच्या प्रतिपादकांची एक मोठी चूक अद्याप सांगायाची आहे ती ही कीं, साऱ्या ग्रंथांस सरसकट एकच भाषापद्धति चालण्यासारखी असते ही खोटी समजूत त्यांस स्पष्ट दिसते. कोणत्याही भाषेंतील ग्रंथसंग्रह जो अंमळ लक्षपूर्वक पाहील त्याच्या लक्षांत एक गोष्ट सहज येणारी आहे कीं, विषयभेदाच्या अनुरोधानें भाषापद्धतिही बदलत असते. जी भाषा गद्यांत चालते ती पद्यांत चालत नाहीं; व गद्यांत चालते ती तरी साऱ्या विषयांस सारखीच चालते असेंही नाहीं. कादंबरीची किंवा नाटकाची भाषा निराळी; इतिहासग्रंथांची निराळी; व शास्त्रीय ग्रंथांची निराळी. असे विषयभेदानें भाषेंत निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात; व तसें होणें हें साहजिकच आहे. साऱ्या सुधारलेल्या राष्ट्रांत निरनिराळ्या प्रसंगांचे निरनिराळे पोषाक जसे असतात, व तसे असावे लागतात, त्याचप्रमाणें प्रौढ दशेस आलेल्या साऱ्या भाषांसही विषयानुरोधास्तव भिन्नभिन्न रूपें प्राप्त होतातच. मग असें जर आहे, तर साऱ्या ग्रंथांस वरच्यासारखा सरसकट एकच नियम घालून देणें हें किती असमंजस आहे! बेबंद नगरींतील बादशाहाप्रमाणें एखाद्या राजानें जर असा सरसकट हुकूम फर्मावला कीं, बस्; सर्वांनीं कापसाच्या वस्त्रांखेरीज इतर वस्त्रें कधींही अंगावर घेऊं नयेत; लग्न असो, कार्य असो, राजाचा दरबार असो; सर्वांनीं वरील साध्या पोषाकांनींच नेहेमी

बाबरावें; तर त्या राजश्रीच्या शहाणपणाची लोक किती तारीफ करीत राहतील! तर हीच गोष्ट वरील मतांपैकीं दुसरें स्थापित करूं पाहणारांसही लागते. जी भाषा ' आरबी भाषेंतील गोष्टी ' किंवा ' मुक्तमालेंत ' दृष्टीस पडते त्याच भाषेंत ' अनेकक्रियामूलतत्त्वा ' सारखा शास्त्रीय ग्रंथ लिहा किंवा तशाच भाषेंत एखादें वीररसप्रधान काव्य रचा असें जर कोणी ह्मटलें, तर तें त्याचें ह्मणणें किती अप्रयोजक होईल ? शास्त्रीय ग्रंथांस जी परिभाषा लागते तिचे शब्द लहान पोरांच्या किंवा अडाणी कुणब्यांच्या भाषेंतून कसे काढावे ? व वरच्या सारख्या ग्रंथांत जी शब्दरचना करायाची ती काऊचिऊच्या गोष्टीप्रमाणें किंवा आटपाट नगरच्या कहाणीप्रमाणें केल्यास उपहास्यता होणार नाहीं काय ? यासारखाच याच्या उलटचा प्रकार. संस्कृतांतील झोंकदार व गोड शब्दांनीं भाषेस शोभा व गांभीर्य हें येतें खरें, पण यावरून वरील गुण जेथें तेथें साधण्याचा यत्न केल्यास चालेल काय ? असे कांहीं विषय आहेत कीं, ज्यांस अगदीं साधी भाषापद्धतिच शोभते. ते शास्त्रीय किंवा कवितेच्या भाषेनें लिहूं गेलें असतां वरच्या सारखाच हास्यास्पदतेचा प्रकार होतो. तर याप्रमाणें भाषापद्धति अमुकच तऱ्हेची असावी याविषयीं आग्रहानें निर्बंध करूं पाहणें हें सर्वथा असमंजसतेचें दर्शक होय. विषयाच्या अनुरोधानें जी भाषापद्धति जेथें शोभेल तेथें ती योजिली असतां अर्थात् दूषणास पात्र होत नाहीं.

८. वर सांगितलेले तीन गुण उत्कृष्ट भाषापद्धतीस अत्यंत आवश्यक असणारे होत. यांखेरीज इतर जे गुण उत्कृष्ट ग्रंथकारांत सांपडतात त्यांचा बहुधां वरच्यांतच अंतर्भाव होतो. उदाहरणार्थ अवतरण घ्या. अवतरण ह्मणजे अभियुक्त ग्रंथकारांच्या ग्रंथांतून आपल्या मतास पुष्टि आणण्याकरतां किंवा लेखास शोभा आणण्याकरतां घेतलेलें वचन. हें अवतरण पुष्कळदां घेण्याची पुष्कळांस हौस असते. त्याच्या योगानें आपल्या लेखास महत्व येऊन विशेष योग्यता येते असें त्यांस वाटतें. पण रसिक ग्रंथकारांच्या प्रचारास हें अनुसरून नाहीं; कारण दागिन्याचा किंवा उंची वस्त्रांचा अतिशय थाटमाट हें जसें खऱ्या मार्मिकतेचें लक्षण नव्हे; त्याचप्रमाणें वरील अवतरणें फार घेतल्यानें उत्तम पद्धतीच्या गुणांपैकीं दुसरा गुण जो साधेपणा म्हणून वर सांगितला त्यास बाध येतो. तर याप्रमाणें या विषयाचा विचार वरील गुणाच्या सदराखालीं येतो. असो; आतां या अवतरणाच्या युक्तायुक्ततेविषयीं थोडा विचार करून प्रस्तुत विषयाचा हा पहिला भाग आटपतों.

अवतरण ह्मणजे काय हें वर सांगितलेंच आहे. हा शब्द प्रचारांतील ह्मणी व संस्कृतांतील न्याय यांसही लावतां येईल. या सर्वांचा प्रयोग ग्रंथांत करणें हें बरोबर आहे कीं नाहीं, व तो करणें तर कितपत करावा, याविषयीं पुष्कळांचा रुचिभिन्नत्वेंकरून बराच मतभेद पडेल. ज्यांस थाटमाट न आवडून अगदीं साधेपणाच आवडतो त्यांचा अभिप्राय बहुधां असा पडेल, कीं असलीं सोंगें ग्रंथांत मुळींच आणूं नयेत. तसेंच त्यांच्या विरुद्ध पक्षाचा वरील प्रकरणीं उलट तऱ्हेचा आग्रह दृष्टीस पडेल, कीं ग्रंथरचनेस विशेष शोभा आणण्याकरतां वरील प्रकार जितके आणावे तितके चांगलेच. जे नव्यानें ग्रंथरचना करूं लागतात

त्यांचा तर वरील दुसऱ्या मताकडे विशेषच कल दृष्टीस पडतो. आपला लेख जितका छानदार व डौलाचा दिसेल तितका करण्याविषयीं त्यांचा यत्न चालू असतो. पण पुढें जसजशीं ग्रंथकर्तृत्वाचीं मर्में त्यांस कळूं लागतात तसतशी वरील अल्लडपणाची त्यांची हौस कमी कमी होत जाऊन पोक्त व गंभीर अशी रचना त्यांस अधिक मान्य होत जाते.[1] असो: तर याप्रमाणें प्रस्तुत विषयावर दोन प्रकारचे अभिप्राय पडणारे आहेत. त्यांविषयीं अगदीं बरोबर निर्णय करणें कठिण आहे; व त्याची येथें जरूरीही नाहीं. अभियुक्त व सर्वमान्य ग्रंथकारांची मात्र पद्धति येथें सांगितली असतां बस् आहे. ती प्राय: अशी आढळते कीं, अवतरण मुळींच घ्यायाचें नाहीं असा त्यांचा जरी नेम नसतो, तरी तें फार बेतानें व फार विरळा ते घेतात. ह्मणजे जेथें प्रकृत अर्थास घेतलेल्या वचनानें, ह्मणीनें, किंवा न्यायानें पुष्कळ दृढता येऊन दोघांचा जम अगदीं बरोबर बसत असेल, किंवा तो अर्थ वरील तिहींनीं उत्तम तऱ्हेचा खुलत असेल, तेथेंच त्यांस ते आपल्या लेखांत जागा देतात. एरवीं उगीच ग्रंथास सुशोभित करण्याकरितां तसें करीत नाहींत. हा दुसरा प्रकार अप्रबुद्ध ग्रंथकारांत फार आढळतो. यांची रीत कधीं कधीं तर अशीही नजरेस येते कीं, एखादें उत्तम वचन वगैरे त्यांस माहीत असलें ह्मणजे त्यास स्थळ देण्याकरितां मुद्दाम ओढून ताणून तिकडे मूळ अर्थाचा संबंध न्यायाचा. तसेंच भाषेंतील ह्मणी जितक्या आंत घालाव्या तितकी लेखास शोभा येते असेंही ते समजतात. पण ही शेवटली तर मोठी चूक आहे. तसें केल्यानें एक तर डौलीपणा दिसतो, आणि शिवाय लिहिण्यास मनोवेधकता येण्याची एकीकडेच राहून उलटी ग्राम्यता मात्र येते. वरचेवर बोलण्यांत ह्मणी आणायाच्या हा प्रकार अडाणी लोकांत व विशेषत: बायकांत चालू असल्यामुळें तो प्रकार प्रौढ व सभ्य लेखांत जितका थोडा येईल तितका चांगला. व ह्मणूनच मोठमोठ्या नामांकिततेस पावलेल्या ग्रंथकारांत तर तो प्राय: कधींही दृष्टीस पडत नाहीं.

वर जे अवतरणाविषयीं लिहिलें तेंच दृष्टांत, उपमा वगैरे अलंकारांची योजना प्रसंग न पाहता व सुमार न ठेवतां करण्याचा जो प्रघात त्यासही लागू पडतें. हा प्रघात वरच्याप्रमाणेंच नूतन किंवा अप्रबुद्ध अशा ग्रंथकारांच्या ठायीं आढळतो; व चांगल्या ग्रंथांत तो कां आढळत नाहीं याचें कारणही वरच्यासारखेंच आहे. आमच्या मराठींत तर आलीकडे

१. वरील गोष्टीचें इंग्रेज ग्रंथकारांतील एक प्रसिद्ध उदाहरण मेकॉलेचें आहे. यानें 'एडिन्बर्ग रिव्ह्यू' नामक अद्यापि चाललेल्या जगत्प्रसिद्ध त्रैमासिकांत मिल्टन् कवीवर एक शानदार निबंध पहिल्याप्रथम लिहिला. त्या वेळेस तो सारा पंचवीस वर्षांचा होता. या निबंधाची त्या वेळेस चोहोंकडे पुष्कळ तारीफ झाली, व निबंधकारांत पुढें लवकरच जें अग्रगण्यत्व वरील ग्रंथकारास मिळालें त्यास वरील लेखच कारण झाला. पण पुढील जाणत्या वयांत मेकॉलेसच वरील निबंधाचें अत्युज्वल स्वरूप आवडेनासें झालें. त्यांत अलंकारिक भाषेची रेलचेल फारच झाली आहे असें त्यानें आपल्या निबंधांच्या प्रस्तावनेंत एके ठिकाणीं लिहिलें आहे. असो. प्रस्तुत ग्रंथकारानें बेकन् व बर्क यांच्याविषयीं चालू विषयाच्या संबंधानें एक चमत्कारिक गोष्ट' लिहून ठेवली आहे कीं, पहिल्यानें ह्मणजे पूर्ववयांत दोघांसही साधी भाषापद्धति रुचत नसून पुढें शेवटीं अलंकारिक भाषेची आतोनात आवड उत्पन्न झाली. हा नेहेमीच्यापेक्षां विपरीत क्रम झाला!

ग्रंथांत व भाषणांतही शब्दालंकार घालण्याची एक अप्रयोजक तऱ्हा[1] निघाली आहे. ती किती निंद्य व हास्यास्पद होय हें आमच्या सुज्ञ वाचकांस सांगणें नकोच. असो; एकंदरींत वरील दोन्ही प्रकार फार समंजसतेनें व बेताबातानें जेव्हां योजावे तेव्हांच शोभतात; व सर्व भाषांतील मोठमोठ्या ग्रंथकारांचे ठायीं ते अशाच तऱ्हेनें आढळतात.

येथवर प्रस्तुत विषयाचा पहिला भाग म्हणजे उत्तम भाषापद्धतीचीं लक्षणें कोणतीं याविषयीं झालें. पुढील अंकांत आरंभीं उपक्षेप केल्याप्रमाणें राहिलेल्या भागाचें निरूपण करूं.

---

शीलभारवती कांता पुष्पभारवती लता ।
अर्थभारवती वाणी भजते कामपि श्रियम्[2] ॥

**अंक २७-(१)** प्रस्तुत अंकाचा विषय. (२) भाषापद्धतींच्या भिन्नत्वाची उपपत्ति. (३) वरील भेदांत उत्तम कोणता या प्रश्नाचा विचार. (४) लोकमान्य ग्रंथांची भाषापद्धति. (५) सरळ व सोपी भाषा. (६) प्रौढ भाषासरणी. (७) इतर प्रकार. (८) इंग्रेजीच्या अनुकरणानें सुरू झालेल्या तऱ्हा. (९) गद्याची प्रवृत्ति. (१०) नवे प्रकार. (११) विनोदात्मक लेख. (१२) सृष्टिवर्णन. (१३) आणखी कांहीं उतारे.

१. मागील खेपेस भाषापद्धतीचा उत्तम प्रकार कोणता याविषयीं सांगितलें. आतां तिच्या निरनिराळ्या तऱ्हा सांगून मराठी भाषेंतल्या ग्रंथांत त्या कितपत आहेत त्या दाखवूं.

२. भाषा ही मनुष्याच्या मनोवृत्तींचा व हृदयवृत्तींचा उद्गार होय; ह्मणजे त्याच्या मनांत जे विचार उत्पन्न होतात किंवा अंतःकरणास क्षोभ होऊन जे तरंग उठतात ते ज्या रूपानें प्रकट होतात तें रूप भाषा होय. असें आहे, तेव्हां अर्थातच मूळ ठिकाणीं जितके निरनिराळे प्रकार आढळतात तितकेच वरील प्रगट होणाऱ्या रूपांत ह्मणजे भाषेंतही सांपडतात. मनुष्य जसा स्वभावेंकरून किंवा प्रसंगविशेषानें गंभीर किंवा लाघवी, उदास किंवा रंगेल, मंद किंवा तापट, वगैरे असेल त्या त्याप्रमाणें त्याची बोलण्याची किंवा लिहिण्याची तऱ्हाही दिसून येईल. त्याचप्रमाणें हृदयाच्या नानाविध वृत्तींचेंही प्रसंगवशात् स्वरूप प्रकट होऊन तो तो रस त्या त्या ठिकाणीं आविर्भूत होईल. तर याप्रमाणें वर सांगितल्यासारखे भाषापद्धतीचे भेद होणें हें साहजिकच आहे; व ह्मणून ते साऱ्या परिपक्वदशेस येऊन पोहोंचलेल्या भाषांतून आढळतात.

३. आतां वरील भाषापद्धतींत उत्तम कोणती असें जर कोणीं विचारलें तर तें सांगणें फार कठिण आहे. फार तर काय, पण वरील प्रश्न पुष्कळ अंशीं असमंजसतेच्या दोषास

---

१. ही आलीकडील कित्येक कादंबऱ्यांतून आढळते. पुण्यासारख्या ठिकाणच्या वक्तृत्व-प्रसंगींही वरील पोरकट हौस कित्येकांनीं केलेली कधीं कधीं दृष्टीस पडते व वर्तमानपत्रांतूनही ती क्वचित दिसते.

२. "शालीनतेचा भार वागविणारी स्त्री, फुलांचा भार जीवर आला आहे अशी वेली, आणि जींत अर्थगौरव आहे अशी वाणी, तिहींची कांहीं अपूर्व शोभा दिसते!"

पात्र होतो असें ह्मटलें असतांही चालणार आहे. ज्याप्रमाणें तांबडा, हिरवा, निळा, वगैरे रंगांत, किंवा गोड, आंबट, तिखट वगैरे रसांत अमुकच उत्कृष्ट हें सांगणें अशक्य असून तसें करूं पाहणें हें अरसिकत्वाचें दर्शक होय; त्याचप्रमाणें भाषासरणीच्या वरील निरनिराळ्या तऱ्हांपैकीं सर्वांत चांगली कोणती याचा निखालसपणें निर्णय करूं जाणें हें वेडेपणाचें काम आहे. वरील दोन्ही गोष्टींत निरनिराळ्या मनुष्यांचीं निरनिराळीं मतें पडणें हें जसें साहजिक असून तें रुचिवैचित्र्याचें फळ होय; व शिवाय जें एका ठिकाणीं चांगलें तें चोहोंकडे चांगलें नसून तो चांगलेपणा स्थानभेदानेंही प्राप्त झालेला असतो; तसेंच प्रस्तुत विषयाचें आहे. जी भाषापद्धति एका विषयाला शोभते तीच दुसऱ्या ठिकाणीं योजिली असतां ती अगदीं अप्रयोजक होते; व तसेंच जी एका मनुष्याला पसंत पडते ती सर्वांस तशीच चांगली वाटते असाही नेम नाहीं. सारांश, प्रस्तुत विषयावर कोणत्याही प्रकारें व्यापक नियम देतां येणार नाहींत; वास्तव या ठिकाणीं लोकोपयोगी ग्रंथांची भाषा कशी असावी येवढ्याचविषयीं सामान्यत: कांहीं लिहून मागें सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत काळीं प्रसिद्ध असणाऱ्या ग्रंथांतील कांहीं वेंचे वाचकांस सादर करतों.

४. आमच्या महाराष्ट्र-भाषेंत ग्रंथरचनेची तऱ्हा जशी चालू असावी तशी अद्याप झालेली नाहीं. इंग्लिश वगैरे भाषांत मोठमोठ्या गहन विषयांवरही सामान्य मनुष्यांस सहज समजण्यासारखे जसे अनेक ग्रंथ आहेत तसे इकडे कोठेंच झालेले नाहींत. असें होणें हें सध्यांच्या स्थितीस अत्यंत आवश्यक आहे. लिहिण्यावाचण्याचा प्रघात आलीकडे सरकारानें सुरू केलेल्या लोकशिक्षणाच्या योगानें पुष्कळ फैलावल्यामुळें वरील उपायानें देशहिताच्या कामाला जशी मदत होणार आहे तशी आलीकडे बडबा बडया लोकांनी सुरू केलेल्या पुष्कळ अचाट उद्योगांनीं मुळींच होण्यासारखी दिसत नाहीं. इंग्लिश भाषेंत ज्याप्रमाणें हरएक उपयुक्त व मनोरंजक विषयावर शेंकडों बालबोध ग्रंथ झाले आहेत, व प्रतिवर्षी तयार होत आहेत, तसेंच इकडील देशभाषांतून जर होईल, तर सहस्रावधि लोकांस अल्पायासानें अल्प काळानें व अल्प अर्थानें पुष्कळ ज्ञान करून दिलेंसें होईल. पदार्थविज्ञानाच्या ज्योतिष, रसायन, दर्शनानुशासन, भूगर्भशास्त्र, यंत्रशास्त्र, इत्यादि निरनिराळ्या शास्त्रांवर, तसेंच इतिहासादि विषयांवर, व अनेक लौकिक विषयांवर जर सुबोध ग्रंथ लोकांस वाचायास मिळतील तर हल्लीं सामान्य गोष्टींचेंही एकंदर लोकांत जें लज्जास्पद अज्ञान दृष्टीस पडतें तें दूर होईल; व वियानंदाचा खरा अनुभव सर्वांस घडून आपले सर्व प्रकारचे हक्कही लोकांस कळूं लागतील. असो; आतां वरील इष्ट हेतूची सिद्धि होण्यास एक मोठें साधन कोणतें कमी आहे कीं, लोकांच्या मनांत ज्ञानाचा जेणेंकरून सुलभ रीतीनें प्रवेश होईल असा मार्ग अद्याप चांगलासा झाला नाहीं. तो होऊन निरंतर प्रचारानें चांगला सुरळीत चालू झाला पाहिजे. हा मार्ग ह्मटला ह्मणजे वरील लोकमान्य ग्रंथांस उचित असा भाषापद्धतीचा प्रकार होय. हा आलीकडील कित्येक सर्वमान्य झालेल्या इंग्रेजी ग्रंथकारांचें अनुकरण केलें असतां आपल्या भाषेस अनुकूल होणार आहे. त्यांतील मुख्य गुण हेच कीं, वाक्यरचना सरळ असावी, अर्थ चांगला खुलासेवार मजेदार रीतीनें लिहिला असावा,— असा कीं, तो सहज मनांत भरून वाचण्याची सारखी हौसच

वाटत जावी—आणि एकंदर लिहिण्यांत आवेश किंवा झोंकदारपणा असावा. हे गुण आमच्या ग्रंथकर्त्यांच्या अंगीं बरेच आले म्हणजे आलीकडील नव्या शिक्षणानें आपल्या लोकांस जें अमूल्य ज्ञान प्राप्त झालें आहे व दिवसानुदिवस होत चाललें आहे त्याचा विनियोग देश-कल्याणाकडे झाल्यानें त्याचें योग्य चीज झालेंसें होईल. आणि सिसरोनें सॉक्रेटिसाविषयीं जें म्हटलें आहे कीं, त्यानें देवलोकींचें नीतिज्ञान मनुष्यलोकीं आणून तें सामान्य जनांसही सुलभ करून टाकलें; त्याचप्रमाणें यापूर्वी जे महासिद्धान्त मोठमोठ्या पंडितांस मात्र अवगत होते, व ज्या कल्पनातरंगांनीं विद्वानांचेंच तेवढें रंजन होत असे, त्या दोहोंपर्यंतही प्राकृत जनांची सुद्धां गति झालीशी होऊन तज्जन्य महानंदाचे तेही अधिकारी होतील.

५. आतां वरील कलमांत लोकमान्यतेस पात्र होऊं पाहणाऱ्या ग्रंथांस अवश्य जे गुण सांगितले त्यांपैकीं सध्यांच्या ग्रंथांतून ते कितीसे आढळतात हें उदाहरणद्वारा दर्शवितों. पहिल्यानें भाषापद्धतीचें सरलत्व. हा गुण आलीकडील ग्रंथांपैकीं कित्येक उत्तम धरलेल्या ग्रंथांतून पूर्णपणें आढळतो; जसें 'बाळमित्र,' 'इसापनीति,' 'आरबी भाषेंतलि गोष्टी,' 'अनेक-विद्यामूलतत्त्व,' 'मधुमक्षिका,' 'मुक्तमाला,' इत्यादि. वरील पुस्तकांत शेवटल्या कादंबरी-खेरीज बाकी सारीं इंग्रेजी ग्रंथांचीं भाषांतरें आहेत. अशांत वरील गुण पूर्णपणें राखणें हें मोठ्या चातुर्याचें काम होय, व कोठें कोठें तर तें फारच कठिण पडतें, याविषयीं मागें अनेक ठिकाणीं बरेंच लिहिलें आहे. असो; आतां प्रस्तुत गुणाच्या उदाहरणार्थ वरील ग्रंथांतून कांहीं निवडक उतारे येथें दाखल करतों.

'बाळमित्रां'तले दोन उतारे प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या अंकांत घेतले आहेत ते या ठिकाणींही लागू पडण्यासारखे आहेत. यास्तव आणखी एकच लहानसा उतारा येथें घेतों—

## " चिमणी. "

" गोदावरीबाई म्हणून एक शहाणी भली मायाळू बायको होती. तिची वडील मुलगी गंगा म्हणून होती; तिनें एके दिवशीं कांहीं अन्याय केला, म्हणून आईनें तीस ममतेनें धम-कावलें. ते आईचे मायाळू शब्द ऐकून आणि आपला अन्याय स्मरून गंगा रडूं लागली. तें पाहून तिची लहान बहीण चिमणी तीन वर्षांची होती तिनें हळूंच माघारून येऊन एका हातानें परकराचा पदर घेऊन आपल्या बहिणीचीं आसवें पुसलीं; आणि दुसरे हातानें आपले तोंडांतला खडेसाखरेचा खडा तिचे तोंडांत घातला.

" मला असें वाटतें कीं, कोणीं चांगल्या चिताऱ्यानें याविषयीं चित्र काढलें असतां काय वेधक होईल !"

'इसापनीतीं'तील—

## " नकल्या आणि गांवढेकर. "

" मागें एके वेळेस, रूमनामें राजधानींत एक मोठा, धनवान् शेट होता; त्याच्या मनांत आलें कीं लोकांस तमाशा दाखवून, त्यांस रंजवून, कीर्ति मिळवावी; म्हणून त्यानें

शहरांत जाहीरनामा लावला कीं, नवा उत्कृष्ट तमाशा कोणी दाखवील, तर त्यास मोठें बक्षीस मिळेल; अशी अवाई पडल्यावर बक्षीसाचे लालचीनें जिकडून तिकडून तमाशेवाले आले. त्यांमध्यें एक नकल्या आला होता; तो ह्मणाला कीं, लोकांनीं कधीं पाहिला नाहीं असा तमाशा मी करून दाखवीन. या गोष्टीचा पुकारा होऊन तो खेळ पाहायास सगळें शहर लोटलें. रंगभूमींत अशी दाटी झाली कीं, कितीकांस उभें रहायासही जागा मिळेना. मग तो नकल्या एकटा पुढें आला; त्याजवळ दुसरें कोणी नाहीं, व सरंजाम कांहीं नाहीं, असें पाहून, हा आतां काय करील ह्मणून त्याकडे डोळे लावून लोक कौतुकानें पाहूं लागले. तेव्हां त्या नकल्यानें आपलें मस्तक उरावर टेंकून डुकराच्या पोराच्या केंकण्याची नक्कल केली. ती इतकी हुबेहुब झाली कीं, खरेंच डुकराचें पोर त्याच्या खाकेंत आहे असें लोकांस खास वाटून त्याचा झाडा घेतल्यावांचून त्यांस राहवेना. त्याचा झाडा घेतल्यावर जेव्हां त्याजपाशीं कांहीं सांपडलें नाहीं, तेव्हां लोकांनीं त्याची वाहवा करून वाखाणणीचा सुमार ठेवला नाहीं. तेथें कोणी गांवढेकर कुणबी बसला होता. तो हें पाहून ह्मणाला कीं, हा खेळ मला याहून चांगला करतां येतो. मग त्यानें सर्व लोकांपुढें प्रतिज्ञा केली कीं, जर तुह्मी उद्यां सारे याल, तर मी तुमच्या समक्ष याचे कान कापीन. दुसऱ्या दिवशीं तमाशा पाहायास पहिल्यापेक्षां लोकांचे लोटच लोट आले. लोकांचे मनांत कीं, पहिला नकल्या मोठा कसबी त्याची स्तुति करावी; आणि दुसरा गांवढेकर अडाणी, याला काय येतें, ह्मणून त्याची छी थू करावी; अशी सर्वांची तयारी होती. लोक जमल्यावर ते दोघे पुढें आले. त्यांतून पहिल्या नकल्यानें पूर्ववत् डुकराच्या पोराच्या ओरडण्याची नक्कल करून पराकाष्ठेची शाबासकी मिळविली. त्याचा खेळ संपल्यावर गांवढेकर पुढें सरला. त्यानें डुकराचें पोर खरेंच अगोदर आपल्या घोंगडींत लपविलें होतें, तें कोणास न समजावें ह्मणून बळेंच लपविण्याचा भाव करून दाखविला, आणि तें पोर केंकावूं लागेपर्यंत त्याचा कान चेपून धरला. तेव्हां सर्वांनीं एकच आरोळी केली कीं, पहिली नक्कल हुबेहुब झाली खरी; ही कांहीं चांगली उतरली नाहीं. असें ह्मणून ते गांवढेकरास छी थू करून हांकून लावणार, इतक्यांत त्यानें घोंगडींतून डुकराचें पोर बाहेर काढून सर्वांस दाखवून, ह्मटलें, गड्यांनों, तुह्मी भले गाजरपारखे दिसतां ! तुह्मी मोठे चतुर साबाजीच आहां ! वास्तविक डुकराचे पोराचा जो शब्द तो न ओळखतां खोटा मानून खोटा शब्द तो खरा, चांगला ह्मणतां ! आहा ! काय तुमची अक्कल !

**तात्पर्य**—"जें वास्तविक आहे तें लोकांच्या मनांत बहुतकरून भरतें असें नाहीं; तर आपापल्या मनाचा जसा कल असतो, तसतशी मनाची समजूत. एखादा मनुष्य चांगला गुणी आहे, आणि त्याजविषयी जर आपल्या मनांत गांठ आहे तर त्याचा चांगुलपणा किंवा त्याचे गुण आपल्या मनांत येत नाहींत. तसेंच एखादा वाईट मनुष्य असून, हा चांगला ह्मणून मनानें घेतला आहे, तर त्याचा वाईटपणा कधीं मनांत यावयाचा नाहीं. सारांश, मनाच्या झोकाप्रमाणें मनुष्यांची वेडी वांकडी समजूत होते."

---

'आरबी भाषेंतील गोष्टी'—

## " मासे धरणाऱ्या कोळ्याची गोष्ट.

"शाहजादी पादशाहास ह्मणते, महाराज, प्राचीन काळीं समुद्रतीरीं एके नगरांत एक कोळी रहात असे. तो फारच दरिद्री होता. त्यास आपला व बायकापोरांचा निर्वाह करण्यापुरतें सुद्धां द्रव्य मिळत नसे. त्याचा पाठ असा होता कीं, दररोज मोठ्या पहांटेस उठून मासे धरायास समुद्रावर जावें. व चार वेळ जाळें टाकून, तितक्यांत जे मासे सांपडतील, तितक्यांवर चरितार्थ चालवावा, यापेक्षां अधिक वेळ जाळें त्यानें कधींही टाकूं नये. तो कोळी एके दिवशीं मोठ्या पहांटेस उठून चांदण्यांत मासे धरण्याकरितां समुद्रावर जाऊन आंगावरचीं पांघरुणें काढून ठेवून, जाळें समुद्रांत टाकून तीरीं बसला. नंतर अंमळशानें जाळें ओढून पाहतो तों, तें फारच जड आल्यामुळें पुष्कळ मासे लागलेसें त्यास वाटून मनांत मोठा आनंद पावला. पण जाळें तीरावर ओढून आंत मासा एक देखील नाहीं, गाढवाच्या हाडांचा एक सांगाडा मात्र लागला आहे; हें पाहून त्यास फारच वाईट वाटलें. नंतर त्यानें गाढव फेंकून देऊन, व जाळें कितीएक ठिकाणीं तुटलें होतें, तें सांधून नीट करून पुनः समुद्रांत टाकलें, आणि ओढूं लागला, तेव्हां तें लौकर ओढत नाहींसें पाहून पुष्कळ मासे सांपडले असें त्यास वाटून पुनः मोठा संतोष झाला. आणि तीरावर जाळें ओढून आंत पाहतो, तों चिखलानें व वाळूनें गच्च भरलेला मोठा हारा त्याच्या नजरेस पडल्यावरून तो फारच संतापला, आणि त्या खेदाच्या आवेशांत दैवास करुणास्वरानें ह्मणतो, अरे दैवा, मजवर इतका कोप करूं नको. अरे मला वांचव, ह्मणून तुजपाशीं नेहेमी दैन्य भाकीत असतां, तूं मज गरिबाच्या कां बरें इतकें हात धुवून पाठीस लागलें आहेस ? अरे पोटाच्या पाठीस लागून कांहीं मिळेल ह्मणून मी येथें आलों; आणि तूं कां रे माझा जीव घेऊं पाहतेस ? मला या धंद्याखेरीज दुसरा धंदा पोट भरायास नाहीं. अरे, मरे तोंपर्यंत मी मेहनत करतों; तरी माझ्या कुटुंबास ओली कोरडी भाकरी व अंगास फाटकीं तुटकीं धडुतें मिळण्याची सुद्धां पंचाईत ! कोठेंच माझें तूं पुरें पडूं देत नाहींस, असें तुझें काय मी केलें आहे ! अथवा मी तुला नांव ठेवतों, हा माझाच अपराध आहे. भल्या मनुष्यास गांजण्यास तुला मोठा संतोष होतो. खऱ्या व थोर मनुष्यास तूं कधीं वर डोकें काढूं देत नाहींस; असा तुझा स्वभावच आहे. दुष्टावर तुझी कृपा फार. जे कुमार्गानें वागतात, त्यांस तूं नेहेमी बरकत देतेंस, हें सर्वांस माहीतच आहे."

---

'मधुमक्षिका'—

## " निद्राभ्रम ".

"एके रात्रीं एक तास पावेतों तो आपले बिछान्यावर स्वस्थ निजून, झोंपेंत एकाएकीं उभा राहिला, आणि कांहीं बोलणें ऐकिलेंसें करून मोठ्यानें गदगदां हंसला. नंतर हाताचीं बोटें बाहेर झाडल्यासारखीं करून, जें ऐकिलें त्यांत कांहीं हांशील नाहीं,

असें त्यानें दाखविलें. मग दुसऱ्या कोणा माणसाकडे वळल्यासारखें करून तपकिरीकरितां चिमूट पुढें केली, पण तेथें शेजारीं कोणी नव्हतें; तेव्हां तो अमळसा हिरमुसल्यासारखा होऊन मागें वळला. नंतर त्यानें आपली डबी काढिली तींत कांहीं नव्हतें, तरी तींत बोटें घालघालून चिमटी काढण्यास त्यानें पुष्कळ यत्न केला, तो सर्व व्यर्थ गेला; तेव्हां संशय-मुद्रेनें चोहोंकडे पाहून, ती डबी चटकन आपले खिशांत टाकिली. पुढें कांहीं वेळ स्तब्ध बसून कांहीं उघड कारण नसतां एकाएकीं तो पराकाष्ठेचा संतापला, आणि शिव्या शाप देऊं लागला, व तडातड शपथा वाहूं लागला. इतकी कृति दुरून पाहून इतर मठवासी कंटाळून उठून गेले.

" तो पुनः एके रात्रीं निद्राभ्रमांतच उठून, मोठ्या लगबगीनें, त्या मठांतील पवित्र यज्ञशाळेंत गेला. तो, तेथें एक ताट ठेवीत असत, तें चोरून आणण्याच्या बेतानें गेला असावा असें वाटतें. परंतु आदले दिवशीं तें घांसण्याकरितां बाहेर टाकिलें होतें, म्हणून तेथें त्याला कांहीं सांपडलें नाहीं. तेणेंकरून त्याला फार संताप आला; आणि रिक्तहस्तें आपल्या खोलींत परत जावयाचेंच नाहीं; असा पक्का निश्चय करून, तेथें जवळच कांहीं मठवाशांचे यज्ञकर्में करते वेळीं घालण्याचे उंची उंची रेशमी झगे होते, त्यांतले दोन तीन हळूच उचलून घेऊन, स्वारी भयभीत होत्साती पळत पळत आपल्या खोलींत आली, आणि ते कपडे आपल्या गादीखालीं लपवून ठेवून, वर स्वस्थ निजली. हें ज्यांनीं पाहिलें होतें, ते, हा सकाळच्या प्रहरीं काय करतो हें पाहण्यास फार उत्सुक झाले होते.

" तो सकाळीं जागा होऊन पहातो तों, त्याचे आंथरुणाला मध्येंच एक गोळा आलेला त्याचे दृष्टीस पडला. तेणेंकरून त्याला मोठें आश्चर्य वाटलें; आणि ते झगे आहेत, असें पाहून तर त्याची बुद्धिच गुंग होऊन गेली. तो बाहेर जाऊन लोकांस विचारूं लागला कीं, हें झालें तरी कसें ? तेव्हां मठवाशांनीं त्याला कची हकीकत कळविली. ती ऐकून, तो लाजून, मान खालीं घालून एक अक्षरही न बोलतां चालता झाला; आणि ते झगे त्यानें तात्काळ जिकडचे तिकडे पोहोंचविले. "

---

वरील चारी उताऱ्यांत महाराष्ट्र-भाषेचें स्वरूप अगदीं साधें दृष्टीस पडतें. चारीही मूळ इंग्रेजी ग्रंथांचीं भाषांतरें होत; तरी तीं अशीं चोख उतरलीं गेलीं आहेत कीं, तीं त्या त्या ग्रंथकारानें मराठी भाषेंत केवळ आपल्या कल्पनेनेंच लिहिलीं आहेत काय असें वाटतें. शब्द अगदीं सोपे व व्यावहारिक घातले असून वरील वाक्यांतील रचनाही भाषांतरकारांनीं अगदीं सरळ केली आहे. गोष्टी ज्या भाषेंत लिहावयाच्या ती वरच्यासारखीच अगदीं सोपी व साधी असावयास पाहिजे. तींत मोठमोठे शब्द घालून व वाक्यरचना प्रौढ करून गांभीर्य आणण्याचा यत्न केला असतां तो प्रकार जॉनसनच्या ' रासेलस् ' वगैरे ग्रंथांत कित्येक-स्थलीं जशी हास्यास्पदता आली आहे तसा उपहास्य होतो. शब्दरचना व अर्थ-

रचना यांची नेहेमी परस्पर अनुरूपता असावी लागते; ह्मणजे आंतील अर्थ जशा योग्यतेचा असेल तितक्याच प्रतीची तद्व्यंजक शब्दरचनाही असावी. अर्थ अगदीं सामान्य किंवा पोरकट आहे, आणि तो मोठमोठ्या शब्दांनीं व्यक्त करण्याचा घाट घातला, तर गाढवावर मखमाली झूल घातल्याप्रमाणें, किंवा चार वर्षांच्या पोरानें आपणास न झेपेसें मोठें पागोटें डोक्यास घातल्याप्रमाणें हास्यास्पदतेचा प्रकार होतो. तसेंच दुसऱ्या पक्षीं अर्थ मोठा प्रौढ व गंभीर आहे आणि तो रस्त्यावरील किंवा बाजारांतील भाषेनें सांगितला किंवा लिहिला, तर तिकडूनही ऐकणारास व वाचणारास हंसूं आल्याविना राहणार नाहीं. आतां हें खरें कीं, हा दुसरा प्रकार पहिल्याहून बरा; कारण त्यांतील विसदृशतेवरून बोलणाराचा किंवा लिहिणाराचा असमंजसपणाच फार तर दिसून येईल. मोठ्या तेजस्वी हिऱ्याला कथिलाचें कोंदण केलें असतांही त्याची लकाकी जशी कमी व्हावयाची नाहीं; त्याचप्रमाणें सुज्ञ पुरुष वरील सुंदर अर्थावरच नजर देऊन शब्दरचनेकडे दुर्लक्ष करतील. तरी एकंदरींत त्यांस अंतर्बाह्य विसंवादाची विलक्षणता भासल्यावांचून राहणार नाहीं. असो; तर वरील ग्रंथांत विषयानुरूपच भाषापद्धति योजली असल्यामुळें ती पूर्वोक्त गुणामुळें विशेष शोभली आहे.

६. आतां वरच्यासारखी तऱ्हा नसून जेथें शास्त्रादिकांचा विषय असतो, तेथील भाषापद्धतीचा प्रकार पाहूं. याचीं उदाहरणें वरच्यासारखीं पुष्कळ देतां येणार नाहींत. कारण पदार्थविज्ञानांत अंतर्भूत होणारीं नाना अर्वाचीन शास्त्रें, किंवा इतिहास, अगर प्रतिपादन करण्याचे नानाप्रकारचे गहन विषय, यांपैकीं कशावरही मराठींत ह्मणण्यासारखे अद्याप मुळींच ग्रंथ झालेले नाहींत. यास्तव प्रौढ भाषापद्धतीचें स्वरूप वाचकांस वरच्यासारखें चांगलेंसें दाखविण्याची सोय नाहीं. ह्मणून एक दोन ग्रंथांतीलच उदाहरणें देतों.—

"अनेकविद्यामूलतत्त्व"—

---

## "सृष्टपदार्थांचे तीन वर्ग."

"हे जे वर सृष्टपदार्थांच्या तीन प्रधान वर्गांचें व त्यांतील मुख्य मुख्य अवांतर विभागांचें वर्णन केलें, तें लिनियस नामें कोणी स्वीदन देशांत सुमारें शंभर वर्षांपूर्वीं महापंडित झाला होता, त्याच्या ग्रंथाच्या आधारानें केलें आहे. हे तीन प्रधान वर्ग स्वरूपतः भिन्न आहेत; तथापि त्यांचा परस्परांशीं संबंध आहे; व कितीएक पदार्थ असे आहेत, कीं, ते कोणत्या वर्गांतले आहेत हें सांगावयास फारच कठिण पडतें. आतां हें खरें आहे कीं, खनिजवर्ग व इतर वर्ग यांची परस्परांवर भ्रांति कदापि व्हावयाची नाहीं; कारण निर्जीव पदार्थांस इतर दोन वर्गांतल्या पदार्थांप्रमाणें जीव व शारीररचना हीं असत नाहींत, व ते बाहेरून नवें द्रव्य चिकटून वाढतात, सजीव पदार्थांसारखे शरीरांत पोषकरस जाऊन

तदद्वारां वाढत नाहींत, असा स्पष्ट भेद आहे; परंतु सजीव पदार्थांचे जे दोन वर्ग आहेत, ह्मणजे वनस्पतिवर्ग, व प्राणिवर्ग, त्यांतील कितीएक पदार्थांचें एकमेकांशीं इतकें सारखेपण असतें, कीं ते पदार्थ वनस्पति आहेत, किंवा प्राणी आहेत, हें स्पष्टपणें सांगवत नाहीं. असे पदार्थ समुद्रांत कितीएक सांपडतात. आतां आपणांस असें जर कोणीं विचारलें, की शेवटच्या दोन वर्गांतल्या पदार्थांचे ठायीं त्यांचा पहिल्या वर्गांतल्या पदार्थांपासून भेद करणारें असें जीवनतत्त्व ह्मणून जें आहे, तें काय ? तर ही गोष्ट आह्मांस अगदीं ठाऊक नाहीं, असें कबूल केलें पाहिजे. आपण ईश्वरास जसा त्याच्या कृतीनें जाणतों; स्वरूपत: जाणत नाहीं; तसेंच जीवतत्त्वाच्या स्वरूपाचें आपणांस ज्ञान नाहीं; तर त्याच्या कार्यांवरून मात्र तें समजावयाचें."

---

"महाराष्ट्र-भाषेचें व्याकरण"—

"मागल्या दहा पंधरा वर्षांपासून महाराष्ट्र-भाषेंत गद्यात्मक ग्रंथ लिहिण्याचा प्रचार वाढूं लागला; तेंव्हांपासून, मोठमोठालीं वाक्यें तर काय, परंतु त्यांतील प्रत्येक शब्द, व त्या शब्दांतील प्रत्येक वर्णरूप अवयवही शुद्ध व नियमास अनुसरून असावा, आणि तेणेंकरून सर्वांची लिहिण्याची पद्धति एकसारखी पडून सांप्रत जी लिहिण्यांत अव्यवस्था आढळते, ती दूर व्हावी, अशी इच्छा माझ्या मनांत उद्भवली होती; कारण जशी भाषा, तशी तिची लेखनपद्धतिही, तदंतर्गत गूढस्थित जे नियम त्यांचें उद्घाटन करून त्यांजवर बशिवणें, हाच व्याकरण-शास्त्राचा मुख्य उद्देश होय. आणि याच उद्देशानें गालवशौनककात्यायनशाकटायनादि जे प्रतिशाख्यादिवेदव्याकरणभाष्यकार, व त्यानंतर पुढें यास्कपाणिन्यादि जे वैयाकरण झाले, व तदनंतर अर्वाचीन काळीं भट्टोजी दीक्षित, महीधरभट्ट, बोपदेव, आदिकरून जे व्याकरणग्रंथकार प्रसिद्ध झाले, त्या सर्वांनीं परिश्रम केले; ह्मणोनच संस्कृत भाषा इतक्या प्रगल्भ दशेस येऊन विद्वज्जनचित्तचकोरास चंद्रीभूत होऊन, वाल्मीकिव्यासशंकरश्रीहर्षकालिदासभवभूत्यादि जे प्राचीन आणि अर्वाचीन कवि त्यांच्या वाग्देवतेस इतकी रम्यस्थानार्ह झाली; नाहीं तर संस्कृत वाणीप्रमाणें जिचें काठिन्य, विस्तार, आणि जिच्या ठायीं, सहस्रश: सूक्ष्म नियमरूप तंतूंचें गुंतलेलें जाल, अशा भाषेस मार्दवदशेस आणून, तिचें हें दुर्निवार जाल उकलून, त्या सूत्रांनीं विणून, सिद्ध केलेला जो पट तो कविजनचित्रकारांच्या अनेक सुरसरंगभरित कल्पनांस लेखनार्ह झाला नसता. ह्मणोन या यशाचे जे अंशभाक् त्यांची परिगणना केली असतां, पतंजलिकात्यायनपाणिन्यादि जे शब्दशास्त्रनियंते त्यांसच आद्यस्थानापन्न केलें पाहिजे." प्रस्तावना.

या शेवटल्या उताऱ्यांत वरील ग्रंथकर्त्यांची नेहेमीची तऱ्हा पूर्णपणें लक्षांत येते. ती सर्वांस माहीतच आहे कीं, संस्कृतांतले मोठमोठाले शब्द व लांब लांब समास घालून देण्याची हौस होय. ही इंग्रेजी भाषेंतलि जॉनसनच्या ग्रंथांवरून प्रस्तुत ग्रंथकारानें मराठींत सुरू केली कीं काय नकळे. असें जर असेल, तर त्यानें वरील पद्धतीविषयीं सध्यां सर्व

रसिक वाचकांचें काय मत झालें आहे तें चांगलेंसें लक्षांत आणलें नाहीं असें ह्मणणें भाग आहे. जॉनसनूची पद्धति मनापासून चाहून तीस बुद्धिपुरःसर अनुसरणारा मनुष्य सध्यां तर कोणीही मिळेल असें वाटत नाहीं; व त्या महापंडिताच्या हयातींत व पुढें कांहीं वेळ त्याची तऱ्हा जरी बरीच लोकमान्य होऊन गेली होती, तरी त्यापुढें ती कोणाही नामांकित ग्रंथकारानें पुनः चालू करण्याचें मनांत आणलें नाहीं. असो; तर असल्या तऱ्हेचें अनुकरण आमच्या भाषेत जितकें बेताचें व जितकें थोडें होईल तितकें चांगलें. आतां हें खरें आहे कीं, वरील उताऱ्यांत प्रौढ विषयावरच लिहायाचें असल्यामुळें वरील रचना केवळ विशोभितच दिसते असें नाहीं. तिजवर दोष येवढाच येतो कीं, ती असावी त्यापेक्षां दुर्बोध झाली असून ग्रंथकारानें आपलें पांडित्य मिरविण्याच्या उद्देशानें तिची योजना केली आहे असा वाचकांचा समज होतो.

आतां वरच्यासारखी डौलाची रचनाही जेथें विषयानुरूपतेमुळें साजली जाऊन मनोवेधक होते असेंही एक उदाहरण येथें देतों. तें वरील सर्वप्रसिद्ध ग्रंथकाराच्याच एका प्रसिद्ध ग्रंथांतील होय--

" आणखी अशी अटकळ होते कीं, जेव्हां प्रथम मोरोपंताच्या आर्या बारामतींतून बाहेर निघूं लागल्या, त्या काळींच बारामतीजवळ सोलापुरांत रामजोशी या नांवाचे व्युत्पन्न आणि परम रसिक कवि असून त्यांनीं हरिदासाच्या वृत्तीचें अवलंबन केलें होतें; आणि नुकतेंच कीर्तीच्या अंगणांत जाण्यास उमऱ्यावरून बाहेर पाऊल टाकीत होते; तों इतक्यांत त्यांस पंताच्या कृतिकुमारिकेचा आल्हाददजनक शकुन भेटला; तिच्या सौंदर्यानें आणि निमंत्रणरूप आनंदजनक अशा प्रेमकटाक्षानें आकर्षितांतःकरण होऊन ही उपवर कन्या आपण वरावी अशी मनांत आवड धरून त्यांणीं तिच्या पित्याचा शोध करण्याकरितां तिचेंच अनुसरण केलें. पित्यानेंहि आपल्या कन्येच्या गुणास हा इतका लुब्ध पाहून तिणें याचें पाणिग्रहण केलें असतां ती लवकरच सुखी होईल ह्मणोन तसें करण्यास आपलें पूर्ण अनुमोदन दिलें. हा प्रसंग कोणीं खालीं लिहिलेल्या आर्येत असाच वर्णिला आहे--

जैशी जनकें दिधली सच्चिद्घन राम जो सिता त्याला ।
तैशी मयुरें दिधली ती आर्या रामजोसि तात्याला ॥

" किंबहुना असेंहि ऐकण्यांत आहे कीं, मोरोपंताच्या आर्यांनींच रामजोशाची वृत्ति हरिकीर्तनाकडे वळविली. त्यापूर्वी ते कलगीतुऱ्याच्या नादांत असून, लावण्यांच्या छंदावर कवनें करून, स्वछंदानें डफ तुणतुणें सारंगी आणि नाचेपोर हातीं घेऊन चरितार्थ चालवीत होते. ही वेळ बाजीराव रघुनाथ देशवे यांच्या विलासाच्या आरंभाची असावी अशी अटकळ होते. त्या काळीं रावबाजीच्या उत्तेजनानें पुणें शहरांत व त्या शहराचा वारा लागून जेथें तेथें शिमग्याचें चांदणें वाढत चाललें होतें. दिवसास ब्रह्मभोजनाचा थाट आणि दिव्यांत वात पडली नाहीं तों मंदिरांत चवघडे, रणया यांचा मंजुळ घोष; श्रीमंतांच्या व सरदार लोकांच्या वाड्यांत सरकारी तायफांचे मुजरे, रात्रीस रस्त्यांत आणि बोळांत

फिरणाऱ्या विलासी लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेणारे, नुकतेंच चिमणी, साळु, मैना, यांच्या मंजुळ कंठांत होणाजी बाळानें घातलेले खडे सूर, आणि फौजेकडील शिलेदार, बारगीर, शिपाई, आणि शहरांतील सुखवस्तु शिंपी, माळी, सराफ, दुकानदार, यांस रिजविण्याकरितां बाहिरू मल्हारी, धोंडीबापु, सगनभाऊ आणि रामा गोंधळी, यांनीं सजविलेले डफतुणतुण्याचे तमासे आणि कलगी तुऱ्याचीं भांडणें; हे सर्व थाट रावबाजीच्या उल्लसित मनोवृत्तींच्या प्रेरणेनें पुणें शहरांत जेथें तेथें गाजून राहिले होते. मग ' यथा राजा तथा प्रजा ' या न्यायानें त्या प्रेरणेचा अंमल सर्व पेशवाईत पसरला नसेल असें संभवत नाहीं. त्या काळीं सर्व गुणिजनांचे आशेनें भरलेले डोळे पुणें शहराकडे लागले असून त्या शहरानें जो कित्ता घातला होता, त्याची नक्कल जेथें तेथें होऊन कित्येक ठिकाणीं त्या नकलेवर ताण करणारे उमेदवारहि निपजूं लागले. रामजोशांसहि यद्यपि अशा उमेदवारांमध्यें गणिलें तथापि त्यांच्या गुणांस न्यूनत्व न येतां उलटी ती त्यांची उमेद प्रशंसेस पात्र होईल; कारण त्यांच्या कवनावरून रामजोशी हे चांगले व्युत्पन्न आणि साहित्यशास्त्रज्ञ असावे असें अनुमान होतें. असें असतां त्यांनीं आपलें लक्ष त्या काळाच्या इतर पंडितांप्रमाणें सभेंत शुष्क वादविवाद करून शालजोड्यांची आणि दक्षणेची प्रतिष्ठा मिळविण्याकडे न लावितां, सर्व लोकांचें मनोरंजन करून त्यांमध्यें वाहवा मिळविण्याकडेस लाविलें हें आश्चर्य होय. त्यांत आणखी ब्राह्मणानें विद्वानाची पूज्य प्रतिष्ठा तुच्छ मानून केवळ लोकरंजनार्थ शूद्रवृत्ति धारण करून तमासगिरांच्या निर्भर्त्सनेचा अंगीकार केला, येणेंकरून रामजोशी हे मोठे उदार मनाचे पुरुष होते असें दिसतें; तसें असल्यावांचून त्या काळीं इतक्या धैर्याचें कर्म त्यांजकडून घडणें कठिण, ह्मणून माझ्या मतें ते मोठे प्रशंसेस योग्य होत."

'केकावली'–प्रस्तावना.

७. याप्रमाणें भाषेंत असणारे दोन मोठमोठाले प्रकार वर सांगून त्यांचें उदाहरणही केलें. आतां यांशिवाय बाकीचे जे आढळणारे आहेत ते आपल्या भाषेंत अद्याप चांगलेसे रूढ न झाल्यामुळें त्यांविषयीं एकंदरीनें निराळ्या सदरांतच विचार करूं. हें सदर इंग्रेजी भाषेचें अनुकरण होय.

८. इंग्रेजी भाषेचें अनुकरण ह्मणजे इंग्रेजींत ज्या पद्धति आढळतात त्या इकडे आणण्याचा गेल्या वीस पंचवीस वर्षांत आपल्या लोकांचा जो उद्योग चालू झाला आहे तो होय. हा उद्योग इंग्रेजी भाषेचा इकडे जो आजपर्यंत प्रसार झाला व उत्तरोत्तर होत आहे त्याचें फळ होय. तो आजला जितका व्हावा व जितका होणें इष्ट आहे तितका अद्याप झाला नाहीं खरा; तरी तो कालेंकरून पुष्कळ वाढत जाईल असा सुमार दिसतो. हे नवे प्रकार ह्मटले ह्मणजे वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व काव्यनाटकादि इतर ग्रंथ हे होत. यांपैकीं पहिल्या दोहोंविषयीं प्रस्तुत मालेच्या पहिल्या दोन अंकांत बराच मजकूर लिहिला आहे. त्यांच्या स्थितींत मध्यंतरीं गेलेल्या अल्पकाळांत ह्मणण्यासारखा कांहींच विशेष फेरफार न झाल्यामुळें तेथल्याहून येथें कांहीं जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. यास्तव इतर ग्रंथांच्या संबंधानें मात्र येथें विचार करूं.

९. कोणत्याही दोन भाषांचा जेव्हां परस्पर संगम होतो, तेव्हां दोहोंच्या मिश्रणाच्या योगानें दोघींचे गुण एकमेकींस लागतात. याविषयीं इतिहासांत पुष्कळ उदाहरणें आहेत; व एका राष्ट्राच्या ग्रंथसंग्रहास दुसऱ्या राष्ट्राच्या ग्रंथसमूहानें कसें साहाय्य झालें किंवा त्यांत कोणते फेरफार घडले हा विषय भाषाभिज्ञ लोकांस मोठा मनोरंजनावह झाला आहे. आतां जेथें मराठी व इंग्रेजीसारख्या परस्परांहून अत्यंत भिन्न असणाऱ्या व परिपक्वतेच्या मानानें ज्यांत अतिशयित अंतर आहे अशा दोन भाषांची गांठ पडते, तेथें तर वरच्याहून पुष्कळ निराळा प्रकार घडण्यांत येतो. तो असा की, हीन भाषेस अभियुक्त भाषेची पद्धत लागून तींतील ग्रंथसंग्रह त्या दुसऱ्या भाषेची अभिवृद्धि होण्यास कारणभूत होतो; हा प्रकार संकृताच्या योगानें आमच्या भाषेस यापूर्वी पुष्कळच झाला आहे; व इतउत्तर वरील संस्कार मराठीस आणखी जास्त होत जाण्याचाही संभव आहे. तीच गोष्ट इंग्रेजी भाषेसही लागते. हिचा परिचय गेल्या पंचवीस तीस वर्षांत आमच्या लोकांस पुष्कळ झाल्यामुळें महाराष्ट्र-भाषेचें सगळें स्वरूप तिनें बदलून टाकलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां वरील फेर-फार होतांना आमच्या भाषेची पुष्कळ हानि झाली, व कांहीं वेळ तर तीस अतिशय अपाय घडण्याचेंही भय होतें, हें खरें आहे; पण सध्यां चोहोंकडे जी गडबड दिसत आहे तिजवरून पहातां वरील भय नाहींसें होऊन तिचा उत्कर्ष होण्याचीं बरींच सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत असें ह्मणणें भाग आहे. असो; आतां इंग्रेजी भाषेच्या अनुकरणानें मराठींत नवे प्रकार कोणते सुरू झाले हें जर पाहिलें, तर अगोदर गद्याची तींत पद्धति पडली ही गोष्ट तेव्हांच लक्षांत येणारी आहे. ही पद्धति हिंदुस्थानांत यापुर्वीं कधींच नव्हती ह्मटलें तरी चालेल; कारण संकृतांतही सर्व ग्रंथ प्रायः पद्यरूपच आहेत. ही नवी पद्धति पद्यरचनेपेक्षां सोपी व साहजिक असल्यामुळें व नाना प्रकारच्या विषयांच्या विवेचनासही ती सारखी उपयोगी पडणारी आहे, यास्तव तिचा प्रचार आलीकडे चांगला पडून गेला हा महाराष्ट्र-भाषेस मोठाच लाभ झाला असें ह्मटलें पाहिजे. आलीकडे दहावीस वर्षांत पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर जी मराठींत ग्रंथरचना झाली ती एरवीं होतीना. ही पद्धत वर्तमानपत्रांच्या व मासिक पुस्तकांच्या फैलाव्यानें दिवसेंदिवस विशेष निश्चित होत जाऊन कादंबऱ्या, नाटकें, वगैरे जे कित्येक नवे प्रकार आलीकडे सुरू झाले आहेत त्यांच्या योगानेंही तीस साह्य झालें आहे. तीस अद्याप ह्मणण्यासारखी चांगली स्थिति आली नाहीं; तरी सध्यांचा क्रम असाच पुढें चालल्यास तींत पुष्कळ सुधारणा होण्याची आशा दिसत आहे.

१०. आतां सरतेशेवटीं वरील कादंबऱ्यादि नवे प्रकार आपल्या भाषेंत कसे सुरू झाले, त्यांची आजला कोणती स्थिति आहे, वगैरेविषयीं लिहून एकंदर विषयाची परिसमाप्ति करतों. इंग्रेज लोक इकडे आल्यानें सर्व गोष्टींत दोन प्रकारचा बदल झाला आहे,—कीं कांहीं नव्या उत्पन्न झाल्या आहेत, व कांहींचें पहिलें स्वरूप पालटून फेरफार झाला आहे,—तसेंच आमच्या ग्रंथांतही झालें आहे. कवितेची व इतिहासाची जुनी तऱ्हा बदलून नवी होत चालली आहे; व कादंबरी आणि नाटक हे अपूर्व प्रकार प्रचारांत येत आहेत. आतां या चोहोंविषयीं अनुक्रमेंकरून विचार करूं.

दुसरें रूपांतर इतिहासाचें. आमच्या जुन्या मराठी व ब्राह्मणी घराण्यांचे इतिहास कोणत्या रूपानें दृष्टीस पडतात हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् माहीत असेल. तें रूप बखर हें होय. ही ऐतिहासिक वृत्तांत लिहून ठेवण्याची तऱ्हा आमच्या लोकांत चांगली पूर्णतेस कधींही आली नाहीं; तरी झालेल्या हकीकती साद्यंत लिहून ठेवण्याची जी वरील चाल त्या काळीं चोहोंकडे सुरू होती तीवरून आपल्या लोकांचा उद्योग व जिज्ञासा हीं दोन्ही स्पष्ट होतात. आपल्या देशाचा खरा इतिहास मिळविण्याचें वरील लेखच चांगलें साधन होत हें आह्मीं मागें सांगितलेंच आहे; व असें असण्याचीं कारणेंही दर्शविलीं आहेत. तसेंच वरील उद्योग आतां जर केला नाहीं, तर तो पुढें होण्याची मुळीं शक्यताही रहाणार नाहीं हेंही मागें आठव्या अंकाच्या शेवटीं सुचविलें आहे. असो; पण आतां वरील तऱ्हा बदलली. इंग्लिश भाषेंत जे शेंकडों मोठमोठे इतिहास-ग्रंथ आहेत त्यांची सरणी आपल्या लोकांस माहीत झाल्यामुळें यापुढें पहिल्या अडाणी रीतीस आतां कोणी अनुसरणार नाहीं. गेल्या तीस चाळीस वर्षांत आपल्या भाषेची क्रमाक्रमानें स्थिति सुधारत जाऊन ती अद्यापही पुढें तशीच चालू आहे, हेंही वरील इतिहासरचनेस चांगलें अनुकूल होणार आहे. तेव्हां एकंदरींत या विषयाच्या संबंधानें इंग्लिश भाषेचा आमच्या भाषेशीं जो संसर्ग घडला आहे तो सर्वथा हितावहच होईल. मागील कवितेच्या संबंधानें त्याचें हितावहत्व जसें संशयात्मक होय तसें याविषयीं नाहीं. असो; पण हे सर्व मनाचे तरंग पुढील काळाच्या संबंधानें झाले. त्यांचा साक्षात् प्रत्यय केव्हां येईल तो येवो. सध्यां तर आजपर्यंत चालत आल्याप्रमाणेंच स्वदेशाच्या इतिहासाविषयीं बहुधां सर्वांची अनास्था दिसते. ज्या गोष्टींचें यथावत् स्वरूप आह्मांस मात्र समजणें शक्य, व यास्तव त्यांविषयीं निर्णय देण्यास वस्तुतः पाहिलें असतां आह्मांस मात्र अधिकार, त्यांविषयीं मतें देण्याचा पतकर बडे बडे रेवरेंड, मोठमोठे हुद्देदार साहेब, व इकडचें अक्षरही माहीत नसतां उंटावरून शेळ्या हांकणारे महान् महान् इंग्रेज ग्रंथकार हे बेधडक घेतात; आणि पेनाच्या सफाईत किंवा जिव्हाग्राच्या चापल्यांत ( त्यांतून त्या चापल्याचा विलायती रसाच्या संस्कारानें परमोत्कर्ष झाला असल्यास मग तर आमचा पुराच भाग्योदय ! ) वक्तृत्वरूप ओघांत जे कांहीं वाहवतात ते आतोनात ! पण याहून चमत्कार काय कीं त्यांच्या पोकळ शब्दावडंबराचें आह्मांस हंसूं न येतां किंवा तिरस्कार न वाटतां सत्याचें व ज्ञानाचें जणों काय मंथन करून दोहोंचें सारच त्यांनीं आह्मांस अर्पण केलें आहे अशा भावानें त्यांचीं वचनें आह्मी शिरसावंद्य करतों; आणि त्यांची पोपटपंची भरसभेंत करून आमच्या लोकांचा खुळेपणा व अधमपणा सर्वांस दाखवून दिला ह्मणजे आह्मांस जन्माचें भूषण झालें असें मानतों ! असो; आज आमच्या भाषेंत आमच्या देशाचे जे इतिहास आहेत त्यांत शब्दास शब्द भाषांतर नसतां स्वतंत्र आपल्याच बुद्धीनें लिहिलेले असे दोन मात्र आह्मांस माहीत आहेत—एक जांभेकर यांचा ' हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास,' आणि दुसरा रा० विनायक कोंडदेव ओक यांचा ' हिंदुस्थानकथारस.' या दोघां ग्रंथकारांनीं, व त्यांतून विशेषतः दुसऱ्यानें स्वतंत्र इतिहासरचना करण्याचा जो आपल्या देशबंधूंस कित्ता घालून दिला आहे त्याजबद्दल

त्यांचे सर्वांनीं मोठे आभार मानणें अवश्य होय हें उघडच आहे. तथापि खरोखरी पाहतां दोघांनींही आपापल्या ग्रंथांत केवळ शब्दरचनेच्या पलीकडे कोणत्याही प्रकारें स्वातंत्र्य दाखविलें आहे असें नाहीं. इंग्रेज ग्रंथकारांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा प्रकार आहे तो आहेच.[1] हें जोंपर्यंत नाहींसें झालें नाहीं तोंपर्यंत इतिहासाचें खरें वास्तव्य आपल्या भाषेंत झालेंसें मुळींच ह्मणतां येणार नाहीं.

आतां आपल्या भाषेंत पूर्वीं मुळीं नसून नवेच सुरू झालेले दोन प्रकार जे कादंबरी व नाटक त्यांविषयीं लिहूं. हे दोन्ही प्रकार संस्कृतांत आहेत. नाटक तर मोठ्याच पूर्णतेस पावलें असून कादंबरीचा प्रकार इंग्रेजींतील 'नाव्हलासारखा' जरी सर्वांशीं नाहीं, तरी तो संविधानकादि अनेक गुणांनीं परिपूर्ण आहे. पण मराठींत जे वरील दोन्ही प्रकार उत्पन्न झाले आहेत ते संस्कृतावरून घेतलेले नव्हेत. त्यांस मूळ इंग्रेजी ग्रंथच होत. इंग्लंडांत गेल्या शंभर वर्षांत 'नाव्हल्' ह्मणून एक कल्पित कथेची तऱ्हा निघून ती लवकरच मोठ्या उत्कर्षास जाऊन पोंचली. नाटकें तर त्या भाषेंत दोनतीनशें वर्षांपूर्वींच मोठीं उत्कृष्ट झालीं आहेत. तर या दोहोंच्या अनुकरणानें वरील दोन्ही तऱ्हा मराठींत सुरू झाल्या आहेत. त्या पूर्णत्वाच्या दशेस पोंचण्यास अर्थात् अद्याप पुष्कळ काळ गेला पाहिजे. तरी सध्यांही त्यांच्यांत कांहीं मासले बऱ्याच चांगल्या प्रतीचे दाखवितां येतील. या नव्या कादंबऱ्यांत आह्मीं अद्याप जितक्या वाचल्या आहेत तितक्यांत 'मुक्तमाला,' 'बोधसुधा,' व 'हंबीरराव आणि पुतळाबाई' या आमच्या मतें उत्तम आहेत. त्याप्रमाणेंच इंग्रेजीच्या धाटणीवर जीं जीं नाटकें झालीं आहेत त्यांत 'थोरले

---

१. मेकॉले, मॉरिससारख्या महासमर्थ ग्रंथकारांनीं आमच्या इतिहाससिंधूचें आलोडन करून आह्मी परम दुर्बल, परम नीच, परम मूर्ख अशीं सत्याचीं रहस्यें जीं आह्मांस नजर केलीं आहेत तीं अद्यापही आह्मीं उराशींच बाळगिलीं आहेत, तीं तेथून केव्हां निघतील तीं निघोत. आमच्या साधारण संभाषणांत मोठमोठ्या सभांतून, लोकमान्य ग्रंथांतूनही वरच्यासारख्याच कल्पना व विचार आढळून येतात. वर सांगितलेल्या 'बखारसां'त ग्रंथकारानें कित्येक ठिकाणीं आपल्या समजुती सदरहूप्रमाणेंच प्रगट केल्या आहेत. त्यांचा मासला ज्या कोणास पाहणें असेल त्यानें तो वरील ग्रंथाच्या शेवटीं सत्तावन सालच्या बंडाच्या संबंधानें दोन लेख लिहिले आहेत त्यांत पाहावा. अथवा त्याच ग्रंथकर्त्यानें 'शिपायांच्या बंडाचा इतिहास ह्मणून एक नवें पुस्तक' प्रसिद्ध केलें आहे तें पाहावें. या नव्या इतिहासांत रा० ओक यांनीं आपली राजनिष्ठा मोठ्या बहादरीनें दाखविली आहे यांत संशय नाहीं; पण त्याच मानानें त्यांत सत्यनिष्ठेचा प्रकार जर दिसता तर बरें होतें असें आह्मांस वाटतें. वरील दोन्ही लेख त्यांनीं लोकभ्रतींचें निरसन करण्याच्या स्तुत्य उद्देशानें लिहिले आहेत; व याच कामगिरीबद्दल सरकारच्या उदार आश्रयाचा अनुभव त्यांस घडला असावा असें वाटतें. असें असेल तर आमची त्यांस अशी सूचना आहे कीं, गेल्या सालीं माजी गायकवाडांनीं विषप्रयोगाचें घोर कृत्य केल्याबद्दल आमच्या न्यायदंडधारी कृपाळू सरकारानें त्यांस जें यथायोग्य शासन दिलें त्यावरही त्यांनीं इतिहासरचना करून लक्षावधि राजनिष्ठ लोकांच्या मनांत ब्रिटिश सरकारच्या न्यायित्वाबद्दल व्यर्थ जो किंतु आला आहे तोही नाहींसा करावा. 'हिंदुस्थानकथारसाच्या हा शेवटचा पुरवणी त्यांनीं तयार केला असतां त्यांच्या श्रमाचें वैफल्य होईल असें नाहीं हें सांगणें नकोच!

माधवराव,' 'जयपाळ,' व 'मनोरमा' [१] हीं आह्मांस उत्कृष्ट वाटतात. अशा प्रकारचे ग्रंथ कसे असावे, त्यांतील गुण कोणते, व ते साधण्यास उपाय काय, वगैरे गोष्टींचा यथास्थित ऊहापोह करून तो आमच्या लोकांस समजाविणें हें मोठें अवश्य आहे. पण तें अद्याप कोणींच न केल्यामुळें कादंबऱ्या व नाटकें हीं सध्यां यदृच्छेनें जो तो हवीं तशीं लिहितो. त्यामुळें तीं सामान्यत: इतकीं भिकार व पचपचीत निपजतात. साधारणपणें बरें असें एखादेंही त्यांत सांपडण्याची मारामार पडते. असो; तर इंग्रेजी भाषेच्या संसर्गानें हे दोन प्रकार आमच्या भाषेंत नवे सुरू होऊन त्यांची आज वर सांगितल्या प्रकारची स्थिति आहे.

११. आतां वरील कलमांत सांगितलेल्या स्थित्यंतराच्या योगानें आमच्या भाषेंत भाषापद्धतीचे नवे प्रकार कोणते निघाले ते सांगतों. एक विनोदाचा; विनोदात्मक लेखाची प्रवृत्ति मराठींत पूर्वीं गद्यांत नव्हती व पद्यांतही नव्हती हें उघडच आहे. तशीच ती संस्कृतांतही विशेष ह्मणण्यासारखी नाहीं हें तद्भाषाभिज्ञांस माहीत असेलच. त्या भाषेंत इतकीं नाटकें आहेत; पण हास्यरसाचा विशेष प्रकार असा एका मृच्छकटिकांत मात्र आहे. प्रहसन नांवाचा एक नाट्यप्रकार प्रसिद्ध आहे खरा; पण त्यांतील विनोद विशेष वाखाणण्यासारखा नसतो. असो; तर ही वरील रीते इंग्रेजी भाषेवरून इकडे आली. वर्तमानपत्रें सुरू होऊन त्यांचा फैलावा जसा होत चालला, व जनमनोरंजन हें त्यांचें तत्त्व होऊन बसलें, तसतसा वरील प्रघात वाढत चालला. लोकप्रसिद्ध गोष्टींविषयीं व लोकप्रसिद्ध मनुष्यांस अनुलक्षून लिहिलेला मजकूर लोकांस मनोवेधक होत गेल्यानें तो मार्मिक रीतीनें लिहिण्याची रीत पडली. त्याप्रमाणेंच ग्रंथ लिहिण्याचा प्रघातही आलीकडे वाढत चालल्यानें टीका करण्याचा प्रचारही आलीकडे वाढत चालला आहे. ग्रंथांचे गुणावगुण लोकांस दिवसेंदिवस बरेच चांगले कळूं लागले आहेत; व मासिक पुस्तकांचा प्रचार सध्यांहून जर पुष्कळ

१. वरील ग्रंथाची आह्मीं उत्तमांत गणना केली हें पुष्कळांस कदाचित् विलक्षण वाटेल; व वरील नाटकांत बीभत्स रसाचा वगैरे पुष्कळ निंद्य प्रकार जो आहे तो आह्मांस अमान्य नाहीं अशी त्यांची समजूत होईल. पण असें अगदीं नव्हे. 'विविधज्ञानविस्तारां'त (पुस्तक ३ अंक १०). सदरील पुस्तकावर जी चरचरीत टीका केली होती ती बहुतेक अंशीं आह्मांस मान्य आहे; व पुस्तकें कितीही चांगलीं असलीं तरी तीं जर चावट आहेत तर तीं न झालेलीं पुरवलीं असें आमचें मत आहे. कारण असल्या ग्रंथांत जितके गुण अधिक तितका त्यांपासून अधिक अनर्थ होण्याचा संभव. तथापि ज्याप्रमाणें वेश्या दुराचारिणी खरी तरी तिचें रूप जर मनोहर आहे, तर नुसत्या रूपाचाच विचार कर्तव्य असतां तिचें दुष्कर्म मनांत आणण्यांत हंशील नाहीं; त्याप्रमाणें ग्रंथाच्या रचनेवरच जर नजर द्यावयाची असली तर त्याच्या बीभत्सत्वाचा वगैरे विचार निराळाच ठेविला पाहिजे. चितारयाचें किंवा मूर्तिकाराचें कसब बीभत्सपणामुळें जसें कमी धरतां येत नाहीं तशी व ग्रंथकारांचीही गोष्ट होय. पाहा कीं, 'बोकेशियो' सारखा चावट व विचकट ग्रंथकर्ता या भूमंडळावर थोडासाच झाला असेल; पण त्याच्या भाषासौंदर्यास्तव त्याच्या गोष्टी आज सहाशें वर्षें युरोपांत सर्वमान्य होऊन त्या चिरकाळ या जगांत रहातील यांत तिळमात्रही संशय नाहीं. त्याचप्रमाणें शेक्सपीयर, बायरन् वगैरे इंग्लिश कवींची, व कालिदास, जयदेव इत्यादि संस्कृत कवींचीही गोष्ट होय असो; तर वरील नाटकांत कांहीं संविधानकाचें चातुर्य व विशेषत: भाषणांचा चटकदारपणा हे गुण चांगले असल्यामुळें त्यास वरील पंक्तींत बसविणें भाग आहे.

वाढत चालला तर ग्रंथपरीक्षणांत वाचकांची निपुणताही अधिकाधिक होत जाईल हें उघड आहे. असो; आतां वरील दोन्ही ठिकाणीं विनोदाचा बराच उत्तम म्हणण्यासारखा मासला आजपर्यंत कोणकोणता दिसण्यांत आला तो सांगतों. एक येथील ज्ञानप्रकाशांतील 'पिशाच' सहीचीं पत्रें. यांतील विषय जरी नेहेमीं विशेष महत्त्वाचा नसे, तरी आंतील मजकूर हास्यपर असल्यामुळें तीं पुष्कळ वाचकांस अत्यंत प्रिय झालेलीं असत. त्यांतील रोख कोणा व्यक्तीवर नसून लौकिक विषयांच्या संबंधानेंच तीं प्राय: लिहिलीं असत. दुसरा मासला वरच्याहून निराळा होता. तो वरील पत्रांत एकदां व एकदां माजी 'लोककल्याणेच्छू'त असा दोनदां चांगला दृष्टीस पडला. तो अद्यापही येथील लोक तरी निदान विसरले नसतील. पुण्यांतील दोन प्रसिद्ध व्यक्तींस अनुलक्षून 'लोककल्याणेच्छू'त 'गोल्या भुबड' या सहीचीं दोन पत्रें व 'ज्ञानप्रकाशां'त 'पढतमूर्ख' या सहीचें एक पत्र अशीं सुमारें चार पांच वर्षांपूर्वीं तीन पत्रें प्रसिद्ध झालीं होतीं. तीं अशीं खुबीदार लिहिलीं होतीं कीं, कांहीं दिवसपर्यंत लोकांच्या तोंडीं त्याशिवाय दुसरा विषयच नाहींसा झाला. जो तो त्या लोकप्रिय व्यक्तींचें चरित्र गाऊं लागला. तसेंच त्या पत्रांवरून, वरील दोघां महापुरुषांस पुरतेपणीं कळून आलें कीं, पुण्याचें पाणी कांहीं निराळें आहे; वनजंबूकन्यायानें आपण पूर्वीच्या ठिकाणीं जी विचित्र लीला केली ती या पुण्यपत्तनांत खपली जाणार नाहीं; येथें मोठमोठ्यांचीही मति कुंठित होते! असो; ग्रंथावरील टीकेंत यावयाचा जो विनोदाचा प्रकार तो अद्याप पुष्कळसा दृष्टीस पडूं लागला नाहीं. यापूर्वीं वरील प्रकार ज्यांत दृष्टीस पडला अशीं पुस्तकें दोनच होत; एक माजी 'शालापत्रक' व दुसरें 'विविधज्ञानविस्तार.' या दोहोंपैकीं पहिल्यांतलि 'घाशीराम कोतवाला'वरील टीका[1] ही आह्मांस वरील विनोदात्मक टीकेचें एक चांगलें उदाहरण वाटतें; व त्याच्या खालोखाल दुसऱ्या पुस्तकांतीलही कांहीं टीका आहेत.

१२. इंग्रेजी ग्रंथांचें ज्ञान चोहोंकडे फैलावल्यानें नवा सुरू झालेला प्रकार आणखी एक सांगणें आहे. तो सृष्टिवर्णन होय. हा जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांत क्वचित् आढळतो; व संस्कृतांतही त्याची एक निराळी तऱ्हाच आहे.[2] इंग्रेजी कवितेंत गद्यग्रंथांत मात्र तो आलीकडे मोठ्या पूर्ण दशेस येऊन पोंचला आहे. त्याचेंच अनुकरण आलीकडे आमचे ग्रंथकार करूं लागले आहेत. वस्तुत: पाहतां आमच्या देशाचें सृष्टिवैभव येवढें अवाढव्य, चित्रविचित्र, व चित्तास आल्हाद व उन्नति देणारें असल्यामुळें वरील प्रकारचा उत्कर्ष होण्यास आमच्या देशवासी लोकांस जशीं साधनें आहेत तशीं पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही देशांतील लोकांस नाहींत असें ह्मटलें असतां चालणार आहे. यास्तव इंग्रेजी ग्रंथांच्या परिचयानें सृष्टिवैभव पाहण्याची आह्मांस जसजशी गोडी लागत जाईल, व चोहोंकडे प्रवास करण्याचा प्रघात आमच्या लोकांत वाढत जाईल; तसतशी आमच्या ग्रंथांतून प्रस्तुत प्रकारची अभिवृद्धि होत जाईल असा सुमार दिसतो. असो; आतां सध्यांच्या स्थितीला वरील वर्णनाचा प्रघात कितपत सुरू झाला आहे तो दाखवितों.—

---

१. पुस्तक ५ अंक १०.

२. या महत्त्वाच्या विषयावर थोडेंसें विवेचन केलेलें शालापत्रक पुस्तक १२ अंक१ यांत सांपडेल.

"पर्जन्यकाळ संपत येऊन हस्तनक्षत्रास आरंभ झाला असतां मोठमोठाले ढग आकाशांतून इकडून तिकडे फिरूं लागले. मोठा जोराचा वारा सुटून कोठें कोठें वादळेंही होऊं लागलीं. विद्युल्लतेचे मोठे भयंकर कडकडाट चालू झाले. कोठें कोठें मोठ्या जोराचा पाऊसही पडत आहे, चोंहीकडील नदनाले भरून चालले आहेत, कितीएक पांथस्थ लोक पावसाच्या सपाट्यानें भिजून नदीनाले इत्यादिकांस उतार नसल्यामुळें खुडखुडत उभे राहिले आहेत. कितीएकांस, विजेच्या व वादळाच्या सपाट्यांत आपण सांपडतों कीं काय असें होऊन गेलें आहे. जिकडून वादळ जात आहे, तिकडे अतिशय धुरळा उसळून वृक्ष आप-आपलीं मस्तकें मोठ्या जोरानें हालवीत आहेत, आणि मेघांच्या भयंकर गर्जनेनें चाही दिशा व्यापून गेल्या आहेत.

"अशा भीतिदायक प्रसंगांत, उज्जनीपासून सुमारें दोन कोशांवर, आमचा सोमदत्त सांपडला. शुक्राक्षाच्या वगीनें भद्राक्षाची मोठ्या जाग्यावर नेमणूक होतांच सोमदत्तानें बंदि-खान्यावरील अधिकाऱ्यांस एक हजार रुपये लांच देऊन आपली सुटका करून घेतली. आणि पहांटेस उठून दोन कोश गेला नाहीं तोंच तो वादळाच्या सपाट्यांत सांपडला. वारा इतका जोराचा सुटला कीं, तो घोड्यासुद्धां कोठें भलतीकडेच नेऊन टाकितो कीं काय असें त्यास वाटलें. धुरळा इतका होऊन गेला होता कीं, डोळे उघडण्याचीही सोय नाहीं. मध्यें थोडा अवकाश सांपडतांच तो घोड्यावरून खालीं उतरला. आणि एक झाड होतें त्याच्या आड जाऊन उभा राहिला. चाकरही मोठ्या प्रयत्नानें घोडा तेथें घेऊन गेला. इतक्यांत पहिल्यापेक्षांही अधिक जोराचा वारा सुटला. तेणेंकरून तो वृक्ष उमळून पडून त्या खालीं आपला चुराडा होतो कीं काय असें त्यास वाटलें. अशा अवस्थेंत तो आहे तो मोठ्या सपाट्याचा पाऊस व मोठमोठ्या गारा पडण्यास आरंभ झाला. वाऱ्याच्या जोरामुळें जसा दगडांचा मार व्हावा तसा गारांचा मार चालला. इतक्यांत अंतःकरणांत धडकी भरण्यासारखा विजेचा कडकडाटही झाला. ह्यांतून आतां प्राण वांचणें कठीण असें सोमदत्तास वाटलें. सुमारें आठ महिने बंदिखान्यांत असल्यामुळें व रात्रंदिवस मुक्तामालेच्या काळजीमुळें तो आधींच अगदीं अशक्त होऊन गेला होता. मग बंदांतून सुटून बाहेर पडतो तों लगेच या अनर्थांत सांपडला, त्यामुळें त्यास असें वाटलें कीं आपणावर ईश्वरच कोपला; मग यश कोठून येणार! तर आतां त्यासच शरण जावें ह्मणजे त्यास दया आली तर येईल, असा निश्चय करून त्यानें अनन्यभावें त्याचें चिंतन चालविलें.

"मागें सांगितल्याप्रमाणें एक घटकाभर गारांचा पाऊस पडला. नंतर तो वळवाचा पाऊस जसा एकाएकीं आला तसाच एकदम उघाला. मेघांनीं आकाश व्यापून गेलें होतें तें तेव्हांच वितळून जाऊन स्वच्छ ऊन्ह पडलें. जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें होतें. सोमदत्ताचें सर्वांग गारांच्या मारानें बरेंच ठेंचून गेलें व कपाळावर एक दोन ठिकाणीं टेंगळेंही आलीं. सर्व चिरगुटें भिजून चिंब झाल्यामुळें कोरडें वस्त्रही नेसावयास राहिलें नाहीं. घोड्यावरीलही सर्व सामान भिजून गेलें. हा आपला अपमृत्यूच टळला असें वाटून सर्व भिजलें व गारांचा मार बसला तरी त्यास फारसें दुःख झालें नाहीं; आकाश स्वच्छ होऊन ऊन्ह पडल्यामुळें कांहींसा त्याचे जिवास धीर आला." 'मुक्तामाला', भाग ८.

" स्वप्न असें पाहिलें कीं, मी वाड्यांतून निघून गंगातीरीं गेलों; आणि तेथें पहातों तों अमर्याद पूर आला असल्यामुळें, ती गंगाबाई दुथड्यांचें उल्लंघन करून, महावेगानें " फूंफूं " असा शब्द करीत चालली होती. कोणी ह्मणेल ही बया गिरिराज जनकावर रुसून तट फुगून, गान्हाणें गातच आपल्या प्रियपात्र रत्नाकराकडे जात आहे कीं काय कोण जाणे ! इतक्यांत तिची ती शीघ्रगति मंद झाली, तिच्या प्रचंड लाटा कमी झाल्या, तिचें विस्तीर्ण पात्र आकुंचित झालें; तिचें गढूळ उदक स्वच्छ स्फटिकासारखें झालें; सारांश कोणी ह्मणेल सख्या रत्नाकरानें अंजारून गोंजारून, लडिवाळपणानें मांडीवर घेऊन इचें शांतवन केलें. इकडे आसमंतात् मार्गांच्या प्रदेशांत नाना तऱ्हेचीं धान्यें इतकीं विपुल उगवलेलीं दिसलीं, कीं आज पृथ्वीनें आपलें सर्वच वैभव बाहेर काढलें कीं काय असा मला घटकाभर भास झाला. जयपाळा, सरासरी दोन अडीच घटकांच्या आंत हा सातदां चमत्कार पाहिला. मग परतावें ह्मणून निघालों तों एकाएकीं गंगाबाईचें होतें तें उदक आटूं लागलें. आटतां आटतां, पांच सात पुरुष पाणी असावयाच्या ठिकाणीं, नेत्रस्पर्शास टिपूसभर देखील उरलें नाहीं. तिच्यामध्यें विहार करून सुखानें रहाणारे जे मत्स्यादि जीव, त्यांनीं तळमळ तळमळ करून पटापटा प्राण टाकले. चहूं बाजूंच्या धान्यांची राख झाली. जिकडे दृष्टि द्यावी तिकडे वालुकामय दिसूं लागलें. हाही चमत्कार सातदां पाहिला." 'जयपाळ,' अंक ३.

१३. येथवर आरंभीं संकल्प केल्याप्रमाणें सगळा विषय आटपला. आतां सरते शेवटीं उत्कृष्ट भाषांतराचे कांहीं मासले येथें दाखल करून प्रस्तुत लेख आटपतों. हें देण्याचा अभिप्राय येवढाच आहे कीं, जे प्रकार आपल्या भाषेंत अद्याप चांगलेसे दृष्टीस पडूं लागले नाहींत ते तींत येण्याची योग्यता तरी तिचे अंगीं आहे कीं नाहीं हें वाचकांस कळावें. ही योग्यता पुढील भाषांतरें जितकीं उत्कृष्ट उतरलीं असतील तितक्यावरून विशेष कळणार आहे. पहिलें उदाहरण अत्यंत आवेशयुक्त वक्तृत्वाचें—

" पण मद्देशबांधवहो, किती वेळ तुमच्या कानांशीं ओरडावें, तुह्मी उपेक्षा करितां हें पाहून, पहा, माझा जीव पराकाष्ठेचा चडफडतो. अरे, तुह्मी आलस्यनिद्रेंतून जागे होऊन युद्ध करण्याविषयीं कंबर कधीं बांधणार ? काय, कांहीं मोठा एकादा अनर्थ घडल्यावांचून तुमचे डोळे उघडत नाहींत ? आतां घरीं बसवत नाहीं, शत्रु येऊन वेशीशीं पोंहचला; असें झालें पाहिजे काय ? अरे, आजपर्यंत ज्या तुमच्या मानखंडना झाल्या त्यांविषयीं तुह्मांस कांहींच वाटत नाहीं ? आजपर्यंत जें झालें, तितक्यानें तुमचा आळस जात नाहीं ? ह्याहीपेक्षां मोठा कांहीं अनर्थ कोसळला पाहिजे ? शहरच्या रस्त्यांनीं उगीच फिरत असावें; आणि एकमेकांस पोकळ बातम्या विचाराव्या; अशा व्यर्थ गमण्याखालीं, तुह्मी बाबांनो, किती तरी वेळ घालविणार ? अरे, मासिदनवाल्यानें आथेन्स संस्थान जिंकून सर्व ग्रीस देशावर आपला पगडा बसविला; असें घोर वर्तमान ह्या शहरांत आजपर्यंत कधीं आलें होतें ? आणखी तुह्मी एकमेकांस विचारतां, " काय हो, फिलिप् मेला ?" एक उत्तर देतो " अद्यापि मेला तर नाहीं; पण तो फार हैराण आहे." अरे, मद्देशबांधवहो, कोण तुमचा हा

बेडेपणा ! अरे फिलिप् हैराण असला तर त्यापासून तुमचें काय़रे, बरें किंवा वाईट आहे ! समजा कीं, फिलिप् मेला; पण तेणेंकरून तुह्मांस काय नफा ? तो मेला; तर तुमचा आळस त्याच्या जागीं लौकरच आणखी नवा फिलिप् उत्पन्न करील. अरे, फिलिप् जो आज इतका प्रबळ झाला आहे, तो काय आपल्या अंगच्या पराक्रमानें झाला आहे ? नाहीं तुमच्या आळसानें झाला आहे. हा तुमचा आळस अलीकडे इतका कांहीं वाढला आहे कीं, तुह्मांस स्वतः शत्रूपेक्षां प्रबल होतां येत नाहीं, व दुसऱ्या कोणीं तुह्मांस प्रबल केलें तर, तें प्राबल्य तुमच्यानें राखवत नाहीं."

'अनेकविद्यामूलतत्त्व.'

---

तोच प्रकार; पण वरच्याप्रमाणें वीरपर व निर्भर्त्सनपर नसून करुणापर व अभ्यर्थनापर—

" जिकडे जिकडे पहावें तिकडे तिकडे भय व घोर अनर्थ हींच माझ्या नजरेस येतात, निर्भय असें ठिकाण कोठेंहि नाहीं. आपल्या पूर्वजांच्या राजधानीकडे जाईन ह्मटलें, तर माझ्या भावाचा मारेकरी माझ्या बापाचें तक्त बळकावून बसला आहे; मी जातांच जे हात माझ्या भावाच्या रक्तानें लाल झाले आहेत तेच माझ्याहि रक्तानें भरविण्यास तो चुकेल काय ? जर दुसऱ्या एखाद्या राजाचा आश्रय पहावा, किंवा त्यापाशीं साह्य मागावें, तर तेंहि व्यर्थ; कां कीं, रोमन प्रजासत्ताक राज्यानेंहि मला अंगाबाहेर टाकल्यावर मला आपलासा ह्मणणारा दुसरा कोण सांपडणार ? माझीं ममतेचीं कुटुंबांतील माणसें किंवा इष्टमित्र यांची तर गोष्ट बोलावयासच नको. माझा बाप केव्हांच लोकांतरास गेला, तेथें त्यास शत्रूचा अपकार कधींहि पोंचणार नाहीं; व दुःखांनीं गांजलेल्या त्याच्या पुत्राचा आक्रोशहि त्याच्या कानीं कधींहि जाणार नाहीं. माझा भाऊ जरी जिवंत असता, तरी परस्परांच्या कळवळ्यानें दोघांचें दुःख हलकें झालें असतें, पण काय सांगावें ! न्युमिडिया देशाच्या राजकुळांतील मनुष्यावर ज्याचा हात कदापि वाहूं नये त्यानेंच कृतज्ञतेचें ओझें एकीकडे झुगारून देऊन त्यास अल्पवयांतच संसारयात्रेंतून मुक्त केलें. शिवाय माझ्या पक्षाचे जे जे लोक त्यास वाटले त्यांचाहि जुगार्थानें एकदम सप्पा उडविला. कोणास सुळावर चढवून त्या घोर यातनांनीं त्यांचे प्राण घेतले. कित्येकांस सिंहादिक क्रूर पशूंकडून खाववून त्यांहूनहि क्रूर अशा मनुष्यांस त्यांचा तमाशा दाखविला. अजूनहि त्या लोकांपैकीं जे कोणी जगले असतील त्यांस अंधारकोठड्यांत टाकून प्रत्यक्ष मरणाहूनहि दुःसह असे त्यांचे हाल तो करवीत असेल.

" आर्यजनहो ! जे तुह्मी या रोम नगरींत अत्युच्चपदीं विराजमान असून संपूर्ण जगाचीं सूत्रें चालवीत आहां, त्या तुमच्या पायांशीं हा दीन राजपुत्र जुगार्थानें दिलेल्या दुर्धर संतापानें पीडित होत्साता शरण आला आहे, याचें रक्षण करा. तुह्मांस तुमच्या मुलबाळांची, तुमच्या देशाची, तुमच्या धर्माची, तुमच्या राज्याची व ज्या ज्या वस्तु तुह्मांस पूज्य किंवा प्रिय आहेत, त्या सर्वांची शपथ घालून हात जोडून एवढेंच मागतों कीं, मी

कोणास यत्किंचित्हि दुखविलें नसून जो दुःखाचा कहर मजवर विनाकारण लोटला आहे, त्यापासून मला सोडवा, आणि न्युमिडियाच्या राज्याची मालकी तुह्मांकडे आहे यास्तव त्यांत जो दंगा उसळला आहे व जीं अघोर कृत्यें होताहेत त्यांचा बंदोबस्त करून तेथें निरंतर स्वस्थता नांदेल असें करा." सेनेट सभेपुढें आधरबालचें भाषण.

---

सृष्टिवर्णन—

"मग कवि होण्याचा निश्चय केल्यावर या नवीन उद्देशानें जेव्हां मी सृष्टीचें अवलोकन करूं लागलों, तेव्हां पूर्वी पाहिलेली सृष्टि मला नवीन भासूं लागली. ज्या गोष्टींकडे पूर्वी लक्ष पोंहचत नव्हतें त्या लक्षांत येऊं लागल्या; सर्व प्रकारच्या माहितीची मला आतां गरज वाटूं लागली. नाना प्रकारचे उपमादि अलंकार सुचावे व मनोरंजक वर्णन करतां यावें, ह्मणून मी पर्वतावर व अरण्यांत पुष्कळ फिरलों; अनेक प्रकारच्या वृक्षांच्या व पुष्पांच्या तसबिरी स्मृतिरूप पटावर उतरून घेतल्या; पर्वतांचे मोठमोठे कडे व राजमंदिरांचीं शिखरें यांचें एकसारखें लक्ष देऊन अवलोकन केलें. कधीं कधीं मी वनांत एखादा चांगला स्वच्छ ओढा वहातां दृष्टीस पडला असतां, त्याच्या वळणावळणांनीं त्याच्या तीरांवरची शोभा पहात पहात कोस कोस लांब जाई व कधीं कधीं संध्याकाळीं पश्चिमेस चित्रविचित्र रंगांचे मेघ दिसतात, व क्षणोक्षणीं त्यांचे आकार बदलत असतात, त्यांजकडे पहात उभा राहीं. कवीला अनुपयुक्त असा कोणताही विषय नाहीं. या सृष्टींत जे जे अत्यंत रमणीय किंवा अत्यंत भयंकर विषय आहेत ते त्यास सर्वदा उपस्थित पाहिजेत; जें जें विशाळ असल्यामुळें प्रचंड, किंवा सूक्ष्म असल्यामुळें गोजिरवाणें असेल त्या सर्वांची त्यास माहिती पाहिजे. बागांतील झाडें, व अरण्यांतील जनावरें, जमिनींतील खनिज पदार्थ, आकाशांतील ग्रह, तारे वगैरे, या सर्व विषयांचें ज्ञान त्यास पाहिजे. कवीचा मुख्य उद्देश झटला ह्मणजे वाचणाऱ्यांची सदाचरणाकडे प्रवृत्ति व्हावी व दुराचरणापासून निवृत्ति व्हावी हा आहे, आणि या प्रकारचा त्याचा उपदेश गोड लागून मनांत ठसण्याविषयीं प्रसंगवशात् सर्व प्रकारच्या कल्पना त्याच्या उपयोगीं पडतात. यास्तव ज्यास माहिती फार, त्यास आपल्या वर्णनांत वैचित्र्य व गोडी आणण्याची व दूरदूरचे दाखले आणून व उपदेश करून वाचणाऱ्यांचें मनोरंजन करण्याची शक्तीहि फार येते हें सिद्धच आहे." 'रासेलस', भाग १०.

---

"हे सागरा! तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून जों जों विचार करूं लागावें तों तों नव्या नव्याच कल्पना मनांत येऊं लागून बुद्धीस अधिकाधिक चमत्कार भासतात, आणि आश्चर्यभरांत चित्त अगदीं थक्क होऊन जातें! ज्याप्रमाणें मनुष्यांच्या पिढ्यानपिढ्या एका मागून एक जन्मास येऊन कांहीं काळानें लागलीच विलयास जातात, त्याप्रमाणें तुजवर हजारों लाटा एकावर एक येऊन भराभर बुजून नाहींशा होतात, आणि त्यांच्या प्रमाणेंच यांच्या वास्तव्याची मागें खूण देखील रहात नाहीं! तुझ्या लाटा साऱ्या पृथ्वीच्या किना-

त्यांवर आदळत आहेत, आणि ज्यांचें निकट सान्निध्य त्यांच्या अक्षय वैरास मात्र कारणभूत होतें, अशा देशांची तोडातोड करून तूं त्यांचें कलाकौशल्य व संपत्ति हीं परस्परांस देववितोस, व येणेंकरून सर्व जगास तुझ्यामुळें सुखाचा व समृद्धीचा लाभ होत आहे.

" तुझे देखावे तरी निरनिराळ्या समयीं किती विचित्र असतात ? त्यांची शोभा व भव्यपणा हीं कोठवर वर्णावीं !–कधीं वाऱ्याची हालचाल अगदीं बंद होऊन तुझा सर्व विस्तार अगदीं निश्चल दिसतो–कधीं नुकताच सूर्योदय झाला असल्यामुळें क्षितिजाची कड रुप्यानें जणों काय मढविलीच आहे अशी भासते–कधीं तोच सूर्य अस्तास जाऊं लागून संध्याकाळचें आकाश त्याच्या सोनेरी किरणांनीं देदीप्यमान झालें असतें, व अशा वेळेस आरशाप्रमाणें स्थिर अशा तुझ्या पाण्यावर जेव्हां आकाशाची कमानची कमान शाबूद उठलेली असते तेव्हां ती तर काय शोभा सांगावी ?–पण हीं सर्व सौम्य रूपें टाकून जेव्हां तूं आपलें उग्र स्वरूप धारण करतोस–जेव्हां काळ्या दाट ढगांनीं आकाशांत गाढ अंधार होऊन तुफानांच्या वाऱ्यांच्या सोसाट्यांनीं तूं अगदीं खवळून जातोस, व तुझ्या प्रचंड लाटा उसळून मेघमंडळाशीं एकवट होऊं पहातात–जेव्हां मृत्यु आपलें भयंकर आधिपत्य तुजवर चोहोंकडे गाजवीत असतो–जेव्हां अशा तडाक्यांत सांपडलेला बिचारा खलाशी भयानें गर्भगळित होऊन त्याचें सर्व प्रयत्न निष्फळ होतात, व त्याचे इष्टमित्र त्याजकरितां जागच्याजागीं हळहळत असतात, अशा भयंकर प्रसंगीं तुजकडे पहाण्याची कोणाची छाती आहे !

" याप्रमाणें विचार पुढें चालविले असतां बुद्धि अगदीं कुंठित होऊन जाते. पण जेव्हां तुझ्या भरतीओहोटीविषयीं विचार करावा–कीं ज्या जगाच्या आरंभापासून आजपर्यंत कधींही टळल्या नाहींत,–तेव्हां ज्यानें आपल्या अपार सामर्थ्यानें तुला निर्माण केलें, व तुझ्या मर्यादा अशा रेखून टाकिल्या कीं, तूं एवढा उच्छृंखल खरा, परंतु त्यांचें उल्लंघन तुझ्यानें होऊंच नये, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष लागून विचारशक्ति गुंग होऊन जाते, व तिची गतिच पुढें होत नाहीं !" समुद्र—'शालापत्रकां' तून.

एका तत्त्वज्ञाची स्वोक्ति—

" अहो ! मनुष्याचें ज्ञान फार फार झालें तरी तें किती अत्यल्प ! मीं आपला सारा जन्म ज्ञानसंपादन करण्यांत घालविलाना ! पण इतकें करूनहि मला समजतें तें काय ! सृष्टीच्या रहस्यांचा खुलासा लावण्याची उमेद धरून मी खोल खोल विचारांत जों जों शिरूं लागतों, तों तों माझी बुद्धि अगदींच गुंग होऊन मला कांहींच कळेनासें होतें. पहिल्या पहिल्यानें माझी मति कांहींशी चालते खरी, पण माझें निश्चित ज्ञान असें तेवढेंच; त्यापुढें नुसत्या कल्पनाच बांधाव्या लागतात. एकूण अज्ञानदशेपेक्षां सज्ञानदशेंत मोठा विशेष झटला ह्मणजे एवढाच कीं, सृष्टिकर्त्याच्या अपार योजनेचें आकलन होण्यास मनुष्याची बुद्धि किती पंगू याचा तींत असल्यानें पूर्णपणें सिद्धांत होतो !

" आतां सूर्याचें परिमाण व ग्रहांचीं अंतरें हीं मला काढतां येतात, तसेंच त्यांचे वेध घेऊन त्यांच्या गति वर्तविणें, व मनास थक्क करणाऱ्या अशा त्यांच्या प्रदक्षिणांचे

नियम सिद्ध करणें, या गोष्टीही मला अगदीं सहज आहेत, हें सर्व खरें; परंतु त्यांची रचना कशी काय आहे, त्यांवर प्राणी वास करितात कीं नाहीं, करीत असले तर त्यांची जीवनस्थिति व रहाण्याच्या सोई कोणत्या प्रकारच्या आहेत, इत्यादिविषयीं माहिती माझी व अडाण्या कुणब्याची सारखीच.–पण हें फार दूरच्या अशा अंतरालांतील गोलांविषयीं झालें; ज्या पृथ्वीवर मी खुद्द रहातों तिच्या सृष्टिव्यवस्थेविषयीं तरी मला कितपत माहिती आहे! ज्या वायुजलादिकांस मूलद्रव्यें समजून 'पंचमहाभूतें' अशी संज्ञा पूर्वापारपासून लोक देत आले, त्यांचेंहि पृथक्करण करून त्यांच्या घटकावयवांस मीं नांवें दिलीं, हें खरें; पण अग्नीची दहनक्रिया कशी चालते किंवा जलास प्रवाहित्वधर्म कशामुळें आला आहे, इत्यादि गोष्टींचें उपपादन माझ्यानें करवेल काय? अग्नि व उदक हीं वस्तुतः काय आहेत हा विचार सुद्धां कधीं मनांत न आणतां सर्व जग त्याचें सेवन करितें, त्यास वरील गोष्टींचा उलगडा पाडण्यास जशी मोठीच पंचाईत येऊन पडेल त्याचप्रमाणें मलाहि होतें; माझी कुशाग्रबुद्धि व तत्त्वज्ञता यांची येथें यत्किंचित्‌हि गति न होतां सारी माझी माझ्यापाशींच रहाते.–पदार्थ निराधार असला कीं, तो जमिनीवर पडायाचाच हा नियम सर्वत्र मी पाहतों; व शास्त्रकारांच्या उपपत्तीवरून मला असें समजलें आहे कीं, हें गुरुत्वाकर्षणाचें फल होय. पण हें समजूनहि मला नवीन तें काय कळलें! ज्यास पूर्वी मी 'पतन' ह्मणत होतों त्यासच आतां 'आकर्षण' ह्मणतों येवढाच काय तो फरक! अवघ्या पदार्थमात्राची ज्या अतर्क्य व अदृश्य सूत्राच्या योगानें एका केंद्राकडे गति होत आहे, त्याच्या स्वरूपाचा बोध वरील शब्दानें मला यत्किंचित् तरी होतो काय?–सृष्टिविषयक शास्त्रांत निष्णात झाल्यामुळें प्राणिवर्ग, उद्भिजवर्ग, व खनिजवर्ग असे तीन मुख्य विभाग, तशाच अवांतर जाति व उपजाति, या सर्वांची निवडानिवड मला करितां येते; पण इतके परिश्रम करूनहि हिरव्या गवताच्या एका पातीचा तरी पोषणप्रकार माझ्यानें सांगवेल काय? मीं फार फार सूक्ष्म विचार केला तरी सृष्टिकर्त्या चतुर कारागिरानें जें मारू कलम वनपुष्पांस चित्रविचित्र रंगांनीं रंगवितें त्याचा मला शोध लागेल काय? तसेंच माणिकावर व पाचेवर जे रंग झळकतात, व तऱ्हेतऱ्हेच्या शिंपांवर ज्या लकेरी मारतात, त्यांचें कारण तरी आजपर्यंत विचार करून मला काय उमगलें आहे?–इतर प्राण्यांचें चातुर्य जें माझ्या नजरेस येतें त्यास मी उपजतबुद्धि ह्मणतों, व मनुष्याच्या विचारशक्तीशीं ती कोणकोणत्या जनावरांचे ठायीं किती किती मिळूं पाहते याविषयींहि माझा तर्क चालतो; परंतु एकंदरींत पाहतां, पशूंस माझे मनोधर्म जितपत कळतात तितपतच त्यांचेहि मला कळतात असें ह्मणणें भाग येतें. जेव्हां पक्ष्यांचा थवा आकाशांत घिरट्या घालतांना मी पाहतों, किंवा एखाद्या दूरच्या प्रदेशाकडे त्यांचे कळप निघालेले असतात, तेव्हांचे यांचे संकेत व शब्द, पंडितांच्या भाषा जशा एखाद्या अक्षरशून्य मजुराला, त्याप्रमाणेंच मलाही ते अत्यंत गूढ होते. धर्मशास्त्रावरील ग्रंथांत जितकी त्यांची गति तितकीच माझीहि त्यांच्या वर्तननियमांत व व्यवस्थेंत होय.

"हर हर! एकूण ज्ञानाचा हव्यास धरून त्याच्या प्राप्तीस्तव सर्व जन्मभर जो मीं शीण केला त्यासारखें त्याचें सार्थक तें मला काय झालें! माझी बुद्धि किती पंगू, अज्ञान

केवढें थोर, या गोष्टीचा पूर्ण प्रत्यय माझ्या मनास येऊन माझें क्षुद्रत्व मला स्पष्टपणें भासूं लागलें, इतकेंच कीं नव्हे ! शिव शिव ! मनुष्याच्या अंगीं पराकाष्ठेची विद्वत्ता आली, तरी आपला ज्ञानगर्व मिरविण्यास त्यास किती अत्यल्प अवकाश असतो ! त्याची बुद्धि वस्तुतः इतकी कोती असून व संपादिलेलें ज्ञानहि तसेंच अपुरतें असून नुसत्या भूषणाचा त्यानें गर्व वाहावा व आपली योग्यता मोठी मानावी हा त्याचा केवढा मूर्खपणा !"

मनुष्याचें अटोकाट ज्ञान–'शालापत्रकां'तून.

---

आणखी एकच उतारा देतों. तो 'अथेल्लो,' नाटकांतला आहे. प्रसंग मोठा व चित्तास थरारवणारा असून तो मूळ कवीनें व भाषांतरकारानेंही मोठ्या सफाईनें मारून नेला आहे.—

## "निजण्याची खोली."

"देस्दिमोना बिछान्यावर झोंपीं गेली आहे. बाजूस दिवा जळतो आहे; अशा समयीं अथेल्लो तिचा प्राण घ्यावा या हेतूनें आंत शिरतो; आणि आपल्याशींच ह्मणतो, हे मना, या अघोर कृत्याचें तेंच बीज बरें, तेंच बीज. अहो पवित्र तारांगणांनो तें मी आपणांजवळ या तोंडानें वदूं नये; पण बीज तेंच. तरी या सुंदरीचा रक्तस्राव करणें आपल्या हातून घडणें नाहीं. हिची काया तर पहा कशी बर्फासारखी शुभ्र आहे ती, आणि अंगावर तेज पहा कसें लखलखतें आहे तें, जशी काय घोटीव संगमरवरी पुतळीच ! अशा तुळतुळीत आणि तेजस्वी शरीरावर घाव करण्यास आपला कांहीं हात वाहयाचा नाहीं. ( असें ह्मणून तरवार आटपतो. ) पण हिला जिवंतही ठेवण्याची सोय नाहीं; कारण तसें केल्यास ही विश्वासानें पुष्कळांचे असे गळे कापील. याकरितां मारलीही पाहिजेच; पण अगोदर दिवा मालवावा आणि मग-हे प्रकाशदायका दीपा जरी मीं तुला मालविलें तरी मला जर वाटेल तर पुनः तुला पूर्वीप्रमाणें प्रकाशित करतां येईल. ( स्त्रीकडे दृष्टि जाऊन ) अहाहा ! आपलें सर्व कौशल्य व अक्कल खर्चून परमेश्वरानें तुझी काय ही अप्रतिम सौंदर्याची मूर्ति निर्माण केली आहे ! या तुझ्या मूर्तीतील अंतर्दीप जर मीं समूळ मालविला तर त्यास पुनः प्रदीप्त करायास संजीवनी विद्या मजपाशीं कोठें आहे ? हें गुलाबाचें फूल जर मीं तोडलें तर याला पुनः जीव आणण्याची शक्ति माझ्या अंगांत नाहीं; तेव्हां अर्थातच यास कोमेजून गेलें पाहिजे. असो; झाडावर आहे तोंपर्यंत याचा उपभोग तरी घेऊं या ( असें ह्मणून तिचें मोठ्या प्रेमानें चुंबन करितो ) अहाहा ! काय मधुर चुंबन हें! या माधुर्याच्या योगानें प्रत्यक्ष न्यायदेवतेला देखील आपला खड्ग मोडून टाकण्याची बुद्धि निपजूं लागत्ये. ( चुंबनाची तृप्ति न होऊन ) आणखी एकदां, आणखी एकदां. प्रिये तूं मरून अशीच राहा ह्मणजे मी तुजवर अत्यंत प्रीति करीन. पुनः आणखी एकदां आणि आतां हें शेवटचें. इतकें गोड असें प्राण घेणें कधीं नव्हतें. रडें तर कांहीं आपल्याला आवरत नाहीं, पण हे अश्रु महादुष्ट आहेत. हें दुःख मोठें अलौकिकच आहे ! अहो ज्या ठिकाणीं प्रीति करायाची त्याच ठिकाणीं घाव घालायाचा ! अँ ! ही जागी झाली.—" अंक ५ प्रवेश २.

---

# वाचन.

अथास्य तत्त्वेषु कृतेऽवभासे । समुन्मिमीलेव चिराय चक्षुः[1] । किरातार्जुनीय.

अंक ११-(१) विषयस्वरूप. (२) व्युत्पत्ति. (३) दोन लाभ. (४) मनोरंजन. (५) इतर प्रकारांशीं तुलना. (६) दुसरा लाभ-ज्ञान. (७) विशेषतः निरूपण. (८) मराठींतील ग्रंथसंग्रह. (९) इकडीलांचा वाचनाचा प्रघात. (१०) त्याची खरी रीत.

१. प्रस्तुत अंकांत वाचन ह्मणजे वाचण्याची कला याविषयीं लिहायाचें नाहीं. ह्मणजे उत्कृष्ट वाचनाचे जे कांहीं नियम आहेत ते दाखल करून त्यांचा उपयोग सांगणें हा याचा उद्देश नाहीं. तर ग्रंथ वाचण्याचा निरंतर नाद असणें हें किती हितावह आहे, तो प्रघात आपल्या लोकांत कितपत आहे, वाचायाचे ग्रंथ कसे असावे, ते वाचावे कसे, वगैरे गोष्टींविषयीं या निबंधांत विचार करूं.

२. येथें पहिल्यानें 'वाचन' या शब्दाची व्युत्पत्ति अंमळ चमत्कारिक आहे ती सांगतों. हा शब्द अर्थातच 'वच्' (बोलणें) या धातूपासून निघाला आहे; आणि हें रूप प्रयोजक रूपावरून साधलेलें क्रियावाचक नाम होय. तेव्हां 'वाचन' ह्मणजे 'बोलवणें' 'पुस्तक वाच' ह्मणजे 'पुस्तकास बोलव' असा अर्थ! यावरून कागदास—किंवा कागद तरी कसचा!—वृक्षत्वचांस वगैरे बोलतें करण्याची[2] लेखनकला जेव्हां पहिल्यानें निघाली, तेव्हां आपल्या पूर्वजांस जें आश्चर्य वाटलें तें वरील शब्दांत गर्भित होतें.

३. असो; आतां मुख्य विषयाविषयीं विचार करूं. वाचनापासून लाभ कोणकोणते आहेत ते सर्वांस विदितच आहेत. ते मुख्यतः दोन—एक मनोरंजन, आणि दुसरा ज्ञान. आतां यांविषयीं अनुक्रमें करून लिहूं.

४. पहिलें मनोरंजन. याचा अनुभव थोडाबहुत बहुधा सर्वांस असेल. लहान वयांत तर ही गोष्ट विशेषतः अनुभवास येते. लहान मुलांस प्रथमतः वाचतां येऊं लागलें ह्मणजे पुस्तकें वाचण्याची त्यांस केवढी हौस वाटत असते हें सर्वांनीं पाहिलेंच असेल. अक्षरओळख होऊन आपणांस वाचतां येऊं लागलें हीच अगोदर मोठी गोष्ट मिळविलीशी वाटून तिजबद्दल त्यांस मोठाच हर्ष व अभिमान वाटूं लागतो. त्या भरांत त्यांस जी उमेद व हौस वाटत असते ती त्यांच्या विद्याभ्यासास फार उपयोगीं पडते. त्या मौजेच्या काळीं मनोरंजन व ज्ञान हीं दोन्ही एकरूपच असतात. ह्मणजे पुढील वयांत ज्ञानसंपादनाची हौस कमी होऊन अभ्यास करण्याचा जसा त्रास येतो तसें त्या वेळेस मुळींच न होऊन नव्या

१ 'याप्रमाणें तत्त्वांचा बोध होऊन त्याच्या हृदयांत ज्ञानप्रदीप उजळला असतां, त्याचे फार दिवस मिटलेले डोळे जणों काय एकदम उघडले!'

२. 'लेखन' हा शब्द तरी 'वाचन' शब्दाप्रमाणेंच ऐतिहासिक ह्मणजे पूर्वस्थितिसूचक होय. 'लिख्' ह्मणजे 'ओरखडणें,' यावरून लिहिण्याचा प्रघात पहिल्यानें झाडांच्या साली वगैरे कठिण पदार्थांवर झाला हें उघड दिसतें.

गोष्टी शिकणें हें मनास केवळ रंजन करणारेंच होतें. शरीरानें तीं जशीं चपळ असतात,— सुस्त बसणें बिलकुल न आवडून कांहींना कांहीं तरी त्यांस करीत असल्यावांचून चैनच पडत नाहीं, त्याचप्रमाणें त्यांच्या मनाची स्थिति असते. ज्ञानग्रहण करण्यास त्यांचें कोंवळें मन तेव्हां इतकें प्रवीण असतें कीं, व्याकरण, भूगोल, गणित वगैरे जे नीरस शुष्कप्राय विषय तेही त्यांस मोठ्या मजेचे वाटून मनोरंजक गोष्टींप्रमाणेंच त्यांविषयींही त्यांस जी हौस वाटत असते ती कांहीं पराकाष्ठेची ! वरील दोन्ही गोष्टी जगन्नियंत्या परमेश्वराचें, त्यानें निर्माण केलेला क्षुद्र प्राणी जो मनुष्य त्याच्या कल्याणाकडे केवढें लक्ष आहे याविषयीं प्रमाणभूत होत. मनुष्य जन्मास आल्यापासून तो स्वतःविषयीं खबरदार होईपर्यंत मध्यंतरीं पुष्कळ काळ जातो. हा काळ लहानपणा होय. यांत ईश्वराचा असा संकेत उघड दिसतो कीं, मनुष्याच्या पुढील संसारास उपयोगी असें शारीर व मानसिक सामर्थ्य त्यानें या काळांत संपादन करून ठेवावें. असो; तर ज्याप्रमाणें मुलांस उडण्याबागडण्याची अतोनात हौस असते, त्याप्रमाणेंच त्यांच्या मनासही त्या वेळेस स्वभावतःच मोठी प्रबळ जिज्ञासा वाटत असते. या दोहोंचा नीट उपयोग करून घेणें हें सुजाण मातापितरांचें व शिक्षकांचें काम आहे. असो; तर वाचनापासून मनोरंजन केवढें होतें हा लहानपणचा अनुभव सर्व सुशिक्षित लोकांस अर्थात् आहेच. पण इतकेंच नव्हे. ती लहानपणची संवय नीट वाढविली असतां अगदीं शेवटपर्यंत ती मनुष्यास सारखी खिळून राहते. आजपर्यंत जे मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले ते बहुतकरून सर्व मोठे जब्बर वाचणारे होते असें आढळेल. यांत वस्तुतः पाहतां कांहीं आश्चर्य नाहीं. कारण कोणाची बुद्धि केवढीही उज्वल असली, तरी खाणींतल्या हिऱ्याप्रमाणें तीवर जर कांहींच संस्कार घडला नाहीं तर तिचें तेज कधींहीं प्रगट होणार नाहीं. किंवा दुसरा दृष्टान्त घ्या. जमीन मोठी पिकाऊ आहे पण तिची नीट मशागत करून जर तींत कांहींच पेरलें नाहीं; तर अर्थातच नुसतीं रानझाडें किंवा कांटेकुटे हे मात्र तिजवर उगवतील ! तर याप्रमाणेंच विशाल बुद्धीचे महान् ग्रंथकर्ते जे आजपर्यंत होऊन गेले त्यांस वरील गोष्टी पुरतेपणीं अनुभवास येऊन आपल्या मनास ज्ञानाचा संस्कार अधिकाधिक करतांना ते कधीं थांबले नाहींत. ग्रंथवाचन हेंच त्यांस परम सुखकर वाटून त्याशिवाय त्यांस चैनच पडूं नये. इटाली देशांत सुमारें पांचशें वर्षांपूर्वी पेट्रार्क नामें करून एक मोठा नामांकित कवि होऊन गेला त्याविषयीं अशी एक गोष्ट लिहिली आहे कीं, तो एकदां आपल्या एका मित्राच्या येथें राहिला असतां त्याची प्रकृति अंमळ बिघडलीशी पाहून तो मित्र त्यास ह्मणाला, "तुह्मांला बरें वाटत नाहीं, यास्तव दहा दिवसपर्यंत तुमचीं बुकें, कागद, लेखणी, शाई हीं मला अडकवून ठेवूं द्या." पेट्रार्क बरें ह्मणाला. मग त्यानें तसें केलें असतां पहिला दिवस पेट्रार्कचा मोठा कंटाळवाणा गेला. दुसऱ्या दिवशीं भारी डोकें दुखूं लागलें; आणि तिसऱ्या दिवशीं तर बारीक ताप भरूं लागला. हीं अधिकाधिक चिन्हें पाहून त्या मित्रास मोठा धाक पडला आणि त्यानें मुकाट्यानें त्याच्या पुस्तकालयाची किल्ली त्याच्या पुनः स्वाधीन केली. दुसऱ्या दिवशीं तो कवि पुनः पहिल्यासारखा हुशार झाला. असो; तर याप्रमाणें विद्याप्रिय लोकांचा पुस्तकांविषयीं अतोनात हव्यास असतो.

५. आतां या मनोरंजनाच्या प्रकारांत व इतर जे लोकांत चालू आहेत त्यांत किती भेद आहे तो पाहूं. कालक्रमण करण्याचे प्रकार विद्वज्जनांचे कोणते व तदितरजनांचे कोणते यांविषयीं एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे—

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्।
व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥

" बुद्धिमान् जे आहेत त्यांचा काळ काव्य किंवा शास्त्र यांचें अध्ययन, अथवा विनोद या तिहींत जातो; आणि मूर्खांचा ह्मटला ह्मणजे व्यसनांत, निद्रेंत किंवा कलहांत ! " हें वचन अगदीं यथार्थ आहे यांत संशय नाहीं. अज्ञ किंवा अल्पज्ञ जे लोक असतात त्यांचें नेहेमीचें वर्तन जर पाहिलें, तर वरील श्लोकाच्या उत्तरार्धात त्यांचा बहुधां समावेश होईल. आणि एकंदर जगांत पाहिलें असतां, अशांचीच कोटी फार फार मोठी आहे. वरील श्लोकाचें पूर्वार्ध ज्यांस खरोखरी लागेल असे लोक किती थोडे ! त्यांतून आमच्या हिंदुस्थानांत तर विचारूंच नये. युरोपखंडांत वगैरे आलीकडे विद्येचा पुष्कळच फैलाव झाला असल्यामुळें काळाचा वर सांगितल्याप्रमाणें सद्व्यय करणारे तिकडेच काय सांपडतील ते सांपडतील. बाकीच्या जगाच्या बहुतेक भागांत दुसऱ्या चरणाचेंच फार करून प्राबल्य आढळेल. आमच्या देशांत जुन्या पद्धतीचे जे लोक आहेत त्यांचा एकंदरींत पहातां वाईटच काळ जातो असें ह्मणतां येणार नाहीं; तरी त्यांचा विद्याभ्यास फारच तोकडा असल्यामुळें ज्ञानापासून होणारा जो परमानंद त्याचा अनुभव त्यांस कधींही घडत नाहीं. विद्येचें स्वरूप कांहीं ज्यांस कळतें ह्मणायाचें असे जे शास्त्री, पंडित वगैरे त्यांचीही शिकण्याची पद्धति कांहीं विलक्षणच असल्यामुळें वरील आनंद त्यांच्याही ह्मणण्यासारखा अनुभवास येत असेलसें वाटत नाहीं. ही साधारण एकंदर लोकांची स्थिति झाली. श्रीमंतांची व विशेषतः संस्थानिकांची जर आमच्या देशांतली स्थिति पाहिली, तर ती फारच शोकास्पद वाटेल. सगळ्या देशभर जी लहान मोठ्या राजेरजवाडयांची रांग लागत गेली आहे त्यांत चांगले हुशार तर काय, पण सरासरी समजूत तरी ज्यांस आहे असेही फारच थोडे निघतील ! मागें त्यांस मोठ्या जोखमीचीं सरकारी कामें करायाचीं पडत, शत्रूचें निरंतर भय असे, त्यामुळें त्यांस सतत हुशारीनें रहावें लागे. पण सध्यांच्या काळीं वरील दोन्ही प्रकार बिलकुल नाहींसे झाल्यामुळें पोरासोरांची व अज्ञान लोकांची जी कल्पना कीं, राजाला ह्मणजे कांहीं करायाला नकोच, जेथें तेथें चाकर, निरंतर पक्वान्नें खावीं, ख्यालीखुशाली करावी, इतकेंच त्याचें काम, ती दिवसेंदिवस पूर्णपणें खरी होत चालली आहे ! 'तुह्मी काय राजे आहां' या वाक्यांत 'राजे' शब्दाचा जो अर्थ तो दिवसेंदिवस अधिकाधिक यथार्थ होत चालला आहे. असें झाल्यावर मग राज्यांतील व्यवस्था किती उत्तम असेल, व दरबारांतली मनुष्यें कशा प्रकारचीं असतील, याची कल्पना सहजच करतां येईल; व वर्तमानपत्रद्वारें ते बहुतेक प्रकार सर्वांस विदित होतातच. असो; तर मग अशा ठिकाणीं वरील श्लोकांचें कोणतें अर्थ लागतें तें आमच्या वाचकांस फोडून सांगायास नकोच !

वरील लेखावरून हें ध्यानांत येईलच कीं, खरें जें विद्यासुख तें जुन्या पद्धतीच्या लोकांस बहुतकरून मुळींच माहीत नाहीं. यास्तव मनोरंजनाचें हें मोठें साधन त्यांस अगदीं अंतरतें. आमच्या मराठींत वाचण्याचे ग्रंथ मुळींच नव्हते असें नाहीं, पण ते अगोदर थोडे, आणि त्यांतून दुर्मिळ. गद्यग्रंथ झटले झणजे इतिहासाच्या किंवा पौराणिक विषयांच्या बखरी, आणि पंचोपाख्यान, विदुरनीति वगैरे तीन चार पुस्तकें इतकींच काय तीं. पद्य-ग्रंथ वरच्यांहून पुष्कळ होते खरे, पण त्यांचा संग्रह झाला तर हरदास वगैरे लोकांपाशींच काय तो. छापखान्याचें उत्कृष्ट साधन अनुकूल नसल्यामुळें जें आपणांस हवें असेल तें हातानें उतरून घेतल्याखेरीज सोय नसे. पण या सर्वांहून जबरदस्त अडचण झटली झणजे लोकशिक्षणचा मुळींच प्रघात नसल्यामुळें लोकांत विद्याभिरुचीचा जो मुळींच अभाव होता तो होय. सरासरी काव्यव्युत्पत्ति पुष्कळांस असल्यामुळें पुराणादि ग्रंथ तसेंच ज्ञानेश्वरी आदि-करून प्राकृत ग्रंथ, हजारों लोक वाचीत, व अजूनही वाचतात; पण तें केवळ पारमार्थिक बुद्धीनें. झणजे तसें करणें हें पुण्यकर्म आहे येवढेंच समजून तें करण्याचें. अर्थज्ञान किंवा रसानुभव घेऊन वाचणारे फारच थोडे. असो; तर याप्रमाणें ग्रंथवाचनरूप जो करमणुकीचा उत्तम मार्ग तो पूर्वीच्या लोकांस मुळींच अनुकूल नसल्यामुळें सागट्या बुदबळें वगैरे खेळ, कैफ, किंवा व्यभिचार अशींच पोरकळ, निंद्य व लज्जास्पद साधनें त्यांस जवळ करावीं लागत. फार तर काय, पण अजूनही नेटिव संस्थानांतून बहुतेकांत वरील प्रकार भरपूर आढळून येतात. त्यांचें केवळ दिग्दर्शन करणें हें सुद्धां एतद्देशीय मनुष्यांस अत्यंत लज्जेचें व खेदाचें काम होईल.

तर याप्रमाणें वाचनाचा पहिला मोठा उपयोग झटला झणजे त्याच्या योगानें चित्ताचें उत्कृष्ट रंजन होऊन दुसरे जे अज्ञान व मूर्ख लोकांचे शेंकडों करमणुकीचे उपाय त्यांची बिल-कुल गरज रहात नाहीं. भर्तृहरीनें एके ठिकाणीं झटलें आहे.--

सुकविता यद्यस्ति राज्येन किम् ।

'उत्कृष्ट कविता जर आहे तर तीपुढें राज्य काय ?' हेंच वचन बाकीच्याही सर्व प्रकारच्या ग्रंथांस लागेल. खरा रसिक व विद्वान् हा आपल्या पुस्तकाल्यांत बसून ग्रंथ-वाचनांत निमग्न झाला असतां त्यास त्या वेळेस जें सुख होत असेल, तें मोठ्या सार्वभौम राजास भर दरबारांत राज्यासनावर बसल्यापासूनही नसेल ! आणि खरोखरच नुसत्या सुखाच्या संबंधानेंही पाहतां तें विद्येपासून जितकें साध्य होतें तितकें राज्यापासून होणें नाहीं. रोमन लोकांचें लोकसत्तात्मक राज्य बुडून बादशाही अंमल सुरू झाल्यावर पुढें जे कित्येक बादशाहा झाले त्यांची हकीकत वाचली असतां वरील उल्लेखाची प्रचीति कळून येईल. त्यांची सत्ता त्या वेळच्या बहुधां साऱ्या जगावर असतांही त्यांस रात्रंदिवस चैन पडूं नये. शेंकडों राजोपचार निरंतर चालले असतां त्यांचा त्यांस अगदीं वीट येऊन त्यांनीं नाना तऱ्हेचे फंद व चाळे करावे. झर्सीज नामेंकरून जो पारसीकांचा राजा होऊन गेला, त्यानें वीस लक्ष सैन्य जमा करून ग्रीस देशावर स्वारी केली, त्याविषयीं अशीच एक गोष्ट

लिहिली आहे, कीं जो कोणी एखादा नवा कर्मणुकीचा खेळ काढील त्यास त्याच्याकडून मोठें बक्षीस मिळे. असो; तेव्हां एकंदरींत स्पष्ट काय दिसतें कीं, केवळ शारीर सुखें स्वभावतःच अल्पकालिक होत; त्यांचा तेव्हांच वीट येऊन मन लवकरच उदास होतें. मौजेच्या खेळांचीही गोष्ट तीच. व्यसनें तर यांहूनही भयंकर; त्यांच्या योगानें शरीरास बहुतकरून जन्माचा अपाय होऊन निरंतर जीवास खाण्याचें मात्र साधन पैदा होतें. तेव्हां वरील कोणताही दोष नसून उलटें अत्यंत शुद्ध, अत्यंत प्रतिष्ठादायक, आणि अत्यंत मनोरंजनावह असें कर्मणुकीचें साधन एक वाचन मात्र होय.

६. दुसरा लाभ ज्ञान. हें संपादन करण्याचें ग्रंथवाचन एक मोठें साधन आहे हें उघडच आहे. सिसरोनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, लेखनकला जर नसती, तर मूळारंभीं जी जगाची स्थिति होती तिजपेक्षां पुढें पाऊल पडतेंच ना. उघडच आहे. सांप्रतकाळीं मानवजाति जी येवढ्या उत्कर्षास पोंचली आहे त्या सर्वांचा मूळ पाया पाहिला तर वाचनमातृकाच होत ! हल्लींच्या काळाच्या आश्चर्यकारक सुधारणेची जी येवढी भव्य इमारत उभी आहे ती असंख्य कारागिरांच्या श्रमाचें फळ होय ! मागल्यानें रचलेले धर पुढच्याच्या उपयोगीं पडावे अशी आजपर्यंत अनादिसिद्ध परंपरा चालत आली आहे. व हीस एक कारण काय ती लिहिण्याची अमोलिक कलाच होय. ही नसती तर आज लक्षावधि महाबुद्धिमान् लोकांचे अत्यंत परिपक्व विचार आपणांस नाहींसे झाले असते ! प्रख्यात ग्रंथकार लॉर्ड बेकन् यानें एके ठिकाणीं या मूळाक्षरांस जहाजांशीं तुळिलें आहे, आणि ह्मणतो कीं, या जहाजांनीं काळरूप समुद्राच्या फार दूर दूरच्या बंदरांवरून आपणांकडे माल आणून या पुढेंही तशाच अत्यंत दूरच्या बंदरांत तो तीं पोंचवितील ! असो; तर याप्रमाणें सर्व काळच्या व सर्व देशांच्या महान् महान् लोकांची आपणांस हवी तेव्हां, हवी तेथें, हवी तेवढी वेळ परमानंदकारक संगति होण्याची जी अद्भुत सोय सर्वांस झाली आहे तिचें मोल किती ह्मणून सांगावें ! त्यांतून अलीकडे तर मुद्रणकला, अग्निरथ वगैरे अनेक साधनांनीं वरील सुख तर चोहोंकडे होऊन केवळ दारिद्र्यावस्थेंत असणाऱ्या मनुष्यासही तें अनुकूल झालें आहे. तसेंच विद्येच्या सर्व शाखांवरही अलीकडे ग्रंथ होऊन कांहीं अमुक शास्त्राच पढल्याच्या योगानें पूर्वीच्या काळीं बुद्धीवर जो संकुचितत्वाचा वाईट संस्कार घडत असे तोही हल्लींच्या काळीं नाहींसा करण्याची सोय होऊन अलीकडील शिक्षणपद्धतीचा मुख्य रोंख तोच आहे. आपल्याच देशांतलि पूर्वींची स्थिति पाहिली तर विद्याभ्यासाची यत्ता निदान तरी बारा वर्षे होती. तितका काळपावेतों गुरूच्या घरीं राहून एकनिष्ठेनें जेव्हां अध्ययन करावें तेव्हां कांहीं ह्मणण्यासारखी विद्वत्ता शिष्याच्या ठायीं यावी. आणि इतकेंही करून बहुधा कोणत्या तरी एकाच शास्त्रांत त्याची गति ! न्याय आहे तर व्याकरण नाहीं, व्याकरण आहे तर मीमांसा नाहीं, असा प्रकार अर्थातच होत असे. कारण जें शास्त्र हातीं धरायाचें तें शेवटांस पोंचविल्यावांचून थांबायाचेंच नाहीं. ही त्यांची शिक्षणपद्धति पुष्कळ तऱ्हेवाईकच होती यांत संशय नाहीं. तिचा एक मोठा गुण होता खरा, कीं जेवढें ह्मणून कोणी शिकेल तेवढें अगदीं ठाम; एकदां त्याचें पठण झालें ह्मणजे त्यांत लेंचेपेचेपणा बिलकुल राहा-

याचा नाहीं . कोणतेंही शास्त्र घेतलें कीं, त्यावरील मुख्य ग्रंथ, उपग्रंथ, टीका, प्रतिटीका, वगैरे जेवढे ह्मणून ग्रंथ असतील तेवढे पार मुखोद्गत केल्यावांचून प्राय: सोडायाचे नाहींत. मुळीं परंपरेनेंच तशी वहिवाट चालत आलेली ! गुरु आपल्या आसनावर बसून पंक्ति सांगायाला लागले ह्मणजे शिष्याच्या हातांत जेवढें पुस्तक असेल तेवढेंच काय तें; गुरूंनीं ह्मणून पाठ सांगतांना पोथी हातीं धरायाचीच नाहीं. तसें करावें लागलें तर तो गुरु कसचा ? असो; तर असाच बाणा पूर्वीपासून चालत आला असल्यामुळें पुढें जे शिष्य गुरुस्थानापन्न होतात तेही तो तसाच पुढें अबाधित चालवतात. याप्रमाणें आलीकडची जी पोपटपंची तीस पूर्वी मुळींच थारा न मिळून जे कोणी पंडित होत ते आपआपल्या शास्त्रांत केवळ निष्णात असेच होत. आलीकडील इंग्रेजी युनिवर्सिटी-च्या पद्धतीनें ह्मटलें ह्मणजे हवा तो विषय ज्यांस अवगत आहे असे विद्वान् तयार करा-याचे. हमालांचे जसे टप्पे असतात त्यांप्रमाणें आधींच निःशक्त झालेल्या आमच्या गरीब विद्यार्थ्यांवर वर्षानुवर्ष अधिकच विषयांचें ओझें लादून त्यांनीं अमुक दिवसांत अमुक मजल मारली पाहिजे असा ठराव झालेला असतो. मग विद्यार्थीही निरुपायास्तव जेमतेम करून तेवढी यातायात करतात; पण एकदां सुटले ह्मणजे बुकांना जी रजा मिळते ती मिळते. त्यांच्या कृपाळू आईनें येवढा खटाटोप करून जें नाना विषयांचें ज्ञान त्यांचे ठायीं सांठविलें असतें तें लवकरच घालवून ते बहुधा पहिल्यासारखेच पुन्हां लखलखीत होऊन बसतात ! असो; तर या मानानें पाहतां पहिली एकधोरणी रीतच कांहीं अंशीं बरी होती असें आह्मांस वाटतें. तरी आलीकडे जे सर्व विषयांवर उत्कृष्ट रीतीनें लिहिलेले ग्रंथ युरोपांतील भाषांत झालेले आहेत त्यांच्या योगानें फार काळ व श्रम न पडतां मनुष्याचें मन विशाल व बहुश्रुत होतें; व पूर्वीच्या पद्धतीनें मनास जडणारे जे वेडेपणाचे ग्रह व दुष्कल्पना त्या यामुळें बहुतेक नाहींशा होऊन जातात हा लाभ लहानसान ह्मणतां येत नाहीं.

७. याप्रमाणें प्रकृत विषयाविषयीं सामान्यत: कांहीं विचार प्रदर्शित केले. आतां खुद्द आपल्या स्वतःच्या स्थितीविषयीं कांहीं लिहून हा विषय संपवितों.

८. आतां पहिल्यानें हें उघडच आहे कीं, वाचन ह्मटलें ह्मणजे अगोदर भाषेंत ग्रंथ-संग्रह पाहिजे. आमच्या मराठींत तो मूळचा कोणत्या प्रकारचा होता हें वर लिहिण्यांत आलेंच आहे. तसेंच आलीकडे तो कोणत्या प्रकारचा झाला आहे व होत आहे याविषयींही प्रस्तुत मालेच्या पहिल्या दोन अंकांत कांहीं लिहिलें आहे. आतां हा ग्रंथसंग्रह सगळा एकं-दरींत धरला तरी अर्वाचीन युरोपियन भाषांशीं किंवा संस्कृतादि प्राचीन भाषांशीं त्यासंबं-धानें आमच्या गरीब मराठी भाषेस टक्कर मारतां येईल हें अगदीं संभवत नाहीं खरें; तरी सध्यांच्या स्थितींत सुद्धां तीस आपल्या दारिद्र्यास्तव केवळ खालींच पाहायास हवें असें आह्मांस अगदीं वाटत नाहीं. एतद्देशीय इतर भाषांत तर तिच्याहून कोणच्याही संबंधें वर-चढशी भाषा एकही नाहीं असें आह्मांस वाटतें; तसेंच सुमारें तीनचारशें वर्षांपूर्वी इंग्लिश वगैरे युरोपियन भाषांची जी स्थिति होती तीपेक्षांही सध्यां देखील तिची स्थिति बरी आहे.

सारांश, केवळ अज्ञानास्तव, दुराग्रहास्तव, व आळसामुळें मराठीचा जे तिरस्कार करूं पाहतात व तिची ज्यांस मोठी लाज वाटते त्यांस तसें करण्यास वरच्याशिवाय दुसरें कोणतेंही समर्पक कारण नाहीं हें त्यांनीं पक्कें समजावें. तसेंच जे फाकडे नवीन विद्वान् जुन्या शाल-जोडीवाल्या शास्त्र्यांप्रमाणें मराठी भाषेवर नाक मुरडतात त्यांवर दोन प्रकारचा दोष येतो. एक तर जिचें ज्ञान आपण पुरतेपणीं कधींही संपादन केलें नाहीं तीस विनाकारण दूषण देणें हें; आणि दुसरें असें कीं जी न्यूनता त्यांनीं पूर्ण करायाची ती न केली हें तर एकीकडेच राहिलें, पण पुनः तीबद्दल भाषेसच दोष! भाषेच्या अंगीं रानांतील जमिनीप्रमाणें तर शक्ति नाहींना! कीं तींत जसे गगनचुंबित वृक्ष आपोआप उत्पन्न होतात व वाढतात त्याप्रमाणें मोठमोठे ग्रंथ भाषेंत आपले आपोआप व्हावे! काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, शास्त्रीय ग्रंथ हे केवळ स्वतःच उत्पन्न व्हावे, मनुष्याच्या श्रमाची ह्मणून त्यांस बिलकुल गरज लागूं नये, असा जर सृष्टीचा नियम असता, तर बरीक वरील मराठीवरचीं दूषणें ठीक होतीं! पण अशी स्थिति मुळींच नाहीं हें स्पष्ट आहे. ग्रंथसंग्रह हें मुख्यतः उद्योगाचें फळ होय. मोठमोठे कवि, कादंबरीकार, किंवा शास्त्रकार वगैरे निपजणें ही गोष्ट केवळ एकेका देशाच्या भाग्याची होय; ती येथें धरायाची नाहीं. पण एकंदर लोकांच्या हितार्थ इतर भाषांतील ग्रंथांचीं भाषांतरें करणें किंवा त्यांच्या नमुन्यावर आपल्या भाषेंत तसे ग्रंथ उतरणें असल्या सामान्य कृत्यांकरितां ईश्वराचे लाल्च निर्माण झाले पाहिजेत असें नाहीं! सुताराचें, शिंप्याचें, वगैरे काम जसें त्यांत कांहीं दिवस पडलें ह्मणजे बहुधा सर्वांस येण्यासारखें आहे तशाच मासल्याचीं वरील कामें होत. इंग्लिश भाषेंत जे आज लाखों ग्रंथ झाले आहेत व होत आहेत त्या सर्वांचेच कर्ते प्रतिमिल्टन्, प्रतिन्यूटन् असे आहेत काय? कांहीं नाहीं. पुष्कळ अंशीं त्या लोकांच्या अचाट उद्योगाचेंच केवळ तें फळ होय. पण आमच्यांत बहादर पाहा कसे आहेत! नांव लिहायाचें झालें तर पुढें हात सव्वा हात किताब, देशाभिमानाविषयीं तर पहिल्या प्रतीचा बाणा, देशकल्याणाचें कोणतेंही काम निघो, त्यांत प्रमुख मंडळींत नांव, पण देशभाषेंत जर चार शब्द बोलण्याचा किंवा लिहिण्याचा प्रसंग आला, तर बहुधा प्राणसंकटच! असो; तर जेथें स्वभाषेचें येवढें ज्ञान व तीविषयीं येवढी आस्था दृष्टीस पडते तेथलि स्थिति काय सांगावी! ती सर्व प्रकारें अत्यंत शोचनीय असून तिच्यासंबंधानें येथवर अनेक वेळां मागें आह्मी लिहिलेंच आहे; यास्तव जास्त पुनः लिहिण्याची गरज दिसत नाहीं. असो; एकंदरींत मराठींतील ग्रंथसंग्रहाविषयीं आह्मांस असें वाटतें कीं, सध्यां तो जितपत आहे त्याची इतरांच्या मानानें पाहतां फार मोठी योग्यता जरी नाहीं, तरी आह्मी, सध्यां जितपत स्थितीस येऊन पोंचलों आहों तितक्या स्थितीला तो चांगला उपयोगीं पडण्यासारखा आहे; व आमचें पाऊल जसजसें पुढें पडत जाईल त्या त्याप्रमाणें आमच्या भाषेची आंगची योग्यता व लोकांचें कर्तृत्व पाहतां तो वाढत जाण्याचेंही आह्मांस अगदीं कठिण वाटत नाहीं.

९. आतां वाचनाचा प्रघात आपल्या लोकांत सध्यां कितपत आहे तो पाहूं. पूर्वीच्या पद्धतीचे जे लोक आहेत, त्यांच्या वाचनाचा वर एक प्रकार सांगितलाच आहे,—कीं ज्ञाने-

भरी, भगवद्गीता अशांसारखे ग्रंथ ते नियमानें वाचतात; पण तें केवळ भाविकपणानें, ह्मणजे आपण जें वाचतों त्याचा अर्थ आपणांस कळावा इतकी सुद्धां थोड्यांचीच इच्छा असते! हें असलें वाचन विद्येच्या दृष्टीनें केवळ निरर्थक होय हें उघड आहे. आतां नव्या पद्धतीचे लोक पाहूं. यांपैकीं फार करून सगळ्यांचें मुख्य वाचन ह्मटलें ह्मणजे वर्तमानपत्रेंच होत. सांजसकाळ लायब्ररींत खेप घालून आलें ह्मणजे त्या दिवसाचें कर्तव्यकर्म आपण बजावलें असा पुष्कळांचा समज दिसतो. पण खरोखरीची जी लायब्ररी तिजकडे बहुधां कोणी महिन्याचे महिने ढुंकूनही पाहत नाहीं. तेथें खरा अक्षय वास ह्मटला ह्मणजे अंधाराचा व केराचा. पुस्तकांचा खरा चालक ह्मटला ह्मणजे महिन्या दोन महिन्यांनीं त्यांवर सांचलेला मळ झाडणारा गडी, आणि त्यांचे खरे उपभोक्ते ह्मटले ह्मणजे कृमिकीटक! हा हास्यास्पद प्रकार बहुधां जेथें तेथें दृष्टीस पडत असेल यांत संशय नाहीं. पण याबद्दल कोणासही कधीं कांहीं चमत्कार वाटला आहे, किंवा तो मोडायाचें मनांत आलें आहे, असें बिलकुल आढळत नाहीं! याचें कारण काय असावें बरें? एकंदर लोकांत एकाएकीं ज्ञानाची भरती येऊन आजपर्यंत मोठे मानलेले ग्रंथही त्यांस आज एकदम नादान वाटूं लागले; किंवा देशांत विद्येची अगदीं रेलचेल होऊन गेल्यामुळें अधिक शिकण्यास आतां जागाच उरली नाहीं; अथवा सर्व लोक एकंदर लोककल्याणाच्या कामास लागून मार्ग तयार करण्याच्या किंवा कलाकौशल्य वाढवण्याच्या कामास तर गुंतले नाहींत ना! काय असेल तें असो. याचें कारण आह्मांस एक सुचतें. तें हें कीं, वरच्यासारखे प्रकार केवळ लोकाचाराचे होत. सुधारलेलें शहर ह्मटलें ह्मणजे जशी त्यांत म्युनिसिपालिटी पाहिजे, सभागृह, नाटकगृह वगैरेही अवश्य आलींच; त्याचप्रमाणें पुस्तकालय. त्याची एकदां स्थापना होऊन गेली पाहिजे; मग पुढें त्याची व्यवस्था कांहीं कां होईना? त्याचा मूळचा अर्थ असा खरा, कीं उपयुक्त व मनोरंजक पुस्तकें त्यांत ठेवून तीं लोकांनीं वाचावीं, व तेणेंकरून ज्ञानप्राप्ति करून घेऊन देशभाषेंत तसे ग्रंथ रचण्याची त्यांस उमेद यावी; व पहिल्या पहिल्यानें हा त्यांचा उद्देश बराच सिद्धीस गेला. पण त्याचें आतां काय? जें पहिल्यानें खरोखर उपयोगाकरतां होतें तें आतां केवळ शोभेचें कलम झालें आहे. सारांश, आमच्या राजेरजवाड्यांस कमरेस रेशमी म्यानांत लटकणाऱ्या तरवारीचा जितका उपयोग, किंवा कित्येक शौकीन गृहस्थांच्या बंड्यांच्या कप्यांत टिकटिक करणाऱ्या धाकट्या घड्याळांचा त्यांस जितका उपयोग, तितकाच घरच्या दिवाणखान्यांत सुंदर सोनेरी पुठ्ठे करवून नीट बेताबातानें ठेवलेल्या लायब्ररींतील बुकांचा! असो; एकंदरींत सांगायाचें काय कीं, याप्रमाणें ग्रंथवाचनाचा प्रवात बहुतेक मोडून नुसतीं वर्तमानपत्रेंच वाचण्याकडे आमच्या लोकांचा दिवसेंदिवस कल होत चालला आहे. यावरून वर्तमानपत्रें वाचणें अगदीं निरर्थक, त्यांस लोकांनीं आश्रय देणें अगदीं गैर आहे, असें ह्मणण्याचा आमचा बिलकुल रोख नाहीं. तीं वाढविणें हें भाषेच्या संबंधानें व सरकारच्या संबंधानें लोकांस फार हितावह होय अशी आमची पक्की खात्री आहे. पण त्यांपलीकडे ज्ञानाचें साधनच नाहीं, ही जी लोकांची समजूत होत चालली आहे ती मात्र फार गैर आहे हें आह्मांस दाखविणें आहे. वर्तमानपत्रें वाचणें हें इंग्रेज लोक सकाळीं जसा चहा घेतात

त्यासारखेंच पुष्कळ अंशीं होय. ह्मणजे अर्धे पोषण अर्धी करमणूक असाच दोहोंचा प्रकार आहे. शरीराचा निर्वाह होऊन त्याचें यथास्थित पोषण होण्यास जसें चांगलें जेवणच पाहिजे त्याप्रमाणेंच खरी उपयोगाची अशी विद्वत्ता ज्यास संपादन करणें असेल त्यानें मोठमोठ्या नानाविधविषयक ग्रंथांचा ऊहापोहपूर्वक यथास्थित व्यासंगच केला पाहिजे. हे परिश्रम केल्यानें आलेला शीण घटकाभर दूर करण्यास व जगांत काय उलाढाली चालल्या आहेत त्या समजण्यास वरील पत्रांचा आदर करणें बरोबर आहे; पण त्यांस विद्येच्या शिखरावर बसवून ठेवणें हें अगदीं शोभत नाहीं. फार तर काय, पण कित्येक मोठमोठ्या ग्रंथकारांचें असेंही मत आहे कीं, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, इत्यादिकांची समृद्धि लोकांस अपायकारक होय. का कीं, हींच चाळून पाळून वरवर वाचण्याची संवय एकदां मनास लागून गेली ह्मणजे विचारपूर्वक व शोधक बुद्धीनें मोठमोठे ग्रंथ सावकाश वाचण्याचा मनास कंटाळा येऊं लागतो. व यामुळें वरवरचें शुष्क पांडित्य मात्र चोहोंकडे माजून खऱ्या विद्वत्तेचा लोप होतो.

१०. प्रस्तुत विषयावर निरनिराळ्या संबंधानें आणखी पुष्कळ लिहितां येईल. पण सरतेशेवटीं एका मात्र गोष्टीविषयीं कांहीं लिहून हा निबंध आटपतों. ज्यांस ग्रंथ वाचण्याचा नाद असतो, किंवा डौलाकरितां जे तसा आव घालतात, ते बहुधा आपली विद्वत्ता वाचलेल्या पानांच्या संख्येवर लेखतात, ह्मणजे जितकीं पानें आपण वाचलीं तितक्या मानानें आपले ठायीं अधिक ज्ञान आलें असें ते समजतात. पण हा केवढा भ्रम आहे हें हवें त्यास अमळ विचार केला असतां कळण्यासारखें आहे. जितकें जितकें ज्यानें वाचलें तितका तितका तो विशेष ज्ञानसंपन्न व शहाणा असें जर असतें, तर सध्यांचा काळ जगाच्या मागील सर्व काळांपेक्षां ज्ञानांत व शहाणपणांत श्रेष्ठ असता; कारण हल्लीं जितके ग्रंथ झाले आहेत व होताहेत, व लोकांत वाचनाचा सध्यां जेवढा प्रचार आहे त्याचा लक्षांशही प्राचीन काळीं नव्हता. पण चमत्कार पाहा काय आहे, कीं अत्यंत प्राचीन काळचेच महान् महान् ग्रंथकार कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदांवर जे एकदां अढळ बसले आहेत ते आहेत ! हल्लींच्या काळीं ज्ञानाचा केवढाही फैलावा झाला तरी त्यांची सर कोणासही येत नाहीं ! तेव्हां यावरून स्पष्टच दिसतें कीं, वाचलेल्या ग्रंथांच्या संख्येचा आणि विद्वत्तेचा मेळ घालणें हें नेहेमीं बरोबरच असतें असा नेम नाहीं. ज्यानें दहाच ग्रंथ वाचले पण मननपूर्वक शोधक बुद्धीनें वाचले त्याचें ज्ञान, आणि ज्यानें शेंकडों भराभर वाचून फेंकून दिले त्याचें ज्ञान, या दोहोंत कांहींच साम्य धरतां येणार नाहीं. पारसीकांचें मोठ्या डामडौलाचें अफाट सैन्य आणि शिकंदराचें थोडकेंच पण कसलेलें सैन्य या दोहोंचा सामना झाला असतां जो परिणाम झाला तोच वरील दोन पंडितांचें वाग्युद्ध झालें असतां व्हावयाचा. पण इतकेंच नव्हे. असें 'भराभर केलेलें पाठांतर' सर्वथा 'व्यर्थ' होय इतकेंच नव्हे, तर तें अत्यंत अनर्थकारकही होय. वरच्या सैन्याचाच दृष्टान्त घेऊन पाहा. त्यांत कोणाचा जोडा कोणाच्याच पायांत नसल्यामुळें व जो तो आपल्याच थाटांत असल्यामुळें ऐन गर्दीच्या वेळेस सगळा घोंटाळाच घोंटाळा होऊन सैन्याची संख्याच त्याच्या नाशास जशी कारण होते, त्याप्रमाणेंच वरील ग्रंथसंख्या

वाचणारास उपयोगीं पडत तर नाहींच, पण उलटी गर्वोत्पत्तीस मात्र कारण होऊन त्यास प्रसंगीं गोत्यांत आणण्यास मात्र खाशी उपयोगीं पडते! अथवा सर्वांच्या अतिशय परिचयांतला जो व्यापार भोजन त्याचा दाखला घ्या. अन्न जसें शरीरास तसें वाचन, श्रवण वगैरे जीं ज्ञानाचीं साधनें तीं मनास होत. एकानें जसें शरीराचें पोषण होतें, तसेंच दुसऱ्यानें मनाचें होतें. या दोन्ही व्यापारांत पुष्कळ प्रकारचें मोठें चमत्कारिक साम्य आहे. तें असें—जेवण जसें सावकाश नेमस्तपणाचें व नियमानें असेंच केलें असतां अंगीं लागून शरीरास हितावह होतें, त्याप्रमाणेंच वाचायाचे ग्रंथ जर पूर्ण लक्ष देऊन मननपूर्वक असे बेताबातानें वाचले तरच त्यापासून ज्ञानाचा लाभ होऊन निरनिराळ्या मानसिक शक्ति वृद्धिंगत होत जातील. नाहीं तर जसा अधाशी मनुष्य अन्नाशीं गांठ पडली असतां आकंठ तृप्ति करून घेऊन पुढें मग आमांशाच्या योगानें होणारी पीडा भोगीत बसतो त्याप्रमाणेंच वाचणाराचीही स्थिति होते. ह्मणजे सगळेंच अर्धेमुर्धे माहीत, पक्कें निश्चित असें कांहींच नाहीं, असें असल्यामुळें भलभलत्या कल्पना व विलक्षण वेडगळ मतें त्याच्या मनांत शिरून तीं अभिमानास्तव त्यास कधींही टाकावींशीं वाटत नाहींत. तेव्हां अन्नाचा परिपाक होऊन तें रक्तरूपानें शरीरास मिळालें ह्मणजे जसें त्याचें सार्थक झालें त्याप्रमाणेंच आपण जें वाचलें त्याचें पुरतेपणीं विवेचन करून त्यांतलें ग्राह्य कोणतें त्याज्य कोणतें वगैरेची नीट व्यवस्था झाली ह्मणजे तो मजकूर ज्ञानरूपानें आपल्या मनाशीं मिळून तो आपला झाला असें समजावें. या ठिकाणीं मांसाहाराचा दृष्टान्त फार समर्पक होय. पशुपक्ष्यादिकांचें मांस खाल्लें ह्मणजे तें जसें तत्क्षणींच शरीराच्या मांसाशीं मिळत नाहीं, तर जठराग्नीनें त्याचें पुनः पृथक्करण होऊन व तेथील सर्व व्यापार त्यावर क्रमाक्रमानें होऊन शेवटीं जेव्हां त्याचें रक्त बनतें व रक्ताचें मांस होतें, तेव्हांच तें जसें खाणाराच्या मांसाशीं मिळतें, तशीच गोष्ट ग्रंथवाचनाची होय. शेंकडों जाडे मोठमोठाले ग्रंथ जरी घोकून टाकले, तरी जोंपर्यंत त्यांचें विवेचन करण्यास वाचणारानें आपल्या विचारशक्तीचा उपयोग केला नाहीं, तोंपर्यंत तितकी विद्या त्या जाडी पुस्तकांतल्या पुस्तकांतच राहिली. त्याचा लवलेशही याच्या मनांत शिरला नाहीं. इसापनीतींतील उंटाप्रमाणें त्याच्या पाठीवर मात्र अन्नसामग्री पुष्कळ झाली, पण पोटांत कांहीं नाहीं! त्या खाशा ओझ्यानें यास वाहण्याचे मात्र श्रम होतील, व मूर्खत्वास्तव त्याच्या भाराचा यास मोठा गर्वही वाटेल; पण उपयोग ह्मटला तर जो कोणी शहाणा त्यांतील अन्न काढून करून घेईल त्यासच!

असो; वरील अर्ध्याकच्च्या विद्वत्तेचे अनर्थ फार प्राचीन काळापासून सर्व देशांतल्या पंडितांनीं पाहून ठेवले आहेत. ते सर्व भाषांतील ह्मणींत व सुभाषितांत बहुधा सांपडतील. त्यांपैकीं आह्मांस अवगत असलेल्या तीन भाषांतले तीन चुटके येथें लिहून हा लेख पुरा करतों.

आपल्या मराठींतील ह्मण आमच्या सर्व वाचकांस माहीत असेलच—

'उथळ पाण्याला खळखळाट फार.'

पोप कवीनें आपल्या एका लहानशा काव्यांत ( Essay on Criticism ) ह्मटलें आहे—

A little learning is a dangerous thing;
Drink deep, or taste not the Pierian spring,
There, shallow draughts intoxicate the brain,
But drinking largely sobers us again.

" चुटपुटती विद्या ही फार भयंकर आहे. विद्यारूप झऱ्याशीं तोंड लावून एक यथेच्छ प्राशन तरी कर, नाहीं तर एक बिंदुही घेऊं नको. कारण त्याचा असा विचित्र गुण आहे कीं, थोडेच घोट घेतले असतां त्यांनीं माथें फिरून जातें; पण तेच पुष्कळ जसजसे प्यावे तसतसा मद उतरत जातो !"

भर्तृहरि 'नीतिशतका'च्या आरंभीं ह्मणतो—

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि च तं नरं न रंजयति ।।

" जो केवळ अज्ञान आहे त्याची लवकर समजूत करून देतां येते; किंवा जो ज्ञाता आहे त्याची तर त्याहीपेक्षां लवकर करतां येते. पण ज्ञानाचा अर्धामुर्धाच संस्कार ज्यास घडला आहे अशास नमस्कार असो ! साक्षात् ब्रह्मदेवाच्यानेंही त्याचें समाधान करवणार नाहीं ![1]

---

## भाषांतर.

सानुमती—अहो एषा राजर्षेर्निपुणता । जाने सखी अग्रतो मे वर्तत इति[2] । शाकुंतल—६

अंक १२—(१) 'भाषांतर' शब्दाचा इतिहास व व्याख्या. (२) पूर्वीचा भाषांतराचा प्रघात. (३) अलीकडील भाषांतरें. (४)—(५) भाषांतरकर्त्यांस लागणारीं साधनें. (६) भाषांतराचे प्रकार. (७) आणखी दोन विभाग. (८) गोष्टींचीं वगैरे भाषांतरें. (९) शास्त्रीय ग्रंथांचीं. (१०) कविता-ग्रंथांचीं. (११) भाषांतराच्या उत्कृष्टत्वाचें प्रमाण. (१२) एका आक्षेपाचें निवारण.

१. ' भाषांतर ' हा शब्द अलीकडे इंग्रेजींत नवीन बनलेल्या शब्दांपैकीं दिसतो. प्राचीन संस्कृतांत तर हा शब्द आढळत नाहींच; कारण त्याच्या प्रयोगाचें कधीं कारणच

---

१ वामनानें वरील आर्येचें असें भाषांतर केलें आहे–

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें, धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें ।
न जाणे न नेणे अशा पामराला, सुझावूं शकेना विधाता तयाला ॥

२ "सानुमती ( नामें अप्सरा गुप्तरूपें दुष्यंतामागें आकाशांत उभी असतां शकुंतलेची तसबीर पाहून ) ह्मणते—" अहो या राजर्षीची ( दुष्यंताची ) चित्रकर्मांत सुद्धां काय निपुणता ही ! माझी सखी ( शकुंतला ) माझ्यापुढें जगूं उभीच आहे काय असें मला वाटतें ! "

पडलें नसावें. भोंवतालचीं राष्ट्रें त्या काळीं आमच्या आर्य लोकांपेक्षां फार कमी ज्ञानसंपन्न असल्यामुळें त्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें संस्कृतांत व्हावीं असा कधींच योग आला नाहीं. उलटीं संस्कृताचीं मात्र त्या वेळीं व पुढें जवळच्या लोकांनीं भाषांतरें केली ही गोष्ट कांहीं अनुमानावरून व कांहीं प्रत्यक्ष प्रमाणांवरून सिद्ध आहे. असो; पुढें संस्कृत मागें पडून प्राकृत किंवा बालभाषा यांचा जेव्हां प्रचार झाला, तेव्हां त्यांचें संस्कृतांत व संस्कृताचें त्यांत भाषांतर करण्याचा प्रसंग आला. पण यांस 'भाषांतर' ही संज्ञा नसून 'छाया' हें नांव आजपर्यंत चालत आलें आहे. 'छाया' ह्मणजे 'प्रतिबिंब.' आपल्या मराठींतही जुने लोक वरील शब्द ह्मणत नाहींत. तर त्याच्या जागीं 'प्राकृतांत अर्थ करणें' असें ह्मणतात. अथवा 'टीका' 'व्याख्या' हे शब्द चालतात. तेव्हां प्रस्तुत शब्द शुद्ध इंग्रेजींतला आहे असें वाटतें.

या शब्दाचा मूळ अर्थ 'दुसरी भाषा' असा होय.[1] हा कर्मधारय समास असून संस्कृत रीतीनें 'अन्या भाषेति भाषांतरम्' (दुसरी भाषा ह्मणजे भाषांतर) असा याचा विग्रह करतात. तेव्हां भाषांतर करणें ह्मणजे जो अर्थ एखाद्या विवक्षित भाषेंत असेल तो दुसऱ्या भाषेंत उतरणें.

२. आतां हा प्रघात मराठी भाषेंत कसकसा पडत गेला तो पाहूं. पूर्वीं गद्य ग्रंथच मागें सांगितल्याप्रमाणें अगोदर थोडे होते, व आतांप्रमाणें परभाषेचा अभ्यासही लोकांत होत नव्हता. तेव्हां हल्लीं जशीं इंग्रेजींतून अनेक भाषांतरें मराठींत झालीं आहेत तशीं त्या वेळेस फारशींतून किंवा आरबींतून होत नव्हती; एका संकृतांतून मात्र होत होतीं खरीं, पण तीं काव्यांतील किंवा शास्त्रीय ग्रंथांतील मुळींच नसून केवळ पुराणांतून प्राकृत कवींनीं देशभाषेंत छंदोबद्ध रचलेलीं होतीं. या ह्मणण्याचा अर्थ असा अर्थातच नाहीं कीं, मराठी कविता जेवढी ह्मणून आहे तेवढी सर्व संकृतांचें शुद्ध भाषांतर आहे. हें मत बहुतेकांचें, किंबहुना मोठे ज्ञाते ह्मणविणारांचेंही आहे. यांच्या मतें मराठी भाषा तर एकंदरींत निर्जीवच; आणि त्यांतून मराठी कविता तर कांहीं पुसूंच नये. तींत भाकड कथा, वेदान्ताचीं वेडगळ मतें, वेडगळ धर्म हींच काय तीं भरलीं आहेत. पदलालित्य, अर्थगांभीर्य, सुंदर अलंकार वगैरे प्रकार तींत बिलकुल नाहींत. एकंदरींत तीस 'कविता' हें नांव तरी कितपत शोभेल याची शंकाच आहे! असो; या सर्व मतांचा विचार येथें करायाचा नाहीं. तो सविस्तर केल्यास एक बराच मोठा स्वतंत्र ग्रंथ होईल. प्रस्तुत स्थलीं इतकेंच सांगायाचें कीं, मराठी कविता संस्कृताचें केवळ भाषांतरच आहे किंवा निराळी स्वतंत्र आहे याचा पुरतेपणीं क्षणभरही कधीं विचार न करतां तिच्या प्रतिकुल जे खुशालपणें आपलें निक्षून मत देतात त्यांची सत्यावर निष्ठा केवढी असेल किंवा आपले अभिप्राय किती तारतम्यत्वविचार करून ते देत अस-

---

१. या अर्थी 'तथापि भाषांतरलोलुपोऽहं'
हा चरण आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस आठवेलच.

( गीर्वाणवाणीषु विशिष्ट बुद्धिस्तथापि भाषांतर लोलुपोऽहम्।
यथा सुराणां सुधयां च सत्यां स्वर्गांगना नामधरासवे रुचिः ॥ )

हा श्लोक अंक २ रा, पृष्ठ २१ मध्यें आला होता.

तील हें स्पष्ट दिसतें ! तुकारामाचे हजारों निरनिराळ्या प्रसंगीं यदृच्छेनें निघालेले उद्गार; वामनानें, आनंदतनयानें वगैरे रचलेलीं स्फुट प्रकरणें; महीपतीनें रचलेला 'संतविजय' 'भक्तिविजय' इत्यादि; मोरोपंताचे 'केकावली,' 'सन्मणिमाला' 'संशयरत्नमाला,' 'अष्टोत्तरशत रामायणें' इत्यादि ग्रंथ; रामजोशाच्या लावण्या; अमृतरायाचे कटाव—हीं सर्व जर संस्कृताचीं शुद्ध भाषांतरेंच होत, तर शेकसादीचें 'गुलिस्तान' किंवा मिल्टनचें 'प्याराडैज लॉस्ट्' हींही तशींच कां नव्हत ? बरें हेंही सोडून दिलें; मुक्तेश्वराचें किंवा मोरोपंताचें 'भारत' घ्या. हे ग्रंथ तरी व्यासकृत 'महाभारता'चीं भाषांतरें आहेत काय ? 'महाभारत' हा केवढा प्रचंड ग्रंथ आहे, यावरूनच नुसतें पाहतां कळून येईल कीं, त्याचें शुद्ध भाषांतर झटलें ह्मणजे त्याहूनही प्रचंड होणार ! पण वरील ग्रंथ पाहिले तर तीं त्याचीं लहान पिलीं-शींच शोभतील. बरें दोन्ही भाषांतरें संक्षेपानें केलीं असतील ह्मणावें, तरी मोरोपंतानें येवढालीं लांब लांब यमकें, मधून मधून चमत्कारिक प्रास वगैरे जे साधले आहेत ते सर्व असूनही त्याच्या ग्रंथाचें भाषांतरत्व रहाणें ह्मणजे लहानसान आश्चर्य नव्हे ! तेव्हां बरच्यासारखीं आपल्या विद्वत्तेच्या भरांत जे निःशंकपणें मतें देतात त्यांनीं यावरून अंमळ सुविचार शिकावा कीं, अभिप्रायाला खरेपण जें येतें तें तो सप्रमाण असल्यानेंच येतें; तो मोठ्या डौलदार शब्दांनीं एकदम झोंकून दिला असतां अज्ञान व भोळे असे श्रोते किंवा वाचक मोठ्या पूज्यभावानें त्यास झेलतील खरें, पण तसें करणें ठीक नव्हे. एक तर तें पंडितत्वास कलंकभूत होय; शिवाय त्याच्या योगानें असत्याचा प्रसार होऊन जो कोणी अंमळ शोधक बुद्धीनें त्यांच्या मतांचा विचार करूं जातो, त्यास तेव्हांच त्यांचा पोकळपणा कळून येऊन त्यांची पत मात्र नाहींशी होते !

वरील गोष्टीच्या प्रत्ययार्थ आमच्या वाचकांपैकीं जे कोणी संस्कृतज्ञ असतील त्यांनीं आदिपर्वांतील शकुंतलोपाख्यानाशीं मुक्तेश्वराच्या ओंव्या व मोरोपंताच्या आर्या ताडून पहाव्या. तसें केलें असतां मराठी कवितेचें भाषांतरत्व कितपत उरतें तें त्यांस तेव्हांच कळून येईल. तितकें करूनही जे वरील ओंव्यांस व आर्यांस भाषांतरच ह्मणतील, त्यांनीं मग कालिदासाच्या जगद्विख्यात 'शाकुंतल' नाटकास, तसेंच भवभूतीच्या 'उत्तररामचरिता'स वगैरेंही तोच दोष ठेवल्यास तितकेंच साजणार आहे !

३. हें मागील काळाविषयीं झालें. आतां गेल्या पांचपन्नास वर्षांत ह्मणजे इकडे इंग्रेजी झाल्यापासून जो प्रघात पडला तो पाहूं. आमची भाषा अव्वल इंग्रेजींत कशी होती, तिजकडे लक्ष देऊन तिच्या नियमनार्थ व अभिवृद्ध्यर्थ आमच्या प्रस्तुतच्या सरकारानें केवढा उद्योग केला, वगैरे गोष्टींचें संक्षेपतः निरूपण आह्मीं पहिल्या दोन अंकांत केलें आहे; तें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. ही भाषेची अभिवृद्धि मुख्यत्वेंकरून भाषांतरांनीं झाली. हीं भाषांतरें मुख्यतः इंग्रेजींतून आणि त्याच्या खालोखाल संस्कृतांतून झालीं. इंग्रेजींतील भाषांतरें नानाप्रकारच्या विषयांवर झालीं. भूगोलविद्या, ज्योतिषशास्त्र, पदार्थविज्ञान, गणिताच्या शाखा वगैरें शास्त्रीय विषयांवर; व चरित्रें, देशवर्णनें, गोष्टींचीं पुस्तकें, इत्यादिकांवरही तीं झालीं. या पुस्तकांपैकीं अजून दृष्टीस पडणारीं अशीं थोडींच उरलीं आहेत.

असो; दुसरा प्रकार संस्कृतांचीं भाषांतरें. हीं बहुतेक सर्व दक्षिणा प्रैज कमिटीच्या वियमानें झालीं. कालिदास, भवभूति, श्रीहर्ष इत्यादि संस्कृत कवींचीं नाटकें बहुतेक मराठींत होऊन कित्येक छापून प्रसिद्धही झालीं आहेत. हे भाषांतरकार सर्व जुने पंडित असून सगळ्या देशाची भिस्त ज्यांवर असे आमचे नवीन विद्वान् मात्र त्यांत कोणीच नाहींत! ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेवण्यासारखी असून तींत अर्थही थोडा आहे असें नाहीं! असो; वरील भाषांतरकार कैलासवासी परशुरामपंततात्या गोडबोले; वे० शा० सं० कृष्णशास्त्री राजवाडे, व गणेशशास्त्री लेले हे होत. त्यांत रा० लेले यांचीं भाषांतरें तर मूळार्थास धरून असून पुनः अत्यंत सरस व शुद्ध असल्याबद्दल त्या वेळच्या चिटणिसांनीं त्यांची रिपोर्टांत विशेष तारीफ केलेली आढळते. असो; पण वर सांगितल्याप्रमाणें संस्कृत नाटकांचीं जशीं भाषांतरें झालीं, तशीं त्या भाषेंतील 'रघुवंशा'दि अत्यंत प्रसिद्ध काव्यांचींही कांहींच झालीं नाहींत ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे! याचें कारण काय झालें असेल तें असो!

४. याप्रमाणें आजवर भाषांतररूपानें जो ग्रंथसंग्रह आमच्या भाषेंत झाला त्याविषयीं लिहिलें. आतां भाषांतर कसें असावें, त्याच्या उत्कृष्टतेचें प्रमाण कोणतें, वगैरे गोष्टींविषयीं विचार करूं.

५. उत्कृष्ट भाषांतरकार झटला झणजे त्यास इतके गुण अवश्य पाहिजेत, एक तर ज्या भाषेंतून तो भाषांतर करणार ती त्यास पूर्ण अवगत व्हावी. झणजे व्याकरणरचना, अर्थ-स्वारस्य वगैरे त्याचें त्यास यथास्थित कळलें पाहिजे,—दुसऱ्याच्या भाषांतरावर, सांगण्यावर वगैरे त्यानें जातां कामा नये. याप्रमाणें मूळ ग्रंथाचा अर्थ सर्व यथास्थित त्यानें आपल्या मनांत भरून घेऊन मग तो भाषांतरद्वारां दुसऱ्या भाषेंत त्यानें ओतूं लागावें. दुसरें ज्या भाषेंत भाषांतर उतरायाचें तिचेंही पहिल्यासारखेंच त्यास पूर्ण ज्ञान पाहिजे. तरच पहिल्या भाषेंतील अर्थ दुसरींत त्यास नीट ठाकठिकीनें बसवतां येईल. हें काम पहिल्यापेक्षां किती कठिण आहे हें सांगायास नकोच! पुष्कळांस स्वतःच्या अनुभवावरून त्याची प्रचीती आली असेलच. मूळ भाषेचा अर्थ चांगला पक्का समजणेंही तादृश कठिण नाहीं. पण तोच दुसऱ्या भाषेनें यथास्थित व्यक्त करणें झणजे पुष्कळ वेळां मोठी मारामार पडते. ज्याच्या त्याच भाषेंत तो अर्थ व्हावा तर अनेक प्रकारांनीं व्यक्त करतांही येईल, पण त्याची कल्पना बरोबर परभाषेंत ठेवून देणें झणजे परम दुर्घट! उघडच आहे. भाषाभाषांत अनेक प्रकारची तफावत असते. कित्येकांत शब्दसंग्रह अगदीं थोडा, कित्येकांत पुष्कळ, कित्येकांत संस्कृताप्रमाणें शब्दसाधनिकेची पुष्कळ सोय असते,—झणजे एका शब्दावरून निरनिराळ्या अर्थांचे वाचक असे शब्द लगेहात हवे तितके करतां येतात; कित्येकांत ही सोय फारच थोडी असते; कित्येकांत अशा कांहीं कल्पना असतात कीं, दुसऱ्या भाषेनें त्या व्यक्त करतांच येत नाहींत. किंवा आल्याच तर केवळ सारासरी मात्र करतां येतात; याखेरीज शब्दांचें मृदुत्व, सौंदर्य, लालित्य इत्यादि प्रकार; वाक्यरचनेची रीत, भाषापद्धतीची शैली, वगैरेही आणखी अनेक भेद असतात. तेव्हां या सर्व अडचणींतून बरेपणीं निभावून जाणें लहानसान काम नव्हे. त्यास मनुष्याच्या अंगीं समंजसता व चातुर्य असून भाषांतराच्या कामांत तो चांगला

घटावलेलाही असला पाहिजे. असो; तिसरी गोष्ट ज्याचें भाषांतर करायाचें तें. तें भाषांतर होण्यासारखें पाहिजे. याचा आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् मोठा अचंबा वाटेल! ते ह्मणतील कीं, याचा काय अर्थ! हवें त्याचें भाषांतर होण्यासारखें आहे. नाहीं असें काय आहे? पण याचें विवरण अंमळ पुढें सविस्तर करण्यांत येईल. असो; तर याप्रमाणें दोहों भाषांची पुरी माहिती भाषांतर करणारास असून ज्याचें भाषांतर करायाचें त्याची तशी योग्यता हवी, हीं उत्कृष्ट भाषांतरास तीन साधनें मुख्यतः अनुकूल असलीं पाहिजेत. याखेरीज चवथीही एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे. ती ही कीं, भाषांतरकर्ता मूळ ग्रंथकाराशीं समवृत्ति असला पाहिजे. ह्मणजे मूळच्या ग्रंथकाराची वृत्ति जशी रंगेल, थट्टेखोर, किंवा गंभीर, कडक वगैरे असेल तशीच भाषांतर करणाराची असायास पाहिजे; किंबहुना एकाच ग्रंथांत अशा वृत्ति जसजशा त्यानें जागोजाग प्रगट केल्या असतील तसतशा अनुक्रमानें भाषांतरांत उतरल्या पाहिजेत. पण हें काम हवें त्यास साधणार आहे असें नाहीं. कोणी स्वभावतः केवळ थट्टेखोरच असतात; कोणास थट्टा कशी ती मुळींच भासतही नाहीं! यास्तव जो तशा ग्रंथाचें भाषांतर करूं जाईल तो केवढाही बुद्धिमान् असला तरी तें काम त्याच्यानें निभणार नाहीं. धर्माच्या किंवा वेदांताच्या विषयास भाषांतरकार तसाच पाहिजे; व 'डॉन्‌किक्सोट्'[1] सारख्या ग्रंथास तसाच निराळा पाहिजे. असो; याप्रमाणें मूळ ग्रंथाच्या भाषापद्धतीकडे वगैरेही भाषांतर करणारानें लक्ष दिलें पाहिजे.

६. याप्रमाणें उत्कृष्ट भाषांतर होण्यास कोणकोणतें साहित्य पाहिजे तें सांगितलें. आतां भाषांतराचे निरनिराळे प्रकार पाहूं. ग्रंथाचे एकंदर मोठे दोन विभाग आहेत; एक गद्यग्रंथ आणि दुसरे पद्यग्रंथ, ह्मणजे कविता. आतां दोहोंविषयीं अनुक्रमानें लिहूं.

७. गद्यग्रंथांतही दोन प्रकार; एक शास्त्रीय, आणि दुसरे बाकीचे,—ह्मणजे गोष्टी, कादंबऱ्या, चरित्रें इतिहास वगैरे. आतां या दुसऱ्यांविषयीं प्रथमतः लिहून मग पहिल्यांविषयीं विचार करूं.

८. गोष्टींचीं भाषांतरें करणें हें एकंदरींत जरी फार कठिण नाहीं; तरी तें उत्कृष्ट साधणें ही एखाद्याचीच हातोटी! मनुष्य जसा जन्मतःच कवि निपजावा लागतो तसाच गोष्टी सांगणाराही निपजायासच पाहिजे असें एका ग्रंथकाराचें वचन आहे. हें कोणास केवळ अत्युक्तिरूप वाटेल; पण तसें नव्हे. चित्तवेधक रीतीनें गोष्टीची रचना करायाची किंवा ती सांगायाची ही लहान कला आहे असें नाहीं. हें काम किती कठिण आहे याचा अनुभव ज्यास घेणें असेल त्यानें बुकांत वाचलेली एखादी मजेदार गोष्ट किंवा हरदासानें सांगितलेली नक्कल आपण होऊन दुसऱ्यास सांगूं लागावें, ह्मणजे त्या ग्रंथकारांत किंवा हरदासांत आणि आपणांत केवढी तफावत पडते ती त्यास तेव्हांच दिसून येईल. एकेका मनुष्यास बोलण्याची छाप अशी साधून गेलेली असते कीं, तशी त्याशीं निरंतर सहवास केल्यानेंही दुसऱ्यास साधूंच नये. गोष्ट जुळण्याची खुबी; ज्या शब्दांनीं ती सांगायाची ते

१. मागें पृष्ठ ६६ पहा.

असे काय अगदीं टाकलेले—त्यांत लेवापेचा शब्द पडायाचाच नाहीं; गोष्टीस ओघाओघानें एकदम आरंभ करायाचा; तिचा शेवटही तसाच झोंकानें करायाचा; निरनिराळ्या पात्रांचें ज्याचें त्यास शोभेसें बोलणें; इत्यादि गोष्टी जो ह्मणेल त्यास साधण्यासारख्या आहेत असें नाहीं! असो; तर ज्याप्रमाणें वरील बोलणारांस किंवा लिहिणारांस रसवंती अनुकूल असावी लागते त्याचप्रमाणें ती खुबी व ती मजा परभाषेंत उतरण्यास भाषांतरकर्त्याच्याही अंगीं तो गुण असला पाहिजे. वास्तव अशीं भाषांतरें हवा तो करूं गेल्यास त्यास अगदीं साधणारीं नव्हेत. आह्मीं असें ऐकिलें आहे कीं, कौपरचा प्रसिद्ध चुटका 'जॉन् गिल्पिन्' याचें कोणी मराठींत छंदोबद्ध भाषांतर केलें आहे. हें आह्मीं अजून पाहिलें नाहीं; पण न पाहतांही वरील भाषांतराविषयीं अभिप्राय देण्यास आह्मांस काडीइतकेंही भय वाटत नाहीं. तें भाषांतर निवळ फसलें असेल असें आह्मी खात्रीनें सांगतों. आणि याचें कारणही उघड आहे कीं, त्यांत जो नाजुक तऱ्हेचा विनोद आहे तो केवळ इंग्रेजी पद्धतीचाच आहे. तो मराठींत उतरणें केवळ अशक्य होय! दुसरें उदाहरण 'अथेल्लो'. शेक्सपियरकृत या अत्यंत प्रसिद्ध नाटकाचें भाषांतर कैलासवासी महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं सुमारें दहा बारा वर्षांपूर्वीं केलें तें एकंदरींत फार उत्कृष्ट साधलें आहे,—व तें इतकें मराठींत उतरेलसें आह्मांस वाटलेंही नव्हतें!—पण याचें कारण अर्थातच भाषांतरकर्त्याचा रंगेल स्वभाव हें एक; आणि दुसरें त्या नाटकाची निवड. असो; पण याविषयीं पुढें आणखी विशेषत: लिहिण्यांत येईल. तेव्हां गोष्टींचीं, कादंबऱ्यांचीं, नाटकांचीं वगैरे भाषांतरें करतांना त्यांची मराठींत उतरतां येण्याची योग्यता व त्या कामास आपली स्वत:ची योग्यता हीं नीट पाहून मग त्या उद्योगास घालणारानें हात घालावा. इतिहास व चरित्रें यांच्या भाषांतराची गोष्ट मात्र तशीच केवळ ह्मणतां येत नाहीं. दोहों भाषांचें पूर्ण ज्ञान व वाकबगारी मनुष्यास असली ह्मणजे तें होण्यास, विशेष अडचण पडणार नाहीं.

९. दुसरें कलम शास्त्रीय ग्रंथ. यांचें भाषांतर एरवीं पाहतां सगळ्यांत सोपें आहे; कारण त्या त्या शास्त्रांतील सिद्धांत वगैरे जसे असतील तसे या दुसऱ्या भाषेंत ठेवून दिले ह्मणजे झालें. मूळच्या ग्रंथांतील रस भाषांतरांत उतरला पाहिजे वगैरे संबंध यांत बिलकुल नसल्यामुळें केवळ व्याकरणशुद्ध व रूढिशुद्ध असा साध्या सोप्या रीतिचा तर्जुमा इकडे उतरला ह्मणजे पुरे होतें. पण एक मात्र मोठी जबरदस्त अडचण वरचेवर येऊन पडते. ती अर्थातच पारिभाषिक शब्दांची. प्रत्येक शास्त्राला त्याचे त्याचे असे ठरलेले कांहीं शब्द असतात; त्यांस संस्कृतांत परिभाषा ह्मणतात. या परिभाषेला प्रतिपरिभाषा दुसऱ्या भाषेंत बनवणें हें मोठ्या चातुर्याचें व श्रमाचें काम असतें. असे जे नवे शब्द बनवायाचे त्यांत इतके गुण असावे लागतात. एक तर या शब्दांचें वरचेवर काम लागणार, तेव्हां ते लांबलचक अवजड असे नसावे; तर जेवढे थोडक्यांत येतील तेवढे चांगले; जसें 'भूगर्भशास्त्र,' 'पदार्थविज्ञान,' 'वक्रीभवन,' इत्यादि. दुसरें, ते ओबडधोबड अथवा कर्कश नसून कानास चांगले मृदु व मधुर लागावे. तिसरें, ते व्यावहारिक भाषेपेक्षां जितके निराळे असतील तितकें चांगलें; कारण जे शब्द नेहेमी बोलण्याचालण्यांत वगैरे आलेले ते शास्त्रीय ग्रंथांत

शोभत नाहींत. असो; आतां या सर्व सोयी संस्कृतामुळें मराठीस फार उत्कृष्ट साध्य झाल्या आहेत हें मागें एक दोन वेळां आम्हीं लिहिलेंच आहे. एक तर तींत समासांची व संधींची अत्युत्कृष्ट रचना असल्यामुळें नवा शब्द थोडक्यांत व बेमालूम असा बनवतां येतो. दुसरें, त्या भाषेंत शब्दसंग्रह फार मोठा असल्यामुळें व भाषाच एकंदर मोठी डौलदार व सुंदर असल्यामुळें वर सांगितलेले दोन गुण मार्दव आणि माधुर्य—हेही सहज साधतां येतात; तिसरा गुण—-अपरिचितत्व—-हा तर ती भाषा निराळी पडल्यामुळें अर्थात् आहेच आहे. शिवाय त्या भाषेच्या रीतीप्रमाणें एक शब्द साधला असतां त्यापासून जवळ जवळच्या अर्थाचे शब्दही तेव्हांच साधतां येतात; जसें 'इतिहास' शब्दापासून 'ऐतिहासिक,' 'इतिहासज्ञ' इत्यादि. सारांश, सोन्यारुप्याच्या उंच नाण्यास जसे गुण असतात तसेच परिभाषेंत असावे. ह्मणजे रुपयाची किंवा मोहरेची जशी किंमत फार असून वजन मात्र थोडकें असतें, कीं त्यांस बरोबर नेण्याची अगदीं अडचण पडूं नये, त्याप्रमाणेंच परिभाषेच्या शब्दांत अर्थ पुष्कळ असून ते टुमदारसे, ल्हान असावे, कीं उच्चारण्यास व वारंवार त्यांचा प्रयोग करण्यास श्रम पडूं नयेत. दुसरें वरील नाणें ठाकठिकीनें पाडलें असून जसें दिसण्यांतही सुंदर दिसतें, तसेंच वरील शब्दांत झोंकदारपणा व सुरेखपणा हे गुण असावे. तिसरें अपरिचितत्व. रुपये, मोहरा या सामान्य लोकांस ह्मणजे गरीबगुरिबांस कशानें दृष्टीस पडायाच्या आहेत? हल्लीं आमच्या देशांत तर असे हजारों लोक आहेत कीं ज्यांनीं सोन्याचें नाणें तर काय पण सबंध रुपयाही यावज्जन्म पाहिला नाहीं! तर याप्रमाणेंच पारिभाषिक शब्दही अगदीं व्यवहारबाह्य असावे. चवथें सादृश्य वरील नाण्याची मोड ह्मणजे मोहोरांच्या पुतळ्या, किंवा रुपयांच्या अधेल्या पावल्या वगैरे जशा करतां येतात, तसेंच हें विभाजत्व परिभाषेंतील शब्दांत असावें. ह्मणजे 'तें जाणणारा,' 'तत्संबंधी,' इत्यादिवाची शब्दांची साधनिका मूळ शब्दापासून सुलभतेनें होण्यासारखी असावी. सरतेशेवटीं, देशाचें राज्य चालवणाऱ्या राजाचा शिक्का एकदां ठोकला, ह्मणजे तें नाणें बनून सर्वांस जसें ग्राह्य होतें, त्याप्रमाणेंच इकडे मोठमोठ्या ग्रंथकारांनीं आपली बुद्धि व चातुर्य खर्चून एकदां परिभाषा ठरवून टाकली, कीं ती मग चालली! असो; तर वर सांगितल्याप्रमाणें आमच्या देशाच्या व भाषांच्या भाग्यानें जेव्हां चोहोंकडे टांकसाळी सुरू होतील तेव्हां वरील गोष्टींकडे आमच्या पंडितांस अवश्य लक्ष पुरवावें लागेल.

१०. आतां एक मात्र सदर राहिलें,—पद्यग्रंथ ह्मणजे कविता. याविषयींचा विचार वरच्याहूनही विशेष महत्वाचा आहे; कारण कवितेचें भाषांतर ह्मणजे फारच कठिण! हें ह्मणणें आमच्या बहुतेक वाचकांस फार विलक्षण वाटेल; कारण इतर ग्रंथांचीं जशीं भाषांतरें झालीं आहेत, तशींच आमच्या मराठी कविताग्रंथांचींही बरींच झालीं आहेत, व तीं विशेष जड गेलीं असेंही पण कोणास वाटत नाहीं. याचें कारण पाहूं जातां कवितेच्या स्वरूपाचें एकंदर लोकांस थोडेंच ज्ञान आहे हें होय. कविता ह्मणजे नुसत्या पद्यरचनेच्या पलीकडे कांहीं पदार्थ आहे ही कल्पनाही बहुतेकांच्या मनांत अजून आली नाहीं; व ज्यांस ती ऐकून माहीत आहे त्यांच्यापैकीं कितीकांस तिचा पूर्ण प्रत्यय मनास भासत असेल तो

असो! आमच्या जुन्या मराठी कवितेविषयीं जर पाहिलें, तर ती ज्यांनीं वाचली आहे व यास्तव तीविषयीं मत दिलें असतां ज्यांस कांहीं तरी शोभेल अशा लोकांपेक्षां वाचण्याच्या किंवा वाचून समजण्याच्या नांवानें तर पूज्य पण तिजविषयीं रामबाण मत देणारांत मात्र अग्रगण्य अशांचीच संख्या फार आहे. मराठी कवि एकंदर येथून तेथून अप्रयोजक,[१] त्यांतून मोरोपंतासारखा नादान कवि ( अथवा 'कवि' तरी कसचा ? 'यमकें जुळणारा' ) तर आजपर्यंत कधींच झाला नसेल, अशीं मतें लेखनद्वारां व भाषणद्वारां ज्यांनीं अनेकशः प्रणीत केलीं आहेत अशा गृहस्थांपैकीं आह्मांस असे माहीत आहेत कीं, ज्यांत 'केकावली'सारख्या अंमळ कठिण काव्यांची तर काय, पण आर्येची, श्लोकाची सुद्धां भ्रांत! हे श्लोक किंवा या आर्या त्यांस ह्मणजे समजणार नाहींत असें आमचें बिलकुल ह्मणणें नाहीं; पण त्या समजण्याच्या अगोदर त्यांविषयीं मत देण्याचा पतकर जो ते खुशाल बिनधोक आपणावर घेतात, तो पाहून मात्र हंसूं येतें. पण अंमळ जास्ती नजर फांकविली असतां यांतही मोठेंसें आश्चर्य वाटणार नाहीं! आलीकडील इंग्रेजी विद्वत्तेचा बहुतेक ठिकाणीं असाच कांहीं अद्भुत प्रभाव दिसण्यांत येतो कीं, आपणास जें माहीत असेल त्याविषयीं कोणीही मत देईल, पण ज्याची आपली बापजन्मींही ओळख नाहीं, जें समजण्याविषयीं आपण कधीं यत्किंचित्‌ही प्रयत्न केला नाहीं, किंबहुना योग्यता नाहीं, त्याविषयीं फाडकन भरसभेंत मत झोंकून दिलें, तर ती विद्वत्ता! ही शक्कल इंग्रेज लोकांनीं प्रथम काढली असून त्यांचे पुरे शिष्य बनलेल्या आमच्या कित्येक विद्वानांनीं ती त्यांच्यापासून भरपूर उचलली आहेशी दिसते! असो. तर याप्रमाणें आमच्यांत आमच्या जुन्या कवितेविषयीं ज्ञान आहे. आतां तीपेक्षां इंग्रेजी कवितेशीं पुष्कळांचा अधिक परिचय झाला असतो खरा,—कारण कीं, बिचाऱ्या मराठी कवितेप्रमाणें तिजकडे तसें दुर्लक्ष करतां येत नाहीं—तरी कवितेची अभिरुचि प्राप्त होण्यास केवळ शाळांतील व विद्यालयांतील शिक्षण मोठेंसें उपयोगीं पडण्यासारखें असतें असें आह्मांस बिलकुल वाटत नाहीं. कारण शेंकडों विषयांचें सारखेंच अध्ययन करायाचें, तेव्हां त्यांत कवितेचीच काय मातब्बरी! वरील अभिरुचि प्राप्त करून घेण्यास विद्यार्थ्यांचा स्वतःचा निराळा व्यासंगच कारण होय यांत संशय नाहीं. असो; तर याप्रमाणें सध्यांच्या स्थितींत कवितेची खरी अभिरुचि फारच थोड्यांस प्राप्त होते. त्यांतून मराठी कवितेची तर वर सांगितल्या प्रकारची दशा! तेव्हां ती वाचणारे अगोदर थोडे, समजणारे तर त्यांहून थोडे, आणि खरे उपभोक्ते तर विरळाच! यास्तव वर जीं मराठींत कविताग्रंथांचीं भाषांतरें झालीं ह्मणून सांगितलीं त्यांविषयीं यथार्थ ज्ञान आमच्या लोकांस तितपतच आहे. अमुक अमुक भाषांतरें झालीं आहेत येवढें कित्येकांस माहीत आहे; पण तीं कशीं आहेत, त्यांत मूळच्या ग्रंथाचे गुण कितपत उतरले आहेत, हें समजणें पुष्कळांस अर्थातच अशक्य होय.

---

१. हो! पण चुकलों! वर सरसकट मराठी कवींस ओढलें तें बरोबर नाहीं. आलीकडे पांच सहा वर्षांत माजी डैरेक्टर् ग्रांट् साहेब यांच्या प्रसादानें तुकाराम मात्र पक्क्या चांगल्या कवींत मोडूं लागला आहे, यास्तव त्यास वरील पंक्तीस बसवतां येत नाहीं!

कारण तसें होण्यास दोन्ही भाषांचें पूर्ण ज्ञान परीक्षकास असलें पाहिजे. ही स्थिति सध्या फारच थोड्यांचा आहे; ती पुष्कळ लोकांची होण्यास अजून पुष्कळच अवधि पाहिजे. असो; तर यास्तव कवितेचें भाषांतर करणें फारच कठिण ह्मणून आह्मीं वर जें ह्मटलें त्याचा अर्थ पुष्कळांच्या लक्षांत मुळींच येणार नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

कवितेचें भाषांतर ह्मणजे काय याची कल्पना अद्याप तर एकंदर लोकांची अशीच आहे कीं, मूळच्यांतील अर्थ पद्यरूपानें परभाषेंत उतरला ह्मणजे झालें. ही कल्पना किती पोरकळ आहे याविषयीं प्रस्तुत मालेच्या तिसऱ्या अंकांत आरंभीं आह्मीं बराच विस्तार केला आहे. केवळ छंदोबंध हा कवितेचा किती लहान भाग आहे याविषयीं आमच्या वाचकांस बहुधां संशय नसेलच. मूळच्या कविताग्रंथांचें भाषांतर केवळ वरच्या प्रकारानेंच जर होत असेल तर भाषांतराभाषांतरांत बिलकुल फरक राहणार नाहीं; व साऱ्या उत्कृष्ट कवितांचीं भराभर भाषांतरें होऊं शकतील. कारण सुताराच्या लोहाराच्या वगैरे व्यावहारिक कामासारखेंच हें काम झालें! एकदां पद्यें जुळण्याचें कसब साधलें ह्मणजे झालें! पण तसें नव्हे. उत्तम कविता ह्मटली ह्मणजे तिचीं अनेक अंगें असतात. एक तर पद्यरचना. ही पद्यरचना ह्मणजे 'ट' ला 'ट' व 'प' ला 'प' जुळवीत बसविण्याचें कसब नव्हे. हें तर हवें त्यास साधणारें आहे; व अशा कविता कितीही श्रम करून केल्या तरी त्यांचा निर्जीवपणा मार्मिक वाचकांस तेव्हांच भासतो. कविता दोन प्रकारची आहे. एक हठकविता ह्मणजे बळेंच ओढून ताणून ठाकठिकीनें जुळविलेली; आणि दुसरी प्रासादिक ह्मणजे सरस्वतीच्या कृपेचें फळ. आतां पहिल्या हठकवीची कविता ह्मटली ह्मणजे 'कुंभारानें घडलेल्या मडक्यांसारखी' किंवा फार बुद्धि खर्चून केली असली तर 'सोन्याच्या कमळासारखी'च काय ती होईल! याच्या पलीकडे तिची मजल कधीं पोंचणार नाहीं. प्राण्यांच्या शरीरांत जीवतत्त्व घालणें किंवा वनस्पतिवर्गास टवटवी, स्वाद, सुगंध वगैरे देणें हें जसें एका ब्रह्मदेवाच्या हातीं; त्याचप्रमाणें कवितेच्या पदरचनेंत कवित्व ओतून देणें हें एक वरील प्रासादिक कवींनीं त्यांचें त्यांनींच करावें! अथवा याही ह्मणण्यांत अंमळ चूकच आहे. वरील कवित्व ते ओतून देतात असें नव्हे, तर तें स्वतःसिद्धच बाहेर पडतें असें ह्मणायाला हवें! अशा खऱ्या खऱ्या कवींस काव्यरचनेचें कठिण पडत नाहीं हें तर काय, पण त्यांचे जे जे उद्गार निघतील ते कवित्वमय निघावे हा त्यांचा स्वभावधर्मच केवळ होय. भवभूतीनें 'उत्तररामचरितां'त ह्मटलें आहे—

लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुवर्तते ।
ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ॥

"लोकांत वागणारे जे साधु असतात त्यांची वाणी अर्थास अनुसरते, ह्मणजे अर्थास अनुलक्षून ते बोलतात; पण वाल्मीकिप्रभृति जे पुरातन ऋषि त्यांच्या पाठीमागें अर्थ धांवतो!— ह्मणजे त्यांचें बोलणें वरच्यांच्यासारखें अर्थावर धोरण ठेवून झालेलें नसतें, तर आधींच होऊन

१. अंक ३ व ४ यांवरील पद्यांत हा अर्थ आहे. पृष्ठ २२ व ३० पहा.

मग अर्थ हा आपोआप त्यास येऊन मिळतो!" ही उक्ति रामाची असून तेथें आशीर्वादाच्या संबंधानें केली आहे. पण तीच प्रकृत प्रसंगीं कवित्वाच्याकडे लावली असतां शोभणार आहे!

असो; तर याप्रमाणें पद्यरचनेची गोष्ट आहे. तींतील मृदुत्व, माधुर्य, लालित्य हे गुण फार श्रमानें कोणाकोणास कदाचित् साध्य होतील; पण कवित्वाच्या भरांत जी शब्दांची ठेवण प्रासादिक कवीस वरचेवर साधते ती इतरांस कितीही श्रम केले तरी साधणारी नव्हे. फार तर काय, पण प्रत्यक्ष त्या कवीसही तशी पुनः साधेल असा नेम नाहीं! अशा अमृत-योगावर निर्माण झालेली आपली कृति पाहून कवीस स्वतःच जो विलक्षण विस्मय वाटत असेल तो पुढील श्लोकांत वर्णिल्यासारखाच ह्मणायाचा—

दृशः पृथुतरीकृता जितनिजाब्जपत्रत्विष—
श्चतुर्भिरपि साधुसाध्विति मुखैः समं व्याहृतम्।
शिरांसि चलितानि विस्मयवशात् ध्रुवं वेधसो
विधाय ललनां जगज्जनललामभूतामिमाम्॥

"साऱ्या जगाचें केवळ नाक अशी ही स्त्री निर्माण झाली असतां, ब्रह्मदेव खरोखर अगदीं चकित होऊन राहिला असेल!—आपल्या आसनाच्या कमलाच्या पत्रांहून आपले डोळे मोठे करून तो हिजकडे टकमकां पाहूं लागला असेल; चारी मुखांनीं एकदम 'वाः' 'वाः' असें केलें असेल; आणि आश्चर्यांत बुडून जाऊन त्यानें आपलीं मस्तकें डोलवलीं असतील[1]!" अशीं स्थलें मोठमोठ्या कवींच्या ग्रंथांतून रसिक वाचकांस हवीं तितकीं सांपडतील व अशी जेथें मूळ ग्रंथकर्त्याची तल्लीनता झाली असते तेथेंच वाचकांचीही होते हें उघडच आहे! 'प्याराडैज लॉस्ट्' नांवाच्या मिल्टनकृत काव्याविषयीं लिहितांना मेकॉलेनें आपल्या पहिल्या प्रथमच्या निबंधांत काय लिहिलें आहे तें आमच्या इंग्रेजी जाणणाऱ्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच. तो ह्मणतो, 'मिल्टनचा प्रत्येक शब्द कवित्वानें भरलेला आहे; त्यांतला एक अंमळ इकडचा इकडे करा, कीं, सगळें बिघडलें!'[3] शेक्सपीयर, ग्रे इत्यादि कवींच्या कित्येक पद्यांविषयींही कितीक पंडितांनीं असें लिहिलें आहे कीं, त्यांतील शब्दांत काय चेटुक करून ठेवलें असेल तें असो, त्यांनीं वाचकाला मोहनीच पडते! आपल्याकडचें कालिदासाचें उदाहरण घ्या. 'शाकुंतल' नाटक निर्माण झालें असेल तेव्हां वरील ब्रह्मदेवाप्रमाणेंच आमच्या महाकवीस आपल्या कृतीचा विस्मय वाटून त्यानें खरोखर मस्तक डोलवला असेल! या आमच्या स्वारीनेंही त्यांतील चवथ्या अंकावर व विशेषतः

१. विल्सन् साहेबानें वरील श्लोकाच्या पहिल्या चरणाचें भाषांतर निराळेंच केलें आहे. तें असें कीं, 'आपल्या आसनाच्या कमलाच्या पत्रांसारखे सुंदर असे तिचे डोळे पाहून—ब्रह्मदेव चकित झाला.' त्याप्रमाणेंच वरील चरणाचा पाठ—निजात—पत्रत्विषः' असाच दोन तीन पुस्तकांत आढळतो. पण हीं दोन्ही आमच्या मतें बरोबर नाहींत.

२. 'रत्नावली' नाटक अंक २. नायिकेची तजवीर पाहिली असतां राजास आश्चर्य वाटून त्यानें केलेली ही उक्ति होय.

3. Essay on Milton.

त्यांतील श्लोकचतुष्टयावर[१] काय फुक मारून ठेवली असेल ती असो! सगळ्या जगाची त्यावर मुरकुंडी वळते![२] आमच्या महाराष्ट्रकवींविषयीं बोलण्यास भय वाटतें; कारण आमच्या आलीकडील महाराष्ट्रपंडितांनीं त्यांस केव्हांच नादान ठरवून ठेवले आहेत! तरी येवढ्या पंडितांच्या मतविरोधास भीत भीतच आह्मी येथें असा अभिप्राय देतों कीं, आमच्या पंतासही केकावली लिहितांना खूपच भट्टी साधली, त्यांतही शेवटल्या शेवटल्या पंधरा सोळा केका लिहितांना! असो; तर अशा प्रकारचीं स्थलें हीच कवितेचे जीवप्राण होत. मनुष्याच्या जीवतत्त्वाचा जसा आजपर्यंत कोणासही थांग लागला नाहीं, व बहुधा पुढेंही कधींच लागणार नाहीं, त्याप्रमाणें वरील कवितांचें होय. इकडे जसें बाहेरचें जड शरीर मात्र इंद्रियगोचर होतें, पण त्याचा चालक जो जीवात्मा तो केवळ अवाङ्मानसगोचर होय, ह्मणजे वाणीच्या व मनाच्या टप्याबाहेर आहे, तसेंच तिकडे बाहेरचे शब्द कानावर पडतात व त्यांचा आल्हादजनक अर्थ मनास भासतो, पण येवढा अपूर्व गुण त्यांत कशामुळें आला आहे हें मात्र कधीं समजायाचें नाहीं! एके पक्षीं मोठ्या उत्कृष्ट व कुशल शस्त्रवैद्याचीं शस्त्रें जशीं व्यर्थ होत, त्याप्रमाणेंच दुसऱ्या पक्षीं शब्दविवेचकाचें पांडित्य अगदीं खुंटून जातें. पण इतकेंच नव्हे. वरील शस्त्रवैद्याच्या दृष्टांतांतच आणखी हेंही स्पष्ट होतें कीं, जीवतत्त्वाचा शोध लावण्याच्या हेतूनें त्यानें एखाद्या प्राण्याच्या शरीरावर जर शस्त्रप्रयोग केला तर तें जसें नाहींसें मात्र होऊन तो प्राणी त्यास पुन: शाबूद करतां यावयाचा नाहीं, त्याप्रमाणेंच वरील कवितांचें मर्म काढून तें परभाषेंत जो ठेवूं पाहील त्याचा प्रयत्नही तितकाच सफळ होईल! अथवा झाडाचें उदाहरण घेतलें तरी चालणार आहे. झाड जसें उपटतांच अंमळशानें त्यावरची टवटवी नाहींशी होते, पानें सगळीं गळून जातात, त्याचप्रमाणें मूळच्या भाषेंत जी शब्दांची ठेवण वगैरे असते ती दुसऱ्या भाषेंत आणणें हें परम दुर्घट, किंबहुना अशक्यच ह्मटलें असतां चालेल. सर् विल्यम् जोन्स् यानें 'शाकुंतल' नाटकाचें जें इंग्रजींत भाषांतर

---

१. जुन्या पंडितांत एक चुटका प्रसिद्ध आहे—

काव्येषु नाटकं रम्या तत्र रम्या शकुंतला।
तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम्॥

"काव्यांत नाटक रम्य, नाटकांत 'शकुंतला' रम्य, 'शकुंतलें'त चवथा अंक, आणि चवथ्या अंकांत 'हें श्लोकचतुष्टय'. ह्मणजे शकुंतला सासरीं जाण्यास निघाली असतां कण्वाचे निरनिराळ्या प्रसंगीं जे उद्गार निघाले ते होत."

२. खुद मिल् साहेबांसही एकंदर कवितेशीं व विशेषत: हिंदूंविषयीं जो त्यांचा बळकट विरोध होता तो क्षणभर विसरून असें लिहावें लागलें--

"The poem (!) has, indeed, some beautiful passages.........The scene which takes place when Sacontala is about to leave the peaceful hermitage where she had happily spent her youth, her expressions of tenderness to her friends, her affectionate parting with the domestic animals she had tended, and even with the flowers and trees in which she had delighted, breathe more than pastoral sweetness."

केलें आहे त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें असाच अभिप्राय दर्शविला आहे. तेथें तो ह्मणतो, कीं एका भाषेंतील कवित्व दुसऱ्या भाषेंत नेण्याचा जो प्रयत्न करतो, त्याचा उद्योग एका कुपींतील अत्तर दुसऱ्या कुपींत जो घालतो त्याच्या सारखाच होय. ह्मणजे या अत्तरवाल्याची जशी फजीती होते तशीच भाषांतरकर्त्याची! बूच उघडल्याबरोबर जो वास जायला लागतो तो दुसऱ्या कुपीला बूच पडेतोंपर्यंत बहुधां सगळा निघून जातो; आणि याप्रमाणें दुसऱ्या कुपींत निवळ पाणी मात्र राहतें!

वरील गोष्टीच्या प्रत्ययार्थ एक सर्वप्रसिद्ध उदाहरण घेऊं. आपल्या देशचा आद्यकवि जसा वाल्मीकि तसा युरोपांतील कवींत होमर् होय हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. या कवीच्या 'इलियड्' नामक काव्याचीं नुसत्या इंग्रेजींतच दहा बारा भाषांतरें झालीं आहेत. पण मूळच्याच्या बरोबरीला कांहीं तरी उतरलीं अशीं एक दोनच आहेत. एक चापमनचें, आणि दुसरें त्याहून विशेष प्रख्यात असें पोपचें. अजून सर्वत्र प्रसिद्ध व सर्वांस प्रिय असें पोपचेंच भाषांतर होय. पण या पोपचीच हें भाषांतर उतरतांना काय त्रेधा उडाली ती त्यानेंच स्वतः वर्णिली आहे. या भाषांतरास हात घालण्यापूर्वींच या कवीची फार कीर्ति झाली होती; व तिच्या भरावरच येवढा बोजा त्यानें आपल्या शिरावर घेतला असावा यांत संशय नाहीं. यानें आपला बेत वर्तमानपत्रद्वारां चोहोंकडे सर्वांस जाहीर करून शेंकडो बडे लोकांच्या वर्गण्या घेऊन ठेवल्या; व असा संकल्प केला कीं, दररोज पन्नास ओळींप्रमाणें सुमारें वर्षा सव्वा वर्षांत सगळे चोवीस सर्ग संपवून टाकायाचे. हे सर्व बेत होईतोंपर्यंत ठीक होते; पण जेव्हां कां भाषांतराला त्यानें प्रत्यक्ष आरंभ केला, तेव्हां त्याला कळून आलें! त्यास चैन पडेनासें झालें, रात्रीं झोंप येऊं नये,—येऊन जाऊन भाषांतराचा धोशा! पुढें पुढें तर त्यास इतका त्रास झाला कीं, मला कोणी फाशीं देईल तर बरें असें त्यास होऊन गेलें! शेवटीं अशा विपत्तींत रखडतां रखडतां जें काम तो वर्षा सव्वा वर्षांत आटपून टाकणार होता तें पांच वर्षांत त्यास आटपतां आटपेना; व जर तो वर्गणीदारांचा पैसा घेऊन बसल्यामुळें अडकून न राहता तर हें ओझें तो केव्हांच झुगारूनही देता यांत संशय नाहीं! बरें इतकें करूनही भाषांतर तरी कितपत उतरलें आहे? ज्यास मूळ काव्याची ओळख नाहीं त्यास तें फार मौजेचें वाटतें खरें, पण बाकीच्यांच्या मतें त्याची योग्यता सुमाराचीच आहे. पोपच्या वेळेसच बेंटली नामेंकरून ग्रीक् व ल्याटिन् भाषांत अत्यंत निपुण असा एक महाविख्यात पंडित होता, त्यानें पोपच्या तोंडावरच त्यास सांगितलें, कीं तुमचें भाषांतर ह्मणजे मजेदारशी टुमदार कविता आहे खरी, पण तींत होमरचे गुण बिलकुल उतरले नाहींत![1] आणि आलीकडे तर मेकॉलेनें एके ठिकाणीं या भाषांतराची

१. वरील अभिप्राय बेंट्लीनें ज्या प्रसंगीं दिला तो अंमळ विशेषतः सांगण्यासारखा आहे. हा ग्रीक व ल्याटिन् पंडित पोपचा वर्गणीदार असून 'इलियडा'च्या भाषांतराचे जसजसे भाग तयार होत गेले तसतसे इतर वर्गणीदारांप्रमाणें यासही पोंचत गेले. एके समयीं असें झालें कीं, हे भाग नुकतेच

[ पुढें चालू ]

खुशाल निवळ थट्टाच केली आहे'. असो; तर कवितेचें भाषांतर करणें ह्मणजे येवढी जोखीम अंगावर घेणें आहे. स्वतंत्र निराळी कविता करणें हें एके परी बरें; कारण आपल्या कवित्वाचा आपणास अजमास असून ती आपणास साधेल त्या विषयावर हव्या तेवढ्या विस्तारानें करतां येते. पण परभाषेंतील कविता आपल्या भाषेंत आणायाची ह्मणजे बारीक मोठी पंचाईत ! मूळ ग्रंथाचें संधान राखून मग आपलें राखायाचें, व शिवाय आपणांत नसणाऱ्या त्यांतील कल्पना वगैरे आपल्या भाषेनें व्यक्त करायाच्या, शब्दसौष्ठवादि गुण साधायाचे, ह्मणजे केवळ अचाटच काम ! असो; तेव्हां असें अंगावर घ्यावयाचें तें मोठ्या विचारानेंच घेणारानें घेतलें पाहिजे.

येथवर कवितेचें भाषांतर यथास्थित रीतीनें उतरणें हें किती कठिण आहे हें सांगितलें, तरी अशा कठिण कामांतही कित्येकांस यश आलें तें सांगितलें पाहिजे. इटालियन् भाषेंत ड्यांटी नामक कवीचें जें प्रख्यात काव्य आहे त्याचें इंग्रेजी भाषांतर केरी नामेंकरून एका पंडितानें केलें आहे तें अशाचें एक नामांकित उदाहरण आहे. वर सांगितलेलें पोपचें 'इलियड्' तरी सर्वांसच केवळ अमान्य आहे असें नाहीं. जॉनसन्च्या मतें तर तसें भाषांतर आजपर्यंत झालेंच नाहीं; व बाकीच्या सर्वांहून त्याचीच जी आजपर्यंत प्रसिद्धि चालत आली आहे तीही तसेच गुण कांहीं असल्याखेरीज आली नाहीं हें खास आहे. असो; जॉनसन्नेंही जुवेनल् नामक ल्याटिन् कवीच्या धाटणीवर कांहीं उत्कृष्ट लहान काव्यें रचलीं आहेत. तसेंच पोपचें 'मेसाया' नांवाचें एक इंग्रेजी काव्य आहे. त्याचें जॉनसन् यानें ल्याटिन् भाषेंत असें शानदार भाषांतर केलें कीं, तें वाचून पोप यास फार विस्मय वाटून तो ह्मणाला कीं, हा नवा कवि सर्वांस लवकरच संदेहांत पाडील कीं, मूळचें काव्य कोणतें, व भाषांतर कोणतें, कोण जाणे ! आमच्या भाषेंत अशीं उदाहरणें देणें कठिण आहे. तरी 'पद्यरत्नावली'त जगन्नाथरायाच्या 'भामिनीविलासां'तील एका चुटक्याचें जें मराठी भाषांतर केलें आहे तें प्रस्तुत प्रसंगीं घेतलें असतां चालेल.

पण असें होणें विरळा. त्यांतून हीही दुसरी गोष्ट येथें ध्यानांत आणली पाहिजे, कीं इटालियन् अगर ल्याटिन् आणि इंग्लिश्, किंवा संस्कृत आणि मराठी या भाषा परस्पर पुष्कळ जवळ जवळ आहेत, यास्तव भाषांतराचें कठिणत्व यांत तितकें दिसून येणारें नव्हे. शिवाय वरील उदाहरणांत मूळ ग्रंथकाराचा आणि भाषांतर करणाराचा काळ, समजुती वगैरे गोष्टींतही ह्मणण्यासारखा भेद नाहीं. पण संस्कृत अगर चिनी ग्रंथांचें इंग्रेजींत भाषांतर, किंवा इंग्रेजी कवितेचें अगर नाटकांचें मराठींत भाषांतर ह्मणजे विलक्षणच काम आहे. यावर

---

चोहोंकडे वाटलें असतां पोपची व बेंट्लीची गांठ पडली. तेव्हां पोपनें सहजच विचारलें, 'कांहो तुमचीं बुकें तुह्मांस पोंचलीं ना ?' बेंटलीनें बळेंच न कळल्याचें सोंग करून परत पुसलें, 'अं, बुकें-कसलीं बुकें ?' पोपनें सांगितलें, 'माझ्या होमरचीं'—तेव्हां आठवलेंसें करून त्या गर्विष्ठ पंडितानें कुर्रेबाजपणानें उत्तर दिलें, 'पोप, तीस तुह्मी दुमदार मौजेची कविता हवी तर ह्मणा, तीस तुह्मांस मी होमर ह्मणूं देणार नाहीं !

1. *Addison and his writings.*

कोणी असा आक्षेप काढतील कीं, असें आहे तर मग इतकीं भाषांतरें झालीं आहेत व होत आहेत तीं कशीं ? पण या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. भाषांतरें झालीं आहेत खरीं; पण ज्यांच्याकरतां तीं तयार केलीं त्यांपैकीं कितीकांस तीं गोड लागतात ! माजी डायरेक्टर् हवार्डसाहेब यांच्या दुसऱ्या भागांत त्यांनीं ह्मटलें आहे कीं, ज्यांस संस्कृत समजतें त्यांसच मात्र कालिदासाचे ग्रंथ समजतात. हें त्यांचें ह्मणणें आह्मांस अगदीं यथार्थ वाटतें. फार काय, पण दोन तीन लोकोत्तर रसिकांखेरीज 'शाकुंतल' नाटकांत ज्यास गोडी लागली असा संस्कृत न जाणणारा युरोपियन् ग्रंथकार थोडाच सांपडेल ! मिल् साहेबांचा एकंदर झोंक मागें एकदां दर्शविला आहेच; व मेकॉले साहेबांनींही एखाद्या ठिकाणीं तरी कालिदासावर वगैरे यथास्थित झोड उडविली असतीच ही आमची पक्की खात्री आहे;पण श्लेजेल् , हुंबोल्ट् , गेटी, जोन्स्, विल्सन् अशांच्या पुढें त्यांचा दम निघाला नसावा असें वाटतें ! अशींच आणखीही एक दोन विरुद्ध मतें आमच्या वाचण्यांत आलीं आहेत. एक क्यांप्बेल् नामक प्रख्यात इंग्लिश् कवीचें, आणि दुसरें फॉरेस्टर् नामक एका नामांकित पाद्री ग्रंथकाराचें. पहिल्यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, हिंदु लोकांची कविता फार विलक्षण आहे. तींत मदनाचें धनुष्य हें फुलांचें, धनुष्याची दोरी भ्रमराची, बाण स्त्रियांचे कटाक्ष, साह्यकारी चंद्र वगैरे वर्णन असतें, त्याचा काय अर्थ असेल तो असो ! दुसऱ्या ग्रंथकारानें 'रामायणा'वर हत्यार धरलें आहे, आणि ह्मणतो—'यांत शुद्ध येथून तेथून सारखी बडबड आहे दुसरें बिलकुल कांहीं सांपडायाचें नाहीं' ! हा येवढ्या संस्कृतज्ञाचा अभिप्राय आमच्या ख्रिस्ती मित्रांस खूप मानवेल यांत संशय नाहीं; व कित्येकांनीं तो आपल्या हृत्पट्टिकेवर खोदूनही ठेवला असेल ! असो; तर जोन्स् , विल्सन् असे भाषांतर करणारे असतांही संस्कृत भाषांतरांची ही दशा; तर यावरून काय स्पष्ट होतें ? दुसरें, मागें एक दोन वेळां आलेले कैलासवासी कोल्हटकर यांचें 'अथेल्लो'चें भाषांतर घ्या. हें फार चांगलें साधलें आहे ह्मणून आह्मीं वर ह्मटलें आहे. पण हें चांगलें कोणाला ? जोन्स्चें, विल्सन्चें भाषांतर जसें संस्कृतज्ञांस चांगलें, तसें वरील भाषांतर ज्यांना इंग्रेजी समजतें आहे त्यांनाच चांगलें ! ज्यास नुसतें मराठी कळतें तो मोठा रसिक असला तरी तें त्याला किती गोड लागेल ? आह्मांस क्वचित वाटतें कीं, मुळींच लागणार नाहीं. याच्या स्पष्टीकरणार्थ दोन तीन उदाहरणें घेतों—

"अथेल्लो—सखे प्राणवल्लभे, तूं माझ्या अगोदर येथें पोंहचलीस हें पाहून मला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटून अतिशय आनंद झाला आहे. आजच्या वादळाचा शेवट जसा गोड झाला तसाच जर प्रत्येक वादळाचा होऊं लागला तर साक्षात् मृत्यु जागा होई येवढ्या सपाट्यानें कां बापडा वारा वाहीना, आणि ओलेंपस पर्वतायेवढ्या समुद्रांतील लाटांच्या शिखरावर कां तारूं जाऊन बसेना, आणि तें पुनः अस्मानापासून जितकी जमीन खोल तितकें कां तळीं जाईना ! आतां मरण जरी आलें तरी तें देखील मोठें सुखाचें; कारण, सांप्रत जीवात्म्यास जसें सुख झालें आहे तसें ह्मणजे पुढें कधीं होईल असा मला भरंवसा वाटत नाहीं !"

अंक २.

"यागो—महाराज, आपली बायको व्यभिचारिणी आहे अशी कल्पना एकदां मनु-

ध्याच्या मनांत आली, की मग त्याला चैन ह्मणून कधीं पडावयाचें नाहीं, याकरतां या गोष्टीविषयीं मात्र आपण फार जपा. कल्पनेसारखें द्वाड कोणी नाहीं. ती शुद्ध घाऱ्या डोळ्यांची राक्षसीण आहे. नाहीं ते संशय घेऊनच घोळीत बसते. मग त्यांतले कांहीं टाकून देते, पुन: आणखी घेते. हा खेळ चाललेला असतो...... " अंक ३ प्रवेश ३.

"अथेल्लो—अरे त्या गुलामाला चाळीस हजार देह पाहिजे होते, कारण मला सूड घेण्याकरितां एक देह काय अगदीं बापुडवाणा पासंगास देखील पुरावयाचा नाहीं. आतां मला पक्कें दिसूं लागलें कीं, हें सर्व खरें आहे—इकडे बघ, यागो, ही पहा मी आपली बट सारी प्रीति आकाशांत फुंकून दिली. आतां प्रीतीचें ह्मणून नांव देखील नको घ्यायला. साधेल तितका द्वेष उगविला पाहिजे. हे कृष्णवर्णा वैराग्या, आपल्या नरकदरींतून निघून तूं असा बाहेर ये. हे प्रेमा, तूं आपला मुगुट व माझ्या हृदयांत जें तुझें सिंहासन आहे तेंही त्या जुलमी द्वेषाच्या स्वाधीन कर. अंतःकरणा, आतां तुझे विषतुल्य तरंग चालून तूं उलून जा. कारण द्वेष हा काळसर्प आहे." किता.

वरील स्थळें ह्मटलीं ह्मणजे प्रस्तुत नाटकांतील अत्युत्कृष्टांपैकीं होत. पण हीं वाचून ज्यांस आनंद होईल असे मराठी वाचक किती सांपडतील ! हें नाटक असें जर रंगभूमीवर करून दाखविलें, तर लोकांना एक दोन अंकपर्यंत तरी दम निघेल कीं नाहीं कोण जाणे ! उघडच आहे. अगोदर ही तन्हाच मुळीं अगदीं निराळी;—विचार निराळे, कल्पना निराळ्या, वाक्यरचना निराळी; सगळेंच अपरिचित ! 'ओलिंपस पर्वत' ह्मणजे काय, 'घाऱ्या डोळ्यांची राक्षसीण' काय, आणि 'कृष्णवर्ण वैराग्य' तरी काय ? मूळ ग्रंथांत या शब्दांचा अर्थ जसा तेव्हांच समजला जातो व गोड दिसतो, तसें मराठींत काय होणार ? अशा ठिकाणीं भाषांतरकर्त्यास निरुपायास्तव हातच टेकणें येतें.

दुसरें उदाहरण पाहा—

"हाय हाय, काय हा अनर्थ ! कोण अंदाधुंदी ? शिव शिव ! हे स्वतंत्रते, कोणीकडे गेलीस ? पूर्वीं स्वतंत्रता हा शब्द हरएक रोमन् गृहस्थाच्या कानास कसा अमृतासारखा गोड लागत होता ! 'रोमन् गृहस्थ' या पदवीचा मान मागें केवढा होता ! पण हाय हाय ! आतां मातीपेक्षांही कमी मोलाची ती पदवी झाली ! अहो, सभासदहो, पण पुढें काय ! काय हा असा काळ आला काय ? अरे, काय रोमन् लोकांनीं नेमलेल्या क्षुल्लक सुभेदारानें रोमन् प्रांतांत इतालीच्या शेजारीं, रोमन् गृहस्थास विनाकारण बांधावें, कोरड्यांनीं मारावें, तापलेल्या लोखंडाच्या पत्र्यांनीं भाजून हाल करावे, आणि शेवटीं अपमान करून गुलामासारखें क्रुसावर खिळून जिवें मारावें ? आणि काय, त्या निरपराध मनुष्यानें दुःखानें कळवळून केलेला आक्रोश, पाहणाऱ्या लोकांच्या डोळ्यांस आलेले अश्रु, रोमन् लोकांचा प्रभाव, न्याय होऊन शिक्षा होण्याचें भय, ह्यांपैकीं एकाही गोष्टीनें किंवा एकंदर ह्या सर्व गोष्टींनीं ह्या राक्षसाच्या क्रूरतेचा व दुष्टपणाचा प्रतिबंध होऊं नये ? तो आपल्या संपत्तीच्या मदानें व बलानें सर्वांस तुच्छ मानून स्वातंत्र्याच्या मुळावर निर्भयपणें कुन्हाड घालीत असतां आह्मीं सर्वांनी उगीच बसावें असा समय आला काय ? "

अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह.

वरील उतारा सिसरोनें वेरिसच्या विरुद्ध जें भाषण केलें त्याच्या भाषांतरांतील होय हें आमच्या वाचकांस बहुधा माहीत असेलच. हें भाषण त्याच्या सर्व भाषणांत उत्तम गणिलें आहे, आणि यांतच सिसरोचा नामांकित सारालंकार[1] आहे. वरील भाषांतर कसें उतरलें आहे हेंही येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. असो; पण हा उतारा येथें देण्याचें कारण उघडच आहे कीं, त्यांत 'स्वतंत्रते' विषयीं जो उल्लेख आहे तो इंग्रेजी न कळणाऱ्या वाचकांस बिलकुल कळणार नाहीं; तसेंच 'रोमन् गृहस्थ' या शब्दांवर जो त्यांत रोख आहे तोही त्यांस मुळींच भासणार नाहीं. हे शब्द 'रोमन् सिटिझन्' याचें भाषांतर होत; पण 'भाषांतर' या शब्दाचा अर्थ जर असा घेतला कीं, मूळ शब्दांनीं जितका व जसा अर्थ मनांत बिंबतो तितका व तसा त्या दुसऱ्या शब्दांनीं बिंबावा तर वरील भाषांतर अगदीं व्यर्थ आहे यांत संशय नाहीं. असो; तर याप्रमाणें देशादेशाचे आचार, रीतभात, विचार, समजुती वगैरे अगदीं भिन्न असल्यामुळें तसला संबंध जेथें असतो तेथें भाषांतर होणें केवळ अशक्य होय. आणि असले संबंध काव्यांतून, नाटकांतून, कादंबऱ्यांतून वगैरे भरपूर असावयाचे; तेव्हां त्यांचीं भाषांतरें अन्यभाषांत—त्यांतून विशेषतः फार दूर देशच्या भाषांत होणें केवळ अशक्य होय.

वरील प्रतिपादनावरून सर्वांच्या ध्यानांत येईलच कीं, मिल्टन्, शेक्सपीयर, स्कॉट् यांचे ग्रंथ इंग्रेजींत फार रमणीय आहेत म्हणून मराठींत ते तसे होणार नाहींत. उलटे कंटाळवाणे होऊन हास्यास्पद मात्र होतील. ते वाचून व त्यांतील खुब्या नीट ध्यानांत ठेवून त्यांतील तुकडे उतरण्यासारख्या ज्या असतील त्या मात्र आपल्या भाषेंत आणल्या असतां साजणार आहे.

११. असो; याप्रमाणें तिन्ही सदरांचा विचार झाला. आतां भाषांतराच्या उत्कृष्टत्वाविषयीं अगदीं बरोबर असें एक प्रमाण सांगतों. तें हें कीं, ज्या ग्रंथाचें दुसऱ्या भाषेंत भाषांतर करावयाचें त्याचा कर्ता, तो ग्रंथ या दुसऱ्या भाषेंत आपण स्वतः कसा लिहिता हें मनांत आणावें; व त्यासारखें जेव्हां भाषांतर उतरेल तेव्हां तें अत्युत्तम झालें. हें प्रमाण बरोबर सांपडणें अर्थातच अशक्य आहे; तरी मूळ ग्रंथकाराची स्थितिरीति, स्वभाव, समजुती, विचारांचा झोंक, भाषापद्धति या सर्वांशीं दृढ परिचय झाला असतां भाषांतरांत त्याची घटणी बरीच उतरतां येईल यांत संदेह नाहीं.

१२. आतां सरते शेवटीं एका गोष्टीविषयीं लिहून हा लांबलचक निबंध पुरा करतों. प्रस्तुत मालेच्या पहिल्या अंकांत आरंभीं आम्हीं म्हटलें होतें कीं, इंग्रेजीचें मराठींत भाषांतर करतांना कित्येकांस मोठी मुष्कील पडून ते मराठी भाषेसच दोष लावतात कीं, तींत प्रौढ व खोल अर्थ व्यक्त करण्यास शब्दच नाहींत. आतां हें म्हणणें कितपत खरें आहे याविषयीं विचार करूं. यांत पहिल्यानें हें एक लक्षांत आणलें पाहिजेच कीं, वरील मत जे

---

१. या अलंकाराचें इंग्रेजी नांव climax आहे. एकाहून एक वरचढ अशी मालिका रचिली असतां वरील अलंकार होतो.

देतात त्यांपैकीं यासंबंधानें मत देण्यास खरोखर लायक असे किती. ही शंका मुळारंभीच येण्याचें कारण उघडच आहे कीं, हल्लीं मराठीचा अभ्यास ह्मणजे मोठ्या आस्थेनें होत असतो असें नाहीं. मुलांस लिहितां वाचतां येऊन व्याकरण, भूगोल वगैरे समजूं लागतांच इंग्रेजीचा अभ्यास जो सुरू होतो तो शेवटपर्यंत; मराठीकडे तादृश लक्ष देण्यास फावतच नाहीं. व तसें करण्याचें मोठेंसें अगत्यही कधीं त्यांस पडत नाहीं. तर अशी स्थिति असल्यावर मराठी भाषेची पोंच कोठपर्यंत आहे; प्रौढ, सरस, किंवा खोल अर्थ तिच्यानें कोठपर्यंत झेपला जाईल याची त्यांस वास्तविक कल्पना होणें अंमळ दुरमास्तच खरें ! पण जेथें प्रत्युक्तीचें भय नाहीं तेथें हवी तशी वल्गना चालली जाते; व हेंच समजून वरील अभिप्राय चोहोंकडे हवा तो देतो. हें मत शिक्षकांस व भाषांतरकारांस तर खासें पथ्यावरच पडतें. कारण इंग्रेजींतील अर्थ वर्गांत समजून देतांना किंवा एखाद्या अवघड ग्रंथाचें पैशाच्या अगर लौकिकाच्या लोभानें भाषांतर करण्याचें पतकरलें असतां, जेथें जड जाऊं लागेल, तेथें आपली आयती सबब तयार आहेच;—काय करावें हो ! आपली भाषा पडली फार भिकार, यापुढें इलाज नाहीं; नाहीं तर भाषांतर करण्यास काय कठिण आहे ! असो; तर याप्रमाणें वरील मत कांहीं अज्ञानास्तव व कांहीं अपमतलबीपणामुळें चोहोंकडे पसरलें आहे. आमची भाषा इतक्यांतच इंग्रेजीसारख्या भाषांशीं टक्कर मारील असें आह्मी ह्मणत नाहीं,—व तितक्या उजगारीस ती कधीं तरी पोंचेल कीं नाहीं याचा संशय आहे,—पण अर्थव्यंजकता वगैरे गुण तिच्यांत फारच नेमस्तपणाचे आहेत, किंवा मुळींच नाहींत, असें जे पुष्कळ मानतात त्यांची समजूत अगदीं गैर आहे. खरोखरी जर पाहिलें, तर मराठीस सोयी काय थोड्या आहेत? व्यावहारिक बोलण्याच्या चालण्याच्या वगैरे भाषेस आमची साधारण भाषा पुरे आहेच; शास्त्रीय भाषेस तर संस्कृताचें अत्युत्कृष्ट साहाय्य; दरबारी, लष्करी वगैरे भाषेस फारशी व आरबी यांची मदत आहेच. इंग्लिश लोकांचा इकडे संचार होण्यापूर्वीच आमचें राष्ट्र सर्व प्रकारें पूर्णावस्थेस येऊन पोंचलें असल्यामुळें कवितेची भाषा, नेहेमीच्या व्यवहाराची भाषा दरबारी भाषा, लष्करी भाषा, व्यापारी भाषा, न्यायमनसुब्याची भाषा, धर्मोपदेशाची भाषा, कलाकौशल्यांची भाषा, इत्यादि सर्व येथें केव्हांच ठरून गेल्या होत्या. कोणत्याही ठिकाणीं ह्मणजे आतां नवे शब्द शोधून काढले पाहिजेत असें नव्हतें. एक मात्र मोठी उणीव होती खरी. ती ही कीं, गद्यग्रंथांचा मुळींच प्रघात नसल्यामुळें तो भाषेचा प्रकार इकडे बिलकुल नव्हता; व भाषेकडेही शास्त्रदृष्ट्या कोणीं लक्ष दिलें नव्हतें. ह्मणजे व्याकरण कोश वगैरेंची रचना संस्कृतांत जशी आहे तसें इकडे मुळींच कधीं झालें नाहीं.[१] ही उणीव प्रस्तुत सरकारानें आपल्या उदार आश्रयानें भरून टाकली ही मोठी गोष्ट केली खरी; कारण तिच्याशिवाय आमच्या भाषेच्या पूर्वीच्या अभिवृद्धीचा कांहींच उपयोग होताना. पण गद्यग्रंथांची पद्धति आतां चांगली बसून गेल्यामुळें लोकशिक्षणाचा उत्कृष्ट मार्ग तींतून निष्पन्न झाला,

१. आह्मांस एका मित्राच्या सांगण्यावरून कळलें आहे कीं, कानडी भाषेंत संस्कृतासारखीं व्याकरणें व कोश रचलेले आहेत. हिंदुस्थानांतील विद्यमान भाषांत असा प्रकार दुसरीकडे कोठेंही असेलसा वाटत नाहीं.

व भाषेच्या अभिवृद्धीसही ती पुष्कळ कारणभूत झाली. असो; तर येवढ्या स्थितीस जी भाषा अगोदरच येऊन पोंचली होती ती केवळ रानटी अवस्थेंत होती असें ह्मणतां येणार नाहीं. पण आमचे लोक स्वतःस अज्ञान व रानटी ह्मणून घेण्यास जसे अगदीं खुष आहेत, तद्वतच भाषेचीही मानहानि केल्याचें ते बिलकुल दुःख मानीत नाहींत. मराठी भाषेंत अद्याप ग्रंथसंख्या फार झाली नाहीं. तरी गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें, इतिहास, शास्त्रीय ग्रंथ असे प्रकार बरेच झाले आहेत; व कोण्या ग्रंथकाराची लेखणी अमुक विषयावर लिहितांना भाषेच्या कोतेपणामुळें ह्मणजे थांबली अशी हाकाक अजून कोणाच्या कानीं आली नाहीं! असो; तेव्हां वरील आक्षेप केवळ व्यर्थ होय असें आह्मांस वाटतें.

तरी आमची भाषा इतक्यांतच पूर्णतेच्या शिखरास पोंचली आहे, किंवा कोणत्याही भाषेंतील कोणताही अर्थ मराठी भाषेंत चांगला हवा तसा नियमानें व्यक्त करतां येईलच, असा व्यर्थ अभिमान तिजबद्दल आह्मी वहात नाहीं. आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, ती सध्यांही बऱ्याच पक्क दशेस आली असून इंग्लिश वगैरे भाषा जशा क्रमाक्रमानें वाढत गेल्या तशी वाढत जाण्यास तीस पुष्कळ हवी तशी सोय आहे. हीमुळें कालगत्या हवा तो अर्थ त्या भाषेनें लिहितां व बोलतां येईल. आतां येवढें खरें आहे कीं, जे प्रकार इकडे कधींच नव्हते त्यांच्यासंबंधाचे शब्द आमच्या भाषेंत मिळणार नाहींत. उदाहरणार्थ आलीकडील यंत्रांचे वाचक शब्द, किंवा रसायनादि ज्या शास्त्रांचा आलीकडे प्रादुर्भाव झाला त्यांची परिभाषा, हीं नवींच बनवावीं लागतात. तसेंच 'लोकसत्ताक राज्य', 'सार्वजनिक सभा,' 'विद्यालय,' 'पुस्तकालय,' 'देखावा,' 'देशाभिमानी,' 'मुद्रणकला,' 'बेअब्रूची फिर्याद,' वगैरेही सर्व नव्याच अर्थाचे वाचक शब्द मराठींत आणावे लागले. यांत आमच्या भाषेची कमताई आहे खरी; पण हीबद्दल मराठी भाषेस दोष कोण लावील? ज्या कल्पना लोकांच्या कधीं मनांतच आल्या नाहींत त्यांचे वाचक शब्द किंवा वाक्यें त्या भाषेंत असावीं कशीं? कांहीं दिवसांपूर्वी आमच्या एका मित्रानें आह्मांस एक इंग्रेजी वाक्य देऊन त्याचें भाषांतर करण्यास सांगितलें. तें वाक्य हें—'He sympathises with me fully in this movement' याचें भाषांतर आह्मीं कांहीं तरी सरासरी केलें; पण तें आमच्याही मनास आलें नाहीं, व त्याच्याही आलें नाहीं. पण यांत दोष कोणाचा? अर्थातच कोणाचाच नाहीं. 'Hearth,' 'Oak,' 'Skating,' 'Aurora Borealis,' 'Swallow,' वगैरे शब्दांस मराठींत प्रतिशब्द जसें सांपडणें नाहींत, तसेंच 'Parliament,' 'Limited Monarchy,' 'Whig,' 'Tory,' 'Representation,' 'Popular Movement,' वगैरेंस तरी कसे सांपडतील? बरें, अशानें मराठीवर दरिद्रतेचें दूषण येईल काय? तिकडे कांहीं जिन्नस होतात ते इकडे होत नाहींत ह्मणून आमचा देश जसा भिकारी होत नाहीं त्याप्रमाणेंच तिकडील कांहीं कल्पना व विचार इकडच्या भाषांस मुळींच माहीत नसले ह्मणून या भिकारच ठरल्या असेंही पण होत नाहीं. असो; तर अशा आक्षेपांत कांहीं जीव नाहीं; व ज्यांस आपल्या भाषेचा

अजून अभिमान वाटत असेल व तिचें हित करण्याची बुद्धि असेल त्यांनीं असल्या पोकळ पांडित्यास अगदीं जुमानूं नये. शिवाय आमच्या वरील मित्रांनींही ही मोठी गोष्ट ध्यानांत वागविली पाहिजे कीं, भाषा जी प्रगल्भ दशेस चढते ती केवळ सृष्टिनियमानुसारानेंच चढते असें नाहीं; ह्मणजे प्राणी किंवा वनस्पति यांची वाढ जशी नेमानें व्हावयाचीच, तशी कांहीं भाषेची गोष्ट नाहीं. तिची अभिवृद्धि मुख्यत: मनुष्यप्रयत्नांनींच आहे. तर ग्रंथकारांनीं भाषेच्या भिकारपणाचें रडगाणें गाणें ह्मणजे त्यांसच पुष्कळ अंशीं लज्जास्पद आहे. याखेरीज दुसरी उत्साह येण्यासारखीही ही गोष्ट आहे कीं, भाषा भिकार असतां तींत चांगली ग्रंथ-रचना करण्यांत जितकें भूषण आहे, तितकें ती अगोदरच चांगली असतां करण्यांत मुळींच नाहीं. यास्तव आमच्या भाषेच्या सध्यांच्या वाईट मानलेल्या स्थितींतही जे ग्रंथकार परिश्रम करून मनोरम ग्रंथ रचतील त्यांची वाहवा आलीकडील मोठे नामांकित ह्मणून मोडले जाणारे जे इंग्रेज ग्रंथकार त्यांच्याहूनही अधिक होईल हें उघडच आहे!

## निबंधमाला:—वर्ष १ लें.

या पुस्तकाचें आज पहिलें वर्ष संपलें. यास्तव या प्रसंगीं कांहीं विचार प्रदर्शित केल्यावांचून राहवत नाहीं. पहिल्यानें संपूर्ण विश्वाचें सूत्र चालवणारा जो परमेश्वर, ज्याच्या कृपेशिवाय सर्व मनुष्यप्रयत्न व्यर्थ होत, त्यास आह्मी मनोभावानें कृतज्ञतापूर्वक नमन करतों; आणि आमच्या कृत्यास यश येण्याकरतां त्याचा प्रसाद मागतों. संपत आलेल्या वर्षाच्या आरंभीं जेव्हां सदरहू मासिक पुस्तक काढण्याचें आह्मीं मनांत आणलें, तेव्हां येवढें काम कसें निभेल, त्यास लोकांचा आश्रय कसा मिळेल, वगैरे गोष्टी वरचेवर मनांत येऊन आह्मांस मोठा धाक वाटत होता. पण जगदीशाच्या सत्तेनें त्याचा बराच निभाव लागला हें पाहून आह्मांस जो संतोष वाटतो आहे त्याचा येथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. असो; या ठिकाणीं प्रस्तुत पुस्तकास ज्यांनीं आपण होऊन आपला आश्रय दिला त्यांचेही आभार आह्मी मन:पूर्वक मानतों.

पुस्तककर्त्यास, किंबहुना कोणत्याही मनुष्यास, आपल्या स्वतःविषयीं बोलणें ह्मणजे मोठी पंचाईत असते. कारण तसें करण्याचें बीज अहंकारच होय असें सामान्यतः लोक समजतात. तरी तसें केल्यावांचून परिणाम नाहीं असे पुष्कळ वेळां मनुष्यास प्रसंग येतात. तसें तो न करील तर त्याच्याविषयीं लोकांचे कधीं कधीं जे भलतेच ग्रह झालेले असतात ते तसेच राहून ते दिवसेंदिवस अधिकाधिकच दृढ होत जातील. यास्तव प्रस्तुत मालेच्या पांचव्या अंकाच्या शेवटीं आह्मीं स्वत:विषयीं कांहीं मजकूर लिहिला होता, तसाच आतां वर्षाच्या अखेरच्या या संधीस कांहीं लिहिणें अवश्य वाटून तो लिहितों.

जगाची रीत ज्यानें यत्किंचितही पाहिली असेल त्यास अर्थातच कळून येणारें आहे कीं, मनुष्यामनुष्यांत, रूप, स्वर, बोलण्याचालण्याची ढब वगैरे गोष्टींत जसा फरक नेहेमी

दृष्टीस पडतोच त्याचप्रमाणें स्वभाव, रुचि, समजूत यांतही नेहेमी तो असायाचाच. यास्तव एका मनुष्यास जी गोष्ट चांगली वाटते तीच दुसऱ्यास त्याच्या विपरीत वाटल्यास कांहीं नवल नाहीं. याप्रमाणेंच सगळ्यांचें ज्ञानही वस्तुगत्याच सारखें नसल्यामुळें लोकांच्या समजुतींतही परस्पर फेर पडल्यास मोठी विलक्षण गोष्ट झाली असें ह्मणतां येत नाहीं. हा प्रकार जोंपर्यंत मनुष्याचें मन सध्यां आहे असेंच राहील तोंपर्यंत अर्थातच चालणारा आहे. यास्तव सुज्ञ जे असतात त्यांस दुसऱ्यांच्या मतविरोधाचें कधीं आश्चर्य वाटत नाहीं व रागही येत नाहीं; कां कीं, मानवी स्वभावाचा हा धर्मच होय असें समजुन ते आपला ज्या विषयावर मतभेद पडत असेल त्याची वाटाघाट करण्याकरतां एकत्र जमतात, आणि सत्यैकनिष्ठ बुद्धीनें व शान्त मनानें खरें खोटें निवडतात. जेथें असा साफ निर्णय झाला तेथें जो हटतो तो आपल्या पराभवाचें किमपि दुःख न मानतां सत्याचा लाभ झाला यावरच नजर देऊन आपणास जिंकणाराचीही प्रशंसाच करतो; असो तर शहाण्या व सालस लोकांची चाल अशी आहे. पण ही जगांत कितपतशी दृष्टीस पडते याचा शोध जो करूं जाईल त्याची खात्री होऊन जाईल कीं, तिची अपेक्षा व अभाव हीं परस्परांशीं सम आहेत. ह्मणजे जगाचें कल्याण होण्यास तिची अवश्यकता जेवढी मोठी आहे तितकाच मोठा तिचा जगांत अभावही पण आहे. ही मनाची शांतवृत्ति व सत्यप्रीति यांचें मान विद्वत्तेवर नाहीं हें तर काय, पण पुष्कळ ठिकाणीं जितकी जितकी विद्वत्ता अधिक तितका तितका वरच्या उलट गुणांचा मात्र पगडा मनुष्यावर झालेला दृष्टीस पडतो. अशा विषयींचीं उदाहरणें मागील काळचीं व हल्लींच्या काळचींही पुष्कळ देतां येतील. असो; पण त्यांशीं आह्मांला गरज नाहीं. त्याच्या विरुद्ध मात्र एक उत्कृष्ट उदाहरण आमच्या वाचकांच्या प्रत्ययार्थ आह्मी येथें सांगतों. मेकॉले व मिल्ल् साहेब यांची ओळख आमचे वाचक विसरले नसतीलच. या दोघां साहेबांचा सुमारें चाळीस वर्षांमागें मोठा वाद लागला होता; आणि खरोखर पाहतां हिंदुस्थानाचा द्वेष किंवा तिरस्कार असे कांहीं थोडे विषय खेरीज करून या दोघांचा ज्यांवर मिलाफ व्हावा असे थोडेच विषय होते! असो; हा वाद मिल्लच्या एका राज्यप्रकरणी निबंधावरून उत्पन्न झाला. यांत मेकॉले साहेबांनीं आपल्या प्रतिपक्षाची आपल्या नेहेमीच्या चालीप्रमाणें[१] वाजवीपेक्षां फाजील शोभा अगोदर खूपच केली; पण पुढें त्यांचें त्यांसच वाईट वाटून येवढ्या थोर ग्रंथकाराशीं आपण फार गैर रीतीनें वागलों असें त्यांनीं कबूल केलें. त्यांतून प्रकृत प्रसंगीं विशेष सांगण्यासारखें काय कीं, पुढें लवकरच दोघांचा जो परस्पर स्नेह जमला तो आमरणान्त राहिला! तर याचें नांव खरा थोरपणा व सौजन्य! हें सामान्यतः सर्व मनुष्यांस, व

१. मेकॉले साहेबांवर जी आह्मीं टीका केली तिला एक्या अक्षरानेंही उत्तर देण्याची पंचाईत न करतां आमच्या ख्रिस्ती बंधूंनीं आह्मांवर नुसती शिव्यांची मात्र फेर झाडली! पण ते एखाद्या साधारण प्रतीच्या विद्वान् साहेबास—कारण हिंदूचें तसें वजन पडायाचें नाहीं—जर पुसतील तर त्यांस कळून येईल कीं, मेकॉले साहेबांचें जें त्यांस परब्रह्म येवढें वाटतें तसें कोणीही सध्यां मानीत नाहीं! कित्येकांनीं त्यांची योग्यता तर फारच थोडी धरली आहे. असो. एकंदरींत आमच्या वरील साहेबांची फुगवून लिहिण्याची खोड फार खरी. त्यांच्या प्रसिद्ध निबंधांतच कित्येक ठिकाणीं त्यांनीं स्वतःच मूळचा मजकूर फिरवून घातलेला आढळतो.

विशेषत: जे साधारण लोकांपेक्षां आपण विशेष ज्ञानसंपन्न ह्मणून मिरवतात अशा वर्तमानपत्रकर्त्यांस, पुस्तककर्त्यांस व ग्रंथकारांस तर फारच उचित होय!

वरील लेखाचा रोख आमच्या मर्मज्ञ वाचकांच्या ध्यानांत आला असेलच. तो आह्मीही येथें विशेष स्पष्टतेनें सांगतों. आज एक वर्षभर आमच्या पुस्तकांतून जे विचार प्रदर्शित होत गेले ते सर्व लोकांस सारखे मान्य झाले नाहींत. कित्येकांस तर ते अत्यंत दुःसह होऊन त्यांचें आह्मीं शत्रुत्व मात्र संपादन केलें हें आह्मी पक्कें जाणतों. तरी ज्याअर्थी हें पुस्तक सुरू करण्याचा उद्देश अर्थप्राप्ति किंवा कोणाचें आर्जव करणें हा बिलकुल नव्हता, त्याअर्थी वरील दोन्ही गोष्टींची आह्मी काडीइतकीही पर्वा करीत नाहीं. आजपर्यंत आमच्या देशाच्या हरएक गोष्टींविषयीं—आमच्या विद्येविषयीं, स्वभावाविषयीं, आचारांविषयीं, धर्माविषयीं, भाषांविषयीं, कवितेविषयीं वगैरे ज्या लोकांच्या समजुती ठरून गेल्या होत्या त्यांपैकीं कित्येक आह्मीं निःशंकपणें खोडून टाकून खोट्या ठरवल्या आहेत. तरी असें करतांना आह्मीं कोणास विनाकारण दुखविलें आहे, किंवा कोणाची खरी योग्यता न ओळखतां मानहानि केली आहे असें आह्मांस वाटत नाहीं. तसेंच लोकांच्या समजुतींच्या विरुद्ध उगीच डौलानें केवळ लिहायाचें असेंही आमच्या हातून घडल्याचें आह्मांस माहीत नाहीं. तर आमच्या बुद्धीनें जें जें आह्मांस खरें भासलें व ज्याच्या सत्यत्वाविषयीं आह्मांस स्वतः संशय उरला नाहीं, तें तें कितीही लोकमतविरुद्ध असलें तरी आमच्या सुज्ञ व निःपक्षपात वाचकांस आह्मीं प्रमाणासहित सादर केलें. तसेंच पहिल्या दोन अंकांच्या शेवटीं ज्या आह्मीं कांहीं सूचना केल्या होत्या त्यांप्रमाणें आमच्या आक्षेपकांस आह्मीं उत्तरें देऊन योग्य वाटला तेवढा त्यांचा मजकूर ग्रहण केला.

सदरहू पुस्तकाविषयीं कितीकांच्या ज्या कल्पना झाल्या आहेत त्यांचें आह्मांस मोठें नवल वाटतें. या पुस्तकाचा उद्देश ज्यास त्यास शिव्या द्याव्या, ज्याची त्याची फजिती करावी, येवढाच पुष्कळांच्या मतें आहे. इंग्लिश लोक, नवीन विद्वान्, मोठमोठे ग्रंथकार वगैरेंची मानहानि करून आपली प्रतिष्ठा मिरवावी इतकाच या लिहिणाराचा उद्देश आहे असें कित्येकांचें मत आह्मांस समजलें आहे. आमचे ख्रिस्ती बंधु 'ज्ञानोदय' महाराज यांनीं[1] तर आह्मांवर मोठाच कडाका उठवून राजद्रोहही ते आह्मांवर शाबीत करूं पाहत आहेत. या सर्व गोष्टींवरून वरील लोकांस मराठी फार उत्कृष्ट समजतें, ग्रंथ वाचणें तो ते फार लक्ष लावून वाचतात, व त्यांची विचारशक्तिही मोठीच जाज्वल्य असावी, याविषयीं आह्मांस बिलकुल संशय उरला नाहीं! इंग्रेज लोक ह्मणजे केवळ देवमाणसें, हिंदु ह्मणजे कृमिकीटकां-

---

१. 'ज्ञानोदय' महाराजांस आमच्या 'पुस्तकरूप पिढ्या'नें काय शिकवावें ह्मणा; पण पोरपणाचा अनिवारपणा कांहीं अधिक आहे! आमचें मूळचें वाक्य 'सैन्यासहवर्तमान धांवणारा परवांचा शूर' हें बरोबर न वाटून आमच्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध बंधूनें त्याच्या जागीं 'खरें पाहिलें असतां चुकांच्या(?) देत पळणारा' असा शोध घातला. याप्रमाणें मूळ वाक्याचें राजद्रोहार्थकत्व मोडून त्याच्या अंगीं खरी राजनिष्ठा आमच्या बंधूनें आणली. ही त्याची आपल्या वाकड्या मार्वंडाविषयीं म मत

[ पुढें चालू ]

हून नीच; जेवढें जेवढें ह्मणून उत्कृष्ट, मनानें कल्पितां येईल किंवा भाषेनें व्यक्त करतां येईल तेवढ्याचें आगर युरोपखंड, व त्यांतून इंग्लंड देश, वरच्याच्या अगदीं जें जें उलट त्याची भरपूर भरती बरीक बिचाऱ्या एशियाखंडांत, व विशेषत: आमच्या हतभाग्य हिंदुस्थानांत; खरा धर्म ह्मटला ह्मणजे सीनिया* पर्वताच्या शिखरावर विजा चमकताहेत, मेघ गडगडताहेत, अशा थाटांत जो प्रगट झाला तो, निवळ थोतांड ह्मटलं ह्मणजे ब्रह्मदेवाच्या चारी मुखांतून जो निघाला तो; विद्वत्त्व, शूरत्व, सुशीलत्व वगैरे सर्व गोऱ्या कातड्याकडे, काळ्याच्या बिचाऱ्याच्या माथीं मात्र मूर्खत्व, भीरुत्व, क्रूरत्व हें ब्रह्मदेवानेंच जन्मकाळीं बांधलेलें;— फार तर काय, पण 'ज्ञानोदय' महाराज ' बुद्धिमांद्यता,' 'सौजन्यता' असे, पाणिनीस एकीकडे गुंडाळून ठेवणारे प्रयोग करूनही अत्यंत 'परिपक्व पंडित,' आणि 'निबंधमाले'चा कर्ता बिचारा 'अपक्व,' 'अर्धकच्चा' ! असो; भाग्य आमच्या देशाचें !—तर अशीं उत्कृष्ट मतें ज्यांचीं आज वीज पंचवीस वर्षे कायम बनून गेलीं त्यांस त्यांचें अकस्मात् झालेलें खंडन कसें पाहवेल ! मेकॉले, मिल्ल् अशा जगद्विख्यात ग्रंथकारांवरही जो 'आपली क्षुद्र लेखणी उचलतो' तो महा मूर्ख कसा नव्हे ! इंग्रेज लोकांनीं त्याच्या देशावर जन्मोजन्मींही न फिटणारे जे असंख्य उपकार करून ठेवले आहेत ते न जाणतां जो प्रत्येक इंग्रजास प्रतिख्रिस्त मानीत नाहीं; ख्रिस्ती धर्म खरा, हिंदु धर्म खोटा अशी ज्याची अजून खात्री झाली नाहीं; पाठीवर

---

पाहून आह्मांस खरोखर मोठा संतोष वाटतो. तरी पुढील वाक्यांकडे आमच्या प्रिय बंधूंनीं आपली ज्ञानदृष्टि अंमळ फेंकावी अशी त्यांस विनंति आहे—

"Tantia Topee fought to the last... ... ... This able general, *whose movements Russell's graphic pen compared to forked lightening*, and who led our troops so many weary marches—crossing the Nerbudda to and fro, passing between our columns, behind them, and before them, traversing mountains, ravines, valleys, swamps, and marching for weeks together thirty and forty miles a day—was a comely well-made Brahmin fifty years of age, with a large finely-shaped head, piercing black eyes, sharply arched grey eyebrows, and an abundant head of grey hair with whiskers, beard, and moustache of the same colour. When apprehended and heavily ironed, he was quite calm—said he wanted no trial, and expected nothing but death. Only he wished that it might be speedy, and that his captive family might not be made to suffer on his account. He was tried by court-martial and hanged."—Martin's British India—pp. 80–1.

वरील मजकूर वाचून आमच्या राजनिष्ठ बंधूंची खात्री होईल कीं, निबंधमालाकर्त्यांपूर्वीं पुष्कळांनीं ' महादुष्ट बंडवाल्याची प्रशंसा ' केली आहे.

* Mt. Sinai, यालाच मुसा, (Jebel Mlusa) 'मोसेस्'चा पर्वत (Mt. of Moses) ' होरेब् ' (Horeb) अशीं नांवें आहेत. उंची सुमारें सात हजार चारशें फूट (७३६३). आकाब्बा (Akabah) व सुएझ् (Suez) या आखातांच्या दरम्यान हा पर्वत असून येथें Moses ला साक्षात्कार झाला व येशू ख्रिस्ताचें सुप्रसिद्ध प्रवचन झालें. (Surmon of the Mt.)

" सम्पादक "

घाव घेऊन तकढ (तडक?) पळालेला इंग्रजी सोजरही आमच्या बाजीरावापेक्षां,रणजितासिंगापेक्षां शतपट अधिक शूर असें ज्यास भासत नाहीं; ज्याची पूर्वजप्रीति इंग्रेजी ज्ञानानें नष्ट होत नाहीं; महाराणीचे ठायींच्या राजनिष्ठेचा आणि आपल्या देशच्या शूरांच्या वर्णनाचा केवढा जबरदस्त विरोध आहे तो ज्यास दिसत नाहीं;—तो केवढा नष्ट, केवढा कृतघ्न तरी! असो; एकंदरींत 'ज्ञानोदय' प्रभृति आमच्या प्रतिपक्ष्यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, जेव्हां 'सेरीज् ऑफ् लेसन्स्' 'मरेज् इंडिया' हीं पुस्तकें ह्मणजे इंग्रेजी विद्येचें शिखर होतीं; म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरली ह्मणजे त्या उतरणारास आज मी काय ब्रह्मदेवच झालों असें वाटावें; रस्त्यानें जाणाऱ्या एखाद्या सोजरासही बडासाहेब समजून लोक कौतुकानें त्यास पाहण्यास धांवत; दयाळू इंग्रेज सरकार ह्मणजे रयतेचे केवळ मायबाप,—नागपूरवाल्यास, लखनौवाल्यास लॉर्ड डालहौसी साहेबांनीं जें नागवलें तें केवळ आमच्या हिताकरितां,—परवां मेजवान्यांवर जो कोणाच्या कधीं स्वप्नींही न आलेला कर आमच्या सरकारानें बसविला होता तो आह्मांस मितभोजी, मितव्ययी करण्याकरतां,—आह्मांस शहाणे करून व आमच्या देशाचें आधिपत्य देऊन इंग्रेज लोक आह्मांस सरते शेवटीं रामराम करून परत निजधामास जाणार; अशी बोंडल्यानें दूध पिण्याची स्थिति मागेंच निघून गेली! त्या काळांत व सध्यांच्यांत विद्येच्या, धर्माच्या, सरकाराच्या वगैरेसंबंधानें पुष्कळच फेरफार झाला आहे. तेव्हां जेथें म्याट्रिक्युलेशन होती तेथें सध्यां बी. ए. ची परीक्षा झाली आहे. त्या वेळेस जीं अत्युत्कृष्ट ह्मणून पत्रें चालत असत तितपत आतां अगदीं सामान्य प्रतीचीं चालतात; त्या वेळेस जे ज्ञानकिरण शिखराशिखरांवर असत ते आतां अगदीं पायथ्यापर्यंत पोंचले आहेत. धर्माच्या संबंधानें तरी तसेंच. त्या वेळेसही इंग्रेजी ज्ञानानें हिंदुधर्मास हळु हळु धक्का पोंचूं लागला होता खरा; पण मिशनरी लोकांच्या इच्छेप्रमाणें ख्रिस्ती धर्मास त्या धक्क्याच्या योगानें बळकटी आली असें मात्र घडलें नाहीं. जी बुद्धीची प्रखरता हिंदु धर्मास अपायकारक झाली तीच ख्रिस्ती धर्मासही तितकीच झाली. उघडच आहे. तुकाराम देहासकट वैकुंठास गेला ही गोष्ट खोटी ठरवून जर तोच ख्रिस्ताविषयीं तीच गोष्ट सांगूं लागला, तर कोण ऐकेल! शेषाच्या मस्तकावर पृथ्वी आहे हें धडधडीत खोटें आहे ह्मणून ज्यानें टाकून दिलें तो किड्यांनीं खाऊन टाकलेलें शरीर पुनरुत्थानाच्या दिवशीं पुनः उठेल हें कसें खरें मानील! असो; सरकारच्या संबंधानेंही लोकांच्या समजुतींत किती फेर पडला आहे तो सर्वांस माहीत आहेच. तर याप्रमाणें गेल्या वीस पंचवीस वर्षांत जें स्थित्यंतर झालें आहे तें आमच्या आक्षेपकांनीं पूर्णपणें लक्षांत आणावें. मेकॉले, मिल्ल वगैरेंच्या तोंडून जें जें निघेल तें ब्रह्मवाक्य, बैबल ह्मणजे सर्व जगास शिरसावंद्य, इंग्रेज लोक ह्मणजे सारे देवाचे अवतार, मिशनरी ह्मणजे केवळ ज्ञानसागर व सत्यमूर्ति, इत्यादि भावना जर आमच्या लोकांच्या मनांत पूर्ण बिंबवायाच्या होत्या तर त्यास एक मात्र खासा उपाय होता. तो अर्थातच लोकशिक्षणाची बंदी. लोकांस जर पूर्वप्रमाणें अज्ञान ठेवलें असतें, किंवा 'सेरीज् ऑफ् लेसन्स्' येथवरच त्यांची गति असें जर केलें असतें, तर ख्रिस्ती धर्मावर ज्यांचा पूर्ण निर्धार, महाराणी साहेबांचे ठायीं ज्यांची अपार राजनिष्ठा, आणि सगळ्या इंग्रेजी ग्रंथ-

कारांचे पुरे निःसीम भक्त, अशा आमच्या 'ज्ञानोदय' महाराजांचा क्रोधाग्नि येवढा भडकला नसता ! पण आतां काय ! मसलत पाहिल्यानेंच चुकली ती चुकली !¹

असो; हा मजकूर आमच्या पूर्वसंकल्पापेक्षां पुष्कळ वाढला. पण आमच्या पुस्तकाचे खरे उद्देश आमच्या वाचकांस पुनः एकवार कळवावे, व त्यांविषयीं भलभलते ग्रह जे कित्येकांचे झाले आहेत ते काढण्याचा यत्न करावा, या हेतूनें येवढा विस्तार करावा लागला. आतां सरते शेवटीं पुनः थोडक्यांत एकंदर सारांश सांगतों कीं, इंग्रेज सरकारानें आमचें हित किती केलें आहे; त्या लोकांची विद्वत्ता, नीति, थोरपणा, सौजन्य हें केवढें आहे; मेकॉलेसारख्या महाविख्यात ग्रंथकारांचे एकंदर जगावर व विशेषतः आमच्या देशावर केवढे उपकार आहेत; वगैरे सर्व आह्मी पूर्णपणें जाणत आहों. फार तर काय, पण ख्रिस्ती धर्मात, तद्धर्मी लोकांत, व त्यांच्या पुस्तकांत ज्या कित्येक चांगल्या गोष्टी आहेत त्यांसही आह्मी मनापासून मान देतों. व अशाविषयींचे उल्लेख आमच्या पुस्तकांत जागोजाग सांपडतील. पण इंग्रेज सरकार शहाणें ह्मणून पूर्वीचें सर्व प्रकारें वेडगळ, इंग्रेज लोक विद्वान्, शूर, सुशील, ह्मणून आमचे लोक मूर्ख, भित्रे, व दुःशील; इंग्रेजांची कविता, शास्त्रें, कला वगैरे उत्कृष्ट, ह्मणून आमचीं सर्व अर्थातच त्याच्या उलट; ख्रिस्ती धर्मात कांहीं चांगल्या गोष्टी आहेत ह्मणून आमचा अत्यंत नीच; हल्लींच्या सरकारानें पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या आहेत ह्मणून तें जें जें करील तें वंद्यच; मेकॉले वगैरे ग्रंथकारांची विद्वत्ता मोठी, ह्मणून त्यांचे ग्रंथ सर्वथा निर्दोष; असें मात्र आह्मी कधीं कबूल करणार नाहीं, आणि ज्याला लेशमात्र ह्मणून ज्ञान आहे तोही कधीं करणार नाही. या जगांत पूर्णावस्थेस पावलेलें कांहींच नाहीं, सर्वांत कांहींना कांहीं तरी दोष आहेतच. यास्तव केवळ स्तुति किंवा केवळ निंदा हीं कशासच शोभत नाहींत. इंग्रेज जसे देव नव्हेत, तसेंच आह्मीही पशु किंवा राक्षस नाहीं. दोघांतही गुणदोष आहेतच आहेत; आणि त्यांविषयीं वाटाघाट करण्याचा अधिकार इंग्रेज ग्रंथकारांस जसा आहे तसाच तो आह्मांसही पण आहे. तो चालवणें ही आमच्या 'ज्ञानोदय' कर्त्यांच्या मतें कृतघ्नता व राजद्रोहबुद्धि होय; पण आह्मांस तसें वाटत नाहीं. आह्मांस तर असें वाटतें कीं, आमचे खरे गुण व इंग्रेजांचे खरे दोष प्रकट केले असतां ते आमच्या रेवरेंड बंधूंस व इतर हेकेखोर लोकांस न आवडोत, पण ज्यांस सत्यप्रीति आहे अशा कित्येक थोर इंग्रेजांस ते फार पसंत पडतील; व द्रोणाचार्यांनें अर्जुनाचे प्रणामबाण ( येथें आमच्या पाद्री—बंधूंची क्षमाच मागितली पाहिजे ! ) जसे प्रेमानें ग्रहण केले, तसेंच आमचे

---

१. हा अनर्थ चाळीस वर्षांपूर्वीच मेकॉलेसारख्यांच्या मनांत येऊन चुकला. वरील थोरे साहेबानें ' हिंदुस्थानची राज्यरीति ' या विषयावर जें पार्लमेंटांत भाषण केलें त्यांत ह्मटलें—

" **Are we to keep the people of India ignorant in order that we may keep them submissive ? Or do we think that we can give them knowledge without awakening ambition ? Or do we mean to awake ambition and to provide it with no legitimate vent ? Who will answer any of these questions in the affirmative ?—**

बागबाणही त्यांस फार प्रेमळ लागतील अशी आमची खात्री आहे! तसेंच प्रस्तुत सरकारच्या राज्यरीतींतील दोष आह्मी दाखवून दिले असतां तें रागावेल याची शंकाच नको; तें इतकें मूर्ख आहेसें आमच्या ख्रिस्ती बंधूंच्या महावचनप्रामाण्यावरूनही आमचें मन घेत नाहीं. येवढ्या तेवढ्या लेखांवरून तें रागावत नाहीं हें तर काय, पण स्वतेची गान्हाणीं व शिव्या आपणास ऐकवण्याकरतांच खुद्द एका स्वतंत्र कामगाराची नेमणूक आहे, हें नीट न समजून आमच्या बंधूनें आह्मांस बागुलबोवा दाखविण्याची जी नवीनच शक्कल काढली आहे तिचें आह्मांस फार हसूं येतें. असो; तर एकंदरींत निःपक्षपातपणानें खरा जो मजकूर आह्मांस वाटेल तो आह्मी अवश्य लिहिणार; मग तो कोणास आवडो; कोणास न आवडो! 'खऱ्यास मरण नाहीं' ही आमच्या भाषेंतील उत्कृष्ट ह्मण आह्मांस सर्वथैव मान्य होय!

---

## लोकभ्रम.

सांगों जाणती शकुन भूत भविष्य वर्तमान।
त्यांचा आह्मांसि कंटाळा पाहों नावडती डोळां॥ तुकाराम.

अंक १३.—(१) विषयोक्षेप. (२) भुतेंखेतें. (३) त्यांविषयीं लोकांच्या कल्पना. (४) त्यांचें अस्तित्व. (५) अंधार व ओसाड जागा यांची आवड. (६) दुसरे प्रत्यय.

१. या निबंधांत आपल्या लोकांत आज फार दिवसांपासून जीं कित्येक खुळें माजलीं आहेत त्यांविषयीं लिहायाचें आहे. हीं खुळें ह्मणजे भुतेंखेतें, शकुन, मंत्र, ग्रहांचे शुभाशुभ योग, दैव, नवस, किमया, रमल इत्यादि होत. यांवर बहुतेक लोकांचा विश्वास असल्यामुळें लबाडांस फावून लोकांचें फार नुकसान होतें. एक तर हे सर्व निवळ भ्रांतीचे प्रकार असल्यामुळें हे मनास जडले असतां त्यास क्षीणत्व येतें. शिवाय काळाचा, श्रमाचा व पैशाचा विनाकारण खर्च होतो. असो, तर याविषयीं आतां क्रमाक्रमानें विचार करूं.

२. पहिल्यानें भुतेंखेतें. अगदीं प्राचीन काळापासून मनुष्यमात्राचा असा एक समज होऊन गेला आहे कीं, मनुष्याचे मरणसमयीं त्याचे दोन भाग जे चित् आणि जड, ह्मणजे आत्मा आणि शरीर, यांचा जो वियोग होतो तो झाल्यानंतरही ज्या ठिकाणीं मेलेल्या माणसाची आशा गुंतून राहिली असते तेथें त्याचा आत्मा पिशाचरूपानें भ्रमण करतो. हा समज मनुष्यमात्राच्या मनास बहुधा खिळून गेला आहे; इतका कीं, ज्यानें अशा प्रकारच्या कांहीं तरी गोष्टी ऐकल्या नाहींत असा साऱ्या पृथ्वीवर एकही मनुष्य सांपडायाचा नाहीं. आडिसननें[१] एके ठिकाणीं मौजेनें ह्मटलें आहे, कीं 'ज्यांत भूत नाहीं असें इंग्लंडांत एकही गांव किंवा खेडें नाहीं;' हेंच त्याचें ह्मणणें पृथ्वीवरील एकंदर शहरांस, गांवांस, व खेड्यांसही लागेल. आमच्याच देशांत भुतें, समंध, ब्रह्मसमंध, हाडळी, डाकिणी, मुंजे, पैशाच्या हंडोल्यांवर

---

१. आडिसनच्या 'स्पेक्टेटर्'मध्यें प्रकृत विषयावर एक शानदार निबंध आहे तो आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच.

बसलेले रक्षक नाग, यांविषयी लोकांनीं सांगितलेल्या गोष्टी कोणी ऐकल्या नाहींत! तसेंच अमुक अमुक वाड्यांत समंध आहे, तो कोणास आंत नांदूं देत नाहीं, अशा प्रकारच्या लोकवार्तेवरून ओसाड पडलेलीं ठिकाणेंही कोणास माहीत नाहींत! पण पिशाचादिकांचा मुख्य आखाडा ह्मटला ह्मणजे मसणवटींत. तेथें त्यांच्या क्रीडा, चेष्टा, वेताळाची स्वारी वगैरे सर्व यथास्थित दृष्टीस पडायाचें! भवभूतीच्या 'मालतीमाधव' नाटकाच्या पांचव्या अंकाच्या आरंभीं हा सर्व प्रकार फार उत्कृष्ट रीतीनें वर्णिलेला आहे. तो आमच्या असंस्कृतज्ञ वाचकांसही त्या नाटकाच्या मराठी भाषांतरांत वाचतां येईल. असो; तर स्मशान हें पिशाचादिकांचें मुख्य वसतिस्थान. याचें कारणही उघडच आहे, कीं सारीं प्रेतकर्में तेथेंच होत असल्यामुळें त्या स्थळाच्या दर्शनानें किंवा स्मरणानें दुसरी कल्पना येतच नाहीं. यास्तवच कोणास भुतें दाखवायाचीं असतां देवऋषे, बीरमंत्री वगैरे लुच्चे लोक भोळ्या लोकांस तेथेंच नेऊन फसवतात. भुतें दिवसां दिसायाचीं नाहींत, तीं रात्रीं मात्र दिसायाचीं; त्यांतून काळोख्या रात्रीं, विशेषतः अवसेस; हे समज लोकांचे आयतेच ठरले असल्यामुळें त्यांच्या पथ्यावर फार पडतात. का कीं, काळोख्या रात्रीं, अंधारांत भुतें दाखविण्याची तयारी त्यांस सर्व अगोदर कोणास न कळतां करतां येते. ती तयारी ह्मटली ह्मणजे अर्थात् जिवंत आशाळभूत भुतें तेथें अगोदर नेऊन ठेवून त्यांच्याकडून खऱ्या भुतांच्या सर्व चेष्टा करून दाखवायाच्या. त्यांतून तो भूतवाला पाहणारास दूर उभें करून ताकीद देत असतो कीं, पाहा, जर जवळ जाल तर भूत नरडी धरील! याप्रमाणें त्यांचें सर्व कावे अगोदरपासून बनवलेले असतात. पण त्यांतूनही जर तसाच कोणी वस्ताद भेटला, तर वेळेनुसार त्यांची फजीतीही होते. असो; याप्रमाणेंच कोणास मंत्रसाधन करून घेणें असतां तेंही स्मशानावांचून होत नाहीं.[1] कोणी नादिष्ट लोक गारुड्याच्या मागें लागले असतां तो त्यांस मध्यानरात्रीं मसणवटींत फिरवतो, आणि पुरलेल्या व जाळलेल्या माणसांच्या कवट्या, हाडें वगैरे जमा करण्याच्या नादीं लावून त्यांस वरचेवर भूलथापा देत असतो. शेवटीं यांपासून आतां जास्त कांहीं लभ्य नाहीं असें पाहून एकादे दिवशीं निसटून जातो ह्मणजे झालें. असो; तर यासारख्या अनेक प्रकारांनीं 'दुनिया झुकती है' या ह्मणीप्रमाणें भोळ्या लोकांवर लबाडांचा चरितार्थ चालत आहे.

---

१. हा प्रकाश मसणवटींत, रानांतील दलदलींत वगैरे दिसतो. याचें कारण अजून बरोबर समजलें नाहीं. प्राण्यांचीं शरीरें व वनस्पति हीं कुजत पडलीं असतां त्यांतून निघणारा एखादा ज्वालाग्राही वायु (ग्यास) हा असावा असें ह्मणतात. याची मौज अशी सांगतात कीं, यांत पुष्कळ ज्योति हवेंत तरंगताहेतशा दिसून त्यांच्या जवळ जसजसें जावें तसतशा त्या दूर दूर जातात. हा प्रकार मनुष्य चालूं लागला असतां मध्यरात्रीच्या निश्चल हवेंत चालण्यानें ज्या लाटा होतात त्यांच्या योगानें होतो. याचें ल्याटिन् नांव 'इग्निस् फ्याटयूई' (फसवणारा प्रकाश) असें आहे. इंग्रेजींतील तर मराठींतल्यासारखींच आहेत—'विल् औफ् दि विस्प्.' 'जाक् विथ् दि ल्यांटर्न्' (कोलीत किंवा कंदील घेतलेला बोवा)!

२. भर्तृहरीनें लिहिलें आहे—

'मंत्राराधनतत्परेण मनसा नीताः श्मशाने निशाः'

(मंत्राराधन करण्याच्या हेतूनें रात्रीं मसणवटींत हिंडलों)

यावरून स्पष्ट दिसतें कीं, जगांतील सर्व प्रकारचे अनुभव घेऊन हा कवि चुकला होता!

३. आतां भुतांविषयीं वगैरे लोकांच्या ज्या अनेक कल्पना आहेत त्यांतील तथ्य पाहूं. पहिल्यानें त्यांचें अस्तित्व, ह्मणजे तीं आहेत कीं नाहींत याविषयीं.

४. कोणत्याही गोष्टीच्या खरेपणाविषयीं खात्री होण्यास तीन प्रकार लागतात. एक तिची स्वतःची संभाव्यता; दुसरें प्रत्यक्ष प्रमाण, तिसरें विश्वासपात्र मनुष्याचें भाषण किंवा लेख. आतां भुतंखेतें दृष्टीस पडणें हें संभवतें कीं नाहीं याचा अगोदर विचार करूं. भूत ह्मणजे काय याची जर कल्पना मनांत आणली तर ती अर्थात् हीच कीं, शरीरास सोडून गेलेला आत्मा. तेव्हां भूत ह्मणजे तो आत्मा होय; इंद्रियगोचर जें जड शरीर तें नव्हे हें अर्थातच झालें. मरणसमयीं जें नष्ट झालें तें तो आत्मा होय; जड शरीर हें पहिल्यासारखें कायमचें कायमच असतें; त्याची मरणोत्तर काय व्यवस्था होते ती तर सर्वांस दिसतेच. तर मग या दहन पावलेल्या किंवा पुरून टाकलेल्या शरीरासहवर्तमान तो नष्ट झालेला आत्मा पुन: दिसावा हें कसें घडेल! जो मनुष्य ह्मणतो कीं मीं आपल्या मित्रास किंवा कोणा मनुष्यास भूत झालेला पाहिला वगैरे, त्यानें जर यत्किंचित् विचार केला तर त्यास कबूल येईल कीं, जें शरीर त्यानें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं जाळलेलें किंवा पुरलेलें वगैरे पाहिलें तेंच पुन: दृष्टिगोचर कसें होईल? पण कोणी कदाचित् ह्मणतील कीं, तेंच शरीर जरी दृष्टीस न पडलें, तरी त्यासारखें शरीर धारण करण्याचें पिशाचांचे अंगीं सामर्थ्य असेल. अशा शंकेवर उत्तर देणें कठिण आहे खरें; कारण या पंचेंद्रियविषयक सृष्टीखेरीज दुसऱ्या सृष्टीचें आपणांस बिलकुल ज्ञान नाहीं; तसेंच यमपुरींतील, प्लूटोच्या † नगरांतील, किंवा ‡पर्गेटरींतील व्यवस्थाही इहलोकीं कळण्याचा बिलकुल मार्ग नाहीं! असो; तर भुतांच्या अस्तित्वाच्या संभाव्यतेविषयीं हा विचार झाला. आतां दुसरें प्रत्यक्ष प्रमाण प्रस्तुत वादास किती उपयोगीं पडतें तें पाहूं. हें प्रमाणही येथें कोतेंच पडतें. आमचा स्वतःचा अनुभव जर कोणी विचारील, तर आह्मी असें स्पष्ट सांगूं कीं, सृष्टींतील अद्भुत चमत्कार पाहण्याची जशी मनुष्यमात्रास जात्याच हौस असते व असावी, त्याप्रमाणेंच आह्मांसही या गोष्टीची अतोनात हौस आहे; व जर कोणी या गोष्टीविषयीं आमची पक्की खात्री करून देईल तर ती करून घेण्याची आमची फार खुषी आहे.[१] फार तर काय, पण जगांतील सर्व विद्वान् शोधक लोकांची

† Pluto हा शनीचा (Saturn) मुलगा व गुरु (Jupiter) व वरुण (Neptune) यांचा भाऊ पाताललोकचा अधिपति देव. हातांत राजदंड असून गंधकाच्या सिंहासनावर अभिषिक्त झालेला, अत्यंत निर्दय अंतःकरणाचा नरकलोकचा राजा असें याचें वर्णन आहे. आमच्याकडील 'यमा'शीं याचें सादृश्य दिसतें. "सम्पादक"

‡ "रोमन् कॅथोलिक् संप्रदायाप्रमाणें मृतात्म्यांचे पापक्षालन पूर्ण होईतों कांहीं काळपर्यंत मिळणारा लोक."............ 'सम्पादक'

१. वरील मजकूर केवळ ऐकिवावरून आह्मी लिहीत नाहीं हें आमच्या वाचकांस कळवण्याकरतां स्वतःस घडलेला एक वृत्तांत येथें सांगतों. पुण्यांतील एका प्रसिद्ध गृहस्थाकडे एक भूतवाला येऊन त्यानें मी भुतें दाखवतों अशी प्रतिज्ञा भोगली. कोठें ह्मणून विचारतां त्यानें खंडोबाचा माळ सांगितला. तेव्हां दोन तीन गाड्या करून आमची पंधरा दहा पंधरा मंडळी भुतांच्या दर्शनार्थ तेथें

[ पुढें चालू ]

आह्मी बिनधोक हमी भरतों कीं, कितीही अक्राळ विक्राळ भुतांची, ब्रह्मसमंधांची, मुंजेबुवांची, किंवा वेताळ महाराजांची स्वारी प्रत्यक्ष दाखविण्याची जर कोणामध्यें शक्ति असेल, तर सूर्यग्रहणाला, गेल्या शुक्रयुतीला, गर्दी झाली नाहीं अशी देशोदेशच्या लक्षावधि लोकांची वरील चमत्कार पहाण्यास हवी तेथें जमेल! शिवाय बीरमंत्राची येवढी भट्टी ज्यास साधली त्यास पिशाचादिकांचा राजा कुबेर यापासूनही प्रत्यक्ष मिळणारी नव्हे अशी संपत्ति त्यास देशोदेशचे लोक देतील. हवा तर खुद्द महाराणीच्या शिक्क्याचा भुतांबद्दल, समंधांबद्दल त्या महाभाग्यवान् मनुष्यास पेटंटचा चांदही मिळेल! असो; पण भुतें नाहींत याचें हेंच एक मोठें साक्षात् प्रमाण आहे कीं, अशी गोष्ट आजपर्यंत कधीं झाली नाहीं! समजा कीं एखाद्यास पिशाच अनुकुल असून हवे ते चमत्कार त्यास करतां येत आहेत, तर तो त्या मौजेवर लोकांपासून हवा तितका पैसा काढणार नाहीं काय? जो आपल्या जवळच्या पिशाचास आज्ञा करून हलवायाच्या घरची पेढेबर्फी आणवतो, त्यासच आपली पोतडी बगलेस मारून आपल्या भिकार खोपटांत गेल्यावर ओल्याकोरड्या भाकरीचीही कां बरें पंचाईत पडावी! तसेंच ज्याच्या लहान कांडीचा असा पराक्रम कीं ती हातावरून फिरविली असतां मुठींतील पैशाचा खाडदिशीं रुपया होतो तीच कांडी त्याच्या बिन्हाडीं कां स्वस्थ पडून राहते! एखाद्या मनुष्यास जर परीस सांपडला तर त्याचें सामर्थ्य दारोदार दाखवून त्यावर पैसा दोन पैसे मिळवण्यास त्यास हिंडावें लागेल काय? असो; तर पिशाचें कोणाच्या स्वाधीन असणें हें मुळींच संभवत नाहीं. व ह्मणूनच तीं दृष्टीस पाडविण्याचें कोणामध्यें सामर्थ्य आहे हीही गोष्ट संभवदुक्तिक ह्मणतां येत नाहीं. आतां तिसरें प्रमाण भाषण किंवा लेख. यांत पहिल्या भाषणाविषयीं जर पाहिलें तर त्यांत पहिल्यानें हा चमत्कार आढळेल कीं, जो अशा गोष्टी सांगतो त्यास जर विचारलें कीं तुह्मीं ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिली काय? तर 'पाहिली' असें उत्तर न येतां नेहेमी 'ऐकली' असेंच येईल! तसेंच जो मनुष्य खोटें बोलणारा नव्हे त्याच्याही तोंडून मीं अमुक अमुक वेळीं अमुक अमुक ठिकाणून जात असतां पिंपळावर मुंजा, चिंचेवर जखीण[1] किंवा वडावर वेताळ पाहिला असेंही कधीं येणार नाहीं. पण जे वरच्या प्रकारचे मनुष्य नव्हेत, तर निवळ खोट्या गोष्टीही जे केवळ मौजेखातर बनवून

---

डेक्कन् कॉलेजापाशीं दाखल झाली. ती रात्र गतवर्षीच्या मार्गशीर्ष महिन्याची पौर्णिमा होती. आकाश निरभ्र असून चांदणें (त्या भूतवाल्याची चांगली फजितीच करण्याकरतां कीं काय कोण जाणे!) फार नामी पडलें होतें. पण तेथें जाऊन पाहतों तों काय आहे? भुतें तर नाहींतच; पण भुतांचीच खोड काढण्यासारखे आमच्या कालेजांतील विद्यार्थी ती बातमी समजून बाहेर इकडे तिकडे फिरत होते. ते मात्र रात्रीं वाट चुकलेल्या एखाद्या मनुष्यास त्या ओसाड ठिकाणीं पिशाचवत् भासते खरे! असो; मग त्या मंत्रीबोवांनीं जेव्हां पाहिलें, कीं आतां तर दहाबाराची पन्नाससाठ मंडळी झाली. तेव्हां मग कांहीं वेड्यावांकड्या सबबी सांगून त्यांनीं आपल्या लपवलेल्या सोंगाड्यासहवर्तमान निसटता पाय घेतला!

१ हा शब्द 'यक्षिणी' शब्दाचा अपभ्रंश आहे. वरील मराठी शब्दांत अक्षराबरोबर अर्थाचाही अपभ्रंशच झालासें दिसतें. 'मेघदूतां'तील नायिकेस 'जखीण' कोण ह्मणेल!—'तो जख्ख ह्मातारा झाला आहे' या वाक्यांत 'यक्ष' शब्दाचा तसाच दुहेरी अपभ्रंश दृष्टीस पडतो.

सांगत असतात किंवा अशा भीति उत्पन्न करणाऱ्या गोष्टी सांगून ज्यांस कांहीं स्वार्थ साधायाचा असतो, अशा लोकांच्याच तोंडून वरील गोष्टी बहुधा ऐकूं येतात; व त्यांस सत्याची पर्वा बिलकुल नसल्यामुळें शपथा आणा घेऊनही वरील खोटा बनावट मजकूर सांगतांना ते तिळमात्रही कांकूं करीत नाहीत. तर या तिन्ही गोष्टींचा नीट विचार करतांही भुतांच्या अस्तित्वाचा मोठाच संशय येतो. आतां शेवटीं एक मात्र मुद्दा राहिला—लेख. याचाही निकाल पाडण्यास फार पंचाईत नको. कां कीं कोणी प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारानें मीं प्रत्यक्ष असा असा भुतांचा चमत्कार पाहिला असें लिहून ठेवलेलें आढळत नाहीं. निदान आलीकडे तरी असा चमत्कार दृष्टीस पडण्यासारखा असता तर तो कधींही गुप्त राहताना! सोसायटी-(मंडळी)-चीं पुस्तकें, मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांतून कोठें कोनाकोपऱ्यांत जरी अशी गोष्ट घडली तरी ती सर्वांस जाहीर झाल्याखेरीज कधीं रहायाची नाहीं. पण भुतें जशीं दिवसास भितात त्याप्रमाणेंच वरील प्रसिद्धीच्या साधनांसही भिऊन, इसापनीतींतील उंदरांनीं जसा बेत केला होता कीं कोणींही फळीखालीं उतरूं नये त्याप्रमाणेंच इतःपर कोणीं कोठेंही हूं कां चूं मुद्दां करूं नये असें जर सर्वांनीं कौन्सल करून ठरविलें असेल तर मात्र न कळे! असो; तर याप्रमाणें वरील तिन्ही प्रमाणांवरून पाहतां भुतांच्या विरुद्धच निकाल होईल.

५. याप्रमाणें पिशाचांच्या अस्तित्वाविषयीं वस्तुदृष्ट्या विचार झाला. आतां त्याविषयीं लोकांच्या मनांत जे कित्येक समज आहेत, कीं ज्यांवरून भूतसृष्टीच्या अस्तित्वाचें ते प्रमाण धरतात—त्यांत कितपत समंजसपणा आहे तो पाहूं. पहिला मोठा समज हा कीं, भुतें अंधारांत मात्र दृष्टीस पडायाचीं. शेक्सपीयरच्या 'ह्याम्लेट्' नामक प्रसिद्ध नाटकांत आरंभीं जे भूत दिसल्याचे एक दोन उत्कृष्ट प्रवेश आहेत त्यांत त्या कवीनें हीच सर्व लोकांची कल्पना तेथें दर्शवली आहे. त्या राजपुत्राचा भूत झालेला बाप मध्यरात्र उलटून गेल्यानंतर पहारा करणाऱ्या संत्र्यास व त्यास दिसे, व कोंबड्याचा शब्द कानीं पडतांच दचकून 'हवेंतल्या हवेंत दिसेनासा होई!' असो; आतां या कल्पनेचें जर तथ्य पाहिलें तर काय निघेल? भूत जर मनुष्यास अदृश्य आहे व हवें तेवढें रूप त्यास घेतां येतें, तर मग उजेडांतही येण्यास त्यास कां शंका वाटावी? जें मुळींच अदृश्य त्यास अंधार काय आणि उजेड काय! तसेंच सात ताड ज्यास उंच होतां येतें त्यास यःकश्चित् मनुष्याच्या बळाची काय पर्वा! शिवाय लोकांची भुतांविषयीं अशी कल्पना आहे कीं, ज्याची आशा मागें राहिली, किंवा ज्यास दावेदाराचा सूड जिवंतपणीं उगवतां आला नाहीं, तो भूत होऊन आपल्या वैऱ्यास छळतो. आतां ही दुसरी कल्पना जर खरी आहे, तर त्या भुताला आपल्या दावेदाराचा सूड घेण्यास किती उत्कृष्ट सोय झाली बरें! स्वतः अदृश्य, हवें तितकें बळ, हवें तेथें हव्या तेवढ्या त्वरेनें जाण्याची मोकळीक, हवें तें करण्याचें सामर्थ्य; इतकी सामग्री असल्यावर मग त्या वैऱ्याच्या घरादाराचें वाटोळें करून त्याचें निसंतान सुद्धां त्यास क्षणार्धांत करतां येईल. मग असें आजपर्यंत कोठेंही झाल्याचें बिलकुल ऐकूं येत नाहीं असें

का बरें असावें? भुतांस समंधांसही हायकोर्टाचा तर धाक वाटत नसेलना! काय असेल तें असो! दुसरी कल्पना अशी कीं, तीं नेहेमी ओसाड जाग्यांतच दिसायाचीं. अशा जाग्यांत मात्र तीं आपला नेहेमीचा क्रम मोडून एकट्या दुकट्या मनुष्यास कधीं मधीं दिवसासही दिसतात. पण हें त्यांचें करणेंही वरच्यासारखेंच विचित्र होय. मनुष्यास येवढें धुजण्याची त्यांस काय गरज आहे? बरें, शिवाय ओसाड एकान्त प्रदेश व अंधार हीं जर त्यांस अत्यंत आवडतात, व अशा ठिकाणीं त्यांचा नेहेमीचा वास आसयाचाच असें जर असतें, तर आमच्या शिवाजीसारखे सेनापति, ज्यांचा सारा जन्म निर्जन अरण्यांतून व डोंगरांतून वगैरे रात्रींच्या रात्रीं फिरतां गेला, त्यांस कोठेंच भुतांनीं भेवडावलें नाहीं, किंवा त्यांस अटकाव केला नाहीं, हें कसें झालें? तेव्हां भुतांविषयींच्या वरील कल्पना केवळ व्यर्थ होत.

६. वरील गोष्टी सर्व विचारी मनुष्यांच्या सहज ध्यानांत येणार आहेत; व त्यांवरून एकंदरींत पाहतां भुतांविषयींच्या चोहोंकडे ऐकूं येणाऱ्या गोष्टी सगळ्या निवळ गप्पा आहेत असाच सिद्धांत होतो. या ह्मणण्यावर कोणी कदाचित् अशी शंका काढतील कीं, असेंच निखालस कसें एकदम ह्मणावें? जिकडे तिकडे साऱ्या जगभर ज्या भुतांच्या गोष्टी ऐकूं येतात त्यांपैकीं पुष्कळ जरी लुच्चे किंवा भोळसर लोकांनीं सांगितलेल्या असल्या, तरी त्यांपैकीं कांहीं तरी खऱ्या झालेल्या असाव्या. उगाच आगीशिवाय कसा धूर निघेल? हें ह्मणणें सकृद्दर्शनीं बरेंच समंजस वाटतें, व कित्येक नामांकित ग्रंथकारांनीं असाच गुळमुळीत अभिप्राय देऊन ठेवला आहे.[1] पण अंमळ विचार केला असतां कळून येईल कीं, अशा ठिकाणीं सगळ्या जगाचा अभिप्राय कांहीं उपयोगीं पडायाचा नाहीं. 'पांचां मुखीं परमेश्वर' वगैरे ह्मणी अशा ठिकाणीं बिलकुल लागू पडत नाहींत. एखाद्या रत्नाची परीक्षा करणें असतां ती जशी लोकांचा मोठा जमाव जमवून त्यांच्या बहुमतानें ठरवणें केवळ अप्रयोजक होईल, त्याचप्रमाणें जेथें बुद्धीच्या सूक्ष्मत्वाचें काम लागतें तेथें सगळ्या जगाचें मत घेण्यांत कांहीं जीव नाहीं. पहिल्या उदाहरणांत रत्नपारख्याचें एकाचें मत जसें लक्षावधि मनुष्यांच्या मतांहून ज्यास्त योग्यतेचें धरायाचें, त्याप्रमाणेंच दुसऱ्या उदाहरणांत तत्त्वविवेचकाचें मत साऱ्या जगाहून भारी असें समजावें. पृथ्वी फिरते कीं अचल आहे, अट्लांटिक् महासागराच्या पलीकडे भूमि आहे कीं नाहीं, या दोन्ही वादांत जसें सगळ्या दुनियेचें मत खोटें

---

१ वर जो आडिसन्‌चा भुतांविषयींचा निबंध सांगितला त्याचा एकंदर झोंक निराळाच असून शेवटचा अभिप्राय मात्र अंमळ विचित्रच आहे. पण तो शेवटचा मजकूर त्या ग्रंथकारानें व्याजोक्तीनें लिहिला असावासें आह्मांस वाटतें. जॉन्सन्‌च्या 'रासेलसां'त तर त्या ग्रंथकाराची नेहेमीची समजूतच स्पष्ट लिहिली आहे. जॉन्सन् आपणाबरोबर कांहीं मंडळी घेऊन एक्या घरीं मध्यानरात्रीं भुताशीं बोलण्याकरतां गेला होता, व तो सर्व खेळ एका नऊ दहा वर्षांच्या लबाड पोरीचा होता हें पुढें समगलें. ही गोष्ट त्याच्या चरित्रांत प्रसिद्ध आहे. या सर्वप्रसिद्ध वृत्तांताचें नांव 'कॉक् लेन घोस्ट्' ('कॉक् नांवाच्या गल्लींतील भूत') हें असून याबद्दल चर्चिल नामक विनोदी कवीनें जॉन्सन्‌ची खूप फजिती उडवली होती.

सांगत असतात किंवा अशा भीति उत्पन्न करणाऱ्या गोष्टी सांगून ज्यांस कांहीं स्वार्थ साधायाचा असतो, अशा लोकांच्याच तोंडून वरील गोष्टी बहुधा ऐकूं येतात; व त्यांस सत्याची पर्वा बिलकुल नसल्यामुळें शपथा आणा घेऊनही वरील खोटा बनावट मजकूर सांगतांना ते तिळमात्रही कांकूं करीत नाहीत. तर या तिन्ही गोष्टींचा नीट विचार करतांही भुतांच्या अस्तित्वाचा मोठाच संशय येतो. आतां शेवटीं एक मात्र मुद्दा राहिला—लेख. याचाही निकाल पाडण्यास फार पंचाईत नको. कां कीं कोणी प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारानें मीं प्रत्यक्ष असा असा भुतांचा चमत्कार पाहिला असें लिहून ठेवलेलें आढळत नाहीं. निदान आलीकडे तरी असा चमत्कार दृष्टीस पडण्यासारखा असता तर तो कधींही गुप्त राहताना ! सोसायटी–( मंडळी )–चीं पुस्तकें, मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांतून कोठें कोनाकोपऱ्यांत जरी अशी गोष्ट घडली तरी ती सर्वांस जाहीर झाल्याखेरीज कधीं राहायाची नाहीं. पण भुतें जशीं दिवसास भितात त्याप्रमाणेंच वरील प्रसिद्धीच्या साधनांसही भिऊन, इसापनीतींतील उंदरांनीं जसा बेत केला होता कीं कोणीही फळीखालीं उतरूं नये त्याप्रमाणेंच इतःपर कोणीं कोठेंही हूं कां चूं मुद्धां करूं नये असें जर सर्वांनीं कौन्सल करून ठरविलें असेल तर मात्र न कळे ! असो; तर याप्रमाणें वरील तिन्ही प्रमाणांवरून पाहतां भुतांच्या विरुद्धच निकाल होईल.

५. याप्रमाणें पिशाचांच्या अस्तित्वाविषयीं वस्तुदृष्ट्या विचार झाला. आतां त्याविषयीं लोकांच्या मनांत जे कित्येक समज आहेत, कीं ज्यांवरून भूतसृष्टीच्या अस्तित्वाचें ते प्रमाण धरतात—त्यांत कितपत समंजसपणा आहे तो पाहूं. पहिला मोठा समज हा कीं, भुतें अंधारांत मात्र दृष्टीस पडायाचीं. शेक्सपीयरच्या ' ह्यामूलेट् ' नामक प्रसिद्ध नाटकांत आरंभीं जे भूत दिसल्याचे एक दोन उत्कृष्ट प्रवेश आहेत त्यांत त्या कवीनें हीच सर्व लोकांची कल्पना तेथें दर्शवली आहे. त्या राजपुत्राचा भूत झालेला बाप मध्यरात्र उलटून गेल्यानंतर पहारा करणाऱ्या संन्यास व त्यास दिसे, व कोंबड्याचा शब्द कानीं पडतांच दचकून ' हवेंतल्या हवेंत दिसेनासा होई !' असो; आतां या कल्पनेचें जर तथ्य पाहिलें तर काय निघेल ? भूत जर मनुष्यास अदृश्य आहे व हवें तेवढें रूप त्यास घेतां येतें, तर मग उजेडांतही येण्यास त्यास कां शंका वाटावी ? जें मुळींच अदृश्य त्यास अंधार काय आणि उजेड काय ! तसेंच सात ताड ज्यास उंच होतां येतें त्यास यःकश्चित् मनुष्याच्या बळाची काय पर्वा ! शिवाय लोकांची भुतांविषयीं अशी कल्पना आहे कीं, ज्याची आशा मागें राहिली, किंवा ज्यास दावेदाराचा सूड जिवंतपणीं उगवतां आला नाहीं, तो भूत होऊन आपल्या वैऱ्यास छळतो. आतां ही दुसरी कल्पना जर खरी आहे, तर त्या भुताला आपल्या दावेदाराचा सूड घेण्यास किती उत्कृष्ट सोय झाली बरें ! स्वतः अदृश्य, हवें तितकें बळ, हवें तेथें हव्या तेवढ्या त्वरेनें जाण्याची मोकळीक, हवें तें करण्याचें सामर्थ्य; इतकी सामग्री असल्यावर मग त्या वैऱ्याच्या घरादाराचें वाटोळें करून त्याचें निसंतान सुद्धां त्यास क्षणार्धांत करतां येईल. मग असें आजपर्यंत कोठेंही झाल्याचें बिलकुल ऐकूं येत नाहीं असें

कां बरें असावें ? भुतांस समंधांसही हायकोर्टांचा तर धाक वाटत नसेलना ! काय असेल तें असो ! दुसरी कल्पना अशी कीं, तीं नेहेमी ओसाड जाग्यांतच दिसायाचीं. अशा जाग्यांत मात्र तीं आपला नेहेमीचा क्रम मोडून एकट्या दुकट्या मनुष्यास कधीं मधीं दिवसासही दिसतात. पण हें त्यांचें करणेंही वरच्यासारखेंच विचित्र होय. मनुष्यास येवढें बुजण्याची त्यांस काय गरज आहे ? बरें, शिवाय ओसाड एकान्त प्रदेश व अंधार हीं जर त्यांस अत्यंत आवडतात, व अशा ठिकाणीं त्यांचा नेहेमीचा वास आसयाचाच असें जर असतें, तर आमच्या शिवाजीसारखे सेनापति, ज्यांचा सारा जन्म निर्जन अरण्यांतून व डोंगरांतून वगैरे रात्रींच्या रात्रीं फिरतां गेला, त्यांस कोठेंच भुतांनीं भेवडावलें नाहीं, किंवा त्यांस अटकाव केला नाहीं, हें कसें झालें ? तेव्हां भुतांविषयींच्या वरील कल्पना केवळ व्यर्थ होत.

६. वरील गोष्टी सर्व विचारी मनुष्यांच्या सहज ध्यानांत येणार आहेत; व त्यांवरून एकंदरींत पाहतां भुतांविषयींच्या चोहोंकडे ऐकूं येणाऱ्या गोष्टी सगळ्या निवळ गप्पा आहेत असाच सिद्धांत होतो. या म्हणण्यावर कोणी कदाचित् अशी शंका काढतील कीं, असेंच निखालस कसें एकदम म्हणावें ? जिकडे तिकडे साऱ्या जगभर ज्या भुतांच्या गोष्टी ऐकूं येतात त्यांपैकीं पुष्कळ जरी लुच्चे किंवा भोळसर लोकांनीं सांगितलेल्या असल्या, तरी त्यांपैकीं कांहीं तरी खऱ्या झालेल्या असाव्या. उगाच आगीशिवाय कसा धूर निघेल ? हें म्हणणें सकृद्दर्शनीं बरेंच समंजस वाटतें, व कित्येक नामांकित ग्रंथकारांनीं असाच गुळमुळीत अभिप्राय देऊन ठेवला आहे.[१] पण अंमळ विचार केला असतां कळून येईल कीं, अशा ठिकाणीं सगळ्या जगाचा अभिप्राय कांहीं उपयोगीं पडायाचा नाहीं. 'पांचां मुखीं परमेश्वर' वगैरे म्हणी अशा ठिकाणीं बिल्कुल लागू पडत नाहींत. एखाद्या रत्नाची परीक्षा करणें असतां ती जशी लोकांचा मोठा जमाव जमवून त्यांच्या बहुमतानें ठरवणें केवळ अप्रयोजक होईल, त्याचप्रमाणें जेथें बुद्धीच्या सूक्ष्मत्वाचें काम लागतें तेथें सगळ्या जगाचें मत घेण्यांत कांहीं जीव नाहीं. पहिल्या उदाहरणांत रत्नपारख्याचें एकाचें मत जसें लक्षावधि मनुष्यांच्या मतांहून ज्यास्त योग्यतेचें धरायाचें, त्याप्रमाणेंच दुसऱ्या उदाहरणांत तत्त्वविवेचकाचें मत साऱ्या जगाहून भारी असें समजावें. पृथ्वी फिरते कीं अचल आहे, अट्लांटिक् महासागराच्या पलीकडे भूमि आहे कीं नाहीं, या दोन्ही वादांत जसें सगळ्या दुनियेचें मत खोटें

---

१ वर जो आडिसन्चा भुतांविषयींचा निबंध सांगितला त्याचा एकंदर झोंक निराळाच असून शेवटचा अभिप्राय मात्र अंमळ विचित्रच आहे. पण तो शेवटचा मजकूर त्या ग्रंथकारानें व्याजोक्तीनें लिहिला असावासें आम्हांस वाटतें. जॉन्सन्च्या 'रासेलसां'त तर त्या ग्रंथकाराची नेहेमीची समजूतच स्पष्ट लिहिली आहे. जॉन्सन् आपणाबरोबर कांहीं मंडळी घेऊन एक्या घरीं मध्यानरात्रीं भुताशीं बोलण्याकरतां गेला होता, व तो सर्व खेळ एका नऊ दहा वर्षांच्या लबाड पोरीचा होता हें पुढें उमगलें. ही गोष्ट त्याच्या चरित्रांत प्रसिद्ध आहे. या सर्वप्रसिद्ध वृत्तांताचें नांव 'कॉक् लेन घोस्ट्' ('कॉक् नांवाच्या गल्लींतील भूत') हें असून यावद्दल चर्चिल नामक विनोदी कवीनें जॉन्सन्ची खूप फजिती उडवली होती.

ठरून, व पोप महाराजांचेंही आज्ञापत्र मधल्या मधेंच राहून, ग्यालिलियो व कोलंबस हेच शहाणे ठरले, त्याचप्रमाणें आजपर्यंत हरएक गोष्टींत होत आहे. उघडच आहे; ज्याची दृष्टि शाबूत आहे अशा एकट्या मनुष्याचें पाहणें खरें, कीं शंभर आंधळे आहेत आणि पांच-पन्नास डोळ्यांवर सारा आलेले लोक आहेत त्यांचें बहुमत खरें! आतां हीच गोष्ट प्रस्तुतच्या वादास लावून पाहा. लाखों लोक भुतांविषयीं अंधपरंपरेनें चालत आलेल्या गोष्टी सांगतात; कांहीं थोडे मात्र आह्मीं पाहिलीं ह्मणून सांगतात; पण हे लुचे, भोळसर, किंवा वेडगळलेले अशा प्रकाराचे; पण वरील दोन्ही प्रकार ज्याचे नाहींत, ज्याचें मन नव्या आरशासारखें स्वच्छ, त्यास मात्र कोणताच अनुभव प्रत्यक्ष घडत नाहीं. तेव्हां अर्थात् नकाराकडेच त्याचा कल होतो. असो; तेव्हां पिशाचादिकांच्या गोष्टी साऱ्या जगभर जरी आहेत तरी यावरून कांहीं निष्पन्न होत नाहीं. कां कीं, मनुष्याच्या मनाचा हा धर्मच आहे कीं, डोळ्यास जसे नानाप्रकारचे आभास होतात त्याचप्रमाणें त्यासही व्हावे. ह्मणजे डोळ्यास जसे सूर्यबिंबाचें संध्यासमयीं प्रसरण व आरक्तता, अरण्यांतील मृगजल, वगैरे अनेक आभास होतात, त्याचप्रमाणें मनासही होत असतें. हे भ्रम विचारांच्या योगानें मनुष्यास जसजसें यथार्थ ज्ञान प्राप्त होतें तसतसे नाहींसे होत जातात. पण हें जेव्हां नसतें तेव्हां वरील आभासांचा मनुष्याच्या मनावर पूर्ण अंमल चालू असतो; जसें लहानपणीं, मादक पदार्थांचें सेवन केलें असतां, ज्वरसृष्टींत वगैरे वरील तिन्ही अवस्थांत मनुष्याला जे जे भास होत असतात ते सर्व खरेच वाटत असतात, ह्मणून त्यांतून सुटल्यावरही पाहिलेल्या सर्व गोष्टी खऱ्याच असें कोणी तरी ह्मणेल काय? तर याचप्रमाणें अज्ञानाच्या काळीं लोकांची एकंदर स्थिति असते. खरें खोटें निवडण्यापुरता त्या वेळेस लोकांच्या बुद्धीस पोक्तपणा आलेला नसतो, वास्तव निबंधारंभीं जे कित्येक भ्रम सांगितले आहेत ते सर्व त्यांच्या ठायीं माजलेले आढळतात. व ते सर्वजनसाधारण असल्यामुळें मोठमोठ्या पंडितांच्या मनालाही अंशत: लागून राहिलेले आढळतात. असो; तर ज्या अर्थी भुतांविषयीं प्रमाण ह्मणजे अशाच भ्रांतींत बुचकळत राहिलेल्या लोकांचें धरायाचें, त्या अर्थी अशांची संख्या केवढीही असली, किंवा कधीं कधीं मोठ्या नामांकित ग्रंथकारांचेही तसेच समज झालेले असले, तरी तेवढ्यानेंच त्यांचीं मतें खरीं होतात असा अर्थ नाहीं.

७. असो; तर याप्रमाणें भुतांखेतांविषयीं जो बारीक रीतीनें विचार करील त्याचा एकंदर कल आमच्यासारखाच होईल. तो असा कीं, प्रत्यक्ष प्रमाण ह्मणून त्यास बिलकुल मिळणार नाहीं; तसेंच ज्याच्या खरेपणावर त्याचा पूर्ण विश्वास आहे असाही मनुष्य मीं भूत पाहिलें असें प्रतिज्ञेवर सांगणारा त्यास अगदीं सांपडणार नाहीं. शिवाय इतकेंही न करतां प्रकृत विषयाविषयीं जो आपणाशींच वस्तुत: शोध करूं लागेल त्यासही त्याचा शुष्कपणा पूर्ण कळून येईल, कीं या सर्व अज्ञान लोकांच्या भ्रांति असून पाहूं गेलें असतां त्यांत तथ्य हें मुळींच संभवत नाहीं. या असंभाव्यतेचीं वर कित्येक प्रमाणें सांगितलींच, पण आतां सरतेशेवटीं आणखीही कांहीं अधिक सांगतों. एक हें कीं, भुतें जर दिसतात, तर जीं आपणांस माहीत आहेत तेवढींच कां दिसावीं? शंभर दोनशें वर्षांमागील एखादें भूत आतां

कां दृष्टीस पडूं नये ? तसेंच मनुष्यांचींच तेवढी भुतें कां व्हावीं ? देह सोडून गेलेला आत्मा ह्मणजे जर भूत तर पशुपक्ष्यादिकांचाही[१] तसा प्रकार दृष्टीस पडावा; कां नये पडूं ? मग आमचा मेलेला घोडा किंवा कुत्रा भूत होऊन खिंकाळतो किंवा भोंकतो असें कोणाच्या सांगण्यांत येत नाहीं हें कसें ! असो; तेव्हां यावरून उघडच दिसतें कीं, या सर्व ज्याच्या त्याच्या मनास भासणाऱ्या शुष्क भ्रांति आहेत. जें ज्या वेळेस मनांत फार भरलें असतें तें जसें स्वप्नांत क्षणभर प्रत्यक्ष दिसतें, किंवा अंमलाच्या गुंगींत जसा प्रकार होतो, तसाच कल्पनाशक्ति अनावर होऊन उच्छृंखल झाली असतां होतो. हा प्रकार मुलांत व अज्ञान लोकांतच काय तो दृष्टीस पडतो याचेंही कारण तेंच. ज्याची विचारशक्ति कल्पनेहून प्रबळ झाली त्याच्या भूत कधींही वाटे जाणार नाहीं.! आमच्या इकडच्या प्रांतांत भुतांविषयीं कोंकण फार प्रसिद्ध आहे, व यावरून 'कोंकणचीं भुतें' अशी ह्मणही पडली आहे. पण हींच भुतें शहरांत वगैरे कधीं दृष्टीस पडत नाहींत याचें कारण काय ? शेंकडों साहेब लोक लोकवस्तीपासून दूर अशा बंगल्यांत किंवा तंबूंत निराळेच राहिलेले असतात, पण त्यांस कधींही पिशाचानें पछाडलेलें ऐकण्यांत नाहीं. ते रानें तोडतात, डोंगर पोंखरतात, पण कोणीही त्यांच्या वाटे जात नाहीं. त्यांच्या उग्र स्वरूपापुढें भुतांचाही थरकांपच होतो कीं काय कोण जाणे ! असो; तेव्हां एकंदरींत सर्व प्रकार निवळ भीतीचे आहेत. 'भित्र्या-पाठीं ब्रह्मराक्षस' या ह्मणींत तरी हाच अर्थ सुचवला आहे; कीं भुतें, ब्रह्मराक्षस हे सर्व कल्पनेचे खेळ आहेत. सुविचाराचे योगानें ज्यानें तत्त्वशोध केला त्यास भूतपिशाचादिकांची शंकाही मनांत यावयाची नाहीं, मग भीति तर कोठली ?[२]

---

१. हें अर्थातच आमच्या धर्माच्या लोकांचेंच मत होय. ख्रिस्ती वगैरे लोकांस हें अर्थातच मान्य होणार नाहीं. आत्मा असा फक्त मनुष्यास मात्र आहे, व बाकीच्या कोणत्याही प्राण्यास नाहीं हें त्यांच्या धर्मांतील एक मुख्य मत आहे. यावरच पुनर्जन्माचा अभाव व हिंसेची निर्दोषता तद्धर्मी लोक ठरवतात. असो; या मताच्या तथ्यत्वाचा येथें आह्मांस विचार करणें नाहीं. तरी वरील मतासारखेंच दुसरेंही एक मत येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. महमदी धर्माप्रमाणें स्त्रियाही आत्मशून्य होत ! आह्मांस तर असें वाटतें कीं, या मताचे प्रतिपादक मात्र तसे खरे !

२. भुतांविषयीं सुविचाराचे योगानें निर्भीत न होतां जो केवळ धट्टाईनें भुताशीं सामना करील त्याची खालीं लिहिल्याप्रमाणें फजिती होण्याचा संभव आहे. पुढील गोष्ट येथेंच घडलेली आह्मीं ऐकली आहे. एका मित्रमंडळीचा अशा विषयावर वाद चालला असतां पैज पडली कीं, जो अवसेच्या दिवशीं मसणवटींत जाऊन तेथें खुंटी ठोकून येईल तो खरा धीट, त्याला सर्वांनीं अमुक अमुक रुपये द्यावे. असें बोलणें होतांच एकजण मी हें काम करतों असें ह्मणून छातीस हात लावून तयार झाला. मग अवसेच्या दिवशीं मध्यानरात्रीच्या सुमारास सारी मंडळी येथील ओंकारेश्वराच्या देवळाशीं जाऊन बसली, व तो पैज मारणारा गडी एका हातांत लांकडाची मेख व दुसऱ्यांत ठोकायास एक चांगला भक्कम धोंडा अशा सरंजामानें मसणवटीकडे निघाला. जात्या स्वारी धीटच होती, तेव्हां काळोखांतून बेधडक अर्ध्या वाळवंटापर्यंत गेली. नंतर तेथून आपल्या सोबत्यांस हाक मारून ओरडला, 'पहा रे, येथें मेख ठोकतों !' ही फुशारकीची आरोळी त्याच्या मंडळीनें ऐकली;

[ पुढें चालू .]

असो; या खेपेस निबंधाच्या आरंभीं लोकभ्रमाचे जे अनेक प्रकार सांगितले त्यांपैकीं एकाचें विवेचन झालें. पुढल्यांचें क्रमाक्रमानें पुढील निबंधांत होत जाईल. अशा विषयांवर लोकांचीं मनें निर्भ्रांत करणें अगदीं अवश्य आहे. आतां यावरून जुन्या पद्धतीच्या कित्येक लोकांच्या मनांत अशा कल्पना येण्याचा संभव आहे, कीं अशा विषयांवर उघडपणें आपले विचार प्रदर्शित केले असतां लोकांची धर्मावरील श्रद्धा कमी होऊन नास्तिकपणा वाढवलासा होईल. पण ही केवळ भ्रांति होय. हर जे लोकभ्रमाचे आह्मीं विषय काढले आहेत त्यांचा आणि धर्माचा बिलकुल संबंध नाहीं. उलटा त्यांचा धर्माशीं कांहीं अंशीं विरोधच आहे असें ह्मटलें पाहिजे. आजपर्यंत सर्व देशांत दोहोंचें ऐक्यच सर्व मानीत आले आहेत; पण आतां तसें कोणी मानीत नाहीं, फार तर काय, आमच्या महाराष्ट्रांतही जे मोठे विख्यात साधु होऊन गेले त्यांनींही तें सर्व निवळ थोतांड ह्मणून खुशाल ह्मटलें आहे. हेंच दाखवण्याकरतां निबंधारंभींचा चुटका तुकारामाच्या ग्रंथांतला घेतला असून आतां सरतेशेवटीं रामदासाचे प्रस्तुत विषयास उद्देशून लिहिलेले सर्वप्रसिद्ध अभंग येथें दाखल करतों—

वाजे पाऊल आपुलें ह्मणे मागें कोण आलें।
कोण धांवतसे आड पाहों जातां झालें झाड।
भावीतसे अभ्यंतरीं कोण चाले बरोबरी।
शब्द-पडसाद ऊठला ह्मणे कोण रे बोलिला।
रामीरामदास ह्मणे संशयाचीं हीं लक्षणें ॥१॥
कांहीं दिसे अकस्मात तेथें वाटे आलें भूत।
वायां पडावें सं-देहीं मुळीं तेथें कांहीं नाहीं।
झाड-झुडूप देखिलें जिवीं वटे कोणी आलें।
रामदास सांगे खूण भितो आपणा आपण ॥२॥
छाया देखुनी आपली शंका अंतरीं वाटली।
ऐसें भ्रमाचें लक्षण भुले आपणा आपण।

---

पण फार वेळ गेला नाहीं तोंच दुसरी निराळ्याच प्रकारची किंकाळी त्यांच्या कानीं आली—'मेलों रे मे—!' ती ऐकून त्यांच्या सोबत्यांच्या उरांत धडाड झालें. मग कांहीं वेळानें ते सारे व दुसरी आणखी मंडळी असे कंदील घेऊन स्मशानांत उतरले. भीत भीत जाऊन, जवळ जाऊन पाहतात तों राजश्री निपचित पडले आहेत! मग त्यांस उठवूं लागले तेव्हां थोबडी वळल्याचें कारण उमगलें. काय? तर मेख ठोकतांना आंगरखा सांवरून न बसल्यामुळें ती आंगरख्याबरोबरच वाळूंत ठोकली गेली तेव्हां अर्थातच उठूं लागतांच भुतानें पछाडल्याचा बोकांस भास झाला. असो; पुढील वृत्तांत उघडच आहे. सर्वांनीं त्या भुतांच्या प्रतिमल्लास प्रेतभूमींतून प्रेतसंप्रदायाविरुद्ध माघारी उचलून आणून देवळांत ठेवलें. नंतर तोंडावर पाणीबिणी शिंपडल्यावर चार सहा घटकांनीं स्वारी सावध झाली. याप्रमाणें पैजेपरी पैज बुडाली आणि मंडळीचें हसें मात्र झालें,—पण बरें तितक्यावरच गेलें, जिवावरच येऊन बेतली होती तो प्रसंग दैवयोगानें टळला!—तर वेडेपणाची धट्टाई अशी एखाद्या वेळीं भोंवते!

मुखें बोलतां उत्तर तेथें झालें प्रत्युत्तर ।
डोळां घालितां आंगोळी एकाचीं तीं दोन झालीं ।
पोटीं आपण कल्पिलें तेंचि आलेंसें वाटलें ।
दास ह्मणे हा उपाधी शंका धरितां अधिक बाधी ।

---

ग्रहाणां चरितं स्वप्नोऽनिमित्तोत्पादकं तथा ।
फलंति काकतालीयं तेभ्यः प्राज्ञा न बिभ्यति[1] ॥ वेणीसंहार २.

अंक १४—(१) शकुन. (२) या भ्रमाचा प्रचार. (३) निरनिराळे प्रकार—परदेशांतले. (४) आपल्या देशांतले. (५) शकुनाचा खरेपणा. (६) शंकेवर उत्तर. (७) या भ्रमापासून हानि. (८) परधर्मी लोकांचे अपशकुन. (९) आपल्यांतील प्रकार. (१०) शकुनांवर विद्वानांचा विश्वास. (११) शंकानिवारण; सारांश.

१. मागील अंकांत चालू विषयांपैकीं एक कलम झालें. आतां यांत दुसऱ्या एकाचा विचार करूं. हें कलम शकुन होय.

२. हा भ्रमाचा प्रकारही मागल्याप्रमाणेंच सार्वत्रिक आहे. कोणत्याही देशांत शकुनाचे निरनिराळे प्रकार नव्हतेसे नाहींत. युरोपांतील प्राचीन ज्ञानसंपन्न राष्ट्रें ग्रीक् व रोमन् लोक यांच्याही इतिहासांत हें खूळ पुष्कळच दृष्टीस पडतें; व अद्यापही त्या खंडांत अडाणी लोकांमध्यें भुतेंखेतें, ग्रहफलें, जादू वगैरेंवर जसा विश्वास आहे तसाच शकुनांवरही बहुधां असेलच. आमच्या देशांत तर हा प्रकार आजपर्यंत भरपूर चालत आला आहेच. असो; आतां हे सर्व प्रकार अनुक्रमानें सांगून नंतर त्यांत तथ्य असण्याचा संभव किती याविषयीं विवेचन करूं.

३. शकुन ह्मणजे पुढें घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींचें सूचक. यावरून शकुन अर्थात् दोन प्रकारचे झाले; एक शुभ आणि दुसरा अशुभ. या दोहोंविषयीं निश्चित प्रमाण ह्मणून कांहींच नसल्यामुळें असें अर्थातच होत असेल, कीं जें एका देशांत शुभ त्यासच दुसऱ्यांत अशुभ मानीत असतील, व अशुभास शुभ. शकुन पुष्कळ गोष्टींवरून मानतात. पक्ष्यांच्या शब्दांवरून व गतींवरून, कोणत्याही आवाजावरून, पोरांच्या साहजिक बोलण्यावरून, नेत्रादि स्फुरण पावल्यावरून, वगैरे; तसेंच मांजर, चासपक्षी,† कावळा, घुबड[2], पिंगळे,

---

१. "ग्रहांचे योग, स्वप्न, आणि अपशकुन यांचें फळ केवळ काकतालीय न्यायानें दृष्टोत्पत्तीस येतें! यास्तव जाणते पुरुष त्यांचा धाक मानीत नाहींत."

† मैना. यालाच चास [ सं. चाषः ] ह्मणतात. "सम्पादक"

२. या पक्ष्याचें संस्कृत नांव 'कौशिक' असें मोठें पवित्र आहे. पण हल्लींचें त्याचें मराठींतील नांव उच्चारण्यासही लोक भितात. तसें करणें पाप मानून त्याबद्दल बोलणेंच झाल्यास 'दिवाभीत' हा त्या शब्दाचा पर्याय योजतात. या पक्ष्याचा शब्द अपशकुनी मानून लोक याविषयीं असेंही सांगतात कीं, यास दगड मारला असतां तो तें झेलतें, आणि उगाळीत बसतें;

[ पुढें चालू ]

कवडा,[1] इत्यादि प्राणीही शुभाशुभसूचक मानले आहेत. ग्रहांचे योग तर चोहोंकडे शुभावह व अशुभावह मानलेले असून आमच्या देशांत तर त्यांवांचून कांहींही चालत नाही. सैंपाकघरांत चुली घालण्यापासून तों मोठ्या मोहिमेस बाहेर पडण्यापर्यंत ग्रहांचें आनुकूल्य अगोदर करून घ्यावें लागतें. हा प्रकार ग्रीक् व रोमन् लोकांतही पुष्कळ होता हें वर लिहिलेंच आहे. त्यांच्या इतिहासांत अशीं उदाहरणें सांपडतात. एकदां कोणत्या एका देवतेस रोम शहरीं यज्ञ चालला असतां पशूच्या शरीरांतलें काळीजच नाहींसें झालें. तें देवताक्षोभाचें दर्शन व अत्यंत अशुभ जाणून लोक फार भ्याले. दुसरे एके प्रसंगीं असें झालें कीं, देवाचीं कोंबड्याचीं पिलीं चारा खाईनात, तेव्हां त्यांचा रक्षक भयभीत होऊन त्यानें सेनापतीस वर्दी दिली कीं, हें मोठें अशुभ झालें आहे. तर या वेळेस शत्रूशीं लढाई करूं नये. तो सेनापति आपला असाच होता; त्यानें त्या अपशकुनाची मुळींच पर्वा न करतां त्या रक्षकाचीच उलटी निर्भर्त्सना केली, आणि त्या कोंबड्याच्या पोरांस उचलून समुद्रांत झुगारून दिलें, आणि म्हणाला, 'बरें चारा नको तर नको, पाणी कां पिईनातें ! " या धर्म-**-पणाचें त्यास लवकरच प्रायश्चित्त भोगावें लागलें. कार्थेजिनियन् लोकांनीं त्याचा समुद्रावर अगदीं पराभव करून टाकला, व त्यामुळें व वरच्या दांडगाईबद्दल त्याला रोमन् लोकांनीं कामावरून दूर केला. आथीनियन् व स्पार्टन् लोकांतही हें खूळ होतें. पारसीकांनीं पहिल्यानें जी ग्रीस देशावर स्वारी केली त्या वेळेस आथेन्सच्या साह्याग्यास स्पार्टन् लोक आले नाहींत. कां तर पौर्णिमेच्या अगोदर लढाईस निघूं नये असा त्यांचा नियम होता ! तसेंच पुढें स्पार्टन् व आथीनियन् लोकांचें जें सत्तावीस वर्षें अत्यंत घोर युद्ध चाललें होतें त्यांत सिसिली बेटावर जी आथीनियन् लोकांनीं स्वारी केली तींतही वरीलच प्रकार घडला. तेथून गुप्तपणें निसटून माघारी

---

आणि त्या उगाळण्यानें तो दगड जसजसा झिजत जातो, तसतसें तें माणूसही झिजत जातें, आणि शेवटीं मरतें !—या पक्ष्यास एके ठिकाणीं मात्र मोठा मान असे; तो अशा तशा ठिकाणीं नव्हे, तर आथेन्स शहरांत ! त्या लोकांची मुख्य विद्याधिदेवता जी मिनर्वा तिला हा पक्षी प्रिय असून तिच्या निशाणावर याची प्रतिमा असे. असा जगद्विलक्षण मान त्या चतुर लोकांनीं या पक्ष्यास देण्याचा आशय असा दिसतो कीं, विद्येच्या उपासकांचें आणि मिनर्वा देवीच्या आवडत्या अशा या पक्ष्याचें पुष्कळ साम्य दिसतें, तें असें—दोहोंची निशाचरवृत्ति, जगापासून अलिप्तपणा, मुद्रा गंभीर, आणि एकंदर व्यवहार शांतपणाचे !

१. हा शब्द 'कपोत' शब्दाचा अपभ्रंश दिसतो. हा पक्षी अशुभसूचक होय. हें मोरोपंताच्या पुढील आर्येवरून दिसून येईल. विदुर शकुनीस उद्देशून म्हणतो—

'हा न भला बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा ' सभापर्व.

२. यासारखाच धट्टपणा दुर्योधनानें 'वेणीसंहार' नाटकांत केला आहे. मोठें वारें सुटून रथाचा ध्वज मोडून पडला असतां त्याचा कंचुकी 'भग्नं' 'भग्नं' करीत एकाएकीं ओरडत आला, आणि भावी घोर अनर्थाचें सूचक जें ध्वजपतन तें त्यानें मोठ्या भयाच्या मुद्रेनें आंत येऊन त्यास निवेदन केलें. पण दुर्योधनास त्या अपशकुनाचें कांहींच न वाटून तो त्या घाबरलेल्या कंचुकीस रागें मात्र भरला. आणि शेवटीं म्हणाला कीं, 'अः, यांत रे काय आहे ! जा, वाड्यांत जाऊन पुरोहितास सांग, म्हणजे तो याची शांतीबिंती कांहीं करील !'—निबंधाऱ्भोंचें वचन याच बड्या राजश्रींचें आहे !

येण्याचा त्यांनीं बेत केला होता, पण इतक्यांत चंद्रग्रहण लागल्यामुळें शकुनज्ञ लोकांनीं त्यांस कळविलें कीं, या ग्रहणावरून देवाची अशी सूचना दिसते कीं, पुढील पौर्णिमेपर्यंत आपण येथून निघूं नये. त्याप्रमाणें निघून जाण्याचा बेत रहित झाला. मग तितक्या अवकाशांत शत्रूंनीं तयारी करून त्यांचा अगदीं मोड केला. असो; तसेंच वरील दोन्ही लोकांत शकुनज्ञ म्हणून निराळे शिकवलेलेच लोक असत. यांस पाठशाळांत पढवून शकुन कसे पाहावे व त्यांचा अर्थ कसा करावा हें शिकवीत. हें शकुनशास्त्र[1] त्यांनीं कसें रचलें असेल व त्यांत नियम वगैरे काय करून ठेवले असतील तें पाहायास सांपडलें असतें तर मोठी मौज होती !

४. असो; आतां आपल्या लोकांत निरनिराळे प्रकार आहेत ते पाहूं. पहिला सर्वांत मोठा शकुन* म्हटला म्हणजे मांजराचा होय. कोणी कांहीं कार्यानिमित्त बाहेर पडला, आणि वाटेनें मांजर आडवें गेलें, कीं गेली मसलत ! ही मांजराची गम्मत पुष्कळांनीं पाहिली असेल. एखादे वेळेस दोघे चौघे कोठें निघाले असतां मधेंच एखाद्या घरांतून मांजर निघतें व माणसांच्या भयानें तें रस्ता ओलांडून समोरच्या घराकडे पळत जाऊं लागतें. त्या बिचाऱ्याच्या ध्यानींमनींही नसतें, कीं आपल्या साहजिक जाण्यानें या गृहस्थांस आपण अपशकुन करीत आहों; व आपल्या केवळ यदृच्छेच्या गतीचा जाणाऱ्या गृहस्थांच्या कार्यावर येवढा जबरदस्त परिणाम घडणार आहे ! वास्तव तें खुशाल बिनधोक जात असतें. पण इतक्यांत हे गृहस्थ हाकाटी करून दोघे इकडे होतात–दोघे तिकडे होतात; आणि त्यास हुसकूं लागतात. मांजरास आपणावर एकाएकीं येवढा गहजब गुजरण्याचा अर्थ कांहींच न कळून बिचारें अगदीं गांगरून जातें. आणि इकडे पळ तिकडे पळ अशी त्याची त्रेधा उडते ! मग त्या धांदलींत बहुधा या गृहस्थांच्या इच्छेविरुद्धच त्याचें गमन होतें ! याप्रमाणें घडणाऱ्या शकुनास बळेंच माघारी फिरविण्याचा त्यांचा यत्न निष्फळ झाला असतां हे हिरमुसले होऊन माघारी फिरतात; किंवा त्या अपशकुनावरही कांहीं तडजोड चालवून पुन: मार्गस्थ होतात ! याप्रमाणेंच विधवेचें दर्शन, प्रेत समोरून येणें, वगैरेही अशुभसूचक होत. हिंदुस्थानांत म्हणजे शिंद्याच्या होळकराच्या वगैरे मुलखांकडे शिंकणें हेंही अपशकुन मानतात. वाटेनें निघालें असतां वगैरे कोणीं शिंकतां कामा नये. गाईकवाडाच्या मुलखांत विधवेप्रमाणेंच विधुराचेंही मुखावलोकन अशुभ धरतात. जो विधुर म्हणजे गतस्त्रीक झाला त्याला राजवाडा वर्ज्य ! अन्याय व अंदाधुंदी यांविषयीं प्रसिद्ध असणाऱ्या आमच्या वरील मराठी संस्थानांत हा मोठाच न्याय घडतो असें सर्व स्त्रीपक्षपाती लोक कबूल करतील. असो; तर असे अपशकुनाचे अनेक प्रकार आहेत.

आतां कांहीं शुभ शकुन सांगतों. सकाळचे प्रहरीं कोल्ह्याचें तोंड दृष्टीस पडणें; डावा डोळा लवणें; उजवा बाहु स्फुरण पावणें वगैरे. तसेंच घराच्या बाहेर पडतांच सवाष्ण बायका

---

१. शकुनविद्येस इंग्रेजी नांव augury असें आहे. संस्कृतांत पक्ष्यांस 'शकुनि' असा एक पर्याय आहे, आणि वरील इंग्रेजी शब्दाची व्युत्पत्तिही तशीच आहे—'*avis*' 'a bird' (पक्षी) !—यावरून शकुन पाहण्याचें मुख्य ठिकाण पक्षी होते असें असेलसें दिसतें. 'सम्पादक'

* अपशकुन.

कडेवर पाण्यानें भरलेल्या घागरी घेऊन सामोऱ्या येणें. हा शेवटला शकुन फार उत्कृष्ट समजतात; व मागील पद्धतीच्या श्रीमंत लोकांची अशी चालही सांगतात कीं, ते कांहीं एखाद्या मोठ्या कार्यास बाहेर पडले असतां दहा पांच बायका वर सांगितल्याप्रमाणें मुद्दाम तयारी करून स्वारी घराबाहेर पडते आहे तोंच त्यांस सामोऱ्या याव्या अशी आधींच तजवीज करून ठेवायाची! तसेंच ज्या वाटेनें बडी स्वारी जायची त्या वाटेंत कोणी अपशकुनी माणूस येऊं नये ह्मणून अगोदर शिपायांनीं पुढें धांवून बंदोबस्त करून ठेवायाचा! हें वाचून सर्व सुविचारी मनुष्यांस हसूं आल्याखेरीज राहणार नाहीं. एक तर शकुन अपशकुन ह्मणजे सारी निवळ भ्रांति. त्यांतून त्यांस यदृच्छेनें घडूं न देतां अपशकुनास पिटून लावून चांगल्या शुभ अशा शकुनास मुद्दाम कैद करून आणून पुढें उभें करणें व तसल्या मारून मुटकून आणलेल्या शकुनाचें शुभत्व मानणें ह्मणजे मूर्खत्वाची कांहीं सीमाच झाली! अशा जुलमाच्या शकुनांचा हर्ष मानणें ह्मणजे सोंगट्या खेळत असतां दर वेळेस फांसे हवे तसे जुळून जसेचे तसेच खालीं ठेवून दुसऱ्यावर डाव करणें, व त्यांत फुशारकी मिरवणें; किंवा रंगभूमीवर रामाचें किंवा भीमाचें सोंग घेऊन रावणाचा पराभव केल्याबद्दल किंवा जीमूत मल्लास चीत केल्याबद्दल शौर्याची व बळाची प्रौढी झोंकणें यासारखेंच हास्यास्पद होय! असो; तर याप्रमाणें मूर्खत्वाच्या एका प्रकारास थारा मिळाला असतां त्याचे भाऊबंद दुसरे अनेक प्रकार त्याच्या भोंवतीं जमतात!

५. वर शकुनाचे कांहीं निरनिराळे प्रकार सांगितले. आतां यांवर विश्वास ठेवणें यांत समंजसपणा कितपत आहे याविषयीं विचार करूं. कोणतीही गोष्ट खरी मानण्यास अनुभवसिद्ध प्रमाण पाहिजे; तें इतर लोकभ्रमांप्रमाणेंच यासही बिलकुल मिळणार नाहीं. वर सांगितलेलें मांजराचेंच नेहेमीचें उदाहरण घ्या. कांहीं कामास निघालें असतां मांजर आडवें गेलें, आणि तें काम हटकून झालें नाहीं असें कोणाच्या तरी अनुभवास आजपर्यंत आलें असेल काय? कार्याचें स्वरूप, कर्त्याचें शहाणपण व हिंमत, साधनांचा योग्यायोग्यपणा, इत्यादिकांवर हातीं घेतलेल्या कामांत यश अगर अपयश येणें हें सदासर्वदा असतें. त्यांत बिचाऱ्या मांजराच्या जाण्याचा कांहींच संबंध नसतो. दुसरे जसे लक्षावधि व्यापार त्या वेळेस सृष्टींत चालले असतात त्याप्रमाणेंच मांजरानें रस्ता ओलांडून जाणें हा एक होय. मग होणाऱ्या कार्याची असिद्धि ही त्या बिचाऱ्या एकट्यावरच कां लोटावी? दिसण्यांत परस्पर असंबद्ध असणाऱ्या लक्षावधि कार्यांचा जर कांहीं अपूर्व संबंध असेलच, तर वाटेनें निघालेल्या मनुष्याचें काम न होणें याचा संबंध केवळ खुषखातर इकडून तिकडे जाणाऱ्या मांजरावर जितका येईल तितकाच कोट्यवधि दुसऱ्या गोष्टींवरही येईल. समजा कीं, पुणें मुक्कामीं कोणी गोमाजी तिमाजीस भेटण्याकरितां गेले, आणि तिमाजी भेटले नाहींत, तर तें अपेश सोम्या नांवाच्या मांजरावरच कां? गोमाजींनी त्या वेळेस पांढरें पागोटें घातलें होतें, किंवा आदल्या रात्रीं ते जेवले नव्हते, हेंच भेट न होण्याचें कारण कशावरून नसेल? अथवा हेंचसें काय, त्याच क्षणीं लंडन शहरांत अमुक अमुक ठिकाणीं अमुक अमुक मनुष्यास अमुक अमुक झालें तें आमच्या शकुनभोळ्या गृहस्थास कशावरून बाधक झालें नसेल?

बिचारें मांजर तेवढें पुढें दिसलें त्यानेंच काय पाप केलें? बुद्धीच्या मार्गानें लक्षांत न येणारा असा कांहीं विलक्षणच कार्यकारणसंबंध हजारों गोष्टींत असतो असें जर एकदां ह्मटलें, तर मग अमुकापासूनच अमुक कार्य झालें असें ह्मणण्यास जागा कोणती राहिली? निश्चित असें कांहीं नाहीं, सारेंच अनिश्चित, असें जेथें झालें, तेथें एकाच व्यक्तीवर निमित्त ठेवण्यास आधार काय? ईश्वराच्या घरचें तंत्र सगळेंच जर असें तऱ्हेवाईक असलें, तर मग त्यांत मनुष्यानें अमुक अमुकच नियम करून ठेवणें हा केवढा मूर्खपणा! असो; तर असे विचित्र संबंध जोडीत बसणें हा निवळ वेडेपणा आहे. आणि त्यांचा खोटेपणा जर पावलोपावलीं प्रत्ययास येतो, तर त्यांवर विश्वास ठेवणें अगदीं अप्रयोजक होय.

६. पण यावर कोणी अशी शंका घेतलि कीं, आजपर्यंत हा विश्वास साऱ्या देशांतील लोकांचा पूर्ण होता, आणि अजूनही लक्षावधि लोकांचा आहे, तर हे सर्व लोक कांहींच प्रमाण पाहिल्याशिवाय विश्वास धरीत असतील काय? अशा ह्मणण्याचा गेल्या अंकांत बराच विचार केला आहे. तरी त्यावर आणखीही लिहिण्यास पुष्कळ आहे. अज्ञान जे असतात त्यांच्या तोंडून हें वाक्य नेहेमी ऐकूं येतें. त्यांना एखादी नवी व सकृद्दर्शनीं विलक्षण वाटण्यासारखी गोष्ट सांगा, कीं हा वाद पुढें ठेवलेला! काय हो, हजारों लाखों लोकांचें असें मत आहे, आणि हाच काय तो शहाणा, इतक्या सगळ्या लोकांना ज्ञान शिकवणारा! आजपर्यंत सॉक्रेटीस्, कोलंबस्, ग्यालिलियो, न्यूटन्, बेकन्, वॅाट्, वगैरे जे मोठमोठे शोधक होऊन गेले त्या सर्वांशीं बाकीच्या अज्ञानग्रस्त जगाचें हें भांडण;—आज हाच निघाला दीड शहाणा आह्मांस सांगायाला; आजपर्यंत लोक झाले ते सगळे मूर्खच! तर याप्रमाणें मनानें एकदां घेतलेले ग्रह सोडण्याची जगास नेहेमी मारामार पडते.—एकंदर लोकांची दुसरीही एक मोठी चूक अशी दृष्टीस पडते, कीं एखाद्या गोष्टीचा खरेपणा किंवा खोटेपणा तिच्या स्वरूपावरूनच न पाहतां ते नेहेमी बहुमताकडे धांवत असतात! ह्मणजे शरीराच्या संबंधानें जसें जिकडे पुष्कळ मंडळी असेल तिकडे जाणें सुरक्षित, तसेंच मनाच्याही संबंधानें असेलसें त्यांस वाटतें. पण ही अर्थातच मोठी चूक आहे. हजारों लोक जर एकीकडे आहेत, आणि दुसरीकडे एकटाच मनुष्य त्यांच्याशीं भांडणारा असला, तर हा दुसरा तेव्हांच चिरडून जाईल यांत संशय नाहीं; पण मनाच्या संबंधानें हीच गोष्ट अगदीं उलटी पडते. ह्मणजे ज्याच्यापाशीं मजबूत प्रमाण आहे तो मनुष्य उलट पक्षाच्या कोट्यनुकोटि मनुष्यांसही भारीच होतो! ठीकच आहे; पाहा कीं, ज्यापाशीं दिवा आहे तो त्या दिव्यावर अंधाराचे डोंगरचे डोंगर आणून लोटले तरी डगमगेल काय? असो; पण अशा सत्यरूप ज्योतीचे किरण एकंदर जगाच्या ज्ञाननेत्रांत सुखेंकरून कधींही प्रवेश करीत नाहींत; त्यांस अनेक प्रकारचे दोष जडले असल्यामुळें अगोदर त्यांचा त्यांत रिघाव होणें हें सुद्धां बहुतेक ठिकाणीं केवळ दुरापास्तच असतें! तेव्हां अर्थातच सर्वांस बहुधा एक धोपट मार्ग माहीत असतो, कीं पुष्कळांचें जें मत असेल तेंच आपलें मत ह्मणावें; सगळ्यांची वाट ती आपली वाट! हाच एकंदर जगाचा कल लक्षांत आणून कोणीं तत्त्वज्ञानें ह्मटलें आहे—

गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः

" एकानें केलें ह्मणून दुसऱ्यानें करावें हाच प्रकार या जनाचा आहे; परमार्थ ह्मणजे तत्त्व जाणणारा थोडा " ह्मसेंच कालिदासाचें वचन आहे--

सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ।

" जे ज्ञाते आहेत ते द्वन्द्वी पक्ष पाहून चांगलें आढळेल तें पसंत करतात; पण मूर्खांचा प्रकार वेगळा. त्यांचा अभिप्राय नेहेमी दुसऱ्यांवर टेकलेला असतो "

असो; तर याप्रमाणें या जगाची रहाटी आहे. जें एकदां मत पडून गेलें त्यासच सारे अनुसरतात; मग तें खरें असो कीं खोटें असो ! त्याच्या स्वरूपाविषयीं बारीक विचार करण्याचें कोणाच्या मनांतही येत नाहीं, आणि तसें करण्याची योग्यताही थोड्यांचीच असते. याचकरतां लोकशिक्षणाचा जेवढा फैलावा होईल तेवढा देशास हितावहच होतो. त्याच्या योगानें लोकांचे भ्रमजाल तुटून सत्यासत्याची निवड करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य येऊं लागतें. पण याचा प्रसार जेथें झालेला नसतो तेथें अर्थातच वरचा गतानुगतिकत्वाचाच न्याय; तेथें प्रमाणें कसलीं आणि अनुभव कसला !

बरें; पण शकुनादिकांवर ज्याचा पूर्ण भरंवसा आहे त्याला जर कोणीं विचारलें कीं, तूं हें सर्व खरें मानतोस, तर याचा दाखला तूं कोणता पाहिला आहेस ? तर तो मनुष्य उगीच बसायाचा नाहीं; तसा ठोका आल्याचीं तो पांच सात उदाहरणें सांगेल, आणि त्यां-वरून सिद्धांत करील कीं, हें सर्व खरें आहे. हीच अशा लोकांची मोठी चूक असते. जेवढीं आपल्या तर्फेचीं ह्मणजे शकुन पटल्याचीं उदाहरणें असतात तेवढींच ते घेतात पण त्याच्या उलटचीं मात्र बिलकुल घेत नाहींत. याविषयीं बेकननें एके ठिकाणीं एक मजेदार गोष्ट लिहिली आहे. प्राचीन काळीं ग्रीस देशांत इतर सर्व राष्ट्रांतल्याप्रमाणेंच मूर्तिपूजेचा प्रचार असे, आणि पुष्कळ देवता उपदेवता वगैरे ते लोक मानीत. एकदां असें झालें कीं, नवसाच्या पुष्कळ प्रचीतीबद्दल वाद चालला असतां तो वाद करणाऱ्यानें आपल्या प्रतिपक्ष्यास त्याची खात्री करण्याकरतां नेपच्यूनच्या देवळांत नेलें. नेपच्यून हा हिंदु लोकांच्या वरुणाप्रमाणें समुद्राचें दैवत होतें. तेथें त्यानें त्या नास्तिकास देवास नवस करून वाहिलेला पुष्कळ सरंजाम दाखवला, आणि शेवटीं ह्मणाला. 'पाहा, किती लोकांस हा देव पावला तो !' त्याच्या प्रतिपक्ष्यानें उत्तर केलें, 'ह्मणतोस तें खरें; पण असें न होऊन ज्यांचीं जहाजें बुडलीं असतील त्यांची खूण येथें कोठें आहे ? त्या जर असत्या, तर त्याही मीं तुला दाखवल्या असत्या !' असो; तर शकुनांच्या खरेपणाविषयींचीं प्रमाणें लोक जीं सांगतात तीं सारीं अशा प्रकारचीं असतात. कोणी बहादर कांहीं कामाला निघाले, आणि तोंडांत मारल्यासारखे माघारी आले, कीं तें सारें अपेश सामोरें आलेल्या मांजरावर ! आणि असें एकदां दोनदां झालें, कीं झाला तो ठोका ! पण ज्या कामाला हात घातला तेंच जर होण्यासारखें नसलें, किंवा या राजश्रींच्या अंगचें कर्तृत्वच तितपत असलें, तर त्या बिचाऱ्या मांजराकडे काय बोल ? पण तें कांहीं नाहीं. अपेशास मूळ कारण तें मांजरच ! एरवीं यांच्या हातून फत्ते झाल्याखेरीज राहायाचेंच नाहीं !

७. असो; तर याप्रमाणें हा शुद्ध भ्रांतीचा प्रकार आहे; त्यांत तथ्य पाहूं जातां बिलकुल सांपडणार नाहीं. आतां यापासून अनर्थ कोणते कोणते आहेत ते पाहा. एक तर हा निवळ भ्रम असल्यामुळें तो मनास चिकटल्यानें त्यास दुर्बलता प्राप्त होते, ह्मणजे सद्‍सद्विवेचनरूप जी उत्कृष्ट शक्ति परमेश्वरानें मनुष्याचे ठायीं ठेवली आहे तिचा व्यापार या अज्ञानजन्य भ्रमानें कांहींसा कुंठित होतो. शिवाय, व्यवहारांत याचे योगानें अनेक हानि झाल्या आहेत व होत आहेत. स्पार्टन् व आथीनीयन् लोकांचा वृत्तांत वर एक लिहिलाच आहे. व या शकुनांच्या पायीं लोकांस वरचेवर किती बहुल घडते, किती घोटाळा होतो, वगैरे गोष्टी विशेषेंकरून आमच्या लोकांस सांगण्याची तर मुळींच गरज नाहीं. शकुनांनीं आमची जशी पाठ पुरवली आहे तशी थोड्यांचीच असेल! आह्मांस त्याशिवाय इकडच्या इकडे बहुधा हालतांही येत नाहीं. कोणतेंही काम हातीं घेण्यापूर्वी तिथि, वार, नक्षत्रें वगैरे काय ह्मणतात तें अवश्य समजून घ्यावें लागतें, आणि त्याचा रुकार पडला तर सगळ्या गोष्टी. करायाचें काम कितीही निकडीचें असलें तरी वरील सल्ला अगोदर घ्यावा तेव्हां तें करायास लागावें. कधीं नव्यानवसानें सद्‍बुद्धि सुचून एकदां बेत आरंभण्याचें आह्मी मनांत आणणार, तों चमत्कार पाहा,—त्या दिवशीं आपला शुक्रवार ठेवलेला! आमच्यां देशांत जागोजाग ज्या सभा, मंडळ्या, समाज वगैरे खंडोगणती उत्पन्न होतात, आणि लवकरच चोहोंकडे सामसूम होते, त्यांस वरील वाराची तर बाधा होत नसेलना!+—तसेंच आमच्यांतील कोणी बहादर एखाद्या बड्या कामास बाहेर पडले, आणि पुढें जातात तों सुळकन् या घरांतलें मांजर निघून त्या घरांत गेलें, कीं फिरला मोर्चा मागें! कार्य जेमतेम करून होण्यासारखें असलें तरी त्या अपशकुनाचा धाक सारखा मनांत राहून हातच कामाला नीट वाहायाचा नाहीं; कां कीं, मनास पक्की गांठ मारून गेलेली, कीं निघतांच बेटें मांजर आडवें निघून गेलें आहे तें कसचें काम होऊं देतें! याप्रमाणेंच कोठें निघालें तर तिघांनीं जाऊं नये; आपल्या ठिकाणीं नवव्या दिवशीं परत येऊं नये; एका घरांतून निघून दुसऱ्यांत जायचें, परगांवीं जायचें वगैरे हरएक लहान मोठ्या प्रसंगीं शुभाशुभ योग अवश्य साधले पाहिजेत; अशा प्रकारच्या नानाविध निरर्थक निर्बंधांनीं वेळ, पैसा यांचा व्यर्थ व्यय होऊन कार्यास पुष्कळ वेळां मोठाच व्यत्यय घडतो, आणि वेडेपणाचीं शुष्क भयें मनांत माजतात.

८. पण वरील प्रकार नुसता मूर्खपणाचाच झाला. यहूनही उद्वेगकारक जे शकुनांचे आणखी परिणाम घडून येतात ते सांगायाचेच आहेत. ते असे. जोंपर्यंत शकुन हे पशुपक्ष्यादिकांवरच असतात तोंवर मोठीशी वाईट गोष्ट झाली असें ह्मणतां येत नाहीं. घुबड, पिंगळे वगैरे पक्षी; किंवा मांजर, गाढव वगैरे जनावरें यांचा मनुष्यानें कितीही त्रास मानला, तरी त्यांत त्यांचें कांहीं वाईट नसतें; ह्मणजे त्या योगानें त्यांस मनुष्यापासून उपद्रव पोंचतो किंवा त्यांची मानहानि होते असा कांहींच प्रकार घडत नाहीं. पण प्रत्यक्ष मनुष्याकडेच जेव्हां हें शुभाशुभत्व येतें तेव्हां वरील मनुष्याच्या अंगभूत मूर्खत्वाचा व उद्धटपणाचा कळस होतो. ह्मणजे मनुष्यजातींतच एकानें दुसऱ्यास विनाकारण भ्रष्ट, अपशकुनी, अमंगळ असें

मानावें हें अत्यंत लज्जास्पद होय. धर्माधर्मांत व राष्ट्राराष्ट्रांत हा वेडगळ व निंद्य प्रकार किती आहे हें सर्वांस माहीत असेलच. तसाच हा अगदीं प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. ग्रीक् लोक एकंदर सार्‍या राष्ट्रांस 'बार्बेरियन्स्' म्हणजे रानटी समजत, आमचे पूर्वज सर्वांस म्लेंच्छ म्हणत तसेंच सांप्रतकाळीं इंग्रेज लोक व त्यांचे धर्मपुत्र जे आमच्या देशांत कित्येक आहेत त्यांच्या मतें सारी सुधारणा काय ती इंग्लंडांत नेऊन सांठविली आहे! पण याहीपेक्षां धर्मांच्या हेकटपणानें जें पिसें अंगांत शिरतें त्याची तर कांहीं सीमाच आहे! प्रत्येकाच्या मतें बाकीचे लोक सर्वथा अपवित्र व पापरूपी होत. मुसलमान इतर धर्मांच्या कोणत्याही लोकांशीं गांठ पडली असतां 'बिसमिल्ला रहिमान' वगैरे एखादें कुराणांतील सूक्त म्हणून आपणांस त्या पापापासून धुवून काढील; हिंदूस तर तसें प्रत्यक्षच करावें लागेल; आणि मनुष्यमात्राचें बंधुत्व मानणारा व केवळ दयेचा सागर जो ख्रिस्तीधर्म तो पाळणारास परधर्मी लोकांचा विटाळ उडवण्यास अंगावर पवित्र क्रूस काढावा लागेल![1] आमचे शेवटले बाजीराव पेशवे दहा घटका दिवस येईपर्यंत मुसलमानाचें तोंड पहात नसत; आणि त्यांचेच बंधु माजी गायकवाड खंडेराव महाराज हे ब्राह्मणाच्या दर्शनाचा अपशकुन मानीत! या दिग्विजयी समशेर–बहादुरांनीं शेवटीं शेवटीं आपल्या वंशाचा धर्म सोडून ते अगदीं इमाम बनले होते व साठ लक्षांची एक रत्नखचित चादर मक्केस पाठवण्याकरितां त्यांनीं तयार केली होती हीही गोष्ट सर्वांस मशहूर असेलच. त्यांच्या ब्राह्मणद्वेषाची व एकंदर स्वभावाची एक चमत्कारिक गोष्ट येथें लिहिल्यावांचून राहवत नाहीं. एके दिवशीं सकाळीं खासा स्वारी शिकारीस निघाली होती. बरोबर त्यांचे मंत्री, मयत भाऊ शिंदे, हे होते. स्वारी शहराबाहेर पडत असतांच रस्त्यांत एक गरीब ब्राह्मण एका बाजूस उभा राहिलेला दृष्टीस पडला. खंडेराव महाराजांची सहज त्याजकडे नजर गेली मात्र,

---

१. वरच्या गोष्टीची येथें अमळ स्पष्टता केली पाहिजे. आमच्या देशांत जेवढे ख्रिस्ती दृष्टीस पडतात त्यांपैकीं कोणीही वर सांगितलेला क्रूस काढीत नाहींत हें खरें आहे. पण ख्रिस्ती धर्माचें मूळचें खरें स्वरूप यांचे ठायीं जें दृष्टीस पडतें तें नव्हे. ब्रह्मपंथांतील किंवा प्रार्थनासमाजांतील लोक जसे खरे ब्राम्हण नव्हेत, तसेच प्रॉटेस्टंट् पंथांतलेही खरे ख्रिस्ती नाहींत. खरा ख्रिस्ती म्हटला म्हणजे स्पेन देशांतला किंवा रोम शहरांतला भाविक क्याथलिक्. त्यांचे आचार वर सांगितल्या प्रकारचेच आहेत. सर् वॉल्टर् स्कॉट् च्या 'पेव्हेनो' नांवाच्या कादंबरींत वरील क्रुसाचा प्रकार आढळतो. यहुदी लोकांच्या केवळ दर्शनानेंही विटाळ होऊन त्यांतील कित्येक पात्रांनीं वरील 'विष्णवे नमः'चा प्रकार केला आहे!

२. वरील शब्द वाचून आमच्या ख्रिस्ती बंधूंस आमची केवळ पोरबुद्धि वाटून हसूं येईल हें आम्ही जाणतों! पण गेल्या महिन्याच्या अंकांत त्यांच्या एका बंधूनें निबंधमालेच्या आठव्या अंकावर जी एक ताण झाडली आहे ती पाहिली असतां त्यास हसण्यास फारशी जागा राहणार नाहीं. सदरील अंकांत त्या पुस्तककारानें आमच्यावर कृतघ्नत्वाचे वगैरे जे आरोप ठेवले आहेत ते कांहीं अपूर्व आहेत! आणि त्या सर्वांत एक तर फारच भयंकर आहे; कोणता? तर 'जो धर्म आपली महाराणी अंतःकरणपूर्वक पाळीत आहे त्याची मनास वाटेल अशी निंदा' आम्ही केली आहे! आमच्या

[ पुढें चालू ]

तों लागलींच मागें वळून मागल्या हत्तीवर भाऊ शिंदे होते त्यांस महाराज ह्मणाले, " हा दांड बाह्मन आमच्या झोरें कां आला ? आज चांगली शिकार सांपडली तर बरें, नाहीं तर याला मारून टाकायाचा !" मग उशीर काय ? लागलेंच त्या भटजीस पकडून भाऊंनीं आपल्या कांहीं लोकांबरोबर त्यास वाड्यांत पाठवून दिलें. पण त्याबरोबर त्या लोकांस हळूच असेंही सांगितलें कीं, आपल्या शिकारखान्यांतला एक वाघ काढून त्याला लवकर आमच्या अगोदर शिकारीच्या वाटेवर एका जाळींत दडवून ठेवा. त्याप्रमाणें त्या लोकांनीं केलें. अंमळशानें महाराजांची स्वारी तेथून जाऊं लागली तों भाऊंनीं तो वाघ दाखविला. मग काय ? तावडतोब मर्जी सुप्रसन्न होऊन उद्गार निघाला, " कां भाऊ ! बाह्मन लई पाय-गुणाचा, शिकार तर अक्षीं पहिल्या झपाट्यांत धावली ! " नंतर भाऊंनीं सुचवलें कीं, आतां परत गेल्यावर त्या ब्राह्मणाला कडीं, कंठी घातली पाहिजेत. त्यांस महाराजांचाही रुकार पडून स्वारी माघारी आल्यावर जो ब्राह्मण अगदीं घाबरून जाऊन मरणाची वाट पाहात होता त्याची एकदम वरील संकल्पाप्रमाणें मोठी संभावना झाली ! असो; तर धर्मांच्या हेकटपणानें असे विचित्र प्रकार घडून येतात.

९. आतां विशेषत: आपल्याच लोकांत चालू असणारे कांहीं प्रकार येथें सांगतों. पहिला मोठा अपशकुन विधवा स्त्रियांचा. या करुणास्पद विषयाविषयीं क्षणभरही विचार करतांना ज्याचें हृदय अत्यंत खेदानें व संतापानें व्याप्त होऊन जात नाहीं त्यास केवळ पाषाणहृदय व अधमाधम ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. स्त्रियांचें जिणें मुळींच पराधीन असल्यानें व संसारदु:खाचें मोठें ओझें त्यांच्यावरच नेहेमी असल्यानें त्यांची स्थिति एकंदरींत कठिणच; पण त्यांतूनही वैधव्याच्या योगानें त्यांचा सगळाच आधार जेव्हां एकदम तुटतो तेव्हां त्यांच्या विपत्तीची तर सीमाच होते. त्यांतही आमच्या देशांत जी त्यांची स्थिति दृष्टीस पडते तीहून दु:खास्पद अशी स्थिति थोडीच ! इतरांस दु:खाची स्थिति प्राप्त झाली असतां ते लागलेच सर्वांच्या दयेस व मैत्रीस पात्र

---

मल्लिकामाअझमा महाराणीचें राज्यवैभव ख्रिस्ती धर्मास बळकटी आणण्यास कसें उपयोगी पडलें व आमच्या दयाळू राज्यकर्त्रीनें आपला १८५८ सालचा जाहीरनामा रद्द करून मिशनरींस व पाद्र्यांस मात्र तोंड सोडण्यास कोणत्या आक्टानें मुभा दिली, हें आह्मांस माहीत नाहीं. एकंदरींत आह्मांस याचें फारच आश्चर्य वाटतें कीं, जे दोहों धर्मांची परस्पर तुलना करून आपखुषीनें ख्रिस्ती झाले, ज्यांनीं गेलीं वीस वर्षें त्या धर्माच्या सत्यतेचा जातीनें अनुभव घेतला व त्याविषयीं सतत विचार केला, ज्यांनीं आमचे बिचारे शास्त्री पुराणिक यांस केव्हांच वादांत हटवून त्यांच्या धर्मांची असत्यता त्यांच्या पदरांत घातली, व तेव्हांपासून आह्मां पापी लोकांच्या हृदयांत सत्याचा व ज्ञानाचा उजेड पाडणाऱ्या मंडळींत जे प्रमुख आहेत, त्यांनीं खऱ्या धर्माविषयीं चांगलीं सबळ प्रमाणें आह्मांस मुळींच न दाखवतां 'बाबावाक्यं प्रमाणम्' या महावाक्यावरच सरतेशेवटीं आणून काय तें थडकवलें ! एकूण जसा प्रभु बदलेल तसा त्याबरोबर धर्मांचा खरेपणाही बदलतो असें आमच्या 'सत्यदीपिका'कारांचें ह्मणणें झालें ! म्हणजे मोंगलाचें राज्य होतें तोंवर महंमदी धर्म खरा, पेशव्यांचें होतें तोंवर ब्राह्मणधर्म खरा, आणि आतां महाराणीचें झालें म्हणून ख्रिस्ती धर्म खरा ! वाहवारे सत्य आणि वाहवारे दीपिका ! !

होतात; पण तेंच सगळें वरील अनाथ प्राण्यांच्या ठायीं विपरीत होतें. ज्या वैधव्यदुःखाची वेदना सहन न होऊन बिचाऱ्या स्त्रियांनीं दुष्ट दुष्ट कसाही नवरा असला तरी आपल्या पातिव्रत्यधर्मास जागून अंगावर शहारा येणाऱ्या रीतीनें त्याच्या चितेवर आपल्या देहाची आहुति द्यावी, किंवा तसें न झालें तर आमरणान्त त्याच्या करतां केवळ तपस्व्याच्या वृत्तीनें राहावें, त्याच महादुःखाबद्दल त्यांचा कळवळा कोणास येत नाहीं इतकेंच नव्हे, तर त्यांच्याच प्रारब्धदशेचें तें फळ असें ह्मणून त्यांचा उलटा छळच होण्यास आरंभ होतो, हा प्रकार आमच्या देशास अत्यंत लांछनरूप होय यांत संशय नाहीं. असो; यासंबंधीं जितकें लिहावें तितकें थोडेंच. प्रस्तुत स्थळीं इतकेंच सांगतों कीं, ज्या अपशकुनाच्या प्रकारासंबंधें सध्यां आह्मी लिहीत आहों तो सर्वथा व्यर्थ आहे हें तर आहेच; पण शिवाय तो मानणें हें विपद्ग्रस्त मानवी प्राण्याचा उपमर्द करणेंही होय. केवळ दैवयोगानें किंवा यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या स्थितिविशेषावरून मनुष्यास मंगळ किंवा अमंगळ मानावें हा केवढा अन्याय आहे! स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप, भाऊ, बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाईकांचें तरी कां तोंड बघावें? पण मुळींच हा केवढा मूर्खत्वाचा प्रकार आहे! जी अत्यंत सदाचरणानें आपलें आयुष्य क्रमून आपल्या कुलास तर काय पण सगळ्या मनुष्यजातीस भूषण आणीत आहे,—कारण मनुष्याचें अंतःकरण स्वभावतःच किती अस्थिर व दुष्ट असतें हें सर्वप्रसिद्धच आहे!—त्याच साध्वीचें दर्शन, पुरते तेरा दिवसही जाऊं न देतां जो निर्लज्ज व विषयांध पुनः नवरा मुलगा होऊन उभाच, अशा पुरुषानें अशुभ मानावें हा केवढा उलटा न्याय!! आणि अशा निष्पाप स्त्रीचें दर्शन जर शुभ नव्हे, तर सगळ्या कपाळभर जिनें कुंकवाचा पट्टा ओढला आहे अशा एखाद्या नगरभवानीचें अथवा उभयकुलांस आणि अवघ्या मनुष्यजातीस जिनें स्त्रियांचें सहज भूषण जी लज्जा ती समूळ टाकून देऊन काळोखी आणली अशा बाजारबसवीचें तिच्या केवळ बाह्य वेषावरून अत्यंत शुद्ध दर्शन झालें काय? असो; तर याप्रमाणें सुविचारानें दिसणारा मार्ग आणि जगाचा धोपट मार्ग या दोहोंत अनेक वेळां इतकें अंतर असतें. यासारखेच दुसरेही वेडगळ अपशकुन. कोणी दाराबाहेर पडतो आहे इतक्यांत पुढें जर बोडका ब्राह्मण आला तर खुंटलेंच त्याचें जाणें! मग हा ब्राह्मण चांगला सत्पात्र, सुशील, सज्जन असाही कां असेना! पण तोच जर एखादा महाशंख मोठी शालजोडी पांघरून व मोठ्या लफ्याचा पदर लावून पुढें आला कीं शकुन उत्तम! तसेंच, कोणी क्लीबांचेंही दर्शन तसेंच अशुभावह मानतात. हें करणें ह्मणजे जें मनुष्याच्या स्वाधीनचें नाहीं त्याबद्दल उगीच विनाकारण त्यास हिणावणें आहे.

याप्रमाणें मुळावर आल्याचेंही एक मोठें बंड आहे. एखादें मुलगें जन्मतांच आई किंवा बाप यांतून कोणी मेलें, किंवा दुसरें कोणी कुटुंबांतील मनुष्य गचावलें, कीं आलें तें अपेश त्या बिचाऱ्या पोराच्या माथीं! मग त्या पोराला कोणी चैन पडूं द्यायचें नाहीं. एखाद्या वैऱ्याशीं जसें वागावें त्याप्रमाणें त्या पोराचे सारखे हाल चालायाचे. याहूनही भयंकर प्रकार सुनेचा. ती घरांत आली, आणि सासू, सासरा, नवरा व इतर आप्तसंबंधी

ही सारी जर पुढें बरींच वर्षे निभावली तर ठीक गोष्ट; नाही तर मधेंच जर कांही विपरीत झालें की त्या बिचाऱ्या पोरीचें नशीब उसकटलें! नवऱ्यांची स्वारी दुर्व्यसनी निघून त्यांत जरी पुढें मागें त्यांचा शेवट झाला, तसेंच सासूस, सासऱ्यास वगैरे अशाच स्वतःच्या मूर्खपणानें किंवा आकस्मिक रोगानें मृत्युपंथास लावलें, की सारें सूनबाईच्या प्रारब्धाचें फळ! अशा प्रकारचीं उदाहरणें आमच्या सर्व वाचकांस कांहींना कांही तरी माहीत असतीलच. वास्तव याविषयीं आणखी विस्तार करण्याची बिलकुल गरज नाहीं व हा केवढा घोर अन्याय आहे हेंही एखादा शुद्ध ठोणपाखेरीज हवें त्यांस सहज समजणारें आहे.

१०. असो; येथपर्यंत प्रस्तुत विषयावर बराच विस्तार झाला. आतां हें शकुनाचें वेड केवळ आमच्यांतच आहेसें नाहीं, तर युरोपांतलि अगदीं अगदीं आलीकडच्याही कित्येक मोठमोठ्या नामांकित पुरुषांमध्यें होतें याचा थोडासा मासला दाखवतों. लॉर्ड बायरन् म्हणून इंग्लंडांत सुमारें पन्नास वर्षांपूर्वी एक मोठा नामांकित कवि होऊन गेला. त्यास एके समयीं इंग्लंडाहून पत्र आलें असतां तें फोडण्याच्या अगोदर तो म्हणाला, "या पत्रांत कांहीं तरी वाईट बातमी मला खास समजावयाची आहे." असें म्हणून त्यानें पत्र फोडून वाचून पाहिलें तों खरेंच! त्या प्रसंगीं त्यानें असा लेख लिहिला आहे—"काल रात्रीपासूनच मला कांहीं चमत्कारिक वाटत होतें, कीं माझ्या परिचयांतला कोणी मरण पावला; आणि पाहतों तों तसें खरेंच—असा ठोका आल्यावर शकुनांवर विश्वास कसा ठेवूं नये! स वॉल्टर् स्कॉट् याचा दिव्य दृष्टीवर[1] विश्वास असे; रॉसी (फ्रेंच कवि) झाडाच्या बुंधाशीं नेम धरून त्यावरून पाही, कीं मरणोत्तर आपण अक्षय नरकांत पडणार कीं नाहीं; गेटी (जर्मन कवि) चाकूवर तोंडाचा वाफारा टाकून पाही कीं आपण हातीं घेतलेलें काम तडीस जाईल कीं नाही!" याच कवीनें दुसरे एके ठिकाणीं लिहिलें आहे—"माझ्या जन्मदिवसापासून पुष्कळ विलक्षण गोष्टी आजपर्यंत घडून आल्या. तसेंच नेपोलियनलाही झालें. आणि मेरी आंटोइनेट् (फ्रान्सची राणी) हिला तर एक फारच चमत्कारिक प्रसंग घडून आला; माझ्या लग्नाच्या वेळेस माझ्या असें अकस्मात् मनांत आलें कीं, मी आपल्या मरणचिह्नावर सही करीत आहें. त्या वेळेस जर मला पळून जातां येतें तर मी तसें करणार होतों. मनःप्रेरणेच्या शकुनावर माझा दृढ विश्वास आहे. सॉक्रेटीसाचा गुप्त यक्ष होता म्हणून जें म्हणतात तें खोटें नव्हे; मंक् ल्युइस् यालाही तशीच कोणी देवता अनुकूल होती; आणि नेपोलियनाला पुष्कळ दैवी सूचना वारंवार होत!" आपल्या लोकांत जसे घातवार मान-

१. दिव्यदृष्टि म्हणजे पुढें होणाऱ्या गोष्टींचें अगोदर ज्ञान होणें. ही शक्ति कोणाकोणामध्यें असते असें स्कॉटलंडांतील कित्येक लोक मानतात.

२. बायरन कवि आपल्या बायकोशीं भांडून व तिजशीं घटस्फोट करून देशांतरास चालता झाला या गोष्टीवर कज्ज आहे. या वेळेस तो जो बाहेर पडला तो पुनः स्वदेशास माघारी आलाच नाहीं.

तात तसाच वरील कवीचा प्रकार होता. तो शुक्रवारीं कोणास भेटायास जात नसे; याप्रमाणेंच आणखीही पुष्कळ चमत्कारिक गोष्टी सांगतां येतील. हाच बायरन् ज्या वेळेस ग्रीस देशांत मृत्यु पावला त्या वेळेस एक मोठी भयंकर वावटळ सुटली होती; व हाच प्रकार नेपोलियन् व क्रॉमवेल् यांच्या मरणसमयीं झाला. जुलियस् सीजर ज्या दिवशीं मारला गेला त्याच्या आदल्या रात्रीं विलक्षणच उत्पात चोहोंकडे झालेले प्लुटार्क् यानें त्याच्या चरित्रांत लिहून ठेवले आहेत. त्यांचें कवितारूप शानदार वर्णन शेक्सपीयरच्या प्रसिद्ध नाटकांत आहे. त्यांत सीजरच्या बायकोला कसलें स्वप्न पडलें, तिला त्याचें किती भय वाटलें,[1] व त्याला मारण्यास टपलेल्या लोकांपैकीं एकानें त्याचा लाक्षणिक अर्थ सीजरला कशा चातुर्यानें बनवून सांगितला, हें सर्व या नाटकांत आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं वाचलें असेलच. असो; अशीं उदाहरणें आमच्या इकडे इतिहासांतील मुळींच देतां येत नाहींत; कारण तो लिहिलेलाच नाहीं. तरी टिप्पू सुलतानाचें एक उदाहरण आहे. श्रीरंगपट्टण घेतल्यावर टिप्पूचे कागदपत्र जे सांपडले त्यांत त्याचीं स्वप्नें व त्यांचा अर्थ केलेला असा एक लेख सांपडला. त्यांतील एक स्वप्न मोठें चमत्कारिक आहे. मराठ्यांचें लष्कर आपणावर चालून येत आहे हें त्यास माहीत असतां त्यास एकदां असें स्वप्न पडलें कीं, एक तरणा मनुष्य आपणाकडे येऊन आपणापाशीं बोलतो आहे. पण बोलतां बोलतां तो मनुष्य बदलून आपणाकडे येऊन आपणापुढें स्त्री उभी आहे असें त्यानें पाहिलें. या स्वप्नाचा सुल्तान साहेबांनीं असा अर्थ केला कीं, मराठे हे पहिल्यानें मोठे शूरसे दिसतील पण लढाईत केवळ बायकांप्रमाणें नामर्द ठरतील! असो; तर याप्रमाणें मागील निबंधांत भुतांवर विश्वास ठेवणारे जसे सांगितले तसेच शकुनांवरही ज्यांचा विश्वास होता असे कित्येक नामांकित पुरुष वर सांगण्यांत आले.

११. वरील उदाहरणांवरून कित्येकांस कदाचित् असें वाटेल कीं निबंधांत जें आम्हीं प्रतिपादन केलें त्याचें वरील मोठमोठ्या उदाहरणांनींच खंडन होतें. पण असें बिलकुल नाहीं. प्रस्तुत निबंधाच्या अग्रभागीं दुर्योधन महाराज जसें म्हणताहेत तसेंच आम्हांस वाटतें कीं शकुनादिकांचा कसाही ठोका मिळाला तरी ज्या अर्थी तो नियमानें मिळत नाहीं त्या अर्थी तसें केवळ काकतालीय न्यायानें घडतें असेंच म्हटलें पाहिजे. त्यांवर पूर्ण भरंवसा ठेवून भिणें हें शहाण्याचें काम नव्हे. तर मग वरील शहाण्यांनीं तरी त्यावर कसा भरंवसा ठेवला? असें कोणीं विचारल्यास त्यावर आमचें उत्तर इतकेंच आहे कीं, त्यांचा तरी त्यांवर अगदीं पक्का विश्वासच होता असें नाहीं, एखाद्या भलत्याच नादास लागून मोठे शहाणेही जसे फसतात तसाच हा त्यांचा केवळ नाद असेल; यापेक्षां कांहीं नाहीं. त्यांची जर त्यांविषयीं पक्की खात्रीच झाली असती तर तसें त्यांनीं खचित लिहून ठेवलें असतें, व सबळ प्रमाणें दाखवलीं असतीं. पण वरील गोष्टी तशा बिलकुल नसून त्यांच्या मनानें घेतलेल्या सम-

---

१. असाच प्रसंग 'वेणीसंहार' नाटकांत आहे. भानुमतीस एक अत्यंत अशुभ स्वप्न पडून तें तिनें आपल्या नवऱ्यास सांगितलें आहे. निबंधारंभींचें पद दुर्योधनाचीच वरील प्रसंगींची उक्ति होय.

जुती मात्र त्यांत दाखवल्या आहेत. असो; तर एकंदरींत शकुन वगैरे सर्व निवळ भ्रम आहेत. त्यांवर विश्वास ठेवून कोणींही हर्षविषाद पावूं नये; व त्यांचें भयही बिलकुल बाळगूं नये. तुकोबा सांगतात—

अवघा तो शकुन हृदयीं देवाचे चरण ।
येथें नसतां वियोग लाभा उणें काय मग ।
संग हरीच्या नामाचा शुचिर्भूत सदा बाचा ।
तुका ह्मणे हरिच्या दासा शुभ काळ दाही दिशा ।।

---

चतुरंगवलो राजा जगतीं वशमानयेत् । अहं पंचांगबलवानाकाशं वशमानये ॥[1]

अंक १७—(१) ज्योतिष. (२) विषयस्वरूप. (३) प्रस्तुत शास्त्राच्या उदयाचीं कारणें. (४) त्याचा प्रचार—या प्रचाराचीं कारणें. (५) मुख्य विषय—आक्षेपावर उत्तर. (६) ग्रहगति आणि संसारकृत्यें यांचा परस्पर संबंध असण्याचा संभव. (७) प्रत्यक्ष अनुभव. (८) दुसरे कांहीं विचार. (९) कुतर्काचें विवरण. (१०) खऱ्या ज्योतिषांची योग्यता व उपयोग.

१. मागील दोन निबंधांत भुतें व शकुन यांविषयीं आह्मीं आपले विचार प्रदर्शित केले. आतां या खेपेस ज्योतिषाविषयीं ह्मणजे ग्रहदशेवर वगैरे जो लोकांचा दृढ विश्वास आढळतो त्याविषयीं लिहूं.

२. प्रस्तुत निबंधांत खऱ्या ज्योतिषाविषयीं—ह्मणजे ज्या आश्चर्यमय शास्त्रांत आपल्या पृथ्वीविषयीं व सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांविषयीं यथार्थ निरूपण केलेलें आढळतें, व ज्यासारखें कवीच्या, तत्त्वज्ञाच्या आणि भाविकांच्या मनास आल्हाद देणारें दुसरें कांहीं नाहीं, त्याविषयीं विवेचन कर्तव्य नाहीं. तर त्याचा उदय होण्यास जें भ्रांतिमूलक शास्त्र कारण झालें त्याविषयींच फक्त यांत विचार करायाचा आहे. ह्मणजे त्याचा उदय कसा झाला, केव्हां झाला, त्याचा सध्यां कितपत प्रसार आहे, त्यांत तथ्य कितीसें आहे, वगैरे गोष्टीच काय त्या सांप्रतच्या निबंधांत येतील.

३. आतां प्रथमतः या शास्त्राचा उदय कसा झाला असावा हें पाहूं. ज्योतिषाची माहिती थोडीबहुत बहुतेक राष्ट्रांत सांपडते; त्यांतून खाल्डियन्, मिसरी, हिंदु, चीन वगैरे अत्यंत प्राचीन राष्ट्रांत तर हें शास्त्र पुष्कळच पूर्णावस्थेस येऊन पोंचलें होतें, असें समजतें. तेव्हां यावरून आकाशांतील चमत्कारांविषयीं जिज्ञासा व शोधक बुद्धि हीं मनुष्यस्वभावास केवळ साहजिक होत हें स्पष्ट दिसतें. पण बाल्यावस्थेंत असणाऱ्या राष्ट्रांस स्वाभाविक असणाऱ्या ज्या वरच्या दोन मनोवृत्ति त्यांबरोबर त्याच स्थितीच्या अप्रबुद्धत्वास साहजिक जी मनाची भ्रांतिमयता तीही पुष्कळ आढळते. ह्मणजे हल्लींच्या काळीं जो कोणी ज्योतिष शिकतो तो

---

१. "चतुरंगबलेंकरून ह्मणजे हत्ती, घोडे, पायदळ इत्यादि चारी अंगें ज्याचीं परिपूर्ण आहेत अशा सैन्याच्या योगानें राजा पृथ्वीस वश करूं शकतो; तसाच मी पंचांगबलेंकरून म्हणजे पंचांगाच्या जोरावर आकाशास आपल्या सत्तेंत आणतों!"

तें जसें केवळ त्यांतील प्रमेयांचा बोध व्हावा येवढ्याच हेतूनें शिकतो, तसें प्राचीन काळीं नसून शिकणाराचा उद्देश वरच्या खेरीज आणखी एक निराळाच असे. तो अर्थात् हा कीं, ज्योतिषांत पारंगत होऊन ग्रहफलें वर्तवितां येऊं लागलीं ह्मणजे भावी कालाचें आपणास ज्ञान व्हावें. हा हेतु वरील शास्त्राच्या अध्ययनानें कितपत सिद्ध होतो व कितपत व्हावा याविषयीं पुढें विवेचन करण्यांत येईलच. प्रस्तुत स्थलीं त्याच्या संबंधानें इतकेंच सांगायाचें कीं, मागील काळीं वरील हेतु केवळ भ्रांतिमूलक होय हें सामान्य जनांस तर काय, पण मोठमोठ्या विद्वानांसही पक्कें ठाऊक नसे. मागें विवेचन केलेल्या दोन भ्रमांस अनुसरणारे जसे पुष्कळ असत तसेच यावर पूर्ण भरंवसा ठेवणारेही होते. असो; तर याप्रमाणें वरील समज सर्वांचा होऊन गेला असल्यामुळें प्राचीन काळीं ज्योतिषाचें ज्ञान करून घेण्याची उत्कंठा व त्यांत नवे नवे शोध लावण्याची हौसही पुष्कळ लोकांस असावी यांत संशय नाहीं. आणि याच दोन्ही गोष्टी प्रस्तुत शास्त्राच्या उदयास कारणभूत झाल्या असाव्या. असें नसतें तर तादृश ज्ञानसंपन्न नसणाऱ्या राष्ट्रांतही या शास्त्राची बरीच माहिती असल्याचें आढळतें ना. पण यावर कोणी कदाचित् अशी शंका घेतील कीं, हें शास्त्र जर केवळ भ्रांतिमयच होय, तर याचा अभ्यास येवढे परिश्रम घेऊन लोक करीत असत हें कसें? ग्रहांचीं फलें वगैरे गोष्टी सर्व खोट्याच जर असल्या तर त्या समजण्याविषयीं सर्वांनीं येवढा अटाट कशाला केला असता? या शंकेचें समाधान असें आहे कीं, ज्या वेळेस या शास्त्राचें वर सांगितल्याप्रमाणें मोठ्या हौसेनें लोक आपणांस ज्ञान करून घेत त्या वेळेस त्याचें खोटेंपण प्रगट झालें नव्हतें. नवग्रह, राशिचक्र, नक्षत्रें वगैरेंची व्यवस्था करून लोक जेव्हां पहिल्यानें गणितें करूं लागले व कुंडल्या मांडूं लागले, तेव्हां तें सर्व खरें आहे अशा समजुतीवरच लोकांत तो प्रघात पडला. अंतरिक्षांतील ग्रहांच्या गत्यादिकांवर इहलोकच्या संसारादि कृत्यांचा ठोकताळा मिळतो या समजुतीवर ज्योतिष्यांनीं पहिल्यानें नियम बांधले,—कीं अमुक अमुक योग आला असतां त्याचें अमुक अमुक फल प्राप्त व्हावयाचेंच. हेच नियम पुढें हळू हळू विस्तार पावून होतां होतां प्रस्तुत काळीं निरनिराळ्या देशांत या विषयावर जे सर्वमान्य ग्रंथ होऊन बसले आहेत ते निर्माण झाले, आणि त्यांवर विश्वास ठेवण्याचाही प्रघात पितृपुत्रपरंपरेनें फारां दिवसांपासून चालत आल्यानें तोच अजूनपर्यंतही सामान्यतः अविच्छिन्नपणें चालू असलेला आढळतो. तरी प्रस्तुत विषयाविषयीं ज्यांनीं यथार्थपणें विचार केला त्यांस या शास्त्रांतील नियमांचा असबद्धपणा लक्षांत येऊन ग्रहणनक्षत्रादिकांवरचा त्यांचा विश्वास उडाला असें मागील काळाच्या इतिहासावरून सुद्धां पुष्कळ दिसून येतें. अशीं उदाहरणें कांहीं पुढें देण्यांत येतीलच. त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच कीं, ज्योतिषावर पूर्वीपासूनही सर्वांचाच सारखा विश्वास होता असें नाहीं. हा विश्वास होतां होतां हल्लींच्या काळीं तर सर्व सुधारलेल्या देशांतून बहुतेक नाहींसाच झाला आहे. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत शास्त्राच्या असत्यत्वाचें अज्ञान हेंच त्याच्या वृद्धीस कारण झालें; आणि शेवटीं त्यांतला असत्याचा जेवढा भाग होता तेवढा निराळा होऊन खरें जें ज्योतिष तें मात्र आयतें जगांत प्रगट झालें.

वर जो ज्योतिषाचा प्रकार सांगितला तसाच प्रकार रसायनशास्त्र व खनिजपदार्थविषयक शास्त्र यांचाही झाला. तो असा कीं, या शास्त्रांतले शोध करण्याविषयीं लोकांची पहिल्यानें प्रवृत्ति जी झाली ती केवळ भ्रमामुळें झाली, आणि होतां होतां सरते शेवटीं त्यांतून वरील उपयुक्त शास्त्रांचा प्रादुर्भाव झाला. तांब्याचें सोनें करण्याचा रस, लोखंडास घांसल्याबरोबर त्याचें सोनें बनवणारा परीस, काया अमर करणाऱ्या वनस्पति, द्रव्यांजन, वगैरे केवळ मनःकल्पित पदार्थ शोधून काढण्याकडे लक्षावधि भ्रांतिष्ट लोकांची प्रवृत्ति झाल्यानें एकंदर जगाचें फार कल्याण झालें. ह्मणजे वरील वस्तु सांपडल्या असें तर नाहीं,पण वरील नादास इतके लोक गुंतल्यामुळें लोकांच्या ध्यानींमनींहीं नव्हत्या अशा अनेक गोष्टी उदयास आल्या. उदाहरणार्थ लोहचुंबक घ्या. या खनिज द्रव्याच्या अंगीं केवढे अद्भुत गुण आहेत, व त्याच्या योगानें जगाचें केवढें अपरिमित कल्याण झालें आहे,या गोष्टी कोणास सांगायाला पाहिजेत? या एकट्या पदार्थानें जगांत जेवढे चमत्कार झाले आहेत त्यांचा शतांशही परीस खरोखरच सांपडल्यानें झाला असता काय? समजा कीं इतक्या लोकांच्या वेडेपणाच्या श्रमाची कींव येऊन देवानें त्यांस परीस सांपडूं दिले असते तर जगांत सध्यां आहे त्याहून कितीशी बदल झाली असती! जो क्षणभर विचार करील त्यास सहज कळून येईल कीं, अपूर्णांकांतील भाजकास आणि भाज्यास सारख्याच केवढ्याही मोठ्या संख्येनें गुणलें असतां जसा मुळींच फरक पडत नाहीं, त्याप्रमाणें सध्यां आहे त्याच्या कोट्यवधिपट सोनें जरी पृथ्वीवर झालेंसें कल्पिलें, तरी तिळमात्रही मनुष्याच्या स्थितींत फेर पडणार नाहीं. वरील अपूर्णांकांत दोन्ही आंकडे वरीक जसे भले मोठे भव्य दिसतील, त्याप्रमाणें घरीं दारीं जिकडे तिकडे सोनेंच सोनें होऊन शिलंगणाच्या दिसचा मात्र थाट उडेल; पण त्या खऱ्याखुऱ्या सोन्याची किंमत त्या नामधारी सोन्याहून फार जास्त होणार नाहीं.[1] असो; तर. याप्रमाणें वरील भ्रमांच्या मागें लागतां लागतां मनुष्यास खऱ्याखुऱ्याच मोठमोठ्या वस्तूंचा लाभ झाला; तसा त्या भ्रमात्मक पदार्थांच्या प्राप्तीनेंही होतांना. हा सगळा प्रकार मृगजळाचा पाठलाग करतां करतां खरीखुरीच एखादी चांगली नदी लागण्याप्रमाणें होय. किंवा इसापनीतींतील शेतकऱ्यांच्या लेकांच्या सारखा होय. त्यांनीं ज्याप्रमाणें शेतांत ठेवा मुळींच नसतां तें शेत

१. अमेरिकेचा शोध लागून तेथील सोन्याच्या खाणी जेव्हां स्पेन देशाच्या ताब्यांत आल्या, तेव्हां कित्येक वर्षेपर्यंत सोन्याचा भाव पुष्कळ उतरला होता ही गोष्ट अर्थशास्त्रप्रसिद्ध आहे. तशीच लंकेंत गेलेल्या न्हाव्याचीही गोष्ट आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित माहीत असेलच. ती अशी कीं, कोणी एक न्हावी लंकेंतील सोन्याच्या विटांची कीर्ति ऐकून तेथें आपलें कसब चालवण्याकरितां गेला. मग पहिल्याच हजामतीस एकदम पांच विटा मिळालेल्या पाहून त्यानें मनांत आणलें कीं, आतां बरें झालें; जन्माची दगदग चुकली! याप्रमाणें मनानें मांडे यथेच्छ खातो आहे इतक्यांत बायकोनें येऊन सांगितलें कीं, घरांत दाणे नाहींत. यानें उत्तर केलें कीं आतां कोणत्याही गोष्टीची ददात नाहीं, आजच्या पांच विटा आपल्याच जन्माला तर काय, पण आपल्या पाठीमागेंही पिढ्यानपिढ्या पुरण्यासारख्या आहेत! अशा घमेंडींत स्वारी बाजारांत जों गेली तों शेरभर दाण्यास चार विटा एकदम खाडदिशीं गेल्या! सारांश, सोन्याची आणि संपत्तीची वस्तुतः एकात्मता नाहीं; आहे ती केवळ त्यांच्या वैरल्यावरूनच होय.

चोहोंकडून चांगलें पोखरलें, आणि सरतेशेवटीं बापाचें डबोलें जरी सांपडलें नाहीं, तरी शेताचें पीक फार अल्यानें त्यांची भरपाई झाली, त्याप्रमाणेंच वरील भ्रमांनीं वेडे होऊन लोक हिंडतां हिंडतां त्यांस वरील शास्त्रांतील कित्येक गूढ रहस्यें कळून येऊन त्यांचा क्रमाक्रमानें जगांत प्रसार झाला.

४. वर प्रस्तुत शास्त्राची उत्पत्ति व प्रसार कसा झाला याविषयी लिहिलें, आतां त्याचा पूर्वापारपासून प्रचार कसा चालत आला आहे तो पाहूं. मागें सांगितलें आहेच कीं, या शास्त्राची माहिती फार प्राचीन काळच्या राष्ट्रांसही होती; तेव्हां यावरून स्पष्ट आहे कीं ग्रहनक्षत्रादिकांचें माहात्म्य तेव्हांपासून चालत आलें आहे. आणि आलीकडच्या कालापेक्षां तो मागला काळच कोणत्याही प्रकारचा विश्वास विशेष दृढ बसण्यास पुष्कळ कारणभूत होता हें उघड आहे. कारण एक तर दिवसेंदिवस जगांत ज्ञानाचा अधिकाधिक प्रसार होत चालला आहे, तेव्हां समंजसतेच्या संबंधानें पूर्वींच्या काळाला व आतांला पुष्कळच फेर आहे. दुसरें असें कीं, दिवसेंदिवस मनुष्य अधिक शहाणें व लबाड होत चालल्यामुळें पूर्वींच्यासारखा भोळेपणा व भाविकपणा आतां कोठेंही राहिला नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं, प्राचीन काळीं अर्वाचीन काळाइतकें सृष्टिज्ञान चोहोंकडे फैलावलें नसल्यामुळें सृष्टींत कांहीं उत्पात किंवा अपूर्व चमत्कार एकाएकीं घडून आले असतां मागल्याप्रमाणें आतां लोक भयभीत होऊन जात नाहींत. ज्या गोष्टींचें आतां कोणास कांहींही वाटत नाहीं त्यांचाच पूर्वींच्या लोकांस केवढा धाक वाटत असे हें पाहून मोठी मौज वाटते! ग्रीस देशाच्या इतिहासांत अशी एक गोष्ट लिहिलेली आढळते कीं, एशिया मैनर प्रांतांत पूर्वीं लिडिया आणि मीडिया नांवाचीं दोन राज्यें होतीं. यांचीं निकट संबंधामुळें वरचेवर परस्पर युद्धें होत. एकदां असें झालें कीं, दोन्हीं पक्षांचीं दळें समरांगणांत समोरासमोर उभीं राहून आतां चकमक उडावी इतक्यांत सूर्यास ग्रहण लागून खग्रस पडत चालला. होतां होतां पूर्ण ग्रास होऊन सगळ्या रणभूमीवर ठिक्कर काळोख पडला. नक्षत्रें पुन: दिसूं लागलीं. पशुपक्ष्यादि प्राणिजात व वनस्पतिवर्ग हीं एकाएकीं भयचकित झाल्यासारखीं होऊन क्षणभर व्यापारशून्य व स्तब्ध झालीं. संपूर्ण सृष्टि अतिशयित उदास व भयाण वाटूं लागली. सारांश, तो अपूर्व देखावा पाहून दोहों पक्षांचे वीर भयानें अगदीं गडबडून गेले, आणि आपणांवर ईश्वराचा अत्यंत क्षोभ झाला असें मानून दोन्ही सैन्यांनीं युद्धाचा संकल्प तात्काळ सोडून दिला आणि तीं परत आपआपल्या स्थलास गेलीं.[१] कोलंबसाविषयींही अशी एक गोष्ट वाचण्यांत आली आहे कीं, तो अमेरिकेजवळील एका बेटांत असतां लवकरच चंद्रग्रहण येणारें आहे असें जाणून तेथील लोकांस आपले अगदीं आज्ञांकित करून टाकण्याचा त्यानें त्या ग्रहणावरून बेत योजला. तो असा कीं, ते लोक आपणास पूर्वींप्रमाणें न भजतां आपली अंमळ अवज्ञा करूं लागले असें पाहून त्यानें त्यांच्या मनांत दहशत बसण्याकरतां त्यांस

१. सूर्याचें खग्रास ग्रहण इतिहासप्रसिद्ध असणारें असें हें पहिलें होय. हें इ० स० च्या पूर्वी ५८४ व्या वर्षी घडलें. हेंच ग्रहण थेल्स् नामक ग्रीक् पंडितानें आधीं वर्तवून ठेवलें होतें, यावरून वरील दोन प्रांतांतील लोकांपेक्षां त्या वेळींही ग्रीक् लोक अधिक ज्ञानसंपन्न होते हें स्पष्ट दिसतें.

असें कळवलें कीं, तुमची वर्तणूक आलीकडे अगदीं गैर होत चालली आहे तर मी याबद्दल देवाच्या कानावर घालून तुह्मांस शासन करवीन. अशी त्यांस धमकी देऊन ग्रहणाच्या दिवशीं त्यानें त्यांस सांगितलें कीं, तुह्मी अजून माझें ऐकत नाहीं,तर पाहा आज रात्रीं मी आपलें सामर्थ्य तुमच्या चांगलें ढळढळीत प्रत्ययास आणून देतों. मग पौर्णिमेचा चंद्र नेहेमीप्रमाणें अत्यंत देदीप्यमान उगवला असतां कांहीं वेळानें तो काळा होत जातांना जेव्हां त्या बेटांतील लोकांनीं पाहिला, तेव्हां त्यांस मोठी धास्ती पडून ते कोलंबसापाशीं मोठ्या नम्रपणानें आले, आणि त्याच्या पायां पडून आपल्याबद्दल देवापाशीं रदबदली करण्याविषयीं ते त्याची विनवणी करूं लागले. कोलंबसानें त्यांचें बोलणें मान्य करून सांगितलें कीं, जर तुह्मांस खरोखरच पश्चात्ताप झाला असेल तर तुमचें संकट दूर करण्याविषयीं मी पुनः देवाची प्रार्थना करतों. असें ह्मणून तो प्रार्थना करण्याचे निमित्तानें आपले खोलींत एकांतीं गेला. मग कांहीं वेळानें सृष्टिनियमाप्रमाणें ग्रहण सुटलेंच; पण तें कोलंबसाच्या योगानें झालें अशी त्या अडाणी लोकांची खात्री होऊन तेव्हांपासून ते कोलंबसास पुष्कळच मान देऊं लागले. असो; तर याप्रमाणें सूर्याच्या व चंद्राच्या ग्रहणांची वास्तविक उपपत्ति माहीत नसल्यामुळें प्राचीन काळीं त्यांचें लोकांस इतकें भय वाटत असे. असाच प्रकार धूमकेतूंचा. हे तर वरील ग्रहणांहूनही क्वचित् येणारे असल्यामुळें व यांचा आकारही मोठा विचित्र असल्यामुळें यांचा वरच्याहूनही धाक लोकांस पडे. हीं शेंडीं नक्षत्रें आकाशांत दिसूं लागलीं कीं, देशांत दुष्काळ, सांथी, लढाया, धरणीकंप वगैरे प्रलय कांहीं तरी व्हावयाचेच अशी साऱ्या जगाची समजूत होऊन बसली आहे. असो तर याप्रमाणें सृष्टींतील चमत्कारांचें यथावत् स्वरूप मागील काळच्या लोकांस समजत नसल्यामुळें ज्योतिषावर वगैरे त्यांचा सर्वथैव निर्धार असे. शिवाय दुसरें असें कीं, ज्योतिषांतील कांहीं भागांची ह्मणजे ग्रहणांची वगैरे लोकांस नेहेमी बरोबर प्रचीति येत असे; तेव्हां इतर भागांसही त्याप्रमाणेंच खरें मानणें त्यांस भाग पडे. आतां जसा त्या शास्त्रांतील खऱ्या खोट्या भागांचा साफ निकाल झाला आहे तसें पूर्वी नसल्यामुळें संदेहात्मक भागांवरही लोकमतें निश्चयात्मकताच येत असे. तर याप्रमाणें प्राचीनकाळीं ग्रहनक्षत्रादिकांच्या शुभाशुभत्वावर लोकांचा पक्का विश्वास बसून राहिला होता. आणि पुढें हळू हळू धर्मांत व लोकव्यवहारांत ज्योतिष शिरून मुहूर्तांचा वगैरे जेव्हां विचार होऊं लागला, तेव्हां वरील विश्वासास तर अधिकच बळकटी आली. ती अशी कीं, वरील विश्वास हें धर्माचें व लोकाचाराचें एक कलमच बनून जाऊन त्याचा अभाव हें नास्तिकपणाचें व तऱ्हेवाईकपणाचें चिन्ह झालें. असो; तर ज्योतिषाचें प्राबल्य सर्व जुन्या राष्ट्रांत जें इतकें माजलें त्याचीं कारणें वर सांगितल्याप्रमाणें होत. हें प्राबल्य अजूनही सर्वथैव मोडलेंसें ह्मणतां येत नाहीं. सुधारलेले ह्मणवणाऱ्या देशांतूनही वरील प्रकार आढळतातच आणि त्यांतून आमच्या देशांत तर कांहीं विचारूंच नये! विद्वान् अविद्वान् वगैरे सर्व लोकांचा प्रस्तुत विषयावर केवढा विश्वास आढळतो, व त्याचा प्रचार किती बारीक गोष्टींपर्यंत गेला आहे याची माहिती आमच्या वाचकांपैकीं कोणासही नवी द्यावयास पाहिजे असें नाहीं.

५. येथपर्यंत प्रस्तुत विषयाचें उपोद्घातरूपानें कांहीं विवेचन झालें. आतां मुख्य विषयाविषयींच विचार करूं;—ह्मणजे ज्योतिषाची लोकभ्रमांत कां गणना केली याचीं कारणें लिहितों. हें करण्याच्या अगोदर पुढील प्रतिपादनावर येणाऱ्या एका आक्षेपाचें निवारण केलें पाहिजे. तो हा कीं, यापुढें ज्योतिषाच्या विरुद्ध जें आह्मी मत देणार तें त्या विषयावरील ग्रंथ वाचल्याशिवाय अगोदरच देण्यास आह्मांस अधिकार काय? 'मुहूर्तमार्तंड' 'बृहज्जातक' वगैरे ग्रंथांचें यथास्थित अध्ययन करून त्याप्रमाणें गणितें करून त्यांचा ठोका जेव्हां पहावा, तेव्हां मग त्यांच्या खरेखोटेपणाविषयीं बोलावें. आधीं बोलण्यांत काय जीव! असा वाद जर कोणी प्रस्तुत विषयाचे कैवारी घेतील तर त्यांस आमचें उत्तर असें आहे कीं मागील दोन खेपेस जसे आह्मीं भूतविद्या किंवा शकुनविद्या न शिकतां केवळ बारचौघांच्या समजुतींवरूनच अभिप्राय दिले त्याचप्रमाणें प्रस्तुत विद्येविषयींही होण्यासारखें आहे, ह्मणजे आकाशांतील गोलांच्या गतींवर मनुष्यास होणाऱ्या इष्टानिष्ट गोष्टींचें बस्तान असण्याचा संभव किती, व ज्योतिष्यांनीं केलेल्या गणितांचा ठोकताळा किती वेळां बरोबर उतरतो, या दोन गोष्टींचा शोधक बुद्धीनें जो अंमळ विचार करील त्यास प्रस्तुत विषयावर निर्णय देण्यास फार आयास पडणार नाहींत. आणि हा निर्णय कोणी मनुष्यानें वरील ज्योतिषग्रंथ मुळींच न पाहतां जरी दिला, तरी तसें असल्यानें त्याच्या निर्णयास यत्किंचितही दुर्बलत्व येणारें आहे असें नाहीं.

६. तर आतां वरील दोन गोष्टींविषयीं यथानुक्रम विचार करूं. पहिली गोष्ट ही कीं, अंतरालांतील गोल आणि या आपल्या गोलावर जीं आपण मनुष्यें आहों यांचीं संसारकृत्यें यांचा परस्पर कांहीं संबंध आहे कीं नाहीं. अशा प्रश्नांवर निश्चयात्मक उत्तर देणें फार कठिण आहे; कां कीं, सगळ्या सृष्टीचा परस्पर किती संबंध आहे किंवा मुळींच नाहीं वगैरे गोष्टींविषयीं अल्पज्ञ जो मनुष्य त्यास कसें ज्ञान व्हावें! या सर्व गोष्टी एका सृष्टिकर्त्यास मात्र माहीत! असो; पण येवढें खरें आहे कीं, असा जर कांहीं विचित्र संबंध असलाच, तर तो मनुष्यास कळण्याचा बिलकुल मार्ग नाहीं. आणि हल्लीं जे संबंध ज्योतिषग्रंथांत लिहून ठेवले आहेत ते केवळ काल्पनिक होत. ह्मणजे ग्रहनक्षत्रादिकांचा अमुक अमुक योग आला असतां अमुक अमुक व्हावें असें, तशी गोष्ट केवळ यदृच्छेनें एक दोन वेळां घडली असतां ज्योतिषकारांनीं लिहून ठेवलें असावें इतकेंच दिसतें. याच्या पलीकडे तसल्या नियमांत कांहीं तथ्य नाहीं. याखेरीज दुसऱ्याही आणखी कित्येक गोष्टी मनांत येतात, कीं ज्यांवरून अमुक अमुक ग्रह आला असतां अमक्या अमक्या मनुष्यास वाईट वगैरे सर्व निवळ भ्रांति आहे अशी खात्री होते. पाहा कीं, आपल्या भाषेंतील ह्मणीप्रमाणें दररोज सव्वा लक्षाची घडामोड आहे, ह्मणजे प्रतिदिवशीं लाखों मनुष्यें जन्मास येत आहेत आणि लाखों मरण पावताहेत. आतां या लाखांमध्यें अगदीं त्याच पळास किंबहुना विपळास जन्मलेलीं मनुष्यें किती सांपडतील बरें? समजा कीं, आपण एक विवक्षित काळ धरला, आणि त्याच काळीं अगदीं बरोबर जन्मास आलेलीं एक दहा हजार मनुष्यें घेतलीं. आतां ज्योतिषविद्येच्या सिद्धांताप्रमाणें ह्मटलें ह्मणजे या दहा हजार मनुष्यांचे जन्म-

काळचे योग अगदीं सारखे असल्यामुळें त्यांस पुढील संसारांत सारख्याच बऱ्या वाईट गोष्टी घडून त्या सर्वांची आयुष्यमर्यादाही अगदीं सारखी असायास पाहिजे. पण अशी प्रचीति कधीं तरी येते काय? अमुक अमुक दोन मनुष्यांस सारख्याच विपत्ति आल्या व सारखींच सुखें प्राप्त झालीं असें कधीं कोणाच्या ऐकण्यांत आलें आहे? ज्यास त्यास बहुतकरून ज्याच्या त्याच्या बऱ्या वाईट कृतीप्रमाणें बरेवाईट परिणाम आजपर्यंत घडत आले आहेतच. जी रास व जें नक्षत्र एकास रंकाचा राजा करतें तीच रास व तेंच नक्षत्र दुसऱ्यास राज्यपदावरून खालीं ढकलून देतें. तेव्हां यावरून हें स्पष्ट दिसत नाहीं काय, कीं, ज्या अर्थी वरील नक्षत्रांपासून व नक्षत्रराशींपासून एकेच प्रसंगीं अशीं परस्परविरुद्ध कार्यें घडतात त्या अर्थी त्या प्रसंगीं त्यांवर कारणत्वाचा आरोप करणें हें केवळ असमंजस होय.

इंग्रेजी ज्योतिषाची—ह्मणजे प्राचीन काळच्या ज्योतिषावर इंग्रेज वगैरे लोकांनीं अलीकडे जे पुष्कळ नवे नवे चमत्कारिक शोध केले आहेत त्यांची—ज्यांस माहिती असेल त्यांस प्रस्तुत विषयावर आणखीही कांहीं चमत्कारिक आक्षेप काढतां येतील. ते असेः आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस बहुधा माहीत असेलच कीं, गेल्या शंभर वर्षांत पुष्कळच नव्या ग्रहांचा शोध लागला आहे. इ० स० १७८१ सालापर्यंत साऱ्या जगास माहीत असलेले ग्रह ह्मटले ह्मणजे बुध, शुक्र, मंगळ, गुरु आणि शनि असे पांचच काय ते होते. पण तेव्हांपासून आजपर्यंत एकामागून एक असे नवे ग्रह सांपडतां सांपडतां सध्यां त्यांची संख्या शंभरांवर गेली आहे; आणि यापुढें आणखी कितीकांचा शोध लागेल हेंही सांगवत नाहीं. मग या गोष्टीवरून ही एक मोठी शंका प्राप्त होत नाहीं काय, कीं जर वर सांगितल्या पांचांचींच फळें सगळ्या जगाला बाधतात तर या बाकीच्या मंडळीचींही कां बाधूं नयेत? पूर्वीच्या ज्योतिष्यांस न दिसले ह्मणून हे सर्व नवे ग्रह सगळ्यांच्या राशीस लागायास चुकले असतील काय? बाकीच्यांच्या प्रमाणेंच यांनींही शक्त्यनुसार जगास पीडा व सुख हीं दिलीं असतीलच. पण चमत्कार पाहा कीं, गेल्या शंभर वर्षांपर्यंत पांचांची मात्र गणना होऊन बाकीची येवढी मंडळी धड जमेंत ना खचींत!! आणि याखेरीज सूर्यमालेच्या आणखी दूर दूर कोंपऱ्यांत आजपर्यंत दृष्टि चुकवून जे कोणी बसले असतील ते निराळेच! दुसरा आक्षेप असा कीं, आपली पृथ्वी ही ग्रहगणांतच मोडते; ह्मणजे सूर्यमालेंत पहिला ग्रह बुध, दुसरा शुक्र आणि तिसरी पृथ्वी होय. तेव्हां यावरून सहज ध्यानांत येईल कीं, या गोलावरील लोकांस जसा बुधाचा, शुक्राचा, मंगळाचा धाक वाटतो, त्याप्रमाणेंच वरील ग्रहांवर राहणाऱ्या लोकांसही (लोक असले तर!) आमच्या पृथ्वीचा धाक वाटत असेल. तेव्हां ज्योतिष्यांनीं गणित करतांना आपल्या पायांखालच्या ग्रहाचेंही फळ वर्तवलें पाहिजे!! तें वगळतां कामा नये!

आणखी असें पाहा कीं, ग्रहांच्या गतीवर मनुष्यमात्राच्या सुखदुःखाचें जर अवश्य अवलंबन आहे, तर जो प्रकार एके देशांत आढळावा तोच सर्वत्रही आढळण्यांत यावा हें न्यायाच्या दृष्टीनें युक्त आहे कीं नाहीं? जर आहे, तर तसा प्रकार दृष्टीस पडतो काय?

आमच्या देशांत जर बारावा बृहस्पति वाईट, अमुक स्थानीं असलेला मंगळ चांगला, तर तसेंच चोहोंकडेही लागू पडावें. पण निरनिराळ्या राष्ट्रांतील ज्योतिषविद्येचे प्रकार पाहिले तर ते सारखेच जमतील असें वाटत नाहीं. एका देशांत ज्या स्थानाचा जो ग्रह इष्ट किंवा अनिष्टकारक मानला असेल त्याच स्थानाचा तोच ग्रह दुसऱ्या देशीं विपरीत असेल. शिवाय वरील ग्रहांची सर्वांवर सारखीच दृष्टि असावी. एका मनुष्यास जर त्यापासून पीडा झाली तर दुसऱ्यासही ती अवश्य व्हावयासच पाहिजे. पण असें कोठें आढळतें? येथें कोणाच्या राशीवर शनि महाराजांची स्वारी वळली की, त्यांच्या प्रीत्यर्थ लोहदान, तिलदान वगैरे हजारों धर्मकृत्यें केलीं तरी त्यांचा रोष कमी होत नाहीं; पण तीच स्वारी इंग्लंडांतल्या वगैरे मनुष्यांच्या बिलकुल वाटेस न जातां खुशाल आल्या वाटेनें चालती होते. तेव्हां या त्यांच्या पंक्तिप्रपंचाचें काय बरें बीज असावें? ज्या अत्युग्र ग्रहानें प्रत्यक्ष शंकरावरही दोन तीन घटका आपला प्रभाव गाजवला, ज्याची दृष्टि लंकापतीच्या सिंहासनावर सारखी लागली असतां लवकरच चौदाचौकड्यांचें राज्य फडशा होऊन गेलें, त्याचेंच सामर्थ्य यःकश्चित् परद्वीपस्थ मनुष्यांवर चालूं नये हें केवढें आश्चर्य! तेव्हां एकंदरींत 'भितऱ्यापाठीं ब्रह्मराक्षस' हीं म्हण मागील दोन लोकभ्रमांच्या संबंधानें जशी लागू पडते तशीच ती प्रस्तुतच्या संबंधानेंही पडते असें सहजच म्हणणें येतें.

७. आतां प्रस्तुत विषयाच्या तर्फेचें दुसरें प्रमाण जो प्रत्यक्ष अनुभव त्याविषयीं विचार करूं. हें प्रमाणही वरच्यासारखेंच प्रकृत विषयाचें खरेंपण सिद्ध करण्यास चांगलेंसें उपयोगीं पडणार नाहीं, हें सर्वांस स्वतःच्या प्रचीतीवरून बहुधां माहीत असेलच. पाहा कीं, जन्मपत्रिका, वर्षफल, मुहूर्त, प्रश्न वगैरे जे ज्योतिष्यांचे भविष्यवादाचे अनेक प्रकार असतात त्यांतून सर्वांशीं बरोबर प्रत्ययास उतरलेला एक तरी सांपडतो काय? अमुक अमुक गोष्ट अमुक अमुक वेळीं घडेल असें सांगितलें, आणि तिचा नेमका ठोका आला, असें दोन चारदां तरी झालेलें कोणाच्या ध्यानीं असेल? अशा गोष्टी कदाचित् एखाद्या दुसऱ्या वेळीं झालेल्या फार तर कोणीं पाहिल्या असतील; पण ज्या अर्थी त्या नेहेमी न होतां एखाद्या दुसऱ्या वेळेसच काय त्या घडतात, त्या अर्थी त्यांवर नियम बांधतां न येऊन त्या केवळ यदृच्छेनेंच घडल्या असें मानायला नको काय? अर्थात् असेंच मानलें पाहिजे; त्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण असें नसून, समजा कीं पुढें होणाऱ्या गोष्टींचें ज्ञान होण्याचा मार्ग मनुष्यास सांपडला, तर त्यापासून केवढा उपयोग होईल बरें! सर्व मनुष्यांस व विशेषतः राजकारणी पुरुषांस तर, अशा ज्ञानापासून आपलें केवढें हित करून घेतां येईल? सध्यांच्या अज्ञान स्थितींत जसें करायाला जावें एक आणि होतें एक, दुसऱ्यास आपण मोठ्या युक्तीनें डावपेंच घालायला जावें, आणि मधेंच कांहीं अकल्पित गोष्टी घडून आपल्याच तंगड्या आपल्या गळ्यांत याव्या, असे प्रकार भावी गोष्टींचें ज्ञान आपणांस झालें असतां अगदीं टाळतां येतील हें उघड आहे. असो; तर याप्रमाणें भविष्यकाळाचें ज्ञान मनुष्यास अत्यंत हितावह होणारें आहे; आणि हें प्राप्त करून घेण्याचा एखादा खरा मार्ग जर आजपर्यंत कोणास उमगला असता, तर त्याच्या शोधार्थ लक्षावधि लोकांचे प्रयत्न सुरू झाले असते,

यांत अगदीं संशय नाहीं. पण प्रस्तुतच्या ज्योतिष-विद्येसारखे जे कांहीं मार्ग चोहोंकडे प्रसिद्ध आहेत ते केवळ अनिश्चित होत, वास्तव यांच्यावर भोळे व भाविक अशा लोकांखेरीज कोणाचाही पक्का विश्वास जडत नाहीं. असो; एकंदरींत हें भविष्यज्ञान ईश्वरानें केवळ आपल्याकडेच ठेवून तें मनुष्यास होण्याचा बिलकुल मार्ग ठेवला नाहीं हें फार चांगलें झालें असेंही आह्मी समजतों. कारण मनुष्याचा स्वभाव एकंदरींत पाहतां मोठासा सुधा आहे असें नाहीं; आणि त्यांतून वरील ज्ञान त्यास अनुकूल झालें तर जगांत आणखी किती अनर्थ होतील हें सांगायाला नको! सारांश, भविष्यकाळीं होणाऱ्या गोष्टींचें ज्ञान मनुष्यास होण्याचा अद्याप एकही मार्ग कोणास सांपडला नाहीं; आणि तो आजपर्यंत न सांपडला व पुढेंही कधीं सांपडूं नये यांतच एकंदर जगाचा निभाव आहे!

दुसरें प्रत्यंतर असें पाहा कीं, ज्योतिषविद्येवरून पुढें होणाऱ्या गोष्टी जर सगळ्या बिनचूक कळतात, तर मग इतर सामान्य मनुष्याप्रमाणेंच ज्योतिष्यांवरही संसारांतील संकटें कां गुदरतात! जर त्यांस ग्रहांच्या गतीवरून भावी संकटें अगोदर समजतात, व त्यांचा प्रतिकार कसा करावा हेंही जर त्यांस माहीत असतें, तर मग सर्व उपद्रवांपासून सर्व विपत्तींपासून वगैरे ते अगदीं मुक्त असावे कीं नाहीं! पण असा प्रकार कोठें तरी आढळतो काय! असो; तेव्हां या सर्व गोष्टींवरून एकंदरींत स्पष्ट दिसतें कीं, जोशांचा ठोका वगैरे सर्व लोकांचीं बोलणीं केवळ भ्रांतिमूलक होत. मागें शकुनांच्या निबंधांत सांगितलेल्या नेपचूनच्या गोष्टीप्रमाणें अज्ञान लोक फसले जातात इतकेंच काय तें. ह्मणजे जेवढ्या गोष्टी पटतात तेवढ्या मात्र घेऊन लोक त्यांवरून एकंदर सिद्धांत ठरवतात हीच त्यांची मोठी चूक असते. बाकी, जो मनुष्य प्रांजल बुद्धीनें पटलेलीं व न पटलेलीं अशीं दोन्हीही उदाहरणें घेऊन त्या दोहोंवरून सत्यासत्यत्वाचा निवाडा करूं पाहील त्याच्या ध्यानांत खरें तत्त्व तेव्हांच आल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

याप्रमाणें प्रस्तुत विषयावर दोन प्रकारचीं प्रमाणें दाखवलीं. त्यांवरून आमच्या समंजस वाचकांची खात्री झाल्याविना राहणार नाहीं कीं, लहान मोठ्या सर्व कृत्यांत तिथि, वार, नक्षत्रें वगैरेंचीं फलें पाहण्याचा जो प्रघात आपल्या देशांत आज हजारों वर्षे चालत आला आहे तो केवळ भ्रमात्मक होय. अंतराळांत जे लक्षावधि गोल फिरताहेत त्यांच्या अनादिसिद्ध गतीचा आणि आपल्या या यःकश्चित् क्षुद्र गोलावर कीटकवत् इतस्ततः संचार करणारे जे आपण मानवी प्राणी यांच्या संसारकृत्यांचा परस्पर संबंध असावा हें मुळींच संभवत नाहीं. जगन्नियंत्याच्या इच्छामात्रेंकरून प्रेरित होत्सातीं वरील तेजें आपापलीं नियतकालिक परिभ्रमणें अंतरिक्षांत परिपूर्ण करीत आहेत;—त्यांस या आमच्या लहानशा जगांत आमच्या मतें मोठमोठ्या उलाढाली झाल्या तरी त्यांशीं काय कर्तव्य आहे? तीं कोणीकडे आणि आह्मी कोणीकडे! आमचे मल्हारराव महाराज पदच्युत होऊन जन्मकैदेंत गेले, किंवा उद्यां रशियन् लोकांनीं सगळा अफगाणिस्थान सर केला, तर या गोष्टीचा पुकारा सगळ्या जगभर करण्यास शनीनें अमुक स्थानीं यावें, गुरूनें अमुक अमुक जागा पतकरावी, सूर्यानें

आपल्या भोंवतीं खळें उत्पन्न करावें, किंवा एखाद्या धूमकेतूनें उदयास यावें येवढी खटपट वरील खस्थ पदार्थांस करण्याची काय गरज आहे? बडोद्याचे गायकवाड, सेंट् पिटर्सबर्गचे झार, यांची कीर्ति सूर्यमालेंतील दूरदूरच्या ग्रहांपर्यंतही गेली आहे काय? आणि एकाचा अपकर्ष व दुसऱ्याचा उत्कर्ष या गोष्टी एकंदर सृष्टीच्या मानानें पाहतां येवढ्या महत्त्वाच्या आहेत काय, कीं खरेंखोटें दुःखप्रदर्शन किंवा आनंदप्रदर्शन करण्यास येथें जसे जागोजाग लोक जमतात त्याचप्रमाणें आकाशांतही चोहोंकडे एकदम मोठा हाहाकार व्हावा! आम्हांस तर वाटतें कीं, एकंदर विश्वाच्या मानानें पाहतां आमच्या पृथ्वीवरील मोठमोठे बादशाहा व सार्वभौम राजे यांची योग्यता आणि मधाच्या पोळ्यावर स्वामित्व गाजविणारी राणी माशी किंवा वारुळाची नायकीण राणी मुंगी यांची योग्यता या परस्पर सारख्याच होत!! ज्या कालीं पृथ्वी ही अवघ्या विश्वाचा मध्य असून सर्व ग्रहगण व ज्योतिर्गण तिच्याभोंवतीं सतत भ्रमण करताहेत अशी एकंदर जगाची समजूत होती, व सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांचें वास्तविक परिमाण माहीत नसून सूर्यमालेची यथावत् स्थिति लोकांत प्रगट झाली नव्हती, तेव्हां वरील कल्पना होत्या हें ठीकच होतें. त्या वेळेस जग काय तें आपली पृथ्वी मात्र मानली असून बाकीचे सर्व खस्थ पदार्थ हे केवळ तीवर राहणाऱ्या प्राणिमात्राकरतां व विशेषतः मनुष्यांकरतांच निर्माण केले आहेत असें सर्व समजत असत.[१] जसें एखादें मोठें मंदिर असावें आणि त्यांत हजारों पदार्थ कांहीं उपयोगाकरतां व कांहीं केवळ शोभेकरतां ठेवले असावे, त्याचप्रमाणें आपली पृथ्वी ही देवानें मनुष्याकरतां बांधलेला एक मोठा महाल असून सूर्यचंद्र हे त्यास प्रकाश देण्याकरतां व नक्षत्रें, ग्रह वगैरे हे केवळ शोभेकरतां उत्पन्न केले आहेत अशी पुरातन काळच्या लोकांची समजूत होती. अशा वेळीं पृथ्वीवरील मोठमोठे राजे यांचें एकंदर विश्वाच्या मानानें—( त्या वेळेस एकंदर विश्व ह्मणजे पृथ्वीच काय ती! ) मोठेंच महत्त्व असून त्यांस घडलेल्या इष्टानिष्ट गोष्टींचीं चिन्हें सगळ्या सृष्टींत दिसावीं हें साहजिकच होतें; ह्मणजे प्राचीन महाकाव्यांतून जीं वरील प्रसंगीं उत्पातादिकांचीं वर्णनें असतात तीं त्या वेळच्या लोकांस तशीं वाटावीं हें सहजच आहे. पण हल्लींच्या काळीं वरील मान सगळें अगदींच फिरून गेलें आहे. ह्मणजे सूर्य व त्याच्या भोंवतालचें आपली पृथ्वी आदिकरून ग्रहांचें लटांबर यांचीही एकंदर विश्वांत कोणीकडच्या कोणीकडे मुळींच दाद लागत नाहीं. समुद्रावरील वाळवंटांतला एखादा खडा नाहींसा झाला असतां जसा तो कोणास कधींही उमगला जाणार नाहीं, त्याचप्रमाणें अवघ्या विश्वाच्या एकंदर अवा-

१. ज्योतिषशास्त्रासंबंधीं पुष्कळ चमत्कारिक नवे शोध करून तें पूर्णत्वास आणल्याचा मान जरी खिस्ती लोकांकडे आहे, तरी त्यांच्या 'पवित्र शास्त्रां'त या शास्त्राचें अज्ञान भरपूर दिसून येतें. यास वरील 'ईश्वरप्रणीत शुभवर्तमानां'ची पहिली ओवीच मोठें प्रमाण आहे. ही ओवी पुष्कळांस माहीत असेलचः—" ईश्वरानें आदी आकाशें व पृथ्वी यांस उत्पन्न केलें."

वरील शब्द भाषांतरकाराच्या महाराष्ट्रभाषाभिज्ञतेचें जसें उत्कृष्ट प्रमाण होत; त्याप्रमाणेंच 'पवित्र शास्त्रा'चा खरा कर्ता कोण हेंही ते साऱ्या जगास विदित करीत आहेत! या दिल्लीदरवाज्यावरूनच आंतील इमारतीची बळकटी सर्वांस दिसून येईलच!!

द्व्य विस्तारांतून आमची सूर्यमालाची माला अजीबात गडप जरी झाली तरी सुद्धां कांहीं समजण्यांत येणार नाहीं असें ज्योतिषवेत्ते ह्मणतात ! मग येवढ्या प्रचंड सूर्याचें व शनि-गुरु-सारख्या शंभर ग्रहांची ज्या विश्वांत इतकी योग्यता तेथें आमच्या येवढ्याशा एका गोलाला कोण विचारतो ! आणि सरतेशेवटीं या यःकश्चित् गोळ्यावर तीन साडेतीन हातांची आपली भव्य मूर्ति मिरवणारे, 'स्टार् ऑफ् इंडिया' नांवाचे दहा पांच चांद अंगावर चमकणारे आणि 'नजर रख्खो' ह्मणून मोठ्या थाटांत ललकारत जाणारे, अशा आमच्या सेनाखासखेलांची किंवा तशीच झार महाराजांची स्वारी मनांत आणावी;—ह्मणजे ज्यांचें शुभाशुभ दाखविण्याकरतां नक्षत्रांनीं, ग्रहांनीं, धूमकेतूंनीं वगैरे नेहेमी जपत असलें पाहिजे, त्यांचा खरोखरीं पाहतां एकंदर सृष्टींत केवढा बडिवार आहे याची कल्पना वाचकांच्या मनावर चांगली ठसल्याविना राहणार नाहीं ! !

वरील प्रतिपादनावरून आमच्या सर्व सुज्ञ वाचकांच्या मनांत येईल कीं, या भूतलावर क्षणमात्र इतस्ततः संचार करणारा जो कीटकप्राय मनुष्य त्याच्या भातुकलींतल्यासारख्या चुटपुटत्या गृहकृत्यांचा आणि आकाशांत फिरणाऱ्या ग्रहनक्षत्रादिकांचा बिलकुल संबंध नाहीं. यास्तव त्यांच्या योगायोगांचा त्यानें हर्षही मानूं नये व विषादही मनांत बाळगूं नये. गिरणींत काम करणाऱ्या मनुष्यांचें बरें वाईट होणें हें जसें भोंवतालीं फिरणाऱ्या शेंकडों चाकांच्या गतिवर नाहीं, किंवा चव्याळाच्या तबकडीवरून जाणाऱ्या मुंगीचें शुभाशुभ लंबकाच्या हेलकाव्यांवर किंवा आंतील चक्रांच्या फिरण्यावर नाहीं; त्याचप्रमाणें मनुष्याची या भूगोलावर स्थिति आहे. आकाशांत फिरणारीं तेजें हीं त्याच्या कल्याणाविषयीं अगर अकल्याणाविषयीं केवळ उदासीन होत. येथील लोकांस शनीचा येवढा निरंतर धाक वाटतो, पण गेल्या वर्षी कांहीं लोक तोफेच्या गोळ्यांत बसून असे चंद्रावर गेले होते तसेच पुढें एखादे वेळेस जर कोणी शनीवर जातील, तर तेथील लोकांस आमच्या विलक्षण व निरर्थक भयाचें मोठें आश्चर्य वाटेल; व आह्मी जसे त्यांच्या गोलास भितों तसेच तेही कदाचित् आमच्या ग्रहाच्या वक्रदृष्टीस थरथरां कांपत असतील ! ! असो; तर या सर्व गोष्टी मनांत आणल्या असतां आमच्या वाचकांची खात्री होईल कीं, ज्योतिषविद्येवर आजपर्यंत जो सर्व लोकांचा विश्वास पक्का जडला असे त्यास त्यांचें अज्ञान व बुद्धीचा अपक्वपणा हींच केवळ कारणें होतीं. हीं आतां पुष्कळांच्या ठायीं दूर झालीं असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं मागलि काळचा अज्ञानजन्य विश्वास अजून राहावा हें मुळींच संभवत नाहीं.

९. येथवर मुख्य विषयाचा बहुतेक विचार झाला; आतां आणखी एक दोन गोष्टींविषयीं लिहून हा निबंध आटपतों. एक ही कीं, वर प्रस्तुत विद्येचें आह्मी खंडन केलें यावरून तिचें प्रणयन करणारे व तिची पुढें वृद्धि करणारे जे होऊन गेले ते केवळ मूर्ख होते किंवा लोकांस फसवण्याच्याच हेतूनें त्यांनीं वरील ग्रंथ लिहिले असें ह्मणण्याचा आमचा बिलकुल रोंख नाहीं. उलटें आह्मी मागें एकदां सांगितलेंच आहे कीं, प्रस्तुत शास्त्राच्या उदयास ज्ञानप्राप्तीची मनुष्याची स्वाभाविक उत्कंठा हीच मुख्यतः कारण झाली; आणि तिचे योगानें पहिल्या पहिल्यानें जरी भ्रमाचा मात्र प्रसार झाला तरी पुढें त्या भ्रमांतूनच

खऱ्या शास्त्राचा प्रादुर्भाव झाला. यास्तव त्यांच्या ज्ञानसंपन्नतेच्या: काळीं जरी वरील शास्त्राचें विलक्षणत्व व असमंजसत्व पाहून आपणांस हसूं आलें, तरी त्यापासून पुढें परिणाम कोणते झाले या गोष्टीवरच मुख्यत्वेंकरून लक्ष देऊन त्या व्यर्थ श्रम पावलेल्या शोधकांस आपण विशेष मानच दिला पाहिजे. दुसरें असेंही आपण लक्षांत आणावें कीं, ते ज्या वेळीं जन्मास आले त्या वेळेस जग मूळच्या बाल्यावस्थेंतून नुकतेंच वर येऊं लागलें होतें, यास्तव हल्लींच्या इतका ज्ञानाचा प्रसार त्यावेळेस झाला नसल्याकारणानें वर वर्णिलेला भ्रम मनास जडणें हें केवळ साहजिकच होतें. पाहा कीं, सूर्याच्या व चंद्राच्या ग्रहणांची उपपत्ति ज्यास माहीत नाहीं त्यास त्या दोहोंचीं बिंबें एकाएकीं काळीं ठिक्कर पडतांना पाहून मोठें आश्चर्य व भय वाटणार नाहीं काय ? त्यास वाटेल कीं, सृष्टीचा नेहेमीचा क्रम बदलून हा येवढा उत्पात एकाएकीं कशामुळें झाला असावा बरें ? सगळ्या राष्ट्रावर ईश्वराचा क्षोभ होऊन त्याचें दर्शक तर हें नसेल ना ? कोलंबसानें अटलांटिक् महासागरावर पहिल्यानें धाड घातली असतां होकायंत्राचा कांटा एकाएकीं उत्तरेकडचा दक्षिणेकडे वळतांना पाहून त्याच्या खलाशांस भय वाटलें तें जसें साहजिक होतें तसाच वरील प्रकार होय. या चमत्काराचें अजूनही कांहींच कारण उमगलें नाहीं; पण पुढें कांहीं काळानें जर तें उमगलें तर कोलंबसास व त्याच्या खलाशांस विनाकारण भय वाटल्याबद्दल हसणें हें त्या वेळेस जसें असमंजस होईल, किंवा सध्यां तें कारण उमगलें नसतांही तसें करणें हा जसा मूर्खपणा होय, तसाच वरचा प्रकार आहे. वरील ग्रहणांचें किंवा होकायंत्राचा कांटा ढळल्याचें आपणांस सध्यां जें भय वाटत नाहीं त्याचें कारण वरील प्रकार हळू हळू अंगवळणीं पडल्यासारखे झाले आहेत हें होय; व सर्वांस समजून आलें आहे कीं, यापासून कांहीं होत नाहीं. पण असे चमत्कार ज्या लोकांस पहिल्यानेंच दृष्टीस पडतात ते अत्यंत भयचकित होऊन जात असतील त्यांत कांहीं नवल नाहीं. दुसरें उदाहरण धूमकेतूंचें पाहा. यांचें भ्रमण सरासरी अनिश्चितच आहे; व त्यामुळें यांच्या कक्षा सुमारानेंही काढण्यास मोठ्या पटाईत ज्योतिष्यांसही मोठीच मारामार पडते. तेव्हां यांचें दर्शन आकाशांत जें कधीं कधीं घडतें तें अर्थातच अकल्पित घडून त्यांचें वास्तव्यही अनिश्चितच असतें. शिवाय यांचा आकारही बाकीच्या खस्थ पदार्थांहून अगदीं निराळा व तऱ्हेवाईक असल्यामुळें हे दिसूं लागले न लागले कीं सर्वांचें लक्ष यांच्याकडे लागतें. मग काकतालीयन्यायानें त्या देशांत किंवा आसपासच्या देशांत एखादा भयंकर उत्पात त्याच वेळेस सुरू असला किंवा पुढें लागलींच झाला, कीं लागलींच सर्वांची सहजच कल्पना बसते कीं, हें शेंडें नक्षत्र या उत्पाताचें सूचक होय. परस्पर केवळ असंबद्ध असणाऱ्या गोष्टींचाही असा जम बसवणें हा मनुष्याच्या मनाचा एक धर्मच होय; यास इंग्रेजींत 'आसोसिएशन् ऑफ् ऐडियाज्' [ कल्पनांची संगति ] असें ह्मणतात. ही संगति एकदां झाली ह्मणजे विरुद्ध प्रमाणें चांगलीं बळकट्टर दृष्टीस पडल्याखेरीज ती कधींही मोडली जात नाहीं; ह्मणजे मनानें घेतलेल्या कारणांचा व कार्यांचा असंबंध पुष्कळदां दृष्टीस पडल्याखेरीज वरील ग्रह नाहींसा होत नाहीं. असो; तर याप्रमाणें सूर्यचंद्रांचीं ग्रहणें व शेंडीं नक्षत्रें हीं कधींमधीं एखादे वेळेसच काय तीं दृष्टीस पडणारी असल्यामुळें वरच्यासारखी खोटी कल्पनासंगति

लोक जी करीत ती स्वाभाविक करीत. समजा कीं, दररोज रात्रीं एक दोन शेंडीं नक्षत्रें उगवावीं असें जर असतें; किंवा गुरूवर, शनीवर वगैरे[१] जसा प्रकार आहे त्याप्रमाणेंच या आपल्या पृथ्वीवरही दर रात्रीं चंद्रग्रहण असून सूर्यग्रहणेंही महिन्यांतून दहापांचदां व्हावीं असें जर असतें; तर बिचाऱ्या शेंडे नक्षत्रावरचा व राहूकेतूंवरचा आरोप केव्हांच उडून जाता, किंबहुना आरंभींच जडताना! आपला चंद्र कधीं अर्धा असतो, कधीं सगळा होतो, कधीं मुळींच नाहींसा होतो, याच्या जसा विलक्षणपणा कोणास कधींही वाटला नाहीं—कां कीं, तो सृष्टिक्रमच होय अशी तेव्हांच एकदम मनुष्याची समजूत होऊन बसली—त्याप्रमाणें वरील नक्षत्रांच्या लांब शेपटांचा व चंद्रसूर्यांवर अकस्मात् येणाऱ्या काळिमेचा कोणासही मुळींच अचंबा वाटताना! 'अतिपरिचयादवज्ञा' 'अति परिचय झाल्याच्या पोटीं अवज्ञा उत्पन्न होते' ही ह्मण लौकिकांत जशी खरी आहे तशीच चोहोंकडेही आहे. धूमकेतूची स्वारी कधीं मधीं एखादे वेळेस वीस पंचवीस वर्षांनीं दृष्टीस पडते, व पुन: प्रस्थानही लवकरच करते, त्यामुळें त्यांची साऱ्या दुनियेभर जी मानमरातब राहते ती पुन: पुन: आगमन केलें तर अगदीं राहणार नाहीं. 'इसापनीतीं'तील बेडकांच्या गोष्टीप्रमाणें त्यांचीही गत होईल. ह्मणजे जुपिटरानें आकाशांतून लांकडाचा ओंडा खालीं टाकला असतां तो पाण्यावर मोठ्यानें आदळल्यामुळें सगळे बेडूक जसे पहिल्यानें अगदीं चपापले व कोणी हूं कां चूं सुद्धां न करतां कांहीं वेळ आपआपल्या जागीं स्तब्ध होऊन राहिले; पण त्यांचा राजा कांहींच हालचाल करीनासें पाहून सर्व जसे हळू हळू त्याच्या जवळ आले—त्याच्या अंगावर चढूं लागले—त्याशीं खेळूं लागले—आणि लवकरच सर्वांस त्याच्या अतिशय मठ्ठपणाचा अगदीं त्रास येऊन त्यास कोणीच विचारीतनासे झाले, त्याचप्रमाणें धूमकेतूंचीही दुर्दशा झाली असती. असो; तर याप्रमाणें वरील अंतरिक्षांतील चमत्कार क्वचित् होणारे असल्यामुळें त्याकडे लोकांचें लक्ष फार लागे. आणि या पृथ्वीवर घडणाऱ्या घडामोडींचें सूत्र सगळें आकाशांत आहे अशी कल्पनाही मनुष्यास सहज होण्यासारखी असल्यामुळें ती सर्वांनीं उचलून प्रस्तुत शास्त्राचा जो सार्वत्रिक प्रचार आढळतो तो चोहोंकडे सुरू झाला असावा असें अनुमान होतें. तर याप्रमाणें ज्योतिषविद्या ज्यांनीं पहिल्यानें प्रवर्तविली त्यांनीं तसें करण्यांत आपला मूर्खपणा प्रगट केला किंवा जगास फसवण्याचा मार्ग काढला असें ह्मणणें अगदींच शोभत नाहीं.

१०. आतां सरते शेवटीं प्रस्तुत भ्रमरूप शास्त्रांतून उद्भवलेलें जें खरें ज्योतिष त्याची योग्यता व उपयोग यांविषयीं थोडेंसें लिहून हा विषय आटपतों. प्रस्तुत निबंधाच्या आरंभीं लिहिलेंच आहे कीं, या शास्त्रापासून कवि, तत्त्वज्ञ, व ईश्वरपरायण अशा तिघां प्रकारच्या

---

१. गुरूला चार चंद्र [ उपग्रह ] आहेत. वास्तव त्याच्या व सूर्याच्या मधोमध एका केंद्रांत आलेला असा त्यांपैकीं कोणी ना कोणी तरी असतोच. यामुळें दररात्रीं ह्मणजे नेहेमी [ कारण रात्रही कोठें ना कोठें तरी असायाचीच! ] गुरूवर चंद्रग्रहणाचा योग असतो. हीं ग्रहणें खलाशांस फार उपयोगी आहेत, व तीं त्यांच्या पंचांगांत नेहेमी दाखल केलेलीं असतात. याच गुरूच्या चंद्रग्रहणावरून दर्शनानुशासनांतील* एक मोठी गोष्ट सिद्ध झाली. ती गोष्ट प्रकाशाचा प्रसरणधर्म व गति ही होय. शनीला तर आठ उपग्रह आहेत!

* प्रकाश-शास्त्रांतील. 'संपादक'

मनुष्यांस अत्यंत आनंद होण्यासारखा आहे. तो असो. पहिल्यानें कवि. कवीचा विषय म्हटला म्हणजे कल्पनाशक्ति होय. म्हणजे जिजास जेणेंकरून चमत्कृति भासेल त्यांत ते रममाण होतात. ही चमत्कृति ज्योतिषशास्त्रांत जी आहे ती त्या शास्त्राचा विषय जें विश्व त्यासारखीच केवळ अपार आहे ! प्रत्येक राष्ट्राच्या कवींनीं सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांचीं वर्णनें किती निरनिराळ्या प्रकारांनीं केलीं आहेत, त्यांपासून उपमारूपकादि भांडार त्यांस किती ध्यावयास सांपडतें; व हिंदु, ग्रीक् वगैरे राष्ट्रांच्या पुराणग्रंथांतून वरील तेजांस दैवतें कल्पून त्यांविषयीं किती चमत्कारिक कथा लिहिल्या आहेत, हें सर्व जो मनांत आणील त्यास प्रस्तुत शास्त्राचा कवितेशीं किती निकट संबंध आहे तो चांगला लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. त्यांतून आलीकडे तर या शास्त्रांत जे शेंकडों नवे नवे शोध झाले आहेत व होत आहेत त्यांच्या योगानें तर कवींच्या कल्पनाशक्तीस रंजवण्याचें साधन याजमध्यें किती जास्त आलें आहे ! गुरूचे चंद्र, शनीचे उपग्रह व कडें, सूर्यावरचे डाग, धूमकेतूंचा लक्षावधि कोस लांबवर पसरलेला प्रकाशाचा झोत, इत्यादिकांचें दग्यंत्रद्वारां प्रत्यक्ष दर्शन झालें असतां कोणास मौज वाटणार नाहीं ? त्याप्रमाणेंच सूर्यमालेची एकंदर अवाढव्य रचना-तींतील ग्रहांचें आकारमान, मनास थक्क करून टाकणारा त्यांचा वेग, त्यांचीं अमर्याद अंतरें, कधीं न चुकणारी अशी सुयंत्र गति; हें सर्व मनांत आणलें असतां केवढा चमत्कार वाटतो ! सारांश, आडिसन् यानें आपल्या सर्वप्रसिद्ध निबंधांत 'चित्तचमत्कृती'चे जे तीन हेतु प्रतिपादन केले आहेत-एक महत्त्व, दुसरें सौंदर्य, आणि तिसरी विचित्रता-त्या सर्वांचा प्रस्तुत विषयांत पूर्ण समावेश होत असून तिन्हीही यांत अनंतत्वानें राहताहेत ! असो; आतां दुसरे तत्त्वज्ञ म्हणजे वस्तुमात्राचा तत्त्वतः शोध करणारे; अशांसही प्रकृत शास्त्रांतील सिद्धांत अत्यंत विस्मयास्पद वाटतील हें उघड आहे. लोकांस स्वतःसिद्ध वाटणाऱ्या गोष्टी, किंबहुना प्रत्यक्ष इंद्रियजन्य अनुभव, यांसही खोटीं करणारी जी सूर्याची स्थिरता, पृथ्वीचें भ्रमण, तिची अंतरालांत निराधार स्थिति, पदार्थमात्राचें आकर्षण करण्याची तिच्या अंगची शक्ति, —इत्यादि ज्योतिषांतील प्रमेयें त्यांचें सोपपत्तिक ज्ञान होऊन संपूर्ण सृष्टीचें नव्या ज्ञाननेत्रानें जेव्हां मनुष्य अवलोकन करूं लागतो तेव्हांचा त्याचा अधिकार काय सांगावा ! मोठ्या उंच पर्वताच्या शिखरावर उभा राहिलेल्या मनुष्याची नजर जशी खूप लांबवर पोंचून त्याचा दृक्प्रदेश वाढतो त्यासारखीच मनाच्या संबंधानें पाहतां वरील मनुष्याची स्थिति होय. म्हणजे त्याच्या ज्ञाननेत्राचा टप्पा सृष्टीच्या सीमेपर्यंत जाऊन पोंचतो असें म्हणायास चिंता नाहीं ! तसेंच सृष्टीचे अनेक गुप्त व्यापारही त्यास कळून सामान्य जनास अज्ञानास्तव ज्या गोष्टींचें खरें स्वरूप कांहींच कळत नाहीं, किंवा ज्याविषयीं विचार करूं गेलें असतां त्याची बुद्धि अगदीं गोंधळून जाते, किंवा ज्याचें त्यास अत्यंत भय वाटतें, त्या सर्वांचें यास सोपप-

१. सूर्य आकाशांतून एकाएकीं नाहींसा झाला असतां अजाणत्या लोकांस केवढें भय वाटण्यासारखें आहे याचें उदाहरण मागें [ पृ० २१० ] एक सांगितलेंच आहे. आतां बरच्याविरुद्ध एक उदाहरण ग्रीसच्या इतिहासांतील येथें सांगतों. अथेन्स आणि स्पार्टा या संस्थानांची लढाई चालली

[ पुढें चालू ]

तिक ज्ञान झालें असतां मुलाचें एखाद्या गोष्टीविषयीं वेड किंवा बाहुलीबाबत फार पाहून वयस्क मनुष्यास जसें हसूं येतें त्याप्रमाणेंच यासही होतें. असो; पण हें सर्व तरी वरील शास्त्र शिकण्याविषयींच झालें. त्या शास्त्रांत नवे नवे शोध करून त्याचें गुरुत्व ज्यांनीं आपणांकडे घेतलें त्या महाबुद्धिमान् पुरुषांचें माहात्म्य तर काय सांगावें ! थेल्स् नामें मागें सांगितलेल्या ग्रीक् पंडितानें इ० स० च्या पूर्वीं ५८४ च्या वर्षीचें खग्रास सूर्यग्रहण वर्तवून तें जेव्हां लोकांच्या बरोबर प्रत्ययास उतरलें असेल तेव्हां त्याच्या बुद्धिसामर्थ्याचा लोकांस केवढा अचंबा वाटला असेल, व त्यास स्वतः केवढा हर्ष झाला असेल ! ग्यालिलियोनें नवी दुर्बीण स्वतः तयार करून आकाशाचें जेव्हां पहिल्यानें संनिरीक्षण केलें, व पहिल्याच तडाक्यास गुरूचे उपग्रह, शनीचें कडें, सूर्यबिंबावरचे डाग, चंद्रावरील पर्वत,[2] ही लूट भूलोकास आणली, तेव्हां त्याच्या चित्तास केवढा उल्हास झाला असेल ! असेंच केप्लर्‌चे ग्रहांच्या गतींविषयीं सिद्ध करून दाखविलेले तीन नियम याच्या नांवावर ज्योतिषशास्त्रांत प्रसिद्ध आहेत. यांतील प्रत्येकाची सिद्धता करण्यास बारा वर्षांचीं वर्षें मनन खपावें लागलें. यांच्या योगानें ज्योतिषास किती पूर्णत्व आलें हें त्या शास्त्राच्या अभिज्ञांस चांगलें माहीत आहे. असो; या ज्योतिष्यानेंही वरील सिद्धांत पक्के ठरले असतां जो आनंद प्रदर्शित केला त्याचे उद्गार त्याच्या चरित्रांत सांपडतात. या आनंदभरांत त्यानें आपणास 'आकाशाचा नियंता' असें म्हटलें, व हा किताब आजपर्यंत तसाच त्याच्या नांवाबरोबर चालत आला आहे. पण या सर्वांहून मोठी गोष्ट म्हटली म्हणजे सर् ऐझाक् न्यूटन् याची. हा एके दिवशीं बागेंत बसला असतां एक फळ झाडावरून खालीं पडतांना पाहून तेवढ्याशा गोष्टीवर त्यानें

---

असतां एकदां असें झालें कीं, पहिल्या संस्थानानें दुरून चालून जाण्याकरतां एक मोठें आरमार तयार केलें. पण तें आतां निघणार इतक्यांत सूर्यास ग्रहण लागलें. त्याच्या योगानें अत्यंत भयभीत होऊन मुख्य गलबतावरील नाखोदा* हातांत सुकाणू धरीना. तेव्हां त्याच जहाजावर पेरिक्लीज होता, त्यानें त्याच्याकडे जाऊन त्याच्या डोळ्यांवर आपला झगा घातला, आणि म्हटलें, "यांत तुला कांहीं भयंकर दिसतें काय?" नाखोदा म्हणाला, 'नाहीं.' तव पेरिक्लीज म्हणाला, "अरे, मग यांत आणि या ग्रहणांत रे काय भेद आहे?—इतकेंच ना, कीं माझ्या झग्याहून फार मोठा पदार्थ तुझ्या दृष्टी-आड आला आहे!"

१. या ग्रहणाचें उलट गणित करतां हें वरील वर्षाच्या मे महिन्याच्या २८ वे तारखेस झालें असें समजतें !

२. या पर्वतांस उद्देशून मिल्टन् कवीनें आपल्या महाकाव्याच्या पहिल्या सर्गांत म्हटलें आहे—

——His ponderous shield,
Ethereal temper, massy, large and round,
Behind him cast; the broad circumference
Hung on his shoulders like the Moon, whose orb
Through optic glass the Tuscan artist views
At evening from the top of Fesole,
Or in Valdarno, to descry new lands,
Rivers or mountains in her spotty globe.

* नाखोदा—नाखवा, तांडेल, मुख्य नावाडी.          'सम्पादक'

केवढा विभु रचला हें सर्वांस विदित आहेच. ज्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमावर विशेषेंकरून त्याची कीर्ति आजपर्यंत चालत आली आहे व पुढेंही जगाचा अंत होईपर्यंत चालत राहील, त्याची सिद्धता पुष्कळ वर्षे गणित करून जेव्हां त्यास सांपडली, व त्यास हावे होते तसे आंकडे त्या गणितांत क्रमाक्रमानें येऊं लागले,-तेव्हां असें सांगतात कीं, त्यास इतका आनंद झाला व कंपस्वेदादि अष्टभाव प्रगट होऊन इतके प्रबळ झाले, कीं त्याच्यानें पुढें गणित करवेना! तेव्हां तें टाकून देऊन आपल्या एका मित्राकडून त्यानें तें पुरें करवलें! आतां सरतेशेवटीं एक मात्र भाग राहिला. तो हा कीं, प्रस्तुत शास्त्राच्या अध्ययनानें व मननानें मनुष्याच्या ठायीं आस्तिक्य उत्पन्न होऊन जगत्कर्त्या परमेश्वराच्या ठायीं भक्ति वृद्धिंगत होते. पहिल्यानें आस्तिक्य जें उत्पन्न होतें तें असें कीं, तो येवढी अपार सृष्टि आपणाभोंवतालीं पसरलेली जेव्हां पाहतो, व तिचा व्यापार आज युगानुयुगें अस्खलित व सुयंत्र चाललेला जेव्हां मनांत आणतो, तेव्हां येवढें अवडंबर कोणा कर्त्याशिवाय खास उत्पन्न झालें नाहीं, व येवढी रहाटी जी आज अनंत वर्षे चालली आहे ती कोणा नियंत्याखेरीज खचित चालली नाहीं; अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होऊन जाते! एखादी टोलेजंग व सुशोभित इमारत एखाद्या वालुकामय व निर्जन प्रदेशांत एखाद्यानें पाहिली असतां जी त्यास कल्पना होईल तीच वरील मनुष्यास होते; आणि ज्यानें येवढी भव्य व अवाढव्य रचना केली त्याचें सामर्थ्य व चातुर्य किती असावें असें त्याच्या सहजच मनांत येऊन तो थक्क होऊन जातो! ही एक पहिली गोष्ट झाली. ह्मणजे सर्व धार्मिकपणाचें मूळ जी वरील आस्तिक्य-बुद्धि ती वर सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत शास्त्रानें मनुष्याच्या मनांत दृढ होते. नंतर दुसरी गोष्ट परमेश्वराचे ठायीं प्रीति व भक्ति. या दोन्ही वृत्तीही सृष्टीचें लेशमात्रही अवलोकन लक्ष-पूर्वक केलें असतां सर्व सुज्ञ मनुष्यांच्या हृदयांत उत्पन्न होणाऱ्या आहेत. जसें मूल मोठें होऊन त्यास जाणतेपणा येऊं लागला असतां आपल्या मातापितरांनीं आपलें लालनपालन कसें केलें, आपणावर आलेले किंवा येऊं पाहणारे दुःखप्रसंग कसे टाळले, वगैरे गोष्टी त्यास कळूं लाग-तात, व त्या मनांत येऊन त्याची जन्मसिद्ध व सहवासरूढ प्रीति व भक्ति या वृद्धिंगत होतात; त्याचप्रमाणें जगत्कुटुंबी जो परमेश्वर त्यानें संपूर्ण सृष्टीच्या रक्षणार्थ व सुखार्थ ज्या हजारों लाखों तजविजी व युक्ति करून ठेवल्या आहेत—ज्या सृष्टिविषयक प्रत्येक शास्त्राच्या वृद्धीबरोबर अधिकाधिक उदयास येत चालल्या आहेत व अशाच पुढें अनंतकालावधि अवश्य येत जातीलच—त्या सर्व मनांत आणल्या असतां दुराग्रही व मूर्ख अशा लोकांखेरीज बाकी सर्वांच्या मनांत वरील दोन वृत्ति अवश्य उत्पन्न होतीलच होतील; आणि जोंपर्यंत हें चराचर विश्व त्यांस दृष्टिगोचर होत आहे तोंपर्यंत त्या कशानेंही ढळणार नाहींत हें उघड आहे!

# गर्व.

अभिमानधनस्य गत्वरैरसुभिः स्थास्नु यशश्चिचीषतः ।
अचिरांशुविलासचंचला ननु लक्ष्मीः फलमानुषंगिकम् ॥[१] किरातार्जुनीय.

अंक १६—(१) मानसशास्त्र. (२) प्रस्तुत विषयाचें स्वरूप. (३) त्याविषयीं वाचकांस होणाऱ्या कल्पना. (४) प्रकृत विवेचनाचा उद्देश--षड्रिपु. (५) गर्वाचीं दोन स्थानें. (६) दोषरूप गर्व. (७) अदोषरूप गर्व—(८) योग्य रीतीचा गर्व, (९) दुसरे प्रकार-स्वाभिमान इ०. (१०) प्रस्तुत मनोवृत्तीचें प्रयोजन.

१. प्रस्तुत विषय मानसशास्त्राचा होय. मानसशास्त्र ह्मणजे मनुष्याच्या मनाच्या व हृदयाच्या ज्या नानाविध वृत्ति आहेत त्यांचें विवरण ज्यांत केलें असतें तें होय. जसें शारीरकांत मानवी शरीराचे घटकावयव जे, रक्त, मांस, हाडें इत्यादि यांविषयीं विवेचन असतें, त्याप्रमाणेंच वरील शास्त्रांत मानसिक व्यापारांविषयीं विचार केला असतो. या शास्त्राचें ग्रंथरूपानें प्रणयन यापूर्वी आमच्या देशांत कधींही झालेलें माहीत नाहीं. इंग्रेजी भाषेंत मात्र अर्थातच याही शास्त्रावर इतरांप्रमाणें पुष्कळ सर्वमान्य ग्रंथ झाले आहेत. असो; तर प्रस्तुत शास्त्राचें ज्यास अध्ययन करायाचें असेल त्यास इंग्रेजी भाषेशिवाय सध्यां दुसरें द्वार नाहीं.

२. प्रस्तुत निबंधांत वरील मनोवृत्तीचें जें विवरण करायाचें आहे तें शास्त्ररीत्या करायाचें नाहीं. ह्मणजे त्याच्या स्वरूपाविषयीं सूक्ष्म विचार, त्याच्या उत्पत्तीचें कारण, त्याच्या प्रतिकाराविषयीं उपाय, वगैरेविषयीं यांत लिहायाचें नाहीं. तर फक्त व्यवहार-रीत्याच त्याविषयीं विचार करूं. ह्मणजे तो मनुष्यांत असणें हें योग्य कीं अयोग्य, त्यापासून हिताहित कोणतें, वगैरेविषयीं लोकांत जशी वाटाघाट चालते त्याप्रमाणेंच येथें प्रस्तुत विषयावर कांहीं विचार प्रदर्शित करायाचे आहेत.

३. आतां मूळारंभीं प्रकृत विषयावर सामान्यतः लोकांच्या काय समजुती आहेत त्यांविषयीं थोडेंसें लिहिलें पाहिजे. आह्मांस खचीत वाटतें कीं, या निबंधांतील विषयाचें वरील नांव पाहतांच आमच्या बहुतेक वाचकांस असें वाटेल कीं, या विषयावर नवें तें लिहिण्यासारखें काय आहे ? गर्व ही मनोवृत्ति दुष्ट असून ती सर्वथा त्याज्य होय हें उघडच आहे; मग तीविषयीं मोठें विवेचन केलें तरी अधिक काय सिद्ध होणार ! जो मनुष्य गर्विष्ठ ह्मणून लोकांस माहीत झाला त्याची सर्व हेळणा करितात, व त्या दुर्गुणाखालीं त्याचे असते नसतेही गुण बहुधा लोपून जातात, हा प्रकार जनांत पुष्कळ दृष्टीस पडतोच; व यास्तवच जगांत वागलेले लोक नव्या उमेदवार पूर्ववयी लोकांस सर्वांशीं लीनतेनेंच वागण्याविषयीं उपदेश करतात हें सर्वांस माहीत आहेच. तसेंच जुन्या तत्त्वज्ञानी लोकांनीं मनुष्याचे ठायीं संचार करणारे षड्रिपु ह्मणून जे वर्णिले आहेत त्यांपैकींच वरील

१. " क्षणभंगुर जे प्राण ते खर्चून चिरकाल राहणारें यश मिळवूं इच्छिणारा जो मानी पुरुष तो संपत्तीची ह्मणजे पर्वा करीत असतो असें नाहीं, कां तर ती विद्युल्लतेप्रमाणें चंचल असून त्याच्या शौर्याचें केवळ आनुषंगिक फलच होय ! "

गर्वही होय. तेव्हां यावरून पाहतां या मनोविकाराच्या युक्तायुक्ततेविषयीं आणखी विचार तो कसचा करायाचा ? 'विकार' या शब्दांतच त्याचें अयुक्तत्व आलें. व यास्तवच त्यापासून मनुष्याचें सर्वथा अहितच होणार हेंही उघडच झालें. मग यापुढें हिताहितत्वाचा विचार तो आणखी काय राहिला ! तेव्हां हें दुसरें प्रतिपादनही वरच्या प्रमाणेंच निरर्थक झालें. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत विषयावर सर्वांचा निर्णय अगोदरच ठरला असून त्यावर जास्त विचार करण्यासारखें कांहीं नाहींच असें बहुधा सर्वांस वाटेल.

४. पण वरील निर्णय सर्वांशीं अगदीं खराच आहे असें नाहीं, व प्रस्तुत विषयावर सविस्तर उपपादन करण्यास जागाही पुष्कळ आहे, हें पुढील मजकुरावरून आमच्या वाचकांस दाखवण्याचा आमचा उद्देश आहे. या पुढील मजकुरांत आजपर्यंत परंपरेनें चालत आलेलीं कांहीं जुनीं मतें व एकंदर लोकांचे साधारण समज यांस पुष्कळ ठिकाणीं विरोध पडलेला दिसेल. असो; आतां पहिल्यानें याचाच विचार करूं कीं, गर्वाची 'मद' या पर्यायानें षड्रिपूंत जी गणना केली आहे ती कितपत खरी आहे. कामादि षड्वर्गास आजपर्यंत मनुष्याचे रिपु म्हणजे त्याच्या हिताच्या आड येऊन त्यास अनर्थांत घालणारे मनोविकार असेंच सर्व म्हणत आले आहेत. पण हें म्हणणें केवळ एकदेशीय होय असें अंमळ विचार केला असतां सर्वांस कळून येईल. कामक्रोधादि मनोविकृति केवळ अनावर होऊन त्यांचा मनुष्यावर पगडा झाला असतां मोठमोठे अनर्थ होतात हें खरें आहे; पण ते या जगांतून मुळींच नाहींसे झाले असें समजा, तर जगाची काय अवस्था होईल बरें ? सर्वांत अग्रगण्य जो काम त्याच्या अभावीं तर जगाचा अवश्यमेव लयच होईल हें उघडच आहे. त्याच्यापुढें क्रोध. याचाही समूळ नाश होऊन सर्वांनीं धर्मराजाची वृत्ति धरली, किंवा खऱ्या ख्रिस्त्याप्रमाणें एका गालावर मारली असतां दुसरा गाल पुढें करण्याचा निर्धार केला, तर जगांत काय अनर्थ होतील ! असो, याप्रमाणेंच बाकीच्या मनोविकारांविषयींही समजावें. तेव्हां यावरून स्पष्ट दिसेल कीं, वरील सहा जण हे जगाचे केवळ शत्रूच आहेत असें नाहीं. उलटें असेंही म्हणतां येईल कीं ते जगाचे हितकर्ते मित्रही पण होत. आणि आमचा असा पक्का भरंवसा आहे कीं, मनुष्याच्या शरीराचा जसा कोणताही अवयव वावगा नाहीं, व कोणताही व्यापार निरर्थक नाहीं, त्याप्रमाणेंच मनाचीही गोष्ट होय. परमेश्वरानें मनाच्या ज्या निरनिराळ्या शक्ति निर्माण केल्या आहेत व त्यास निरनिराळ्या वृत्ति जडवल्या आहेत त्यांस अहेतुक किंवा अनर्थावह म्हणणें हें धर्माच्या दृष्टीनें पाप व न्यायाच्या दृष्टीनें मूर्खत्व होय ! आतां यावर, जर कोणी अशी शंका काढील कीं असें आहे तर सर्व देशांतील ज्ञाते पुरुष व आपले शास्त्रकार यांनीं वरील मनोवृत्तींचा येवढा निखालस निषेध कां केला ? तर तिचें समाधान करणें अवघड आहे असें नाहीं. एक तर असें कीं वर जो निषेध सांगितला तो त्या त्या विकाराच्या अतिरिक्ततेचा समजायाचा; साक्षात् त्या वृत्तीचाच नव्हे. कारण तसें असतें तर विवाह करणें हें पातक-कर्म मानलें असतें.[1] 'काम'

१. हा प्रकार रोमन् क्याथोलिक् पंथांत अद्याप चालू आहे. त्यांच्यांतल्या धर्माधिकाऱ्यानें लग्न करतां कामा नये !

हा तिसरा पुरुषार्थ धरला नसता; आणि कामदेवाची हिंदु, ग्रीक् वगैरे जुन्या राष्ट्रांत पूजा झाली नसती. त्याप्रमाणेंच थोर पुरुषांच्या कथांतून त्यांच्या क्रोधावेशांचें वगैरे जें प्रशंसापूर्वक वर्णन केलेलें असतें तेंही आढळतेंना. दुसरें असें कीं, जगाच्या व्यवहारांत सामान्यतः पाहतां वरील कामक्रोधादि वृत्तींचें योग्य आकलन फारच थोड्या ठिकाणीं झालेलें सांपडतें; त्या दुर्धर होऊन मनुष्य अरिष्टांच्या कचाटयांत सांपडलेलाच फार आढळतो. पण वास्तव या सामान्यतः दृष्टीस पडणाऱ्या प्रकारावरच मुख्यतः कटाक्ष टेवून वरील अंमळ एकदेशीय वर्णन वरील लोकांनीं केलें आहे हें उघड आहे. वस्तुतः पाहतां वरील वृत्तिच अनर्थकारक आहेत असें नव्हे. परमेश्वरानें त्या मनुष्याच्या ठायीं ज्या ठेवल्या आहेत त्या उगीच नव्हेत. त्यांपासून त्यास फार उपयोग आहे. इतकेंच मात्र कीं, त्यांस मनुष्यानें आपल्या नेहेमी स्वाधीन ठेवून त्यांस आपण सर्वथा वश कधींही होतां कामा नये. जसें, घोड्यावर बसणें. घोडा हा आपलें सामर्थ्य आणि वेग मनुष्याच्या अगदीं स्वाधीन करून देतो, आणि त्याच्या योगानें बसणारा चांगला चतुर असेल तर त्यास हवा तसा उपयोग करून घेतां येतो हें सर्व-प्रसिद्ध आहे. पण बसणारा जर कच्चा असेल किंवा मूर्ख असेल, तर घोड्याच्या अंगचे वरील दोन गुणच त्याच्या नाशास कारण होऊन तो बसणारास एखाद्या खड्ड्यांत नेऊन टाकणार नाहीं काय ?

५. वर काम आदिकरून सहा मनोविकारांविषयीं साधारणपणें जे प्रतिपादन केलें आहे तेंच प्रस्तुतच्या निबंधाचा विषय जो गर्व त्यासही लागतें. म्हणजे तो वस्तुतः वाईट नसून त्याचा बरेवाईटपणा मनुष्याच्या बरेवाईटपणावरच सर्वथा असतो. तेव्हां यावरून वरील मनोवृत्ति अर्थातच दोन प्रकारची झाली. एक शहाण्या समंजस अशा लोकांच्या ठायीं जी आढळते ती; आणि दुसरी मूर्ख लोकांच्या ठायीं जी दृष्टीस पडते ती. आतां दोहोंविषयींही अनुक्रमानें विवेचन करूं.

६. पहिल्यानें मूर्ख लोकांतला प्रकार. यांसच पहिल्यानें पुढें आणण्याचें कारण 'दुर्जनं प्रथमं वंदे ' हें सर्वप्रसिद्ध सूत्र एक आहेच; आणि दुसरें असें कीं, यांचीच कोटि जगदीशाच्या इच्छेनें जनांत फार मोठी आहे. तेव्हां बहुपक्षाचा अगोदर मान करणें हेंच आम्हांस उचित दिसतें. असो; आतां येवढ्या समुदायास गर्व जो बाधा करतो तो एका प्रकारानें नव्हे हें उघडच आहे. निरनिराळ्या द्वारांनीं आंत प्रवेश करून वरील ' रिपु ' अंतःकरणरूप गडास सर करून घेतो. कोणास आपल्या बळाचा गर्व असतो. बलिष्ठ काय तो मी, माझ्याशीं सर्वांनीं बेतानें असलें पाहिजे; मला कोणाचें दुरुत्तर खपायाचें नाहीं, मी मात्र हवें त्यास हवें तें बोलणार; असें कित्येकांस वाटत असतें. हा दोष विशेषेंकरून आमच्या तालिमबाज लोकांत फार आढळतो. कोणी उगीच महिना दोन महिने कां तालमींत जाईना— आणि जाऊनही कांहीं येण्याच्या नांवानें शून्य कां असेना—लागलीच तो चालण्याची बोलण्याची वगैरे अकड त्यानें उचललीच ! पण इतकेंही करून कोणी मोठा मोठा बलवान् झाला समजा,—इतका कीं; मोठाल्या पहारी त्यानें सहज वांकवाव्या, किंवा पाण्यानें भरलेले हांडे दांतांनीं सहज वर उचलावे;- तरी असलें अचाट बलही नुसतेंच प्रशंसेस पात्र

होणार नाहीं हें उघड आहे. कारण टोणग्याचा, हत्तीचा वगैरे दृष्टान्त सर्वांच्या जवळ आहेच. असो; वरील लिहिण्यानें तालमींत मेहनत करून शरीरसामर्थ्य संपादन करणें वाईट असें ह्मणण्याचा आमचा अर्थात मुळींच रोख नाहीं,–सांप्रतकाळीं तर तें अनेक कारणांनीं फारच इष्ट झालें आहे;–आह्मांस सांगायाचें इतकेंच आहे कीं, जें संपादन केलें त्याविषयीं सदासर्वदा गर्व वहाणें हें मूर्खत्वाचें चिन्ह आहे. दुसरा प्रकार संपत्तीचा. हें तर गर्वाचें बऱ्याहूनही मोठें कारण होय. मनुष्य बळकट असूनही जर त्यापाशीं कांहीं ऐपत नसली तर नुसत्या बळाला कोणी वचकत नाहीं. पण संपत्ति असली कीं, साऱ्या मनुष्यांस त्याचा दरारा वाळगावा लागतो. थोडीबहुत सत्ता हातीं असल्यामुळें व पैशाचें मोठें पाठबळ असल्याच्या योगानें गरीबगुरीबांचा मनांत आल्यास नाश करण्याचें त्यांच्या हातांत बरेंच असतें. यामुळें जो तो त्यांच्यांशीं नमून असतो, व पुष्कळ आशाबद्ध लोक त्यांजपाशीं नेहेमी हांजी हांजी करण्यास तयार असतात. आपण थोर, आपण मोठे गुणवान्, आपल्या आश्रयावर इतक्या लोकांचा चरितार्थ चालला आहे, वगैरे प्रकारच्या खऱ्याखोट्या प्रशंसा याच काय त्या त्यांच्या नेहेमीं कानीं पडल्यामुळें, व आपल्या पाठीमागें आपणांस लोक काय ह्मणत असतील हें कधीं त्यांस स्वप्नींही ठाऊक नसल्यामुळें, श्रीमंत लोक गर्वाचीं आगरें झालेले असतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्यांतूनही जे स्वतःच्याच पराक्रमानें वैभवास चढलेले असतात त्यांस वरील गर्व कांहीं तरी शोभतो. पण वाडवडिलांनीं संपादन करून ठेवलेल्या संपत्तीवरच जे डौल मिरवतात त्यांस तर तो मुळींच शोभत नाहीं. कारण एखाद्या कुळांत जन्मास येणें ही जी केवळ दैवायत्त गोष्ट तीवरच फुकाची फुशारकी मारणें हें काय ? अशा कुलीन पुरुषांचा आपल्या कुळवंतपणाबद्दलचा पोकळ गर्व इसापनीतींतील खेचराच्या सारखा केवळ हास्यास्पद होय. किंबहुना त्यांच्या पूर्वजांची उज्वळ कीर्ति हीच त्यांच्या दुष्कीर्तीस विशेष कारणभूत होते असेंही ह्मटलें असतां चालेल; कारण पांढऱ्या स्वच्छ कापडावर वगैरे जसा अगदीं लहान डागही तेव्हांच उमगतो, त्याप्रमाणेंच गर्वाचा विषय जें कुलीनत्व तेंच या वंशजांचा दुर्लौकिक विशेष स्पष्ट दिसण्यास मात्र कारण होतें. तसाच या लोकांचा आपल्या दागदागिन्यांचा आणि उंची पोषाकाचा गर्व. या गर्वाची व्यर्थता सोलन नामक विख्यात ग्रीक तत्त्वज्ञानें एके प्रसंगीं जशी स्पष्ट दाखवली तशी फारच थोड्यांनीं दाखवली असेल. त्यास कोणीं राजानें आपलें वरील वैभव मोठ्या दिमाखानें दाखवलें असतां त्यानें थोड्याच शब्दांत त्याच्या गर्वाचें पूर्ण खंडन केलें! तो ह्मणाला, " हे राजा ! तुजपेक्षां मोर मला जास्त श्रीमंत दिसतो, व त्याचा गर्वही अधिक यथार्थ वाटतो ! " असो; तिसरा प्रकार रूपाचा. याबद्दलचा अभिमान पुरुषांस मुळींच शोभत नाहीं; तो बायकांचाच सर्वथा विषय होय. नवऱ्याची प्रीति आपणांवर स्थिर करण्याचें तें स्त्रियांस एक मोठें साधन असतें. यास्तव तें राखण्याविषयींची व वाढवण्याविषयींची त्यांची तर्तूद त्यांस शोभते; व पुरुषांस आपल्या अंगच्या हिंमतीचा, हुषारीचा वगैरे गर्व जसा शोभतो तसाच स्त्रियांस आपल्या रूपाचाही शोभतो; कारण तें त्यांच्या जातींत एक मोठें भूषण धरलें असतें. पण त्यांचे मृदुत्व, भीरुत्व वगैरे गुण जसे पुरुषाचे ठायीं दोषरूप होतात, त्याप्रमाणेंच रूपवत्त्वाचा गर्व व

नटण्यामुरडण्याची हौसही पुरुषजातींत केवळ निंद्य मात्र होते. असो; आतां शेवटला मोठा प्रकार विद्येचा. या सदराचा प्रस्तुत काळीं वरच्याहून पुष्कळ विस्तारानें विचार केला पाहिजे. कारण हल्लीं आमचा देश सगळा एकदम महानिद्रेंतून एकाएकीं जागा केल्यासारखा होऊन बहुतकरून घरोघर विद्वत्ता झालेली सध्यां दृष्टीस पडत आहे. आमच्या प्रस्तुतच्या दयाळू सरकारानें आह्मांस ज्ञानामृत पाजण्याचा जो चोहोंकडे उद्योग सुरू केला आहे, त्याचीं आतांपासूनच जीं फळें दृष्टीस पडूं लागलीं आहेत त्यांवरून पाहतां सरकारचा उद्योग सरकारासच लवकर फळूं लागेल असा सुमार दिसूं लागला आहे. ज्ञानामृताचा पेला तोंडाशीं नेऊन त्याचा एक झुरकाच नुकता आह्मीं कोठें घेतला न घेतला; तों इतक्यांतच चोहोंकडे एकदम केवढाले चमत्कार झाले आहेत पाहा! खुद्द होमरच्या, मिल्टनच्या सुद्धां तोंडांत मारणारे महाकवि; येशू ख्रिस्त, महंमद अशांस एकीकडे झुगारून देणारे धर्मसंस्थापक; डिमास्थेनीस, सिसरो अशांनीं सुद्धां ज्यांचीं सुरस भाषणें ऐकून तटस्थ व्हावें असे महावक्ते; तसेच मोठमोठे पंडित, मोठमोठे शिल्पज्ञ वगैरे महाजनांचा समुदाय जिकडे तिकडे उत्पन्न होऊन त्यांनीं सगळा देश गजबजून टाकला आहे! येवढ्याशा अल्पकाळांत येवढी गर्दी झालेली पाहून पुढें तर काय होईल कोण जाणे असा मोठाच विस्मय प्राप्त होतो! हजारों महाकवींचे विणे सजून त्या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून नाद घुमूं लागला असतां, व हजारों महावक्त्यांची एकदम गर्जना सुरू झाली असतां आकाशमंडप लवकरच खालीं येईल कीं काय कोण जाणे! असो; एकंदरींत वरील चमत्कार पाहून मनास अशी कल्पना होते कीं, ख्रिस्त प्रभु साक्षात् अवतरून जगाच्या शेवटीं एक हजार वर्षें राज्य करणार आहे ह्मणून जें पवित्र शास्त्रांत सांगितलें आहे त्या परम सुखाच्या काळाजवळजवळ तर आह्मी येऊं लागलों नाहीं ना? त्या प्रभूनें आपला पहिला अवतार आमच्या एशिया खंडांतच घेतला; त्याचप्रमाणें शेवटलाही इकडेच घेण्याचा त्याचा विचार झाला आहे कीं काय न कळे! सारांश, आमच्या देशांत चोहोंकडे इतक्यांतच विद्वत्तेचा वगैरे जो फैलावा झाला आहे तो कांहीं अपूर्व आहे. पण या फैलाव्याप्रमाणें लोकांत खरोखर ज्ञान व समजूत हीं किती वाढलीं आहेत हें जो पाहील त्याची खात्री कांहीं निराळ्या तऱ्हेचीच होईल. आमच्या लोकांच्या बुद्धिविलासाचे अचाट प्रकार जे वर सांगितले त्यांचें वास्तविक स्वरूप पाहिलें तर ज्ञानाचा संस्कार आमच्या लोकांस जो नुकता नुकता होऊं लागला आहे त्याचे योगानें झालेले दुर्विकार बाहेर पडले आहेत असें सर्व समंजस लोकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. मनुष्याच्या मनांत ज्ञानाचा प्रवेश होऊं लागला असतां प्रथमतः गर्वादि दुर्विकार त्यास कसे जडतात हें मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे;[1] त्यावरच येथें अंमळ विस्तार करतों. भर्तृहरीनें नीतिशतकांत ह्मटलें आहे—

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदांधः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः।

---

१. अंक २७ पृष्ठ १४९–१५१.

यदा किंचित् किंचितद्बुधजनसकाशादवगतं
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

"जेव्हां मला उगीच थोडें समजत होतें तेव्हां हत्तीप्रमाणें मी मदोन्मत्त ('मद' शब्द द्व्यर्थी आहे) असें, आणि मी सर्वज्ञ आहें असा गर्व वाहीं; पण पुढें जसजसें शहाण्या लोकांपासून मला थोडथोडें ज्ञान प्राप्त होऊं लागलें तसतशी माझी खात्री होत चालली कीं, मी मूर्ख आहें. याप्रमाणें जसा अंगांतून हळू हळू ज्वर नाहींसा होत जावा तसा माझा मद उतरत गेला!"[1]

वरील पद्य कवीनें स्वानुभवावरून लिहिलें आहे हें उघड आहे. आणि खऱ्या ज्ञानापर्यंत जे पोंचले असतील त्या सर्वांस वरील गोष्टीचा प्रत्यय आला असेलच. आणि जो कोणी शिकण्याचे विषय किती आहेत, मनुष्याची बुद्धि किती अल्प आहे, इत्यादि गोष्टींचा यथास्थित विचार करील त्यास मनुष्याचा आपल्या ज्ञानाविषयींचा गर्व किती मूर्खत्वाचा असतो हें तेव्हांच लक्षांत येईल. कोणीही मनुष्य पहिल्यानें शिकूं लागला म्हणजे त्यास असें वाटतें कीं, मी जेवढें शिकणार आहें तेवढें आटपलें म्हणजे मापुढें मग काय उरलें आहे! पण तोच मनुष्य जसजसा अधिकाधिक ज्ञान संपादन करूं लागतो तसतसा ज्ञानाचा प्रदेश अधिकाधिक विस्तृत होत जाईसा त्यास दिसूं लागतो. याप्रमाणें होतां होतां ज्ञानाची सीमा आकाशाच्या सीमेप्रमाणें सरतेशेवटीं अगदीं अनंत होय अशी त्याची खात्री होते.[2]

१. वरील श्लोकावर वामनी टीका—

जधीं कांहीं कांहीं 'हरि' 'कवि' असे शब्द शिकलों
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों।
जधीं कांहीं नेणे म्हणुनि वदले पंडित मला
तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला ॥

२. हें निरूपण पोपनें एके ठिकाणीं फार सरस दृष्टांतानें केलें आहे—

Fired at first sight with what the Muse imparts,
In fearless youth we tempt the heights of arts,
While from the bounded level of our mind,
Short views we take, nor see the lengths behind;
But more advanced, behold with strange surprise
New distant scenes of endless science rise!
So pleased at first the towering Alps we try,
Mount o'er the vales, and seem to tread the sky,
The eternal snows appear already past,
And the first clouds and mountains seem the last;
But those attained, we tremble to survey
The growing labours of lengthened way,
The increasing prospect tires our wandering eyes,
Hills peep o'er hills, and Alps on Alps arise!

*Essay on Criticism.*

वरील गोष्ट ज्यांच्या पूर्णपणें मनांत बिंबली असेल त्यांस कळून येईल कीं, मनुष्याचें ज्ञान हें केवळ सापेक्ष आहे; ह्मणजे अमुक अमुक मनुष्य शहाणा किंवा विद्वान् आहे असें जेव्हां आपण ह्मणतों तेव्हां तो दुसऱ्या कोणाच्या मानानें पाहतां तसा आहे इतकाच अर्थ समजायाचा. असें कांहीं मान न घेतां त्यास ज्ञानविशिष्ट ह्मणणें हें पृथ्वीवरील एखाद्या पदार्थाच्याविषयीं निरपेक्षत्वानें उच्चतेचें विधान करण्यासारखें अप्रयोजक होईल. ह्मणजे पृथ्वीवरील एखादा फार उंच वृक्ष, मनोरा किंवा डोंगर घ्या, त्याची उंची जशी भोंवतालच्या पदार्थांच्या ठेंगणेपणामुळेंच त्यास आली—वस्तुतः एकंदर पृथ्वीच्या मानानें पाहतां तो अति उंच पदार्थ आणि भुईवरून चालणारी मुंगी हीं दोन्ही सारखींच; त्याचप्रमाणें इतर मनुष्यांचा संबंध जर मनांत न आणला तर फार फार मोठा विद्वान् आणि केवळ निरक्षर मनुष्य हे दोन्ही सारखेच! पाहा कीं, पृथ्वीवर सर्वांत उंच पदार्थ ह्मटला ह्मणजे हिमालयाचें एवरेस्ट् नामक शिखर होय, व खोल ह्मटला ह्मणजे हिंदीमहासागरांतील कांहीं भागांचा तळ होय; पण येवढी पांच मैलांची उंची व पांच मैलांची खोली जमेस धरूनही पृथ्वीचा एकंदर पृष्ठभाग खासा गुळगुळीत वर्तुळाकारच आहे!! याचा प्रत्यक्ष प्रत्यय चंद्राचें बिंब होय. ह्मणजे चंद्रावर पृथ्वीप्रमाणेंच डोंगर वगैरे असतांही येथून त्याची कड सारखी वाटोळीच दिसते. किंवा पृथ्वीचाच एकंदर पृष्ठभाग खुद्द पाहणें असल्यास तो चंद्रग्रहणसमयीं सर्वांस छायारूपानें चंद्रबिंबावर प्रत्यक्ष दृष्टिगोचर होतो. हिमालयादि पर्वतांनीं आपआपलीं उंच उंच शिखरें आकाशांत जरी हजारों उभारलीं आहेत, तरी वरील ग्रहणाच्या समयीं भूपृष्ठाची छाया चंद्रबिंबावर खाशी नामी वाटोळीच पडते! येवढ्या प्रचंड पर्वतांच्या योगानेंही त्या कंसाकृतींत कोठेंही इतका सुद्धां फांटा फुटलेला बिलकुल दिसत नाहीं. असो; तर वरील दृष्टांतावरून आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, पदार्थांचा उंचपणा हा जसा नेहमी सापेक्षच असतो त्याचप्रमाणें मनुष्याच्या ज्ञानाचीही गोष्ट होय.

वरील उपपादनावरूनच ही मोठी गोष्ट अर्थातच सिद्ध होते कीं, ज्ञान हें अनंत आहे; व वास्तव आपल्या मोठ्या ज्ञानाचा गर्व वाहणें हें मनुष्यासारख्या अल्पज्ञ क्षुद्र प्राण्यास मुळींच शोभत नाहीं. आपणाहून ज्यांस कमी ज्ञान आहे त्यांजवर हवा तर त्यानें मोठा डौल मिरवावा; पण तो डौल खरोखरी ह्मटला ह्मणजे डोंगळ्यानें आपण मुंगीहून मोठे आहों ह्मणून डौल मारण्यासारखा क्षुल्लक प्रकारचा होय. हीच गोष्ट मनांत आणून खरे ज्ञाते आहेत ते आपल्या ज्ञानानें फुगून जाऊन दुसऱ्याची अवहेलना कधींही करीत नसतात. त्यांस आपल्या ज्ञानाची इयत्ता केवढी थोडी आहे, व आपलें अज्ञान केवढें अपरंपार आहे, या दोन गोष्टींचा मनास पूर्ण प्रत्यय येऊन चुकलेला असतो.. हा प्रत्यय होणें हीच तत्त्वज्ञतेची खरी निशाणी आहे; आणि त्याच्या विरुद्ध प्रकार ही अत्यंत मूर्खत्वाची होय. वास्तव कोणा चतुर ग्रंथकाराचें असें एक वचन आहे की, तत्त्वज्ञाचें मत आपण ज्ञानशून्य आहों असें असतें व मूर्खाचें मत मी सर्वज्ञ आहें असें असतें! या दोहों प्रकारांचीं उदाहरणें थोडीं आहेत असें नाहीं. साक्रेटीसाची गोष्ट आमच्या बहुतेक वाचकांस माहीत असेलच. डेलफायच्या देवानें साक्रेटीस साऱ्या ग्रीस देशांतील लोकांहून शहाणा आहे असा

कौल दिला असतां तो अगदीं गोंधळून गेला. तो असा बुचकळ्यांत पडला कीं, माझ्या मतें तर माझें ज्ञान फारच अल्प आहे आणि देवाचें वचन तर मी सर्वांत मोठा ज्ञानसंपन्न आहें ह्मणून आलें, तेव्हां या दोन्ही परस्परविरुद्ध गोष्टी एकदम संभवतात तरी कशा! पण पुढें शोध करतां करतां त्याची खात्री झाली कीं, मोठे शहाणे ह्मणून जे लोक मिरवतात त्यांचें ज्ञान वस्तुतः फार अल्प आहे, आणि त्यांच्यांत व आपणांत मोठा विशेष ह्मणून हाच कीं, आपलें अज्ञान आपणास समजतें, आणि त्यांस समजत नाहीं! दुसरें असेंच मोठें उदाहरण न्यूटनचें होय. या महापंडितानें येवढे अपूर्व शोध करून जगांत प्रगट केले असतां मरणा-पूर्वीं कांहीं वर्षे त्यानें आपणाविषयीं असा चमत्कारिक लेख लिहून ठेवला आहे—'माझ्या-विषयीं लोकांस केवढेंही आश्चर्य वाटो; पण माझें मला कसें वाटतें ह्मणाल तर जसें एखादें पोर समुद्रकिनाऱ्यावर खेळत असतां ही चमत्कारिक गारगोटी वाटली, ती चमत्कारिक वाटली; असें ह्मणून त्या गोळा करीत असतें त्याप्रमाणें माझी अवस्था आहे;—मला ठाऊक नसणाऱ्या कोट्यवधि प्रमेयांचा सागर तर मजपासून फारच दूर आहे!' असो; तर सर्व देशांत मोठमोठे तत्त्वज्ञ ह्मणून जे होऊन गेले त्या सर्वांच्या मनाचा पूर्ण सिद्धांत होऊन ठरलेला तो हा. आतां वरच्याच्या उलट प्रकार पाहा. हा जगांत पुष्कळ ठिकाणीं भरपूर भरलेला आढळेल. या लोकांस आपलें अज्ञान किती आहे हें कधींही कळत नाहीं, व कळण्याची इच्छाही नसते. त्यांच्या मतें आपणांस सर्व लोकांनीं सर्वज्ञतेचा मान द्यावा असें असतें; व या हेतूस्तव ते सर्व विषयांत सारखाच बाणा मारीत असतात. पण हा साधतो कसा! तेव्हां अर्थातच 'एक ना धड भाराभर चिंध्या' या ह्मणीप्रमाणें पुष्कळ विषयांची त्यांनीं उगीच चावाचाव मात्र करून ठेवलेली असते. हें सर्वतोमुख ज्ञान भोळ्या मूर्ख अशा लोकांस कांहीं वेळ फसवण्यास मात्र उपयोगीं पडतें खरें; पण जगांतील लोक सगळेच वरच्यासारखे नसल्यामुळें त्यांचा कावा लवकरच बाहेर पडतो, आणि फजिती मात्र उडते. असो; तर याप्रमाणें सुज्ञ व मूर्ख लोकांचे निरनिराळे समज असतात.

७. येथवर प्रस्तुत विषयाच्या एका अंगाचा विचार झाला. ह्मणजे कोत्या सम-जुतीच्या लोकांत गर्वाचे जे प्रकार दृष्टीस पडतात, ते सांगितले. आतां वरील मनोवृत्तीचें दोषरूपत्व ज्या प्रसंगीं नाहींसें होऊन ती मनुष्यास उलटी शोभादायकही होते त्यांचा निर्देश करतों.

गर्वाच्या ज्या प्रकारांविषयीं वर विचार झाला ते प्रकार आपल्या भाषेंत 'उन्मत्तपणा,' 'ताठा,' 'अहंपणा,' 'मिजास,' वगैरे निंदाव्यंजक शब्दांनीं जे दर्शवले जातात ते होत. हे अर्थातच सर्वथा दूषणास्पद असून सर्व सुज्ञ लोकांहीं समूळ त्याज्य होत. पण यांच्यासारखें दुष्ट स्वरूप ज्यांचें नाहीं, असे कांहीं गर्वाचेच प्रकार सज्जन व थोर मनुष्यांचे ठायीं आढळ-तात, त्यांचें निरूपण यापुढें करतों.

८. एक प्रकार तर योग्य रीतीचा गर्व. आपल्या ठायीं जे वास्तविक गुण आहेत त्यांविषयीं नेहेमी वल्गना करीत बसणें जरी मनुष्यास शोभत नाहीं, व त्यामुळें ऐकणारासही त्रास येतो; तरी त्यांविषयीं यथायोग्य गर्व वहाण्यानें मनुष्य केवळ दोषासच पात्र होतो

असें नाहीं. जे अशा मनुष्याचे द्वेषी असतील, किंवा स्वभावतःच दुसऱ्याचा उत्कर्ष ज्यांस देखूं सकत नाहीं, असे मत्सरी मनुष्य, यांस त्याचा यथार्थ गर्वही दुःसह होईल खरा, व ते त्याबद्दल त्याची निंदा करण्यास कधीं चुकणार नाहींत हें खरें; पण जे न्यायी व सत्यपक्षपाती लोक असतील त्यांस त्याच्या वर्तनांत कांहीं गैर दिसणार नाहीं. यास व्यावहारिक दाखला पाहा. जो तो मनुष्य आपापल्या ऐपतीप्रमाणें वागून आपणास शोभे अशाच पोषाकानें बहुधा लोकांत मिरवतो, व असें करण्याबद्दल कोणास कोणीही नांव ठेवीत नाहीं. ही मर्यादा मोडून जो नुसता डौल आपले ठायीं आणतो त्यास मात्र लोक हंसतात, व तें ठीकच आहे. आणि याचप्रमाणें आपल्या खऱ्या योग्यतेहून उगीच जास्त विद्वत्तेची जो घमेंडी मारतो त्याचीही दशा होते. पण आपल्या पायरीप्रमाणें जो जगांत वागतो त्यास जसें नांव ठेवतां येत नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या वास्तविक योग्यतेनुरूप जो आपल्या गुणांचा खरा अभिमान मनांत बाळगतो तोही दोषास बिलकुल पात्र होत नाहीं. पण हें तरी साऱ्या लोकांविषयीं एकंदर सरसकट रीतीनें झालें. गुणिजनांत अग्रगण्य असून जगाच्या पूज्यत्वबुद्धीस व प्रशंसेस जे पात्र झाले, त्यांची गोष्ट तर वरच्याहूनही अधिक. सामान्य प्रतीच्या नामांकित लोकांस त्यांचा यथायोग्य गर्व दोषास पात्र करीत नाहीं इतकेंच काय तें; पण वरच्या सारख्या बड्या मंडळीस तर तो दोषावह मुळींच न होतां उलट विशेष शोभादायकच होतो!—कीं ज्याप्रमाणें सार्वभौम राजांस आपलें वैभव जेवढें बाहेर काढावें तेवढें शोभतेंच! वरील दृष्टांत ज्यांस अगदीं यथार्थ वाटेल त्यांस निरनिराळ्या देशांत होऊन गेलेल्या महान् महान् ग्रंथकारांचे वगैरे आत्मश्लाघेचे उद्गार वाचून अगदीं आश्चर्य वाटणार नाहीं, आणि ते वाचतांना हृदयवृत्ति कोणत्या प्रकारची झाली पाहिजे हेंही त्यांस कळेल. असो; आतां या प्रकारचीं कांहीं उदाहरणें येथें घेतों.

इंग्लंडांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वी मिल्टन् म्हणून एक मोठा नामांकित कवि होऊन गेला, हें सर्वांस विश्रुत असेलच. या कवीच्या लेखांत वर सांगितल्यासारखे आत्मश्लाघापर उद्गार जागोजाग सांपडतात. आपल्या काळच्या अरसिक लोकांत आपल्या अर्वाचीनत्वामुळें आपल्या अद्भुत कवित्वाचें तेज पडत नाहीं हें जाणून वरील कवीनें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, 'मी या काळीं न जन्मतां जर मागेंच जन्मलों असतों, तर बरें होतें!'[1] तसेंच या कवीचा उत्तर काळ त्याच्या पक्षाचा समूळ नाश होऊन विरुद्ध पक्षाचा जय झाल्याकारणानें मोठ्या विपत्तींत गेला, या गोष्टीस उद्देशूनही त्यानें आपल्या काव्यांत कोठें कोठें लिहिलें आहे. तसेंच पूर्ववयीं अतिशय अभ्यास केल्याच्या योगानें शेवटीं त्याचे डोळे गेले, व त्या परम दुःखकारक स्थितींत त्यानें धातारपणीं अनेक तऱ्हेचे हाल काढले, याचाही

---

१. असाच अभिप्राय वरील कवीचा प्रतिपक्षी जो जॉन्सन् त्यानें अमळ निराळ्या रीतीनें लिहिला आहे—

"His work is not the greatest of heroic poems, only because it is not the first."

*Life of Milton.*

संबंध दोन मोठ्या ठिकाणीं त्यानें आणलेला आहे. एक त्याच्या महाकाव्याच्या तिसऱ्या सर्गाच्या आरंभीं, आणि दुसरा 'स्यामसन् एगोनिस्टिस्' नामक नाटकांतही पहिल्या पहिल्यानेंच. या दोहों स्थलींचे त्याचे उद्गार वाचून ज्यांचें हृदय करुण व उदात्त रसांनीं व्याप्त होऊन जात नाहीं त्यास धन्य पुरुष ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं! असो; हें एक उदाहरण झालें. दुसरें वर्ड्स्वर्थ् नामक सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी निवर्तलेल्या कवीचें. हा कवि जरी वरच्याच योग्यतेचा नव्हता, तरी चालू शतकांत इंग्लंडांत जे कित्येक मोठमोठे कवि होऊन गेले त्यांच्यांत सर्वांनुमतें याची प्रमुखत्वानें गणना आहे. पण हा मान यास आलीकडेच प्राप्त झालेला आहे, तेथपर्यंत लहान थोर रसिक, अरसिक, विद्वान्, अविद्वान्, सर्वच याच्या कवितेचा अतिशयित उपहासच करीत असत. पण इतक्यांच्याही बडबडीस न जुमानतां हा थोर मनाचा कवि पुढील काळावर सारखी नजर देऊन धैर्यानें कालक्रमण करीत होता; आणि शेवटीं त्याचेंच खरें झालें. असो; तर याच्याही लेखांत आत्मस्तुतीचे जागोजाग उल्लेख आहेत. आमच्या संस्कृत कवींतही वरील प्रकार नाहींसा नाहीं. वर सांगितलेल्या वर्ड्स्वर्थ् कवीप्रमाणेंच आमच्या प्रसिद्ध भवभूतीचीही दशा झाली असावी असें अनुमान होतें. सामान्यत: पंडितजनांची जरी अशी समजूत आहे कीं, भोजराजापाशीं जीं कविरत्नें होतीं त्यांच्यांतच कालिदासादिकांच्या मंडळींत वरील कवि होता, तरी शोधकांच्या मतें वरील गोष्ट खरी नव्हे असें ठरलें आहे. भवभूतीच्या ग्रंथांत कांहीं ठिकाणीं जे उल्लेख आहेत त्यांवरून गुणज्ञांची प्रशंसा व राजसत्कार हीं दोन्हीही त्यास प्राप्त झालीं नाहींत हें स्पष्ट दिसतें.[१] उलटी त्याची अरसिकांच्या पायीं विटंबना मात्र पुष्कळ झाली असावी असें दिसतें. यास प्रत्यक्ष प्रमाण—

> ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां
> जानंतु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
> उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
> कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

मालतीमाधव.

"जे कोणी आमची अवहेलना चोहोंकडे पसरवतात त्यांनीं पक्कें समजून ठेवावें कीं, त्यांच्या करतां हा माझा मुळींच यत्न नव्हे. मला पूर्ण भरंवसा आहे कीं, ज्याचे मनाचे धर्म माझ्या सारखे आहेत असा पुढें मागें कोणीचा कोणी तरी निपजेलच निपजेल; कां तर काळ हा अनंत आहे आणि पृथ्वी विस्तीर्ण आहे!"

वरील श्लोकाचें भाषांतर इंग्रेजींत पद्यरूपानें जर केलें तर तें वर्ड्स्वर्थनेंच लिहिलें आहे असें ह्मणण्यास कोणीही चुकणार नाहीं; इतकें दोहोंत अत्यंत साम्य आहे. असो; तर आपल्या काळच्या लोकांची गुणानभिज्ञता पाहून महाशय कवींचे असे लोकभर्त्सनपर उद्गार

---

१. या विषयावर सविस्तर विवेचन केलेलें पाहाणें असल्यास शालापत्रक पुस्तक १२ अंक ६ आणि ११ हे पाहावे.

वारंवार प्रगट केलेले आढळण्यांत येतात; व ते सहृदय वाचकांस अत्यंत तल्लीन करून टाकतात. असाच, किंवा याहूनही विशेष उद्दामत्वाचा प्रकार अगदीं अर्वाचीन संस्कृत कवि जगन्नाथपंडित याच्याही लेखांत आढळतो. याचे कांहीं मासले पुढें देतों.

'भामिनी विलासा'च्या पहिल्या भागांत प्रायः सगळ्या अन्योक्ति आहेत; त्यांत आरंभींच पण्डितराय गर्जतात—

दिगन्ते श्रूयन्ते मदमलिनगण्डाः करटिनः
करिण्यः कारुण्यास्पदमसमशीलाः खलु मृगाः ।
इदानीं लोकेऽस्मिन्ननुपमशिखानां पुनरयं
नखानां पाण्डित्यं प्रकटयतु कस्मिन्मृगपतिः ॥

"मदस्रावानें ज्यांचीं गंडस्थळें मलिन झालीं आहेत असे मदोन्मत्त हत्ती दिगंतरीं आहेत असा जनवाद कानीं येतो; आणि सभोंवतीं पाहावें तों केवळ कारुण्यास पात्र अशा हत्तिणी व क्षुद्र पशु हेच दृष्टीस पडतात; तर अशा समयास मृगराज जो सिंह त्यानें आपल्या अत्यंत तीव्र नखांचें पांडित्य कोठें प्रगट करावें !"[१]

तसेंच वरील ग्रंथाच्या शेवटीं शेवटीं—

आमूलाद्रत्नसानोर्मलयवलयितादा च कूलात्पयोधे-
र्यावन्तः सन्ति काव्यप्रणयनपटवस्ते विशङ्कं वदन्तु ।
मृद्वीकामध्यनिर्यन्मसृणमधुरी माधुरीभाग्यभाजाम्
वाचामाचार्यतायाः पदमनुभवितुं कोऽस्ति धन्यो मदन्यः ॥

"सुमेरु पर्वताच्या पायथ्यापासून तों मलयवेष्टित सागराच्या तीरापर्यंत—( ह्मणजे सगळ्या भारतवर्षांत )—जे जे काव्यरचनानिपुण असतील त्या सर्वांनीं निःशंकपणें सांगावें कीं, द्राक्षांपासून निघणाऱ्या रसाप्रमाणें अत्यंत मधुर अशा वाणींचें स्वामित्व मजवांचून दुसऱ्या कोणास आहे !—( ह्मणजे माझ्या इतकी रसभरित काव्यरचना करणारा दुसरा कोण आहे ! )"

याप्रमाणें अगदीं सरतेशेवटचा श्लोक—

शास्त्राण्याकलितानि नित्यविधयः सर्वेऽपि संभाविता
दिल्लीवल्लभपाणिपल्लवतले नीतं नवीनं वयः ।
संप्रत्युज्झितवासनं मधुपुरीमध्ये हरिः सेव्यते
सर्वं पण्डितराजराजितिलकेनाकारि लोकाधिकम् ॥

"संपूर्ण शास्त्रांचें आकलन केलें, सारे नित्यविधि आचरले, दिल्लीपतीच्या करतलावर

---

१. वरील आरंभींची अन्योक्ति कवीनें आत्मपर लिहिली आहे. त्याचा अभिप्राय असा आहे कीं, पुरातनकाळीं कालिदासप्रभृति जे महाकवि होऊन गेले त्यांसारखे आतां कोणीच नाहींत,—जे जे कोणी आहेत ते केवळ 'कारुण्यास्पद' व क्षुद्र असेच आहेत. तेव्हां आतां टक्कर मारायाची ती कोणाशीं मारावी ?

नवीन वय घालवलें (ह्म० तरुणपणीं दिल्लीच्या बादशाहाच्या अत्यंत आदरास पात्र झालों,) हल्लीं सर्वपरित्याग करून मथुरेंत हरिसेवेंत रत आहे;—तर याप्रमाणें पंडितराजमालिकेंत जो अग्रगण्य त्यानें लोकोत्तर असें काय केलें नाहीं!"

वरील श्लोकांत प्रस्तुत कवीविषयीं चोहोंकडे असणाऱ्या प्रसिद्धीचें प्रत्यक्ष प्रमाण आहे हें आमच्या साऱ्या वाचकांच्या ध्यानांत येईलच.[1]

असो; आतां सरतेशेवटीं आमच्या महाराष्ट्रभाषेंतील कवींकडे पाहूं. यांची तऱ्हा एकंदरींत बाकीच्या सर्व भाषांतील कवींहून अगदीं निराळीच असल्यामुळें, ह्मणजे जेवढे काव्यरचना करणारे झाले तेवढे बहुधां साधुच असल्यामुळें, वरील आत्मश्लाघेचा प्रकार यांत आढळणें कठिण हें सर्वांच्या सहज ध्यानांत येईलच. आणि खरोखरीच तसें आहे. साधूंचा आणि अहंकाराचा परस्पर अत्यंत विरोध असल्यामुळें पूर्वोक्त गर्वोक्तीसारखें त्यांच्या ग्रंथांत कांहीं आढळणार नाहीं. तथापि जरी कवित्वाचा गर्व न आढळला, तरी तुकारामासारख्यांनीं आपले स्वत:विषयींचेही अभिप्राय जागोजाग स्पष्ट बोलून दाखवतांना अगदीं कमी केलें नाहीं. जसें—

मऊ मेणाहुनी आह्मी विष्णुदास कठिण वज्रास भेदूं ऐसे ।
मेले जित असों निजोनियां जागे जो जो जें जें मागें तें तें देऊं ।
भले तरी देऊं गांडीची लंगोटी नाठ्याळाचे काठी देऊं माथां ।
मायबापाहुनी बहु मायावंत करूं घातपात शत्रूहुनी ।
अमृत तें काय गोड आह्मांपुढें विष तें बापुडें कडू किती ।
तुका ह्मणे आह्मी अवघेंचि गोड जया पुरे कोड त्याचेपरी ।

तसेंच—

तोंवरी तो करी जंबुक गर्जना जंव पंचानना देखिलें नाहीं ।
तोंवरीच सिंधु करी तो गर्जना जंव त्या ब्राह्मणा देखिलें नाहीं ।
जोंवरी तोंवरी वैराग्याच्या गोष्टी सुंदर वनिता दृष्टी पडली नाहीं ।
तोंवरी तोंवरी शूरत्वाच्या गोष्टी जंव परवीर दृष्टी पडला नाहीं ।
तोंवरी तोंवरी माळामुद्राभूषण जंव तुक्याचें दर्शन झालें नाहीं ।

एके ठिकाणीं प्रस्तुत कवीनें सर्व संतांत आपलें श्रेष्ठत्व वर्णिलें आहे—

संतकृपा झाली इमारत फळा आली ।
ज्ञानदेवें रचिलें पाया रचियेलें देवालया ।

---

१. अकबर पादशाहास उद्देशून लिहिलेला एक संस्कृत श्लोक आह्मांस आढळला आहे. तो असा—

जगद्दलन भूपते वदति यद्यपि त्वां नृपं ।
मतं तु हरिशर्मणो हरिरसि त्वमेव ध्रुवम् ।
अकब्बरमहीश्वर ज्वलदघासुरग्रासतः
प्रजाः सह निजात्मना कथमथान्यथा रक्षिताः ॥

वरील हरिशर्मा कोण असेल तो असो!

नामा तयाचा किंकर तेणें केला हा विस्तार ।
जनार्दन एकनाथ ध्वज केला भागवत ।
भजन करा सावकाश तुका झालासे कळस ।

याप्रमाणेंच ईश्वरापाशीं केवळ सरूपता पावल्याचा मनांत भाव धरून तुकारामानें कोठें कोठें म्हटलें आहे--

अणुरणीयां थोकडा तुका आकाशाएवढा ।
गिळुनी सांडिलें कळिवर भवभ्रमाचा आकार ।
सांडिली त्रिपुटी दीप उजळला घटीं ।
तुका म्हणे आतां उरलों उपकारापुरता ।

तसाच पुढील सर्व प्रसिद्ध अभंग—

आधीं होता संतसंग तुका झाला पांडुरंग ।
त्याचें भजन राहिना मूळस्वभाव जाईना ।

असो; पण हा प्रकार निराळा. वर दाखल केलेल्या उदाहरणांप्रमाणें जर आमच्या मराठी कवितेंतील स्थलें पाहायाचीं असतील तर तीं दोन तीन कवींच्या ग्रंथांतच काय तीं सांपडतील. हे कवि मोरोपंत, रघुनाथ पंडित, रामजोशी हेच मुख्यत: होत. आतां यांपैकीं पहिल्याचे कांहीं उद्गार येथें सादर करतों.—

'मंत्ररामायणा' च्या शेवटीं 'विद्वत्प्रार्थनें' त वरील कवि म्हणतो—

जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं[१],
तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं; ।
महाराष्ट्रग्रंथीं रसिक कवि जे तेच रमती,
परंतु ज्ञात्याची पळहि न असावी चर[२] मती ॥

'आर्यामुक्तामाले' च्या शेवटीं म्हटलें आहे—

आर्यामुक्तामाला दाविन परि जरि तुह्मी न मागाल ।
लागाल प्रमुकंठीं घालूं फुगवील कीं रमा गाल* ॥

तसेंच 'भारता' च्या सरते शेवटीं जो उपसंहार केला आहे त्यांत आपल्या मातापित्यांस नामनिर्देशपूर्वक अभिवंदन करून आमच्या कवीनें 'भारत'-प्रणेता जो व्यास त्याशीं आपली समता व्यंग्योक्तीनें सुचवून दिली आहे.

धन्य श्रीराम पिता, धन्या लक्ष्मी सू[३] जगीं झाली, ।
आली[४] सत्यवतीची[५], कीं, भारतकीर्ति सुतमुखीं आली.॥

---

१. इंद्राच्या नंदनवनांत. २ चंचल. ३ माता. ४ सखी. ५ व्यासाची आई.

* कवीचा अभिप्राय असा कीं, जर या 'मोत्यांच्या माळा' मीं तुह्मांस दाखवल्या आणि त्या मजपासून घेऊन तुह्मीं ईश्वरास अर्पण करूं लागलां, तर लक्ष्मी रुसेल; कां कीं भगवंतास कंठालिंगन करण्याचा तिचाच अधिकार, तो माळा घेऊं पाहतील तर तिला कसा सहन होईल?

याप्रमाणेंच आपल्या काव्याचे दूषक जे खल त्यांस उद्देशून वरील ' विद्वत्प्रार्थने ' च्या शेवटीं मोरोपंत ह्मणतो—

माझी सत्कृति[1] दूषिली जरि खळें उच्छृंखळें आग्रहें,
सेवावीच परंतु नित्य रसिकें हे सद्‌गुणाच्या* गृहें ।
चंडाल त्रिदशापगेंत[2] वमला कीं धेनुला स्पर्शला
त्यांचें श्रोत्रियदेवसेव्य[3] पयही[4] त्याही सदा निर्मळा ॥

ज्या आमच्या कवीस आलीकडील महापंडितांनीं कवित्वाच्या पदावरून केव्हांच झुगारून दिलें आहे व ज्याचे ग्रंथ छापून काढण्यापुरती त्याची योग्यता आलीकडे कोणासही भासत नाहीं, त्यानेंच आपल्या ' सत्कृती ' विषयीं जेथें तेथें येवढी प्रौढी ह्मोंकावी हें आमच्या सर्व वाचकांस बहुधां मोठें विलक्षण वाटेल यांत संशय नाहीं ! पण आमची तर अशी खात्री आहे कीं, 'केकावली' सारख्या अप्रतिम काव्याच्या रचणारास जर वरील गर्वोक्ति शोभत नाहींत, तर त्या कोणत्याही कवीस शोभणार नाहींत. असो; एकंदरीत सरतेशेवटीं असेंही येथें लिहिल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं कीं, आमच्या कवीच्या प्राकृत काव्यास नाक मुरडणारे मोठमोठे 'शास्त्री,' 'पंडित,' ' आचार्य,' ' उपाध्याय ' आदिकरून सर्व बडी मंडळी जशी हळू हळू विस्मृतीच्या पंथास लागून आजला पार नाहींशी झाली, त्याचप्रमाणें त्याचे आधुनिक प्रतिपक्षी जरी मोठमोठे ' उपपदधारी ' असले तरी काळाच्या तडाक्यांत या लांब लांब किताबांचाही चुराडा होऊन जाऊन आमच्या साध्या कवीची कीर्ति आजवर जशी अबाधित चालत आली तशीच पुढें चालून निरंतर उज्वलच राहील !

असो; मोरोपंताशिवाय दुसरे जे दोन कवि वर सांगितले त्यांच्या ग्रंथांत वरच्यासारखे आत्मश्लाघात्मक निराळे उल्लेख सांपडत नाहींत. प्रसंगोपात्त व काव्याच्या आरंभीं शेवटीं वगैरे आपलें नांव घालण्याची जशी कवींची चाल आहे त्याप्रमाणें मात्र त्यांनीं आपआपल्या कृतीस केलेलें आढळतें; व विशेष ह्मटलें ह्मणजे ' कविराय, ' ' कवींद्र ' वगैरे उपपदें कोठें कोठें जोडलेलीं आढळतात, इतकेंच.

याप्रमाणें इंग्रेजी, संस्कृत व मराठी कवींनीं आपापल्या ग्रंथांतून जे स्तुतिपर उद्गार जागोजाग उघडपणें प्रगट केले आहेत त्यांपैकीं कांहीं वर सांगितले. आतां यावर आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस बहुधां असें विचारणें येईल कीं, आपल्याच तोंडानें आपली स्तुति कधीं करूं नये, तसें करणें हें मूर्खत्वाचें चिन्ह होय, वगैरे जें सारे शहाणे लोक सांगत असतात तें आणि या वरील वल्गना हीं परस्पर जुळतात कशीं ? वरील कवि येवढे ज्ञानी असून त्यांच्या हातून असें अनुचित कर्म कसें घडलें, व तें करणें त्यांस बरें कसें वाटलें ? यावर आमचें असें उत्तर आहे कीं, वरील नियम जरी सामान्यतः पाहतां खरा आहे, तरी तो पुष्कळ ठिकाणीं अपवादक होतो. पाहा कीं आपल्या स्वतःविषयीं बोलणें हें जरी प्रशस्त नाहीं, तरी, ह्यूम, गिबन्, मिल्, वगैरे ग्रंथकारांनीं आपलीं चरित्रें आपल्याच हातांनीं लिहून

१. उत्कृष्ट काव्य. २ गंगेंत. ३ ब्राह्मणश्रेष्ठ आणि देव यांस सेव्य. ४ पाणी-दूध

* ' सद्गुणाच्या गृहें ' याचा संबंध ' रसिकें ' कडे घ्यावा. सद्गुणाचें घर—आगर अशा रसिकानें असा अर्थ. ' सम्पादक '

ठेवलीं आहेत, व त्याबद्दल कोणी त्यांस नांव ठेवीत नाहीं इतकेंच नव्हे, पण तीं स्वरचितें चरित्रें लोक उलटीं अधिक आवडीनेंच वाचतात. त्याप्रमाणेंच सीझर व बाबर यांनीं आपापल्या ग्रंथांत आपल्याच पराक्रमांचें जरी स्वतः वर्णन केलें आहे, तरी तें दोषरूप न होतां जगास प्रियच झालें आहे. तेव्हां यावरून काय स्पष्ट होतें बरें ? अर्थात् हेंच कीं स्वतः-विषयींचें जरी वर्णन असलें, तरी जर तें यथार्थ आहे, तर दूषणास पात्र होत नाहीं. दुसरें असें कीं, गुणिजनांचे चहाते असून त्यांपासूनच जेव्हां त्यांस अगोदरच मानमान्यता प्राप्त होते, तेव्हां आत्मश्लाघेचा प्रसंगच येत नाहीं. सत्परीक्षकांनीं केलेल्या प्रशंसेनें संतुष्ट होऊन गुणवान् मनुष्य आपल्या श्रमांचें सार्थक झालेसें मानतो, आणि स्वस्थ रहातो, पण वरच्याच्या विपरीत जेव्हां प्रकार घडतो,—ह्मणजे गुणाची चहा न होतां उलटी थट्टा व हेळणा मात्र होते, जेव्हां

नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि ॥

" सुवासिक पुष्पाची स्वभावसिद्ध योग्यता झटली ह्मणजे डोक्यावर असणें ही होय, पायाखालीं तुडवून जाणें, ही नव्हे ! " हें विसरून जाऊन लोक एखाद्या महान् ग्रंथकाराची अवज्ञा करूं पाहतात, तेव्हां स्वतःची योग्यता प्रगट करण्यास आत्मप्रशंसेखेरीज मार्गच रहात नाहीं. तसें तो ग्रंथकार न करील तर मोठा तेजस्वी हिराही जसा अजाणत्या अडाणी लोकांच्या हेळसांडीनें कोणीकडे लोटून जाऊन हरवेल, त्याप्रमाणेंच त्याचे गुणही अप्रसिद्धच रहातील. वर ज्या कवींच्या ग्रंथांतून उतारे दिले आहेत त्या सर्वांनीं ही अवहेलना स्वतः अनुभवली असून तिच्यासंबंधानेंच वरील दर्पोक्ति प्रगट केल्या आहेत. तेव्हां या रीतीनें पाहतांही त्यांवर गर्वाचा दोषारोप करतां येत नाहीं. याखेरीज वर एकदां सांगण्यांत आलेंच आहे कीं, आपआपल्या योग्यतेप्रमाणें उंची पोषाक केलेला जसा सर्वांस चालतो, त्यांत जनदृष्ट्या कांहीं वावगें दिसत नाहीं, तसाच ग्रंथकारांसही यथायोग्य अभिमान असल्यास तो निंद्य होत नाहीं. तर इकडून पाहिलें असतांही जे ग्रंथकार साऱ्या जगास वंद्य होऊन राहिले आहेत त्यांचा स्वतःविषयींचा गर्व राजाधिराजांच्या महद्वैभवाप्रमाणें दूषणास मुळींच पात्र न होतां त्यास उलटा भूषणास्पदच होतो.

पण इतकेंच नव्हे. वर जीं कित्येक कारणें दर्शवलीं तीं पूर्वोक्त आत्मश्लाघेचा प्रकार दोषरूप समजून त्याचें दोषरूपत्व उडवण्याकरतां कळवण्यांत आलीं. आतां तो प्रकार वस्तुतः किंवा निदान रसिकजनांच्या दृष्टीनें तसा मुळींच नव्हे हें दाखवतों. पाहा कीं, कोणाचेंही यथावत् गुणदोषवर्णन करणें हें चितान्याच्या किंवा मूर्तिकाराच्या कसबाप्रमाणें आहे; ह्मणजे वरील दोन कारागीर जशी हुबेहुब प्रतिमा उतरतात तसेंच करणें हें गुणदोषविवेचकांचें काम आहे. आतां अशी कल्पना करा कीं, कोणा एकाला आपली तजवीर उत्कृष्ट काढायाची आहे किंवा उत्कृष्ट पुतळा बनवायाचा आहे; तर तो मनुष्य कोणाकडे जाईल बरें ? अर्थातच एखाद्या नामांकित चितान्याकडे किंवा मूर्तिकारांकडे हें उघड आहे. पण पुनः असें समजा कीं त्या सर्वोत्कृष्ट चितान्यास किंवा मूर्तिकारासच अशी इच्छा उत्पन्न झाली कीं,

आपणामागें आपली कीर्ति कायम रहावी यास्तव आपली एक तसबीर किंवा मूर्ति तयार करवावी, तर मग त्यानें कोणाकडे जावें ? त्याच्यासारख्या कारागिराच्या कीर्तीस साजेसें काम करण्यास यजमानास त्यास कोण सांपडेल ? व तें काम अत्युत्तम असें व्हावें तसें इतर कोणाच्या हातून होणार आहे ? ग्रीस देशाच्या इतिहासांत तद्देशीय एका अत्युत्कृष्ट मूर्तिकाराची[1] अशी एक गोष्ट लिहिली आहे कीं, आथेन्स शहरीं एक मोठें देवालय बांधलें असतां त्याच्या बाहेरच्या भिंतीवर तेथील देवांचीं चित्रें खोदून बसविलीं असतां त्या कारागिरानें त्या गर्दींतच एक आपलें आणि एक आपल्या यजमानाचें असें चित्र कोणास कळूं न देतां बसवून दिलें. पण तें पुढें जेव्हां कळून आलें तेव्हां त्याच्या शत्रूंनीं त्याबद्दल त्याजवर सरकारांत फिर्याद करून त्यास मोठी शिक्षा देवविली. असो; तर याप्रमाणें महाविख्यात जे पुरुष होऊन जातात त्यांचे ठायीं स्वाभिमान असा अनेक वेळां दृष्टीस पडतो. पण जे खरे रसिक आहेत ते त्याबद्दल वरील मत्सरी लोकांप्रमाणें त्यांच्यावर कधींही न उलटतां त्यांचा अधिक सत्कारच करतील अशी आमची खात्री आहे. असो; तर हें सर्व वरील कवीकडे घेऊन असें म्हणावयाचें कीं, ज्याप्रमाणें फिडियस् याचा पुतळा बनवण्यास किंवा रेफॅलेची तसबीर काढणें असल्यास तें काम फिडीयस् किंवा रेफॅल् यांच्यासारखें दुसऱ्या कोणाच्याही हातून होणें नाहीं, त्याप्रमाणेंच मिल्टन् किंवा जगन्नाथराव अशा महाकवींच्या वाणीचें मधुरत्व अत्यंत उत्कृष्टतेनें वर्णावयाचें असल्यास तें काम तीच स्वतः जितक्या सरसत्वानें करील तितकें इतरांकडून कदापि व्हावयाचें नाहीं. यास्तव स्वमुखानें केलेलें गुणवर्णन जरी सामान्यतः दुसऱ्यास कंटाळाच आणतें, तरी वरच्यासारख्या प्रसंगीं त्या वर्णनाच्या माधुर्यानें व व यथार्थत्वानें चित्तवृत्ति इतकी तन्मय होऊन जाते कीं, त्या आनंदभरांत वरील दोषाकडे वाचकांचें लक्षच जात नाहीं. सारांश, ज्याप्रमाणें समरांगणांत महावीरांच्या वीरोक्ति आत्मश्लाघापर असतांही ऐकणारांस त्रास न देतां उलट्या अत्यंत आल्हादच देतात, किंवा मानिनी स्त्रियांचा आपल्या रूपवत्त्वाचा अभिमान त्यांच्या सौंदर्यास विशेष रमणीय करून त्यांचीं निर्भर्त्सनपर भाषणेंही त्यांच्या वल्लभांस उलटीं अधिक हृद्य वाटवितो, त्याचप्रमाणें संपूर्ण जगाच्या प्रेमाचें स्थान होऊन बसलेल्या कवीश्वराचे लोकाधिक्षेपपर उद्गारही रसिकजनमनास कांहीं विलक्षण रीतीनें मोहून टाकतात ! ते वाचतांना त्यास तृप्ति न होतां दर खेपेस ते त्यांत अधिकाधिक तन्मयच होऊन जातात !

९. असो; येथवर आपल्या अंगीं वास्तविकपणें असणाऱ्या गुणांचा अभिमान मनु-

---

१. हा मूर्तिकार फिडियस् होय. याच्या तोडीचा कारागीर आजपर्यंत कोणी झालाच नाहीं. ज्यूपिटर (इंद्र) वगैरे देवांच्या याच्या मूर्ति अजून जपून ठेवल्या आहेत. त्यांकडे पाहून आजपर्यंत हजारों कारागिरांनीं हात टेकले. हा कारागीर पेरिक्लीज याचा जिवलग मित्र होता. याचीच एक मूर्ति फिडियसानें आपल्या मूर्तींबरोबर खालीं लिहिल्याप्रमाणें खोदून तयार केली होती. पुढील वृत्तांत खालीं आला आहेच.

२. रेफॅल् हा वरच्या फिडियसासारखाच आपल्या कलेंत अगदीं वस्ताद होऊन गेला. याचीं चित्रें अद्याप रोम शहरीं आहेत. तीं कितीही पैसा दिला तरी तेथील लोक कोणास देत नाहींत. या चित्रांच्याही बरोबरीचा आजपर्यंत कोणीही झाला नाहीं.

ण्यास असल्यास ती दोषरूप होत नाहीं याविषयीं निरूपण झालें. हा वरील सदराचा एक भाग झाला. याखेरीज अदोषरूप गर्वाचे आणखीही कित्येक प्रकार आहेत. ते स्वाभिमान, कुलाभिमान, जात्यभिमान, देशाभिमान इत्यादि होत. यांविषयीं हवें तसें विवेचन करण्यास पुष्कळ जागा पाहिजे; ती प्रस्तुतच्या अंकांत घेतां येत नाहीं. यास्तव पुढें एखादे वेळेस निराळ्याच निबंधांत त्या सर्वांविषयीं पृथक् विचार करूं. असो; आतां सरतेशेवटीं प्रस्तुत विषयावर आणखी कांहीं थोडे विचार प्रदर्शित करून हा लेख आटपतों.

१०. प्रस्तुत निबंधाच्या आरंभीं आह्मीं दाखवलें आहे कीं, मनुष्याचे ठायीं परमेश्वरानें ज्या निरनिराळ्या वृत्ति ठेवल्या आहेत त्या व्यर्थ किंवा अपायकारक मुळींच नाहींत; तर त्या शरीरावयवांप्रमाणें मनुष्याच्या कल्याणार्थच मूळच्या दिल्या असून केवळ त्याच्याच असमंजसपणानें त्या प्रसंगानुसार त्यास बंधक होतात. हीच गोष्ट सांप्रत विवेचनाचा विषय जो गर्व त्यासही लागू पडते. कशी ती पहा. जसा क्रोध हा मनुष्यास योग्य प्रसंगीं अवश्य आलाच पाहिजे,—ह्मणजे ज्या वेळेस कोणी कोणाच्या विनाकारण वाटेस जाईल व त्यास कोणत्याही प्रकारची नाहक इजा करील तेव्हां त्याचें पारिपत्य त्यानें अवश्य केलेंच पाहिजे.—त्याचप्रमाणें आपली खरी योग्यता लोकांत कमी करण्याचा जो यत्न करील त्याशीं गर्वाची बागणूकही समजदार मनुष्यास अवश्य करावी लागते. तसें तो न करील तर वरील प्रसंगीं सर्वस्वाची किंबहुना शरीराचीही हानि होण्याचा जसा संभव, त्याचप्रमाणें या दुसऱ्या प्रसंगीं आपल्या अंगच्या योग्यतेचाही नाश अवश्य व्हावयाचा. याचा उत्कृष्ट प्रत्यय सध्यां आमच्या देशांतच आहे. आमचें वैभव होतां होतां अगदीं नष्ट झाल्यापासून आज पांचपन्नास वर्षें इंग्रेज ग्रंथकार, इंग्रेजी शिक्षक, इंग्रेजी मिशनरी वगैरे सर्व लोकांनीं एकवट होऊन आमच्या लोकांस जें कांहीं घाबरें करून सोडलें आहे तें कांहीं पुसूं नये. एखाद्या बिचाऱ्या हरणावर कुत्र्यांची झुंड सुटून त्यांनीं त्याजवर लगट करून त्यास पाडाव करावें, आणि मग जशी त्याची दुर्दशा, त्याचप्रमाणें वरील ज्ञानसंपन्न लोकांपैकीं ज्यानें उठावें त्यानें आह्मांस अज्ञानांधकारांतून वर काढण्याचा जसा काय पतकरच घेऊन सर्वांनीं आह्मांस एका मोठ्या तत्त्वाचें पक्कें ज्ञान करून दिलें आहे कीं, आह्मांस ज्ञान ह्मणून कसें तें मुळींच नाहीं! आह्मी सर्व केवळ मतिमंद, कर्तृत्वशून्य व अत्यंत नीच असे कोणी क्षुद्र प्राणी असून इसापनीतींतील ओझ्यानें लादलेल्या गाढवाप्रमाणें आज यांचें उद्यां त्यांचें असें सतत पिढ्यानपिढ्या ओझें वागवण्यासच केवळ निर्माण झालों आहों. आह्मांस योग्य कामें झटलीं ह्मणजे नांगर धरणें, पोरें हांकणें, कागद घासणें, छोटेखानी शिपाई बनून हडेल हप करणें इतकींच काय तीं! अंमळ मोठ्याशा वरील कामांवरही आह्मांस नेमतां कामा नये,—कारण व जाणो आमच्या अजागळपणानें सरकारच्या गळ्यांत एखादें जबरदस्त घोंगडें येऊन पडलें तर मग कोणी उगीच पंचाईत करीत बसावी! तेव्हां पहिल्यापासूनच सावधगिरी ठेवलेली बरी नव्हे? असो; एकंदरींत सध्यांच्या काळीं अमुक अमुक गुण ह्मणजे आमच्या ठिकाणीं आहे असें ह्मणण्यास मुळींच जागा राहिलेली नाहीं. जगांत जेवढे ह्मणून गुण आहेत त्यांपैकीं झाडून एकूण एक आमच्या राजकर्त्यांनीं आपणांकडे ओढून घेऊन सगळे अवगुण तेवढे दरोबस्त

आह्मांकडे सोंपवून दिले आहेत. फार तर काय पण ज्या गोष्टी केवळ निर्विवादशा आजपर्यंत आह्मांस वाटत होत्या त्याही आलीकडे निवळ खोट्या ठरत चालल्या आहेत! आमचा देश साऱ्या पृथ्वींत कंगाल असून आमच्यानिमित्त आमच्या दयाळू राजकर्त्यांस दर वर्षी विलायतेंतून अगणित द्रव्य उलटें इकडेच आणावें लागतें ही गोष्ट आजपर्यंत कोणास कळली होती! आभाळांत दगडफोडीचा कारखाना असून आयतीं तयार झालेली देवळेंची देवळें एखादे वेळेस मजेखातर खालीं कोसळतात हें शुभवर्तमान आजपर्यंत कोणीं जगांत जाहीर केलें होतें! 'रामायण' हें होमरच्या काव्यावरून उतरलें आहे. 'भगवद्गीता' 'पवित्र शास्त्रां'तील मजकूर चोरून बनवली आहे, वगैरे ग्रंथकर्तृत्वाचीं परम गूढ रहस्यें प्रणीत करण्याची युरोपीय महापंडितांशिवाय कोणा इतराची छाती झाली असती? तेव्हां एकंदरांत आमच्या देशास उगीच वर मान करण्यास जेथें जेथें म्हणून सांपडेल तेथें तेथें देवाच्या आवडत्या सत्यनिष्ठ लोकांनीं वरच्याप्रमाणें टोला हाणलाच! एकूण धन्य त्यांची यांत संशय नाहीं. इतःपर एतद्देशीय लोकांस, आणि त्यांतून विशेषतः हिंदूंस, कोणत्याही संबंधें उगीच प्रौढी मिरवण्याचें बिलकुल कारण उरलें नाहीं. हें तर काय पण मनुष्यमात्रास जे कांहीं स्वाभाविक हक्क असतात तेही त्यांस जागवतां कामा नयेत. वरील हक्कांपैकीं दोन मुख्य म्हटले म्हणजे एक शरीराचें स्वातंत्र्य म्हणजे हवें तें करण्याची मोकळीक, आणि दुसरा मनाचें स्वातंत्र्य म्हणजे हवा तसा विचार करण्याची मोकळीक हे होत. हे दोन्ही अधिकार मनुष्यास जन्मसिद्ध आहेत. पण हेही हल्लींच्या काळीं निष्प्रतिबंध चालतात असें नाहीं. वाटेनें जातांना जर सोजरसाहेबांची गांठ पडली,—त्यांतूनही त्यांच्या हातांत अग्नियंत्र असलें,—तर मग बिचाऱ्या नेटिवानें ती वाट आपली सोडून द्यावी हें बरें; कां कीं साहेब मजकूर स्वभावतःच किती सालस व दयाळू असतात, व पुढें कोडतांतून अशा खटल्यांचे निवाडे कसे होतात हें कोणासही माहीत नाहींसें नाहीं. दुसरें स्वातंत्र्य मनाचें. हें आमच्यापासून हिसकूनच घेतलें आहे असें नाहीं; तरी वरच्याप्रमाणेंच तें चालण्यास पुष्कळच अटकाव आहेत हें उघड आहे. जी गोष्ट आमच्या गौरवर्ण बांधवांनीं केली असतां खुशाल चालते, किंबहुना तीबद्दल त्यांची वाहवाही होते, तीच गोष्ट केली असतां नेटिवास चोहोंकडून सर्व खायाला उठतात. तेव्हां न्याय अन्याय तोलण्याचा कांटा युरोपियन् लोकांना एक आणि आह्मांला एक अशी सांप्रतची व्यवस्था आहे. विद्येकडे वगैरेही हाच वैषम्यभाव आढळतो. एखादी जागा युरोपियनास मिळावयाची असतां जितकी विद्वत्ता लागते तिच्या दसपट किंवा शंभरपट विद्वत्ता अंगीं असतांही ती नेटिवास मिळण्यास मारामार पडते. तेव्हां दहा किंवा शंभर नेटिवांबरोबर एक युरोपियन् असें प्रमाण पडलें. आह्मा एतद्देशीय लोकांस कित्येक वर्षे उरस्फोड करूनही इंग्लिश भाषेचे प्रयोग नीट करतां येतच नाहींत. यास्तव कित्येक दयाळू इंग्रेज ग्रंथकारांनीं आह्मांकरतां लहान लहान ग्रंथ करून ठेवले आहेत; त्यांतूनही इंग्रेजीचे उच्चार[1] म्हटले तर ते आह्मांस कधींच साध्य व्हावयाचे नाहींत. तसें

---

१. इंग्रेजीच्या उच्चारविषयांची वरची जी घमेंडी तिकडील लोकांच्या तोंडून हमेश ऐकू येते ती अगदीं खोटी असेल असें आह्मी म्हणत नाहीं. तरी इतकें खरें आहे कीं, इकडील लोकांस तिक-

[ पुढें चालू ]

होण्यास जन्मोजन्मीं तपश्चर्या करून जेव्हां खुद्द लंडन् शहरांतच जन्मास यावें तेव्हांच तो महालाभ व्हावयाचा, याप्रमाणें मोठमोठे विद्वान् व अनुभवशीर असे तद्देशीय पंडित सर्वांस सांगतात. पण तीच आमच्या इकडच्या भाषांची गोष्ट पाहा. यांचे प्रयोग युरोपियन् लोकांस नीट करतां येत नाहींत हें तर नाहींच,—छे छे! असें म्हणेल त्याची जिव्हा झडो!—पण खुद्द आमच्याच लोकांनीं केलेले ग्रंथ आमच्या भाषांच्या सरणीस यथास्थित उतरले आहेत कीं नाहींत याविषयींची साक्ष वरील परस्थ पंडित देतात! कोणी कसाही नवीन ग्रंथ तयार केला कीं त्याच्या शुद्धाशुद्धतेविषयीं मत देणारे कोण?—अर्थातच मिचेल्साहेब, विल्सन्-साहेब, हौग्साहेब वगैरे! आमच्या बिचाऱ्या एतद्देशीय पंडितांस दोन तीन भाषांचाच पुरेसा अभ्यास करतांना मोठी पंचाईत पडते, पण आमच्या युरोपीय पंडितांस आपली जन्म-भाषा शिकून शिवाय इंग्लिश्, फ्रेंच् वगैरे अर्वाचीन व ल्याटिन्, ग्रीक् वगैरे प्राचीन भाषांत पारंगत होऊन खेरीज आमच्या इकडच्याही दहा पांच सहज बगलेंत मारतां येतात ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? काय असेल तें असो! एशिया खंडाकडील लोक चटसारे नामर्द व बेबंदशाई हा युरोपियन् इतिहासकारांचा एक मोठा सिद्धांत होऊन गेला आहे, तसाच कांहीं प्रकार इकडच्या भाषांचाही नसेल ना! असो; असाच किंवा याहूनही विचित्र प्रकार उच्चारांचा. इंग्लिश् भाषेंतील शब्दांचा स्वरही अंमळ इकडे तिकडे झालेला कोणास खपत नाहीं,-तेवढ्यावरूनही त्या बोलणाराची भाषाज्ञानाची परीक्षा कित्येक करूं जातात; पण आमच्या एतद्देशीय भाषास कोण विचारतो? जेथें खुद्द व्याकरणावर व भाषाप्रयोगां-वरही धाड पडते तेथें येवढ्याशा तेवढ्याशा उच्चाराची कोण पर्वा करतो! मेकॉलेसाहेबांनीं आपल्या देशबांधवांची आमच्याशीं तुलना करून कोठेंसें म्हटलें आहे कीं, इंग्लंडांत एका मनुष्याचें डोकें फुटलें असतां जितका लोकांत गवगवा होतो तितका हिंदुस्थानांत तीन कचकचीत लढाया झाल्या तरी होत नाहीं; तर हीच गोष्ट इंग्लिश् व एतद्देशीय भाषांस अनुक्रमेंकरून लागते. असो; तर याप्रमाणें युरोपियन् व नेटिव यांत इतकी तफावत हरएक बाबतींत पडलेली आढळते.

वरील पाल्हाळवार मजकुराचें एकंदर धोरण आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असे-लच. तें इतकेंच आहे कीं, आमच्या देशाची सांप्रत काळीं अत्यंत निकृष्ट अवस्था आली असल्यामुळें तो सगळ्या जगाच्या व विशेषेंकरून बहुतेक इंग्लिश् लोकांच्या दृष्टीनें केवळ अवहेलनेसच पात्र झाला आहे. तर जे खरे देशाभिमानी असतील व सत्यनिष्ठ असतील त्यांस प्रस्तुत निबंधाच्या या शेवटल्या भागांत आम्ही इतकेंच सुचविणार कीं, त्यांनीं वरील निंदेनें बिलकुल खचून जाऊं नये; आणि मेकॉलेसारख्यांच्या मोठ्या नांवास भिऊन न जातां व मिशनरी, पाद्री, बाटे वगैरे लोकांच्या शिव्यांस व रागास अगदीं न जुमानतां आपल्या देशावर वरील लोकांनीं जीं अज्ञानमूलक व दुराग्रहजन्य परोपरीचीं दूषणें बळेंच

डच्या भाषांचे उच्चार जितके साधतात तितके तिकडच्यांस इकडचे साधत नाहींत. आमच्या देशां-तून प्रख्यात बाबू केशवचंद्र-सेन यांसारखे जे कित्येक विद्वान् तिकडे गेले होते त्यांचें बोलणें ऐकून त्यांच्या उच्चाराची व सफाईची तिकडील पुष्कळ लोकांनीं खूप तारीफ केली असें ऐकण्यांत येतें.

जाणून बुजून दिलीं आहेत त्यांचें यथास्थित खंडन करावें. असें केलें असतां त्यांचे याच देशावर तर काय, पण एकंदर सगळ्या जगावरही मोठे उपकार होतील!

असो; तर याप्रमाणें प्रस्तुत मनोवृत्तीचा मनुष्यास अत्यंत उपयोग आहे. ही त्याचे ठायीं वास करीत नसेल तर मत्सरी व द्वेषी मनुष्यांच्या निर्भर्त्सनेखालीं तो तेव्हांच खचून जाऊन त्याच्या अंगचे खरे गुणही कदाचित् लोपून जातील. यास्तव भर्तृहरीनें 'नीतिशतकांत' ह्मटलें आहे—

कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्तेर्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।
अधःकृतस्यापि तनूनपातो नाधः शिखा याति कदाचिदेव ॥ १०६ ॥

" गंभीर मनाचे जे पुरुष असतात ते सर्वांनीं अवमानना केली असतांही अंगचा धैर्यगुण कदापि सोडीत नाहींत. कसें? तर जसा अग्नि उलटा केला असतांही त्याची शिखा खालीं न राहतां वरच जाते!"

---

## वक्तृत्व.

वद्वक्ता सदसि ब्रवीतु वचनं यच्छृण्वतां चेतसः
प्रोल्लासं रसपूरणं श्रवणयोरक्ष्णोर्विकासश्रियम् ।
क्षुन्निद्राश्रमदुःखकालगतिहृत् कार्यान्तरप्रस्मृतिं
प्रोत्कण्ठामनिशं श्रुतौ वितनुते शोकं विरामादपि ॥[1]

अंक १८—(१) विषयोपक्षेप. (२) 'वक्तृत्व' शब्दाची व्याख्या. (३) प्रस्तुत विषयाचे विभाग. (४) वक्तृत्वगुणाची उत्पत्ति. (५) तिचा लोकसत्तात्मक राज्याशीं संबंध. (६) उदाहरणें:— (७) ग्रीस देश, (८) डिमॉस्थिनीस. (९) रोम. (१०) सिसरो. (११) इंग्लंड. (१२) बर्क.

१. हा विषय फार महत्त्वाचा आहे. त्यांतून अलीकडे पांच सहा वर्षें तर याकडे लोकांचें चोहोंकडे विशेष लक्ष लागलें असल्यामुळें याविषयीं थोडा बहुत कांहींच विचार न केलेले फार थोडे लोक सांपडतील. यास्तव या खेपेस सदरील विषयावर कांहीं विचार प्रगट करण्याचें मनांत आणलें आहे. पुस्तककर्त्यांचें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे निरनिराळ्या विषयांवर लोकांचीं जीं मतें ठरून गेलीं असतील त्यांचा खरेखोटेपणा पाहून तीं नीट करण्याचा यत्न करणें हें होय. यास्तव प्रस्तुत विषयावर लोकांत सामान्यतः जीं मतें आढळतात त्यांविषयीं विचार करून या विषयाचें स्वरूपही आमच्या वाचकांच्या लक्षांत विशेष यथार्थत्वानें आणावें या हेतूनें पुढील निरूपण करतों.

---

१. "सभेंत उभें राहून वक्त्यानें बोलणें तर असें बोलावें कीं, तें ऐकतांना श्रोत्यांचीं अंतःकरणें प्रसन्न व्हावीं, कर्ण बाग्रसानें भरून जावे, आणि डोळे आश्चर्यानें विकास पावावे; तसेंच क्षुधा, निद्रा, श्रम, दुःख आणि कालगति ह्यांचें त्यांस भान राहूं नये; इतर सर्व कार्यांचें विस्मरण पडून भाषण व कथाकडेच त्यांस अतिशय उत्कंठा वाटावी; आणि तें संपलें असतां फार वाईट वाटावें!"

२. आतां प्रथमतः 'वक्तृत्व' शब्दाचा मूळ अर्थ पाहिला तर 'बोलणारेपणा' ह्मणजे 'बोलण्याची शक्ति' असा होय. पण हा केवळ यौगिक अर्थ झाला. रूढीवरून पाहिलें असतां नुसत्या वाचाशक्तीस वरील शब्द लागत नाहीं; त्याच्या पोटीं वरच्याहून पुष्कळ जास्त अर्थ गर्भित होतो. तो पुढें वक्त्यांच्या अंगीं कोणकोणते गुण अवश्य असले पाहिजेत त्याचें वर्णन करतांना स्पष्ट होईलच. सध्या प्रसंगानुसार थोडक्यांत येवढेंच सांगतों कीं, 'वक्तृत्वा'-चें मुख्य लक्षण मोहकपणा होय. ह्मणजे जें भाषण ऐकतांच श्रोत्यांची चित्तवृत्ति तदस्थ होऊन ती बोलणाराकडे अगदीं वेधून जावी त्याचें नांव वक्तृत्व.

३. आतां प्रस्तुत विषयाचे चार भाग करून त्यांचा क्रमवार विचार करूं. ते चार भाग असे–एक वक्तृत्वाचें आदिपीठ जो ग्रीस देश तेथें त्याची उत्पत्ति होऊन प्रसार कसा झाला व तेथें तें कोणत्या दशेस येऊन पोंचलें याविषयीं लिहून नंतर तेथून इतर देशांत त्याचा फैलावा कसा व कितपत झाला वगैरे वृत्तांत लिहूं. याप्रमाणें पहिल्या भागांत देशांतराचें कथन करून दुसऱ्यांत या आपल्या देशांत प्रस्तुत प्रकार कितपत होता याविषयीं निरूपण करूं तिसऱ्यांत हल्लीं वक्तृत्वोत्तेजनाचा जो प्रकार चालू आहे त्याविषयीं कांहीं लिहूं. आणि चवथ्यांत सदरील विषयाविषयीं एकंदरीनें विवेचन करून वक्त्याचे अंगीं गुण कोणकोणते असावास पाहिजेत, वक्तृत्वापासून उपयोग काय, इत्यादि गोष्टींविषयीं विवेचन करूं.

४. तेव्हां प्रथमतः प्रस्तुत वक्तृत्वगुणाची उत्पत्ति कशी होते व त्याचा फैलावा होण्यास कोणत्या गोष्टी कारणभूत होतात याविषयीं विचार करायाचा. आतां एकंदर इतिहासा-वरून जर पाहिलें तर एक मोठी गोष्ट कळून येते कीं, जेथें जेथें लोकसत्तात्मक राज्यें होतीं तेथें तेथें वरील गुणांचें वास्तव्य होतें. पाहा कीं, सगळ्या ग्रीस देशांत आथेन्स येथेंच काय तो वरील राज्यप्रकार चालू असल्यामुळें मोठमोठे नामांकित वक्ते तेथेंच मात्र निपजले. बाकी, त्या शहराच्या जोडीचीं दुसरीं जी स्पार्टा, थीब्स्, मासिडन् वगैरे संस्थानें होतीं त्यांच्या सगळ्या इतिहासांत कोणी मोठा वक्ता होऊन गेल्याचें एक सुद्धां उदाहरण सांपडत नाहीं. तोच प्रकार पुढें इटाली देशांतही नजरेस येतो. त्या देशांतही ग्रीसप्रमाणेंच अनेक संस्थानें होतीं; पण मोठे वक्ते झालेले असे रोम शहरीं मात्र इतिहासांत प्रसिद्ध आहेत. तोच प्रकार अर्वाचीन काळीं आलीकडे सुमारें शंभर दोनशें वर्षें इंग्लंडांतही दृष्टीस पडतो. तो तरी केव्हांपासून ह्मणाल तर राजाचें आणि प्रजेचें मोठें युद्ध होऊन दुसऱ्या पक्षास अधिकाधिक स्वातंत्र्य ज्या वेळेपासून मिळूं लागलें तेव्हांपासूनच. तसेंच सुमारें शंभर वर्षां-पूर्वीं फ्रान्स देशांत मोठी धामधूम होऊन तद्देशीय लोकांस जें क्षणिक स्वातंत्र्य प्राप्त झालें होतें त्या प्रसंगींही येवढ्याशा थोड्या वेळांत सुद्धां वक्तृत्वशक्तीचा क्षणमात्र उदय झाला होता. तसाच आलीकडे अमेरिकेंतील नव्या प्रजासत्तात्मक राज्यांतही झाला आहे. आतां तोच प्रकार उलट पाहा. इकडे एशियाखंडांत आजपर्यंत शेंकडों मोठमोठीं राज्यें होऊन गेलीं; पण एकांतही वक्त्याच्या भाषणानें सगळे लोक एकदम चेतून गेले आहेत, वक्त्यांच्या पाठशाळा घातल्या असून त्यांतून मोठ्या नामांकित गुरूंनें शिष्यांस व्याख्यान चाललें आहे, अथवा संस्थानिक कारभाराच्या मोठाल्या सभांतून दोन वक्त्यांच्या परस-

रांवर कीव्या प्रतिकोव्या चालल्या आहेत, असा प्रकार बिलकुल कोठेंही आढळत नाहीं. फार तर काय, पण 'वक्ता' व 'वक्तृत्व' हे शब्दही आलीकडील नव्या अर्थाचे दर्शक असे एशिया खंडांतील कोणत्याही भाषेंत सांपडतीलसें वाटत नाहीं. कारण कोणत्याही शब्दानें वाच्य जो अर्थ तोच जर लोकांच्या मनांत कधींच आला नसेल तर त्याचा व्यंजक शब्द भाषेंत कधीं असणार नाहीं हें उघड आहे. असो; तसेंच दुसरें अत्यंतर हें पाहा कीं, आमच्या प्राचीन हिंदु लोकांत अनेक शास्त्रें व विद्या उदयास आल्या होत्या, व यास्तव ग्रीक्, रोमन् वगैरे जुन्या राष्ट्रांतून जे जे प्रकार आढळतात ते सर्व आमच्या देशांत होते, पण नव्हते असे दोन मात्र. एक इतिहास आणि दुसरें वक्तृत्व. यांपैकीं पहिल्याचा अभाव असण्याचीं कारणें गेल्या सालच्या जून महिन्याच्या अंकांत [1] दाखल केलीं आहेतच. आणि दुसऱ्याच्या अभावाची उपपत्ति प्रस्तुत प्रतिपादनावरून सहजच होईल. ती अर्थात् अशी कीं, आमच्या देशांत राज्यांचा प्रकार काय तो साम्राज्याचाच होता; ह्मणजे सगळी सत्ता एका राजाच्या हातीं असून सर्व प्रजा त्याची केवळ अंकित:,अशीच राज्यरीति अगदीं प्राचीन काळापासून तों आजपर्यंत सारखी चालत आली आहे. यास्तव वक्तृत्वाची उत्पत्ति येथें कधीं झाली नाहीं ही ठीकच. मुसलमानांचा इतिहास जर पाहिला तर त्यावरून तर प्रकृत सिद्धांतास फारच मोठी दृढता येते. पाहा कीं, महंमदाच्या अनुयायांनीं आरबस्थान, इराण, हिंदुस्थान, चीन असे पूर्वेकडील देश व पश्चिमेकडे मिसर देश, आफ्रिकेचा उत्तर किनारा, स्पेन, फ्रान्स, व हल्लीं ज्यास तुर्कस्थान ह्मणतात ते दोन देश, येवढा पृथ्वीचा अफाट विस्तार व्यापून इतकीं निरनिराळीं राज्यें स्थापलीं असतां,—व त्यांतून विशेष काय कीं, ग्रीक् व रोमन् लोकांच्या सगळ्या विद्या त्यांनीं आपल्याशा करून टाकल्या असतां, लोकसत्तात्मक राज्याची कल्पनाही कधीं त्यांच्या मनांत आली नाहीं. आणि ग्रीक् लोकांचे वैद्यकावरील, ज्योतिषावरील, अध्यात्मविद्येवरील वगैरे सर्व ग्रंथ जरी त्यांनीं आपल्या भाषेंत उतरवून त्यांचा मोठ्या हौसेनें अभ्यास केला, तरी त्या भाषेंतील वक्तृत्वाचे जे अत्युत्तम ग्रंथ ते मात्र त्यांच्या राज्यरीतीस अगदींच विरुद्ध असल्यामुळें त्यांस विशेष प्रिय झाले नाहींत असें दिसतें. कारण ते प्रिय होऊन त्यांतील मतें जर त्यांच्या मनांवर ठसतीं, तर ग्रीक् व रोमन् लोकांच्या सारखें एकादें तरी लोकसत्तात्मक राज्य त्यांच्या येवढ्या अफाट मुलखांत कोठें तरी स्थापित झालें असतें. असो; पण वरील लोकसत्तात्मक राज्याची कल्पना इकडील पूर्वदेशीय लोकांच्या स्वभावास किती अत्यंत अपरिचित आहे याची उत्कृष्ट प्रतीति आह्मांस आमच्या घरचीच आहे. हल्लीं आमच्या देशांत इतक्या हजारों सभा दर वर्षीं उपस्थित होतात व लवकरच लयासही पावतात यांचें मुख्य कारण पाहूं गेलें असतां ही सभांची पद्धत केवळ अन्यदेशीय असल्यामुळें तिचें बीं इकडील लोकस्वभावांत रुजण्यास अजून पुष्कळ काळ पाहिजे हें होय असें आह्मांस वाटतें. आज हजारों वर्षें लोकप्रवृत्तीचा जो ओघ चालत आला आहे त्यास एकाएकींच नवें वळण देऊं लागलें असतां कसें चालेल ? असो; तेव्हां वरील उल्लेखावरून एकं-

---

[1] मागें अंक ६ पृष्ठ ५५ पहा. "सम्पादक"

दर सिद्ध काय होतें कीं, लोकसत्तात्मक राज्याची कल्पना एशियाकडील लोकांस बिलकुल माहीत नव्हती. ह्मणून संस्कृत, फारशी, आरबी वगैरे भाषांतून ग्रीक् व ल्याटिन् भाषांप्रमाणें वक्तृत्वाचे ग्रंथ मुळींच नाहींत यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

५. वरील प्रतिपादनाचा रोख आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत आलाच असेल कीं, वक्तृत्वशक्तीचा उदय होण्यास देशांतील राज्यरीति एका विशेष प्रकारची असावयास लागते. हा विशेष प्रकार लोकसत्तात्मक राज्य हा होय. आतां हाच प्रकार मात्र वक्तृत्वाच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस कां कारण व्हावा, व इतरांत वरील दोन गोष्टी कां होऊं नयेत, याचें कारण जर कोणी विचारील, तर तें सांगण्यास फार कठिण आहे असें नाहीं. पाहा कीं, मनुष्याचा काय अगर राष्ट्राचा काय, कोणाचाही अंगभूत गुण प्रगट होण्यास कांहीं विशेष प्रसंगच यावा लागतो; तो जर आला नाहीं तर तो कधींही दृष्टोत्पत्तीस यावयाचा नाहीं. तर याचप्रमाणें कोणा मनुष्याच्या ठायीं वक्तृत्वशक्ति कितीही उत्कृष्ट असली, तरी जोंपर्यंत तिचा विकास होण्यास हवा तसा अवकाश मिळाला नाहीं, तोंपर्यंत ती त्याची त्याजपाशींच त्यास स्वतःसही न कळतां राहील हें उघड आहे. तर यावरून सहजच दिसून येईल कीं, लोकसत्तात्मक राज्य असून समाजाच्या किंवा सभेच्या बहुमतानें जेव्हां राज्यकारभार नेहेमी चालत असतो, तेव्हां बुद्धिमान् पुरुषांस अशा समाजांचें किंवा सभांचें एकचित्त करून आपल्यासारखा एकादा सल्ला करून घेणें असतां त्यांस वक्तृत्वासारखें जबरदस्त हत्यार कोणतेंही सांपडणार नाहीं. तें ज्याजपाशीं पुरें असेल त्याच्या मग सर्व लोक मुठींत आले असें समजायाचें. तो ह्मणेल ती पूर्व दिशा होऊन सगळ्या संस्थानावर त्याचाच अंमल चालू आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असो; तर याप्रमाणें सर्व राज्यप्रकारांत लोकसत्तात्मक राज्य हेंच वक्तृत्वशक्तीच्या उदयास अनुकूल होय; कारण बाकी कोणत्याही प्रकारांत बहुजनांच्या मतावर राज्यकारभार चालत नसल्यामुळें बहुजनांचें मन आपल्या मताकडे वळविण्याची कला जें वक्तृत्व त्याची गरजच पडत नाहीं; आणि याप्रमाणें वरील कलेचें मूळच खुंटल्यामुळें तिचा विस्तार होण्याचा संभवच नाहीं हें उघड आहे.

६. वरील दोन कलमांत वक्तृत्वशक्तीचा उदय होण्यास कोणच्या प्रकारची स्थिति असावी लागते याविषयीं सामान्यतः लिहिलें. आतां वरील नियमाचीं कांहीं इतिहासप्रसिद्ध उदाहरणें दाखल करतों. त्यांवरून वरच्या नियमाचा खरेपणा आमच्या वाचकांच्या चांगला लक्षांत येईल.

७. पहिलें मोठें उदाहरण ग्रीस देश. या देशाचा इतिहास[1] ज्यानें वाचला नाहीं त्यानें मानवी बुद्धीचे अद्भुत अद्भुत चमत्कार मुळींच पाहिले नाहींत असें ह्मटलें पाहिजे. हा देश पृथ्वीच्या साऱ्या खंडांत अगदीं लहान जें युरोपखंड त्याच्या नकाशांतही पाहिला असतां पुरता टीचभरही भरणार नाहीं. पण येवढासा चिमुकला देश असतांही ' मूर्त लहान

---

१. आमच्या मराठी भाषेंत बहुधा सर्व विषयांवर कांहींना कांहीं तरी लहान मोठे असे ग्रंथ आहेतच. पण ग्रीस व रोम यांचे इतिहास करण्याचें अद्याप कोणाच्याच मनांत आलें नाहीं हा चमत्कार आहे !

पण कीर्ते मोठी ' या आपल्या भाषेंतील म्हणीप्रमाणें याच्या कीर्तीचा दुंदुभि आजपर्यंत साऱ्या जगभर वाजत आहे, व तसाच तो जगत्प्रलयावधि वाजत राहील ! याच्याहून शंभरपट, हजारपट मोठमोठाले असे दुसरे कित्येक देश आहेत, व कित्येकांत देवाच्या पैगंबरांनीं आकाशांतून उतरून त्याच्या प्रियत्वाबद्दल लोकांस आश्वासन दिलें आहे; पण वरील देश आकारमानाचें येवढा लहान असतां व देवाचा लाडका नसतांही त्याचें केवळ स्वतःच्या बुद्धिबळावर जें आपलें नांव गाजविलें आहे त्याची सर आजपर्यंत कोणत्याही अन्य देशास आली नाहीं, व पुढेंही येईलशी वाटत नाहीं ! असो; या देशाविषयीं प्रस्तुत विषयाच्या संबंधानें हेंच सांगावयाचें आहे कीं, वक्तृत्वाचा वांतच पहिल्यानें उदय होऊन तें लवकरच अगदीं कळसास चाऊन पोंचलें; आणि येथूनच अन्य देशांत तें पसरून अद्यापही त्याचें वास्तव्य जें देशोदेशीं आहे त्याचें मुख्य कारण हाच देश होय. शिवाय दुसरें असें आहे कीं, प्रस्तुत कला याच देशांत जें पूर्णत्व पावली त्यावर वरचढ आज दोन हजार वर्षांत कोठेंही झाली नाहीं. असो; आतां या वक्तृत्वरूप महौषधाचा उगम जर पाहूं गेलें तर तो आथेन्स शहरचें लोकसत्तात्मक राज्य होय हें तेव्हांच ध्यानांत येईल. या शहरीं प्रस्तुत राज्यप्रकाराचें स्वरूप जेथपर्यंत जाऊन पोंचलें होतें तेथपर्यंत दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं तें प्राचीन काळीं पोंचलें नव्हतें व अद्यापही कोणत्याही देशांत पोंचलें नाहीं. संस्थानांतील अगदीं गरीबगुरिबांपर्यंत सर्वांची मतें घेऊन मग जें ठरेल तो निकाल समजून त्याप्रमाणें जें कार्य होणें तें होत असे. तेव्हां अशा समयीं साऱ्या लोकसमाजापुढें उभें राहून जो भाषण करील व आपल्या अभिप्रायास सर्वांचीं मतें अनुकूल करून घेईल तोच संस्थानांत मुख्य होत असे, व सगळें राज्यसूत्र त्याच्याच तंत्रानें चाले. आथेन्स शहरीं मोठमोठे मुत्सद्दी जितके म्हणून होऊन गेले ते सर्व वरील वक्तृत्वगुणानें विशिष्ट होते, व तो गुण त्यांच्या ठायीं अप्रतिम असल्याच्या योगानेंच त्यांची सत्ता दीर्घकाळ अबाधित चालली. या मुत्सद्द्यांत शेवटला जो डिमॉस्थेनीस् याची वक्तृत्वशक्ति तर अद्याप जगभर गाजते आहे. मासिडन्* देशाचा राजा फिलिप् यानें सगळा ग्रीस देश पादाक्रांत करण्याचा बेत मांडला असतां वरील वक्त्यासारखे जे कित्येक देशाभिमानी पुरुष होते त्यांच्या जिवास सारखी चटपट लागून गेली होती. त्यांनीं आपली वक्तृत्वशक्ति सर्व वेंचून व जेवढा म्हणून हातून प्रयत्न होण्यासारखा होता तेवढा सर्व करून फिलिप् राजाशीं एकदां समरांगणांत गांठ घातली. या प्रसंगीं सगळीं बाकीचीं संस्थानें मासिडनाच्या विरुद्ध होतीं; पण फिलिपाच्या कवाइतीपुढें व हिंमतीपुढें इतक्यांचाही टिकाव न निघून त्या एका लढाईंत सगळा देश एका सपाट्यास जो चीत होऊन गेला तो गेला; त्यानें पुनः वर डोकें काढलेंच नाहीं[1] ! असो;

* ग्रीसच्या उत्तरेस असलेला (Macedonia) मॅसिडोनिया देश. याचें मूळचें नांव एमाथिया (Emathia) होतें. ' सम्पादक '

१. वरील युद्धप्रसंग इ० स० पूर्वी ३३८ व्या वर्षी झाला. तेव्हांपासून ग्रीस देशास जी परतंत्रता आली ती त्यास सारखी दोन हजार वर्षे भोगावी लागली. हें नष्टचर्य त्याचें सन १८२७ या वर्षी सरून तेव्हांपासून आज सुमारें पन्नास वर्षे त्यास पुनः स्वातंत्र्याचें वारं लागलं आहे. तरी पहिलें वारें जें एकदां गेलें तें गेलेंच !

याप्रमाणें डिमॉस्थेनीस् वगैरे देशाभिमानी लोकांच्या पक्षाचा जरी आदीं मोड होऊन गेला तरी त्यांचे श्रम सर्वथा व्यर्थ गेले असें नाहीं. कां कीं, जोंवर देशैकनिष्ठेची व वक्तृत्वाची या जगांत प्रशंसा होईल तोंवर त्यांचीं नांवें निषतील निषतील. फार तर काय, पण त्यांचा शत्रु जो फिलिप् त्यासही मोठमोठ्या सैन्याचा धाक वाटत नसे, पण यांचा वाटत असे. इतका कीं, आथेन्स शहरीं जे नामांकित बारा † वक्ते होते त्यांस मोठमोठे लांच देऊन वश करून घेण्याचा त्यानें उद्योग चालवला होता; व तो काळ ग्रीसच्या उतरत्या पायाचाच असल्यामुळें त्या बारा जणांतही कांहीं त्यांस आंतून अनुकूळ झाले. असो; तर याप्रमाणें लोकसत्तात्मक राज्याच्या संबंधानें ग्रीस देशांत वक्तृत्वाचा उद्भव होऊन तें वर सांगितल्या इतक्या पूर्ण स्थितीस येऊन पोंचलें होतें.

८. या ठिकाणीं विषयनिरूपणाच्या ओघानें सगळ्या ग्रीस देशांत, किंबहुना साऱ्या जगांत, जो अप्रतिम ठरला त्या डिमॉस्थेनीसाचें थोडेंसें वृत्त दिलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. यास्तव त्याचें संक्षेपतः कथन करतों. हा महाविख्यात वक्ता आथेन्स शहरीं जन्मला. हा पुढें जरी येवढ्या योग्यतेस चढला तरी याचें अंगचें साहित्य प्रथमतः कच्चेंच होतें. तें असें कीं, आवाज कोता, उच्चार साफ नाहीं, आणि अंगविक्षेप श्रोत्यांचें चित्त वेधून टाकणारा असा नव्हता. यास्तव हा जेव्हां एके प्रसंगीं सभेंत पहिल्यानेंच बोलायास उभा राहिला, तेव्हां सर्वांनीं वरील दोषांस्तव त्याची हुरेवडी करून दिली. पण तीमुळें हा खचून न जातां त्यानें आपल्या अंगचे वरील दोष काढून टाकण्याविषयीं व वक्त्यास अवश्य ज्या दुसऱ्या कित्येक गोष्टी त्या संपादन करण्याविषयीं सतत उद्योग चालवला. तो असा: त्याचा आवाज कोता होता, यास्तव तो मोठा व गंभीर करण्याकरतां त्यानें समुद्रतीरीं एकांतीं जावें, आणि समुद्राच्या प्रचंड लाटा उसळूं लागून त्यांची मोठी गर्जना होत असतां तेथें खूप मोठ्यानें आपलीं भाषणें ह्मणावीं. तसेंच डोंगरांच्या दरडींवरून खालींवर पळत जाण्याची संवय करून त्यास दम छाटत नसे तो त्यानें छाटेसा केला. आणि उच्चार तोंडांतून साफ होत नसे यास्तव तोंडांत बारीक गारगोट्या धरून त्यानें आपला शब्द बाहेर चांगला उमटेसा केला. याप्रमाणें वाणीचे जेवढे दोष होते तेवढे काढून टाकल्यानंतर डिमॉस्थेनीसानें तिचें मोहकत्व वाढविणारे जे दुसरे कित्येक

---

† ग्रीस देशामध्यें ॲटिका ( Attica ) प्रांतांत दहा प्रसिद्ध वक्ते होऊन गेले. ते ॲटिक् ऑरेटर्स् ( Attic Orators ) ह्मणून प्रसिद्ध आहेत. त्यांचीं नांवें:—

| | |
|---|---|
| १ ॲंटिफन् ( Antiphon ) | २ ॲंडोसाइडस् ( Andocides ) |
| ३ लायसिअस् ( Lysias ) | ४ आयसॉक्रेटीस् ( Isocrates ) |
| ५ आयूसेसस् ( Isæus ) | ६ लायकर्गस् ( Lycurgus ) |
| ७ एस्कीन्स् ( Æschines ) | ८ हायपराइडस् ( Hiperides ) |
| ९ डेमॉस्थेनीस् ( Demosthenis ) | १० डीनार्कस् ( Deinarchus ) |

पण यांपैकीं फिलिपूचे समकालीन असे फक्त शेवटचे सातच आहेत. पहिले तीन त्याच्या पूर्वी होऊन गेले. तेव्हां वरील बारांची भरती करण्यास आणखी पांचांची जरूर भासते. पण याहून जास्त नांवें सांपडत नाहींत. "सम्पादक"

गुण ते आपल्या ठायीं आणण्याचा यत्न चालवला. आथेन्स येथें रंगभूमीवर नाटकप्रयोग होत असत; यास्तव त्या कलेंत अत्यंत प्रवीण असणाऱ्या कांहीं नटांपाशीं तो अंगविक्षेपादिक शिकला. तसेंच आपल्या भाषणाची रचना प्रौढ, रसभरित व मनोवेधक अशी आपणास करतां यावी या उद्देशानें नामांकित इतिहासकार जो थुसिडिडीज्† त्याचा ग्रंथ त्यानें आठदां आपल्या हातानें लिहून काढला. असो; तर याप्रमाणें येवढे अचाट श्रम कित्येक वर्षेपर्यंत जेव्हां डिमॉस्थेनिस् यानें केले तेव्हां त्याच्या देशबांधवांत त्याचें तेज पडून सर्वांवर त्याचा पगडा बसला; आणि देशहिताचीं मोठमोठीं कामें जीं त्यानें केलीं तीं त्याच्या हातून घडलीं !

मनुष्याच्या अंगचा कोणताही गुण पूर्णपणें प्रगट होण्यास तसाच कांहीं विशेष प्रसंग घडून यावा लागत असतो. असा प्रसंग डिमॉस्थेनीस् यास कोणता घडून आला व त्यानें आपल्या देशाची सेवा केली ती कोणत्या संकटसमयीं केली हें सर्व इतिहासज्ञांस विश्रुत आहे. हा प्रसंग नुकता वर सांगण्यांत आलाच आहे; कीं, मासिडन् प्रांताचा राजा फिलिप् यानें आपली सत्ता वाढवून सगळा ग्रीस देश काबीज करण्याचा बेत मांडला होता. असो; या प्रसंगीं डिमॉस्थेनीसूचे आवेशादि वक्तृत्वगुण सर्व प्रगट झाले; या समयींचीं याचीं भाषणें इतकीं उत्कृष्ट आहेत कीं, तीं साऱ्या जगास मान्य होऊन तेव्हांपासून तशा प्रकारच्या सर्व भाषणांस त्याचेंच नांव प्राप्त झालें आहे. म्हणजे एखाद्या मनुष्यावर ज्या भाषणांत खूप भडिमार करून सोडिला असतो त्यास इंग्रेजी भाषेंत ' फिलिपिक् ' असें म्हणतात ! या भाषणांचा मासिडन्च्या राजांस इतका धाक वाटे कीं, त्यांनीं डिमॉस्थेनिसास् आपले स्वाधीन करण्याविषयीं आथेन्सच्या लोकांपाशीं अनेक वेळां बोलणीं केलीं; आणि सरतेशेवटीं वरील प्रांताच्या राजाच्या भयास्तवच या वक्त्यास विषप्रयोगानें आत्महत्या करणें भाग पडलें. असो; तर येवढा ज्यांचा प्रभाव तीं भाषणें किती अत्युत्तम असतील याचें सर्वांस सहज अनुमान करतां येईलच. त्यांचा मासला 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहां' § त आमच्या मराठी वाचकांस पाहण्यास सांपडेल; त्यावरून त्यांनीं मूळच्या ग्रीक् ग्रंथाची कल्पना करावी¹ !

९. दुसरें उदाहरण रोम. या शहरींही लोकसत्तात्मकच राज्यप्रकार चालत असल्या-

---

† Thucydides—, जन्म खिस्तपूर्व ४७१, मृत्यु खिस्तपूर्व ४०१). सुप्रसिद्ध ग्रीक इतिहासकार; याला सैन्याच्या एका तुकडीचें आधिपत्य देण्यांत आलें होतें. पुढें लढाईंत यानें वरिष्ठांचे हुकूम न मानल्यामुळें होणारी शिक्षा चुकविण्याकरितां देशत्याग करून वीस वर्षें अज्ञातवास पत्करला. अथेन्सला परत आल्यावर याचा खून झाला. अज्ञातवासाच्या काळांत यानें ज्या युद्धांत त्यानें स्वतःच भाग घेतला होता त्या युद्धाचा इतिहास लिहिला. "संपादक"

§ पृष्ठें ३०३ ते ३१८ पाहा........................................"सम्पादक"

१. डिमॉस्थेनीसच्या भाषणांविषयीं मेकॉलेनें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, त्यांपैकीं कित्येक इतकीं उत्कृष्ट आहेत कीं, त्यांतला एक शब्दही इकडचा तिकडे करतां येणार नाहीं !

मुळें अगदीं पूर्वीपासून येथें वक्तृत्वगुणाची गरज पडून त्याची चहा असे. महाजन आणि $ सामान्यजन असे रोमन् लोकांत दोन तट असून त्यांच्या भांडण्याच्या एका समयीं पहिल्या पक्षाकडील एका चतुर वक्त्यानें* इसापनीतींतील ' पोट आणि अवयव ' ही गोष्ट दुसऱ्यास सांगून तंटा मिटवला आणि दोघांची एकी केली, ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे. ही-वरून त्या वेळीं रोमन् लोक किती साधेभोळे होते व वक्तृत्वकला त्यांच्यांत किती आधीं-पासून होती हें स्पष्ट दिसतें. त्याप्रमाणेंच पुढें पिऱ्हस् राजाचा मंत्री सिनियस्—ज्याची ख्याति इतिहासांत अशी लिहिली आहे कीं, त्याच्या चित्तवेधक बोलण्यानें जितकीं शहरें वश झालीं तितकीं त्याच्या धन्याच्या तरवारीनें झालीं नाहींत—तो रोम शहरीं येऊन त्यानें आपल्या अपूर्व वक्तृत्वानें रोमन् लोकांसही क्षणभर तन्मय करून टाकलें असतां सरते-शेवटीं एका वयोवृद्ध व अंध सभासदानें मुद्दाम सेनेट$ सभेंत येऊन सभेचें मोहजाल जेव्हां दूर केलें व पिऱ्हस् राजाचें कपट सर्वांच्या नजरेस आणून दिलें, तेव्हां त्यांचे डोळे उघडून

---

$ Patricians व Plebians. पहिल्यांकडे सर्व राजकीय सत्ता असे. दुसऱ्यांना मुळींच नसे, हे रोममधील अनुक्रमें ब्राह्मण व शूद्र होते ह्मटलें तरी चालेल. यांचे परस्पर विवाह होत नसत. देवपूजनार्थ वेगळ्या पद्धतिहि (इकडील वेदोक्ताच्या तंट्याची आठवण होण्यासारख्या) होत्या. रोमन् लोकांच्या शौर्यामुळें जे अनेक देश त्यांच्या राज्यांत सामील होत, त्यांतील खेडेगांवच्या लोकांस रोमला जाण्यास प्रोत्साहन देण्यांत येई; हेतु हा कीं, अतिसांनिध्यामुळें त्यांना बंड करतां येऊं नये. हेच लोक Plebians होत. व रोमच्या घटनेच्या दृष्टीनें नसली तरी कायद्याच्या दृष्टीनें यांनीं फार महत्त्वाची कामगिरी केली आहे. 'सम्पादक'

* मेनेनिअस् ॲग्रिप्पा (Menenius Agrippa) हा सुप्रसिद्ध रोमन् कॉन्सल् व सेनापति होता. (ख्रिस्तपूर्व ५०२). अन्यायाला मान वांकविण्यापेक्षां जुलमी कॉन्सलला ठार मारावें असें प्रजाजनांनीं ठरविलें. पण सिसिनिअसच्या (Sicinius) सल्ल्यावरून त्यांनीं असा एक मार्ग काढला कीं, ती एक अद्वितीय क्रांति झाली असें त्या प्रसंगाचें वर्णन पुढें कायमचें चालू राहिलें. कारण ती क्रांति अनत्याचारी असून रक्ताचा एक बिंदुसुद्धां सांडावा लागला नाहीं. तरीहि अन्याय्य धोरण हट्टानें चालू ठेवण्यामुळें अल्पसंख्यांक जुलमी अधिकाऱ्यांचें काय नुकसान होतें हें त्यांनीं अत्यंत परिणामकारक रीतीनें दाखवून दिलें. सशस्त्र सैनिक प्रजाजन ॲनिओ (Anio) नदी ओलांडून, रोमचा त्याग करून, फक्त अन्नवस्त्र बरोबर घेऊन एका टेंकडीवर जाऊन राहिले. त्यांनीं कोणावर हल्ला केला नाहीं. त्यांच्यावरहि कोणीं हल्ला केला नाहीं. तटबंदी वगैरे व्यवस्था करून ते राहिले. हे असहकारिता पत्करणारे देशत्यागी वीर सशस्त्र असल्यानें शत्रूंनीं घेरलेल्या रोमला त्यांची ही कृति फारच जाणवली व ह्मणून त्यांच्याशीं बोलणें करण्याकरतां मेनेनिअसला पाठविलें. व त्यानें ही ' पोट व अवयव ' यांची गोष्ट सांगून व त्यांना सवलती देऊं करून त्यांची समजूत घातली. या टेंकडीला या गोष्टीमुळें पुढें पवित्र पर्वत ' The Sacred Mount " असें ह्मणूं लागले.

"सम्पादक"

$ रोमन् प्रजासत्ताक राज्यांत संस्थानांतील अधिकाऱ्यांविरुद्ध फिर्याद झाली असतां त्यांचा इन्साफ करण्याचा अधिकार या सभेस असे. इंग्लंडची जशी पार्लमेंट् तशी ही सभा रोमन् लोकांना होती. 'सम्पादक'

त्यांनीं त्या वकिलास तावडतोब रोम शहर सोडून जाण्याविषयीं हुकूम दिला ही ही गोष्ट इतिहासवेत्त्यांस माहीत आहे. तसेंच पुढें सिपीयो, केटो वगैरे कित्येक नामांकित राजकारणी पुरुष प्रस्तुत कलेंत चांगले निपुण असून जो जो संस्थानिक कामांत पुढारी झाला त्यास त्यास वक्तृत्वगुण हा अवश्यच झाला. मेरियस् व सीजर हे दोघे मोठे प्रख्यात सरदार होऊन गेले व कांहीं वेळ हे दोघे सगळ्या राज्याचे आधारस्तंभच होऊन राहिले होते; तरी त्यांसही वरील कलेंत निपुणत्व संपादणें भाग पडलें. पहिल्याच्या वक्तृत्वाचा मासला वरील 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह'‡ पुस्तकांत एक आहे. दुसऱ्याची तर प्रस्तुत गुणांत इतकी परिपूर्णतां होती कीं, खुद्द सिसरोनेंही त्याबद्दल त्याची प्रशंसा केली; आणि त्याच्याखालोखाल प्रायरी सीजराचीच अशी त्या वेळेस त्याची ख्याति होती! सीजराच्या मागें इतिहासप्रसिद्ध ब्रूटस् व आंटनी यांचाही वक्तृत्वगुणाविषयीं लौकिक होता. या दोघांचीं भाषणें शेक्सपीयर कवीनें आपल्या सर्वप्रसिद्ध नाटकांत* मोठीं खुबीदार घातलीं आहेत. तीं वाचलीं असतां रोम शहरांत घडलेला तो महाप्रसंग जसा काय ढळढळीत डोळ्यांपुढें उभा राहतो. तसेंच त्यांवरून वक्तृत्वाचें सामर्थ्य केवढें आहे हेंही स्पष्ट दिसून येतें. पाहा कीं, ज्याप्रमाणें वाऱ्याच्या सोसाट्यानें समुद्राचा समुद्र सगळा हव्या त्या दिशेला उचंबळला जातो, त्याप्रमाणें पहिल्या वक्त्यानें ह्मणजे ब्रूटसानें आपलें बेताबाताचें संक्षिप्त भाषण करतांच सगळ्या लोकांची खात्री झाली कीं, सीजराला मारला तो ठीक मारला; सगळ्या लोकांच्या स्वातंत्र्यावर जो उठला होता त्या दुष्टास यथायोग्य शासन झालें! पण तेंच आंटनीनें आपल्या करुणरसभरित भाषणास आरंभ करतांच सगळें मान एकदम फिरून गेलें. जे लोक नुकतेच सीजराला शिव्या देत होते त्यांसच त्याचें यथार्थ गुणवर्णन ऐकून मोठा गहिंवर आला; आणि ज्या ब्रूटस् वगैरे मारेकरी लोकांची ह्यांनीं नुकतीच प्रसंसा केली होती तेच त्यांचीं घरेंदारें जाळून पोळून फस्त करण्याकरतां मोठ्या आवेशानें दांत ओंठ चावीतच त्यांच्या पाठोपाठ निघाले! तेव्हां वक्तृत्वाच्या अद्भुत सामर्थ्याचें आणखी दुसरें कोणतें उदाहरण पाहिजे! असो; तर याप्रमाणें रोम शहरीं जोंवर लोकसत्ता होती तोंवर वर सांगितल्याप्रमाणें ती वक्तृत्वाच्या अभिवृद्धीस कारणभूत होऊन तें इतक्या परिपक्व दशेस येऊन पोंचलें होतें. आतां मागील अनुक्रमाप्रमाणें साऱ्या रोमन् लोकांत जो अप्रतिम वक्ता ठरला, व ज्याच्याहून डिमॉस्थेनीस्‌खेरीज दुसरा कोणीही वरचढ नाहीं, त्या सिसरोची थोडीशी हकीकत येथें देतों.

१० सिसरो हा मूळचा हीन कुळांतला होता. हा व वर सांगितलेला मेरियस् हे दोघे एकाच गांवीं जन्मले असून दोघेही केवळ अंगच्या हिंमतीनेंच पुढें मोठ्या पदवीस चढले. मेरियस् हा लष्करी खात्यांत शिरला, आणि सिसरोनें कायद्याचा अभ्यास करून लवकरच नांव काढलें. सिसरोच्या बरोबरीचे आणखी दोन तीन हुशार वकील होते; पण

‡ पृष्ठें ३१३–३१८ पाहा. 'सम्पादक'

* ज्यूलियस् सीजर्. 'सम्पादक'

त्यांची व यांची झकमक उडून त्यांस लवकरच सिसरोशीं स्पर्धा करणें सोडून द्यावें लागलें. याप्रमाणें न्यायसभेंत सिसरोचें फार वजन बसलें असतां तो हळूं हळूं लोकमान्यतेस चढला. त्यास संस्थानांतील हुद्दे एकापुढें एक मिळून सरतेशेवटीं तो कॉन्सल्चीं‡ पदवी पावला. हा मोठा अधिकार सिसरोस ज्या वर्षी मिळाला त्याच वर्षी रोम शहरावर व सगळ्या राज्यावर एक मोठा कहर गुजरणार होता. हा रोमच्या इतिहासांत ' क्याटिलैनचा कट '$ या नांवानें प्रसिद्ध आहे. पण सिसरोनें मोठी हुषारी ठेवून वरील कट मोडला, आणि त्या संकटसमयीं राजधानीचा व एकंदर राज्याचा बचाव केला. असो; याप्रमाणें जो सिसरो पहिल्यानें केवळ यःकश्चित् वकील होता तो पुढें रोमच्या संस्थानांतील एक बडें प्रकरण होऊन बसला; आणि पॉंपे, सीजर अशा रणधुरंधरांबरोबर त्याची लोकांत मानमान्यता झाली. पण थोरपणामागें सदोदित भयें लागलीं असतात. आणि या जगांत भल्या मनुष्यांचा दुर्जनांकडून सदैव छळ होतच असतो; याप्रमाणेंच सिसरोची अवस्था झाली. त्यानें रोमन् लोकांवर येवढे थोर उपकार करून ठेवले असतां, व आपल्या उज्वल कीर्तीनें त्यांस अक्षय भूषण आणलें असतां त्यांनींच त्यास दोनदां हद्दपार करून दिलें. आणि सरतेशेवटीं रोम शहरीं दुष्टांचें आधिपत्य होऊन साऱ्या लोकांवर मोठी संक्रांत येऊन गुजरली असतां या विख्यात वक्त्याचा त्याच धामधुमींत शेवट झाला. त्याच्या शत्रूंनीं त्यावर मारेकरी घालून त्याचें शिर कापून आणविलें, आणि सेनेट सभेंत ज्या उच्चस्थानीं आरूढ होऊन तो लोकांचीं मनें खवळून टाकीत असे, त्याच ठिकाणीं त्याचें शिर खिळून टाकलें! केवढा हा अधमपणा!!

वर सिसरोचें ऐतिहासिक चरित्र सांगितलें. आतां ज्या गुणानें तो साऱ्या जगास विश्रुत आहे, त्याच्या संबंधानें कांहीं वृत्तांत येथें लिहितों.

वर सांगितलें आहेच कीं, सिसरोनें पहिल्यानें कायद्याचा अभ्यास करून तो वकिलीचा धंदा करीत असे. या धंद्याचा वक्तृत्वशक्तीशीं निकट संबंध आहे. तेव्हां प्रस्तुत वक्त्याची ती शक्ति या ठिकाणीं पहिल्यानें उदयास आली. त्या काळीं आथेन्स, ऱ्होड्स्,

---

‡ रोमन् प्रजासत्ताक राज्यांत दरसाल निवडून येणाऱ्या दोन मुख्य मॅजिस्ट्रेटांना ही पदवी असे. 'सम्पादक'

$ Catilina हा एका दरिद्री कुटुंबांत जन्मला होता. दुर्गुण व गुन्हे यांनीं त्याचें तारुण्य भरलेलें होतें. तरीहि तो प्रेटर् ( Preator ) झाला. पण येवढ्या मानानें संतुष्ट न होतां, त्यानें कॉन्सल् होण्याची खटपट चालविली. पण पूर्वी आपल्या प्रांतांत केलेल्या जुलमामुळें हा त्या जागेला नालायक ठरला. म्हणून निवडून आलेल्या दोघां कॉन्सलांचा खून करण्याचा कट त्यानें केला. पण तो त्याच्याच उतावळेपणामुळें फसला. त्यानें विस्तृत प्रमाणावर फिरून दुसरा कट योजिला. पण सिसरोच्या सावधगिरीमुळें तोहि साधला नाहीं. कॅटिलैन्‌ला पळून जावें लागलें. सिसरोनें कटांतील बाकीच्या सर्व पुढाऱ्यांस पकडून रोमच्या सेनेटपुढें आणलें. त्यांना फांशीची शिक्षा झाली. नंतर कॅटिलैनविरुद्ध एका सरदारास पाठविलें व खूप शौर्यानें लढतां लढतां कॅटिलैन पडला. ( ख्रिस्तपूर्व ६२ ). इतकी राक्षसी व्यक्ति इतिहासांत दुसरी सांपडणार नाहीं.
'सम्पादक'

हीं दोन वक्तृत्वाच्या पाठशाळांचीं दोन मोठीं प्रसिद्ध स्थळें होतीं. यास्तव या दोहों ठिकाणीं मोठ्या नामांकित गुरुंपाशीं कित्येक वर्षें सिसरोनें वक्तृत्वाचा अभ्यास केला. त्याच्या योगानें त्याचें न्यायसभेंत विशेषच तेज पडून मागें सांगितल्याप्रमाणें तें तेज त्याच्या प्रसिद्धीस व लोकप्रियत्वास कारण झालें. पुढें त्यास सरकारी हुद्देही मोठमोठे मिळून ते त्यानें मोठ्या दक्षतेनें व सचोटीनें वहिवाटल्यावरून त्याचा लौकिक दिवसोंदिवस अधिकाधिकच होत गेला. त्या काळीं रोमन् लोकांची नीति, व सदाचरण हें पुष्कळच सुटत चाललें होतें. यास्तव सिसरोचा प्रामाणिकपणा व निस्पृहपणा त्या वेळच्या लोकांत विशेषच ठळठळीत दिसूं लागला आणि वक्तृत्वाचें हत्यार त्याजपाशीं चांगलें मजबूत असल्यानें त्यास लोक इतके वचकायाला लागले कीं, मोठमोठ्या अरेरावांसही त्याचा धाक वाटे. एके समयीं सल्ला नांवाच्या प्रसिद्ध सरदाराचा त्याच्या विरुद्ध पक्षास जबर आसरा असतां सिसरोनें भांडून दावा आपल्यासारखा केला. व्हेरीस् नांवाच्या जुलमी सुभेदाराची तर त्यानें कशी खोड मोडून टाकली तो सर्वांस विदित आहेच.[1] पुढें क्याटिलैन नांवाच्या मानवरूपी राक्षसानें मोठा पुंडावा मांडला असतां त्याचें सिसरोनें पारिपत्य केलें हेंही वर सांगण्यांत आलेंच आहे. या आणीबाणीच्या प्रसंगीं सिसरोची फारच वहा झाली; आणि त्याच्या भाग्याचा व वैभवाचा कळस झाला. या वेळेस त्यानें सेनेट सभेंत केलेलीं भाषणें मागील व्हेरीस्च्या संबंधाच्या भाषणांप्रमाणेंच फार प्रसिद्ध आहेत. पण इतक्यानेंच झालें नाहीं. वरील दोन समयांहूनही थोरतर प्रसंग रोम शहरावर गुजरून त्यांत सिसरोच्या वक्तृत्वाचा विकास अद्याप पूर्णपणें व्हावयाचा होता! हा महाप्रसंग अर्थातच सीजराचा वध होय. सीजर यास छप्पन्नजणांनीं एकवट होऊन सभास्थानीं मारला असतां त्यानें अचाट श्रम करून रचलेला राज्यव्यूह सगळा जेव्हां एकदम उकलला तेव्हां सगळ्या राज्यभर कित्येक वर्षें बेबंदाईच चालली होती. या समयीं मागें सांगितलेला आंटनी हा सीजरच्या कृपेंतला असल्यामुळें त्यानें लोकांचीं मनें आपणाकडे वळवून घेऊन आपणच सगळी सत्ता बळकावण्याचा बेत मांडला होता. हें सिसरोच्या व त्याजसारखे इतर जे लोकसत्तात्मक राज्याचे अभिमानी होते त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं त्यास विरोध करण्यास आरंभ केला. तरी आंटनी हा आपल्या पक्षाच्या लोकांच्या बळावर कांहीं दिवसपर्यंत त्यांस डोकें देऊन राहिला होता. शेवटीं सिसरोच्या तडाक्यासमोर आपला निभाव लागणार नाहींसें पाहून त्यानें पळ काढला. मग तर सिसरोनें त्याचा सारखा पिच्छाच पुरवून त्याजवर रोम शहराहून फौज रवाना केली. असो; तर या प्रसंगीं प्रस्तुत वक्त्यास आपलें शक्तिसर्वस्व प्रगट करावें लागलें. हीं या समयींचीं भाषणें आंटनीच्या विरुद्ध बोललेलीं असून त्यांत त्यांवर इतका भडिमार करून सोडला आहे कीं, मागें सांगितलेला 'फिलिपिक्' हा शब्द त्यांस लावतात. हीं भाषणें एकंदर वीस पंचवीस आहेत. हीं सर्व ऐकण्यास आंटनी रोम शहरीं राहिला नाहीं. पहिल्या दुसऱ्या तडाक्यासच त्यास दे माय धरणी ठाय होऊन येथून मी घडपणीं निघून जातों कसा असें त्यास होऊन गेलें; आणि

---

१. या प्रसंगींचें एक भाषण 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहांत' आहे. ( पृष्ठें ३०८-३१३ पाहा.)

रोम शहराच्या आणि आपल्यामध्यें आल्प्सचे पहाड जेव्हां त्यानें केले तेव्हां त्याच्या जिवांत जीव आला. मग तेथें त्यानें अनेक कारस्थानें रचून आपणावर चालून आलेले दोघे सरदार आपलेसे करून घेतले; आणि पुनः रोम शहरीं आपला अंमल बसवून मागें सांगितल्याप्रमाणें सिसरोचा सूड घेतला. असो; तर असा सरस्वतीचा महिमा आहे !

११ याप्रमाणें वक्तृत्वाच्या दोन आदिपीठांचा वृत्तांत झाला. आतां आपल्या देशाशीं ज्याचा दैवयोगेंकरून संबंध जडला आहे त्या इंग्लंड् देशाची सदरहूप्रमाणें थोडीशी हकीकत देतों. वर एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, इंग्लंडांत राजाचें व लोकांचें जें सुमारें दोनशें वर्षांपूर्वी भयंकर युद्ध झालें तेव्हांपासून त्या देशांत प्रस्तुत गुणाची प्रवृत्ति झाली; व ती त्या वेळेसच कां झाली याचेंही कारण वर सांगितलें आहेच. असो; आतां वरील देशांत जे मोठमोठे वक्ते होऊन गेले त्यांचीं नांवें येथें सांगतों.

वर सांगितलेल्या भयंकर लढाईच्या वेळींच पार्लमेंट् सभेंत कित्येक सभासदांचा वक्तृत्वाविषयीं मोठा लौकिक होता. त्यांचीं नांवें इतिहासांत प्रसिद्ध आहेत; पण तीं वक्तृत्वाच्या संबंधानें तितकीं विख्यात नसल्यामुळें देत नाहीं. तसेंच पुढेंही कित्येक वर्षेंपर्यंत इंग्लंडांत चांगले नामांकित वक्ते किरकोळ निपजले. पण त्यांच्याही नांवांचा निर्देश वरील कारणास्तवच करीत नाहीं. आतां वरील लोकांचीं नांवें त्यांच्याच मात्र काळांत प्रसिद्ध असतां तीं पुढें कां मागें पडलीं याचीं कारणें पाहूं गेलें असतां दोन दिसतात. एक तर हें कीं, सध्यां इंग्लंडांत जी एक उपयुक्त कला कित्येक वर्षें चालू आहे ती त्या वेळेस नव्हती. ही कला शीघ्रलिपि म्हणजे वक्ता बोलत असतांच त्याचे शब्द झटपट उतरून घेण्याची युक्ति ही होय. ही आतां चांगल्या पूर्ण दशेस आली असल्यामुळें व चोहोंकडे प्रसिद्ध असल्यामुळें अगदीं साधारण वक्त्यांचीं भाषणें सुद्धां शब्दानशब्द उतरतां येऊन त्यांचा तेव्हांच चोहोंकडे हवा तेवढा फैलावा करून देतां येतो. पार्लमेंट् सभेंत तर सभासद उजाडतां उठून परत घरीं येताहेत तोंच त्यांचीं भाषणें छापून चोहोंकडे वांटून पार केव्हांच निकाल होऊन गेलेला असतो; व लवकरच कांहीं दिवसांत त्यांचीं प्रसिद्धि साऱ्या जगभर होते ! अशी हल्लींच्या काळीं वक्त्यांस उत्कृष्ट सोय होऊन गेलेली आहे. पण पूर्वी यांपैकीं कांहींच नसे, सभांतल्या सभांत अंत काय तें होई; आणि वक्त्यांची बाहेर लोकांत प्रसिद्धि झाली म्हणजे ऐकणारांच्या सांगोपांगीवरून जी काय होईल ती होईल असें असे. फार काय, पण गेल्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटीं शेवटीं सुद्धां पार्लमेंटांतील भाषणें एकंदर लोकांस समजण्याचा बिलकुल मार्ग नसून त्या वेळेस चालणाऱ्या पत्रांतून त्यांचा गोषवारा दिलेला असे. एका पत्रांत मात्र तीं भाषणें सगळींचीं सगळीं दिलीं असत; पण तीं शब्दशः बरोबर नसून सरासरी तो मतलब मात्र त्यांत आणलेला असे.[१] असो; तर याप्रमाणें वरील शीघ्रलिपि निघण्यापूर्वी वक्त्यांच्या प्रसिद्धीस मोठा अडथळा होता; व यामुळेंच त्या काळांत होऊन गेले-

---

१. हें पत्र 'जेंट्लमेन्स् मागेझैन्' नांवाचें मासिक इंग्लंडांत निघत असे. यांत वरील भाषणें जॉन्सन् हा लिहीत असे. तो लोकांनीं आणलेल्या टिपणावरून हीं रचीत असे.

त्या किल्येकांची नुसती वक्तृत्वाविषयीं कीर्ति मात्र उरली आहे. फार तर काय, पण ज्यास मरून अद्याप पुरतीं शंभरही वर्षे लोटलीं नाहींत त्या पिट्ट नामक विख्यात वक्त्याचीं सुद्धां भाषणें सध्यां केवळ अंशतः मात्र उपलब्ध आहेत; बाकीच्यांचा वरील कलेच्या अभावास्तव केव्हांच लोप होऊन गेला.

दुसरें कारण असें कीं, चितान्यास किंवा मूर्तिकारास ज्याप्रमाणें मूळचें रूप जसें उत्कृष्ट असेल तसें आपल्या कृतीत उतरतां येतें, किंवा उत्कृष्ट विषय असला म्हणजे कवीच्या स्फूर्तीस तेज चढून काव्यास जसें विशेष रमणीयत्व येतें, त्याचप्रमाणें वक्त्यासही प्रसंग-विशेषाची अनुकूलता लागत असते. या सिद्धान्ताचा प्रत्यय मागील दोन महावक्त्यांच्या वृत्तांतावरून आमच्या वाचकांस आलाच असेल. तर हेंही वर सांगितलेल्या वक्त्यांची कीर्ति पुढें न उरल्याचें एक मोठें कारण असावें. ज्या विषयांवर त्यांनीं आपली वक्तृत्वशक्ति खर्चली ते विषय एकंदर जगास महत्त्वाचे वाटण्यासारखे नसल्यामुळें त्यांवर आधेयभूत जी त्यांची वक्तृत्वकीर्ति तीही अर्थातच लवकर विनष्ट झाली. आणि शिवाय ते विषय तसे सामान्य प्रतीचेच असल्यामुळें त्यांच्या वक्तृत्वाचा ओघही त्यांवर सुमाराचाच वाहिला असेल. पदार्थ-विज्ञानांत पाण्याच्या दाबाचा असा नियम आहे कीं, तें मूळचें जितकें उंच असेल तितकेंच नळांत वगैरे दुसऱ्या बाजूस उंच चढतें, तोच नियम सर्व कलांस लागतो. विषयाची अशी योग्यता असेल त्याप्रमाणें करागिराचें कसब दिसून येतें. तर याप्रमाणें वरील दोन कारणांस्तव आलीकडील कित्येक नामांकित वक्त्यांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या अनेक वक्त्यांची कीर्ति फार वेळ टिकली नाहीं असा सुमार दिसतो.

असो; आतां इंग्लंड् देशांत ज्यांची कीर्ति विशेष स्थिर होऊन ती चिरकाळ राह-ण्याचा संभव आहे अशा कांहीं अत्यंत प्रसिद्ध वक्त्यांचा येथें निर्देश करतों. या सर्वांत कालानें, व कांहीं अंशीं योग्यतेनेंही, पहिला असा विल्यम् पिट्ट ऊर्फ लॉर्ड च्याथम् हा होय. हा 'हौस ऑफ् कॉमन्स्'मध्यें शिरून त्या सभेंत यानें मोठा नांवलौकिक मिळवला. आपल्या आवेशयुक्त वक्तृत्वानें यानें ती सभा केवळ आपलीशी करून कांहीं काळपर्यंत सगळें राज्यसूत्र आपल्याच हातांत वागवलें. तसाच त्या वेळेस फॉक्स् नामेंकरून याच्या जोडीचा एक प्रसिद्ध वक्ता होता. तोही याच्याप्रमाणेंच लोकपक्षास मिळाला असून शेवट-पर्यंत त्याच पक्षास बळकट धरून राहिला. असो; वरील च्याथम् मरण पावल्यावर त्याचा दुसरा मुलगा विल्यम् पि_ जो याच साध्या नांवानें शेवटपर्यंत प्रसिद्ध होता, तो आपल्या बापाच्या जागेवर आला. याचेंही थोरल्या पिट्टसारखेंच वक्तृत्व असून प्रामाणिकपणा, राजनिष्ठा इत्यादि गुणांतही तो त्यासारखाच होता. पण एक मात्र झालें कीं, त्याच्या बापाला जसें राजकारणांत यश आलें तसें यास आलें नाहीं,—अथवा तें पाहूणें याच्या नशीबीं नव्हतें असेंच म्हटलें पाहिजे. थोरल्या पिट्टचें राज्यांत चांगलें वजन बसलें असतां युरोपांत, अमेरिकेंत, हिंदुस्थानांत वगैरे सर्व ठिकाणीं इंग्रिशांचा उत्कर्ष होत गेला; पण दुसऱ्याच्या वेळेस तर खुद्द इंग्लंडच वांचतें कीं नाहीं याचीच शंका होती! आतां हें खरें

कीं, या दुसऱ्याच्याही कारकिर्दीत इंग्लिशांस पुष्कळ जय मिळाले; व जे अपजय झाले ते याच्यामुळें मुळींच झाले नसून शिवाय पुढें कांहीं वर्षांनीं लवकरच त्यांचा वचपाही निघाला; पण इतकें खरें कीं, यास जिवंतपणीं आपल्या देशाची दुर्दशाच पाहावी लागली. हा प्रसंग या शतकाच्या आरंभीं नेपोलियन् बादशाहानें सगळ्या दुनियेभर केलेला दंगा होय. नेपोलियनानें बहुधा सगळें युरोप पालथें घालून एशिया खंडावरही त्याचा डोळा होता; व इंग्लिशांचें कांहीं वर्षें सगळ्या युरोपभर त्यानें मातेरें करून टाकलें होतें; व एके सालीं तर खुद्द इंग्लंडावर चढ करण्याचा त्यानें मोठाच घाट घातला होता; या गोष्टी सर्व इतिहासज्ञांस माहीत आहेत. असो; तर याच शेवटल्या भयंकर संकटाच्या सुमारास वरील पिट् हा मृत्यु पावला.[1] पुढें वेलिंग्टन्, ब्लूचर, कुटुसॉफ्[2] वगैरे सरदारांनीं फ्रेंच लोकांचा मोड करून फ्रान्स देशावरच चोहोंकडून गर्दी केली ती पाहण्यास तो वांचला नाहीं. असो; याच वेळेस दुसरेही आणखी बरेच वक्ते होऊन गेले. पण त्या सर्वांत मुख्य झटले झणजे बर्क व शेरिड्यान् हे होत. यांपैकीं पहिल्याचा यापुढें सविस्तर वृत्तांत थावयाचा आहे; व त्यांतच दुसऱ्याविषयींही मजकूर लिहिण्यांत येईलच; यास्तव दोघांविषयींही येथें कांहीं विशेष लिहिणें नको. यानंतर आजपर्यंतही प्रस्तुत गुण इंग्लंडांत बराच वास करीत आहे. यापूर्वी मेकॉलेसारखे कांहीं नामांकित ग्रंथकार व सध्यांचे ग्ल्याड्स्टन्, डिज्रेली, ब्राइट् वगैरे मुत्सद्दी यांची वक्त्यांत बऱ्याच प्रतीची गणना आहे. आणि आलीकडे विलायतेंत विद्येचा फैलावा दिवसेंदिवस अधिकाधिक होत गेल्यानें वक्तृत्वाचा अभ्यास व त्याच्या ख्यातीविषयीं हौसही मोठमोठ्या सभांपासून तो लहान लहान शाळांतील वर्गांपर्यंतही पोंचली आहे. तेव्हां या गुणाचा सदरील देशांत अगदींच लोप बहुधा कधींही होणार नाहीं.

१२. आतां वर सांगितल्याप्रमाणें वरील क्रमास अनुसरून बर्क याची येथें थोडीशी हकीकत देतों. याचें कारण वरील विख्यात पुरुषाची वक्तृत्वाच्या संबंधानें फार मोठी गणना आहे हें मुख्य आहेच; व शिवाय विद्वत्तेच्या व बुद्धिमत्त्वाच्या मानानेंही त्याच्यासारखे

---

१. पिट्च्या मरणाचा शक इ० स० १८०५ हा होय. या वर्षांत ट्राफल्गार् येथें इंग्लिशांचा मोठा जय झाला, आणि पुढें दोन महिन्यांतच ऑस्टर्लिझ् येथें नेपोलियनास मोठा विजय प्राप्त होऊन सगळें युरोप त्याच्या हातीं आलें. या लढाईचें वर्तमान ऐकतांच पिट्च्या काळजास जो मोठा धक्का बसला, त्यापासून तो पुढें सांवरलाच नाहीं. सोनपत पानपतची खबर ऐकून नानासाहेबांची जी अवस्था झाली तीच त्याची होऊन लवकरच त्याचा अंत झाला. वरील प्रसंगीं युरोपाच्या भावी स्थितीविषयीं त्याची इतकी निराशा होऊन गेली कीं, वरील बातमी खरीशी समजतांच तो झणाला, "तो समोरचा युरोपचा नकाशा आतां गुंडाळून ठेवा; त्याची आतां पुढील पांच पन्नास वर्षें अगदीं गरज पडणार नाहीं." तसेंच मरतेसमयीं "हाय हाय! आतां माझ्या देशाची काय गति होईल!" असे शब्द त्यानें उच्चारले असें झणतात!

२. वेलिंग्टन् कोण हें आमच्या वाचकांस माहीत असेलच. ज्यानें बाजीरावास गादीवर बसविलें; टिप्पूचा आणि धोंड्याचा मोड केला; आणि ज्याचें नांव वेल्स्ली पूल या नांवावरून तिगस्त सालपर्यंत सर्वांच्या तोंडीं होतें तो तो होय.—वरील दुसरे दोघे सरदार अनुक्रमेंकरून प्राशियन् आणि रशियन् लोकांचे मुख्य होते.

मनुष्य इंग्लंडांत थोडेच निपजले हीही गोष्ट त्याच्याविषयीं विशेष सांगण्यासारखी आहे. पण आमच्या वाचकांस या विख्यात वक्त्याचा विशेष परिचय करून देण्याचें एक तिसरेंही मोठें कारण आहे. तें कारण हें कीं, सध्यांच्या फॉसेट $ साहेबांप्रमाणें सुमारें शंभर वर्षांपूर्वी बर्क हा आपल्या देशाच्या तर्फे पार्लमेंटांत सारखा सतत वर्दे भांडत होता. तो सर्व वृत्तांत पुढें यथास्थलीं येईलच. असो; बर्क हा जॉनूसन्च्या वेळेस होता. दोघांचें मोठें सख्य असून दोघांचेही मनांत एकमेकांविषयीं मोठी सन्मानबुद्धि वागत होती.[1] तसेंच दोघेही पहिल्याचें दारिद्रावस्थेंत असून पुढेंही मोठ्या भाग्यास चढले असें झालें नाहीं. तरी आपआपल्या गुणांत ते सर्वांहून श्रेष्ठत्व पावले. जॉनूसन् हा सर्व ग्रंथकारांत अग्रगण्य होऊन बसला, आणि तसाच तिकडे वक्तृत्वगुणांत व राजकारणांत बर्कहून वरचढ कोणीही राहिला नाहीं. बरोबर शंभर वर्षांपूर्वी अमेरिकन् लोकांनीं इंग्लंडाशीं मोठें कडाक्याचें भांडण चालवलें असतां कित्येक दूरदर्शी व थोर मनाचे मनुष्य तिकडील लोकांच्या पक्षानें नेहेमी बोलत असत; अशांतच प्रस्तुत वक्त्याची गणना होती. या प्रसंगींचीं याचीं भाषणें ऐकून खुद्द लॉर्ड च्याथम् यानेंही मस्तक डोलविलें. हा बर्कच्या वक्तृत्वाचा पहिला प्रसंग; व एव्हांपासून त्याची चोहोंकडे हळू हळू प्रसिद्धि होऊं लागली. ती होतां होतां त्याच्या आयुष्याच्या शेवटीं शेवटीं अगदीं शिखरास जाऊन पोंचली. त्या वेळेस पार्लमेंटांतील सभासदांत याची पायरी सर्वांवर होती. इ० स० १७८९ या सालीं फ्रान्स देशांत जो रयतेचा मोठा दंगा झाला,—कीं ज्याच्या योगानें फ्रान्स देशांत दोन तीन वर्षांतच आकाश आणि पाताळ एकत्र होऊन गेलें, आणि ज्या अपूर्व उत्पाताचा सगळ्या युरोपास धाक पडून त्याप्रमाणें वीस पंचवीस वर्षे सगळ्या देशांतून सारखीच धुमश्चकी चालली होती,—त्याच्याच संबंधानें प्रस्तुत वक्त्याची वक्तृत्वशक्ति पूर्ण उदयास आली. तरी त्या समयीं याला पुत्रशोक होऊन त्याच्या योगानें याचें चित्त अत्यंत उद्विग्न झालें असल्यामुळें, व सगळ्या फ्रान्स देशभर हाहाकार उठून पारिस् राजधानी त्या वेळेस तर केवळ यमपुरीच बनून राहिली असल्यामुळें तेथील लोकांविषयीं याच्या मनांत जो संताप व जी चिळस येऊन गेली होती, त्यांच्या योगानें, व इतर कांहीं कारणांमुळें नुकत्या उगवलेल्या चंद्राचा प्रकाश जसा प्रसन्न व आल्हादकारक

---

$ Henry Fawcett. (१८३३–८४) पोलिटिकल् एकॉनॉमीवर एक पुस्तक यानें १८६३ सालीं लिहिलें. १८५८ सालीं दुर्दैवानें बापाच्या बंदुकींतून याला चुकून गोळी लागून हा आंधळा झाला होता. तरीही त्याच्या कर्तृत्वास बाध आला नाहीं. १८६५ मध्यें पार्लमेंटमध्यें शिरून ग्लॅड्स्टन्चा विश्वास यानें संपादन केला व हिंदी जमाखर्चाच्या (Irdian Finance) प्रश्नांवर आग्रहानें जोर दिला. 'सम्पादक'

१. बर्क याची इतर सर्व तत्कालीन लोकांप्रमाणें जॉनूसन्विषयीं मोठी पूज्यबुद्धि होती यांत कांहीं विशेष नाहीं. पण जॉनूसन् हा स्वभावानें कांहींसा गर्विष्ठ व कोणास न मोजणारा असतां त्याचें बर्कविषयीं अत्यंत प्रेम व सन्मानबुद्धि होती ही गोष्ट सांगण्यासारखी आहे. तो बर्कविषयीं असें ह्मणे कीं, जर एकाद्या मनुष्यास मध्यें पावसानें गांठून तो व बर्क एकाद्या आडोशास एके ठिकाणीं उभे राहिले, तर तितक्या थोड्या वेळांतही बर्क हा कोणी लोकोत्तर पुरुष असावा असें त्यास वाटल्यावांचून राहणार नाहीं!

नसतो, त्याप्रमाणेंच वरील प्रसंगींचें यांचें वक्तृत्व त्याच्या चुत्रींच्या वाग्विलासांसारखें रमणीय नाहीं. त्याच्या उज्वल बुद्धीवर वरील दुष्ट विकारांचें पटल आल्यामुळें तिचें शुद्ध स्वरूप त्यांत दृष्टीस पडत नाहीं.

असो; तर याप्रमाणें बर्कचीं ही शेवटलीं भाषणें सर्वांत उत्तम घरण्यासारखीं नाहींत. वास्तव वरील प्रसंगाच्या आधीं जो त्याच्या वक्तृत्वाचा विकास झाला तो अत्यंत उज्वल समजला पाहिजे. हा विकास झटला ह्मणजे मागें सांगितल्याप्रमाणें यानें आपल्या देशाचा जो कैवार घेतला त्या प्रसंगींचा होय. हिंदुस्थानचा पहिला गवर्नर् जनरल् वॉरन् हेस्टिंग्स् यानें येथील राजेरजवाड्यांवर अतोनात जुलूम केला असतां, व इंग्रेजी शिपाई भाड्यावारी लावून कंपनीची तिजोरी भरण्याचा उद्योग आरंभला असतां, इंग्लंडांतील लोकांस, सगळ्या देशाचा नांवलौकिक यानें दवडला ह्मणून हेस्टिंग्स् याचा फार संताप येऊन गेला होता. त्यांतून बर्कसारखे जे कोणी महात्मे होते त्यांस तर हिंदुस्थानांत चाललेले कहर कानांनीं ऐकवेनासे होऊन क्लैव, हेस्टिंग्स् वगैरे मुख्य मुख्य लोकांवर ते सारखे दांत ओंठ खात होते.[१] असो, तर असा प्रकार कित्येक वर्षें चालला असतां सरतेशेवटीं वॉरन् हेस्टिंग्स् हा आपला अधिकार सोडून परत स्वदेशास जेव्हां गेला, तेव्हां बर्कप्रभृति त्याच्या प्रतिपक्ष्यांनीं त्याज-विरुद्ध पार्लमेंटांत फिर्याद केली. हा सगळा प्रसंग एकंदरींत मोठाच भव्य झाला. याचें मेकॉले साहेबांनीं आपल्या निबंधांत फार शानदार वर्णन केलें आहे. ही चौकशी सन १७८८ पासून तों १७९५ पर्यंत अशी सात वर्षें चालली होती. फिर्यादींत प्रमुख असे तिघे चौघे मोठे नामांकित मनुष्य होते. एक तर वर सांगितलेला बर्क आणि दुसरे फॉक्स्, शेरिड्यान, फ्रान्सिस् हे होते. फिर्यादीचीं कलमें एकंदर बावीस होतीं. त्यांत बर्क यानें सर्वांत मोठें व धडधडीत अन्यायाचें कलम जी रोहिले लोकांवर विनाकारण घातलेली धाड तें उचललें. पण या प्रसंगीं आपलें सर्व कौशल्य खर्चून बर्क यानें जरी मोठें मनोवेधक भाषण केलें, तरी त्यापासून जितकें कार्य व्हावेंसें त्यास वाटलें होतें तितकें झालें नाहीं. त्यानंतर

---

१. वरील घोर अनर्थ इकडे चालले असतां तिकडील लोकांच्या मनाची स्थिति कशी होत होती हें त्या वेळच्या कांहीं लेखांवरून स्पष्ट होतें:—

"Is India free? and does she wear her plumed
And jewell'd turban with a smile of peace,
Or do we grind her still?"

*The Task.*

"——That she is rigid in denouncing death
On petty robbers, and indulges life
And liberty, and ofttimes honour too,
To peculators of the public gold;
That thieves at home must hang; but he that puts
Into his overgorged and bloated purse
The wealth of Indian provinces, escapes."

*Ibid.*

फॉक्स् पुढें झाला; आणि काशीचा राजा चेतसिंग याचें राज्य बलात्कारानें घेतल्याबद्दलचें दुसरें कलम त्यानें हातीं घेऊन त्यावरही मोठें उत्कृष्ट भाषण केलें. पण या दोघांवरही तिसऱ्या वक्त्यानें कडी केली. शेरिड्यान् यानें अयोध्येच्या बेगमांच्या संबंधाचें जें तिसरें कलम त्यावर आपली वाक्शक्ति अशी कांहीं लढविली कीं, सर्व श्रोते जागच्या जागीं केवळ चित्रांसारखे तटस्थ झाले. असें भाषण आजपर्यंत जगांत कधींच झालें नाहीं असें सर्वांस वाटून तेथल्या तेथें त्याच्या श्रोत्यांपैकीं कित्येकजणांनीं त्यास विनंति केली कीं, जर हें छापण्याची आपण आह्मांस परवानगी द्याल तर आपणांस दहा हजार रुपये देण्यास आह्मी कबूल आहों. तसेंच वरील भाषणांत त्या गरीब बिचाऱ्या राजस्त्रियांचा इंग्लिशांनीं जो पराकाष्ठेचा छळ केला त्याचें वर्णन इतकें हृदयभेदक केलें होतें, व त्यासंबंधानें आरोपीवर असा विलक्षण भडिमार करून सोडला होता कीं, त्या वेळेस ऐकणारांचीं मनें अत्यंत क्षुब्ध होऊन गेल्यामुळें सभेचें काम पुढें चालेनासें झालें, आणि त्या दिवशीं तें तसेंच तहकूब ठेवावें लागलें. असो तर याप्रमाणें या प्रसंगीं वॉरन् हेस्टिंग्स् याजवर असल्याले जबरदस्त वक्ते उठले होते;—कीं ज्यांनीं या समयींच्या आपल्या वाक्पांडित्यानें आपलाही नांवें आणि आपल्या प्रतिपक्ष्याचें नांव ही जगांत चिरकाळ चालतीलसें करून टाकलें आहे! मागें जे आथेन्स व रोम शहरीं झालेले वक्तृत्वाचे मोठमोठे प्रसंग सांगितले त्यांच्याशीं तुळण्यासारखा इंग्लंडांत घडलेला प्रसंग हाच होय. असो; तर आह्मां भारतवर्षीय जनांस बर्क याचें नांव विशेष प्रिय होण्यासारखें आहे ह्मणून जें मागें सांगितलें तो हा वर वर्णिलेला प्रसंग होय. व या महाप्रसंगाच्या संबंधानेंच प्रस्तुत वक्त्याचें नांव सर्व रसिक व थोर हृदयाच्या लोकांत चिरकाल राहील हें उघड आहे!

---

दाता वक्ता योद्धा तेजस्वी मानधन असामान्य।
अतुळें पितृप्रसादें पंडित देवव्रता असा मान्य ॥ कर्णपर्व.

अंक १९–(१) अवतरण. (२) प्रस्तुत अंकाचा विषय. (३) प्रस्तुत गुणाचा प्रचार. (४) त्याच्या अभिवृद्धीचें एक मोठें कारण. (५) त्याचें संस्कृत व असंस्कृत रूप. (६) प्रकृत विषयाच तीन विभाग–प्राचीन काळ. (७) मध्यम काळ. (८) महाराष्ट्र देश. (९) वक्तृत्वविशिष्ट राजकारणी पुरुष.—

१. मागील अंकांत प्रस्तुत विषयाच्या एका भागाविषयीं निरूपण केलें, आतां यांत प्रस्तुत वक्तृत्वाचा प्रकार आपल्या देशांत कितपत होता याविषयीं विचार करावयाचा आहे.

२. गेल्या अंकांत प्रकृत गुणाच्या उत्पत्तीविषयीं सांगतांना आपल्या देशाविषयीं लिहिण्यांत आलेंच आहे कीं, येथील राज्यस्थिति त्याच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अनुकूळ नव्हती. ह्मणजे आथेन्स व रोम येथें लोकसत्तात्मक राज्यप्रकार चालू असल्यामुळें वक्तृत्व

गुण तेथें जसा सहज उदयास येऊन तो तेथील लोकांत उत्तरोत्तर वर्धिंगत होत गेला, तसें येथें कधींही झालें नाहीं. तेव्हां यावरून एखाद्यास सकृद्दर्शनीं असें वाटणार आहे कीं, आपल्या देशाच्या संबंधानें प्रस्तुत गुणाविषयीं काय लिहावयास सांपडणार आहे! या देशांत त्याचा अभावच पहिल्यापासून नांदत असल्यामुळें त्याविषयीं सगळें बोलणेंच खुंटलें. असो; ही समजूत कितपत खरी आहे याचा निकाल पुढील लेखावरून होईल.

१. वक्तृत्व हा गुण असा आहे कीं, त्याचें वास्तव्य या जगांत अगदीं मुळारंभापासून असलें पाहिजे. म्हणजे सरस्वतीच्या उदयापासून प्रस्तुत गुणाचा उदय या जगांत झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. मानवी भाषेचा जेव्हांपासून प्रचार झाला तेव्हांपासून ती कांहीं थोड्या मनुष्यांची सर्वथा अंकित होऊन इतरांस मोहून टाकण्याचें त्यांच्यामध्यें सामर्थ्य दृष्टीस पडूं लागलें असावें. साधारणतः जगांत पाहिलें असतां असा प्रकार दृष्टीस पडेल कीं, अगदीं अडाणी लोकांत सुद्धां कोणा एखाद्या मनुष्यास आपल्या बोलण्यानें दुसऱ्याचें चित्त वेधून टाकण्याची कांहीं चमत्कारिक हातोटी साधलेली असते! त्याच्या वाणीचा असा कांहीं गुण असतो कीं सर्वांनी त्याचें बोलणें ऐकतच राहावें! हाच प्रकार सर्व राष्ट्रांच्या आद्यावस्थेंतही दृष्टीस पडतो. पाहा कीं युरोपखंडांतील साऱ्या देशांत ग्रीसइतका जुना देश नाहीं; आणि त्या देशाच्या भाषेंत होमरकृत 'इलियड्' नामक काव्याइतका जुना दुसरा ग्रंथ नाहीं; पण त्यांतही वक्तृत्वाचा प्रकार स्पष्ट आढळतो. ट्रॉय् नामक शहरावर ग्रीस देशांतील जे राजे गेले होते त्यांत भिन्न भिन्न गुणांनीं विशिष्ट असे कित्येकजण होते. त्यांत युलिसिस् नामेंकरून राजाची वक्तृत्वगुणाविषयीं ख्याति होती. ह्मणेच भारती युद्धांत प्रसिद्ध जो पितामह भीष्म त्याच्या जोडीचा एक वृद्ध राजा नेस्टर् नामेंकरून वरील काव्यांत प्रसिद्ध आहे; त्याची तर प्रकृत गुणाविषयीं वरच्या युलिसिस्‌पेक्षांही ज्यास्त प्रसिद्धि होती. वरील राजांत वैमनस्य उत्पन्न होऊन ते आपसाआपसांत भांडूं लागले असतां आपल्या पोक्त भाषणानें त्यानें त्यांची समजूत करावी. असो; हीं वरील भाषणें होमर कवीनें आपल्या अजरामर काव्यांत फार उत्कृष्ट तऱ्हेचीं घातलीं आहेत. त्यांवरून ज्या ग्रीस देशानें पुढें वक्तृत्वगुणांत केवळ कळस करून टाकला त्याची आद्यस्थिति लक्षांत घेऊन प्रस्तुत कलेचा उगम त्यांत स्पष्ट दिसतो. तर याप्रमाणें युरोपांतील अत्यंत प्राचीन काळची स्थिति होय. आतां इकडे एशिया खंडांत पाहा. यांतील अत्यंत प्राचीन देश म्हटले म्हणजे हिंदुस्थान व चीन हे दोन होत. यांपैकीं दुसऱ्याविषयीं विशेष म्हणण्यासारखी माहिती जगास अद्याप कोणत्याच प्रकारची नाहीं. वास्तव त्याच्या संबंधानें कांहींच लिहवत नाहीं. आपल्या हिंदुस्थानाविषयीं वरच्यापेक्षां बरीच पुष्कळ माहिती आपणांस आहे. तीवरून पाहतां प्रस्तुत गुणाचें वास्तव्य ग्रीस देशाप्रमाणें इकडेही होतें असें जरी दिसत नाहीं, तरी पूर्वोक्त युरोपीय काव्याच्या जोडीचीं इकडचीं काव्यें जीं 'रामायण' व 'महाभारत' त्यांत, व विशेषतः 'महाभारतां'त, प्रस्तुत प्रकार बराच दृष्टीस पडतो. असो; तर याप्रमाणें 'वक्तृत्व' शब्दाच्या आलीकडील अर्थास अनुसरून जरी प्रस्तुत गुणाचा प्रचार प्राचीन काळीं किंवा अजूनही सर्वत्र दृष्टीस पडत

नाहीं; तरी त्या गुणाचें वास्तव्य अगदीं पहिल्यापासून या जगांत आहे यांत संशय नाहीं.

४. प्रस्तुत गुणाच्या अभिवृद्धीचें दुसरें एक मोठें कारण असें आहे कीं, तो सदोदित उजळ राहण्याची सोय असते. तशी दुसऱ्या कोणत्याही कलेस असत नाहीं. पाहा कीं, काव्यरचना, चित्रकर्म, वादनकला, नानाप्रकारच्या शिल्पविद्या, नाट्य, मल्लविद्या, युद्धकौशल्य इत्यादि कोणतीही कला घेतली, तरी तिचा सतत अभ्यास ठेवणें ह्मणजे केवढा खटाटोप करायास पाहिजे व केवढे श्रम आहेत! कवितेचा अभ्यास ठेवणें ह्मणजे कागद, लेखणी, शाई नेहेमीं जवळ बाळगून गणमात्रा जुळण्याचे श्रम करीत बसलें पाहिजे. त्याप्रमाणेंच चित्रें काढणें, वाद्यें वाजविणें, कुस्ती किंवा कसरत करणें वगैरे कोणतेंही काम घडवायाचें ह्मटलें ह्मणजे त्याकरतां मुद्दाम सगळी सामग्री जेव्हां जमवावी तेव्हां तें साध्य होणार; व त्यावरच सारखे परिश्रम करण्यानें लवकरच कंटाळा येण्याचा संभव. त्यांतून मूर्ति घडणें, इमारती बांधणें वगैरे कामें तर फारच अटाटाचीं असून युद्धादि प्रसंग तर स्वाधीनचेही नाहींत. असो; तर याप्रमाणें इतर कलांचा सतत परिचय ठेवण्यास सामग्रीची सिद्धि, श्रम, वगैरे अनेक गैरसोयी असतात. पण वक्तृत्वकलेची गोष्ट अगदीं निराळी. तिची सामग्री मिळण्यास तर अगदींच आयास नाहींत व क्षणाचाही विलंब नको हें उघडच आहे. परमेश्वरानें आपलें अगाध चातुर्य खर्चून मानवजातीस अद्भुत देणगी दिली आहे ती सदैव सिद्धच आहे. जिव्हा, दंतपंक्ति व वर्णोच्चाराचीं कंठताल्वादि स्थानें इत्यादि साहित्य जन्मसिद्ध व अंगभूतच असल्यामुळें वक्त्याच्या इच्छेचीच केवळ ती वाट पाहत असतात. इतर कलांच्या उपकरणांप्रमाणें यांस सज्ज करण्यास यत्किंचितही काल न लागून व आयास न पडून स्थलकालादिकांची अनुकूलताही यांस लागत नाहीं. शिवाय त्यांवर कालाचा तडाखाही बऱ्याच्यांच्या सारखा न चालून वक्त्याच्या जीवमानापर्यंत बहुधा तींही टिकाव धरून असतात. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत कलेचें साहित्य असें उत्कृष्ट सोयीचें आहे. हें एक झालें. दुसरें असें कीं, मागें सांगितल्याप्रमाणें इतर कलांचा अभ्यास फार श्रमदायक असतो. तसा हा मुळींच नाहीं ह्मटला असतां चालेल; कारण वक्तृत्व ह्मणजे नुसतें. बोलायाचें काम. पण तिसरी सोय तर वरच्या दोहोंहूनही मोठी मौजेची आहे. ती ही कीं साधारण नित्याच्या व्यवहारांतच प्रस्तुत गुणाचें अनायासानें सहज उज्वलन होत असतें. तें असें कीं, नेहेमींच्या बोलण्याचालण्यांत किंवा इष्टमित्रांच्या मेळ्यांत वगैरे सहजच वाक्शक्तीचा उपयोग करणें पडून तिचे निरनिराळे गुण उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जातात. इतर कलांत निपुणत्व संपादणें असतां त्याकरतां जशी निराळी यातायात करायाला हवी तसें येथें न पडून व्यवहाराचा व्यवहार आणि अभ्यासचा अभ्यास अशीं दोन कामें एकेच वेळीं सहजगत्या साधून जातात. आणि पुनः श्रम ह्मणून बिलकुल नसून उलटें मनोरंजनही त्यांत होतें.

५. असो; तर याप्रमाणें प्रकृत गुण हा इतर सर्व गुणांप्रमाणें केवळ स्वभावसिद्ध असल्यामुळें अत्यंत प्राचीन काळापासून सर्व देशांत असेल यांत संशय नाहीं आणि मागील

कलमांत सांगितल्याप्रमाणें त्याचा व्यवहारांत नेहमी उपयोग असल्यामुळें तो सर्व देशीं व सर्व काळीं बऱ्याच प्रौढदशेस येऊन पोंचण्याचा पुष्कळ संभव आहे हेंही उघड आहे. आतां हें खरें आहे कीं, ज्ञानसंपन्न राष्ट्रांत वरील गुण ज्या रूपानें दृष्टीस पडेल त्या रूपानें तो अज्ञान लोकांत दृष्टीस पडायाचा नाहीं. ह्मणजे मागें होऊन गेलेल्या मोठमोठ्या वक्त्यांच्या भाषणांत किंवा आलीकडच्यांच्या व्याख्यानांत जसे शब्दलालित्य, अलंकार, विषयरचना इत्यादि गुण सांपडतील तसे त्याच्यांत कदाचित् मुळींच दृष्टीस पडणार नाहींत. उलटा अपशब्दांचाही पुष्कळ भरणा असून विषयाची मांडणी तर कधीं कधीं मुळींच नसेल. लोकसमाजांत उठून जें त्या अवसरास सुचेल तेंच वरील वक्ता बोलेल. सारांश, पहिल्या वक्त्याच्या भाषणांत रसिकता, कोमलता इत्यादि गुणांचा जसा समावेश असेल तसा दुसऱ्यांत नसून उद्दामपणाचेच सर्व गुण त्यांत असतील; इतके कीं, स्थलविशेषीं कोमल मनाच्या मनुष्यास त्यांच्यामुळें तें भाषण अत्यंत दुःश्राव्यही वाटेल. पण याप्रमाणें वरील दोहों भाषणांत बाह्यरूपदृष्ट्या जरी बराच फरक दृष्टीस पडेल, तरी वक्तृत्वाचें बीज जो मोहकपणा तो दोहोंतही आढळेल; आणि त्यामुळें वस्तुतः पाहतां पहिल्यास जशी वक्तृत्व ही संज्ञा लागेल, तशीच ती दुसऱ्यासही पण लागेल. दोहोंत भेद झाला ह्मणजे पुर-स्त्रीच्या आणि वन-स्त्रीच्या रमणीयत्वांत जितका दृष्टीस पडेल, तितकाच. ह्मणजे दोहींचेंही सौंदर्य वस्तुतः सारखें असतां पहिलीस जशी जडावाच्या व सोन्यारुप्याच्या दागिन्यांनीं व उंची उंची वस्त्रांनीं विशेष शोभा येईल व बोलण्याचालण्याची ढब वगैरे तीस उत्तम लागली असल्यामुळें पुर-वासी रसिकजनांस तिची रमणीयता अधिक वाटेल, तशीच गोष्ट पहिल्या वक्तृत्वाची होय. पण जो खरा मार्मिक आहे, जो अंतर्गत गुणाचा वस्तुतः शोध करणारा, त्यास दुसरें वक्तृत्वही वरच्यासारखेंच मोहून टाकील; किंबहुना स्वाभाविकत्वास्तव तेंच ज्यास्त पसंत पडेल. कसें तर ज्याप्रमाणें दुष्यंत राजास कण्वाच्या तपोवनांत शकुंतलेचें वल्कलाच्छादित मुग्ध लावण्य व अप्रगल्भत्व हींच अंतःपुरांतील स्त्रियांच्या उज्वल वेषांहून व नाट्याचार्यांनीं शिकवलेल्या विभ्रमांहून विशेष आल्हादप्रद झालीं.

६. आतां आपल्या भरतखंडांत वक्तृत्वाचे प्रकार कोणकोणते होते, व आलीकडे कोणते असून हल्लीं कोणते नवे चालू झाले आहेत याचा विचार करूं. त्यांत पहिल्यानें आपल्या देशांतील प्राचीन काळाविषयीं जर पाहिलें तर त्याविषयीं जरी आपणांस ह्मणण्यासारखी कांहींच विशेष माहिती नाहीं, तरी वक्तृत्वगुणाची त्या वेळेस चहा होती येवढें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. पुराणादि जुन्या ग्रंथांतून प्रस्तुत गुणाची अधिदेवता ह्मणून सरस्वतीचें वर्णन केलेलें आढळतें, व देवांचा गुरु बृहस्पति याचेंही प्रकृत गुणाच्या संबंधानेंच प्रधानत्वानें वर्णन असून अद्याप आपल्या मराठी भाषेंतही मोठ्या वक्त्यास वरील शब्द लावतात, इत्यादि प्रमाणांवरून वरील गोष्ट सिद्ध होते. त्याप्रमाणेंच ' वाग्मी '* ' वाग्विद् '

---

* या दोन्ही शब्दांचा अर्थ वक्ता असा आहे. " अल्पाक्षररमणीयं यः कथयति निश्चितं स खलु वाग्मी ॥" ह्मणजे थोडक्याच शब्दांत मधुर व निश्चित भाषण करणारा तोच खरा वक्ता. (वाग्मी)

"सम्पादक".

इत्यादि शब्दांचा ' रामायणा ' च्या वेळेपासून प्रचार आहे यावरूनही वरीलच अनुमान निघतें. शिवाय पृथ्वीवरील बाकीचीं राष्ट्रें गाढ अज्ञान-निद्रेंत स्वस्थ घोरत असतां आमच्या देशांत धर्माच्या, लोकव्यवस्थेच्या वगैरेसंबंधानें शेंकडों उलटापालटी होऊन नवीं मतें, नवीं दर्शनें, नवे पंथ वगैरेंची जेव्हां सारखी गडबड चालली असे तेव्हां प्रस्तुत गुणाची आमच्या देशांत मोठी जागृत वस्ती असेल यांत संशय नाहीं. ब्राह्मण, बौद्ध,$ जैन, चार्वाकमती, इत्यादिकांचे धर्मविषयक वाद व नैयायिक,‡ मीमांसक, सांख्यवादी इत्यादिकांचे

---

$ बुद्ध व जैन या नास्तिक धर्मांची उभारणी सांख्यमतावरच झाली असून ते वेदप्रामाण्य मानीत नाहींत; व ब्राह्मणनिर्मित जातिभेद व विधि यांचा प्रतिकार करतात. चार्वाकमत यांहूनहि अधिक नास्तिक आहे; सर्व तत्त्वज्ञानांचे मूळ सिद्धान्त, कर्मफलावलंबी पुनर्जन्ममत, व मुक्तिवाद तें मानीत नाहीं. बुद्ध व जैन धर्मांचें महत्त्व अध्यात्मविचारांत नसून नीतितत्त्वांच्या त्यांनीं केलेल्या उच्च विकासांत आहे. चार्वाक 'प्रत्यक्ष प्रमाण' हें एकच ज्ञानाचें साधन मानतो. प्रकृति सत् असून आत्मा हा बुद्धिगुण-विशिष्ट देह होय, व म्हणून आत्मा देहाबरोबर जसा उत्पन्न होतो तसाच नष्टहि होतो; असत्य, परस्परविरोध, पुनरुक्ति या त्रिदोषांनीं ग्रस्त असल्यामुळें वेद मूर्खांचे विसंगत प्रलाप होत असें तो मानतो. 'पशूचा बळी देऊन स्वर्ग मिळतो, तर बापाचीच आहुति देणें अधिक बरें नव्हे काय?' असें तो विचारतो. व इंद्रियसुख हेंच अंतिम साध्य मानून 'ऋण काढा पण सण करा व चैनीनें राहा. एकदां शरीर जळलें कीं तें थोडेंच परत येणार आहे?' असें प्रतिपादतो.

'सम्पादक'

‡ जगाचा उत्पादक व नियामक अशा परमेश्वराचें अस्तित्व सांख्य मानीत नाहींत. "जड प्रकृतींत उत्क्रांतीचें सामर्थ्य स्वभावतःच असतें, कर्मच त्या उत्क्रांतीचें नियमन करतें, व आत्मा—ज्याच्याकरतां उत्क्रांति होत असते तो—निष्क्रिय आहे; जग हें सत्य व अनादि आहे, कारण सत् वस्तूशिवाय अस्तित्व असणारे पदार्थ उत्पन्नच होणार नाहींत; प्रकृति अविभाज्य असली तरी सत्व, रजस्, तमस् अशी ती त्रिविध गुणयुक्त असल्यामुळें कांहीं नियमांनीं सृष्टीच्या उद्भवाला व विविधतेला कारण होते," असें सांख्यमत आहे. कपिल हा या मताचा प्रवर्तक. हा इ० स० पूर्वी ६ व्या शतकांत होऊन गेला. ईश्वरकृष्णकृत 'सांख्यकारिका' हा या मताचा आद्य ग्रंथ होय.

सांख्यांशीं विसदृश आणि सेश्वरवादी अशीं दोन दर्शनें एक वेद व ब्राह्मण यांच्या आधारावर व दुसरें उपनिषदांच्या मूळ अद्वैतपर अध्यात्मविचारांचा पद्धतशीर विकास करून निर्माण झालीं. पहिल्याचा जनक जैमिनि; यांत कर्मकांडाचाच विचार आहे. विधि व तत्पालनजन्य फलप्राप्ति, यांचीच यांत चर्चा आहे. हें वेदांचें अपौरुषेयत्व व अनादित्व मानतें. शब्दोच्चार अनादि व शब्दाचा त्याच्या अर्थाशीं संबंध संकेतजन्य नसून स्वयंभू असतो असें हें मत आहे. यांत तत्त्वविचार नाहीं. याला पूर्व-मीमांसा, कर्म-मीमांसा अगर मीमांसा म्हणतात. दुसऱ्या मताला उत्तरमीमांसा अगर शारीरक मीमांसा म्हणतात. याच्या 'तत्त्वमसि' या प्रमुख सिद्धांतावरून जीवात्म्याचें परमात्म्याशीं तादात्म्य अगर अनन्यसादृश्य व्यक्त होत असल्यामुळें याला 'अद्वैत' असेंहि म्हणतात. जीवात्मा परमात्म्याचा अंश अगर व्यक्तस्वरूप आहे असल्या मिथ्याभासाचें कारण अविद्या किंवा स्वयंभू अज्ञान होय असें मानणाऱ्या या मताचा आधारभूत ग्रंथ बादरायणकृत ब्रह्मसूत्र हा होय.

न्यायः—हें दर्शन कणादाच्या वैशेषिकाचेंच विकसित स्वरूप होय. यांत विध्यनुरूप तर्कशास्त्राचें विस्तृत विवरण आहे, गौतमाचें 'न्यायसूत्र' हा या दर्शनाचा आधारग्रंथ आहे. न्याय व

( पुढें चालू )

'पदार्थमात्राविषयीं सूक्ष्म विचार, यांची ज्या वेळेस बौद्धांकडे गर्दी असेल त्या वेळेस अनेक नामांकित वक्ते निपजले असतील असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां यावर जर कोणी अशी शंका घेईल कीं, वरील गोष्टीस कोठें ग्रंथांतरीं आधार नसतां किंवा दुसरेंही निश्चित प्रमाण नसतां ती खरी कशी मानावी, तर तीवर आमचें उत्तर असें आहे कीं वरील उल्लेखास अनुमान हें प्रमाण जबरदस्त आहे; मिसर देशांतील पर्वतप्राय विशाळ मनोरे पाहून किंवा इकडील भव्य व विस्तीर्ण लेणीं पाहून प्राचीन मिसरी लोकांचें व आर्य लोकांचें बुद्धिसामर्थ्य जसें सहज अनुमानसिद्ध होतें, त्याप्रमाणेंच वरील वक्तृत्वाविषयीं जरी कोठेंही बिलकुल आधार न सांपडला, तरी तें गृहीत धरण्यास अगदीं अडचण नाहीं. कारण ज्या वेळेस हल्लींप्रमाणें ग्रंथ छापण्याची कला माहीत नसल्यामुळें वादविवाद व्हावयाचा तो केवळ तोंडीच व्हावयाचा असें असे, त्या वेळेस लिहिण्याच्या चातुर्यापेक्षां बोलण्याच्याच चातुर्यास अतिशय उत्तेजन मिळालें असेल यांत संशय नाहीं. आणि ज्या वादांस आज निदान दोन हजार तरी वर्षें होऊन गेली असतांही 'शंकराचार्य,' 'मंडनमिश्र,'¶ 'कुमारिलभट्ट,' अशीं नांवें लोकवार्तेच्या केवळ वाऱ्यावर उडत हल्लींपर्यंत येऊन पोंचलीं आहेत, आणि ज्यांचा परिणाम येवढा झाला कीं, अर्ध्या एशिया खंडास त्यांच्यामुळें नवा धर्म मिळाला[1], ते वाद केवढे कडाक्याचे झाले असतील याची सहज कल्पना होते! असो; तर याप्रमाणें प्राचीन भरतखंडांत प्रकृत गुणाचें वास्तव्य होतें याविषयीं केवळ प्रत्यक्ष प्रमाण जरी न मिळालें, तरी तें अनुमानानें सिद्ध होतें. हें अनुमान वरच्या कलेप्रमाणें इतरही कांहीं कलांस तसेंच लागतें. उदाहरणार्थ नाट्यकला आणि चित्रविद्या घ्या. या दोहोंहीविषयीं

---

वैशेषिक दोन्ही मतांना ईश्वरास्तित्ववाद कालांतरानें मान्य झाला असला तरी प्रकृतीला कोणी जनक आहे हें मात्र त्यांस मान्य नाहीं. 'सम्पादक'

¶ १ शंकराचार्यः—(जन्म इ० स० ७८८ मृत्यु इ० स० ८२०) वेदांतसूत्रांचा आधाररूप ग्रंथ बादरायणकृत ब्रह्मसूत्र हा अवघड असल्यानें त्यावर यांनीं शारीरक-भाष्य लिहिलें. वेदांत विषयावर आणखीहि स्वतंत्र ग्रंथ यांनी लिहिले असून यांचीं उपनिषदांवरील व भगवद्गीतेवरील भाष्येंहि प्रसिद्ध आहेत. यांनीं ब्राह्मणधर्माचें पुनरुज्जीवन केलें.

२ मण्डनमिश्रः—याच्या बरोबर वाद करून शंकराचार्यांनीं याचा पराभव केला.

३ कुमारिलभट्टः—मीमांसेवरील प्राचीनतम टीका शबरस्वामिकृत 'भाष्य' होय. या टीकेवर इ० स० ७०० च्या सुमारास कुमारिलभट्टानें 'तंत्रवार्तिक' व 'श्लोकवार्तिक' या टीका लिहिल्या. 'सम्पादक'

१. ब्राह्मणधर्माची व बौद्धधर्माची प्रॉटेस्टंट् व क्याथलिक् पंथांप्रमाणें पुष्कळ दिवस मोठी झटापट लागून सरते शेवटीं बौद्धांचा मोड झाला, व त्यांस सिंहलद्वीप, तिबेट, चीन, वगैरे देशांत जावें लागलें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. बौद्धांची संख्या एकंदर *६ कोट आहे व एकंदर मनुष्यवस्तीचा सरासरी अर्धा भाग या धर्माचा आहे.-सुमात्रा, जावा वगैरे बेटांतूनही हिंदुधर्माच्या खुणा कित्येक अद्याप स्पष्ट आहेत.

* आज सुमारें चवदा कोटि. (१३,८०३१०००) 'संपादक'

इतर देशांप्रमाणें आमच्या देशाची मुळींच प्रसिद्धि नाहीं. ग्रीस$ देशांत रॉशस् ‡नामेंकरून एक मोठा-विख्यात नट होऊन गेला; व सुमारें शंभर वर्षांपूर्वी त्याच्या बरोबरीचा ग्यारिक् ¶ ह्मणून एक नट इंग्लंडांत झाला. पण इकडे ¶सॉफोक्लीज् व शेक्सपीयर यांच्या बरोबरीचे नाटककार निपजले असतां वरील नटांसारखीं मात्र इकडे कोणाचींही नांवें आढळत नाहींत. त्याप्रमाणेंच ग्रीस देशांत आपिलीज, इटालींत रेफील्, व इंग्लंडांत जॉन्सनचा परम मित्र रेनॉल्ड्स् हे चित्रकर्मांत मोठे निपुण होऊन गेले. पण प्राचीन काळीं आपल्या देशांत अमुक अमुक मोठे चित्रकार झाले असें कोठेंही आढळत नाहीं. तर या दोन अभावांचें काय बरें कारण असावें ? ज्या आमच्या देशांत ‘ शाकुंतल, ’ ‘ उत्तररामचरित्र, ’ ‘ मृच्छकटिक, ’ अशीं नाटकें रचणारे कवि निपजले त्याच देशांत त्यांचा उत्कृष्ट अभिनय करणारा नट कोणीच झाला नाहीं काय ? तसेंच अशोक, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, शालिवाहन, असे मोठमोठे पृथ्वीपति येथें नांदत असतां व बहुतकरून दरएक संस्कृत नाटकांत चित्रपट, आलेख्य‖ तूलिका,† इत्यादिकांचें नेहेमी वर्णन येत असतां कोणाही चित्रकाराची सार्वत्रिक प्रसिद्धि झाली नाहीं काय ? वरील दोन्हीही गोष्टी केवळ असंभाव्य होत हें आमच्या सर्व समंजस वाचकांच्या लक्षांत येईल; आणि ज्या अर्थी इतर कलांत व विद्यांत आपल्या पूर्वजांनीं येवढी कीर्ति मिळवली, त्या अर्थी वरील दोन कलांतही त्यांनीं निदानपक्षीं बरेंच निपुणत्व संपादिलें असेल असा तर्क सहज होतो. बरें, पण मग वरील कला आपल्या देशांत असून त्यांचा पुढें मागमूसही कसा उरला नाहीं हें जर कोणी विचारील, तर त्याचें उत्तर अर्थात् हेंच कीं, वरील दोन कला व प्रस्तुत वक्तृत्वकला या अशा प्रकारच्या आहेत कीं, या स्वभावतःच अचिरस्थायी ह्मणजे फार वेळ न टिकणाऱ्या आहेत. पाहा कीं, एकाद्या

---

$ शास्त्रीबुवांची कांहींतरी नजरचूक झालेली दिसते. हा नट ग्रीस देशांत झाला नसून इटाली देशांत रोम येथें होऊन गेला. ‘ सम्पादक ’

‡ Roscius—Celebrated comic actor at Rome. प्रेक्षकांची हंसवून मुरकुंडी वळविणारा हा सुप्रसिद्ध विनोदी नट रोम येथें होऊन गेला. ( मृत्यु खि. पू. ६२ ) यानें आपल्या नाट्यनैपुण्यानें सला ( Sulla ) व सिसरो यांचें प्रेम संपादिलें. याचें नैपुण्य इतक्या परमावधीला पोंचलें होतें कीं तो उपमान-पद पावला. व त्याच्यानंतर होणाऱ्या उत्कृष्ट नटांची ‘ हा रॉशस् आहे बुवा ! ’ अशा वाक्यांनीं रोमन् लोक वाहवा करीत. ‘सम्पादक’

¶ ग्यारिक्—डॉक्टर् जॉन्सन्चा शिष्यः हा नाट्यकलेंत इतका प्रवीण झाला कीं “ जे बहिरे असत त्यांस त्यांचे डोळे कानांच्या जागीं होत व जे आंधळे असत त्यांस त्यांचे कान डोळ्यांच्या जागीं होत. ” म्हणजे मनाच्या निरनिराळ्या वृत्ति अंगविक्षेपांवरून व आपल्या मुद्रेवरून तो इतक्या उत्कृष्ट दाखवी कीं, केवळ त्याच्याकडे पाहण्यानेंच तो काय म्हणतो आहे तें बहिऱ्यांस (कानांशिवाय) कळे. आणि (दुसऱ्या पक्षीं) तो त्या वृत्ति आपल्या शब्दांवरून इतक्या हुबेहुब दाखवी कीं, त्याचे शब्द ऐकतांच तो काय काय करतो आहे तें आंधळ्यांस ( डोळ्यांशिवाय ) समजे. ( मद्दाख्यायिकांपैकीं एक) ‘सम्पादक’

¶ जन्म ग्रीस देशांत अथेन्सजवळ एका खेडेगांवीं ( खिस्तपूर्वक ४९५ ) ‘ सम्पादक ’

‖ चित्र †चितारयाचा कुंचला. ‘ सम्पादक ’

उत्कृष्ट नटानें फार उत्तम अभिनय केला तर तो चिरकालिक करण्यास कांहीं तरी उपाय आहे काय ? तो जोंवर रंगभूमीवर आहे तोंवरच त्याचें कसब. शिल्पकारानें तयार केलेल्या वस्तु जशा पुष्कळ दिवस राहूं शकतील किंवा एकाद्या उत्तम कवीचें काव्य एकदां रचलें म्हणजे तें जगत्प्रलयापर्यंत जसेंचें तसेंच ठेवतां येईल तशी गोष्ट वरील मनुष्याच्या कृतीविषयीं आहे काय ? फार फार झालें तर त्या नटाच्या हयातीपर्यंत तो लोकांस रंजवील, पण त्याचा अवतार एकदां आटपला कीं पुढें त्याची करामत कशी होती आणि काय होती ती सांगतां येणेंही मुष्कील आहे. जी मूर्ति एकदां लोपली ती लोपली ! यासारखीच सरासरी चितान्याचीही गोष्ट आहे. चित्राचा आधार जो कागद, भिंत, किंवा कापड, हीं जोंवर आहेत तोंवरच त्याचें अस्तित्व; शिवाय रंगाची तकाकी वगैरे तर वरच्याहूनही लवकरच नाहींशीं होणारीं. कालगत्या सगळ्या सृष्टींत जी बदल होत जायची ती मोठ्या चितान्याच्या कसबाकडे पाहून होण्याची म्हणजे क्षणभरही राहील असें नाहीं ! मागें आपिलीज् म्हणून जो ग्रीस देशांत होऊन गेलेला चितारी सांगितला त्याच्याही तजबिरी[1] वरील कारणास्तवच आतां कोठेंही राहिल्या नाहींत आणि वरील देशाची मूर्तिकारांबद्दल जशी प्रसिद्धि अद्याप आहे तशी चित्रकारांबद्दल नाहीं याचेंही कारण वरीलच असावें. असो; तर याप्रमाणें ज्या कलांचीं कामें लागलींच किंवा लवकरच नाहींशीं होणारीं असतात तीं पुढें दृष्टीस न पडलीं इतक्यावरून त्यांचें वास्तव्य अमुक अमुक देशांत मुळींच नव्हतें असें म्हणणें रास्त नाहीं. यास्तव वक्तृत्वाची तरी वरच्यासारखीच गोष्ट आहे. एक तर अगदीं आलीकडेपर्यंतही शीघ्र-लिपि ही कला युरोपांत सुद्धां माहीत नव्हती; यामुळें कोणी एकादें उत्कृष्ट भाषण केलें तर तें टिपून घेण्याची मुळींच सोय नव्हती. शिवाय दुसरी मोठी गोष्ट आणखी अशी आहे कीं, पुष्कळ भाषणांचा रस त्या प्रसंगामुळेंच वृद्धिंगत झालेला असतो; तो इतका कीं, पुढें कांहीं काळ लोटल्यावर जर तींच वाचलीं किंवा ऐकलीं तर तीं अगदीं नीरस वाटतील. फार कशाला, मागील अंकांत सांगितलेल्या शेरिडयान् नामक वक्त्याच्या भाष-

---

१. वरील चित्रकार शिकंदर बादशहाच्या पदरीं होता; व तो विद्यासंपन्न असल्यामुळें त्याचा शिकंदराशीं स्नेहसंबंध होता. याच्याविषयीं इतिहासांत कांहीं आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं दोन येथें सांगतों. एकदां असें झालें कीं, वरील राजपुत्र हा आपल्या स्नेह्याच्या चित्रशाळेंत गेला. तेथें कित्येक तसबिरा तयार झाल्या असून कित्येक तयार होत होत्या. शिकंदरास चित्रकलेंत विशेष गम्य नसतांही तो आपल्या राजवैभवाच्या घमंडींत तेथील चित्रांत कांहीं चुका काढूं लागला. तें ऐकून आपिलीजानें त्याची पुढील उत्तरानें खुबीनें फजिती केली;—म्हणाला, "मित्रा, अंमळ हळूं तरी बोल: तीं पलीकडे पोरें रंग उगाळीत बसलीं आहेत तीं तुला हंसतील !" दुसरी गोष्ट अशी आहे कीं, शिकंदराचा प्रख्यात घोडा बुसेफेलस् याचें वरील चितान्यानें एक त्याच्याच प्रमाणाचें चित्र काढलें. तें इतकें हुबेहुब उठलें होतें कीं, तें पाहिलें असतां चित्र म्हणून भासत नसे. शिकंदरानें वरच्याप्रमाणच या चित्रावरही कांहीं टीका केली. आपिलीजानें कांहींएक उत्तर न करतां त्या घोड्यासच तेथें आणविलें. तो जवळ येतांच तेथें दुसरा आपल्यासारखाच घोडा बांधला आहे असें त्यास वाटून तो खिंकाळूं लागला. तेव्हां आपिलीज् शिकंदरास म्हणाला, "खरोखर, तुझ्यापेक्षां तुझ्या घोड्यास चित्रकलेचें मर्मज्ञान विशेष आहे !"

णानें त्या वेळेस सगळ्या लोकांस जरी येवढा चटका लावून सोडला, व प्रत्यक्ष फॉक्स् यानेंही एके प्रसंगीं त्यास सर्वोत्कृष्ट ह्मणून ह्मटलें[1], तरी हल्लीं तें वाचलें असतां त्यांत येवढा अद्भुत गुण कांहीं दिसत नाहीं. खुद्द डिमॉस्थिनीस्च्याही कांहीं थोड्या सर्व-प्रसिद्ध भाषणांखेरीज करून बाकीचीं वरच्याप्रमाणेंच सध्यां नीरस झालीं आहेत. याचें कारण उघडच आहे. अन्न निवाल्यावर जशी त्याची गोडी राहत नाहीं, त्याप्रमाणेंच एकाद्या प्रसंगविशेषानेंच जें लोकांस रुचलेलें असतें तें मग तो प्रसंग निघून गेल्यावर पहिल्यासारखें कसें रुचेल? खेरीज वक्त्यानें भाषण केलेलें खुद्द ऐकणें आणि तें कागदावरून वाचणें यांत पुष्कळदां फारच तफावत असते. मोठमोठ्या वक्त्यांच्या भाषणांत तर वरील भेद फारच असेल यांत संशय नाहीं. कारण वक्तृत्व ह्मणजे नुसतें बोलणेंच नव्हे; तर उंच व मनोवेधक स्वर, अंगविक्षेपांचा नोकझोंक, चेहऱ्यावर निरनिराळ्या मनोवृत्तींचा आविर्भाव, व आणखीही कित्येक बारीक सारीक गोष्टी या सर्वांचें संमेलन होय[2]. शिवाय वक्तृत्वस्थानाची शोभा, एकंदर लोकांचा थाट, वगैरे गोष्टींनीं आधींच सुप्रसन्न होऊन गेलेल्या मनावर वक्त्याच्या भाषणाचा जसा रंग उठेल तसा पांढऱ्यावर काळें केलेलें नुसतें वाचून कांहींच उठायाचा नाहीं हें उघड आहे. फार तर काय, पण नुसतें ऐकणें व वाचणें या दोन व्यापारांतही सुखाच्या संबंधानें थोडा भेद आहे असें नाहीं. वाचण्याचा जसा तेव्हांच त्रास येतो तसें ऐकण्याचें नाहीं. असो; तर याप्रमाणें वक्तृत्वसभेचा थाट पाहून तेथें झालेलें भाषण खुद्द ऐकणें आणि तें दुसऱ्या दिवशीं किंवा पुढें वर्तमानपत्रांत किंवा पुस्तकांत वाचणें या दोहोंत फारच फेर आहे. त्यांतून एकाद्या लौकिक प्रसंगविशेषानें लोकांचीं मनें क्षुब्ध होऊन गेलीं असतां त्या संधीस तर भाषणाचा जो रंग पडेल तो ती वेळ निघून गेल्यावर अगदीं नाहींसा होऊन त्याची कल्पनाही पुनः करतां येणार नाहीं. सारांश, ज्याप्रमाणें कमलपत्रांवर जलबिंदूंस मोत्यांची शोभा येते, किंवा संध्यासमयीं सूर्याची कोमळ व सोनेरी किरणें पश्चिमेकडील ढगांवर पडलीं असतां त्यांस रंग चढून त्यांचा देखावा कांहीं मोठा अपूर्व दिसत असतो, त्याप्रमाणें प्रसंगविशेषीं झालेलें वक्तृत्व कांहीं चमत्कारिक रीतीचें खुलतें! ती खुमारी तो प्रसंग आटपला कीं अगदीं नाहींशी होऊन जाते. कशी? तर जसे

१. फॉक्स् कोण होता हें मागील अंकावरून आमच्या सर्व वाचकांस माहीत झालें असेलच. या वक्त्यास एकदां कोणीं असा प्रश्न केला कीं, आपण इतके दिवस पार्लमेंटांत अनेक भाषणें ऐकलीं, त्या सर्वांत तुह्मांस अत्युत्तम कोणतें वाटलें? फॉक्सनें उत्तर केलें "बेगमांच्या संबंधानें शेरिडयान् यानें जें केलें तें."

२. वरील सर्व अंगें वक्त्यास किती आवश्यक आहेत हें मागें डिमॉस्थेनीस्च्या संबंधानें जें सांगितलें, कीं तीं त्यानें मोठमोठ्या नटांपासून शिकून घेतलीं यावरून एक स्पष्ट दिसतेंच. शिवाय वरील वक्त्याचें एक सर्वप्रसिद्ध वचन असें आहेः एके समयीं कोणा एकानें त्यास विचारलें कीं, वक्त्यास अगदीं आवश्यक अशा कोणकोणत्या गोष्टी आहेत? डिमॉस्थेनीस्नें उत्तर केलें, "नाट्य"-दुसरी कोणती?—"नाट्य!"—बरें तिसरी?—"नाट्य"!" पहिला विल्यम् पिट् ऊर्फ लॉर्ड चाथम् यास वरील 'नाट्य' किती अंगवळणीं पडून गेलें होतें हें मेकॉलेच्या त्याविषयींच्या निबंधावरून चांगलें ध्यानांत येईल.

वरील ढग क्षणभर आपलें विचित्र वैभव मिरवून सूर्य अंमळसा खालीं जातांच राखेसारखे दिसूं लागून अधिकच निस्तेज दिसतात!

असो; तर याप्रमाणें वक्त्यानें केलेलें भाषण उतरल्यानें तें अधिक नीरस मात्र लागणारें असल्यामुळें वरील निष्फळ प्रयत्न कोणीं केला नसेल हेंही संभवतें. शिवाय हातानें लिहिण्याचे श्रम वांचविण्याचें जें मुद्रणरूप साधन तें प्राचीन काळीं नव्हतें हेंही लक्षांत आणलें पाहिजे. तर याप्रमाणें अनेक कारणांस्तव आपल्या देशांतील प्राचीन वक्तृत्वाचा आजला बिलकुल मागमूस उरला नाहीं हें ठीकच आहे. त्यांतून ग्रीक् व रोमन् लोकांप्रमाणें इतिहास लिहून ठेवण्याची जर आपणांत प्रवृत्ति असती तर निदान अमुक अमुक काळीं अमुक अमुक प्रसंगानें अमुक अमुक पंडितांची वक्तृत्वाविषयीं मोठी ख्याति झाली असा नुसता उल्लेख तरी सांपडता. पण इतिहासाच्या अभावामुळें तोही आधार आपणांस अनुकूळ नाहीं. तेव्हां एकंदरींत प्रस्तुत कलेचें वास्तव्य केवळ अनुमानावरून सिद्ध करायाचें. त्यास प्रत्यक्ष प्रमाण मुळींच नाहीं. तरी ज्याप्रमाणें एखाद्या अरण्यांत राखेचा व कोळशांचा चोहोंकडे ढीग पडलेला पाहिला असतां वणव्याच्या ज्वाळाच प्रत्यक्ष पाहायाला नकोत, किंवा भुईंत खचलेले वाडे व वर आलेल्या विहिरी पाहिल्या असतां भूमीचा कंप प्रत्यक्षच दृष्टिगोचर होण्याची गरज लागत नाहीं, त्याचप्रमाणें अर्ध्या एशिया खंडावर पसरलेला हिंदुस्थानांतील धर्म व खुद्द हिंदुस्थानांतच मागें चालू असलेले व अद्याप चालत असणारे हजारों पंथ व निरनिराळीं मतें, हीं मोठमोठे वक्तृत्वग्रंथ प्रत्यक्ष पाहिल्यापेक्षांही प्रस्तुत विषयाविषयीं विशेष निर्णायक होत!

७. वर प्राचीन काळाविषयीं प्रस्तुत गुणाच्या संबंधें विचार झाला. आतां मध्यंतरीं ह्मणजे त्या काळाच्या व हल्लींच्या मध्यें जो पुष्कळ काळ लोटला त्याविषयीं विचार करूं. या काळाविषयीं मागील काळाप्रमाणेंच ह्मणण्यासारखी कांहींच आपणांस माहिती नाहीं. तरी आमच्या देशाच्या एका भागाविषयीं निदान एक दोन शतकांपर्यंत बरीच माहिती लिहिण्यासारखी आहे. हा भाग आमचा महाराष्ट्र देश असून वरील शतकें ह्मणजे यापूर्वींच गेलेला काळ होय.

८. आमच्या सर्व वाचकांस माहीत आहेच कीं, या देशाचें प्राचीन वैभव नष्ट होऊन कित्येक शतकें लोटल्यानंतर एका कोपऱ्यांतल्या लोकांनीं एकाएकीं वर डोकें उचलून थोडक्याच काळांत सगळा देश व्यापून टाकला. या त्यांच्या उदयामुळें प्राचीन आर्य लोकांचा धर्म, विद्या, आचार, इत्यादिकांचा जो सर्वथा लोपच होऊन जाण्याचा रंग आला होता तो समय दैवयोगानें टळला. या पराक्रमी लोकांनीं साऱ्या देशभर जीं जागोजाग ठाणीं घातलीं व मोठमोठीं राज्यें स्थापन केलीं, त्यांच्या योगानें यवनांनीं व म्लेंछांनीं उच्छेद करून टाकल्यामुळें आर्यांच्या धर्मादिकांवर जी ग्लानि येत चालली होती ती मागें हटून हिंदुत्वाचें जणों काय पुनरुज्जीवनच झालें. आमच्या जुन्या विद्या, कला इत्यादिकांस उत्तेजन मिळून आमच्या गतवैभवाची कळा आह्मांवर पुनः बऱ्याच प्रमाणानें आली. हीबरोबर मोठमोठ्या राष्ट्रांत आढळणारे जे निरनिराळे उज्वल गुण त्यांचाही पुनः उदय झाला. हे गुण

धैर्य, साहस, शौर्य, प्रामाणिकपणा, बुद्धिप्रागल्भ्य, इत्यादि होत. यांचीं उदाहरणें महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत जीं सांपडतील त्यांहून मोठीं इतर कोणत्याही प्राचीन किंवा अर्वाचीन देशाच्या इतिहासांत सांपडणें नाहींत. असो; प्रस्तुत गुण वक्तृत्व, हाही वरच्यांच्या मालिकेंतलिच एक होय. मराठ्यांचा इतिहास ज्या थोड्यांनीं सविस्तर वाचला असेल व आपल्या देशाची गेल्या शंभर वर्षांतली स्थिति जे पुरतेपणीं ध्यानांत आणतील, त्यांची वरील गुणाच्या वास्तव्याविषयीं खात्री झाल्याखेरीज राहणार नाहीं. आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं वक्तृत्व याचा अर्थ प्राचीन ग्रीस व रोमच्या इतिहासावरून जो एकंदर जगाच्या मनांत बसून गेला आहे, व जो आलीकडे आपल्या देशांतही सामान्यतः सर्व समजूं लागले आहेत, तो त्याचा केवळ एकदेश होय. वक्तृत्वसभेंत उभें राहून सभोंवतीं थाटलेल्या समाजास ' अहो वीर हो ', ' हे महेशबांधवहो ' वगैरे खरीं किंवा खोटीं संबोधनें करून मोठ्या गंभीर स्वरानें व मोठा आविर्भाव आणून उद्देशून बोलणें हें जसें वक्तृत्व, त्यापेक्षां सेनापतीनें रणांगणावर आपल्या सैन्यास बोललेले वीर्योत्साहप्रेरक शब्द, किंवा धर्मोपदेशकानें देवळांत केलेलें धर्मव्याख्यान, किंवा सुज्ञ बापानें आपल्या पुत्रास घरगुती केलेला बुद्धिवाद, हे प्रकार वरच्याहून वस्तुतः पाहतां कमी आहेत असें नाहीं. जो गुण पंडितसभेंत झळकणारा तोच वरील प्रसंगीं ह्मणजे उणा पडेल असें नाहीं. सोनें किंवा रुपें यांच्या अंगीं जशी स्वतःसिद्ध योग्यता असून त्यांवर छाप असो किंवा नसो, त्यांची योग्यता खरा परीक्षक तेव्हांच जाणतो, त्याप्रमाणें जगांतील सामान्य व्यवहारांतही प्रस्तुत गुण खऱ्या मर्मज्ञाच्या लागलीच लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. असो; तर याप्रमाणें पेशव्यांच्या या जुन्या राजधानींत व इतर ठिकाणीं जरी वक्तृत्वाच्या समारंभाकरतां आथेन्स व रोम येथल्याप्रमाणें मोठाल्या टोलेजंग इमारती बांधल्या नव्हत्या, व ऱ्होड्स् †बेटांतल्याप्रमाणें येथें त्या कलेचा अभ्यास करण्याकरितां पाठशाळा घातल्या नव्हत्या, तरी प्रकृत गुण वरील राज्यांत अनेक स्थानीं प्रगट झालेला होता यांत संशय नाहीं. हें ह्मणण्यास आधार काय हें पुढील लिहिण्यावरून स्पष्ट होईल.

९. मनुष्याच्या करणीवरून त्याच्या अंगीं असणाऱ्या निरनिराळ्या गुणांचें अनुमान करतां येतें हें जर खरें असेल, तर ज्या महापराक्रमी पुरुषानें हिंदूंस दास्यमुक्त करून सुमारें शंभरदीडशें वर्षें त्यांस स्वातंत्र्यसुखाचा व राजवैभवाचा अनुभव करविला त्याचे ठायीं प्रकृत गुणाचें वास्तव्य बरेंच कल्पिलें पाहिजे असें आह्मांस वाटतें. यापूर्वीं शिकंदरप्रभृति जे अनेक रणधुरंधर महाविख्यात राज्यकर्ते होऊन गेले त्यांपैकीं बहुतेकांची राज्यसाधनसामुग्री त्यांच्या पूर्वजांनींच अगोदर करून ठेवलेली होती. वास्तव एकाद्या कारागिरास उत्तम प्रकारचीं हत्यारें आयतीं तयार करून दिलीं असतां मग जशी त्यांवर त्यानें आपली करामत

† ग्रीसच्या पूर्वेला हें बेट आहे. येथें शिल्पशास्त्र व खोदकाम यांची नमुनेदार पाठशाळा होती. अलेक्झांडरनंतर ग्रीक् कलांना उतरती कळा लागली. तरी ऱ्होड्सनें आपलें नांव खिस्ती शक चालू होईपर्यंत कायम ठेवलें. ऱ्होड्स् बंदरांत एकशेंपांच फूट उंचीचा सूर्याचा राक्षसी पुतळा [ Collossus of Rhodes. ] खि. पू. तिसऱ्या शतकांत बारा वर्षें खपून तीन शिल्पकारांनीं उभारला. हा पुतळा जगांतल्या सात आश्चर्यांत मोडतो. 'सम्पादक'

दाखवावी, तसाच प्रकार शिकंदर, सीजर, नेपोलियन्, इत्यादि राज्यकर्त्यांचा झाला. पण मराठी बादशाहीचा ज्यानें पाया घातला त्यास सगळें राज्य विश्वकर्म्याप्रमाणें केवळ नवेंच बनवावें लागलें. त्याची मूळची सामग्री ह्मटली ह्मणजे लोखंडासारखें भक्कम शरीर आणि मोठी विशाळ बुद्धि येवढीच काय ती होती. जे मावळे लोक आतांप्रमाणेंच शेतभात, मोल-मजुरी किंवा काबाडकष्ट करूनच पिढ्यानपिढ्या राहिलेले, व अगदीं भाबडे व भित्रे असल्या-मुळें हूं कां चूं न करतां परराज्याचा जुलूम सोसण्यास अगदीं घटावून गेलेले, त्यांचाच स्वभाव अगदीं बदलून टाकून मोठे कडवे व अभिमानी जे मुसलमान व रजपूत त्यांशीं छाती भिडावून लढण्याचें सामर्थ्य शिवाजीनें त्यांच्यांत आणलें. फार तर काय, पण ज्यांस आपला धर्म काय, आपला देश काय, याची साधारण चांगलीशी कल्पनाही कधीं झाली नसेल, त्यांचा मुसलमानांशीं पुरा दुजेभाव करून देऊन त्यांचा रणोत्साह व आपल्या ठायीं अनन्यभाव त्यानें इतका वाढविला कीं, हरएक प्रसंगीं आपापलीं शिरें हातांवर घेऊन व प्रत्यक्ष प्राणही अर्पण करून त्याची कामागिरी त्यांनीं बजाविली. सिंहगडावर कल्याण दर-वाज्याशीं जो घोरतर प्रसंग झाला—कीं ज्या वेळेस काळोख तर ऐन मध्यान्हीचा,$ जवळ दिवा ना बत्ती, चढायाचा कडा सारखा पंचवीस तीस हात उंच, खालच्या लोकांची चाहूल ऐकून वरील रजपूत हत्यारबंद होऊन तयार झालेले, त्यांतून सर्वांत धैर्य खचण्यासारखी गोष्ट काय कीं, ऐन गर्दीच्या वेळेस त्यांचा मोहरा पडून सर्वांचें काळीज उडून गेलेलें; कां कीं, पुढें जावें तर रजपुतांच्या तरवारींशीं गांठ, मागें हटावें तर कडेलोट होऊन अंगाच्या ठिकऱ्यान् ठिकऱ्या उडायाच्या; असो; पण अशा भयंकर प्रसंगींही—कीं जो नुसता मनांत आणला असतांही अंगाचा थरकांप सुटतो—तानाजीचा धाकटा भाऊ सूर्याजी तिळमात्रही धैर्यभंग न होतां आपल्या सोबत्यांस सांगतो, "गड्यांनो, मागच्या शिड्यांच्या आशेवर तुह्मी मागें परतूं पाहत असाल, तर दोर मी मधांच कापून टाकले, तर आतां वांचायाचा मार्ग ह्मटला ह्मणजे येथील शिपायांवर तुटून पडल्याखेरीज दुसरा कोणता नाहीं." असें ह्मणून स्वतः त्यांचा ह्मोरप्या होऊन त्यानें रजपुतांस कापून काढलें, आणि पंधरा कोस दुरून गडाकडे डोळे लावलेल्या आपल्या धन्यास तेथील एका खोपटास आग लावून फत्ते झाल्याची वर्दी दिली!—तर असे प्रसंग लक्षांत आणले असतां आपल्या जवळच्या लोकांस अगदीं आपलेसे करून टाकण्याचें सामर्थ्य शिवाजीच्या अंगीं किती अद्भुत असेल हें काय सांगावें! वस्तुतः पाहतां तो कोण व मावळे लोक कोण? बरें, पैशाच्या लालचीनें त्यांनीं त्याचा आश्रय धरला असेल ह्मणावें तर वरील प्रसंगीं खुद्द धर्मापिलीवरही‡ कडी झाली असतां

---

$ मध्यरात्रीचा, मध्यानरात्रीचा. 'सम्पादक'

‡ धर्मापिली (Thermopylae) ची सुप्रसिद्ध खिंड. ही नुसत्या Pylae पिली या नांवानेंहि प्रसिद्ध आहे. या शब्दाचा अर्थ उष्ण (Therme=Heat) दरवाजे (Pyle=a gate) असा आहे. थेसाली (Thessaly) प्रांतामधून लॉक्रिस् (Locris) प्रांतांत जातांना ही खिंड लागते. इराण (Persia) चा राजा झर्क्सेस् (Xerzes) यानें (खि. पू. ४८०) ग्रीसवर

[पुढें चालू]

शिवाजीनें आपल्या सवंगड्यास येवढीं बक्षिसें तरी काय दिलीं ह्मणाल तर पांच सात रुप-यांचें एक एक रुप्याचें कडें किंवा एकादें मुंडासें ! तेव्हां वरील अद्भुत सामर्थ्य आमच्या महावीराच्या वाक्पटुत्वाचें होय यांत संशय नाहीं. वरील गुण त्यानें अडाणी व साधेभोळे जे मावळे लोक त्यांस वश करून घेण्यांत असा दाखविला, तसाच विजापूरच्या दरबारीं वागलेल्या वकिलाशीं बोलणें लावून त्यावर आपली पूर्ण छाप ठेवण्यांत व तसेंच पुढें मोगल सरदारांस वगैरे आंतून आपल्या पक्षास अनुकूळ करून घेण्यांतही प्रगट केला. असो; तर याप्रमाणें महाराष्ट्र देशाच्या इतिहासांतील वक्तृत्वाचें पहिलें उदाहरण त्या इतिहासाचा मुख्य आधारस्तंभ जो वरील पुरुष तो होय. दुसरें उदाहरण मराठी राज्य विसकळित झालें असतां त्यास आपल्या अंगच्या व बुद्धीच्या पराक्रमानें ज्यानें जोरदार केलें, व मोगल, पठाण, मराठे आणि फिरंगी यांस ब्राह्मणांच्या शौर्यापुढें कांपायास लावलें, त्या बाजीरावाचें होय. हा पेशवा शिपाईगिरींत, राजकारणांत, वगैरे बहुतेक गोष्टींत शिवाजी राजाशीं समत्व पावतो; व महाराष्ट्र देशाच्या सगळ्या इतिहासांत पाहिले असतां त्याहून वरची पायरी अशी एका शिवाजीचीच आहे. असो; याच्या वक्तृत्वगुणाचा उल्लेख मराठ्यांच्या इतिहासकारानें आपल्या ग्रंथांत केला आहे. त्यावरून व शाहू राजास त्यानें व बाळाजी विश्वनाथानें असा बाप-लेकांनीं मिळून अगदीं आपल्या मुठींत ठेवला होता यावरूनही प्रस्तुत गुणाची अनुकूलता दोघांस किती होती हें स्पष्ट दिसून येतें. पहिल्या पेशव्यानें तर पेशवाईचा अधिकार आपल्या वाक्-चातुर्यावरच मिळविला ही गोष्ट आमच्या साऱ्या वाचकांस बहुधा विश्रुत असेलच. आंग्र्यानें मोठा पुंडावा करून खुद्द साताऱ्यावरही येण्याचा संकेत केला असतां बाळाजीनें त्याशीं मोठें युक्तीचें तहाचें बोलणें लावून शेवटीं त्यास अगदीं आपलासा करून उलटी शाहूसच खंडणी देण्याचें त्याकडून कबूल करविलें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेंच हरएक प्रसंगीं शाहूस शहाणपणाची मसलत देणारा व संकटसमयीं पुढें तोंड देणारा वरील पंतप्रधानच होता. हा पेशवा किती उत्तम प्रकारच्या चढाईत होता हें सर्वांस माहीतच असेल, कीं स्वारी घोड्या-वर बसली असतां दोहोंकडून दोघांनीं यास धरावें लागत असे ! तरी दिल्लीपर्यंत मोहिमा करून यानें आपल्या शेवटल्या मोहिमेंत स्वराज्य चौथाई व सरदेशमुखी या हक्कांच्या बाद-शाही सनदा आपल्या धन्यास आणून दिल्या. तेव्हां ही सर्व कार्ये करतांना त्यास तरवा-रीच्या पाण्यापेक्षां वाणीचा सरळपणाच मुख्यत्वेंकरून उपयोगीं पडला असेल यांत संशय नाहीं. या गुणास्तव मागील अंकांत सांगितलेला जो पिन्हस राजाचा मंत्री सिनियस त्याची उपमा यास साजेल. असो; आतां दुसरा पेशवा बाजीराव बल्लाळ याचा वक्तृत्वप्रसंग सांगतों.

---

स्वारी केल्यावेळीं स्पार्टाचा राजा लिओनिडास (Leonidas) यानें तीनशें स्पार्टन् वीरांसह अद्भुत पराक्रम गाजवून या खिंडीच्या तोंडाशीं प्रचंड शत्रुसैन्याला अनेकवार परतविलें; परंतु शेवटीं विश्वास-घात होऊन इराणी राजाला दुसराच एक मार्ग दाखविण्यांत आल्यामुळें या शूर वीरांवर पिछाडी-कडून हल्ला झाला तेव्हां पळून न जातां त्यांनीं मृत्यूच्या कराल दाढेंत आत्मसमर्पण केलें. अशा या थर्मापिलीचें नांव ऐकल्यावर आपल्या इकडील पारनखिंडीच्या रोमहर्षण प्रसंगाची आठवण कोणास होणार नाहीं ?
'सम्पादक'

शाहूच्या दरबारीं साऱ्या प्रधानमंडळांत वरीळ पेशवा शिरजोरपणानें वागे, व साऱ्या मुलखांत मराठ्यांचा डंका जो फिरत होता तो याच्याच जोरावर. हें याचें महत्त्व सहन न होऊन श्रीपतराव नामेंकरून त्या वेळेस प्रतिनिधि होता तो याचा फार द्वेष करी. एके समयीं असें झालें कीं, बाजीरावानें हिंदुस्थानावर जातीनिशीं स्वारी करण्याची आपली मसलत राजास कळविली असतां वरील प्रतिनिधि त्या बेतास आडवा येऊन असें करणें फार अविचाराचें आहे असें शाहूस समजावून देऊं लागला. त्यानें आपला विचार असा सांगितला कीं कर्नाटकांतील वगैरे आपल्या हातचे जे मुलूख गेले आहेत, ते अगोदर माघारी घेऊन मग मोगलांवर चालून जावें. बाजीरावानें उत्तर केलें कीं, जर शिवाजी महाराजांची बुद्धि प्रतिनिधीसारखी असती, तर विजापूर व गोवळकोंडें आधीं घ्यावें, आणि मग हळूंच युक्तीनें कर्नाटकांत प्रवेश करावा असें त्यांच्या मनांत येतें. पण ते अभिमानी, साहसी,—त्यांची बुद्धि थोर; त्यांनीं एकदांच कर्नाटक सर केलें ! तर याचप्रमाणें या विस्तीर्ण व जुनाट वृक्षाच्या बुडाशींच आपण कुऱ्हाड घालूं, म्हणजे फांद्या आपोआप खालीं आल्याच !—याप्रमाणें प्रतिनिधीनें जो विचार काढला होता त्याचें खंडन करून बाजीरावानें शेवटीं विनंति केली कीं, " जर मला आज्ञा होईल, तर कृष्णेपासून अटकनदीपर्यंत मी महाराजांचा झेंडा लावीन !" हें पेशव्याचें वीर्योत्साहयुक्त भाषण ऐकून शाहूराजा तन्मय होऊन गेला; आणि त्याच्या आजाचा आवेश क्षणमात्र त्याच्या शरीरांत संचरून सद्गदित होत्साता म्हणाला, " शाबास ! तुमचे वडील मोठे थोर होते, त्यांचे तुम्ही पुत्रही योग्यच आहां. मराठ्यांचा झेंडा तुम्ही हिमालयाच्या मस्तकावर नेऊन रोंवाल अशी माझी खात्री आहे !"

बाजीराव बल्लाळ यापुढें जे चार पेशवे गादीवर आले त्यांपैकीं वरील दोघांप्रमाणें वाक्पटुत्वाविषयीं कोणाचीही कोठें विशेष वर्णना केलेली आढळत नाहीं. ती शेवटल्याविषयीं मात्र आढळते. हे शेवटले राजमणि अद्याप सर्वांस पूर्ण माहीत आहेत, व यांच्या दुष्कीर्तीचा कलंक केवळ त्यांच्याच नांवास लागून न रहतां त्यांच्या पूर्वजांच्या शुभ्र यशासही तो बाधक झाला आहे. 'पेशवाई' हें नांव काढतां ज्यानें पुणें वसविलें,$ ज्याच्या भयानें नादिरशाहास येथें धडगत न दिसून माघारा पाय घ्यावा लागला,[1] जो संपूर्ण चंद्रा-

$ पहिले बाजीराव—यांनींच शनवार-वाडा बांधिला.

१. वरील उल्लेखाचें आमच्या वाचकांस बहुधां आश्चर्य वाटेल, व ही अगीच निराधार प्रौढी झोकली आहे असा आरोप घेण्यासही आमचे प्रतिपक्षी चुकणार नाहींत. यास्तव प्रमाण दाखल केलें पाहिजे. तें हें पाहा—

"The ravages of the Persians were confined to Hindustan, and their departure was hastened by fear of the Mahrattas, then ably ruled by Bajee Rao, the second Peishwa."—*Martin's British India.* P.6.

दुसरें:—

"If Bajee Rao had been near Delhi when Nadir Shah arrived, it is not improbable that he would have joined the emperor in the defence of the empire; and could he have done so, or the Mahratta troops have been employed as auxiliaries, Nadir Shah's invasion would probably have had a very different conclusion.—*Taylor's Manual*—P. 381.

प्रमाणें पूर्ण आधिपत्य पावून यवनम्लेच्छादिकांनीं दीर्घकाळ संताप दिलेल्या जगतीस मुहूर्तमात्र शीतळविता झाला,† जो दुष्टांस काळासारखा व सन्मार्गवर्ती मनुष्यांस केवळ पितृतुल्य असा प्रत्यक्ष धर्मच अवतरला होता,‖ ज्या राजेंदूस उदयकालानंतर लवकरच दुर्दैवराहूनें ग्रासलें, ज्या राजबिंब्यास‡ खर्ड्यांचा मोठा जयही अपजयापेक्षां अधिक खेदास्पद झाला,—या सगळ्या राजपरंपरेची मुळींच आठवण न होतां ज्या गोजिरवाण्या दिसणाऱ्या दुष्ट सर्पानें$ कालियाप्रमाणें सर्वांचा जीवनहेतु जो राज्यरूप डोह त्यास आपल्या विषारानें लवकरच विषमय करून टाकिलें, दुर्जनरूप नक्रांस आंत बिऱ्हाड दिलें, आणि आपल्या आईचे हात जे तिच्या जिवंतपणीं तीस घेतां आले नाहींत ते निर्धास्तपणें घेतले—ज्या अधमानें नसते दुराचार आपल्या नगरींत माजवून केवळ विषयांधतेनें पुण्यक्षेत्राचे ठिकाणीं हिंदुधर्मात अत्यंत घोर मानलेलें जें ब्रह्मवधाचें पातक¶ तेंही जोडण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं, आपल्या पदरच्या सरदारास§ अत्यंत नीच अपराध्यास योग्य जें शासन तें देऊन आपल्या डोळ्यांचें पारणें फेडलें, आणि त्याचा समशेरबहादर भाऊ× जेव्हां छातीवर चढून आला तेव्हां भागूबाईप्रमाणें पळ काढला, आणि सरतेशेवटीं ज्यांच्या जिवावर उड्या मारून पंधरा वीस वर्षें राज्यसुख भोगलें त्यांवरच उलटून दीपशलभन्यायानें आपल्याच हातीं आपला व आपल्या प्रजेचा नाश करून घेतला,—त्या राजश्रींचीच मूर्ति मनांत उभी राहते ! असो; वरील पेशव्याचा दुर्लौकिक विशेष स्पष्टतेनें दिसण्यास दुसरें आणखी असें कारण झालें आहे कीं, त्याची सत्ता त्याच्या मागें ज्या राज्यकर्त्यांच्या हातीं आली, त्यांचें शहाणपण, नीति, शौर्य, व्यवस्थितपणा वगैरे गुण सर्वांच्या प्रत्ययास येऊन दोहों राज्यरीतींतील जमीनअस्मानची तफावत सर्वांच्या नजरेस आली. तर या दोन कारणांवरून बाजीराव ह्मणजे मूर्खांतला मूर्ख, त्याच्या अंगीं बिलकुल कर्तृत्व नव्हतें, असा एकंदर लोकांचा समज होऊन गेला. पण ही मोठी चूक आहे. सदरील पेशव्याच्या अंगीं त्याच्या पूर्वजांचे शौर्यादि गुण तर नव्हतेच; पण दोहोंची त्याच्या अंगीं मोठी परिपूर्णता होती. एक आंतल्या आंत लावालावी करून कपटोपक्रम रचण्याचा आणि दुसरा आपल्या बोलण्यानें दुसऱ्यास अगदीं मोहून टाकण्याचा. या दोन्ही गुणांचा क्रम जें दहा वीस वर्षें त्यानें राज्य केलें त्या सर्व काळभर सतत चालला होता. त्यास गादी मिळाली व ती त्यानें चालवली हें तरी वरील दोहोंचेंच फळ. नाना फडनवीसानें धाकट्या माधवरावाशीं प्रतिस्पर्धा करणारा कोणी नसावा या हेतूनें बाजीराव व त्याचा धाकटा भाऊ यांस राज्योपयोगी शिक्षण मुळींच न देतां केवळ वैदिक कर्मांतच त्यांस निपुण करून ठेवलें होतें; व त्यांची आई निवर्तल्यापासून त्यांवर मोठा सक्त पाहरा ठेवला होता. पण तशा अडचणींतही वरील दोन्ही गुणांच्या योगानें बाजीरावानें पशिव्याशीं संधान बांधलें. पुढें तें सर्व बंड बाहेर पडून पेशव्याच्या, नानाच्या, व एकंदर

† नानासाहेब ऊर्फ बाळाजी बाजीराव पेशवे ‖ थोरले माधवराव पेशवे ‡ सवाई माधवराव $ आनंदीबाईचा मुलगा दुसरा बाजीराव. ¶ गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा पंढरपूर येथें खून झाला. § विठोजी होळकर—यास बंडखोरीच्या आरोपावरून हत्तीच्या पायांशीं बांधून ठार मारण्यांत आलें. × यशवंतराव होळकर.

राज्याच्या नाशास कसें कारण झालें तें सर्वांस माहीत आहेच; पण वरील गुप्त पत्रव्यवहारापासून बाजीरावास एक मोठी गोष्ट साध्य झाली ती ही कीं, त्याच्या पुतण्यानें आपला अधिकार आपल्या पश्चात् त्यास असावा असें लिहून ठेवलें. तें छपवण्याचा नानानें पुष्कळ उद्योग केला; पण तो सिद्धीस न जातां व्हावयाचें तें झालेंच. बाजीरावानें शिंद्यास अनुकूळ करून घेऊन आपणास गादीचा मालक करून घेतलें. असो; तर याप्रमाणें शेवटल्या पेशव्यानें पेशवाई मिळवली तीच मुळारंभीं प्रस्तुत गुणाच्या बळावर. हा गुण आणखीही दोन तीन प्रसंगीं त्यानें दाखवला. पण त्यांचें वर्णन करण्यास कोणत्याही महाराष्ट्रवासी जनास उत्साह वाटणार नाहीं. कारण त्या गुणाचा उपयोग मागें सांगितल्यासारख्या कीर्तिदायक प्रसंगीं न होतां केवळ नीच कृत्यांच्या संबंधानेंच तो झाला. तरी कसेंही असलें तरी तो गुण वर्णनीय होता यांत संशय नाहीं. असो; आतां ते प्रसंग सांगतों. एक तर, नाना फडनवीस येवढा चाणाक्ष व धूर्त असतां व साडेतीन* शहाण्यांत मोडत असतां, सदहू पेशव्यानें त्यास दोनदां फसवलें. तें असें कीं, त्यास पकडून कैद करण्याची आंतून मसलत चालली असतां आपली त्यावर अत्यंत भक्ति आहे असें त्यास आपल्या गोड बोलण्यानें व मोठ्या नाटकी आविर्भावानें भासवून दिलें. तें सर्व त्यास खरें वाटून बाजीरावाचें अंतःकरण आपणाविषयीं शुद्ध आहे अशा भ्रमांत तो दोनदां पडला. त्याप्रमाणेंच अगदीं शेवटीं इंग्रेजांशीं लढण्याची तयारी मोठ्या सपाट्यानें चालली असतां माहुली येथें सर् जॉन् माल्कम् साहेबाशीं जें बाजीरावाचें बोलणें झालें त्यांतही त्यानें वरील साहेबावर अशी छाप ठेवून दिली कीं, कंपनी सरकाराविषयीं याच्या मनांत मोठा स्नेहभाव वागत आहे अशी त्याची पक्की खात्री झाली; आणि त्यानें कलकत्त्यास लिहून धाडलें कीं, पेंढाऱ्यांच्या लढाईंत आपणांस पेशव्यापासून उत्कृष्ट तऱ्हेची मदत मिळेल. या मदतीचा प्रकार मालकम् साहेबास लवकरच पुढें कळून आला असेल! असो; तिसरा प्रसंग गंगाधरशास्त्र्याचा. त्या भोळसर ब्राह्मणास पेशव्यापासून व त्रिंबकजी डेंगळ्यापासून दूर राहण्याविषयीं पुष्कळ सांगत होते; तरी दोघांच्या मानभावी बोलण्यास भुलून तो कालपाशाकृष्ट होत्साता त्यांबरोबर पंढरपुरास निघाला. तेथें पोंचल्यावर तर त्यांच्या आदरसत्कारानें तो जो कांहीं चढून गेला तो कांहीं विचारूं नये. कंपनी सरकारचें अभयवचन त्यास सुदर्शनासारखें वाटून मारेकऱ्यांच्या तरवारीही आपल्या अंगास लागणारच नाहींत असें त्यास वाटलें कीं काय न कळे! असो; तर याप्रमाणें ज्या सरस्वतीप्रसादानें ब्राह्मण बादशाहीचा पाया घालून पहिल्या पेशव्यांच्या कीर्तीस अधिक उज्वल केलें तोच शेवटल्याच्या अपकीर्तीस मलिनतर करून वरील राज्यरूप इमारतीस धुळीस मिळवून टाकण्यास सरतेशेवटीं कारण झाला!

---

* सखारामबापू फडके, विठ्ठल सुंदर, देवराव हिंगणे, हे तीन सबंध शहाणे व नाना फडनवीस अर्धा शहाणा, [ देवराव हिंगणे याच्या ऐवजीं कोणी देवराव चोरघे समजतात. ] मिळून पेशवाईंतील साडेतीन शहाणे होत. 'सम्पादक'

कीर्तन-सुखार्थ झाला भव-तारचि ¶अमृतराय $जीवाचा ।
भलत्या मुखांतुनि अशी सु-रस-ध्वनि निघेल काय जी वाचा ॥ †सन्मणिमाला.

अंक २०—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) हिंदु धर्माचें उज्जीवन. (३) धर्मव्याख्यान. (४) आमच्या देशाचा अध्यात्म विचारांकडे कल. (५) इकडे सुरू झालेला एक नवा प्रकार. (६) त्याची प्रवृत्ति व मराठयांच्या उदयाशीं त्याचा संबंध. (७) 'कीर्तन' शब्दाचा अर्थ, व मूळ प्रकार. (८) तो सध्यांच्या स्थितीस येऊन पोंचण्याचा क्रम. (९) या गुणांत नामांकितपणा पावलेले लोक. (१०) राष्ट्राचें व भाषेचें झालेलें हित.

१. मागील खेपेस महाराष्ट्र देशांत राजकारणाच्या संबंधानें वक्तृत्व उदयास आल्याचा प्रकार सांगितला. आतां त्याच गुणाचा वरच्याहून फार भिन्न रीतीनें जो आविर्भाव झाला—कीं जो अद्यापही दृष्टीस पडतो—त्याजविषयीं लिहूं.

२ मागें* सांगितलेंच आहे कीं, मराठ्यांची सत्ता या देशांत चोहोंकडे पसरल्यामुळें एक मोठी गोष्ट ही झाली कीं, परराष्ट्रांच्या तडाक्यापुढें हिंदूंचा टिकाव न निघून ते अगदीं क्षुद्रत्वास जाऊन पोंचण्याचा किंवा त्यांचें भिन्नत्व नष्ट होण्याचा जो समय येऊं लागला होता तो अगदीं टळला. परमुलखांतून येऊन ज्या ज्या लोकांनीं हिंदुस्थानांत ठाणीं घातलीं होतीं व हिंदूंस तृणवत् मानून त्यांवर निर्धास्तपणें जुलूम चालवला होता त्या सर्वांचा वरील लोकांनीं चांगला समाचार घेतला. त्यामुळें हिंदूंची स्वत:विषयींची क्षुद्रत्व-बुद्धि व त्यांविषयीं परक्यांचा तिरस्कार हीं दोन्ही तेव्हांच नाहींशीं झालीं. 'हिंदु' या नांवास हल्लींप्रमाणें तेव्हां जो अगदीं हलकेपणा आला होता तो जाऊन त्यास राज्यवैभवा-मुळें मोठें गौरव प्राप्त झालें. असें झालें असतां आमच्या धर्मासही पहिल्याहून विशेष मान प्राप्त झाला हें उघडच आहे. ज्या मुसलमानी धर्मानें हल्लींच्या त्याच्या वडील भावाप्रमाणें‡ येथील धर्माचा समूळ उच्छेद करण्याकरतां कंबर बांधली होती तोच पुढें हळूं हळूं त्याशीं मित्रत्वानें राहण्यास खुषी झाला; व कोठें कोठें तर स्वतःचा पराभवही त्यास मुकाट्यानें सहन करावा लागला. असो; तर याप्रमाणें परधर्माचा पाय मागें हटून हिंदुधर्माचें पुन: सर्वत्र संजीवन झालें. हें होण्यास वरील कारणाखेरीज दुसरी एक मोठीच गोष्ट कारणभूत झाली. ती प्रस्तुत अंकाचा विषय होय.

---

¶ अमृतराय:—( जन्म शके १६२०, मृत्यु शके १६७५ ) मध्वमुनींचा शिष्य. फार रंगेल व थट्टेखोर; यानें मध्वमुनींची चेष्टा केली तरी न रागावतां 'ईश्वरानें दिलेल्या अमृततुल्य वाणीचा असा दुरुपयोग न करतां परमेश्वराच्या पायाची जोड करून घेण्यास तिचा उपयोग कर' असा त्यांनीं उपदेश केल्यावरोबर याची वृत्ति पालटली व प्रसादपूर्ण व शब्दालंकाराच्या कौशल्यानें वाचकांच्या मुर-कुंड्या पाडणारे ईशस्तवनपर कटाव हा करूं लागला. 'सम्पादक'

$ बृहस्पतीचा [ वास्तविक अमृतराय व्युत्पन्न पंडित किंवा मोठा विद्वान् होता असें मुळींच नाहीं. ] 'सम्पादक'

† सन्मणिमाला—कर्ता मोरोपंत; प्रत्येक आर्येंत एकेका सन्मणिचें—साधूचें वर्णन करून ही माला तयार केली आहे. 'सम्पादक'

* ( पृष्ठ २६७–२६८ पाहा ) 'सम्पादक'

‡ खिस्ती धर्म. 'सम्पादक'

३. वक्त्यांच्या व्याख्यानास आधारभूत जे अनेक मोठमोठे विषय आहेत त्यांपैकींच धर्म हा एक होय. किंबहुना याचेंच प्राधान्य सर्वांवर आहे असें ह्मटलें असतां चालेल. कां कीं, ज्या देशांत वकील किंवा बारिस्टर हे शब्द कोणास माहीत नाहींत, व राजकारणाच्या संबंधानें किंवा देशाभिमानाच्या स्फूर्तीनें कोणी आपलें वक्तृत्व प्रगट केलेलें कधीं ऐकूं येत नाहीं, अशा देशांतून धर्मव्याख्यान मात्र निरनिराळ्या रूपांनीं सतत चालू असलेलें दृष्टीस पडतें. त्यांतून सर्व राष्ट्रांच्या पूर्वस्थितींत तर वरील प्रकार विशेषच आढळून येतो. याचें कारण उघड आहे. राष्ट्रांची आद्यस्थिति ह्मणजे मनुष्याच्या आद्यस्थितिसारखी होय. ह्मणजे लहानपणीं, किंबहुना पूर्ववयांतही, कुतूहल जसें सतत जागृत असतें, ह्मणजे जी जी वस्तु पाहावी तिची मौजच वाटून नव्या नव्या गोष्टींचा शोध करण्याकडे मनाची साहजिक प्रवृत्ति असते; त्याप्रमाणेंच जें राष्ट्र बाल्यावस्थेंत असतें, किंवा ती दशा संपून वरच्या स्थितीस नुकतें नुकतें येऊं लागलें असतें, त्यास सृष्टीची जी आश्चर्यमय राहाटी आज अनंतकाल चालली आहे, व समुद्र, पर्वत, नद्या, सूर्य, चंद्र, पर्जन्य, विद्युत् इत्यादि सहस्रावधि महाभूतांचे जे खेळ तींत चालले आहेत, ते पाहून मोठा चमत्कार वाटतो. एकाद्या गांवढळ मनुष्यास मोठ्या पदार्थसंग्रहालयांत सोडून देऊन त्याची गुप्तपणें मौज पाहायास बसलें असतां त्याचें ज्या त्या पदार्थाविषयीं जसें चोज व कौतुक दृष्टीस पडेल त्यासारखीच अज्ञान राष्ट्रांतील लोकांची स्थिति होय. सज्ञान राष्ट्रांस पदार्थविज्ञानादि अनेक शास्त्रांची माहिती होऊन सृष्ट पदार्थांविषयीं बरेंच यथार्थ ज्ञान झालें असल्यामुळें त्यांची जिज्ञासा जशी तृप्त झाली असते तशी वरील लोकांची झाली नसल्यामुळें जो जो सृष्टींतील पदार्थ पाहावा त्याच्या विचारांत त्यांची अप्रौढ बुद्धि अगदीं गुंग होऊन जाते. त्यांस कसलाच कांहीं थांग लागत नाहीं.[१] पण वरील गोष्ट केवळ बाह्य सृष्टीचीच झाली. अंतःसृष्टि जी आहे—ह्मणजे पिंडास आणि ब्रह्मांडास चाळवणारीं तत्त्वें आणि त्यांचे व्यापार, यांविषयीं तर कांहीं बोलूंच नये! बाह्यसृष्टीविषयीं पुष्कळ सतत विचार करून मोठमोठ्या पंडितांनीं अनेक गहन शोध आजपर्यंत कांहीं तरी लावले आहेत; पण या दुसऱ्या सृष्टींतली एकही निश्चित गोष्ट आपणांस आजपर्यंत कळली आहे असें ह्मणण्यास कठिण पडेल. शरीरचालक जो आत्मा व विश्वचालक

---

१. मनुष्याच्या मूळ अज्ञानावस्थेंत बाह्य सृष्टीचा व्यापार त्याच्या ज्ञानसंस्कारविरहित मनावर कसा होतो, व जगाच्या नियंत्याची कल्पना त्याच्या हृदयावर कशी ठसते, हें पोप कवीच्या पुढील पद्यावरून लक्षांत येईल—

> **Lo the poor Indian, whose untutored mind**
> **Sees God in clouds, or hears him in the wind!**

प्राचीन आर्य व ग्रीक् लोकांनीं सृष्टींतील महाभूतांवर देवतात्वाची कल्पना करून 'मेघांचा राजा जो इंद्र त्यास मुख्य देव कल्पिला; व त्याविषयींच्या व इतर देवांविषयींच्या त्यांच्या व हिंदु लोकांच्या पुष्कळ कल्पनांचा मेळ बसतो, या गोष्टींची उपपत्ति वरील उक्तीवरून होते. आलीकडे कोणी महापंडितांनीं 'इंद्र' ह्मणजे 'ईश्वर,' 'सूर्य' ह्मणजे 'ईश्वर,' 'वरुण' ह्मणजे 'ईश्वर'च असा जो पांडित्याचा कळस करून दिला आहे त्यांत तथ्य कितपत आहे हें सदरील टिपेवरून वाचकांस कळून येईल!

परमात्मा यांच्या स्वरूपाविषयीं फार प्राचीन काळापासून मोठमोठे ज्ञाते विचार करीत आले, पण त्यांचा निश्चय म्हणून कोणत्याच गोष्टीविषयीं बिलकुल झाला नाहीं. मनुष्याची मरणोत्तर काय स्थिति होते, त्याचें जनन होतें तें तरी कसें होतें--म्हणजे चित् आणि जड यांचे धर्म परस्पर येवढे भिन्न असतां त्यांचा संयोग कसा होतो,-मनुष्याची पूर्वावस्था काय असते, त्यास निर्माण करण्याचा हेतु काय, त्यास इहलोकीं जें सुखदुःख प्राप्त होतें तें कशामुळें, वगैरे शतशः गोष्टींविषयीं मनुष्य अद्याप संशयजालांत जशाचा तसाच गुंतून राहिला आहे. असो; तर याप्रमाणें राष्ट्रांच्या आद्यावस्थेंत वरील दोन्ही सृष्टींविषयीं मनुष्य केवळ अजाण असून त्या मानानेंच त्याची जिज्ञासाही अतिशयित जागृत असते. त्यांतून दुसऱ्या सृष्टीविषयीं ज्ञान करून घेण्याची व तिजविषयीं विचार करण्याची तर त्यास विशेषच उत्कंठा असते. कारण एक तर ती अत्यंत अगोचर आहे; आणि जिज्ञासावृत्तीचा असा नियम आहे कीं, तिचा विषय जितका गूढ, व तिच्या तृप्तीस जितके विशेष आयास, तितका तिचा जोर अधिक! दुसरें कारण असें कीं, या दुसऱ्या सृष्टीशीं मनुष्याच्या हिताहिताचा जितका निकट संबंध आहे तितका पहिलीशीं नाहीं; का कीं, पहिलीशीं जो त्याचा संबंध आहे तो केवळ नियतकालिक असून दुसरा संबंध वरच्याहून अगदीं भिन्न आहे. म्हणजे या दृश्य जगाशीं मनुष्याचा जो संबंध आहे तो केवळ त्याच्या जीविताच्या मर्यादेपर्यंतच. शरीरांतील जीवितत्त्व नष्ट होऊन त्याच्या परमाणूंचा सृष्टींतील तत्त्वांशीं पुनः संयोग होऊं लागला, की परस्परांचा संबंध तुटला. त्यापुढें म्हणजे मरणोत्तर जी त्यास स्थिति प्राप्त होणार ती वरच्यासारखी क्षणिक नसल्यानें तिजविषयींचा विचार त्यास वरच्यापेक्षां अतिशयित महत्त्वाचा आहे. असो; तर याप्रमाणें परलोकाविषयींचे विचार मनुष्याच्या मनांत येणें अगदीं स्वाभाविक आहे. आणि त्यांतून ज्या राष्ट्रांस असल्या विचारांच्या गहनत्वाचा पूर्ण अनुभव येऊन चुकला नसतो, म्हणजे असले विचार करण्यास मानवी बुद्धि किती पंगु आहे हें ज्यांस कळलें नसतें, अशांस तर त्यांचा अतिशयच हव्यास असतो. हा हव्यास पुढें अनुभवांतीं जरी पुष्कळ कमी होत जातो, तरी तो अगदीं नाहींसा असा मनुष्याच्या मनांतून कधींच होत नाहीं.

४. वर धर्माच्या संबंधानें जें सांगितलें, कीं त्या विषयावर विचारांची प्रवृत्ति होणें हें मनुष्यास अगदीं स्वाभाविक आहे, तें आमच्या देशास तर विशेष लागू पडतें. अध्यात्म विषयावर या देशांत पूर्वीपासून जितका विचार झाला, व एकंदर लोकांच्या मनाचा तिकडे जितका पूर्ण कल आढळण्यांत येतो, तितका बहुधा पृथ्वीवरील इतर थोड्याच देशांत सांपडेल. याचें कारण काय असेल तें असो; पण कोणी ग्रंथकार वरील वृत्तीची उपपत्ति करतांना या देशांतील उष्ण हवा, जमिनीचा पिकाऊपणा, नदीपर्वतादिकांचें विशालत्व इत्यादि बाह्य सृष्टीवरच सर्वथा निर्वाह करतात, तें आमच्या अल्प बुद्धीस केवळ प्रशस्त वाटत नाहीं. असो; पण वरील वृत्तीचा उद्भव कशापासूनही झाला असला, तरी येवढें खरें आहे कीं, तिचा प्रबलपणा या देशांत कांहीं विलक्षण आहे. प्राचीन काळाची गोष्ट तर राहूं द्याच; पण आलीकडे अजूनपर्यंतही एतद्देशीय लोकांचा कल वरील विषयाकडे मोठाच दृष्टीस

पडतो. पाहा कीं, कवितेचे विषय इतके नानाविध असतां, व तितक्या निरनिराळ्या प्रकारांनीं ती जगांतील इतर भाषांत आढळत असतां, एतद्देशीय सर्व भाषांत तिचा धर्माच्या व परमार्थाच्या विषयांकडेच विशेष रोख दृष्टीस पडतो. याप्रमाणेंच वक्तृत्व या शक्तीचा ओघ प्राचीन ग्रीक् व रोमन् लोकांच्या प्रमाणें येथें ऐहिक विषयांकडे न वळतां केवळ पारलौकिक हिताच्या साधनाकडेच वळला.

५. धर्मविषयक व्याख्यान प्राचीन काळीं कसें होत असे याविषयीं हल्लीं आपणांस कांहीं माहीत नाहीं. तसेंच बंगाल, कर्नाटक वगैरे इतर प्रांतीं वरील प्रकार कसा चालू आहे हेंही आमच्यानें सांगवत नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं इकडे महाराष्ट्र देशांत गेल्या शेंदोनशें वर्षांत जो एक नवा प्रकार सुरू झाला, किंवा त्यास विशेष स्वरूप प्राप्त होऊन तो मोठ्या प्रगल्भ दशेस येऊन पोंचला, त्याविषयीं मात्र येथें लिहितों.

६. वर कोणत्या प्रकारास अनुलक्षून लिहिलें आहे हें आमच्या सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलें असेलच. हा प्रकार अर्थात् कथा किंवा कीर्तन या नांवानें जो अद्याप प्रसिद्ध आहे तो होय. याची प्रवृत्ति प्रसिद्ध साधु तुकाराम व शिवाजी महाराजांचे गुरु रामदास यांनीं पाडली असें ह्मणतात. ही गोष्ट कितपत खरी आहे हें सांगवत नाहीं; पण येवढें खचीत कीं, वरील स्वामींच्या दिग्विजयी चेल्यानें सगळा हिंदुस्थान दणाणून दिल्यापासून प्रस्तुत प्रकार जरी पूर्वीपासून चालत आला असला तरी तेव्हांपासून त्यास विशेष तेज आलें. हिंदुधर्माचा यवनादिकांकडून कित्येक शतकें छळ चालला होता तो मराठ्यांच्या उदयानें बंद झाला हीच गोष्ट अगोदर लहानसान आहे असें नाहीं. त्यांतून तद्धर्मी लोकांचा चोहोंकडे पगडा झाल्यानें वरील वक्तृत्व-प्रकारास पुष्कळ उत्तेजन आलें असेल हेंही उघडच आहे. पण मराठ्यांच्या शौर्यानें प्रस्तुत कीर्तनांस जें साह्य झालें तें असें एकपक्षींच केवळ नव्हतें; तर तें उभयपक्षीं सारखेंच झालें. ह्मणजे त्या लोकांच्या वीर्यावर हिंदुधर्माचा बचाव होऊन वरच्यासारख्या अनेक प्रकारांनीं त्याचा पुनः उत्कर्ष जसा झाला, त्याचप्रमाणें कीर्तनादिकेंकरून त्यांच्या शिपाईगिरीसही पण साह्य झालें. खुद्द शिवाजीसच त्याच्या बापानें ठेवलेला कारभारी दादोजी कोंडदेव याच्या शिक्षणानें व आईच्या[१] घरगुती शिकवण्यानें स्वधर्माच्या रक्षणीं केवढा अभिमान पडला, व आपण शककर्ता होऊन पुरातन काळीं होऊन गेलेल्या राजांप्रमाणें पुनः धर्मसंस्थापनाच करावी या कृतसंकल्पावर त्यानें साऱ्या जन्मभर केवढा प्रचंड उद्योग केला, हें सर्वांस विदित आहेच. तसेंच इकडे होऊन गेलेल्या संतमंडळींत प्रमुख जे रामदास व तुकाराम त्या दोघांविषयीं त्याचे ठायीं किती पूज्यत्वभाव वागत होता हेंही सर्वप्रसिद्धच आहे.[२] ग्रांट् डफ् यानें एके ठिकाणीं असेंही लिहिलें आहे कीं,

---

१. शिवाजीच्या आईचें नांव जिजाबाई. हिजवर शिवाजीची अतिशय भक्ति होती. एकाद्या अवघड कामास हात घालायाचा असतां अगोदर तो मातोश्रीच्या चरणांवर मस्तक ठेवून तिचा आशीर्वाद घेत असे.—येथील कसब्याच्या गणपतीचें देऊळ हिनेंच बांधलें असें सांगतात.

२. रामदासांस तर शिवाजीनें आपले गुरु करून त्यांस सगळें राज्य वाहिलें होतें, व हें

[ पुढें चालू ]

शिवाजीस कथा ऐकण्याची अतोनात गोडी असल्यामुळें त्यानें केलेले बेत त्यास पुष्कळ वेळां तहकूब ठेवावे लागत; व एके प्रसंगीं तर तुकारामबावांच्या कीर्तनांत हा आसक्त होऊन राहिला असतां शत्रूंची एक टोळी त्यावर छापा घालण्यास आली. पण तें त्यास अगदीं आयत्या वेळेस कळून येऊन तो तेथून युक्तीनें निसटून गेला. असो; तर याप्रमाणें शिवाजीच्या हृदयांत जन्मतःच जें राजतेज स्फुरत होतें त्याचें धर्माभिमानानें विशेष उद्दीपन झालें. ही वृत्ति त्यानें आपल्या अनुयायांच्या ठायीं, किंबहुना एकंदर राष्ट्रांतही मोठी बळकट उत्पन्न केली. तिच्यामुळेंच त्यानें रचलेला राज्यव्यूह जरी पुढें मोडून लोकदृष्ट्या अगदीं नाहींसा झाला होता, तरी जसें एकादें जोरदार झाड खणी करून टाकलें असतां अधिक जोरानें मात्र फोंफावतें, त्याप्रमाणें मराठे हे पहिल्यापेक्षांही प्रबळ होऊन त्यांनीं अवरंगजेबाची व मस्त झालेल्या मोगलांची खबरच चांगली खबर घेतली. तर याप्रमाणें हिंदूंचा धर्म आणि त्यांची राजसत्ता यांचा परस्परांमुळें उभयतांचाही उत्कर्ष होत गेला. मराठ्यांचा इतिहास वाचणारांनीं वरील गोष्ट चांगली लक्षांत ठेवली पाहिजे. महंमदी लोकांचा इतिहास जसा वरील गोष्टीशिवाय बिलकुल समजणार नाहीं, त्याप्रमाणेंच इकडील लोकांचा अंमल येवढ्या थोड्या काळांत चोहोंकडे कसा पसरला व यवनांचीं मोठमोठीं राज्यें त्यास कशीं गेलीं हेंही वरील धोरण ठेवल्याखेरीज चांगलें लक्षांत येणार नाहीं.

७. असो; आतां हा कीर्तनाचा प्रकार कसा सुरू झाला, व तो अधिकाधिक पूर्णत्वास कसा पावत गेला, त्यांत वस्ताद कोण कोण होऊन गेले, व त्यापासून देशास उपयोग काय झाला, याविषयीं अनुक्रमानें लिहूं. पहिल्यानें कीर्तनाची प्रवृत्ति. 'कीर्तन' शब्दाचा धात्वर्थ 'यशाची वर्णना करणें' हा होय. यावरून ध्यानांत येईलच कीं, रामकृष्णादि अवतारी पुरुषांच्या पुराणांतून ज्या कथा आहेत त्या निवेदन करून तद्द्वारां ईश्वराचे गुणानुवाद गाणें, याचें नांव कथा किंवा कीर्तन. पण या अर्थीं वरील शब्द योजलेला संस्कृतांत कोठेंही सांपडत नाहीं; त्याप्रमाणेंच 'कथा' या शब्दाचाही मराठींतल्याप्रमाणें मूळ संस्कृतांत अर्थ नाहीं.[1] या शब्दांचा अर्थ अनुक्रमेंकरून 'यशोवर्णन' आणि 'सांगणें'

---

झुंजण्यास आपल्या पदरीं 'भगवा झेंडा' बाळगला होता, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. पण तुकारामाचा आणि त्याचा घडलेला प्रसंग सर्वांस माहीत नसेल. तो हा कीं, तुकारामाची योग्यता ऐकून शिवाजीनें त्यास आपल्या भेटीस आणण्याकरितां कारकून, घोडे, अबदागिरी वगैरे मोठा लवाजमा पाठवून दिला. पण तुकारामानें तो तसाच माघारी लावून देऊन सांगितलें कीं, 'आपण रामदासांकडे जावें, मी शूद्र असल्यामुळें उपदेश देण्याचा मला अधिकार नाहीं.' पुढें शिवाजी स्वतः होऊन भेटण्यास आला, आणि पुष्कळ जवाहीर नजराणा म्हणून त्यानें तुकारामाच्या पुढें ठेवलें. पण तितक्या रत्नांच्या प्रकाशानेंही त्या जन्मविरक्त योग्याचें चित्त विरघळलें नाहीं, त्यानें त्यांचा उलटा अत्यंत तिरस्कार दाखविला. असो; याच काळीं वामनपंडितांचीही कवित्वाविषयीं व साधुत्वाविषयीं ख्याति झाली होती; पण शिवाजीचा आणि त्यांचा प्रसंग घडलेला कांहीं ऐकण्यांत नाहीं.

१. वरील शब्द नव्या अर्थानें योजलेले पुढील दोन श्लोकांत आढळतात—

(१) येषां श्रीमद्यशोदासुतपदकमले नास्ति भक्तिर्नराणां

[ पुढें चालू ]

किंवा 'गोष्ट' इतकाच मूळचा आहे. असो; तेव्हां यावरून प्रस्तुत प्रकार अगदीं आलीकडे सुरू झाला आहे हें स्पष्ट दिसतें. पण एरवीं पाहिलें असतांही ही प्रवृत्ति नवीन पडली असावी हें सहज समजेल. कथेचें अगदीं मूळचें रूप, ह्मणजे पौराणिक कथांचें देवळांत वगैरे जमलेल्या श्रोतेमंडळीस नुसतें निरूपण करणें, हें ज्या वेळीं चालू असेल तोही काळ अर्वाचीनच असला पाहिजे. कारण ज्या वेळेस मूळची संस्कृत भाषा सर्वांस समजत असेल, तेव्हां 'रामायणा'दि ग्रंथ सर्वांस सुबोध असल्यामुळें कथेकऱ्यांची, पुराणिकांची वगैरे गरजच नव्हती हें उघड आहे. तेव्हां संस्कृत भाषा मोडकळीस येऊन तिचे प्राकृत रूपानें जेव्हां अनेक भेद झाले, तेव्हांपासून कथापुराणादिकांची रीत पडली असावी. असो; आतां या व्याख्यानविशेषाचें मूळचें रूप कसें असेल व तें हळू हळू बदलत जाऊन सध्यांच्या स्थितीपर्यंत कसें पोंचलें असेल याविषयीं लिहूं.

८. प्रस्तुत धर्मव्याख्यानाचें मूळचें रूप वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, ज्या वेळीं संस्कृत भाषा बुडून प्राकृत व तिच्या देशभेदेंकरून झालेल्या शाखा यांचाच पूर्ण प्रचार झाला तेव्हां पुराणांतील कथांचें लोकसमाजापुढें निरूपण करणें इतकाच अगदीं आरंभींचा प्रकार असावा. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्या वेळीं वरील साध्या रूपानेंच कीर्तनाची प्रवृत्ति असे. त्या वेळेस मराठी भाषा तादृश परिपक्वतेस आली नव्हती, चोहोंकडे यवनी अंमल चालू असून एतद्देशीय धर्मांचा लोप होत चालला होता, आणि पुढें महाराष्ट्रांतील लोकांस प्रभुत्व प्राप्त झाल्यामुळें जसे अनेक कवि उदयास आले, धर्माचें उज्जीवन झालें, गायनादि कलांचा प्रसार झाला, तसें पूर्वीं कांहीं नसल्यामुळें प्रकृत धर्मव्याख्यानास पुढें जसा रंग आला तसा त्या वेळेस बिलकुल नव्हता. तुकारामाविषयीं तर असें सांगतात कीं, त्याची गायनसामग्री ह्मटली ह्मणजे एक काय तो टाळ; त्याखेरीज तो दुसरें कांहीं जवळ बाळगीत नसे. तसेंच कथेंत तो प्रायः आपलेच आधीं केलेले किंवा प्रसंगवशात् तेथल्या तेथेंच केलेले अभंग ह्मणे, आणि त्यांवर व्याख्यान करी. त्यास कीर्तनांचा पहिल्यापासून नाद

येषामाभीरकन्याप्रियगुणकथने नानुरक्ता रसज्ञा ।
येषां श्रीकृष्णलीलाललितगुणरसे सादरौ नैव कर्णौ
धिक् तान् धिक् तान् धिगेतान् कथयति नितरां कीर्तनस्थो मृदंगः ॥

(२) निद्राप्रियो यः खल कुंभकर्णो
हतः समीके स रघूत्तमेन ।
वैधव्यमापद्यत तस्य कांता
श्रोतुं समायाति कथां पुराणम् ॥

पण हे दोन्ही अगदीं अर्वाचीन आहेत. पहिला श्रीधरस्वामिकृत 'व्रजविहारां'तील होय. हा कवि कोण हें कांहीं माहीत नाहीं; पण अगदीं आलीकडीचा असेल यांत संदेह नाहीं. दुसऱ्याचा कर्ता माहीत नाहीं;† पण त्याच्या रचनेवरून त्याचें नवीनत्व व्यक्त होत आहे.

† या श्लोकाचा कर्ता विठोबा अण्णा दप्तरदार (शके १७३५-९५) असें वांईचे दिवेकरशास्त्री कळवितात. 'सम्पादक'

असल्यामुळें व त्याच्या आधींचे महाराष्ट्रकवि जे *मुकुंदराज, †ज्ञानेश्वर, $एकनाथ, §नामदेव; आणि ‡कबीर, ‖सुरदास, ¶तुळसीदास, वगैरे हिंदुस्थानी कवि यांची कविता त्यानें पुष्कळ

---

* मुकुंदराजः—" महाराष्ट्र-रसवंतीचें पहिलें बाळ "—आद्य मराठी कवि. नागपूर प्रांतीं राहत असे. संस्कृत व मराठी दोन्ही भाषांतील आपला प्रमुख ग्रंथ ' विवेकसिंधु ' यानें शके १११० मध्यें रचला. याशिवाय परमामृत, पवनविजय, मूळस्तंभ, पंचीकरण हे मराठी व परमार्थतत्त्वबोध अथवा महाभाष्य हा संस्कृत असे याचे आणखीहि ग्रंथ आहेत. 'सम्पादक'

† ज्ञानेश्वरः—जन्म शके ११९७ श्रावण कृष्ण अष्टमी, आळंदी येथें रात्रीं; समाधि शके १२१८ कार्तिक वद्य त्रयोदशी, दुपारीं आळंदीसच. प्रमुख ग्रंथ ज्ञानेश्वरी वयाच्या पंधराव्या वर्षी शके १२१२ मध्यें लिहिला. नववा व विशेषतः अठरावा अध्याय म्हणजे महाराष्ट्र-वाङ्मयरूप देवळावरचा कळसच होय. याची दृष्टांत व उपमा देण्याची धाटणी फारच मोहक आहे. अमृतानुभव, योगवासिष्ठ वगैरे आणखीहि याचे ग्रंथ आहेत. ' सम्पादक '

$ एकनाथः—जन्म शके १४७० पैठण; समाधि फाल्गुन वद्य षष्ठी शके १५२१. सुप्रसिद्ध संत श्रीभानुदास यांचा पणतू. देवगिरीचे दत्तोपासक जनार्दनपंत हे याचे गुरु. उपदेश शके १४८०—चतुःश्लोकी भागवत, भागवत एकादशस्कंद, रुक्मिणीस्वयंवर, भावार्थरामायण वगैरे याचे ग्रंथ आहेत. आपल्या तीव्र बुद्धीच्या जोरावर या देशस्थ ब्राह्मणानें " बोरू घेउनियां हातें। महाराष्ट्र मोहिलें नाथें॥" असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तुकारामापासून तों न्या. रानड्यांपर्यंत सर्व महाराष्ट्राची याच्या भागवतावर अविच्छिन्न भक्ति आहे. 'सम्पादक'

§ नामदेवः—भगवद्भक्त दामाशेटी शिंपी याचा मुलगा. जन्म कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ मृत्यु शके १२७२ (अंदाजें). शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून निजणारा सुप्रसिद्ध विसोबा खेचर हा याचा गुरु. उपदेशानंतर याला सर्वत्र विठ्ठल दिसूं लागला. याची स्वतंत्र ग्रंथरचना नाहीं. अभंग मात्र अनेक आहेत. याचें सहज बोलणें अभंग होई. याचें सर्व कुटुंबच्या कुटुंब भजन करून अभंग रचीत असे. " करीन मी तुझे। शतकोटि अभंग॥ जरी न होती पूर्ण। जिव्हा उतरून ठेवीन मी॥" अशी यानें शपथ वाहिली होती. ' सम्पादक '

‡ कबीरः—(जन्म इ. स. १४४०, मृत्यु इ. स. १५१८) हिंदु-मुसलमान यांच्या ऐक्यासाठीं जिवापाड खटपट करणारा साधु. हा एका ब्राह्मण विधवेचा मुलगा. जन्मतांच त्याला आईनें काशीच्या ' लहर ' तलावांत सोडून दिलें. नीरु कोष्ट्याला तो सांपडला व त्याच्याच घरीं तो वाढला. तो ईश्वरचिंतनांत इतका मग्न होई कीं विणकामाचें त्याला भान राहत नसे. रामानंद याचा गुरु. सृष्टीचा उत्पत्तिकर्ता व पालनकर्ता एकच आहे, त्याला राम म्हणा अगर रहिम म्हणा, असें तो सांगे. मूर्तिपूजा त्यास अमान्य होती. अंतःकरणशुद्धीशिवाय केवळ तीर्थयात्रा अगर धर्मग्रंथपठण व्यर्थ होय हें त्याच्या उपदेशाचें सार होय. जित हिंदुधर्म जेत्या मुसलमानी धर्माच्या बरोबरीचा आहे असें उपदेशिण्याबद्दल त्यास काशींतून हद्दपार केलें. तेथून तो बस्ती जिल्ह्यांत मगर येथें गेला व तेथेंच वारला. त्याचें प्रेत जाळावें कीं पुरावें याचा हिंदु-मुसलमान शिष्यांत तंटा लागला; पण प्रेत उघडून पाहतां अर्धा सब्जा व अर्ध्या तुळशी तेथें दिसल्या हे विभाग नेऊन मुसलमानांनीं व हिंदूंनीं मगर व काशी येथें पुरून व जाळून मशीद व वृंदावन बांधलें. याचे आठ लक्ष अनुयायी आज आहेत. उपदेशार्थ यानें हिंदींत कविता केल्या. त्यांस दोहे म्हणतात. यांच्या शेवटीं ' कहे कबीर,' ' कहत कबीर,' किंवा ' दास कबीर ' असें असतें. 'बीजक' नांवाच्या ग्रंथांत कांहीं दोहे त्याचा शिष्य भागोदास यानें एकत्र केले आहेत. 'सम्पादक'

‖ सूरदासः—(जन्म इ. स. १४८३ मृत्यु इ. स. १५६३) बाप-बाबा रामदास, गुरु-वल्लभाचार्य;

(पुढें चालू. पृष्ठ २८१ तुलसीदास ¶ ही टीप पाहा.)

बावली व ऐकली असल्यामुळें तो जातीचा शूद्र होता तरी त्यास पुष्कळ ज्ञान प्राप्त होऊन वक्तृत्वकला त्यास साध्य झाली होती. शिवाय गीता, भागवत, योगवासिष्ठ इत्यादि अध्यात्म-विषयक ग्रंथ त्यानें अनधिकारास्तव स्वत: जरी कदाचित् वाचले नसतील, तरी हरदासांच्या वगैरे तोंडून त्यांचें त्यास श्रवण झालें असेलच. हें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें. असो; तर

यानें सुमारें (७५०००) पाऊण लाख श्लोक लिहिले आहेत. याचा बाप तानसेनाच्या खालोखाल उत्तम गवई होता. हा कवि हिंदी वाङ्मयाच्या सुवर्णयुगांतील होय. हें युग १५५० च्या सुमारास सुरू होतें. याच काळांत हिंदी वाङ्मयाचे मुकुटमणि तुलसीदास-सूरदास-विहारीलाल हे होऊन गेले. इंग्लंडांत एलिझाबेथूचा काळ जसा इंग्रजी वाङ्मयास पोषक व उत्तेजक झाला, तद्वतच हा इकडील अकबर-जहांगीर-शहाजहान यांचा काळ हिंदी वाङ्मयाला उत्तेजक झाला. शीख लोकांचा धर्मग्रंथ--ग्रंथसाहेबहि याच काळांत झाला. चित्ताकर्षक वृत्तयोजना व ठाकठिकीची काव्यरचना या बाबींत यानें तुलसीदासावरहि ताण केली असल्यानें तुलसीदासास हिंदी वाङ्मयांतील चंद्राची व सूरदासाला सूर्याची उपमा देतात. याचा साहित्यलहरी हा प्रमुख काव्यग्रंथ असून शिवाय यानें भागवतपुराण, नलदमयंती आख्यान वगैरेंवरहि कविता केली आहे. हा आग्र्याचा 'आंधळा शाहीर' म्हणून प्रसिद्ध आहे. हा स्वतःच आपणांस आंधळा म्हणतो. मग तो खरोखरच आंधळा होता कीं कृष्ण-भक्तिव्यतिरिक्त अन्य विषय त्याला दिसत नसत म्हणून हें फक्त अलंकारिक वर्णन समजावयाचें कोण जाणे ! वर जरी आम्हीं याचा काळ दिला आहे तरी तोहि अनिश्चित आणि अंदाजावरच आधारलेला आहे. 'सम्पादक'

¶ श्रीगोस्वामी तुलसीदासः—(जन्म सन १५३३, मृत्यु सन १६२३). मूळचें नांव रामबोला. हा मूळ नक्षत्रावर जन्मल्यानें आईबापांनीं याला टाकून दिलें. (कांहीं म्हणतात आई-बाप लहानपणीं मेले.) साधु नरहरिदासानें तुलशीपत्रानें शुद्ध करून त्याला घरीं घेतलें व त्याचें तुलसीदास असें नांव ठेवलें. बायको माहेरी गेली असतां वियोग सहन न झाल्यानें नदीच्या पुरांतून पोहून रात्रीं सासुरवाडीस आला, व खिडकींतून साप लोंबत होता ती दोरी समजून त्याला धरून वर गेला. त्यावर बायकोनें 'इतक्याच निष्ठेनें भगवद्भक्ति केल्यास मोक्षप्राप्ति होईल' असें सांगतांच विरक्ति होऊन काशीस गेला, व गोसावी होऊन जन्मभर रामभजन करीत राहिला. पुढें कीर्ति होऊन शिष्यमेळा त्याच्याभोंवतीं जमला. अखेर संवत् १६८० श्रावण शु. सप्तमीस गंगाकाठीं अस्सीघांटावर यानें देह ठेवला. याच्या हिंदी रामायणाला उत्तरहिंदुस्थानांत वेदांखालोखाल महत्त्व आहे. तुलसीदासानें याला 'रामचरितमानस' असें नांव दिलें होतें. यांतील अयोध्याकांड फारच बहारीचें उतरलें आहे. 'सम्पादक'

१. तुकारामाचे भगवद्गीतेवर भाषांतररूप अभंग प्रसिद्ध आहेत. ते 'गीतार्थबोधिनी' नांवाच्या कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या एका ग्रंथांत आहेत. सदरील पुस्तकांत वामनाची समश्लोकी, मोरोपंताची आर्या, कबीराचे दोहरे, ज्ञानेश्वराच्या ओंव्या, आणि तुकारामाचे अभंग हे प्रत्येक श्लोकाच्या खालीं दाखल केले आहेत. शिवाय प्रस्तुत कवींच्या ग्रंथांतून मुळांत सांगितलेल्या भागवतादि ग्रंथांतील वचनें पुष्कळ भाषांतररूपानें आढळतात, जसें—

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥

तुकारामाचा अभंग—

माझे भक्त गाती जेथें ॥ नारदा मी उभा तेथें ॥

याप्रमाणें मराठी राज्याचा चोहोंकडे डंका वाजून सध्यां चालू असणारा कथेचा प्रकार सुरू होण्यापूर्वीं तो वरील स्थितीस येऊन पोंचला होता. ह्मणजे पुराणांतील एकाद्या कथेचें आख्यान, त्यावर एकाद्या कवीच्या ओंव्या किंवा अभंग असतील तर ते, वेदान्ताचा विषय निघाला असतां ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु वगैरे ग्रंथांतील वचनें, इतक्याच काय त्या तऱ्हा त्या वेळेस असत. पण पुढें लवकरच वामनपंडितानें संस्कृतांतील मोठमोठालीं गणवृत्तें—ज्यांस एकंदर लोक श्लोक ह्मणतात तीं—प्रचारांत आणून त्यांत निरनिराळ्या पौराणिक विषयांवर सुरस काव्यरचना केली. अमृतरायानें कटाव, चूर्णिका वगैरे नवेच छंद निर्माण करून त्यांत कविता केली. सवाई, साकी, दिंडी, पद हेही संस्कृतांत नसणारे नवेच प्रकार मराठींत सुरू झाले. शेवटीं शेवटीं मोरोपंतानें आर्यावृत्तांत मोठी प्रौढ, सरस, व शब्दार्थचमत्कारयुक्त कविता करून, व रघुनाथकवीनें संस्कृतांतील महाकाव्यांचा थाट मराठींत उतरून देऊन जनमनोरंजनाचें व कीर्तनास रंग आणण्याचें मोठें साहित्य करून ठेवलें. आणि सरतेशेवटीं रामजोशी यांनीं सर्वजनांस अत्यंत प्रिय जो लावणी छंद त्यास तमासगिरांच्या डफावरून काढून हरदासांच्या मृदंगावर आणून बीभत्स शृंगारास जो उद्दीपक व्हावयाचा त्यासच आपल्या वाक्प्रभावानें श्रोतृजनांच्या हृदयांत वैराग्यवृत्ति बळकट बाणविण्यास साधनीभूत केला. असो; तर याप्रमाणें नामदेव, तुकाराम यांच्या वेळेस ओंव्या आणि अभंग या दोन अगदीं साध्या छंदांतच जी मराठी कविता होती ती पुढें हळूं हळूं संस्कृतांतील जुन्या वृत्तांनीं व मराठी कवींनीं जीं कित्येक नवींच काढलीं त्यांनीं अत्यंत सुशोभित झाली. त्यांच्या योगानें कीर्तनास पहिल्यापेक्षां अतिशयित रमणीयत्व व वैचित्र्य आलें हें उघडच आहे. दुसरें असें कीं एतद्देशीय जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तीस बहुधा सगळ्या देशभर पुष्कळ उत्तेजन मिळत गेल्यामुळें संस्कृताचा अभ्यास पुष्कळ वाढला, साधारण गृहस्थांसही थोडी बहुत काव्यव्युत्पत्ति संपादन करणें अवश्य होऊन तसा प्रघातच पडून गेला. असें झालें असतां हरदासांस अर्थातच संस्कृताचें अंग चांगलें बळकट ठेवणें जरूर पडलें. यास्तव प्राकृत कवितेचा भरणा जवळ बाळगून शिवाय पुराणें, काव्यें, चंपू, सुभाषित, वगैरेंचें साहित्यही त्यांस आवश्यक झालें. यांच्याही योगानें वरील दोन गुण जे वैचित्र्य व रमणीयत्व ते कीर्तनाच्या ठायीं वरच्याहूनही अधिक वाढले. असो; तर या दोन गोष्टींनीं पहिल्या साध्या कीर्तनांत आणि गेल्या शंभर वर्षांत जी नवी पद्धति पडली तींत इतका फेर पडला. पण वरील दोहोंशिवाय तिसऱ्याही एका गोष्टीचा येथें उल्लेख केला पाहिजे. ही गोष्ट कथांत तात्कालिक लौकिक वृत्तांतास उद्देशून बोलणें व नकला करणें हें होय. हें अंग वरील दोहोंप्रमाणेंच अर्वाचीन कीर्तनास नवेंच जडलें; व यामुळें पूर्वोक्त दोन गुणांत आणखीही अधिक भर पडली. वेदांताचा वगैरे गहन विषय सारखाच चालल्यानें श्रोत्यांस जो कंटाळा यावयाचा तो वरील गोष्टींनीं नाहींसा करण्यास वरील साहित्य चांगलें यांत संशय नाहीं; व मधून मधून असा गंमतीचा विषय निघाल्यानें एकंदर व्याख्यानास वैचित्र्यही येतें. गेल्या शंभर दोडशें वर्षांत या देशांत चोहोंकडे जी धामधूम चालली होती, व त्यांत महाराष्ट्रांच्या लोकांचा चोहोंकडे जयजयकार होत होता, यामुळें येथील शेंकडों विख्यात वीरांच्या व

प्रसिद्ध राजकारणी पुरुषांच्या चमत्कारिक आख्यायिका सर्वांच्या तोंडीं होत्या. त्या अद्यापही वृद्ध लोकांच्या तोंडून कांहीं कांहीं कानीं पडतात. तर प्रस्तुत व्याख्यानास आलीकडे जें जनमनोरंजकत्व विशेषेंकरून आलें त्यास तिसरें कारण वरील आख्यायिका व लोकव्यवहारांतील विनोदात्मक गोष्टी ह्या होत. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत व्याख्यानप्रकार जो केवळ धर्मशील व विरक्त अशा पुरुषासच रुचण्यासारखा मूळचा होता, तो होतां होतां लहान थोर, विरक्त रक्त, सुज्ञ अज्ञ, अशा सर्व लोकांस मनोरंजनावह झाला.

९. आतां प्रकृत गुणाच्या संबंधानें महाराष्ट्र देशांत कोण कोण मोठ्या लौकिकास चढले तें लिहूं. हा लेख अर्थातच अगदीं संक्षिप्त व अपुरता होईल. कारण एक तर आपल्यांत गत वृत्तांत लिहून ठेवण्याची चाल जशी असावी तशी नाहीं.[१] आणि दुसरें असें कीं, या प्रांताचा इतिहास ज्या ग्रंथकारानें लिहिला त्यानें मागें आठव्या अंकांत* सांगितल्याप्रमाणें अशी अवांतर प्रकारची माहिती ग्रंथविस्तारभयास्तव ह्मणा, अगर न मिळाल्यामुळें ह्मणा, ह्मणण्यासारखी कोणतीच दिली नाहीं. जेवढा संबंध आला तेवढ्यापुरती मात्र कोठें कोठें कांहीं थोडीशी दिली आहे. असो; तर आतां पुढें जें आह्मी लिहितों तें कांहीं ऐकिवावरून व कांहीं कोठें कोठें जें लिहिलेलें आहे त्यावरूनच होय असें वाचकांनीं समजावें.

कीर्तनकारांत पहिला अत्यंत विख्यात झाला ह्मणजे तुकाराम होय. या कवीच्या कथांविषयीं वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं, शिवाजी राजाची त्यावर मोठी भक्ति असे. असा वक्ता आणि असा श्रोता असल्यावर कीर्तनाचा रंग काय पुसायाचा आहे! जे प्रस्तुत कवीचे अभंग सध्यां दोन शतकें उलटून गेलीं असतांही त्याच्या देशबांधवांत लहानथोरांच्या सर्वांच्या तोंडीं आहेत, ज्यांची योग्यता परधर्मी लोकांसही वाखाणणें भाग पडतें[२],

---

१. पेशवाईंत व मुसलमानी राज्यांतून दररोजचा वृत्तांत लिहून ठेवणारे अकबरनवीस ह्मणून सरकारी कामगार असत हें पुष्कळांस माहीत असेल; व तशीच मोठमोठया गोष्टींचीं टिपणें करून ठेवण्याची चालही मागें पुष्कळांच्या घरोघर होती, हेंही खरें आहे. तरी वरील लेखांकडे आपल्या लोकांचें तादृश लक्ष होतें असें दिसत नाहीं. सध्यां तर अशी स्थिति आली आहे कीं, वाण्यांच्या दुकानांतून जिनसांचीं जीं पुडकीं आणावीं तीं सोडून पाहतां कधीं कधीं जुने महत्त्वाचे लेख किंवा शास्त्रीय वगैरे ग्रंथांचीं पृष्ठें हीं केव्हां केव्हां आढळतात! आमच्या देशास आलेल्या भिकारपणाचें व मतिमंदत्वाचें दुसरें कोणतें प्रमाण पाहिजे?

* पृष्ठें ८८–८९ पाहा. 'सम्पादक'

२. माजी डायरेक्टर सर् आलेक्झांडर् ग्रांट्साहेब यांनीं मुंबईच्या 'एज्युकेशनल् रेकर्ड' पत्रांत तुकारामावर एक निबंध लिहिला आहे तो आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. सदरील निबंधाचा प्रभाव केवढा झाला याविषयीं मागें एके ठिकाणीं आह्मीं लिहिलेंच आहे. वरील विद्वान् व रसिक साहेबानें प्रस्तुत कवीचे अभंग छापण्यास २४००० रुपये दिले, व ते अभंग दोन भाग मिळून छापून प्रसिद्ध झाले आहेत, हेंही पुष्कळांस मशहूर असेलच. वरील निबंधांत तुकारामाच्या व एकंदर हिंदुधर्माच्या संबंधानें लिहिलेल्या कांहीं वाक्यांचा आणि गतवर्षी या महिन्याच्या अंकांत×

×पृष्ठें७९–८२पाहा. 'सम्पादक'

[ पुढें चालू ]

ते आदि उगमापासून कानीं पडले असतां स्वधर्माभिमानी व रामदासाचा शिष्य जो वरील राज्यकर्ता तो किती तल्लीन होऊन जात असेल व त्याच्या शौर्याचें किती उद्दीपन होत असेल हें सहजच ध्यानांत येणारें आहे! एके प्रसंगीं तर बोवांचा संसाराच्या मिथ्यात्वाविषयींचा उपदेश शिवाजीच्या हृदयांत इतका ठसला कीं, त्यानें राज्य सोडून देऊन तो अगदीं विरक्त झाला; तेव्हां त्याची आई जिजाबाई तुकारामाकडे जाऊन तिनें विनविल्यावरून त्यानें शिवाजीस क्षत्रियांच्या धर्मावर व्याख्यान देऊन पुन: ताळ्यावर आणला; अशी गोष्ट 'संतविजय' ग्रंथांत महिपतीनें लिहिली आहे. असो; तुकारामाच्या पुढें दुसरें नांव अमृतरायाचें. हाही तुकारामासारखाच स्वत: कवि असून वैराग्यशील व तात्कालिक काव्यरचना करणारा होता. मराठी वृत्तांत 'कटाव' म्हणून जो छंदोभेद आहे त्यांत यानेंच पहिल्यानें कविता केली. सदरील वृत्त वर्णनाच्या प्रसंगास किती उत्कृष्ट आहे व त्यांत प्रस्तुत कवीनें किती बहार करून दिली आहे, हें सर्वांस माहीत असेलच. हा औरंगाबादचा राहणारा असून मूळचा मोठा संपन्न असतां यानें पुढें विरक्तता धारण केली. याचा मरणकाल 'नवनीतां'त इ० स० १७५३ असा दिला आहे त्यावरून पेशवाईची अगदी भरभराट असतां वरील कवि हयातींत होता असें दिसतें. नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दींत अमृतराय पुण्यास आला होता, व सरकारवाड्यांत त्याची एक कथा झाली, असें म्हणतात[१]. या कवीचें कीर्तन किती रसाळ होत असेल हें त्याचीं कवनें जीं अद्याप आहेत त्यांवरून व निबंधारंभाच्या पद्यांत मोरोपंतानें त्यास बृहस्पतीचा अवतार असें म्हटलें आहे यावरून स्पष्ट दिसतें. वरील आर्येंत प्रस्तुत कीर्तनकाराच्या वाणीच्या रसाचें जें वर्णन केलें आहे तें कवीनें स्वत:च्या अनुभवावरून लिहिल्यासारखें दिसत आहे. असो; अमृतरायानें हिंदुस्थानी भाषेंतही पुष्कळ कविता केली आहे असें म्हणतात. तिच्या योगानें व गायनाच्या साहित्यानें याच्या वाणीचा रस व कीर्तनाचा रंग हीं विशेषच खुलत असतील. अमृतरायाच्या पुढला असामी सोलापूरकर रामजोशीबोवा. यांच्या विषयींच्या लोक ज्या ज्या गोष्टी सांगतात त्यांवरून ही स्वारी मोठी विलक्षण असावी असें दिसतें. हे पहिल्यानें मोठे फक्कड, रंगेल व फंदी होते; आणि ही वृत्ति यांच्या शृंगारपर लावण्यांवरून स्पष्ट दिसते. पण पुढें मोरोपंताच्या आर्यांनीं यांची मनोवृत्ति तन्मय करून टाकून परमार्थाकडे ओढली. ती इतकी कीं, जो वाग्विलासाचा भर प्रस्तुत कवीनें असभ्य काव्यरचना करून रंगेल लोकांस अधिकच व्यसननिमग्न करण्याच्या अनुचित कार्याकडे योजला होता, तोच पुढें जनांचे मन विषयपराङ्मुख करून

---

दाखल केलेल्या मेकॉलेच्या व मिशनरींच्या महावचनांचा मेळ घातला असतां मोठीच मौज दिसणार आहे! देहूच्या वारकऱ्यांस उपदेश करणाऱ्या ख्रिस्तभक्तांनीं व मेकॉलेसारख्या लेखणबहादरांनीं पुढील वाक्याकडे नजर पुरविली असतां त्यांचें चापल्य बरेंच कमी होईल:—

"It must be hard to convince a people who have Tukaram in their mouths of the *intrinsic moral superiority* of the Christian doctrine."

१. 'नवनीता'स जोडलेलें 'कर्तींचें वर्णन.'

आपल्या खऱ्या हिताकडे वळवण्यास त्यानें योजला. ज्यानें विषयासक्त होऊन स्त्रियांच्या लावण्याचें व विलासांचें मनोवेधक वर्णन करावें, त्याचेच ठायीं परमार्थाची वृत्ति इतकी दृढ व्हावी कीं, त्यानें विषयसुखाची अनर्थावहता व असारत्व हीं वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या हृदयावर ठाम उठवून द्यावीं हें सकृद्दर्शनीं विरोधात्मक दिसतें. आणि सामान्य प्राकृत जनांचे ठायीं वरील दोन्ही गोष्टींचा मेळ कधींही दृष्टीस पडत नाहीं हेंही खरें. जे एकदां विषयलंपट होऊन बसले, व ज्यांची चित्तवृत्ति केवळ तदाकार बनून राहिली, त्यांस वैराग्याच्या स्थितीची कधीं कल्पनाही होत नसते. पण विशाल मनाचे जे असतात त्यांचा प्रकार निराळा. तो वर सांगितलेल्या कवीच्या सारखा असतो. अशीं उदाहरणें आणखीही कांहीं कवींचीं देतां येतील. भर्तृहरीचीं तीन शतकें आमच्या वाचकांपैकीं बहुधां सर्वांस ऐकून तरी माहीत असतीलच. त्यांतील चमत्कारही असाच आहे. जो भर्तृहरि 'शृंगारशतकां' त स्त्रियांची येवढी वाखाणणी करतो, तोच पुढें 'वैराग्यशतकां' त त्यांस केवळ तुच्छ मानतो व त्यांचा तिरस्कार करतो. जगन्नाथपंडिताच्या 'भामिनीविलासा' चीही अशीच गोष्ट आहे. पहिला भाग शृंगारात्मक असतां शेवटल्यांत त्याच्या विरुद्ध विषय आहे. फार तर काय, पण ज्या विलासी पुरुषानें यवनीच्या पायांशीं आपलें सर्वस्व वाहिलें, त्यानेंच आपल्या नातवास 'अश्वधाटी' नामक प्रसिद्ध काव्यांत विरक्तीचा उपदेश करून भक्तिमार्ग सांगितला आहे. पण नवल काय कीं, शृंगार जसा साधला तसाच शांतरसही वरील काव्यांत उत्कृष्ट उतरला आहे. तेव्हां या सर्व उदाहरणांवरून काय दिसतें कीं, कवींच्या मनांत मानवी प्रकृतीच्या सर्व वृत्तींचा समावेश होऊन साऱ्याच अतिशयित प्रबळ असतात; आणि जिचा ज्या वेळेस पगडा असेल ती त्या समयीं त्यांच्या कृतींत पुरतेपणीं उठते[1]. यास दृष्टांत, कीं ज्याप्रमाणें स्वच्छ तेजस्वी हिऱ्यासमोर जो जो रंग असेल तो तो त्यांत अगदीं पूर्णपणें प्रतिबिंबित होतो!

असो; तर वर सांगितल्याप्रमाणें रामजोशाच्या लावण्यांत शृंगारवर्णन जसें उत्तम आहे, त्याप्रमाणेंच वैराग्यही हृदयावर ठ्ळठळीत ठसण्यासारखें आहे. या कवीनें कीर्तनांत स्वकृत लावण्यांचा प्रवेश करून दिला हें मागें सांगितलेंच आहे. या गोष्टीवरून[2] व वरील लावण्यांत त्यानें याज्ञिकांवर, धर्माचें दंभ माजविणारांवर, वगैरे जो खूप भडिमार करून दिला आहे त्यावरून कवीच्या अंगचा धीटपणा, उद्दामपणा, व आवेश हे सर्व गुण व्यक्त

१. असाच प्रकार मिल्टन् कवीचीं दोन लहान लहान काव्यें 'एल् आलेग्रो' आणि 'इल् पेन् सरेसो' नांवाचीं आहेत त्यांमध्यें आहे. एक वाचलें असतां रंगेलपणा आणि दुसरें वाचलें असतां उदासपणा अशा दोन वृत्ति अनुक्रमेंकरून मनांत उभ्या राहतात!

२. कीर्तनांत लावण्या ह्मणण्याबद्दल अद्यापही लोकांचा ग्रह अगदीं कमी झाला नाहीं. मागें सुमारें दहा वर्षांपूर्वी पन्हळकर ह्मणून एक नामांकित हरदास येथें आले होते. त्यांचें कीर्तन वरील कारणास्तव पुष्कळ असमंजस व अरसिक लोकांस अप्रशस्त वाटे. वरील गोसाव्याजवळ इतर मराठी कवींच्यासारखा रामजोशाच्या लावण्यांचा पुष्कळ भरणा होता. आणि त्या ह्मणण्याची त्याची रीत फारच बहारदार असे. मराठी कवितेची माहिती करून घेऊन तिचा आस्वाद ज्यांस घेणें असेल त्यांनीं वरच्यासारखे प्रसंग कधीं दवडूं नयेत.

होतात. प्रस्तुत स्वरचित कवनें तो जेव्हां कथेंत ह्मणत असेल तेव्हां सामाजिकांच्या मनावर त्यांचा प्रभाव कांहीं विलक्षण होत असेल यांत संदेह नाहीं! शिवाय तो चतुर वक्ता असल्यामुळें त्याची त्या वेळच्या कीर्तनकारांत मोठीच कीर्ति असेल असें अनुमान होतें. या कीर्तनांच्या संबंधें प्रस्तुत कवीविषयीं अशी एक गोष्ट सांगतात कीं, एका सावकाराचें त्याजकडे पांच सहा हजारांचें येणें असतां तें त्यानें एका कीर्तनाची कबुलायत करून घेऊन सोडून दिलें. त्याप्रमाणेंच त्याजवर ब्राह्मणांनीं बहिष्कार घातला असतां शंकराचार्यांनी खुद्द आपण होऊन त्यास पंक्तिपावन करून घेतलें; वगैरे पुष्कळ चमत्कारिक आख्यायिका याविषयीं लोकांच्या सांगण्यांत आहेत.

रामजोशाच्या पुढें लोकप्रसिद्ध हरदास विशेषेंकरून नांव घेण्यासारखे असे एक दोनच आहेत. एक संगमनेरास राहणारा अनंतफंदी,‡ आणि दुसरे, बाजीरावाचे पुढें जे दिवाण झाले ते माणकेश्वर. यांपैकीं दुसऱ्याविषयींच्या लोकप्रसिद्ध दोन *आख्यायिका मागें एका अंकांत

---

‡ अनंतफंदी:—जन्म शके १६६६. मृत्यु शके १७४१. पदें, ओंव्या व विशेषतः लावण्या आणि फटके अशीं याचीं नाना प्रकारचीं कवनें आहेत. हा तमाशा करीत असे व त्यांत आपणच केलेल्या लावण्या म्हणे. हा संगमनेरचा राहणारा. आडनांव घोलप. याच्या तमाशाभोंवतीं कचेरीपासून फटफटीत उजाडेपर्यंत हजारों लोकांचें कडें पडे, व याच्या गोड कवनांनीं आणि म्हणण्याच्या रसाळ धाटणीनें श्रोते नागाप्रमाणें डुलूं लागत. याला एकदां भिल्लांनीं लुटलें असतां यानें त्यांच्यापुढें तमाशा केला व तेथच्या तेथें नाइकावर लावणी रचून म्हणून दाखविली. त्यावर 'सात्विकपणाचा उमाळा' येऊन लुटलेली चीजवस्त सारी परत करून भिल्लांनीं त्याला आणखी बिदागीहि दिली. रात्रीं शृंगारपर लावण्या ऐकविल्यावर त्याच बैठकींत व्यवहाराचीं उपदेशपर सूक्तरत्नें श्रोत्यांच्या मनावर बिंबविण्यासाठीं हा फटके म्हणत असे. अहल्याबाई होळकरणीच्या उपदेशामुळें थोडी उपरति होऊन तमासगिरी टाकून हा हरदास झाला. एकदां कीर्तन करीत असतां पेशव्यांचा कारभारी सदाशिव माणकेश्वर यास यानें कसें खोंचदार उत्तर दिलें तें खालीं माणकेश्वरावरील टिपेंतल्या आख्यायिकेंत दिसून येईल.
'संपादक'

* शेवटले दिग्विजयी पेशवे बाजीराव रघुनाथ यांनीं गादीवर येतांच मुक्तामालेंतील भयानक महाराजांप्रमाणें आपलें खासें राजमंडळ बनवलें. जोडे उचलणारे हुजरे, पाणके, हरदास वगैरे मोठ्या भाग्यास चढले. सदाशिवराव भाऊ माणकेश्वर हे हरदासाचे एकदम मुत्सद्दी होऊन मुख्य मंत्री झाले. यांच्या दोन प्रसिद्ध आख्यायिकाः—

(१) भाऊसाहेबांची स्वारी एकदां बेलबागेंत देवदर्शनास गेली असतां कीर्तन चाललें होतें. दर्शन होऊन स्वारी सभामंडपांत येतांच एकदम खडी ताजीम झाली. बोवांनींही नमस्कार करून कोडाकडे हात दाखविला. तेव्हां कांहीं बोललें पाहिजे म्हणून माणकेश्वर हरदासांस म्हणाले, "कां! हें केव्हांपासून धरलें?" हरदास अनंतफंदी बराच धीट व चतुर होता. त्यानें लागलेंच उत्तर दिलें, "आपण वीणा खालीं ठेवला, आणि आम्हीं उचलला."

(२) एकदां बाजीरावसाहेबांची स्वारी निघाली असतां बडेसाहेब (रेसिडेंट् एल्फिन्स्टन्) आणि नाना फडनविसामागें नुकतेच कारभारी झालेले माणकेश्वर हे बरोबर होते. जातां जातां या दोघांचें बोलणें चाललें. बोलतां बोलतां भाऊसाहेबांनीं आपल्या धन्याचे गुणानुवाद वर्णन करून

(पुढें चालू)

सांगितल्याच आहेत. ग्रांट् डफ् साहेबांनीं आपल्या इतिहासांत वरील ऐतिहासिक पुरुषा-विषयीं लिहितांना त्याचें थोडेसें वृत्त टिपेंत लिहिलें आहे. तीवरून असें समजतें कीं, माण-केश्वर हे मोठे गवय्ये असून शिवाय यांनी पुष्कळ कवनेंही केलीं आहेत. त्यांची वरील इति-हासकारानें बरीच प्रशंसा करून तीं जमविण्याविषयीं आपल्या स्वदेशीयांस शिफारस केली आहे. या शिफारशीप्रमाणें आजपर्यंत कांहीं झाल्याचें कोठें समजण्यांत नाहीं; आणि मूळ इतिहासाचीच कोण दुर्दशा झाली हें मनांत आणलें असतां त्यांतील टिपेकडे कोणीं विशेष लक्ष न दिलें याचें मोठेंसें आश्चर्यही वाटायास नको! असो; वरील शिफारस आह्मी आमच्या वाचकांसही वरील दोघां कीर्तनकारांच्या संबंधानें करतों. ती वरच्यासारखी फुकट न जावो ह्मणजे झालें.[१]

१०. येथवर कीर्तनाच्या स्वरूपाचें वगैरे कथन करून त्या गुणांत प्रख्यातीस आलेल्या मनुष्यांचें कांहीं वर्णन केलें. आतां सरतेशेवटीं या व्याख्यानविशेषापासून एकंदर राष्ट्राच्या व भाषेच्या संबंधानें कोणतीं कार्यें उद्भवलीं याविषयीं विचार करूं. मराठ्यांच्या शौर्याचें उद्दी-पन करण्यास व हिंदुधर्माचें उज्जीवन करून त्याचा प्रसार करण्यास प्रस्तुत कथांचा किती उपयोग झाला हें एक वर सांगण्यांत आलेंच आहे. शिवाय ज्या काळीं सध्यांप्रमाणें चोहोंकडे शाळाशिक्षणाचा क्रम चालू नव्हता, व ग्रंथवाचनाच्या आतांप्रमाणें सोयी नसल्यामुळें व्यव-हारचातुर्य, रसिकता, बहुश्रुतपणा, वगैरे संपादन करण्यास कोणताच मार्ग नव्हता, अशा वेळेस कीर्तनाचा उपयोग वरील संबंधानें मोठाच समजला पाहिजे. हें एक झालें. आतां मराठी भाषेस कथेच्या प्रवृत्तीपासून कोणकोणते फायदे झाले ते पाहा. एक तर महाराष्ट्रभाषें-तलि कविता कीर्तनामुळें वांचली गेली; ही प्रवृत्ति नसती तर ती सफाई बुडण्याचाच रंग होता. कारण हल्लींप्रमाणें त्या वेळेस छापण्याची सोय नसल्यामुळें पैसा खर्च करून किंवा कोणा मोठ्या मनुष्याचा आश्रय मिळवूनही ग्रंथाचा अगोदर नुसता प्रसार होण्याची सुद्धां सोय नसे. जें काव्य किंवा जो ग्रंथ खरोखरीच योग्यतेचा असून लोकप्रिय होईल तोच उत-रून घेऊन पदरीं बाळगण्याची लोक आस्था धरीत अशी त्या वेळची स्थिति होती. तेव्हां

---

आपल्यावर किती लोभ आहे तो सांगूं लागले; ते म्हणाले, "पाहा! नानांच्या हातीं येवढा राज्य-कारभार दिला होता, पण पेशव्यांनीं त्यांस कधीं डंका दिला नाहीं. पण तोही महाराजांनीं आमच्या स्वारीस दिला आहे." एल्फिन्स्टन् साहेब मोठा धूर्त व चाणाक्ष होता. त्यानें उत्तर दिलें, "भाऊसाहेब, मी येथें संगमापलीकडे राहतों, पण तुमचा डंका मला कधीं ऐकूं येत नाहीं; नानांचा डंका आम्ही विलायतेस ऐकत होतों!"

१. दोघांचींही कवनें प्रयत्न केला असतां मिळण्यासारखीं आहेत. तीं छापून प्रसिद्ध केलीं असतां तीं संग्रहास ठेवूं इच्छिणारे पुष्कळ लोक सांपडतील असें वाटतें. मोल्स्वर्थच्या कोशांत 'मुरकुंडी' या शब्दाची व्याख्या करतांना "अनंतफंदीच्या कथेवर हजारों माणसांच्या मुरकुंड्या पडतात" असें उदाहरण दिलें आहे. त्यावरून त्या काळीं [सुमारें १८३०] फंदींच्या कथेची केवढी कीर्ति असेल हें दिसून येतें! हा कविही रामजोशासारखाच मोठा फाटिंग होता असें ह्मणतात. यानें बाजी-रावाच्या शेवटच्या गर्दीचें मोठें मौजेचें वर्णन केलें आहे; आणि बाजीरावाविषयीं भर कथेंत वगैरे बोलायास तो अगदीं बचकत नसे असें सांगतात.

अशा रीतीनें मराठी कवींचीं काव्यें किती वेळ लगलीं असतीं ? पण कीर्तनकारांस त्यांचें अगत्यच पडल्यामुळें, व जितका मोठा भरणा असेल तितका त्यांस उपयोगी असल्यामुळें त्यांस वरील कवितेचा संग्रह करावाच लागला. मग त्यांच्या तोंडून प्रस्तुत कवींचीं उत्कृष्ट पद्यें सर्वांच्या कानीं पडल्यामुळें लोकांत त्यांचा प्रसार होऊन श्रीमान् व रसिक गृहस्थांस लेखकांकडून सगळे ग्रंथांचे ग्रंथ उतरवून जवळ संग्रहास ठेवण्याची इच्छा झाली. असो; तर याप्रमाणें कवींच्या वित्ताचे संरक्षक हरदास हे झाले. पण इतकेंच नव्हे. या लोकांनीं जुन्या कवींच्या यशोरूप देहाचें जसें रक्षण केलें तसेंच पण पुढच्यांचें पोषण करणारेही हेच झाले. गेल्या शंभर दोनशें वर्षांत जे वामन, अमृतराय, मोरोपंत, रघुनाथपंडित इत्यादि कवि होऊन गेले, त्यांच्या कृतींचा चोहोंकडे आदर होण्यास व प्रसार होण्यास वरील पुरस्कर्त्यांशिवाय दुसरें कोणतेंही साधन नव्हतें. यांच्या व्याख्यानाच्या द्वारानेंच ते लोकांच्या हृदयांत शिरून तेथें अढळपद पावते झाले. मोरोपंताच्या आर्यांस लोकप्रीतिपात्र करण्यास राम-जोशीच कारणभूत झाला ही गोष्ट तर सर्वांस माहीत आहेच. असेच इतर सर्व कवींचेही कोणी कोणी विशेष चाहते होऊन त्यांच्या परिश्रमानें त्या कवींच्या कीर्तीचा प्रसार झाला असेल यांत संशय नाहीं. असो; तर महाराष्ट्रांत जी आजपर्यंत कविता झाली तिचें रक्षण व प्रसार केल्यामुळें कीर्तनकर्त्यांचा मराठी भाषेवर मोठाच उपकार झाला. दुसरें असें कीं, हरदासांस मागें सांगितल्याप्रमाणें संस्कृताचें अध्ययन करणें भाग पडल्यामुळें व कथेंत मोठे प्रौढ शब्द योजावे लागल्यामुळें एतद्देशीय भाषेंत संस्कृत शब्दांची पुष्कळ भर पडून तीस प्रगल्भता व वैचित्र्य हीं प्राप्त झालीं. तसेंच हिंदुस्थानी, फारशी वगैरे शब्दही मराठी व हिंदुस्थानी कवींनीं केलेली त्या भाषेंतली कविता कथेंत निघाल्यामुळें देशभाषेंत सामील झाले. तर याप्रमाणें प्रस्तुत व्याख्यानाचे योगानें महाराष्ट्र-भाषेच्या अभिवृद्धीस साह्य झालें. हा त्यापासून झालेला दुसरा नफा. याखेरीज ऐतिहासिक वृत्तांत प्रकृत प्रसंगीं निघाल्यानें व नकला, विनोद यांचाही कथेंत समावेश असल्यानें इतिहासाची माहिती एकंदर लोकांस सहज रीतीनें झाल्यासारखी होऊन विनोदात्मक भाषेचीही सरणी आमच्या भाषेंत क्रमाक्रमानें पडत गेली, अशा आणखीही कांहीं गोष्टी सांगतां येतील. तर याप्रमाणें एकंदरींत या संप्रदायापासून एकंदर राष्ट्रास व देशभाषेस पुष्कळ उपयोग घडला यांत संदेह नाहीं.

---

१. या कवीच्या वृत्तीचा पालट मोरोपंताच्या कवितेनें केला, याविषयीं मागें लिहिलेंच आहे. कवीचा आणि रसिकाचा परस्पर संबंध हासऱ्याच्या आणि खेळवणाऱ्या सारखाच बहुतां अशीं आहे. याच अर्थास अनुलक्षून वरील दोघांविषयीं कोणी आर्या केली आहे—

जैशी जनकें दिधली सच्चिद्घन राम जो सिता त्याला ।
तैशी दिधलि मयूरें स्वार्या ती रामजोसितात्याला ॥

२. अमृतरायानें हिंदुस्थानी भाषेंत कविता केली आहे हें मागें सांगितलेंच आहे तशी तुकारामानेंही कांहीं केली आहे. ती मुंबईस नुकत्या छापलेल्या आवृत्तींत घातली आहे.

अल्पाक्षररमणीयं यः कथयति निश्चितं स खलु वाग्मी ।
बहुवचनमल्पसारं यः कथयति विप्रलापी सः ॥[1]

अंक २१.—(१) प्रकृत विषयाचा तिसरा विभाग. (२) विषयोपक्षेप. (३) वक्तृत्वाची विद्यमान स्थिति. (४) बाल्यावस्था. (५) मागल्या स्थितींत व सध्यांच्यांत अंतर. (६) वक्तृत्वोत्तेजक सभा. (७) त्यांपासून अपेक्षित कार्य. (८) वक्तृत्वादि गुणांचें उत्तेज्यत्व.

१. गेल्या तीन अंकांत प्रस्तुत विषयाचे दोन विभाग आटपले. आतां यांत आमच्या देशांत आलीकडे जो वक्तृत्वाचा नवा प्रकार दृष्टीस पडूं लागला आहे त्याविषयीं लिहूं.

२. हा प्रकार अर्थातच पाश्चात्यजनांच्या संपर्काचें फल होय. या लोकांचें प्रभुत्व आज सुमारें पांचपन्नास वर्षें या साऱ्या देशभर निष्कंटक व सुयंत्र चालल्यामुळें त्यांच्या विद्या, कला वगैरेंचा प्रसार चोहोंकडे क्रमाक्रमानें होत गेला, व तसा अद्यापही चालला आहे. आणि यापुढेंही वरील प्रसार जर असाच दीर्घकाल होत गेला, तर देशाचें स्वातंत्र्य हरण केल्यानें जी विपत्ति वरील लोकांनीं त्यास आणली आहे तिचें बरेंच विस्मरण पाडण्यासारखे आमच्या लोकांस पुष्कळ लाभ होतील असा सुमार दिसतो. असो; तर लोकसमाजांत उभें राहून तात्कालिक स्फूर्तीनें वादास्पद विषयावर भाषण करणें किंवा अगोदर घरून योजून येऊन एकाद्या नेमलेल्या विषयावर वक्तृत्व करणें, हा आलीकडील प्रकार इंग्रेजी विद्येचा जो सगळ्या हिंदुस्थानभर हल्लीं फैलावा होत चालला आहे त्याच्यामुळें सुरू झाला आहे. आतां ही नव्या तऱ्हेची वक्तृत्वकला आजला आमच्या देशांत कोणत्या स्थितीस येऊन पोंचली आहे, तिचा उत्कर्ष यापुढें होण्यासारखा आहे कीं नाहीं, हा उत्कर्ष होण्यास साधनें कोणतीं, वगैरे गोष्टींची प्रस्तुत निबंधांत चर्चा करूं.

३. आतां प्रस्तुत कलेच्या विद्यमान स्थितीविषयीं जर विचार केला, तर ती हल्लीं अगदीं बाल्यावस्थेंतच आहे असें ह्मटलें पाहिजे. हें ह्मणणें आमच्या वाचकांस बहुधां मोठें चमत्कारास्पद वाटेल. कां तर, आमच्या देशांत हल्लीं वक्तृत्वाविषयीं नामांकित असणारे बरेच पुरुष चोहोंकडे गाजताहेत, जिकडे तिकडे वक्तृत्वाच्या सभांतून वक्त्यांचीं भाषणें दरवर्षीं होत आहेत, कोणी रावसाहेब किंवा रावबहादूर यांची अत्तर–गुलाबानें संभावना झाली असतां त्यांचें भाषण नेहेमी 'सुरस' 'मनोवेधक' वगैरे झाल्याचा गांवोगांवच्या वर्तमानपत्रांतून नेहेमी पुकारा होतच असतो;—मग इतकें असूनही वक्तृत्वाची बाल्यावस्थाच ! असा आमच्या वाचकांस फार करून आचंबा वाटल्याविना राहणार नाहीं. पण वक्तृत्वाचें वास्तविक स्वरूप काय, व तें वर सांगितलेल्या लोकांच्या ठायीं कितपत आढळेल, याविषयीं जो मार्मिकपणें विचार करील त्यास प्रकृत विषयाविषयीं बिलकुल संशय उरणार नाहीं. हल्लीं वक्तृत्वाच्या संबंधानें ज्यांची चहोंकडे थोडीबहुत प्रसिद्धि आहे, त्यांचे अंगीं

१. "थोड्याच शब्दांत जो मधुर व निश्चित असें भाषण करतो तो वक्ता; ज्यांत अर्थ तर थोडा, पण शब्दविस्तार फार, असें भाषण करणारास विप्रलापी ह्मणजे बडबड करणारा हेंच नांव योग्य !"

प्रस्तुत गुण वस्तुतः पाहतां किती वसत आहे याविषयीं प्रस्तुत अंकांत जें आम्हीं विवरण करूं त्यावरून, व पुढील अंकांत वक्त्यांस आवश्यक गुण कोणकोणते ते जे सांगण्यांत येतील, त्यांवरून सांप्रत काळच्या वक्तृत्वाची यथार्थ परीक्षा करण्यास आमच्या वाचकांस विशेष अडचण पडणार नाहीं असें वाटतें. प्रस्तुत स्थलीं वरील उल्लेखाचीं इतर जीं कांहीं उघड दिसण्यासारखीं कारणें आहेत तीं दाखल करतों.

४. प्रस्तुत गुण हल्लींच्या काळीं आमच्या देशांत कितीसा असण्याचा संभव आहे याचाच नुसता जो अगोदर विचार करील त्यास कळून येणारें आहे कीं, सांप्रतची स्थिति त्याच्या उत्पत्तीस व वास्तव्यास अत्यंत प्रतिकूळ आहे. मागील दोन निबंधांत दाखविल्या-प्रमाणें राजदरबार किंवा देवालय हींच वक्तृत्वाचा प्रकाश होण्याचीं दोन मुख्य स्थानें होत. मग असें जर आहे तर हल्लींच्या देशस्थितींत वक्तृत्वाचा उदय कसा व्हावा! आमच्या देशचा राज्यकारभार आमच्या हातीं किती आहे हें कोणालाही सांगायाला नकोच;—आमच्या हातांत एक मात्र मोठें साधन सरकारानें ठेवलें आहे, तें आरडाओरड करणें इतकेंच काय तें होय! हें एक झालें. दुसरा विषय धर्माचा. यासंबंधानेंही मागील काळांत व आजच्या स्थितींत किती फरक आहे तो सर्वांस दिसतोच आहे. इंग्रेजी विद्येचा फैलावा होऊन नव्या ज्ञानाचा व कल्पनांचा चोहोंकडे प्रसार होत गेल्यानें, व ख्रिस्ती धर्माच्या निरनिराळ्या शाखा, शिवाय ब्रह्मसमाज,* प्रार्थनासमाज,§ आर्यसमाज,¶ सत्याला शोधणारी

* ब्रह्मसमाजः—संस्थापक राममोहन राय; शुद्धतर आध्यात्मिक धर्म स्थापण्याचे जे अनेक प्रयत्न (उपनिषदें, वेदान्त, योग, भागवत, पाशुपत, पंचरात्र, गीता, आधुनिक संतांचा भक्तिमार्ग वगैरे) आजवर झाले त्या परंपरेपैकींच एक नवा प्रयत्न हा होय. याप्रमाणेंच पुढें आर्यसमाज प्रार्थनासमाज हेहि स्थापन झाले. हे तीन्ही पंथ एकेश्वरवादी असून मूर्तिपूजेविरुद्ध आहेत. सर्वांवरच ख्रिस्ती संस्कृतीची थोडीफार छाया पडली आहे. राममोहन राय हे आरबी व फारशी शिकल्यामुळें त्यांचा मूर्तिपूजेवरचा विश्वास उडला व पंधराव्या वर्षी भांडून त्यांनीं बापाचें घर सोडलें. २० आगस्ट १८२८ रोजीं 'ब्रह्मसभा' स्थापली. तिचेंच नांव पुढें ब्रह्मसमाज ठेवलें. दर शनिवारीं रात्रीं ७ ते ९ ब्राह्मण आचार्य वेदमंत्र ह्मणत. विधवाविवाह, सती वगैरे कामें करून हे इंग्लंडांत गेले व तिकडेच वारले. १८३८ त देवेंद्रनाथ टागोरनीं तत्त्वबोधिनी सभा स्थापली. १८४१ मध्यें हे ब्रह्म-समाजास मिळाले. प्रथम वेद हेच या पंथाचा आधार मानले जात. पण वेदांच्या अर्थासंबंधीं मतभेद झाल्यानें मद्दाम वेदांचा अभ्यास करण्यास चार विद्यार्थी काशीस पाठविण्यांत आले. व अखेर परमेश्वरी ज्ञान होण्याचीं साधनें ह्मणजे निसर्ग व सहजज्ञान (Intuition) होत असें जाहीर करण्यांत आलें. १८५७ मध्यें अब्राह्मण केशवचंद्र सेन या समाजांत आला. त्यानें एक संगतसभा स्थापली. त्याचा परिणाम देवेंद्रावर होऊन ब्राह्मण नसतांहि त्यास मंत्रपठण करूं दिलें, इतकेंच नव्हे तर आचार्य नेमलें. देवेंद्रानें तर त्याच्या उपदेशाचा परिणाम होऊन जानवेंहि तोडून टाकलें. केशव-चंद्रानें हिंदुस्थानभर दौरा काढून शाखा स्थापल्या. हा परत आल्यावर भांडणें होऊन या समाजाचीं दोन शकलें झालीं. मूळचा आदि-ब्रह्मसमाज, नवा भारतवर्षीय ब्रह्मसमाज. भांडणामुळें केशवचंद्राला एकांत मिळून भक्तीचें महत्त्व कळलें, व २२-८-१८६९ रोजीं त्यानें आपल्या समाजाचें मंदिर

[पुढील्या पानावरील प्रार्थनासमाज§. आर्यसमाज¶. ह्या टिपा पाहा.]

मंडळी, देवाचा शोध लावणारी मंडळी ['Theistic Association'], अशा शेंकडों नव्या नव्या

उघडलें. पुढें तो विलायतला गेला. परत आल्यावर फिरून तंटे होऊन तिसरा साधारण समाज स्थापण्यांत आला. या पंथाला आपल्या प्रांताबाहेर (बंगाल) कांहीं करतां आलें नाहीं, इतकेंच नव्हे तर सुशिक्षित समाजापलीकडेही त्याचें कार्यक्षेत्र गेलें नाहीं. या पंथाचे अनुयायी साऱ्या हिंदुस्थानांत १९०१ सालीं फक्त ४०५० (सुमारें चार हजार) होते. 'सम्पादक'

§ प्रार्थना-समाजः—धार्मिक प्रश्नांची चर्चा करण्यासाठीं इ. स. १८४५ मध्यें मुंबईस 'गुप्त सभा' स्थापन झाली. १८४९ मध्यें परमहंस सभा धार्मिक व सामाजिक चर्चेकरितां आणि जातिबंधनें झुगारून देण्याकरितां अधिक मोठ्या प्रमाणावर निघाली. १८६० मध्यें या गौप्याचा स्फोट झाल्यानें सभा मोडली पण कल्पना कायमच असल्यामुळें मुंबईस केशवचंद्र सेन १८६४ मध्यें येऊन गेल्यावर या विचारांना फिरून चालना मिळाली. व १८६७ मध्यें पांडुरंगबंधु व परमानंद या तिघां उत्साही लोकांनीं प्रार्थना-समाज स्थापला. १८७० मध्यें न्या. रानडे आणि भांडारकर मिळेपर्यंत या समाजाला बुद्धिमान् पुढारी लाभले नाहींत. १८७४ मध्यें गिरगांवांतील इमारत बांधण्यांत आली. १८८२ मध्यें चंदावरकर येऊन मिळाले. १९०१ मध्यें न्या. रानडे वारल्यानंतर याचे मुंबईत चंदावरकर व पुण्यांत भांडारकर हे दोन मोठे पुरस्कर्ते होते. ब्रह्मसमाजाप्रमाणें या समाजाला संघटित प्रचारक-मंडळ नाहीं. विठ्ठल रामजी शिंदे व एस्. पी. केळकर यांसारखे निष्ठेनें व्यक्तिशः काम करणारे लोक आहेत. शिवाय नटराजन्, सुखटणकर, वेलिणकर यांनींहि बरेंच काम केलें आहे. पुणें, अहमदाबाद, खडकी, सातारा, कोल्हापूर येथें शाखा आहेत. प्रार्थना-समाजांत जात व मूर्तिपूजा टाकण्याची शपथ साधारण सभासदांकडून घेत नाहींत. पुनर्जन्म व वेदप्रामाण्य अमान्य असले तरी या पंथानें वेदांत, तुकाराम, नामदेव वगैरे भक्तिमार्गी साधूंचे अभंग वगैरे मान्य करून खिस्ती पंथाचीहि शिकवण पत्करली आहे. ज्या त्या ठिकाणच्या मातृभाषेंतून उपदेश चालतो. सुबोध-पत्रिका हें या पंथाचें मुखपत्र होय. हा समाज संख्येनें क्षीण असला तरी याला बरेंच महत्त्व आहे. १८८८ सालीं रानड्यांनीं राष्ट्रीय सामाजिक परिषद घडवून आणली व पुढें दरसाल हा पंथ त्या परिषदेंत उत्साहानें भाग घेत असतो. १९०६ मध्यें विठ्ठल रामजी शिंदे यांनीं 'डिप्रेस्ड् क्लासेस् मिशन्' काढलें व चंदावरकरांनीं मुंबईस 'सोशल् सर्व्हिस् लीग्' स्थापली. शिवाय पंढरपूर येथील अनाथ बालकाश्रम, Distressed Widows Refuge, या संस्था, आणि मुंबईस मुलें व स्त्रिया यांसाठीं दिवसाच्या शाळा व कामकऱ्यांसाठीं रात्रींच्या शाळा, व निराधार लोकांकरितां एक निवासगृह (Home for the Homeless) अशा या पंथाच्या अनेक संस्था अजूनहि काम करीत आहेत. 'सम्पादक'

¶ आर्यसमाजः—प्रमुख सिद्धांतः—

(१) ईश्वर सर्व ज्ञानाचें आदिकारण होय.

(२) तो सर्वज्ञ, सत्य, सर्वसुंदर, सर्वशक्तिमान्, अनाद्यनन्त, दयाळु, सर्वभूत, सर्वस्थित आहे.

(३) वेद म्हणजेच खरें ज्ञान.

(४) प्रत्येकानें अज्ञाननाशन व ज्ञानप्रसार करून वैयक्तिक कल्याणावरच न थांबतां सामाजिक कल्याणार्थ झटावें.

(५) ईश्वर, आत्मा (अगर आत्मे) आणि प्रकृति (Matter) यांस प्रत्येकीं स्वतंत्र अस्तित्व आहे, व तीन्हीहि अनंत आहेत.

[ पुढें चालू ]

पंथांनीं लोकांच्या मनाचें शतशः विदारण होऊन इसापनीतींतील *शंभर युक्तीवाल्या कोल्ह्या-प्रमाणें त्याची अवस्था होऊन गेली आहे. त्याच गोष्टीतील एकच युक्ति माहीत असणाऱ्या मांजराप्रमाणें यापूर्वीं जी या देशाची व पृथ्वीवरील इतर देशांचीही स्थिति होती तीच पुष्कळ अंशीं बरी असून प्रस्तुत गुणाच्या अभिवृद्धीस चांगली अनुकूळ होती. असो; तर याप्रमाणें वरील दोन्ही मोठमोठ्या विषयांस आपण अगदीं मुकलों आहों. आतां वरच्यांखेरीज दुसरे जे विद्येसंबंधीं विषय किंवा देशस्थितीच्या वगैरे संबंधें बोलणें, लोकांचा देशाभिमान जागृत करणें, हें आपणांस अनुकूळ आहे खरें; पण हे विषय अगदीं नवे निघाले असल्या-मुळें लोकांस अद्याप पुरते समजूंही लागले नाहींत. तसें होऊन वक्त्यांच्या व श्रोत्यांच्या हृदयांत ते पूर्णपणें बिंबण्यास अद्याप बराच काळ लोटला पाहिजे. तर हल्लींच्या काळीं विष-यांचा अभाव हें एक प्रस्तुत गुणास प्रतिबंधक आहे. हें एक झालें. दुसरें असें आहे कीं, वक्तृत्व हा गुण कांहीं सामान्य नव्हे. इतर सर्व मोठमोठ्या गुणांप्रमाणें हाही फार विरळ मनुष्यांत सांपडतो. शिवाय तो मूळचा अंगांत असून त्यास इतर जीं कित्येक साधनें लाग-तात त्या सर्वांच्या योगानें त्याचा कोणा मनुष्याचे ठायीं पूर्ण विकास होणें हें मोठेंच दुरा-पास्त आहे यांत संशय नाहीं. डिमॉस्थेनीसास प्रस्तुत गुणाची अत्यंत परिपूर्णता आपले ठायीं करून घेण्यास केवढा खटाटोप करावा लागला तें मागें§ अठराव्या अंकांत लिहिलेंच आहे; आणि आजपर्यंत ज्यांची प्रकृत गुणाच्या संबंधानें मोठी ख्याति झाली त्या सर्वांस वरच्यासारखेच अतिशयित श्रम करावे लागले. असो; मग असें जर आहे, तर ज्या आमच्या

(६) अद्भुत चमत्कार करण्याची शक्ति ( Miracle ) असंभाव्य मानली आहे. दर रविवारीं सकाळीं तीन चार तास प्रार्थना चालते. हा उत्तरहिंदुस्थानांतील धर्मपंथ होय. याचे एक लक्ष अनुयायी आहेत. मांसहारी व बिनमांसाहारी असा एक तंटा; आणि उच्च शिक्षणांत जुन्याला चिकटावें कीं, शास्त्रीय वगैरे नवीन शोधांच्या दृष्टीनें जावें असा दुसरा तंटा आहे. यामुळेंच जुन्या पंथाचें 'गुरुकुल' हरद्वार येथें व नवीन पद्धतीचें 'दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज' लाहोर येथें आहे. लाहोर हें या पंथाचें मुख्य केंद्र; अजमीरला दयानंद मेल्यामुळें तें दुय्यम केंद्र झालें आहे. 'सम्पादक'

* शंभर हा शब्द चुकीनें पडला असावा. वास्तविक ' हजार ' असा शब्द पाहिजे. हा उल्लेख Æsops Fables मधील साठाव्या गोष्टींतील आहे. त्या गोष्टीचा सारांश असा:—राज्यकारस्थाना-संबंधीं बोलत असतां संकटांतून निभावून जाण्याची एकच युक्ति माहीत असल्याचें कबूल करणाऱ्या बोक्याची हजार युक्त्या आपणास माहीत असल्याची घमेंड मारणारा कोल्हा कींव करून, ' ज्यानें त्यानें स्वतः पुरतें पाहण्याच्या ' त्या कालांत चार दोन युक्त्या बोक्याला शिकविण्याचें मनांत असतांहि नाइलाज झाल्यानें जाण्याकरितां पाऊल उचलतो तोंच शिकारी कुत्रे झडप घालतात. अल्पज्ञ एक युक्तिवाला बोका चटकन् झाडावर चढून प्राण वांचवितो. पण कोल्ह्याच्या हजार युक्त्यांच्या माहितीचा प्रसंगीं त्याला कांहींच उपयोग न होतां, कुत्र्यांनीं पकडल्यामुळें आपल्या साऱ्या युक्त्यांसह तो मृत्युमुखीं पडतो; ' तात्पर्य, ' शहाणपणाची घमेंड मारणाराच खरोखरी मूर्ख असतो. अल्प कां होईना पण असलेल्या ज्ञानाचें निरर्थक प्रदर्शन करून बडेजावी न सांगतां प्रसंग येतांच उपयोग करून दाखवावा. प्रसंगीं उपयोगीं पडेल तीच अक्कल खरी'. 'सम्पादक'

§ पृष्ठें २४७—२४८ पाहा. 'सम्पादक'

लोकांस वक्तृत्व ह्मणजे काय हें नुकतें कोठेंसें कळूं मात्र लागलें आहे त्यांच्यांत तो गुण हल्लीं कोणत्या पायरीला येऊन पोंचला असेल, व त्याची परीक्षा करणारे जे एकंदर लोक, त्यांचें ठायीं त्याविषयींची अभिज्ञता कितपत आली असेल हें सहजच दिसण्यासारखें आहे. पण हल्लींच्या आमच्या लोकांची ही एक मोठी मौज आहे कीं, 'बाळमित्रां'तील† महत्त्वाकांक्षी मुलांप्रमाणें त्यांस मोठेपणाचा आव घालण्याची मोठी हौस वाटते; कशास कांहीं ठिकाण नसतांही आपल्या अंगची योग्यता जी त्यांस कांहीं वाटत असते ती अतोनात! आलीकडे तीन चार वर्षांत तर जिकडे तिकडे अशी विलक्षण गडबड होऊन गेली आहे कीं, ज्याला त्याला असें वाटूं लागलें आहे कीं, हा आमचा देश एकदांचा परमोत्कर्षाच्या स्थितीस येऊन पोंचतो कसा! मग काय; कोणीं कलाकौशल्य हातीं घेतलें, कोणीं धर्माची सुधारणा करण्याचें पतकरलें, कोणीं नवे माग तयार करून म्यांचेस्टरबरोबर टक्कर मारण्याकरतां कंबर बांधली, कोणीं पाहिलें कीं, इंग्लंडची जी येवढी सुधारणा झाली आहे ती

---

†बार्किन् नामक महाविद्वान् ग्रंथकर्त्याच्या फ्रेंच भाषेतील ग्रंथाचें इंग्रेजींत भाषांतर झालें. व त्या इंग्रेजी भाषांतरावरून 'बाळमित्र' नांवाचा ग्रंथ कै. सदाशिव काशीनाथ छत्रे यांनीं मराठींत उतरला. मुलांना व्यवहारांतील अगदीं सोप्या विषयांवर व सोप्या भाषेंत गोष्टी सांगून 'रीति व नीति समजावून देणें, बुद्धि विवेकक्षम व हृदय कोमल बनविणें, मातापितरांच्या व भावंडांच्या ठायीं त्यांचें प्रेम व ईश्वराच्या ठायीं त्यांची भक्ति वाढविणें,' व हेंहि कार्य 'समजुतीस खोल, अभिरुचीस रुक्ष व उपदेशास कटु' न वाटेल अशा रीतीनें बजावणें हा ग्रंथाचा हेतु प्रस्तावनेंत दाखल केला आहे. आज हा ग्रंथ मागें पडून अनुपलब्ध असल्यानें प्रस्तुत महत्त्वाकांक्षी मुलांची गोष्ट थोडक्यांत खालीं देत आहों:—

आबाजीचीं मुलें कामू व आई यांना "कोणाच्या आज्ञेंत रहाणें नको म्हणजे मनास येईल तसें करावयास मिळेल" असें वाटून आपण मोठे व स्वतंत्र असतों तर फार बरें झालें असतें असें त्यांनीं बापास सांगितलें. तेव्हां बापानें दुसरे दिवशीं सकाळपासून त्यांस कंटाळा येईपर्यंत पूर्ण स्वातंत्र्य देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं प्रहर दिवस येईतों त्यांस कोणीं उठविलें नाहीं. इतका वेळ निजल्यानें त्यांच्या अंगांत आळस भरला. दुपारपर्यंत खेळांतील मतभेदांवरून बहीणभावंडांचीं भांडणें चाललींच होतीं. शेवटीं 'इच्छा असेल तर जेवा' असें बापानें सांगितल्यावर मुलें जेवावयास गेलीं. तेव्हां प्रथम 'फार खाऊं नका. प्रकृति बिघडेल' असें बाप ह्मणाला. पण लगेच स्वातंत्र्य दिल्याची आठवण होऊन त्यानें मुलांस वाटेल तें मनसोक्त खाण्याची परवानगी दिली. मुलांनींहि अधाशीपणानें बेसुमार खाऊन घेतलें. पुढें खेळतांना, बांधून ठेवलेली एक नाव झोंकवून पाहत असतां कामूचा झोंक जाऊन तो पडूं लागला; आई त्यास धरावयास गेली तों दोघेहि पाण्यांत पडलीं. बापानें लगेच धांवत जाऊन त्यांस बाहेर काढलें. पण तीं अपघातानें अर्धमेलीं झालीं होतीं. अधाशीपणानें खालेलें अन्न न पचल्यामुळें त्यांस रात्रीं झोंपहि लागली नाहीं. अशा रीतीनें भली खोड मोडल्यामुळें स्वातंत्र्य व मोठेपणा नाकारून फिरून हितचिंतक बापाच्या ताब्यांत राहण्यास तीं कबूल झालीं. हक्क वापरण्यास देखील लायकी लागते व ती येईतों एकाद्या हितचिंतकाच्या देखरेखीखालीं राहणें अपरिहार्य आहे हें आढळून आल्यामुळें त्यांची महत्त्वाकांक्षा जिरून गेली व त्यापुढें 'स्वातंत्र्य देऊं कां?' हे शब्द 'बंदिखान्यांत टाकूं कां?' या शब्दांपेक्षांहि त्या मुलांस जास्त भीतिदायक वाटूं लागले. 'सम्पादक'

केवळ वक्तृत्वामुळें झाली आहे, तेव्हां 'वक्त्यांचे वर्ग' सुरू करूं या![1] याप्रमाणें देशसुधारणुकेच्या एकेक खांबानें एकेक काम तेव्हांच पतकरलें; पण तें होणें शक्य तरी आहे कीं नाहीं, किंवा निदान आपलें सामर्थ्य तरी कितपत आहे, याचा विचार एकानेंही क्षणमात्र सुद्धां केला नाहीं. असें असल्यावर वरील सर्व कामाची जी स्थिति आज दृष्टीस पडत आहे तशी असल्यास नवल काय! दरवाज्याच्या फळीवर नांव काय—'कौशल्यशिक्षक मंडळी'! आणि आंत जाऊन पाहावें तों वरील नांवाच्या अक्षरांच्या निम्म्यानेंही आंत शिकणारी मंडळी नाहीं, आणि येवढें कौशल्य तरी कोणतें ह्मणाल तर ज्यास तें नांव देणें वरील मंडळींशिवाय कोणासही समंजस वाटणार नाहीं. वरील मंडळींच्या शेजारींच दुसरी एक मंडळी आहे. पहिलीचा उद्देश जसा लोकांचें ऐहिक हित करण्याचा आहे तसा दुसरीचा लोकांस स्वर्गाचें दार मोकळें करून देण्याचा आहे. या मंडळीच्या शाखा आमच्या देशांत बऱ्याच ठिकाणीं पसरलेल्या आहेत; आणि या भक्तमंडळींची अशी उमेद आहे कीं, यापुढें साऱ्या पृथ्वीवर जर एकादा धर्म पसरणें असेल तर तो आमचाच पसरेल यांत संशय नाहीं. हें यांचें भाकीत पुढें कितपतसें प्रत्ययास येईल तें येवो; पण वरील मंडळीची सध्यांची जर स्थिति पाहिली, तर इतर लोकांत व यांच्यात कोणत्याही संबंधें लवमात्रही फरक नजरेस येईल असें आह्मांस वाटत नाहीं. मनुष्यमात्रांत संचार करणाऱ्या सहा रिपूंचें प्राबल्य इतरांत जसें आढळतें त्याहून वरच्या सद्धर्मपालक मंडळींत कमी आढळतें असें नाहीं; किंवा वरील मंडळींत कोणी मूळचा दुष्ट असतां डोळे मिटल्यानें, गायन केल्यानें, किंवा जगाची पापमग्नता पाहून मोठ्या सद्गदित अंतःकरणानें प्रसंगविशेषीं अश्रु ढाळल्यानें मोठा सज्जन झाला असेंही पण थोडेंच आढळेल. याप्रमाणेंच इतरही सर्व लौकिक कृत्यांची स्थिति आहे. कोणतेंही काम ह्मणजे आह्मीं हातीं घेतलें, आणि त्यांत

---

१. ही अत्यंत सयुक्तिक कल्पना देशकल्याणाच्या कामांत, वक्तृत्वांत, व शहाणपणांत आपणास पुढारी मानणाऱ्या अशा येथील एका गृहस्थाची आहे. वरील 'वर्ग' स्थापन करून देशकल्याण केल्याचें श्रेय घेण्याविषयीं त्यानें कित्येकांस सांगून पाहिलें; पण त्याचा उपदेश त्यांपैकीं कोणाच्याही हृदयांत यथास्थित न उतरल्यामुळें त्याची मनीषा अद्याप पूर्ण झाली नाहीं. ती परमेश्वरकृपेनें कधीं सिद्धीस जाईल ती जावो! एका नकल्या गृहस्थानें तर वरील पंडितांच्या तोंडून वक्तृत्वाचें माहात्म्य वरचेवर ऐकण्यास कंटाळून येथील 'ज्ञानप्रकाशांत छालेवेच्या*' गोळ्यांच्या वाटणीवर एक पत्र लिहून त्यांचा स्पष्टपणें उपहासच केला. तो आमचे येथील वाचक तरी निदान विसरून गेले नसतील असें वाटतें. असो; एकंदरींत वरील गोळी सदर्हू गृहस्थाच्या वक्तृत्वविकारावर बरीच शामक झाली!

* हॉलोवेच्या गोळ्याः—Thomas Holloway. (१८००–'८८३.) पेटंट इंग्रेजी औषधें करणारा. अठ्ठावीस वर्षांचा होईपर्यंत हा बापाचें रोटीचें दुकान चालवीत असे. पुढें लंडन्मध्यें Felix Albinolo या इटॅलियन् गृहस्थाशीं मैत्री करून मलमाची कल्पना त्याजकडून घेतली, मलमामागून गोळ्या काढल्या, व जाहिरातींचा नुसता पाऊस पाडून जगभर यानें नांव कमावलें. पहिली जाहिरात १५ आक्टोबर १८३७ मध्यें प्रसिद्ध झाली. जाहिरातीचा खर्च वाढतां वाढतां मृत्युकाळीं सालीना पन्नास हजार पौंड (साडेसात लाख रुपये) झाला. स्त्रियांचें कॉलेज व आरोग्यभुवन यांस पंधरा कोटि रुपये धर्मादाय देऊन यानें आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे. 'सम्पादक'

आमची फजिती झाली नाहीं, असें एकही आढळणार नाहीं. पण आमची धांव केवढी ! ल्यूथरानें युरोपांत धर्मक्रांति केली, त्याप्रमाणें इकडे नवा धर्म उत्पन्न करायाचा; तिकडे मोठमोठ्या व्यापाराच्या मंडळ्या आहेत तोच मासला इकडे उचलून देशाची नष्ट झालेली संपत्ति पुनः माघारीं आणायाची; युरोपांत तीन मोठमोठ्या कवींनी§ आपआपल्या भाषेत जगत्प्रसिद्ध अशीं वीररसप्रधान काव्यें रचून अक्षय भूषण आणलें, तसाच प्रकार इकडे मराठींत उतरून दाखवायाचा; फार तर काय, पण ज्या आह्मांस मोठमोठ्या प्रचंड विद्वानांपासून तों अगदीं शाळेंतील मुलांपर्यंत महिन्यापंधरा दिवसांनीं भरणारी सभा किंवा मासिक, त्रैमासिक वगैरे पुस्तक हेंही सतत चालवण्याचें सामर्थ्य नाहीं, खाजगी शाळा घातल्या तर त्यांत पहिल्या प्रतीची अंदाधुंदी, ज्या आह्मांस धर्मविषयक वादानें दुफळी पडली असतां, सरकारच्या घरापर्यंत तें भांडण गेल्याखेरीज तंटा मिटतच नाहीं, वक्तृत्वोत्तेजक सभेसारखा छोटासा समारंभ,—पण तोही चार वर्षे सुरळीत चालून सर्वांस आचंबा जों वाटूं लागतो आहे तोंच त्यास दृष्ट पडून पांचव्या वर्षी असा जबरदस्त कहर उसळावा कीं, सभेच्या पुनर्जन्माचीच वेळ आलीशी सर्वांस वाटावी, आणि चार दिवसांत चार बेत होऊन बखेडा कोणासही मोडतां येऊं नये—तेच आह्मी लोक खुद्द ऐरिश् व स्कॉच् यांसही मोठ्या मिनतवारीनें जो प्राप्त झाला, व अमेरिकन् लोकांनी युद्ध करण्यास कंबरा बांधल्या असतांही जो त्यांस प्राप्त झाला नाहीं, तो पार्लमेंट् सभेंत बसण्याचा हक्क मागतों; तेव्हां आमची केवढी थोरें बहादुरी ! असो; एकंदरींत आपलें बळाबळ न जाणतां हव्या त्या अचाट उद्योगास हात घालण्याची जी विलक्षण हौस आपल्या आलीकडच्या लोकांत दृष्टीस पडते तिजपासून देशाचें फार नुकसान होत आहे. तें असें कीं, एक तर देशाचा अपकीर्ति होऊन आरंभशूरपणा, कोती बुद्धि, कमनिश्चयीपणा, वगैरे आपले गुण मात्र चोहोंकडे प्रसिद्ध होताहेत; व त्यामुळें आमचें स्वतःचेंच धैर्य खचून पुढें कोणतेंही कार्य हातीं घेण्याविषयीं मनास तादृश उत्साह वाटत नाहीं. दुसरें असें कीं, वरच्यासारख्या दुर्घट कार्याकडेच लोकांची बुद्धि खर्चली गेल्यामुळें होण्यासारखे जे दुसरे उद्योग आहेत तेही घडत नाहींत. तर याप्रमाणें मोठालीं कामें आमच्या दुर्बलपणानें आह्मांस झेंपत नाहींत, आणि जीं वरच्याहून लहान पण होण्यासारखीं आहेत तीं आमच्या अहंपणामुळें आह्मांस तुच्छ वाटून आह्मी तिरस्कारानें लोटून देतों !

---

§ १ ग्रीक् महाकवि 'होमर्' (ख्रिस्तपूर्व ८५० सुमारें) 'इलियड्' व 'ऑडिसी' या महाकाव्यांचा कर्ता.

२ रोमन् महाकवि 'व्हर्जिल्' (खि. पू. ७० ते खि. पू. १९) 'एनीड्' (Æneid) चा कर्ता.

३ इटॅलिअन् महाकवि 'ॲरिओस्टो' [Ariosto १४७४–१५३३] Orlando Furioso 'ऑर्लॅंडो फ्यूरिओसो'चा कर्ता.

या तिघांशिवाय Jerusallem Delivered चा कर्ता इटॅलिअन् कवि 'टासो' [Tasso. १५४४–१५९५].

आणि Paradise Lost पॅरॅडाइज् लॉस्ट् चा कर्ता इंग्रेज कवि मिल्टन् [Milton १६०८–७४] या दोघांचीहि महाकवींत गणना होते. 'सम्पादक'

आमच्या देशाचें सर्व प्रकारें हित करून त्यास सुधारणुकेच्या मार्गास लावण्याचें काम ज्यांनीं पतकरलें आहे, किंवा निदान लौकिकांत तसा आव तरी जे घालतात, त्यांची इतर गोष्टींच्या संबंधानें जी वर स्थिति सांगितली आहे तीच प्रस्तुत विषयाविषयींही लागू पडते. ह्मणजे येथील वक्त्यांच्या डौलांत किंवा त्यांच्या अनभिज्ञ श्रोत्यांच्या वाखाणणींत जरी कांहीं कमी नाहीं, तरी दुसऱ्या प्रत्येक गोष्टीच्या संबंधें आमची सध्यांची स्थिति जशी निकृष्टतेची आहे तशीच या संबंधेंही ती वस्तुतः पाहतां आहे. ह्मणजे युरोपांतील देशाभिमानी पुरुषांत आणि येथच्यांत जितकें अंतर, तिकडील कलाकौशल्याच्या सभांत आणि इकडील वर सांगितल्यासारख्या कौशल्यशिक्षक मंडळींत जी तफावत, तिकडील ×ल्यूथर् आणि इकडचे नुकते पुण्यांत गाजलेले ¶श्रीमद्दयानंद यांत जो भेद, तोच तिकडील वक्त्यांत आणि इकडच्या वक्त्यांत आढळेल. आतां या वरील लिहिण्यानें आह्मी आमच्या लोकांस नुसतें दूषण बळेंच लावतों, किंवा प्रस्तुत गुणाचा इकडे जो प्रचार होऊं लागला आहे त्याची वास्तविक जितकी

१. 'स्वदेशाभिमान' 'लोककल्याण' वगैरे शब्द आपल्या एतद्देशीय भाषांत जसे अद्याप रुजले नाहींत, त्याप्रमाणेंच तद्व्यंग्य जो अर्थ तोही लोक अजून चांगलासा समजूं लागले नाहींत असें जें प्रस्तुत अंकांत वर ह्मटलें आहे त्याचें एक उत्कृष्ट उदाहरण नुकतें घडून आलें आहे. तें अत्यंत समर्पक असतांही येथें स्पष्ट दाखल करण्यास आमचें मन घेत नाहीं. यास्तव इतकेंच दिग्दर्शन करतों कीं, जे वडे वक्ते गेल्या सालीं येथें जागोजाग मोठी मानमान्यता पावले; 'आर्यजननी' 'स्वदेशमाता,' 'देशबांधवहो' वगैरे यथेष्ट पोपटपंची करून जे चार चार हात उंच उडत असत; ते नुकतेच बाहेरी-ससाण्याची भरारी पुण्यावर घालण्यास आले होते! पण इतकें बरें झालें कीं, त्यांच्या गर्वांत एकादें भोळसर भक्ष्य सांपडण्याच्या पूर्वींच त्यांची झांप ओळखली जाऊन चंचुघाताखेरीज त्यांस दुसरा कांहीं लाभ झाला नाहीं!

× लूथरः—मार्टिन् लूथर् (१४८३–१५४६) प्रख्यात जर्मन् सुधारक. विटन्बर्ग् युनिव्हर्सिटींत वेदांताचा प्रोफेसर् होता. १५१७ पर्यंत कट्टा रोमन् कॅथॉलिक् होता. इंडल्जन्सेसची (पापाच्या शिक्षेचें माफीपत्र) सर्रास विक्री पोपकडून सुरू होतांच याचें पित्त खवळलें, व त्यानें उघड हल्ला चढविला. या त्याच्या टीकेबद्दल त्याच्यावर बहिष्कार घालून १५२१ मध्यें वर्म्सच्या डाएट् (Diet of Worms) –विद्वज्जनसभे–पुढें त्याला बोलावलें. तेथें त्यानें संस्मरणीय भाषण आत्मसमर्थनार्थ केलें. नंतर त्यानें कॅथॉलिक् चर्चशीं संबंध सोडला, व सुधारलेल्या धर्माचा उपदेश सुरू केला. व त्याच्या हयातींतच त्याच्या या मताचा ( Reformation ) खूप प्रसार झाला. 'सम्पादक'

¶श्रीमद्दयानन्दः—आर्यसमाज–संस्थापक दयानंद सरस्वती. जन्म काठेवाडांत मोरवी येथें. मूळचें नांव मूळ शंकर. एका कडकडीत शैवाचा मुलगा. शैव पंथांत प्रवेश करण्याचें वेळीं शिवमूर्तीवरून उंदीर धांवतांना पाहून मूर्तिपूजेचें वैयर्थ्य पटून यानें तद्विरुद्ध बंड केलें; बहीण मरतांच दुःखातिरेकानें संसार-त्यागाचा व मोक्षसाधनाचा निश्चय केला. एकविसाव्या वर्षी बापानें याचें लग्न करण्याचा निश्चय करतांच ही सव्वा मणाची बेडी तोडून टाकण्याकरितां यानें घरांतून पलायन केलें. अठरा वर्षें फकिरी वृत्तीनें भिक्षा मागून पर्यटण केलें. प्रथम वेदांताचा पगडा बसला. पण पुढें त्याला जीव-शिवांचें ऐक्य पटलें. स्वामी विरजानन्द या आंधळ्या वैदिक पंडितानें याच्यावर फार परिणाम केला. १८६३ ते ८३ पर्यंत सार्वजनिक आयुःक्रम; सर्व हिंदुस्थानभर व्याख्यानें देत फिरला. हा फक्त संस्कृतमधून बोलत असे. शरीर भव्य आणि धिप्पाड व उंच होतें. यानें १८७५ साला १० एप्रिल रोजीं

( पुढें चालू )

योग्यता आज दृष्टीस पडत आहे तितकीही आह्मी ओळखीत नाहीं असें नाहीं. वरील आमच्या लिहिण्याचा आशय इतकाच आहे कीं, वक्तृत्वाची आलीकडील नवी तऱ्हा इकडे नुकतीच सुरू झाली असल्यामुळें ती अद्याप बाल्यावस्थेंतच आहे; आणि तिची आज इतकीच मजल येऊन पोंचली आहे यांत कांहीं आश्चर्यही नाहीं. पण हें न समजतां वक्तृत्वाच्या शिखराला आजच आमचा हात लागला असें जे समजतात त्यांच्या असमंजसपणाचा उपहास केल्यावांचून कोणीही खरा ज्ञाता राहणार नाहीं !

५. तर एकंदरींत पाहतां हल्लीं वक्तृत्वकलेची आपल्या देशांत केवळ बाल्यावस्था आहे. पण सुमारें दहा वीस वर्षांपूर्वीं जी स्थिति होती तिशीं ताडून पाहिलें असतां आजचें पाऊलही बरेंच पुढें आहे असें ह्मणावें लागेल. यास कारण इतक्या कालांत जी विद्यावृद्धि झाली ही एक मुख्यत: आहेच; आणि याशिवाय वक्तृत्वोत्तेजक वगैरे सभा चोहोंकडे सुरू झाल्या आहेत हें दुसरें होय. या सभांचा हल्लीं बराच चोहोंकडे फैलावा होत चालला आहे; यास्तव त्यांच्या संबंधें थोडेंबहुत लिहिणें येथें इष्ट होय.

६. ही सभा प्रथमत: मुंबईस सुमारें आठ नऊ वर्षांपूर्वीं सुरू झाली. मग तेथून पुणें, सातारा, नगर वगैरे ठिकाणींही तिची स्थापना होत गेली. पुण्यास गेल्या समारंभासकट तिचे पांच समारंभ एकंदर झाले; आणि एकंदरीनें पाहतां या सभेचें तेज पुण्यास जसें पडलें, तसें इतर कोणत्याही ठिकाणीं पडलें नाहीं, व अद्यापही पडत नाहीं. जेथें तिची मूळ स्थापना झाली तेथें तर ती आज बरेच दिवस क्षयाच्या पंथास लागत जाऊन गेल्या वर्षीं तर मजल येथवर येऊन टेंकली होती कीं, सभेनें वक्तृत्वाचा विषयच 'आपल्या लोकांचा आरंभशूरपणा आणि तो नाहींसा होण्यास उपाय' असा कांहीं एक नेमला होता. असो; पुण्याच्या समारंभास तरी दृष्ट लागण्याचा समय नुकता येत आहे तोंच गेल्या खेपेस त्यावर केवढें अरिष्ट आलें होतें, व तें कितपतसें टळलें आहे, हें येथील सर्व लोकांस माहीत आहेच; व त्याच्या संबंधानें थोडासा उल्लेख आह्मीं वर केलाच आहे. असो; ही सदरील सभांची थोडीशी हकीकत झाली. आतां त्यांचे मूळचे उद्देश काय आहेत, व ते गेल्या काळांत कितपतसे सिद्धीस गेले, वगैरेविषयीं थोडेंसें लिहूं.

या सभांचा उद्देश त्यांच्या नांवावरून स्पष्टच आहे कीं, आपल्या देशांतील लोकांत वक्तृत्व हा गुण अगदीं नाहीं, तर तो उत्पन्न करायाचा;—ह्मणजे ज्या कोणांच्या अंगीं तो

---

मुंबईस आर्यसमाजाची प्राणप्रतिष्ठा केली. १८७७ मध्यें दिल्ली दरबारला गेल्या वेळीं पंजाबांतून निमंत्रण आलें. १८७८–८१ तीन वर्षें आर्यसमाज व थिऑसॉफिकल् सोसायटी यांनीं एकत्र काम केलें. प्रार्थना व ब्रह्म या समाजांच्या पुढाऱ्यांशीं बोलणें करून सर्वांचें एकमत करून सर्वांचा एकच आर्यसमाज स्थापण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. रजपुतान्यांत १८८२–८३ सालीं दौरा काढून जोधपूरच्या राजाची एका नायकिणीच्या नादीं लागल्याबद्दल सणसणीत निर्भर्त्सना केली. या कामगिरीबद्दल याला रजपुतान्याचा 'जॉन् दि बॅप्टिस्ट्' म्हणण्यास हरकत नाहीं. नंतर तो अतिशय आजारी पडून ( कित्येकांना अशी शंका आहे कीं, त्याला अन्नांतून विष घालण्यांत आलें होतें. ) अजमीर येथें ३० आक्टोबर १८८३ रोजीं वारला. मूर्तिपूजेच्या पुरस्कर्त्यांना देण्याची याची फार आवडती शिवी 'महामूर्ख' ही होय. 'सम्पादक'

वसत असेल त्यांस अशा सभांमुळें तो प्रगट करण्याचा प्रसंग आणून तो त्यांच्या ठायीं वृद्धिंगत करायाचा. हा उद्देश अर्थातच अत्यंत स्तुत्य व अत्यंत इष्ट होय. पण उद्देशाची तारीफ केल्यानें उद्योगाची तारीफ नेहेमी होतेच असें नाहीं. उद्देश चांगला असणें हें एक निराळें; आणि तो शक्य असणें ह्मणजे आपल्या किंवा कोणाच्याही हातून तो सिद्धीस जाण्यासारखा असणें, हें एक निराळें. आतां वरील उद्योगाच्या विषयीं वरील संबंधानें जर विचार केला,—ह्मणजे देशांत वक्ते उत्पन्न होणें हें कितीही इष्ट असलें तरी प्रस्तुत सभांनीं तो उद्देश कितीसा सिद्धीस जाणारा आहे हें जर पाहिलें, तर आमच्या कित्येक वर्षांच्या अनुभवावरून सर्वांच्या सहज लक्षांत येईल कीं तो मूळ संकल्पाप्रमाणें सिद्धीस जाण्याचा रंग अद्याप तर ह्मणण्यासारखा कांहींच दिसत नाहीं. येवढें खरें कीं, कांहीं काळापूर्वीं मोठ्या सभेंत उभें राहून वेडेवांकडे कांहीं चार शब्द जरी बोलले तरी तेवढ्यावरूनही त्या बोलणाराच्या सभाधीटपणाची व वक्तृत्वाची जशी तारीफ होत असे तशी आतां होत नाहीं. तसेंच प्रसंगविशेषीं केवळ तात्कालिक स्फूर्तीनेंही थोडेंबहुत भाषण करण्याची शक्तिही लोकांत कांहींशीं आली आहे. आणि एकंदरींत बऱ्याच लोकांस अमुक भाषण बरें झालें आणि अमुक वाईट झालें इतकें साहजिक रीतीनें आपोआप समजण्याचेंही तारतम्य आलें आहे. हें इतकें फळ वरील सभांचे प्रसंग जागोजाग व वेळोवेळ झाल्याचें होय. पण याच्या पलीकडे अजून कोणतीच सिद्धि झाली नाहीं. प्रस्तुत वार्षिक समारंभाच्या वेळीं जीं भाषणें होतात तीं बहुधां सारीं महिना महिना अगोदर घोकंपट्टी करून पाठ करून टाकलेलीं असतात;[१] आणि त्यांतलींही बरींच वक्त्याचीं स्वतःचीं नसून दुसऱ्यांनीं तयार करून दिलेलीं असतात. आतां हें खरें कीं, वरील भाषणें घोकीव असोत, किंबहुना दुसऱ्यानें रचून दिलेलींही असोत; सभेपुढें तीं बोलणारानें आपलें काम जर चांगल्या रीतीनें बजावलें, तर सभेस तेवढेंही बस आहे. पण तसाही प्रकार आजच्या स्थितीस दृष्टीस पडत नाहीं. वक्ता सभास्थानीं येऊन उभा राहिल्याबरोबर आपल्या संथेस जो आरंभ करतो, तो ती संपल्याखेरीज मधें ह्मणून बिलकुल थांबत नाहीं. कोणत्याही प्रसंगीं कोणी मनुष्य दुसऱ्याशीं जो बोलतो तो नाटकांतील पात्राप्रमाणें तोंडपाठ केलेलें बोलणें कधींही बोलत नसतो हें वरील

---

१. सालमजकुरीं येथें जो वक्तृत्वाचा समारंभ झाला त्यांत दोन दिवस नुसती वेडाळी चालली असतां वरील गोष्ट चांगली प्रत्ययास आली. वरील प्रसंगीं दोहीं पक्षांकडील लोकांचीं व तिऱ्हाइतांचीं जीं कांहीं भाषणें झालीं त्यांतील कित्येकांत प्रस्तुत सभेच्या उद्योगाची जितकी कृतार्थता दृष्टीस पडली तितकी गेल्या पांच वर्षांत झालेल्या नकली भाषणांपैकीं एकानेंही झाली नाहीं असें आह्मांस वाटतें! उघडच आहे कीं, चिंधी पेटवून आणून आणि फांकूं करून मोठया केलेल्या जाळापेक्षां चकमक उडून निघालेल्या लहान ठिणगीचीही जास्त योग्यता आहे!

२. वरील प्रकार बहुतेक भाषणांचा जो अस्खलित ओघ चालत असतो त्यावरून तर दिसतोच; पण कित्येकांची जी भरधांव डाक चालत असते तीवरून तर तो अगदींच स्पष्ट होतो. या दुसऱ्या तऱ्हेची एकादे वेळेस अशी गंमत होते कीं एकाएकीं मधेंच गाडी थांबून ती कांहीं केल्या पुढें चालेनाशीच होते. मग पुनः पहिल्यापासून पाठ ह्मणावा लागतो; किंवा टाळ्यांच्या गजरांत पडद्यांत निष्क्रमण करावें लागतें!

लोकांच्या लक्षांत येत नाहीं. त्याप्रमाणेंच कोणत्या प्रसंगाला कोणतें भाषण उचित, कोणतें अप्रयोजक, याचाही सुमार न राहून समयविशेषीं भरकटणारेही पुष्कळ. तेव्हां एकंदरींत घरून तयार करून आणलेलें जरी भाषण असलें तरी तें सावकाश व साहजिक रीतीनें बोलून दाखवून पाठ केल्याचें चिन्ह अगदीं न दाखवणें हें फार करून कोणासही साधत नाहीं. आणि त्या त्या विवक्षित भाषणांत जी जी मनोवृत्ति श्रोत्यांच्या हृदयांत पूर्ण उत्पन्न व्हावयाची असते तिचा आविर्भाव वक्त्याच्या भाषणांतच अगोदर चांगला आला नसल्यामुळें व अंगविक्षेपादिकांवरूनही त्यास तो बाहेर पुरतेपणीं उमटवतां न आल्यामुळें श्रोत्यांच्या हृदयास तर तो विकार फारच थोडा होतो, किंबहुना मुळींच होत नाहीं, हें उघड आहे. असो; तर प्रस्तुत सभेपुढें वक्ते जीं भाषणें करतात त्यांत वरील दोष बरेच आढळतात.

७. वरील लिहिण्यावरून वक्तृत्वोत्तेजक सभांची सध्यांची स्थिति कांहीं लक्षांत येईल. आतां त्यांपासून त्यांचे स्थापक व एकंदर दुसरे लोक ज्या कार्याची अपेक्षा करतात त्याविषयीं कांहीं थोडेसें लिहिणें येथें अवश्य वाटतें. या सभांची अलीकडे उत्पत्ति जी झाली ती कशी झाली हें पुष्कळांस अवगत असेलच. सुमारें आठ दहा वर्षांपासून आमच्या लोकांचें देशस्थितीकडे विशेष लक्ष लागत चाललें आहे. हिंदुस्थानास हल्लीं जी अवस्था प्राप्त झाली आहे तिचीं कारणें काय, ती चांगली होण्यास उपाय कोणते, वगैरे अत्यंत गहन विषयांविषयीं बड्या बड्या विद्वानांपासून तों लहानसान पोरांसोरांपर्यंत सर्वांचे विचार चालू आहेत. कित्येकांस तर वरील विचारांवांचून रात्रंदिवस चैन पडत नाहीं. ‘ लोककल्याण, ’ ‘ हिंदुस्थानची स्थिति ’ वगैरे शब्दांची त्यांनीं जणों काय जपमाळच घेतली आहे! असो; तर याप्रमाणें या ‘ आर्यजननी ’ च्या उद्धारार्थ हजारों जणांच्या हजारों ज्या युक्तिप्रयुक्ति निघाल्या त्यांत कित्येकांची मनोदेवता अशी वाहिली कीं, वक्तृत्वगुणाखेरीज सर्व व्यर्थ होय. आज युरोपांतील देशांची येवढी भरभर जी चालली आहे ती सगळी वाक्चातुर्याच्या जोरावर. तेव्हां कसेंही करून ही अमोलिक चीज आपल्या हातांत आली पाहिजे. ती एकदां आली कीं, मग सगळे लोक आपल्या मुठींत, सगळा हिंदुस्थान आपला! कोणतेंही देशहिताचें काम असो; तें एका वक्त्याकडे सोंपवून देऊन त्याच्या मनोवेधक भाषणानें लोकांचीं मनें वळवलीं कीं, झालें काम फत्ते! सारांश, ज्याप्रमाणें प्राचीन इतिहासांत डिमॉस्थेनीस् किंवा सिसरो यांच्या भाषणांचा अद्भुत प्रभाव दृष्टीस पडतो, तशीच मजा इकडेही उठवून देण्याचा पुष्कळांनीं संकल्प केला. या संकल्पास अनुसरून मुंबई, पुणें, वगैरे ठिकाणीं वक्तृत्वाचे समाज अगोदर स्थापले जाऊन मग त्यांचा इतर जागीं फैलावा झाला. असो; येथवर ठीक झालें. पण येवढ्या केलेल्या उद्योगाचीं फळें जों पुढें पाहिलीं तों तीं भलतींच दृष्टीं पडूं लागलीं. वक्तृत्वसभांच्या स्थापकांचा मूळचा उद्देश काय कीं, आह्मी जे वक्ते तयार करूं, त्यांनीं मग पुढें आमच्या उपयोगी पडावें. ठीकच; जर पन्नास साठ रुपयांचें एक दोन वेळां बक्षीस देऊन कोणाची वक्तृत्वशक्ति त्यांनीं उदयास आणली, तर तो उपकार स्मरून त्या वक्त्यांनीं स्वशक्त्यनुसार आपल्या धन्यांची थोडीशी तरी सेवा करावी हें अगदीं रास्त आहे. पण येवढी कृतज्ञत्वबुद्धि हल्लींच्या काळीं मनुष्यांत राहिली आहे कोठें? वरील वक्ते सभे-

पासून तेवढें बक्षीस उपटून जे नाहीसे होतात ते मग लोकांपुढें कधींही येत नाहींत. संपादन करून दिलेल्या वाक्पटुत्वाच्या गुणानें लोकांत जो त्यांनीं ज्ञानप्रसार करावयाचा तो करण्याचें त्यांच्या कधीं स्वप्नींही येत नाहीं. हा त्यांच्या लबाडीचा प्रकार पाहून कित्येक सभास्थापकांनीं अशी हिकमत काढली होती कीं, जे जे वक्ते सभेपुढे पसंत होतील, त्यांकडून बक्षीस देण्यापूर्वीं असा करार करून घ्यावा कीं, आम्ही दर वर्षास निदान एक दोन तरी व्याख्यानें देऊन प्रस्तुत सभेची कामगिरी बजावीत जाऊं; पण ही सक्ती कशी चालवावी याची पंचाईत पडून सरतेशेवटीं तो बेत रहित झाला. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत सभेचा मुख्य जो उद्देश कीं, वक्तृत्वाचें पीक येऊन एकंदर देशास उपयोग व्हावा, तो सरासरी अगदीं फसलाच !

८. वरील कलमांत प्रस्तुत सभांविषयीं उपहासरीत्या जो आम्हीं मजकूर लिहिला आहे तो आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् आवडणार नाहीं; व वक्तृत्वाचें वेड डोक्यांत शिरून उठतां बसतां त्यावांचून ज्यांत दुसरें कांहीं सुचतच नाहीं त्यांस तर आपला उपमर्द केलासाही कदाचित् वाटेल. पण आपल्या बुद्धीस जें वाटतें तें मोकळ्या मनानें जो बोलूं जाईल त्यास अशा प्रसंगास भिऊन उपयोग नाहीं. जें त्यास वाटेल तें त्यानें स्पष्टपणें खुशाल बोलून दाखवलें पाहिजे. तर याच आमच्या कृतसंकल्पास अनुसरून प्रस्तुत सभांविषयीं आम्हीं आपलें असें मत प्रदर्शित करतों कीं, त्या न चालाव्या असें जरी आमचें म्हणणें नाहीं,–किंबहुना त्यांपासून झालेला व पुढें होणारा फायदाही आम्ही वर दाखवला आहे,–तरी त्यांपासून मोठमोठ्या कार्यांची जे अपेक्षा करतात त्यांच्या असमंजसपणाचें हसूं आल्यावांचून राहत नाहीं. सध्या आमच्यांत देशकल्याणाच्या कामांत पुढारीपणानें वागणाऱ्या लोकांत पुष्कळ जण असे आहेत कीं, ज्यांस आपण काय करतों आहों, आपल्या उद्योगाचा परिणाम काय होईल, याविषयीं बिलकुल पोच नसतो. प्रायः लोकांत इकडे तिकडे मिरवण्याच्या इच्छेनें, व क्वचित् खरोखरीच लोकहितबुद्धीनें, प्रेरित होत्साते शेंकडों स्वदेशाभिमानी पुरुष हल्लीं चोहोंकडे वावरतांना दृष्टीस पडताहेत. पण यांतील बहुतेकांची स्थिति 'सॉक्रेटीसाच्या चरित्रां' तील ग्लाकोनामक ‡ पोंकळ्या सरदारासारखीच होय. त्या वाचेदार गृहस्थाच्या मी यंव करीन मी त्यंव करीन अशा वल्गना ऐकून सॉक्रेटीसानें एके

‡ ग्लाको—प्लेटोचा भाऊ—वीस वर्षांचा असतां, कर्तृत्व व अक्कल नसतांहि सरकारी कामें आपण करावीं हें वेड त्याच्या डोक्यांत इतकें पक्कें शिरलें कीं, कोणाच्यानेंहि तें सोडवेना. शेवटीं हें असाध्य काम सॉक्रेटीसानें केलें. हा गृहस्थ सोफिस्ट् पंडिताच्या हाताखालीं शिकून पटाईत झाला होता; व प्रतिष्ठा मिळविण्याची अनिवार इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली होती. सॉक्रेटीसानें आपल्या पद्धतीप्रमाणें लोकसत्ताक राज्यांतील कारभार चालविण्याच्या त्याच्या इच्छेची खूप प्रशंसा करून त्यामुळें मित्रकल्याण, कुलकीर्तिवर्धन, राज्य–विस्तार या गोष्टी करतां येऊन आथेन्स शहरांतच नव्हे तर साऱ्या ग्रीस देशभर त्याची कशी कीर्ति होईल याचें वर्णन करून त्यानें हा मासा पकडला. प्रतिष्ठेकरितां लोकोपयोगी कृत्यें करणें जरूर आहे; त्याकरितां जमाबंदी वाढवावी हें जरूर; म्हणूनच जमाबंदीची माहिती असणें अपरिहार्य अशा युक्तिपरंपरेनें जमाबंदीचा आकार, अज्ञात कारणानें एखाद्या खात्याचें उत्पन्न घटल्यास भर कशी घालावयाची

[ पुढें चालू ]

समयीं त्यास रस्त्यांत हटकून जसें फजीत केलें,[१] त्याप्रमाणेंच सध्यांच्या काळीं लोककल्याणाचें वारें अंगांत भरून यथेष्ट जल्पना करणाऱ्या कित्येकांस चांगलें बळकट औषध पोंचण्याची तजवीज होणें फारच जरूरीचें आहे. असो; प्रस्तुत विषयाच्या संबंधानें वरील लोकांच्या समजुतीविषयीं आह्मांस इतकेंच लिहावयाचें आहे कीं, त्यांनीं आपल्या उद्योगापासून होणाऱ्या कार्याचा जो आपल्या मनांत विभु रचला आहे तो 'आरबी गोष्टीं'तील अल्नास्कराच्या* मनोराज्याचेंच भावंड होय. किंबहुना 'वक्त्यांचे वर्ग' स्थापणाऱ्या व एका वक्तृत्वाच्या खांबावर सगळ्या देशाची वैभवरूप इमारत रचूं पाहणाऱ्या आमच्या शहाण्या देशबंधूंहून वरील मियासाहेबही बरे असें आह्मांस वाटतें. कारण त्यांनीं चुटक्याचें मांडव यथास्थित रचून खुद्द वजिराच्या लेकीवरही आपल्या नाजूक पायाचा प्रयोग जरी योजिला होता, तरी तो सोहळाही त्यांस केवळ अशक्यच होता असें ह्मणतां येणार नाहीं. पण 'वक्त्यांच्या वर्गां'ची जी कांहीं कल्पना आहे तीस तोड नाहीं! आमच्या देशांत हल्लीं हें एक वेड भारी माजलें आहे कीं, कोणत्याही प्रकारची कोणास उणीव भासो, लागलीच फंड उभा करून त्याच्या 'उत्तेजना'स किंवा 'वर्धनास' आरंभ करावयाचा. हिंदुस्थानांतील प्रजा हल्लीं अशक्त होत चालली आहे काय? काढा 'बलवर्धक' सभा! देशास येवढी बुडवणूक जी आली आहे ती एकी नसल्यामुळेंच आली आहे;—असें आहे काय? कांहीं चिंता नाहीं; 'ऐक्यवर्धिनी सभा,' 'जेवणाच्या मंडळ्या,' 'चहा बुंद पिण्याच्या मंडळ्या,' वगैरे स्थापा ह्मणजे झालें; एकी एकी ह्मणजे काय, चार दिवसांत सगळ्या हिंदुस्थानांत एकी करून देऊं! आमच्या फांकड्या नव्या विद्वानांस शोभेसा

---

तूट कशी भरून काढावी, एकंदर खर्च किती, त्यांतील निरर्थक खर्चाच्या बाबी कोणत्या व त्यांपैकीं कोणत्या तोडाव्या यांपैकीं कोणत्याहि मुद्याचें ज्ञान त्यास नाहीं असें सॉक्रेटीसानें त्यास प्रश्न विचारून दाखवून दिलें. तेव्हां ग्लाकोनें शत्रुनाशानेंहि आपलें संस्थान गबर करतां येईल असा युक्तिवाद मांडला. त्यावर सॉक्रेटीसानें लढाईपूर्वी फौज किती आहे, कशी आहे याची माहिती हवी तीहि त्यास नाहीं असें दाखवून दिलें. व तयारी केल्याशिवाय जबाबदारी पत्करल्यानें त्याची कोती बुद्धि मात्र प्रगट होऊन उपहास व फजिती होईल अशी इशारत दिली. 'सम्पादक'

१. 'सॉक्रेटीसाचें चरित्र' अध्याय ४.

* Alnaschar:—Arabian Nights' Entertainments मधील एक हजार एकशें व एक रात्रींपैकीं एकशें शहात्तराव्या रात्रीं न्हाव्यानें सांगितलेली आपल्या पांचव्या भावाची गोष्ट पाहा. या इवेंत मनोरे बठविणाऱ्या मनुष्यानें आपल्या वांट्यास आलेली सर्व सम्पत्ति खर्चून एक हाराभर कांच–सामान आणलें. व दुकानांत बसल्यावर या दोनशें रुपड्यांच्या भांडवलावर नफा होतां होतां दोनशेंचे चारशें, चारशेंचे आठशें, आठशेंचे आठ हजार अशी आपली इस्टेट कशी वाढत जाईल याचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. शेवटीं या मनोराज्याच्या कैफांत स्वारीची इतकी तंद्री लागली कीं आपला एक मोठा वाडा आहे, आपण वजिराच्या मुलीला मागणी घातली आहे, ती आपली बायको झाली आहे व रागानें आपण तिला लाथ मारतों आहों असें वाटून लाथ झाडतांच काल्पनिक बायको तर नाहींशी झालीच पण पुढचें कांच–सामान मात्र फुटून तो कफल्लक बनला. तात्पर्य, फार व्याजाच्या अगर फायद्याच्या आशेवर बसलें कीं व्याज अगर फायदा मिळणें तर दूरच, पण उलट मुद्दल अगर भांडवल सुद्धां हातीं लागत नाहीं. 'सम्पादक'

व त्यांस चांगला सोईवार पडे असा एखादा धर्म पाहिजे आहे काय ? कुछ् फिकीर नही;- 'पाहिजे आहे !' अशा मोठ्या अक्षरांनी नोटीस देऊन वर्तमान नेमा ह्मणजे झालें; अथवा नेटिवांकडून हें काम नीट न होईसें वाटल्यास 'ट्रेचर् आणि को'‖ किंवा 'बाळकृष्ण आणि मार्गन्'$ यांजकडे ऑर्डर् पाठवून या ह्मणजे काम झालें: कीं, ईश्वरास पसंत पडेशा धर्माचें साहित्य ते तावडतोब रवाना करून देतील! आमच्या देशांत गदाधर,¶ भट्टोजी दीक्षित,† नागोजीभट्ट* वगैरे मंडळींची सध्यां उणीव आहे काय ? 'वेदशास्त्रोत्तेजना'र्थ एक सभा काढा ह्मणजे झालें. मग काय कमी ? पेशव्यांच्या दक्षिणेला आले नाहींत असे मूर्तिमान् §व्यास,

‖ ट्रेचर् आणि कोः—Pharmaceutical Chemists इंग्रेजी औषधें विकणारी एक लिमिटेड् कंपनी होती. या कंपनीला इतका दांडगा फायदा होत असे कीं, पांचसहा वर्षांपूर्वी ही कंपनी लिक्विडेशन्मध्यें निघाल्यावर सर्व निरवानिरव होऊन शेअर-होल्डरांना दीडपट पैसे मिळाले. मुंबईस कोटांत एक, भायखळ्यास एक आणि पुण्यास एक अशा तीन ठिकाणीं मालकीच्या इमारती होत्या. येथें लष्करांत लालदेवळाजवळ अर्सेनलरोडकडे जातांना कोंपऱ्यावर उत्तराभिमुख इमारत (येथें हल्लीं इलेक्ट्रिक् कंपनीची कचेरी आहे) आहे, तेथें ही कंपनी असे. 'सम्पादक'

$ बाळकृष्ण आणि मार्गन्—Suppliers of Furniture, Auctioneers & General Merchants बाळकृष्ण सायन्ना व मार्गन् या उभयतांचें प्रथम भागीचें दुकान होतें. पुढें बाळकृष्ण सायन्नानें तें विकत घेतलें. हेंहि आठ दहा वर्षांपूर्वी मोडलें. हें दुकान सोलापूर रोडवर सोलापूर बाजार पोस्ट ऑफिस आहे तेथें नासक्या तळ्याजवळ होतें. 'सम्पादक'

¶ गदाधरः—त्रिलोचनदास नांवाच्या कायस्थ ब्राह्मणाचा मुलगा अकराव्या शतकांत होऊन गेला. 'सम्पादक'

† भट्टोजी दीक्षितः—सिद्धान्त कौमुदीचा कर्ता, इ. स. १६३० च्या सुमारास होऊन गेला. याच्या बापाचें नांव लक्ष्मीधर. याच्या घराण्यांत मोठे लेखक व वैयाकरणी होऊन गेले. सिद्धान्त-कौमुदी हा ग्रंथ हेमचन्द्राच्या शब्दानुशासनावर आधारलेला असून पाणिनीच्या व्याकरणावरील ही एकच एक लोकप्रिय प्रस्तावना आहे. या ग्रंथामुळें दीक्षितांनीं पाणिनीसहि मागें सारलें. याचे ग्रंथः- बालमनोरमा, प्रौढमनोरमा अशा दोन स्वतःच्याच कौमुदीवरील टीका, शब्दकौस्तुभ नांवाची पाणिनीच्या अष्टाध्यायीवरील टीका, आणि पाणिनीय धातुपाठ, लिंगानुशासन वगैरेंवरील किरकोळ छोट्या टीका. याचा पुतण्या कोण्डभट्ट, मुलगा भानुजि ऊर्फ वीरेश्वर ऊर्फ रामाश्रय आणि नातू हरि दीक्षित यांनींही ग्रंथलेखनपरंपरा कायम राखली. 'सम्पादक'

* नागेश ऊर्फ नागोजीभट्टः—भट्टोजी दीक्षितांचा नातू हरि दीक्षित याचा हा शिष्य. याच्या बापाचें नांव शिवभट्ट काळे. अलाहाबादजवळ शृंगवेरपूर येथें राहणारा मराठा ब्राह्मण. कैय्यटाच्या महाभाष्यप्रदीपावर उद्योत नांवाचा याचा सुप्रसिद्ध व्याकरण ग्रंथ असून शिवाय धर्मविषयक चवदा, योगविषयक एक, अलंकारावर तीन, व्याकरणशास्त्रावर बारा ग्रंथ यानें लिहिले आहेत. वाल्मीकि-रामायण, अध्यात्मरामायण, सप्तशती, गीतगोविंद, सुधालहरी वगैरे ग्रंथावरही याच्या टीका आहेत. 'सम्पादक'

§ व्यास—व्यास दोन आहेत (१) बादरायण (२) पाराशर. पहिल्याची माहिती मिळत नाहीं. कित्येक दोन्हीहि एकच मानतात. पहिला ब्रह्मसूत्रांचा कर्ता. दुसरा सुप्रसिद्ध ऋषि; सत्यवतीला शंतनूशीं तिचा विवाह होण्यापूर्वी पराशर ऋषीपासून झाला. जन्माबरोबर तो रानांत

(पुढें चालू)

गौतम$ व पाणिनी* येथें चोहोंकडून उड्या टाकीत येतील. असो; एकंदरींत लक्ष्मीचा प्रभाव आलीकडे जसा आमच्या देशहितचिंतकांस कडून येऊं लागला आहे तसा; पूर्वी कोणासही आला नसेल. पैसा उभा करून 'मंडळी' किंवा 'सभा' उत्पन्न केली कीं, हवें तें काय होतें आहे! पण वरील समजुतीचा मूर्खपणा किती आहे हें क्षणमात्र विचार केला असतां हवें त्यास सहज समजणारें आहे. पाहा बरें! सुयागुंड्यांसारख्या व्यापाराच्या जिनसांचे जसे कारखाने देशोदेशीं आहेत व ते हवे तेथें घालतां येतील, त्याप्रमाणेंच वक्तृत्व, विद्वत्त्व, कवित्व, शिल्पकौशल्य इत्यादिकांची गोष्ट आहे काय? कालिदासासारख्यांची मधुर वाणी, शिवाजीच्या सारख्या राज्यकर्त्यांचें युद्धकौशल्य व राजकारण, फिडियस् व रॅफील् अशांच्या सारखें शिल्प हीं किती पैसा खर्च केला असतां पैदा होतील बरें? किती वक्तृत्वोत्तेजक सभा मिळून डिमॉस्थिनीस् तर दूरच, पण अगदीं सामान्य प्रतीचा वक्ता तरी निर्माण करण्याचा पतकर घेतील? जॉनसन किंवा मेकॉलेच्या सारखे ग्रंथ मराठींत करून देण्यास किती 'दक्षिणाप्रैजकमिटी'स मत्ता दिला असतां काम होईल? असो; तर केवळ सभा स्थापून बक्षिसांची लालूच दाखवल्यानें आपल्या देशांत वक्तेच वक्ते होतील ही जी सदरलि मंडळीची किंवा निदान त्यांतील कित्येक चाणाक्ष गृहस्थांची आशा आहे ती केवळ वेडगळपणाची आहे; आणि 'वक्त्यांचे वर्ग' हे शब्द 'हिऱ्यांचा कारखाना' या शब्दांसारखे सर्वथा अप्रयोजक होत!१

---

निघून गेला व कडक तप करीत राहिला. शेवटीं सत्यवतीचा मुलगा विचित्रवीर्य याच्या विधवा बायकांच्या ठिकाणीं नियोगानें संतति उत्पन्न करण्याकरितां बोलाविलें व त्याच्यापासून पण्डु-धृतराष्ट्र-विदुर अशीं अपत्यें झालीं. द्वीपावर जन्मल्यामुळें व काळा असल्यानें याला कृष्णद्वैपायन म्हणत. पराशराचा मुलगा म्हणून पाराशर म्हणत. पण पुढें वेदांची व्यवस्थित रचना केली म्हणून [विव्यास वेदान् तस्माद् व्यासः] व्यास हें नांव मिळालें. महाभारत, अठरा पुराणें हे त्याचे ग्रंथ असून सप्तचिरंजीवांत त्याची गणना होते. कोणाहि ब्राह्मण पुराणिकाला व्यास म्हणतात. 'सम्पादक'

$गौतमः—'न्यायसूत्रा'चा कर्ता. 'सम्पादक'

*पाणिनीः—'अष्टाध्यायी'चा कर्ता. तक्षशिलेचा राहणारा. पतंजलि आपल्या महाभाष्यांत याला दाक्षीपुत्र या नांवानें संबोधतो. यास्काचार्य आणि ऋग्-यजुः-साम या तीन संहिता तेवढ्या पाणिनीच्या पूर्वीच्या होत असें भाण्डारकरांचें मत आहे. सध्यांच्या ज्ञानावरून [अगर तें अपूर्ण असल्यामुळें अज्ञानावरून म्हटलें तरी चालेल,] बिनचूक अनुमान करावयाचें तर पाणिनी खिस्तपूर्व ८०० च्या आलीकडचा खास नाहीं असें म्हणतां येईल. विद्याभ्यासांत यश न मिळाल्यामुळें तपश्चर्या करून यानें शङ्कराकडून चवदा प्रत्याहार-सूत्रें मिळविलीं. पंचतंत्रांतील गोष्ट खरी असेल तर तो वाघानें खाल्लेला पाणिनी हा नव्हे. याची अष्टाध्यायी हा सूत्रमय ग्रंथाचा प्राचीनतम नमुना होय. याची चार हजार सूत्रें असून तीं प्रत्येकी चार चार पादांचा एक एक अध्याय याप्रमाणें आठ अध्यायांत विभागलीं आहेत. याच्या ग्रंथांत परिभाषेचें निर्दोषत्व आणि विश्वकोशरचनाक्षम संशोधक बुद्धि यांचा परमोत्कर्ष दिसून येतो. 'सम्पादक'

१. कोणी कदाचित असा आक्षेप घेतील कीं, वर जें लिहिलें आहे तसा प्रस्तुत सभांचा बिलकुल उद्देश नाहीं. पण दोन तीन गोष्टींवरून पाहिलें असतां त्यांचा रोख वरच्यासारखाच दिसतो.

(पुढें चालू)

१. वरील कलमांत वक्तृत्वाविषयीं जें लिहिलें आहे तें सर्व गुणांस सारखेंच लागणारें आहे. तरी हें नीट न समजल्यामुळें वरील भ्रम बहुधां सर्वांच्या मनास जडलेला आढळतो. याचीं उदाहरणें वर दिलीं आहेतच. तीं सांगतांना लोकांच्या असमंजसतेचा जो आह्मीं उपहास केला आहे तो ज्यांस यथार्थ वाटणार नाहीं त्यांस मेकॉलेचा एतद्विषयक एक प्रसिद्ध लेख वाचण्याविषयीं आह्मी शिफारस करतों.[2] तो वाचला असतां कोणतीही कला किंवा गुण यांची अभिवृद्धि कर्तव्य असतां पैशाचें साधन किती अप्रयोजक होय याविषयीं वाचकांची खात्री होईल. उघडच आहे कीं, पैशाचा लोभ ही जी मनुष्याच्या अंगची एक प्रबळ वासना आहे ती ह्मणजे मोठीशी थोर आहे असें नाहीं. तेव्हा तिच्या योगानें प्रवृत्ति होऊन मनुष्याच्या हातून कोणतेंही श्लाघ्य कृत्य घडावें हें मुळींच संभवत नाहीं. शिवाय नुसत्या द्रव्यलोभापासून एका परिश्रमाखेरीज दुसरें कोणतें कार्य होणार ? पुढें लालूच असली ह्मणजे तेवढ्यापुरती मेहनत मनुष्य करील इतकेंच काय तें. कोणत्याही कलेंत पूर्णत्व पावण्यास उत्साहपूर्वक व्यासंग किंवा हौस जी एक लागत असते ती अर्थलाभाच्या केवळ आशेनें मनुष्यांत कशी उत्पन्न होईल ? आणि त्याहीपेक्षां मूळची बुद्धि किंवा स्वाभाविक पटुत्व जें गुणी मनुष्यांत असावें लागतें तें पैशाच्या राशीच्या राशी पुढें मांडल्यानें तरी लवमात्रही उत्पन्न होईल काय ? तेव्हां एकंदरींत पैशाच्या योगानें हवें तें करतां येईल, आणि आमच्या देशांत हल्लीं पैसा नाहींसा झाल्यामुळें लोककल्याणाचीं कामें होण्यास अडचण पडते, या दोन्ही समजुती निवळ खोट्या आहेत. मनुष्यास खुपसुरत करण्याचें साधन किंवा रत्नें निपजविण्याची कृति हीं जशीं मुळींच संभवत नाहींत, त्याचप्रमाणें कोणा कोणा मनुष्यांमध्यें ईश्वरदत्त जे गुण कधीं कधीं विरळ सांपडणारे ते उत्पन्न करण्याची आशा धरणें यासारखा वेडेपणा दुसरा नाहीं. असो; आतां वरील महत्त्वाच्या गोष्टीचें प्रत्यक्ष प्रमाण आमच्या वाचकांस दाखवून प्रस्तुत विषयाचा हा विभाग आटपतों. एक प्रमाण दक्षिणाप्रैजकमिटी. ही सभा आमच्या सार्‍या वाचकांस माहीत असेलच. हिचें वास्तव्य आज सुमारें पंचवीस वर्षें आहे. इतक्या काळांत हिजकडे शेंकडों पुस्तकें नजर होऊन आजपर्यंत पुष्कळ ग्रंथकरांस हिजकडून बाक्षिसें पोंचलीं. आतां या कमिटीच्या द्वारें आजपर्यंत जो सरकारी पैशाचा विनियोग झाला त्याविषयीं जर विचार केला, तर इतकी रकम केवळ

असें ह्मणणें भाग येतें. एक ही कीं, कोणा उमेदवारास दोनदां बक्षीस मिळालें कीं. प्रस्तुत गुण त्यास पुरतेपणीं साध्य झाला असें समजून त्यास पुनः बोलूं देत नाहींत. दुसरी गोष्ट मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलीच आहे कीं, वरील पसार झालेल्या वक्त्यांनीं आपल्या वक्तृत्वाचा प्रकाश जनहितार्थ पाडावा अशी वरील मंडळीची मोठी अपेक्षा होती व अद्याप आहे. शिवाय तिसरें असें कीं, सदरील समारंभांत बक्षीस मिळालें कीं, सरस्वतीचा वरद हस्त त्या मनुष्याच्या मस्तकीं चढलाच असें समजून त्यास तेथल्या तेथें भाषण करायास सांगणें. मुंबईच्या इ० स० १८७० सालच्या समारंभांत अशी एकदां मौज झाली कीं, वरच्याप्रमाणें केवळ तात्कालिक स्फूर्तीनें भाषण करायास नुकत्या तयार झालेल्या एका प्रसिद्ध वक्त्यास सांगितलें असतां तो सभेंत भलतेंच बोलून गेला! तेणेंकरून सार्‍या सभासदांस खालीं पाहावें लागून वरील प्रकार कोठून केला असें त्यास झालें!

२. 'Royal Society of Literature'—*Miscellaneous Writings*.

पाण्यांत गेली असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तरी निदान मूळच्या उद्देशाप्रमाणें तिचें मोठेंसें चीज झालें असें कोणासही वाटणार नाहीं. तोच पैसा पूर्वी जसा गोरगरीब ब्राह्मणांस फुकट वांटला जात असे, त्याचप्रमाणें तो गेलीं पंचवीस वर्षे गद्यपद्यांच्या रचनेच्या श्रमाबद्दल विपन्न ग्रंथकारांस दिला जाऊन तितक्या गरीब लोकांस अन्नास लावण्यांत गेला इतकेंच सरासरी त्याविषयीं ह्मणतां येईल. बाकी सभेचा जो खरा हेतु, कीं मराठी भाषेंत नवे नवे ग्रंथ होऊन ती सुधारणेच्या मार्गाला लागावी तो एकंदरींत तितपतच सिद्धीस गेला! आतां हें खरें कीं, सदहू कमिटीस नजर आलेल्या ग्रंथांत कांहीं सर्वमान्यतेच्या पदवीस पावले आहेत; पण त्यांबद्दल कमिटीनें आपणाकडे मान बळेंच ओढून घ्यावा हें अगदीं रास्त नाहीं. कांहीं महिन्यांपूर्वी येथील एका प्रसिद्ध पहिलवानानें सातान्यास कुस्ती मारली. याबद्दल येथील 'बलवर्धक सभे'नें कृतार्थता मानणें किंवा प्रौढी झोकणें जसें बरोबर होणार नाहीं, त्याचप्रमाणें वरील कमिटीनें पसंत केल्यापैकीं कांहीं पुस्तकें उत्कृष्ट ठरून लोकमान्य झालीं याचाही मान तीस आपणाकडे बिलकुल घेतां येणार नाहीं. कां कीं, प्रस्तुत सभा मुळींच नसती, तर तीं पुस्तकें होण्यास किंवा लोकांस आवडण्यास राहतीं असें मुळींच संभवत नाहीं. असो; हें एक उदाहरण झालें. दुसरें आलीकडील इंग्रेजी शिक्षणक्रम होय. इंग्रेज सरकारचा या देशावर सर्वांत मोठा झालेला उपकार हाच होय, कीं, ज्ञानाची अमोलिक देणगी त्यानें एतद्देशीयांस दिली व अद्याप देत आहे. गेल्या पन्नास पाउणशें वर्षांत या देशांत चोहोंकडे ही नवी विद्या हळूं हळूं प्रसार पावून हल्लीं तिचा पुष्कळच फैलावा झाला आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी मेकॉलेनें जी नवी पद्धति सुरू केली तिच्यामुळें तर वरील प्रसारास फारच साह्य होऊन त्यामुळें देशाची एकंदर स्थिति आजला अगदीं बदलून गेली आहे असें ह्मटलें असतां चालेल. पण इतकें होऊनही एतद्देशीय शाळांविषयीं व विद्यालयांविषयीं सरकारचा, इंग्रेज लोकांचा व आपला जो बोभाट वरचेवर ऐकूं येतो तो सर्वांस माहीत असेलच. तो हा कीं, लोकशिक्षणाकडे देशाचें उत्पन्न इतकें खर्च होत असतां त्याचें ह्मणण्यासारखें चीज कांहींच होत नाहीं. शिक्षणाच्या सर्व सोयी करून ठेवून ज्यांकडून सरकारानें दहा दहा बारा बारा वर्षे विद्याभ्यास करविला, त्यांतून कित्येकांस पदरच्या दमडीच्या कवडीचाही खर्चायास न लागतां नेमणुका, पगारी जागा वगैरे करून देऊन खुशाल विद्यासंपादन करण्याची सवड करून दिली, आणि शेवटीं सगळा विद्याभ्यास आटपून संपूर्ण शस्त्रास्त्रांनीं सज्ज होत्साते जे सरकारच्या दरबारीं मानाचा विडा पावून देशहिताची दीक्षा पावले, ते एकदां सुखवस्तु होऊन संसारसुखाचा अनुभव घेऊं लागले कीं लागलींच पूर्वीच्या गोष्टी सर्व विसरून जातात. आपल्या शिरीं स्वदेशाचें ऋण असून तें आपणांस फेडलें पाहिजे, व चान्सेलर साहेबांनीं केलेला मंत्रोपदेश त्या वेळेस दिलेल्या चर्मपत्रांतच केवळ गुंडाळून ठेवायाचा नाहीं, या दोन्ही गोष्टींची त्यांस पुढें कधींही आठवण सुद्धां होत नाहीं. वर्षानवर्षे खपून मिळवलेल्या ज्ञानाचें व किताबांचें सार्थक स्टॉकिंग् बूट् चोहोंकडे मिरवण्यापलीकडे किंवा हंसून खेळून मौजेंत काळ घालविण्यापलीकडे वरील लोकांपैकीं कोणासही बिलकुल दिसत नाहीं. बाकी प्रस्तुत शिक्षणक्रम इकडे सुरू करण्याच्या

वेळेस मेकॉलेसाहेबांच्या मनांत केवढाले तरंग येऊन चुकले असतील ! कीं लवकरच या देशांतील अज्ञानाचा संपूर्ण विध्वंस होऊन विद्वत्तेंत, रसिकतेंत, देशाभिमानादि गुणांत वगैरे आमचे लोक इंग्लंडांतील लोकांशीं हळूं हळूं समत्व पावत जातील; व त्यांजसारखे मोठमोठे ग्रंथकार येथें निपजून स्वदेशीय लोकांस देशभाषेच्या द्वारें ज्ञानाचा मार्ग खुला करून देतील. या शेवटल्या गोष्टीचा तर साहेबमजकुरांस मोठाच भरंवसा होता; आणि तिच्या संबंधें तर आमच्या नवीन विद्वानांनीं त्यांस जसा दगा दिला तसा कोणताच दिला नाहीं. मेकॉलेसाहेबांस मोठी आशा होती कीं, आपल्या नव्या तऱ्हेनें या लोकांत ज्ञानाचा जो थोडाथोडा प्रसार होत जाईल तो सगळ्या देशभर फैलावण्याच्या कामीं हे नवे लोक आपल्या फार उपयोगीं पडतील. ते असे कीं, ज्यांस इंग्रेजी शिक्षकांकडून व इंग्रेजी ग्रंथांच्या द्वारें साक्षात् ज्ञान मिळणार नाहीं अशा आपल्या इतर लक्षावधि देशबांधवांस हे लोक त्यांच्याच भाषेनें नव्या कल्पना व नवे विचार मोठ्या प्रीतीनें व हौसेनें कळवीत जातील. हा विचार मनांत आणून या लोकांस वरील साहेबानें 'इंटरप्रेटर' ह्मणजे 'दुभाष्ये' असें नांव प्रकृतविषयक लेखांत दिलें आहे. आतां हा 'दुभाष्ये'पणा या लोकांनीं कितपत केलासा आढळेल बरें ? मेकॉलेसाहेब आज चाळीस वर्षांनीं पुनः हिंदुस्थानांत येऊन आपण लावलेला वृक्ष कितीसा लागवडीस आला हें जर पाहते, तर मूळच्या संकल्पांत आणि प्रत्यक्ष सिद्धीत पडलेली येवढी तफावत पाहून ते अगदीं थक्क होऊन जाते ! ज्यांनीं इंग्रेजी विद्येच्या समुद्रांत सतत अवगाहन करून मनाच्या सर्व वृत्ति वृद्धिंगत करायाच्या, अंतःकरणास उत्कृष्ट संस्कार द्यावयाचा, आणि तेंच उत्तम फळ आपल्या इतर ज्ञानरहित देशबंधूंस मिळवून देण्याचा मार्ग—ह्मणजे देशभाषेंत ग्रंथ करणें—याविषयीं उद्योग करायाचा, त्यांची स्थिति सर्वोपरी वरच्याच्या अगदीं उलटच असून वरील 'दुभाष्ये'पणा करण्याविषयीं तर त्यांच्या मनांत अतिशयित तिरस्कार वागतो आहे, हें पाहून साहेबमजकुरांस वर सांगितलेल्या आपल्या निबंधाचीच पुरतेपणीं आठवण झाली असती ! असो; तर या दोन उदाहरणांवरून पूर्वोक्त सिद्धांताचा उत्कृष्ट प्रत्यय आमच्या वाचकांस आल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां एकंदरींत सरतेशेवटीं वरील गोष्ट पुनः दृष्टांतरूपानें येथें सांगतों कीं, पैशाचें साधन हें केवळ उदकासारखें आहे. जेथें अपेक्षित गुण बीजरूपानें गुप्त असेल तेथें जर वरील साधन त्यास जाऊन पोंचलें तर त्याचें चीज होईल यांत संशय नाहीं. पण वनस्पतीचें पोषक उदक आहे येवढेंच समजून केवळ उदकाचा संग्रह केल्यानें अपेक्षित वृक्षाची उत्पत्ति, वृद्धि, व फलद्रूपता या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या झाल्या असें समजून केवळ यदृच्छेनें त्याचा विनियोग करणें, व त्यापासून फलप्राप्तीची आशा करून राहणें, यासारखें असमंजस व उपहासास्पद दुसरें कांहीं नाहीं !

यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्पधीरपि ।
निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते ॥[1]

अंक २३—(१) अवतरणें. (२) वक्तृत्व-गुणाच्या उत्कर्षाचा संभव. (३) सभ्यांची स्थिति. (४) उत्कर्षाचीं साधनें. (५) आलीकडील वक्ते.

१. शेवटल्या अंकांत प्रस्तुत विषयाचें आधुनिक स्वरूप सांगितलें. आतां त्यांत उपोद्घात केल्याप्रमाणें प्रस्तुत कलेचा यापुढें उत्कर्ष होण्यासारखा आहे कीं नाहीं, व तो होण्यास साधनें कोणतीं याविषयीं लिहूं.

२. मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, प्रकृत गुणाची आपल्या लोकांस आलीकडे जी ओळख झाली आहे ती परस्थ लोकांच्या परिचयानें. तेव्हां त्यांच्या सह-वासानें आमच्या देशांत त्यांचे इतर गुण जसे क्रमाक्रमानें प्रसार पावत जातील त्याचप्रमाणें हाही जाईल हें उघड आहे. लोकशिक्षणाच्या व इतर द्वारांनीं चोहोंकडे विद्येचा व ज्ञानाचा जसजसा फैलावा होत जाईल तसतशी ग्रीस, रोम, इंग्लंड्, यांत झालेल्या वक्त्यांची आमच्या लोकांस माहिती विशेष होत जाऊन, व इंग्लिश् लोकांच्या साक्षात् परिचयानें प्रस्तुत गुण जो त्यांत सांप्रत विद्यमान आहे त्याचें अनुकरण होऊन तो उत्तरोत्तर वृद्धि पावत जाईल यांत संशय नाहीं. हल्लींही बाबू केशवचंद्र सेनासारख्या कित्येक एतद्देशीय विद्वानांस प्रकृत कला बरीच साध्य झाली आहे; आणि ज्या ज्या ठिकाणीं इंग्रेजी विद्येचा बराच फैलावा झाला आहे तेथें सभांचा वगैरे कसलाही समारंभ झाला तरी थोडें-बहुत बऱ्याच प्रकारें भाषण करणारे लोक कोणी ना कोणी तरी असतात. असो; तर या-प्रमाणें हल्लींही वक्तृत्वाचा अंकुर जो फुटलेला दृष्टीस पडतो तो यापुढें असाच जर सतत पोषण पावत गेला, तर येथील जमिनीच्या उत्कृष्ट पिकाऊपणामुळें तो पुढें चांगला सरसावत जाईल यांत आह्मांस बिलकुल संदेह वाटत नाहीं.

३. पण वक्तृत्वाची वृद्धि होऊन त्याचा एकंदर लोकांस उपयोग होणें जर असेल, तर प्रस्तुतचा क्रम पुष्कळ बदलायास पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें वक्तृत्वाचें बीज अंकुर-रूपानें देशांत जागोजाग आविर्भूत झालें आहे खरें; पण हल्लींच्या स्थितीस सामान्य लोकांस त्यापासून कांहींएक फायदा घडण्यासारखा नाहीं. मोठमोठीं व्याख्यानें देऊन एतद्देशीय पंडितांनीं विलायतेंतील लोकांसही तोंडांत बोट घालायास लावलें, किंवा आपल्या देश-बांधवांस क्षणभर चकित करून सोडलें, तरी ज्यांस नवें शिक्षण प्राप्त न झाल्यामुळें इंग्रेजी भाषा व इंग्रेजी विचार कळत नाहींत, अशा लाखोंगणती लोकांस तें काय होय! त्यांनीं त्यांचा लौकिक ऐकून स्वस्थ बसावें इतकीच गोष्ट. तसेंच वरील लोकांच्या वक्तृत्वशक्तीचें चीजही शेंदोनशें लोकांनीं टाळ्या पिटल्याच्या पलीकडे कांहीं नाहीं. पण तेवढ्यानेंच त्यांस कृतार्थता वाटून आपल्या कलेचा खरा उपयोग करण्याचें त्यांच्या कधीं मनांतही येत नाहीं.

१. "जेथें विद्वज्जन नसतात तेथें अल्पबुद्धि मनुष्यही प्रशंसेस पात्र होतो; ज्याप्रमाणें ज्या माळावर कांहींच झाडझूड नाहीं तेथें एरंड ह्मणजे मोठा वृक्ष!"

हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार अशिक्षित लोकांचा. यांच्या मंडळींत कोणाकोणास बरेंच वाक्पटुत्व असतें; पण वक्त्यांस अवश्य जीं अनेक साधनें तीं यांस मुळींच अनुकूळ नसल्यामुळें, फार तर काय, पण व्याकरणाची सुद्धां किलेकांस भ्रांत असल्यामुळें, त्यांच्या अंगीं प्रस्तुत गुण थोडाबहुत असतांही तो प्रगट होण्याची सोय नसते.

४. तर आतां प्रस्तुत गुण आपल्या भाषेच्या द्वारानें उदयास येऊन सर्व लोकांस तो हितावह होण्यास काय काय सामग्री पाहिजे ती सांगतों. पहिलें कलम अर्थातच उत्तम भाषा. चित्रें करणारास जशी उत्तम माती, आचाऱ्यास जसें उत्तम प्रकारचें साहित्य, तशीच वक्त्यास उत्तम भाषा अगदीं अवश्य होय. ती त्यास अनुकूळ नसेल तर त्याच्या अंगीं मोठी करामत असली तरी ती त्याची त्याच्यापाशींच राहील; रस्त्यांतील मातीचा ढीग पुढें आणून टाकून एकाद्या उत्कृष्ट जिनगरास त्याची उत्तम पुतळी बनवण्यास सांगितलें, किंवा भाजीभाकरीचें साहित्य देऊन पंचपक्वान्नांचा थाट उडवण्यास एकाद्या उत्तम आचाऱ्यास सांगितलें, तर तसें करणें जसें अत्यंत हास्यास्पद होईल, त्याचप्रमाणें भाषा सुधारण्याचा बिलकुल प्रयत्न न करतां उत्तम वक्तृत्व निपजविण्याचा जो आमच्या लोकांचा चोहोंकडे जारी उद्योग चालला आहे तोही उपहासास्पद होय. भाषा सर्वथा अंकित असणें हें वक्त्यांस किती जरुरीचें आहे हें डिमॉस्थेनीसच्या मागें* जी हकीकत दिली आहे तीवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच; आणि आजपर्यंत प्रसिद्धीस आलेल्या कोणत्याही वक्त्याचें चरित्र पाहिलें तरी तोच प्रकार आढळेल. तर उत्तम भाषा हें वक्तृत्वाचें पहिलें मोठें साधन होय. यास्तव आपल्या देशांत वक्ते उत्पन्न होऊन जनभाषेनेंच सर्वांचीं मनें एकाद्या विवक्षित कार्याकडे वळवण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य यावें असा जर हेतु असेल, तर एतद्देशीय भाषा ह्मणजे काय अप्रयोजक, ती चांगल्या तऱ्हेनें शिकण्याची कोणीं उगीच रिकामी उठाठेव करावी, ती सुधरून काय करायाचें आहे, दिवसेंदिवस सर्वसाधारण होऊं पाहणारी जी इंग्रेजी भाषा ती आली ह्मणजे बस आहे, वगैरे कोत्या समजुती ज्या आज चोहोंकडे पसरल्या आहेत त्या अगोदर नाहींशा झाल्या पाहिजेत. या समजुतींचें खंडन आह्मीं यापूर्वीं अनेक वेळां केलें आहे; फार तर काय, पण आमचें पुस्तकच एके रीतीनें त्याचें खंडन होय! असो; तर याप्रमाणें आपल्या देशांत प्रस्तुत कलेचा उत्कर्ष होण्याचें पहिलें मोठें साधन ह्मटलें ह्मणजे देशभाषा सुधारणें—ह्मणजे तिच्या अंगचे सर्व गुण तिच्या ठायीं प्रगट करणें, आणि संस्कृतादि अन्य भाषांच्या साहाय्यानें तिला विशेष परिपक्वतेस आणणें—हें होय, हें एक झालें. दुसरें साधन विद्वत्त्व व बहुश्रुतपणा. हीही गोष्ट आमचे लोक बिलकुल लक्षांत आणीत नाहींत. वक्तृत्वगुणाविषयीं अनेकांचे जे अनेक तरंग आहेत त्यांतील एक मोठा हा होय, कीं, ज्या अर्थीं प्रकृत गुण हा केवळ ईश्वरदत्त होय त्या अर्थीं वक्ता ह्मणजे असा असला पाहिजे कीं, त्यास एकदम झोंपेंतून उठवून सभास्थानीं आणून उभा केला तरी विषय सांगतांच त्याच्या सरस्वतीचा ओघ तात्काळ उच्छृंखलपणें व अस्खलिततेनें चालला पाहिजे! असा वक्ता वस्तुतः पाहतां त्रिभुवनांतही सांपडायाचा नाहीं.

* पृष्ठे २४७–२४८ पाहा. 'सम्पादक'

डिमॉस्थेनीस्, सिसरो यांच्या सारख्यांसही भाषणाच्या अगोदर चांगली मजबूत तयारी करून यावें लागत असे. येवढें खरें कीं एकाद्या मोठ्या निकराच्या प्रसंगीं मोठमोठ्या वक्त्यांनीं केवळ तात्कालिक स्फूर्तीनें समयविशेषीं भाषणें केलीं आहेत; पण तींही अगदींच अकल्पित विषयावर केलीं आहेत असें नाहीं. तयारी केलेल्या विषयास सोडून अंमळ इकडे तिकडे त्यांनीं थोडीशी भरारी मारली इतकेंच. असो; तर वरील समजूत केवळ पोरकटपणाची आहे. मनुष्याच्या अंगीं कसाही गुण असला, तरी परिश्रमाखेरीज व अभ्यासा खेरीज त्याचें तेज कधींही पडायाचें नाहीं. खाणींतून नुकता खणून काढलेला हिरा जसा तादृश तेजस्वी नसून शिल्पकारांच्या संस्कारप्रयोगाची त्यास अपेक्षा असते त्याचप्रमाणें गुणिजनांच्या अंगीं वसणारी कलाही शिक्षणाखेरीज पूर्णत्वानें कधीं प्रगट होत नसते. असो, तर याचप्रमाणें वक्तृत्व हें जरी मनुष्याच्या अंगीं जन्मसिद्धच असलें पाहिजे, तरी तें तसें कोणाचे ठायीं असतांही विद्वत्तेखेरीज तें पूर्ण शोभा कधींही पावायाचें नाहीं. विद्वान् व रसिक लोकांस तुष्ट करून त्यांचीं मनें आपल्या भाषणानें ज्यास वळविणें असेल त्यानें भाषाशुद्धता, अर्थसंगति, सुंदर व प्रौढ विचार, हीं सर्व साध्य केलीं पाहिजेत. ह्मणजे अर्थातच व्याकरण, तर्क, अलंकार या शास्त्रांचा अभ्यास करून शिवाय मोठमोठ्या नामांकित काव्यांचें, नाटकांचें, इतिहासांचें वगैरेही ज्ञान संपादन करून त्यांशीं त्यानें सतत परिचय केला पाहिजे. याखेरीज इतरही अनेक विषयांची माहिती त्यास असली तर चांगलीच; कारण दृष्टांत वगैरे देण्यास व भाषणास वैचित्र्य व मनोरंजकता आणण्यास ती फार उपयोगीं पडते. तर प्रस्तुत कला आपल्या देशांत वाढण्यास वरील गोष्टींकडे आपल्या लोकांनीं लक्ष दिलें पाहिजे. सध्यां जसें जो उठला तो वक्तृत्व करूं लागतो, तसा प्रकार उपयोगी नाहीं. तिसरें साधन अनुकरण. कोणताही गुण साध्य करून घेण्यास अनुकरणासारखा उत्तम मार्ग दुसरा नाहीं. यास्तव वक्तृत्वाची आपल्या लोकांस चांगली ओळख करून देण्यास प्राचीन व अर्वाचीन काळीं उदयास आलेल्या नामांकित वक्त्यांचीं भाषणें जर सर्वांस सुलभ होतील तर मोठा उपयोग होईल. आमच्या मराठी भाषेंत वरील सोय अद्याप ह्मणण्यासारखी झाली नाहीं. 'अनेकविद्यामूलतत्त्वां'त, 'शालापत्रकां'त व 'गद्यरत्नावली'त मात्र कांहीं भाषणांचीं भाषांतरें आहेत. त्यांखेरीज दुसरीं कोठें नाहींत. तर वक्तृत्ववृद्धीच्छु लोकांनीं 'वक्त्यांचे वर्ग' वगैरे स्थापण्याच्या व्यर्थ भरीस न पडतां वरील लाभ जर सर्व लोकांस विशेषत: इंग्रेजींत तादृश निपुण न झालेल्यांस करून दिला तर त्यापासून इष्ट हेतु सिद्धीस जाण्याचा पुष्कळ संभव आहे.

याप्रमाणें वक्तृत्वाचा उत्कर्ष होण्यास मुख्य साधनें कोणतीं हवीं तीं सांगितली. यांखेरीज अंगविक्षेप, स्वर वगैरे जीं दुसरीं वक्तृत्वाचीं अंगें आहेत तीं गौण होत; यास्तव त्यांविषयीं कांहीं लिहीत नाहीं. सोन्यारुप्याच्या डागांस झिलई दिल्यानें जशी त्यांची प्रभा अधिक फांकते, त्याप्रमाणें वक्तृत्वास विशेष शोभा आणण्याचीं वरील उपकरणें होत. त्यांत स्वत:सिद्ध योग्यता विशेष नाहीं. यास्तव हल्लींच्या स्थितींत त्यांकडे विशेष लक्ष दिलें नाहीं तरी चालणार आहे.

५. येथवर प्रस्तुत विषयाच्या तिसऱ्या भागाविषयीं निरूपण झालें. आतां सरते-शेवटचा भाग हातीं घेण्यापूर्वी सदरील अंकांत आलीकडे प्रसिद्ध झालेल्या व सध्या प्रसिद्ध असणाऱ्या वक्त्यांविषयीं कांहीं लिहितों.

खालील लेख लिहिण्याचीं दोन तीन कारणें आहेत. एक तर जे प्रसिद्ध होऊन गेले त्यांचा कांहीं तरी निर्देश करणें हें अत्यंत उचित होय म्हणून. दुसरें त्यांविषयीं लोकांची यथार्थ बुद्धि करणें, आणि तिसरें निबंधाची पूर्णता, म्हणजे मागें जे कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत ते अप्रमाण नाहींत असें दाखविणें. असो; इकडे म्हणजे महाराष्ट्र देशांत इंग्रेजीचा आरंभ बंगाल्यापेक्षां व मद्रासेपेक्षां फार उशीरानें झाला, यास्तव त्या विद्येचीं वक्तृत्वादि जीं फळें तीं त्याच मानानें इकडे पुष्कळ वेळानें म्हणजे अगदीं आलीकडे दृष्टीस पडूं लागलीं आहेत हें सर्वांस माहीत आहेच. तथापि या प्रांताचे लोक हिंदुस्थानाच्या कोणत्याही भागांतील लोकांहून बुद्धीनें कमी तर मुळींच नसल्यामुळें वरील नवीन विद्येचा फैलावा गेल्या वीस पंचवीस वर्षांतही पुष्कळ झाला. या नवीन विद्वन्मंडळांत प्रस्तुत गुणाच्या संबंधानें प्रख्यातीस आलेले दोन गृहस्थ होते. ते दोघेही पूर्ववयांतच कांहीं वर्षांपूर्वी परलोकवासी झाले. एक रावसाहेब महादेवशास्त्री कोल्हटकर, आणि दुसरे रावबहादूर विष्णु परशुराम रानडे. कोल्हटकर यांच्या 'अथेल्लो' नाटकाविषयीं प्रस्तुत मालेंत आम्ही अनेक वेळां लिहिलेंच आहे. त्याखेरीज 'कोलंबसाचा वृतांत,' 'पदार्थ आणि चलन' वगैरे आणखीही कांहीं थोडीं पुस्तकें त्यांच्या नांवावर प्रसिद्ध आहेत. रानडे यांचें नांव ग्रंथकारांच्या मालिकेंत मुळींच नाहीं म्हटलें असतां चालेल. त्यांचा लौकिक त्यांच्या निबंधांवर व वर्तमानपत्रांत ते मजकूर लिहीत असत त्यावरच काय तो आहे. या गृहस्थानें इंग्लिश् भाषेचा फार चांगला अभ्यास केला होता; तो इतका कीं, त्याचे त्या भाषेंतील लेख वाचून खुद्द इंग्रेजांसही भ्रांति पडावी! हे सर्व लेख एकत्र करून छापण्याचा व ते लिहिणाराचा जीवनवृतांतही त्यांबरोबर सविस्तर देण्याचा बेत होऊन तें काम एका प्रसिद्ध विद्वानानें हातीं घेतलें होतें; पण त्याचें पुढें काय झालें तें समजण्यांत कांहींच आलें नाहीं. आमच्या नव्या लोकांचे दर वर्षी हजारों बेत होऊन ते ज्या पंथाला बहुधा जातात तीच त्याची गति झाली असावी! असो; तर वरील दोघां गृहस्थांचा सामान्यतः विद्वत्तेविषयीं व हुशारीविषयीं जसा लौकिक होता तसाच वक्तृत्वाविषयींही होता. कोल्हटकर हे डेप्युटी एज्युकेशनल् इन्स्पेक्टर् असून आपल्या वक्तृत्वाच्या योगानें फार लोकप्रिय होऊन गेले होते. त्यांची भव्य मुखश्री व गंभीर स्वर यांच्या योगानें त्यांच्या भाषणास विशेष मनोवेधकता येऊन तें एकण्याविषयीं श्रोत्यांचीं मनें अगोदरच उत्कंठित होत. रानडे हेही चेहऱ्यावरून मोठे पाणीदार दिसत; आणि त्यांचा स्वरही खणखणीत असल्यामुळें त्यांचें भाषण ऐकणारांच्या हृदयावर चांगलें ठसे. हे शेवटीं शेवटीं डेप्युटी कलेक्टरच्या जागेपर्यंत चढले असून त्या कामांतही त्यांचें तेज चांगलें पडल.[1] असो; या दोघांचेंही वक्तृत्व आमच्या

१. वरील हुद्यावर असतां रावबहादुरांनीं आपल्या अंगच्या हिम्मतीचें व लोकहितपर बुद्धीचें

[ पुढें चालू ]

कानीं चांगलेंसें कधींही न पडल्यामुळें त्याविषयीं खात्रीचा असा कोणत्याही तऱ्हेचा आमच्यानें अभिप्राय देववत नाहीं. वर सांगितलेल्या गोष्टी दहा पंधरा वर्षांमागच्या असल्यामुळें त्यांची वक्तृत्वाची ख्याति मूळची खरोखर किती, हुद्द्यानें आलेली किती, व श्रोत्यांच्या अज्ञानानें व अनभिज्ञतेनें किती, हें आह्मांस सांगवत नाहीं. पण इतकें खरें दिसतें कीं, ज्या अर्थी वर सांगितलेला वरील गृहस्थांचा लौकिक विद्वानांच्या व अविद्वानांच्याही तोंडीं असे, त्या अर्थी प्रस्तुत गुणाचें वास्तव्य त्यांच्या अंगीं बरेंच असावें. हे निवर्तल्यापासून यांच्या मागें विशेष नांवाजलेले कोणी फार करून नाहींत. एका गृहस्थास मात्र त्यांच्या बरोबरीनें कदाचित् बसवतां येईल असें वाटतें. या नव्या वक्त्याची विद्वत्ता वरील दोघांच्या पेक्षां निराळी आहे; व स्वभावाच्या, चालचलणुकीच्या वगैरे इतर संबंधांनींही त्याच्यांत व वरील दोघांत पुष्कळच तफावत आहे. वक्तृत्वाच्या संबंधानें पाहिलें तर तें प्रसंगविशेषीं चांगलें चित्तवेधक व समर्पक असतें यांत संशय नाहीं. पण वळवाच्या पावसासारखा त्याचा नेम ह्मणून कधीं धरवत नाहीं. मनाच्या अस्थैर्यास्तव, कधीं विद्वत्तेच्या, कधीं हुद्द्याच्या डौलांत, कधीं मत्सरास्तव, कधीं कांहीं एक विशेष कारण नसतां केवळ हुक्कीखातर, वरील वक्त्यास स्वतःचेंच भान न राहून तो कोणीकडच्या कोणीकडेच भरकटत जातो! मग एकादे वेळेस असें होतें कीं, तें त्याचें वक्तृत्व त्याचें त्यासच सांवरतां सांवरतां पुरे वाट होते! असो; एकंदरींत तात्कालिक स्फूर्तीनें श्रोत्यांच्या चित्तास लागण्यासारखें भाषण करण्याची या गृहस्थाच्या अंगीं बरीच शक्ति आहे; पण वरच्याप्रमाणें तें बहुधां अनियमित असल्यामुळें व स्वतःविषयींचा मजकूर यांत नेहेमीं कांहींना कांहीं तरी घुसवून दिल्यामुळें, त्यापासून श्रोत्यांस पुष्कळ वेळां ह्मणण्यासारखें ज्ञान कांहींच न होऊन हंसण्यास मात्र विषय होतो!

या ठिकाणीं हिंदुस्थानाच्या इतर भागांतील प्रसिद्ध वक्त्यांचाही कांहीं निर्देश करणें अवश्य होय. का कीं, दिवसानुदिवस एकराज्याच्या संबंधानें, व राजकीय, लौकिक, धर्मसंबंधी वगैरे प्रकरणांनींही दूरदूरच्या प्रांतांत परस्परांविषयीं यापूर्वी जें औदासीन्य किंबहुना दुजेभाव असे तो मोडत जाऊन स्नेह जमत चालल्यामुळें देशाच्या एके भागाच्या जी हिताहिताची गोष्ट तीच बाकीच्या सर्वांस लागेशी झाली आहे. शिवाय ज्यांविषयीं पुढें उल्लेख

एक उत्कृष्ट उदाहरण दाखविलें तें येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हें अर्थातच पंढरपूरच्या देवळाचीं दारें फोडून मोठमोठीं करून बडव्यांच्या व उत्पातांच्या दांडगाईस, अनाचारास, व द्रव्यहरणास जो त्यांनीं चिरकाल राहण्याजोगा प्रतिबंध केला तो होय. एकंदरींत वरील गृहस्थाच्या अंगीं देशकल्याणाची खरी इच्छा, व त्याहून विशेष दुर्लभ जो आस्थापूर्वक उत्साह, तो पुष्कळ होता यांत संशय नाहीं. केवळ पुढें पुढें मिरवणाऱ्या हल्लींच्या कित्येक लोककल्याणेच्छूंप्रमाणें शुष्क पांडित्य करण्याची त्यांस आवड नसे. लोकाचाराच्या संबंधानें त्यांच्या वागणुकींत कित्येक मोठमोठे दोष होते खरे; व धर्मासंबंधींही त्यांचीं मतें ठीक नव्हतीं. तरी शेवटीं अंतकाळपर्यंत त्यांची वृत्ति जी अगदीं स्वस्थ व नेहेमीप्रमाणें आनंदित राहिली, तिजबद्दल तारीफ केल्यावांचून व आश्चर्य वाटल्यावांचून कोणासही राहवणार नाहीं. इंग्लंडांतील प्रसिद्ध ग्रंथकार ह्यूम याची उपमा वरील संबंधानें त्यांस सर्व प्रकारें पूर्ण साजेल.

करायाचा आहे, त्यांची प्रसिद्धि साऱ्या देशभर असून ते चोहोंकडे फिरलेलेही आहेत. तेव्हां त्यांची वक्तृत्वशक्ति अनुभवलेले इकडे पुष्कळ लोक असल्यामुळें त्यांचा उल्लेख इकडील वक्त्यांप्रमाणेंच केला असतां चालणार आहे. असो; आधुनिक वक्तृवर्गांत मुख्यत्वेंकरून पहिलें नांव ह्मटलें ह्मणजे बाबू केशवचंद्र सेन यांचें होय. हे ब्रह्मसमाजाच्या मंडळींत अग्रगण्य असून त्या मार्गाच्या प्रीत्यर्थ यांनीं युरोपांत व अमेरिकेंतही आपली वक्तृत्वशक्ति गाजवली हें सर्वांस माहीत आहेच. हे विलायतेस गेले होते तेव्हां यांच्या विद्वत्तेची व वक्तृत्वाची चोहोंकडे प्रशंसा होऊन कित्येक पुरुष व बायका लागल्याच आपला ख्रिस्ती धर्म सोडून यांच्या पंथास अनुसरल्या. तसाच प्रकार अमेरिकेंतही घडून आल्याचें समजतें. असो; एकंदरींत या सर्व गोष्टींवरून प्रस्तुत गुण बाबूमजकुरांच्या अंगीं अप्रतिम असावा असें दिसतें. यांच्या खालोखाल प्रसिद्धि पाहिली तर बाबू प्रतापचंद्र यांची होय. यांचाही विद्वत्त्व व वक्तृत्व या गुणांविषयीं चोहोंकडे मोठा लौकिक आहे. केशवचंद्र सेनांप्रमाणेंच हेही कांहीं महिन्यांपूर्वीं विलायत गाजवून आले. तीन चार वर्षांपूर्वीं हे येथेंही आले होते; व चालीप्रमाणें चोहोंकडे व्याख्यानें, उपदेश वगैरे प्रकार झाले. ब्रह्मसमाजाची येथें शाखा स्थापण्याकरतां बाबूंनीं पुष्कळ खटपट केली, पण श्रोत्यांस स्वतःचें हित त्यांच्यापेक्षां बरें कळून कोणीं ह्मणण्यासारखा त्यांस हुंकार दिला नाहीं. इतर समारंभांप्रमाणेंच वरील समारंभ मंडळीनें साजरा करून वक्त्याचे आभार मानणें वगैरे सर्व यथाविधि केलें; पण आपल्या वक्तृत्ववृक्षास गारोड्याच्या आंब्याप्रमाणें तत्क्षणींच फलद्रूपता व्हावी हा जो हेतु वरील धर्मोपदेशकानें मनांत धारण केला होता तो मात्र बिलकुल सिद्धीस गेला नाहीं. असा आशाभंग झाला तेव्हां बाबूंनीं दुसरीकडे संधान करण्याचा यत्न केला. येथील रडत कढत चाललेल्या प्रार्थनासमाजानें व मयत ' थीइस्टिक् आसोशियेशन् ' (देवशोधक मंडळी) हिनें ब्रह्मसमाजाशीं एकात्मक होऊन आपल्या पंथाचें नांव धारण करावें, असा त्यांनीं विचार काढला; पण काय झालें असेल तें असो, तोही वरील भक्तमंडळीस मान्य झाला नाहीं. असो; एकंदरींत वरील वक्त्याचें देशाटन पुष्कळ होऊन त्याची प्रस्तुत गुणाबद्दल जिकडे तिकडे ख्याति आहे. पण वरील बाबूंचीं एक दोन भाषणें ऐकून आमची जी समजूत झाली ती येथें स्पष्ट लिहिली पाहिजे. ती ही कीं, सभेंत उभें राहून साधारण चार चौघे बोलतात त्याप्रमाणें इंग्रेजींत भाषण करण्याची शक्ति त्यांच्या अंगीं आहे खरी; पण त्यांच्या सार्वत्रिक प्रसिद्धीसारखा त्यांच्या भाषणांत मोठा अद्भुतसा गुण आह्मांस कोणताही दिसला नाहीं. तोंपर्यंत इकडील लोकांनीं बंगाल्यांतील बाबू कसा तो मुळींच पाहिला नव्हता यास्तव, व त्यांची ख्यातिही सर्वांनीं अगोदरच ऐकली होती यामुळें, त्यांची प्रशंसा लहानथोरांच्या सर्वांच्या तोंडीं तेव्हांच झाली असें आह्मांस वाटतें. त्यांच्या भाषणांत ह्मणजे कांहीं अपूर्व रस होता, व तो समजण्याजोगती मंडळीच्या ठिकाणीं अभिज्ञता होती, हें ह्मणणें ह्मणजे अंमळ पंचाइतीचेंच! या आमच्या मतास प्रस्तुत भाषणांचें फळ कितीसें दृष्टोत्पत्तीस आलें याविषयीं जें वर नुकतेंच वाचकांस कळवलें आहे त्यावरून चांगलीच बळकटी येते. ज्या लोकांनीं त्या प्रसंगीं यथेच्छ माना डोलवल्या व टाळ्यांचा गजर केला, व कोणीं विद्वत्तेची,

कोणीं धर्मपरायण बुद्धीची, कोणीं इंग्रेजीच्या ज्ञानाची, कोणीं वक्तृत्वशक्तीची, अशी आप-आपल्या प्रकारें भाषणकर्त्याची खूप तारीफ केली; त्यांनीं ब्रह्मसमाजास मिळण्याची खुषी असल्याबद्दल हात वर करण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां कोणीं सगळा, तर कोणीं अर्धाच, आणि तोही तिघांचौघांनीं, असाच हात वर केला! शिवाय वरील वक्त्याच्या भाषणाचा असाही प्रकार नजरेस येतो कीं, जें भाषण मुंबईस होऊन श्रोतृमंडळींच्या आग्रहास्तव छापलें गेलें, तेंच येथें व तेंच लंडन्‌मध्यें! त्याच सुमारास एक अमेरिकन् प्रोफेसर्१ सीलि नामेंकरून येथें आले होते; त्यांची जशी छापील भाषण करण्याची तऱ्हा होती, तसाच प्रकार प्रतापचंद्र यांचा आहेसा दिसतो. तसेंच धर्मोपदेशकाच्या अंगीं जी गंभीरता व औत्सुक्य दृष्टीस पडावें तेंही प्रस्तुत वक्त्याच्या अंगीं विशेष दिसत नाहीं. पुण्यांतून नुकते यशस्वी होऊन गेलेले जे दयानंदस्वामी यांच्याप्रमाणेंच वरील बाबूंस कुचेष्टा करण्यांत मोठी प्रतिष्ठा वाटते. नवा धर्म जो स्थापायाचा तो जुन्याची विटंबना केल्यानें व पोरांसोरांस व मूर्ख लोकांस हंसवण्यानें, येवढ्यानेंच केवळ स्थापला जाईल अशी त्यांची समजूत आहेशी दिसते. असो; एकंदरींत सर्व गुणांनीं या दुसऱ्या वक्त्याची योग्यता पहिल्याहून पुष्कळ कमी येईल असें आह्मांस खास वाटतें.

आतां सरतेशेवटीं वरील दोघांहूनही जाडी प्रकरण जे वरील महाविख्यात स्वामी त्यांच्याविषयीं कांहीं लिहून हा अंक व हा भाग आटपतों. यांस वरील दोघां बाबूंच्याहूनही वरच्या पदवीस चढवण्याचें कारण उघडच आहे कीं, ते त्यांच्यासारखे केवळ प्रेषित होऊं पाहत नाहींत; तर बुद्ध, ख्रिस्त, महंमद, राममोहन राय, यांच्याप्रमाणें नव्या पंथाचा प्रवर्तकच होण्याची त्यांनीं उमेद धरली आहे. स्वामिमहाराजांनीं आमच्या पुण्यपत्तनास आपल्या पवित्र मूर्तीनें पावन करून कांहीं महिन्यांपूर्वी देशोन्नत्यर्थ जीं अनेक व्याख्यानें दिलीं त्यांतील एकांत आपल्या भाविक शिष्यवृंदास आपला चरित्रमहिमा त्यांनीं ऐकविला. त्यावरून असें कळतें कीं, आर्यसमाजवाल्यांची पुण्यभूमि व महातीर्थ गुजराथेंतील अजमीर नामक गांव होणार! कबीर, तुळशीदास, तुकाराम, वगैरे आजपर्यंत थोर व पुण्यशील मानलेल्या महामूर्ख, व महादुष्ट लोकांची तेजोहानि करून महार मांगप्रभृति शूद्रजातींचा अभ्युदय करणारें तेज तेथें उदय पावलें. हें या आर्यभूमीवर तिच्या मोठ्या सुदैवानें आज चाळीस वर्षें झळकत असून आलीकडे दोन तीन वर्षांपर्यंत तें जागच्या जागींच दडून कसें राहिलें याचा आह्मांस मोठा चमत्कार वाटतो व चित्तास अत्यंत विषाद होतो! प्रस्तुत भद्रपुरुष हे आपल्या देशबंधूंच्या पारलौकिक हिताची येवढी कळकळ बाळगीत असतां आज निदान वीस वर्षे तरी मूर्तिपूजेच्या घोर पापमार्गास अनुसरल्यानें कोट्यवधि लोकांच्या आत्म्यांचें जें आज अक्षय नुकसान झालें तें त्यांच्यानें खुशालपणीं कसें पाहवलें कोण जाणे!

१. वरील साहेबांनीं ख्रिस्ती धर्माच्या गौरवाचें असें एक व्याख्यान येथें दिलें. तें पहिल्या प्रसंगास बरेंच चित्तवेधक होतें. पण पुढें एके दिवशीं पाहतां तें जसेंचें तसें शब्दानशब्द एका लहानशा पुस्तकांत वरील प्रोफेसरांचे नांवानें छापलेलें सांपडलें! हा प्रकार आपलेंच द्रव्य आपण चोरल्यासारखा होय!

त्यांचे कित्येक महाविद्वान् शिष्य तर त्यांस लूथर्ची उपमा देतात; व सकृद्दर्शनीं निदान बहिरंगदृष्ट्या तरी तिजवर कोणीही आक्षेप घेईलसें वाटत नाहीं. मग स्वामींचें अंतरंगच येवढें कठोर कां बरें? त्यांनीं स्वचरित्रांत सांगितलें आहे कीं, त्यांचा मामा वारला असतां ते वयानें लहान असतांही त्यांच्या डोळ्यास टिपूसही आलें नाहीं; तेंच निर्वाण निर्ममत्व तर वयःपरत्वें उत्तरोत्तर परिपक्व दशेस आलें नसेल ना!

दयानंदजींनीं धर्मविषयावर जीं आलीकडे कित्येक नवीं मतें प्रगट केलीं आहेत,—कीं जीं त्यांच्या सच्छिष्यांनीं मोठ्या प्रेमळ भक्तीनें टिपून घेऊन त्यांचा चोहोंकडे मोठ्या आस्थेनें प्रसार मांडला आहे; व ज्यांच्या योगानें संस्कृतशून्यासही अकस्मात् विद्वत्त्वाची स्फूर्ति होऊन बऱ्या बऱ्या पंडितांशींही टक्कर मारण्याचें अंगीं सामर्थ्य येतें,¹—त्याविषयीं येथें विचार करायाचा नाहीं. त्याविषयीं पुढें प्रसंगोपात्त एकादे निबंधांत स्वतंत्रपणें लिहितां येईल. तसेंच स्वामींची विद्वत्ता कशी काय आहे याविषयींही आह्मांस लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांच्या प्रसादानें ज्यांस चार दिवसांत चार वेद पालथे घालतां आले, व यजुर्वेद तर पांढऱ्याचा काळा व काळ्याचा पांढरा होऊन गेला, त्यांजवरच स्वामींचे पोवाडे गाण्याचें, किंवा कवित्वशक्ति शेष राहिली असल्यास एकादें वरिरसप्रधान काव्य रचण्याचें आह्मी सोंपवून देतों. या ठिकाणीं फक्त वक्तृत्वाच्या संबंधानें प्रस्तुत परमहंसांची योग्यता कितीशी आहे ती पाहूं.

वरील वक्तृत्वाचें स्वरूप या शहरच्या लोकांत जसें पूर्णपणें दृष्टीस पडलें तसें इतर कोणत्याही ठिकाणीं पडलें नसेल. बाकी पुष्कळ ठिकाणीं ह्मणजे मुंबई, अमदाबाद, नाशिक, सातारा, वगैरे शहरीं सद्धर्मविवेचनेच्छु लोकांनीं स्वामींस पाचारण करून त्यांचें अमूल्य ज्ञान मोठ्या भक्तीनें श्रवण केलें; पण पुण्यास जसा थाट उडाला तसा कोठेंही नाहीं. गेल्या जुलई व आगस्ट महिन्याभर स्वामींच्या नांवावर सगळें शहर जसें काय झुलत होतें! दर रोज रात्रीं दिवसां स्वामींच्या भोंवतीं ज्ञानेच्छु मंडळीची सारखी झिंमड! फार तर काय, पण सगळ्या लोकांत ज्ञानाच्या संबंधानें केवळ श्रेष्ठ म्हणून मिरवणाऱ्या अशा पुण्याच्या पुढारी लोकांसही स्वामींनीं असे आपले अंकित करून सोडले होते कीं, त्यांच्या सेवेव्यतिरिक्त त्यांस कांहीं दुसरें सुचेनासेंच झालें! तेहेतीस कोटि देव सोडून देऊन एका देवास भजा, मूर्ति-पूजनाचा घोर पापमार्ग सोडून द्या, तो देवास खचीत अगदीं आवडत नाहीं, व त्यामुळेंच तर आपल्या देशाचें व प्राचीन ग्रीक्, रोमन्, मिसरी, पारसीक, इत्यादि लोकांचें देवानें रागानें वाटोळें करून टाकलें, दोन तीन वर्षांमागें पंढरपूरच्या देवास जशी भिक्षा मिळाली तसा प्रकार जेव्हां घरोघर सुरू कराल तेव्हांच देशाच्या उन्नतीस आरंभ होईल, ब्राह्मणांचें व

---

१. वरील प्रसाद केवळ एतद्देशीयांसच झाला असता तर इतकें नवल नव्हतें; पण चमत्कार काय कीं, जेथें वेदविद्येचा किंबहुना नुसत्या संस्कृताच्या ज्ञानाचाही प्रवेश होण्याचा फारसा संभव नाहीं, अशा माजिस्ट्रेटी कोर्टांसही तो लाभ झाला. स्वामींच्या मिरवणुकीपासून उत्पन्न झालेल्या गाढवाच्या खटल्यावर आमच्या माजिस्ट्रेटसाहेबांनीं जें फाइंडिंग (अभिप्राय) लिहिलें आहे तें मोक्षमुल्लर साहेबांनीं किंवा होग साहेबांनीं लिहिलें आहे कीं काय असा भास होतो!

मटांचें माहात्म्य वाढवून त्यांनीं उपदेशिलेल्या मार्गास अनुसरून रे तुमचें काय कल्याण होणार!—मराठीशाही बुडून चोहोंकडे इंग्रेजी झाली आहे हेंही तुझी कसें लक्षांत आणीत नाहीं! तीं तुमचीं जुनीं देवळें, जुनीं व्यासपीठें, जुनीं धर्मपुस्तकें, वगैरे सर्व आतां विसरा; हल्लीं इंग्रेजी राज्यांत नवीं नव्या पद्धतीचीं मंदिरें जेव्हां बांधाल, खुर्च्या, टेबलें, आंत ठेवाल, 'प्रार्थनासंगीता' सारखीं अगदीं गाळीव धर्मतत्त्वांचीं अत्यंत शुद्ध अशीं जेव्हां पुस्तकें बाळगाल, व युनिव्हर्सिटींत पसार होऊन मोठाले किताब मिळवलेल्या एकाद्या विद्वानास धरून त्याच्या धोरणानें जेव्हां चालाल तेव्हां स्वर्गाचा मार्ग तुझांस दिसेल; पूर्वींचे मार्ग आतां सारे बंद झाले आहेत—अशा प्रकारचा उपदेश मिशनरी लोक व त्यांच्याच मतांचें थोडेसें रूपांतर करून देशास नवा धर्म देऊं पाहणारे आमचे नवीन पंडित हे आज वर्षानुवर्षे करीत आले. पण त्यांच्या इतक्या दिवसांच्या उपदेशानें, इतक्या व्याख्यानांनीं, इतक्या मासिक पुस्तकांनीं व इतक्या ग्रंथांनीं तेहेतीस कोटींतला एकही देव कमी झाला नाहीं, किंवा एकही मूर्ति भंगली नाहीं! तेव्हां अशा संधीस प्रस्तुत परमहंसाचा जो उदय झाला तो त्यांस किती अभिनंदनीय होय हें सर्वांस सहज समजेल! वरील मंडळींचें फसे काय, कीं ज्यांच्या उद्धारार्थ ते स्वर्गास शिड्या लावण्याची तजवीज करीत त्या सामान्य लोकांचा त्यांजवर बिलकुल विश्वासच मुळीं बसत नसे. ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या लोकांस तर ते बाटगेच ह्मणत, व इतरांस धर्मभ्रष्ट किंवा नास्तिक ह्मणत.तेव्हां उपदेशाचा मार्ग येथेंच अगोदर खुंटला. पण दयानंदजींची कशी मौज आहे! ते परिव्राजकाचार्य असल्यामुळें विरक्त, धर्मशील वगैरे तर झालेच; शिवाय विद्वत्तेची मोठी ख्याति असून वेदग्रंथांचा तर त्यांस अतोनात अभिमान;—तो हरएक प्रसंगीं ते बोलून दाखवतातच! तेव्हां वरील गुणांनीं लोकांचा विश्वास जडण्याचें त्यांजपाशीं उत्कृष्ट साधन असून शिवाय वरील धर्मस्थापकांचा मुख्य जो मुद्दा कीं कसा तरी मूर्तींचा एकदां सत्यानाश होवो, तो कटाक्ष वरील बोवांचा तर त्यांच्याहूनही चौपट! तर याप्रमाणें वरील सर्वोत्कृष्ट सोयी असल्यामुळें स्वामीमजकुरांचा जेथें तेथें मोठा आदरसत्कार झाला. शिष्यपरिवारासह यथेच्छ चमचमीत पाहुणचार, धर्मजिज्ञासु व मुमुक्षु जनांची दर्शनार्थ नेहेमी दाटी, विद्वत्तादि गुणांचा सर्वतोमुख जयजयकार अशा सोहळ्यांत त्यांचें जेथें तेथें कालक्रमण झालें. पुण्यांत तर मागें सांगितल्याप्रमाणें स्वामींचा जो सत्कार झाला तो कांहीं विचारूंच नये! त्यांतून 'हिंदुक्लब्' मध्यें व्याख्यानसमयीं जो थाट नजरेस पडे तो तर कांहीं अवर्णनीय! श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य उंच व्यासपीठावर खुर्चीवर बसलेले, त्यांच्या सरस्वतीच्या ओघाचा थेंब ना थेंब टिपून घेण्यास

१. इंग्लंडांत शंभर वर्षांपूर्वी 'जॉन्सनचा क्लब' ह्मणून एक मोठमोठ्या नामांकित पंडितांची मंडळी दर आठवड्यास एके ठिकाणीं जमत असे. त्या धाटणीवर वरील 'क्लब' येथें एका प्रसिद्ध ठिकाणीं कांहीं दिवस जमत असे. पण इंग्लंड तो इंग्लंड आणि हिंदुस्थान तो हिंदुस्थान! 'जॉन्सन्चा क्लब' सुमारें पन्नास साठ वर्षें सारखा चालला होता; आणि आमचा तितके दिवसही चालला कीं नाहीं कोण जाणें! कांहीं दिवसांपूर्वीं त्याचा मिलाफ येथील 'गायनसमाजा'शीं होणार ह्मणन ऐकिलें होतें. हा अपूर्व संयोग कोणत्या रसायनव्यापारानें होणार होता कोण जाणे!

लेखक मंडळी जवळ बसलेली, भोंवताली स्वामींचे मुख्य पुरस्कर्ते असे कोणी बडे विद्वान् कोणी छोटे विद्वान् वक्तृत्वाचें सेवन करून मान डोलविण्यास व हंसून विनोदास रंग आणण्यास सदा तत्पर असलेले, आणि सगळ्या दिवाणखान्यांत कोणी केवळ मौज पाहण्याकरतां, कोणी मूर्तिपूजेस कंटाळून तींतून सप्रमाण मुक्त होण्याकरतां, कोणी वक्तृत्वाचा लाभ करून घेण्याकरतां, कोणी ब्राह्मणांची व भटांची फजिती ऐकण्याकरतां, अशा निरनिराळ्या उद्देशांनीं जमलेल्या मंडळीचा थाट! असा अपूर्व श्रोतृवृंद पाहून कोणत्या वक्त्यास आपली धन्य वाटणार नाहीं! मग अगोदरच पंडितंमन्य व अहंकाराचें केवळ वसतिस्थान असे आमचे परमहंस तर केवळ अकांड तांडव करूं लागले यांत काय आश्चर्य? प्रार्थनासमाजाच्या धुरंधरांनीं पुढें पुढें करून आपली जी येवढी मिजास चालवली आहे, व मंडळीचा थाट जमवून ते आपणास हातावर झेलीत आहेत, याचें गुप्त बीज काय याचा विचार स्वामी महाराज आपली विशाळ बुद्धि अंमळ खर्च करून जर करते; तर त्यांची खात्री झाली असती कीं, ज्यांचा जन्म वेदशास्त्रादिकांचा निवळ अज्ञानानें व दुराग्रहानें उपहास करण्यांत गेला, ज्यांस या देशांत नुसतें बरें म्हणण्याजोगतेंही आजपर्यंत कांहींच दिसलें नाहीं, वैदिक मार्गाचा उत्कर्ष करण्याची ज्यांची इच्छा तर अशी प्रबळ आहे कीं, तो सगळा एकीकडे गुंडाळून ठेवून किंबहुना त्याचा उच्छेद करून डोळे मिटण्याचा व गाणें बजावणें करण्याचा धर्म चोहोंकडे फैलावण्याचा ज्यांचा यत्न सतत चालू आहे, ते आपल्या चरणीं येवढे लीन जे झाले आहेत ते आपलें अज्ञान नाहींसें करून घेऊन आपला मूर्खपणा पदरीं घेण्याकरतां झाले असतील असें नाहीं! मनुष्यस्वभावाची ज्यास लेशमात्र म्हणून ओळख आहे, त्यासही वरील विरोध तेव्हांच भासला असता, व यांत कांहीं तरी गोम आहे असा संशय आला असता. पण स्वामींस तसें बिलकुल झालें नाहीं. आपल्या दररोजच्या वंदीस भुलून गेल्यामुळें त्यांची युक्ती, प्रमाण, अनुमान वगैरे सर्व लटपटून गेलें! ज्यास खरोखरच धर्माची सुधारणा करण्याचें मनांत असून नवा पंथ स्थापायाचा असेल, तो आपल्या प्रतिपक्ष्यांच्या मतलबी मानसन्मानास कधीं भुलायाचा नाहीं. त्यांतून भारती युद्धांत शिखंडीनें जें पांडवांचें कार्य करून दिलें, किंवा एकाद्या किल्ल्याचा दरवाजा फोडणें असतां उंटास पुढें करून जें काम करून घेतात, तसा उपयोग आपली अंजारणी गोंजारणी करून कोणीं करून घेण्याचें मनांत आणल्यास तर कोणत्याही सामान्य मनुष्यास अतिशय राग येईल. पण प्रार्थनासमाजाच्या अध्वर्यूंनीं आपल्या पंथाच्या पुष्टयर्थ बळी देण्याकरतां आर्यसमाजाची स्वामींच्या द्वारें उत्पत्ति करून त्याचें वरील दुष्ट हेतूनें पोषण करण्याचा घाट घातला असतां त्याच्या जनकाच्या बिचाऱ्याच्या तें मुळींच ध्यानीं मनींही नाहीं!

स्वामींच्या वक्तृत्वाच्या परीक्षेस येवढी प्रस्तावना पुरे आहे. ही इतकी लांब लिहिली हेंही कित्येकांस कदाचित् नीट वाटणार नाहीं. पण या शहरांत महिना दोन महिने सारखे गाजून केवळ अजेयत्वानें जे चोहोंकडे मिरवत होते, ज्यांचीं व्याख्यानें (येवढा शब्द तरी स्वामींच्या मतलबी पुरस्कर्त्यांनीच त्यांच्या भाषणांस दिलेला, एरवीं त्यांस तो पुरतेपणीं शोभण्याची मारामारच!) बडे बडे विद्वानही शिंगें मोडून वांसरांत

शिरून पोरांसोरांबरोबर मोठीं भक्तिपुरस्सर ऐक्त होते, ज्यांनीं आज हजारों वर्षे पडलेल्या प्रवाहास सहस्रबाहु‡ अर्जुनाप्रमाणें सहसा रोध करून या आर्यभूमीच्या हितकत्यांत पहिली पायरी पटकावण्याची हांव बांधली आहे, व वरील महान् उपकाराबद्दल पदरजीं लीन होत्सात्या ज्यांच्या सच्छिष्यांनीं त्यांस गजेंद्रमस्तकारूढ करून मोठ्या जयघोषानें व समारंभानें एकाद्या समरविजयी वीराप्रमाणें त्यांकडून पुरप्रवेश करविला,' अशा श्रीमत्परमहंस-

---

‡ सहस्रार्जुन ऊर्फ कार्तवीर्य:--दत्तात्रेयाची पूजा करून त्यापासून हजार हात, सुवर्णरथ, अजेयत्व, रथांतून वाटेल तिकडे जाण्याचें सामर्थ्य वगैरे वर यानें मिळविले. रावणाचा पराभव करून त्याला एका कोंपऱ्यांत यानें जनावराप्रमाणें बांधून ठेवलें. परशुरामाचा पूज्य पिता जमदग्नि याची कामधेनु बलात्कारानें हरण करून नेल्यामुळें परशुरामानें याचा वध केला. 'सम्पादक'

१. श्रीमत्परमहंसांनीं आपल्या चुटपुटत्या शास्त्रज्ञानानें पुण्याच्याचशा काय, पण एकंदर सगळ्या भारतवर्षांच पंडितांचाही पराभव करून टाकला, व त्यांच्याशीं वादास उभें राहण्यास कोणाचीही छाती होईना, येवढा प्रताप आमच्या मतें कोणत्याही समंजस व सुज्ञ मनुष्यास पुरेसा झाला असता. पण रिपुषट्काचा स्वामींनीं जय केला असतांही त्यांतील पांचवा एकाएकीं उच्छृंखल होऊन त्यानें शिष्यमंडळीस जें प्रेमाचें व भक्तीचें भरतें आलें त्यास साहाय्य केलें. स्वामींची एकाद्या नव्या नवऱ्या मुलाप्रमाणें मोठ्या थाटाची वरात निघणार ही बातमी पुष्कळांस अगोदर खरीशीही वाटेना; मत्सरयंत्रावरील भटांनीं उगीच द्वेषबुद्धीनें ती पिकवली असेल असें वाटलें. पण अंमलशानें पाहतात तों सर्वांची भ्रांति फिटली. महारांपोरांनीं व कामाठ्यांनीं मशाली व दिवट्या धरल्या आहेत, परमहंस गजेंद्रावर आरूढ झाले आहेत, पुढें वाजांचे ताफे चालले आहेत, व लबाड आणि दुष्ट ब्राह्मणांच्या चिरकालिक दास्यांतून विमुक्त झालेले असे त्यांचे शिष्य मोठी कृतकृत्यता मानून आपल्या सद्गुरूंचा पार्श्वभाग सुशोभित करताहेत, अशा थाटानें पालखींत मिरवलेल्या शास्त्र्याच्या सवाईनें स्वारी ब्राह्मणांचें नाक ठेंचीतच शहरांत प्रवेश करती झाली. शेवटीं बुधवारांत दाखल होऊन ज्या ठिकाणाहून दयेचें व आनंदाचें शुभवर्तमान चोहोंकडे फैलावलें त्या पवित्र जागीं सगळे वऱ्हाडी येऊन दाखल झाले. श्रीमंत सिंहासनावर चढले; मग सद्धर्माच्या प्रीत्यर्थ येवढा खटाटोप करून थकलेली भागलेली अशी शिष्यमंडळी मोठी कृतकृत्य होत्साती जागजागीं बसली. नंतर एका दोघां सच्छिष्यांनीं सुरस भाषणें करून एका पंडिताकडून जगद्गुरूंचा स्तुतिपाठ करविला. याप्रमाणें महिना दीड महिना चाललेल्या खटपटीचा सर्व बऱ्या प्रकारें शेवट होऊन एका समाजस्थापनाखेरीज कोणतीही कर्तव्यता उरली नाहींशी दिसली. पण देवाची लीला अगाध! त्याचें मूर्तत्व नाहींसें करून टाकून वास्तव स्वरूपाची प्रतीति लोकांच्या हृदयांत ठसवण्यास दयानंदजींनीं व त्यांच्या चेल्यांनीं येवढा विभु रचला असतांही तो अकस्मात् हासडून सर्वांवर दे माय धरणी ठाय असा प्रसंग एकाएकीं येऊन गुजरला. छावण्याची मंडळी जी बाहेर उभी राहिली होती तिचा व त्यांच्याहून आत्म्याची कळकळ ज्यांस विशेष अशी खाशी मंडळी जी वर माडीवर बसली होती तिची एका अर्ध्या घटकेंत जी तारंबळ व जी त्रेधा उडून गेली ती सांगतां पुरवत नाहीं! ज्या गजेंद्रानें स्वामींची वरात सुशोभित करून आपलें जीवित धन्य करून घेतलें त्याची कोणीं शेपूट ओढून कोणीं सोंड ओढून व महातांस तिसऱ्या ठिकाणीं फुकटाफाकट प्रायश्चित्त मिळून पुण्याच्या दुष्ट व दांडग्या ब्राह्मणांनीं गाढवासारखा माघारीं घार पळवून लावला; ज्या दीपिका या शहरांतील शंभर दीडशें वर्षे सांचलेल्या मूर्तिजन्य अंधकारासच वर्णों काय दूर करीत होत्या त्याही एकदम माळवून दिवट्यांस पलायन कर-

[ पुढें चालू ]

परिव्राजकाचार्यवर्यत्वाद्यनेकगुणविराजमान दयानंदजींचा गुणानुवाद पृष्ठ अर्धपृष्ठांत कसा आटपेल? शिवाय स्वामीमहाराजांचा यशोदुंदुभि पत्रोपत्रीं अनेकदां वाजवून त्यांच्या उपासकांनीं तर तो दूरदूरच्या प्रदेशांपर्यंत पोंचून दीर्घ काळ राहण्याचीही मार्गें सांगितल्याप्रमाणें तजवीज केली आहे. तेव्हां त्यास अनुलक्ष्म झटलें ह्मणजे वर जो विस्तार झाला तो कांहींच नाहीं असें ह्मटलें पाहिजे. मूर्तिपूजेवर व तदनुषंगेंकरून तत्प्रतिपादक ग्रंथांवर व लोकांवर स्वामींनीं आपल्या व्याख्यानांत जो पांडित्याचा भयंकर कहर उसळवून दिला आहे, त्यांत तथ्य कितपत आहे; प्रस्तुत मार्गास वेदांत आधार आहे कीं नाहीं; स्वामींच्या व्याख्यानांत यज्ञाविषयीं, हवा शुद्ध होण्याविषयीं, विमानांविषयीं, तारायंत्राविषयीं, वगैरे जो मजकूर आहे तो 'प्रमाणसे, युक्तीसे, अनुमानसे' कितपतसा खरा ठरेल, कीं सारा 'गोलंकार'च होय; तसेंच निरनिराळ्या शास्त्रांतील वगैरे जे आधार दाखवले आहेत ते अगदीं यथार्थ असून पंडितजींची अखिलशास्त्रपारंगतता सत्य आहे, कीं त्यांच्या भाविक शिष्यवर्गाची ती केवळ प्रेमाची उकळी आहे; वगैरे गोष्टींविषयीं जर यथास्थित निरूपण करूं ह्मटलें तर बराच ग्रंथ माजेल. यास्तव स्वामींच्या निमित्त येथें जो मोठा समारंभ झाला त्याची, आर्यसमाजाची, व खुद्द स्वामींची वर जी थोडी हकीकत दिली ती विषयाचें महत्त्व पाहतां वाचकांस अप्रासंगिक वाटणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

आतां स्वामींचें वक्तृत्व. या फारा दिवसांनीं सांपडलेल्या सद्गुरूचे ठायीं त्यांचे चेले ज्या ज्या गुणांचा मोठ्या प्रेमळ व भाविक बुद्धीनें आरोप करतात त्यापैकीं वरील गुण हा एक मोठा आहे. स्वामींची विद्वत्ता कांहींही असो; त्यांच्या व्याख्यानांत व कोट्यांत 'जुक्ती' कितीही असो; निदानपक्षीं प्रस्तुत वक्तृत्वाचा गुण तरी त्यांच्यांत मोठा वर्णनीय आहे यांत कांहीं संशय नाहीं, असा वरील शिष्यांचा व इतर पुष्कळ लोकांचाही अभिप्राय पडेल. पण याच्या पूर्वींच्या †अंकांत वक्तृत्वाची दशा हल्लीं आपल्या देशांत कोणती आहे व त्याची अभिज्ञता तरी कितपत आहे यांविषयीं जें लिहिलें आहे त्यावरून पाहतां वरील

---

त्यांतच निभावणूक दिसली; वाजेवाल्यांनीं व तासेवाल्यांनीं तोच मुक्तीचा मार्ग पसंत केला; इतक्यांत पोलीसचे शिपाई धांवत आले, त्यांचाही चार पांच हजार लोकांच्या गर्दींत मोठ्या मारामारीनें रिघाव होऊन मग त्यांनीं जो दांडक्यांचा व वाद्यांचा मार सुरू केला तो मोठा कठिण! शेंकडों लोकांस स्वामींचें वक्तृत्व व त्यांच्या रुचिष्ठ्यांची प्रेमळ भक्ति हीं फळास आलीं;—कोणाच्या वांट्यास दांडकीं, कोणाच्या चाबूक, कोणाच्या धोंडे, निदान चिखलाचे लपके तरी, असा प्रसाद सर्वांस पंक्तिभेद न होतां भरपूर वांटला गेला. माडीवरील मंडळी खिडक्या लावून बसली होती; कोणीं मधें मधें उगीच एकादी खिडकी अंमळ किलकिली करून खालची मौज पाहूं लागावें तों आलाच चिखलाचा लपका! याप्रमाणें सप्टेंबर महिन्याची पांचवी तारीख मोहोरमच्या दहावीप्रमाणें या वर्षी पुण्यास गाजली! असो; या छोट्याशा नाटकाची परिसमाप्ति शेवटीं अशी झाली कीं, स्वामींच्या जवळ निदानींच्या समयीं एकही सच्छिष्य न राहून ज्यानें त्यानें आपली वाट काढली. शेवटीं पंधरा वीस एके बाजूस व पंधरा वीस दुसरे बाजूस अशी पोलीसांची रांग दुतर्फा चालून मागून जयघोष होत्साती स्वामींची स्वारी निजधामाला चालती झाली!

† पृष्ठ २८९,२९७,२९८ पाहा. 'सम्पादक' (अंक २१ परिशिष्ट)

अभिप्रायाचें कोणत्याही समंजस मनुष्यास फारसें आश्चर्य वाटणार नाहीं. वक्तृत्वाचें तेज हुद्द्याच्या व लौकिकाच्या जोरावर किती पर्यंत असतें याविषयीं आह्मीं मागें लिहिलेंच आहे. गवर्नर् साहेब, कलेक्टर् साहेब वगैरेंची गोष्ट तर राहोच; पण एकाद्या मामलेदारानें किंवा शाळांवरील इन्स्पेक्टरानें कोठें कसेंही भाषण केलें, तरी तें 'सुरस' 'मनोवेधक' वगैरे असायाचेंच. तसेंच स्वदेशाच्या हलाखीबद्दल, धर्माच्या नीचावस्थेबद्दल वगैरे कोणीं व्याख्यान दिलें किंवा कीर्तन केलें, कीं विद्वान् व सुज्ञ मंडळी अवश्य गोळा होऊन त्या वक्त्याच्या भाषणास किंवा कीर्तनकाराच्या शोकपर आख्यानास अवश्य मान मिळायाचाच. पूर्वींच्या धर्मभोळ्या लोकांचा कीर्तनावर जसा भाव असे, व कीर्तनास जातांना दर एक पावलास शंभर अश्वमेध केल्याचें पुण्य लागतें वगैरे समजुती असत, त्याचप्रमाणें हल्लीं नव्या तऱ्हेचे भक्तिभाव जडले आहेत. पुस्तकालय, पदार्थसंग्रहालय वगैरेंची स्थापना होत असल्यास कधीं आडकाठी घालूं नये, मग त्यांकडे उभ्या वर्षांत कोणी ढुंकूनही पाहिलें नाहीं तरी चिंता नाहीं; भटांभिक्षुकांच्या हातीं कधीं एक छदामही लागूं देऊं नये. पण दयानंदजींच्यासारखे एकादे अगदीं निःस्पृह देशहितचिंतक कोठेंही गेले असतां शिष्यपरिवारासह त्यांची बरदास्त जितकी भरपूर ठेवावी तितकी आर्यजननीच्या घरीं रुजू होते; एकादा उत्कृष्ट कीर्तनकार गांवांत आला तर त्यास कोणीही विचारायाचें नाहीं, पण स्वदेशाचा विषय पुढें करून कोणी रडगाणें गाण्यास उभा राहिला कीं विद्वान् मंडळीची ऐकायाला दाटी; कैलासवासी परशुरामपंत गोडबोल्यांसारखा सज्जन व खरा परोपकारी गृहस्थ मरण पावला तर त्याबद्दल फारशी विचारपूसही व्हावयाची नाहीं, पण एकादे बडे साहेब शेंकडों लोकांना बुडवून स्वर्गवासी झाले, की लागलीच त्यांच्या पराक्रमांचें स्मारक-कृत्य ! तर याच नव्या भक्तिभावास अनुसरून प्रस्तुत वक्त्याचा जो चोहोंकडे महिमा गाजतो आहे तो होय. मागील अंकाच्या एका टिपेंत एका वसईकर वक्त्याचा लौकिक लिहिला होता तो जसा त्यास केवळ नुसत्या बोलकेपणावरून मिळाला, व येथेंही एका वक्तृत्वनिष्ठ गृहस्थास प्रस्तुत गुणाबद्दल जसा गेल्या सालापर्यंत बराच मान मिळत असे, तशीच स्वामींचीही गोष्ट आहे. हे बोवा येथें इतके दिवस गाजले हा जर त्यांच्या रसवंतीचाच केवळ प्रताप ह्मणावा, तर मग मुंबई वगैरे ठिकाणींही तसें कां झालें नाहीं ? येथील 'ज्ञानप्रकाश' वगैरे पत्रांत स्वामींचा महिमा जसा सारखा गाजत होता तसें कांहीं महिन्यापूर्वीं 'इंदुप्रकाश'दि पत्रांतही कां दृष्टीस पडलें नाहीं ! उघडच आहे कीं, भावी[1] आर्यसमाजाच्या दोघां खंबीर खांबांनीं येथें स्वामींस जसें झेलून धरलें होतें, तसा पुरस्कार स्वामींस दुसऱ्या कोणतेही ठिकाणीं मिळाला नाहीं; आणि त्यामुळेंच परमहंसांच्या जिव्हाग्रावर वाग्देवीनें येथें जसें निर्भर तांडव केलें तसें इतर ठिकाणीं कोठेंही झालें नाहीं. तर याप्रमाणें पंडितजींच्या वक्तृत्व-कीर्तीचें पहिलें कारण स्थानमाहात्म्य होय. 'इसापनीती'तील खोपटावर चढलेल्या करडा-

१. वर ज्यास 'भावी' ह्मटलें तो आर्यसमाज स्वामींनीं येथून प्रयाण केल्यापासून दोनदां स्थापला गेला. हा असा वरचेवर कां ढासळतो कोण जाणे.' प्राणप्रतिष्ठेचा एकादा खरा मंत्र करून स्वामी आपल्या शिष्यांस देतील तर त्यांत दोघांचाही उपहास न होण्याची तजवीज होईल.

प्रमाणें† त्यास महदाश्रयानें उन्नति जर प्राप्त न होती तर भटांवर, ज्योतिष्यांवर, देवांवर, मूर्तीवर, पुराणांवर, फारतर काय, पण तुकाराम, तुळशीदास यांवर, व बिचाऱ्या कालिदासावरही, हे बडे वक्ते जसे यथास्थित घसरले तसें त्यांस घसरायास न सांपडतें! त्यांचा 'मतलबसिंधु,' 'गडबडाध्याय', 'गोलंकार' वगैरे चटसारें त्यांचें त्यांच्यापाशींच राहतें! दुसरें कारण विषयमाहात्म्य होय. आमच्या देशांत चोहोंकडे इंग्रेजी अंमल बसून राणीसाहेबांच्या रत्नजडित मुगुटानें, कमांडर्ं इन् चीफच्या तुऱ्यानें, व मडमांच्या गळचूर्णानें, तसेंच आगगाडी, तारायंत्र, फोटोग्राफ् वगैरे आश्चर्यमय कलांनीं ख्रिस्ती धर्मास अपूर्व शोभा येऊन तो इकडे जेव्हां चमकूं लागला तेव्हां आमच्या नव्या शिकलेल्या लोकांचे डोळे तेव्हांच दिपून गेले. त्यांस वाटूं लागलें कीं, ज्या धर्मांत इतक्या मौजा आहेत तोच खरा असला पाहिजे. आमचे बुधवारी पंचे नेसणारे भट, शालजोडी उडवणारे शास्त्री, यांच्यापाशीं कोठून खरा धर्म असणार! त्यांतून पाद्री साहेबांचीं कपटीं आर्जवें व निरनिराळ्या लालुची दाखवणें. तेव्हां अर्थातच या सर्व कारणांनीं ख्रिस्ती धर्माचें मोठें गौरव होऊन त्याच मानानें जुन्या धर्माची विटंबना. ही विटंबना आज चांगली वीस पंचवीस वर्षे मोठी जारी चालली आहे. नव्या विद्वन्मंडळांत वरील उपहासाचें सुख ज्यानें घेतलें नाहीं असा कदाचित् एकही पंडित सांपडणार नाहीं. असो; तेव्हां असा मौजेचा विषय असल्यावर व आमच्या स्वामींसारखे रंगेल नकले असल्यावर मग ती बहार काय विचारावी! चांगल्या प्रतिष्ठित ठिकाणीं व बड्या बड्या विद्वानांच्या मेळांत तमाशांतली मौज जर ऐक्यास सांपडते आहे, व त्यांतून पातक न होतां उलटा फुकटाफाकट पुण्यसंग्रहही जर होतो आहे, तर मग असली लाख रुपयांची वेळ कां दवडा! तर स्वामींचें वक्तृत्व कान भरून ऐकण्यास व हंशा पिकवण्यास जी शेंकडों मंडळी 'हिंदु क्लब्'मध्यें नेहेमी भरे त्याचें बीज वरील होय. आपल्या वक्तृत्वाचें सामर्थ्य किती आहे हें पाहायाचें असल्यास स्वामींनीं मूर्तिपूजेचें मंडन किंवा दुसरा एकादा विषय घेऊन पाहायाचा होता, म्हणजे त्याच ठिकाणीं रेवरेंड् नीळकंठशास्त्री यांच्या व्याख्यानाची जी मजा उडे तीच खास उडाली असती¹! असो; तर ज्या वक्तृत्वख्यातीवर स्वामींचे भक्त येवढ्या उड्या मारतात त्याचीं दोन मुख्य कारणें वरील होत. याखेरीज परमहंसांचा स्निग्ध व गंभीर आवाज, ती भव्य फुगीर मुद्रा, भगवी

---

† एका खोपटाच्या छपरावर चढलेल्या कोंकरानें खालून एक लांडगा जात होता त्याला मनसोक्त शिव्या दिल्या. तेव्हां लांडगा त्याला म्हणाला, "गर्विष्ठ प्राण्या, यांत तुझा कांहींच मोठेपणा नाहीं. तुला जी सुरक्षित जागा सांपडली आहे तिचें हें माहात्म्य आहे. एरव्हीं तुझी मला शिव्या देण्याची काय प्राज्ञा होती!" 'सम्पादक'

१. 'हिंदु क्लब्'मध्यें गेल्या जुलै महिन्यांत मोठी झटापट चालली होती. एक दिवस स्वामींचें व्याख्यान आणि दुसरे दिवशीं वरील रेवरेंड्बोवांचें. त्यांत मौज काय होई कीं स्वामींच्या वेळेस दिवाणखान्यांत जाण्याला रीघ नसे; आणि रेवरेंड् शास्त्रीबोवांच्या वेळेस एकेका श्रोत्यानें बरोबर हातरूण आणून प्रभु येशूचें ध्यान करण्याचें मनांत आणलें असतें तरी हवी तितकी जागा होती! आणि हातरुणाची गरजही खरीच!

कफनी, मुक्त्या डोक्यास गुंडाळून ते झोकदार सोडलेले पल्ले, डोळ्याचे नाटकी हावभाव, उंच आसन, वगैरे सर्व सामग्री ध्यानांत आणली असतां वक्तृत्वाचा परिपाक इतका उत्कृष्ट उतरला याचें कोणासही आश्चर्य वाटणार नाहीं !

असो; येथवर प्रस्तुत विषयाचा तिसरा भाग आटपला. आतां यापुढें शेवटल्या ह्मणजे चौथ्याविषयीं लिहून प्रस्तुत विषय समाप्त करूं.

---

केयूरा न विभूषयन्ति पुरुषं हारा न चन्द्रोज्ज्वला
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः ।
वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते
क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम् ॥ नीतिशतक.

अंक २५—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) वक्त्याचे गुण. (३) मनाचा शुद्धपणा. (४) विद्वत्त्व. (५) इतर गुण. (६) वक्तृत्वापासून उपयोग.

१. येथपर्यंत प्रस्तुत विषयाचे तीन विभाग झाले. आतां शेवटल्याविषयीं विचार करूं. यांतील विषय, वक्त्यास अत्यंत आवश्यक गुण कोणते, व प्रस्तुत कलेपासून उपयोग काय, वगैरे होय.

२. आतां पहिल्यानें वक्त्याचे गुण. हे गुण ह्मणजे मागें एके ठिकाणीं§ ( अंक २३ कलम ४ ) वक्त्यास आवश्यक असणारीं जीं साधनें सांगितलीं तीं नव्हेत. वरील साधनें सर्वथा बाह्य व प्रयत्नसाध्य होत. हे गुण ह्मटले ह्मणजे मागें* तिसऱ्या व चवथ्या अंकांत कवीचे कित्येक अंगभूत गुण जसे सांगितले तशांसारखे वक्त्यांच्या अंगीं जे जन्मसिद्धच असले पाहिजेत ते होत. हे एकदां चांगले समजले असतां कोणाही मनुष्यास कितपतसें वक्तृत्व करतां येईल याचा तेव्हांच अजमास काढतां येत जाईल.

३. वरील गुणांत पहिला ह्मटला असतां मनाचा शुद्धपणा ह्मणजे जें बोलणें तें केवळ मनापासून व मनाची पूर्ण खात्री होऊन बोलणें हें होय. प्रस्तुत मालेच्या चवथ्या अंकांत वरील गुण कवीस किती आवश्यक होय, व स्वानुभवावांचून केलेलीं वर्णनें किती नीरस व अप्रयोजक उतरतात हें बरेंच सविस्तर सांगितलें आहे. तेंच प्रस्तुत कलेसही लागू पडतें.

---

१. " पुरुषास शोभा जी येते ती बाहुभूषणांनीं, चंद्रासारख्या तेजस्वी हारांनीं, स्नानानें, गंधादिविलेपनानें, फुलांनीं, किंवा केशसंस्कारानें येत नाहीं; तर एका संस्कारयुक्त वाणीनेंच मनुष्य शोभा पावतो ! कां कीं, वरील सर्व भूषणें कल्पकालिक असून वाणीचें भूषण मात्र सतत राहणार होय. "

§ पृष्ठें २०८ पाहा. 'सम्पादक'

* पृष्ठें २९-३० व ३६-४० पाहा. 'सम्पादक'

कारण कवि व वक्ता या दोघांचाही उद्देश हृदयवृत्तींत क्षोभ उत्पन्न करावयाचा असल्यामुळे त्यांचे गुण पुष्कळ अंशीं एकमेकांशीं मिळतात. दोघांत मोठा भेद इतकाच आहे कीं, वक्त्यास तर्कशास्त्राचाही जसा अवश्य प्रयोग करावा लागतो तसा कवीस लागत नाहीं. चित्ताचें रंजन होऊन अंतःकरणांत रसाविर्भाव झाला ह्मणजे झालें कवीचें काम; मग त्यानें वर्णिलेल्या गोष्टी निवळ खोट्या असल्या, व केलेलें प्रतिपादन अगदीं चुकलेलें असलें तरी कांहीं हरकत नाहीं. पण वक्त्यास दोन्हीही सांभाळावी लागतात. नुसतें मनोरंजन झालें, व हृदयास मोठा द्रव येऊन डोळ्यांवाटे अश्रुधारा चालल्या, तर तेवढ्यानेंच वक्त्याचें कार्य झालें असें नाहीं. जे बुद्धीचे कोते असतील व युक्तिशून्य असतील त्यांस बरच्यासारखीं भाषणें यथार्थ वाटतील खरीं; पण सदसद्विवेकानें ज्यांच्या बुद्धीस रुक्षता व प्रखरत्व हीं आलीं असतील त्यांस वरील प्रकार मुळींच मान्य न होऊन त्यांस तो उलटा तिरस्कारास्पद व उपहास्यही वाटेल. असो; तर कवींत व वक्त्यांत हा विशेष आहे. तरी ज्या पक्षीं वक्तृत्वाचा मुख्य भाग श्रोत्यांचीं अंतःकरणें वश करून घेणें हाच होय, त्या पक्षीं वरील स्वानुभव कवीस जसा अवश्य होय तसाच तो वक्त्यासही होय. पण तो पूर्णपणें होणें हें वरील शुद्धतेखेरीज संभवत नाहीं. कालिदासानें ह्मटलें आहे,

छाया न मूर्छति मलोपहतप्रसादे
शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा ॥†

"मळानें ज्याचा स्वच्छपणा नाहींसा झाला आहे अशा आरशाच्या भिंगावर छाया नीट उठत नाहीं, पण तेंच शुद्ध ह्मणजे निर्मळ असेल तर तिचा प्रवेश आंत सहज होतो." तर हीच गोष्ट मनुष्याच्या मनासही लागते. ज्याच्या मनावर दंभ, स्वार्थबुद्धि, वगैरे दुर्विकारांचें पटल सांचलें नसेल त्याच्याच ठायीं कोणतीही थोर मनोवृत्ति यथास्थित प्रतिबिंबित होईल. आणि तसें झालें असतां प्रकाशकिरणांच्या धर्माप्रमाणें तिचें परावर्तनही तसेंच निर्मळ पडेल!

वर सांगितलेल्या गोष्टीचा प्रत्यय आजपर्यंत मोठ्या प्रख्यातीस चढलेल्या सर्व वक्त्यांच्या चरित्रांवरून येईल. पहिल्यानें डिमॉस्थेनीस् घ्या. या वक्त्याची स्वदेशप्रीति केवढी बलवत्तर होती हें त्याच्या मागें‡ सांगितलेल्या वृत्तांतावरून व त्याचा अंत कसा झाला यावरून स्पष्ट दिसून येतें. ज्या फिलिप् राजावर तो येवढा भडिमार करून सगळ्या ग्रीस देशाचें सतत प्रोत्साहन करीत होता त्याजपासून इतर कांहीं वक्त्यांप्रमाणें जर तो लांच घेता व त्याचा लाचार होऊन बसता, तर त्याच्या वक्तृत्वास कोणी विचारता ना, व तें अशा कडाक्याचेंही होतें ना. तसेंच त्या वक्तृत्वापासून जें मोठें कार्य निष्पन्न झालें कीं, त्याचे सगळे देशबांधव एकवट होऊन त्यांनीं मासिडनच्या राजाशीं शेवटला समरप्रसंग केला, त्याची तर एरवीं वार्ताही नको होती. दुसरें उदाहरण सिसरोचें. याच्याही वेळीं रोम शहराची स्थिति डिमॉस्थेनीसच्या वेळेच्या सारखीच झाली होती. ग्रीक् लोकांचें पूर्वीचें

† शाकुन्तल अङ्क ७ श्लोक ३२ पाहा. 'सम्पादक'
‡ पृष्ठ २४७–२४८ पाहा. 'सम्पादक'

शौर्य व देशप्रीति हीं नष्ट होत जाऊन फिलिप् राजास सगळा देश जसा सहज् पादाक्रांत करून टाकतां आला, त्याचप्रमाणें रोमन् लोकांचेंही पिऱ्हस्, हानिबल् यांच्या वेळचें मान, सिसरोच्या वेळेस अगदीं पालटून गेलें होतें. बुद्धीच्या व तरवारीच्या जोरानें जो सर्वांस डोईजड होईल त्यास सगळें राज्य आपल्या कबजांत आणण्यास फारसा प्रयत्न नको होता. ही गोष्ट सीजर यानें बहुतेक साध्य केलीच होती हें सर्वांस माहीत असेलच. असो; तर याप्रमाणें वरील वक्त्याच्या काळीं रोमन् लोकांचें पूर्वीचें सत्त्व अगदीं निघून गेलें होतें. अपार संपत्तीपासून होणारे वाईट परिणाम जे बलहीनत्व व दुराचारप्रीति यांचा त्या काळीं जिकडे तिकडे पुष्कळ प्रादुर्भाव झाला होता. अशा वेळींही 'भांगेंत तुळस' या ह्मणप्रमाणें कोणी कोणी सज्जन व थोर मनुष्य विरलतेनें आढळतातच. अशांपैकींच त्या वेळेस सिसरो हा होता. चोहोंकडे व विशेषतः श्रीमंत लोकांच्या घरोघर नाना तऱ्हेचे दुराचार माजले असतां, व पूर्वींच्या रोमन् लोकांचे सर्व सद्गुण नष्ट होत चालले असतां, सिसरोचे ठायीं मात्र पूर्वींच्या लोकांप्रमाणें स्वदेशप्रीति, सदाचरण, धर्मनिष्ठा हे गुण वसत होते. तर तात्पर्य काय कीं, वरील गुणांनीं प्रस्तुत वक्त्याचें मन अत्यंत शुद्ध राहिलें असल्यामुळें त्यानें वेरिस्, क्याटिलैन, आंटनी, यांवर जो तडाका उडवला तो उडाला. आपला मतलब साधण्याकरतां किंवा प्रतिष्ठा मिळवण्याकरतां जर तो सभाप्रस्थानीं उभा राहून पांडित्य करता, तर सला, सीजर अशांसही जो त्याचा धाक वाटे व क्याटिलैन, आंटनी अशांसारख्यांस त्यानें जें पळवून लावलें, तें कधींही झालें नसतें. तिसरें उदाहरण इंग्लंडांतील वक्त्यांचें. या वक्तृवर्गांत प्रमुख जो बर्क त्याविषयीं मागें अठराव्या अंकांत $ बराच मजकूर लिहिला आहे. त्यावरून आपल्या देशाशीं त्याचा बिलकुल संबंध नसतां केवळ भूतदयेनें व अंतःकरणाच्या कळवळ्यानें त्यानें इकडची अतोनात माहिती मिळवली, सात वर्षे हेस्टिंग्स् याचा पार्लमेंट् सभेंत सारखा पिच्छा पुरवला, व सात हजार कोस दूर असणाऱ्या हिंदुस्थानांतील लोकांचा स्वतःच वकील बनून त्यांच्या तर्फेनें पहिल्या गवर्नर् जनरलास आरोपी ठरवून पार्लमेंटांतील पिंजऱ्यांत उभा केला, या सर्व गोष्टींवरून त्याच्या मनाचा थोरपणा व शुद्धपणा स्पष्ट दिसून येतो. हेस्टिंग्स् याजवर त्यानें सात वर्षे सारखा जो गहजब उडवून दिला याचें कारण त्यांची पूर्वींची कांहीं चुरस होती ती होय, असें जें कित्येक ह्मणत असत त्याचें मेकॉलेनें आपल्या निबंधांत खंडन करून टाकलें आहे, व असें दर्शविलें आहे कीं, प्रस्तुत वक्त्यानें बंगाल लुटलेल्या प्रतिष्ठित दरवडेखोरावर † जो येवढा विभु रचला तो केवळ त्याच्या राक्षसी कृत्यांचा त्यास अतोनात संताप येऊन गेल्यामुळेंच होय[१].

---

$ पृष्ठें २५६–२५८ पाहा. † वॉरन् हेस्टिंग्स्. 'सम्पादक'

१. प्रस्तुत विषयाच्या संबंधाचा मेकॉलेचा लेख फार उत्कृष्ट आहे ह्मणून मागें § एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. तो वरील वक्त्याची योग्यता चांगली ध्यानांत येण्याकरतां समग्र वाचण्याविषयीं आह्मी येथें आमच्या वाचकांस पुनः शिफारस करतों. वॉरन् हेस्टिंग्स् याच्या एकंदर वर्तणुकीविषयीं व कृत्यां-

[ पुढें चालू. ]

§ पृष्ठें २५७–५८ पाहा. 'सम्पादक'

असो; तर वर जो वक्तृत्वास अत्यंत आवश्यक ह्मणून गुण सांगितला तो या तिसऱ्या महावक्त्याच्या ठायींही अगदीं परिपूर्ण होता. त्याच्या योगानेंच त्या सगळ्या प्रकरणास अतिशयित शोभा येऊन तो प्रसंग एकंदर जगाच्या चिरकाळ ध्यानांत राहण्यासारखा झाला आहे. वरील गुणानें बर्कच्या वक्तृत्वाचें तेज किती वाढलें व त्याच्या प्रतिपक्ष्यास तें केवढें दुःसह झालें याचा दाखला आह्मांपाशीं एक फार पसंत आहे. तो दुसऱ्या तिसऱ्याचा नव्हे; तर खुद्द खाशा स्वारींचाच आहे. हिंदुस्थानाचे पहिले आधिपति एक गुडघा टेकून पार्लमेंटाच्या पिंजऱ्यांत जेव्हां उभे राहिले, व पहिल्यानें बर्क यानें फिर्यादीचीं कलमें वाचून व एकंदर मोकदम्याचें स्वरूप सर्वांच्या लक्षांत आणून देऊन मुख्य आरोपावर जेव्हां भडिमार चालवला, तेव्हां त्याच्या मनाची जी स्थिति झाली ती त्यानें येणेंप्रमाणें लिहून ठेवली आहे. तो ह्मणतो, "त्या वेळेस एक अर्धा तासभर मी केवळ आश्चर्यस्तब्ध होत्साता वक्त्याकडे पाहत होतों; आणि त्याचे शब्द माझ्या हृदयास इतके टोंचले कीं, कांहीं वेळपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर माझ्यासारखा दुष्ट कोणी मनुष्य नसेल असें मला वाटत होतें!"

असो; बर्कच्या खालोखालचे मोठे नामांकित वक्ते जे होते पिट् व फॉक्स् वगैरे दुसरे कित्येक वक्ते, त्यांचीही अशीच गोष्ट होय. पहिला पिट् ऊर्फ लॉर्ड् च्याथम् याचें उदाहरण तर वरील सिद्धांताचा प्रत्यय दाखवणारें व त्याचें दृढीकरण करणारें मोठेंच उत्कृष्ट आहे. हा जेव्हां 'हौस ऑफ् कॉमन्स्' ( मध्यम प्रतीच्या लोकांची सभा ) हींत पहिल्यानें बोलूं लागला, त्या वेळेस राजाचे दिवाण सर् राबर्ट् वॉल्पोल् हे सगळा राज्यकारभार आपण हांकीत होते. वरील सभा केवळ नांवाला मात्र असून वॉल्पोल् जी करील ती पूर्वदिशा असा प्रकार होता. राजाचा खजिना स्वाधीन असल्यामुळें लोकांच्या तर्फेनें जो भांडायाला उठेल त्याची मूठ गच्च भरून दिवाण साहेबांनीं त्यास खालीं बसवून टाकावें. या श्लाघ्य कृत्यांत त्यांस इतकें यश आलें कीं, 'प्रत्येक मनुष्याची ज्याची त्याला किंमत आहे'[1] अशी त्यांनीं एक ह्मणच करून टाकली. ती यांच्या नांवावर अद्याप चालत आहे. असो; पण सरतेशेवटीं वरील प्रख्यात वक्ता मात्र त्यांस मोठा वस्ताद भेटला. त्यावर त्यांचे कुटिल प्रयोग सर्व

---

विषयीं प्रस्तुत ग्रंथकाराचे गोड गोड व लडिवाळपणाचे लेख कोणत्याही सत्यपक्षपाती व न्यायाभिमानी मनुष्यास, व त्यांतून एतद्देशीय वाचकांस तर, बिलकुल पसंत पडणार नाहींत हें खरें; तरी वरील निबंध मोठ्या सफाईनें लिहिला असल्यामुळे व वरच्यासारखीं उत्कृष्ट स्थळें त्यांत असल्यामुळें इकडील लोकांनीं तो विशेषेंकरून वाचण्यासारखा आहे.

१. 'Every man has his own price.' या ह्मणीवरून खरा प्रामाणिकपणा ह्मणून जगांत मुळींच नाहीं, अशी वरील प्रधानाची समजूत होती हें स्पष्ट दिसतें. हें अर्थातच सर्वांशीं खरें नाहीं. असें ह्मणणें ह्मणजे एकंदर मनुष्यजातीची अब्रू घेणें होय. असो. 'हितोपदेशां'त अशाच अर्थाची पण निराळ्या अभिप्रायानें केलेली एक उक्ति‡ आहे—

पंचभिर्याति दासत्वं पुराणैः कोऽपि मानवः । कोऽपि लक्षैः कृती कोऽपि लक्षैरपि न लभ्यते॥

‡ सुहृद्भेद श्लोक ९७ पाहा: "कोणी पांच पुराणां (चांदीचें नाणें, एकीं वजनाचा किंमतीचें) करतां गुलामगिरी पत्करील तर कोणी लाखानें धन्यता मानील. पण एखादा (असाहि निघेल की जो) लाखों रुपयांनांहि भुलणार नाहीं." असा अर्थ 'सम्पादक'

व्यर्थ होऊन त्यांस आपली आवडती म्हण माघारी घ्यावी लागली. पिट् हा त्या वेळेस वयानें लहान होता, पण वरील अमूल्य गुणास्तव त्याचें वजन चोहोंकडे एकदम असें बसून गेलें, व त्याच्या सरस्वतीच्या ओघास त्याच्या योगानें अशी उद्दामता प्राप्त झाली कीं, वरील दिवाणाचें तेज या नव्या वक्त्यापुढें लोपत चाललें. सरतेशेवटीं त्यास आपल्या हुद्द्याचा राजीनामा देणें भाग पडून सगळें राज्यतंत्र पिट् याच्या हातीं आलें. तें त्यानें कांहीं वर्षें मोठ्या दक्षतेनें सांभाळून आपल्या नांवाचा सगळ्या जगभर जयजयकार करून सोडला. आणि त्याच वेळेपासून कॉमन्स् लोकांच्या सभेचें जें राज्यांत वजन आहे तें बसलें.

असो; तर याचप्रमाणें मनाचें शुद्धत्व हा वक्त्यास अवश्य असणाऱ्या गुणांपैकीं पहिला होय. जें श्रोत्यांस सांगायाचें तें वक्त्यास पूर्णपणें भासून त्यानें अंतःकरणाच्या केवळ कळवळ्यानें जर प्रगट केलें नसेल, तर तें ऐकणारांच्या हृदयास विशेष म्हणण्यासारखा विकार करील हें मुळींच संभवत नाहीं. त्यानें ओढून ताणून आणलेल्या आवेशास कांहीं अतज्ज्ञ लोक कदाचित् भुलून जाऊन फसतील; पण खऱ्या मार्मिक श्रोत्यांस केवळ लटपट-पंची केल्यानें लेशमात्रही द्रव येणार नाहीं. यास्तव 'पुराणांतील वांगीं पुराणांत' असा कपटभाव मनांत धरून जो वक्तृत्व करील त्यानें तें न केलेलें बरें; कारण तशानें त्याचे श्रम तरी वांचतील. आपल्या भाषेंत एक उत्कृष्ट म्हण आहे, कीं 'जाळावांचून कड नाहीं; आणि मायेवांचून रड नाहीं.' तर या लहानशा वाक्यांत येथवर सांगितलेल्या सर्व गोष्टींचा थोड-क्यांत समावेश होतो.

४. वक्त्याच्या अंगीं अवश्य पाहिजे असा दुसरा गुण विद्वत्त्व होय, म्हणजे ज्या-विषयीं बोलायाचें त्याविषयींची पूर्ण माहिती असून साधक बाधक प्रमाणें त्यास सारीं अवगत पाहिजेत. शिवाय अनेक ग्रंथांच्या अवलोकनानें जें बहुश्रुतत्व अंगीं येतें तेंही त्यास अनुकूळ पाहिजे. अशी सर्व सामग्री असली म्हणजे ज्या विषयावर बोलायाचें त्याचें त्यास परिपूर्णतेनें उद्घाटन करतां येऊन श्रोत्यांचें मन संशयमुक्त होतें, व केलेलें भाषण त्यांच्या हृदयावर पूर्णपणें ठसतें. वर सांगितलेले तिन्ही वक्ते याप्रमाणेंच मोठे विद्वान् होते, व त्यांच्या कोटिक्रमापुढें कोणाचाही टिकाव निघत नसे. वरील गुण मुख्यत्वेंकरून वकिलां-च्या अंगीं अवश्य पाहिजेत. सिसरो तर मूळचा वकीलच होता; व बर्कनेंही पार्लमेंटांत आमच्या देशाची एक पैही फी न घेतां वकिलीच केली; आणि काळ्या गोऱ्या लोकांचा मोकदमा चालला असतां जसे अद्याप फैसले झालेले दृष्टीस पडतात तसाच वरील महा-प्रसंगींही येवढें अवडंबर रचलें असतांही झाला. असो; या ठिकाणीं विख्यात तत्त्वज्ञ जो सर् फ्रान्सिस् बेकन् त्याच्या वकिलीविषयीं प्रसिद्ध कवि बेन् जॉन्सन् यानें लिहिलेला एक उत्कृष्ट चुटका सरतेशेवटीं देतों. हा कवि महाविख्यात जो शेक्सपीयर त्याचा जिवलग मित्र होता, व त्याच्याप्रमाणें याचीही कीर्ति त्याच्या नाटकांवरच आजपर्यंत चालत आली आहे. हा बेकन् याच्याहून पुष्कळ वडील होता; तरी त्याच्या कीर्तीचा व वैभवाचा त्यास तिळमात्रही मत्सर न वाटतां त्यानें बेकन्च्या स्तुतिपर पुष्कळ मजकूर लिहून ठेवला; तो अद्याप प्रसिद्ध आहे. बेकन्च्या वक्तृत्वाविषयीं तो येणेंप्रमाणें लिहितो—"माझ्या वेळीं

एक उत्कृष्ट वक्ता वोहोंकडे गाजत होता. त्याचें भाषण मोठें प्रौढ असे. ज्या वेळेस तो विनोद करी त्याखेरीज करून त्याचें भाषण नेहेमी अतिशय गंभीरतेचें असे. त्याच्यासारखा बेताबातानें, युक्तीस धरून, व अर्थगांभीर्यानें बोलणारा माझ्या पाहण्यांत दुसरा कोणी आला नाहीं; त्याच्या बोलण्यांत वायफळ असा एक शब्द किंवा एक अक्षरही नसे. ज्या ह्या शब्दास त्याचीच अशी कांहींना कांहीं तरी खुबी असायाचीच. त्याच्या श्रोत्यांतून एकाद्यानें जर क्षणभर एकीकडे पाहिलें किंवा कोणाला खोकला आला, तर तितक्यांतही कांहीं गहन अर्थाचे शब्द निघून जाऊन त्यांची त्यास हळहळ वाटावी. तो बोलायाला उठला कीं सर्वांनीं स्तब्ध होऊन त्याच्या बोलण्याकडे एकाग्र चित्त द्यावें; आणि न्यायाधिशांचे रागद्वेष केवळ त्याच्या स्वाधीन असत,* त्यांच्या साऱ्या मनोवृत्ति या वक्त्याच्या जशा कायमुठींत होत्या; साऱ्या श्रोत्यांस असा नेहेमी धाक वाटे कीं, हा इतक्यांतच आटपतो कीं काय!"[१] असो; तर ही गहनार्थता व युक्तिमत्त्व पुरतेपणीं साधण्यास वक्त्याची बुद्धि कुशाग्र व विशाल असून तिच्या योगानें त्यानें मोठी विद्वत्ता संपादन करून ठेवली असली पाहिजे.

५. वरच्यांखेरीज सहृदयत्व, तार्किकता, विषय जुळवण्याची शैली, अर्थविशदत्व, वगैरे जे कित्येक गुण उत्तम वक्त्याचे ठायीं अवश्य असले पाहिजेत त्यांविषयीं येथें आणखी सविस्तर लिहीत नाहीं; कां कीं, वर सांगितलेल्या दोन्ही गुणांत त्यांचा बराच समावेश होतो; व त्यांचें स्वरूप उत्तम भाषणांकडे नीट लक्ष पुरवलें असतां सर्वांच्या तेव्हांच ध्यानांत येणारें आहे. शिवाय समग्र विषयाचें श्रोत्यांस सुखानें ग्रहण करतां येई अशी त्याची रचना कशी करावी, व त्यावर केलेलें प्रतिपादन सर्वांस सुबोध होण्यास काय करावें याविषयीं नियम सांगणें कठिण आहे. अशा पुष्कळ गोष्टी असतात कीं, त्या चांगल्या करतां येणें हें केवळ अनुकरणसाध्य मात्र असतें; त्यांविषयीं नियम झटले म्हणजे करतांही येत नाहींत, व केले तर ते सर्वव्यापक होत नसल्यामुळें त्यांपासून तादृश उपयोगही होत नाहीं. तर

---

*बेकनच्या मृत्यूनंतर बेन् जॉन्सन्नें लिहिलेला व वारंवार उद्धृत करण्यांत येणारा पुढील मूळ उतारा पाहा:—

"Yet there happened in my time one noble speaker who was full of gravity in his speaking. His language (when he could spare a jest) was nobly censorious. No man ever spoke more neatly, more pressly, more weightily or suffered less emptiness, less idleness in what he uttered. No member of his speech but consisted of his (its) own graces. His hearers could not cough or look aside from him without loss. He commanded where he spoke & had his judges angry & pleased at his devotion. No man had their affections more in his power. The fear of every man that heard him was lest he should make an end." 'सम्पादक'

१. प्रस्तुत विषयाच्या आरंभीं जें संस्कृत पद्य घातलें आहे त्यांतील पुष्कळ अर्थ वरच्या वर्णनाशीं मोठ्या चमत्कारिक रीतीनें जमतो!

अशा प्रकारच्याच वरील दोन गोष्टी होत. यास्तव ज्या कोणास ह्या शिकणें असतील त्यांनीं प्राचीन व अर्वाचीन काळच्या महावक्त्यांचीं भाषणें लक्षपूर्वक वाचावीं व त्यांवर मनन करावें येवढाच काय तो चांगलासा उपाय आहे.

६. याप्रमाणें वक्त्याच्या अंगीं स्वभावतःच जे गुण असले पाहिजेत त्यांचें निरूपण झालें. आतां सरतेशेवटीं या कलेपासून उपयोग काय याविषयीं लिहून प्रस्तुत विषय आटपतों. हा उपयोग दोन तऱ्हेचा आहे. एक व्यक्तिदृष्ट्या व दुसरा लोकदृष्ट्या. व्यक्तिदृष्ट्या प्रस्तुत कलेचा उपयोग उघडच आहे कीं, ती ज्याजपाशीं वसत असते तो सर्वांस प्रिय व सन्मानार्ह होतो. अशा मनुष्याचा सहवास करण्याविषयीं लोक नेहेमी उत्सुक असतात, व आपल्या भाषणांच्या मोहनीनें तो सर्वांचीं चित्तें आपणास वश करून घेतो. शिवाय हा गुण प्रस्तुत अंकाच्या आरंभीं घातलेल्या पद्यांत सांगितल्याप्रमाणें त्यास मोठा अलंकारही होतो. हा सहज अलंकार त्यास श्रमाशिवाय व निर्भयपणें धारण करतां येऊन यावज्जन्म त्यास शोभादायक होतो. पण इतकेंच नव्हे. एकाद्या शूर सरदारास त्याच्या कमरेस लटकलेली तरवार जशी केवळ शोभाच देते असें नाहीं, तर त्याच्या सामर्थ्याची ती निशाणी असून तिची लकाकी शत्रूंच्या काळजास थरारवीत असते, त्याचप्रमाणें वाक्शस्त्राचें तीव्रत्वही प्रतिपक्षिजनास अत्यंत भयावह असतें. मिलिटसानें सॉक्रेटीसावर† द्वेषबुद्धीनें कारस्थान रचून न्यायसभेंत त्या-

† सॉक्रेटीस—विख्यात अथीनिअन् तत्त्वज्ञानी (जन्म खिस्तपूर्व ४६९, मृत्यु खिस्तपूर्व ३९९) कुरूप पण कमालीचा काटक; कमालीची उष्णता अगर कमालीची थंडी यांपैकीं कशासहि दाद न देतां, केव्हांच पायांत कांहीं न घालतां, उन्हाळ्यांत जितके कपडे घाली तितकेच हिंवाळ्यांत घालून हा आपल्या साऱ्या स्नेह्यांस थक्क करून सोडी. याच्या आयुष्यांतील हकीकतींची खुलासेवार माहिती उपलब्ध नाहीं. खि. पू. ४०६ पर्यंत त्याला कोणतीच महत्त्वाची राजकीय जागा मिळाली नाहीं. या वर्षी तो पांचशें सभासदांच्या सेनेटमध्यें प्रविष्ट झाला, व प्रायटेनीस् (Prytaneis) कमिटी-वरहि त्याला जागा मिळाली. सहा सेनापतींवर खटला झाला तेव्हां हा अध्यक्ष होता; आपला प्राण धोक्यांत घालूनहि बेसनदशीर प्रश्न कमिटींत मताला घालण्याचेंच त्यानें नाकारलें. तीस जुलमी सरदारांनीं (Thirty Tyrants) लिऑन् दि सॅलॅमिनिअन् (Leon the Salaminian) ला पकडण्याचा हुकूम दिला तेव्हांहि सॉक्रेटिसानें असेंच नीतिधैर्य दाखविलें. आपल्या आयुष्याचा मध्य व उत्तर भाग त्यानें द्रव्यप्राप्तीकडे दुर्लक्ष करून केवळ अध्यापनालाच वाहिला. पण शाळाहि उघडली नाहीं; किंवा सोफिस्ट लोकांप्रमाणें व्याख्यानेंही झोडलीं नाहींत. आपणास एक धार्मिक अवतारकृत्य नेमून दिलें असून त्याबद्दल ईश्वरी प्रेरणा अगर साक्षात्कार होतो असें तो म्हणे. बाजारांत व इतर सार्वजनिक जागीं उभें राहून बाल-तरुण-वृद्ध सर्वांना त्यांच्या ध्येयाची जागृति करून देण्यासाठीं ज्ञानाच्या खोट्या भपक्यावर व देखाव्यावर तो निर्दयपणें हल्ले चढवी. म्हणून ॲरिस्टोफेन्सनें त्याच्यावर शस्त्र धरलें. वस्तुतः याच्या अध्यापनाला बंदी करण्यांत आली. अखेर वक्ता लायकन् (Lycon) व कवि मिलेटस (Meletus) यांनीं त्याच्यावर खटला भरला. तरुणांस बिघडविणें, नगरदेवतांचा उपहास करून त्यांच्या जागीं नव्या देवता स्थापण्याचा प्रयत्न करणें, असे त्याच्यावर आरोप होते. वस्तुतः या खटल्याच्या मुळाशीं राजकीय हेतु होता. सॉक्रेटिसानें केलेलें "आत्म-समर्थन" प्लेटोनें लिहून काढलें. ८० सभासदांच्या बहुमतानें सभेनें सॉक्रेटिसला मृत्यूची शिक्षा

[ पुढें चालू ]

वरचे सगळे बनावट व शुष्क आरोप जेव्हां बोलून दाखवले,तेव्हां सरतेशेवटीं आपल्या पक्षाची दुर्बलता व आपल्या प्रतिपक्ष्याचें बुद्धिसामर्थ्य मनांत आणून न्यायाधिशांस त्यानें विनंति केली कीं, "महाराज, सॉक्रेटीस शब्दपांडित्यानें आपणास मोहित करील, तर आपण फार सावध असावें; व तो आपणास फसवण्यासाठीं गोड गोड काव्याचीं भाषणें करील, तर आपण त्याचें बोलणें बहुतकरून खरें मानूं नये." असो; तर याप्रमाणें प्रस्तुत गुणानें मनुष्य भूषित होऊन त्याचें सर्वांवर वजन बसण्यास तो कारण होतो. आतां राष्ट्राच्या संबंधानें पाहा. या संबंधाचीं उदाहरणें मागील अंकांतून ग्रीस, रोम, इंग्लंड् व हिंदुस्थान या देशांतील दिलींच आहेत. त्यांवरून एका मनुष्याच्या वक्तृत्वशक्तीचा प्रभाव प्रसंगविशेषीं किती दृष्टीस पडतो याचा प्रत्यय आमच्या वाचकांस चांगला आलाच असेल. तसलीं उदाहरणें आणखी बहुधा प्रत्येक देशाच्या इतिहासांतूनही देतां येतील. असो; आतां प्रस्तुतच्या देशस्थितीला सांप्रत कलेचा कितीसा उपयोग होईल याविषयीं कांहीं लिहून एकंदर विषयाची परिसमाप्ति करतों.

यापूर्वी आलीकडे चालू झालेल्या वक्तृत्वोत्तेजनाच्या प्रकाराविषयीं जें आम्हीं लिहिलें आहे त्यावरून त्या उद्योगाविषयी आमचें काय मत आहे, व प्रस्तुत कला सुधारणें असल्यास काय केलें पाहिजे, हें आमच्या वाचकांस कळलेंच आहे. त्याविषयीं येथें जास्त सांगण्यासारखें येवढेंच आहे कीं, युरोपांतील कोणताही प्रकार पाहून त्यासारखें येथें करण्याचा प्रयत्न करणें हें फार असमंजस होय. एकाच्या शरीरप्रकृतीला जें मानवलें तें दुसऱ्यास मानवेलच हा जसा नेम धरवत नाहीं, त्याप्रमाणें युरोपच्या स्थितिविशेषाला लागू ज्या गोष्टी त्या इकडे लागतीलच हें कदापि होणार नाहीं. रोम, आथेन्स वगैरे ठिकाणीं लोकसत्तात्मक राज्यप्रकार होता, तेव्हां आंटनी, डिमॉस्थेनीस् वगैरे पुरुषांचे जे प्रभाव इतिहासांत दाखल केले आहेत ते तेथें घडण्यांत आले हें सहजच आहे. पण तो नमुना धरून येथें जर तशा गोष्टी बळेंच घडवून आणण्याचा घाट घातला, तर येथें तसली सामग्री काय आहे? एशियाखंडांतील कोणत्याही राष्ट्रास राजसत्तेखेरिज दुसरा कोणताही प्रकार आजपर्यंत कधींच माहीत झाला नाहीं; व लोकस्वातंत्र्याची कल्पना त्यांच्या कधीं स्वप्नींही आली नाहीं. रोमन् लोकांस 'राजा' हा शब्दही सहन होत नसून सीजरासारख्यांस त्यांनीं कट करून ठार मारून टाकलें ही गोष्ट येथील लोकांस अतिशय विलक्षण वाटणारी आहे; कीं, ज्याप्रमाणें येवढ्याशा काडतुसाच्या चिरडीवरून बंगाल्यांत झालेला दंगा युरोपियन्

दिली. पण डेलास् (Delos) ला गेलेलें जहाज परत येईपर्यंत तीस दिवस शिक्षेची अंमलबजावणी लांबली. या मुदतींत सॉक्रेटिसानें आपल्या स्नेह्यांबरोबर संभाषणें केलीं. त्याचा एकनिष्ठ अनुयायी क्रिटो (Crito) यानें पळून जाण्याबद्दल त्याचें मन वळविण्याचा निरर्थक प्रयत्न केल्यावेळीं "कायदे पाळण्याचें कर्तव्य" (Duty of Obedience to the Laws) या विषयावर त्याचें स्नेह्यांशीं झालेलें संभाषण व विषाचा प्याला प्राशन करण्यापूर्वी त्यानें केलेली "आत्म्याच्या अमरत्वाची मीमांसा" अत्यंत वाचनीय आहेत. मरणापूर्वी त्याचा चेहरा आनंदानें प्रफुल्ल झाला असून त्यावर दुःखाचें मुळींच चिन्ह नव्हतें. 'सम्पादक'

लोकांस विचित्र वाटला ! असो, तर एकंदरींत एका राष्ट्राची प्रकृति दुसऱ्या राष्ट्राच्या प्रकृतीशीं सर्वांशीं कधीं मिळायाची नाहीं. त्यांतून इंग्लंड् व हिंदुस्थान अशा हरएक प्रकारें भिन्न असणाऱ्या देशांविषयीं तर कांहीं बोलायालाच नको. यास्तव वक्ते तयार होऊन त्यांनीं लोकांचीं मनें आपणांकडे ओढून घ्यावीं, व हवा तो फेरफार एकंदर राष्ट्रांत सुरू करावा वगैरे बेत जे आमच्या लोकांच्या मनांत घोळताहेत ते सगळे पुष्कळ अंशीं व्यर्थच होत. वक्तृत्वाचा येवढा प्रभाव येथें दृष्टीस पडूं लागण्यास अद्याप पुष्कळच काळ लोटला पाहिजे; व तितका लोटल्यावरही तो निश्चयानें पडेलच असेंही सांगवत नाहीं. तर याप्रमाणें प्रस्तुत देशस्थितीला वक्तृत्वाची अतिशय अवश्यकता आहे, व तो गुण नसल्यामुळें देशाचें मोठें नुकसान होत आहे, हें मत आमच्या मतें पुष्कळ अंशीं अत्युक्तीचें व असमंजस असें होय.

तेव्हां प्रस्तुत कलेचा उपयोग हल्लीं आमच्या देशास झटला म्हणजे कविता, चित्रविद्या, इत्यादि इतर कलांप्रमाणेंच होय. म्हणजे ती आपल्या देशांत वाढली असतां लोकरंजनाचें एक उत्तम साधन होऊन देशास भूषण होणार आहे. तसेंच हल्लीं जे लोककल्याणाचे कित्येक उद्योग चोहोंकडे सुरू झाले आहेत त्यांची वृद्धि करण्यासही तिचा बराच उपयोग होईल खरा; पण तसें होण्यास हल्लींपेक्षां तिचें स्वरूप फार निराळ्या प्रकारानें प्रगट झालें पाहिजे. हल्लीं ज्याप्रमाणें एक वाक्शक्ति व एके रीतीचा धीटपणा येवढीच सामग्री वक्तृत्वास पुरते, तसा प्रकार कामाचा नाहीं. कोणत्याही विषयाविषयीं जो लोकांस आपल्या मताला मिळवूं पाहणार त्यानें अगोदर तो विषय चांगला समजून घेऊन नंतर मनोवेधक रीतीनें त्याचें प्रतिपादन केलें पाहिजे. असें करतां येण्यास त्यानें कोणतीं साधनें आपणास अनुकूल करून घेतलीं पाहिजेत तीं* मागें सांगण्यांत आलींच आहेत. असें जर न केलें, तर हल्लीं जसें वक्तृत्व बहुधा निष्फळ होतें, किंवा त्यापासून कांहीं निष्पन्न झालेंच तर भलतीं मतें लोकांच्या मनांत अर्धीमुर्धीं शिरून जातात, तसा मात्र प्रकार होईल. असो; तर प्रकृत कलेपासून विद्यमान स्थितींत आपल्या देशास जो उपयोग होणार तो वरच्या इतका मात्र होईल असें आह्मांस वाटतें.

---

————————————नहि प्रियं
प्रवक्तुमिच्छन्ति मृषा हितैषिणः॥[1]

किरातार्जुनीय.

अंक २४—पत्र-त्यास उत्तर.

रा. रा. निबंधमालाकर्ते यांस—

वि. वि. तुह्मी आलीकडे तीन चार अंकांत वक्तृत्वाविषयीं विवरण करून त्या विषयाचीं

---

* पृष्ठें ३२५-३२६ पाहा. 'सम्पादक.'

१. "जे आपले खरे हितचिंतक असतात ते आपणास प्रिय वाटण्याकरतां खोटी गोष्ट कधीं सांगत नसतात !"

वास्तविक योग्यता लोकांच्या ध्यानीं आणून देण्याविषयीं जो यत्न करीत आहां त्यापासून वक्तृत्वाच्या प्रवृद्धीस योग्य उपयोग व्हावा असें मी मनापासून इच्छितों. वास्तव त्या विषयाचे संबंधानें तुमचे निबंधाविषयीं, व विशेषेंकरून अंक २१ माहे सप्तंबर याविषयीं, जे थोडे विचार सुचतात ते तुम्हांस लिहून कळवावे या हेतूनें हें पत्र लिहिलें आहे. सवड झाल्यास कृपा करून यास आपल्या पुढील अंकांत जागा द्याल अशी आशा करतों.

विषयास आरंभ करण्याचे पूर्वी वक्तृत्वाचें जें लक्षण संस्कृत पद्यरूपानें तुम्हीं दिलं आहे तें अगदीं योग्य आहे, व या देशांतील वक्तृत्वाचे प्राचीन काळचे स्थितिविषयीं जे विचार तुम्हीं प्रदर्शित केले आहेत ते प्रायः सर्वसंमत आहेत. या देशांतील प्राचीन काळच्या वक्तृत्वाविषयीं ज्ञान केवळ काव्यें, पुराणें, इत्यादिक ग्रंथांवरून अनुमानानें होतें. तथापि शिष्टाईच्या वगैरे संबंधानें अंगद,‡ कृष्ण,† विदुर§ इत्यादिकांचीं जीं भाषणें रामायणमहाभारतादि ग्रंथांत आहेत, त्यांवरून वक्तृत्वशक्ति

---

‡ अंगद—किष्किंधेचा वानर-राजा वाली याला तारेपासून झालेला मुलगा. राम हा विष्णूचा अवतार असून त्याच्या मदतीकरितां बृहस्पतीनें घेतलेला अवतार म्हणजे अंगद. त्यामुळ त्याचे अंगीं कमालीचें वक्तृत्वनैपुण्य होतें. याची रामाबद्दल इतकी निष्ठा होती कीं एक महिनाभर सीतेचा शोध लागेना तेव्हां यानें प्राणत्यागाची तयारी केली. पण संपाति पक्ष्यानें सीता लंकेंत आहे अशी बातमी दिली. मारुतीला पाठवून खात्री झाल्यावर राम ससैन्य लंकेस गेला. अंगदाला शिष्टाई करण्याकरितां रावणाकडे पाठविलें. पण रावणानें त्याच्या हितोपदेशाचा अनादर केला व नाश ओढवून घेतला. यावरून अयशस्वी शिष्टाईला "अंगद-शिष्टाई" म्हणण्याचा प्रचार पडला. 'सम्पादक'

† आईबापांना तुरुंगांत असतां जो झाला व म्हणून त्याचे प्राण वांचविण्यासाठीं वसुदेव-देवकींना जो नंद-यशोदा यांना देऊन टाकणें भाग पडलें, तेथें गेल्यावर अल्प वयांतच बकपूतनादिकांस ज्यानें मारलें, राधेचें अद्वितीय प्रेम ज्यानें संपादन केलें, कंस-केशि-नरकादिकांस ज्यानें यमसदनास पाठविलें, पांडवांच्या बाजूनें अर्जुनाचें सारथ्य करून कौरवांस ज्यानें धुळीला मिळविलें, यादवांच्या नाशानंतर अवतारकृत्य संपल्यावर एका झाडास टेंकून पडला असतां जरा नामक व्याधानें हरिण समजून बाण मारून ज्यास ठार केलें, असा हा सत्यभामा व रुक्मिणी यांचा पति, आपल्या भक्तिबळानें एका तुळशीपत्रानें कृष्णाला तुळणाऱ्या द्रौपदीचा मानलेला भाऊ, आज देवपद पावला आहे. पाण्डव वनवास व अज्ञातवास संपवून आल्यावर त्यांच्यातर्फे शिष्टाई करण्याकरतां हा धृतराष्ट्राकडे गेला होता. पण यश न आल्यामुळें व दुर्योधनानें अर्धे राज्य तर दूरच पण सुईच्या अग्रावर राहील इतकी मातीहि सुखासुखी युद्धाविना देण्याचें नाकारल्यामुळें पुढें भीषण भारतीय युद्ध झालें. 'सम्पादक'

§ विचित्रवीर्याच्या दोघी निपुत्रिक विधवा स्त्रियांच्या ठिकाणीं कृष्णद्वैपायन व्यासापासून नियोगपद्धतीनें वंशविस्तार करण्याचा प्रयत्न दोनदां सफळ न झाल्यामुळें ( व्यासाच्या भीतीनें एकीनें डोळे झांकल्यामुळें अंधळा धृतराष्ट्र व फिकी पडल्यामुळें दुसरीला पंडुरोगी फिक्ट पंडु असे झाल्यामुळें) फिरून तिसऱ्या खेपेस सत्यवतीनें दोघींना व्यासांकडे जाण्यास सांगितलें. पण भीतीमुळें त्यांनीं स्वतः न जातां दासीस पाठविलें; तिचा मुलगा विदुर. पंडूच्या मागें त्याच्या लहान मुलांवर—पांडवांवर विदुराचें फार प्रेम होतें. लाक्षागृहाची बातमी बर्बरभाषेनें यानें युधिष्ठिरास कळविली नसती तर पांडव जळून गेले असते. पांडव वनवास व अज्ञातवास संपवून परत आल्यावर धृतराष्ट्रानें संजयास त्यांकडे पाठविलें व कळविलें कीं त्यांनीं अर्धे राज्यहि मागूं नये व लढाईहि करूं नये. त्यावर पांडवांनीं सांगितलेला निरोप ("सामानें राज्य दिल्यास ठीकच; नाहींतर युद्ध करून घेऊं") संध्याकाळ झाल्यामुळें दुसरे दिवशीं सांगण्याचें कबूल करून संजय गेल्यावर धृतराष्ट्रास तळमळ लागून झोंपहि येईना. तेव्हां तो विदुराकडे गेल्यावेळीं त्यानें उपदेश केला. तो "विदुरनीति" या नांवानें प्रसिद्ध आहे. महाभारत, उद्योगपर्व, अध्याय ३३–५१ पाहा. 'सम्पादक'

आपल्या पूर्वजांतील पुढारी लोकांत बरीच होती असें दिसतें. परंतु ग्रीस किंवा रोम, इंग्लंड किंवा फ्रान्स, या देशांतील प्राचीन व अर्वाचीन वक्त्यांचीं भाषणें जशीं विषयाच्या संबंधानें पराकाष्ठेचीं व्यापक असतात, तशीं भाषणें करण्याजोगें व्यापक ज्ञान प्राचीन काळीं आपल्या लोकांत असे, असें प्रतीतीस येण्यास कांहीं साधन नाहीं. वक्तृत्वाची विशेष अवश्यकता व प्रवृत्ति लोकसमाजास आकर्षण करण्याच्या संबंधानें असल्यामुळें, प्रायः प्रजासत्तात्मक राज्यांतच या कलेचा विशेष उदय झाला आहे यांत आश्चर्य नाहीं.

आलीकडील काळांत वक्तृत्वाच्या संबंधानें हरदास किंवा कीर्तन करणारे यांजविषयीं तुम्हीं जें लिहिलें आहे तें सर्वांशा बरोबर आहे असें मला वाटत नाहीं. कांहीं काळापूर्वीच्या दोन तीन कीर्तन करणारांचीं नांवें सांगून त्यांच्या संबंधानें तुम्हीं कांहीं लिहिलें आहे. ते स्वतः कवि असून कीर्तनांत आपण नवीन केलेलीं पद्यें वगैरे म्हणून त्यांचा अर्थ लोकांस सांगून गायन, शब्दालंकार, व भाषणाची मधुरता या गुणांनीं आपल्या श्रोत्यांचें मनरंजन त्यांणीं केलें असेल यांत संशय नाहीं. परंतु एकाद्या प्रतिपाद्य विषयाच्या संबंधानें व्यापक बुद्धीनें सर्व साधक बाधक प्रमाणें योजून विषयप्रतिपादन करून श्रोत्यांच्या चित्ताची खात्री आणि तदनुरूप प्रवृत्ति करण्याची शक्ति त्यांचे अंगीं होती, असें त्यांच्या वेळेपासून चालत आलेला जो कीर्तनाचा पाठ त्यावरून दिसत नाहीं. कीर्तनांत दोन भाग मात्र जसे असावे तसे करण्याचा हेतु दिसतो; म्हणजे प्रथम एकाद्या धर्म किंवा नीतीच्या विषयाचें प्रतिपादन, व नंतर त्यास समर्पक असा इतिहासांतील किंवा पुराणांतील दृष्टांत. परंतु हा हेतु एकीकडेच राहून कीर्तनांत आधीं ब्रह्मज्ञान (किंवा ब्रह्मघोळ म्हटलें तरी चालेल) सांगण्याचा प्रघात आहे. यांत वक्त्यास आपला प्रतिपाद्य विषय कोणचा, त्यास साधक बाधक प्रमाणें कोणचीं, याचें भान न राहतां सर्व घोटाळा होऊन जातो. यामुळें कीर्तनसंबंधीं वक्तृत्वांत हा मुख्य भाग असून तो ऐकण्याचें श्रोते टाळावयास सांपडेल तितकें टाळण्याचा यत्न करितात. यावरून कीर्तन करणारांचें वक्तृत्वाचें अनुमान सहज करितां येतें. तसेंच कीर्तनांत जे रस येऊं नयेत ते कीर्तन करणारे निःशंकपणें आणितात; व वेड्या वांकड्या चावट गोष्टीही केवळ बालिश लोकांस हसविण्याकरतां सांगतात. आणि पुष्कळ प्रसंगीं तर असें होतें कीं, कीर्तनाच्या पहिल्या भागांतील प्रतिपाद्य विषय, धर्म किंवा नीति, भक्ति किंवा शांति, किंवा वैराग्य असून पुढें दृष्टान्तरूपानें एकादें उत्कृष्ट शृंगाररसयुक्त, किंवा रौद्र किंवा बीभत्सरसयुक्त आख्यान लागून पूर्व भागानें यथाकथंचित् उत्पन्न झालेला शांत भाव मुळींच नाहींसा होऊन, मनावर शृंगारादिकांचा मात्र ठसा राहतो. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां आपल्या कीर्तन करणारांस प्रायः वक्ते हें नांव मुळींच शोभत नाहीं असें कबूल करावें लागेल. कीर्तन करणारांनीं आपलें भाषेचें व प्रतिपाद्य विषयाचें ज्ञान पुष्कळ वाढविण्याविषयीं यत्न करून वर सांगितलेले दोष त्यांतून काढून टाकिले, तर धर्मसंबंधीं वक्तृत्वाचा कीर्तन हा एक अति उत्तम प्रकार होईल यांत संशय नाहीं. इकडे आपले वाचक व कीर्तन करणारे लक्ष देतील अशी मी आशा करितों.

या विषयाचे संबंधानें आणखी एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे ती ही कीं, धर्मसंबंधीं बोधास अनुकूल जे शांत,करुण,इत्यादि रस त्यांचा जेणेंकरून आविर्भाव होईल असे इतिहासांतील व पुराणांतील निवडक भाग काढून पुराणिकांनीं श्रोत्यांस त्यांचें प्राकृत भाषेंत (पदरचें कांहीं न घालतां) मधुर वाणीनें विवरण करण्याची चाल घातली, तर पुराण सांगण्याची पद्धति आहे, तीही धर्मसंबंधीं वक्तृत्वाचा चांगला प्रकार होईल असें वाटतें.

आतां अंक २१ यांत प्रस्तुतच्या वक्तृत्वाच्या स्थितीविषयीं जें तुम्हीं लिहिलें आहे तें लिहितांना त्या अंकाचे मुखपृष्ठावर जें पद्य तुम्हीं घातलें आहे त्याच्या, व "सत्याय मितभाषिणां" या महाकविवचनाच्या, तात्पर्यावर दृष्टि देऊन जें लिहिणें तें लिहिलें असतें, तर फार बरें झालें असतें.

तसें केलें असतां कदाचित् तुमचा निबंध इतका लांबला नसता. परंतु तुमचा लेख यथार्थ होऊन राहिलेली जागा दुसऱ्या एखाद्या चांगल्या विषयास उपयोगीं पडली असती.

आलीकडील सुधारणुकेच्या ज्या कितीएक पद्धति निघाल्या आहेत त्यांचीं कारणें, त्यांतील वास्तविक गुणाचा अंश, व पुढें होणारा परिणाम, या सर्व गोष्टींकडे "मामिक" लक्ष न पुरवितां त्यांची केवळ विटंबनाच करण्यांत तुम्हांस मोठें भूषण किंवा मौज वाटते याचें मला मोठें आश्चर्य वाटतें! तुमची 'निबंधमाला' ही अशाच पद्धतींतली एक पद्धत आहे अशी प्रायः सर्वांची समजूत आहे. व तुमचा एकंदर विषयप्रतिपादन करण्याचा प्रकार पाहिला तर वृथा डोके घालण्याविषयीं जो दोष तुम्ही इतर सुधारणा करूं इच्छिणारांस लावतां तोच तुमच्यावरही येऊं पाहतो. निबंधाचा मुख्य विषय मात्र खरा असून, त्याचें प्रतिपादन करतांना ज्या अनेक गोष्टी येतात त्यांच्या सत्या-सत्याचा विचार न करता हवें तसें लांबलचक लिहिलें, तर तेवढ्यानेंच निबंध चांगला होत नाहीं. निबंधाचा मुख्य विषय व त्यासंबंधानें लिहावयाच्या बारीकसारीक सर्व गोष्टी सत्य असून, त्यांच्या संबंधानें जें कित्येक व्यक्तींविषयीं लिहिणें येईल तें विचारपूर्वक लिहिलें पाहिजे. हलींच्या अंकांत ही गोष्ट तुम्हीं ध्यानांत ठेविली आहे असें मला वाटत नाहीं. तुमच्या या अंकांतील मुख्य विषय वक्तृत्वाची कला प्रस्तुत कालीं अगदीं बाल्यावस्थेंत आहे हा दिसतो. या गोष्टीची सत्यता सर्व विचारी मनुष्य कबूल करतील याविषयीं मला संशय नाहीं; व सुधारणेचे कामांत पुढें झाल्यामुळें ज्या ज्या कोणास प्रसंगविशेषीं भाषण करण्याचा प्रसंग येतो तेही ही गोष्ट पक्केपणीं समजत असतील असें मला वाटतें. याचें कारण हेंच कीं, वक्तृत्वकलेच्या प्राप्तीविषयीं झटून यत्न करणारे सुशिक्षित लोक निदान आपल्या या महाराष्ट्र देशांत तर मुळींच नाहींत म्हटलें तरी चालेल. ही कला चांगली येण्याकरतां सुभाषित, इतिहास, काव्यनाटकादि प्रबंध, अलंकारशास्त्र, प्राचीन व अर्वाचीन वक्त्यांचीं रसिक भाषणें, यांचा उत्तम अभ्यास केला पाहिजे; तसेंच इतर अनेक विषयांचेंही बरेंच व्यापक ज्ञान संपादिलें पाहिजे: व प्रत्येक भाषण करणें तें, प्रतिपाद्य विषयाचें परिपूर्ण आलोचन करून विवक्षित साधक बाधक प्रमाणांची उत्तम व्यवस्था करून, भाषणाचा प्रसंग, श्रोत्यांची योग्यता, व मनाची स्थिति या सर्व गोष्टींकडे लक्ष देऊन करण्याचा अभ्यास ठेविला पाहिजे. वक्तृत्वगुणाचे प्राप्तीस हीं सर्व साधनें अत्यंत आवश्यक आहेत. यास्तव आपल्या वक्तृत्वशक्तीनें स्वदेशकल्याण करूं इच्छिणारे व वक्तृत्वोत्तेजक मंडळ्या या अवश्य गोष्टींकडे लक्ष पुरवितील अशी मी आशा करितों.

परंतु आलीकडील राज्यरीत व धर्मसंबंधी स्थिति वक्तृत्वकलेच्या वृद्धीस अगदीं प्रतिबंधक आहेत, व पूर्वींची स्थिति होती तीच बरी, असें जें तुम्हीं लिहिलें आहे तें यथार्थ नाहीं. हलींची राज्यरीति व धर्मस्थिति इंग्लिश लोकांच्या इकडे येण्यानें व इंग्रजी विद्येच्या अभ्यासानें झाली आहे, हें तुम्हीं उपक्रमीं सांगितलें आहे. या गोष्टी तुम्हांस इष्ट आहेत कीं अनिष्ट आहेत याचा विचार केला तर, एकंदरीनें त्या तुम्हांस इष्ट आहेत असें निबंधाचा उपक्रम व उपसंहार पाहतां दिसतें. हें ठीकच आहे. कारण या गोष्टी घडल्या नसत्या तर आज मितीस आपली 'निबंधमाला' व निःस्पृहपणानें (पुष्कळ वेळां अविचारानें) विद्यमान व्यक्ति व स्थिति यांजविषयीं लिहिण्याचा मार्ग कोणीकडे असता? तेव्हां एकंदरीनें या गोष्टी हिताच्या आहेत असें परिणामाकडे दृष्टि देऊन सर्व विचारी मनुष्यांस कबूल केलें पाहिजे. तर आपली 'निबंधमाला' खेरीज करून ज्या सर्व सुधारणेच्या पद्धतींची तुम्हीं यथेच्छ विटंबना केली आहे त्याही तुमच्या 'निबंधमाले'प्रमाणेंच त्याच गोष्टींचा तात्कालिक परिणाम होत असें कां म्हणूं नये? व हा तात्कालिक परिणाम सर्वांशीं वाईट असें म्हणणें अगदीं अविचाराचें आहे. तुम्हीं याच निबंधांत एके ठिकाणीं कबूल करतां कीं, "हुमारें दहा वीस वर्षांपूर्वीं जी स्थिति होती तिशीं ताडून पाहिलें असतां आजचें पाऊलही बरेंच पुढें आहे असें म्हणावें लागेल" याचें कारण विद्यावृद्धि व वक्तृत्वोत्तेजक सभा असेंही तुम्हीच कबूल करितां. आणि त्याच

विद्यावृद्धीपासून साहजिक मनांत उठणारे अनेक तरंग कार्यरूपानें प्रकट होऊं पाहत आहेत त्यांची तुम्ही विटंबना करितां. व ज्या वक्तृत्वोत्तेजक सभांच्या योगानें ( तुमच्या मतें ) आलीकडील वक्तृत्वाची स्थिति बरी आहे, त्याच सभांची प्रवृत्ति करणाऱ्या सर्व पुढारी लोकांचा तुम्ही अमर्याद उपहास करितां. या वक्तृत्वोत्तेजक सभांच्या व इतर सुधारणुकेच्या संबंधानें आजपर्यंत कित्येक पुरुष घरांत बसून गोष्टी सांगण्याचें सोडून देऊन आपले विचार यथामति लोकांस कळविण्यास पुढें सरसावले नसते, तर आज मित्तीस ये कित्येकांस सभेंत एखाद्या विषयाचें पूर्वींपेक्षां बरेंच प्रतिपादन करितां येऊं लागलें आहे तें तरी कसें झालें असतें ! या गोष्टीचा विचार न करतां फक्त कोणी बोलतांना एकच हात उडतो, कोणी अशीच मान करतो, कोणी असेंच तोंड करतो, कोणी असाच आव घालतो, कोणी असा डौल करितो, इत्यादि क्षुद्र गोष्टी पुढें करीत बसण्यांत तुम्हांस काय आनंद वाटत असेल तो वाटो ! मला तर त्यापासून कांहीं हांशील दिसत नाहीं ! साधारणपणें एक पद्धति एके ठिकाणीं झाली म्हणूनच तिचा किंवा इतर ठिकाणीं व्हावा हें योग्य नाहीं. परंतु सर्वच सुधारणेच्या पद्धति व्यर्थ व पोकळ व आरंभशूरपणाच्या, व त्यांचा उपक्रम करणारे सर्व अल्पप्रतिष्ठ, डौल मिरविणारे, दांभिक, मल्लाच आव घालणारे, अविचारी, व आरंभशूर असें म्हणणें एकांशीं देखील खरें नाहीं. मला तर असें वाटतें कीं, एखाद्या नष्ट दशेस आलेल्या देशाची उत्तम सुधारलेल्या देशाशीं एकदम गांठ पडली असतां अशा तऱ्हेचा फेरफार होणें हें अगदीं साहजिक आहे. हा सर्वच फेरफार सर्वांशीं चांगला असें तर कधींच होत नाहीं. व सुधारणेच्याही अनेक पद्धति प्रचारांत येऊन नष्ट होतां होतां कांहीं काळानें निकृष्ट प्रतीच्या देशास बऱ्या प्रकारची स्थिरावस्था येते. आणि ईश्वरकृपेनें या देशांतही तसेंच होईल अशी आशा आहे.

हल्लीं जी या देशांत अनेक प्रकारची खळबळ सुरू झाली आहे ही काय सर्वांशीं अकल्याणाची आहे ? माझ्या मतें अशी गोष्ट खचीत नाहीं. तुम्हीं आपल्या 'निबंधमालेंत 'लोकभ्रमा'विषयीं वगैरे जें विवरण केलें आहे तेंही याच खळबळीची लहर तुमच्या अंतःकरणांत उत्पन्न होऊन केलें आहे यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, वक्तृत्वोत्तेजक, व्यापारोत्तेजक, कौशल्यशिक्षक इत्यादि मंडळ्या व त्यांचे उद्योग त्याच खळबळीमुळें उपस्थित झाले आहेत. आपल्या देशांत धर्माचें आलीकडे जें अज्ञान व जी बजबज झाली आहे, व त्याचे योगानें अनेक वेडसर व कित्येक अंशीं अनीतीच्या व अकल्याणकारक चाली व त्यांस अनुकूल प्रतिपादक ग्रंथ प्रचारांत आले आहेत, त्यांपासून लोकांचीं मनें निवृत्त होऊन धर्म व नीति यांच्या तत्त्वांविषयीं ज्ञान व आस्था उत्पन्न होण्यास कित्येक वास्तविक परोपकारी गृहस्थांनीं ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, बालविवाहनिषेधक मंडळी, विधवाविवाहोत्तेजक मंडळी, इत्यादि प्रकारचे प्रयत्न चालू केले आहेत, ते केवळ डौल मिरविण्याकरतां व देशाच्या अकल्याणाकरतां मतलबीपणानें केले आहेत काय ! व त्यांपासून वाईट परिणाम तरी आजपर्यंत कोणते झाले आहेत ! डोळे उघडे ठेवून ईश्वरोपासना करण्यापेक्षां डोळे मिटून उपासना करण्यानें मनुष्य विशेष चांगलें होत नाहीं हें क्षणभर कबूल केलें; तरी तोंडानें कांहीं तरी अर्थावांचून बडबड व हातांनीं हावभाव करणें, किंवा धर्मविचाराकडे अगदीं दुर्लक्ष करून तो निरर्थक असें मानणें, यापेक्षां आपल्यास व इतरांस समजतील अशा शब्दांनीं जगन्नियंत्याची उपासना करणें, त्याचे मंगल गुण आठवून तदाकारवृत्ति व तदनुरूप आचरण करण्याचा यत्न करणें, हा मार्ग विशेष श्रेयस्कर होणार नाहीं असें साहसावांचून कोणाच्यानें म्हणवेल ? हल्लीं ब्रह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज यांतील लोक व इतर लोक यांजमध्यें षड्रिपुजयाचे संबंधानें फरक दिसत नाहीं म्हणून पुढेंही कधीं होणार नाहीं असें कोणाच्यानें म्हणवेल ! धर्मोन्नति इतर सर्व साध्य गोष्टींपेक्षां अत्यंत महत्त्वाची जशी आहे, तशीच अत्यंत यत्नसाध्यही आहे. ती अति अल्पकाळांत व्हावी अशी अपेक्षा करणें हें अविचाराचें काम होय. तुम्हीं ज्या गोष्टींचा मुळींच अनुभव घेतला नाहीं, व जो

विषय तुम्हांस अगदीं उपेक्षणीय वाटतो, त्याजविषयीं इतरांच्या नुकत्याच आरंभलेल्या उद्योगाविषयीं बरा वाईट अभिप्राय देणें हें मला अगदीं साहसाचें काम वाटतें. व हीच गोष्ट इतर सुधारणेच्या यत्नांविषयीं आहे. त्यांत कोणी कांहीं मोठी चूक किंवा अन्याय करीत आहे किंवा निःसंशय केवळ प्रतिष्ठेसाठीं ढोंग करीत आहे, याविषयीं चांगल्या अनुभवांतीं खात्री होईल, तेव्हां तेवढा दुर्गुण निःस्पृहपणें (मर्मभेदकपणानें नव्हे) स्पष्ट करून दाखविणें आणि योग्य मार्ग सांगणें हें तुम्हांसारख्या निबंधकर्त्यांचें काम होय. हें न करतां सर्व सुधारणेच्या उद्योगांत जो सद्हेतु व गुणलेश असेल तिकडे दुर्लक्ष करून दयानंद सरस्वतीसारख्या[1] वास्तविक परोपकारबुद्धीच्या व्यक्तींचा, व ब्रह्मसमाजासारख्या राममोहनराय, बाबू देवेंद्रनाथ टागोर (ठाकूर), बाबू केशवचंद्रसेन, इत्यादि केवळ सद्बुद्धिप्रेरित, परोपकारी, खऱ्या स्वदेशाभिमानी लोकांनीं आरंभलेल्या उद्योगांचा अनुभवावांचून यथेच्छ उपहास करणें, यापासून तुम्ही स्वतःस किंवा तुमच्या वाचणारांस, किंवा ज्या या सर्व देशाच्या कल्याणार्थ तुम्हीं आपल्या पद्धतीनें यत्न चालविला आहे त्यास कांहीं फळ होईल असें मला वाटत नाहीं. कळावें हे विनंति.

मु. रत्नागिरी ता० २० डिसेंबर १८७५.

निबंधमालाहितेच्छु.

वरील पत्राच्या उत्तरास आरंभ करण्यापूर्वी तें लिहिणाराविषयीं दोन शब्द बोलले पाहिजेत. एक तर वरील लिहिणाराचीं मतें आमच्याहून इतकीं भिन्न असतां आमच्या लहान पुस्तकाविषयीं त्याच्या मनांत यत्किंचितही द्वेषभाव नसून त्याचा तो उलटा हितचिंतक आहे याबद्दल आह्मी त्याचे उपकार मानून त्याच्या औदार्याची तारीफ करतों. शिवाय आमच्या लेखावर आपले विचार त्यानें इतके उघड बोलून दाखवल्याबद्दलही आह्मी त्याचे आभारी आहों. असले अभिप्राय कितीही कडक रीतीनें लिहिले असले तरी गुळमुळीत शिफारशीपेक्षां व व्यर्थ स्तुतीपेक्षां त्यांची योग्यता आह्मी फार ज्यास्त समजतों.

सदरील पत्र वाचून आमच्या वाचकांस कळून आलें असेलच कीं तें लिहिण्यास प्रस्तुत पुस्तकाचा २१ वा अंक कारण झाला. त्या अंकांत वक्तृत्वोत्तेजक सभाविषयीं व त्या संबंधानें आपल्या देशांत आलीकडे चालू झालेल्या दुसऱ्या कित्येक उलाढालींविषयीं जें लिहिलें आहे तें 'हितेच्छूं'स यथार्थ न वाटून त्यांनीं आपले स्वतःचे त्यांविषयींचे अभिप्राय आह्मांस कळवले आहेत. मुख्य विषयाविषयीं त्यांचा आमचा मुळींच मतभेद नसून त्यांस अंमळ सोडून प्रस्तुत देशस्थितीविषयीं जे आह्मीं कित्येक विचार प्रदर्शित केले आहेत ते व त्यांचा एकंदर रोख हे त्यांस अगदीं मान्य नाहींत.

आतां 'हितेच्छूं'नीं आमच्या लेखांवर जीं दूषणें काढलीं आहेत तीं प्रथम सांगून नंतर त्यांवर अनुक्रमानें आह्मी आपले विचार प्रगट करूं. हीं दूषणें मुख्यत्वेंकरून तीन

---

१. पंडित दयानंद सरस्वती यांचें वेदांविषयीं मत सुयुक्तिक आहे असें मला वाटत नाहीं. तथापि त्यांची निःस्पृहता, स्वदेशाविषयीं योग्य अभिमान, व खरा कळवळा, व त्यांचे भावी स्थितीविषयीं सद्हेतु, आणि ते सिद्धीस नेण्याविषयीं (त्यांच्या समजुतीप्रमाणें) बहुत दिवस निर्भयपणें व निर्भीडपणें सतत प्रयत्न, हे गुण आपल्या लोकांत फारच थोड्यांचे अंगीं असल्यामुळें त्यांजविषयीं आपली कृतज्ञताबुद्धि असली पाहिजे असें मला वाटतें.

आहेत. एक हें कीं, अलीकडे या देशांत सर्व विषयांच्या संबंधानें जी खळबळ सुरू झाली आहे;—ह्मणजे धर्म, नीति, विद्या, लोकाचार वगैरेंविषयीं जुनीं जीं मतें होतीं तीं बदलत चाललीं आहेत किंवा नाहींशीं होत चाललीं आहेत,—तिजविषयीं आमच्या समजुती बरोबर नाहींत. दुसरें असें कीं, वरील खळबळींत प्रमुख असणारी जी मंडळी तिचे गुण मुळींच न घेतां केवळ दोषच बाहेर काढण्याची आह्मांस हौस वाटते. आणि तिसरें दूषण हें कीं, वरील दोष जे दाखवायाचे ते केवळ प्रांजळ बुद्धीनें न दाखवतां, ह्यांचा अमर्याद उपहास करण्यांतच आह्मांस कांहीं विलक्षण भूषण वाटतें !

आतां पहिल्यानें वरील खळबळ ह्मणजे नवे विचार व नव्या समजुती, या खळबळी-विषयीं प्रस्तुत पुस्तकांत आज दोन वर्षें आमचीं मतें अनेक ठिकाणीं प्रगट झालीं आहेत. त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, गेल्या दहा वीस वर्षांत तीविषयीं लोकांच्या ज्या समजुती होऊन बसल्या होत्या, व पुष्कळ अंशीं अजूनही आहेत, त्यांपेक्षां आमच्या फार निराळ्या आहेत. इंग्रेजांच्या ऐश्वर्यास व विद्योत्कर्षास भुलून जाऊन, आणि इंग्रेज ग्रंथकारांच्या अज्ञानमूलक गर्वोक्ति व पाद्रीसाहेबांचे हेकटपणाचे व मतलबाचे लेख व भाषणें हीं सर्व खरीं मानून, आमच्या नवीन विद्वानांनीं सर्वमतें असा एक जबरदस्त सिद्धांत करून टाकला होता कीं, जुनें तेवढें सर्व अतिनिंद्य व नवें इंग्रेजी तेवढें सर्वथा स्तुतीस पात्र. हा समज कांहीं अंशीं स्वाभाविकच होता. कोणा एका चतुर ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, आपण मनुष्यें हीं सरड्यासारखीं आहों; त्याचा रंग जसा वरचेवर बदलतो त्याप्रमाणेंच संगतिविशेषानें आपलेही गुण, रुचि, व मतें हीं नेहेमी पालटत असतात. तर या सर्व-साधारण नियमावरून पाहतां दहा वीस वर्षांमागच्या लोकांच्या मनावर वर सांगितलेला संस्कार झाला यांत कांहीं मोठेंसें विचित्र नाहीं. कोणत्याही गोष्टीचें खरें स्वरूप व खरी योग्यता हीं समजण्यास नेहेमी कांहीं तरी काळ जावा लागतोच. असो; तर याप्रमाणें ही नवी खळबळ वरील लोकांस सर्वांशीं श्रेयस्करच वाटून पहिलें सर्व अगदीं मोडून टाकण्याचा किंवा तें पालटून टाकून त्यास नवें स्वरूप देण्याचा वरील लोकांचा सारखा प्रयत्न चालला होता, व अद्यापही बराच चालला आहे. प्रस्तुत लिहिणाराचीं मतें आमच्या देशाच्या संबंधानें सारीं कशीं काय आहेत हें आह्मांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी वरील पत्रांत (पृष्ठ ३१२) त्यास त्यांनीं 'नष्ट दशेस आलेला,' व 'निकृष्ट प्रतीचा' अशीं विशेषणें दिलीं आहेत त्यावरून व पत्राच्या एकंदर मजकुरावरूनही त्यांचा झोक बराच दृष्टीस पडतो. आह्मांस खचीत वाटतें, व हा समज यापूर्वीं आह्मी अनेक वेळां बोलून दाखवला आहे, कीं आम-च्यांत प्रमुख ह्मणवणाऱ्या लोकांस स्वतःची योग्यता, ज्ञान व कर्तृत्व हीं जरी केवळ अकटोविकट वाटतात, व जगांत आजपर्यंत महान् महान् पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं तीं करण्याचा पतकरही जरी ते खुशाल घेतात, तरी वस्तुतः पाहिलें तर वरील तिन्ही गुणांत त्यांचा कमतरपणा पुष्कळच आहे असें सर्व यथार्थ पाहणारांस वाटेल. हल्लीं थोरांपासून तों लहानांपर्यंत ज्यानें उठावें त्यानें सगळ्या हिंदुस्थानावर धाड घालून त्यास सांप्रत जी अवस्था प्राप्त झाली आहे ती अशाअशामुळेंच झाली आहे व ती अमुक अमुक उपाय केले असतां

खास दूर होईल, वगैरे यथेष्ट जल्पना निःशंकपणें करावी यासारखें दुसरें काय बरें हास्यास्पद आहे ? येवढा अवाढव्य देश—ज्यांत आज लक्षावधि फेरफार होऊन गेले, ज्यांत हजारों तऱ्हेचे कोट्यवधि लोक आहेत, ज्याच्या प्राचीन इतिहासाची ह्मणण्यासारखी माहिती कोणास कांहींच नाहीं—त्याच्या एकंदर स्थितीविषयींचे खात्रीचे विचार देऊन अमुक अमुक मात्रा द्या ह्मणजे त्याचा रोग हरून त्यास खचीत आराम पडेल असे अभिप्राय देणें ह्मणजे केवढें साहसाचें काम आहे ? इंग्रेज लोकांचें आज निदान शंभर वर्षें तरी या देशांत राज्य चालू असून व एतद्देशीयांचा स्वभाव, रीतभात वगैरे माहिती त्यांनीं आजपर्यंत सतत उद्योग करून इतकी मिळवली असतांही, वरच्यासारखे विचार प्रगट करण्यास त्यांस मोठी भीति वाटते. एतद्देशीय लोकांचें मन हें एक मोठें कोडेंच आहे असें समजून कोणताही फेरफार वगैरे करणें तो ते फार जपून करीत असतात. तरी दहा वीस वर्षांनीं सत्तावन सालासारखी किंवा नुकत्या झालेल्या बडोदें † प्रकरणासारखी भयंकर चूक होतेच होते ! मग अशी जर आमच्या चतुर, ज्ञानी व अनुभवी राज्यकर्त्यांच्या घरची व्यवस्था आहे, तर ज्या आह्मांत शोधक बुद्धीनें प्रवास करण्याचा ज्याला शोक असा एकही मनुष्य सांपडायाचा नाहीं, ज्यांची सर्व माहिती काय ती वर्तमानपत्रांवरून वगैरे मिळवलेली, ज्यांचा जातीचा अनुभव ह्मटला ह्मणजे शून्यच, अशा आह्मीं जर सगळ्या देशाच्या उलाढाली करण्यास हात घातला तर आमच्या शहाणपणाची किती तारीफ करावी ? एखाद्या प्रचंड राक्षसास रोग होऊन तो बेजार होऊन पडला असतां छोट्या छोट्या माणसांनी त्याच्या शरीरव्यापारांची माहिती करून घेण्याची बिलकुल खटपट न करतां पट्टया बांध, पलिस्तरें मार, दवा दे, असा जर धूम सपाटा चालवला, किंवा होडगें वल्हवायाला शिकलेल्या नावाड्यांनीं आपलें नाविकज्ञान समुद्रांत अडून राहिलेल्या किंवा तुफानांत सांपडलेल्या मोठ्या जहाजावर चालवण्याविषयीं जर कंबर बांधली, तर वरील दोन्ही शूरत्वाच्या कृति पाहून कोणास हसूं आल्यावांचून राहील ? असो; तर वरील पत्र लिहिणारानें व्यापारोत्तेज-

† लॉर्ड नॉर्थब्रुक् गव्हर्नर् जनरल् असतां हें बडोदें प्रकरण उद्भवलें. इ. स. १८७० सालीं मल्हारराव गायकवाड हे बडोद्याचे महाराज झाले. अन्नांत हिरकणीची पूड घालून मुंबई सरकारनें नेमलेला बडोद्याचा ब्रि. रेसिडेंट् कर्नल् फेरी ( Phayre ) याला विषप्रयोग करण्याचा प्रयत्न १८७४ मध्यें झाला. त्याचा वहीम सदर मल्हारराव यांजवर घेऊन हिं. सरकारच्या परवानगीनें त्यांस १८७५ च्या जानेवारींत कैद करण्यांत आलें. सहा जणांच्या मिश्र [ तिघे हिंदु, तिघे इंग्रज ] कमिशनपुढें खटला चालून तिघांहि हिंदु सभासदांनीं—ग्वाल्हेरचे महाराज, जयपूरचे महाराज, व प्रसिद्ध दिवाण राजा सर् दिनकरराव यांनीं आरोप नाशाबीत ठरविला. आणि तिघांहि इंग्रज सभासदांची ( Sir Richard Cough, ( President ), Sir Reohard Meade, & Mr. Philip Melville) मल्हाररावांच्या गुन्ह्याबद्दल पूर्ण खात्री झाली. अशा रीतीनें खुनाच्या प्रयत्नाच्या आरोपावर कांहीं करणें प्रशस्त न राहिल्यामुळें 'दुर्वर्तन, राज्यकारभार वाईट रीतीनें चालविणें' वगैरे आरोपांवरून लॉर्ड् नॉर्थब्रुकनें मल्हाररावांस पदच्युत करून मद्रासला नेऊन ठेवलें. (तेथें पुढें ते १८९३ सालीं वारले.) व सयाजीराव या मुलास मल्हाररावाच्या वहिनीच्या दत्तक मांडीवर देऊन सर् टी माधवराव यांस रिजंट् नेमलें. 'संपादक'

नादि ज्या अनेक उलाढालींच्या कैवारानें आह्मांस दोष दिला आहे त्या सर्व आह्मांस वरच्या-सारख्या वाटतात; आणि वरील सादृश्य त्यांस पुरतेपणीं लागतें कीं नाहीं याचा प्रत्यय वरील सर्व मंडळ्यांची स्थिति क्षणभर ध्यानांत आणली असतां कोणासही पुरतेपणीं आल्या-वांचून राहणार नाहीं.

आतां येवढें खरें कीं, वरील उलाढाली कितीही हास्यास्पद असल्या तरी त्यांपासून मुळींच उपयोग नाहीं असें नाहीं. असा उल्लेख या पूर्वी आह्मीं कोठेंही केला असेलसें आह्मांस वाटत नाहीं. कोणतेंही कृत्य केलें आणि तें पुढें सारखें चालेनासें होऊन बंदही जरी पडलें, तरी त्यापासून कांहीं थोडी तरी कार्यनिष्पत्ति होतेच होते. निदानपक्षीं असा असा उद्योग आरंभला असतां त्यांत यश येईल कीं नाहीं, व आलें तर कितपतसें येईल, याचा सुमार तरी लागतो. शिवाय कोणतेंही मोठें कृत्य चांगलें सिद्धीस जाण्यास पहिल्यानें पुष्कळ प्रयत्न करावे लागतात व ते अनेक वेळां फसतातही, हें सर्व आह्मी कबूल करतों. गेल्या एकविसाव्या अंकांत * वरील मंडळ्यांवर वगैरे जे आह्मीं दोष दिले ते फक्त येवढ्याचकरतां कीं, कोणतीही मंडळी किंवा सभा स्थापन करण्यापूर्वी तिच्यापासून कितीसा उपयोग होईल, ती चालण्याचा संभव आहे कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा चांगलासा विचार बिलकुल न करतां केवळ अनुकरणेच्छेनें किंवा प्रतिष्ठेच्या आशेनेंच त्यांस लोक हात घालतात. असें केल्यापासून देशाचें कोणतें अहित होतें* तें मागें सांगितलेंच आहे.

हें एक कलम झालें. आतां 'हितेच्छूं'चा आह्मांवर दुसरा दोष हा आहे कीं, वरील सभादिकांचे गुण मुळींच न घेतां त्यांचे दोष मात्र बाहेर काढण्याची आह्मांस हौस वाटते. हा आह्मांवर केवळ वृथा आरोप आहे अशी आमची खात्री आहे. प्रस्तुत पत्र लिहिणारास कदाचित् येवढें ह्मणतां येईल खरें, कीं ज्या लोकांचे, व मंडळ्यांचे दोष बाहेर काढण्याचा सर्वांस आजपर्यंत संकोच किंवा भीति वाटत असे त्यांवरही प्रसंगानुसार टीका करण्यास आह्मी अगदीं कमी करीत नाहीं. प्रत्येक विषयावर आमचीं जीं मतें आह्मांस यथार्थ वाट-तात तीं उघडपणें व निर्भीडपणानें आह्मी बोलून दाखवतों. पण वरील अभिप्राय केवळ एकपक्षीय असतात, ह्मणजे गुण तेवढे छपवून ठेवून कोणाचेही दोष तेवढे आह्मी उघडकीस आणतों, असें झाल्याचें निदान आह्मांस तर माहीत नाहीं. तसा प्रकार होत असल्यास आमची चूक आह्मास दाखवण्याविषयीं अगदीं पहिल्या अंकापासून आह्मीं सर्वांस विनंति केली आहे. प्रस्तुत लिहिणाराचें पत्र तरी बरेंच रागानें लिहिलें असतां सदरील अंकांत जसेंचें तसें घालून त्यावर हें उत्तर आह्मी लिहीत आहों हेंही मूळच्या संकल्पासच‡ अनुसरून होय हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

तेव्हां प्रस्तुत दूषण जें आह्मांस लावलें आहे तें केवळ विनाकारण लावलें आहे. वक्तृत्वोत्तेजक आदिकरून ज्या अनेक सभांविषयीं व मंडळ्यांविषयीं हा वाद आहे, त्यांपैकीं जिचा 'वास्तविक गुणाचा अंश' आह्मीं घेतला नाहीं अशी कोणती आहे ! आतां येवढें

* पृष्ठें. २९०–२९५ व २९९–३०३ पाहा. 'सम्पादक'
‡ पृष्ठें २१–२२ पाहा. 'सम्पादक'

खरें कीं, जेथें गुणाचा अंश आह्मांस विशेष मुळींच दिसला नाहीं तेथें आह्मीं त्याचा आरोप केला नाहीं. यास जर 'हितेच्छु' वृथा दोषाविष्करण ह्मणत असतील तर ह्मणोत. आमच्या पुण्यास ज्या अनेक मंडळ्या व सभा आहेत त्यांत सार्वजनिक सभा, वक्तृत्वोत्तेजक मंडळी, तसेंच चालू सालीं झालेलें प्रदर्शन, वगैरे कांहीं प्रकार न्यायाच रीतीनें चालल्यामुळें त्यांत दोष व न्यूनता जरी आहेत तरी त्यांस सर्वथा नांव ठेवणारा मनुष्य कोणीही आढळणार नाहीं. त्याप्रमाणेंच ब्रह्मसमाज, विधवाविवाहोत्तेजक, बालविवाहोत्तेजक वगैरे मंडळ्या व केशवचंद्र सेन, बाबू सत्येंद्रनाथ, राममोहन राय इत्यादि खरोखरच 'केवळ सद्बुद्धिप्रेरित, परोपकारी, व खऱ्या स्वदेशाभिमानी' पुरुषांचीही आमच्या पुस्तकांत कोठेंही बिलकुल विटंबना केलेली नाहीं. त्यांविषयीं मजकूर आढळलाच तर उलट्या तऱ्हेचा मात्र आमच्या वाचकांस आढळला असेल. पण वरील कांहीं मंडळ्या व कांहीं व्यक्ति स्तुतीस पात्र असल्या ह्मणून ज्यानें ज्यानें स्वदेशाचा झेंडा मिरवून नाचूं लागावें तो तो अवघा प्रशंसेस पात्र झालाच काय? उद्देश चांगला असला ह्मणजे त्याच्या संबंधानें केलेलें कृत्य नेहेमी चांगलेंच असतें काय? मनांत धरलेला उद्देश मुळींच सिद्धीस जाण्यासारखा आहे कीं नाहीं, किंवा निदान आरंभलेल्या उद्योगानें तो कितपतसा सिद्धीस जाईल, याविषयीं विचार करायास नकोच काय? टिट्टिभ‡ ह्मणून एक पक्षी आहे तो रात्रीं निजला ह्मणजे आपले पाय वर करून निजतो, व त्यास वाटतें कीं, असें केल्यानें मी साऱ्या आकाशमंडळास सांवरून धरतों; मी असें न करीन तर आकाश कडकडून खालीं पडेल व साऱ्या प्राणिमात्राचा नाश होईल! तर अशा प्रतीचे जे कित्येक बहादर आमच्या देशांत आहेत त्यांस असें सांगायास नको काय, कीं टिट्टिभ महाराज! तुमचा हेतु मोठा स्तुत्य आहे खरा, पण आकाश कोणीकडे आणि तुमचे भुवनाधारभूत पाय कोणीकडे! ते एक रात्रभर आपल्या पोटाशीं आंखडून घेऊन जर आपण खुशाल निद्रासुख घ्याल, तर दुसऱ्या दिवशीं आपणांस कळेल कीं, अवघ्या जीवसृष्टीच्या हितार्थ आपण जे येवढे श्रमी होत होतां ते उगीच फुकटाफाकट! जगाची येवढी कामगिरी न पतकरतां आपल्या योग्यतेनुरूप जर एकादें स्वल्प काम आपण सांभाळाल, तर त्यांत तुमचेंही बरें होऊन जनहिताविषयीं जी आपली अनिवार मनीषा तीही बरीच पूर्ण झाल्यासारखी होईल! तर लोककल्याणाची जरी खरी इच्छा हृदयांत वागत असली, तरी असमंजसपणामुळें ती ज्यांच्या ठायीं केवळ उपहासास मात्र पात्र होते अशांचा हा एक प्रकार झाला. पण हाही पुष्कळ अंशीं बरा. 'कौशल्यशिक्षक मंडळी,' 'धर्मसभा' अशांचे स्थापक व पुरस्कर्ते फार तर असमंजसपणाच्याच दोषास पात्र होतील. पण दांभिकत्वाचा व लब्धप्रतिष्ठत्वाचा दोष तर वरच्याहून फारच भयंकर! सदरील पत्र लिहिणारास वरील दोषांचा आरोप जो आह्मीं कित्येक सभांवर व लोकांवर केला तो अगदीं खपला नाहीं. 'तो एकाही अंशीं खरा नसून उलटा आमच्यावरच तो बराच येऊं पाहतो' असें त्यानें ह्मटलें आहे. येथें आमच्यासंबंधानें आह्मी कांहीं लिहीत नाहीं. आमचें पुस्तक

‡ "उत्क्षिप्य टिट्टिभः पादावास्ते भङ्गभयाद्दिवः। स्वचित्तकल्पितो गर्वः कस्य नात्रापि विद्यते॥" पंचतंत्रांतील १–३१४ श्लोक पाहा. 'सम्पादक'

आज दोन वर्षे लोकांसमोर आहे, तेव्हां प्रस्तुत दूषणाविषयीं आमचे वाचक स्वतंत्रपणें विचार करतीलच. वरील सभांविषयीं व व्यक्तींविषयीं वरील पत्रांत जें लिहिलें आहे त्या-विषयीं मात्र येथें विचार करूं.

पत्रकर्ते ह्मणतात, वरील आरोप 'एकाही अंशीं खरा नाहीं.' तर मग 'हितेच्छूं'च्या मतें सुधारणेच्या पद्धति आजपर्यंत जेवढ्या निघाल्या तेवढ्या सर्व समंजसपणानें व केवळ निःस्पृहपणानें काढल्या असून आजपर्यंत चांगल्या सुरळीत चालल्या आहेत, असें आहे काय? असें त्यांच्यानें खास ह्मणवणार नाहीं असें आह्मांस वाटतें. आपल्या नव्या लोकांच्या अंगीं कोणतेंही काम सारखें नेटानें चालवण्याचा बिलकुल दम नाहीं, त्यांचीं कृत्यें आज-पर्यंत जेवढीं झालीं तेवढ्यांत त्यांचा आरंभशूरपणा मात्र दिसून आला, व "निःस्पृहपणा, स्वदेशाविषयीं योग्य अभिमान, खरा कळवळा, व कोणत्याही कार्याच्या सिद्ध्यर्थ निर्भयपणें व निर्भीडपणें सतत प्रयत्न करणें हे गुण आपल्या लोकांत फारच थोड्यांच्या अंगीं आहेत" हें कोणास माहीत नाहीं, व याविषयीं आजपर्यंत कोणीं खेदोद्गार प्रगट केले नाहींत? वरील अवतरणचिन्हांतर्गत शब्द 'हितेच्छूं'चेच स्वतःचे आहेत हें आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच; व पंडित दयानंदजींचा स्तुतिपाठ करतांना त्यांच्या तोंडून देशाच्या खऱ्या स्थितीचे वाचक शब्द नकळत निघून गेले यांत संशय नाहीं! आतां खरोखरी पाहतां वरील शब्द जे सदरील पत्राच्या शेवटीं टिपेंत दिले आहेत ते जर प्रस्तुत लिहिणारानें मिथ्या स्तुतीच्या भरांत लिहिले नसून मनापासून लिहिले असतील, तर परस्परांमधील वादाचें तोंडच मिटलें! गेल्या एकविसाव्या अंकांत सांप्रत देशांत चालू असणाऱ्या मंडळ्यांवर, सभांवर वगैरे जी आह्मीं चर्चा केली तिचा सारांश सारा वरील शब्दांत आला आहे. यास्तव 'हितेच्छूं'नीं व त्यांच्यासारखीं ज्यांचीं मतें असतील त्यांनीं वरील शब्द पतकरावे ह्मणजे झालें; यापेक्षां आमचें कांहीं ज्यास्त ह्मणणें नाहीं.

पण आमच्या इष्टार्थाचें प्रतिपादन करण्यास असा वादच्छल नको. तो सिद्ध करणें असल्यास त्याविषयींचीं प्रमाणें इतकीं मजबूत आहेत, व इतकीं सर्वप्रसिद्ध आहेत, कीं त्यांचा उल्लेख करण्याचा मात्र अवकाश; तीं सांगितलीं असतां त्यांवर वाद घेण्यास मुळीं जागाच नाहीं. फार तर काय, पण तीं येथें दाखल करणें हेंही पुष्कळ अंशीं अयोग्य होईल; कां कीं, एक तर तीं कोणास माहीत नाहींत असें नाहीं; आणि शिवाय त्यांचा यथास्थित उल्लेख करून त्यांवर जशी हवी तशी चर्चा करणें हें जो आमच्या देशाचा शत्रु असेल त्याच्याखेरीज कोणाच्याही हातून सहसा होणार नाहीं! असो; पण ज्या अर्थी प्रस्तुत उत्तराचा मुख्य भाग तो आहे, व त्याविषयीं कांहींच लिहिलें नाहीं तर वरील पत्रांतील मुख्य दोषारोप आह्मीं अंगीकारलासें होईल, त्या अर्थी वरील प्रमाणांपैकीं कांहीं येथें अवश्य लिहिलीं पाहिजेत. आमच्या नव्या मंडळीनें देशस्थिति सुधारण्यास ज्या अनेक तऱ्हा केल्या त्यांपैकीं विधवाविवाहोत्तेजन, स्वदेशीयव्यापारोत्तेजन आणि प्रार्थनासमाज व आर्य-समाज हे दोन धर्मपंथ, हे चार प्रकार मुख्य धरले असतां चालणार आहेत. आतां असें समजा कीं, गेल्या दहा पंधरा वर्षांचा इतिहास एकाद्यानें लिहिण्यास आरंभ केला, तर

वरील प्रकारोविषयीं निःपक्षपातपणानें त्यास काय मजकूर लिहावा लागेल बरें ! त्यास असें लिहायास नको काय, कीं 'नववैधव्याच्या असह्य वेदनां'पासून बिचाऱ्या हतभाग्य बालविधवांस सोडवण्याकरतां आमच्या देशांतील नव्या नव्या उमेदवार विद्वानांनीं व पंडितांनीं पहिल्यापहिल्यानें खूप कंबर बांधली; पण हळूंहळूं त्यांचा आवेश व उत्साह कमी कमी होत जाऊन लवकरच चोहोंकडे अगदीं सामसूम होऊन गेलें. लोककल्याणाची उष्णता जी कांहीं थोडा वेळ २१२ अंशांवर अगदीं टळटळीत येऊन पोंचलीशी दिसत होती ती लवकरच खालीं जायाला लागून जातां जातां ३२ च्याही कांहीं अंश खालीं गेली ! विधवांच्या मनोरथास नुकता अंकुर जों कुठें फुटूं लागतो न लागतो, तोंच चोहोंकडे गारठा पसरावाला लागून तो जागच्या जागींच कोमेजून गेला. जोंपर्यंत सभेंत पांडित्य करणें, वादविषयक ग्रंथ लिहून विद्वत्ता प्रगट करणें, व परस्पर वऱ्हाडीपणा मिरवणें हें होतें तोंवर ठीक होतें; पण परमेश्वरानें लवकरच गाऱ्हाणें ऐकून विधवांच्या मुक्त्यर्थ त्यांच्या कैवाऱ्यांस जेव्हां मोठे नवस करूनही न यावी अशी सोन्यासारखी संधि आणली, तेव्हां स्वदेशाभिमान, आर्तजनाविषयीं दया, आणि दीर्घकाळ केलेल्या पांडित्याचें व नव्या विद्वत्तेचें चीज, हीं दाखवण्याचें धैर्य एकाचें तरी झालें काय ? ल्यूथराविषयीं आणि वॉशिंग्टनाविषयीं§§ नेहेमी गप्पा झोंकणारांनीं, व वरील गप्पा झोंकल्यानेंच त्यांची वीरश्री आपल्या ठायीं आलीशी मानून आह्मी असें करूं, आह्मी तसें करूं, अशा यथेच्छ कल्पना करणारांनीं, देशकार्याच्या धुरेला आपला खांदा जातीनें असा एकानें तरी लावला काय ? नाहीं; तर कोनाकोपऱ्यांतून शोधून काढून कोणाला तरी मारून मुटकून नवरा मुलगा सजवून उभा करावा, आणि "शुभमंगल" करून टाळ्या पिटण्याचें मात्र काम आपलें ! बरें, हेंही एकीकडे ठेवूं. धैर्य हा पुष्कळ अंशीं स्वभावजन्यच गुण होय; तो मोठी विद्वत्ता संपादन केल्यानें किंवा पुष्कळ पुस्तकें वाचल्यानें

---

† जॉर्ज् वॉशिंग्टन् (जन्म २२ फेब्रुवारी १७३२, मृत्यु १७९९). याच्या चरित्राची १७४७ त हा शाळा सोडीपर्यंत कांहींहि विश्वसनीय हकीकत मिळत नाहीं. चेरी झाडावर कुऱ्हाड चालविल्याची व इतर गोष्टी Mason Weems नांवाच्या त्याच्या चरित्रकारानें आपल्या कल्पनासृष्टींतून काढल्या. त्याला फक्त प्राथमिक शिक्षण व तेंहि अपुरें मिळालें. तो बनरा वाचक नव्हता. पण त्याला गणिताची फार आवड असे. त्याच्या बाल्यपणात अद्वितीय असें कांहीं नव्हतें. इंग्लंड व वसाहती यांचें भांडण उपस्थित झालें, तेव्हां यानें स्थानिक विरोधी पक्षाचें पुढारीपण पत्करलें. याच्या राष्ट्रीय चारित्र्याला सुरुवात ५ आगस्ट १७७४ रोजीं झाली. व्हर्जिनिआच्या कन्व्हेन्शन्नें फिलाडेल्फियाच्या पहिल्या कॉंटिनेंटल् कॉंग्रेसकरितां सात प्रतिनिधींपैकीं एक प्रतिनिधि म्हणून वॉशिंग्टन्ला निवडलें. पुढील वर्षी तो अमेरिकन् सैन्याचा सेनापति झाला. १७८३ मध्यें या तंट्याचा निकाल लागेपर्यंत सारखा लोकांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता. व १७८९ त प्रजासत्ताक राज्य स्थापन झाल्यावर त्याच्या लोकमान्यतेचा पुरावाहि मिळाला. १७८९ व १७९३ असा दोन वेळ तो एकमतानें प्रेसिडेंट (अध्यक्ष) निवडून आला. तिसऱ्या खेपेस त्यानें सदर जागा नाकारली तरी त्याला दोन मतें मिळालींच. तो साधा, प्रामाणिक, शूर व कर्तबगार असून त्याची उंची ६–६½ फूट व वजन २२० पौंड होतें. तो निपुत्रिक मेला. अमेरिकन् प्रजासत्ताक राज्याचा पहिला लोकनियुक्त अध्यक्ष ह्मणून तो प्रसिद्ध आहे. 'सम्पादक'

अंगीं येतो असें नाहीं. पण निदान येवढें तरी खरें कीं नाहीं, कीं समरांगणांत सरसावून पुढें जाण्याचें ज्यांचें धैर्य झालें नाहीं त्यांनीं निदान तळ तरी राखावा? कां तेथूनही तडक पळ काढून भराभर स्नानें करून मोकळें व्हावें, व ज्यांस लाथा मारल्या त्यांच्यापुढेंच नाक घासण्याला तयार व्हावें? असो; एकंदरींत या उलाढालींत आमच्या नव्या लोकांची जी फटफजिती झाली ती कांहीं पुसूं नये. तिच्या योगानें त्यांसच काय, पण सगळ्या देशासही निरंतर खालीं पाहण्याचा प्रसंग आला आहे! असो; आतां दुसरी व्यापारोत्तेजनाची मौज पाहा. हें काम तर वरच्याहून पुष्कळ सोपें होतें ना? यांत यश येण्यास इतक्याच गोष्टी हव्या होत्या कीं, सर्वांनीं एकमतानें व सचोटीनें एकमेकांशीं वागून यथाशक्ति आरंभलेल्या कार्यास साहाय्य करावें. पण इतकें तरी आमच्या हातून व्हावें कसें? स्थापना होतांना अगदीं ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणें शेअर्स् (भाग), कोर्ट ऑफ् प्रोप्रायटर्स् (भागीदारांची मंडळी), कोर्ट ऑफ् डैरेक्टर्स् (व्यवस्थापक मंडळी), खजिनदार, चिटणीस, शिपाई वगैरे सर्व यथासांग झालें; पण पुढें काम सुरळीत चालेल तेव्हां कीं नाहीं! अनुकरणाच्या इच्छेनें शरीरास प्रतिशरीर कसें तरी बनवून दिलें; पण त्याचा चालक जो जीव तो कसा घालतां येईल? हा जीव म्हटला म्हणजे साऱ्या सभासदांची स्वदेशकल्याणाविषयीं कळकळ होय. पण ही सर्वांच्या ठायीं किती नांदत होती हें पुढील प्रकारांवरून स्पष्ट दिसतेंच. कोणी डैरेक्टर् आम्हांस बोलावणें पाठवलें नाहीं किंवा आपला इंतमाम बरोबर राहिला नाहीं म्हणून रुसणार; कोणी इतर निमित्तांनीं आपआपसांत भांडणार; प्रेसिडेंट् (अध्यक्ष) साहेबांस कोणाही सभासदाचें दुरुत्तर किंवा नकार खपायाचा नाहीं,—ते म्हणणार, "बस् बस्, आम्ही सांगूं तें सर्वांनीं निमूटपणीं ऐकलें पाहिजे, आम्ही प्रेसिडेंट् आहों!"[1] मग अशी सामग्री असल्यावर आमच्या सभांपुढें मँचेस्टर्नें आणि लिवर्पूल्नें कां कांपूं नये! असो; तर एकंदरींत आमच्या लोकांची पहिल्यानें उडी मोठी, आणि पुढें हातून मात्र कांहीं होणें नाहीं, ही तऱ्हा वरील दोन्ही उदाहरणांवरून स्पष्ट दिसते.

वरील दोन्ही प्रकार केवळ लोकव्यवहाराचे झाले. आतां आमच्या मंडळीनें देशाच्या अवघ्या विपत्तीच्या मुळास हात घालून जुन्या वेडगळ धर्माचा ऱ्हास करून त्याच्या जागीं अत्यंत सोज्वळ अशा नव्याचें रोपण करण्याचा जो प्रचंड उद्योग आरंभला आहे त्याविषयीं

१ वरील नक्कल आमच्या येथील सभेंत झाली. मागें जें आम्हीं दोनतीनदां लिहिलें आहे कीं, हे नवे प्रकार आपल्या देशांत जरी चोहोंकडे बळेंच चालू केले आहेत तरी ते अपूर्व असल्यामुळें त्यांचें स्वरूप एकंदर लोकांस अद्याप मुळींच समजूं लागलें नाहीं त्याचेंच वरील एक चांगलें उदाहरण आहे. वरील मजेदार भाषणावरून अध्यक्षस्थान पतकरण्यांत वरील गृहस्थाचा हेतु काय होता तो स्पष्ट दिसतोच आहे. त्याचप्रमाणें कसलीही सभा असली—ती अंमळ वजनदार मात्र पाहिजे—तरी अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार किंवा चिटणीस यांपैकीं कोणता तरी हुद्दा पटकावून कसेंही करून एकदां आपलें नांव वर्तमानपत्रांतून वगैरे कोठें तरी झळको याविषयीं पुष्कळ लोकांची किती झटापट चालत असते हेंही सर्वांस माहीत आहेच. कित्येकांनीं तर 'येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्' हें महावाक्य आपल्या पदरीं बांधून निरंतर उराशींच बाळगलें आहे काय असें वाटतें!

लिहूं. 'हितेच्छूं'स आमच्या पुस्तकाचा जो राग आला तो मुख्यत: याच विषयावरून आला असावासा वाटतो; यास्तव याविषयींचीं आमचीं मतें अंमळ विशेष विस्तारानें लिहिणें अवश्य आहे.

प्रस्तुत विषयावर आमच्या काय समजुती आहेत त्या आम्हीं अद्याप कोठेंही केवळ निश्चितपणें लिहून प्रगट केल्या नाहींत; तरी आज दोन वर्षांच्या श्लोकावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं, प्रभु येशू, महंमद, राममोहन राय, पाळंदे,[१] किंवा

१ कैलासवासी भास्कर दामोदर पाळंदे यांनीं केलेलें ' रत्नमाला ' नामक पुस्तक हें ' प्रार्थना-समाजा'चा धर्मग्रंथ होय, यास्तव त्यांचेंच नांव वरील मालिकेंत घातलें आहे. असें करण्याचें कारण उघडच आहे कीं, प्रस्तुत समाजाला इतर पंथांप्रमाणें कोणा एकाच प्रवर्तकाचें असें नांव लागलेलें नाहीं. ही त्यास मोठी गैरसोय आहे. शिवाय दुसरी ही मोठी मौज आहे कीं, ज्यांनीं वरील भक्त-मंडळीस आपली 'माळा' गुंफून दिली ते समाजांत मुळींच नसून उलटे मूर्तींचेच उपासक होते! प्रस्तुत समाजांत येवढी वडी मंडळी असतां स्वतः पद्यरचना करण्याचें काम तिजपैकीं कोणी एकाधानें कां पतकरलें नाहीं कोण जाणे !$ त्यांतून महाराष्ट्र-कवींचें शिरोरत्न‡ त्यांजपाशीं असतां 'रत्नमाले'चीच त्यांस काय येवढी थोरवी वाटली ?

$ रत्नमाला हें एक सहा आणे किंमतीचें धार्मिक पदांचें चोपडें त्या वेळीं जरी प्रार्थना-समाजाचें धर्मपुस्तक असलें तरी आज ( १९२४ ) प्रार्थनासंगीत नांवाचें एक विस्तृत प्रार्थनापुस्तक सदर पंथानें तयार केलें असून त्यांत भक्तिमार्गी कवि व भांडारकर, मोडक, माळगांवकर, कीर्तिकर, कै. सदाशिव पांडुरंग केळकर वगैरे समाजीयांच्या पद्यांचा संग्रह केला आहे. पाळंदेकृत पांचच पदांचा या पुस्तकांत अंतर्भाव केला आहे. 'सम्पादक'

‡ सदर गृहस्थ प्रसिद्ध प्रार्थनासमाजिस्ट रा. महादेव मोरेश्वर कुंटे, बी. ए., कोल्हापूर हायस्कूलचे हेड्मास्तर हे असावे. ' महाराष्ट्र-कवींचें शिरोरत्न ' हें उपरोधिक ( ironical ) वर्णन आहे. सदर कुंटे यांनीं " राजा-शिवाजी नांवाची वीररसप्रधान कविता " ( An Epic in Marathi ) लिहिली असून तिच्या बारा भागांपैकीं तीन भाग पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले आहेत. हें चोपडें मुंबईच्या इन्दुप्रकाश छापखान्यांत १८६९ सालीं छापलें असून याचीं १३६ पानें आहेत. श्लोक सुमारें पांचशें असावे. या पुस्तकास ' डेक्कन् व्हर्नॅक्युलर् ट्रान्स्लेशन् सोसायटी'कडून बक्षीस मिळालें आहे. यांचे प्रतिस्पर्धी कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनींहि पांचशें आर्या करून पाठविल्या होत्या. पण त्या कमिटीनें नापसंत केल्या. फेब्रुवारी १८७२ च्या ज्ञानप्रकाशच्या एका अंकांत एका 'विलायती कवी'नें ' अत्यंत प्रौढ भाषा, फार मोठें अर्थगांभीर्य,' यांच्यामुळें वेडावून जाऊन कुंट्यांचा ' कल्याण शिष्या ' होण्यासाठीं अनुकरणपूर्वक कांहीं कविता रचण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांपैकीं एक अशी:—

घटाटा फटाटा थटाटा सणाटा । हयाय हटाय धटाटा टटाय ॥
अगग अरेरे अबब अगाई । रंग होतो दंग होतो नकोगे अगाई ॥ १ ॥

व खालीं कुंट्यांच्या कवितेप्रमाणें याहि कवितेचा अर्थ फार लौकर लक्षांत येतो असा खुलासा दिला आहे. कुंट्यांच्या कवितेचा नमुनाः—हा वृक्ष आहे बहु धर्म यांत । उंचीहि रुंदीहि नसेच अंत ॥ उंची कशी हें मन मुख्य पाही । लावी किती लक्ष निमग्न राही ॥ १ ॥ ता० १ आगस्ट १८७२ च्या ज्ञानप्रकाशांत व पुढें तीन अंकांत 'Poet turned a philosopher' या मथळ्याखालीं कुंट्यांच्या

[ पुढें चालू. ]

दयानंदस्वामी यांपैकीं आह्मी कोणाचेही चेले नसून त्यांच्या पंथांकडे आमचा विशेष ओढा आहे असें नाहीं. तसेंच वरील साऱ्या मार्गांच्या अनुयायांस सांप्रत चालू असणारा हिंदुधर्म जसा केवळ उपहास्य व उच्छेद्य वाटतो, त्यांत गुणाचा लेशही नसून दोषांनीं मात्र तो ओतप्रोत भरला आहे, व या भरतखंडाच्या उन्नतीस तोच मुख्यतः मोठा जबरदस्त अडथळा आहे असें वाटतें, तसेंही पण आह्मांस बिलकुल वाटत नाहीं. प्रस्तुत एकंदर विषयावर, व विशेषतः आमच्या अत्यंत निंद्य मानलेल्या हिंदुधर्माविषयीं, आह्मी अवकाशानुसार आपलीं मतें आमच्या वाचकांस सादर करूं; तेव्हां वरील दोन नव्या निघालेल्या पंथांविषयीं आमचे विचार यथास्थित प्रकट करण्यांत येतील. सांप्रत स्थलीं वरील पत्राच्या संबंधानेंच जें लिहिण्यासारखें आहे तेवढें लिहितों.

'हितेच्छु' यांच्या सदरील पत्रावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, त्यांचीं मतें आलीकडे नव्या निघालेल्या धर्ममार्गास अनुसरून आहेत. यास्तव त्या मार्गांच्या संबंधानें एकविसाव्या अंकांत वगैरे आह्मीं जो टोंचून मजकूर लिहिला आहे तो त्यांस अगदीं अमान्य होऊन, प्रस्तुत विषयाचा आह्मांस मुळींच अनुभव नाहीं, तो आह्मांस अगदीं उपेक्षणीय वाटतो, व यास्तव त्यासंबंधानें आमचें लिहिणें केवळ साहसाचें आहे; असे दोष त्यांनीं आह्मांस दिले आहेत. आतां यावर आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, कोणाचीं धर्मसंबंधी कशींही मतें असलीं तरी त्यांविषयीं आमचें कांहीं बोलणें नाहीं. जो ज्यास धर्म खरा वाटतो त्याचें जर तो निःस्पृह व शुद्ध मनानें यथासांग अनुवर्तन करील तर त्यास कोणीही दोष लावणार नाहीं, किंबहुना बहुधा सर्व लोक त्यास मानही देतील. हें तर काय, पण कोणास, विद्यमान धर्म अत्यंत दुष्ट असून त्यास अनुसरल्यानें आपल्या देशबांधवांचें फार अकल्याण होत आहे, असें मनापासून वाटून तो सुधारण्याचें किंवा तो नष्ट करून टाकून नवा प्रवृत्त करण्याचें जर तो मनांत आणील व त्याकरतां बुद्धिपुरःसर निर्मळ अंतःकरणानें झटेल, तर त्याचा अत्यंत द्वेष करणाऱ्या त्याच्या प्रत्यक्ष शत्रूंसही त्याची योग्यता वाखाणावी लागेल. अशा प्रकारचें आमच्या देशांतील आलीकडचें उदाहरण राजा राममोहन राय यांचें होय; व एकंदर जगाच्या इतिहासांत असलीं उदाहरणें आणखी पुष्कळ आहेत. पण वरच्यासारखें कांहींच नसून असा जर प्रकार कोणाच्या पाहण्यांत आला,—कीं, आज प्रार्थनासमाजाची स्थापना केली तर उद्यां त्याच हातांनीं आर्यसमाजाचें प्रतिष्ठापन करायाचें; सकाळीं वेदमूर्ति बनून वषट्कार केला, तर दुपारीं येशूचें पवित्र भोजन करून त्याची सांगता, कीं लगेच संध्याकाळीं 'अल्लाबिसमिल्ला'दि कुराणसूक्ताचा पाठ करून परिसमाप्ति; दिवसां परमेश्वराचें निर्गुण निराकार स्वरूप डोळे मिटून

सदर काव्याचें परीक्षण आलें आहे. एकंदरींत कुंटे जरी विद्वान् व तीव्र बुद्धीचे असले, तरी त्यांचें प्रस्तुत काव्य म्हणजे 'अव्यापारेषुव्यापार' अशी पुष्कळांची समजूत होती असें दिसतें. यांचें शिक्षण माहुली व कोल्हापूर आणि मुंबई येथें झालें. यांनीं कराची, कोल्हापूर, पुणें येथील हायस्कुलांच्या हेडमास्तरांचीं कामें केलीं आहेत. प्रसंगीं कॉलेजांत प्रोफेसरचेंहि काम केलें आहे. यांनीं सिंधी, गुजराथी यादि भाषांवर चांगलें प्रभुत्व मिळविलें होतें. 'सम्पादक'

मोठ्या भक्तीनें मनांत आणलें, तर रात्रीं साकार सगुण रूपाचें चंद्रचकोर-न्यायानें डोळे भरून ध्यान करायाचें; आज सद्धर्माचा आवेश अंगांत भरून मूर्तीस लाथेनें झुगारून दिलें तर उद्यां अत्यंत उपरति होऊन त्यास पुन: देव्हाऱ्यांत बढवून त्यांवर रुद्राचें आवर्तन;— इत्यादि 'अनेक बुद्धितरंग कोणाचे दृष्टीस पडून ते जर क्षणक्षणां पालटूं' लागले, तर त्यांच्या धार्मिकत्वाची मीमांसा काय करावी बरें ? आमची बुद्धि तर येथें अगदीं गुंग होऊन जाते ! मग 'हितेच्छूं'च्या म्हणण्याप्रमाणें आम्हांस प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळें असें होतें कीं काय न कळे ! असें असेल तर आमची सर्वांस येवढीच प्रार्थना आहे कीं, प्रस्तुत धर्मप्रवाहांत गाढ अवगाहन केल्यामुळें ज्यांचें अंतःकरण शुद्ध होऊन बुद्धीस अत्यंत तीव्रता आली असेल, व अगदीं उगमाच्या स्वच्छ झऱ्यांशीं तत्त्वप्राशन करून जे परमपावन झाले असतील त्यांनीं वरील संशयजालाचें एकदां पूर्ण निरसन करून टाकावें म्हणजे सहस्रावधि अज्ञजनांच्या हृदयांत सद्धर्मप्रकाश फांकून लक्षावधि लोकांस स्वर्गाचा दरवाजा खुला करून दिलासा होईल !

आतां 'हितेच्छूं'चें असें म्हणणें आहे कीं, 'प्रार्थनासमाज' व 'आर्यसमाज' हे अद्याप बाल्यावस्थेंत आहेत, यास्तव सध्यां त्यांच्यापासून विशेष कार्यनिष्पत्ति झालेली जरी दृष्टीस न पडली, तरी कालेंकरून त्यांचा प्रभाव अवश्य फैलावत जाणार. 'आर्यसमाजा'ची नुकती जी पुन्हां स्थापना झाली म्हणून मागील अंकांत एके ठिकाणीं* सांगितलें त्या प्रसंगीं अध्यक्षांनीं जें सुरस भाषण केलें, त्यांत त्यांनीं असा कोटिक्रम बसवला कीं, या भूपृष्ठावर आजपर्यंत जेवढे म्हणून धर्म स्थापले गेले त्यांचे आरंभ आमच्या प्रस्तुत समाजाप्रमाणेंच लहान होते; तर येवढ्यावरूनच या नव्या सुरू झालेल्या पंथाच्या भावी स्थितीविषयीं कोणीं मनांत संशय आणूं नये; याही पंथाचा त्याच्या अग्रजांप्रमाणें भविष्यत्कालीं प्रताप गाजेलच ! या दर्पोक्तीवरून आम्हांस एका करवीरस्थ महाकवीची[1] आठवण होते. त्याच्या वीररसप्रधान काव्यावर जे कोणी मूर्ख समजुतीमुळें व अरसिकत्वास्तव टीका करतात त्यांस तो असें उत्तर देतो कीं, " थांबा असे हातघाईवर येऊं नका; मीं जो आपल्या बुद्धीचा येवढा विलास प्रकट केला आहे तो केवळ तुम्हांकरतांच नव्हे. अरे खुळ्यांनो, केवळ 'ट' ला 'ट' आणि 'प' ला 'प' जुळवून तात्कालिक लोकांसच रंजवूं पाहणारा हा सरस्वतीचा लाल नव्हे ! आम्हांसारख्या महाकवींनीं तुम्हांला एकट्यांनाच घेऊन रे काय करावें ? आमची नजर किती दूरवर असते ! जेव्हां तुम्हांपैकीं मोठे मोठे नामांकित म्हणून गाजणारेही केव्हांच धुळीस मिळून जाऊन त्यांच्या कीर्तीचा मागमूसही राहणार नाहीं, व तुमच्या खापरपंतूचे खापरपंतू जातिभेद, मूर्तिपूजा वगैरे सब गोलंकार मोडून टाकून पायांत विजारी व डोक्याला

---

* पृष्ठ ३१९ पाहा. 'सम्पादक'

१ या कवीविषयीं ‖ एक आख्यायिका १६ व्या अंकाच्या 'विनोद' या सदराखालीं दिली आहे ती आमच्या वाचकांस आठवत असेलच.

‖ हा महाकवि कोल्हापूरस्थ महादेव मोरेश्वर कुंटे. मागील ३४१ पानावरील टीप पाहा. 'सम्पादक'

टोप्या घातलेले दयानंदजींच्या वैदिक विमानांत बसून उलूपी§ राजकन्येचा देश (अमेरिका), श्वेतद्वीप ( ब्रिटन् ) वगैरे खुशाल मौजेनें हिंडूं लागतील, व आमचे दयाळू राज्यकर्ते या सुवर्णभूमीची विभूति रघुराजाप्रमाणें मृत्पात्रशेष ¶ करून आपल्या काळ्या बंधूंस प्रेमालिंगन देऊन व त्यांचा मोठ्या गौरवानें निरोप घेऊन परत निजधामास जाण्याच्या तयारीनें आगबोटीवर पाय ठेवतील,तेव्हांही राजा शिवाजीचा पोवाडा † इतरांपेक्षां लोकांस अतोनात आवडून त्याचा कडाका सगळ्या देशभर गर्जत राहील!" याप्रमाणें हे दोन्ही भविष्यवाद* एकासारखे एक आहेत; व ते तसे असण्याचें कारणही उघडच आहे. आतां ते कितपत खरे होतील याची प्रचीती तर आधुनिक लोकांपैकीं कोणासही सांपडावयाची नाहीं हें उघडच आहे; तरी दयानंदस्वामींनीं आम्हांला जी ' युक्ती, प्रमाण, अनुमान, ' वगैरेंची सामग्री देऊन ठेवली आहे तीवरून पाहतां त्यांच्या आर्यसमाजाची व त्याच्या भावंडाची धडशी गत दिसत नाहीं. कारण जो 'आर्यसमाज' आज चार दिवसांत चारदां ढासळला, व स्थापनाच्या वेळेस ज्यास पांच सात ठरीव भक्तमंडळीखेरीज ज्यास्ती कोणी मिळेचना; तसेंच ज्या 'प्रार्थनासमाजाच्या' पहिल्याच महोत्सवाच्या दिवशीं त्याच्या मंदिराचे स्तंभ एकमेकांवर कोसळूं लागून प्रथम मंगल दिवशींच अत्यंत अमंगल झालें, त्याचा टिकाव किती काळ निघेल याचें अनुमान कोणासही सहज होणारें आहे ! युक्तीपेक्षां भावाचें प्राबल्य ज्याच्या ठायीं ज्यास्त झालें असेल किंवा समंजसतेवर दुराग्रहाचा पगडा बसला असेल त्यास मात्र वरील गोष्ट कदाचित् दिसणार नाहीं. आतां वरील आचार्यांचें असें म्हणणें काहे कीं, आज हजारों वर्षे चालू असणारे इतर धर्मही आरंभीं असेच लहान होते;—होते खरे, पण येवढ्यावरूनच त्यांचें नूतन बालक त्या इतरांसारखें प्रचंड विस्तार पावेल असें झालें कां ? वटवृक्षाचा आरंभ लहान अंकुर असतो, व तेरड्याचाही तोच असतो; म्हणून या दुसऱ्या महावृक्षाची प्रशंसा करून जर एकादे महापंडित सांगूं लागले, कीं हा सध्यां तुम्हांला छोटासा अंकुर

---

§ उलुपी—ऐरावत नामक नागकुलांतील कौरव्य नागाची कन्या. तस्करांनीं हरण केलेलें द्विजगोधन सोडविण्याकरितां धनुष्य-बाण आणण्यासाठीं रात्रीं धर्मराज व द्रौपदी एकान्तात असतां तेथें जावें लागल्यामुळें दुसरे दिवशीं सकाळीं नारदोक्त नियमाप्रमाणें इंद्रप्रस्थ सोडून बारा वर्षे तीर्थयात्रा करण्यास निघाला. मार्गांत गंगा नदी लागली तेव्हां तींत स्नान करूं लागला तों सदर उलुपीनें त्याच्या रूपास भुलून त्याला पाताळांत ओढून नेलें. पुष्कळ कां कूं केल्यावर अर्जुन तिच्याशीं लग्न करण्यास तयार झाला. तिला अर्जुनापासून मुलगा झाला तो इरावान्. याच उलुपीच्या साह्यानें पुढें बभ्रुवाहनाच्या हातून अर्जुनाला मृत्यु आला असतां पाताळांतून अमृतसंजीवनमणि आणून त्याला जिवंत करण्यांत आलें. 'सम्पादक'

¶ रघुराजानें दिग्विजय केल्यानंतर विश्वजित् यज्ञ करून अजाचे स्वाधीन राज्य केलें. सर्वस्वदानामुळें जवळ सोन्याचें भांडें न उरल्यानें मातीच्या भांड्यांत पूजाद्रव्यें घालून वरतंतूचा शिष्य कौत्स या अतिथीचें स्वागत करण्यास गेला. या गोष्टीचा उल्लेख येथें आहे. 'सम्पादक'

† कर्ताः कै. म. मो. कुंटे, मागील ३४२ पानावरील टीप पाहा. 'सम्पादक'

* एक आर्यसमाज स्थापनाच्या वेळच्या अध्यक्षांचा आणि दुसरा करवीरस्थ महाकवि कुंटे यांच्या अवतरणांतर्गत असे दोन्हीहि भावी अभ्युदयाबद्दलचे भविष्यवाद. 'सम्पादक'

दिसत आहे यावर जाऊं नका, या अंकुराचाच कांहीं वर्षांनीं मोठा सपाटा वृक्ष बनणार आहे, असा कीं दहा दहा मनुष्यांच्या वेंगेंतही तो मावणार नाहीं; याचें शिखर मेघमंडळास भेदून जाऊन फांद्यांचा मोठा प्रचंड विस्तार होईल; आणि असें होऊन लक्षावधि प्राण्यांस हा आधारभूत होऊन त्यांचा विश्रांतिहेतु व जीवनहेतु होणार आहे;—अशा बाता जर कोणी झोंकूं लागला, व प्रमाण काय ह्मणून विचारलें असतां जर शेजारच्या वडाकडे बोट दाखवूं लागला, तर ऐकणारास अतिशय हसूं आल्यावांचून राहील काय? बौद्ध धर्मांचा' ख्रिस्ती धर्मांचा, व मुसलमानी धर्मांचा आरंभ 'आर्यसमाजा'प्रमाणेंच आधीं क्षुद्र होता खरा पण पहिल्यानें अर्धें एशियाखंड व्यापलें, दुसऱ्यानें युरोप व्यापून नवें जगही पाहिलें आहे,' आणि 'सत्यदीपिका'कारांसारख्यांचे उल्लेख जर खरोखरीच 'सत्य' असतील तर त्या धर्माचा पाय (निदान संख्येच्या संबंधानें तरी) प्रतिवर्षीं पुढेंच आहे असें ह्मणणें भाग आहे; महंमदाचा धर्म तर त्याच्या हयातींतच सगळ्या आरबस्थानावर पसरून सुमारें शंभर वर्षांतच तो एकीकडे अंट्लांटिक् महासागरापर्यंत व दुसरीकडे पासिफिक् महासागरापर्यंत पसरला! मग दयानंदी धर्माचाही असाच प्रसार होणार आहे काय? कोण जाणे बोवा, वेदांतून व शतपथ ब्राह्मणांतून स्वामींच्या सांगण्याप्रमाणें आगगाड्या, तारायंत्रें, व विमानें निघून तसें झालें तर कोणीं सांगावें!! असो; एकंदरींत समाजमजकुराच्या महाविद्वान् स्थापकांस आमचें येवढेंच सांगणें आहे कीं, असत्याचा उच्छेद करून सत्याचा उदय करण्याची व देशसुधारणा करण्याची जर त्यांची खरोखरच इच्छा असेल, व आपली चोहोंकडे जी प्रतिष्ठा आहे तीं कायम राहून लोकांचा विश्वास आपणावरचा समूळ उडून जाऊं नये असें जर वाटत असेल, तर स्वामींच्या प्रीत्यर्थ व त्यांनीं काढलेल्या सोंगाच्या प्रीत्यर्थ त्यांनीं आलीकडे जो कित्येक महिने लपंडाव सुरू केला आहे, तो त्यांनीं अगदीं सोडून द्यावा; त्याच्या योगानें सध्यांही थोडा अनर्थ झाला आहे असें नाहीं! तसेंच त्यांनीं गेल्या दहा वर्षांत झालेल्या कालांतराकडेही भरपूर नजर पुरवावी. दयानंदजींस पुढें करून शास्त्री लोकांचीं तोंडें बंद करून टाकतां आलीं, व वेदचतुष्टयाचें मूर्तत्व आपल्या ठायीं स्थापून घेऊन त्या बिचाऱ्या लोकांचा भरसभेंत आपणास यथेच्छ उपमर्द करतां आला, येवढ्यानेंच कृतार्थता मानून आपला दिग्विजय झाला असें मानूं नये. 'आर्यसमाजा'चे प्रतिपक्षी केवळ वरील लोकच आहेत असें नाहीं. श्रीमत्परमहंसांच्या उद्दामपणानें, पोरकट कोट्यांनीं, असंबद्ध प्रलापांनीं, व दोन महिने घीशक्करेच्या जोरावर यथेच्छ केलेल्या चारगटपणानें, तसेंच त्यांच्या पुरस्कर्त्यांच्या कौटिल्यानें, ज्यांचीं मनें पुरतेपणीं विटून जाऊन संतप्त होऊन गेलीं आहेत असे लोक थोडे आहेत असें नाहीं. त्यांस सभेंत उभें राहून अद्वातद्वा चर्पटपंजरी करण्याचें जरी सामर्थ्य नसलें व अनेक कारणांस्तव त्यांचा राग त्यांस आंतल्या आंतच जरी गिळावा लागला, तरी तसें ते नेहेमी व सर्वच करतील असें नाहीं. एकंदरींत ज्ञानाचें निधान काय ते आह्मी, व ज्ञुफीचा वास काय तो आमच्याच पाशीं, अशा भ्रमांत गढून जाऊन 'निर्वीरमुर्वीतलम्' असा आव वरील लोक जितका थोडा घालतील तितका बरा!

'हितेच्छूं'चा आह्मांवर तिसरा दोषारोप हा आहे कीं, समांचा व व्यक्तींचा व्यर्थ

उपहास करण्यांत आम्हांस कांहीं विलक्षण भूषण वाटतें. हा आरोप वरील दुसऱ्या आरोपावरच सर्वथा अवलंबून राहणारा आहे. वरील सभांस वगैरे जे आह्मी दोष देतों ते अयथार्थ नव्हेत अशी ज्यांची खात्री असेल त्यांस तिसऱ्या दूषणाची विशेष मातब्बरी वाटणार नाहीं. कारण जें सर्वथा किंवा बहुतेक अंशीं एकाद्यास अप्रयोजक वाटतें, व ज्या गोष्टीविषयीं त्याची विशेष पूज्यबुद्धि नसून इतरांची तरी ती कां असावी हें त्यास कळत नाहीं, त्यावर नुसतीं कोरडीं दूषणें देण्यापेक्षां आपल्या श्रोत्यांस किंवा वाचकांस हसवण्याचीही जर त्यास संधी सांपडली, तर ती तो व्यर्थ घालवील असें नाहीं. हा प्रकार अगदीं प्राचीन काळापासून चालत आला आहे; व त्यांत आमच्या बुद्धीस कांहीं गैरही दिसत नाहीं. त्यांतून जो कित्ता आमच्यापुढें इतका ठळठळीत दिसत आहे तो आह्मीं कां गिरवूं नये ? मेकॉले, मिल्लसारख्या महापंडितांनीं बिचाऱ्यांनीं क्षणमात्रही विचार न करतां आमच्या देशभर आपली चटोरपणाची व कडकपणाची लेखणी जर खुशाल फिरवली आहे, व तिच्या शाईनें आपल्या कीर्तीच्या मुखास कालिमा लावून आमच्या हृदयांत चिरकाळ भिनून राहीसें विष तिच्या मुखांतून जर ओकवलें आहे; तेंच व्रत पुढें जगत्तारकाच्या प्रेषितांनीं व त्यांच्या भुलथापीस भुलून आकाशाच्या राज्याचा तुकडा ज्यांनीं आपापलासा करून घेतला अशा बाटगे मंडळीनें जर आज तीस चाळीस वर्षें कायावाचामनेंकरून निर्बाध चालवलें आहे; फार तर काय, पण आमचे देशबंधु व आमच्या हिताची अतोनात कळकळ बाळगणारे असे जे महाविद्वान् व महावक्ते बाबू प्रतापचंद्र व साक्षात् जगद्गुरु दयानंदजी यांसही हास्यरस यथास्थित पिकवल्याखेरीज आपलें व्याख्यान रंगलेंसें वाटतच नाहीं, तर तोच श्लाघ्य क्रम पुढें चालवण्यास आमच्या 'निबंधमाले'सच कां आडकाठी असावी ? आमच्या जुन्या लोकांत व त्यांच्या आचारांत हास्यरसाला पुष्कळ विषय आहे हें जसें आमच्या नव्या मंडळीनें जगजाहीर करून टाकलें आहे; त्याचप्रमाणें न्यायानें ह्मटलें ह्मणजे नव्या मंडळीचेही गुणदोष जगापुढें विशेष उघडपणें आणले असतां त्यांत कोणास वाईट वाटूं नये. बालविधवांचा दुःखाक्रोश कानांनीं ऐकवत नाहीं ह्मणून शास्त्रकर्त्यांच्या व भटांच्या नांवानें नेहेमी खडे फोडून ते दुष्ट, पक्षपाती, कोत्या समजुतीचे, व आपमतलबी ह्मणून हाका माराव्याच्या, व देशकार्यरूप नौकेचें सुकाणूं आपण स्वतः हातीं धरायाचें; पण पुढें लवकरच आपला कपटकोप, लोककल्याणाविषयी कळकळ, बालविधवांस दिलेलें अश्वासन, आपला, आपल्या मंडळीचा, व एकंदर देशाचा लौकिक, वगैरे चट सारें एका क्षणांत एकीकडे गुंडाळून ठेवून केवळ विषयलंपटतेस वश होऊन आपल्या एकट्याच्याच नियतकालिक सुखाकरतां सगळें जहाजचें जहाज समुद्राच्या तळीं नेऊन बसवतांना तिळप्रायही मनांत शंका आणायाची नाहीं ! मूर्तिपूजा, जातिभेद, वगैरे आह्मी बिलकुल मानीत नाहीं ह्मणून शेंकडों वेळां ईश्वरोपासनेच्या वेळीं मंदिरांत सांगून बाहेर आले कीं, पुन्हां लागले जगाच्या रूढीला ! दुसऱ्यांच्या पुनर्विवाहोत्सवाला वऱ्हाडी; पण घरचें कार्य निघालें कीं कपाळ दुखायाला लागून हवा पालटल्याखेरीज चालायाचेंच नाहीं ! इंग्रेजी विद्येच्या अध्ययनानें जुन्या धर्माची लाज वाटायाला लागून मोठा समाज जमवून त्यांत मोठ्या समारंभानें ईश्वराविषयीं प्रेम,

मनुष्यमात्राविषयीं बंधुप्रीति, वगैरे भाव पूर्ण दाखवून खळखळा रडावावें; पण तेथून निघालें कीं लागलेंच याच्यावर तोंड टाक, त्याच्या नाशाचा उद्योग कर, वगैरे अंगांत बिंबलेलें दुष्टत्व व नीचत्व प्रगट झालेंच; सकाळीं संध्याकाळीं ईश्वराचे गुणानुवाद मोठ्या प्रेमानें गाऊन आम्हांस अक्षय सुखांत ठेवण्याविषयीं त्याजपाशीं प्रार्थना करायाची; आणि रात्रीच्या समयीं ईश्वराच्या दृष्टीस न पडतां त्याचें जगद्व्यापकत्व गुंडाळून ठेवून शरीरसुखसाधनाच्या ठिकाणीं गुप्त प्रवेश करायाचा ! याप्रमाणें शेंकडों कुलंगडीं जीं आमच्या नव्या मंडळींत सर्वांस ढळढळीत दिसत आहेत तींच तेवढीं छपवून ठेवण्याचें कोणीही सत्यपक्षपाती व न्यायी मनुष्य पतकरायाचा नाहीं. शिवाय वरील उपहासापासून कांहीं उपयोग नाहीं असें जें आमच्या पत्रकाराचें ह्मणणें आहे तेंही आह्मांस बरोबर वाटत नाहीं. त्याचा उपयोग उघडच आहे कीं, त्यामुळें जे लोक इतःपर देशहिताच्या उलाढालींत पुढारीपणा घेऊं पाहतील ते पूर्वीप्रमाणें खुशाल मौजेखातर तें काम कधीं हातीं घेणार नाहींत. आपण या कामांत शिरणार तर अगोदर पूर्ण विचार करून शिरलें पाहिजे, व यांत आपण दक्षता दाखवली नाहीं किंवा लबाडी केली तर साऱ्या लोकांचा आपणावर गहजब होईल हेंही ते पक्केपणीं समजून राहतील.

असो; याप्रमाणें ' हितेच्छू ' च्या तीन दोषारोपांवर आह्मीं आपले विचार त्यांस व आमच्या एकंदर सर्व वाचकांस कळवले आहेत. ते निबंधारंभींच्या कविवचनास अनुसरून वरील पत्राच्या रीतीप्रमाणेंच केवळ उघडपणें आह्मीं प्रदर्शित केले आहेत. ते सर्वांस रुचतील असें अर्थातच होणार नाहीं; कारण कोणताही विषय घेतला तरी त्यावर लोकांचा परस्पर मतभेद नेहेमी असतोच. आणि शिवाय कितीही विद्वत्ता अंगीं असली किंवा लोकांत मान्यता असली तरी अप्रिय जें सत्य तें साहणारे लोक फार थोडे. ह्मटलें आहे, " अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः " " जें भाषण पथ्य ह्मणजे हितकर आहे पण अप्रिय आहे असें बोलणाराही दुर्लभ व ऐकणाराही विरळा." तेव्हां वरील उत्तरांत आमच्या देशांतील आलीकडील लोकांविषयीं सामान्यतः व विशेषतः जे इतके उल्लेख स्पष्टरीत्या केले आहेत ते पुष्कळांस न आवडून कांहीं बऱ्या मंडळींचा आह्मांवर अत्यंत क्षोभही होईल हें आह्मी समजून आहों पण यापूर्वीं आह्मीं अनेक वेळां आमच्या वाचकांस कळवलेंच आहे कीं, आमच्या बुद्धीनें आह्मांस जें खरें भासतें तें जाहीर करण्यास आह्मी कोणाचेंही भय किंवा धाक तिळमात्रही मनांत वागवणार नाहीं. ईश्वरकृपेनें सरकारचें मिंधे झाल्यावांचून व बऱ्या मंडळीची भीडभाड बाळगत वागवल्यावांचून आमचें पुस्तक आज दोन वर्षे खासें सुरळीत चाललें आहे. महाराष्ट्र-भाषेविषयीं कळकळ, स्वदेशाचा अभिमान, किंवा ज्ञानाविषयीं उत्कंठा, यांहीं प्रेरित होत्सात्या शेंकडों लोकांचा आह्मांस बळकट आश्रय आहे, व तो दिवसांदिवस वाढत आहे. आमच्या पुरस्कर्त्यांच्या मालिकेंत आमच्या देशाच्या गतवैभवाचें स्मारक व त्याचें अवशिष्टांशभूत असें जें जुनें राजमंडळ त्यांचींही नांवें मधून मधून झळकतात. या शेवटल्या गोष्टीचा आह्मांस मोठा संतोष व मोठा अभिमान वाटतो; व तो प्रदर्शित करण्यांत आह्मांस कांहीं एक दोष दिसत नाहीं. असो; तर याप्रमाणें जर आमच्या

पुस्तकाची स्थिति आहे तर त्यावर कोणाची इतराजी होईल या भयास्तव किंवा व्यर्थ मुरवतीस्तव सत्याचें तेज मुळींच झांकणें किंवा मलिन करणें आह्मांस अगदीं उचित वाटत नाहीं !

हा मजकूर येथवर बराच लांब झाला आहे. तरी प्रस्तुत लेख आटपण्यापूर्वी गेल्या एकविसाव्या अंकांतील मजकुराच्या संबंधानें कांहीं लिहिणें अवश्य वाटतें. त्या अंकांत आलीकडे स्थापन झालेल्या बहुतेक सभांविषयीं वगैरे जो मजकूर लिहिला आहे तो वरील पत्र लिहिणारास जसा वृथा ढोल मिरवण्याकरितां लिहिला आहेसा वाटला तसाच पुष्कळांस वाटण्यासारखा आहे. कारण त्यांविषयीं आजपर्यंत कोणींही विरुद्ध अभिप्राय विशेष उघड रीतीनें प्रसिद्ध केलेला नाहीं. तेव्हां त्यांवर एकदम गर्दी केलेली पाहिली असतां वरील कल्पना होणें कांहीं अंशीं साहजिकच आहे. तरी वरील अंक चांगला लक्षपूर्वक व शांत मनानें वाचला असतां कोणासही कळून येईल कीं, त्यांत जी टीका केली आहे ती वरील सभांवर ह्मणजे त्यांच्या उद्देशावर तादृश नसून, त्यांचें स्वरूप जें हल्लीं दृष्टीस पडत आहे, त्यावर, त्यांपासून अपेक्षा केलेल्या कार्यावर, व त्यांतील सभासदांवरच मुख्यत्वेंकरून होय. मूळचा संकल्प कितीही चांगला असला तरी तो सिद्धीस नेण्याचा मार्ग जर कोणीं भलताच धरला, व त्यापासून विलक्षण कार्याची सिद्धि होईल असा भ्रम लोकांत माजवला किंवा स्वार्थसाधनाच्या आशेनें तें काम हातीं घेतलें, तर या तिन्ही गोष्टींच्यामुळें त्यावर टीका करण्यास जागा होते हें उघडच आहे. तर वरील अंकांतील टीका पुष्कळ अंशीं अशाच प्रकारची आहे. तिजवरून आलीकडे आमच्या लोकांचे जे निरनिराळ्या प्रकारचे उद्योग सुरू झाले आहेत ते सर्व अगदीं व्यर्थ आहेत व त्यांचे पुरस्कर्ते सर्वच दांभिक, लब्धप्रतिष्ठ वगैरे आहेत असें ह्मणण्याचा आमचा बिलकुल इरादा नाहीं. ज्या व्यक्तींवर विशेषेंकरून वरील दोष येऊं पाहतों त्यांविषयीं व वरील उद्योगांचा जेवढा भाग आमच्या मतें दूषणीय वाटतो तेवढ्याविषयीं आमचीं मतें प्रगट झालींच आहेत. तेव्हां व्यक्तिविशेषांविषयीं व एकदेशाविषयीं जें ह्मटलें तें एकंदर सर्वांस व साऱ्या उद्योगांस लागू पडतें असें समजूं नये.

---

१. कित्येक व्यक्तींविषयीं आह्मीं केवळ 'अविचारानें' मजकूर लिहिला आहे असा दोष 'हितेच्छूं'नीं आह्मांस एके ठिकाणीं दिला आहे. येवढ्या सन्मानार्ह व्यक्ति कोणत्या त्या आह्मांस बरोबर माहीत नाहींत. पण निदान एका व्यक्तीचा तरी कैवार आमच्या 'हितेच्छु' ह्मणवणारांनीं घ्यावयाचा नव्हता. ज्या अधमाधमानें शें दोनशें रुपयांच्या लालचीस भुलून दगेखोरपणाचें काम पतकरलें, व आपल्या 'आर्यजननी'स अक्षय काळोख लावून 'देशबांधवां'स गळफांस लावण्याचा प्रयत्न केला, त्याची कीव ज्यांस लडिवाळपणाचीच वाटते त्यांची धन्य ह्मणायाची; दुसरें काय ? आह्मी तर आमचा कृतसंकल्प येथें स्पष्ट लिहून कळवतों कीं, आमच्या महाराष्ट्र-भाषेंत जेवढे ह्मणून कठोर शब्द आहेत व तिच्या अंगीं निंदाव्यंजकत्व जेवढें म्हणून आहे तेवढ्या सर्वांचा अमल्या महापातकी मनुष्यावर वर्षाव केल्याखेरीज आम्ही कधीं राहणार नाहीं !

# निबंधमाला,–वर्ष दुसरें.

या अंकाच्या अखेरीस आमच्या पुस्तकाच्या दुसऱ्या वर्षाचा क्रम संपला. यास्तव सालगुदस्तप्रमाणें एकंदर वर्षाच्या संबंधानें कांहीं थोडा मजकूर येथें लिहितों.

पहिल्यानें सर्वधर्मसंमत जो मुख्यसंप्रदाय त्यास अनुसरून जगन्नियंत्यास येथें सद्भावपूर्वक प्रणाम करतों. अवघ्या जीवसृष्टीची कृति केवळ त्याच्याच सत्तेनें चालली असल्यामुळें ज्ञानवान् प्राणी जो मनुष्य त्यानें आपल्या महाधिकाराप्रमाणें आपल्या वक्तृत्वाचें मूळ ओळखून त्याशीं अनन्यभावेंकरून नम्र असावें हें त्यास उचित होय. यास्तव प्रस्तुत देशकार्याचें दुसरें वर्ष ज्याच्या कृपेनें निर्विघ्नपणें तडीस लागलें त्याचे कृतज्ञताबुद्धीनें व आनंदभरानें येथें उपकार आठवतों.

गेलेलें वर्ष एकंदरींत पुष्कळ गोष्टींनीं दीर्घकाल ध्यानांत राहण्यासारखें झालें. युरोपांत तर रूमशामच्या आज चारशें वर्षें चाललेल्या राज्यावर एकदम मोठाच प्रसंग† गुदरला असून त्यामुळें सगळ्या खंडाच्या खंडास मोठी धास्ती येऊन पडली आहे. आमच्या देशांत दोन मोठे भयंकर प्रलय होऊन एक मोठी राज्यक्रांति झाली, व दुसरी होण्याचेंही चिन्ह थोडेंसें भासूं लागलें होतें. जिकडे तिकडे रडारडी व पळापळी सुरू होऊन मनुष्यमात्राचा मोठाच संहार झाला. लक्षावधि लोकांस इष्टजनवियोगाच्या दुःसह वेदनांचा अनुभव होऊन दुःखसागरांत बुडून राहावें लागलें. आमच्या बडोदें सरकारचा आमच्या राजकर्त्यांशीं आज इतकीं वर्षें अखंड चाललेला स्नेह एकाएकीं भंग पावून दोघांमध्यें जें वितुष्ट पडलें त्याचा डंका साऱ्या जगभर वाजून त्यापासून अनेक अनर्थ झाले. हैदराबादच्या दिवाणाची व बडे साहेबांची बोलाचाली होऊन पुढें काय होतें कोण जाणे असें सर्वांस वाटूं लागलें. असो, एकंदरींत या वर्षीं आमच्या देशांत अनेक मोठमोठे उत्पातच झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं. शेवटीं मात्र एक मोठा उत्सव चोहोंकडे गाजला; तो अर्थातच युवराजनिमित्त जिकडे तिकडे चालू झालेला समारंभ होय. हा अद्याप चालू आहेच.

---

† टर्कीच्या सुलतानाच्या उधळेपणामुळें व प्रधानमंडळाच्या नालायकीमुळें राष्ट्राचें दिवाळें निघण्याची वेळ आली. त्यांत आणखी युरोपियन् प्रजाजनांना कमीपणानें वागविण्यांत येत असल्यामुळें बोस्निया ( Bosnia ) व हर्झिगोव्हिना ( Herzegovina ) या प्रांतांत असंतोष पसरून बंडें झालीं तीं मोडण्यांत टर्कीची सारी शक्ति खलास झाली. पुढें ही आग बल्गेरियांतहि पसरली. बाटवून मुसलमान करण्यांत आलेल्या एका ख्रिस्ती मुलीचें परत ख्रिस्ती धर्मांत येण्याबद्दल मन वळविण्यांत आल्यानें खवळून जाऊन माथेफिरू मुसलमान जनसमूहानें दोघां परराष्ट्रीय वकिलांचे ( Foreign consuls ) खून पाडले. अर्थात् रशियाचें फावलें. शिवाय मिधत पाशा, महमद रुशदी पाशा, महमद दमाद पाशा, यांनीं एक कट करून सुलतान अबदुल् अझीझला पदच्युत केलें.

'सम्पादक'

* माजी व्हिक्टोरिया राणीचा मुलगा एड्वर्ड् ( पुढें बादशाहा सप्तम एड्वर्ड् ); मुंबईस उतरल्याची तारीख ८ नोव्हेंबर १८७५.

'सम्पादक'

वर जे उत्पात झाले म्हणून सांगितले त्यांचीच एक लहर आमच्या शहरावरही येऊन आदळली कीं काय कोण जाणे ! येथेंही गेल्या सालीं दोन अपूर्व प्रसंग घडले. एक मे महिन्यांत वक्तृत्वोत्तेजक सभेंत झालेला दंगा. याविषयीं गेल्या एकविसाव्या अंकांत थोडासा उल्लेख केलाच आहे. त्याहून अधिक येथें इतकेंच सांगावयाचें कीं, तो सगळा प्रकार पुनः मनांत आणला असतां मोठा चमत्कार वाटतो ! वरील समारंभ अगोदर चार वर्षें चांगला चालला असतां पहिल्यानें यत्किंचित् कारण तें काय झालें, पुढें जातां जातां गोष्ट गेली कोणत्या थरावर, सभेंत चोहोंकडे एकदम बजबजपुरी माजून तीस कोणी धनी ना गोसावी अशी एकदम तिची तारंबळ काय झाली, कोणास काय पाहिजे तें तो बोलायास लागून बऱ्या बऱ्या मंडळींचा बोजवार तो काय झाला, हें सर्व मनांत आलें म्हणजे बुद्धि अगदीं गुंग होऊन जाते ! येवढा कहर एकदम कशानें उसळला असेल याची कांहीं कल्पनाच करवत नाहीं. असो; परमेश्वराच्या दयेनें तशी वेळ पुनः न येवो म्हणजे झालें ! दुसरा प्रसंग दयानंद सरस्वतींचा. यांच्या समारंभाचा वृत्तांत गेल्या अंकांत बराच दिला आहे. त्यावरून बाहेरील लोकांस स्वामींच्या निमित्त येथें जो महोत्सव झाला त्याची बहुधा बरीच कल्पना करतां येईल. येथील लोकांस तर निदान दहा वीस वर्षें तरी परमहंसांची वरात व वे० रा० रा० श्रीगर्दभाचार्य यांचा छबिना यांचा विसर पडणार नाहीं. ज्या कोणा भाग्यवान् पुरुषांच्या वांट्यास लुला हात, दगडाची खोंच किंवा चाबकाचे वळ वगैरे महाप्रसाद आला असेल ते तर जन्मपर्यंत स्वामींचा गुणानुवाद गात बसतील. असो; पण अशांस स्वामींच्या तर्फे आह्मी असें आश्वासन देतों कीं, झाल्या गोष्टींचा त्यांनीं व्यर्थ विषाद करूं नये. नुकत्या वर सांगितलेल्या वेदमूर्तीस परमहंसांनीं आपल्या शिष्यांकरवीं तत्त्वमसीचा बोध करून तावडतोब लोकांतरास रवाना केलें आहे. तेथें त्यांनीं आपल्या कर्णदैर्घ्याचा संन्यास करून सुंदर परिव्रज्या धारण केली आहे, व महामीमांसक बनून व्याख्यानांचा भारी सपाटा चालवला आहे. आर्यसमाजाची स्थापना होऊन स्वामीमहाराजांस त्या लोकांचें आधिपत्य घेण्याविषयीं लवकरच सूचना येईल असा रंग दिसतो. तर वरील लोकीं वरील लोकांची त्यांस मिळालेल्या प्रसादाच्या मानानें अवश्य संभावना केली जाईल ! असो एकंदरींत आह्मांस येवढा मोठा संतोष वाटतो, व साऱ्या पुणेंकरांसही तो तसाच वाटेल, कीं येथील जुनें वैभव गेल्यापासून आज सुमारें आठ वर्षें हत्तीची मोठ्या थाटाची स्वारी जी कोणाच्या कधीं दृष्टीस पडली नव्हती, व पुढेंही कधीं पडण्याचा योग नव्हता, ती सत्यशोधकांच्या व आर्यसमाजवाल्यांच्या हौसेमुळें सर्वांस अनायासें पाहावयास सांपडली.

असो; याप्रमाणें गेल्या सालची एरवींची हकीकत झाली. आतां आमच्या पुस्तकाच्या संबंधाची जर पाहिली तर ती फारशी विशेष नाहीं. या सालांत आमच्या आश्रयदात्यांची संख्या सुमारें दुप्पट झाली. याबद्दल आमच्या देशबंधूंचे आह्मी भारी आभारी आहों हें उघडच आहे. व यासंबंधानें यापूर्वीं अंमळ वर लिहिण्यांत आलेंच आहे. गेल्या वर्षांत आमच्याकडे पत्रेंही पुष्कळ आलीं. हीही गोष्ट आमच्या हितचिंतकांस अभिनंदनीय वाटेल. या पत्रांपैकीं कांहींस आह्मांकडून उत्तरें मिळून कांहीं नुसतींच छापलीं गेलीं. असें

करण्याचें कारण कांहींस उत्तर नको होतें, आणि कांहींस विशेष देण्यासारखें नव्हतें हें होय. गेल्या वर्षभर आमच्या पुस्तकावर मागील वर्षाप्रमाणें कोठें टीकाही केलेली आमच्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आली नाहीं.[1] आमचे मुख्य प्रतिपक्षी व परंपरागत चालत आलेले वैरी जे ख्रिस्तोपासक त्यांनींही यंदां बिलकूल कांही खटपट किंवा गडबड केलेली कोठें ऐकण्यांत नाहीं. त्यांच्या पवित्र शास्त्रावर व पवित्र लोकांवर सत्याच्या पक्षास अनुसरून गेल्या बारा अंकांत नेहेमीप्रमाणें बरीच चर्चा झाली असतां, ती सर्व त्यांनीं येशूनें शिकवलेल्या क्षमेस व शांतीस अनुसरून सर्व निमूटपणीं ऐकून घेतलीसें वाटतें. अशी साधुत्वाची वृत्ति मांडणानंतर पतकरण्यापेक्षां त्याच्या अगोदरच ते पतकरीत जातील, तर त्यांत त्यांचा व त्यांच्या शुभवर्तमानाचा बराच आब राहत जाईल. असो; या वर्षी आमच्या एका मित्रानें दिलेला मोरोपंताचा ‘ मुक्तामाला ’ ग्रंथ सुमारें अर्धा टीकेसहित छापला गेला हेंही येथें लिहिलें पाहिजे. अशी मेहेरबानी आमच्या महाराष्ट्रकवींचे कोणी भक्त करीत जातील तर आह्मांवर व एकंदर लोकांवर मोठेच उपकार होतील हें उघड आहे.

---

## ग्रंथांवर टीका.

नीरक्षीरविवेके हंसाऽऽलस्यं त्वमेव तनुषे चेत् ।
विश्वस्मिन्नधुनाऽन्यः कुलव्रतं पालयिष्यति कः ॥[2]

भामिनीविलास.

अंक १५.—(१) ग्रंथसमृद्धि. (२) ग्रंथकारांची स्थिति. (३) ती सुधारण्यास उपाय. (४) ग्रंथपरीक्षेचा हल्लींचा प्रकार. (५) त्याचे परिणाम. (६) प्रस्तुत विषयावर सामान्यतः विचार. (७) त्याची हकीकत. (८) टीका करणारांस आवश्यक गुण-मूळग्रंथाचें ज्ञान. (९) सत्यप्रीति. (१०) शांत स्वभाव. (११) सहृदयता. (१२) टीकेचे सामान्य प्रकार. (१३) खरा टीकाकर्ता. (१४) प्रस्तुत विषयाविषयीं लोकांच्या गैरसमजुती. (१५) चांगले टीकाकार निपजल्यापासून उपयोग.

---

१. वर मुळींच टीका झाली नाहीं असें म्हटलें यांत अमळ चुकी झाली. येथील ‘ शिवाजी ’ पत्रांत कांहीं महिन्यापूर्वी आमच्या पुस्तकाच्या सातव्या अंकांतील कांहीं वाक्यांवर कोणीं एकानें कांहीं वेडावांकडा मजकूर लिहिला होता. पण जी टीका सातवा अंक निघून एक वर्ष होईपर्यंत आमच्या प्रतिपक्ष्यास प्रसिद्ध करण्याचें धैर्य झालें नाहीं किंवा मनांत आलें नाहीं, आणि ज्यास ‘शिवाजी’हून अधिक योग्यतेच्या ठिकाणीं जागा मिळाली नाहीं, तिचें आह्मांस विस्मरण झालें व तिजकडे आम्हीं सर्वथा दुर्लक्ष केलें याचें कोणाही समंजस मनुष्यास मोठेंसें आश्चर्य वाटणार नाहीं.

२. “ हे हंसा ! पाणी आणि दूध हें वेगळें वेगळें करण्याचा जर तूंही आळस केलास, तर या जगीं हें तुझें कुलव्रत दुसरा कोण चालवील ? ”

१. गेल्या पांचपंचवीस वर्षांत आमच्या भाषेंत बरीच ग्रंथसमृद्धि होऊन दिवसांदिवस ती बरीच वाढतही चालली आहे. निदान पांचपंचवीस तरी लहान मोठीं, बाईट चांगलीं अशीं नवीं पुस्तकें निघाल्यावांचून वर्ष बहुधां सुनें जात नसेल. ही गोष्ट आह्मांस सर्व प्रकारें अभिनंदनीय वाटते. कारण या प्रतिवर्षी तयार होणाऱ्या पुस्तकांत जरी नांव घेण्यासारखीं सगळींच नसलीं, किंबहुना मुळींच नसलीं, तरी निदानपक्षीं इतक्या ग्रंथकारांनीं आपल्या श्रमाचा व काळाचा केवळ अपव्यय केला नाहीं, व इतक्या छापखान्यांस काम मिळालें, येवढें तरी निदान ह्मणतां येईल ! पण ही कल्पना ह्मणजे अगदीं कडेलोटची. इतक्या थरास ग्रंथ पोंचणें हें बहुधां मुळींच संभवत नाहीं. कारण एक तर ग्रंथ छापणें हें कोणी उगीच मौजेखातर करीत नाहीं, तो घेणारे कोणी तरी सांपडतील अशा समजुतीवरच कोणी ग्रंथकार आपलें पुस्तक छापतो; आणि दुसरें असें कीं, जो आपला ग्रंथ छापण्यास निघाला तो बहुधां त्यांत छापण्यासारखें कांहीं तरी असल्याशिवाय तसें करण्यास सहसा प्रवृत्त होणार नाहीं; फजितीचें भय ज्याला त्याला आहेच.

२. पण ही ग्रंथांची संख्या जशी दिवसांदिवस वाढत चालली आहे, त्या मानानें त्यांस अत्यंत हितावह अशी गुणदोषविवेचकांची संख्याही वाढत जावी हें अत्यंत इष्ट होय. पण हें मात्र बहुधां मुळींच आढळत नाहीं. सध्यांची स्थिति पाहिली तर अशी आहे; ग्रंथ छापखान्यांतून बाहेर पडतात, आणि पुढें त्यांची कांहीं तरी यदृच्छेनें व्यवस्था होते. कांहींस लोकांचा आश्रय मिळतो; कांहीं शिफारशींनीं, वशिल्यांनीं वगैरे खपतात; आणि पुष्कळ तर ग्रंथकाराच्याच अंगावर पडून ' मला ही कोठून बुद्धि सुचली ' असें त्यास करून टाकतात ! याप्रमाणें लोकांचा आश्रय हा केवळ अनिश्चित असल्यामुळें कोणीही ग्रंथ छापण्यास सहसा धजावत नाहीं. आमच्या देशांत, इंग्लंडांत वगैरे जसे बडे लोकही ग्रंथकारांच्या पंक्तींत सांपडतात तसें अजून मुळींच झालें नाहीं, व केव्हां होईल याचा सुमारही करवत नाहीं; तसेंच जे ग्रंथकार झाले असतां सारे लोक त्यांस अवश्य आश्रय देतील, किंबहुना त्यांपासून अपेक्षित जी ज्ञानवृद्धि तिची सर्व चातकवत् प्रतीक्षा करीत आहेत, अशा आमच्या नवीन विद्वानांच्याही कधीं स्वप्नीं सुद्धां तो विचार येत नाहीं. तेव्हां ग्रंथरचना करणारे झटले ह्मणजे अर्थातच वरील दोहों प्रकारचे ज्यांच्या पदरीं बहुधां अठरा विश्वे दारिद्र्य तेच काय ते. अशांनीं भीत भीत एकादा ग्रंथ लोकांपुढें आणला आणि त्यास कोणींच विचारलें नाहीं, ह्मणजे आटपलें ! आधींच तुटपुंजीचा व्यापार; त्यांतून एकदां जबर ठोकर लागून चांगले डोळे उघडले, ह्मणजे मग तो कशाला पुनः या मानगडींत पडतो आहे ! याप्रमाणें त्याची स्वतःची हिंमत पार खचून जाऊन दुसऱ्यांचेही त्याची ती दशा पाहून हात पाय मोडतात. असो; तर याप्रमाणें ग्रंथकारांची सध्यां स्थिति आहे. पुस्तक छापून त्याची छापणावळ सरासरी बाहेर पडली ह्मणजे अगोदर निंमे मिळविली. मग पुढला विचार पुढें. त्यांतूनही यथाकथंचित् सगळ्या प्रती खपून जाऊन सगळ्या कृत्यांत एकंदरींत नफा झालाच, तरी दुसऱ्या आवृत्तीची गोष्टही नको ! आजपर्यंत जे शेंकडों ग्रंथ आमच्या भाषेंत होऊन गेले, त्यांत सरकारी

पुस्तकांखेरीज दुसरी आवृत्ति पाहिलेले फारच थोडे निघतील. पराकाष्ठा चारपांचांवर चिघणार नाहींत असें आह्मांस खास वाटतें. तर ही केवढी विलक्षण स्थिति! ज्या आमच्या देशांत विद्याभिरुचि चोहोंकडे येवढी फैलावली आहे; ज्यांत प्रतिवर्षी गांवोगांवीं छापखानें, पत्रें, पुस्तकें, पुस्तकालयें, सभा वगैरे नवे नवे प्रकार होत चालले आहेत; ज्यांत देशाभिमान, विद्वत्त्व, कवित्व, वक्तृत्व वगैरेंची चोहोंकडे येवढी गर्दी दृष्टीस पडते; ज्यांत नवा धर्म स्थापणें, देशाचें गेलेलें कलाकौशल्य पुनः माघारीं आणणें, कवितेच्या नव्या शाखा स्थापणें, नवीं यंत्रें तयार करून विलायतेशीं व्यापारांत टक्कर मारणें, फार तर काय, पण ज्या गोष्टी येथें व साऱ्या एशिया खंडांत कधीं कोणी कानीं ऐकल्याही नाहींत अशा—ह्मणजे प्रति-डिमॉस्थेनीस, प्रति-सिसरो, व प्रति-पार्लमेंट् येथें बनवणें,—इत्यादि अचाट कर्मे हातीं घेण्यासही लोक मागेंपुढें पाहत नाहींत;—त्यांतच इंग्लंडांतील केवळ सामान्य प्रतीच्या ग्रंथकारांच्या योग्यतेचेही ग्रंथकार सांपडूं नयेत, व शेंपांचशांच्या पहिल्या आवृत्ती-नंतर मोठ्या नामांकित ग्रंथकर्त्यांसही दुसरी काढण्याची छाती होऊंच नये, हा केवढा चमत्कार आहे? आमच्या सार्वजनिक सभांतून गेलेले हिंदुस्थानतर्फेचे मुखत्यार हौस ऑफ् कामन्स्‌मध्यें तेथील सभासदांशीं जेव्हां खुर्चीशीं खुर्ची लावून बसतील, तेव्हां इकडील विद्येची वरील स्थिति ऐकून तेथील सभासदांस केवढें आश्चर्य वाटेल! त्यांची समजूत अशी कीं, देशास थोरपणा येण्यास तेथील भाषा चांगल्या ऊर्जित दशेस आली पाहिजे, तींत सर्व प्रकारच्या विषयांवर मोठे मोठे ग्रंथ असले पाहिजेत, लोकांच्या अंगांत विलक्षण हिंमत असून जेथें त्यांनीं एकदां पुढें पाऊल ठेवलें तेथें ते मागें सरतच नाहींत असा त्यांचा लौकिक व्हायास हवा, हा नियम जो सर्व मोठ्या राष्ट्रांस लागतो त्यास आमचाच देश मात्र अपवादक पाहून त्यांस मोठा अचंबा होईल! आणि खरोखरीच, जे लोक आपल्या देश-भाषेची योग्यता केवळ हलकट, अविद्वान् अशा लोकांस मात्र ती उपयोगी इतकीच समज-तात, तीस व्याकरण किंवा कोश तयार करण्याचें ज्यांच्या कधीं फारसें मनांतही आलें नाहीं, ती जगो कां मरो याविषयीं जे सोळा आणे बेफिकीर आहेत, ज्यांच्यांत पांच पंचवीस वर्षे तरी वांचावी इतक्या प्रतीचीही कविता निपजत नाहीं, ज्यांच्यांतील मोठ्या प्रसिद्ध वक्त्यांचें भाषण एकदां ऐकतांनाही कंटाळा येतो, ज्यांच्या भाषेनें सामान्य प्रतीच्या लोकांस ज्ञानप्राप्ति होण्याचा बिलकुल संभव नाहीं, ज्यांचे इतिहास, पदार्थविज्ञान, वैद्यक वगैरे विषयांवरील ग्रंथ ह्मटले ह्मणजे पोरींच्या भातुकलीतील पदार्थांसारखे होत, ज्यांच्यांतील व्यापाराच्या मंडळ्या, कौशल्याशिक्षक गृहें, भजनसमाज, पुस्तकालयें वगैरेंचा थाट पाहिला तर युरोपांतून आलेल्या एकाद्या गृहस्थास पोट भरून हसूं मात्र येईल,—त्याच लोकांचा पार्लमेंटांत जागा मिळवण्याचा उद्योग चाललेला पाहून कोण तोंडांत बोट घालून राहणार नाहीं? असो; एकंदरींत आमच्या भाषांची विद्यमान स्थिति व ग्रंथकारांचा लोकांकडून आदर या दोन्ही गोष्टी एकंदर देशाच्या स्थितीविषयीं उत्कृष्ट सूचक आहेत असें आह्मांस वाटतें; आणि हीं चिन्हें अशींच जोंपर्यंत दृष्टीस पडतील तोंपर्यंत देशाच्या मोठेपणाविषयीं लोक कितीही भकले तरी तें सर्व व्यर्थ होय यांत अगदीं संशय नाहीं.

३. देशभाषेची सुधारणा व तींत उत्कृष्ट ग्रंथांची समृद्धि होणें याचा देशाच्या हिताशीं केवढा निकट संबंध असतो याविषयीं जे निःसंशय असतील त्यांस वरचें लिहिणें केवळ यथार्थ वाटेल अशी आमची खात्री आहे. आतां वरील दोन्ही गोष्टी घडण्यास काय झालें पाहिजे याचा विचार करूं. प्रस्तुत मालेच्या पहिल्या दोन अंकांत* आह्मीं वाचकांस कळविलें आहेच कीं, ग्रंथाचे यथार्थ परीक्षक असणें हें फार अवश्य आहे; व असे असले ह्मणजे भाषेस अनेक प्रकारांनीं उपयोग होतो. हे प्रकार या निबंधांत पुढें सांगण्यांत येतील. आतां हें ग्रंथांचें गुणदोषविवेचन सध्यां कितपत होतें तें पाहूं.

४. हा प्रकार बहुधा सर्वांच्या लक्षांत असेलच. आमच्या मराठी वर्तमानपत्रांतील कित्येकांच्या अग्रभागीं इंग्रेजी पत्रांवरून उचललेली एक लांबलचक प्रतिज्ञा असते कीं, अमुक अमुक विषय आमच्या पत्रांत येत जातील. आतां या विषयांत पहिल्यानें कोणता मांडलेला असतो ह्मणाल, तर Literature ह्म० भाषेतील ग्रंथ! आणि पत्र जर उलटून सारें वाचून पाहिलें, तर वरील सदर केवळ नामधारी होय असें तेव्हांच लक्षांत येतें. हा प्रकार केवळ एकाच अंकांत नव्हे, तर महिन्यांचे महिने, किंबहुना वर्षांचीं वर्षें चाललेला दृष्टीस पडेल. आतां वरील सदराचा अर्थ पत्राच्या दोहों बाजूंस नवीन पुस्तकांच्या ज्या जाहिराती दिल्या असतात त्या, किंवा 'तुला—होतें काय? रक्त शुद्ध कर' अशा प्रकारचे जे मजेदार चुटके दिले असतात ते असल्यास न कळे! एरवीं त्यांपासून त्यांच्या वाचकांस भाषेची किंवा तींतील ग्रंथांची माहिती किती होत असेल ती त्या पत्रकर्त्यांस किंवा त्यांच्या वाचकांसच माहीत. बरें हें एक असो; वर्तमानपत्रांचा तो मुख्यतः विषय नसल्यामुळें, व दर खेपेस वरील सदराचा मजकूर लिहिण्यास सांपडणें अशक्य ह्मणून तो वरचेवर येत नाहीं असें ह्मटलें, पण महिन्या दोन महिन्यांनीं कोणी नवीन ग्रंथकार आपलें पुस्तक त्यांच्या परीक्षेकरतां जेव्हां त्यांजकडे नजर करतो तेव्हां तर वरील सदर जागवण्यास चांगली संधि ना? पण अशा प्रसंगीं आमचे वर्तमानपत्रकर्ते कशी हिकमत लढवतात ती पुष्कळांस माहीत असेलच. कोणी 'पोंच' या सदराखालीं त्या ग्रंथकाराच्या नांवाचा यथास्थित निर्देश करून पुस्तक पाठवल्याबद्दल त्याचे फार फार आभार मानतात, येवढीच त्याच्या ग्रंथावर टीका! दुसरे कित्येक वरील छापील आभार प्रदर्शित करून नंतर ग्रंथाची छापणी फार सुरेख आहे, बांधणी मोठी मनोवेधक आहे, कागद तर कांहीं पुसूंच नये, अशा प्रकारच्या गोड गोड शिफारशी करतात. येवढें नामी गुणदोषविवेचन करण्यास त्या विद्वान् पत्रकर्त्यांस केवढे श्रम पडत असतील बरें! व बिचाऱ्या ग्रंथकर्त्यांस आपली शिफारस सगळी कागदांच्या कारखानदाराकडे, छापणाराकडे व बुकें बांधणाराकडेच खपली जाऊन स्वतःच्या वांट्याला एक शब्दही उरला नाहींसें पाहून केवढा संतोष वाटत असेल! असो; तर अशा दोन तऱ्हांनीं प्रायः नवीन पुस्तकावर मत प्रदर्शित केलें जातें. पण याहूनही खुबीची एक तिसरी तऱ्हा सांगायाची राहिली आहे. ती ही—'अमुक अमुक बूक आह्मांस पावलें;

---

* पृष्ठ १०, ११ व १४ पाहा. 'सम्पादक'

आह्मी ग्रंथकर्त्यांचे याबद्दल फार आभारी आहों. आमचें मत पुढील खेपेस देण्यांत येईल.' किंवा इतकेंही आपणांस बांधून घ्यावयाचें मनांत नसल्यास 'मत सवडीप्रमाणें प्रकट करूं.' असें लिहावें ह्मणजे आटपलें. पुढील खेप किंवा सवड यायला नको, आणि मत द्यायला नको. ही पुढील खेप येणें ह्मणजे नारदमुनीची उलट फेरीच ह्मणायाची! त्या भोळ्या स्वारीनें सह्याद्रीकडून दंडवत घालवून त्यांस जशी थाप दिली, कीं बा रे! असाच अंमळ राहा, मी आतां रामेश्वराहून परत आलों पाहा! आणि मग परत कसचें आणि काय कसचें-याप्रमाणेंच वरील पत्रकारांचा वेळ मारून नेण्याचाच केवळ मतलब असतो! असो; तर नवीन ग्रंथ करून तो अभिप्रायाकरतां जो कोणी वर्तमानपत्रांकडे वगैरे पाठवतो, त्याची चासलात वरील तिन्ही प्रकारांतूनच बहुधां एकानें होते.

वरील विचित्र स्थिति पाहून काय बरें मनांत येतें? अर्थात् हेंच कीं, असें होण्याचें कारण ग्रंथ वाचण्याचा एक आळस तरी असेल; किंवा गुणदोषपरीक्षेचें काम लोकांस अंमळ जडच जातें. कांहींही असो, निदान येवढें खरें कीं, ग्रंथकारांची अशी हेळसांड होणें हें आमच्या विद्वत्तेस व देशाभिमानास मोठें लांछन असून त्यापासून भाषेची व तद्द्वारा एकंदर लोकांची मोठीच हानि होते. ग्रंथाची शिफारस करतेसमयीं बहुतेक शिफारस पुस्तकाच्या पुठ्ठ्यावरून व छापणीवरूनच करणें हें किती अप्रयोजक आहे! कसाई लोक जशी गुरांची परीक्षा त्यांच्या अंगाच्या चांचपणीवरून करतात तशीच गोष्ट ग्रंथांची असते काय? 'साधारण प्रार्थने' सारखें धर्मपुस्तक किंवा 'मंजुघोषे'सारखी कादंबरी मोठ्या शानदार पुठ्ठ्यांनीं बांधवून त्यांवर मोठें नामी असें मिन्याचें किंबहुना जडावाचें काम केलें ह्मणजे तीं पुस्तकें खरोखरी वाचनीय झालीं काय? आणि 'बाळमित्र' किंवा 'पद्यरत्नावली' हीं अगदीं भिकार कागदावर भिकार ठशांनीं छापून अगदीं भिकार रीतीनें बांधलीं ह्मणजे त्यांची योग्यता कमी झाली काय? रद्दी घेणाऱ्या वाण्यानें किंवा आताऱ्यानें पुस्तकांची त्यांच्या बाह्य स्वरूपावरून जर पारख केली तर ती त्यास शोभणार आहे; पण स्वतः अर्थज्ञ व अत्यंत मार्मिक ह्मणून जे लोकांस एकाद्या ग्रंथाची शिफारस करणार त्यांनीं ग्रंथांची पारख वाण्यासारखी किंवा अत्तरवाल्या-सारखी करावी हें किती हास्यास्पद होय! अशी शिफारस झटली ह्मणजे ग्रंथकारास आपली केवळ मानहानि केलीशीच वाटावी, व ती करणारासही त्याबद्दल मोठा संकोचच वाटावा. पण ही वृत्ति उभयपक्षींही बहुधां दिसत नाहीं; दोघांसही बाह्यरूपाची प्रशंसाच पुरेशी होते. असो; एकंदरींत वरील प्रकारच्या ग्रंथपरीक्षेनें भाषेचें फार अहित होतें. कारण खरा परीक्षक कोणीच नसल्यामुळें कसाही ग्रंथ असला तरी 'टका शेर भाजी टका शेर खाज्या' या न्यायानेंच त्याची प्रायः योग्यता ठरते. ह्मणजे 'मुक्तामाला' सुरस आणि 'मंजुघोषा'ही सुरस; 'अथेल्लो' उत्कृष्ट भाषांतर, तसेंच वर्षा दोन वर्षांमागें तयार होऊन लोळत पडलेलें 'जुलियस् सीजर'चें एक भिकार भाषांतरही उत्कृष्टच; 'पुण्याच्या वर्णना'सारखा ग्रंथ पुस्तका-लयीं संग्रहास असण्यास जितक्या योग्यतेचा, तितकाच 'राणीच्या पुस्तका'सारखा केवळ राजमान्य ग्रंथही योग्यच! सगळे ग्रंथ अर्थातच सारख्या योग्यतेचे कधींही असणार नाहीत; पण अवसेच्या दाट काळोखांत जसे सगळे पदार्थ सारख्याच आकारमानाचे, सारख्याच

रंगाचे, आणि सारखेच सुरेख; त्याप्रमाणेंच सत्परीक्षकांच्या अभावीं सगळे ग्रंथ येथून तेथून सारखेच. हा अव्यवेटाळा होण्याचीं कारणें प्रस्तुत मालेच्या पहिल्या अंकांत§ कांहीं सांगण्यांत आलीं आहेतच. ह्या सर्वांत आमच्या नवीन विद्वानांची स्वभाषेविषयींची उपेक्षाबुद्धि हीच मुख्य म्हटली असतां चालेल. कारण ग्रंथपरीक्षा करण्याचें सामर्थ्य ह्यांच्या अंगीं येण्याचा जितका संभव आहे तितका अर्थातच इतरांच्या नाहीं. याचें तरी कारण मुख्यतः हेंच आहे कीं, इंग्रजी भाषेत जॉन्सन्, मेकॉले वगैरे नामांकित ग्रंथकारांचे ग्रंथ प्रस्तुत विषयावर मोठे उत्कृष्ट असून त्यांचा परिचय कॉलेजांतील विद्यार्थ्यांस हरहंमेश घडतो. शिवाय इतरही पुष्कळ माहिती त्यांस झाली असते. यामुळें एकाद्या ग्रंथावर ते जसा मार्मिक अभिप्राय देतील तसा केवळ मराठींतच हुशार असा मनुष्य किंवा मोठा व्युत्पन्न शास्त्री याच्या हातूनही देणें होणार नाहीं. असो; पण ही केवळ शक्यत्वाची उक्ति झाली. म्हणजे इतकें करण्याचे त्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे, किंवा निदान योग्यता तरी आहे, इतकेंच. हें सर्व ते करतातच असा अर्थ नाहीं. शेक्सपीयरसाहेबांची नायिका* म्हणते—

'If to do were as easy as to know what were good to do, chapels had been churches and poor men's cottages princes' palaces!'[1]

हाच न्याय प्रस्तुत प्रसंगीं किंचित् फिरवून लावतां येईल. असो; पण या हयगयीमुळें देशाचा तोटा किती होतो हें उघडच आहे. ग्रंथांचा खरा चाहता कोणी नसल्यामुळें चांगल्या ग्रंथकारांस वाइटांतच सामील होऊन बसावें हें तरी एक त्यांच्या कपाळीं येतें किंवा आपली योग्यता जर प्रगट करणें असली तर आत्मश्लाघेचें अश्लाघ्य कृत्य करण्याखेरीज त्यांस दुसरा मार्ग राहत नाहीं. पण हा मार्ग आचरणें हें नेहेमीच फलदायक होतें असें नाहीं. पुष्कळदां त्याचे योगानें लोकांच्या मनावर वाईट ग्रह मात्र होऊन जातो. असो; तर याप्रमाणें तिऱ्हाईतपणें निष्पक्षपातपणानें ग्रंथांचीं योग्य प्रशंसा करणारे असले, म्हणजे

---

§ पृष्ठें ९–११ पाहा. 'सम्पादक'

* The Merchant of Venice (व्हेनीस नगरचा व्यापारी) या नाटकांतील चतुरस्र नायिका पोर्शिआ (Portia) आपली दासी नेरिसा (Nerissa) हिच्याशीं बोलत असतां हा भाग आला आहे. अंक पहिला, प्रवेश दुसरा, ओळी १३–१५ पाहा. तिच्या बापानें असें ठरविलें होतें कीं, तीन बंद पेट्यांपैकीं तिचा फोटो आंत असलेली पेटी जो ओळखून काढील त्याला तिनें वरावें. पुढें बाप मेला. पण त्याची इच्छा तिला अंमलांत आणावयाची असल्यानें आपल्या आवडीनावडी तिला गुंडाळून ठेवणें भाग होतें. पसंत पडेल त्याला वरणें अगर नापसंत पडेल त्याला नाकारणें कांहींच तिच्या हातीं नव्हतें. तिच्या पसंतीचा पुरुष आणि फोटोची पेटी ओळखणारा पुरुष हे दैवाच्या अंधळ्या कोशिंबिरीच्या खेळांत अभिन्न ठरले तरच तिची घडगत होती. अशा कैचींत सांपडली असतां नायिका पोर्शिया प्रस्तुत सिद्धांत आपल्या दासीला सांगते. 'सम्पादक'

१. "अमुक अमुक करणें चांगलें हें समजणें जसें सोपें आहे त्याप्रमाणेंच तें करणेंही जर सोपें असतें, तर लहान देवळें हीं मोठीं देवालयें बनलीं असतीं आणि गरिबगुरीबांच्या खोपटांचे टोलेजंग राजवाडे झाले असते!

चांगल्या ग्रंथकारांस उमेद येते व लोकांपासून त्यांस आश्रय मिळाल्याच्या योगानें भाषेंत चांगल्या ग्रंथांची संख्या उत्तरोत्तर वाढते. आणि त्याप्रमाणेंच वाईट तेवढें निवडलें जाऊन त्यांचा क्रमाक्रमानें ऱ्हास होतो. पण असें जेव्हां असत नाहीं तेव्हां अर्थातच ह्याप्रमाणें चांगलें काय आणि वाईट काय दोन्ही एकच होऊन जाऊन भाषेची मोठीच हानि होते; आणि लोकांचे हातीं चांगलेच ग्रंथ पडून त्यांच्या मानसिक शक्ति वृद्धिंगत होऊन जाव्या असें जें व्हावें तें मुळींच न होऊन त्यांस उलट्या अपाय मात्र घडतो.

६. येथवर आमच्या भाषेंतील ग्रंथकारांच्या सांप्रतच्या स्थितीविषयीं विशेषतः निरूपण झालें. आतां प्रस्तुत विषयावर सामान्यतः विचार करूं, ह्मणजे ग्रंथावर टीका करण्याचें काम जो हातीं घेतो त्याच्या अंगीं कोणते गुण असले पाहिजेत, त्यास साधनें कोणतीं हवींत, हा टीका करण्याचा प्रकार केव्हां उद्भवला, त्यापासून हिताहित कोणतें वगैरे.

७. पहिल्यानें या प्रकाराची हकीकत. हा प्रकार आपल्या देशांत प्राचीन काळीं ह्मणण्यासारखा नव्हता, व अर्वाचीन काळीं तर अगदींच बुडून आलीकडे दहा पंधरा वर्षांतच इंग्रेजी ग्रंथकारांच्या परिचयानें नुकता कोठें सुरू होत चालला आहे. या विषयाच्या संबंधानें प्रस्तुत मालेच्या तिसऱ्या व चवथ्या अंकांत* आह्मीं कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत, त्यावरून या काळाच्या पूर्वीची स्थिति कांहीं लक्षांत येईलच; यास्तव तिजविषयीं आणखी येथें लिहिणें जरूर नाहीं. प्रस्तुत स्थलीं आलीकडच्या स्थितीस उद्देशून मात्र लिहितों. मुख्यें वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं, इंग्रेजी विद्येचा इकडे फैलावा होऊं लागल्यापासून ग्रंथांच्या गुणदोषांचें विवेचन करण्याचा इकडे प्रघात पडला. प्रतिवर्षीं नवीं जीं पुस्तकें निघतात त्यांवर वर्तमानपत्रांतून थोडीबहुत चर्चा होऊं लागली व त्याच उद्देशानें मासिक पुस्तकेंही सुरू झालीं. या पुस्तकांचा विषय, भाषा व विद्या हींच केवळ होत; वर्तमानपत्रांप्रमाणें आणखी दुसरीं व्यवधानें त्यांस बिलकुल नाहींत. यास्तव वरील गुणदोषविवेचनाचें काम वस्तुतः पाहतां त्यांचेंच विशेषेंकरून होय. देशांत चालणाऱ्या राज्यकारभाराविषयीं, व्यापाराविषयीं व इतर अनेक लौकिक गोष्टींविषयीं लोकांचीं मनें बरोबर करणें हें जसें वर्तमानपत्रांचें काम, तसेंच मासिक पुस्तकांचें विद्येच्या संबंधानें होय. ह्मणजे नानाविध विषयांविषयीं थोडक्यांत चांगल्या रीतीनें वाचकांस माहिती जेणेंकरून होईल तें करणें हेंच त्यांचें मुख्य काम होय; व याबरोबर विद्यावृद्ध्यर्थ सरकारचे किंवा लोकांचे जे प्रयत्न चालले असतील त्यांची चर्चा करणें हेंही त्यांजकडेच येतें. यास्तवच नवीं पुस्तकें जेवढीं होतील त्यांपैकीं खरोखरी उपयोगाचीं कोणतीं व नादान किंवा अपायकारक कोणतीं तींही लोकांस कळवणें त्यांचेंच कर्तव्य होय. हा प्रकार विलायतेंतील मासिक व त्रैमासिक पुस्तकें जीं आपल्या दृष्टीस पडतात त्या सर्वांत आढळतो. कोणत्याही विषयावर नवें बुक झालें न झालें कीं लागलेंच चोहोंकडे मासिक पुस्तकांतून त्याची वाटाघाट सुरू होते. हें तर काय, पण पुस्तकालयांतून वादविवादाच्या सभांतून, चहा, बुंद वगैरे पिण्याच्या ठिकाणीं, किंबहुना मेजवान्यांच्या

* पृष्ठें २२-२५ पाहा. 'सम्पादक'

प्रसंगींसुद्धां वरील चर्चा जिकडे तिकडे चालू असते. असो; तर नवीन पुस्तकांविषयीं मतें प्रद-र्शित करून त्यांपैकीं लोकांच्या आश्रयास पात्र कोणतीं व नाहींत कोणतीं हें ठरवणें हा अधिकार मुख्यतः मासिक पुस्तकांचा होय. पण आमच्या भाषेंत जीं आहेत व मागें होतीं त्यांपैकीं वरील काम बरेंच बजावलेलें व बजावणारें आम्हांस एक मात्र दिसतें. तें 'विविध-ज्ञानविस्तार' होय, हें सर्वांच्या सहज ध्यानांत येईलच. असो; तर याप्रमाणें ग्रंथांवर टीका करण्याचा प्रकार आमच्या भाषेंत अगदीं नवा सुरू झाला आहे व अद्याप त्याचा प्रचारही फारच थोडा आहे. तो वाढणें हें भाषेच्या अभिवृद्धीस व लोकांच्या हितास फार आव-श्यक आहे.

८. वर प्रस्तुत प्रकाराचा कांहीं इतिहास झाला. आतां ग्रंथांवर टीका करणाराच्या अंगीं अवश्य गुण कोणकोणते हवेत तें सांगतों. प्रथमतः अर्थातच मूळ ग्रंथाचें ज्ञान. हें अस-ल्याशिवाय टीकाकार एरवीं केवढाही विद्वान् असला तरी तें व्यर्थ होय हें उघड आहे. ही गोष्ट वास्तविक पाहतां अगदीं स्पष्ट होय; कारण ज्या मनुष्यास एकाद्या वस्तूचें पूर्ण ज्ञान नाहीं, किंबहुना मुळींच नाहीं, त्यानें त्याविषयीं आपलें मत सांगणें हें मुळींच शोभत नाहीं हें अगदीं उघड आहे. पण मनुष्याच्या मनाचा असा कांहीं चमत्कार आहे कीं, स्वतः-च्या अज्ञानाची केवळ कल्पनाही त्यास सहन होत नसते. आपणांस अमुक अमुक विषय अगदीं कळत नाहीं व यास्तव त्यावर मत देण्यास आपण सर्वथा अयोग्य, अशी मनाची पक्की खात्री फारच थोड्या सुज्ञ लोकांची झाली असते. बाकी कोणास कोणत्याही विषया-विषयीं पुसा; बहुतकरून उत्तर नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. ज्या त्यास बहुधां असें वाटत असतें कीं, मला जितकें ज्ञान आहे त्यापेक्षां अधिक दुसऱ्यास काय असायाचें आहे ? व माझीं जीं मतें आहेत त्यांत चुकीचा संभव असेल तरी कसा ? तर असा मूर्खपणाचा दुर-भिमान बहुतेक लोकांच्या मनास जडला असल्यामुळें हव्या त्या गोष्टीवर हवें तसें मत ठोकून न देणारे फार थोडे. फार तर काय पण जो विषय त्यांस अगोदर असलाच तर फारच थोडा अवगत असण्याचा संभव, त्यावरही बरें वाईट म्हणण्यास मागें पुढें बिलकुल न पाहणारे शेंकडों गृहस्थ सांपडतात. बेकननें कोठेंसें एक मोठें मार्मिक वचन लिहिलें आहे कीं, असे कित्येकजण आढळतात कीं ज्यांस आपणांस माहीत काय नाहीं तेंच माहीत नसतें ! असो; तर ग्रंथांवर टीका करण्यास निघालेले गृहस्थ अशा प्रतीचे कामाचे नाहींत. आपण ज्याचे गुणदोष लोकांस दाखवणार तो ग्रंथ खरोखर आपणास पुरतेपणीं समजला आहे असा निश्चय झाल्यावरच टीका करणारानें त्या कामास हात घालावा. नाहीं तर तो अर्धामुर्धा समजून तितक्यावरूनच जर गुणदोषविवेचनास आरंभ केला तर तें त्या कर्त्यांच्या उपहासास मात्र कारण होईल; व लोकांत सत्याचा प्रसार होणें एकीकडेच राहून मूर्खपणाचीं मतें मात्र चोहोंकडे माजतील.

९. दुसरा गुण सत्यप्रीति. हाही गुण वरच्यासारखाच टीकाकर्त्यांच्या अंगीं अवश्य असला पाहिजे. याची योग्यता तर वरच्याहूनही अधिक आहे; पण त्याच मानानें तो जगांत फारच विरळा आढळतो. दुसऱ्याच्या ग्रंथावर जी टीका करायाची ती केवळ सत्यास

अनुसरूनच करायाची, व ती करण्यांत सत्याचा उदय व असत्याचा ऱ्हास करणें येवढाच काय तो हेतु, हा प्रकार फारच थोडा सांपडेल. एरवीं टीका करणारांचे सामान्यतः उद्देश पाहिले तर द्वेषबुद्धीनें, मत्सरानें किंवा उगीच गमतीखातर दुसऱ्याची निंदा करावी, त्याची फजिती उडवावी, त्याची कीर्ति दूषित करावी, इतकाच असतो. किंवा इतकेंही नसलें तरी निदान आपलें नांव लोकांपुढें यावें; आपली विद्वत्ता प्रदर्शित व्हावी, इतका तरी असतो. आतां हें खरें कीं, वरील दुष्ट मनोवृत्तींच्या प्रेरणेनेंच कोणीं एकाद्या ग्रंथावर चर्चा केली असूनही जर तींत असत्याचा लेशही नसला, तर ती केवळ दोषास पात्र होत नाहीं; तरी वरील वृत्तींचें अवलंबन सर्वथा अश्लाघ्यच होय. सुविचाराचे योगानें ज्यांचें मन थोर झालें असतें ते त्यांस आपल्या निर्मळ अंतःकरणांत कधीं थारा देत नसतात. असो; तर जो कोणी एकाद्या ग्रंथकाराचे गुणदोष जगास प्रगट करण्याकरतां हातीं लेखणी धरील त्यानें अगोदर सत्यास स्मरावें आणि त्यास धरूनच मी पुढील सगळा मजकूर लिहीन असा अगोदर निश्चय करावा. असें करणें केवळ परमार्थबुद्धीस्तवच त्यास योग्य आहे असें नव्हे. तर त्यानें निवळ स्वार्थ पाहिला तरी सुद्धां वरीलच मार्ग श्रेयस्कर होय हें त्याच्या लक्षांत येईल; कारण जरी त्यानें आपल्या विद्वत्तेच्या व कीर्तीच्या भरावर चढून जाऊन खोटींच मतें लोकांच्या मनांत भरवून देऊन त्यांस कांहीं वेळ फसवलें व त्याबद्दल तात्कालिक कृतार्थता मानली, तरी कधीं ना कधीं तरी त्याची लबाडी बाहेर पडेलच पडेल हें त्यानें खूप समजून ठेवावें. याविषयीं ह्यूम, जॉन्सन्, मेकॉले हीं सर्व-प्रसिद्ध उदाहरणें आहेत. पहिल्यानें आपल्या इंग्लंड्चे इतिहासांत पुष्कळच खोटा मजकूर लिहिला असल्यामुळें त्याची पत आतां बहुतेक अगदीं बुडाल्यासारखीच आहे; व दुसरे दोघेही आपल्या हेकटपणाच्या लहरींत अनेक प्रसंगीं पुष्कळच भरकटले असल्यामुळें त्यांचीं मतें ग्रहण करणें तीं लोक फार जपून करतात! असो; तर सत्यरूप दैवत असें कडक व जाज्वल्य आहे. त्याच्या क्षोभापुढें मोठमोठ्या प्रबंध ग्रंथकारांचाही चुराडा होऊन जातो! मग छोटेखानी लुटपुट्या ग्रंथकारांचा चुंदा तर कोणीकडच्या कोणीकडे उसळून जात असेल कोण जाणे! असो; तर याप्रमाणें वर जी सत्यानुसरणाविषयीं आह्मीं सूचना केली ती केवळ स्वार्थदृष्ट्याही यथार्थ होय. ग्रंथाविषयीं जो यथार्थ विवरण करील, ह्मणजे गुण असतील तेवढे गुण व दोष असतील तेवढे दोष जो यथास्थित दाखवून देईल; त्याचीच टीका चिरकाल जगास मान्य होऊन राहील.

१०. तिसरा गुण शांत स्वभाव. हाही टीका करणारांच्या अंगीं अवश्य पाहिजे असून वरच्यासारखाच क्वचित् आढळतो. याचें कारण वरील कलमांतच आलें आहे. तें अर्थांतच हें कीं, टीकाकर्त्यांची प्रवृत्ति मुळीं वर सांगितलेल्या द्वेषमत्सरादिकांनींच प्रायः होत असल्यामुळें वरील गुणास जागाच राहत नाहीं. क्रोधास वश होऊन जेथें चित्ताचा क्षोभ झाला तेथें शांतता कशी राहावी? असो; पण क्षोभाचाही उद्गार बाहेर पडण्यास मनास कांहींशी तरी शांति असावी लागते. ती मुळींच नसून चित्तास अतिशयित क्षोभच जर केवळ झाला असला तर मनाचे व्यापारही नीट चालण्यास कठिण पडेल. ह्मणजे जसा मनुष्य अतिशयच रागावला असला तर त्याचा कंठ दाटून येऊन शब्दही पुरता तोंडावाटे निघेनासा होतो, त्या-

प्रमाणेंच मनुष्य रागानें अगदीं देहभान विसरून गेला ह्मणजे त्याची बुद्धिही गोंधळून जाते. काय बोलायाचें किंवा लिहायाचें तें त्यास एरवीं जेवढें सुचेल तेवढेंही त्या हातघाईच्या वेळीं न सुचून तो अगदीं बेफाम होऊन जातो. व वेड्यासारखें भलभलतेंच बरळूं सुद्धां लागतो. असें कीं, तोच मनुष्य पुढें कांहीं दिवसांनीं आपला वेडेपणा पाहून विस्मय पावेल. असो; तर मनाच्या शांततेची इतकी अवश्यकता आहे, कीं रागाचें बोलणें किंवा लिहिणें संगतवार होण्यास सुद्धां तीवांचून चालत नाहीं. मग हजारों वाचकांस मान्य होईशी ग्रंथरचना करायाची असल्यास तर तिचें अगत्य केवढें आहे हें काय सांगावें ? कां कीं, ग्रंथ रचायाचा ह्मणजे सगळा विषय अगोदर साद्यंत मनांत आणून त्याची यथास्थित मांडणी करायाची असते; व वाक्यरचना वगैरे जितकी उत्कृष्ट होईल तितकी साधावी लागते. तेव्हां हें सर्व क्षोभ पावलेल्या मनुष्यापेक्षां शांत, स्थिर मनाच्या मनुष्यास ज्यास्त साधेल हें उघड आहे. हें एक झालें. दुसरें असें कीं, एकाद्या ग्रंथावर वगैरे जो अभिप्राय देणें तो शांत, गंभीर व सभ्य अशा रीतीनें दिला असतां त्याचें कांहीं निराळेंच वजन पडतें, आणि त्यानें जें काम होतें तें रागाच्या सपाट्यांत उगीच पुष्कळ गोंगाट केला, वेड्यावांकड्या शिव्या आंसडल्या, अशानें अगदींच होत नाहीं. या दुसऱ्या प्रकारानें टीका करणारावरून मात्र लोकांचें मन उडतें. व त्याचा हलकटपणा व पोरकटपणा जगांत प्रगट होतो. शिवाय वरील शिव्यांनीं त्याच्या पक्षास बळकटी यायची ती तर एकीकडेच राहून त्याची दुर्बलता मात्र लोकांस भासूं लागते. कारण लोक पक्कें समजतात कीं, ज्या अर्थीं यानें शिव्यांचा येवढा भडिमार केला आहे त्या अर्थीं याजपाशीं प्रमाणें तितपतच असतील. खेरीज ग्रंथकाराच्या थोरपणाला ह्मटलें ह्मणजे शिमग्याचा झगडा जागवणें हें अगदींच अप्रशस्त. रस्त्यांतील भांडणारांत तोंडाच्या जोरावर जसा कज्जाचा निकाल होतो, म्हणजे जो मोठ्यानें ओरडत असेल त्याचाच पक्ष खरा असें भोंवतालच्या तमासगिरांस वाटतें, तसा प्रकार ग्रंथांत करूं पाहणें यासारखें निंद्य व हास्यास्पद कांहीं नाहीं. असें जो करतो त्यास आपला बोज कळत नाहीं हें एक दिसतें, आणि शिवाय हातीं घेतलेलें टीका करण्याचें कामही त्यास बिलकुल कळत नाहीं हें दुसरें स्पष्ट होतें. कारण ज्याजवळ सबळ प्रमाणें आहेत, तो शब्दपांडित्याचा किंवा शिव्यांचा भडिमार करण्याच्या भरीस कधीं पडणार नाहीं. जीं ठोक प्रमाणें त्यास माहीत असतील तीं दाखवून तो खुशाल बिनधोक बसेल. आपल्या प्रतिपक्ष्यांच्या शिव्यांचीही तो काडीइतकीही परवा करणार नाहीं, कारण त्यांचा पोकळपणा त्यास धडधडीत दिसून येईल. व जे सुज्ञ आहेत ते यानें कधीं फसले जाणार नाहींत हेंही तो पक्कें समजेल. असो; तर याप्रमाणें मनाची शांतता ही टीकाकर्त्यास अत्यंत आवश्यक असून तिच्या योगानें त्याच्या लेखास कांहीं विलक्षण थोरवी व भव्यपणा हीं येतात, कीं ज्याप्रमाणें दोहों पक्षांच्या वकिलांच्या कोट्या व एकतर्फी उत्तरेंप्रत्युत्तरें सगळीं ऐकून घेतल्यावर न्यायाधीश आपल्या उंच आसनावरून निःपक्षपातपणाचा चोख निवाडा अगदीं स्वस्थ अंतःकरणानें बोलून जातो त्याप्रमाणें. सारांश, टीकाकर्त्यांचा अभिप्राय वकिलाप्रमाणें एकतर्फी कधीं नसावा, तर न्यायाधीशाच्या निर्णयाप्रमाणें केवळ सत्याच्या तर्फेचाच असावा.

११. चवथा गुण सहृदयता. सहृदयता ह्मणजे ज्यावर टीका करावयाची त्यांत हृदयाचा पूर्ण अभिनिवेश होण्याची योग्यता. ही योग्यता अर्थातच सर्व मनुष्यांच्या ठायीं असत नाहीं, अथवा असली तरी सारख्या प्रमाणानें असत नाहीं. जगांत जें येवढें मतवैचित्र्य दृष्टीस पडतें यास मुख्य कारण वरील होय. प्रत्येक मनुष्याची जन्मसिद्ध प्रकृतिच निराळी पडल्यामुळें व पुढें ज्या ज्या अवस्था त्यास प्राप्त होतात त्याही सर्वांच्या सारख्या नसल्यामुळें, मनुष्यांमनुष्यांमध्यें रुचिभिन्नत्व उत्पन्न होतें हें साहजिकच आहे. पण त्यांतूनही कित्येक मनुष्यांच्या ठायीं वरील सहृदयता गुण इतरांच्याहून ज्यास्त आढळतो. ह्मणजे दुसऱ्याच्या मनोवृत्तीशीं आपली मनोवृत्ति मिळवणें हें त्यास सहज करतां येतें. हा गुण असणें हें मनाच्या किंवा हृदयाच्या विशालत्वाचें चिन्ह होय, आणि त्याचा अभाव हा अर्थातच त्याच्या उलट गुणाचें ह्मणजे वरील दोहोंच्या संकुचितत्वाचें दर्शक होय. तर जो एकाद्या ग्रंथावर टीका करण्याचें मनांत आणील त्यानें अगोदर आपल्याशीं हें पाहावें कीं, याशीं सहृदयत्व पावण्याची माझी योग्यता आहे, की नाहीं. नाहीं तर काय प्रकार होईल तो उघडच आहे. समजा कीं, जयदेवाच्या 'गीतगोविंद' काव्यावर किंवा मराठीशाहींत रामजोशासारखे सुरस लावण्या करणारे जे कित्येक कवि झाले त्यांच्या कवनांवर टीका करण्यात शुकाचार्यासारख्या परमहंसांनीं हातांत लेखणी घेतली, किंवा वृद्धत्वानें अगर सृष्टीच्या चुकीनें मदनव्यापारशून्य असणाऱ्या मनुष्यानें तें काम पत्करलें, तर टीका किती उत्तम तऱ्हेची होईल याचें अनुमान सहज करतां येईल! तसेंच धर्मप्रतिपादक किंवा वेदान्तविषयक ग्रंथावर एकाद्या रंगेल विनोदी मनुष्यानें जर टीका करण्यास आरंभलें तर तें त्यास किती साधेल! बिशप् बट्लर् नांवाच्या एका धर्माध्यक्षानें इंग्रेजी भाषेंत एक मोठा विख्यात ग्रंथ वरील विषयावर रचला आहे, त्याविषयीं कित्येकांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, तो ग्रंथ पाहिल्याबरोबर आमचें डोकें दुखूं लागे. याप्रमाणेंच मिल्साहेबांचें शेक्सपीयरविषयीं मत, आमच्या कालिदासाविषयीं मत, जॉन्सन्चें कित्येक इंग्रेजी कवींविषयीं व इतिहासाविषयीं, मेकॉलेचें हिंदूंच्या विद्यादिकांविषयीं; या सर्वांची योग्यता किती धरायाची हें आमच्या वाचकांस तेव्हांच कळेल. एलिझाबेथ् राणीचे खजीनदार लॉर्ड् बर्लें ह्मणून कोणी होते, त्यांस, स्पेन्सर् च्या* सर्वप्रसिद्ध काव्याबद्दल राणीनें त्यास कांहीं इनाम करून दिलें या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें: त्या प्रसंगीं त्यांचा असा उद्गार निघाला, 'अहो, हें काय वेड आहे, नुसतें एक यःकश्चित् गाणें केल्याबद्दल येवढें इनाम!' दुसऱ्या एका प्रसंगीं असें झालें कीं, कोणा

---

* एड्मंड् स्पेन्सर् [ Edmund Spencer १५५३–९९ ] जन्म लंडन्मध्यें, शिक्षण केंब्रिज्ला. "Shepherd's Calender" ही कविता प्रसिद्ध झाल्यानंतर त्याची एलिझाबेथ् राणीशीं ओळख झाली. १५८० मध्यें आयर्लंडच्या लॉर्ड् डेप्युटीचा सेक्रेटरी त्याला नेमण्यांत आलें. व पुढें त्याला जप्त झालेल्या इस्टेटींतून तीन हजार एकर जमीन व किल्कोलन् (Kilcolman) किल्ला मिळाला. येथेंच त्यानें आपलें सुप्रसिद्ध अन्योक्तिपर काव्य फेरी क्वीन् (Faerie Queen) लिहिलें. १५९८ सालीं बंड माजवलें त्यांत स्पेन्सरचा किल्ला जाळून टाकण्यांत आल्यामुळें तो लंडन्ला गेला; व तेथेंच वारला. 'सम्पादक'

काव्याची कोणी फार फार प्रशंसा केली असतां एका तत्त्वज्ञाचा उद्गार निघाला, ' अं:--यांत काय आहे ? या काव्याच्या योगानें बाजारांत दाणे स्वस्त झाले कीं काय हें मला सांगा !' असो; तर याप्रमाणें ज्यांत आपणाला गम्य नाहीं त्यांत वेडेपणानें शिरलें ह्मणजे अशीं विचित्र मतें उत्पन्न होतात. यास्तव एकाद्या ग्रंथावर लेखणी उचलण्यापूर्वी टीकाकारानें याचा अगोदर नीट सुमार पाहावा कीं, मी हें काम हातीं घेणार खरें, पण याशीं सहृदयता पावण्याची माझी योग्यता आहे काय ? नसली तर अंधळ्यानें तजबिरीची परीक्षा करूं गेल्यासारखें त्याचें मत वेडगळ ठरेल. या ठिकाणीं कोणास असा भ्रम उत्पन्न होईल कीं, मनुष्याची विद्वत्ता मोठी असल्यावर त्यास हवें त्यावर मत देण्यास काय हरकत आहे ? पण या भ्रमाचें वरील जॉन्सन्, मिल्ल् वगैरेंच्या उदाहरणांवरूनच पूर्ण निरसन होतें; आणि त्यांविषयीं अधिक उपपादन केलेलें पाहणें असल्यास प्रस्तुत मालेचा तिसरा व चवथा अंक¶ पाहावा. असो, तर एकंदरींत या * हृदयता--गुणाची नुसत्या विद्वत्तेहून फारच अधिक योग्यता आहे. व ह्मणूनच एकाद्या ग्रंथावरील अभिप्राय जरी मोठी विद्वत्ता खर्चून लिहिला असला तरी वरील गुणाच्या अभावीं वरील मत केवळ कवडीचा माल होय.

१२. याप्रमाणें उत्तम प्रकारची टीका करतां येण्यास ती करूं जाणाराच्या अंगीं जे गुण लागतात ते वर सांगितले. यांत बाकीच्यांचा समावेश होईल असें आह्मांस वाटतें. आतां जगांत सामान्यतः जी ग्रंथादिकांवर लोकांची टीका चालते ती कितपत योग्यतेची असते व कोणकोणत्या प्रकारची दृष्टीस पडते याविषयीं थोडेंसें निरूपण करणें अवश्य आहे. प्रथमत: लोकव्यवहारांत हा प्रकार सर्वांच्या सहज ध्यानांत येणारा आहे कीं, एकंदर लोकांची स्तुतीपेक्षां निंदेकडे फारच विशेष प्रवृत्ति असते. कोणी अंमळ वर डोकें काढलें न काढलें, कोणाची अंमळ कोठें प्रशंसा झाली न झाली, कीं लोकांस तें सहेनासें होऊन लागलीच चोहोंकडे त्याचे निंदक उभे राहतात. ह्मणूनच पुष्कळ मोठमोठ्या ग्रंथकारांनीं व विशेषत: बहुतेक सर्व कवींनीं आपआपल्या ग्रंथांच्या प्रस्तावनांतून खलांचें माहात्म्य वर्णिलेलें आढळतें. असो; तर यावरून स्पष्टच आहे कीं, टीकेचें सामान्य स्वरूप ह्मटलें ह्मणजे मूळ ग्रंथाचें दूषण किंवा खंडन हेंच होय. दुसऱ्याची स्तुति करण्याकरतां कोणी एकाद्या ग्रंथावर विवेचन केलें आहे असें बहुधां कांहीं आंत मतलब असल्याविना झालेलें सांपडणार नाहीं. आतां एकंदर सगळ्या लोकांचा दुसऱ्यास नांवें ठेवण्याकडेच येवढा रोख कां दिसून येतो याविषयीं जर अंमळ विचार केला तर त्याचें कारण स्वाभिमान होय हें तेव्हांच लक्षांत येईल. ज्याच्या त्याच्या मतें शहाणा काय तो मी, माझेंच सर्वांनीं गुणवर्णन करावें, असेंच बहुधां असतें; यास्तव दुसऱ्याची जेवढी प्रशंसा झाली तेवढी आपल्यांतून वजाच झाली असें मनाच्या कोतेपणामुळें त्यास वाटतें. यामुळें दुसऱ्याच्या निंदेस जो तो बहुधां सतत ज(ट?)पलेला असतो. कित्येक जे खरोखरच बुद्धिमान् व शहाणे ह्मणून निवडले असतात त्यांची अशी समजूत असते कीं, दुसऱ्याच्या करण्यास आपण सर्वथैव चांगलें ह्मणून त्यांत कांहींच दोष

¶ पृष्ठें २३-२५ व ४२ पाहा. 'सम्पादक'

काढला नाहीं, तर आपला थोरपणा तो काय राहिला ! यास्तव आलीकडील नव्या सुरू झालेल्या युनिव्हर्सिटीच्या वगैरे परीक्षांतून परीक्षकांचा जसा प्रकार आढळतो, कीं, त्यांच्या हातून भरपूर गुण ह्मणून पडायाचेच नाहींत,—दहा पांच तरी स्वतःच्या गौरवास्तव त्यांतले एकीकडे शाबूत काढून ठेवायाचेच—तसेंच हे टीकाकार करतात. स्वतः सुद्धां जी ग्रंथरचना हातून घडायाची नाहीं तिची परीक्षा करतांनाही कांहीं गुणांचा उल्लेख करून शेवटीं कांहींना कांहीं तरी खरीं किंवा खोटीं कुलंगडीं काढून स्तुति आणि निंदा शेवटीं सरासरी समानच करून टाकतात ! हा प्रकार वरच्याहून पुष्कळ बरा, पण टीकाकारांच्या सत्यनिष्ठेस याचे योगानें कलंक लागतो हें उघड आहे. दुसरे कोणी असे असतात कीं त्यांस गुण व दोष दोन्ही दाखवावे लागतातच; पण दोषांवर पांडित्य करणें त्यांस जितकें आवडतें तितकें गुणांवर विवरण करणें अगदीं आवडत नाहीं. यास्तव गुणांचा उल्लेख सरासरी कांहीं थोडासा करून मग दोषांवर ते यथास्थित घसरतात. हा प्रकार अर्थातच द्वेषबुद्धीशिवाय किंवा मत्सरी स्वभावाशिवाय घडत नाहीं. पण कसाही असला तरी सरळ स्वभावाच्या मनुष्यास तो खचीत पसंत पडणार नाहीं. कोणाच्या स्वभावांत पक्षपातीपणाचें इतकें प्राबल्य असतें, व प्रकृति इतकी हेकटपणाची असते कीं, त्यांस एक गुण तर गुणच, नाहीं तर दोष तर दोषच, याखेरीज कांहीं बिलकुल दिसत नसतें. त्यांच्या आवडीचे किंवा त्यांच्या मतासारखे जे ग्रंथ असतील त्यांत त्यांस सर्वच गुणमय दिसून दोषाचा लवलेशही सांपडायाचा नाहीं; आणि वरच्या उलट ठिकाणीं सर्वच दोषरूप भासून गुणाचा लेशही सहन व्हावयाचा नाहीं. अशा टीकाकारांच्या ठायीं अर्थातच दुराग्रह ह्मणजे अगदीं जागरूक असतो; कारण कोणतीही वस्तु केवळ गुणमय किंवा केवळ दोषमय असावी हें सृष्टिनियमासच मुळीं विरुद्ध होय. तेव्हां अशा टीकाकर्त्यांस सहजच सत्याचा उपमर्द करून गुणांस दोषांचें व दोषांस गुणांचें रूप देण्याची खटपट करावी लागते. असो; तर याप्रमाणें बहुधां ग्रंथावरील टीकांचे प्रकार अनेक दृष्टीस पडतात.

१३. वर जे प्रकार सांगितले ते अहंकारादि दुष्ट मनोवृत्तींचीं फळें असल्यामुळें अर्थातच थोडेबहुत सर्व दूषणार्हच होत. आतां खऱ्या टीकाकर्त्याचें स्वरूप येथें थोडक्यांत सांगतों. ज्या ग्रंथावर टीका करायाची त्याचें पूर्ण ज्ञान व त्याशीं सहृदयता हे गुण त्याच्या अंगीं अगोदर हवेत हें वर सांगण्यांत आलेंच आहे. पण यांहून दुसरे जे गुण सांगितले ते तर टीकाकर्त्यास अधिकच अवश्य होत. त्यांच्या योगानें टीकेस खरी शोभा व खरी योग्यता येते; व ती सर्वांस मान्य होते. फार तर काय पण ग्रंथकर्ता जर समंजस असला तर तोही तीस मान डोलवल्यावांचून राहणार नाहीं. ही टीका ह्मणजे अशी कीं, ती केवळ निःस्पृहतेनें व निःपक्षपातपणानें केली असून केवळ सत्यनिरूपणाखेरीज तींत टीकाकाराचा दुसरा बिलकुल कांहींएक उद्देश नाहीं असें स्पष्ट दिसलें पाहिजे. टीकाकाराचें काम गुण व दोष दोन्हीही दाखवण्याचें आहे; यास्तव ते दोन्ही प्रगट करून त्यांचा उल्लेख कशाचीही लेशमात्रही अत्युक्ति न करतां त्यानें केवळ प्रांजळपणें केलेला असावा. दोष दाखवतांना मूळ ग्रंथकर्त्यांवर शेखी मिरवण्याची आपली हौस आहे असें टीकाकर्त्याकडून जितकें न

दाखववेल तितकें बरें; तसेंच गुण दाखवतांना तो त्याचा मित्र असल्यास त्याची फाजील प्रशंसा करणें हेंही अगदीं बाजवी नाहीं. तर जे दोष असतील ते उघड निर्भीडपणानें स्पष्ट बोलून जाऊन जे गुण असतील त्यांबद्दल ग्रंथकर्त्याची त्यानें वाजवी रीतीची तारीफ करावी. असो; एकंदरींत ज्याप्रमाणें खरा न्यायाधीश शत्रुमित्रभाव अगदीं विसरून जाऊन केवळ उदासीनपणें कैदीचा इनसाफ करतो; किंवा खरा व्यापारी खऱ्या वजनांनीं गिऱ्हाइकाच्या पदरांत चोख माप घालतो; किंवा खरा उत्कृष्ट चितारी जसा मूळचा चेहरा असेल तसाच हुबेहुब तजबिरींत उतरून देतो; त्याप्रमाणेंच ग्रंथांवर टीका करणारा असावा !

१४. येथवर प्रस्तुत विषयाचें बहुतेक विवेचन झालें. आतां या ठिकाणीं हल्लीं एकंदर लोकांत प्रकृत विषयाच्या संबंधें ज्या कित्येक विलक्षण समजुती नजरेस येतात त्यांविषयीं थोडेसें लिहिणें इष्ट वाटतें. हें लिहिणें कांहीं अंशीं याच पुस्तकाच्या संबंधानें येईल. यास्तव या गोष्टीबद्दल आमच्या समंजस वाचकांची अगोदर क्षमा मागणें अवश्य आहे. या समजुतीं-पैकीं पहिली ही मोठी समजूत दृष्टीस पडते कीं, जो दुसऱ्याचे दोष काढतो तो तसें अहं-पणानें फुगून जाऊन किंवा द्वेषबुद्धीनेंच केवळ करतो; यास्तव तो मोठा गर्विष्ठ व दुष्ट मनुष्य असावा. ही समजूत होण्यास कारणें कोणतीं झालीं आहेत हें मागील लेखावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. पण ही समजूत नेहेमी खरी असायचीच असा कांहीं नियम नाहीं. अगदीं निकट संबंधाच्या व सारख्या स्वभावाच्या लोकांतही मतभेद हरहंमेश दृष्टीस पडतोच, व तो पडला असतां कांहीं विलक्षण आश्चर्याची गोष्ट झाली असें होत नाहीं, याविषयीं गेल्या सालच्या शेवटच्या अंकाच्या शेवटीं* कांहीं विवेचन केलें आहे, त्यावरून आमच्या वाचकांची यासंबंधें खात्री झाली असेलच. यास्तव त्यावर येथें आणखी विस्तार करण्याची गरज नाहीं. इतकेंच सांगतों कीं, वरील दोषविवेचन हें वरील दोन हेतूंवरून होण्याचा जसा संभव आहे तसेंच पण तें केवळ सत्यनिष्ठेपासूनही संभवतें. यास्तव तसा लेख लिहिणारावर वरील दोन मनोवृत्तींचा आरोप निखालसपणें करणें ही कांहींशी दांडगाईच होय. हें एक झालें; दुसरें असें कीं, ज्यानें गर्वानें किंवा दुष्टबुद्धीनें दुसऱ्याची विनाकारण निंदा केली, त्यावर तोच कडाका उठवण्यास त्या निंदिलेल्या मनुष्यास किंवा त्याच्या कैवाऱ्यास कोणीं मनाई केली आहे ? त्याच्या निंदेस आपण पात्र नाहीं असें ज्यास वाटत असेल त्यानें तो दोषारोप आपणावरून न उडवतां कां स्वस्थ बसावें ! तसें न केलें तर आपण त्या सर्व दूषणांस कबूल आहों असें लोक समजतील हें त्यास कळत नाहीं काय ? तर याप्रमाणें द्वेषमूलक निंदेपासूनही यत्किंचित् सुद्धां अनर्थ होण्याचा बिलकुल संभव नाहीं हें उघड आहे. असो; दुसरी समजूत अशी कीं, आपणांहून जे थोर आहेत त्यांचे दोष काढण्यास आपणांस अधिकार नाहीं. ही समजूत आमच्या जुन्या भोळ्या भाविक लोकांची जर असती तर तिचा आह्मांस मोठासा चमत्कार वाटला नसता. कारण वाडवडिलांविषयीं वगैरे आमच्या लोकांची पूज्यबुद्धि किती दृष्टीस पडते हें सर्वांस विदित आहेच. पण जुन्या

* पृष्ठें १८०-१८२ पाहा. 'सम्पादक'

वेड्या कल्पनांच्या दास्यांतून नवीन विद्वत्तेनें आपणांस मुक्त केलें ह्मणून जे आपणांस परम धन्य मानतात, आजपर्यंत हिंदुस्थानांत इतके राज्यकर्ते होऊन गेले पण सांप्रतच्या दयाळु सरकाराप्रमाणें मनाचें स्वातंत्र्य कोणींही प्रजेस दिलें नाहीं ह्मणून जे त्यांचे पोवाडे गातात, आपल्या थोर पूर्वजांची चारगटपणानें हवी तशी निंदा करण्यास ज्यांनीं कधींच मागें पुढें पाहिलें नाहीं, आमच्या प्रभूचा धर्म शांतीचा सागर असून तो जबरदस्तीनें नव्हे तर लोकांचीं मनें वळवूनच वाढवण्याची आह्मांस आज्ञा आहे ह्मणून जे चोहोंकडे डांगोरा पिटीत आहेत, त्यांनींच मेकॉले, मिल् सारख्या ग्रंथकारांची निंदा वाचतांच अंगावर शहारा आणून कानांत बोटें घालावीं, डॉक्टर् विल्सन् सारख्यांस कोणत्याही संबंधानें नांव ठेवणें हें केवळ सहावेंङ्क महापातकच मानावें, आपल्या महाराणीसाहेबांचे पायीं तिच्या सर्व प्रजेनें आपली धर्मनिष्ठा, सत्यप्रीति. व ईश्वरदत्त सदसद्विवेचनशक्ति वगैरे सर्व वाहून टाकावें असा प्रसिद्धपणें उपदेश करावा ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे ! पण वरील अधिकार मनुष्यमात्रास आहे कीं नाहीं याचा निर्णय जो क्षणभर विचार करील त्यासही सहज समजण्यासारखा आहे. केवळ पोरबुद्धि टाकून मनुष्यांच्या गुणागुणांविषयीं* यत्किंचित्ही विचार करण्याचें ज्याच्या बुद्धीस सामर्थ्य आलें, त्यास जगाचें अवलोकन उगीच थोडेंसें केल्यावरही लक्षांत येणारें आहे कीं, सर्व गुणांनी संपन्न असा मनुष्य एकही सांपडणार नाहीं; तसेंच ज्यांत लेशमात्रही दोष आढळणार नाहीं असाही सांपडणें केवळ अशक्य होय. दोषांचा सर्वथा अभाव हा एक परमेश्वराचे ठायीं मात्र संभवतो. त्याची मनुष्यानें स्पृहा करणें, किंवा त्याचें वास्तव्य आपले अंगीं मानणें, यासारखें भयंकर मूर्खत्व कोणतेंच नाहीं ! मग असें जर स्पष्ट आहे तर कोणी केवढाही थोर असला तरी त्याचे ठायीं कांहीं ना कांहीं तरी दोष दिसल्यास व ते कोणीं काढल्यास नवल कसचें ? पण कोणी कदाचित् ह्मणतील कीं, मोठ्यांच्या अंगीं जरी दोष असले तरी ते लहानानें काढूं नयेत. हें ह्मणणें ह्मणजे चंद्रास कलंकी ह्मणूं नये, सूर्याच्या बिंबावरचे काळे डाग पाहूं नयेत, असें ह्मणण्यासारखेंच असमंजस झालें. वरील दोन ज्योतींचा प्रकाश त्यांच्या डागांनीं कमी होतो काय ? किंवा त्या डागांचा नकाशा जे ज्योतिषी काढतात ते तसें करण्यानें त्यांच्या तेजाची निंदा करूं पाहतात काय ? कांहीं नाहीं. त्यांचा उद्देश त्यांचें यथावत् स्वरूप प्रगट करावें इतकाच काय तो असतो. पण इतकेंच नव्हे. हें महद्दोषविवरण वर सांगितल्याप्रमाणें केवळ निर्दोष तर आहेच; पण शिवाय तें अत्यंत उपयोगाचेंही होय. एक उपयोग तर सत्याचा लाभ हा उघड आहेच. दुसरा असा कीं, त्याच्या योगानें मनुष्याच्या वृथागर्वाचें उत्कृष्ट खंडन होऊन परमेश्वराच्या पूर्णत्वाकडे चांगलें लक्ष लागतें. तें असें कीं, आपण ज्यांस फार फार थोर ह्मणतों त्यांच्या

---

§ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वङ्गनागमः ॥ महान्ति पातकान्याहुः संसर्गश्चापि तैः सह ॥ मनु. ११-५४.

ब्राह्मणाचा वध, मद्यपान, चौर्यकर्म, गुरुपत्नीशीं व्यभिचार, आणि हीं चार पापें करणाराशीं संबंध ठेवणें हें पांचवें अशीं महापापें आजपर्यंत पांचच मानण्यांत येत. आतां यापुढें हें एक नवें तितकेंच भयंकर व ह्मणून सहावें महापाप मानावें. 'सम्पादक.'

* गुणावगुणांविषयीं. 'सम्पादक'.

ठिकाणींही जेव्हां अपूर्णत्व दृष्टीस पडतें, तेव्हां बाकीच्या यःकश्चित् क्षुद्र मनुष्यांस आपला वेडेपणाचा गर्व सहजच समूळ टाकून द्यावा लागतो, आणि सर्व गुण व ऐश्वर्य हीं सृष्टिकर्त्या देवाच्या ठिकाणीं मात्र आहेत अशी मनाची खात्री होऊन जाते. आणखी तिसरा उपयोग असा आहे कीं, थोरांच्या दोषांपासून जो एक मोठा अनर्थ होतो तो बंद होतो. कोणीं चतुर इंग्रेज ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, 'मोठ्यांच्या ठायीं असणाऱ्या दोषांसारखें भयंकर कांहीं नाहीं.' उघडच आहे कीं, मनुष्याचा स्वभाव दुसऱ्याचें अनुकरण करण्याचा असल्यामुळें मोठ्यांच्या दुर्गुणांचा कित्ता घेणारे हजारों निघतात, आणि त्या दुर्गुणांतही कांहीं विलक्षण प्रतिष्ठा आहे असें पुष्कळांस वाटूं लागतें. तेव्हां त्या दुर्गुणांचेंच एकदां यथास्थित खंडन झालें असलें ह्मणजे ते पुढें लोकांस तादृश बाधक होत नाहींत. असो; तर याप्रमाणें कोणी केवढाही मोठा असला तरी त्याचे दोष काढण्यांत कांहीं गैर नसून तसें करणें अत्यंत उपयोगाचें आहे असेंही पण आह्मीं वर दाखवलें. तिसरी समजूत अशी कीं, वरील दोषाविष्करणानें त्यांचा उपमर्द होतो. हीही समजूत अगदीं खोटी आहे. वर जें सांगितलें आहे कीं मनुष्यानें आपण सर्वगुणसंपन्न आहों असा अभिमान बाळगणें हें अत्यंत मूर्खत्व होय, हें जर खरें आहे, तर आपल्या दोषांचें वर्णन सहन न होणें हा तरी वरचाच प्रकार झाला. जो मनुष्य आपल्या गुणांची लोकांनीं प्रशंसा करावी असें इच्छितो, त्यानेंच आपल्या दोषांची निंदा ऐकण्यासही कां सिद्ध नसावें ! आपले गुण तेवढे काढून दोष तेवढे लोकांनीं झांकून ठेवावे असें त्यास वाटतें काय ? व मनाची प्रवृत्ति ज्यानें यत्किंचित्ही अवलोकन केली असेल तो अशी वेडी आशा तरी बाळगील काय ? शिवाय आपण जसे दुसऱ्याचे दोष काढण्यास काडीइतकाही अनमान करीत नाहीं, तसेंच दुसऱ्यांनींही आपणाविषयीं कां करूं नये ? सर्वांस सर्वांच्या गुणदोषांची चर्चा करण्यास अर्थात् पूर्ण अधिकार आहे; इतकेंच मात्र कीं, कांहीं गोष्टी उघडपणें बोलून दाखवल्या असतां चालतात, आणि कांहीं चालत नाहींत. बरें; पण ही बऱ्यावाइटाची निवडानिवड तरी खरोखरी पाहतां जगाच्या सद्वर्तनास अत्यंत इष्टच नव्हे काय ! अर्थात् इष्टच आहे; आणि तिच्या हितावहत्वाविषयीं एक स्वतंत्र निबंध लिहितां येईल. यास्तवच या जनचर्चेचा ज्ञाते पुरुष कधीं त्रास मानीत नाहींत; आणि नसत्या गुणांबद्दल आपली उगीच प्रशंसा झाल्यापेक्षां नसत्या दोषांबद्दल झालेली निंदाही त्यांस एकवार पतकरेल, इतका त्यांस वावग्या स्तुतीचा कंटाळा असतो. मग स्वतःच्या यथार्थ दूषणाबद्दल त्यांस राग तर कोठचा ! असो; तर वरील कारणांवरून सहज ध्यानांत येईल कीं, खरोखर जे आपल्या ठायीं दोष आहेत ते दाखवल्याचा सुज्ञ मनुष्यास कधीं राग येणार नाहीं, आणि ते दाखवले असतां कोणाचा उपमर्द होतो हीही अगदीं खोटी समजूत आहे.

पण ग्रंथकर्त्यांस तर वरील गोष्ट विशेषच लागू पडते. एरवीं व्यवहारांत नातीं, स्नेहसंबंध, भीडमुरवत वगैरे प्रकारांमुळें आपणास कोणाविषयीं जें वाटेल तें अगदीं यथार्थ असतांही स्पष्ट बोलून दाखवतां येत नाहीं. तसाच सरकारी नात्यानेंही मनुष्य बांधला जातो. कोणाचें कोणाविषयीं मत कितीही वाईट असलें, रागानें, मत्सरानें, तिरस्कारानें वगैरे

मनुष्य कितीही आंतल्या आंत जळफळत असला, तरी सरकारी संबंधास्तव वरकरणीं तरी उभयपक्षींही गोडीगुलाबी ठेवावी लागते. तसेंच कायद्याचेंही बंधन. प्रत्यक्ष हाडवैरी जरी असले, एकीकडे गांठ पडली असतां एकमेकांच्या उरावर बसण्यासही जरी चुकले नाहींत, तरी त्याच मनुष्यांस चारचौघांत आपआपलीं मतें स्पष्टपणें बोलून दाखवतां येणार नाहींत. कां तर लायूबेलच्या *फिर्यादीचा धाक ! पण कोणी मनुष्य ग्रंथकाराच्या नात्यानें जगापुढें आला कीं वरील मान सर्व अगदीं फिरून जातें. तेथें लपण्यास मग कांहीं सांपडत नाहीं. तो घरचा मोठा संपन्न असो; मोठा हुद्देदार असो; मोठा विद्वान् असो; मोठ्या अब्रूचा मनुष्य असो; जो त्यावर हत्यार उचलील, त्यास त्याच्या कशाचेंही तिळमात्रसुद्धां भय बाळगण्याची गरज नाहीं. त्याचे दोष जे त्याच्या बुद्धीनें वाटतील ते खुशाल निर्भीडपणें सर्वांस जाहीर करून त्याची हवी तशी फजिती उडवण्यास त्यास पूर्ण अखत्यार असतो. आतां हें खरें कीं असें आहे म्हणून एकाद्याचा विनाकारण बभ्रा करणें, व भलभलतीं बळेंच दूषणें लावून त्याची योग्यता लोकांत कमी होईलसें करूं पाहणें हें केवळ नीचपणाचें व अत्यंत अश्लाघ्य असें कृत्य होय. हें करण्यास प्रवृत्त होणारे लोक पुष्कळ आढळतात खरे; पण यावरून वरील अधिकार सर्वांस असणें हें वाईट आहे असें कदापि सिद्ध व्हावयाचें नाहीं. सर्व गोष्टींचा चांगलेवाईटपणा ज्याच्या त्याच्या बऱ्यावाईट कृतीवर असतो; त्याचप्रमाणें वरील अधिकाराचीही गोष्ट होय. सत्यप्रिय व समंजस जे असतील त्यांच्या हातून त्याचा चांगला उपयोग होईल; आणि हेकटखोर अथवा दुष्ट असतील त्यांच्या हातून वाईट होईल. असो; आतां हा अधिकार सर्वांस कशावरून आला असें जर कोणी पुसेल, तर त्याचें उत्तर थोडें आहे. तें इतकेंच कीं, बाजारांतील जिन्नस चांगला वाईट ठरवणें हा हक्क जसा हवा त्यास आहे, तसाच ग्रंथांचें गुणदोषविवेचन करण्याचाही साऱ्या वाचकांस आहे. वरील साम्य आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् उपहासास्पद वाटेल; पण वस्तुतः पाहतां ग्रंथकाराची आणि दुकानदाराची गोष्ट अगदीं सारखी आहे. आलीकडे तर छापखाने निघाल्यापासून वरील सादृश्य अधिकच दृढ झालें आहे. पण पूर्वीपासून जरी पाहिलें तरी सगळी दुनिया हाच कोणी बाजार, यांत आपला ग्रंथरूप माल घेऊन कीर्तिरूप द्रव्याच्या आशेनेंच सर्व ग्रंथकार येतात असें म्हटल्यास कांहीं हरकत नाहीं. मग असें जर आहे तर बाजारांत दुकानदारांची जी दशा होते तीच ग्रंथकारांच्या कपाळीं आल्यास त्यांनीं कां खेद मानावा ? म्हणजे हजारों गिऱ्हाईक आणि त्यांचीं हजारों बोलणीं, तीं सर्व वरील दुकानवाल्यास निमूटपणें सोसणें जसें भाग पडतें, त्याप्रमाणेंच लोकांचे आपल्या ग्रंथांवर नानाप्रकारचे अभिप्राय ग्रंथकारानें निमूटपणें ऐकून कां घेऊं नये ? अथवा दुसरा दृष्टांत. रंगभूमीवर नाटकपात्र आलें असतां त्याच्या अभिनयाची, किंवा एकाद्या सभेंत कोणी वक्ते उठून त्यांनीं

* हस्तलिखित अगर छापील लेख, चित्रें, कार्टून्स् वगैरे एकाद्या मनुष्याबद्दल सार्वजनिक तिरस्कार उत्पन्न करण्यासाठीं अगर त्याचा उपहास करण्यासाठीं दुष्ट बुद्धीनें प्रसिद्ध करणें हा बदनामीचा गुन्हा होतो. अर्थातच केलेलें विधान सत्य अगर सार्वजनिक हितासाठीं आहे असें सिद्ध झालें तर गुन्हा होत नाहीं. 'सम्पादक'

भाषणास आरंभ केला असतां त्यांच्या वक्तृत्वाची, परीक्षा करण्याचा अधिकार सर्व श्रोत्यांस नाहीं काय? आणि समजा कीं, वरील दोघेजण आपआपल्या कलेंत अत्यंत निपुण असतांही सगळ्यांनीं टाळ्या पिटल्या व हुर्रेवडी करून दिली, तरी त्याबद्दल आपली मानहानि झालीशी वाटून त्या दोघांनीं सर्व लोकांवर बेअब्रू केल्याची जर फिर्याद केली तर तें त्यांस किती शोभेल व कोर्ट तरी त्यांस काय जबाब देईल? तर या॰ वरील तीन दृष्टांतांवरून आमच्या वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल कीं, कोणाच्याही ग्रंथावर कोणास हवें त्यास हवा तसा अभिप्राय प्रगट करण्याची पूर्ण मोकळीक आहे.

वरील गोष्ट इतकी स्पष्ट असतांही पुष्कळ लोकांस व त्यांतून विद्वान् व ज्ञाते ह्मणवणाऱ्यांपैकींही कित्येकांस, चांगलीशी कळत नाहींशी दिसते. कांहीं वर्षांपूर्वीं 'विविधज्ञानविस्तारा'च्या एका अंकांत मोरोपंताविषयीं कांहीं मजकूर लिहिला होता. त्यांत लिहिणारानें त्या कवीवर कांहीं खरीं व कांहीं केवळ शुष्क अशीं दूषणें दिलीं होतीं. तीं त्या कवीच्या भजकांस न आवडून त्यांपैकीं एकानें एके पत्रांत असा मजकूर प्रसिद्ध केला होता कीं, पंतांचे कोणी पुरस्कर्ते जर या वेळेस असते तर त्यांनीं वरील लिहिणारावर बेअब्रूबद्दल फिर्याद ठोकली असती. पण तसें नसल्यामुळें हवें त्यानें त्यांवर हवे तसे दोषारोप करावे अशी स्थिति झाली आहे. ही वेडी समजूत त्या लिहिणारास वरील गुन्ह्याचें स्वरूप पुरतें माहीत नसल्याच्या योगानें जडली हें उघडच आहे. असो; वरच्याप्रमाणेंच आमच्या पुस्तकाच्या दहाव्या अंकांत* जीं कांहीं मराठी कवींस आह्मीं दूषणें दिलीं आहेत तीं पाहूनही कित्येक नाखुष झाले असें आमच्या कानीं आलें आहे. पण गुणदोषविवेचनाच्या अधिकाराविषयीं वगैरे जो मजकूर वर लिहिला तो सगळा लक्षांत आणला असतां आह्मीं केलें तें गैर केलें अशी समजूत थोड्यांचीच होईल, असा आह्मांस भरंवसा आहे. पण वरील अज्ञान आमच्या आठव्या अंकाच्या खेपेस‡ तर आमच्या नजरेस पुष्कळच आलें. कित्येकांनीं मोठ्या गंभीर मुद्रेनें आह्मांस लायूवेल्चा अॅक्ट् वाचण्यास सांगितलें; कित्येकांनीं असा धाक घातला कीं, हें जर सरकारच्या कानीं गेलें तर मोठें कठिण जाईल; कित्येकांस असें भय पडलें कीं, त्यांतील मजकूर लिहिण्यास आह्मांस कोठून बुद्धि सुचली कोण जाणे; कित्येकांनीं पुस्तक बंद केलें जाईल असाही भविष्यवाद केला! आमच्या दयाळू व सत्याभिमानी ख्रिस्ती बंधूंनीं तर आह्मांवर जी तरवार उपसली ती अतिच भयंकर! एकाद्या लुच्चाची ठकविद्या जाणून त्याची पुंगी कोणीं बंद केली असतां त्याचा जसा माथा फिरून जावा त्याचप्रमाणें लोकांत ज्ञानाचा उदय करणारे व सत्याचा दीप पाजळणारे आमचे बंधु अगदीं खवळून गेले आणि त्यांच्या शुभवर्तमानावर जे आह्मीं कांहीं आक्षेप काढले ते नाहींसे करून ख्रिस्ती धर्माचें सत्यत्व प्रतिपादन करण्यास जो त्यांनीं खटाटोप केला त्यास भगीरथ-प्रयत्न§ ह्मण-

* पृष्ठें ११६–१८ पाहा. 'सम्पादक'

‡ पृष्ठें ७७–८५ व ८९–९२ पाहा. 'सम्पादक'

§ भगीरथप्रयत्नः—इक्ष्वाकु-कुलांतील सगर राजानें अश्वमेध यज्ञ करून श्यामकर्ण घोडा

(पुढें चालू)

ण्यास कांहीं हरकत नाहीं:—इतकेंच मात्र कीं, वरील शब्दांत कार्याच्या सिद्धीचा जो अर्थ गर्भित होतो तो वरीक वरील ठिकाणीं लागू पडत नाहीं! असो; एकंदरींत वरील प्रसंगावरून आमचे लोकांस आपले हक्क कितपत समजतात, व एकदां कायम होऊन बसलेलीं जीं मतें तीं सोडण्यास केवढा आयास पडतो, हें स्पष्ट करून येतें.

आम्हीं अद्याप लाय्‌बेल्‌चा ॲक्ट् वाचला नाहीं, व पुढेंही वाचूं कीं नाहीं याचा संशयच आहे; पण आम्हांस येवढें स्पष्ट कळतें कीं, जर मेकॉले, जॉन्सन् वगैरे हजारों मोठ्या थोर मानलेल्या ग्रंथकारांनीं आपआपल्या ग्रंथांतून मोठमोठे कवि, इतिहासकार, तत्त्वज्ञ इत्यादिकांविषयीं हवा तेवढा कडक मजकूर लिहिला आहे व तो सर्वांस मान्य आहे; पोप कवीनें खुद्द बेकन्‌ला उद्देशून,

"The greatest, brightest, meanest of mankind."

"सर्व मनुष्यांहून अति बुद्धिमान्, अति चतुर, आणि अति नीच!" असें म्हटलें असतांही जर पोपवर बेअब्रू केल्याचा गुन्हा येत नाहीं, व त्या जगद्विख्यात अद्वितीय पंडिताची विद्वान् लोकांतील कीर्तिही लवमात्रसुद्धां कमी होत नाहीं, तर मेकॉले, मिल् यांसारखे ग्रंथकार केवढेही मोठे असले, व त्यांस आम्हीं कितीही शिव्या दिल्या असल्या, तरीही पण वरच्याप्रमाणेंच कोणतीही गोष्ट ठरत नाहीं. तसेंच पाद्री लोकांनीं आज पांचपन्नास वर्षें हिंदु व इतर धर्मांविरुद्ध सहस्रावधि अप्रयोजक ग्रंथ जर आजपर्यंत प्रसिद्ध केले आहेत, व अजूनही 'ज्ञानोदया'सारख्या कपींची बडबड सतत सुरूच आहे, तर आमच्याच लोकांची लेखणी कोणी धरीलसें वाटत नाहीं. पण हें वसें काय! आमच्या 'सन्मान्य' पाद्री बंधूंस खुद्द इंग्लंडांतच ख्रिस्ती धर्मावर लोकांचा केवढा विश्वास आहे हें माहीत नाहीं काय? टॉमस् पेन्,§ हास्‌ल्म वगैरे ग्रंथकारांनीं 'पवित्रशास्त्रा'ची केवढी धूळधाण करून दिली आहे

---

दिग्विजयास पाठविला तो इंद्रानें हरण केला. सगराचे साठ हजार पुत्र घोडा शोधतां शोधतां समुद्र खणून कपिलाश्रमांत आले. तेथें घोडा सांपडल्यानें समाधिस्थ कपिलाला चोर समजून ते मारूं लागले. कपिलानें त्यांकडे दृष्टि फेंकतांच सारे जळून भस्म झाले. सगराला असमंजा नांवाचा आणखी एक पुत्र होता. पण तो अरण्यांत गेला होता. तेव्हां असमंजाचा पुत्र अंशुमान् यानें कपिलमुनींना प्रसन्न करून घेऊन, घोडा आणून यज्ञ पूर्ण केला, याला दिलीप नांवाचा मुलगा होता. अंशुमानानें सारा जन्म व दिलीपानें तीस हजार वर्षें तप केलें पण यश आलें नाहीं. पुढें दिलीपपुत्र भगीरथ यानें हिमालयावर गोकर्णक्षेत्रीं एक हजार वर्षें तप केल्यावर गंगा प्रसन्न झाली. व अलकनंदा नामक प्रवाहानें स्थित असलेली ती भगीरथामागून हिमालयावरून भरतखंडांत आली. भगीरथानें आपल्या पितरांचा उद्धार केला. भगीरथानें आणल्यामुळें 'भागीरथी' असें नांव या नदीला पडलें. पणजापासून फसत असलेला प्रयत्न पिढ्यान्‌पिढ्या चालू ठेवणाऱ्या कुळांत अखेर भगीरथानें सिद्धि मिळविली. यावरून 'अखंड, दीर्घकालीन, दुर्दमनीय व यशस्वी' प्रयत्नास भगीरथ-प्रयत्न म्हणण्याचा प्रघात पडला. 'सम्पादक'

§ Thomas Paine (१७३७–१८०९) राजकीय व धार्मिक विषयांवरचा प्रख्यात लेखक. (Rights of Man) 'मानवी हक्क' हें पुस्तक १७९१ सालीं व (Age of Reason) 'बुद्धिवादाचें युग' हा धार्मिक ग्रंथ १७९४ मध्यें प्रसिद्ध झाला. त्यावेळीं दोन्ही खेपांस भयंकर खळबळ उडून गेली. पहिल्या वेळीं तर ईश्वर-निंदेबद्दल त्याच्यावर खटला उभारण्यांत आला पण तो फ्रान्सला पळून गेला. १८०२ नंतर तर तो अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत राहिला. 'सम्पादक'

हेंही त्यांस ठाऊक नसेल काय? ह्यूम, गिबन्, दोघे मिल् हे विलायती धर्माचे केवढे शत्रु होते हें कोणास माहीत नाहीं? नुकतें कांहीं महिन्यांपूर्वींच माजी जॉन् स्टुअर्ट् मिल् यांचे 'धर्मावर तीन निबंध' छापून ते लक्षावधि लोकांच्या पुस्तकालयांत जाऊन पडले हें कोण जाणत नाहीं? आमच्या 'ज्ञानोदय' महाराजांनीं मेकॉले व मिल् या दोघांस हात देऊन सांवरलें, पण दोघांचेही ग्रंथ जर त्यांनीं उगीच वरवर तरी वाचले असते, तर त्यांस कळून आलें असतें कीं, यांची जगाच्या तारणाऱ्या प्रभूवर मोठीशी भक्ति होती असें नाहीं. असो तिसरा मोठा आरोप बंडवाल्यांच्या नांवांचा उल्लेख. गेल्या वर्षाच्या बाराव्या अंकांत× एका इंग्लिश् इतिहासकाराचा तात्या टोप्याविषयीं जो उतारा दिला आहे, व त्या शूर पुरुषाची खुद्द रसेल् साहेबांनीं[1] केलेली मोठी तारीफ त्यांत जी मोडी‡ अक्षरांनीं लिहिली आहे, ती वाचून आमच्या पाद्री बंधूंशिवाय बाकी सर्वांची खात्री होईल कीं, 'महादुष्ट बंडवाल्यां'च्याही योग्य स्तुतीनें इंग्रेजांची लेखणीही केवळ विटाळतेच असें नाहीं; मग एतद्देशीय लिहिणाराची तर नाहींच नाहीं! असो; तेव्हां एकंदरींत सारांश हाच कीं, कोणी केवढ्याही योग्यतेचा ग्रंथकार असला तरी त्यावर हवी तशी चर्चा करण्यास हवा त्यास अधिकार आहे; आणि जोंपर्यंत आपण कोणाच्या घरगुती वगैरे गोष्टी न काढतां केवळ लौकिक संबंधानें कोणाविषयीं बोलत आहों, तोंवर त्याची हवी तशी शोभा केल्यास कांहीं गुन्हा होत नाहीं. इतकें मात्र खरें कीं, येवढें जो धाडस करील त्यानें त्याविषयीं अगोदर आपणापाशीं तशीच कडेकोट तयारी करून ठेवली पाहिजे; आणि लोकांचा द्वेष जो त्याजवर येईल त्यानेंही आपण कचरणार नाहीं असा मनाचा पक्का धडा करून ठेवला पाहिजे.

१५. असो; आतां सरतेशेवटीं वर सांगितलेल्या गुणांनीं विशिष्ट असे टीकाकार निपजले असतां भाषेचें व तद्द्वारां लोकांचें हित कोणतें होतें तें सांगतों. चांगलें वाईट अशीं कांहींच निवडानिवड न करतां हवें तें अन्न खाल्लें असतां जसें शरीराचें पोषण होणें एकीकडेच राहून उलटच्या त्यास व्याधि मात्र जडतात, त्याचप्रमाणें ग्रंथवाचनाचीही गोष्ट होय. जे ग्रंथ खरोखर वाचण्यालायक असतील,—ह्मणजे ज्यांची भाषासरणी उत्तम, विषयप्रतिपादन प्रौढ व सरस, ज्यांपासून मनोरंजन किंवा उपदेश अथवा दोन्हीही एकदम प्राप्त होतात, असेच वाचणारांनीं वाचावे. पण हें होण्यास वरच्यासारखे ग्रंथ कोणते हें अगोदर अवश्य समजलें पाहिजे. हें ज्ञान वाचणारांस प्रथमतः मुळींच नसतें; तें अनेक ग्रंथांचें बहुतकाल जेव्हां सतत परिशीलन करावें तेव्हांच प्राप्त व्हावयाचें. तेव्हां अमुक ग्रंथ वाचण्या-

---

× पृष्ठ १८३ पाहा. ‡ मोडी=Italic, तिरपीं. 'सम्पादक'

१. हा नामांकित ग्रंथकार जगद्विख्यात 'लंडन् टैम्स्' पत्राचा बातमीदार होता. आदल्या वर्षी क्रिमियाच्या लढाईचा वृत्तांत त्या पत्रास पोंचवून बंडाच्या सालीं हा हिंदुस्थानांत आला होता. येथील वृत्तांतही या साहेबानें अगदीं चोख रीतीनें आपल्या देशीं कळवला. असो; एकंदरींत आमच्यावर राज्य करणाऱ्या लोकांच्या अनेक सद्गुणांपैकीं प्रत्यक्ष शत्रूचीही वाहवा करण्याची जी औदार्यान्वित सत्यप्रीति त्यांच्यांत दिसून येते ती परम आश्चर्यकारक खरी! आणि आमच्या मेकॉलेसाहेबांप्रमाणें किंवा पाद्री बंधूंप्रमाणें सगळेच सत्यनिष्ठ नाहींत हीही मोठ्याच आनंदाची गोष्ट होय!

सारखा आहे आणि अमुक नाहीं हें ज्ञान वाचकांस करून देण्यास अर्थातच निराळेच लोक पाहिजेत. हे लोक टीकाकार होत. मागील काळच्या श्रीमंतांच्या घरीं जसे चोखे बाळगलेले असत, कीं त्यांनीं पदार्थ वाढायला आला असतां अगोदर आपण चोखून तो नीट उतरला असला तरच आपल्या यजमानांकडे जाऊं द्यावा, त्यांच्यासारखेंच कांहीं अंशीं टीकाकर्त्यांचें काम होय. ग्रंथकार हे मुदपाकांतील पाकाध्यक्षांसारखे होत, आपली सर्व करामत खर्च करून पदार्थ तयार करण्याचें त्यांचें काम; एकंदर वाचणारे लोक हे पाटावर बसलेल्या यजमानांसारखे, त्यांस जातीनें पदार्थांचा बरेवाईटपणा फार करून कळायाचा नाहींच; आणि ग्रंथांचे गुणदोषपरीक्षक हे अर्थातच वर सांगितलेल्या चोखेमंडळीसारखे, यांच्या सर्वानुमतें किंवा बहुमतें जो पदार्थ पसार होईल तो मग पुढें खाशांकडे जायचा. असो; तर याप्रमाणें चांगले गुणदोषविवेचक असले ह्मणजे एकंदर लोकांचें त्यापासून केवढें हित होतें. हें एक झालें ह्मणजे याच्या पोटीं दुसऱ्याही अनेक गोष्टी आल्या. चांगले ग्रंथकार निवडले गेले ह्मणजे तशांसच उत्तेजन मिळून त्यांच्या हातून उत्तरोत्तर भाषेची सुधारणा होत जाते. ते तिचें व्याकरण नीट बसवून तिजमधील अव्यवस्था मोडून टाकतात, आणि शेंकडों नवे शब्द व नवे प्रयोग वगैरे प्रचारांत आणून तिची अभिवृद्धि करतात. याप्रमाणें तिच्या ऊर्जित दशेस एकदां आरंभ झाला ह्मणजे कविजनपरंपरेच्या प्रसादानें तिजवर अधिकाधिक कळा येऊं लागून कांहीं काळानें अभियुक्त भाषांच्या वर्गांत मोडूं लागण्याची तिचे ठायीं योग्यता येते. ही योग्यता आली असतां ती भाषा लोकांत ज्ञानाचा प्रसार होण्यास केवढी साधनीभूत होते, व हा प्रसार देशाच्या वैभवाचें केवढें कारण आहे वगैरे गोष्टी सर्व विचारी मनुष्यांस पूर्णपणें माहीत आहेतच. असो; सरतेशेवटीं हाही एक मोठा नफा सांगितला पाहिजे कीं, निःपक्षपात व सहृदय असे ग्रंथांचे परीक्षक असले ह्मणजे बुद्धिमान् मनुष्यांस एरवींच्या साधारण लोकांप्रमाणें मूर्ख व दुष्ट अशा धनिकांचें आर्जव करण्याची किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुढें पुढें करून पदरीं लघुत्व घेण्याची बिलकुल गरज राहत नाहीं. तर त्यांच्या बुद्धिमत्त्वास अत्यंत अनुकूळ, उचित आणि शोभादायक जी निःस्पृहता व स्वतंत्रता ती खुशाल मिरवायास सांपडते.[१]

---

१. ही उत्कृष्ट सोय छापखाने निघाल्यापासून ग्रंथकारांस अनुकूळ झाली आहे. इंग्लंडांत हिच्या योगानें संपत्तिमान् होऊन पुनः स्वतंत्र राहिलेला पहिला कवि पोप होय. यास होमरच्या महाकाव्याच्या भाषांतरानें पन्नास हजारांवर रुपये मिळून वतनवाडी बागबगीचा अशा थाटांत राहतां आलें. त्यानें ह्मटलें आहे—

**And thanks to Homer, since I live and thrive,**
**Indebted to no prince or peer alive!**

याप्रमाणें सर् वाल्टर् स्कॉट् यास पंधरा लाख रुपयांची व्यापारांत ठोकर लागली असतां आपल्या कादंबऱ्यांनीं वगैरे ती त्यानं पैसान्पैसा फेडून टाकली ही गोष्ट सवप्रसिद्ध आहेच. आपल्या महाराणीजवळचे राजकवि टेनिसन् यांचीही प्राप्ति अशीच आहे. वर्षा दान वर्षांनीं एकादें काव्य रचावें की तीन चार लाखांची बेगमी!

# 'टॅंपेस्ट्' नाटक.

करबदरसदृशमाखिलं भुवनतलं यत्प्रसादतः कवयः।
पश्यन्ति सूक्ष्ममतयः सा जयति सरस्वती देवी।[1] सुबन्धुकृत वासवदत्ता.

अंक २२—'टॅंपेस्ट्' नाटकावर अभिप्राय.

हें पुस्तक रा. रा. नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं नुकतेंच छापवून कांहीं दिवसांपूर्वीं आमच्याकडे त्याची एक प्रत मेहेरबानीनें पाठवून दिली. तिचा आभारपूर्वक स्वीकार करून सदहूं ग्रंथाबद्दल चार शब्द लिहिण्यासारखे आहेत ते येथें लिहितों.

प्रस्तुत नाटकाचे कर्ते आमच्या वाचकांच्या माहितींतले नाहींतसें नाहीं. आमच्या मालेच्या आठव्या अंकांत* हिंदुस्थानाच्या व विशेषतः महाराष्ट्रदेशाच्या, इतिहासाविषयीं लिहितांना वरील ग्रंथकाराच्या एक दोन लेखांचा निर्देश केला असून त्यांतील एकाचा तर त्यांत पुष्कळच उपयोग झाला आहे. तसेंच वरील निबंधांतील एके टिपेंत† रा. कीर्तने यांच्या मराठी लिहिण्याची तारीफ केली आहे तीही आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. असो; आतां प्रस्तुतच्या प्रसंगीं वरील प्रशंसेचें यथार्थत्व विशेष पूर्णपणें आमच्या वाचकांच्या लक्षांत आणून देण्याचा योग फार चांगला आहे हें पाहून आह्मांस मोठा संतोष वाटतो.

'टॅंपेस्ट्' ह्मणजे 'वादळ' हें नाटक शेक्सपीयर कवीच्या नाटकांत उत्तम ह्मणून जीं निवडलीं आहेत त्यांपैकीं एक होय. याचा शेवट 'आथेलो' वगैरे नाटकांसारखा दुःखाचा न होतां संस्कृत नाटकांप्रमाणें गोड झाला आहे. यांतील मुख्य पात्र प्रॉस्पेरो, हा मांत्रिक आहे; आणि याच्या आज्ञेंत वागणारीं भुतें व पिशाचें यांच्या खेळांनीं हें भरलें आहे. यांतील स्थळ एक निर्जन बेट असून वरच्या भूतपिशाचादिकांखेरीज यांतील दुसरीं पात्रें ह्मटलीं ह्मणजे पूर्वोक्त मांत्रिक आणि त्याची एकुलती एक आवडती कन्या, मिरांदा, हीं होत. यावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, प्रस्तुत नाटकांतील विषय सामान्य नाटकांप्रमाणें लौकिक वृत्तांचा नाहीं. तो याच कवीच्या 'मिड्समर् नैटस् ड्रीम्' ('ऐन उन्हाळ्याच्या रात्रीं पडलेलें स्वप्न') या नांवाच्या नाटकाप्रमाणें, किंवा आमच्या कालिदासाच्या 'शाकुंतल' व 'विक्रमोर्वशी' या जगत्प्रसिद्ध नाटकांसारखा केवळ कल्पनामय आहे. असो; शिवाय या नाटकांत मिल्टन् कवीच्या 'प्याराडैज लॉस्ट्' नामक महाकाव्याप्रमाणें, व वरील 'शाकुंतल' नाटकाप्रमाणें, शृंगाराचा एक मोठा मौजेचा प्रकार आहे. तो असा कीं, 'प्याराडैज लॉस्ट्' यांत पृथ्वीवर प्रथम निर्माण केलेल्या जोड्याचें परस्पराविषयक अकृत्रिम प्रेम जसें

---

१. "जिच्या प्रसादेंकरून सूक्ष्ममति होत्साते कवि अवघ्या भुवनतलास हातावरील बोराप्रमाणें पाहतात ती सरस्वती देवी सर्वांस वंद्य होय!"

* पृष्ठ ८६ व टीप, पृष्ठ ९० पहिल्या चार ओळी, पृष्ठ ९२ ओळी १७–१८ पाहा.
'सम्पादक'

† पृष्ठ ९३ पाहा.
'सम्पादक'

वर्णिलें आहे, व विशेषतः आडम् यास ईव्हच्या प्रथम-दर्शनानें झालेल्या हृदयविकारांचें जसें वर्णन केलें आहे, तसेंच 'शाकुंतलां'त वनांतील लतेप्रमाणें कण्वाच्या आश्रमांत वाढलेली जी नायिका तिची दुष्यंत राजाशीं अकस्मात् गांठ पडली असतां पूर्वी कधींही न अनुभवलेल्या अशा चमत्कारिक वृत्तीचा जो तिचे ठायीं एकदम उद्भव झाला त्याची जशी काय हुबेहुब तजबीर उठवून देऊन कालिदासानें मनुष्यस्वभावाची पुरी माहीतगारी व अप्रतिम कवित्वशक्ति जशी प्रकट केली आहे, तसाच प्रकार प्रकृत नाटकांत आहे. यांतील नायिका मिरांदा ही शकुंतलेप्रमाणेंच अगदीं लहानपणापासून वरील बेटांत वाढली असून तिच्याशीं पुढें लग्न झालेला जो राजपुत्र फर्दिनांद त्याच्या पूर्वी आपल्या बापाखेरीज तिनें कोणीही पुरुष पाहिला नव्हता. यास्तव आपल्याशीं समवयस्क व सुस्वरूप अशा वरील राजपुत्रास पाहतांच आश्चर्य, प्रेमभाव, व त्याहून विशेष खोल अशी दुसरीच एक अननुभूतपूर्व अशी नाजूक मनोवृत्ति, या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून तिच्या हृदयांत प्रादुर्भाव झाला. असो; तर 'टेंपेस्ट्' नाटकांतील मुख्य बहार ही आहे. याशिवाय राजेरजवाडे, राजदरबारी लोक, नाविक, भुतेंखेतें, या साऱ्या भिन्न भिन्न पात्रांची ज्यास त्यास शोभतशीं जीं भाषणें घातलीं आहेत त्यांवरूनही प्रस्तुत कवीची अपूर्व बुद्धि लक्षांत येते.

येथवर खुद्द मूळ नाटकाविषयींच झालें. आतां सदर्हू ग्रंथाचें सौरस्य आपल्या महाराष्ट्रभाषेनें एतद्देशीय वाचकांस सुलभ करून देण्याचा जो रा. कीर्तने यांनीं प्रयत्न केला आहे त्यांत त्यांस कितपत यश आलें आहे याविषयीं विचार करूं.

प्रस्तुत नाटक मूळ इंग्रेजींतून आह्मीं अद्याप समग्र वाचलें नाहीं. आलीकडील प्रसिद्ध ग्रंथकार चार्लस् ल्यांब् यानें शेक्सपियरच्या ऐतिहासिक खेरीज करून बाकीच्या बहुतेक नाटकांचीं संविधानकें कथारूपानें जीं रचलीं आहेत त्यांवरून वरील नाटकांतील कथासूत्र मात्र आह्मांस माहीत होतें. तेव्हां टीकाविषयक ग्रंथ आह्मीं प्रथमतः जो वाचला तो केवळ वरील कथासूत्राच्या अनुसंधानानें. पण असें असतांही प्रकृत भाषांतर आह्मांस मुळींच दुर्बोध वाटलें नाहीं इतकेंच नव्हे, तर बहुतेक भागीं अत्यंत रमणीयही वाटलें. यावरून प्रस्तुत भाषांतर कसें उतरलें आहे याविषयीं निराळी तारीफ करणें नको. इंग्रेजी व मराठी या भाषा परस्परांहून इतक्या भिन्न असतां, व त्यांतून पाश्चात्य कवींच्या कल्पना, विचार वगैरे तर इकडच्याहून फारच निराळे असतां, दुर्बोध व नीरस न होतां सरासरी बरेंच चित्तरंजन होई इतपत जरी कोणत्याही भाषेंत कोणत्याही ग्रंथाचें, व विशेषतः काव्यनाटकादिकांचें, भाषांतर उतरलें, तरी त्याच्या कर्त्याचें कौशल्य थोडें ह्मणतां येत नाहीं! हा प्रकार प्रस्तुत नाटकांत पुष्कळ दृष्टीस पडतो. युरोपांतील रीतभात, भाषा, मनोव्यापार, हीं येथल्यापेक्षां फारच निराळीं पडलीं; तेव्हां तिकडील काव्यनाटकादिकांचें यथास्थित रूपांतर इकडच्या भाषांतून होणें हें वस्तुगत्याच अशक्य होय; तें पुरतेपणीं तर साधायाचेंच नाहीं. पण जेथपर्यंत वरील प्रकार शक्य होय तेथपर्यंत मूळच्यांतील रस मराठींत उतरतांना भाषांतरकर्त्यानें यत्किंचितही कसर केली नाहीं असें आह्मांस वाटतें. प्रॉस्परोच्या प्रौढ व रसाळ भाषणापासून व मिरांदेच्या लडिवाळपणाच्या आणि कोमलतेच्या बोलण्यापासून तों क्यालिबनूचें

अभद्र व कुत्सित भाषण आणि जहाजावरील मोकद्दमाचें थाडदांड व उद्धटपणाचें बोलणें, यांपर्यंत सर्व अगदीं यथास्थित साधलें आहे. तसेंच त्या त्या मनोवृत्तींचा व्यंजक जो जो भाषणप्रकार तोही भाषांतरकर्त्यानें यथापात्र शुद्ध मराठी रीतीचा योजला आहे. सारांश, शेक्सपीयरच्या मूळ नाटकाची प्रस्तुत भाषांतरावरून रसिक व अभिज्ञ अशा मराठी वाचकांस सुद्धां बरीच कल्पना होईल असें आह्मांस वाटतें.

पण वरील वाचकांपेक्षां इंग्रेजी कवितेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस व शुद्ध आणि सरस भाषांतर करण्याची कला शिकणारांस तर सांप्रत पुस्तक फारच उपयोगाचें आहे. आमच्या मराठींत भाषेच्या सरणीस अगदीं यथास्थित उतरलेलीं भाषांतरें अगोदर थोडीं; त्यांतून कॉलेजाचें वारें लागून गर्वानें ताठलेल्या व इंग्रेजीचा तोरा मिरवणाऱ्या आमच्या नव्या मंडळींत तर वरील उदाहरण शपथेसही सांपडायाचें नाहीं. मराठी पुस्तकांचें अवलोकन ज्यांस उभ्या वर्षांतही घडत नसेल, तसेंच सगळ्या अहोरात्रांत साधारण व्यवहाराखेरीज मराठी बोलण्याचाही ज्यांस थोडाच प्रसंग, पत्रव्यवहार, सभेंत बोलणें वगैरेही सर्व ज्यांचें हरहंमेश इंग्रेजींत चालायाचें, अशा आमच्या नवीन विद्वानांस चार शब्दही बोलणें किंवा लिहिणें झाल्यास गेल्या फेब्रुवारीच्या अंकांतील *मरे आणि लांन्मन् यांच्या 'साखरावगुंठित गोळी'सारखा प्रकार होत असेल यांत नवल कसचें ? असो; पण लिहिण्यास आनंद वाटतो कीं आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते हे इंग्रेजींत पुरे वाकबगार असतां यांच्या लेखांत वरील लज्जास्पद दूषणाचा प्रकार आढळलाच तर फार क्वचित् आढळेल. यांची लिहिण्याची एकंदर पद्धति अत्यंत शुद्ध व मराठी चालीची असून शिवाय मार्मिक व चित्तवेधकही असते. प्रस्तुत भाषांतरांतच पाहा बरें, प्रत्येक पात्राचें ज्याचें त्यास शोभेसें भाषण कसें खुबीनें उतरून दिलें आहे तें ! पहिले दोन प्रवेशच घ्या. पहिल्यांत जहाजावर झालेली तारंबळ व आकांत, आणि नावाड्यांची आणि मोकद्दमाची एकच होऊन राहिलेली गर्दी, हीं किती हुबेहूब मराठींत साधलीं आहेत ! वरील प्रवेश वाचणाऱ्या वाचकांस भूमध्यसमुद्राची व युरोपियन् खलाशांची बिलकुल आठवण न होतां वरील प्रसंग एतद्देशीय लोकांवरंच कोठें तरी गुदरला आहे असें वाटेल. तसेंच पुढील प्रवेशांत बापाचें व लेकीचें जें

* १८७५ फेब्रुवारीच्या म्हणजे चवदाव्या अंकांत 'रसातळची मराठी भाषा' या मथळ्याखालीं न्यूयॉर्क (अमेरिका) येथें मरे व लान्मन् यांनीं आपल्या औषधाच्या वगैरे प्रसिद्धीकरतां एक जाहिरातवजा चोपडें 'लोकांसाठीं मनोरम वार्ता' या नावानें छापून काढलें होतें. त्यावर टीकात्मक असा शास्त्रीबुवांचा एक दहा पानांचा विनोदी लेख आला आहे. पुस्तकाचें वर्णन ग्रंथकर्त्यांनींच मुखपृष्ठावर "यांनीं शरीरसंपत्तीचें रक्षण कसें करावें व आपले जीव कसें लांबवून मोठी वृद्धावस्था संपादावी यांसंबंधीं येथें दाखविलें आहे." अशा घेडगुजरी भाषेंत केलें आहे. शिवाय आंतील मजकुरांतहि 'साखरावगुंठित गोळ्या' 'पराकाष्ठा झाला' 'अर्धापाणीभर पेल्यांत' 'मिस्टलच्या सासांपरिला हें दीपक रूपांतरकारक पथ्योदक सर्व ऋतुगण व सर्व देश यांत उपयोगी पडतो.' 'मरे आणि लानमन यांचें फ्लोरिडाचें पाणी कायचें ! असा दूर देशांपासून चहुंकडून आम्हांस प्रश्न घालतात ! !' अशा मराठीच्या हास्यास्पद प्रकारांची रेलचेल आहे त्याबद्दल शास्त्रीबुवांनीं थट्टा उडविली आहे. सदर लेख या आवृत्तांत छापलेला नाहीं.

'सम्पादक'

संभाषण दाखल केलें आहे तें तरी इकडच्या सारखेंच दिसण्यासारखें किती उत्तम साधलें आहे! 'बाळमित्रां'तील मैनेची धनीण मनी हिचा मूळचा इंग्रेजी झगा काढून त्या चतुर भाषांतरकर्त्यानें तीस इकडचा वेष असा अगदीं पूर्णपणें देऊन तिची मूळची ओळखही वाचकांस पडूं नये असें केलें आहे, त्याचप्रमाणें सांप्रत रसिक भाषांतरकारानें मिरांदेस अगदीं नवी करून टाकली आहे. आह्मांस खास वाटतें कीं, प्रवेशारंभींचें वादळाचें थोडेंसें वर्णन व पुढें आपल्या आजीबाईविषयीं मिरांदेनें झोंकून दिलेला उद्गार,[1] या दोहोंखेरीज करून बाकीचें तिचें सर्व बोलणें येथील एखाद्या कुलीन सरदाराच्या मुलीस पुरतेपणीं शोभण्यासारखें आहे! असो; तेव्हां एकंदरींत इंग्रेजीचें मराठींत रूपांतर कसें करावें हें ज्यास शिकणें असेल त्यास सांप्रत 'टेंपेस्ट्' नाटक चांगला नमुना होय.

असो; याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथाचें सामान्यत: निरूपण केलें, व यापासून वाचकांस काय उपयोग होईल तोही सांगितला. आतां सरतेशेवटीं एका गोष्टीविषयीं मात्र थोडेंसें लिहिणें अवश्य वाटतें. ती ही कीं, वर जी आह्मी या नाटकाची तारीफ केली आहे, तीवरून हें मराठींतील एखाद्या नाटकाप्रमाणें किंवा कादंबरीसारखें सर्वांस सारखेंच मनोरंजक होईल असें कोणी समजूं नये. आमच्या मराठी वाचकांस अद्याप ह्मणण्यासारखी कांहींच रसिकता आलेली नाहीं.[1] तेव्हां एखाद्या ग्रंथाच्या बरेवाईटपणाबद्दल सहसा अभिप्राय देण्याचें किंवा तो आपल्या मनाशीं ठरवून ठेवण्याचें त्यांनीं पतकरूं नये. शिवाय प्रस्तुत नाटक परभाषेंतलें व परराष्ट्राचें असल्यामुळें त्याचें यथास्थित भाषांतर आपल्या भाषेंत होणें फार कठिण असून मूळच्यांतला रस सर्वथैव उतरणें तर केवळ अशक्यच होय हेंही त्यांनीं लक्षांत ठेवावें. मागें बाराव्या अंकांत याविषयीं बरेंच विवरण केलें असून 'आथेल्लो' नाटकांतील जे दोन तीन प्रसिद्ध उतारे तेथें घेतले आहेत त्यांवरून प्रकृत सिद्धांताचा वाचकांस प्रत्यय येऊन चुकला

१. पृष्ठ १४. असलीं चावटगेरीचीं बोलणीं शेक्सपीअरच्या नाटकांत व काव्यांत भरपूर आहेत. प्रस्तुत नाटकांतच तीं फार थोडीं आहेत असें ह्मटलें पाहिजे. वरच्यासारखें दुसरें उदाहरण चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत मात्र आहे. 'आथेल्लो' नाटकांत तर कांहीं विचारूंच नये. असो; मिरांदेचें वरील बोलणें नायिकेच्या शालीनतेस अत्यंत विघातक असून शिवाय स्वाभाववर्णनासही अगदीं विरुद्ध होय. कां कीं, जी केवळ निर्जन बेटांत जन्मली असून नायकाचें प्रथम दर्शन होतां त्यास सुंदर पिशाच्च समजली, तिला स्त्रीपुरुषसमागमाची आणि त्यांतून व्यभिचाराची, कल्पना व्हावी हें अगदींच संभवत नाहीं! तशांत असली अप्रयोजक कल्पना आपल्या आजीच्या-संबंधानें करून ती खुशाल मौजेनें झोंकून द्यावी हें इंग्लिश् लोकांच्या आचारास व सभ्यतेस मात्र शोभेसें आहे!!

१. वरील स्पष्टपणाची उक्ति प्रस्तुत पुस्तकांत कदाचित् कृतघ्नत्वदोषास पात्र होईल. पण वास्तविक जी स्थिति दृष्टीस पडत आहे ती सांगितल्यावांचून राहवत नाहीं. नवव्या अंकांत वगैरे कोठें कोठें प्रस्तुत विषयावर कांहीं उल्लेख आहेतच; पण येथें आणखी एक ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण सांगण्याजोगें आहे. 'माधवराव,' 'जयपाळ,' 'पद्यरत्नावलि' इत्यादि ग्रंथांची ह्मणण्यासारखी कांहींच चहा नसून 'मंजुघोषे'च्या तीन तीन चार चार आवृत्ति निघून मोठ्या झपाट्यानें त्यांचा खप चालू आहे.

असेलच. तर तोच दुर्बोधत्वाचा व रसापकर्षाचा प्रकार प्रस्तुत नाटकांतही कोठें कोठें सांपडेल. पण त्याबद्दल अभिज्ञ वाचक भाषांतर करणारावर टपका ठेवणार नाहींत. मुळांतील रस भाषांतरांत न उतरल्याबद्दल दोष न देतां जितका उतरला आहे तितक्याबद्दलच भाषांतरकर्त्याची तारीफ करणें अशा प्रसंगीं उचित होय; कां कीं, जी निरुपायाची गोष्ट ती न करतां आल्याबद्दल कोणी दोषास पात्र होत नाहीं. दुसरें असें कीं, भाषांतराचा प्रकार आपल्या भाषेंत अगदीं नवाच झालेला आहे. दहा वर्षांमागें 'आथेल्लो'चें भाषांतर झालें; त्यावर दुसरें हटलें म्हणजे हेंच. तेव्हां हा मार्ग आपल्या ग्रंथकारांस अद्याप अगदीं अपरिचित असल्यामुळें प्रस्तुतसारख्या ग्रंथांकडे विशेष करडी नजर करणें बरोबर नाहीं. हा प्रघात असाच पुढें चालला असतां असले ग्रंथ पुढें किती चांगले होतील, किंवा प्रस्तुत भाषांतरकारासारख्यांसच या कामांत आणखी घटवल्यानें कितपत ज्यास्त यश येईल, याची आज कांहीं कल्पना करतां येत नाहीं. यास्तव प्रस्तुत ग्रंथाची कल्पना जी करायाची ती त्याची त्याजवरूनच केली पाहिजे. ती तशी केली असतां आमच्या वरील अभिप्रायाप्रमाणेंच बहुधां सर्वांचा पडेल असें आम्हांस वाटतें. असो; शिवाय प्रकृत नाटकाच्या संबंधानें तिसरी हीही गोष्ट लक्षांत आणावयास पाहिजे, कीं हें भाषांतर मुख्यत: विद्यार्थ्यांकरतां तयार केलेलें आहे. एरवींच्या वाचकांच्या मनोरंजनार्थ जर पुस्तककर्त्याचा हा प्रयत्न असतां, तर सध्यांपेक्षां ज्यास्त खबरदारी घेणें त्यास कदाचित् जरूर वाटलें असतें.

आतां वरील ग्रंथांत जे कित्येक दोष किंवा न्यूनता आहेत त्या सांगून हा लेख आटपतों. इंग्रेजी तऱ्हेचें लिहिणें न येण्याबद्दल जरी ग्रंथकर्त्यानें आपणाकडून पुष्कळ खबरदारी ठेवली आहे, तरी कित्येक ठिकाणीं तसा प्रकार अद्याप राहिला आहे. याचीं उदाहरणें येथें देण्याची गरज नाहीं. मार्मिक वाचणाराच्या तीं स्थलें सहज लक्षांत येणारीं आहेत. आतां त्यांपैकीं कांहीं निरुपायास्तव राहून कोणाच्यानेंही तीं न निघण्यासारखीं कदाचित् असतील व त्यांबद्दल भाषांतर करणाराच्या भाषाशुद्धतेवरही विशेष टपका ठेववणार नाहीं हें खरें. कारण भाषांतर करतांना एरवींप्रमाणें ग्रंथकारास स्वातंत्र्य नसतें. असो; दुसरा दोष असा कीं, कांहीं ठिकाणीं वाक्यें लांब लांब होऊन त्यांची गुंतागुंत झाली असल्यामुळें प्रथमतः सर्वांस, व विशेषत: इंग्रेजी न समजणारांस तर तीं विशेषच दुर्बोध होतील. हा दोष विद्यार्थ्यांकरतां प्रस्तुत पुस्तक रचण्याचा जो हेतु ग्रंथकर्त्यानें मनांत धारण केला त्यामुळें बराच उत्पन्न झाला असावा असें वाटतें. तसेंच कांहीं ठिकाणीं टिपांची जरूर असून त्या नसल्यामुळें, व इकडील लोकांस अत्यंत अपरिचित अशा गोष्टींच्या व कल्पनांच्या संबंधानेंही प्रस्तुत दोष कांहींसा आला आहे. शिवाय संस्कृताच्या अपरिचयास्तव भाषांतरकर्त्याच्या हातून कोठें कोठें अशुद्ध प्रयोगही पडले आहेत ते मराठी वाचकांच्या लक्षांत येण्यासारखे जरी नाहींत, तरी ग्रंथास दूषणरूप होत.

असो; याप्रमाणें प्रस्तुत नाटकाचें गुणदोषविवेचन झालें. एकंदरींत हा ग्रंथ महाराष्ट्रभाषेंत आजपर्यंत झालेल्या उत्कृष्ट ग्रंथांत गणण्यासारखा होय. भाषांतरकर्त्यानें सदरील पुस्तकाच्या प्रस्तावनेंत जरी आपली संशयवृत्ति प्रगट केली आहे तरी यापूर्वीं झालेल्या

'आथेल्लो' नाटकाच्या जोडीला यास बसवण्यास आह्मांस कांहीं हरकत दिसत नाहीं. दोहोंचीही योग्यता भाषांतर व एरवीं वाचण्याचा ग्रंथ या दोन्ही संबंधानें मोठी आहे. अशा ग्रंथांचा देशास अनेक प्रकारांनीं मोठा उपयोग होणारा आहे. एक तर इंग्रेजींतला अति विख्यात ग्रंथकारांच्या गुणांचें साधारण लोकांस येणेंकरून ज्ञान होईल; आणि दुसरें असें कीं, इंग्रेजी व मराठी या अत्यंत विप्रकृष्ट भाषांमधील मार्ग प्रस्तुतसारख्या भाषांतरांनीं उत्तरोत्तर आधिकाधिक सुगम होत गेला असतां आपल्या भाषेच्या अभिवृद्धीची मोठी सोय होणार आहे. इंग्लिश् वगैरे उत्तम अवस्थेस पोंचलेल्या भाषांतल्याप्रमाणें आमच्या मराठींत मूळचे स्वतंत्र ग्रंथ होण्यापेक्षां वरील भाषांत असणाऱ्या ग्रंथांचें आमच्या भाषेंत रूपांतर होण्याची शक्यता अधिक आहे. तेव्हां एतद्देशीय भाषांतून ग्रंथसमृद्धि करतां येण्याचा हा जो दुसरा सुगमतर मार्ग तो जितका सोपा होईल तितकें देशभाषेचें व तद्द्वारा लोकांचें अधिक हित आहे.

सरतेशेवटीं सांप्रत ग्रंथाच्या बाह्य स्वरूपाविषयींही थोडेंसें लिहिणें इष्ट वाटतें. 'छापणी सुरेख', 'बांधणी मनोवेधक', 'कागद जाड' हीं स्वतः जरी केवळ क्षुल्लक होत; व प्रिंटर् साहेबांची, बैंडर्बुवांची तारीफ करणें हा ग्रंथावरील टीकेचा अवश्य भाग होय असें जरी आह्मी बिलकुल समजत नाहीं; तरी जेथें अंतर्बाह्य अशा दोहों प्रकारच्या रमणीयत्वाचा संयोग होतो तेथें दुसऱ्यासही योग्यता येऊन त्याविषयीं केवळ उदासीन असणें हें संभवत नाहीं. उघडच आहे कीं नुसत्या पात्रास जरी स्वतःसिद्ध फारशी योग्यता नाहीं, तरी उत्तम अन्नाचा व उत्तम पात्राचा योग आला असतां तो परस्परांस शोभावह होतो! तर याच न्यायानें सदरील पुस्तकाच्या सुरेख व स्वच्छ छापणीची आणि लहान टुमदार अशा बांधणीचीही येथें तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं.

---

# वेदार्थयत्न.

यस्य निश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत्।
निर्ममे तमहं वन्दे विद्यातीर्थमहेश्वरम्॥[1]

अंक ३१—(१)प्रस्तुत अंकाचा विषय. (२) प्राचीन विद्येचें उज्जीवन. (३) वेदग्रंथांच्या अभ्यासाचें महत्त्व व उपयोग. (४) अन्यदेशीय लोकांच्या संबंधानें. (५) आपल्या संबंधानें. (६) वेदांतील विषय. (७) वेदांचा काळ, (८) प्रस्तुत भाषांतर. (९) त्यांतील विषयसंग्रह. (१०) न्यूनता व दोष. (११) भाषेच्या संबंधाचे (१२) अर्थाच्या संबंधाचे. (१३) उपसंहार.

---

१. "सकल विद्यांचें आदिस्थानभूत जो परमेश्वर, कीं ज्याच्या निश्वासमात्रेंकरून वेद निर्माण झाले, आणि ज्यानें वेदांपासून सर्व जग उत्पन्न केलें, त्यास मी नमन करतों."

१. सदरील पुस्तकाचा तिसरा अंक त्याच्या प्रकाशकांनीं आमच्याकडे पाठवल्यास आज बरेच दिवस झाले. या खेपेस चालीप्रमाणें वरील अंकाचा आभारपूर्वक स्वीकार करून एकंदर पुस्तकाविषयीं आमचा अभिप्राय प्रगट करतों.

२. आलीकडे या भरत खंडांतील प्राचीन विद्यांचें पुनरुज्जीवन करण्याविषयीं लोकांचा उद्योग दिवसांदिवस वाढत चालला आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. युनिवर्सिटी स्थापन होऊन तिनें संस्कृताच्या अभ्यासास उत्तेजन दिल्यापासून आज दहा पंधरा वर्षे त्या भाषेचें ज्ञान आपल्या लोकांत बरेंच प्रसार पावत चाललें आहे, व त्याच्या योगानें देशभाषेचीही बरीच सुधारणा होऊं लागली आहे. या सालीच पाहिलें तर वरील उद्योग तीन चार भिन्न भिन्न रूपांनीं प्रगट झाला हें आमच्या वाचकांस बहुधां माहीत असेलच. एक तर प्रस्तुत 'वेदार्थयत्न'; दुसरा उद्योग इंग्रेजी पद्धतीप्रमाणें प्राचीन संस्कृत कवींचा वृत्तांत व त्यांच्या कवित्वाचें विवरण या रूपानें त्यांविषयीं केलेलें विवेचन होय; हे दोन्ही उद्योग सध्यां चालू असून त्यांचें फळही लोकांस दृष्टीस पडूं लागलें आहे. दुसऱ्या दोहोंची अद्याप तशी स्थिति न आल्यामुळें ते सुरू आहेत किंवा नाहीं याविषयीं संशय वाटतो. हे उद्योग एक आपल्या पुरातन वैद्यकाच्या संबंधानें व दुसरा जुन्या शास्त्रविद्येच्या संबंधानें असे होत. पहिला मुंबईच्या कांहीं प्रसिद्ध नेटिव डाक्तरांनीं हातीं घेतलेला आहे; व दुसऱ्याच्या प्रीत्यर्थ येथील कांहीं बड्या व कांहीं किरकोळ विद्वानांनीं कंबर बांधली आहे. असो; हे शेवटले उद्योग पहिल्या दोहोंसारखे यशालाभास येऊन वर जो त्यांविषयीं वर्तमानकालानें उल्लेख केला आहे तो भूतकालीं करण्याची पाळी न येवो म्हणजे झालें.

३. आतां प्रस्तुत पुस्तकाविषयीं साक्षात् विवेचन करण्यापूर्वी त्यांतील विषयावर कित्येक विचार सामान्यतः सुचण्यासारखें आहेत ते येथें दाखल करतों. ते येणेंप्रमाणें. पहिल्यानें प्रस्तुत विषयाचें महत्त्व व उपयोग हीं दोन प्रकारचीं आहेत; एक साऱ्या पृथ्वीच्या संबंधानें व दुसरें आपल्या एकट्या देशाच्याच संबंधानें. आतां दोहोंविषयीं अनुक्रमेंकरून लिहूं.

४. वेदग्रंथांचें साऱ्या जगास कोणतें महत्त्व आहे व त्यांच्या अध्ययनापासून कोणता उपयोग आहे हें आलीकडे सर्वांस माहीत होत चाललें आहे. याचें प्रमाण प्रत्येक सुधारलेल्या देशांत संस्कृतास व त्यांतून वरील ग्रंथास जो आदरपूर्वक मान प्राप्त झाला आहे तो होय. सर्व देशांतील संस्कृतज्ञांची दिवसांदिवस खात्री होत चालली आहे कीं, वेदांच्या बरोबरीचा जुना लेख पृथ्वीवर कोठेंही नाहीं. युरोपांत अत्यंत प्राचीन मानलेलीं जीं ग्रीक् व रोमन् हीं राष्ट्रें त्यांहून, किंबहुना त्यांसही पूज्य होऊन गेलेलें असें ¶मिसर देशचें जुनें राष्ट्र, त्याहूनही येथील लोक पुरातन होत.[1] तेव्हां इतक्या प्राचीन राष्ट्राचा जो अत्यंत

¶ इजिप्त. 'सम्पादक'

१. "Ere yet the Pyramids looked down upon the valley of the Nile—when Greece and Italy, those cradles of modern civilization,

[पुढें चालू]

प्राचीन ग्रंथ, कीं ज्यास ते ' अनादि ' ही संज्ञा देतात, तो प्रत्येक जिज्ञासु मनुष्याच्या अत्यंत आदरास पात्र होईल यांत नवल कसचें ? उगाच शंभर दोनशें वर्षांची जुनी एकादी अपूर्व वस्तु पाहिली असतां केवढी मौज वाटते व जिज्ञासा जागृत होऊन तिच्या तृप्तीविषयीं केवढी प्रबळ इच्छा उत्पन्न होते ! मग मानवी जातीच्या आद्य स्थितीचें स्वरूप ज्यांत दृष्टीस पडतें, ज्यांत चार हजार वर्षांपूर्वींचीं मनुष्यें कशीं बोलत होतीं, कशीं वागत होतीं, त्यांचे मनोव्यापार कसे होते, निरनिराळ्या विषयांवर मतें कशीं होतीं, वगैरे गोष्टींची माहिती ज्यावरून व्हावी असा अत्यंत विश्वसनीय लेख जर सांपडला, तर शोधक व जिज्ञासु जनांस केवढा मनोवेधक विषय होईल ! इतिहास खरा ह्मटला ह्मणजे मनुष्यजातीच्या मनोव्यापारांचें शाश्वत स्वरूप कोणतें व प्रसंगानुरोधानें त्यांवर कसकशीं कार्यें घडतात याचें ज्यांत उद्घाटन केलें आहे असा लेख होय. मग वरील ज्ञान होण्यास वेदासारखा ग्रंथ हर किती साधनीभूत होय ! कां कीं तो अत्यंत प्राचीन असल्यामुळें मनुष्य स्वभावाचें अगदीं साधें व मूळचें रूप त्यांत जसें सांपडेल तसें पुढील काळच्या ग्रंथांत सांपडणार नाहीं. असो; तर एतद्देशीयांखेरीज बाकीच्या सर्व लोकांस वेदग्रंथांच्या ज्ञानापासून वरील एक मोठा उपयोग आहे. तसाच दुसरा उपयोग भाषाज्ञानाच्या संबंधानें आहे हेंही सर्वत्र प्रसिद्धच आहे.[१]

---

housed only the tenants of the wilderness, India was the seat of wealth and grandeur. A busy population had covered the land with marks of its industry; rich crops of the most coveted productions of Nature annually rewarded the toil of the husbandman; skilful artizans converted the rude produce of the soil into fabrics of unrivalled delicacy and beauty, and architects and sculptors joined in contributing works, the solidity of which has not in some instances been overcome by the revolution of thousands of years. The princes and nobles of India, unlike the wandering chieftains of the neighbouring countries, already dwelt in splendid palaces, and clothed in the gorgeous products of its looms, and glittering with gold and gems, indulged a corresponding luxury in every act and habit of their lives. Poets were not wanting to celebrate the exploits of their ancestors, nor philosophers to tread the mazes of metaphysical inquiry, and weave the net of ingenious speculation, with as much subtlety, and perhaps with not less success than has attended the researches of subsequent inquirers."

*Thornton's History of India.*

१. 'शाकुंतल' नाटकाचें भाषांतर युरोपांत प्रसिद्ध होतांच तिकडील पंडितांस संस्कृत भाषेच्या अध्ययनापासून होणारें कोणकोणतें काम तेव्हांच लक्षांत आलें हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल—

——"At the same time the attention of the historian, the philo-

[ पुढें चालू ]

५. आतां आपणांसच खुद्द वरील ग्रंथाच्या अध्ययनापासून कोणकोणते लाभ आहेत हें पाहिलें तर ते वरच्याहूनही अधिक आहेत हें सहज लक्षांत येईल. याविषयीं प्रस्तुत भाषांतरकारांनीं प्रस्तावनेंत उगीच थोडा निर्देश प्रथमारंभीं केला आहे. वास्तविक म्हटलें असतां येवढ्या थोरल्या व महत्त्वाच्या ग्रंथास त्याच्या योग्यतेप्रमाणें चांगली एक मोठी प्रस्तावना हवी होती. 'वेदांचें' भाषांतर म्हणजे 'पंचोपाख्यानाचें'¶ किंवा एकाद्या गणित ग्रंथाचें भाषांतर नव्हे. जो ग्रंथ आज शेंकडों पिढ्या पितृपुत्रपरंपरेनें पठन करून येथील लोकांनीं जिवापलीकडे रक्षण करून ठेवला, ज्यास साक्षात् ईश्वरप्रणीत मानून मुक्तीचें द्वार म्हणून लोक समजतात, ज्याचा अर्थ मोठमोठ्या पंडितांसही दुर्गम म्हणून प्रसिद्धि आहे, ज्यांत एतद्देशीय लोकांच्या सर्व विद्येचें व सर्व आचाराचें मूळ आहे, आणि सामान्य जनांच्या मतें तर ज्यांत हरएक प्रकारचें ज्ञान भरलें आहे, अशा ग्रंथाचा अर्थ लोकभाषेंत उतरतांना असल्या अपूर्व उद्योगाच्या संबंधानें वाचकांस पुष्कळ गोष्टी अगोदर कळवणें अवश्य होतें. पण तशाविषयीं 'वेदार्थयत्न'कारांनीं विशेष खटपट मुळींच केली नाहीं. सरासरी विषयाचें स्वरूप व भाषांतराच्या अडचणी वगैरे यांविषयीं कांहीं लिहून पांच सात पानांत

---

loist, and the philosopher was roused to the fact that a complete literature had been preserved in India, which promised to open a new leaf in the ancient history of mankind, and deserved to become the object of serious study."

"No one who wishes to acquire a thorough knowledge of these or any other of the Indo-Eeropean languages, no one who desires to study the history of that branch of mankind to which we ourselves belong, and to discover in it the fiist germs of the language and mythology of our forefathers,—can for the future dispense with some knowledge of the language and ancient literature of India."

*Muller's Sanskrit Literature.*

¶ पंचोपाख्यान, कर्ता विष्णुशर्मा. पैठण नगराच्या सुदर्शन राजाला मूर्ख मुलगे असल्यानें फार काळजी लागली होती. आपल्या कुमार्गवर्ती मुलास शिकवून विद्वान् कोण करील असा सवाल त्यानें दरबारांत टाकतांच बृहस्पतितुल्य विद्वान् ब्राह्मण विष्णुशर्मा यानें सहा महिन्यांत त्यांस शास्त्रपारंगत करण्याचें कबूल केलें. मुलगे त्याच्या स्वाधीन केल्यावर त्यानें पांच नीतिपर गोष्टी सांगून राज्याचा गाडा हांकण्यास त्यांस लायक केलें. हा ग्रंथ पंचतंत्रासारखाच दिसतो. इतकेंच नव्हे तर बॉन् विद्यापीठांतील संस्कृत व भाषाशास्त्र यांचे आचार्य Theodor Aufrecht यांनीं संस्कृत ग्रंथ व ग्रंथकर्ते यांचा सर्व उपलब्ध याद्यांचा उपयोग करून जो एक प्रचंड कॅटलॉग् (Catalogus Catalogorum) लीप्झिग् येथें १८९१ सालीं प्रसिद्ध केला, व १८९५ आणि १९०१ सालीं त्यास नव्या पुरवण्या जोडल्या त्या कॅटलॉगांत पंचोपाख्यान म्हणजे पंचतंत्र असा खुलासा केला आहे. पण पंचतंत्रांतील राजाचें नांव अमरशक्ति असून त्यांतील नगर महिलारोप्य आहे इतका मात्र फरक पंचतंत्र व पंचोपाख्यान या दोन ग्रंथांत पडतो. पंचोपाख्यानाचें मराठी भाषांतर १८५१ सालीं झालें.

'सम्पादक'

सगळी प्रस्तावना आटपली आहे; व तीही विशेष काळजीनें लिहिली आहेशी दिसत नाहीं. असो; आतां वरील लाभ सांगतों. एक तर लाभ स्पष्टच आहे कीं, सर्व आर्यजनांच्या पूज्यताबुद्धीस व प्रीतीस पात्र झालेला जो प्रस्तुत ग्रंथ त्याचा अर्थ समजल्यानें त्यांत आहे काय याची अगोदर फोड होईल. दुसरा असा कीं, आपले अत्यंत प्राचीन पूर्वज, ज्यांचा आभमान आम्हांस वाटतो हें तर सहजच आहे, पण ज्यांचें अपूर्व बुद्धिवैभव पाहून युरोपांतील पुरातन राष्ट्रें जशीं विस्मित होत होतीं तसेंच त्यांचे आधुनिक वंशजही होतात,— त्यांची त्या वेळची स्थितिरीति आम्हांस कळेल. ही कळल्यापासून त्यांचे कोणी नव्हेत अशा दूरच्या युरोपियन् लोकांसही जर कौतुक वाटतें तर आम्हांस तर तें किती वाटेल! याचें विशेष कारण असें कीं, ती स्थितिरीति आमच्या पाश्चात्य बंधूंहून आम्हांस निकट संबंधास्तव विशेष चांगल्या रीतीनें कळेल. या ज्ञानापासून दुसऱ्याही पुष्कळ गोष्टी समजून येतील. त्या अशा कीं, आमच्याच राष्ट्राची अगदीं पूर्वी स्थिति कशी होती, ती आज हजारों वर्षांच्या कालांतरानें कशी बदलली आहे, ती बदलण्याचीं कारणें काय काय झालीं; धर्म, नीति, आचार, विद्याभ्यास वगैरेंचा प्रकार पूर्वी कसा होता व सध्यां कसा आहे, अशा अनेक गोष्टी आपल्या लक्षांत येतील. याशिवाय भाषेच्या संबंधानें प्रस्तुत ग्रंथावरून पुष्कळ ज्ञान होईल हें उघडच आहे.

६. येथवर प्रस्तुत विषयाच्या महत्त्वाविषयीं व उपयोगाविषयीं लिहिलें. आतां त्याच्या स्वरूपाचें थोडेंसें विवरण करून मुख्य विषयास लागूं. वेद चार आहेत. हे येथें कोणास सांगायास नकोच; ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्ववेद. या चोहोंत मुख्य झटला ह्मणजे पाहिलाच होय. याच्याच ऋचा प्राय: बाकीच्या तिघांत आहेत. चवथा तर तिहींहून अर्वाचीन आहे, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे.[1] चारी वेदांस समुदायरूपानें 'श्रुति' असें ह्मणतात. या शब्दाचा अर्थ 'जें ऐकलें तें' असा होतो; यावरून वेद ज्या वेळेस उत्पन्न झाले किंवा मंत्रद्रष्टा ऋषींनीं पाहिले त्या वेळेस लेखनकला चालू नव्हती असें अनुमान करण्यास जागा आहे. श्रुतीमध्यें तीन भाग आहेत. संहिता, ब्राह्मण आणि आरण्यक. संहिता ह्मणजे मूळ वेदमंत्र; ब्राह्मण ह्मणजे त्यांवर टीकारूप व्याख्यान; आणि आरण्यक ह्मणजे उपनिषदादि भाग. प्रत्येक वेदाची संहिता निरनिराळी आहे; व तिचे पुन: पदें, क्रम इत्यादि आणखी भेद आहेत.[2]

१. वेदांस 'त्रयी' अशी संज्ञा प्रसिद्धच आहे. शिवाय पाणिनीच्या अष्टाध्यायीवरून पाहतां त्यास अथर्ववेद माहीत नव्हता हें स्पष्ट दिसतें. वरील मुनीच्या व्याकरणांत तसाच ब्राह्मणांविषयीं व आरण्यकांविषयींही उल्लेख सांपडत नाहीं.

२. 'संहिता' ह्मणजे मूळ संहित स्थितींत असलेला वेदमंत्र; पदें म्हणजे त्याचा पदविभाग; आणि क्रम म्हणजे ऋचांचा अनुक्रम. हा क्रम प्रत्येक संहितेचा निरनिराळा आहे. याशिवाय जटा, घन, रेखा, शिखा वगैरे आणखी प्रकार† पुढें सुरू झालेले सर्व-प्रसिद्ध आहेतच.

† संहिता-पारायण, पद-पारायण, क्रम-पारायण, जटा-पारायण, घन-पारायण, रेखा-पारायण, शिखा-पारायण असे वेद पाठ ह्मणण्याचे अनेक प्रकार आहेत. हे प्रकार योजण्याचा हेतु

[ पुढें चालू ]

ब्राह्मणें (हा शब्द नपुंसकलिंगी आहे) हीं प्रत्येक वेदाचीं निरनिराळीं आहेत. जसें ऋग्वेदावर ऐतरेय व कौषीतकी ब्राह्मण; यजुर्वेदाच्या दोन शाखा कृष्णयजुर्वेद व शुक्लयजुर्वेद; त्यांवर अनुक्रमेंकरून तैत्तिरीय व शतपथ ब्राह्मण; सामवेदावर प्रौढ व अद्भुत ब्राह्मण; आणि अथर्वावर गोपथ ब्राह्मण. आरण्यकें हीं ब्राह्मणांच्या परिशिष्टासारखीं होत. यांत सारीं उपनिषदें

---

वेदऋचांचीं अक्षरें (अगर त्यांचा क्रम) बदलूं नयेत.

१ 'संहिता-पारायण' म्हणजे वेदमंत्र असेल तसा म्हणणें.

२ 'पद-पारायण' म्हणजे संधिनियमांप्रमाणें शब्द वेगळे करून अर्थात् पदें पाडून म्हणणें.

३. 'क्रम-पारायण' म्हणजे प्रत्येक पदाबरोबर त्याच्या पुढचेंहि पद उच्चारणें.

यापुढील प्रकार समजण्यासाठीं प्रथम आणखी थोडी परिभाषा समजून घेतली पाहिजे:—क्रम, उत्क्रम, व्युत्क्रम, अभिक्रम, संक्रम असे पदें म्हणण्याचे पांच प्रकार आहेत. दोन पदें या पांची प्रकारांनीं एकामागून एक म्हटलीं म्हणजे पंचसंधि असें त्यास म्हणतात. दोन पदें जर १ व २ या अंकांनीं दर्शविलीं तर १+२ हा क्रम, २+२ हा उत्क्रम, २+१ हा व्युत्क्रम, १+१ हा अभिक्रम, आणि पुनः १+२ हा संक्रम व हे सर्व प्रकार एकत्र केले म्हणजे (१+२)+(२+२)+(२+१)+(१+१)+(१+२) पंचसंधि म्हणावें. [येथें १=पहिलें पद; २=दुसरें पद.] मंत्रांत पदें दोहोंपेक्षां अधिक असतात; तेव्हां सर्व मंत्र पंचसंधि-रीतीनें म्हणावयाचा असेल तर प्रथम पहिलीं दोन पदें, मग दुसरें व तिसरें, पुढें तिसरें व चौथें अशा जोडया करून मंत्र संपेतों प्रत्येक जोडी पंचसंधि-पद्धतीनें उच्चारावी. उदाहरणार्थ:—

'नमो रुद्रेभ्यो ये' हा त्रिपदात्मक मंत्र पंचसंधिरीत्या उच्चारला तर असा होईल:—

नमो रुद्रेभ्यो, रुद्रेभ्यो रुद्रेभ्यो, रुद्रेभ्यो नमो, नमो नमो, नमो रुद्रेभ्यो ॥ रुद्रेभ्यो ये, ये ये, ये रुद्रेभ्यो, रुद्रेभ्यो रुद्रेभ्यो, रुद्रेभ्यो ये ॥ [१-२, २-२, २-१, १-१, १-२; २-३, ३-३, ३-२, २-२, २-३.]

याप्रमाणेंच इतक्या तितक्या पदांचा मंत्र बसविणें फारसें अवघड नाहीं हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

वरील क्रमोत्क्रमादि प्रकारांच्या वेगवेगळ्या योजना आठ तऱ्हांनीं करतात त्यांस विकृति म्हणतात; त्यांचीं नांवें:—

जटा माला शिखा रेखा ध्वजो दण्डो रथो घनः ॥
अष्टौ विकृतयः प्रोक्ताः क्रमपूर्वा मनीषिभिः ॥ १ ॥

जटा=क्रम+व्युत्क्रम+संक्रम.

=१-२, २-१, १-२ । २-३, ३-२, २-३ । ३-४, ४-३, ३-४, । इ०.

शिखा=जटा+पुढचें एक पद=क्रम+व्युत्क्रम+संक्रम+ पुढचें पद.

=१-२, २-१, १-२,३ । २-३, ३-२, २-३, ४ । ३-४, ४-३, ३-४, ५ । इ०.

घन=शिखा+विपर्यास+क्रम.

=(१-२, २-१, १-२, ३ । २-२-१ । १-२-३ ।
२-३, ३-२, २-३, ४ । ४-३-२ । २-३-४ ।
३-४, ४-३, ३-४, ५ । ५-४-३ । ३-४-५ ।)

[पुढें चालू]

अंतर्भूत होतात. यांचें पठन अरण्यांत करावें लागतें ह्मणून वरील संज्ञा त्यांस प्राप्त झाली आहे. वेद प्रायः सर्व छंदोबद्ध आहे, यजुर्वेदाचा कांहीं भाग मात्र गद्यरूप आहे. ऋग्वेद-संहितेचे दहा भाग केले आहेत; त्या प्रत्येकास मंडल ह्मणतात. मंडलाचे पुनः आणखी उपभाग आहेत त्यांस सूक्तें ह्मणतात. हीं सूक्तें वरील संहितेंत हजारांवर आहेत. प्रत्येक सूक्तांत सुमारें दहा ऋचा येतात. या मानानें पाहतां नुसता ऋग्वेदच सुमारें दहा हजार ग्रंथ आहे. आतां या निरनिराळ्या संहितांत व ब्राह्मणादि ग्रंथांत काय काय विषय आहे हें पाहिलें तर ऋग्वेदांत इंद्रादि देवतांची स्तुति आहे; यजुर्वेदांत यज्ञप्रकरण आहे; सामांत ऋग्वेदांतील ऋचा, पण त्या गायनाच्या रीतीनें ह्मणायाच्या आणि चवथ्या आथर्वणांत जारणमारणादि क्रियांचे मंत्र आहेत. वर सांगितलेल्या निरनिराळ्या ब्राह्मणांत प्रायः यज्ञक्रियेविषयीं मजकूर आहे. आरण्यकांत व उपनिषदांत अध्यात्मज्ञान आहे.

७. वेदांच्या संबंधानें एका मोठ्या गोष्टीविषयींची माहिती देणें अवश्य आहे. ही गोष्ट वेदग्रंथांचा काळ होय. या कालाचा निर्णय अगदीं बरोबर होणें तर बहुधा अशक्यच दिसतें, तरी त्याविषयींची कांहीं अटकळ करण्याची युक्ति पाश्चात्य पंडितांनीं एक चांगली योजली आहे. ती संपातबिंदूचें चलन होय. ज्योतिष ह्मणून एक वेदांग आहे, त्यांत आपल्या ऋषींच्या वेळीं सूर्य कोणत्या अयनांशावर होता हें सांपडतें. त्यांवरून गणित करतां असें निघतें कीं, तो ग्रंथ ज्या वेळेस रचला तो काळ इ. स. पूर्वीचें ११८१० वें वर्ष

---

घनाकरितां तीन तीन पदांच्या ( १, २, ३; २, ३, ४; ३, ४, ५ ) गटांवर क्रमानें शिखा, विपर्यास, क्रम हे संस्कार करावे.
( विपर्यास=तीन पदें उलटीं, क्रम=तीन्ही पदें सरळ यथास्थित ).

रेखा—क्रमाद् द्वि-त्रि-चतुः-पञ्च-पदक्रममुदाहरेत् ॥
पृथक् पृथक् विपर्यस्य रेखामाहुः पुनः क्रमात् ॥ १ ॥
=प्रथम दोन पदें, मग तीन पदें, नंतर चार पदें, पुढें पांच पदें याप्रमाणें क्रम-व्युत्क्रम-व दोहोंचा संक्रम घेऊन ऋचा संपवावी.
=( १-२, २-१, १-२ । २-३-४, ४-३-२, २-३, ३-४ ।
४-५-६-७, ७-६-५-४, ४-५, ५-६, ६-७ ॥ ).

संहिता, पदें व क्रम इतकेंच पाठांतर वैदिक साधारणपणें करतात; जटापाठी व घनपाठी फार थोडे; शिखापाठी व रेखापाठी त्यांहून अल्प; आणि आठहि विकृति ह्मणणारा तर एकादाच. वर क्रम, जटा, घन, शिखा, रेखा इतक्यांचा विस्तृत खुलासा दिलाच आहे. बाकीच्यांच्या (शास्त्रीबुवांनीं त्यांचा उल्लेख केला नसल्यामुळें ) फक्त व्याख्या देतों:—

माला—ब्रूयात् क्रमविपर्यासं क्रममीदृग्विधं दिशेत् ॥
जटाऽऽख्या विकृतिं धीमान् विज्ञाय क्रमलक्षणम् ॥ १ ॥
माला मालेव पुष्पाणां पदानां ग्रंथिनी हि सा ॥
आवर्तते त्रयस्तस्यां क्रमव्युत्क्रमसंक्रमाः ॥ २ ॥

[ पुढें चालू ]

होय.[1] यावरून स्पष्ट कळतें कीं, वरील वेदांगाचा जर इतका काळ तर मूळ वेदाचा याच्याही मागला असला पाहिजे. तो एका विख्यात संस्कृतज्ञाच्या मतें इ. स. पूर्वी २०००

---

ध्वज—ब्रूयादादेः क्रमं सम्यक् अन्तादुच्चारयोदिति ॥
वर्गे वा ऋचि वा यत्र पठनं स ध्वजः स्मृतः ॥

दण्ड—क्रमवत् क्रमणं कुर्याद् व्युत्क्रमं च पदे पदे ।
स्वरसन्धिसमायुक्तं एतद्दण्डस्य लक्षणम्॥

रथ—पादशोऽर्धर्चशो वाऽपि सहोक्त्वा दण्डवद्रथः ॥

सांगोपांग ऋग्वेद घनपारायणापर्यंत शिकण्यास साधारणपणें वीस वर्षे लागतात.

आतां एक ऋचा या सर्व प्रकारांत बसवून दाखवितों:—

ऋचा—तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षं पुरुषं जातमग्रतः ॥

पदें—तम्, यज्ञम्, बर्हिषि, प्र, औक्षन्, पुरुषम्, जातम्, अग्रतः ॥

क्रम—तं । यज्ञं ॥ यज्ञं । बर्हिषि ॥ बर्हिषि । प्र ॥ प्र । औक्षन् ॥
औक्षन् । पुरुषं ॥ पुरुषं । जातं ॥ जातं । अग्रतः ॥
अग्रत इत्यग्रतः ॥

जटा—तं । यज्ञं ॥ यज्ञं । तं ॥ तं । यज्ञं ॥
यज्ञं । बर्हिषि ॥ बर्हिषि । यज्ञं ॥ यज्ञं बर्हिषि ॥
बर्हिषि । प्र ॥ प्र । बर्हिषि ॥ बर्हिषि । प्र ॥
प्र । औक्षन् ॥ औक्षन् । प्र ॥ प्र । औक्षन् ॥ इत्यादि.

घन—तं । यज्ञं ॥ यज्ञं । तं ॥ तं । यज्ञं । बर्हिषि ॥
बर्हिषि । यज्ञं । तं ॥ तं । यज्ञं । बर्हिषि ॥
यज्ञं । बर्हिषि ॥ बर्हिषि । यज्ञं ॥ यज्ञं । बर्हिषि । प्र ॥
प्र । बर्हिषि । यज्ञं ॥ यज्ञं । बर्हिषि । प्र ॥
बर्हिषि । प्र ॥ प्र । बर्हिषि ॥ बर्हिषि । प्र । औक्षन् ॥
औक्षन् । प्र । बर्हिषि ॥ बर्हिषि । प्र.। औक्षन् ॥ इत्यादि.

शिखा—तं । यज्ञं ॥ यज्ञं । तं ॥ तं । यज्ञं । बर्हिषि ॥
यज्ञं । बर्हिषि ॥ बर्हिषि । यज्ञं ॥ यज्ञं । बर्हिषि । प्र ॥
बर्हिषि । प्र ॥ प्र । बर्हिषि ॥ बर्हिषि । प्र । औक्षन् ॥ इत्यादि.

रेखा—तं । यज्ञं ॥ यज्ञं । तं ॥ तं । यज्ञं ॥
यज्ञं । बर्हिषि । प्र ॥ प्र । बर्हिषि । यज्ञं ॥ यज्ञं । बर्हिषि । प्र ॥
प्र । औक्षन् । पुरुषं । जातं ॥ जातं । पुरुषं ॥ औक्षन् । प्र ॥
प्र । औक्षन् ॥ औक्षन् । पुरुषं ॥ पुरुषं । जातं ॥ जातमिति जातम् ॥

१. वरील ग्रंथ लगध नांवाच्या ऋषीनें केलेला आहे. यांत त्यानें आपल्या वेळचीं अयनवृत्तांचीं संपातस्थळें सांगितलीं आहेत त्यांवरून कळतें कीं, त्या वेळच्या संपातबिंदूंत आणि सांप्रतच्यांत २३ अंशांचें अंतर पडलें आहे. संपातबिंदु म्हणजे विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांचा ज्यांत परस्पर छेद होतो ते दोन बिंदु होत. हे दर वर्षास मागें सरताहेत. यांस ३० अंश क्रमण्यास सुमारें दोन हजार वर्षे लागतात.

वर्षे होय.[1] हें खुद्द वेदाविषयीं ह्मणजे संहितेविषयीं झालें. ब्राह्मणें व आरण्यकें हीं पुढें झालेलीं आहेत याविषयीं मागें सांगितलेंच आहे.

८. येथवर प्रस्तुत पुस्तक ज्याचें भाषांतर होय असा मूळ ग्रंथ जो सर्वमान्य वेद त्याविषयीं उपोद्घातरूपानें आमच्या वाचकांस कांहीं थोडीशीं माहिती दिली. आतां सदरील पुस्तकाविषयीं लिहितों.

९. या पुस्तकांत एकंदर सहा भाग आहेत. ते असे–संहिता, पदें, मराठी भाषांतर, इंग्रेजी भाषांतर, अन्वय, आणि टिपा. यांपैकीं पहिलीं दोन एका पृष्ठावर व त्याच्या समोरील पृष्ठावर दुसरीं दोन दिलीं असून खालीं एका बाजूस अन्वय व दुसरीस टिपा घातल्या आहेत. येणेंकरून कोणतीही ऋचा काढली तरी लागलीच पुढें तिचे दोन तऱ्हेचे अर्थ

---

१. वरील विख्यात पंडित नुकते निवर्तलेले मार्टिन् हौग्\$ साहेब होत. हे येथील विद्यालयांत संस्कृताचे गुरु होते, व ऐतरेय ब्राह्मणावर त्यांचा जो एक प्रसिद्ध ग्रंथ आहे तो लिहिण्यापूर्वी त्यांनीं आपल्या बंगल्यांत एक यज्ञ करविला होता हेंही येथें तरी सर्वांस माहीत असेलच. वरील साहेबास पंधरा वीस भाषा येत असून इतिहासाचें ज्ञान उत्तम होतें; व तो विद्याभ्यासांत इतका गढून गेलेला असें कीं, त्याचें बोलणें, चालणें वेड्या खुळ्या मनुष्यासारखें असे. यानें येथील मागी 'यंग् मेन्स् असोसियेशन्' पुढें १८६२ सालीं वेदांवर कांहीं व्याख्यानें दिलीं, त्यांतील प्रमाण वर दाखल केलें आहे. या व्याख्यानांचें मराठी भाषांतर इंदुप्रकाशांत छापलें आहे.

\$ मार्टिन् हौग् ( Martin Haug. Ph. D. 1827–1876 ) प्रख्यात जर्मन् प्राच्य-भाषाविशारद. याचें शिक्षण स्टुटगार्ट् येथें फार उशिरां सुरू झालें. १८४८ सालीं पौर्वात्य भाषांचा व विशेषतः संस्कृतचा टुबिंग्टन् येथें अभ्यास करून तो बॉन् ( Bonn ) येथें ( Privatdozent ) फेलो ह्मणून राहिला (१८५४). १८५६ सालीं बन्सेन्च्या कार्यांत यानें मदत केली. १८५९ सालीं पुण्याच्या डेक्कन् कॉलेजांत ( त्या वेळचें पूना कॉलेज् ) याला संस्कृतचा प्रोफेसर् आणि Superintendent of Sanskrit Studies नेमण्यांत आलें तेव्हां झेंद ( Zend ) भाषा व वाङ्मय यांचें अध्ययन करून पारशांचा धर्म, पवित्र लेख आणि भाषा या विषयावर यानें एक ग्रंथ लिहिला ( १८६२ ). कोणत्याहि विषयावर संभाषण करतां यावें इतकें उत्तम मराठीचें ज्ञान संपादन करून ब्राह्मणग्रंथ, सूत्रें इत्यादिकांतील पारिभाषिक शब्दांचे अर्थ समजून व उमजूनहि घेण्याकरतां यानें आपल्या बंगल्यावर सोमयाग करविला ( १८६२ ). हा सोमयाग पांच दिवस चालू असून याच्या-साठीं दर्शपूर्णमासासारख्या क्षुल्लक इष्टींतच नव्हे तर सोमयज्ञांतहि होता, उद्गाता अशा जबाबदारीचीं कामें केलेला श्रोत्रिय हौग् साहेबानें संपादन केला होता. दिक्षोपाध्यायाकडून मिळाला असतां आरोग्य, संपत्ति, ज्ञान व ईश्वरी स्फूर्ति देणारा सोमरसहि प्राशन करण्यास याला मिळाला होता. अनेक ऋत्विज् अग्निहोत्री वगैरेंशीं संभाषणें करून वेदविषयक शंका-निवृत्ति हा करून घेई. ऐतरेय ब्राह्मणाचें विस्तृत टिपांसह इंग्रेजी भाषांतर यानें १८६३ सालीं प्रसिद्ध केलें. १८६६ सालीं स्टुट्-गार्ट्ला परत गेल्यावर हा म्यूनिच् ( Munich ) येथें संस्कृतचा प्रोफेसर् झाला. १८६७ सालीं यानें झेंद-पह्लवी कोश प्रसिद्ध केला. १८६८ सालीं खास भाषाशास्त्राच्या प्रोफेसर्ची जागा मिळाली. याच्या मतें वेदकाल कमींत कमी खि. पू. १४०० व ज्यास्तींत ज्यास्त खि. पू. २००० वर्षें इतका मागें जाईल. 'अश्वमेध' यज्ञाचा उल्लेख करणाऱ्या ऋचा याच्या मतें सर्वांत प्राचीन होत. मंत्रकाल याच्यामतें खि. पू. २४०० पर्यंतहि मागें जाणें शक्य आहे व ब्राह्मणें आणि सूत्रें यांचा काल खि. पू. १२०० ते खि. पू. १४०० च्या दरम्यान असावा. 'सम्पादक'

पाहण्यास सांपडून अन्वय व टीपही खालीं लगेच वाचतां येते. याप्रमाणें हें पुस्तक शिकणारास चांगलें उपयोगीं पडण्यासारखें असून समयानुसार चाळणारासही सोयीवार आहे. आतां वरील सहा भागांचा विचार केला असतां संहिता व पदें याविषयीं तर कांहीं बोलायासच नको. तीं जशीं आज पिढ्यान्‌पिढ्या वैदिकांच्या जिव्हाग्रावर आरूढ होऊन आलीं आहेत त्याप्रमाणें, किंवा श्वेतद्वीपीय महावैदिकाच्या[१] नुकत्या संपूर्ण झालेल्या ग्रंथावरून, उतरलीं असतील. यास्तव त्यांविषयीं कांहीं विशेष लिहिणें नकोच. मराठी भाषांतर, इंग्रेजी भाषांतर, व 'भाषायाम्' या सदराखालीं दिलेला अन्वय, हींही प्रसिद्ध वेदभाष्यकर्ते सायणाचार्य याचा मुख्य आधार घेऊन व कोठें कोठें युरोपीयन पंडितांच्या नव्या अर्थास अनुसरून रचलीं आहेत. अन्वयांत दुर्बोध व अपरिचित अशा वैदिक शब्दांस अर्वाचीन संस्कृत भाषेंतले प्रतिशब्द कंसांत दिले आहेत, व प्रसंगविशेषीं शेषपूरणही केलें आहे. हा दुसरा प्रकार मराठी व इंग्रेजी भाषांतरांतही बराच करावा लागला आहे. हीं भाषांतरें मुख्यतः शब्दास शब्द धरूनच केलीं आहेत. आतां हीं मुळांतील अर्थास अगदीं बरोबर उतरलीं आहेत कीं नाहीं हें सांगण्याचा पतकर आह्मी आपणांवर घेत नाहीं; कां कीं, या विषयाचें विशेष अध्ययन आमचें अद्याप झालेलें नाहीं. तरी आमच्या वाचकांस येवढें आह्मांस खात्रीनें सांगता येईल कीं, ज्या मंडळीनें हें काम हातांत घेतलें आहे त्यांपैकीं एकाशिवाय बाकी सर्वांस प्रस्तुत विषय चांगला अवगत असून त्यांचा त्यावर बहुत परिश्रमही झाला आहे. यास्तव सदरील भाषांतरें त्यांनीं आपणांकडून तरी अगदीं बरोबर उतरलीं असतील याविषयीं आह्मांस बिलकुल संशय नाहीं. एकंदरींत ज्या कोणास वेदांत काय आहे हें समजण्याची इच्छा असेल त्यास या भाषांतरावरून त्याची बहुतकरून बरोबर कल्पना करतां येईल असें आह्मांस वाटतें.

आतां शेवटल्या टिपांविषयीं मात्र बोलणें राहिलें. हा सदरील पुस्तकाच्या सर्व भागांत विशेष महत्त्वाचा भाग आहे; व याच्या वाचकांपैकीं बहुतेकांस हा व वरील मराठी भाषांतर हींच काय तीं उपयोगीं पडणारीं आहेत. कां कीं, इंग्रेजी भाषांतर सर्वांस समजेल असें नाहीं; व संस्कृताचा मुख्य भाग तर फारच थोडक्यांस कळेल. यास्तव एकंदर मराठी

---

१ वरील अपूर्व संज्ञा आह्मीं कोणास उद्देशून केली आहे हें आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस तरी माहीत असेलच. डॉ॰ मॅक्स् म्यूलर् यानें आज तीस वर्षे सतत खपून संपूर्ण ऋग्वेदाचें भाष्यासहित प्रकाशन केलें. या ग्रंथाचे एकंदर सहा भाग होऊन शेवटला नुकताच प्रसिद्ध झाला. या उद्योगामुळें आमच्या अत्यंत पुरातन ग्रंथाचा साऱ्या पृथ्वीवर प्रसार होऊन त्यावरील टीकाग्रंथाचें कांहीं अंशीं पुनरुज्जीवन झाल्यासारखेंच झालें. या आवृत्तींतील अत्यंत उपयुक्त भाग म्हटला ह्मणजे तिच्या शेवटीं जें मोठें सूचीपत्र दिलें आहे तें होय. यांत ऋग्वेदांतील सर्व शब्दांचें वर्णानुक्रमानें परिगणन केलें असल्यामुळें अमुक अमुक शब्द वरील ग्रंथांत अमुक अमुक ठिकाणीं आला आहे असें तेव्हांच काढतां येतें. याचे योगानें शब्दविशेषाचा अर्थनिश्चय करण्यास साधन झालें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या अवलोकनानें शोधक मनुष्यास याही गोष्टीचा चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं, कीं शेंपन्नास वर्षांमागला एकादा ग्रंथ काढला तर त्यांत पाठभेद आढळतात; पण साऱ्या पृथ्वींतला अगदीं जुना जो हा ग्रंथ यांत पाठांतराची वार्ताही नाहीं. येथून तेथून एक पाठ ! !

वाचकांस वेदांचें स्वरूप ध्यानांत जें येणार तें वरील टिपांवरून. हें आणून प्रस्तुत भाषांतर-कर्त्यांनीं या भागावरच विशेष परिश्रम केला आहेसें दिसतें. या टिपांत मूळ अर्थाच्या संबंधानें जें जें विशेष लिहिण्यासारखें वाटलें तें तें लिहिलें आहे. तें असें कीं कोठें देवतांविषयींची माहिती, कोठें शब्दविशेषांचें विशेष स्पष्टीकरण, कोठें प्राचीनकाळच्या संबंधानें माहिती, कोठें अर्वाचीन काळांत झालेल्या अनेक फेरफारांच्या संबंधाचा उल्लेख, इत्यादि. या टिपा समयविशेषीं पुष्कळ विस्तारानें लिहिल्या आहेत; व त्या पुष्कळ उपयोगाच्या व माहिती-च्याही आहेत.[1] तसेंच प्रसंगानुरोधानें मूळ ग्रंथांतील भाषासौंदर्य व अर्थसौष्ठव यांचाही त्यांत निर्देश केला आहे.

१०. आतां सदरील पुस्तकांत ज्या कित्येक न्यूनता व दोष आहेत त्यांविषयींही येथें उल्लेख करणें अवश्य होय. प्रस्तुत 'यत्न' म्हटला म्हणजे लहानसान उद्योगाच्या संबंधानें केलेला नव्हे; तर या देशाच्या संबंधानें पाहतां ज्यासारखें महत्त्व दुसऱ्या कशासही नाहीं अशा तऱ्हेचा तो आहे. यास्तव अशांत कोणत्याही संबंधानें उणेपणा जितका थोडा असेल व नांव ठेवण्यास जितकी थोडी जागा राहील तितका प्रयत्न करणें अवश्य होय. असें असतां व हे 'यत्न'कार इकडील विद्वन्मंडळांत प्रमुखत्वानें मोडणारे असतां त्यांनीं आपलें कर्तव्य बजावण्यांत पुष्कळच कसूर केली आहे हें वाचकांस कळवण्यास आम्हांस अत्यंत खेद वाटतो. तसेंच आश्चर्यही वाटतें कीं, येवढाले ढोबळ दिसणारे दोष इतक्यांच्या नजरेखालून खुशाल गेले कसे! असो; आतां त्यांचें क्रमवार निरूपण करतों.

११. वरील दोष दोन प्रकारचे आहेत. एक भाषेच्या संबंधाचे व दुसरे आंतील विषयाच्या संबंधाचे. भाषेच्या संबंधाचे दोष तर असे आहेत कीं, ते हवे त्यास पुस्तक सहज चाळलें असतां जिकडे तिकडे दृष्टीस पडणारे आहेत. आजपर्यंत या पुस्तकांत आम्ही अनेक वेळां आमच्या देशांतील नव्या विद्वानांची स्वभाषेविषयीं जी अत्यंत उपेक्षा व तिरस्कारबुद्धि आढळते तिच्या संबंधानें आरोळ्या मारल्या आहेत; व कित्येक असमंजस लोकांस त्या निरर्थकशाही वाटल्या आहेत. पण सदहू पुस्तकाच्या आजपर्यंत झालेल्या पांच अंकांपैकीं एकाचाचेंही उगीच वरवर अवलोकन केलें असतां कोणासही आमच्या दूषणांचा प्रत्यय चांगला आल्याविना राहणार नाहीं. महाराष्ट्रभाषेंत सुरस ग्रंथरचना करणें हें तर काय, पण नुसतें शुद्ध लिहितां येणें हेंही कांहीं सामान्य नव्हे, तर तें साधण्यास इतर भाषांप्रमाणेंच मराठीचाही चांगला अभ्यासच करणें जरूर आहे; व तसें न करतां केवळ परभाषेचेंच उठतां बसतां नेहेमी डौलानें सेवन केलें असतां जन्मभाषेचेंही किती मातेरें होऊन जातें व शुभ-वर्तमानाच्या जवळ जवळ तिचे झोकांडे कसे जाऊं लागतात, हें ज्यास पाहणें असेल त्यास तें प्रस्तुत 'यत्ना'वरून चांगलें नजरेस येईल. भाषेच्या संबंधानें पाहतां निर्दोष असा यांतील

---

१. उदाहरणार्थ अंक ४ पृष्ठ २०४ यांतील 'शुनःशेपा'वरची पांच सहा पानांची टीप पाहा. तसेंच त्या अंकांतील 'ऋक्ष' व 'अधिक मास' या शब्दांवरील व्याख्याही पाहाव्या. शिवाय 'ऋतु' 'बृहस्पति,' 'असुर' वगैरे अनेक शब्दांच्या संबंधानें ठिकठिकाणीं पुष्कळ चमत्कारिक माहिती दिलेली आहे.

भाग झटला ह्मणजे इंग्रेजी भाषांतर मात्र होय. तें वाचण्यास जसें गोड लागतें व मूळ ऋचेचें स्वरूप त्यावरून जसें लक्षांत येतें तसें मराठी भाषांतरावरून फारसें येत नाहीं. उलटें त्यांत मूळचें स्वारस्य नष्ट होऊन वाचकांस त्रास मात्र येतो. नुसतें मराठीच ज्यांस येतें त्यांस तर हें हिंदुशास्त्र पवित्र ख्रिस्ती शास्त्रासारखेंच बहुधां मधुर लागत असेल. असो; हाच प्रकार दरएक पानाखालीं ज्या भरपूर टिपा दिल्या आहेत, त्यांतला व आरंभींच्या प्रस्तावनेंतलाही होय. फार तर काय, पण प्रस्तुत ग्रंथाचें नांव- हेंही इंग्रेजी धर्तीचें असून अमळ विलक्षणच आहे टीकाग्रंथांचीं नांवें संस्कृतांत अशा तऱ्हेचीं कधींही नसतात; तीं 'प्रकाश', 'दीप', 'बोध' अशा प्रकारच्या उपपदांशीं प्राय: समस्त केलेलीं असतात. शिवाय प्रस्तुत शब्दापासून बोध झटला ह्मणजे 'वेदांकरतां यत्न' असा होतो; अभिप्रेत अर्थ व्यक्त करणें असल्यास 'वेदार्थ–विवरण–यत्न' असें कांहीं लांबलचक नांव हवें होतें.

वर जें प्रकृत पुस्तकाच्या भाषापद्धतीवर पहिलें मोठें दूषण दिलें आहे तें कोणत्या आधारावर हें आतां वाचकांस दाखवतों. तेणेंकरून आह्मांवर वृथा आरोप किंवा अत्युक्ति केल्याचा दोष कोणी समंजस व निष्पक्षपात मनुष्य तरी निदान ठेवणार नाहीं;—

" वेदाचा मूळ अर्थ हजारों वर्षांपासून आजपर्यंत करणाऱ्यांनीं जे श्रम ज्या उद्देशानें केले आहेत त्याच ज्ञानेच्छेच्या उद्देशानें त्याप्रमाणें थोडा श्रम केला पाहिजे तरच भाषांतर समजेल असें कितीएक सूक्ताविषयीं कबूल करणें अवश्य आहे. आणि तसें झाल्यावरहि जर दुर्दैवेंकरून वाचकांची निराशा होईल तर त्यांचा दोष वाचक कृपा करून भाषांतरकर्त्यांलाच सगळा न लावेतील अशी आशा आमच्यानें केल्याविना राहवत नाहीं. कारण कीं, आह्मी केवळ अर्थवाहक आहों, अर्थकारक नाहीं. भांडारांत जें असेल तें आणून आह्मी आमच्या प्रिय वाचकांपुढें ठेवूं. बाहेरचें आणून भांडारांतील हें आहे अशी अथवा भांडारांत अर्थ असून तो नाहीं अशी प्रतारणा करणार नाहीं. आणि या आमच्या कारभारांत आह्मांस देवाचे प्यारे सकल आर्यजन आपल्या "मित्रतेचा, अर्थाचा आणि सच्छात्ररूपी संततींत जें बळ नित्य असतें त्याचा अनुग्रह करून साहाय्य करितील"* यांत संशय नाहीं."

(सूचना–पृष्ठ ७.)

कोण विलक्षण मराठी भाषा ही! प्रस्तुत पुस्तकास आश्रय देणाऱ्या मंडळींत कित्येक रेवरेंड्, कित्येक शेट, कित्येक मिस्तर, वगैरे मंडळी आहे. त्यांस अशा भेसळीची नेहेमी संवय असल्यामुळें त्यांस वरील वाक्यांपासून कांहीं बोध झाला असल्यास नकळे. यांपैकीं कित्येकांनीं तर शेवटल्या वाक्याच्या शेवटीं पवित्र शास्त्रांतील ओंवीचा भ्रम होऊन बहुधां

---

* ही अवतरणान्तर्गत विनंति ऋग्वेदांतील मण्डल १ अनुवाक् ३ सूक्त १० मधील सहाव्या ऋचेचें जवळ अवळ भाषांतर आहे. ती ऋचा अशी:—

तमित्सखित्व ईमहे तं राये तं सुवीर्ये। स शक्र उत नः शकदिन्द्रो वसु दयमानः॥

अर्थ:—' त्यालाच मैत्रीसाठीं (प्रेमासाठीं), (त्यालाच) संपत्तीसाठीं व (त्यालाच) शौर्यासाठीं आह्मी प्रार्थितों. म्हणून तो शक्तिसंपन्न इन्द्र द्रव्य देऊन आम्हांस मदत करो. (आमच्या अंगीं कर्तृत्वशक्ति उत्पन्न करो.) 'सम्पादक'

'आमेन' या पवित्र पदाचा उच्चारही केला असेल ! असो; हाच आरंभीचा प्रकार पुढें चोहों-कडे आढळतो. त्याचीं कांहीं उदाहरणें देतों म्हणजे बस आहे;—

'इंद्र चपल घोड्यावरून जातो,' 'शब्द वापरणें,' 'नवऱ्यानें काम बजाविण्याच्या स्थितींत असणें', 'भरभराटीची देवता', 'ही समजुत जिकडे तिकडे वेदमंत्रांत व्यापून आहे', 'सायणाचार्य जो याचा अर्थ करतात त्यावरून तरी विशेष तृप्ति होते असें नाहीं'.—'अभवंताच्या मैत्रींत राहणाऱ्यापेक्षां शक्तिमंताच्या मैत्रींत राहणारा विशेष निर्भय राहील हें सांगावयास नको'.—वैदिक युगांत रथ होते व त्यांत कौशल्य खर्चून सुख होई अशी युक्ति करीत असत. म्हणजे कितीएक सुखकारक व कितीएक हालण्यानें क्लेशकारक होते असें दिसून येतें.'

हा इंग्रेजी धर्तीवर मराठी भाषा गेल्याचा एक प्रकार झाला. यांशिवाय प्रस्तुत भाषांतरावर दुसरीही दोन मोठालीं दूषणें देणें अवश्य आहे. तीं यवनी शब्दांचा प्रचार व अश्लील पदांचा प्रयोग हे होत. ज्या आमच्या देशबंधूंस एकीकडे यहुदी तर दुसरीकडे मुसलमान अशा मुमुक्षूंबरोबर डोळे मिटून ईश्वरास एकाद्या नादलुब्ध हरिणाप्रमाणें आळवण्याची संवय होऊन गेली असेल, व ज्या कित्येक भाग्यवंतांनीं आपल्या गौरकाय आर्यबंधूंबरोबर व आर्यभगिनींसहवर्तमान एका ताटांत किंवा निदान एका मेजावर क्षुधाशमन केलें असेल, त्यांच्या मनाचा कल काय असेल तो असो; पण आमच्या साध्या व अल्प समजुतीस असें वाटतें कीं, ज्याप्रमाणें वषट्काराचा घोष चालून इंद्रादि देवता सोमपानाविषयीं तरंगल्या असतां तेथें एका मेजावर मुसलमान बसून अग्नींत आहुति टाकतो आहे, दुसरीकडे कोणी ख्रिस्ती भट खुर्ची पुढें सरसावून उद्गातेपणाचें काम बजावीत आहे, असा प्रकार पाहिला असतां तो आम्हांस जसा मोठासा गोड वाटणार नाहीं; त्याप्रमाणेंच आमच्या प्राचीन ऋषींकडून 'हे अग्ने, तूं आम्हांस दौलत दे', 'हे इंद्रा, तूं आम्हांस मदत कर', 'हे अमक्या, तूं पिंवळ्या घोड्यांची जोडी वापरतोस', असले प्रयोग वदवलेलेही आम्हांस 'एकाद्या ठुंबरीप्रमाणें मधुर' मुळींच लागत नाहींत हें आम्ही प्रांजलपणानें कबूल करतों ! तसेंच इंद्रास 'जवान पोळ' म्हटल्यानें, दुसऱ्या एका देवतागणास 'जासूद' ही संज्ञा दिल्यानें, मरुतांस तर बिचाऱ्यांस एके ठिकाणीं श्वापदांप्रमाणें 'कळप' हा शब्द लावल्यानें, तसेंच, 'हे गव्यांनो, हा सूर्य—', 'इंद्रालाच फडानें गाणारे लोक स्तवीत असतात', 'वरुणाचे कपडे असे असतात', अशा वाक्यांनीं मूळ वेदवाणीचें महाराष्ट्रभाषेंत मोठें गौरव होतें असेंही पण आम्हांस वाटत नाहीं.

१२. येथवर भाषासंबंधीं दूषणांचें एक सदर झालें, आतां आंतील विषयाच्या संबंधानें आमच्या बुद्धीस यांत जे कित्येक दूषणीय प्रकार वाटतात ते सांगतों. एक तर विचित्र तर्क. हे तर्क दोन प्रकारचे असतात; एक शब्दांच्या संबंधाचे व दुसरे या देशाच्या नाना प्रकारच्या गोष्टींच्या संबंधाचे. या दोहों ठिकाणीं आपली कल्पनाशक्ति खर्च करून कांहींना कांहीं तरी अजब चीज वर्षा सहा महिन्यानें काढल्याखेरीज आमच्या पाश्चात्य बंधूंस बहुतकरून चैन पडत नसतें. त्यांचें इकडील भाषांचें व देशांचें ज्ञान अगोदर मासलेवाईकच

असतें; त्यांतून वरील अक्कल लढवण्याचा प्रकार जेव्हां ते दाखवूं लागतात, तेव्हां तर कांहीं विलक्षण तारे तुटूं लागतात. एक ह्मणतो, 'अहो! पूर्वी सर्व भाषा एकच होत्या. याचें प्रमाण पाहण्यास फार लांब जायाला नको; पहा, बैबलांतला पहिला उत्पन्न झालेला पुरुष 'आदम' आणि संस्कृत शब्द 'आदिमः' !–दुसरी मौज पाहा! 'यशोदेचा कृष्ण' आणि 'येशू ख्रिस्त,' किती जवळ मेळ आहे तो!—तिसऱ्या एका विद्वान् पंडितानें 'रामायणा'विषयीं व 'भगवद्गीते'विषयीं काय नव्या कोट्या काढल्या आहेत त्याही सर्वांस माहीत आहेतच. याप्रमाणेंच आपल्या शिपायाच्या तोंडून 'जी साब' हे शब्द वरचेवर ऐकले असतां येथील एका शार्मण्य संस्कृतज्ञाचा† तर्क धांवला कीं, हा बेटा 'जीव' असा आपणास मूळ संस्कृत भाषेतला आशीर्वाद करतो आहे, हीही मजा आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. फार काय, पण आमच्या सत्यशोधक पंडितांनींही आज कित्येक वर्षे एक कोटि जगास जाहीर केली आहे; ती ही कीं, 'महाराष्ट्र' ह्मणजे 'मोठें राष्ट्र' नव्हे तर 'महार–राष्ट्र'! आणि यास प्रमाण काय तर मराठींतली ह्मण 'जेथें गांव आहे तेथें महारवडा आहेच.' या शूद्रश्रुतीवरून निर्णय स्पष्ट होतो कीं, या प्रांतांतील राहणारे मूळचे ब्राह्मणादि महादुष्ट व महामूर्ख लोक नव्हेत, तर त्यांचे 'महा–अरि' ह्मणजे 'महार' हे होत.[१] असो; आतां सदरील पुस्तकांत वरच्यासारख्या अप्रयोजक कोट्या मुळींच नाहींत हें खरें; तरी यांत युरोपीय पंडितांनीं केलेले अर्थ जेथें तेथें अगदीं पूर्ण भक्तीनें ग्रहण केलेले जे दिसत आहेत त्यांच्या संबंधानें प्रस्तुत पुस्तकाच्या कर्त्यास व त्याच्या वाचकांस पुढील सूचना केल्याखेरीज आमच्यानें राहवत नाहीं. ती इतकीच कीं, वरील द्वीपांतरस्थ पंडितांची शोधकबुद्धि जरी प्रशस्त होय व त्यांनीं पुष्कळ चमत्कारिक शोध जरी केले आहेत, तरी त्यांच्या अपुरत्या ज्ञानामुळें इकडील गोष्टींविषयींचे त्यांचे पुष्कळ तर्क अगदीं भरकटलेले असतात, यास्तव एतद्देशीयांनीं त्यांचा स्वीकार करण्यापूर्वी त्यांचा अगोदर यथास्थित विचार करावा, आणि त्यानंतर युक्तायुक्ततेच्या मानानें त्यांचें ग्रहण किंवा त्याग करावा.

आतां 'वेदार्थयत्नां'त वरील कर्त्यांचा दुसरा प्रकार जो नजरेस येतो त्याचीं कांहीं उदाहरणें सांगतों. या पुस्तकांतील टिपा साऱ्या जर वाचल्या तर त्यांपासून वाचकांच्या मनावर हा ग्रह दृढतर होणार आहे,–व तसा व्हावा याविषयीं 'यत्न'कारांचीही पूर्ण मनीषा

---

† शार्मण्य=जर्मन्. प्रो. मार्टिन् हौग्. 'सम्पादक'

१. वरील सर्व कोट्या इतक्या पोरकट आहेत कीं, त्या वर दाखल केल्या याबद्दलही कित्येक वाचक आह्मांस कदाचित् नांव ठेवतील. पण त्या मोठमोठ्या विद्वान् ह्मणवणारांनीं काढल्या असून तशाच प्रतीच्या लोकांच्या मनांत अद्याप वागत आहेत हें पुष्कळांस माहीत असेलच. पहिली कोटि आह्मीं दयानंदस्वामींच्या व्याख्यानांत ऐकली; दुसरीविषयीं प्रख्यात जर्मन् प्रोफेसर् वेबर् साहेब यांचा वाद चालूच आहे; तिसरी 'जी'ची कोटि येथील एका प्रोफेसराची $ असून तिचें खंडन 'विविधज्ञानविस्तारा'नें केलेलें पुष्कळांस आठवत असेलच; आणि चवथी कोटि माजी डॉक्टर् विल्सन् यांनीं मराठी कोशाच्या प्रस्तावनेंत दाखल केली आहे. तेव्हां या सर्वांचें खंडन करणें अवश्य हाय हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

दिसते-कीं, ज्यांस आज हजारों वर्षें आह्मी परमपूज्य मानीत आलों आहों, व ज्यांच्या ठिकाणीं सकल ज्ञानाचें अधिष्ठान कल्पून त्यांस आह्मी सरासरी देवांसारखे आजपर्यंत मानीत होतों, त्या लोकांची स्थिति सध्यांच्या एकाद्या रानटी राष्ट्राहून फारशी वरचढ होती असें नाहीं. त्यांची संपत्ति काय ती गुरेंढोरें, खाण्याचा मोठा मेवा ह्मणजे तूपलाह्या, प्यायचें उत्तम मद्य ह्मणजे सोमवल्लीचा पिळून काढलेला रस, बसायाचे मोठे उत्तम गालिचे ह्मणजे दर्भांचीं विणलेलीं आसनें. ही ऐहिक स्थिति झाली. आतां पारमार्थिक स्थितीचा जर विचार केला, तर तीही भिल्ल, गोंड लोकांपेक्षां किंवा येथील वैदूंपेक्षां विशेष भिन्न दिसत नाहीं. पाहा, इंद्रासारख्या देवाला, वरुणासारख्या महाराजाला, अग्नीची मध्यस्थी घालून बोलावून आणायाचें, आणि मागायाचें काय ? तर कोठें गाई दे, कोठें घोडे दे, कोठें शूर संतति दे; कोठें युद्धांत आमचें रक्षण कर, इतकेंच ! आमच्या एकाद्या आधुनिक ब्रह्मोच्या पुढें जर देव येऊन उभा राहिला, तर तो कशा सुधारलेल्या जिनसा मागेल ! कोठें ह्मणेल माझ्या हातून लोककल्याण करीव, मला एकदम वेदमूर्तित्व दे, मोठमोठे शोध करण्याचें बुद्धि-सामर्थ्य दे, मुक्ति दे; खाण्यापिण्याच्या का जिनसा पोरासारख्या मागत बसेल ? शरीर ह्मणजे काय पदार्थ; त्याच्या पोषणाबद्दल, रक्षणाबद्दल, वगैरे देवाला विनवणी करावी हें काय ? असो; आतां वरील मजकुराच्या संबंधानें आह्मांस येवढेंच कळवणें आहे कीं, आमच्या प्राचीन पूर्वजांच्या ऐहिक व पारमार्थिक स्थितीविषयीं जरी आह्मांस अद्याप पूर्ण माहिती नाहीं, तरी वरील तर्क सर्वथा युक्त आहेत असें नाहीं येवढें आह्मास समजतें. पाहा बरें, ज्या आमच्या ऋषींस सोनें माहीत होतें, जहाजें माहीत होतीं, ज्योतिःशास्त्रांतही ज्यांचा पुष्कळ प्रवेश झाला होता, ते केवळ रानटी व अज्ञानी कसे असतील ? 'यत्न'-कर्ते 'दर्भ' शब्दावर व्याख्या करतांना ह्मणतात, "दर्भाचें आसन घालणें यांत फार आश्चर्य नाहीं. कारण अजून तरी गालिचा आंथरणारे लोक थोडेच, पण लवाळ्याची अथवा शेंदीच्या पातीची हातरी बसायास घालणारे पुष्कळ." हा तर्क किती समंजस आहे बरें ! दर्भांचीं आसनें घातल्यावरून प्राचीन आर्योच्या दारिद्र्याची जर कल्पना करायाची, तर आमच्या देशांतले मोठमोठे श्रीमंतही केळीच्या पानावर जेवतात व कढीला द्रोण घेतात यावरून त्यांस कंगाल कां ह्मणूं नये ? किंवा महादजी शिंद्याच्या हातीं तुळशीच्या मण्यांची स्मरणी असे, यावरून त्यास सोनें किंवा रत्नें मिळत नव्हतीं असें ह्मटल्यास काय चिंता आहे ? दर्भ, लाह्या, सोमवल्ली यांस यज्ञीय द्रव्यें मानलीं असल्यामुळें त्यांचा विनियोग यज्ञांत करीत हें 'वेदार्थयत्न'कारांस आह्मीं सांगितलें पाहिजे काय ?

तसेंच दोन तीन ठिकाणीं हे भाषांतरकार वाचकांस कळवतात कीं, आमच्या प्राचीन ऋषींची चाल सध्यांच्या ख्रिस्ती लोकांप्रमाणें पुरुष, बायका व मुलें अशा सर्वांनी मिळून प्रार्थनेस बसावें अशी होती. पण यास आधारभूत ह्मणून जीं स्थलें दाखवलीं आहेत त्यांवरून वरील तर्क चांगलासा निघतो असें आह्मांस वाटत नाहीं.[1] तसेंच

१. अंक २ पृष्ठ १००, व अंक ३ पृष्ठ १७०. पहिल्या ठिकाणीं येवढेंच वाक्य आहे कीं, 'हे

[ पुढें चालू ]

चवथ्या सूक्ताच्या आरंभीं ' सोम ' शब्दाचा अर्थ ' पिळून काढलेला रस ह्मणजे मद्य ' असा केला आहे हेंही अंमळ चमत्कारिकच आहे. आतां वरील व्याख्येंत ' मद्य ' ह्मणजे ' दारू ' असाच अर्थ स्पष्ट न लिहितां ' मादक रस ' अशा संदिग्ध अर्थी त्या शब्दाची योजना केलेली जरी दिसते, तरी दुसऱ्या अनेक स्थलांवरून पाहतां वरील निंद्य अर्थच त्यांस इष्ट आहेसा दिसतो. एके ठिकाणीं मूळ ऋचेंत देवांस अर्पण करायाच्या सोमाचें वर्णन असतां खालीं टिपेंत ' यत्न ' कर्ते लिहितात, " आधुनिक मद्यपी आधुनिक मद्याची प्रशंसा यापेक्षां चांगली काय करूं शकेल ? " यावरून वरील ऋचेंत मंत्रवक्त्या ऋषीनें प्राचीन ग्रीक् किंवा अर्वाचीन फारसी भाषेंतील एकाद्या रंगेल कवीप्रमाणें बाटलाबाईचें मनोहर चरित्र गाइलें असा या आधुनिक भाष्यकारांचा अभिप्राय दिसतो. कसेंही असलें तरी यज्ञशालेस खाटकाचें दुकान ह्मणणें जसें शोभणार नाहीं, त्याप्रमाणेंच सोम केवढाही ' मधुर, स्वादिष्ट, तुरट, रसवान् आणि मादकारक ' असला तरी त्यास ' मद्य ' ह्मटल्यानें कोणत्याही रसिक वाचकाच्या मनास उद्वेग झाल्यावांचून राहणार नाहीं. आतां येवढें खरें कीं, प्रस्तुत ' यत्ना 'स साह्य करणाऱ्या मंडळींत वर एके ठिकाणीं सांगितलेली रेवरेंड् आदिकरून मोठी रसिक मंडळी आहे, व एतद्देशीय वाचकांपैकींही कित्येकांनीं आधुनिक सोमाचें आधुनिक रीतीनें पान केलें असेल; तरी असल्या वाचकांस रिझविण्याकरतां मूळ वेदवाणीस भ्रष्ट करणें आह्मांस अगदीं प्रशस्त वाटत नाहीं.

याप्रमाणेंच ' चांगला गाडी हांकणारा ' ( हे शब्द वेदाच्या भाषांतरांत मोठेसे शोभतात असें नाहीं ! ) येवढ्या शब्दांवरून आमच्या प्राचीन आर्यांच्या वेळीं भरतखंडांत सध्यांप्रमाणें चांगले रस्ते नव्हते असा तर्क करणें, तसेंच ' शूर संतति दे, ' येवढ्या शब्दांवरून आमच्या पूर्वजांच्या व येथील भिल्लप्रभृति लोकांच्या नेहेमी लढाया चालत असत ही कल्पना बसवणें, हेंही सर्वांस किती मान्य होईल हें सांगवत नाहीं.

असो, येथवर वर सांगितलेल्या दूषणीय प्रकारांतला एक झाला. आतां दुसऱ्याचें निरूपण करतों. हा दोष तर प्रस्तुतसारख्या पुस्तकाच्या योग्यतेस फारच अपायकारक होय असें आह्मांस वाटतें. हल्लींच्या काळीं जिकडे तिकडे लोकांची धर्मावरील श्रद्धा उडून तसल्या विषयावरही चावटपणा करण्याचा जो प्रकार चोहोंकडे सुरू झाला आहे, तो बंद होण्याचें एकादें ठिकाण जर असेल, तर तें प्रस्तुतसारखीं अत्यंत पूज्य मानलेलीं जीं कांहीं धर्मपुस्तकें पृथ्वीच्या पाठीवर आहेत तीं होत यांत संशय नाहीं. यास्तव अशांतील प्रमेयें जो लोकांस समजून देण्याचा ' यत्न ' करील त्यानें अतिशयित गंभीर वृत्ति धारण केली पाहिजे. त्यानें आपल्या वाचकांस किंवा श्रोत्यांस हंसवण्याकरतां विदूषकाच्या वृत्तीचें अवलंबन

---

अग्नी, कण्वांनीं तुला हाक मारली आहे;' व दुसऱ्या ठिकाणीं असें आहे कीं, ' हे मित्रांनो, या बसा, आतां आम्हांस ( आपणांस ) सवित्याची स्तुति गावयाची आहे.' आतां वरील दोन संबोधनांवरून कुटुंबप्रार्थनेचा तर्क कितपतसा बसतो याचा वाचकांनींच स्वतंत्रपणें विचार करावा. हा विचार करतांना नुकतीं वर येऊन गेलेलीं दोन स्थलें,—' हे गड्यांनो,' व ' फडानें गाणारे लोक ' यांकडेही वाचकांनीं लक्ष पुरवावें.

करणें हें अत्यंत अश्लाघ्य होय. तसें केल्यानें तो आपल्या स्थानाची प्रतिष्ठा घालवतो, व त्यामुळें अत्यंत दोषास पात्र होतो. आतां प्रस्तुत ग्रंथ जर एकाद्या मिशनरी साहेबांनी हातीं घेतला असता तर त्यावर हवा तितका हास्यरस पिकवण्यास ते मुकत्यार होते. किंवा जर्मन् पंडितांनीं त्याचें भाषांतर चालवलें आहे त्यांत त्यांनीं इंद्रादि देवतांशीं हवा तसा विनोद केला तर तेंही सर्वथा दूषणीय होणार नाहीं. पण 'अनादि काळापासून ज्यांत सर्व गोष्टींचें प्रमाण आणि पूज्यता व पवित्रता हीं राहिलीं आहेत, आणि ज्याच्या ज्ञानांत मोक्ष-प्राप्ति निःसंशय राहिली आहे' असें ज्यांनीं आरंभीं ह्मणावें व ज्याचा मोठा बाऊ करून वेदवाणीचा अर्थ मोठा दुर्गम यास्तव त्याविषयीं आह्मी हा नुसता 'यत्न' करीत आहों अशी इंग्रजी नमुन्याची संकोचवृत्ति ज्यांनीं प्रगट करावी, त्यांनींच अगदीं पहिल्या पानापासून त्याच वेदवाणीशीं हास्यविनोदादि प्रकार आरंभावे हें आह्मांस अत्यंत अनुचित दिसतें. युरोपांतील देशभाषांतून बायबलाचें जेव्हां पहिल्यानें भाषांतर आरंभलें, तेव्हां पुढील काळीं व्हाल्टेर्, गिबन्, पेन यांनीं जी ख्रिस्ती शास्त्राची विटंबना केली, ती त्या भाषांतरांत टिपांच्या रूपानें जर सामील केली असती, तर त्या भाषांतरकारांची लोकांनीं काय अवस्था करून टाकली असती? फार कशाला, अजूनही जर तसा प्रकार करून कोणीं बायबलाची नवीन आवृत्ति काढली, तर त्यास विलायत-सरकारांतून व विशेषतः हिंदुस्थान-सरकारांतून केवढें बक्षीस मिळेल बरें! हेंही असो; पण ज्या लक्षावधि लोकांस बायबल हें केवळ गाबाळ ग्रंथ वाटतें त्यांच्या तरी वरील आवृत्ति आदरास पात्र होईल काय? उघडच आहे; कधींही होणार नाहीं. कारण मनुष्यास किंवा ग्रंथास प्रमाणभूत न मानणें ही एक निराळी गोष्ट; व दुष्टपणानें त्याची विटंबना करण्यांत हर्ष मानणें हें एक निराळें.

आतां हेंच दूषण 'वेदार्थयत्न' कर्त्या मंडळीवर बऱ्याच अंशीं कसें येतें तें पाहा. या मंडळीचीं धर्मसंबंधी मतें प्रस्तुत पुस्तकाच्या वाचकांस बहुधा माहीत असतीलच; कीं, ते प्रार्थनासमाजपंथाचे आहेत, किंवा निदान त्यांचीं मतें तरी त्यासारखीं आहेत. तेव्हां अर्थातच देशांत सध्यां चालू असणारा धर्ममार्ग पापपरिणामी असून तो देशास बुडवणूक आणणारा आहे असें यांचें कायमचें मत असून ज्या ग्रंथाचें ज्ञान आपल्या देशबांधवांस करून देण्याचा यांचा 'यत्न' सुरू आहे तोही त्यांस विशेषतः मान्य आहे असें नाहीं. कां कीं, ईश्वरप्रणीत ग्रंथ मनुष्यास कोणताही मिळालेला नाहीं हें त्यांच्या पंथाचें एक मुख्य तत्त्व आहे. आतां खरोखरी पाहिलें असतां वरच्यासारखीं प्रस्तुत भाषांतरकर्त्यांचीं कांहींही मतें असलीं, तरी तीं प्रकृत पुस्तकांत प्रगट करण्याचें कांहीं विशेष प्रयोजन नव्हतें; कां कीं, त्यांचें काम ह्मटलें ह्मणजे फक्त अर्थ समजून देण्याचें. त्यांनींच प्रस्तावनेंत ह्मटलें आहे कीं, "आमचा हेतु इतकाच आहे कीं, परम पुरातन, परम पूज्य आणि परम प्रमाणीभूत जो वेद त्याचा अभ्यास लोकांनीं करावा, आणि अर्थ सकल आर्यजनांनीं जाणून घ्यावा." मग ही स्वकृत मर्यादा उल्लंघून पुढील मताभिमान प्रगट करण्यांत प्रस्तुत 'यत्न' कारांचा काय हेतु असावा बरें!—

"या मंत्रांत इंद्राजवळ ऋषि काय मागतो याचा विचार आपण केला ह्मणजे ऋषि-

जन देवांपेक्षांहि मोठे आणि ते विष्णूच्या वक्षःस्थळीं लाथ मारतील तर त्यापासून देवांचा देव विष्णु भूषण मानून घेईल ह्या पौराणिक कथेची योग्यता समजून येईल. वेदांत ब्राह्मणांनीं देवावर वर्चस्व बजाविलेले दृष्टीस पडत नाहीं. ऋषि हे देवांचे आपण उपासक आणि देव करितील तर आपलें कल्याण होईल अशीच सुबुद्धि बाळगीत होते."

( अंक १, पृष्ठ ३४—५ ).

तसेंच,

"या ऋचेंतील प्रार्थना किती नम्र आणि भाविक आहे पाहा. रक्षण करणारे देव 'महाराज' होत, ह्मणजे मोठ्या शक्तीचे व अधिकाराचे राजे होत; आणि ज्याचें रक्षण करावयाचें तो दीन, दास, दीनवाण्या स्थितींत आहे असें उपासक मंत्रवक्ता मेधातिथिऋषि ह्मणतो. हा जो देवभजकभाव त्याला, आणि देवाधिदेव विष्णूच्या छातीवर ब्राह्मणानें लाथ मारिली आणि तेणेंकरून जें क्षत पडलें तो एक अलंकारच आहे असें समजून विष्णूनें तें क्षत बिरुद करून बाळगिलें आणि तो आपल्यावर ब्राह्मणाचा प्रसाद झाला असें मानिलें या अघोर पातकरूपी कथेला किती अंतर आहे पाहा !"

( अंक ३, पृष्ठ १२९ )

आणखी पुनः,

"ऋग्वेदांत विष्णूविषयीं जें सांगितलें आहे त्यास आणि पुराणांत वगैरे त्याजविषयीं सांगितलेल्या कथांस पुष्कळ अंतर आहे. विष्णूस अजून बायकोची व मुलांची आणि संसार करण्याची जरूर लागली नव्हती. तो ब्राह्मणाकडून लाथा मारून घेऊन त्यांतच आपला मान आहे असें मानून घेण्यास शिकला नव्हता."

( कित्ता—पृष्ठ १८० ).

ब्राह्मणांवर कडाका—

"हा मंत्र फार सुंदर आहे. यांत वरुणाचा मोठेपणा किती नम्रभावानें मंत्रवक्ता वर्णीत आहे तें ध्यानांत ठेवावें. ज्या वरुणाच्या प्रसादाची इच्छा मंत्रवक्ता करितो तो साधारण एकाद्या जेजुरीसारख्या लहानशा गांवांतील देव आहे असें नाहीं, तर तो सकल द्युलोकाचा आणि सकल पृथ्वीचा राजा आणि सकल भुवनांचा राजा होय. आणि उपासक उद्धट आणि गर्विष्ठ कर्मठ ब्राह्मण नाहीं, तर लीन आणि अनन्यभावें आपल्या देवाला शरण जाऊन आपली हाक ऐक अशी नम्रतापूर्ण साधी प्रार्थना करणारा एक सेवक होय. ब्राह्मणाचा शब्द असला तर पुरे, देवांचे दगड होतील आणि दगडांचे देव होतील अशी शक्ति भूदेवांस वैदिक युगांत आली नव्हती. त्या वेळचे उपासक बिचारे आह्मांसारिखेच गरीब आणि निर्बळ मानव, पण अधिक भाविक अधिक प्रामाणिक आणि अधिक भजनोत्सुक होते[१]."

( अंक ४, पृष्ठ २४६—७ ).

---

१. वरील उताऱ्यांत ब्राह्मणांविषयीं जो भाव दृष्टीस पडतो तो आपल्या प्रियवाचकांच्या अंतः-करणावर पक्केपणीं ठसविण्याविषयीं 'वेदार्थयत्न'कारांनीं जेथें तेथें मोठा आस्थापूर्वक 'यत्न' केला

[ पुढें चालू ]

वरील वचनें 'ज्ञानोदया' दि कर्पांचें पांडित्य आज सुमारें चाळीस वर्षे ऐकून स्वभावेंच व स्वधर्मोचें जे मातेरें करून बसले असतील अथवा माजी आर्यसमाजाचे स्थापक जे यशःशुभ्र परमहंस त्यांनी सगळ्या आर्यभूमीवर उड्डाण करून जें मधुर कूजित केलें तें ज्यांनीं ऐकून माना डोलवल्या असतील, अशा सर्व तत्त्वज्ञ वाचकांस भारी पसंत होतील यांत बिलकुल संशय नाहीं. पण ज्या अर्थी प्रस्तुत 'यत्न', वरील लोकांकरतांच केलेला नाहीं; व वेदाचा अर्थ समजून घेण्याविषयी जे सर्वांत अत्यंत उत्सुक असणारे त्यांस वरील वाक्यें विशेष गोड लागतील असाही संभव कमीच, त्या अर्थी प्रस्तुत 'यत्न'कार 'सुबुद्धी' च्या व सद्धर्मनिष्ठेच्या योगानें वरच्यासारखे अनेक ठिकाणीं जे वाहवले आहेत ते मोठा विचार करून वाहवले आहेत असें आह्मांस वाटत नाहीं. वेदांतील मंत्रांचा अर्थ करतांना विष्णु, विठोबा, खंडोबा, वाघजाई, यांच्याकडे व 'उद्धट आणि गर्विष्ठ' ब्राह्मणांकडे नजर वरचेवर गेल्याखेरीज जर राहतच नाहीं, तर ख्रिस्त महाराजांकडे, त्यांच्या रोमनगरस्थ प्रतिनिधींकडे, बैबलांतील सुंदर कथांकडे, वगैरे तिचा लेशही पोंचत नाहीं हें नवल नव्हे काय? प्रस्तुत पुस्तकाला हिंदु लोकांचा जसा आश्रय आहे तसाच ख्रिस्ती जनांचाही आहे, तेव्हां त्यांच्या वर्गणीच्या मोबदला त्यांसही उपहासाचा वांटा थोडा तरी मिळणें रास्त होतें हें कोण कबूल करणार नाहीं?

पण हेंही सध्यां एकीकडे ठेवूं. पुराणें तितकीं येथून तेथून अप्रयोजक व दुष्ट असून त्यांनींच मूळचा हिंदु-धर्म जो कांहीं बरासा होता तो अगदीं भ्रष्ट करून टाकला, व हिंदुस्थानाची सांप्रतची अवस्था त्यास प्राप्त होण्यास ब्राह्मण व त्यांतून भट हे कारण झाले, हे आधुनिक विद्वानांचे दोन जबरदस्त सिद्धांत आहेत; तेव्हां त्यांस अनुसरून 'वेदार्थयत्नां'त वरील टिपा आल्या आहेत असे कदाचित् एके रीतीनें ह्मणतां येईल. पण पौराणिक 'देवांचा देव' विष्णु यावर व त्याच्या छातीवर लाथ मारणाऱ्या 'उद्धट' ब्राह्मणावर प्रस्तुत भाषांतरकार मंडळीची लेखणी जशी सफाईनें वाहिली, तशीच ती वैदिक 'देवांच्या देवा' वर व त्याच्या 'प्रामाणिक' उपासकांवर तरी निदान वाहायाची नव्हती! आमच्या जुन्या यमाची व त्याच्या 'चित्रगुप्तादि दिवाणां' ची प्रार्थनासमाजाच्या सभासदांस भीति बाळगण्याचें बिलकुल कारण नसून त्यांची त्यांनीं खुशाल थट्टा केली यांत फारसें आश्चर्य नाहीं; पण ऋग्वेदांत ज्याच्या पराक्रमांचें वर्णन केलें आहे असा जो देवाधिदेव 'वज्रबाहु' इंद्र त्याशींही 'यत्न'कार इतकी सलगी करतील हें कोणासही वाटलें नव्हतें; पाहा—

" इंद्र जन्मला त्याचें सार्थक्य (या मंत्राच्या कर्त्याच्या समजुतीप्रमाणें) इतकेंच कीं, त्यानें देवांचें आधिपत्य करून सर्वांच्या वांट्यापेक्षां मोठा सोमाचा वांटा प्यावा."

---

आहे. छपल्या आलेल्या पांचव्या अंकाच्या शेवटीं शेवटीं तर 'ब्रह्मप्रतापा'वर सारखा भडिमार केलेला आढळतो (पृष्ठ २८२–८८–९८–३०२). प्रस्तुतसारख्या विद्वन्मान्य पुस्तकानें 'ज्ञानोदया'शीं किंबहुना 'ब्राह्मणांची गुलामगिरी' असल्या अप्रयोजक व हलकट ग्रंथाशीं समत्व पावण्याची वेडी हौस बाळगावी, व कांहीं प्रयोजन नसतां आपल्या आश्रयदात्यापैकीं पुष्कळांचीं मनें दुखवावीं, हें आमच्या मतें अत्यंत शोचनीय होय.

त्याच्या उपासकांची आणखी फजिती—

" वरील सूक्तांत येवढ्या मोठ्या देवाजवळ जितकें मागायाचें तितकें मागितलें नाहीं असें ह्मटलें पाहिजे. आलीकडचे खंडोबा आणि ह्मसोबा यांचे भगत सुद्धां त्या आपल्या देवांकडेस मोक्षादि मोठमोठे वर मागतात. असो; आमचे आर्य पूर्वज वरुणाच्या सार्वभौमत्वाच्या वेळीं कोणत्या स्थितींत होते तें लक्षांत ठेवलें पाहिजे. "

असो; याप्रमाणें प्रस्तुत भाषांतरांत भाषेच्या व विषयाच्या संबंधाचे जे अनेक दोष आहेत त्यांचें निरूपण केलें. याशिवाय आमच्या एका बंधूनें जे दाखवले आहेत तेही येथें दाखल करणें अवश्य होतें; पण अगोदरच येवढा मोठा विस्तार झाला आहे, यास्तव त्यांचा निर्देश मात्र येथें करतों. एक 'भाषायाम्' या सदराखालीं दिलेली वृत्ति. ही पहिल्या एक दोन अंकांत तर फारच थोडी दिली आहे; एकादा दुसरा शब्द क्वचित् बदलून नुसता वाक्यान्वय मात्र दिलेला आढळतो. तर ती पूर्ण असावी; ह्मणजे तेणेंकरुन मूळ ग्रंथाचें अध्ययन करणारास फार उपयोग होईल. दुसरी गोष्ट सुसंगतता. हिच्या संबंधानें पुढील अंकांत आह्मांस नांव ठेवण्यासारखें कांहीं दिसलें नाहीं; पहिल्या अंकांत 'दंभहारका'नें 'सरस्वती' व 'ब्राह्मण' या शब्दांवरलि निरनिराळ्या टिपांचा जो विरोध दाखवला आहे तो आह्मांस बरोबर वाटतो, व तो प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्याच अंकांत इतक्या थोड्या पृष्ठांत कसा घडला याचेंही आश्चर्य वाटतें. तसेंच या 'यत्ना'स पूर्वींचे अनेक ग्रंथ साहाय्यभूत असतां व त्यांचा यांत पुष्कळ उपयोगही केला असतां, त्याबद्दल ह्मणण्यासारखें अवाक्षरही 'यत्न'-कारांनीं काढलें नाहीं, याचाही आह्मांस चमत्कार वाटतो. यास्कपाणिन्यादि पुरातन ग्रंथकार तर राहोतच; पण चारपांचशें वर्षांमागें झालेला प्रसिद्ध वेदभाष्यकर्ता सायणाचार्य व नुकती गेल्या वर्षीं संपलेली प्रसिद्ध मोक्षमुल्लर* साहेबांची ऋग्वेदाची आवृत्ति यांचा तरी प्रस्तुत मंडळीनें यत्किंचित् उल्लेख करायाचा होता. ज्याला वेदांचा अर्थ समजून घेण्या-

१. वरील पुस्तकाचा कांहीं महिने अस्त होऊन पुनः उदय झाला आहे हें सर्वांस बहुधां माहीत असेलच. आमच्या देशांत लोकांच्या उपेक्षेमुळें चांगल्या कृत्यासही यश येणें मोठें दुरापास्त होतें ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. सदहू मासिक पुस्तकानें 'राम म्हटला' ही संतोषदायक बातमी 'ज्ञानोदय' कर्त्यांस शोधाअंतीं जेव्हां पक्की समजली, तेव्हां त्यानें आपल्या पत्रीं मोठी नाटकी कळवळा दाखवून आपल्या 'पुणेंकर बंधू'स त्याच्या भावी पुनरुत्थानाचें शुभ वर्तमान कळवलें होतें. ही आमच्या खिस्ती बंधूची भविष्योक्ति लवकरच सफल झाली, व धर्मविचारांवर चर्चा करण्यास व त्याची वादश्रद्धा पुरवण्यास एकाच्या जागीं पुनः दोन प्रतिपक्षी तयार झाले याचा आम्हांस अत्यंत संतोष वाटतो. असो; 'दंभहारका'च्या या नव्या अंकांत 'वेदार्थयत्ना'वर टीका असून तींत वर सांगितलेला दोषनिर्देश केला आहे. एकंदरींत वरील पुस्तकाच्या संबंधानें वरील अंकही वाचण्याविषयीं आमच्या जिज्ञासु व अभिज्ञ वाचकांस सूचना केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

*फ्रेड्रिक् मॅक्झिमिलिअन् मुलर् ऊर्फ मॅक्स् मुलर् (जन्म ६ डिसेंबर १८२३, मृत्यु २८ आक्टोबर १९००). सुप्रसिद्ध जर्मन् कवि विल्हेल्म् मुलर् (Wilhelm Muller) याचा मुलगा. १८४१

[पुढें चालू]

विषयीं उत्कंठा होईल त्यास सायणाचार्यासारख्या‡ महापंडिताची व वर्तमानकाळीं 'उक्षतरण'† नगरीं वास करणाऱ्या महावैदिकाची* माहिती आपणास कांहीं तरी असावी हें बिलकुल वाटणारच नाहीं काय ? जेथें जेथें वेदभाष्याचा व आपला विरोध झाला आहे तेथें तेथें मात्र सायणाचार्यांच्या नांवाचा उल्लेख करून त्यांची चूक त्यांच्या पदरीं घालण्याचा 'यत्न' केला आहे, व त्यासंबंधानें आरंभीं प्रस्तावनेंत वाचकांस सूचना देऊन ठेवली आहे. पण

---

सालीं लीप्झिग् विद्यापीठांत मॅट्रिकूची परीक्षा पास झाल्यावर प्रो. ब्रौखौस् (Brockhaus) यांनीं संस्कृताचें अध्ययन करण्याबद्दल याचें मन वळविलें. पुढें १८४५ सालीं पॅरिस् येथें बर्नॉफ् (Burnouf) जवळ झेंड् (Zend) ही पारशी धर्मग्रंथांची भाषा तो शिकला. पुढें ऋग्वेद-संपादनाचें कार्य हातीं घ्यावें असें वाटल्यामुळें तो इंग्लंड्ला गेला. तेथें बन्सेन् व वुइल्सन् यांनीं त्याची व्हिक्टोरिआ राणीशीं आणि ऑक्स्फोर्ड् विद्यापीठांत ओळख करून देऊन ऋग्वेद-प्रकाशनाच्या खर्चाची जबाबदारी ईस्ट् इंडिया कंपनीकडून घेवविली. या वेळेपर्यंत मॅक्स् मुलर् हस्तलिखितांच्या नकला करून गरिबीनें दिवस काढी. १८५० मध्यें त्याला अर्वाचीन भाषांचा आचार्य (Taylorian Professor) नेमण्यांत आलें. पुढें १८६० मध्यें संस्कृतचे आचार्य एच्. एच्. वुइल्सन् यांच्या निधनानंतर त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेकरितां मोनिअर् वुइल्यम्स् हा त्याच्याहून अनेक दृष्टीनीं कमी लायकीचा एकच प्रतिस्पर्धी असूनहि केवळ इंग्लंडांत जन्मण्याचें साधलें नाहीं म्हणून मॅक्स् मुलर्ला ती जागा मिळाली नाहीं; तथापि १८७५ मध्यें तुलनात्मक भाषाशास्त्राच्या [ Comparative Philology तुलनात्मक शब्द-विकास-मीमांसा ] आचार्याची जागा मिळाली. जर्मन् सरकारनें परत बोलाविलें तरी हा गेला नाहीं. याला पुढें प्रिव्ही कौन्सिलर्हि करण्यांत आलें. युरोपांतील बहुतेक सर्व राजांशीं याचा परिचय होता. १८९८-९९ मध्यें यानें आत्मचरित्रात्मक टिपणें लिहिलीं व विस्तृत आत्मचरित्रपर ग्रंथ लिहीत असतां हा मृत्यु पावला. अखेरच्या दुखण्याच्या वेळीं आपणास बरें वाटावें म्हणून अभिषेक चालू करण्याकरितां यानें हिंदुस्थानांत निरोप पाठविला होता असें म्हणतात, तसेंच पुण्यांतील ब्रह्मवृंदांची प्रचंड सभा भरून मॅक्स् मुलर्ची ऋग्वेदाची प्रत निर्दोष असल्याबद्दलहि कबुली देण्यांत आली होती. पौर्वात्य हस्तलिखितांसंबंधीं त्याचा शब्द प्रमाण मानण्यांत येई. Sacred Books of the East, Chips from a German Workshop, History of Ancient Sanskrit Literature, व Rig Veda हे याचे प्रमुख ग्रंथ होत. हा आपणास 'शार्मण्यदेशोत्पन्न मोक्षमूलरभट्ट' म्हणवितो. 'सम्पादक'

‡सायणाचार्य—इ० स० १३७० च्या सुमारास होऊन गेला. याचा गुरु विद्यातीर्थ (पूर्वाश्रमींचें नांव सर्वज्ञविष्णु) ऊर्फ पहिला विद्याशंकर. याला दोघे भाऊ होते. वडील बंधु माधवाचार्य आणि लहान बंधु भोगनाथ. या त्रिवर्ग बंधूंनीं हक्क ऊर्फ पहिला हरिहर, कंपन, बुक्क, व दुसरा हरिहर या विजयनगरच्या चार राजांची सुमारें पस्तर वर्षें दिवाणगिरी केली. व विजयनगरचें साम्राज्य साऱ्या दक्षिण-हिंदुस्थानभर वाढविलें. पूर्वींच्या वसिष्ठ-रामचंद्र, चाणक्य-चंद्रगुप्त किंवा अलीकडच्या रामदास-शिवाजी या ब्राह्मण-क्षत्रियांच्या गुरु-शिष्य-परंपरेप्रमाणेंच माधवाचार्य हा ब्राह्मण सल्लागार व हरिहर हा क्षत्रिय राजा ही जोडीहि अपूर्वच झाली. माधव-सायण-भोगनाथ तिघेहि बंधु विद्वान् ग्रंथकर्ते व राजकारणी होते. या त्रिवर्गांच्या पित्याचें नांव मायण आणि मातेचें नांव श्रीमती; हे भारद्वाज गोत्राचे यजुर्वेदी ब्राह्मण होते. 'सम्पादक'

† Oxford [ Ox=उक्षन्; Ford=तरण. ] मॅक्स् मुलरनें Oxford चें गो-तीर्थ असें भाषांतर केलें आहे. 'सम्पादक'

* मोक्षमुल्लर्. 'सम्पादक'

एकंदरीनें वरील भाष्यकाराविषयीं मजकूर,—कीं, तो कोठें होता, कोण होता, त्याची आमचे पाश्चात्य महापंडित जी निर्भर्त्सना करतात ती कितपत खरी आहे, वगैरेंविषयीं कांहीं एक चकार शब्दसुद्धां काढलेला नाहीं.[1] तसेंच पुन: त्याच्या चुका ज्या काढल्या आहेत त्या 'यत्न'कारांनीं आपल्या बुद्धीनें काढल्या आहेत किंवा त्या युरोपीय पंडितांच्या कोठल्या आहेत हेंही समजूं देण्याचा बिलकुल मार्ग ठेवला नाहीं. एकंदरींत वरील कृतीवरून मनुष्याच्या मनाची स्थिति 'वरुणाच्या सार्वभौमत्वाच्या वेळीं' बरी होती, कीं विष्णूच्या हातीं

---

१. सायणाचार्याविषयीं अद्याप विशेष कांहीं माहिती मिळालेली नाहीं. इतकें मात्र म्हणतात कीं तो सुमारें ४७५ वर्षांपूर्वी होऊन गेला. व बुक्क नामक कोणा राजाच्या पदरीं होता. वेदांचें अध्ययन या देशांत इतक्या प्राचीन काळापासून सर्वतोमुख चालत असतां त्यांवर पांचशें वर्षांपूर्वी मुळींच भाष्य नसावें ही मोठ्या चमत्काराची गोष्ट आहे; व इतकें अलीकडे तें झालें असतां प्रमाणग्रंथत्वेंकरून चोहोंकडे मान्य होऊन जावें हाही दुसरा चमत्कारच होय. असो; या भाष्यकाराविषयीं युरोपीय विद्वानांमध्यें मोठा वाद आहे. अर्ध्या हळकुंडानें पिवळे होणारे, व मूर्खपणाचा कां असेना पण नवा करकरीत शोध कांहीं तरी काढून जगभर टिमकी वाजवण्याची भारी हौस बाळगणारे, जे कित्येक महापंडित युरोपांत आहेत त्यांच्या मतें 'सायण' हा केवळ मूर्ख व अप्रयोजक टीकाकार आहे; त्याच्या भाष्यावरून मूळचा अर्थ कळेनासा मात्र होतो. पण ज्यांचा वरील टीकाकाराशीं खरोखर चांगला परिचय झाला आहे त्यांचें मत वेगळें दृष्टीस पडतें. भट्ट मोक्षमुल्लर लिहितो—

"I do not wonder that others who have more recently entered on the study of the Vedas are inclined to speak disparagingly of the scholastic interpretations of Sâyana. They hardly know how much we all owe to his guidance in effecting our first entrance into this fortress of Vedic language and Vedic religion, and how much even they, without being aware of it, are indebted to that Indian Eustatheus*......... If we can now walk without Sâyana, we ought to bear in mind that five and twenty years ago we could not have made even our first steps, we could never, at least, have gained a firm footing, without his leading strings. If therefore we can now see further than he could, let us not forget that we are standing on his shoulders!"

*Rig-Veda-Sanhita, Vol. I.*

* Eustatheus थेसालोनिका (Thesalonica) चा आर्चबिशप् व Byzantine बायझंटाइन् (बैझंटिअम् नगरचा; हें नगर ख्रि. पू. ६५८ मध्यें Megarians नीं वसविलें; पुढें त्याच्याच जागीं कॉन्स्टंटाइन राजानें कॉन्स्टंटिनोपल् नगर इ. स. ३३० सालीं वसवून तेथेंच रोमन् राज्याची राजधानी केली.) विद्वान् ग्रंथकर्ता होता. धर्मान्तर करून आलेल्या मुसलमानांस घ्याव्या लागणाऱ्या शपथेच्या नमुन्यांत फेरबदल करण्याचें बादशहा मॅन्युअल् (Manual) यानें ठरविलें तेव्हां या युस्टेथिअसनें निर्भयपणें त्यास विरोध केला. हा अत्यन्त स्वतंत्र वृत्तीचा मनुष्य होता. याचा सुप्रसिद्ध ग्रंथ म्हणजे होमर् कवीच्या इलियड् आणि ऑडिसी या काव्यग्रंथांवरील टीका. या टीकेंत नष्ट झालेल्या अन्य टीकाग्रंथांतील सिद्धान्त उद्धृत करून घेतले आहेत हा या टीकेचा विशेष होय. दमास्कसच्या जॉननें केलेल्या पेंटेकॉस्ट् (Pentecost) नामक यहुदी सणादिवशीं म्हणण्याच्या स्तोत्रांवरहि (Hymns) यानें टीका लिहिली आहे. हा ११९३ सालीं मेला. 'सम्पादक'

सत्ता असतांना होती, कीं आतां एकेश्वराच्या अमलांत बरी आहे, याची आमच्या सर्व वाचकांस बरीच कल्पना झाल्यावांचून राहणार नाहीं !

१३. असो; येथवर आरंभीं प्रस्ताव केल्याप्रमाणें प्रस्तुत विषयाच्या संबंधानें पहिल्यानें एकंदर कांहीं माहिती, पुढें प्रकृत पुस्तकाचें स्वल्पकथन, आणि शेवटीं त्याचें गुणदोषविवेचन, याप्रमाणें सारे भाग आटपले. आतां सरतेशेवटीं कांहीं गोष्टींविषयीं अवश्य लिहिलें पाहिजे तेवढें लिहून हा लेख आटपतों. वरील सर्व मजकूर जे जे बाबतील त्या सर्वांस तो सारखाच पसंत पडेल असें फार करून होणार नाहीं. स्थलविशेषीं तो उगाच ज्यास्त कडक रीतीनें लिहिला असून टीका करणारांची सामान्यत: जी वृत्ति दृष्टीस पडते कीं, त्यांच्या मनास झणून फारसें कांहीं यावयाचें नाहीं तीच आह्मीं प्रगट केली आहे असेंही कित्येकांस कदाचित् वाटेल. पण असे जर कोणी आक्षेप काढले तर त्यांनीं असा विचार करावा कीं, आह्मीं वरील ग्रंथावर जीं दूषणें दिलीं आहेत तीं उगीच मन:कल्पित दिलेलीं नाहींत; तर प्रत्येकाचे आधार जेथल्या तेथें दाखल केले आहेत. ते नीट लक्षांत आणलेअसतां व मूळ ग्रंथांत त्यांचें प्रत्यंतर पाहिलें असतां अत्युक्ति केल्याचा किंवा अन्यथा निरूपण केल्याचा दोष कोणाच्यानेंही सहसा आह्मांवर ठेववणार नाहीं अशी आह्मांस खात्री वाटते. आतां कोणी असें जर ह्मणतील, कीं हें लोकोपयोगाचें काम आहे; तेव्हां अशावर टीका करून त्याचें खंडन करूं पाहणें हें दुष्टपणाचें कृत्य आहे; तर याचेंही उत्तर सोपें आहे. एक तर हें कीं, जी लोककल्याणाची इमारत इतकी लुटपुटीत कीं चार शब्द विरुद्ध बोललें कीं लागलीच ती खचून जाते, असली उभारली काय आणि न उभारली काय सारखीच ! 'वेदार्थयत्ना'ची अशी गोष्ट नाहीं याबद्दल सर्वांची खात्री असेलच. पण दुसरी मोठी गोष्ट अशी कीं, ज्यापासून सर्व लोकांस मोठा उपयोग घडायाचा त्यांत कोणास कांहीं न्यूनता किंवा दोष दृष्टीस पडले तर ते त्यानें जाहीर करावे कीं दडवून ठेवावे ? या दडवण्यास जर सज्जनपणा हें नांव असेल, तर येवढी शाबासकी कोणताही शुद्ध मनुष्य खास पतकरणार नाहीं. वरील भाषांतर ह्मणजे एकादा य:कश्चित् निबंध किंवा कादंबरी नव्हे; तर तें मोठें महत्त्वाचें कार्य असून देशभाषेचें चिरकालिक भूषण होणार, व एकंदर देशावर अनेक रीतींनीं त्यांपासून कार्यें घडणार. यास्तव आमचा लेख ज्यांस आवडणार नाहीं त्यांनीं असें समजावें कीं, वर जे प्रतिकूळ अभिप्राय आले आहेत ते प्रस्तुत भाषांतर करणाऱ्या विद्वान् मंडळींविषयीं आमच्या मनांत सन्मानबुद्धि कमी वागत असल्यामुळें आले आहेत असें नव्हे; तर प्रस्तुत विषयावर जी सर्व खऱ्या आर्यजनांप्रमाणें आमची अतिशयित भक्ति व पूज्यताबुद्धि आहे तिजमुळें प्रादुर्भूत झालेले होत. सारांश, ज्या प्रांजल बुद्धीनें प्रस्तुत पुस्तक भाषांतरकर्त्या मंडळीनें आह्मांकडे पाठविलें व त्यावर अभिप्राय मागितला, तोच भाव मनांत धरून आह्मीं आपले विचार 'लोकांस आवडणार नाहींत किंवा त्यांच्या प्रचारांस व समजुतींस विरुद्ध आहेत' ह्मणून बिलकुल भय न बाळगतां ते स्पष्टपणें बोलून दाखवले आहेत. तर याप्रमाणें आह्मांवर सोंपवलेलें कार्य उरकलें असतां आतां लेखणी खालीं ठेवतों.

# रसायनशास्त्र.

अनन्तपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ।
सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु हंसो यथा क्षीरमिवाम्बुमध्यात् ॥[१]

अंक ३८—(१) रसायनशास्त्र. (२) प्रस्तुत विषयाचा विस्तार. (३) पूर्वींचे ग्रंथ. (४) प्रस्तुत ग्रंथाचें साहित्य. (५) मुख्य विषय. (६) भाषापद्धति. (७) स्वतंत्र रचना. (८) प्रयोग व प्रयोगांचें साहित्य. (९) व्यावहारिक उदाहरणें व शिल्पक्रियांची माहिती. (१०) स्थलनिर्देश. (११) उपसंहार.

१. वरील ग्रंथाची जाहिरात आमच्या पुस्तकांत गेल्या वर्षी दिली असून तें कांहीं महिन्यांपूर्वीं छापून प्रसिद्ध झालें हें आमच्या वाचकांस विदित असेल. त्याबद्दलची पोंचही नुकती आह्मीं प्रसिद्ध केलीच आहे. या खेपेस सदर्हू ग्रंथावर आह्मी आपला अभिप्राय प्रगट करतों.

२. आतां सदरील ग्रंथाविषयींच खुद्द विचार करण्यापूर्वीं असल्या पुस्तकाच्या संबंधानें सामान्यतः पुष्कळ गोष्टी लिहिण्यासारख्या आहेत. त्या या कीं, युरोपांत अर्वाचीन काळीं सृष्टिविषयक अनेक शास्त्रांचा अपूर्व प्रादुर्भाव होऊन तीं प्रगल्भ दशेस जीं येऊन पोंचलीं आहेत तीं कशामुळें, त्यांपासून पाश्चात्य राष्ट्रांच्या आधुनिक उत्कर्षास कसें साधन झालें, इकडील राष्ट्रांनीं पदार्थविज्ञानसंबंधीं आजपर्यंत किती शोध केले, किंवा ते त्यांच्या हातून मुळींच झाले नाहींत, आमच्या देशाच्या प्रस्तुत स्थितीवर वरील शास्त्रांच्या ज्ञानानें कोणकोणतीं कार्यें होण्याचा संभव आहे, इत्यादि. टीकाविषयक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत वरील संबंधाचे कांहीं विचार प्रदर्शित केलेले आहेत. त्यांवर विशेष विस्तार करण्यास व त्यांच्या यथार्थत्वाचें परीक्षण करून इतर संबंधानेंही विवरण करण्यास पुष्कळ जागा आहे. पण विस्तारभयास्तव व विषयांतराच्या दोषास्तव तसें प्रस्तुत अंकांत करीत नाहीं. यापुढें प्रसंगानुसार त्याविषयींचे आमचे विचार वाचकांस सादर करण्याचा आमचा संकल्प आहे. यास्तव या ठिकाणीं फक्त सदरील ग्रंथाच्या संबंधानेंच जें लिहावयाचें तें लिहितों.

३. महाराष्ट्र-भाषेंत पदार्थविज्ञानाच्या निरनिराळ्या शास्त्रांवर अद्याप चांगलेसे ग्रंथ झाले नाहींत हें सर्वांस माहीत असेलच. वरील विषयावर ज्ञान होण्यास आमच्या लोकांस इंग्रेजी पुस्तकांखेरीज इतर साधनें ह्मटलीं ह्मणजे ज्योतिषादि कांहीं शास्त्रांवर झालेले ग्रंथ, मासिक पुस्तकांतील प्रसंगोपात्त लेख, व सामान्यतः व्याख्यानें वगैरे क्वचित् होणारे प्रसंग, इतकींच काय तीं होत. या सर्वांच्या योगानें पदार्थविज्ञानाचें सामान्य स्वरूप एत-

---

१. "शास्त्रविस्तार हा फार अवाढव्य आहे, आणि आयुष्य तर अल्पमात्र असून पुनः विघ्नें शेंकडों आहेत. यास्तव सारी विद्या संपादन करण्याच्या भरीस न पडतां सारभूत जेवढा अंश दिसेल तेवढा ग्रहण करून बाकीचें टाकून दे; कीं ज्या प्रमाणें हंस हा क्षीरनीरविभाग करून दुधाचा तेवढा अंश काढून घेतो."

देशीय लोकांत जे कोणी विशेष बहुश्रुत आहेत त्यांस झालें आहे इतकेंच कायतें म्हणतां येईल. प्रस्तुत रसायनशास्त्राविषयीं जर पाहिलें, तर आजपर्यंत त्यावर प्रसिद्ध ग्रंथ म्हटले म्हणजे काय ते दोनच होते. एक इकडील प्रसिद्ध गणिती व आलीकडील नव्या मंडळींपैकीं बहुतेकांस गुरुस्थानीं असलेले रा० रा० केरो लक्ष्मण छत्रे यांचें 'पदार्थविज्ञान,' व दुसरें कैलासवासी डॉ० नारायण दाजी यांचें 'रसायनशास्त्र'. पहिल्या ग्रंथांत प्रस्तुत विषय केवळ अंशत: आला असल्यामुळें त्याचें विवेचन संक्षेपानेंच केलें आहे हें उघड आहे. दुसऱ्याचा कोठें विशेष प्रचार आढळत नाहीं. मुंबईच्या मेडिकल् कॉलेजांत मात्र मराठी विद्यार्थी त्यावरून रसायनशास्त्राची माहिती करून घेतात असें आह्मांस समजलें आहे. याखेरीज इतर वाचकांच्या हातीं तें पुस्तक जात असेलसें वाटत नाहीं.

४. तेव्हां असल्या विषयावर आमचे मित्र रा० बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं ग्रंथरचना करून आपल्या देशबंधूंस पाश्चात्य शास्त्रविद्येंत प्रविष्ट करून देण्याचा जो हा यत्न त्यांनीं केला आहे तो परम स्तुत्य होय हें सांगायास नकोच. प्रस्तुत ग्रंथकारानें सदरील विषयाचा गेलीं चार पांच वर्षें सतत अभ्यास केला आहे. अनेक ग्रंथांचें साग्र अध्ययन करून, ज्यांस हें पुस्तक नजर केलें आहे अशा विद्वान् युरोपियनांकडून त्यांस सप्रयोग शिक्षणही मिळालें आहे. शिवाय ते ज्या कामावर आहेत त्यामुळें तर सदरील विषयाचें निरंतर पाठन करण्याचा त्यास प्रसंग पडतो. या कारणास्तव नवीन शिकणारांस हा विषय कसा सुबोध करून द्यावा, त्यांस त्यांतील कोणते भाग विशेष मनोरम वाटतील, व व्यवहारदृष्ट्या कोणते विशेष उपयुक्त आहेत, हें सर्व त्यांस अनुभवसिद्ध करून प्रस्तुत ग्रंथ रचतांना हा अनुभव त्यांस पुष्कळ उपयोगीं पडला असेल यांत संशय नाहीं. याखेरीज हेंही वाचकांस कळवण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं कीं, रा० मोडक यांचा पदार्थविज्ञान हा अत्यंत प्रिय विषय असून त्यांनीं त्यावर कोल्हापुरास सार्वजनिक व्याख्यानें दिलीं आहेत. अशा प्रसंगीं पुष्कळ प्रयोग त्यांनीं स्वत: करून साऱ्या लोकांस पाश्चात्य राष्ट्रांच्या विद्याप्रभावाविषयीं विस्मित करून टाकलें. सारांश, प्रस्तुत ग्रंथकारानें प्रकृत विषय आपल्या देशबंधूंस शिकवण्याचा पतकर जो आपणावर घेतला आहे तो केवळ अल्पस्वल्प ज्ञानाच्या जोरावर नसून तो घेण्याची योग्यता त्यानें आपले ठायीं चांगली आणली आहे हें वरील माहितीवरून आमच्या ध्यानांत चांगलें येईल.

५. आतां खुद्द ग्रंथाच्या गुणदोषांविषयीं विचार करावयाचा. प्रथमत: विषयाच्या संबंधानें. या सदरावर प्रस्तुतसारख्या पुस्तकांत फारसें विवेचन करण्यास जागा नसते हें थोडा विचार केला असतां वाचकांस तेव्हांच कळून येणार आहे. प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध केलेल्या प्रमेयांचें जें शास्त्र झालेलें असतें त्याची विवरणरीति प्राय: एकच असते. तींत वादास मुळींच स्थळ न राहून रसाचा प्रादुर्भाव होण्यासही बिलकुल अवकाश नसतो. गणिताच्या कोणत्याही शाखेवर रचलेल्या ग्रंथांत जसे कांहीं नियमित सिद्धांत असावाचे, कीं, ज्यांवर शंका घेण्यास अवकाशच राहत नसतो, व जे केवळ बुद्धीनें आकलन करावाचे असतात; त्याप्रमाणेंच रसायनादि सृष्टिविषयक शास्त्रांतील सिद्धताही अगदीं ठरलेल्या असून

त्यांचें विवरण करण्याचा प्रकार एकच असतो. कविता, कादंबरी, इतिहास वगैरे विषयांवरील ग्रंथांवर रसदृष्ट्या, युक्तिदृष्ट्या वगैरे जसें विवेचन करण्यास जागा असते, तशी भूमितीच्या किंवा भूगोलाच्या पुस्तकावर असत नाहीं हें उघड आहे. तर या कारणास्तव गुणदोषविवेचनाचें मुख्य स्थान जे ग्रंथविषय तें सोडून देऊन इतर संबंधानें सदरील पुस्तकाविषयीं विचार करूं.

६. या बाह्य विचारांपैकीं पहिला अगोदर भाषापद्धतीचा. या संबंधानें सांप्रत पुस्तकास नांव ठेवण्यास बिलकुल जागा नाहीं असें आह्मांस वाटतें. याची भाषासरणी अगदीं सुबोध आहे. विषय जरी इंग्रेजी आहे, व तो प्रौढ असल्यामुळें मोठमोठे संस्कृत शब्द घातले असतां जरी शोभणारें आहे, तरी धेडगुजरीचा किंवा आव्यतेचा प्रकार यांत बिलकुल आणला नाहीं. कोणाही सामान्य वाचकास सहज अर्थग्रहण व्हावें अशा तऱ्हेची त्याची रचना केली आहे. आतां एक मात्र आहे कीं, मराठींत प्रस्तुत शास्त्रांतील नांवें अद्याप कोणींही ठरवलीं नसल्यामुळें, साऱ्या पुस्तकभर इंग्रेजी शब्दांची गर्दी दृष्टीस पडते. केवळ मराठी भाषाच समजणारांस वरील परकी शब्द तर अत्यंत दुःश्राव्य होऊन ते त्यांच्या तोंडीं बसण्यासही पुष्कळ श्रम पडतील. त्याप्रमाणेंच 'गुरु कार्ब्यूरेटेड् हैद्रोजन्,' 'निर्जल नैत्रिक् आसिड्' वगैरे व्यभिचारी प्रयोग पाहून वाचकांस हसूं आल्यावांचूनही राहणार नाहीं. पण समंजस वाचक याबद्दलचा दोष ग्रंथकारावर ठेवणार नाहींत हें उघडच आहे. नव्याच विद्याप्रदेशांत प्रथमतः जो वाट काढील त्यास ती सुगम व सुखावह करतां न आली ह्मणून दूषण देणें बरोबर नाहीं. जो रस्ता सध्यां बिकट व अडचणीचा वाटतो तोच पुढें पायमळणीनें बराच सुधारेल; किंवा तिकडे रहदारी विशेष वाढली असतां तोच दुरुस्त केला जाऊन तेथें कदाचित् चांगली सडकही होईल

७. दुसरा विचार प्रकृत ग्रंथाच्या स्वतंत्र रचनेचा. वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं रा. मोडक यांनीं या विषयावरील अनेक ग्रंथांचें सतत पर्यालोचन करून सदरील पुस्तक तयार केलें आहे. यापूर्वी शास्त्रीय विषयांवर जे जे ग्रंथ झाले आहेत ते प्रायः भाषांतररूप असत. ही भाषांतराची पद्धत आलीकडे कांहीं कांहीं मोडत चालली आहे; ती अगदीं मोडून स्वातंत्र्यानें ग्रंथरचना करण्याचा प्रचार जेव्हां चोहोंकडे सुरू होईल तेव्हां एतद्देशीय भाषांस जोर येऊन खरी ज्ञानवृद्धि लोकांत होऊं लागेल. नेहेमीं आईच्या कडेवर वागणारें पोर जसें किचकट व किरकिरें होत जातें, पण तेंच जर आपल्या पायांनीं चालूं लागेल तर त्याची त्यासच हुशारी वाटायाला लागून तें बळकट होत जाईल; तशीच गोष्ट भाषेची व लोकस्थितीची आहे. तेव्हां प्रस्तुतसारख्या गहन शास्त्रीय विषयावर सदरील ग्रंथकारानें अगदीं स्वतंत्र रचना केली ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय होय. पण हा स्वतंत्रतेचा प्रकार केवळ ग्रंथकर्त्यास भूषणरूप व भाषाभिवृद्धीस अनुकूळ ह्मणूनच चांगला ह्मणायाचा असा अर्थ नाहीं; तर विषयरचनेच्या संबंधानें पाहतांही त्याचें महत्त्व फार आहे. तें असें कीं, स्वतंत्र ग्रंथ करायाचा ह्मटलें ह्मणजे विवक्षित विषय ग्रंथकारास पक्केपणीं समजावाच लागतो; तो न समजेल तर त्याची लेखणीच चालायाची नाहीं. पण तेंच भाषांतर असलें ह्मणजे गोष्ट निराळी पडते.

ग्रंथकर्त्यांची जबाबदारी मजकुरावरची तेव्हांच उडून फक्त भाषेच्या संबंधानेंच काय ती त्याची मालकी राहते. शिवाय देशभाषेंत एकाद्या विषयावर नवाच ग्रंथ करायाचा असला म्हणजे तो लोकस्थितीच्या अनुरोधानें लिहावा लागतो; म्हणजे वाचकांचा त्यांत कोणत्या रीतीनें अत्यंत सुलभ प्रवेश होईल, व कोणत्या प्रकारांनीं त्यांच्या मनावर तो उत्तम ठसेल, हें पाहावें लागतें. अशा दृष्टीनें भाषांतररूप ग्रंथ तर फारच थोड्या योग्यतेचा ठरेल.

८. सदरील पुस्तकांत दोनशांवर प्रयोग दिले आहेत, व त्यांची कृति नीट लक्षांत येण्याकरतां सुमारें शंभर सवाशें आकृति ग्रंथाच्या शेवटीं जोडल्या आहेत. या प्रयोगांस कोणकोणतें सामान लागेल त्याचीही याद किंमतीसकट सरतेशेवटीं दाखल केली आहे. ग्रंथकाराचे हातून वरील साऱ्या प्रयोगांच्या कृति अनेक वेळां साक्षात् होऊन गेल्या आहेत, यास्तव वरील सर्व सोयी त्यास अनायासानें करून ठेवतां आल्या. असें करण्यांत दोन तीन हेतु आहेत. एक तर प्रस्तावनेंत सांगितलाच आहे कीं, एतद्देशीय शाळांतून प्रस्तुत विषय जसा चालावा तसा चालत नाहीं, यास्तव प्रस्तुत पुस्तकाच्या साहाय्यानें तो चांगल्या तऱ्हेनें शिकवतां यावा. दुसरा असा आहे कीं, कोणा हौसदार विद्यार्थ्यास या शास्त्राची चट लागून स्वतः प्रयोग करण्याची जर इच्छा झाली, तर तीही शंभर सवाशें रुपयांत त्यास पुरवतां येऊन मौजेची मौज व माहितीची माहिती अशीं दोन्ही त्यास करून घेतां येतील. तिसरा उपयोगही लौकिक संबंधाचा एक फार मोठा करून घेतां येणार आहे. तो असा कीं, मोठमोठ्या शहरांतून वरील सामग्री जर आणून ठेवली, व पदार्थसंग्रहालयांतून पंचवीस प्रकारच्या शिंपा व पन्नास प्रकारचे शंख वगैरे जें समान ठेवलें असतें त्याच्या जागीं वरील प्रयोगाची सिद्धता करून ठेवलेली जर असली तर लोकशिक्षणाचा एक उत्तम मार्ग स्थापित केलासा होईल. असल्या कृत्यास जो खर्च लागेल तो वसूल होण्याची पंचाईत पडेल असेंही वाटत नाहीं. लोकांस अद्भुत चमत्कार पाहण्याची जात्या हौस असतेच, यास्तव ती पुरवण्यास सहज लोकाश्रय मिळण्याचा संभव आहे.

९. आतां प्रस्तुत ग्रंथाच्या एका गुणाविषयीं मात्र उल्लेख करायाचा राहिला आहे. तो हा कीं, त्यांत जेथें जेथें अवकाश सांपडला तेथें तेथें व्यावहारिक उदाहरणें देऊन पुष्कळ यांत्रिक व्यापारांची माहितीही प्रसंगवशात् दिली आहे. असें केल्याच्या योगानें दोन गोष्टी झाल्या आहेत. एक तर प्रकृत विषय वाचकांस सामान्यतः अपरिचित वाटण्यासारखा असल्यामुळें, व तो स्वरूपतःच कांहीं अंशीं रुक्ष असल्यामुळें, व्यावहारिक गोष्टींचा संबंध मधें मधें आल्यानें त्यास सुबोधता येऊन तो विशेष चित्तवेधकही झाला आहे. वस्तुतः पाहतां असला विषय साक्षात् प्रयोगदर्शनानेंच विद्यार्थ्यांच्या मनावर ठसायाचा व त्यांस गोड लागायाचा; पण तशी अनुकूलता किती थोड्यांस असणार ? सामान्य वाचक जे असला ग्रंथ वाचणार ते अर्थातच इतर पुस्तकांप्रमाणें केवळ मौजेखातर व विषयाची साधारण माहिती होण्याकरतां वाचणार. त्यांजपाशीं रसायनसामग्री कोठली ? व आहे असें जरी कल्पिलें तरी येवढी खटपट कोण करीत बसतो ? यास्तव मुख्य विषयाच्या अनुरोधानें व्यावहारिक गोष्टींचा संबंध सदरील पुस्तकांत वरचेवर आणला आहे ही चांगली योजना होय.

दुसरें असें कीं, आलीकडे आमच्या लोकांचें देशी माल उत्पन्न करण्याकडे बरेंच लक्ष लागत चाललें आहे. आजपर्यंत ज्या त्या गोष्टींत सरकारावर टेंकण्याची जी त्यांस संवय लागली होती ती सोडून देण्याचें त्यांस भाग पडत चाललें आहे. व उत्तरोत्तर तर 'आपल्या बळें बांधावी कास, आणि कोणाची करूं नये आस' या ह्मणीसच सर्वथा धरून चालण्याचें त्यांस अगत्य पडणार असा सुमार दिसतो. तर अशा स्थितींत प्रस्तुतसारख्या पुस्तकांत नुसतें शास्त्रीय विवेचन नसून व्यवहारोपयोगी अशा भिन्न भिन्न कलांच्या कृति व त्यांचे व्यापार यांविषयीं सविस्तर माहिती दिली आहे हें वाचकांस पसंत होईल यांत संशय नाहीं.

१०. आतां वरील उल्लेखाच्या उदाहरणार्थ सदहू ग्रंथांतील कित्येक स्थलें दाखवतों. हीं अवतरणरूपानें संपूर्ण दिलीं असतां अतिशयितच विस्तार होईल, यास्तव त्यांचा निर्देश मात्र येथें करतों. त्यावरून सदरील पुस्तकाच्या रचनेविषयीं वाचकांस बरीच कल्पना झाल्या- शिवाय राहणार नाहीं.

रसायनाचा सृष्टिविषयक बहुतेक शास्त्रांशीं थोडाबहुत संबंध आहेच आहे. यास्तव प्रसंगवशात् त्यांविषयीं प्रस्तुत ग्रंथांत बरेच लेख आढळतात. उदाहरणार्थ—

पृष्ठ १२३. यांत बाष्पोद्गमनादि व्यापारांचें निरूपण केलें आहे. नंतर 'पाणी' या सदराखालीं 'पर्जन्योदक', 'झऱ्याचें उदक', 'पाण्यांतील क्षारांचें प्रमाण काढण्याची रीति', 'नदीचें उदक', 'खनिजोदक', 'समुद्राचें पाणी', अशा निरनिराळ्या विभागांचें विव- रण केलें आहे.

पृष्ठ १२९. यांत हिऱ्याचें स्वरूप व धर्म हे सांगून त्यापुढें पृथ्वीतील अत्यंत नामां- कित जे 'कोहिनूर' वगैरे हिरे त्यांविषयीं माहिती दिली आहे. नंतर लकडी पेन्सिलीचा दगड, व दगडी, लांकडी, लोखंडी वगैरे कोळशांच्या जाती, यांविषयीं पुष्कळ तऱ्हेची सविस्तर माहिती दाखल केली आहे.

पृष्ठ १४९. यांत कार्बानिक् आसिड् वायूविषयीं विवेचन चाललें असतां वारा मोकळा खेळेल अशा तजविजीनें घरें बांधणें हें आरोग्यास किती अनुकूल होय, वनस्पति व प्राणी यांचें श्वासोच्छ्वसन परस्परांस कसें हितावह आहे, तुळशीच्या झाडांत कोणता अपूर्व गुण असतो वगैरे आगंतुक विषयांवर पुष्कळ विवरण केलें आहे, व कित्येक अत्यंत महत्त्वाच्या सूचना करून ठेवल्या आहेत.

पृष्ठ १६५–१७०. यांत वातावरणाचा विषय असून हवेचे घटक जे निरनिराळे वायु त्यांच्या संबंधानें पुष्कळ अवांतर माहिती दिली आहे.

आतां व्यवहारोपयोगी ज्ञान या पुस्तकापासून जें होणारें आहे त्याचे मासले दाखवतों.

प्रयोग ५३, ५४. यांत गुळाची पांढरी साखर करण्याच्या दोन तीन रीति सांगि- तल्या आहेत.

पृष्ठ १३८. यांत फिल्टर् ह्मणजे पाणी स्वच्छ व शुद्ध करण्याचें यंत्र कसें तयार करावें तें सांगितलें आहे.

पृष्ठ २११—२१४ यांत कापड पांढरें शुभ्र कसें करावें, व निरनिराळ्या रंगांचें बुट्टीदार कापड विलायतेंत जें तयार करतात तें कसें करतात हें सर्व सांगितलें आहे.

प्रयोग १३३, १३४. यांत कांचेवर नक्षीचें काम करण्याचा प्रकार दिला आहे.

पृष्ठ १३९. यांत रेशमी, लोंकरी, वगैरे वस्त्रांस रंगहीन ह्मणजे शुभ्र करण्याची रीत सांगितली आहे.

पृष्ठ २४९–५० टीप. हींत फोटोग्राफीविषयीं माहिती आहे; ह्मणजे सूर्यकिरणांच्या योगानें हुबेहुब तजबीर कशी उठते तो प्रकार समजावून सांगितला आहे.

प्रयोग १६३, १६४ यांत आगकाड्या करण्याची कृति सांगितली आहे. पहिल्या प्रयोगानें आवाज न होणाऱ्या काड्या तयार होतात, दुसऱ्यानें आवाज होऊन पेटणाऱ्या तयार करतां येतात.

पृष्ठ २७०–२७४. यांत कांचेविषयीं निरूपण केलें आहे. प्रथम सामान्यत: तिचें वर्णन असून नंतर 'खिडक्यांची कांच', 'शिशांची कांच', 'बोहिमियन् ग्लास्', 'गारेची कांच', व 'रंगीत कांच' इतक्या तऱ्हांविषयीं मजकूर आहे.

आतां प्रस्तुत पुस्तकांतले कांहीं चमत्कारिक प्रयोग दाखवतों. त्यांचें वर्णन वाचतां-नाही वाचकांस चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं; मग ते प्रत्यक्ष पाहिले असतां किती मौज वाटेल याची कल्पना वाचकांनींच करावी !—

पाण्यावर जाळ——————प्रयोग————८

पाण्यांत जाळ——————प्रयोग————१९

लोखंडावर तांबें चढवणें——————प्रयोग————२५

लोखंड जाळणें——————प्रयोग————३१

साबणाचे बुडबुडे——————प्रयोग————३७

विमान——————प्रयोग————३८

दारू-बत्तीशिवाय बंदुकीसारखा बार——————प्रयोग————४०

रसायन-संगीत——————प्रयोग————४३

पाण्याचें विद्युत्प्रवाहाच्या योगानें पृथक्करण——————प्रयोग————११४

वायुसंयोगजन्य पाणी——————प्रयोग————११२

पाण्याच्या गोठण्यानें लोखंडाचें भांडें फुटणें——————प्रयोग————५०

उत्कृष्ट कारंजें——————प्रयोग————९९

आग्या वेताळ——————प्रयोग————१५९

पाण्यावर आगीच्या लाटा——————प्रयोग————१६०

११. इतका निर्देश पुरे आहे. येवढ्यावरून टीकाविषयक पुस्तक कोणत्या तऱ्हेचें

रचलें आहे याचा कोणासही बराच अजमास करतां येईल. तसेंच वर त्याची जी तारीफ केली आहे ती केवळ 'मित्रनिष्ठे'च्या भरांत केली नाहीं याविषयींही बहुधां खात्री होईल. आमच्या देशांत विद्या वाङ्मयास व एतद्देशीय भाषांचा उत्कर्ष होण्यास काय झालें पाहिजे याविषयीं सदरील पुस्तकावरून आह्मांस एक कल्पना सुचते, तीही येथें प्रसंगवशात् लिहिल्यावांचून राहवत नाहीं. ती ही कीं, सध्यांच्या शिक्षणपद्धतीनें ' वेश्यानामिव विद्यानां मुखं कैः कैर्न चुंबितम्' हा प्रकार होऊन विद्याभ्यास ह्मणजे नेमक्या टप्यावर ओझें नेऊन पोंचवणाऱ्या हमालाचें काम अशी जी स्थिति झाली आहे, त्यापेक्षां ज्यास ज्या विद्येची हौस वाटेल व जिकडे त्याचा जात्याच कल असेल तिकडे व्यासंग करायास जर प्रत्येक जण मोकळा होईल तर आमच्या सरकारचा एतद्देशीयांस विद्यादान करण्यांत जो वास्तविक हेतु आहे तो विशेष सफल होणार आहे. असो; पण हा सरकारचा विचार आहे; व त्याविषयीं विवेचन करण्याची ही जागाही नव्हे. यास्तव सरतेशेवटीं आमच्या नव्या मंडळीस येवढीच सूचना करून आटपतों कीं, रा. मोडक यांचा या कामीं कित्ता उचलून एकेक जण आपापला काळ एकेका विषयाकडे किंवा कांहीं विवक्षित विषयांकडेच घालवण्याचा जर संकल्प करील व आपआपल्या व्यासंगाचें फळ कालांतरानें आपल्या देशबंधूंस सादर करण्याचें जर मनांत आणील, तर आजपर्यंतच्या अभिशापापासून ते मुक्त होतील, व देशभाषेचें कल्याण होऊन आजपर्यंत पाश्चात्य विद्या केवळ पांडित्य करण्यांतच जी प्रगट होत होती ती क्रियाद्वारां फलद्रूप होत्साती साऱ्या देशभर प्रगट होईल[1]!

---

## संस्कृत ग्रंथ.

येन धौता गिरः पुंसां विमलैः शब्दवारिभिः।
तमश्चाज्ञानजं भिन्नं तस्मै पाणिनये नमः॥[2]

अंक ८२—(१) कौमुदीमहोत्साह. (२) गद्यपद्यावलि. (३) भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश.

१. 'कौमुदीमहोत्साह,' 'गद्यपद्यावलि' व 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' हे

---

१. प्रस्तुत ग्रंथकाराचा पदार्थविज्ञानावरही एक ग्रंथ तयार झाला आहे. तो लवकरच छापून प्रसिद्ध करण्याची त्याची उमेद आहे. याशिवाय दक्षिणेंतील प्रांतांच्या प्राचीन इतिहासासंबंधीं माहिती पुष्कळ जमा करून महाराष्ट्र देशाचा प्राचीन इतिहास त्यांनीं अलीकडे लिहावास घेतला आहे. हाही कांहीं दिवसांनीं कदाचित प्रसिद्ध होईल.

२. "ज्यानें निर्मल शब्दजलांनीं मनुष्यांची वाणी धुऊन शुद्ध केली, व अज्ञानजन्य मतिभ्रमाचें निरसन केलें, त्या पाणिनीस नमस्कार असो!"

तीन ग्रंथ त्यांच्या कर्त्यांनीं आमच्याकडे पाठवल्यास आज बरेच दिवस झाले. सदरील अंकांत त्यांवर यथानुक्रम आह्मी आपला अभिप्राय वाचकांस सादर करतों.

**कौमुदीमहोत्साह**—हें त्रैमासिक पुस्तक मुंबई येथें रा० रामचंद्र भिकाजी गुंजी-कर व रा० काशीनाथ पांडुरंग परब यांनीं प्रसिद्ध करण्यास आरंभ केला आहे. सदरील अंक हा त्याचा पहिला खंड होय. असे पंधरा सोळा खंड होऊन हें पुस्तक समाप्त व्हावें असा त्याच्या प्रकाशकांचा अजमास आहे. प्रत्येक अंकाचीं पृष्ठें शंभर व्हावयाचीं असून किंमत एक रुपया ठेवली आहे. या मानानें पाहतां चार वर्षांच्या शेवटीं 'महोत्साहा'ची समाप्ति होऊन १६ रुपयांस १६०० पृष्ठांचा ग्रंथ वाचकांच्या हातीं येईल.

आतां प्रस्तुत पुस्तकाविषयीं विशेषतः निरूपण करण्यापूर्वी त्यांविषयीं सामान्यतः कांहीं लिहिणें अवश्य होय. या ग्रंथाचा विषय कोणता आहे हें बहुधा कोणासही सांगा-याला लागेल असें वाटत नाहीं. पाणिनिमुनीच्या सर्वप्रसिद्ध 'अष्टाध्यायी' नामक सूत्रात्मक ग्रंथावर अर्वाचीन प्रख्यात पंडित भट्टोजी दीक्षित[1] यांची 'कौमुदी' या नांवाची सर्वमान्य वृत्ति आहे हें संस्कृतज्ञांस माहीत आहेच. ही वृत्ति सुमारें दोन–अडीचशें वर्षांतली आहे. तरी इतकी अर्वाचीन असतां हिचें प्रामाण्य येवढें आहे कीं, सायणाचार्यांच्या वेदभाष्याप्रमाणें व मल्लिनाथी टीकेप्रमाणें तिची पंडितमान्यता तेव्हांच स्थापित होऊन तिच्यामुळें पूर्वींचे सर्व ग्रंथ लुप्त व्हावयाला लागून आजला तर बहुतेक बुडालेच आहेत. पूर्वींच्या 'काशिका'दि ज्या वृत्ति होत्या त्यांत मूळ 'अष्टाध्यायी'चाच क्रम धरून प्रतिसूत्रावर विवरण केलेलें असे. या विवरणाच्या पलीकडे कोणत्याही प्राचीन पंडिताची मजल गेली नाहीं. पण भट्टोजींनीं आपल्या पूर्वींच्या सर्व वैयाकरणांवर ताण करून मूळ पाणिनीयावर नवीन रचना केली. गीर्वाण भाषेचें तीन मुनींनीं * ज्या सूत्रजालानें निबंधन करून तीस सर्वथा नियंत्रित करून टाकली होती, त्याचें उद्घाटन करून वरील अर्वाचीन पंडितानें त्याचा मनोरम पट विणला, आणि सकल भुवनास वंद्य व समग्र भाषांस शिरोभाग व मूलभूत असणारी जी या देशाची पुरातन आर्यभाषा तीस त्याचें पवित्र प्रावरण घातलें. हा प्रकार या पंडितानें असा केला कीं, मूळ पाणिनीयावर प्राचीन दोन मुनींचे व पुढील अनेक पंडितांचे[2] जे अभिप्राय होते

१. दीक्षितांचें राहणें काशीस होतें. त्यांचे वंशीय जे कोणी तेथें आहेत त्यांस अग्रपूजेचा मान अद्याप चालत आहे. शिवाय असाही लोकप्रवाद ऐकण्यांत आहे कीं, त्यांचा संचार त्यांच्या खासगी वाड्यांत अद्याप असून पाणिनीयावरील शंकांचें समाधान त्यांजकडून अजूनही विद्यार्थ्यांस होत असतें !

* पाणिनि, कात्यायन व पतंजलि. 'सम्पादक'

२. पाणिनीच्या पुढील दोन मोठे वैयाकरण म्हटले म्हणजे कात्यायन व पतंजलि हे होत. पहिल्या मुनीनें 'अष्टाध्यायी'स परिशिष्टादाखल अनेक 'वार्त्तिकें' रचलीं; व दुसऱ्यानें सूत्रें व वार्त्तिकें यांची नीट व्यवस्था लावून 'महाभाष्य' नामेंकरून एक विस्तीर्ण ग्रंथ रचला. या तिन्ही वैयाकरणांच्या प्रमाणत्वाविषयीं 'यथोत्तरं मुनीनां प्रामाण्यम्' असें पंडितप्रसिद्ध वचन आहे.

[ पुढें चालू. ]

ते सर्व एकत्र करून ते आपल्या वृत्तीशीं ऊहापोहपूर्वक सामील केले, व विषयक्रमास अनुसरून सूत्रव्यवस्था केली. तेणेंकरून काय झालें कीं, पाणिनीचा मूळ ग्रंथ जो अत्यंत दुर्बोध व विषयाच्या संबंधानें संकीर्ण होता, तो या वृत्तीच्या योगानें सुगम होऊन विद्यार्थ्यांस व्यवस्थेवार शिकण्यास सुलभ झाला आहे.

वर 'सिद्धांतकौमुदी'स सुगम व सुलभ म्हटलें आहे यावरून कित्येक वाचकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, 'कौमुदी' हातीं धरली म्हणजे मूळ 'अष्टाध्यायी' अत्यंत व्यर्थ होणार आहे. पण असें केवळ म्हणतां येत नाहीं. संस्कृतांतील शास्त्रग्रंथांची सामान्यतः अशीच पद्धति आहे कीं, गुरुमुखावांचून त्यांत प्रायः प्रवेश होऊंच नये. व्याकरणास तर ही गोष्ट विशेषतः लागू पडणारी आहे. कां कीं, संस्कृतासारखी विस्तीर्ण व परिपक्व भाषा,–जींतील शब्दसंग्रह अपार व रूपांची साधनिकाही तशीच विचित्र–तींतील साऱ्या नियमांचा संग्रह ज्या ३९८३ सूत्रांत केला आहे, व ज्यांतही पुनः लाघवाविषयीं म्हणजे जितक्या थोड्या अक्षरांत नियम सांगतां येईल तितक्यांत तो आणण्याविषयीं अतिशयित यत्न केला आहे,[1] त्यांचे ठिकाणीं दुर्बोधता किती आली असेल, याची सहज कल्पना होईल! 'अष्टाध्यायीची' रचना किती बिकट आहे व तींत लाघवावर केवढा कटाक्ष ठेवला आहे, याविषयींचा प्रत्यय आरंभींच्या चौदा सूत्रांवरून तेव्हांच येण्यासारखा आहे. या सूत्रांस 'माहेश्वरसूत्रें'† अशी संज्ञा प्रसिद्ध आहे. याशिवाय एकाद्या वैयाकरणास एकादें अवघडसें सुबंतांतलें किंवा तिङंतांतलें रूप विचारलें असतां तें सिद्ध करण्यास केवढी खटपट करावी लागते, किती सूत्रांची अनुवृत्ति* करावी लागते, कितींची निवृत्ति¶ (निर्वृत्ति? सं०) करावी लागते, विभाषादिकांवर‡ किती लक्ष ठेवावें लागतें—हें सर्व ज्याच्या ध्यानांत असेल त्यास ही 'अष्टाध्यायी'रूप सूत्रजालाची रचना कशी असेल हें सहज समजेल. असो; तर असल्या सूत्रव्यूहाचा भेद करणें हें नुसत्या 'कौमुदी'वरूनही साध्य होणारें नव्हें. हें जाणून दीक्षितांनीं वरील ग्रंथावर 'मनोरमा' म्हणून एक निराळीच टीका लिहिली आहे.

वर जें सांगितलें त्यांवरून वाचकांच्या ध्यानांत येईलच कीं 'कौमुदी'वर प्रस्तुत पुस्तकांत जी मराठी टीका दिली आहे तिची सांप्रत काळांत अत्यंत अवश्यकता आहे. हें

---

' हरदत्त,' ' चंद्र,' ' भीमसेन ' इत्यादि आणखीही कित्येक वैयाकरणांचीं नावें 'कौमुदी'त मधून मधून आढळतात.

१. ' अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः ' ('सूत्ररचनेंत कोठें अर्धमात्रा जर कमी करतां आली तर वैयाकरणांस पुत्रलाभापासून व्हावा तसा आनंद होतो ') अशी एक वैयाकरणांची परिभाषा आहे.

† पाणिनि प्रथम 'ढ' होता. तप करून महेश्वरास (शंकरास) प्रसन्न करून घेऊन हीं चौदा सूत्रें मिळविलीं. म्हणून यांना माहेश्वरसूत्रें-शिवसूत्रें असें नांव आहे. यांस अक्षरसमाम्नाय असेंहि म्हणतात. 'सम्पादक'

* अनुवृत्ति=पूर्वींच्या नियमाचा पुढच्या वर अंमल चालणें. 'सम्पादक'

¶ निर्वृत्ति=' अनुवृत्ति 'च्या उलट=पूर्व नियमाचें पुढच्यास बंधन नसणें. 'सम्पादक'

‡ विभाषा=विकल्प (Option). 'सम्पादक'

तीन ग्रंथ त्यांच्या कर्त्यांनीं आमच्याकडे पाठवल्यास आज बरेच दिवस झाले. सदरील अंकांत त्यांवर यथानुक्रम आह्मी आपला अभिप्राय वाचकांस सादर करतों.

**कौमुदीमहोत्साह**—हें त्रैमासिक पुस्तक मुंबई येथें रा० रामचंद्र भिकाजी गुंजीकर व रा० काशीनाथ पांडुरंग परब यांनी प्रसिद्ध करण्यास आरंभ केला आहे. सदरील अंक हा त्याचा पहिला खंड होय. असे पंधरा सोळा खंड होऊन हें पुस्तक समाप्त व्हावें असा त्याच्या प्रकाशकांचा अजमास आहे. प्रत्येक अंकाचीं पृष्ठें शंभर व्हावयाचीं असून किंमत एक रुपया ठेवली आहे. या मानानें पाहतां चार वर्षांच्या शेवटीं 'महोत्साहा'ची समाप्ति होऊन १६ रुपयांस १६०० पृष्ठांचा ग्रंथ वाचकांच्या हातीं येईल.

आतां प्रस्तुत पुस्तकाविषयीं विशेषतः निरूपण करण्यापूर्वी त्याविषयीं सामान्यतः कांहीं लिहिणें अवश्य होय. या ग्रंथाचा विषय कोणता आहे हें बहुधा कोणासही सांगावयाला लागेल असें वाटत नाहीं. पाणिनिमुनीच्या सर्वप्रसिद्ध 'अष्टाध्यायी' नामक सूत्रात्मक ग्रंथावर अर्वाचीन प्रख्यात पंडित भट्टोजी दीक्षित[१] यांची 'कौमुदी' या नांवाची सर्वमान्य वृत्ति आहे हें संस्कृतज्ञांस माहीत आहेच. ही वृत्ति सुमारें दोन–अडीचशें वर्षांतली आहे. तरी इतकी अर्वाचीन असतां हिचें प्रामाण्य येवढें आहे कीं, सायणाचार्यांच्या वेदभाष्याप्रमाणें व मल्लिनाथी टीकेप्रमाणें तिची पंडितमान्यता तेव्हांच स्थापित होऊन तिच्यामुळें पूर्वीचे सर्व ग्रंथ लुप्त व्हावयाला लागून आजला तर बहुतेक बुडालेच आहेत. पूर्वीच्या 'काशिका'दि ज्या वृत्ति होत्या त्यांत मूळ 'अष्टाध्यायी'चाच क्रम धरून प्रतिसूत्रावर विवरण केलेलें असे. या विवरणाच्या पलीकडे कोणत्याही प्राचीन पंडिताची मजल गेली नाहीं. पण भट्टोजींनीं आपल्या पूर्वींच्या सर्व वैयाकरणांवर ताण करून मूळ पाणिनीयावर नवीन रचना केली. गीर्वाण भाषेचें तीन मुनींनीं * ज्या सूत्रजालानें निबंधन करून तीस सर्वथा नियंत्रित करून टाकली होती, त्याचें उद्घाटन करून वरील अर्वाचीन पंडितानें त्याचा मनोरम पट विणला, आणि सकल भुवनास वंद्य व समग्र भाषांस शिरोभाग व मूलभूत असणारी जी या देशाची पुरातन आर्यभाषा तीस त्याचें पवित्र प्रावरण घातलें. हा प्रकार या पंडितानें असा केला कीं, मूळ पाणिनीयावर प्राचीन दोन मुनींचे व पुढील अनेक पंडितांचे[२] जे अभिप्राय होते

१. दीक्षितांचें राहणें काशीस होतें. त्यांचे वंशीय जे कोणी तेथें आहेत त्यांस अग्रपूजेचा मान अद्याप चालत आहे. शिवाय असाही लोकप्रवाद ऐकण्यांत आहे कीं, त्यांचा संचार त्यांच्या खासगी वाड्यांत अद्याप असून पाणिनीयावरील शंकांचें समाधान त्यांजकडून अजूनही विद्यार्थ्यांस होत असतें !

* पाणिनि, कात्यायन व पतंजलि. 'सम्पादक'

२. पाणिनीच्या पुढील दोन मोठे वैयाकरण म्हटले म्हणजे कात्यायन व पतंजलि हे होत. पहिल्या मुनीनें 'अष्टाध्यायी'स परिशिष्टादाखल अनेक 'वार्तिकें' रचलीं; व दुसऱ्यानें सूत्रें व वार्त्तिकें यांची नीट व्यवस्था लावून 'महाभाष्य' नामेंकरून एक विस्तीर्ण ग्रंथ रचला. या तिघां वैयाकरणांच्या प्रमाणत्वाविषयीं 'यथोत्तरं मुनीनां प्रामाण्यम्' असें पंडितप्रसिद्ध वचन आहे.

[ पुढें चालू ]

ते सर्व एकत्र करून ते आपल्या वृत्तीशीं ऊहापोहपूर्वक सामील केले, व विषयक्रमास अनुसरून सूत्रव्यवस्था केली. तेणेंकरून काम झालें कीं, पाणिनीचा मूळ ग्रंथ जो अत्यंत दुर्बोध व विषयाच्या संबंधानें संकीर्ण होता, तो या वृत्तीच्या योगानें सुगम होऊन विद्यार्थ्यांस व्यवस्थेवार शिकण्यास सुलभ झाला आहे.

वर 'सिद्धांतकौमुदी'स सुगम व सुलभ झटलें आहे यावरून कित्येक वाचकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, 'कौमुदी' हातीं धरली म्हणजे मूळ 'अष्टाध्यायी' अत्यंत व्यक्त होणार आहे. पण असें केवळ म्हणतां येत नाहीं. संस्कृतांतील शास्त्रग्रंथांची सामान्यतः अशीच पद्धति आहे कीं, गुरुमुखावांचून त्यांत प्रायः प्रवेश होऊंच नये. व्याकरणास तर ही गोष्ट विशेषतः लागू पडणारी आहे. कां कीं, संस्कृतासारखी विस्तीर्ण व परिपक्व भाषा,–जींतील शब्दसंग्रह अपार व रूपांची साधनिकाही तशीच विचित्र–तींतील साऱ्या नियमांचा संग्रह ज्या ३९८३ सूत्रांत केला आहे, व ज्यांतही पुनः लाघवाविषयीं म्हणजे जितक्या थोड्या अक्षरांत नियम सांगतां येईल तितक्यांत तो आणण्याविषयीं अतिशयित यत्न केला आहे,[1] त्यांचे ठिकाणीं दुर्बोधता किती आली असेल, याची सहज कल्पना होईल ! 'अष्टाध्यायीची' रचना किती बिकट आहे व तींत लाघवावर केवढा कटाक्ष ठेवला आहे, याविषयींचा प्रत्यय आरंभींच्या चौदा सूत्रांवरून तेव्हांच येण्यासारखा आहे. या सूत्रांस 'माहेश्वरसूत्रें'† अशी संज्ञा प्रसिद्ध आहे. याशिवाय एकाद्या वैयाकरणास एकादें अवघडसें सुबंतांतलें किंवा तिङंतांतलें रूप विचारलें असतां तें सिद्ध करण्यास केवढी खटपट करावी लागते, किती सूत्रांची अनुवृत्ति* करावी लागते, कितींची निवृत्ति¶ (निर्वृत्ति ? सं०) करावी लागते, विभाषादिकांवर‡ किती लक्ष ठेवावें लागतें—हें सर्व ज्याच्या ध्यानांत असेल त्यास ही 'अष्टाध्यायी'रूप सूत्रजालाची रचना कशी असेल हें सहज समजेल. असो; तर असल्या सूत्रव्यूहाचा भेद करणें हें नुसत्या 'कौमुदी'वरूनही साध्य होणारें नव्हें. हें जाणून दीक्षितांनीं वरील ग्रंथावर 'मनोरमा' म्हणून एक निराळीच टीका लिहिली आहे.

वर जें सांगितलें त्यांवरून वाचकांच्या ध्यानांत येईलच कीं 'कौमुदी'वर प्रस्तुत पुस्तकांत जी मराठी टीका दिली आहे तिची सांप्रत काळांत अत्यंत अवश्यकता आहे. हें

---

* 'हरदत्त,' 'चंद्र,' 'भीमसेन' इत्यादि आणखीही कित्येक वैयाकरणांचीं नावें 'कौमुदी'त मधून मधून आढळतात.

१. 'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः' ('सूत्ररचनेंत कोठें अर्धमात्रा जर कमी करतां आली तर वैयाकरणांस पुत्रलाभापासून व्हावा तसा आनंद होतो') अशी एक वैयाकरणांची परिभाषा आहे.

† पाणिनि प्रथम 'ढ' होता. तप करून महेश्वरास (शंकरास) प्रसन्न करून घेऊन हीं चौदा सूत्रें मिळविलीं. म्हणून यांना माहेश्वरसूत्रें-शिवसूत्रें असें नांव आहे. यांस अक्षरसमाम्नाय असेंहि म्हणतात. 'सम्पादक'

* अनुवृत्ति=पूर्वींच्या नियमाचा पुढच्यावर अंमल चालणें. 'सम्पादक'

¶ निर्वृत्ति='अनुवृत्ति'च्या उलट=पूर्व नियमाचें पुढच्यास बंधन नसणें. 'सम्पादक'

‡ विभाषा=विकल्प (Option). 'सम्पादक'

भाषांतर या वेळेस जर न होईल तर 'अष्टाध्यायी,' व 'सिद्धांतकौमुदी' हे दोन्ही ग्रंथ कापडांत गुंडाळून पुस्तकालयशोभनार्थ 'झेंदावेस्तादि'§ * प्राचीन ग्रंथांच्या सोबतीला ठेवून द्यावे लागतील. प्रस्तुतचा काळ असा कांही चमत्कारिक तऱ्हेचा आहे कीं, एखादा मनुष्य कडेपठारावरून चालत असतां तो कड्याच्या काठावर असा येऊन ठेपावा, तशी आमच्या देशाची हरएक गोष्टीच्या संबंधानें आज स्थिति आहे. आमच्या विद्या, आमच्या कला, आमचे आचार वगैरे सर्व परराज्याच्या अमलाखालीं मलिन व्हावयाला लागून लवकरच त्यांचा समूळ नाश होईलसा दिसत आहे. हरएक विद्येंत निपुण असणारे विद्वान्, हरएक कलेंत वाकबगार असणारे कारागीर, यांस सांप्रत काळांत सरकारांतून तर नाहींच, पण लोकसमुदायाकडूनही आश्रय न मिळाल्यामुळें 'विनाश्रयं न शोभन्ते पण्डिता वनिता लताः'† या वचनाप्रमाणें त्यांचें दिवसादिवस मातेरें होत चाललें आहे. त्या त्या विद्येंत व कलेंत पूर्वीच्या सारखे नवे कोणी होत नाहींत हें तर काय, पण कोणी मुळीं होतच नाहींत. त्यामुळें सध्या जे जे तसे मनुष्य आहेत ते एकदां खपून गेले म्हणजे 'नवी विटी नवें राज्य' या म्हणीप्रमाणें कांहीं वर्षांनीं सगळा हिंदुस्थान खलत्वीत होऊन पूर्ण सुधारणा त्यांत प्रतिबिंबित होऊं लागेल! उदाहरणार्थ प्रकृत शास्त्र घ्या. पांचपंचवीस वर्षांत या शास्त्राच्या संबंधानें केवढें स्थित्यंतर झालें असेल! 'भाष्या'त अध्ययन केलेले, 'कौमुदी' मुखोद्गत असणारे किती पंडित इतक्या काळांत लयास गेले असतील! व्याकरणाच्या किती पोथ्या वाण्यांच्या घरीं जाऊन हिंगजिऱ्याच्या कामीं लागल्या असतील! आतां यापुढें तर 'कौमुदी,' 'शेखर' हीं नांवें सुद्धां ऐकूं येण्याचा संभव दिसत नाहीं. सध्यांच पाहिलें तर रस्तोरस्तीं भट्टोजी दीक्षित, नागोजी भट्ट या नांवाच्या ऐवजी भट्ट मोक्षमूलर, बोथलिंगाचार्य‡

§ झोरोआस्ट्रियन् ( Zoroastrian ) उर्फ पारशी लोकांचे प्राचीन धर्मग्रंथ. हे मूळचे एकवीस होते पण तिहींशिवाय बाकीचे आज उपलब्ध नाहींत. झेंद् किंवा झेंद (Zend) हें प्राचीन पारशी भाषेचें नांव होय. अवेस्त ( Avesta ) हे धर्मग्रंथ झेंद् भाषेंत आहेत व ती भाषा समजणें दुर्घट असल्यानें पुस्तकालयांतील शोभेचेच ग्रंथ ते होऊन राहिले आहेत. 'सम्पादक'

* १९०६–१९२० च्या दरम्यान खालील पांच पारशी धर्मग्रन्थांचें संस्कृत भाषांतर निर्णय-सागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध करण्यांत आलें आहे:—

(१) खुर्दे अवस्तार्थः (२) इजिस्नि (३) मइनीउ खरद (४) स्कंद-गुमानी-गुजार (५) अरदांग्वीरा. 'सम्पादक'

† वेली, स्त्रिया आणि विद्वान् लोक यांस आधारावांचून शोभा नाहीं. त्यांस स्वतंत्रपणें ( कोणाच्या तरी आधाराशिवाय ) उत्कर्ष पावतां येणार नाहीं. 'सम्पादक'

‡ बोथलिंगाचार्य ( Otto Von Bohtlingk ) हा प्रख्यात जर्मन् पंडित सेंट्पीटर्स्बर्ग् येथे १८१५ सालीं जन्मला. तेथीलच विद्यापीठांत ( १८३३–३५ ) प्राच्य भाषा ( विशेषतः आरबी, पारशी, संस्कृत ) शिकून त्यानें अध्ययन बर्लिन् व बॉन् ( Bonn ) येथें चालू ठेवलें. १८४२ सालीं रशियास परत जाऊन व मानाच्या अनेक जागा पटकावून १८८५ सालीं हा लीप्झिग्ला ( Leipsig ) परत आला व तेथेंच वारला ( १९०४ ). हा स्वरच मोठा भाषाशास्त्री

[ पुढें चालू ]

या शार्मण्य नामांचा आदेश कर्णप्रदेशावर आदळूं लागला आहे.'

मेथवर सांप्रत पुस्तकाच्या स्वरूपाविषयीं व उपयुक्ततेविषयीं वाचकांस कळवलें. आतां यांत विषयसंग्रह कोणता आहे याविषयीं लिहितों. प्रथमतः 'कौमुदी'च्या क्रमाप्रमाणें 'अष्टाध्यायी'तलीं सूत्रें लिहिलीं आहेत; त्याखालीं भट्टोजींची संस्कृत व्याख्या दिली आहे; तिच्या खालीं सदरील व्याख्येचा मराठी अर्थ केला आहे; आणि सरतेशेवटीं वरील अर्थ

---

होता. यानें छांदोग्य व बृहदारण्यक या उपनिषदांचें भाषांतर केलें असून पाणिनीच्या व्याकरणावरहि एक ग्रंथ लिहिला आहे. तथापि याचें सर्वांत अव्वाढव्य काम म्हणजे (Rudolf Roth) रूडॉल्फ् रौथ् आणि (Albrecht Weber) आल्बर्ट् वेबर् या दोघां स्नेह्यांच्या साह्यानें तेवीस वर्षें परिश्रम करून तयार केलेला प्रचंड संस्कृत कोश (Worterbuch) होय. याचे सात खंड (Volumes) आहेत. यज्ञविषयक पारिभाषिक शब्द व संहितेंतील इतर अनेक शब्द यांचे अर्थ, सूत्रें व ब्राह्मणें यांवरील टीकांचें काळजीपूर्वक अध्ययन न करतां, यज्ञप्रक्रियांची नीट माहिती घेतल्याशिवाय, व यज्ञकर्मविशारद वैदिकधर्मी ग्रंथकारांच्या मतांपेक्षां स्वतःच्या केवळ विद्वत्तेवरच आधारलेल्या अनुमानांना फाजील महत्त्व देऊन लिहिण्यांत आले असल्यामुळें विपुल संदर्भ व अवतरणें यांसाठीं कर्त्यानें घेतलेली दगदग किंचित् अस्थानीं झाली आहे अशा अर्थाचा अभिप्राय प्रख्यात युरोपीय संस्कृत पंडित थिओडोर् गोल्डस्टकर् (Theodor Goldstucker) यानें दिल्यामुळें कोशरचनाकौशल्याच्या परमावधीचा निर्दोष नमुना म्हणून या कोशाची मुक्तकंठानें स्तुतिस्तोत्रें गाणाऱ्या बर्लिनच्या बोट्लिंग्-भक्त पंडितांस राग आला. गोल्डस्टकर्ची टीका थोडी फाजील कडक तर खरीच; पण वेदांतील शब्दांचे अर्थ निश्चित करणाऱ्या कोशकारानें (तो कितीहि विद्वान् असला तरी) कौशिक-भाष्य, रावणभाष्य, सायणभाष्य यांसारख्या वेदांवरील विद्वत्ताप्रचुर टीकांत दिलेले अर्थ दडपून टाकण्यापेक्षां (चुकीचे वाटले तरी) ते देऊन मग आपला भिन्न अभिप्राय दाखल करावा हें अनेक दृष्टींनीं अधिक सयुक्तिक होय इतकें तरी सर्व सुविचारी माणसांस मान्य होण्यास हरकत नाहीं असें आम्हांस वाटतें. Bohtlingk खेरीज अलीकडे आमच्या प्राचीन संस्कृत ग्रंथांविषयीं भाषाशास्त्रदृष्ट्या वगैरे अविश्रांत मेहनत करणारे पाश्चात्य पंडितः—H. H. Wilson, Max Muller, Benfey, Roth, Rosen, Kuhn, Westergaord, Aufrecht, Schlegel, Rieu, Neve, Weber, Stensler, Burnouf, Colebrook, Bardelli, Pevie, Dindorf, Lachmann, Buhler, Winternitz, Kielhorn, Baker etc. 'सम्पादक'

१. व्याकरणाचीच काय पण एकंदर शास्त्रविद्येची स्थिति पाहिली असतां दिवसांदिवस 'विश्वगुणादर्शा'त कृशानूनें महाराष्ट्राविषयीं जें म्हटलें आहे तेंच पूर्ण प्रत्ययास येत चाललें आहे—

वेदव्यासः स नव* दश यो वेद वेदाक्षराणि
श्लोकं त्वेकं परिपठति यः स स्वयं जीव एव।
आपस्तम्बः स इह कलयेत्सम्यगौपासनं यः
कष्टं शिष्टक्षतिकृति कलौ कार्श्यमृच्छन्ति विद्याः॥

* 'इह' असाहि पाठ आहे. श्लोक १३८ वा, प्रकरण १२ वें पाहा. अर्थः—"या महाराष्ट्र देशांत वेदांतील (एक पुरा मन्त्र सुद्धां नव्हे तर) केवळ नऊ दहा अक्षरेंच जो जाणतो तो मूर्तिमान् वेदव्यास होय; जो (अनेक नव्हत तर) फक्त एकच श्लोक पाठ करतो तो बृहस्पति होय; व जो सांजसकाळचें होमकर्म समाधानकारक रीतीनें करतो तो आपस्तम्ब ऋषि होय. सभ्य लोकांचा नाश करणाऱ्या कलियुगांत वेदशास्त्रादिकांविषयींचें ज्ञान इतकें क्षीण झालें हो किती खेदाची गोष्ट आहे!"

'सम्पादक'

विशेष परिस्फुट करण्याकरतां टिपा दिल्या आहेत. कात्यायनाचीं 'वार्तिकें'§ जीं मधें मधें आलीं आहेत त्यांचा निर्देश दोन फुल्यांनीं करून व्याख्यानाची व्यवस्था मूळ सूत्रांप्रमाणेंच केली आहे. वरील चार चार सदरें स्पष्ट उमगण्याकरतां लहानमोठ्या ठशांची योजना केली आहे;—म्हणजे मूळ सूत्र फार मोठ्या अक्षरानें, संस्कृत वृत्ति त्याहून लहान, मराठी भाषांतर तिजहूनही बारीक, व टिपा सर्वांहून बारीक. इतर सूत्रांचा संबंध जेथें जेथें प्रसंगवशात् आला आहे त्यांचाही निर्देश सांकेतिक अंकांनीं केला आहे. हें इतकें मुख्य ग्रंथाविषयीं झालें. याखेरीज कित्येक उपग्रंथ परिशिष्टरूपानें जे जोडले आहेत ते येणेंप्रमाणें—

पाणिनिकृत——सूत्रपाठ, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन.
( किंवा )——शिक्षा.
शाकटायनकृत¶——उणादिसूत्रें.
शांतनवाचार्यकृत——फिट्सूत्रें.
कात्यायनकृत——वार्तिकपाठ.

या सर्व जुन्या ग्रंथांचा प्रस्तुत पुस्तकांत संग्रह करून शिवाय 'महोत्साह'कर्त्यांनीं 'अनुवृत्तिदर्पण,' व 'सूत्रसूच्या'दि वर्णानुक्रमपर परिशिष्टेंही जोडण्याचा विचार केला आहे. या उपग्रंथांपैकीं पहिला व दुसरा खंड१ मिळून संपूर्ण 'सूत्रपाठ' व 'गणपाठ' आणि 'अनुवृत्तिदर्पण' यांचे कांहीं भाग इतका विषय आज छापून निघाला आहे. या तिन्ही परिशिष्टांत विद्यार्थ्यांच्या सोयीकरतां विशेष सौलभ्य आणखी कांहीं करून ठेवलें आहे तें त्यांचें पर्यालोचन केलें असतां ध्यानांत येणारें आहे. खेरीज पहिल्या खंडांत दोन कोष्टकें घातलीं आहेत; एक प्रत्याहारांचें† व एक स्थानप्रयत्नांचें. हींही अध्ययन करणारांस पुष्कळ उपयोगीं पडणारीं आहेत.

प्रस्तुत पुस्तकाच्या विषयव्यवस्थेचें वर जें निरूपण केलें आहे, त्यावरून वाचकांच्या ध्यानांत येईलच कीं, संस्कृत व्याकरणाचें अध्ययन करणारास तो अतिशयित उपयोगी आहे.

---

§ "उक्तानुक्तदुरुक्तार्थव्यक्ति (चिन्ता) कारि तु वार्तिकम् ॥" किंवा 'वृत्तिरूपेण कृतो ग्रन्थः।' उक्त म्हणजे म्हटलेलें, अनुक्त म्हणजे न म्हटलेलें, विस्मरणानें राहिलेलें, आणि दुरुक्त म्हणजे अपुरें किंवा अर्धवट (घाईमुळें) म्हटलेलें या तीनहि प्रकारांचा अर्थ खुलासेवार स्पष्ट करण्याकरतां दिलेला पूरक नियम म्हणजे वार्तिक. 'वार्तिकें' हें नांव पाणिनीच्या सूत्रांवर कात्यायनानें दिलेल्या अर्थनिर्णायक नियमांसच लावण्याचा प्रघात आहे. 'सम्पादक'

¶ शाकटायन—हा सुप्रसिद्ध वैयाकरण व भाषाशास्त्री (शब्द-विकास-मीमांसक) असून पाणिनि व यास्क हे याचा वारंवार हवाला देतात. निरुक्तांतहि 'व्याकरणे शकटस्य च तोकं' असा उल्लेख आहे. 'सम्पादक'

१. 'कौमुदीमहोत्साहा'चा दुसरा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

† अनेक अक्षरें अगर प्रत्यय यांचा (थोडक्यांत सांगण्याकरतां) एकावयवी शब्दांत संक्षेप करणें. एकाच सूत्राचा अगर अनेक सूत्रांचा प्रत्याहार करणें असतां आद्य व अन्त्य अक्षरें एकत्र उच्चारावीं. असें:—'अइउण्' सूत्राचा प्रत्याहार 'अण्'. 'अइउण्, ऋऌक्, एओङ्, ऐऔच्' या चार सूत्रांचा प्रत्याहार 'अच्'. 'अच्'=सर्व स्वर; 'हल्'=सर्व व्यंजनें, 'अल्'=सर्व वर्ण. 'सम्पादक'

जुन्या पद्धतीप्रमाणें या शास्त्राचें साग्र परिज्ञान करून घेण्याची सोय दिवसांदिवस नाहींशी होत चालली आहे, यास्तव सदरील पुस्तकावरून तें यथावकाश सहज रीतीनें प्राप्त करून घेण्यास मार्ग झाला आहे. शिवाय या एका पुस्तकाचा संग्रह केल्यानें विद्यार्थ्यापाशीं पाणिनीची 'अष्टाध्यायी,' भट्टोजीची 'कौमुदी,' कात्यायनाचा 'वार्त्तिकपाठ,' व याखेरीज वर सांगितलेले 'गणपाठा'दि ग्रंथही संगृहीत होणार आहेत. तसेंच प्रसंगानुसार व्याकरण-नियम पाहूं जाणारास सूत्रादिकांचें सूचीपत्र जें येणार आहे तेंही फार उपयोगीं पडेल. हा केवळ विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें उपयोग झाला. याखेरीज नुसता जो बहुश्रुत वाचक आहे त्यास प्रस्तुत विषयांत खुद्द जरी प्रवेश होणार नाहीं, तरी सदहू पुस्तकांत टिपांच्या रूपानें जी अवांतर माहिती मधें मधें दिली आहे तिजपासून बरेंच ज्ञान होण्यासारखें आहे. संस्कृत भाषेच्या रचनेची त्यास थोडबहुत कल्पना होऊन प्राचीन वैयाकरणांच्या बुद्धिवैभवाची कीर्ति जी द्वीपांतरींही ऐकूं येते तिचें यथार्थत्व त्यास भासल्यावांचून राहणार नाहीं.

आतां सांप्रत त्रैमासिक पुस्तकाच्या प्रकाशकांनीं आपलें काम कोणत्या रीतीनें बजावलें आहे, त्यांच्या प्रकृत विवरणांत वगैरे न्यूनाधिक कांहीं आहे कीं नाहीं, याविषयीं येथें कांहीं निर्देश करणें अवश्य होतें. पण तें येथें होण्यास सवड नाहीं. कां कीं, मूळ 'कौमुदी'चा ज्यानें उत्कृष्ट अभ्यास केला असेल त्यासच वरील तारतम्य कळणार आहे. तितकी परिपक्वता प्रस्तुत पुस्तककारास अद्याप अनुकूळ नसल्यामुळें वरील विवेचन करवत नाहीं. तरी इतकें कळवण्यास संतोष वाटतो कीं पूर्वोक्त द्वितीय खंडाच्या शेवटीं कित्येक तदभिज्ञ पंडितांचे अभिप्राय जे लोकांस जाहीर केले आहेत त्यांवरून पाहतां हें काम उत्तम तऱ्हेनें चाललें आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. शिवाय ज्या वैयाकरणाच्या साह्या-वर हा उद्योग उपस्थित केला आहे त्यासही कोठून विद्याप्राप्ति झाली आहे हें लक्षांत आणलें असतां प्रकृत विवरण कसें उतरलें असेल याचा कोणासही सहज अजमास करतां येईल. यास्तव या संबंधानें येथें आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं. भाषापद्धतीच्या संबंधानें पाहिलें असतांही प्रस्तुत पुस्तकाची प्रशंसाच केली पाहिजे. विषयानुरूप भाषा प्रौढ योजली असून ती अनभिज्ञ वाचकांस जरी प्रथमतः कांहींशी दुर्बोध वाटेल तरी परिचयाच्या योगानें ती सुगम वाटायास लागेल, व तिची मार्मिकता व अर्थव्यंजकता त्यांच्या मनांत क्रमेंकरून भरेल यांत संशय नाहीं.

आतां सरतेशेवटीं 'प्राचीन वैयाकरणांशीं आपल्या देशबांधवांचा स्नेह करून देऊं इच्छिणाऱ्या' आमच्या मुंबईकर दोघां बंधूंच्या स्तुत्य परिश्रमाबद्दल त्यांची तारीफ करून व त्यांचा सदुद्योग निर्विघ्नपणें शेवटास जावा याविषयीं आशा प्रदर्शित करून हा लेख आटपतों. हा आटपतांना देशस्थितीच्या संबंधानें एक 'उत्साह'दायक विचार मनांत उद्भवतो तो येथें प्रगट केल्यावांचून राहवत नाहीं. तो हाच कीं, महाराष्ट्र-भाषेकडे आमच्या देशांतील विद्वानांचें आलीकडे बरेंच लक्ष लागून आमच्या जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होण्याचाही सुमार दिसूं लागला आहे. वेदशास्त्रांकडेही लोकांच्या मनाची प्रवृत्ति व्हावयाला लागून शोधकबुद्धीनें सर्व विषयांचा विचार करण्याची संवय त्यांस लागत चालली आहे. असाच

क्रम दिवसांदिवस चालू झाला असतां कालेंकरून लोकस्थितींत पुष्कळ फेर पडत जाईल यांत संशय नाहीं. आजपर्यंत केवळ पाश्चात्य विद्येचेंच सेवन केल्यामुळें,—व तेंही पुन: अल्पमात्र—जे विलक्षण ग्रह लोकांच्या मनास जडून जात, व उत्तरोत्तर स्वाभिमानामुळें बळावत जात, ते आतां हळूं हळूं झडत जाण्याचा समय येऊं लागला आहे. ही स्थिति एका तऱ्हेच्या लोकांस विशेष इष्ट वाटणार नाही खरी, व लोकशिक्षणाचा मूळचा जो उद्देश होता तो एकीकडेच राहून हें काय विलक्षण होत चाललें आहे म्हणून ते हाकाटी करतील, व करूंही लागले आहेत हें खरें; पण या देशाचें खरें कल्याण झालेलें पाहण्यांत ज्यांस संतोष वाटत असेल त्यांस वरील स्थित्यंतर अत्यंत अभिनंदनीय वाटल्याविना राहणार नाहीं. एकाच पारड्यांत सगळें वजन पडलें असतां तराजूची दांडी जशी अगदीं तिरपी होऊन कल खाते त्याप्रमाणें आजपर्यंत एतद्देशीय विद्वज्जनांची व तद्द्वारा सामान्यतः पुष्कळ लोकांच्या मनाची स्थिति असे. पण अलीकडे दुसऱ्या पारड्यांत जसजशी भर पडूं लागली आहे तसतशी वरील दांडी खालीं यावयाला लागून तिची वास्तविक अवस्था जी समांतरता ती स्थापित होण्याचा संभव उत्तरोत्तर दिसत आहे. तर या भारतवर्षाच्या साऱ्या हितचिंतकांनीं ही समतेची अवस्था जेणेंकरून दृढतर स्थापली जाईल तें करण्याविषयीं अवश्य झटलें पाहिजे. जुन्या विद्येंतून जे जे पारंगत होतील त्यांनीं ती किंवा निदान तिचें मर्म देशभाषांतून प्रसिद्ध करण्याचा उद्योग करावा, व एकंदर लोकांनीं त्यांस यथाशक्ति आश्रय देण्याचें मनावर घ्यावें. असें झालें असतां एकसमयावच्छेदेंकरून किती कार्यें उठणारीं आहेत पाहा!—एक तर देशभाषांची उत्कृष्ट सुधारणा होईल; दुसरें, लोकांस विद्येचे नवे मार्ग खुले करून दिलेसे होतील; तिसरें लोकांच्या मनावर जे विजातीय ग्रह चिरकाल स्थिर होऊन राहिले आहेत ते अनायासानें दूर होतील,—कां तर दिवा लावला असतां अंधारास घालवण्याची निराळी खटपट करायास नको, व दुसऱ्या बाजूस वजन घातल्यावर दांडीला खालीं ओढण्याची गरज नाहीं; आणि चवथें असें कीं, आमच्या जगद्वंदनीय पूर्वजांनीं आपल्या बुद्धीचे अपार विलास जे नानातऱ्हांनीं प्रगट केले आहेत,—कीं, जे आम्ही परम भाग्यवान् म्हणून आजपर्यंत अभंग राहिले व आम्ही देवाचे लाडके म्हणून ते पाहण्यास अद्याप जिवंत राहिलों आहों, नाहीं तर मिसरी, पारसिक, ग्रीक्, रोमन्, वगैरे लोकांप्रमाणें आमचें पर्यवसान केव्हांच होऊन जावयाचें,—त्यांचेंही लोकप्रसिद्धीनें चीज होणार आहे, व आपल्या कुलपरंपरेस आपण कालिमा लावलासा न होऊन प्राचीन ऋषिगणांच्या ऋणांतून चिरकाल मुक्त झालेसे होऊं![1]

---

१. वरील ऋणाचा उल्लेख केवळ अलंकारार्थ केला आहे असें नाहीं. प्रत्येक भारतवर्षीयावर तीन ऋणांचें ओझें आहे अशी पूर्वीपासूनच समजूत आहे. हीं ऋणें प्राचीन ऋषि, देवगण, व पितृवर्ग अशा तिघांचीं होत. पहिल्यापासून मुक्त होण्याचा मार्ग ऋषिप्रणीत शास्त्रांचें अध्ययन, दुसऱ्याचा मार्ग यजन, व तिसऱ्याचा संतान हे यथानुक्रम होत. कालिदासानें अजराजाविषयीं म्हटलें आहे—

[ पुढें चालू ]

गद्यपद्यावलि—या पुस्तकाचा सध्यां प्रसिद्ध झालेला पहिला भाग आमचे स्नेही रा० सखाराम रामचंद्र किर्लोस्कर यांनीं रचला आहे. दुसरा जो तयार होणें आहे त्यांत वेदांतील ह्मणजे उपनिषदांतील, ब्राह्मणांतील वगैरे कांहीं उतारे यावयाचे आहेत, व एकंदर दोहों भागांवर टिपा यावयाच्या आहेत. हा दुसरा भाग आजला प्रसिद्ध झाला असता, तर पहिल्याची पूर्णता होऊन एकंदर ग्रंथाच्या संबंधानें विवेचन करतां आलें असतें. पण तसा तूर्त योग दिसत नाहीं. यास्तव पहिल्या भागाविषयीं लिहिणें जरूर आहे.

या पुस्तकाविषयीं दोन दृष्टींनीं विचार करण्यासारखा आहे. एक शाळांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संबंधानें, व दुसरा सामान्य वाचकांच्या संबंधानें. पहिला विचार असा कीं, ग्रंथकर्त्यानें ज्यांच्या उपयोगीं पडण्याकरतां तो केला आहे त्यांस तो किती उपयुक्त होण्यासारखा आहे; व त्याप्रमाणेंच संस्कृताचें ज्याचें थोडेंबहुत अध्ययन झालें आहे अशा वाचकानें तो स्वतः हातीं घेतला असतां त्यास किती पसंत पडण्यासारखा आहे.

आतां प्रथमतः शाळांतून शिकवण्याविषयीं प्रस्तुत ग्रंथाची योग्यता या संबंधानें येथें जरी बरेंच लिहितां येणार आहे, तरी तसें करणें इष्ट दिसत नाहीं. कां कीं, एक तर तें आमच्या वाचकांस सामान्यतः कंटाळवाणें वाटणार आहे; व दुसरें असें कीं, सरकारी शाळांसंबंधीं चर्चा करण्याचें हें पुस्तक नव्हे. यांत फक्त सामान्यतः लोकांच्या संबंधाचें जें तेवढ्याविषयींच उल्लेख आजपर्यंत करण्यांत आले आहेत, व असलेच उल्लेख एकंदर लोकांसही समजण्यासारखे होत. सरकारी शाळांची कशी काय व्यवस्था असते व तेथील विद्यार्थ्यांच्या मानानें कोणत्या तऱ्हेचीं पुस्तकें तेथें चालणें जरूर आहे याविषयीं या पुस्तकांत उठाठेव करणें ह्मणजे एक तर 'अव्यापारेषु व्यापार' होणार; व शिवाय ज्यांच्या उपयोगार्थ हें पुस्तक चाललें आहे त्यांचाही वरच्यासारखाच टपका पुस्तककर्त्यावर येणार. यास्तव या सदराच्या संबंधानें येथें इतकेंच लिहिणें बस आहे कीं, संस्कृत पहिल्या व दुसऱ्या बुकांच्या पुढें काठिन्याच्या मानानें व मजकुराच्या योग्यतेच्या--मानानें पाहतां अशासारख्याच पुस्तकाची योजना ठीक होणारी आहे. जो पहिल्या व दुसऱ्या पुस्तकांतून पारंगत झाला आहे त्याच्या अंगीं हें वाचण्याची योग्यता क्रमानेंच येणारी आहे. यांतील पाठ अनुक्रमानें एकाहून एक अवघड असे घातले आहेत. हे सकृद्दर्शनीं जरी वाचकांस कदाचित् बरेच कठिण लागतील, तरी प्रत्येक पाठाचा संदर्भ समजला असतां व दुर्बोध शब्दांवर व अपरिचित् व्याकरणरूपांवर भरपूर टिपा असतां ते बरेच सुबोध होतील असें आह्मांस वाटतें. यास्तव ग्रंथकारास आमची अशी सूचना आहे कीं, प्रस्तावनेंत सुचवल्याप्रमाणें दुसरा भाग

---

ऋषिदेवगणस्वधाभुजां श्रुतयागप्रसवैः स पार्थिवः।
अनृणत्वमुपेयिवान् बभौ परिधेर्मुक्त इवोष्णदीधितिः ॥* रघुवंश ८-३०.

*अध्ययन, यज्ञ आणि सन्तान या तीन साधनांनीं अनुक्रमें ऋषि, इंद्रादि देव आणि स्वधाभुज् ह्मणजे पितर यांच्या ऋणांतून अजराजा मुक्त झाला; आणि धुक्याच्या खळ्यांतून मुक्त झालेला सूर्य जसा (संपूर्ण तेजानें) प्रकाशतो तसा शोभूं लागला. 'सम्पादक'

तयार करण्यास त्यानें अनमान करूं नये. तो प्रसिद्ध न झाल्यास मात्र सध्यांच्या भाषेचा कर्त्ता अधिक उपयोग नाहींसा होणार आहे.

दुसरा विचार केवळ सामान्य वाचकांच्या संबंधानें. असले लोक अद्याप आमच्या देशांत फार थोडे आहेत असें ह्मणण्यास हरकत नाही. जुन्या पद्धतीनें शिकलेले जे शास्त्री लोक ते तर आलीकडे सर्वथा मागेंच पडत चालल्यामुळें, व असल्या पुस्तकांविषयीं त्यांस अभिरुचिही विशेष नसल्यामुळें, त्यांच्यांत संस्कृत ग्रंथ वाचीत बसण्याचा नाद कितपत आढळण्याचा संभव आहे हें उघडच आहे. नव्या पद्धतीनें ह्मणजे आलीकडे शाळांतून व विद्यालयांतून तयार होणारी जी नवीन उमेदवार मंडळी त्यांच्यांत पाहिलें तरी वरीलच अभाव निराळ्या तऱ्हेनें दृष्टीस पडतो. तो असा कीं, त्यांच्या अंगीं नूतन शिक्षणपद्धतीच्या योगानें रसिकता विशेष येण्याचा जरी संभव असतो, तरी विद्यालयांतून सुटल्यावर आलस्यदेवतेची सामान्यतः त्यांच्यावर अशी भरपूर कृपा होते कीं, विद्यापर्वतावरील नऊ देवतांपैकी कोणतीच त्यांच्या मर्जीस उतरत नाहीं; नाहीं ह्मणण्यास वेदस् व रहीनम् यांजवर मात्र त्यांची भक्ति जडते.[1] असो; पण हीही स्थिति पालटण्याचा आलीकडे रंग दिसूं लागला आहे ही संतोषाची गोष्ट होय; व ती जसजशी पालटत जाईल तसतशी प्रस्तुतसारख्या ग्रंथांची चहाही विशेष होणार आहे हें उघड आहे. असल्या वाचकांस सदरील ग्रंथ हा मराठी 'नवनीता'प्रमाणें उपयोगीं पडेल. त्यांत जसे पहिल्यापासून शेवटपर्यंत साऱ्या महाराष्ट्र-कवींच्या ग्रंथांतील वेंचे दिले आहेत व ते वाचल्यानें साऱ्या कवींच्या वाणीचा अनुभव घडून एकंदर कवितेविषयी कल्पना करतां येते; त्याप्रमाणेंच प्रस्तुत पुस्तकावरूनही संस्कृतांतील निरनिराळ्या कवींच्या गुणांचें ज्ञान होऊन एकंदर कवितेचें स्वरूपही समजून येणारें आहे. अगदीं आदिकवीपासून,‡ किंबहुना त्याच्याहूनही प्राचीन जे वैदिक कवि त्यांच्यापासून, तों थेट जगन्नाथरायापर्यंत बहुतेक मोठमोठ्या कवींच्या ग्रंथांतले उतारे 'गद्यपद्यावलीं'त आले आहेत.'रघुकिराता'दि§ मोठाली सर्वमान्य काव्यें;'शाकुंतल,' 'उत्तररामचरित'

१ 'पार्नेसस्' ह्मणून एक ग्रीस देशांत पर्वत आहे. त्यावर नऊ विद्यादेवतांचा वास ग्रीक लोक कल्पीत. या देवता कविता, इतिहास, हास्यप्रधान नाटक, शोकप्रधान नाटक, चित्रविद्या, संगीत, व इतर शिल्पकला यांवर अधिकृत असत. वर सांगितलेल्या शेवटल्या दोन देवतांचा अधिकार मद्य व शृंगार यांवर असे.

‡वाल्मीकि. पाहाः— मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ॥
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥

उत्तररामचरितम् २,५.

प्रेमवेड्या क्रौंच पक्ष्यांच्या जोड्यापैकीं एकाला मारणाऱ्या व्याधाला पाहून दुःख झाल्यामुळें वाल्मीकीनें त्याला छंदोबद्ध शाप दिला कीं,'तुला कधींहि समाधान लाभणार नाहीं. कारण तूं त्या पक्ष्याचें समाधान नाहींसें केलें आहेस.' "श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः" त्याचा शोक उपरिनिर्दिष्ट श्लोकरूपानें (अनुष्टुप् छंदांत) प्रकट झाला. त्यावर ब्रह्मदेवानें रामचरित कवितारूपानें तयार करण्यास त्याला सांगितलें व त्यामुळें संस्कृतांतील 'आद्य काव्य' जें रामायण तें जन्मास आलें. 'सम्पादक'

§ रघुवंश, कुमारसंभव हीं दोन कालिदासाचीं, भारवीचें किरातार्जुनीय, माघाचें शिशुपालवध,

इत्यादि रसिकप्रिय नाटकें; 'कादंबरी,' 'दशकुमारचरित' वगैरे गद्यप्रबंध; 'सर्वदर्शनसंग्रह',§ 'ब्रह्मसूत्रभाष्य' यांसारखे वेदांतविषयक ग्रंथ, अशा मोठमोठ्या प्रकरणांपासून तों 'हितोपदेश', 'पंचतंत्र', 'चाणक्यशतक,'* अशा अत्यंत सुबोध ग्रंथांपर्यंत सर्वांचें पर्यालोचन करून, त्यांतील यांत वेंचे काढले आहेत. शिवाय 'घटकर्परांतले† यमकबद्ध श्लोक,' 'भट्टिकाव्यां-'¶ तलीं व्याकरणोदाहरक पद्यें, 'गीतगोविंदां' ‡तलीं तालसुरांवर म्हणायाचीं गीतें, अन्योक्त्यादि सुभाषितें, जुन्या संस्कृत चालीचीं पत्रें, हे प्रकार सुद्धां त्यांत आणले आहेत. सारांश, प्रस्तुत ग्रंथाचें समग्र अध्ययन झालें असतां अपरिचित असा संस्कृत कवितेचा भाग फार करून थोडाच राहील!

---

व श्रीहर्षाचें नैषधीय हीं पांच काव्यें पंचमहाकाव्यें म्हणून रूढ आहेत. कित्येक जण कालिदासाचें खंडकाव्य मेघदूत, तर दुसरे कित्येक भट्टिकाव्य हेंहि सहावें महाकाव्य मानतात. पण यांशिवाय रत्नाकर नामक काश्मिरी कवीचें प्रचंड (पन्नास सर्गांचें) हरविजय काव्य, आणि विक्रमार्कदेवचरित अशीं आणखीहि दोन महाकाव्यें आहेत. 'सम्पादक'

§ सायणाचार्यांचे बंधु माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य यांनीं चवदाव्या शतकांत हा ग्रंथ लिहिला. १ चार्वाक (लोकायत) २ बौद्ध (यांतच योगाचार, माध्यमिक, सौत्रांतिक, वैभाषिक असे आणखी चार भेद आहेत.) ३ जैन (अर्हत्, दिगम्बर) ४ रामानुज (नारदीय पांचरात्र, भागवत) ५ पूर्णप्रज्ञ (उत्पादक आनंदतीर्थ, पूर्णप्रज्ञ व माधव) ६ नकुलीशपाशुपत (माहेश्वर) ७ शैव ८ प्रत्यभिज्ञ ९ रसेश्वर १० वैशेषिक (कणाद) ११ नैयायिक (न्याय, कर्ता गौतम ऊर्फ अक्षपाद) १२ जैमिनि (पूर्व—किंवा कर्म—मीमांसा) १३ पाणिनि १४ सांख्य (कपिल) १५ योग (पतञ्जलि) १६ शांकर. अशा सोळा दर्शनांचें विवेचन प्रस्तुत ग्रंथांत असून प्रत्येक दर्शनाचें विवेचन करतांना आपण केवळ त्याचेच अनुयायी आहों अशी अलौकिक तादात्म्यबुद्धि व समता विद्यारण्यांनीं प्रकट केली आहे. या सोळा दर्शनांत व्यासांच्या (उत्तरमीमांसा, ब्रह्ममीमांसा, शारीरक मीमांसा या नांवांनींहि प्रसिद्ध असलेल्या) वेदान्त ऊर्फ अद्वैत दर्शनाचा उल्लेख नाहीं, पण तें अतिशयित महत्त्वाचें आहे.

'सम्पादक'

* केवळ बोधवचनमय अशी जी फार थोडी स्वतंत्र संस्कृत कविता आहे, तींतच विख्यात नीतिपटु चाणक्य याच्या 'चाणक्य–शतका'चा अंतर्भाव होतो. 'सम्पादक'

† कलकत्त्याचे श्रीजीवानन्द विद्यासागर भट्टाचार्य यांनीं प्रसिद्ध केलेल्या काव्यसंग्रहांत हें घटकर्परयमककाव्य आलें आहे. याचे फक्त २२ श्लोक आहेत. शिवाय 'नीतिसार' हें २१ श्लोकांचें काव्यहि याचेंच आहे. पाहा:—

जीयेय येन कविना यमकैः परेण तस्मै वहेयमुदकं घटकर्परेण ॥ 'घटकर्परकाव्य २२' "सम्पादक"

¶ श्रीधरसेन अगर त्याचा पुत्र नरेंद्र याच्या कारकिर्दींत सहाव्या शतकांत उदयास आलेला वलभीचा राहणारा श्रीस्वामींचा पुत्र भट्टि, यानें व्याकरणाच्या नियमांचा खुलासा करणारीं शब्दरूपें देऊन तयार केलेलें २२ सर्गांचें हें रामचरित्रवर्णनपर काव्य कालिदासाचें आहे. असें कित्येक टीकाकारांनीं मानलें आहे. 'सम्पादक'

‡ लक्ष्मणसेन राजाच्या कारकिर्दींत (बाराव्या शतकांत) बंगालच्या वीरभूमि जिल्ह्यांतील कवि जयदेव यानें राधाकृष्णांचा प्रणय, त्यांची तात्पुरती ताटातूट व पुनर्मीलन या विषयावर आत्मगत भाषणांनींच युक्त असें हें सुमधुर पद्यमय नाटक रचलें आहे. 'सम्पादक'

असो; तेव्हां एकंदरींत रा० किर्लोस्कर यांनीं संस्कृत विद्यार्थ्यांची एक मोठी उणीव दूर केली, व गीर्वाणकवितारूप महोद्यानाची रम्य शोभा संपूर्ण दृष्टिगोचर होई अशा प्रकारची नवी वीथिका त्यांत निर्माण केली, याबद्दल वरील भाषेच्या पुरस्कर्त्यांनीं व सकल विद्यावृद्धीच्छु जनांनीं त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. वरील वीथिकेस सर्वगम्य करण्याकरतां काय केलें पाहिजे हें वर सुचवलेंच आहे. आतां सरतेशेवटीं येवढेंच कळवतों कीं, प्रो० भांडारकर यांच्या पहिल्या व दुसऱ्या पुस्तकांच्या साग्र अध्ययनानें संस्कृत भाषेची व्युत्पत्ति प्राप्त होते असें ह्मणण्यास जशी हरकत नाहीं, त्याप्रमाणेंच प्रस्तुत गद्यपद्यात्मक ग्रंथाचें पारायण केलें असतां त्या भाषेंतील काव्यग्रंथांचीही विद्यार्थ्यांस चांगली माहिती होईल असें ह्मणण्यास फारसा बाध दिसत नाहीं.

---

**भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश**—हा ग्रंथ रा० रघुनाथ भास्कर गोडबोले, 'मराठी भाषेचा नवीन कोश' व 'हंसकोश' यांचे कर्ते, यांनीं रचला आहे. वरील दोन्ही कोश हल्लीं प्रसिद्ध नाहींत. पहिला तर डिपोंतल्या डिपोंतच आहे; व दुसरा दहा बारा वर्षांपूर्वी कांहीं प्रसिद्ध होता. तो आतां नाहींसा झाल्यासारखाच आहे. पहिला कोश अव्वल इंग्रेजींत कांहीं शास्त्रीमंडळीनें जो एक मोठा मराठी कोश तयार केला होता त्याचा संक्षेप होय; व दुसऱ्यांत 'ज्ञानेश्वरी' वगैरे जुन्या ग्रंथांतून आढळणाऱ्या शब्दांचा मुख्यतः संग्रह आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा ज्यास इंग्रेजींत 'क्लासिकल् डिक्शनरी' ह्मणतात अशा तऱ्हेचा होय. असे कोश इंग्रेजी भाषेंत ग्रीक् व ल्याटिन् भाषांच्या संबंधाचे अनेक आहेत; ह्मणजे प्राचीन ग्रीक् व रोमन् ग्रंथांतून अनेक देवतांविषयीं, उपदेवतांविषयीं, ऐतिहासिक पुरुषांविषयीं वगैरे जे जागोजाग उल्लेख आढळतात ते व्यक्त होण्याकरतां वरील भाषांच्या अभिज्ञांनीं वर सांगितलेले कोश रचले आहेत. त्याप्रमाणेंच आलीकडे इंग्रेजी भाषेंतील ग्रंथांची परिस्फुटता होण्याकरतां इंग्रेजी काव्यांतील व कादंबऱ्यांतील वगैरे नांवांचा निर्देश केलेले कोशही[१] तयार झाले आहेत. हें तर काय, पण 'पवित्र शास्त्र' प्रत्यहीं किंवा निदान शाबाथाच्या* दिवशीं तरी वाचण्याचा जरी ख्रिस्ती लोकांचा संप्रदाय आहे तरी त्याचें अनुसरण

---

१. वेब्स्टर्च्या इंग्रेजी कोशास जोडलेल्या ज्या अनेक पुरवण्या आहेत त्यांपैकीं एक पुढील आहे—Vocabulary of Noted Names of Fiction &c.: त्याप्रमाणेंच आलीकडे Dictionary of Phrase and Fable म्हणून एक कोश प्रसिद्ध झाला आहे हें पुष्कळांस माहीत असेलच.

* Sabbath—परमेश्वरानें आज्ञापिलेला विश्रांतीचा दिवस. ख्रिस्ती लोक आठवड्याच्या सुरवातीचा दिवस–रविवार हा विश्रान्ति–दिन मानतात; ज्यू लोक शेवटचा म्हणजे शनिवार मानतात; तर मुसलमान शुक्रवार मानतात. ज्यू लोक तर दर सात वर्षांनीं एक वर्ष जमीन पेरीत नसत. त्या वर्षास Sabbatical Year म्हणत. इंग्लंडांत या 'साबाथ्'च्या दिवशीं काम करणारांस कायद्यानें

( पुढें चालू )

वस्तुत: कितपत होत असेल याचें प्रमाण 'डिक्शनरी ऑफ् बायबल् नॉलेज्' ('पवित्र शास्त्रासंबंधीं माहितीचा कोश') अशासारख्या ग्रंथांवरून बरेंच धरतां येणार आहे. असो, रा० गोडबोले यांनीं गेलीं सात वर्षें परिश्रम करून प्रस्तुत कोशरचनेचा जो उद्योग केला आहे तो अशाच तऱ्हेचा होय. 'रामायण', 'महाभारत', 'भागवत' व 'मत्स्य-ब्रह्मांडा'दि पुराणें यांत जे जे वृत्तांत आहेत ते वाचकांस सदरील ग्रंथावरून उपलब्ध होणार आहेत. अशा तऱ्हेचा कोश अद्याप कोठेंही झालेला नाहीं;[1] आणि त्यांतून मराठींत तर तो केवळ अपरूपच आहे. शिवाय हीही गोष्ट सामान्य आहे असें नाहीं, कीं जी लोकसेवा खरोखरी पाहतां कोणा नव्या उमेदवार विद्वानांच्या हातून व्हावयाची, ती प्रस्तुत ग्रंथ-कारासारख्या जुन्या चालीच्या एकट्या विद्वानानें मनांत आणून उतार वयांत वर्षानुवर्षं खपून लोकाश्रयाची किंवा राजाश्रयाची चिंता बिलकुल न करतां मुकाट्यानें तडीस नेऊन पोंचवावी ! या गोष्टीवरून केवळ उदासीनपणें सतत पडून राहणाऱ्या आमच्या जुन्या पंडि-तांनीं कांहीं उपदेश घेण्यासारखा आहेच; पण विशेषेंकरून आमच्या तरुण विद्वानांस—कीं, ज्यांच्या देशहितविषयक प्रलापांत शरन्मेघांच्या गर्जनेप्रमाणें गांभीर्य मात्र असून त्यांच्या विद्वत्तेचें चीज काय तें एकाद्या सभेची चिटणिशी किंवा पोतनिशी पतकरण्यांतच बहुधां झालेलें दृष्टीस पडतें,—त्यांस तर वरील गोष्टीचा चटकाच लागून जावा !

आतां प्रथमतः प्रकृत कोशाची रचना कशी केली आहे ती सांगून नंतर त्यांतील गुणदोषांविषयीं विवेचन करूं. यांतील सारीं नांवें विल्हेवारीनें ह्मणजे अकारापासून ज्ञकारा-पर्यंत वर्णानुक्रमानें दिलीं आहेत, हें 'कोश' या नांवावरून तर सिद्धच आहे. यास्तव जो शब्द पाहायाचा असेल तो वरील क्रमानें सांपडेल. कधीं कधीं एकच नांव अनेकांचें वाचक असल्यामुळें एकाच शब्दाखालीं त्याचे अनेकार्थ दिले आहेत. या अर्थात जेथें जेथें विशेष कारण दिसलें तेथें तेथें त्या त्या ग्रंथाचा, पर्व, कांड, अध्याय इत्यादिपूर्वक निर्देश केला आहे. कोठें कोठें तर कार्यपरत्वें कांहीं कांहीं श्लोकांचे उतारेही घेतले आहेत. या ग्रंथाचें संज्ञापत्र पाहिलें असतां सहज कळून येईल कीं, यांत मुख्यतः तीन ग्रंथांतील नांवें भरपूर आलीं आहेत—एक रामायण, दुसरें भारत, व तिसरें भागवत. त्यांतून भारतावर तर कोशकाराचा विशेषच कटाक्ष आढळतो. त्यांत असणाऱ्या साऱ्या कथांचा त्या त्या नांवापुढें सविस्तर उल्लेख करून, देशमर्यादा, नदी-पर्वतादिकांची स्थानें हींही वरील ग्रंथाचाच

---

शिक्षा आहे. "**No person is allowed to work on the Lord's day, or use any boat or barge, or expose any goods for sale, except meat in public houses, milk at certain hours, & works of necessity or charity, on forfeiture of 5 shillings.**" 'सम्पादक'

१. आलीकडे मद्रासेस प्रसिद्ध झालेला एक इंग्रेजी कोश मात्र अशा तऱ्हेचा आहे. याचें नांव 'Garret's Classical Dictionary of India' असें आहे. याची रचना टीकाविषयक कोशा-हून पुष्कळ प्रकारें निराळी आहे.

मुख्यतः आधार धरून त्यानें निश्चित केलीं आहेत. पुराणांपैकीं मत्स्य, लिंग, ब्रह्मांड, व स्कंद यांतून; व जैमिनी अश्वमेध, ब्रह्मोत्तरखंड इत्यादि कांहीं इतर ग्रंथांतूनही सदरील कोशास मजकूर घेतला आहे. यांच्याखेरीज आणखी दुसरीं जीं पुष्कळ पुराणें आहेत त्यांतूनही सदरील कोशास आणखी भर पडली पाहिजे होती; पण एक तर हीं सर्व हल्लीं दुर्लभ झालीं आहेत; दुसरें तीं सर्व वाचून कोशरचनेचा श्रम करणें ही कांहीं सामान्य दगदग नव्हे; व तिसरें असें कीं, तीही कोणी केली तरी तिजपासून तादृश उपयोगही नाहीं; यास्तव वरील न्यूनता कोणास विशेष भासणार नाही. असले कोश ज्या हेतूस्तव रचले असतात तो, सदरील ग्रंथ हल्लीं जेवढा आहे तेवढ्यावरूनही पूर्णपणें सिद्ध होणार आहे.

वरील स्वरूपवर्णनावरून प्रस्तुत कोशाचा उपयोग काय काय होणार आहे तें सहज लक्षांत येईलच. एक मोठा उपयोग तर हा उघडच आहे कीं, जुने संस्कृत किंवा मराठी ग्रंथ वाचतांना पौराणिक कथांच्या संबंधानें जेथें वाचकांस अडचण पडेल तेथें या ग्रंथापासून उत्कृष्ट साहाय्य होईल. अमुक अमुक पुरुष कोण होता, अमुक देश, पर्वत किंवा नदी ही कोठेंशी होती किंवा अद्याप आहे, वगैरे प्रकारची माहिती हें पुस्तक चाळलें असतां अल्पायासानें थोडक्यांत मिळणार आहे. तीच माहिती पुरतेपणीं पाहिजे असल्यास तीही सोय आहे; कारण वर सांगितल्याप्रमाणें बहुतेक शब्दांच्या व्याख्यानाच्या शेवटीं मूळ ग्रंथ अध्यायादिकांच्या सकट संक्षिप्त रीतीनें सांगितलेला असतोच. यास्तव तो पाहिला असतां सर्व वृत्तांत सविस्तर सांपडणार आहे. हें एक झालें. दुसरें असें कीं, कोणा बहुश्रुत वाचकांस आपल्या 'रामायणा'दि प्राचीन ग्रंथांत काय काय मजकूर आहे हें पाहावेंसें वाटल्यास तीही मनीषा प्रस्तुत कोशावरून पूर्ण होणार आहे. उदाहरणार्थ 'राम' शब्द पाहा. या शब्दाखालीं रामायणांतील सर्व इतिहास बालकांडापासून तों उत्तरकांडापर्यंत सगळा क्रमानें इत्थंभूत दिला आहे. याला या ग्रंथाचीं १७।१८ पानें लागलीं आहेत. याप्रमाणेंच 'रावण', 'दुर्योधन', 'कर्ण', 'भीष्म', 'धृतराष्ट्र', इत्यादि शब्द पाहिले असतांही 'रामायण' व 'भारत' यांतील बहुतेक भाग वाचल्याप्रमाणें होणार आहे. तर रामायण-भारतादि जे प्रचंड ग्रंथ,-कीं जे वाचणें हेंच अगोदर आयासाचें व पुष्कळ वेळाचें काम, आणि त्यांतून ज्याला संस्कृत येत असेल त्यासच साध्य-तें सांप्रत पुस्तकावरून कोणाही ट फ करणारास सहज वाचल्याचें श्रेय येणार आहे. तिसरा उपयोग भाविक वाचकांस. यांनीं 'रामकथामहोदया' सारखीं लांबच लांब पुस्तकें वर्षानवर्षं जें वाचीत बसावें त्यापेक्षां सदरील ग्रंथांत सहस्रावधि पुण्यपुरुषांचीं चरित्रें थोडक्यांत त्यांस वाचावयास सांपडतील; व शिवाय विषयवैचित्र्यामुळें यांत मनोरंजन अधिक होऊन बहुश्रुतपणाही प्राप्त होईल. चवथा उपयोग आमच्या नवीन विद्वन्मंडळासही असल्या प्रकारच्या ग्रंथापासून एक मोठा होण्यासारखा असतो. तो स्वभाषेच्या संबंधानें होय. निरंतर इंग्रेजींत पडल्यानें त्यांच्या देशभाषेवर जें पाणी पडत जात असतें व धेडगुजरीची तऱ्हा त्यांस चिकटूं लागते, तिजवर प्रकृत कोशासारखे ग्रंथ मारक होत. याचें कारण उघडच आहे कीं, ज्यांस म्लेंछ भाषांचा कधींच संस्कार न घडून जे भाषा-

दूषणाच्या संबंधानें जसे काय अगदीं सोंवळे राहिले त्यांच्या लेखांत 'बेबल्'च्या* बुरुजावरील भाषा शिरण्याचा बिलकुल संभव नाहीं !

या 'ऐतिहासिक कोशा'पासून बहुश्रुत व शोधक वाचकांस निरनिराळ्या तऱ्हेची माहिती बरीच मिळण्यासारखी आहे. हिचे कांहीं मासले दाखवतों. 'राधा' शब्द उलटून पाहिला असतां पुढील चमत्कारिक मजकूर सांपडतो !—

" गोकुळांत कृष्णसखी राधा असल्याचें हरिदास‡ इत्यादि वर्णितात; परंतु सगळ्या भागवतांत तिचें नांव कोठेंही नाहीं."

तसेंच कुचैलाविषयीं:—

"यास सुदामा अथवा श्रीदामा असें पुराणिक इत्यादि ह्मणतात; परंतु हें नांव भागवतांत नाहीं.

'नौबंधन'—या शब्दाखालीं जो वृत्तांत† सांगितला आहे तो वाचला असतां 'पवित्र शास्त्रां'तील एका गोष्टीची‡ आठवण होते.

---

* Tower of Babel. [ Babel=Confusion. ] भिन्न भाषा बोलण्याचा शाप देऊन या ठिकाणीं परमेश्वरानें लोकांच्या त्या वेळेपर्यंत असलेल्या एकाच भाषेचा घोंटाळा उडवून दिला व लोकांना साऱ्या जगभर पसरून टाकलें अशी जुन्या करारांत ( Old Testament ) जेनेसिस् नांवाच्या मोसीस्च्या पहिल्या पुस्तकाच्या अकराव्या भागामध्यें पहिल्या नऊ श्लोकांत आख्यायिका सांपडते. देवानें असें करण्याचें कारण म्हणजे प्रलयानंतर माणसें आकाशाइतका उंच—आकाशाला भिडणारा—मनोरा बांधूं लागल्यामुळें त्याला राग आला हें होय. 'सम्पादक'

† पूर्वकल्पांतील रात्रींत, ब्रह्मदेव निद्रित झाले असतां, संपूर्ण समुद्र एकवटून जलमय झालें, त्यावेळेस मत्स्यरूप भगवंताच्या आज्ञेवरून, सत्यव्रत राजानें आपली नौका ज्या पर्वतशृंगास बांधली, त्याचें नांव. भारतांत वनपर्व अध्याय १८७ हिमालयाचें शिखर म्हटलें आहे. पण तें चूक आहे. कारण नित्यप्रलयांत भूलोकच काय पण भुवर्लोक व स्वर्लोकहि बुडतात मग हिमालयाची ( तो कितीहि उंच असला तरी ) काय कथा ? 'सम्पादक'

‡ "ईश्वराच्या सृष्टींतील आडम् हा पहिला पुरुष धरला तर याच्यानंतर सुमारें दीड हजार वर्षांनीं दहाव्या पिढींत त्याचा वंशज नोआह् (Noah=Rest or Comfort) हा पांचशें वर्षांचा झाला तेव्हां याला शेम्, हॅम्, जॅफेथ् असे तीन मुलगे झाले. या वेळीं मनुष्यांचा दुष्टपणा इतका वाढला होता कीं, त्यांच्या अंतःकरणांतील प्रत्येक विचार निर्विवाद दुष्टपणाचाच असावयाचा असें झालें. ईश्वराला पश्चात्ताप झाला कीं, आपण ही सारी सृष्टि व्यर्थ उत्पन्न केली. जग अत्याचारी बनलें तरी नोआह् मात्र फार सज्जन होता व देवाचें त्याचेवर फार प्रेम होतें. ह्मणून चाळीस अहोरात्र महावृष्टि करून मनुष्यें, पशु, पक्षी यांसकट पृथ्वी बुडवून टाकण्यापूर्वी एक आठवडा त्यानें नोआह्ला सूचना देऊन गॉफर् ( Gopher ) लांकडाची तीनशें हात लांब, पन्नास हात रुंद, तीस हात उंच, तिमजली, बाजूला एक दरवाजा आणि वर एक हाताची खिडकी ठेवलेली अशी नाव करण्यास सांगितलें. नोआह्च्या सहाशेंव्या वर्षी अतिवृष्टि चाळीस अहोरात्र झाली. नोआह्, बायको, मुलगे, सुना, व सजीव प्राण्याच्या प्रत्येक जातीचें एकेक जोडपें घेऊन त्या नावेंत गेला. दीडशें दिवस पृथ्वी पाण्यांत बुडली होती. या नावेंतील प्राण्यांशिवाय सर्व जीवसृष्टि या जलप्रलयास बळी पडली. पाणी कमी होतां होतां सातव्या महिन्याच्या सतराव्या दिवशीं अराराट् ( Ararat ) पर्वतावर नाव

[ पुढें चालू ]

हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार संज्ञाशब्दांचा. यांची व्युत्पत्ति या ग्रंथांत कित्येकें ठिकाणीं प्रमाणपूर्वक दिलेली आढळते. उदाहरणार्थ पुढील शब्द पाहा:—

'उमा', 'करंधम', 'कान्यकुब्ज', 'चर्मण्वती', 'दण्डकारण्य', 'नक्षत्र', 'पांचजन्य', 'मांधाता', 'यक्ष', 'लोमहर्षण', 'वाराणसी', 'विपाशा', 'शतद्रू', 'सुपर्ण',.१

---

टेकली. नऊ महिने संपतांच पर्वतशिखरें दिसूं लागलीं. एक वर्षाच्या अखेरीस सारें पाणी आटलें. पुढें एक महिन्यानें पृथ्वी सुकली. नावेंतील सर्व जीवांसकट देवाच्या आज्ञेनें नोआह् जमिनीवर उतरला व ईश्वरप्रीत्यर्थ त्यानें एक यज्ञ केला." अशा अर्थाची सृष्टिप्रलयाची हकीकत बहुतेक प्रत्येक धर्मपंथाच्या वाङ्मयांत आढळते. 'सम्पादक'

१ उमा—'उ=अगे, मा=नको.' शिवच पति व्हावा म्हणून घोर तप करणाऱ्या पार्वतीला 'अगे, (असें तप करून शरीर कष्टवूं) नको' असें तिची आई वारंवार म्हणे त्यावरून उमा नांव पडलें.

करंधम—दिष्टकुलोत्पन्न खनिनेत्र राजर्षीचा पुत्र, अवीक्षित राजाचा बाप, मरुत्त राजाचा आजा. याचें मूळचें नांव सुवर्चा. एकदां कित्येक राजांनीं याला त्रास दिल्यावेळीं आपले हस्त कंपित करून यानें सैन्य उत्पन्न केलें व सर्वांचा पराजय केला म्हणून याचें करंधम नांव पडलें.

कान्यकुब्ज—प्रस्तुत कनोज देश. [कन्या आहेत कुब्जा-वांकड्या ज्याच्या.] सोमवंशी विजयकुलोत्पन्न कुश राजाचा चौथा पुत्र कुशनाभ यानें महोदय नामक पुरी स्थापली. याच्या शंभर मुली वायुकोपानें वांकड्या झाल्या. पण कांपिलीपुरीच्या चूलिसुत ब्रह्मदत्त राजास दिल्यावर सरळ झाल्या. पण देशाला मात्र कान्यकुब्ज नांव पडलें तें पडलेंच.

चर्मण्वती—भरतखंडांतील अपरकुंतिराष्ट्राच्या दक्षिणेस असलेली नदी. रंतिदेव राजाच्या यज्ञांत मृत झालेल्या पशूंच्या चर्मराशीपासून निघालेल्या रक्तप्रवाहानें उत्पन्न झाली म्हणून 'चर्मण्वती.' 'महानदी चर्मराशेरुत्क्लेदात्ससृजे यतः। ततश्चर्मण्वतीत्येवं विख्याता सा महानदी॥' भारत शांतिपर्व २९।१२३ पाहा.

दण्डकारण्य—विंध्याद्रि व शैवल यांमधील दण्डक देशांत इक्ष्वाकूचा तिसरा मुलगा राज्य करीत होता. एकदां या उन्मत्तानें गुरूच्या आश्रमास गेल्यावेळीं गुरुकन्या अरजा हिला पाहिलें व कामातुर होऊन ती 'पित्याच्या परवानगीनें पाणिग्रहविधीनें मला वर, दांडगाई करूं नको' असें सांगत असतांहि बलात्कारानें तिशीं संभोग करून चालून गेला. त्यामुळें त्या ऋषीच्या शापानें एका सप्तकांत चारशें योजनें विस्तृत असा तो दण्डक देश राजासकट जळून गेला व पुढें तेथें अरण्य झालें.

नक्षत्र—"दृश्यन्ते दिवि ताः सर्वा विशं चेदं पुनः पुनः। न क्षीयन्ते यतस्तानि तस्मान्नक्षत्रता स्मृता॥" लिंगपुराण ६०।२६ पाहा. क्षीण होत नाहींत म्हणून नक्षत्रें.

पांचजन्य—श्रीकृष्णाचा शंख. पंचजन नामक दैत्याच्या हाडांपासून केला म्हणून 'पांचजन्य'.

मांधाता—युवनाश्व याला शंभर स्त्रियांपासूनहि पुत्र न झाल्यानें वैतागून अरण्यांत गेल्यावर भार्गवाश्रमांतील वेदीमधील पुत्रप्राप्तीसाठीं अभिमंत्रित करून ठेवलेलें एका कलशांतील

[पुढें चालू]

तिसरा प्रकार प्राचीन काळची माहिती, ही सदरील पुस्तकावरून आपल्या भारतवर्षीय बंधुजनांस व्हावी हा ग्रंथकर्त्यांचा एक मुख्य हेतु असल्यामुळें ती त्यानें जागोजाग अगत्यपूर्वक दिली आहे. प्रत्येक देशाच्या, नगराच्या वगैरे नांवापुढें तें कोठें होतें याविषयीं 'भारता'दि ग्रंथांत जें त्यास आढळलें तें त्यानें तेथल्या तेथें दाखल करून ठेवलें आहे. यामुळें पूर्वीच्या स्थितीची कांहीं बरीच माहिती मिळते. उदाहरणार्थ, 'मद्रदेश' व 'मत्स्यपुर' हे शब्द पाहिले असतां तेव्हांच कळून येतें कीं, पहिला देश ह्मणजे आलीकडील 'मद्रास' व विराट राजाचें नगर ह्मणजे हल्लींची 'वांई' या दोन्ही कल्पना केवळ अन्यथा होत. वरील दोन्ही ठिकाणें उत्तरेकडीलच असल्यामुळें वरील लौकिक कल्पना केवळ भासमय होत हें तेव्हांच लक्षांत येतें. चंद्रगुप्त राजाची राजधानी 'पाटलिपुत्र', विक्रमार्काचें नगर 'उज्जयिनी', व पुढील काळीं अनेक संस्कृत ग्रंथांतून ज्यांचा उल्लेख आढळतो असे 'पारसीक' लोक, यांचा सदरील ग्रंथांत कांहीं वृत्तांत सांपडत नाहीं; यावरून भारती युद्धाच्या वेळीं वरील दोन्ही नगरें व वरील राष्ट्र हीं नव्हतीं असें सहज अनुमान होतें. 'महाराष्ट्र' व 'कोंकण' या शब्दांविषयींही असेंच. पहिला देश 'दंडका' या नांवाखालींच त्या वेळेस बहुधां मोडत

---

जल तो प्याल्यामुळें गरोदर राहून योग्य काळीं त्याची कूस फोडून मुलगा बाहेर येऊन दूध पिण्यास मिळेना म्हणून रडूं लागला. तेव्हां इंद्रानें 'मां धास्यति' म्हणजे 'हा मला पिईल' असें म्हणून त्याच्या तोंडांत अंगुलि दिली त्यावरून त्याचें नांव 'मांधाता' पडलें.

यक्ष—ब्रह्मदेवानें कांहीं प्राणी उत्पन्न केल्यावर 'किं कुर्मः—काय करूं ?' असें त्यांनीं विचारलें. तेव्हां 'रक्षध्वं' (प्राण्यांचें रक्षण करा) असें त्यानें उत्तर दिलें. त्यावर कांहीं 'यक्षाम' म्हणाले ते 'यक्ष' झाले, व कांहीं 'रक्षाम' म्हणाले ते राक्षस झाले.

लोमहर्षण ऊर्फ रोमहर्षण—सूत नांवाचा पुराण सांगणारा ऋषि. वक्तृत्वशक्तीनें श्रोत्यांची अंतःकरणें सद्गदित करून शरीरावर रोमांच उभे करी. म्हणून याचें नांव 'रोम-हर्षण' पडलें.

वाराणसी—काशीनगरीचें नांव. कारण, ही नगरी 'वरुणा' आणि 'असी' या नद्यांच्या समीप आहे.

विपाशा व शतद्रू—वसिष्ठ विश्वामित्राला कांहीं केल्या 'ब्रह्मर्षि' म्हणेना तेव्हां संतापून त्यानें वसिष्ठाचे शंभर पुत्र राक्षसाकडून खावविले. तरी 'राजर्षे'चें कांहीं 'ब्रह्मर्षे' असें संबोधन होईना. पुत्रशोकानें दग्धप्राय होऊन वसिष्ठानें शरीर पाशबद्ध करून बुडून मरण्यास्तव एका नदींत उडी मारली पण नदीनें त्याला पाशमुक्त करून बाहेर टाकलें. त्यामुळें त्या नदीस 'विपाशा' असें नांव पडलें. त्यानें पुनः एके वेळीं 'हैमवती' नदींत उडी टाकली. पण तिनेंहि शतप्रवाहरूपानें होऊन यास बुडविलें नाहीं तेव्हां त्या नदीला 'शतद्रू' नांव पडलें.

सुपर्ण—गरुडाची आई विनता कद्रूच्या दास्यांत असतां सर्पाकरतां अमृतकलश आणण्यास तो स्वर्गांत गेला. पण इंद्र आड आला. गरुडाचा पराभव होईना तेव्हां इंद्रानें त्याच्यावर दधीचि ऋषीच्या अस्थींचें केलेलें आपलें वज्र सोडलें. म्हणून त्याच्या सन्मानार्थ एक पीस देवलोकांत टाकून अमृतकलश घेऊन गरुड गेला. त्या पिसाच्या सौंदर्यानें चकित होऊन देवानीं गरुडास 'सु-पर्ण' [ सुंदर पंखाचा ] असें नांव दिलें. 'सम्पादक'

असावा, व दुसऱ्यास 'शूर्पारक' असें दुसरेंच नांव त्या वेळेस असावेंसें दिसतें. आतां दुसऱ्या पक्षीं पाहा. 'गांधार' ह्मणून जो प्राचीन देश होता (तेथील राजाची कन्या गांधारी) तोच बहुधां सांप्रतचा कंदाहार असावा, कारण त्याची पुरातन राजधानी जी तक्षशिला ही ग्रीक् लोकांच्या ग्रंथांतून Taxila (तक्षिला) या नांवानें प्रसिद्ध आहे, व[1] टॉलेमीच्या* भूगोलवर्णनावरून पाहतां वरील दोन्ही स्थलें परस्पर मिळतात. 'चीन' शब्द काढून पाहतां तो 'भीष्मपर्वा'त आहे असें आढळतें; व ही गोष्ट त्या देशाची सुप्रसिद्ध जी प्राचीनता तिशीं चांगली जुळते. याप्रमाणें 'कर्नाटक' हें नांव 'भारतां'त सांपडत असल्यामुळें आजवर चालत आलेली त्या देशाची संज्ञा किती प्राचीन होय याचा निश्चय होतो.

असो; तर प्रकृत कोश लक्षपूर्वक वाचला असतां वरच्यासारख्या चमत्कारिक गोष्टी शोधक मनुष्यास अनेक कळण्यासारख्या आहेत. तसेंच लोकाचारांत वगैरे प्राचीन काळाहून आलीकडे काय काय फेरफार होत गेले आहेत हें समजण्यासही या ग्रंथांत पुष्कळ साधन आहे हें उघड आहे.

येथवर प्रस्तुत पुस्तकाचा एतद्देशीयांस काय काय उपयोग होण्यासारखा आहे या संबंधानें त्याचें गुणवर्णन झालें. आतां त्यांत जे कित्येक दोष आढळतात त्यांचाही निर्देश केला पाहिजे. हे दोष ह्मणजे प्रकृत कोशास विशेष लागून आहेत व त्यांच्या योगानें त्याच्या उपयुक्ततेस बाध येण्यासारखा आहे असें नाहीं. ते केवळ कोशकर्त्यांच्या धर्मविषयक समजुतीमुळें उत्पन्न झाले असून मुख्य ग्रंथापासून पृथग्भूत आहेत. तरी ते त्यांत अनेक ठिकाणीं प्रगट झाले असल्यामुळें, व त्यांचा संसर्ग पुष्कळांच्या मनास जडण्यासारखा असल्यामुळें त्यांचें सविस्तर निरसन करणें अवश्य होय. शिवाय आपणास अपरिचित अशा विषयावर अभिप्राय प्रगट केले असतां ते किती असमंजस होतात याचेंही उदाहरण पुढील विवरणावरून वाचकांस पाहायास सांपडेल.

---

१. शिकंदर बादशाहानें मिसर देश काबीज केल्यानंतर त्याच्या इतर मुलखांप्रमाणें हाही त्याच्या तेहेतीस सरदारांपैकीं एकानें बळकावला. या सरदारानें टॉलेमीचें घराणें स्थापलें. हे राजे सारे विद्येचे मोठे शोकी होते. आलेक्झांड्रिया येथील जगत्प्रसिद्ध पुस्तकालय यांनींच मोठ्या श्रमानें व खर्चानें जमवलें होतें. वर ज्याचा उल्लेख केला आहे तो मोठा नामांकित भूगोलवेत्ता व ज्योतिषी होता. कोपर्निकस्, ग्यालिलियो, यांचीं मतें प्रगट होत तोंपर्यंत त्याचेंच मत साऱ्या युरोपभर चालू असे. संस्कृतांत 'यवनाचार्य'कृत ह्मणून कांहीं ज्योतिषग्रंथ आहेत; हे आचार्य बहुधां वरीलच असावे असा पाश्चात्य संस्कृतज्ञांचा समज आहे!

* टॉलेमी—(Claudius Ptolemæus Ptolemy) [इ. स. १३९-इ. स. १६१] अलेक्झांड्रियाचा विख्यात गणिती, ज्योतिषी, व भूगोलवेत्ता. याची विशेष माहिती उपलब्ध नाहीं. याच्या मतें पृथ्वी स्थिर असून आकाशस्थ ज्योती तिच्या भोंवतीं फिरतात. हें मत पुढें प्रशियन् खगोलशास्त्रज्ञ निकोलस् कोपर्निकस् (इ. स. १४७३-१५४३) यानें खोडून काढलें. सूर्य स्थिर असून पृथ्वी त्याभोंवतीं फिरते असें सिद्ध केलें. असेंच मत पायथॅगोरास् (Pythagoras खि. पू. ५८२—खि. पू. ५००) या ग्रीक् तत्त्ववेत्याचेंहि प्राचीन काळीं होतें. आठ खंडांचा एक विस्तृत ग्रंथ यानें भूगोलावर लिहिला असून तो फार प्रसिद्ध आहे. 'सम्पादक'

'भारतवर्षीय कोशा'चे कर्ते जुन्या पद्धतीचे गृहस्थ असून वेदशास्त्रांवर त्यांचा पूर्ण भरंवसा आहे. आलीकडे पाश्चात्य विद्येच्या संसर्गानें आमच्या देशांत जी चोहोंकडे बज-बजपुरी माजली आहे, व वरील ग्रंथांस धाब्यावर ठेवून 'मन राजा मन प्रजा' या न्याया-प्रमाणें यथेच्छ वर्तण्याचा जो प्रघात सुरू झाला आहे, तो त्यांस अत्यंत अनन्वित वाटतो हें उघड आहे. प्रस्तुत कोशाचें काम सात वर्षेपर्यंत सतत परिश्रम करून जें त्यांनीं तडीस नेलें त्याचा तरी मुख्य हेतु त्यांनीं प्रस्तावनेंत दाखल केल्याप्रमाणें आपल्या भारतवर्षीय बंधूंस ताळ्यावर आणण्याचाच होय. आतां असल्या उद्देशानेंही त्यांच्या हातून स्वदेशाची ही सेवा घडली ही गोष्ट संतोष मानण्यासारखी होय यांत संशय नाहीं; व एकंदरीत पाहतां आलीकडील सुधारणेवर त्यांचा जो कटाक्ष आढळतो तोही फार चुकीचा आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. तरी स्वदेशप्रीति व पूर्वजांविषयीं पूज्यबुद्धि या दोन्ही वृत्ति प्रस्तुत ग्रंथांत ज्या प्रकारें प्रादुर्भूत झाल्या आहेत तो प्रकार समंजसतेस विशेष अनुसरून आहे असें ह्मणवत नाहीं. याविषयीं पुढील उदाहरणांवरून वाचकांनीं स्वतंत्रपणें निर्णय करावा.

कोशकर्त्यानें प्रस्तावनेंत आरंभींच आपला एक पूर्वसंकल्प येणेंप्रमाणें लिहून ठेवला आहे:—

"या ग्रंथांत श्रुतिस्मृतींस विरुद्ध किंवा पूर्वापार ग्रंथसंगतीस विरुद्ध अतएव कुतक अथवा हस्तदोषादिकांनीं अन्यथा लिहिला गेलेला तितका भाग सूक्ष्म दृष्टीनें गाळून टाकून, व त्याची जुळणी करतांना अरबी व फारसी भाषेचे शब्द त्यांत अगदीं न येऊं देऊन, लिहिण्याविषयीं अतिशय सावधपणा ठेवला आहे."

आतां प्रथमत: अरबी व फारसी शब्दांविषयीं कोशकारानें येवढी बंदोबस्ती जी करून ठेवली आहे तिजविषयीं विचार करूं. प्रस्तुत ग्रंथांतला विषय सगळा ऐतिहासिक व पौराणिक आहे यास्तव भारतवर्षीय प्राचीन पुरुषांच्या कथांतून यवनी शब्दांचा प्रयोग होणें हें मोठें विलक्षण दिसेल हें खरें आहे, व हें जाणूनच महाराष्ट्र—कवींच्या ग्रंथांतूनही वरील शब्दांचा पूर्ण अभाव आढळतो. 'कृष्णानें पांडवांची वकिली पतकरली,' 'रामसुग्रीवांनीं एकमेकांस मदत केली,' हीं वाक्यें प्रस्तुत ग्रंथांत 'भीष्म हा कौरवांचा पहिला कमांडर् इन् चीफ् झाला,' 'दारुक हा कृष्णाचा कोचमन होता' यांसारखींच अप्रयोजक व हास्या-स्पद दिसणार आहेत! तेव्हां मूळ ग्रंथांत वरील परकी शब्दांचा रिघाव बिलकुल होऊं दिला नाहीं यांत कांहीं गैर ह्मणतां येत नाहीं. पण हाच निर्बंध ग्रंथबाह्य जी प्रस्तावना तींतही कां दृष्टीस पडावा हें कळत नाहीं. 'कोंकणी समुद्र,' 'जलयान,' 'पादत्राण,' 'परिलेख' वगैरे अपरिचित शब्द प्रथमत: योजून मग ते कोणास समजतील न समजतील यास्तव त्यांचे प्रसिद्ध पर्याय 'आरबी समुद्र,' 'जहाज,' 'पायपोस,' 'नकाशा,' इत्यादि पुढें कंसांत घालण्याचा द्राविडी प्राणायाम जो करावा, त्यापेक्षां तेच मुळीं घातले तर काय वाईट? स्वाहास्वधाकार चालला असतां तेथें यवनांचा, म्लेंछांचा वगैरे प्रवेश होऊं देणें बरोबर नाहीं, ह्मणून एरवींच्या व्यवहारांतही तेथलें सोंवळें काय कामाचें? शिवाय जेथें ग्रंथाच्या परिस्फुटतेकरतां विलायती विरामचिन्हांची योजना खपली जाते, तेथें बिचाऱ्या 'जहाजा'वर व 'नकाशा'वरच येवढी कदर कां असावी!

दुसरी गोष्ट श्रुतिस्मृतिविरुद्ध लेख आणि कृतक किंवा लेखकप्रमादजन्य अशीं पुराणांतील वचनें यांविषयीं. हे तिन्ही प्रकार प्रस्तुत ग्रंथकर्त्यास जेथें जेथें भासले तेथें तेथें त्यानें त्यांचें खंडन केलें आहे. पहिली प्रस्तावना पाहिली असतां या खंडनाचें स्वरूप वाचकांस कांहीं कळेलच; शिवाय कोश चाळतां चाळतांही कित्येक ठिकाणीं असलीं स्थळें सहज दृष्टीस पडतील. यांचा मासला ज्यांस पाहणें असेल त्यांनीं 'सूर्य,' 'राहु,' 'ग्रह,' 'हिमालय,' 'भरतखंड,' 'खंड,' 'सप्तद्वीपें,' 'सप्तसमुद्र,' 'रोहिणी,' 'सहदेव,' 'बृहस्पति,' 'म्लेच्छ'§ हे शब्द पाहावे.

---

§राहु—"कश्यपऋषीपासून सिंहिकेस झालेल्या पुत्रांतील एक. हा प्रस्तुतच्या मन्वन्तरांत आकाशामध्यें, सूर्यमंडलाच्या वर व चंद्रमंडलाच्या खालीं असणारें जें (तामस) अंधारयुक्त राहुमंडल, तेथील अधिपति असून, याचें मंडल सूर्यमंडलगतीनें फिरणारें आहे. हें याचें मंडल जेव्हां फिरत फिरत, चंद्रमंडलाच्या व याच्या कक्षेच्या (परिभ्रमणमार्गवृत्ताच्या) छेदनबिंदुसमीप ज्या प्रमाणानें अल्प किंवा पूर्ण येतें, त्याच प्रमाणानें चंद्रग्रहण अल्प किंवा पूर्ण होतें. परंतु येथें जे लोक पृथिवी फिरते म्हणून मानून, तिची गति सूर्यमंडलाप्रमाणें कल्पितात, त्यांस सूर्यमंडलगतीनें फिरणाऱ्या राहूचें भान न होतां चंद्रमंडलाआड पृथिवीच आली असें वाटून, तें चंद्रग्रहणास पृथिवी कारण मानितात. याचप्रमाणें चंद्रगतीनें फिरणारें सूर्याच्या खालीं असणारें केतूचें तामसमंडल आपल्या व सूर्यमंडलाच्या कक्षेच्या छेदनबिंदुसमीप ज्या काळीं ज्या प्रमाणानें येतें त्या काळीं त्याच प्रमाणानें सूर्यग्रहण अल्प किंवा पूर्ण होतें. येथेंहि चंद्रमंडलगतीनें फिरणाऱ्या केतूचें भान न होऊन, सूर्यमंडलाआड चंद्रमंडलच आलें असें त्यांस वाटून, ते सूर्यग्रहणास चंद्रच कारण मानितात, आणि त्याची सिद्धि होण्यासाठीं सूर्यमंडलाखालीं चंद्रमंडल कल्पितात, परंतु हें मत श्रुतिविरुद्ध असल्यामुळें असत् होय. (यज्ञेश्वर दैवज्ञाचा मूळ अगर सटीक संस्कृत 'विरोधमर्दन' ग्रंथ पाहा.)

खंड—महाद्वीपाच्या लहान भागांस जशी वर्ष म्हणून संज्ञा आहे, तशी वर्षांतील लहान भागांस खंड संज्ञा आहे. आपण राहतों या भरतवर्षांत कुशावर्त, इलावर्त, ब्रह्मावर्त, मलय, केतु, भद्रसेन, इंद्रस्पृक्, विदर्भ आणि कीटक असे नऊ खंड आहेत. हींच नांवें मत्स्यपुराणांत इंद्रद्वीप, कसेर, ताम्रपर्ण, गभस्तिमान्, नाग, सौम्य, गंधर्व, वारुण, आणि भरत अशीं आहेत. (मत्स्यपुराण ११३-९,१० पाहा) या दोहों प्रकारांत कोणतें कोणाचें नामांतर त्याचा निर्णय होत नाहीं. तरी भरतखंड म्हणजे ब्रह्मावर्तखंड असा निर्णय होऊं शकतो.

आतां यास द्वीप असें मत्स्यपुराणांत म्हणून "अयंतु नवमस्तेषां द्वीपः सागरसंवृतः ॥" या वाक्यानें त्याचें दृढीकरण केलें आहे. परंतु नौकाद्वारें येथील राजाचें अन्य खंडांत जाणें कोणत्याहि ग्रंथांत दृष्ट नसून भारताचें तर या गोष्टीस मुळींच प्रमाण नाहीं, यास इंद्रद्वीपादिक (नांवें देणारा मत्स्यपुराणांतील) पाठ लेखकप्रमादच होय.

सप्तमहाद्वीपें—जंबुद्वीप, प्लक्षद्वीप, शाल्मलिद्वीप, क्रौंचद्वीप, शाकद्वीप आणि पुष्करद्वीप अशीं य पृथिवीवर सात महाद्वीपें आहेत. या द्वीपांच्या वर्णनांत नांवें कोठें कोठें मागेंपुढें अशीं आढळतात. परंतु बहुग्रंथसंमत हीं नांवें क्रमशः खरीं आहेत. यांशिवाय नांवें अ—

[पुढें चालू]

आतां वरील शब्दांवर रा० गोडबोले यांनीं जे जे आपले अभिप्राय प्रगट केले आहेत त्यांपैकीं दोन जातींच्या अभिप्रायांविषयीं आह्मांस कांहीं विशेष लिहिणें नाहीं. एक कृतक

---

व्यवस्थित आढळल्यास लेखकांचा प्रमाद झाला आहे असें समजावें. या प्रत्येक द्वीपाभोंवतां एकेक समुद्र आहे.

रोहिणी—प्राचेतस दक्षाच्या साठ कन्यांतील एक असून सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक. ही सोमास अत्यंत प्रिय असे त्यामुळें इतरांचा सहजच अनादर होई. एकदां इतर कन्यांनीं, याविषयीं पित्याकडे गाऱ्हाणें केलें, त्यावरून दक्षानें त्यास समजावून सांगितलें कीं, इतःपर असें करूं नको, तरी त्यानें तें ऐकिलें नाहीं. शेवटीं हिला त्यापासून बुध पुत्र झाला. तेव्हां हिच्या इतर भगिनींनीं व सपत्नींनीं (सवतींनीं) पुनः पित्याकडे गाऱ्हाणें केलें, त्यावरून त्यानें सोमास शाप दिला कीं, तूं क्षयरोगी होशील. ही क्षयकल्पना लोक सोममंडलावर कल्पितात, परंतु ती अगदीं चूक असून कलांच्या ऱ्हासवृद्धींनीं व्याप्त सोममंडल अनादिसिद्धच ईश्वरानें महादेवरूपेंकरून निर्मिलेलें आहे.

सहदेव—कनिष्ठ पांडव. युधिष्ठिरानें राजसूय यज्ञाचे वेळीं दक्षिण दिशेचा जय करून द्रव्य आणण्याची आज्ञा केली. तेव्हां दिग्विजय करतां करतां तो कच्छ (जलासमीपचा प्रदेश) प्रदेशास गेला " व तेथून त्यानें बिभीषणाकडे लंकेस दूत पाठविले. श्लोकः—

ततः कच्छगतो धीमान् दूतान् माद्रवतीसुतः। प्रेषयामास राजेन्द्र पौलस्त्याय महात्मने ॥
बिभीषणाय धर्मात्मा प्रीतिपूर्वमरिंदमः। स चास्य प्रतिजग्राह शासनं प्रीतिपूर्वकम्।
तच्च कालकृतं धीमानभ्यमन्यत स प्रभुः॥ इ० (भारत-सभापर्व अ. ३१ श्लोक ७२-७६)

......आतां हा लेख रामायणाशीं ताडून पाहतां असंभाव्य आहे. तो असाः—

सीताशुद्धि करण्यासाठीं, ज्या कालीं अंगदप्रमुख वानर दक्षिणसमुद्रतीरीं गेले त्या कालीं त्यांस समुद्र पाहून भीति उत्पन्न झाली......(दहा ते नव्वद योजनें उडून जाण्याचें सामर्थ्य आपणांस असल्याचें कित्येकांनीं सांगितल्यावर) अंगद म्हणाला, मी शत योजनें उडून लंकेस जाईन; परंतु माझ्यानें परत येववेल किंवा नाहीं तें मी जाणत नाहीं. (अध्यात्म-रामायण किष्किंधाकांड ९, ४ ते १२ श्लोक पाहा.)

यावरून उड्डानशक्ति ज्यांच्या अंगीं स्वाभाविक, त्या वानरांस चोविसाव्या पर्ययाच्या त्रेतायुगांत समुद्रोल्लंघन करून लंकेस जाण्याची ही मारामार. असें असून अठ्ठाविसाव्या पर्ययाच्या द्वापरयुगांत मनुष्यास उड्डानशक्ति नसतां, तसे सहदेवाचे दूत सहज गेले काय! वाः, काय हा महत्त्वाचा लेख! बरें हे दोन लेख लिहिणारे भिन्न म्हणावेत, तर तसेंहि नसून व्यासच हे लेख लिहिणारा आहे, म्हणून याविषयीं माझें म्हणणें असें आहे कीं, भारतांतील लेख कृतक (कोणी धूर्तानें व्यासाकडे मूर्खपणा येण्यासाठीं नवा घातलेला) आहे. ज्यानें हा लेख नवा घातला, त्यानें या गोष्टीच्या सिद्धीसाठीं परिहार तरी आपल्याकडून काय सावधपणानें दिला आहे तो पाहा, श्लोक-" तच्च कालकृतं धीमानभ्यमन्यतः सः प्रभुः।" म्हणजे सहदेवाचा दूत लंकेस आला, तें येणें बिभीषणानें कालकृत (त्या कालाला तें योग्यच) असें मानलें. परंतु त्या धूर्त बृहस्पतीस हा सुमार कसा राहिला नाहीं ?......कीं त्रेतायुगांतील मनुष्यादिकांचें सामर्थ्य प्रभाव इ०कांपेक्षां द्वापरांतील सामर्थ्य इ० अधिक कीं उणें ? तर उणेंच होय. म्हणून तो लेख असंभाव्यच. बरें सहदेवाचा दूत नौकाद्वारें गेला म्हणावा तर श्लोकांत

[पुढें चालू]

ह्मणजे बौद्धादि द्वेष्ट्यांनीं जीं वचनें किंवा जे श्लोक बळेंच घुसडून दिले असावे असें त्यांस वाटतें तीं स्थळें; व दुसरीं लेखकांच्या प्रमादानें पडल्याविषयीं ज्यांच्या संबंधानें त्यांनीं स्वमत प्रगट केलें आहे तीं. अशांच्या संबंधानें आह्मांस येवढेंच कळवावयाचें आहे कीं, जोंपर्यंत पुस्तकांच्या अतिप्राचीन प्रती सांपडत नाहींत व कोणीं कोठें कोणता फेरफार केला हें निश्चितपणें समजण्याचा मार्ग नाहीं, तोंपर्यंत अमुकच भाग कृतक आहे हें ह्मणणें

---

नौकेचेंहि नांव नाहीं, असल्या पराक्रमी दूताचें ग्रंथांत नांव कां बरें नसावें ? म्हणून हा लेख चोरटेपणाचाच होय.

तात्पर्य...सहदेवानें पत्र लिहून बाणाग्रास बांधून, तो बाण त्यानें धनुर्विद्यासामर्थ्यानें बिभीषणाकडे लंकेस पाठविला असावा, व त्यावरून त्यानें कदाचित् करभार पाठविला असेल तर असेल. याशिवाय सर्व गोष्टी कृतक होत.

बृहस्पति—चालू वैवस्वत मन्वंतरांतील जो ब्रह्मपुत्र अंगिराऋषि, त्याच्या आठ पुत्रांतील ज्येष्ठ...... यास शुभा आणि तारा अशा स्त्रिया दोन. बृहस्पतीची स्त्री तारा, सोमानें हरण केली इ० वृत्त पुराणांतून आढळतें तें नीट नाहीं; कारण देवलोकांत अशा अनीतीच्या गोष्टी घडण्याचा असंभवच होय......पुराणकर्ते व्यास, त्यांना आह्मी वैदिक धर्मानुसारी लोकांनीं वेडें म्हणावें, अथवा अपशब्द बोलावें, असें करण्याकरितां बौद्धादिक नास्तिक लोकांनीं, असे लेख नवे नवे करून घातले नसतील म्हणून कशावरून ? यास्तव असले श्रुतिस्मृतिविरुद्ध लेख कृतक असावेत एक, किंवा पुराणकर्त्यांनी, मनुष्यांच्या अंगीं विचारशक्ति कितपत आहे, तिची परीक्षा करण्याकरितां, कूट घातलें असावें एक......(उमया सहितः सोमः) म्हणजे उमेनें सहित जो, त्याला सोम म्हणावें, अर्थात् सोम शब्दाचा अर्थ शिव असा झाला. त्यानें, तारा असें पार्वतीला नांव आहे, तिचें हरण केलें म्हणजे तिला वरिलें......सोमानें तारेचें हरण केल्यावर, बृहस्पति त्याकडे येऊन त्यास म्हणूं लागला, सोमा, मी परदारेचें हरण केलें असें तूं मान्य कर म्हणजे मी जातों. तें सोम मान्य करीना; तो म्हणूं लागला, तारा, ही माझी पूर्वजन्मींची भार्या आहे, यास्तव ही परस्त्री असें मी कसें मान्य करीन ? यावर त्यानें साक्षहि पटविली असल्याची गाथा ऋक्संहितेंत आहे......तारा, ही सोमभार्या पूर्वींची असेल, आणि तेवढ्याच बळानें, जर तो प्रस्तुत तिचा विवाह बृहस्पतीशीं झाला असतां तिचें हरण करितो, तर उघड सिद्ध होतें कीं, सोम हा परस्त्रीकामुक व गुरुस्त्रीकामुक खरा, यांत संशय नाहीं. पण......(सत्तावीस दक्षकन्यांपैकीं) सर्वांत अतिरूपवती प्रमुख तारा रोहिणी, तिलाच सर्वदा घेऊन तिशींच तो (सोम) रममाण होऊं लागला, त्या योगानें इतरांस संतति न होतां तिला मात्र......बुध नांवाचा पुत्र झाला, आणि याच कारणास्तव त्या बुधास रोहिणेय म्हटलेलें ग्रंथांतून दृष्टीस आहे. ह्मणून हा अर्थ सरळ, व श्रुतिस्मृतींस अविरुद्ध जाणून बुद्धिमानांनीं कृतकाचा त्याग करावा.

म्लेच्छ—अस्पष्ट भाषण करणाऱ्या व ज्ञानविज्ञानशून्य ज्या जाति त्या. यवन आणि म्लेच्छ, हे जरी वेदबाह्य आहेत, तरी ह्यांच्या जाति दोन असून, त्यांमध्यें बराच भेद असल्याचें (भारत कर्णपर्व ४५, ३६) दिसतें. हे प्रायः पिशाच, राक्षस किंवा प्रेत, यांच्या अंशानें जन्मलेले असून स्वच्छंदाचारवेष्टित असतात. (भारत शांतिपर्व अध्याय १८८).

पुढें पृष्ठ ४३६ वरील ओळी ४ ते १६ पाहा. 'सम्पादक'

साहसाचें होय; व वस्तुतः पाहतां कोशकाराचें काम येवढेंच आहे कीं, त्यास जें आढळेल तें त्यानें वाचकांस सादर करावें. भाषेचा जो कोश करील त्यास अमुक शब्द वाईट किंवा अमुक प्रयोग अशुद्ध ह्मणून ते गाळणें हें जसें बरोबर नाहीं; त्याप्रमाणेंच प्रकृत ग्रंथासारखी जो रचना करील त्यानेंही अमुक अमुक वृत्तांत श्रुतिविरुद्ध होय किंवा बनावट आहे असें ठरवून तो गाळतां कामा नये. त्यानें आपलें मत अमुक अमुक ह्मणून पाहिजे तर प्रसिद्ध करावें, पण सर्वप्रसिद्ध ग्रंथांत आवड निवड करीत बसण्याचा त्यास अधिकार नाहीं. हीच गोष्ट लेखकप्रमादांसही लागू. कांहीं निश्चित आधार असल्याखेरीज अमुक गोष्ट लेखकाच्या मूर्खपणानें चुकून पडली आहे हें ह्मणणें केवळ विलक्षण होय! लेखकमहाराजांस लिहितां लिहितां डुलकी आली, किंवा त्यांचें मन स्वभावसिद्ध चांचल्यास अनुसरून क्षणमात्र कोणीकडे विहार करण्यास गेलें तर पराकाष्ठा 'ट'च्या ठिकाणीं 'प' पडेल, किंवा त्यानें फारच दूर भरारी मारली तर कदाचित् पंक्तीची पंक्ति चुकेल, ह्मणून काय पूर्वसंगतीस अनुसरून असणारा अधिक वृत्तांत त्यांच्या हातून कागदावर नकळत लिहिला जाईल? बुद्ध्या स्वकपोलकल्पित मजकूर त्यांजकडून लिहिण्यांत येईल ह्मणावें, तर सरस्वती देवीची कृपा त्यांवर प्रायः कितपत असते हें सर्वप्रसिद्धच आहे. 'माशीला माशी' ही ह्मण पुष्कळांस माहीत असेलच!

तर या दोन मुद्द्यांवर ज्यास्त लिहिण्याचें आह्मांस कारण नाहीं. यांखेरीज तिसरा एक मोठा मुद्दा जो या ग्रंथांत आढळतो, व ज्याविषयीं प्रस्तावनेंत एक दोन जागीं स्पष्ट लिहिलें आहे, त्यावर मात्र अंमळ विस्तारानें लिहिणें जरूर वाटतें. हा मुद्दा कोणता हें पुढील उताऱ्यांवरून वाचकांच्या लक्षांत येईलच:—

(प्रस्तावना)—"या ग्रंथांत व युरोपियन् लोकांच्या ग्रंथांत इतकाच फेर आहे कीं, ते लोक अनुमानानें पृथिवी लहान व सूर्याभोंवतीं फिरते असें मानतात; आणि आह्मी शास्त्राधारानें पृथिवी अतिशय मोठी व स्थिर समजतों."

(क्षिता)—"मी या ग्रंथांत पृथिवी लहान व गोलाकार नसून मोठी व सपाट आहे, तशीच सूर्याभोंवतीं फिरत नसून स्थिर आहे, असें प्राचीन इतिहासावरून लिहिलें आहे तें सत्य आहे. चंद्रग्रहणावरून पृथिवी गोल व लहान आहे असें गणिती लोक जरी ह्मणतात तरी तें बरोबर नाहीं, कारण चंद्रग्रहणास पृथिवी मुळींच कारण नाहीं. (राहु शब्द पाहा.)"

(सूर्य)—"सारांश, असा वैदिक सिद्धांत भारतांत वर्णन केला आहे. ह्मणून पृथिवी फिरणारी व सूर्य स्थिर असें कधींहि ह्मणूं नये; कारण (अचिंत्याः खलु ये भावा न तांस्तर्केण साधयेत्) असें (भार० भीष्म० अ० ५ श्लोक १२) यांत आहे. ह्मणून ऋषींव्यतिरिक्त इतरांस चिंतन करण्यास अशक्य ज्या गोष्टी त्या त्यांनीं तर्केकरून कधींही साधायास जाऊं नयेत. गेल्यास तसें करणें दोषयुक्त आहे."

(हिमालय)—"प्रस्तुतच्या भूगोलवेत्त्यांस अस्मदितिहासोक्त भूमीचा पूर्ण शोध लागला नाहीं; कारण ज्या प्रमाणांनीं येवढीच काय ती पृथिवी असें त्यांनीं निश्चित केलें आहे, तीं प्रमाणें पंच दोषांनीं व्याप्त आहेत, त्यांचीं नांवें. मदमोहादिक मानस दोष-

पित्तकामळादिक शारीर दोष, काणत्वादिक नेत्रदोष, दूरत्वादिक अर्थदोष, आणि काचादिक यंत्रदोष."

(ग्रह)—"आतां राहु आणि केतु हे जे दोन ग्रह ह्मणजे तीं मंडलें, त्यांची व्यवस्था अशी आहे कीं, राहु-मंडल चंद्र व सूर्य यांच्यामध्यें‡ आहे व त्यामुळेंच तीं मंडलें अनुक्रमानें सूर्यचंद्रमंडलांच्या ग्रहणास कारण होत आहेत. (छादयत्यर्कमिंदुर्विधुं भूमिभाः) ह्मणजे सूर्यग्रहण होण्यास कारण चंद्र आणि चंद्रग्रहणास कारण पृथिवी, हें सूर्यसिद्धांतातील वाक्य, काल्पनिक अतएव असत् होय."

(भरतखंड)—"पृथिवी अल्प परिमाणाची, गोलाकार व सूर्यासभोंवतीं फिरत्ये, इत्यादिक कल्पना आमच्या प्राचीन इतिहासकार ऋषींस संमत नत्त्यामुळें, त्यांस अनुसरून लिहिणाऱ्या मला तर संमत नाहींतच; परंतु माझ्या वैदिकधर्मी सर्व बांधवांसही नसाव्यात; कारण, तिजभोंवतीं पूर्वपश्चिम प्रदक्षिणा करून आलेल्यांस अजून दक्षिणोत्तर प्रदक्षिणा झाली नाहीं व कल्पसमाप्तीपर्यंत किंवा पुढें होईल, असेंहि कधीं होणार नाहीं."

(सप्तमहासागर)—"आह्मीं संपूर्ण पृथिवीचा शोध लावून तिला प्रदक्षिणाहि करून आलों असें जे ह्मणतात, त्यांस अद्यापर्यंत क्षारसमुद्राचें उल्लंघन झाल्याचें व अन्यद्वीपांत गेल्याचें त्यांच्या इतिहासांत कोठें आढळत नाहीं; तथापि आह्मी गेलों असेंच त्यांचें ह्मणणें असेल, तर तशी प्रतीति कां होऊं नये? प्रतीति हीच कीं, सुरासमुद्रांतून मद्य, शिसे भरून सर्वत्र यावें. तें अजून येत नाहीं, त्याचप्रमाणें दहीं, दूध, तूप, उंसाचा रसही येत नाहीं, तेव्हां सर्व पृथिवीचा शोध लागला हें ह्मणणें संभवत नाहीं."

इतके उतारे पुरे आहेत. यांवरून प्रस्तुत कोशकारांचा अर्वाचीन पदार्थविज्ञानावर केवढा कटाक्ष आहे तो वाचकांस सहज कळून येईल. आतां वरील साती उताऱ्यांत पृथ्वीच्या आकाराविषयीं व विस्ताराविषयीं, चंद्रसूर्यांच्या ग्रहणांच्या वास्तविक उपपत्ती-विषयीं, पृथ्वीच्या दैनंदिन परिभ्रमणाविषयीं, सातां समुद्रांविषयीं वगैरे जे अभिप्राय प्रगट झाले आहेत, त्यांविषयीं सविस्तर विवरण करायाचें ह्मटलें ह्मणजे एक स्वतंत्र ग्रंथ होण्या-सारखा आहे. स्वतंत्र ग्रंथ ह्मटलें ही कोणास अतिशयोक्ति केलीशी वाटेल; पण वरील विवरणाच्या पोटीं किती अवांतर विषय येणार आहेत याचा विचार केला असतां वरील शब्दांची यथार्थता ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. भूगोल व खगोल या शास्त्रांविषयीं प्राचीन राष्ट्रांस कितपत माहिती होती; त्यांतून प्राचीन आर्यांचें एत-द्विषयींचें ज्ञान कितपत स्थितीस येऊन पोंचलें होतें; वेदांत, पुराणांत, व आर्यभट,†

‡ येथें "असून केतुमंडल पृथिवी आणि सूर्य यांच्यामध्यें" इतके शब्द उतारा घेतांना राहून गेले असावे. 'सम्पादक'

† आर्यभट्टाचे पूर्वी पराशर (खि. पू. चवदावें शतक), गर्ग, आणि असुरमय हे व त्याच्या मागून वराहमिहिर, (इ. स. ५०४–५८७), ब्रह्मगुप्त (सातवें शतक), आणि भास्कराचार्य (जन्म

[पुढें चालू]

भास्कराचार्य† इत्यादि ज्योतिष्यांच्या ग्रंथांत परस्पर कितपत मेळ आढळतो; आलीकडे पृथ्वीचें गोलत्व, तिची दैनंदिन व वार्षिक प्रदक्षिणा, तिच्या अंगीं असणारी आकर्षणशक्ति, इत्यादि प्रमेयें इंग्रेजी पुस्तकांतून जीं आढळतात तीं आमच्या कोशकारांच्या ह्मणण्याप्रमाणें केवळ अनुमानानें सिद्ध केलीं आहेत किंवा प्रत्यक्षादि इतर प्रमाणांनींही त्यांस निश्चितता आली आहे; 'अचिंत्या: खलु ये भावा न तांस्तर्केण साधयेत्' हें भारतोक्त वचन प्रस्तुत स्थलीं कितपत लागू पडणारें आहे, व या 'अचिंत्य' गोष्टींविषयीं 'तर्क' करूं गेलें असतां त्यांत पातकसंग्रह होणार आहे कीं काय; 'सूर्यसिद्धांता'च्या§ वचनास 'काल्पनिक अतएव असत्–' असा शेरा मारून वर जें बेलाशक झुगारून दिलें आहे तें बरोबर केलें किंवा कसें; 'मदमोहादिक मानसदोष,' अर्वाचीन भूगोलज्ञांवर जे ठेवून दिले आहेत ते कितपत यथार्थ आहेत; पृथ्वीची अद्याप कोणीं दक्षिणोत्तर प्रदक्षिणा जी केली नाहीं तिचें बीज काय व ही प्रदक्षिणा न झाल्यानें तिचा सपाटपणा व विस्तीर्णपणा सिद्ध होतो किंवा कसें; तसेंच या एकंदर विषयाचा व धर्माचा परस्पर संबंध आहे किंवा नाहीं,—ह्मणजे पदार्थविज्ञानसंबंधीं माहिती बिनचुक असल्यानें किंवा नसल्यानें धर्मविषयक ग्रंथांची योग्यता कितपत कमज्यास्त होते,—या सर्व सदरांवर यथास्थित निरूपण करूं गेल्यास केवढा ग्रंथ माजेल ! तर प्रस्तुत स्थलीं वरच्यांपैकीं दोन तीन मुख्य गोष्टींविषयीं मात्र कांहीं उल्लेख करतों ह्मणजे बस आहे.

पहिली गोष्ट पृथ्वीचा गोलाकार. खगोलविद्येस मुख्य आधारभूत जें हें प्रमेय,—कीं ज्याचें आकलन होण्यास युरोपियन् लोकांस कित्येक शतकें लागलीं,—तें आह्मांस तर केव्हांपासून माहीत झालेलें आहे कोण जाणे ! 'पृथ्वी' व 'गोल' या दोन पदांचा निकटभाव आमच्या प्राचीन भाषेंत इतका दृढपणें स्थापित होऊन गेला आहे कीं, 'भू' व 'भूगोल' या दोन शब्दांत अर्थाच्या संबंधानें न्यूनाधिकभाव सुद्धां विशेष भासत नाहीं. एक कल्पना आली कीं दुसरी जणों काय तिला लगटून मनांत आलीच ! अगदीं प्राचीन ग्रंथांपासून तों अर्वाचीनांपर्यंत 'भूगोल,' 'क्षितिचक्र,' 'कुवलय' इत्यादि शब्द जेथें तेथें प्रयुक्त केलेले आढळतात. त्याचप्रमाणें 'पृथ्वीप्रदक्षिणे'च्या कथा 'रामायणा'पासून प्रसिद्ध आहेत. सकलस्रष्टा व सकल–व्यापी जो परमेश्वर त्याच्या पोटांत अनंत 'ब्रह्मांडें' नांदताहेत हें त्याचें

सन् ११६४) असे प्रमुख ज्योतिषी भरतखंडांत होऊन गेले. वराहमिहिराचा बृहत्संहिता नामक प्रख्यात ग्रंथ आहे.

आर्यभट्ट हा इ. स. ४७६ सालीं कुसुमपुर (आधुनिक पाटलीपुत्र किंवा पाटणा) येथें जन्मला. यानें तेविसाव्या वर्षी दशगीतिसूत्र व आर्याष्टशत हे ग्रंथ लिहिले. पुढें आर्यसिद्धांत नामक अठरा अध्यायांचा नामांकित ग्रंथ लिहिला. यानें बीजगणिताचा शोध लावला. 'सम्पादक'

† भास्कराचार्य—(जन्म शके १०३६ सन १११४) यानें सन ११५० सालीं सिद्धान्तशिरोमणि ग्रंथ लिहून पूर्ण केला व इ. स. ११८३ सालीं करणकुतूहल ग्रंथ पुरा केला. बापाचें नांव महेश्वर; गोत्र शांडिल्य. 'सम्पादक'

§ सूर्यसिद्धान्त—श्रीसूर्यनारायणाच्या कृपाप्रसादानें हा प्राप्त झाला अशी समजूत आहे. हा ज्योतिषावरचा प्राचीनतम ग्रंथ होय. 'सम्पादक'

स्तवनही आमच्या देशांत आज अनादिसिद्ध चालत आलें आहे. पण या सर्वांहून केवळ दृग्गोचर प्रमाण कोणास पाहिजे असल्यास त्यानें आमच्या ज्योतिष्यांनीं आपल्या जुन्या मताप्रमाणें तयार केलेले पृथ्वीचे गोल पाहावे. ते पाहूनही कोणास संशय उरल्यास त्याची खात्री याच्या पलीकडे आमच्यानें करवणार नाहीं!

दुसरी गोष्ट पृथ्वीचें परिमाण. याविषयीं निरनिराळ्या पुराणांतून काय काय लिहिलें आहे तें आम्हांस माहीत नाहीं; पण एतद्देशीय ज्योतिष्यांस हें परिमाण सांपडलें आहे कीं नाहीं याविषयीं निश्चय होण्यास पुढील उतारा बस आहे:—

"भास्कराचार्यप्रभृति अर्वाचीन ब्राह्मण ज्योतिषी व न्यूटन्प्रभृति† युरोपियन् ज्योतिषी, यांस जी भूमि दृग्गोलावरून गणितानें गोचर झाली, तिचा व्यास, त्यांनीं आठ सहस्र मैल, व परिधि पंचवीस सहस्र मैल निश्चित करून, ती गोलाकार आहे अशा कल्पनेनें तिचें पृष्ठफळ पंधरा कोटी मैल वर्तविलें आहे."१ (भरतखंड.)

---

† न्यूटन्प्रभृति अर्वाचीन यूरोपीय ज्योतिषी—कोपर्निकस (मृत्यु १५४४) नंतर ग्यालिलिओ इटालींतील पिसा नगरींत [१५६४–१६४२] होऊन गेला. यानें स्वानुभवानंतर अरिस्टॉटल्ची कांहीं मतें खोटीं ठरविलीं. म्हणून लोकांनीं त्याच्यावर गिल्ला करून त्याचे हाल हाल केले. इकडे इंग्लंडांत न्यूटन् [जन्म सन १६४२] पृथ्वीचें आकर्षण इ. आर्य शोधांचे पुनरुज्जीवन करून १७२१ सालीं वारला. यानें दुर्बिर्णीतहि बऱ्याच सुधारणा केल्या. सूर्य स्थिर व त्याभोंवती बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरु, शनि फिरतात असें कोपर्निकस्चें मत होतें. 'सम्पादक'

१ एतद्देशीय ज्योतिष्यांत अग्रगण्य जो वरील गणिती त्याच्या ग्रंथांतील गोष्टी अर्वाचीन युरोपियन् पंडितांच्या शोधांशीं किती मिळतात याचें दिग्दर्शन गेल्या सालच्या नोवेंबरच्या अंकांतील एका रत्नागिरीच्या पत्रांत केलेलें आहे तें§ पुष्कळांस माहीत असेलच. वरील पत्र लिहिणारानेंच* भास्कराचार्यांच्या ज्योतिषाविषयीं एक नवा ग्रंथ$ तयार केला आहे हेंही गेल्या अंकाच्या मलपृष्ठावरून सर्वांस जाहीर झालेंच आहे. या ग्रंथावरून आमच्या प्राचीन ज्योतिषाविषयींचें अज्ञान बरेंच दूर होईलसा सुमार दिसतो.

§ भास्कराचार्य—मतः—पृथ्वी वातावरणानें वेष्टित आहे; ग्रह स्वयंप्रकाशित नसून त्यांस सूर्यापासून प्रकाश मिळतो. म्हणून ते सूर्याच्या अतिसमीप असतां लहान व अति दूर असतां पूर्ण प्रकाशित बिंबें असल्यानें मोठे दिसतात. पृथ्वीचे पृष्ठभागाचे वर बारा योजनें म्हणजे १६ मैल उंचीपर्यंत वातावरण आहे. त्यांतच मेघ, वीज, इ. चमत्कार होतात. गोलाध्यायांत मूळचे श्लोक असे आहेत:—

उच्चस्थितो व्योमचरः सुदूरे। नीचस्थितः स्यान्निकटे धरित्र्याः॥
अतोऽणुबिम्बाः पृथुलश्च भाति। भानोस्तथासन्नसुदूरवर्ती॥
भूमेर्बहिर्द्वादशयोजनानि। भूवायुरत्राम्बुदविद्युदाद्यम्॥

पाश्चात्य अर्वाचीन ज्योतिषी हर्शेल् नॉर्मन् लॉकियर् वगैरेंच्या मतें वातावरणाची उंची पृथ्वीच्या व्यासाच्या शंभरांश म्हणजे ८० ऐंशी मैल आहे. तर भास्कराचार्यांच्या मताशीं हें मत फारच जुळतें हें उघड आहे. परंतु ४५ मैलांपलीकडे हवा फार पातळ होते, किरण परावर्तन करण्याची शक्ति नष्ट होते म्हणून व्यवहारतः वातावरणाची उंची ४५ मैल मानतात. प्रस्तुत पत्राचा असा सारांश आहे. 'सम्पादक'

* जनार्दन बाळाजी मोडक, फर्स्ट् असिस्टंट्, हायस्कूल्, रत्नागिरी. 'सम्पादक'

$ भास्कराचार्य व तत्कृत ज्योतिष. 'सम्पादक'

तिसरी गोष्ट ग्रहणांची उपपत्ति. हिजविषयीं 'सूर्यसिद्धांता'चें वाक्य,–कीं चंद्र सूर्यास आच्छादन करतो, व चंद्रास भूमीची छाया आच्छादिते '—हें सदरील कोशकारानें दाखल केलेंच आहे, परंतु तें काल्पनिक अतएव असत् होय असें ह्मटलें आहे. वरील विशेषणांचा व्यत्यास करून हें वाक्य असत् अतएव काल्पनिक असें जर ग्रंथकारानें दाखवलें असतें तर बरें झालें असतें. पण तसें कांहीं केलें नाहीं. तेव्हां वरील 'काल्पनिक'ता केवळ प्राचीन इतिहासकारांस अनुसरण्याचा जो त्याचा संकल्प आहे त्यावरून त्यानें स्थापित केली आहे असें ह्मटलें पाहिजे. आतां पुराणकर्त्यांचें तरी अनुसरण कोशकर्त्यानें कितपत केलें आहे हें पाहिलें असतां असें आढळेल कीं, जेथें तें त्यास सोयीवार पडलें तेथेंच केलें आहे. 'राहु' व 'रोहिणी' हे शब्द काढून पाहिले असतां वरील गोष्टीचा प्रत्यय येणार आहे. राहुकेतु चंद्र-सूर्यांचा ग्रास कां करतात याविषयीं आदिपर्वांतील प्रसिद्ध जी समुद्रमंथनाची कथा* तिचा उल्लेख वरील शब्दाच्या व्याख्येंत बिलकुल न करतां ज्योतिषांतील माहिती त्याच्यापुढें दाखल केली आहे. ती ही कीं, राहूचें तामस (अंधकाररूपी) मंडल फिरत फिरत चंद्र-कक्षेच्या समीप जेव्हां येतें तेव्हां चंद्रग्रहण होतें. याप्रमाणेंच दक्षाच्या§ सत्तावीस कन्या या चंद्रास दिल्या असून तो त्यांतील एकीविषयींच (रोहिणीविषयीं) जेव्हां प्रेमविशेष दाखवूं लागला तेव्हां बाकीच्यांनीं पित्याकडे गाऱ्हाणें करून त्यास क्षयाचा शाप देववला ही जन-

---

* मेरु पर्वतावर बसून देवांनीं अमृतप्राप्तीचा विचार करून असें ठरविलें कीं, देव व असुर यांनीं समुद्रमंथन करावें. त्याकरतां रवी ह्मणून अकरा हजार मैल उंच व तितकाच खोल जमिनींत असलेला मंदर पर्वत शेषाकडून उपटून घेऊन, त्याला वासुकि सर्प दोरीप्रमाणें बांधून मंथन सुरू केलें. दुग्ध, घृत, सोम, लक्ष्मी, सुरादेवी, श्वेत हय, कौस्तुभ मणि, अमृतकलश घेतलेला धन्वन्तरी, ऐरावत, कालकूट विष, वगैरे वस्तु त्यांतून निघाल्या. लक्ष्मी व अमृत यांकरतां देव-दानव भांडूं लागले. विष्णूंनीं मोहिनीरूपानें दानवांस भुलवून अमृतकलश घेतला. व ते देवांस अमृत देऊं लागले, तों राहु देवरूपानें येऊन अमृत घेऊन पिऊं लागला. तेव्हां सूर्य–चंद्रांनीं तें कपट उघडकीस आणल्यामुळें विष्णूंनीं सुदर्शन चक्रानें त्याचें मस्तक अमृत घशाखालीं उतरण्याचें आंत तोडून टाकलें. तेव्हांपासून राहूचें मुख सूर्य–चंद्रांचें नित्य वैर करीत आहे. पुढें देवदैत्यांचें युद्ध होऊन दैत्यांचा पूर्ण पराजय झाला. 'सम्पादक'

§ दक्ष ब्रह्मदेवाच्या दहा मानसपुत्रांपैकीं एक. तो ब्रह्मदेवाच्या उजव्या आंगठ्यापासून झाला असून सर्व प्रजापतींचा अधिपति होता. स्वायंभू मुनीची कन्या प्रसूति ही याची बायको. याला सोळा मुली झाल्या. तेरा कश्यपऋषीस व स्वाहा, स्वधा, सती या तीन अग्नि, पितर व शंकर यांस दिल्या. शिवाकडे गेल्यावेळीं शिवानें याचा मान केला नाहीं त्यामुळें रागावून हा निघून गेला व सती व शंकर यांचा द्वेष करूं लागला. यानें एक महायज्ञ केला व सर्व देवांस बोलावलें. फक्त सती व शंकर यांना मात्र वगळलें. तरीहि सती तेथें गेलीच व त्यानें अपमान केल्यामुळें तिनें अग्नींत उडी टाकली. हें शंकरास कळतांच त्यांनीं (कित्येकांच्या मतें स्वतः, तर कित्येकांच्या मतें एक जटा तोडून जमिनीवर आपटून तिच्यापासून निघालेल्या राक्षसाकडून) दक्षाचा शिरच्छेद केला. यानं आपल्या सत्तावीस मुली चंद्रास दिल्या तींच सत्तावीस नक्षत्रें. कश्यपाच्या तेरा बायकांपासूनच देव-दानव-मानव-प्राणी यांची उत्पत्ति झाली.

'सम्पादक'

प्रसिद्ध कथा सांगून शेवटीं कोशकार येणेंप्रमाणें लिहितात—" ही क्षयकल्पना लोक सोम-मंडलावर कल्पितात, परंतु ही अगदीं चूक असून कलांच्या ऱ्हासवृद्धींनीं व्याप्त सोममंडल अनादिसिद्धच ईश्वरानें ब्रह्मदेवरूपेंकरून निर्मिलेलें आहे." एकूण तात्पर्य असें कीं, पुराणांतील सोम व सृष्टींतील चंद्रमंडल यांचा कांहीं संबंध नाहीं. आकाशांत जो चंद्र दिसतो त्यास वृद्धिक्षयादि जे नियम ब्रह्मदेवानें लावून दिले आहेत ते अनादिसिद्ध आपोआप चाललेले आहेत. मग असें जर आहे, तर वरच्याच ब्रह्मदेवानें चंद्रसूर्यांस जे नियम लावून दिले आहेत त्यांस अनुसरूनच ग्रहणकालीं स्पर्श व मोक्ष हे त्यांच्या बिंबांत घडतात असें तरी ह्मणण्यास अडचण कोणती? कलांच्या क्षयवृद्धींची उपपत्ति जर पुराणांप्रमाणें घ्यावयाची नाहीं, व ती तशी घेणें ही 'अगदीं चूक' आहे; तर भूच्छाया व चंद्रमंडल ही अनुक्रमें-करून चंद्राच्या व सूर्याच्या ग्रहणास कारण होत हें तरी 'काल्पनिक अतएव असत्' असें कां ह्मणावें?[१]

आतां वरील सर्व उपपत्ति श्रुतीस विरुद्ध होत असें जर आमच्या प्रस्तुत कोशकाराचें

---

१. ही कथा पुराणांतील अनेक कथांप्रमाणें अलंकारिक होय हें थोडासा विचार केला असतां सहज लक्षांत येईल. दक्षाच्या सत्तावीस कन्या हीं आकाशांतील नक्षत्रें होत. यांतून चंद्राची मासिक प्रदक्षिणा नेहेमीं होत असल्यामुळें, चंद्राच्या अश्विनी, भरणी इत्यादि स्त्रिया होत व एकेकीपाशीं त्याचा एक एक दिवस वास होतो, या कल्पना सहज होणाऱ्या आहेत. याप्रमाणेंच राहूनें चंद्र-सूर्याच्या मध्यें बसून सुधेचें प्राशन केलें, व हें तो करीत असतां त्याचा शिरश्छेद होऊन अद्याप शिरोरूपानेंच तो आकाशांत भ्रमण करीत आहे, हें सर्व चंद्रग्रहणसमयींची स्थिति लक्षांत आणली असतां वरच्याप्रमाणेंच अलंकारिक वर्णन म्हणून तेव्हांच लक्षांत येईल. राहूचें अंधकाररूप मंडळ आहे असें जें वर सांगितलें आहे त्यावरून सहज कळणारें आहे कीं, पृथ्वीच्या मंडलाकृति भासणाऱ्या छायेसच 'राहु' ही संज्ञा आहे. या छायेचा एकंदर आकार शंकूसारखा आहे, तेव्हां सहजच शिराची कल्पना राहूवर बसली. चंद्राच्या प्रकाशास सुखकरत्वास्तव 'सुधा,' 'अमृत' म्हणण्याचा परिपाठ सर्वप्रसिद्धच आहे; मग राहु हा चंद्रसूर्यांच्या मध्यें बसून मुहूर्तमात्र सुधा प्राशन करीत नाहीं काय?

२. चंद्रग्रहणाविषयीं व सूर्यग्रहणाविषयीं आमच्या ज्योतिषग्रंथांतून यथार्थ उपपत्ति आहेच हें तों प्रतिवर्षी वर्तविलीं जातात यावरून तर उघडच आहे; पण नुसत्या लोकभाषेवरूनही वरील यथार्थ ज्ञानाविषयीं प्रमाण मिळतें. 'अमरकोशांत 'राहु' व 'अमावास्या' यांचे पर्याय येणेंप्रमाणें आहेत—

> तमस्तु राहुः स्वर्भानुः सैंहिकेयो विधुंतुदः ।
> अमावास्या त्वमावास्या दर्शः सूर्येन्दुसंगमः ॥

यांपैकीं 'तमस्' व 'सूर्येन्दुसंगमः' या शब्दांकडे लक्ष पोंचवलें असतां निकाल होणार आहे. 'अमावास्या' शब्दाची व्युत्पत्तिही *मागें एके प्रसंगीं सांगण्यांत आलीच आहे.

* अमा (सह) वसतः चंद्राकौं अस्यां सा। किंवा, सूर्याचन्द्रमसोः यः परः संनिकर्षः साऽमावास्या। ही गोलाध्यायांतील अशा दोन व्याख्या आहेत. अर्थः—'सूर्यचंद्र एकत्र येतात तेव्हां अमावास्या होते.' 'सम्पादक'

मत असेल तर तेंही चुकलें आहे. वेदांतील एका ऋचेंत§ चंद्रग्रहणाच्या खऱ्या उपपत्ती-विषयीं स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरून वरील तिन्ही गोष्टी वेदविरुद्ध आहेत किंवा वेदसंमत आहेत याविषयीं कोणासही संदेह उरणार नाहीं.'

§ हा उल्लेख चंद्रग्रहणासंबंधीं नसून सूर्यग्रहणासंबंधीं आहे. ऋग्वेद मंडल ५ वें अनुवाक तिसरा, सूक्त ४० वें ( किंवा चवथें अष्टक, दुसरा अध्याय, वर्ग ११–१२ ) पाहा:—

यत्त्वा सूर्य स्वर्भानुस्तमसाऽविध्यदासुरः। अक्षेत्रविद्यथा मुग्धो भुवनान्यदीधयुः ॥ ५ ॥
स्वर्भानोरध यदिन्द्र माया अवो दिवो वर्तमाना अवाहन्।
गूळ्हं सूर्यं तमसापव्रतेन तुरीयेण ब्रह्मणाविन्ददत्रिः॥ ६ ॥
मा मामिमं तव सन्तमत्र इरस्या द्रुग्धो भियसा निगारीत्।
त्वं मित्रो असि सत्यराधास्तौ मेहावतं वरुणश्च राजा ॥ ७ ॥
ग्राव्णो ब्रह्मा युयुजानः सपर्यन् कीरिणा देवान्नमसोपशिक्षन्।
अत्रिः सूर्यस्य दिवि चक्षुराधात्स्वर्भानोरप माया अघुक्षत् ॥ ८ ॥
यं वै सूर्यं स्वर्भानुस्तमसाविध्यदासुरः। अत्रयस्तमन्वविन्दन् नह्यन्ये अशक्नुवन् ॥ ९ ॥

हे सूर्या आसुर स्वर्भानु तमानें झांकलें तेव्हां सर्व भुवनांतील लोक आपापलीं स्थानें न जाणणारे अर्थात् मुग्ध झाल्यासारखे दिसले ॥ ५ ॥ हे इन्द्रा, 'द्यु'खालच्या स्वर्भानूच्या मायांचा तूं नाश करतोस. अपव्रत तमानें झांकलेल्या सूर्यास तुरीयब्रह्मानें अत्रीनें मिळविलें ॥ ६ ॥ हे अत्रे, अशा मला अन्नेच्छेनें द्रोह करणारा तो असुर भयजनक अंधारानें न गिळो ॥ ७ ॥ अत्रि ब्राह्मणानें ग्राव्याची योजना करून, व स्तोत्रानें देवांची पूजा करून, व त्यांस नमन करून स्वर्भानूच्या मायांचें निवारण केलें, आणि सूर्याच्या तेजाच्या ठिकाणीं त्यानें दृष्टि लावली; म्हणजेच, सूर्य तमापासून मुक्त झाल्याचें त्यांनीं पाहिलें ॥ ८ ॥ ज्या सूर्यमण्डलाला ( सुर=स्वयंप्रकाशी गोल ) असुर ( परप्रकाशी गोल किंवा स्वर्भानु ) तमानें झांकतात तें सूर्यमण्डळ अत्रींनीं मिळविलें इतर कोणास मिळवितां आलें नाहीं. [ या शोधाचें श्रेय प्रथम अत्रींना आहे. हा वेध त्यांनींच प्रथम शोधून काढला असा अर्थ. ] 'सम्पादक'

१. वेदांत ग्रहणाविषयीं, पृथ्वीच्या आकर्षणाविषयीं वगैरे जे चमत्कारिक उल्लेख आहेत ते ज्यास पाहणें असतील त्यानें मुंबईचे कैलासवासी विष्णुबोवा ब्रह्मचारी* यांच्या 'वेदोक्त धर्मप्रकाशां'-तील 'वेदांतील सृष्टीचे नियम' हें प्रकरण पाहावें. 'विविधज्ञानविस्तारा'चा सन १८७१ चा जानेवारीचा अंकही प्रस्तुत विषयाच्या संबंधानें उपयोगी आहे.

*विष्णुबोवा ब्रह्मचारी—(शके १७४७–१७९२)—कुलाबा जिल्ह्यांत महाडजवळ निजामपूर पेट्यांत शिरवळ हें यांचें जन्मस्थान. मूळचें पूर्ण नांव विष्णु भिकाजी गोखले. वैराग्य झाल्यामुळें सरकारी नोकरी सोडून यांनीं अरण्यवास पत्करला, व देशपर्यटन करीत करीत नाशिक, पंढरपूर, कलकत्ता वगैरे शहरांत फिरून १८५६ सालीं हे मुंबईस येऊन राहिले. वैदिक धर्मविषयक वादविवाद वगैरेबद्दल यांनीं मुंबईत खूप चळवळ केली. 'वेदोक्त धर्मप्रकाश' या आपल्या ग्रंथांत यांनीं खालील ज्योतिषविषयक गोष्टींना वेदांत आधार दाखविले आहेत:—

( १ ) सूर्य पृथ्वीला आकर्षण करतो. ऋक्संहिता अष्टक तिसरें अध्याय चवथा वर्ग पांचवा ( किंवा मण्डल तिसरें अनुवाक ५ सूक्त ५९ ) पाहा:—

मित्रो जनान्यातयति ब्रुवाणो मित्रो दाधार पृथिवीमुत द्याम् ॥
मित्रः कृष्टीरनिमिषाभि चष्टे मित्राय हव्यं घृतवज्जुहोत ॥ १ ॥

[पुढें चालू]

असो; आतां सरतेशेवटीं एक निराळ्या तऱ्हेचा उतारा मात्र येथें देतों. त्याविषयीं वाचकांस कांहीं विशेष सांगायाची जरूर दिसत नाहीं. 'म्लेच्छ' शब्दाखालीं या कोशांत पुढील मजकूर आढळतो:—

"कौरवपांडवांचें युद्ध झालें त्यांत हे लोक बरेच होते असें भारतावरून दिसतें, आणि त्यावरून कृष्णद्वैपायन व्यासास हे चांगल्या रीतीनें ऐकून जाणत होते इतकेंच नव्हे, तर ते, आमच्यांतील अडाणी लोक द्वैपायन हीं अक्षरें गाळून, व्यास कृष्ण येवढ्याच शब्दांतील, व्याकरण हा शब्द म्हणतांना जसें वियाकर्न म्हणतात, त्याप्रमाणें व्यास या स्थलीं यियास म्हणत आणि कृष्ण या स्थलीं कष्ण बोलत, तो शब्द ऐकून ऐकून जीजास कष्ण म्हणतां म्हणतां जीजस काइस्ट शब्दोच्चार करीत परस्परांत त्याच्या वार्ता नेहेमी बोलत; आणि व्यासाची माता कुमारी‡, तसेंच त्यास शिष्य चार,$ हेंही वृत्त त्यांस चांगल्या प्रकारानें ठाऊक होतें, मात्र त्यांचीं नांवें तादृश त्यांच्या ध्यानांत राहिलीं नसावींत. तरी जैमिनि हा शिष्य व्यासासही अंमळ भारी होता, त्यामुळें त्याच्या नांवाचा त्यांस विसर न पडल्यामुळें, त्याच्या गोष्टी वारंवार जॉन अशा नांवानें काढीत. आतां यावरून मला असें वाटतें कीं, पुढें त्यांच्यांत कोणी एकादा पुरुष उत्पन्न झाला असावा, आणि त्याच्यावर वर लिहिलेले व्यासाचे संबंध त्यांनीं बसविले असावेत. या माझ्या म्हणण्याचा मार्मिक लोक विचार करोत."

याप्रमाणें 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' या ग्रंथाचें गुणदोषनिरूपण झालें. यांत गुणांपेक्षां दोषांच्या विवरणास जरी ज्यास्त जागा लागली आहे तरी आरंभीं आम्हीं वाचकांस

---

अर्थः—'सर्व प्रजेला सूर्याचा आधार आहे. तो पृथ्वीचें आपल्याकडे आकर्षण करतो आणि या त्याच्या आकर्षणांतून पृथ्वी निमिषमात्रहि सुटत नाहीं.

(२) सूर्यकिरणांनीं पाण्याची वाफ होऊन आकाशांत जाते व तिचेंच पुनः पाणी होऊन पाऊस पडतो:—

'अग्निर्वा इतो वृष्टिमुदीरयति मरुतः सृष्टां नयन्ति यदा खलु वा असावादित्यो-न्यङ्रश्मिभिः पर्यावर्ततेऽथ वर्षति ॥' यजुर्वेद आपस्तंभ संहिता दुसरें अष्टक अकरावा अनुवाक पाहा.

अर्थः—अग्नि पाण्याची वाफ करतो, म्हणून तो पावसाच्या उत्पत्तीचें कारण होय. वायु सर्व सृष्टींत अभ्र इ. पाऊस लोटून नेतात; पण पर्जन्याचें प्रमुख कारण सूर्यकिरण होत. ते पाण्याची वाफ करून आकाशांत नेतात, व ती पुनः जलरूप होऊन पाऊस पडतो.

(३) ग्रहणांचा उल्लेख वर आलाच आहे. 'सम्पादक'

‡ सत्यवतीला तिचें शंतनूशीं लग्न होण्याआधीं कौमार्यावस्थेंतच पराशरऋषीकडून मातृपद प्राप्त झालें; व या संबंधापासून झालेला मुलगा व्यास होय. 'सम्पादक'

$ जैमिनि २ वैशंपायन ३ पैल ४ सुमंतु. पहिल्यानें 'अथातो धर्मजिज्ञासा' या पक्षानें 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' हा पक्ष घेणाऱ्या गुरु व्यासाबरोबर वाद केला. हा जनमेजयाच्या सत्रांत वक्ता होता. दुसरा तैत्तिरीय शाखाध्यायी व इतिहासपुराणें सांगण्यांत फार वाकबगार होता.

'सम्पादक'

कळवून ठेवलेंच आहे कीं, या दोषांचा मुख्य ग्रंथाशीं तादृश संबंध नाहीं. ज्या मतांतर आम्हीं चर्चा केली आहे तीं केवळ परिशिष्टादाखल कांहीं कांहीं ठिकाणीं प्रगट झालीं आहेत; व ग्रंथकाराची स्थिति मनांत आणली असतां त्यांबद्दल कोणास आश्चर्यही वाटणार नाहीं. ज्याला अर्वाचीन इतिहासाची, भूगोलाची वगैरे माहिती नाहीं, आणि त्यांतून स्वधर्माचा अभिमान ज्यास पूर्ण आहे, त्यास जॅान् कोणीकडे व जैमिनि कोणीकडे, ऋषिक देश कोठला व रशिया कोठला, पृथ्वीचें अंतराळीं अधांत्रीं राहणें व नित्य परिभ्रमण करीत असणें हें चंद्राविषयीं जें आपण नित्य आपल्या डोळ्यांनीं पाहतों त्याहून लवमात्रही ज्यास्त आश्चर्य करण्यासारखें नाहीं, या गोष्टी लक्षांत येणें कठिण आहे यांत संशय नाहीं. यास्तव धर्मवेड्या मिशनरींच्या, दुराग्रही इंग्रेज ग्रंथकारांच्या, व अर्वाचीन पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथांतून वेळेनसार विलक्षण तर्कांचे तारे तुटलेले पाहिले असतां त्यांची एरवींची योग्यता कमी झालीशी जशी आपण मानीत नाहीं; त्याप्रमाणेंच इकडच्या पंडितांचेही वरच्यासारखे अभिमानमूलक विलक्षण लेख पाहून त्यांबद्दल त्यांजवर विशेष दूषण ठेवणें योग्य नाहीं. तरी ज्या अर्थी कोणत्याही तऱ्हेचीं भ्रमात्मक मतें अज्ञानास व दुराग्रहास वर्धक होतात, त्या अर्थी त्यांचें निरसन करून सत्य प्रगट करणें हें सर्व देशहितेच्छूंचें कर्तव्य होय. हें जाणूनच प्रस्तुत कोशकाराच्या आग्रहमूलक अभिप्रायांचें वर खंडन केलें आहे. त्यावरून आमच्या वाचकांनीं हा बोध घ्यावा कीं, ज्या गोष्टींची आपणांस पक्की माहिती नाहीं किंवा मुळींच नाहीं त्यांविषयीं निश्चयात्मक मतें देणें हें अतिशय वेडेपणाचें काम होय. विद्या ही आकाशाप्रमाणें अनंतपार आहे, व मानवी बुद्धि ही पक्ष्यांच्या पांखांप्रमाणें थोड्या आटोक्याची आहे; यास्तव तिच्या अवसानावर मनुष्यानें कितीही भरारी मारली, तरी विद्याप्रदेशाचें आक्रमण तें कितीसें होणार? कोणी केवढाही विद्यासंपन्न असला तरी हजारों विषय त्यास मुळींच अज्ञात राहतील, व जितके अवगत असतील तितकेही सर्व इत्थंभूत त्यास माहीत असतील असें नाहीं, हें उघडच आहे. तेव्हां यावरून हें सिद्धच आहे कीं, कोणास निखालस खात्रीचा जो अभिप्राय देणें असेल तो त्यानें आपल्या पूर्ण माहितीच्या विषयांतच द्यावा हें बरें; आपली मर्यादा उल्लंघून दुसऱ्याच्या विषयावर धाड घालण्याचें साहस सहसा पतकरूं नये. तें आपल्या सामर्थ्याच्या वृथाभिमानामुळें केलें असतां शत्रूच्या मुलखांत चाल केली असतां जशी मोठमोठ्या सैन्यांचीही धूळधाण झाली आहे, किंवा गरुडपक्षी मोठा उंच उड्डाण करणारा म्हणून तो जर पाण्यांत पोहूं लागेल किंवा देवमासा शेपटाच्या तडाक्यासरसा होडयांस उंच झुगारून देणारा म्हणून भुईवर येऊन श्वापदांशीं सामना करायाला जर जाईल, तर जशी त्यांची अवस्था होईल, त्याप्रमाणेंच वरील साहसाचा परिणाम होईल हें उघड आहे.[1] तर या

१. वर जी गोष्ट उघड आहे म्हणून म्हटलें ती मोठमोठ्या अकटोविकट पंडितांसही अभिमानांधतेनें बिलकुल दिसत नाहीं हें कोणास सांगितलें तर खरें तरी वाटेल काय? पण मौज पाहा!—आमचे डॉक्टर् विल्सन् मोठ्या नामांकित विद्वानांत मोडत होते; पण त्यांचा एकादा ग्रंथ पाहिला तर त्याच्या पाठीवर पुढील चमत्कार आढळेल. कोणता? तर 'हिंदुधर्माचें खंडन,' 'मुसलमानी

[ पुढें चालू. ]

सिद्धांताचें उदाहरण वरील विवरणांत वाचकांस सांपडेल. शिवाय विषयाच्या संबंधानें पाहतांही तें महत्त्वाचें होय हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

---

धर्माचें खंडन,' 'पारशी धर्माचें खंडन,' 'चिनी धर्माचें खंडन'!! असेंच सव्यसाचित्व जुन्या शास्त्रविद्येस ज्याच्या योगानें मिनिट बसलें त्या 'मिनिटां'त मेकॉलेसाहेबांनींही प्रगट केलें आहे. पुढील वाक्यरत्नें पाहा—

"I have never found one among the Orientalists themselves who could deny that a single shelf of a good European library was worth the whole native literature of India and Arabia!"

"I certainly never met with any Orientailist who ventured to maintain that the Arabic and Sanskrit Poetry could be compared to that of the great European nations!!"

"I doubt whether the Sanskrit literature be as valuable as that of our Saxon and Norman progenitors!!!"

हे आंग्लभौम पंडिताचे महासिद्धांत ऐकून कालिदास, पाणिनि, भास्कराचार्य, फर्दोशी,§ शेकसादी¶ वगैरे मंडळीनें स्वर्गांत टाळ्यांचा गजर करून टाकला असेल नाहीं बरें!!!

§फर्दोशी—सुप्रसिद्ध पर्शियन् कवि. मूळचें नांव अबुल् कासीम मन्सर. यानें शाहनामा नांवाचा साठ हजार श्लोकांचा इराणचा संपूर्ण इतिहास कथन करणारा ग्रंथ लिहिला. [ जन्म सुमारें इ. स. ९४१, मृत्यु इ. स. १०२०. ] याचें अरबी व पल्वी भाषांचें ज्ञान अत्युत्तम होतें. सुरुवातीच्या कारकिर्दींत दिखन दनीश्वरनें प्राचीन राजांच्या आख्यायिका जमवून खोदाइनामा नांवाचा ग्रंथ तयार केला होता. इ. स. ९७६ त नूह् राजानें दाकिकी कवीकडे हेंच काम दिलें. महमद सबक्तगीन (इ. स. ९७८–१०३६) यालाहि या कामाची आतुरता होती. व दाकिकीचा खून झाल्यावर त्यानें सात कवींची या कामावर योजना केली. पुढें या अबुल् कासीमला राजाची भेट करवून देण्यांत आली तेव्हां त्याच्या जन्मस्थलाची हकीकत विचारल्यावर त्यानें प्राचीन इतिहासाचें अगाध ज्ञान प्रकट केल्यामुळें थक्क होऊन आपल्या दरबारचा स्वर्ग (फर्दोस) बनविला म्हणून अबुल्ला फर्दोशी असें नांव देऊन राजानें त्याच्याकडे त्या ग्रंथाचें काम दिलें. सात कवींपैकीं तिघे आपल्या बैठकींत त्याला त्याची काव्यप्रतिभा सिद्ध झाल्याशिवाय घेईनात. व त्याची फजिती करण्यासाठीं त्यांनीं अशी अट घातली कीं त्या तिघांनीं केलेल्या तीन ओळींशीं प्रास जमेल अशी चवथी ओळ त्यानें तेथल्या तेथें रचून दाखवावी. त्यानें तें कबूल केल्यावर फारसी भाषेंत प्रास जुळविण्यास चवथा शब्दच सांपडूं नये याकरितां युक्तीनें आगाऊ खटपट करून तयार केलेल्या तीन ओळी तिघांनीं म्हटल्या. तों त्यानें शाहनामा पुस्तकांतील लढायांचा संदर्भ घेऊन त्या प्रासाला जुळणारा शब्द काढून चवथी ओळ रचून दाखवून त्यांना थक्क केलें.

सुलतानानें दर हजार श्लोकांस सोन्याचीं हजार नाणीं देण्याचें ठरविलें. हसन नांवाच्या आपल्या खजिनदाराबरोबर सुलतानानें रकम पाठविली पण सर्व काव्य संपल्यावर एकदमच द्या असें त्यानें सांगितलें. पसतीस वर्षांनीं तें काव्य इ. स. १०११ त पूर्ण झालें. सुलतानानें ठरल्याप्रमाणें साठ हजार सुवर्णनाणीं हत्तीवर घातलीं पण खजिनदारानें 'चांदीचीं नाणींच द्यावीं; सोन्याचीं नाणीं त्याच्या योग्यतेहून ज्यास्त होतील.' असें सांगितल्यावरून चांदीचीं पाठविलीं. फर्दोशी स्नान करतांना हत्ती आला तेव्हां सुवर्णनाणीं ठरावाप्रमाणें असतीलसें वाटून त्यानें ठेवून घेतलीं.

[ पुढें चालू ]

असो; आतां सरतेशेवटीं एक दोन गोष्टींविषयीं कांहीं सूचना करून प्रस्तुत लेख आटपतों. एक गोष्ट ही कीं, प्रस्तुत कोशासारखा मोठा व उपयुक्त ग्रंथ ज्या 'गुर्जर जातीय श्रीमान् गृहस्थानें साह्य दिल्यामुळें' प्रसिद्ध होऊन ग्रंथकर्त्यांच्या दीर्घकालिक श्रमाचें चीज

---

पण मागाहून चांदीचीं नाणीं दिसतांच संतापून वीस हजार नाणीं सुलतानाच्या मर्जीतला अयाझ यास, वीस हजार नाणीं स्नान घालणारास, व वीस हजार नाणीं एका दारूच्या पेल्याची किंमत म्हणून देऊन टाकून आपण पैशाकरतां कांहीं श्रम केले नाहींत असा सुल्तानाकडे निरोप पाठवून तो रागावेल म्हणून फर्दोशी गिझनी सोडून निघून गेला. जातांना सुलतानास देण्याकरतां एक निर्भर्त्सनापर काव्य एका स्नेह्यापाशीं ठेवून तो गेला. तो गेल्यावर वीस दिवसांनीं तें काव्य सुलतानास देण्यांत आलें. आतांना सुल्तान प्रार्थना करी तेथच्या भिंतीवर 'महमदाचा दरबार समुद्रासारखा अफाट आहे. मला खूप खोल बुड्या मारूनहि मोत्यें लामलीं नाहींत हा माझ्या दुर्दैवाचा परिणाम. त्यांत त्या सागराकडे काय दोष!' असें त्यानें लिहून ठेवलें. पण लेखी कविता मात्र याच्या अगदीं उलट होती. तींतील एकाच श्लोकाचें इंग्रेजी भाषांतर खालीं देत आहों. कारण पुढें हा श्लोक आबालवृद्धांच्या तोंडीं झाला:—

"Had Mahmud's father been what he is now,
A crown of gold had decked this aged brow;
Had Mahmud's mother been of gentle blood,
In heaps of silver knee-deep had I stood."

फर्दोशी पुढें अनेक देशांत भटकून शेवटीं परत जन्मभूमीला (तूस) आला व आजारी पडला. इकडे सुलतानालाहि पश्चात्ताप होऊन सुवर्णनाणीं, मानाचा झगा, व माफीपत्र त्यानें फर्दोशी कडे पाठविलें, पण दैवदुर्विपाक असा कीं एका दरवाज्यांतून हे जिन्नस गांवांत येत असतां दुसऱ्या दरवाज्यानें फर्दोशीचें प्रेत बाहेर जात होतें. त्याची मुलगी ती देणगी पत्करीना पण वृद्ध बहिणीनें त्याची बाळपणापासूनची इच्छा व महत्त्वाकांक्षा जाणून ती देणगी घेऊन तूस नदीला घाट व एक मोठी धर्मशाळा बांधली. फर्दोशीचें कुराणाधारें रचलेलें ७००० श्लोकांचें 'यूसफ् व जुलेखा' या नांवाचें एक काव्य आहे. पण तें फारसें प्रसिद्ध नाहीं. 'सम्पादक'

शेक सादी—(इ. स. ११८४-१२९२) मूळचें नांव मुसली किंवा मुशरीफ उद्दीन. इराणचा फार विख्यात कवि. जन्म सिराज येथें. बाप लहानपणीं वारला. बगदादच्या निजामिया संस्थेंत शिक्षण (११९६-१२२४). १२२६ सालीं बापाच्या पश्चात् त्याचा सांभाळ करणारा पालक आटा बेग (सादी झेंगी नांवाचा) पदच्युत झाल्यामुळें दुःखानें सिराज सोडून हा कवि (१२२६-५६) भटकत राहिला. गुजराथेंत सोमनाथाचें शिवमंदिर यानें पाहिलें, हा दिल्लीला गेला, हिंदुस्थानी शिकला, मक्का, मदिना या यात्रा यानें केल्या व सिरियामध्यें शेख म्हणून ख्यातिहि मिळविली. प्रवचन कौशल्याबद्दलहि हा प्रसिद्ध होता. जरुसलेमजवळ भटकत असतां हा कैद झाला. एका स्नेह्यानें खंडणी भरून सोडवून त्यास आपली मुलगी दिली. पण ती भांडकुदळ निघाल्यानें पुनः गृहत्याग करून यानें वनवास पत्करला. अखेर १२५६ मध्यें आपल्या पूर्वीच्या पालकाचा पुत्र अबू बाकर याच्या सुखसमृद्धिशांततापूर्ण कारकिर्दींत परत सिराजला येऊन आमरण तेथेंच राहिला. मक्केच्या यात्रेकरतां मात्र प्रसंगानुसार सिराज सोडून जाई. यानें अखेरचे दिवस ईश्वरचिंतनांत व काव्यरचनेंत घालविले. याच्या गुलिस्तान (गुलाबाची बाग) व बुस्तान (फळांची बाग) अशा दोन कविता आहेत. याच्या वीणाकाव्यांचा एक दीवान नांवाचा ग्रंथ आहे तो याच्या सर्व कवितांत मोठा आहे. 'सम्पादक'

झालें, व लोकांस लाभ झाला, त्याचें नुसतें नांवही या ग्रंथांत कोठें आढळत नाहीं हें बरोबर नाहीं. ज्या काळांत विद्येकडे पैशाचा विनियोग झालाच तर देशाच्या सुदैवानें क्वचित् कोठें होणारा, त्या काळांत असल्या औदार्याचा विशेषतः उल्लेख होणें अत्यंत अवश्य होय. शिवाय दोन ग्रंथ नुसते पाहायाला दिल्याबद्दल त्या देणारांचीं नांवें * जर ठळठळीत दाखल झालीं, तर प्रस्तुत कोश वरील उदार साह्यकर्त्यांस नजर तरी झाला पाहिजे होता. तर सदरील ग्रंथाची सुदैवेंकरून द्वितीय आवृत्ति छापण्याचा प्रसंग कधीं पुढें आल्यास वरील सूचनेकडे लक्ष दिलें जाईल अशी आह्मी आशा करतों. या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळेस या ग्रंथास दुसरा भाग ह्मणूनही एक जोडण्यासारखा आहे. तो हा. आलीकडील काळांत आमच्या देशांत चोहोंकडे बरेच नवे धर्मविषयक ग्रंथ झाले; ह्मणजे पूर्वीच्या पुराणांत अशा पुण्यशील राजांच्या वगैरे कथा लिहिल्या गेल्या, त्याप्रमाणेंच आलीकडे मोठमोठे नामांकित साधु चोहोंकडे प्रसिद्धीस येऊन त्यांच्या कथा लिहिल्या गेल्या. तर हें अर्वाचीन वृत्तांतही या ' भारतवर्षीय कोशास' जोडायासारखे आहेत. हे जोडले असतां प्रस्तुत ग्रंथ अगदीं अर्वाचीन काळापर्यंत आणून पोंचवल्याप्रमाणें होईल. हें दुसरें कामही पहिल्याप्रमाणेंच रा० गोडबोले यांच्या हातून सहज रीतीनें चांगलें होण्यासारखें आहे हें उघडच आहे; कां कीं, ज्याचा ज्या विषयावर विशेष व्यासंग असतो व ज्याविषयीं त्यास आवड असते, तें त्याच्या हातून जसें उत्कृष्ट होईल तसें नवी तयारी जो पहिल्यापासून करूं जाणारा त्याच्या हातून होणार नाहीं. अशा प्रकारची लोकसेवा करण्याची आपली मनीषाही कोशकारानें प्रस्तावनेंत प्रदर्शित केली आहे. तर आह्मी अशी उमेद बाळगतों कीं, सर्व विद्यावृद्धीच्छु व देशाभिमानी लोक हे प्रस्तुत उपयुक्त कोशाचा उत्कंठापूर्वक आदर करून वर जो त्याचा परिशेष सांगितला तो रचून आपल्या देशबंधूंस सादर करण्याचाही कालेंकरून प्रसंग आणतील!

---

## मराठी पुस्तकें

ब्राह्मणांचें येथें नाहीं प्रयोजन।
द्यावें हाकलून जोती ह्मणे॥ ब्राह्मणांचें कसब–जोती*

अंक ४४.—(१) सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट. (२) विद्यार्थिबुद्धिवर्धिनी. (३) जमाखर्चाची पद्धति.

---

* श्रीमंत रामचंद्र गणेश ऊर्फ आप्पासाहेब नातू यांनीं भारत व रा. त्र्यंबक विश्वनाथ गोडबोले यांनीं रामायण दिलें, व रामशास्त्री मुरपुरकर यांच्या मदतीनें शके १७९२ ते १७९८ पर्यंत खपून गोडबोले यांनीं हा कोश तयार केला. 'सम्पादक'

* जोतीराव गोविंदराव फुले—मूळ आडनांव गोन्हे, पण यांचे वडील व दोघे चुलते यांनीं पेशव्यांस देण्याचे फुलांचे पोषाख करण्यांत कौशल्य दाखविल्यामुळें कीर्ति होऊन फुले असें आडनांव जारी झालें, जन्म पुणें इ. स. १८२७ मृत्यु १८९०; गोवंडे, परांजपे, वाळवेकर हे तीन यांचे मोठे

सदरील पुस्तकांतील पोंचीवरून वाचकांच्या लक्षांत असेलच कीं, 'सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' 'विद्यार्थिबुद्धिवर्धिनी' व 'जमाखर्चाची पद्धति' अशीं तीन पुस्तकें त्यांच्या कर्त्यांकडून आमच्याकडे पाठवण्यात आलीं. त्यांवर या खेपेस आह्मी आपलें मत प्रगट करतों.

**१. सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट**—या पुस्तकाविषयींच खुद्द लिहिण्यापूर्वी 'सत्यशोधक समाज' ह्मणजे काय प्रकरण आहे हें आमच्या वाचकांस कळवणें जरूर आहे. ही माहिती त्यांस अशाकरतां दिली पाहिजे कीं, हल्लीं आमच्या देशांत जिकडे पाहावें तिकडे खेड्यापाड्यांतून सुद्धां समाज व सभा स्थापन होत असल्याचें बरचेवर ऐकूं येतें, तेव्हां आमच्या देशाच्या दूर दूर टिकाणीं येथील सत्यशोधक मंडळीचें बहुधां नांवही माहीत असण्याचा संभव नाहीं. पुण्यासारख्या शहरांत जोतीबाप्रभृति विद्वन्मणींनीं येवढ्या परम स्तुत्य उद्देशानें काढलेला व आज थोडीं थोडकीं नाहींत तर चार वर्षें सतत चाललेला वरील समाज कोणास माहीत नसून त्याच्या स्वरूपाचें प्रकाशन करण्याचें आमच्यासारख्या गरीब पुस्तककर्त्यास अगत्य पडावें, या गोष्टीचें आह्मांस अत्यंत सखेदाश्चर्य वाटतें ! पण उपाय काय, पडलें तें केलें पाहिजे.

दोन वर्षांपूर्वी या शहरांत एका जगद्गुरूंची* स्वारी प्राप्त झाली होती; तिचा आरंभींच्या धूळभेटीपासून तों अखेरच्या चिखलवृष्टीपर्यंत एकंदर काय वृत्तांत झाला तो आह्मीं आपल्या वाचकांस बराच सविस्तर कळविला होता.* त्या वेळीं स्वामींचें जिवलग अपत्य जो

दैस्त शिक्षण साधारण झाल्यावर जगन्नाथ सदाशिवजी वगैरेंच्या मदतीनें बुधवारांत भिड्यांच्या वाड्यांत सन १८५१ मध्यें यांनीं मुलींची शाळा स्थापली. पुण्यांत फार गडबड उडाली. लोक विरुद्ध असल्यामुळें मास्तर मिळणें कठिण झालें. तेव्हां जोतीबा व त्यांची पत्नी सावित्रीबाई यांनींच अध्यापनाचें काम करावें सदर सावित्रीबाईस लोक रस्त्यानें खडे वगैरे मारून त्रास देत. लोकांनीं चुगल्या करून जोतीबांस त्यांच्या वडिलांकडून सपत्नीक घरांतून बाहेर घालविलें. सर् अर्स्किन् पेरी, कर्नल् मेडोज् टेलर् वगैरे साहेबांची यांस आर्थिक मदत असे. व यांच्याच शिफारशीनें १८५२ सालीं सरकारकडून विश्राम-बागेंत यांस शालजोडी मिळाली. दक्षिणा प्राईझ कमिटीहि यांस आर्थिक मदत देई. शेणवी जातींत पुनर्विवाह चालू करण्यास यांनींच खटपट केली. पुनर्विवाहबंदीमुळें वांकडें पाऊल पडलेल्या विधवांनीं गर्भपात, भ्रूणहत्या अगर बालहत्या करूं नये ह्मणून गुप्त-प्रसुति-गृह यांनीं आपल्या घरीं कित्येक दिवस चालू ठेवलें होतें ! अतिशूद्रांचीहि एक शाळा यांनीं काढली. यांनीं सत्यशोधक समाज स्थापला (सन १८७३) व 'शिवाजीचा पवाडा', 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचें कसब', 'शेतकऱ्यांचा आसूड' 'सार्वजनिक सत्यधर्म' वगैरे पुस्तकें लिहिलीं. 'सम्पादक'

* स्वामी दयानंद सरस्वती. पृष्ठें ३१३–३१८ पाहा.

यांचीं व्याख्यानें बुधवारांत बेलबागेसमोर डॉ. भिडे यांच्या दिवाणखान्यांत होत. येथेंच "हिंदुकुश" होता. यांचे प्रतिस्पर्धी वक्ते रेव्हरंड् नीळकंठ शास्त्री घत्ते, काशीकर, (बायबलचें संस्कृतांत अनुष्टुभ् छंदांत भाषांतर करणारे) हे असून यांच्या व्याख्यानांस श्रोतेच नसत. दयानंदांच्या नादीं के. न्या. रानडे यांसारखे मोठे पुढारीहि लागले होते. व पांच सप्टेंबरला व्याख्यानसमाप्तीनंतर त्यांची हत्तीवरून गिरवणूक काढण्याचा बूट रानड्यांच्याच घरीं मुक्रर झाला. सकाळपासून सायं-काळपर्यंत काळ्या हौदापासून साऱ्या गांवभर शृंगारलेल्या गर्दभानंदाचार्यांची मिरवणूक काढून

[ पुढें चालू ]

आर्यसमाज त्याविषयीं आह्मीं जें भाकीत केलें होतें तें लवकरच प्रत्ययास येऊन त्याच्या पुरस्कर्त्यांचे आशीर्वाद सर्व निष्फळ झाले. हीच गति कदाचित् प्रस्तुत सत्यशोधक समाजाचीही लवकरच होईल. व आर्यसमाजाचे जनक जसे आतां धर्मोन्नति करतां करतां थकून काशीवास पतकरून राहिले आहेत, त्याचप्रमाणें बहुधां आमचे जोतीरावही सत्य शोधतां शोधतां दमून शेवटीं कदाचित् येरुशालेमास तीर्थयात्रा करून आकाशांतील बापाच्या पुत्राच्या ज्योतीस जाऊन मिळतील ! असें झाल्यास पुढील लोकांस सत्यसमाजाचें अधिपति येवढे कोण होते याविषयीं मोठा भ्रम पडेल व प्रबळ उत्कंठा प्राप्त होईल. हें मनांत आणून माजी आर्यसमाजाच्या अध्यक्षांप्रमाणें माजी होऊं पाहणाऱ्या सत्यशोधक समाजाच्या कुलगुरूंचाही महिमा लोकांस कळवणें जरूर वाटतें.

अजम जोतीराव गोविंदराव फुले हे वर सांगितलेल्या समाजाचे मुख्य पुरस्कर्ते व आधारस्तंभ होत. या गृहस्थांच्या अंगीं अनेक अलौकिक गुण वास करताहेत. ते कोणते ह्मणाल तर हे कवि आहेत, इतिहासज्ञ आहेत, मोठे गहन भाषापंडित आहेत, वक्ते आहेत; आणि सर्वांत विशेषत: सांगण्यासारखें हें कीं, आमच्या देशांत आलीकडे लोककल्याणाला वाहिलेली जी मंडळी चोहोंकडे आढळते त्यांत तर यांच्यासारखे केवळ तद्रूप बनलेले थोडेच सांपडतील ! हें काम आज पुष्कळ वर्षांपासून ते करीत आहेत असें 'पुण्याच्या वर्णना'वरून व खुद्द त्यांच्याच 'गुलामगिरी' वरून समजतें. मुलींच्या शाळा स्थापण्याच्या कामीं यांनीं मदत केल्यावरून या 'तात्यासाहेबांस सरकारनें एक शालजोडी आनंदानें बक्षीस दिली.' पण मध्यंतरीं 'भटपांड्यांचें बंड* उपस्थित झाल्यामुळें सर्व युरोपियन् कामगार यांस पाहिल्याबरोबर कपाळास आंठ्या घालूं लागले.' ज्या कामगारांविषयीं आमच्या राजनिष्ठ जोतीरावांची इतकी कृतज्ञताबुद्धि होती कीं, 'त्यांचे उपकार त्यांच्या जातभाईंच्या अंगांत खिळून त्याजबद्दल त्यांनीं आपल्या शरीराचे चर्मी जोडे करून त्यांच्या पायांत घातले तथापि ते उतराई होणार नाहींत,' तेही जेव्हां त्यांचा तिटकारा करूं लागले व त्यांस हिडीस फिडीस करूं लागले, तेव्हां मग काय पुसावें ! तात्यासाहेबांस परम वैराग्य प्राप्त होऊन त्यांनीं लोककल्याणाची व आपली फारकत करून टाकली. हा जोतीबांचा पहिला अवतार समाप्त झाला ! पण पुनः दहा वीस वर्षांनीं त्यांस स्वस्थ बसण्याचा कंटाळा येऊन ते ग्रंथकर्ते या नात्यानें पुनः अवतीर्ण झाले. तारीख १ आगष्ट १८७२ रोजीं त्यांनीं त्यांचा

---

स्वामी दयानंदांची टर उडविण्याकरितां 'श्रीरामानंदस्वामींकी जय' असा त्या गर्दभाचार्यांचा सारखा घोष करीत जाणाऱ्या प्रतिपक्षी पुणेरी गुंडांचे प्रमुख वे. शा. सं. रामदीक्षित आपटे होते. ही दंगल ५ सप्टेंबर १८७५ रोजीं झाली. पालखींत ग्रंथ व हत्तीवर दयानंद अशा थाटांत निघालेल्या मिरवणुकींत उपरिनिर्दिष्ट गर्दभाचार्यांची मिरवणूक घुसली व पुढें रविवारच्या मोतीचौकापासून दारूवाल्यांच्या पुलापर्यंत या गुंडांनीं बरीच धुंडाई केली पण रानड्यांनीं हें अगाऊच जाणून व्यवस्थेकरतां आणविलेल्या पोलिसांनीं प्रसाद दिल्यावर दंगल मोडून मिरवणूक पुढें शांतपणें गेली. 'सम्पादक'

* १८५७ सालचें "परदेशी भटपांडे, कोंकण्या नाना, तात्या टोप्या वगैरे अनेकदेशस्थ भटजींनीं केलेलें बंड. 'सम्पादक'

कुलांतक जो विष्णूचा सहावा अवतार परशुराम त्यास एक नोटिस दिली. तींतील मतलब हा कीं, ' चिरंजीवा परशुरामा, तूं जर खरोखरच चिरंजीव असशील, तर सहा महिन्यांच्या आंत या नोटिशीदाखल तूं आह्मांपुढें येऊन हजर हो; तसें न करशील तर तुझ्या 'विविधज्ञानी' ह्मणविणाऱ्या ब्राह्मणबच्चांस ओढून आणून त्यांची फटफजिती करण्यास आह्मी कधीं कमी करणार नाही.' फुले महाराज वाट पाहतां पाहतां थकले. ७२ साल आटपत आलें, तरी परशुराम कोठें हूं का चूं करीना. तेव्हां जोतीसाहेबांस ' निर्वीरमुर्वीतळम् ' होऊन त्यांनीं ब्राह्मणबच्चांवर आपलें हत्यार काढलें. तारीख ५ डिसेंबर रोजीं ' क्षुद्रांनी ब्रह्मराक्षसांच्या दास्यत्वापासून असें मुक्त व्हावें ' या सदराचें एक पत्र त्यांनीं तयार केलें. नंतर आपल्या एका स्नेह्यास आज्ञा केली कीं, ' या पत्रांतील ऱ्हस्वदीर्घादि सर्व चुक्या नीट-करून त्याची एक एक प्रत करून एकंदर सर्व भट व ख्रिस्ती वर्तमानपत्रकर्त्यांच्या अभिप्राया-करतां पाठव.' राजेसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें प्रधानजींनीं वरील पत्राची व्यवस्था तर केलीच असेल-पण त्यास बहुधा कोठेंही थारा मिळाला नसावा. माजी 'लोककल्याणेच्छू'* कडून फुलेबोवांस जें उत्तर मिळालें,[1] त्यावरून इतर 'भट' पत्रकर्त्यांनीं त्यांचा कितपत आदर केला असावा याचें अनुमान होतें. पण ' भटां'नीं आपल्या पत्रास मान दिला नाहीं ह्मणून जोतीबा कशाला फिकीर करताहेत ! काळ्या भटांनीं आपलें अजिंक्यपत्र छापलें नाहीं तर त्यांचे गोरे भट तर कोठें गेले नाहींत ना ! ख्रिस्त माउलीच्या घरीं 'भटा'च्या धर्माप्रमाणें कांहीं भिन्न भाव आहे काय ! छे छे ! तिच्या येथें मि० जोती सारखा व मि० जोतीचा जोडा बांधणारा चांभारही सारखाच ! त्यांतून ज्या अप्रयोजक व परम निंद्य पत्राचा जिकडे तिकडे अव्हेर झाला त्याचा 'शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधीं नानाविध संग्रहा'नें जर अंगीकार करूं नये तर मग करावा तरी कोणीं ! दुबळें, खुळें, बापडें, ज्यास साऱ्या दुनियेंत कोणी पतकरीना, त्याला प्रभु येशूच्या मेंढवाड्यांत जर आसरा मिळूं नये, तर मग त्याच्या दयाळुत्वाचा महिमा तो काय ! असो; तर मि० जोती याचें पत्र वरील करवीरस्थ वर्तमानपत्रांत सरते-शेवटीं छापलें जाऊन पत्रकर्त्यानें जोतीची पाठही बरीच थोपटली.[2] याही गोष्टीस कांहीं

१. सदरील उत्तर असें होतें—

"आमचे प्रसिद्ध महाज्ञानी, महाविचारी व महाशोधक तत्त्ववेत्ते अजम जोतीराव गोविंदराव फुले यांणीं एका मोठ्या गृहस्थाच्या शिफारशीनें एक अप्रयोजक अशा प्रकारचें आत्मश्लोघेचें व ब्राह्मणांच्या निंदेचें पत्र आह्मांकडे पाठविलें आहे, त्यास आमच्या पत्रांत जागा मिळण्याचा संभव नाहीं. याबद्दल सदहू अजम फुले आह्मांस माफी करोत."

* हें पत्र पुण्यास निघत असे. ४ जानेवारी १८७३ च्या अंकांत हें उत्तर प्रसिद्ध झालें होतें.

'सम्पादक'

२. कांहीं वर्षांपूर्वी जे नुसते ' जोतीबा ' होते ते पुढें आपणच होऊन ' जोतीराव ' बनले असतां त्यांस अगदीं मूळपद जें ' जोती ' त्यावर कोणीं आणून ठेवलें ही कोणास शंका प्राप्त होईल तर त्यानें पुढील ' शुभवर्तमान–संग्रह ' या पत्रांतील उतारा पाहावा—

"पुण्यांतील नेटिव वर्तमानपत्रकर्ते खालच्या मजकुरास आपल्या पत्रांत जागा देत नाहींत

[ पुढें चालू ]

दिवस लोटून गेले. शेवटीं जोतीबांनीं विचार केला कीं, जीवित हें क्षणभंगुर आहे, आपली ज्ञानज्योत जर कदाचित् एकाएकीं मालवून गेली, तर 'भटपांच्यां'ची बडबड पुनः सुरू होईल. तर या 'ब्रह्मराक्षसां'नीं पुनः डोकेंच वर करूं नये अशी कांहीं तजवीज करून ठेवली पाहिजे. असें मनांत आणून त्यांनीं धोंडीबा या नांवाचा एक मानसपुत्र उत्पन्न केला, आणि कृष्णानें जशी अठरा अध्यायांत अर्जुनास गीता उपदेशिली, त्याप्रमाणें षोडशभागात्मक गार्थेत जोतीबांनीं या प्रतिजैमिनीस ब्राह्मणद्वेषाच्या तत्त्वांचें विवरण करून सांगितलें. जोतीबांसारखा महासमर्थ पुराणवक्ता व धोंडीबांसारखा महान् अधिकारी परम भाविक प्रष्टा व श्रोता, मग काय विचारायाचें आहे! आमच्या ज्ञानोबा नांवाच्या एका साळ्या भोळ्या अटकवीनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, चंद्राचा चंद्रिकेशीं योग झाल्यावांचून चंद्रकांतास पाझर फुटत नाहींत. तर ह्याच न्याय प्रकृत स्थलीं लागू पडून जोतीबांच्या ज्ञानसागरास जें भरतें आलें आहे तें कांहीं अपरंपार! पवित्र शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अहोदिवस अहोरात्र सहा महिने सारखी मुसळासारखी धार चालून सगळी पृथ्वी जशी जळबंब होऊन गेली, व पुरुष-स्त्रिया, पशु-पक्षी, कृमि-कीटक, वृक्ष-पर्वत, वगैरे चट सान्यांस सरसकट जलसमाधीचा योग घडून आकाशांतून मौज पाहणाऱ्या देवबापाचा क्रोध अंमळ शांत झाला, त्याप्रमाणें प्रस्तुत महापंडितानेंही आपल्या 'गुलामगिरी' नामक महाग्रंथांत स्वर्गपाताळ जणूं काय एकच करून टाकलें आहे! जिकडे जिकडे दृष्टि द्यावी तिकडे तिकडे या महाज्योतीच्या प्रकाशानें डोळे अगदीं दिपूनच जातात. 'महा-अरि'-राष्ट्र-भाषेकडे पाहावें तों तिचा तर या गुरु-शिष्यांच्या धांगडधिंग्याखालीं जो धुडगूस उडून गेला आहे तो पाहून बिचारीची दया येते. जोतीबांचे महान् पूर्वज जे शंखासुर,† हिरण्याक्ष* वगैरे त्यांच्या प्रचंड तांडवानें सगळी भूमि जशी दणाणून जात असेल, त्याप्रमाणेंच आमच्या देशभाषेचा टांकान् टांका या एका ग्रंथकाराच्या अकांडतांडवानें खिळखिळा होऊन गेला आहे! व्युत्पत्तिज्ञानाकडे पाहावें तर असें ह्मणावें लागतें कीं, आजपर्यंत पाणिनि, भट्टोजी वगैरे वैयाकरण आमच्या देशांत झाले, व युरोपांत मोक्षमुल्लरादिकांनींही आह्मांकरतां व्याकरणें रचून इकडे पाठवून दिलीं, पण त्या

---

म्हणून हा आह्मांकडे पाठविला आहे. हा मजकूर चहूंकडे प्रसिद्ध करावा अशी मि॰ जोती गोविंदराव फुले याची इच्छा असल्यामुळें आह्मी त्यास या अंकांत जागा देतों. जरी आमच्या हिंदु मित्रांस हा मजकूर कांहीं अंशीं निंदापर वाटेल तरी ह्यामध्यें जो अभिप्राय दाखविला आहे तो स्तुत्य असें आह्मांस वाटतें. कारण वास्तविक पाहिल्यास ब्राह्मणांनीं मानिल्याप्रमाणें जातीभेद नाहीं असें मि॰ जोतीच्या लक्षांत पक्कें आल्यावरून मी कोणा पाहिजे त्याशीं अन्नव्यवहार करीन असें त्यानें वैयांनें सांगितलें. असे छातीचे पुरुष या देशांत पुष्कळ लवकर होवोत."

† जोतीबांच्या 'गुलामगिरी'प्रमाणें पाहतां मत्स्यानें मारलेला क्षेत्रपती. पण पुराणांत याचें नांव हयग्रीव असें सांपडतें. ब्रह्मदेवाच्या तोंडून झोंपेंत गळून पडलेले वेद हरण करून समुद्रांत नेणाऱ्या हयग्रीवास मत्स्यरूपी भगवंतानें ठार मारून वेद ब्रह्मदेवाला परत आणून दिले असा पौराणिक कथेचा सारांश आहे. 'सम्पादक'

* स्वायंभुव मन्वन्तरांतील कश्यपाचा मुलगा असावा. हा भूलोकास पाताळांत घेऊन जात असतां वराहानें यास मारलें, पृथ्वीचा उद्धार केला व पूर्वस्थानीं तिची स्थापना केली. 'सम्पादक'

सर्वांनीं निवळ झक मारली ! ! जोतीबांच्या 'गुलामगिरीं'त 'द्विज,' 'ब्राह्मण,' 'विप्र,' 'संस्कृत,' 'मार्तंड,' इत्यादि शब्दांची मूळपीठिका जी आढळते ती पाणिनीच्या प्रपितामहाच्याही स्वप्नीं कधीं आली नसेल.[1] पण हेंही एक वेळ असो. ज्या बहादरानें भटांच्या सर्व जुन्या ग्रंथांस लाथ मारली व मनूसही सपाट्यासरसा झुगारून दिला, तो पाणिनीची

---

१. सत्यशोधक समाजाच्या भट्टाचार्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें पाणिनिप्रभृति 'भटमंडळी' कशी चट सारी गुंडाळून टाकली आहे हें स्पष्ट करण्याकरतां पुढील उतारे बरील समाजाच्या शुभ—वर्तमानांतून घेतों—

"धों०—बरें, ते कच्छानें क्षेत्रांतून पिटाळून लाविलेले क्षत्रिय कोणीकडेस गेले ?

जो०—समुद्रावरून दुजी इराणी अथवा आर्य लोकांची टोळी आली असें ब्राह्मणबद्दल; घाबरल्यामुळें द्विज आले द्विज आले, असा शब्द करीत करीत त्या पर्वताचे पलीकडेस जाऊन कश्यप या नांवाच्या क्षेत्रपतीची पाठ निघाले यावरून कच्छ आपल्या बरोबर कांहीं फौज घेऊन त्या पर्वताचे पलीकडील बाजूनें खालीं उतरला."

गुलामगिरी—पृष्ठ ११.

"नंतर वामनाचे मागून आर्य लोकांचा ब्रह्मा या नांवाचा मुख्य अधिकारी झाला. त्याचा स्वभाव फार हट्टी होता. त्यानें आपल्या कारकीर्दींत येथील आपल्या मूळ पूर्वजांस रणांगणीं जिंकून आपले दास केले; व त्यानें आपले लोक आणि दास या उभयतांमध्यें हमेशा भेद राहावा म्हणून अनेक तऱ्हेचे नेम बांधिले. ह्या सर्व कृत्यांवरून ब्रह्मा मेल्यानंतर आर्य लोकांच्या मूळच्या नांवाचा आपोआप लोप होऊन त्यांचें नांव ब्राह्मण पडलें."

कित्ता—पृष्ठ ६.

"इकडेस नृसिंहानें प्रल्हादास फसवून असें अघोर कर्म केलेलें उघडकीस आल्यावरून क्षत्रियांनीं आर्य लोकांस मुळींच द्विज म्हणण्याचें सोडून त्यांस विप्रिय म्हणूं लागले. व पुढें त्या विप्रिय शब्दापासून त्यांचें नांव विप्र पडलें असावें. पुढें क्षत्रियांनीं नृसिंहास नारसिंह म्हणजे सिंहाची बायको असें निंद्य नांव दिलें."

कित्ता—पृष्ठ १७.

"जो०—ब्रह्मानें प्रथम ताडपत्रावर खिळ्यानें उकरून लिहिण्याची युक्ति काढून व त्यास जे कांहीं इराणी जादूमंत्र व ज्या कांहीं माकड दंतकथा पाठ होत्या, त्यांपैकीं कित्येक गोष्टी त्यांत सामील करून त्या सर्वांचें त्यानें त्या वेळच्या सर्वकृत (ज्याचा अपभ्रंश संस्कृत) चालू भाषेत, आतांच्या फारशी बयतीसारिखीं लहान लहान कवनें करून त्या सर्वांचा सार ताडपत्रांवर टिपून ठेविला."

कित्ता—पृष्ठ ३६.

"तो* धर्मन्यायानें लढण्यामध्यें इतका अहंकार बाळगीत असे कीं, त्यानें कधीं आपल्यास पाठ दाखविलेल्या शत्रूंवर वार केला नाहीं, म्हणून त्याचें नांव मारतोंड पडलें होतें. ज्याचा अपभ्रंश मार्तंड हा आहे."

कित्ता—पृष्ठ २२-२३.

* [तो=मल्हारी. बळीनें महाराष्ट्राचीं नऊ खंडें करून प्रत्येकावर खंडोबा नामक अधिकारी नेमला. जेजुरीचा खंडोबा आसपासच्या क्षेत्रपतींच्या ताब्यांतील मल्लांस ताब्यावर आणी म्हणून त्याचें नांव नांव मल्ल-अरि (अपभ्रंश मल्हारी) पडलें, असें जोतीबा लिहितात.] 'सम्पादक'

जोतीबांच्या अगाध ज्ञानसमुद्रांत वर ज्या बुचकळ्या मारल्या त्यांखालींच आमचे वाचक

[पुढें चालू]

मोठी पर्वा करील असें नाहीं. पण ज्यांच्यापुढें कुलुंगी कुत्र्याप्रमाणें नेहेमी शेपूट हलवायाची, व ज्यांच्या आड दडून साऱ्या जगावर भोंकायाचें, त्यांच्यापर्यंत तरी जोतीरावांनीं आपलें तर्कट न्यावयाचें नव्हतें. पण तो तरी सुमार कोणाला राहावा? इंग्रेजींतील Hurrah Hurrah (हुरा हुरा) या उद्गारवाचक अव्ययाची दुर्दशा वर सांगितलेल्या शब्दांप्रमाणेंच त्यांनीं केली आहे.[1] तिसरी अजब चीज प्रस्तुत ग्रंथांतील इतिहासज्ञान. हें तर जोती-महाराजांनीं कोठून पैदा करून आणलें असेल तें असो. सारें त्रिभुवन धुंडलें तरी तें बहुधां कोठेंही सांपडेलसें दिसत नाहीं. आतां एक मात्र आह्मांला तर्क होतो, तो खरा असला तर कोणास माहीत! तो हा कीं, 'गुलामगिरी'च्या कर्त्याच्या कुलपतींतला प्रथम जो शंखासुर त्याची कीर्ति आज हजारों वर्षें लबाड ब्राह्मण ग्रंथकारांनीं जी दडपून टाकली होती ती

---

अगोदर अधंमेले झाले असतील! पण आणखीही दोन तीन मारींपर्यंत त्यांनीं आपलें अवसान जाऊं देऊं नये. अशी सत्यशोधनाची पर्वणी पुनः कधीं येणार आहे? तर हें आणून आमच्या आग्रहास त्यांनीं मान द्यावा—

"" वामनानें बळीच्या शहरांतील एकंदर सर्व अंगणांचें सोनें लुटलें, त्याचा अपभ्रंश " शिलंगणाचें सोनें लुटलें " हा होय."

किता—पृष्ठ २८.

" बळी अतिशय बळवान होता म्हणून त्याविषयीं एक जुनाट म्हण सुद्धां सांपडते. ती अशी कीं, " बळी तो कान पिळी. "

किता—पृष्ठ २४.

" सारांश ब्रम्ह्यानें येथील मूळच्या क्षेत्रवासी लोकांस दास केल्यानंतर तो गर्वानें इतका फुगला होता कीं, महाअरींनीं त्याचें नांव थट्टेनें " प्रजापती " पाडिलें होतें असा तर्क निघतो."

किता—पृष्ठ ४३.

मि० जोतीच्या अरण्यपांडित्याचा एक देश वरील उताऱ्यांत वाचकांस सांपडेल. असल्या महान् वैयाकरणास सत्यशोधकवाल्यांनीं मराठी शाळेंत पहिली यत्ता शिकण्यास पाठवायाचें सोडून उलट त्यास आपल्या डोक्यावर बसवून ठेवला हें कसें झालें असेल तें असो! सत्याचा शोध काढण्यास निघालेल्या मंडळीस हें नाकासमोरचें महासत्य कसें दिसलें नाहीं कोण जाणे!!

१. " हरहर या शब्दाचा अपभ्रंश हुरा हुरा होय, असा तर्क निघतो. कारण इंग्लिश लोकांत एक अति जुनाट वहिवाट सांपडते; ती अशी कीं, ते हुरा हुरा झटल्याशिवाय आनंदाची टाळी पिटीतच नाहींत, व त्यांचे सेनापती आपल्या फौजेस हुरा हुरा झटल्याशिवाय शत्रूंवर तुटून पडण्याचा हुकूम देत नाहींत; असें कोठें कोठें त्यांच्या इतिहासांत सांपडतें. उदाहरण.—"Hurrah Boys! lose the Saddle or win the horse?" गुलामगिरी पृष्ठ२५.

जोतीरावांनीं सत्यशोधक समाजाकरतां नवें शुभवर्तमान तयार करून देतांना 'ब्राह्मणांचा कृत्रिमरूपी कोट फोडणारे जे 'अमेरिकन् व स्कॉच् उपदेशक' त्यांचा बिलकुल सल्ला घेतलाच नसेल काय? किंवा निदान 'पुण्याच्या वर्णना'ला बाप्तिस्मा देऊन त्याचे जे पारलौकिक जामीन होऊन बसले त्यांच्या पवित्र अवलोकनाखालीं तरी आपलें नवीन अपत्य जोतीबांनीं कांहीं वेळ असूं दिलें नसेल काय? आम्हांस तर खास वाटतें कीं, वरील इंग्रेजी शब्दांची कुळकथा या जोतीपुराणांत जी दाखल केली आहे ती एकाद्या 'महा-अरि' बुटलेरास जर दाखवली असती, तर त्यानें सुद्धां सत्य-शोधक मंडळींच्या अधिपतींचा कान धरला असता!!

आज एकोणिसाव्या शतकांतील बहादरानें उदयास आणल्यावरून तो जर प्रसन्न झाला असेल, व मि॰ जोतीच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून समुद्रांत आजपर्यंत गुप्त ठेवलेलें एकादें बाडचें बाड जर त्यानें आपल्या कुलदीपकाच्या गुपचूप हातांत आणून दिलें असेल तर न जाणो! असें असेल तर शंखासुर महाराजांनीं आपल्या कृपेचें निधान करण्यास मोठें उत्कृष्ट पात्र पाहिलें यांत संशय नाहीं; कारण सदरील पुस्तकांत ग्रंथकर्त्याच्या बुद्धिमत्तेचें व सौजन्याचें जें मान प्रगट झालें आहे त्यावरून पाहतां वरील योग अत्यंत अनुरूप होय असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं. कसेंही असो; पण आमच्या महान् इतिहासज्ञानें अगदीं पहिल्यापासून—ह्मणजे खुद्द ब्रह्मदेवापासून—तों मत्स्य, कच्छ, वराह, नारसिंह, वामन, परशुराम हे सर्व अवतार घेऊन थेट इंग्रज बहादरापर्यंत व म्युनिसिपाल कमिटीपर्यंत एकंदर वृत्तांत जो आणून पोंचवला आहे तो वाचून मन अगदीं थक्क होऊन जातें! आज-पर्यंत कोणत्याही इतिहासकाराच्या लेखणीनें येवढी भरारी मारली नसेल! जोतीबांची 'गुलामगिरी' वाचीपर्यंत आह्मांस गिबनच्या इतिहासाचा चमत्कार वाटत असे. आह्मांस वाटे, कीं दीड हजार वर्षांची हकीकत हजारों पुस्तकांचे आधार घेऊन एकट्या मनुष्यानें वीस बावीस वर्षे सारखी लेखणी चालवून तयार करायाची ह्मणजे केवढें अचाट काम आहे! पण मि॰ फुले यांनीं आमचा वरील भ्रम पूर्णपणें दवडला. पाहा कीं, गिबननें वेड्यानें आपलें निम्में शिम्में आयुष्य घालवून चार शेरांच्या ओझ्याचा ग्रंथ जेव्हां रचला, तेव्हां कोठें दहा पंधरा शतकांचा वृत्तांत त्यास लिहितां आला. पण फुल्यांनीं तर अवघ्या शंभर पानांच्या चोपडींत प्रथमारंभीं मत्स्य, कच्छ, वराह वगैरे ब्राह्मण मंडळी इराणांतून या देशांत जलमार्गें कशी येऊन दाखल झाली, शूद्रांचा मोठा बलाढ्य राजा जो बळी त्याच्या डोईवर त्या बंड्या बामनानें [ वामनानें ] कसा पाय दिला, वगैरे हजारों वर्षांचा वृत्तांत* इत्थंभूत

---

* या शिरोमणींच्या पांडित्याचा सारांश असा:—ब्राह्मण मूळचे पूर्व (!) समुद्रापलीकडच्या इराण देशचे राहणारे. यांना इराणी किंवा आर्य ह्मणत. यांची पहिली टोळी लढाऊ गलबतांच्या अभावीं माशांसारख्या पाण्यावरून त्वरेनें चालणाऱ्या मचव्यांतून जलमार्गानें या देशांत आली, म्हणून या टोळीच्या मुख्य अधिकाऱ्याचें नांव मत्स्य पडलें असावें. मत्स्यानें येथील क्षेत्रपति शंखासुर यास मारून त्याचें राज्य बळकावलें. पण मत्स्य मरतांच शंखासुराच्या लोकांनीं उचल करून मत्स्याच्या लोकांना जंगलांत पिटाळून लावलें. इतक्यांत दुजी ( दुसरी ) आर्य लोकांची टोळी कचव्यां [ मचव्यां-हून थोडे मोठे पण कांसवाप्रमाणें सावकाश चालणारे ] मधून उतरली. तिच्या अधिकाऱ्याचें नांव कच्छ पडलें असावें. कच्छाचे पश्चात् वराह आदिनारायण ( याची आई पद्मा डुकरीण ) द्विजांचा अधिकारी झाला. हा स्वभावानें व आचारानें दुष्ट व घाणेरडा असून जाईल तिकडे रानडुकराप्रमाणें मुसंडी मारून जय मिळवी. त्यावरून हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपु यांच्या लोकांनीं धिःकारानें याचें नांव डुक्कर ( वराह ) पाडलें. त्यामुळें चिडून यानें एका लढाईत हिरण्याक्षास मारलें. त्यामुळें हिंदुस्थानच्या साऱ्या क्षेत्रपतींस दरारा बसला. वराहाचे पश्चात् कपटी, लोभी व क्रूर नृसिंह द्विजांचा मुख्य झाला. एका द्विज पंतोजीकडून हिरण्यकश्यपूचा पुत्र प्रल्हाद याला बिघडवून ताबुतांतील वाघाच्या सोंगाप्रमाणें अंग रंगवून, मोठाले खोटे दांत व लांब दाढी लावून तो सिंह बनला व लुगडें नेसून तोंडावर पदर घेऊन प्रल्हादाच्या मदतीनें हिरण्यकश्यपचा शयनमंदिराच्या खांबांच्या गर्दीत दडून

जगास प्रगट केला आहे; आणि हें सर्व करण्यास त्यांस यत्किंचितही श्रम न पडतां सहज शिष्याशीं संवाद करतांना त्यांची इतिहासवाणी प्रगट झाली आहे. त्यांतून आणखी असें पाहा कीं, गिबनूनें सहस्रावधि ग्रंथांचा आधार घेऊन आपलें भारूड रचलें; दुसऱ्यांचा उष्टा मजकूर घेऊन कोणी भाराचे भारे ग्रंथ नाहीं का तयार करायाचा ! पण आमच्या शूद्र इतिहासकारानें पाहा ! असा मासलेवाईक इतिहास लिहून ठेवला आहे कीं, त्यास आधार म्हणून कोठेंही सांपडायाचा नाहीं; मग तुम्ही ब्राह्मणांचा अधिपति जो ब्रह्मा त्याच्या लोकीं जा ! किंवा शूद्रांचा सरनाईक जो बळी त्याच्या राज्यांत जा ! स्वतःसिद्ध ऐतिहासिक स्फूर्ति असल्यावर व धोंडिबासारखा बिचारा परम भाविक श्रोता मोठ्या सुदैवानें गवसल्यावर मग कशाला पंचाईत करीत बसा ! कवित्वाची स्फूर्ति होतांच धोंडीबास तुणतुणें आणायाला सांगून जोतीबांनीं 'ब्राह्मणाचें कसब,' जसें केवळ लीलेनें गाइलें असेल; त्याप्रमाणेंच

---

राहिला; व हिरण्यकश्यपू रोजच्याप्रमाणें विसांव्यासाठीं बिछान्यावर पडतांच त्याच्या पोटांत वाघनखें खुपसून सर्व द्विजांसह रातोरात पळून गेला. प्रल्हादामागून त्याचा पुत्र विरोचन व विरोचना–मागून त्याचा मुलगा बळी हा राजा झाला. त्या वेळचा विप्रांचा अधिकारी वामन हा फार लोभी, धाडसी व हेवेखोर होता. त्याचें व बळीचें भाद्रपद वद्य प्रतिपदेपासून आश्विन शुक्ल अष्टमीपर्यंत युद्ध होऊन बळीराजा पडला. बळीची बायको विंध्यावली सती गेली. बळीमागें बाणासुरास वामनानें दुसऱ्याच दिवशीं पिटाळून लावलें व नंतर आश्विन शुक्ल दशमीस सकाळीं बदमस्त वामनानें बळीच्या नगरांतील सर्व अंगणांचें सोनें लुटलें. बाणासुरानें लहान लहान क्षेत्रपतींच्या फौजा जमवून आश्विन शुक्ल चतुर्दशीस वामनावर हल्ला केला. पौर्णिमेची रात्र वामनानें बचाव कसा करावा या विचारांत जागून घालविली. (म्हणून हिला कोजागरी म्हणतात.) दुसरे दिवशीं बाणासुरानें वामनाचा पराभव करून त्यास हिमालयावर पिटाळून लावलें व तो तेथेंच मेला. त्याच्या पश्चात् ब्राह्मणांचा पुढारी ब्रह्मा झाला. व त्यानें बाणासुराच्या पश्चात् बेबंदशाही माजल्यामुळें त्याच्या राज्यावर हल्ला करून तेथच्या क्षेत्रवासी लोकांस दास केलें. ब्रह्मा प्रजापति मेल्यावर अधम, पुंड, व साहसी मातृघातकी परशुराम ब्राह्मणांचा मुख्य झाला. त्यानें सर्व महाअरींशीं एकवीस वेळ कदून पुष्कळांस ठार मारलें व बाकीच्यांस कैद करून खुणेकरतां त्यांचे गळ्यांत काळा दोरा बांधून त्यांना महार, मांग वगैरे म्हणण्याचा प्रघात पाडला. क्षत्रियांच्या गरोदर बायकांस पकडून आणून त्यांना होणाऱ्या अर्भकांचाहि खून करून निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचा त्यानें सपाटा चालविला. लपून छपून राहिलेल्या बायकांपासून झालेली संतति म्हणजे परभू. परशुराम गर्विष्ठ झाला असतां एका क्षेत्रपतीच्या रामचंद्र नामक मुलानें त्याच्या धनुष्याचा भंग केला. तेव्हां चुरशीमुळें परशुरामानें जानकीस घेऊन जाणाऱ्या रामास गांठून त्याशीं युद्ध केलें. पण पराजय झाल्यामुळें कोंकणांत पळून गेला व कृतकर्मांच्या पश्चात्तापानें त्यानें तिकडे जीव दिला. 'सम्पादक'

१. 'कलिविडंबन' ग्रंथांत शिष्याचीं लक्षणें दिलीं आहेत—

अगतित्वमतिश्रद्धा ज्ञानाभासेन तृप्तता । त्रयः शिष्यगुणा ह्येते मूर्खाचार्यस्य भाग्यजाः ॥

"अध्ययनाच्या विषयाचें पूर्ण अज्ञान, जें कोणी सांगेल त्यावर पूर्ण विश्वास, व ज्ञानाचा भास झाल्यानेंही तृप्ति,—या तिन्ही गुणांनीं युक्त असा शिष्य मूर्ख आचार्यास परम भाग्यानें प्राप्त होतो !" वरील श्लोक प्रस्तुत गुरुशिष्यांवर कसा बरोबर लागू पडतो हें 'गुलामगिरी'चें पारायण केलें असतां तेव्हांच लक्षांत येईल. जोतीबांचीही आपल्या कल्याण चेल्यावर मर्जी किती सुप्रसन्न आहे हें पुढील पद्यावरून लक्षांत येईल—

खरा विद्यार्थी जोतीबांचा धोंडीराम जिव्हाळा ।
घालि भटांच्या गळ्यांत गुंफुनि सर्व ऋषींच्या माळा ॥ (मलपृष्ठावरील पद.)

कविरायांचा इतिहासाचा सूर लागला असतां 'ब्राह्मणांची गुलामगिरी'ही तेव्हांच निर्माण झाली असेल यांत संशय नाहीं. पण सदरील ग्रंथाचा सर्वात मोठा गुण अद्याप सांगायाचा राहिलाच आहे. तो कोणता ह्मणाल तर विषयवैचित्र्य. हें वैचित्र्य पाहून तर जोतीबा केवळ ज्ञानमूर्ति आहेत असें ह्मणावें लागतें. 'ब्राह्मणांच्या गुलामगिरीं'त केवळ भगवद्गीतेंतलें विश्वरूप दृष्टीस पडल्यासारखें वाटतें ! या गुलामगिरींत 'पद्या इकरीण' आहे, 'टॉमस पेन्स (!)'† आहे, 'विश्वामित्र' आहे, 'वसिष्ठ' आहे, 'होमर' आहे, 'बदमास नाना'§ आहे, 'टर्कीन् साहेब' आहे, 'मनु' आहे, 'भागवत' आहे, 'अमेरिकेंतील बळीचा मतानुयायी जॉर्ज वॉशिंगटन्'आहे,'फ्रान्सांतील बळीचा मतानुयायी लफेट्' आहे,* 'बळीराजाचे मतानुयायी अमेरिकन व स्कॉच उपदेशक' आहेत, 'शिवाजीसारखा अज्ञानी धर्मभोळा शूद्रराजा,' आहे, 'मुकुंदराज, ज्ञानेश्वर वगैरे रामदासासारिखे अनेक 'पायलीचे पंधरा व अधोलीचे सोळा' ब्राह्मण ग्रंथकार आहेत, 'भट प्रोफेसर' आहे, 'भट सभासद' आहे, 'भट शिरोमणि' आहे; 'लंगोट्या बहादर' आहे, 'दिगंबर विद्याखातें' आहे. 'मनगटाचा प्र * * *' आहे.—सर्व कांहीं आहे ! ! गारुड्याच्या पेतडीचा जसा ठावठिकाण लागत नाहीं, त्याचप्रमाणें सदरील 'गुलामगिरींत' काय काय चिजा आहेत हें प्रत्यक्ष पाहिल्यावांचून कोणालाही कळणार नाहीं.

ज्या महाग्रंथावरून जोतीराव फुले यांचें नांव या देशांत चिरकाल राहून त्यांच्या शूद्र बांधवांचें कोटकल्याण होणार व 'ब्रह्मराक्षसां'चें निर्दाळण होणार, जो येथील सत्यशोधक मंडळीचें जणों काय पवित्र शास्त्रच बनून राहिला आहे, जो लिहिण्यास जोतीबांच्या कित्येक विद्वान् मित्रांनीं त्यांस उत्तेजन दिलें, ज्याची अकटोविकट योग्यता बाहून जो ग्रंथकर्त्यानें 'युनैटेड् स्टेट्स् मधील सदाचारी लोकांस' अर्पण केला आहे, व ज्या शूद्र अर्भकाचा ख्रिस्ती पत्रकर्त्यांनीं आपआपल्या घरोघर महोत्सव करून त्याच्या जनकास परोपरीनें शाबासकी दिली, त्याच्या स्वरूपाचा कांहीं बोध वरील दिग्दर्शनावरून आमच्या वाचकांस होईल. मि० फुले यांजविषयीं केवळ लोकप्रवादावरून सामान्यत: आमची अशी कल्पना आजपर्यंत असे कीं, हे जात्या शूद्र असल्यामुळें इंग्रेजी ज्ञानाच्या योगानें त्यांच्या-

---

† Thomas Paine (1737–1809). राजकीय व धार्मिक विषयांवरील विख्यात लेखक. १७९१ सालीं प्रसिद्ध झालेल्या याच्या 'मानवी हक्क' (Rights of Man) या ग्रंथानें इतकी खडबळ उडाली कीं श्रेष्ठांच्या निंदेबद्दल (Blashlemy) ह्याच्यावर खटला झाला. तो फ्रान्सला पळून गेला. १७९४ सालीं असाच क्षोभजनक 'Age of Reason' हा ग्रंथ यानें प्रसिद्ध केला. १८०२ नंतर हा अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत जाऊन राहिला. 'सम्पादक'

§ १८५७ च्या बंडांतील नानासाहेब. 'सम्पादक'

* Lafayette, Marquis de (1757–1834) अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत वसाहतवाल्यांच्या बाजूनें लढणारा शूर देशाभिमानी सैनिक. हा फ्रान्सला परत आल्यावर हा कमांडर इन् चीफ् झाला. फ्रेंच राज्यक्रांतींत खूप कामगिरी करून यानें लुई फिलिप् यास गादीवर बसविण्यांत मदत केली. 'सम्पादक'

ठायीं ब्राह्मणांविषयीं स्पर्धा उत्पन्न झालेली असावी, व त्यांतून 'ज्ञानोदय', 'सत्यदीपिका', 'नानाविध चर्च-संग्रह' यांच्या निरंतर पवित्र परिशीलनानें ब्राह्मणद्वेषाचें मोलवान् तत्त्व त्यांनीं पटकावलें असावें. पण वरील 'रिपोर्टा'विषयीं अभिप्राय देण्याचें मनांत आणून जोतीबांचें 'कसब' व 'गुलामगिरी' हे दोन ग्रंथ पैदा करून ते वाचण्यास जेव्हां आरंभ केला, तेव्हां आमची तत्क्षणीं खात्री होऊन चुकली कीं, राव जोतीचें माहात्म्य आह्मांस पूर्वी जें माहीत होतें तें कांहींच नव्हतें ! ऐकण्यांत व पाहण्यांत किती अंतर आहे याविषयींची आह्मांस 'गुलामगिरी'वरून जी प्रचीति आली ती आह्मी कधीं विसरणार नाहीं. केवढी प्रचंड विद्वत्ता ! केवढी अतर्क्य तर्कशक्ति ! सत्याविषयी केवढा अभिमान व तें हुडकून काढण्याविषयीं केवढा हव्यास ! इंग्रेज सरकाराविषयीं केवढी अपार राजभक्ति ! वा ! एकूण येवढा पटाईत शिष्य ज्या गुरूनें तयार केला असेल त्यानें आमच्या देशास केवढी जोड करून दिली बरें ! हा गुरु कोणी भट जातीचा असेलसें वाटत नाहीं; त्यांतूनही कोणी प्रथमतः असलाच तर त्याची दुष्ट विद्या जोतीबांनीं लवकरच ओकून टाकून कोणा महासमर्थ मिशनरींच्यापासून चांगला अनुग्रह घेतला असेल. या पूर्वसंस्कारत्यागाच्या बरोबरच त्यांनीं ऱ्हस्वदीर्घांची ओळख टाकून दिली कीं काय कोण जाणे ! एरवीं येवढ्या महापंडिताला ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार यांविषयीं वानवा असून त्यांबद्दल दुसऱ्याच्या तोंडाकडे बघण्याची जरूर पडावी हें संभवत नाहीं ! असो; एकंदरींत जोतीरावांचा ग्रंथ अत्यंत मोलवान् आहे. याची किंमत आमच्या ज्ञातिबंधूंस जरी दुप्पट पडणार आहे. तरी तीही भरून तो संग्रहास बाळगण्याची आह्मी त्यांस शिफारस करतों. निदान प्रत्येक पुस्तकालयांत व विशेषतः पदार्थसंग्रहालयांत तरी त्याची प्रत असणें अगदीं जरूर आहे. पूर्वी एका अंकांत * आर्यसमाजवाल्यांच्या जगद्गुरूच्या मतें 'उलूपी राजकन्येच्या देशांत' व सत्यशोधकवाल्यांच्या जगद्गुरूच्या मतें 'बळी राजाचे अनुयायी जे अमेरिकन् त्यांच्या देशांत' छापलेलें एक

१. 'गुलामगिरी'च्या मुखपत्रावरच ग्रंथकर्त्यांनें किंमतीचा तपशील लिहिला आहे कीं, शूद्र अतिशूद्रांस ६ आणे, व इतरांस १२ आणे. हा मूल्यभेद करण्याचा जोतीबांचा उद्देश उघडच आहे कीं, ज्यांच्याकरतां त्यांचे रात्रंदिवस परिश्रम चालले आहेत त्यांनीं त्यांच्या महा-ग्रंथाच्याद्वारें शहाणें व्हावें व ते स्वतः आधीं 'क्षुद्र' असतां पुढें ज्ञानबळानें 'ब्रह्मराक्षसाच्या दास्यत्वापासून जसे मुक्त' झाले त्याप्रमाणेंच त्यांनींही मुक्तस्थितीचें सुख अनुभवावें. पण इतकें करूनही राव-जोतींच्या 'गुलामगिरी'—ला फारसें गिऱ्हाईक आलें असेलसें वाटत नाहीं. कारण आज चार वर्षें लोटून गेलीं असतांही वरील महाग्रंथाच्या पुष्कळ प्रती अद्याप शिल्लक आहेत असें 'रिपोर्टा'वरून कळतें, व शिवाय आळंदीच्या भटसंताच्या वारीला जाणारा कोणी शूद्र आपली पताक माघारी फिरवून सत्य शोधणाऱ्या मंडळींकडे वळला असेंही कोणाच्या सांगण्यांत नाहीं ! असो, पण येवढ्यानें काय झालें आहे ? 'गुलामगिरीं'त भविष्यवाद केल्याप्रमाणें बळीचें राज्य जेव्हां या महा-अरि-राष्ट्रावर होईल, व त्याच सुमारास ख्रिस्त महाराजही आपला प्रेषितपरिवार बरोबर घेऊन सहस्रवार्षिक राज्य करण्यास जेव्हां भूमंडळावर मात्स्यान अवतीर्ण होतील, तेव्हां तरी सत्यशोधकांच्या पवित्रशास्त्राची खूप चलती चालेल !

*नवव्याच्या.

मासलेवाईक पुस्तक† आह्मी आपल्या वाचकांस प्रसिद्ध करून त्याची उपयुक्तता दाखवली होती ती केवळ विलक्षण भाषेच्या संबंधानेंच होती, पण सदर्हू पुस्तकांत तर सर्व प्रकारची बहार सांपडणार आहे. बळीराजाचे अनुयायी मिशनरी त्यांचे अनुयायी जे आमचे जोतीबोवा त्यांनीं तर मिशनरींवर व बळीवरही ताण करून दिली आहे ! आमच्या भवभूतीनें 'वाचमर्थोऽनुधावति' [ अर्थ वाणीच्या मागून धांवतो ] असें जें ह्मटलें आहे त्याचा प्रत्यय ज्यास उत्कृष्ट घ्यावयाचा असेल, बलवत्तर स्फूर्तीच्या लोंढ्यासरशी व्याकरणाची, अर्थसंगतीची वगैरे काय त्रेधा उडून जाते हा चमत्कार ज्यांस पाहावयाचा असेल, 'ज्ञानोदयां'तील ४० वर्षांच्या तत्त्वज्ञानाचा ज्यास अर्क काढून घ्यावयाचा असेल, श्रावणमासीं जोतीबांच्या भगिनींचा गालिप्रदानविधि जो मोठ्या थाटानें रस्तोरस्तीं चालतो त्याचा रस ज्यास चार घटका अनुभवायाचा असेल, त्यास 'गुलामगिरी' सारखें दुसरें साधन नाहीं !

सत्यशोधक मंडळीच्या अग्रेसरांविषयीं वर जो मजकूर लिहिला आहे त्यावरून सदरील समाजाविषयीं वाचकांस बरीच कल्पना करतां येईल. आतां या समाजाच्या वरील पुस्तकाविषयीं लिहूं. हा तीन वर्षांचा रिपोर्ट आहे; ह्मणजे माहे सप्तंबर सन १८७३ पासून तों माहे मजकूर सन १८७६ पर्यंतची एकंदर झालेली हकीगत यांत सर्वांस जाहीर केली आहे. प्रथमतः समाज स्थापण्याचा उद्देश येणेंप्रमाणें प्रगट केला आहे:—

"ब्राह्मण, भट, जोशी उपाध्ये इत्यादि लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरतां व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारें आज हजारों वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीनें लुटीत आले आहेत यास्तव सदुपदेश व विद्याद्वारें त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरतां ह्मणजे धर्म व व्यवहारसंबंधीं ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरतां कांहीं सुज्ञ शूद्र मंडळींनीं हा समाज ता० २४ माहे सप्तंबर सन १८७३ इसवी रोजीं स्थापन केला. या समाजांत राजकीय विषयांवर बोलणें अजी वर्ज्य आहे."

आतां हा जो सामाजिकांनीं आपला कृतसंकल्प येथें प्रदर्शित केला आहे त्यावर सकृद्दर्शनींही अनेक आक्षेप येणार आहेत. ते हे कीं, शूद्रांचा आणि भटांचा व जोशांचा जो संबंध आढळतो त्यास एका पक्षीं दास्य व दुसऱ्या पक्षीं जुलूम हे शब्द अंमळ दांडगाईनेंच लावले पाहिजेत. शूद्र अतिशूद्र यांच्या घरीं यजमानकृत्य चालवण्यास कोणत्या तऱ्हेचे

---

† 'रसातळाची मराठी भाषा ' या मथळ्याखालीं ' लोकांसाठीं मनोरम वार्ता ' या नांवाच्या न्यूपेंर्ड्र येथें ' भरे आणि कान्मन् ' (वैद्य व गंधी) यांनीं आपल्या ' सुगंध पाणी ' व ' साखरावगुंठित गोळ्या ' यांची जाहिरात म्हणून प्रसिद्ध केलेल्या चोपड्यावर एक विनोदी टीका फेब्रुवारी १८७५ च्या अंकांत आली आहे. या मनोरम वार्तेतील सुंदर भाषेची कांहीं उदाहरणें:— ' हे रेचन चांगलें यास सर्व लोक मान्य आहेत,' ' जें औषध चांगलें विश्वास् व निर्भयी असतें,' ' चला वाटावाट करूं,' ' त्या आपल्या मोठ्या तेजानें पोट धर्मावर नेतात.' ' उत्साह मन ' ' त्यांची वाखाण करितों ' ' रोगीला समाधान, अरोगीलो आनंद असें प्राप्त होतें.' ' औषधाचे धनी ' वगैरे. याचबद्दल मागें पृष्ठ ३७५ वरील टीप पाहा. 'सम्पादक'

भट जात असतात व त्यांतून जे जातात त्यांच्यापैकीं आपल्या दासांवर जुलूम करून कितीजण धनत्तरं होऊन पडले आहेत याविषयीं विचार केला असतां, व त्यांतही वरील प्रकारचें 'दास्य' केवळ हिंदुस्थानांतच आहे किंवा सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या देशांतही त्याचें प्राबल्य आहे याविषयींही थोडा विचार केला असतां, ब्राह्मणांच्या जुलुमाचा सत्यशोधकांनीं येवढा जो बाऊ करून ठेवला आहे तो बराच नाहींसा होईल. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, 'ब्राह्मणांच्या बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून' आपल्या देशबांधवांस मुक्त करण्यास जी 'सुज्ञ शूद्र मंडळी' पुढें सरसावली तिच्यापैकीं कितीकांच्या ठायीं वरें वरील पाश छेदण्याचें सामर्थ्य असेल ? इकडे इंग्रेजी झाल्यास जें सबंध संवत्सरचक्र* आज उलटून गेलें आहे त्यांत इंग्रेजी विद्येचा सर्वांस सारखा लाभ घडत असतां शूद्रवर्गापैकीं थोडेच विद्यासंपन्न झालेले आढळतील. त्यांतून ब्राह्मणांच्या बनावट व कार्यसाधक ग्रंथांचें ज्ञान ज्यास आहे असा धर्मशास्त्री शूद्र तर अद्याप कोणींही ऐकला नाहीं. मग ज्या 'बनावट' ग्रंथांचा शेंडा कां बुडखा आपणांस स्वतः माहीत नाहीं त्यांची अप्रमाणता समाजांतील पंडितजन जे तुकोबा, सदोबा, माणकोबा वगैरे त्यांस आमची 'सुज्ञ शूद्र मंडळी' कोणत्या तऱ्हेनें समजून देणार असेल ती असो ! त्यांच्या बृहस्पतींनीं आपल्या बृहत्संहितेंत §ब्रह्मदेवाविषयीं, भागवताविषयीं, मनुसंहितेविषयीं वगैरे जी बडबड केली आहे तसलेंच पांडित्य करण्याचें सामाजिकांनीं मनांत आणलें असल्यास कोण जाणे ![1]

वरील आक्षेपांप्रमाणेंच प्रस्तुत समाजाच्या संबंधानें आणखी अनेक प्रकारचे आक्षेप कोणाही विचारी मनुष्याच्या सहज लक्षांत येणारे आहेत. त्यांवर सविस्तर निरूपण करूं गेल्यास आर्यलोक हे प्रथमतः कॉकेजस् पर्वतापाशीं होते, पुढें त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन मूळच्या भिल्ल, गोंड वगैरे लोकांस जिंकून आपले दास केलें, वगैरे जे पाश्चात्य पंडितांचे तर्क

* साठ वर्षें. §गुलामगिरी. 'सम्पादक'

[1] जो०—त्याचप्रमाणें मनुसंहिताही भागवताचे मागून केली असावी म्हणून शाबीत करितां येतें.

धों०—काय ? मनुसंहिता भागवताचे मागून केली असावी ? असें कसें होईल ?

जो०—कारण, भागवतांतील, वसिष्ठानें मी खून केला नाहीं म्हणून सुदामन† राजासमोर शपथ घेतल्याची उपमा मनूनें आपल्या ग्रंथाच्या ८ व्या अध्यायाच्या ११० व्या श्लोकांत§ कशी घेतली ? त्याचप्रमाणें, विश्वामित्रानें विपत्तिकाळीं कुत्र्याचें फरें खाल्ल्याविषयीं त्याच ग्रंथाच्या १० व्या अध्यायामध्यें १०८ व्या श्लोकांत §कशी उपमा घेतली ? यांखेरीज त्याच पुस्तकांत अनेक विरुद्ध गोष्टी सांपडतात. गुलामगिरी–पृष्ठ ५५.

† 'सुदास्' ऐवजीं चुकून 'सुदामन' पडलें असावें. - 'सम्पादक'

§ महर्षिभिश्च देवैश्च कार्यार्थं शपथाः कृताः । वसिष्ठश्चापि शपथं शेपे पैजवने नृपे ॥११०॥
क्षुधार्तश्चात्तुमभ्यागाद्विश्वामित्रः श्वजाघनीम् । चण्डालहस्तादादाय धर्माधर्मविचक्षणः॥१०८॥

भावार्थः—"सप्तर्षि व चन्द्र वगैरे देव, यांनीं संशयाचा निर्णय करण्यासाठीं शपथा घेतल्या. विश्वामित्रानें वसिष्ठावर जेव्हां 'यानें शंभर पुत्र खाल्ले' असा आरोप केला तेव्हां त्यानें आपला शुद्धपणा सिद्ध करण्यासाठीं पिजवनाचा मुलगा सुदास् नांवाचा राजा होता त्याच्यापुढें शपथ घेतली. धर्माधर्म जाणणारा विश्वामित्रहि भुकेनें व्याकूळ झाल्यावर चांडालाच्या हातचें कुत्र्याच्या तंगडांचें मांस घेऊन खाण्यास तयार झाला." 'सम्पा०'

आहेत, ते कितपत सप्रमाण आहेत; अथवा तेही सप्रमाण धरले तरी ईश्वरप्रणीत धर्मांचे आपणांस ह्मणवणारे व साऱ्या जगाचें बंधुत्व तोंडानें कबूल करणारे जे देवाचे लाडके लोक त्यांच्याकडून अमेरिकेंत व आफ्रिकेंत काय काय प्रकार घडण्यांत आले, व सध्यांही साऱ्या जगभर काय काय चालू आहेत; आलीकडील स्थिति पाहिली तर ब्राह्मणांचा व अवांतर जातींचा परस्पर जो संबंध आहे तो जोतीबाप्रभृति विद्वन्मणींस व त्यांस चिथवणारे जे शुभवर्तमानी त्यांचे बंधु त्यांस जसा वाटतो किंवा बळेंच आंगावर वेड घेऊन तो वाटल्या-सारखें जसें ते दाखवतात तसाच आहे किंवा कसा आहे; शूद्रांतील अत्यंत नीच जातींत निर्माण झालेल्या साधुसंतांचाही महिमा ब्राह्मणांनी निरंतर गाइलेला पाहून व त्याच जातीं-तल्यांस खुद्द ब्राह्मणांनींच केवळ गुणावर लक्ष देऊन महाप्रभुत्वाच्या पदास चढवून आपल्या बरोबरचे करून सोडलें हेंही क्षणभर मनांत आणलें असतां कोणाही मनुष्यास काय वाटणार आहे; हल्लींच्या काळीं आमच्या जोतीबासारख्या पठ्ठयांनीं निर्धास्तपणें ब्राह्मणांवर भोंकलें असतां त्यांत त्यांची कितपत बहादुरी आहे व वेळनसार तोंडावर तुकडा टाकणाऱ्या धन्यांच्या पुढें लाळ घोटण्यांत कितपत राजनिष्ठा व सत्यनिष्ठा आहे; तसेंच हल्लींच्या देश-स्थितींत एकमेकाला शिव्या देण्याकरतां समाज स्थापणें यांत कितीसें शहाणपण आहे;—इत्यादि सर्व गोष्टींविषयीं विचार करावा लागेल.[1] पण ज्या अर्थी जोतीबांचा समाज अद्याप बाल्यावस्थेंतच आहे, एकीकडे हडपसर व दुसरीकडे भांबुरडें याच त्याच्या प्रचंड सीमा होत, त्या अर्थी असल्या 'क्षुद्र' सभेवर हत्यार धरण्यास आह्मी उत्साह पावत नाहीं. स्वामींच्या आर्यसमाजाप्रमाणें त्याचा जेव्हां अवाढव्य विस्तार होईल, व सत्यसमाज–मंदि-राच्या अग्रभागीं जोतीरावांचा संगमरवरी पुतळा त्यांच्या शुभ्र यशाचा स्मारक म्हणून स्थापला जाईल, तेव्हां त्याच्या मतांच्या यथार्थत्वाविषयीं विचार करतां येईल !

सदरील 'रिपोर्टांत' वरील उद्देश प्रथमतः प्रगट करून नंतर जागजागीं समाजाच्या

---

१. वरील विषयावर आमच्या ज्ञातींतील एका प्रमुख विद्वानानें गेल्या मे महिन्यांतील सप्ता-हांत एक व्याख्यान दिलें तें येथील बहुश्रुत लोकांस तरी अजून आठवत असेलच. हे गृहस्थ ब्राह्मणांचे पक्षपाती कितपत आहेत हें सर्वांस माहीत आहेच. असें असतांही त्यांनीं केवळ समान दृष्टीनें सदरील विषयावर जे विचार प्रगट केले ते विशेषतः 'सत्यशोधक' मंडळीनें ऐकण्यासारखे होते. तरी या मंडळीपैकीं त्या रात्रीं श्रोतेजण किती होते हें आम्हांस माहीत नाहीं. समाजाचे अध्यक्ष येथील लोकप्रिय डॉ० विश्राम रामजी घोले यांच्याखेरीज कोणी प्रमुख मंडळी त्यासमयीं बहुधां आली नसावी. "गुलामगिरी"चे विद्वान् कर्त्यांनीं जर त्या दिवशीं व्याख्यानाची जागा सुशोभित केली असती तर 'सत्यदीपिका'दि पत्रांच्याद्वारें त्यांच्या डोक्यांत सांठवलेला गाढ अंधकार बराच दूर होऊन त्यांस खरें 'सत्य' कांहीं तरी उमजायाला लागलें असतें ! पण हें व्हावें कोठून ? जेथें 'भट प्रोफेसरा'ची, 'भट सभासदा'चीही डाळ शिजेना तेथें भट प्रिन्सिपालाची तरी कोठून शिजावी ? असो; पण वर सांगितलेल्या अध्यक्षांच्या मनावर मात्र त्या दिवशीं खऱ्या सत्याचा प्रकाश बराच पडला असावा असें दिसतें. कां कीं, त्यांनीं यंदांच्या सत्यशोधक वक्तृत्वसमारंभांत शेवटीं जें भाषण केलें ( हें 'ज्ञानप्रकाशां'तून आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं वाचलेंच असेल ) त्यांत जोतीबांची जागती जोत मालवल्यासारखीच दिसली ! !

शाखा कसकशा स्थापन होत गेल्या, त्यांच्या हातून कोणकोणतीं कृत्यें घडण्यांत आलीं, ही होत असतांना दुष्ट लोकांकडून त्यांच्या सत्कृत्यास कोणकोणते अडथळे आले, त्या अडथळ्यांचें कोणीं कसें निवारण केलें, आपल्या शूद्रबंधूंस सुधारणेच्या मार्गास लावण्यासाठीं हरितालिका, गणेशचतुर्थी, ऋषिपंचमी वगैरे धर्मभोळ्या चाली बंद करून त्यांच्या जागीं 'बळीराजानें पवित्र पाळिलेला' व आकाशांतील बापानें लावून दिलेला जो आदितवार तो छानछूक पोषाक करून देवाच्या नांवानें डोळे मिटण्यांत घालवण्याची सुधारलेली रीत समाजानें सुरू केली; ब्राह्मणांचें बंड मोडून टाकून त्यांच्या मदतीशिवाय कोणीं लग्में लावलीं, कोणीं वास्तुशांत केली, कोणीं पिंडप्रदान केलें, वगैरे प्रकार चालू झाले; त्याप्रमाणेंच समाजाचा उत्कर्ष चिंतून कोणीं कोणीं काय काय मदत केली, म्हणजे कोणी पैशाच्या रकमा दिल्या, कोणीं शूद्र विद्यार्थ्यांस स्कॉलरशिपा सुरू केल्या, कोणीं त्यांस उत्तेजन येण्याकरता मेणकापडी डगलीं वाटलीं, कोणीं मॅट्रिक्युलेशन् परीक्षेंत जो उतरेल त्यास देण्याकरतां सोन्याचें पदक देण्याचें कबूल केलें, कोणीं शेतकीवर जो चांगला निबंध लिहील त्यास बक्षीस देण्याचें कबूल केलें, कोणीं तर सत्याच्या प्रकाशाचा फैलावा व्हावा म्हणून १२०० रुपयांचा छापखाना समाजाच्या हवालीं केला;—इत्यादि गोष्टींची हकीकत लिहिलेली आहे. आतां वरील सर्व गोष्टी आमच्या 'सुज्ञ शूद्र मंडळी'नें शहाणपणाच्या म्हणून केल्या आहेत, व आलीकडे इंग्रेजी विद्येच्या योगानें जी लोकस्थिति बदलली आहे तीसही त्या प्राय: अनुसरूनच आहेत हें खरें; पण सदरील 'रिपोर्टां'तील वरील स्थळें वाचून कांहीं शंका मनांत सहजीं उद्भवतात त्या येथें यत्किंचित् प्रदर्शित केल्यावांचून राहवत नाहीं. एक ही कीं, आपल्या शूद्र बंधूंची व भगिनींची पारलौकिक स्थिति सुधारण्यास म्हणून जी सामाजिकांनीं वर सांगितल्याप्रमाणें तजवीज केली आहे तिजपासून त्यांचें कितपत हित होईल हें आमच्यानें सांगवत नाहीं. गौरीच्या मुखवट्याची स्त्रियांनीं पूजा करणें हें जोतीबाप्रभृति तत्त्वज्ञान्यांस अतिशय वेडगळ वाटेल हें उघड आहे; पण तें न करतां पुरुषमंडळींत परक्याच्या दंडाला दंड लावून बसल्यानें व डोळे मिटण्याचें आठां दिवसांनीं एकदां सोंग केल्यानें त्याच शूद्र स्त्रियांस ईश्वरज्ञान कितपत अधिक होईल किंवा त्यांची नीति कितपत सुधारेल याची आम्हांस कल्पना करवत नाहीं! 'भटशिरोमणीनें केलेलीं गीतें एकंदर मिळून नवीन समाजांत गाण्याचा' जो परिपाठ आढळतो त्यापासून पारमार्थिक कार्य कितपत होतें व कितपत झालें आहे हें सर्वप्रसिद्धच आहे; व शूद्रशिरोमणीच्या समाजांत तरी बळीराजांचा आदितवार पवित्र पाळल्यानें अंतःकरणाची शुद्धता कितपत होण्याचा संभव आहे याची प्रचीती, आमच्या मतें, शूद्रशिरोमणीच्याच पवित्र 'गुलामगिरी'वरून भरपूर घेतां येणार आहे. मि० जोती वयानें चांगले पोक्त आहेत म्हणून ऐकतों, व लोककल्याणाच्या कामांत तर त्यांची गडबड वीस पंचवीस वर्षें तरी आहे; नग आकाशांतील बापाची ओळख झाल्यास इतका काळ लोटला असतां, व इतकीं वर्षें त्यांनीं त्याचें दर आदितवारीं ध्यान केलें असतां, त्यांचा स्वभाव जर प्रसिद्ध शूद्रकवीच्या अभंगांत सांगितल्याप्रमाणें जसाचा तसाच अद्याप राहिला आहे, तर त्यांच्या बंधूंवर व भगिनींवर तरी नेत्रमीलनविधीचें

अधिक कार्य दृष्टीस पडेल हें कोणीं ह्मणावें ? कोणत्याही धर्मसमाजाचा उद्देश अर्थात हा असतो कीं, त्याचें अनुसरण केलें असतां धार्मिकतेच्या वृत्ति, ह्मणजे शांति, निरहंकारता, समदृष्टि, सभ्यता इत्यादि हृदयांत उत्पन्न व्हाव्या, व मनास उन्नति व प्रसन्नता प्राप्त व्हावी; पण हीं सर्व लक्षणें सत्यशोधकांच्या जगद्गुरूंच्या ठायीं कितपत आढळतील बरें! जो 'गुलामगिरी'चें एकादें पृष्ठ वाचील त्याची मुद्दां वरच्या संबंधानें तेव्हांच खात्री होईल! हें एक झालें. दुसरी एक मोठी शंका वरील वास्तुशांतीवरून व पिंडप्रदानावरून अशी मनांत येते कीं, वरील विधि 'समाजाचे मताप्रमाणें' केले ह्मणजे काय! वास्तुशांतीचे व उत्तर-कार्याचे मंत्र कोणीं शूद्र आचार्यानें नवे तर बनवले नसतीलना! किंवा त्यांच्या जागीं शुभ-वर्तमान अध्याय अमुक ओंवी अमुक, किंवा 'ब्राह्मणांची गुलामगिरी' भाग अमुक पृष्ठ अमुक अशी बदल करण्याविषयीं जोतीराव फुल्यांनीं एकादें भज्ञापत्र काढलें आहे काय? किंवा जेथें भाताचे पिंड करायाचें त्या जागीं यंत्रासिद्ध विलायती पिंडांची योजना करायाची? काय असेल तें असो; या बाबतींत एकादा जोतीबांचा चेला किंवा त्यांचे साह्यकारी जे 'वर्चूसंग्रह'वाले ते आमच्या अज्ञानांधकाराच्या निरसनार्थ एकादा ज्ञानकिरण पाठवण्याची मेहेरबानी करतील तर बरें होईल! तिसरी गोष्ट सोन्याचें पदक व शेतकीचा निबंध. सोन्या-च्या पदकाविषयीं सदहू रिपोर्टांतच असा मजकूर आढळतो कीं, तें देणाऱ्यानें 'दरसाल २५ रुपये देण्याचें कबूल करून एकसालचे रुपये भरले असतांही पदक अद्याप देण्यांत आलेलें नाहीं!' दुसऱ्या निबंधाची काय व्यवस्था झाली ती अद्याप समजण्यांत आली नाहीं. आतां या दोन्ही प्रकारांविषयीं आह्मांस लिहायाचें ह्मणून इतकेंच आहे कीं, केवळ इच्छामात्रेंकरून कोणत्याही कार्याची सिद्धि होत असते असें नाहीं. ज्या जमिनीची कधीं लागवड झाली नाहीं तिजवर उत्कृष्ठ पीक यावें अशी जर कोणाची मनोदेवता धांवली तर त्यानें नांगराची, बैलांची वगैरे तजवीज पाहावी, का कोठें बक्षीस लावून क्षेत्रदेवतेस लालचावयास पाहावें? जेथें बारा जन्मांत कधीं नांगर फिरला नाहीं तेथें मोठीं सोन्याचीं फुलें उधळलीं ह्मणून काय होणार! तर या उघड न्यायाकडे लक्ष देऊन आमची शूद्रकल्याणेच्छु मंडळी सोन्याचें पदक व बाक्षिसांच्या थैल्या यांस तूर्त मोहोरबंद करून ठेवून आपल्या बांधवांच्या शिक्षणाच्या तज-विजीला जर अगोदर लागतील तर त्यांत त्यांचें शहाणपण दिसून येणार आहे, व ज्यांच्या हितार्थ ते झटताहेत त्यांचेंही त्यांत कल्याण होणार आहे!

असो; आतां सरतेशेवटीं सदरील रिपोर्टांतल्या चार ठिकाणचा उतारा पुढें देऊन जोतीबांची व त्यांच्या सभासदांची रजा घेतों.—

"मुंबईकर सभासदांनीं रा॰ रा॰ जोतीराव फुले, यांस गतवर्षी मुंबईस बोलावून नेलें आणि तेथें त्यांच्याकडून कांहीं व्याख्यानें सत्याविषयीं देवविलीं."

"रा॰ रा॰ जोतीराव गोविंदराव फुले, यांनीं केलेल्या 'गुलामगिरी आणि ब्राह्मणांचें कसब या पुस्तकांच्या प्रत्येकीं पन्नास पन्नास प्रती समाजास बक्षीस दिल्या. हीं पुस्तकें आणि समाजाचे नियम ही श्रीमंत आणि राजे लोक यांजकडे पाठवावीं असें ठरलें."

"या समाजाचे खरे हेतु जाणून सत्यदीपिका ह्मणजे केवळ सत्याचा दीपकच या पत्रानें समाज सुरू झाल्या दिवसापासून आजतागाईत जी जी मदत अवश्य आणि सत्यास अनुसरून द्यावयाची ती दिली, व ज्या ज्या सभासदांनीं सत्यास स्मरून जीं जीं स्तुत्य कृत्यें केलीं ती छापून प्रसिद्ध केलीं याजकरतां समाज त्या पत्रकर्त्यांचे फारच आभार मानून सर्वशक्तिमान् जगाचा उत्पन्नकर्ता यास अशी प्रार्थना करतो कीं, हें पत्र चिरकाळ चालून असाच सत्याचा प्रकाश जगभर होवो !"

"श्री० रा० रा० हरी गणेश पटवर्धन ऊर्फ अण्णासाहेब सांगलीकर हे सभ्य गृहस्थ ब्राह्मण लोकांपैकीं बडे लोक असून समाजाचे सभासद नसतां, समाजाचे मुख्य सभानायकाकडून समाजाचा स्तुत्य हेतु त्यांस समजतांच त्यांना शूद्र लोकांचा खरा कळवळा आल्यामुळें त्यांनीं चालू सालाकरतां पस्तीस रुपये वर्गणी दिली, यास्तव समाज त्यांचा फार आभारी आहे. याचेंच नांव सत्याभिमान आणि याचेंच नांव मनुष्यमात्राचा कळवळा !"

वरील चार कलमांवर निराळी टीका करणें नको. जोतीराव केवढे महाज्ञानी आहेत, त्यांचें 'सत्य' ह्मणजे काय, व त्यांच्या दोन महाग्रंथांचें स्वरूप काय आहे, हें वर सविस्तर वाचकांस कळवलेंच आहे; तशीच 'सत्याची जी केवळ दीपिकाच' तिजविषयींही विशेषत: गेल्या ३६ व्या अंकावरून आमच्या वाचकांस माहिती झालेलीच आहे; तेव्हां मुंबईकरांनीं वरील सत्यमूर्तीस पाचारण केलें असतां त्यांच्या वक्तृत्वानें त्यांचे कान कितपत पावन होऊन गेले असतील, 'गुलामगिरी' व तिचें 'क्षुद्र' आवंड हीं पुस्तकें कोणत्या वमुलाची आहेत व राजाश्रयास तीं कितपत पात्र आहेत, तशीच 'सत्याच्या जोती' ची जी सत्यशोधकांनीं व जोतीभक्तांनीं तारीफ केली आहे व तिच्या तर्फेनें आकाशांतील प्रभूशीं सांड घातली आहे ती कितपत यथार्थ आहे व कितपत सफळ होण्यासारखी आहे, या सर्व गोष्टी वाचकांच्या लक्षांत येऊन चुकतीलच. त्यांविषयीं आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं. पण शेवटल्या कलमांत ज्या पुण्यपुरुषाचा महिमा गाइला आहे त्याची माहिती मात्र आमच्या दूरदूरच्या वाचकांस कदाचित् नसेल. कां कीं संभाजी महाराजांच्या अमलांत कलुषाची कारकीर्द जशी गाजली, किंवा शेवटल्या रावबाजीच्या आश्रयानें त्रिंबकजीचे गुण जसे पूर्ण विकास पावले, तशीच वरील गृहस्थांची सार्वत्रिक विख्याति होण्याचा योग आमच्या सरकारानें येऊं दिला नाहीं. त्यांचा 'सत्याभिमान व मनुष्यमात्राचा कळवळा' नुकता कोठें दृष्टीस पडूं लागला न लागला तोंच त्यांस सरकारनें त्यांच्या जिवलग दोस्तापासून दूर केलें. व सांगली संस्थानाचा बचाव केला. पुढें या कळवळ्याच्या गृहस्थांनीं आमच्या पुण्यपत्तनांतही आपली कीर्ति उधळून वर्तमानपत्रद्वारें लोकांचें रंजन कांहीं दिवस बरेंच केलें हेंही सर्वांस मशहूर आहेच. असो; एकंदरींत सत्यशोधनाचा जिनें आपला बाव्हट्य उभारला आहे, व सत्यदीपिकेच्या साह्यानें जिची दृष्टि येवढी परम सूक्ष्म झाली आहे कीं, मनूपासून ब्रह्मदेवापर्यंतही ती पोंचून टर्किन् साहेबांच्या अंगावरील रोमांवही तिच्या दृष्टीला विषय झाले, त्या सभेस पटवर्धन ऊर्फ सांगलीकर यांचेंच चरित्र कसें अश्रुत

राहिलें याचा आह्मांस आचंबा वाटतो! पण कोण जाणे, पस्तीस टिकल्यांच्या उजेडानें अंध होऊन सभेचे डोळे तर दिपले नसतील ना! असें असेल तर सामाजिकांस आह्मी अशी सूचना करतों कीं, वरील सत्याभिमानी व कनवाळू गृहस्थास त्यांनीं आपल्या मंडळीचें अधिपतित्व द्यावें. तें दिलें असतां समसमानांचा जोडा मोठा उत्कृष्ट घडेल व बळीचें राज्य आकाशाच्या राज्याबरोबर लवकरच खालीं येईल!

अभिप्राय देण्यास हाती घेतल्यापैकीं पहिल्या पुस्तकावर येवढी टीका बस झाली. वस्तुतः पाहिलें असतां जोतीबांच्या व त्यांच्या अनुयायांच्या मतांवर विवरण करणें, व ब्राह्मणांचे गुणावगुण, हल्लींचा शिक्षणपद्धति वगैरे विषयांवर सविस्तर निरूपण करणें, हें हल्लींच्या काळीं अत्यंत अवश्य होय. पण तसें करण्याचें हें स्थळ नव्हे हें उघड आहे. तरी वर जे अनेक विचार प्रगट करण्यांत आले आहेत त्यांवरून प्रस्तुत समाजाविषयीं व त्याच्या मताविषयीं वाचकांच्या मनांत बरीच यथार्थ कल्पना येईल असें आह्मांस वाटतें. सत्यशोधकांस वरील विवरण आवडणार नाहीं हें उघडच आहे; पण ज्या अर्थी आमचें मत प्रांजलपणें उघड करण्याविषयीं त्यांनीं आपलें पुस्तक पाठवण्यानें आह्मांस सूचना केली त्या अर्थी पुस्तककारांच्या संप्रदायास अनुसरून आह्मांस आपलें मनोगत कळवणें प्राप्त पडलें. तें आमच्या बुद्धीनें तरी आह्मीं निःपक्षपातपणानें दिलें आहे, तर सत्याच्या शोधार्थ यत्न करणारी मंडळी आपलें नामाभिधान सार्थ करून त्याविषयीं मनन करो येवढीच आमची त्यांस प्रार्थना आहे.

---

**विद्यार्थिबुद्धिवर्धिनी**—हें पुस्तक रा० शंकर बाळकृष्ण दीक्षित स्कूलमास्तर रेवदंडा यांनी रचलें आहे. हें मराठी शाळांतील चवथी, पांचवी व सहावी यत्ता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरतां केलें असून यांत क्रमिक चवथें, पांचवें व सहावें पुस्तक यांतील कवितांत असणाऱ्या कठिण शब्दांचा संग्रह केला आहे. आरंभीं एक बराच मोठा निबंध जोडला आहे, त्यांत मराठी कवितेंतील व्याकरणविशेषांचें निरूपण केलें आहे, व शब्दसिद्धीविषयीं वगैरे कांहीं सूचना दिल्या आहेत.

सदरील ग्रंथाचे वरील सर्व भाग यथास्थित व व्यवस्थेवार लिहिलेले आहेत. पहिला व्याकरणाचा निबंध 'पद्यरत्नावली'स जोडलेल्या लेखांच्या आधारानें लिहिलेला असावा. तरी यांतील विषय वरील लेखाहून अधिक विस्तारानें लिहिला असून उदाहरणें वगैरे पुष्कळ दिलीं आहेत. शिवाय संधीचे वगैरे नियमही अधिक जोडले आहेत. दुसऱ्या भागांत पुस्तकाचा मुख्य विषय, ह्मणजे चवथ्या, पांचव्या व सहाव्या पुस्तकांतील कवितांतले कठिण शब्द यांचा संग्रह, हा आहे. या भागाची रचना येणेंप्रमाणें आहे:—प्रथमत: प्रत्येक कवितेचा विषय वगैरे सांगून ह्मणजे तींतील कथानकाचा पूर्वापार संबंध, एकंदर कथा, कवीचें नांव वगैरे ही सर्व माहिती देऊन नंतर दुर्बोध शब्दांचें समजण्यासारखे संस्कृत किंवा मराठी पर्याय दिले आहेत. हे पर्याय देतांना कोठें मूळ शब्दाची व्युत्पत्ति, कोठें विशेष

नाम असल्यास त्याविषयींची विशेष माहिती, कोठें लिंगनिर्वचन, कोठें समासविग्रह, असा प्रकार केला आहे; व स्थलविशेषीं त्या त्या शब्दाच्या खालीं टिपेंत पूर्वींच्या व्याकरण-नियमांचा निर्देश केला आहे; तसेंच कोठें पुराणप्रसिद्ध प्राचीन कथांचा संदर्भ, कोठें 'पुण्य-श्लोक', 'चतुरंग', 'पंचबाण', इत्यादि शब्दांच्या संबंधानें 'पुण्यश्लोक', ही संज्ञा कोणा-कोणास आहे,* सेनेचीं चार अंगें‡ कोणतीं, मदनाचे पांच बाण§ कोणते, अर्जुनास कोणतीं दहा नांवें¶ होतीं, ही माहिती मूळ संस्कृत श्लोकांचा उल्लेख करून दिली आहे. एकं-दरींत सदरहू पुस्तक लिहिण्याचा ग्रंथकाराचा मूळचा जो उद्देश कीं त्याच्या साह्यानें विद्या-र्थ्यांस स्वतःच्या परिश्रमानें अर्थ लावण्याची संवय लागावी व त्यांची कल्पना वाढावी, तो आमच्या मतें यापासून चांगला सिद्धीस जाईल.

सदरील पुस्तक मराठी शाळांतील शिक्षक व विद्यार्थी या दोघांसही उपयोगीं पडावें म्हणून केलें आहे. शिक्षकांस यांत कांहीं माहिती ज्यास्त दिलेली आढळेल व शिवाय शिक-वतांनाही प्रश्न विचारण्यास याचा त्यांस उपयोग होईल. विद्यार्थ्यांच्या संबंधानें याची उपयुक्तता काय आहे हें वर सांगितलेंच आहे. कवितार्थांचीं आयतीं तयार केलेलीं जीं पुस्तकें आहेत त्यांवरून अर्थ तोंडपाठ करण्यापेक्षां सदरील पुस्तकावरून तो लावण्याचा जर

---

* पुण्यश्लोको नलो राजा, पुण्यश्लोको युधिष्ठिरः ॥
पुण्यश्लोका च वैदेही, पुण्यश्लोको जनार्दनः ॥ १ ॥

निषध देशचा नल राजा, युधिष्ठिर ऊर्फ धर्मराज आणि जनार्दन व वैदेही ( म्हणजे सीता ) या चौघांस 'पुण्यश्लोक' ही संज्ञा आहे. 'सम्पादक'

‡ हत्ती, घोडे, पायदळ व रथ अशीं सेनेचीं चार अंगें होत. 'सम्पादक'

§ अरविन्दमशोकं च चूतं च नवमल्लिका ॥
नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः ॥ १ ॥

सूर्यकमळ, अशोक, आम्रवृक्ष, नवमल्लिका ( एका प्रकारची जाईजुई ) आणि निळें कमळ हे पांच मदनाचे बाण होत.

किंवा,

संमोहनोन्मादनौच शोषणस्तापनस्तथा ॥
स्तम्भनश्चेति कामस्य पञ्चबाणाः प्रकीर्तिताः ॥ १ ॥

संमोह, उन्माद, शोष, ताप, स्तंभन व भ्रंश हेहि पांच मदनाचे बाण मानतात. 'सम्पादक'

¶ अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः ॥
बीभत्सुर्विजयः कृष्णः सव्यसाची धनञ्जयः ॥ १ ॥

अर्जुन म्हणजे पांढरीं अतएव पवित्र कृत्यें करणारा म्हणून अर्जुन, उत्तराफल्गुनी नक्षत्रावर जन्म झाला म्हणून फाल्गुन, नेहमीं जिंकणारा म्हणून जिष्णु, पूर्वी शूर दानवांशीं लढतांना डोक्यावर इंद्रानें मुकुट ठेवला म्हणून किरीटी, पांढऱ्या घोड्यावर बसणारा म्हणून श्वेतवाहन, युद्धांतहि नीतिबाह्य घाणेरडीं कर्में करण्याचा वीट येई म्हणून बीभत्सु, शत्रूंना जिंकल्याविना न परतणारा म्हणून विजय, वर्ण काळा म्हणून कृष्ण, गांडीव धनुष्य उजव्या व डाव्या दोन्ही हातांनीं सारख्याच कुशलतेनें वापरणारा म्हणून सव्यसाची, दिग्विजय-प्राप्त धनराशींत लोळणारा म्हणून धनंजय, अशीं अर्जुनाच्या अनेक नांवांपैकीं दहा नांवें होत. 'सम्पादक'

त्यांनीं परिपाठ ठेवला, तर तो त्यांस किती अधिक श्रेयस्कर होईल हें सांगायास नको. असो; तर मराठी शाळांतील मास्तरांस वरील पुस्तकाविषयीं शिफारस करून ग्रंथकाराची रजा घेतों.

---

**जमाखर्चांची पद्धति**—हें पुस्तक रा॰ वासुदेव बाळकृष्ण लोटलीकर यांनीं आमचेकडे पाठवल्यास बरेच दिवस झाले. त्यांतील गुणावगुणांविषयीं या वेळीं आह्मी आपला अभिप्राय देतों. या पुस्तकासंबंधीं गुणदोष कळवण्यापूर्वी प्रथमतः जे विचार सुचतात त्यांचें कांहीं दिग्दर्शन येथें करतों.

आमच्या देशांतील मोगल बादशाहापासून तों आजपर्यंत जमाखर्च लिहिण्याची पद्धति या देशांत उत्कृष्ट प्रकारची चालत आली आहे. पेशवाईत जमाखर्च लिहिणें हें मोठें कसबच मानीत असत. त्या काळीं या विद्येचा फारच फैलावा झाला होता. लहानपणीं मुलांस शिक्षण ह्मटलें तर मोडी लिपीचें अक्षर चांगलें असणें व पत्र लिहितां येऊन हिशेब ठेवतां येणें इतकेंच असे. खुद्द पेशव्यांच्या दरबारांतील जे फडनवीस त्यांजकडे त्या वेळच्या सर्व राज्यप्रकरणी जमाखर्चाचा हिशेब असे, हें सर्वांस माहीत आहेच. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांजपासून तर शेवटचे बाजीराव पेशव्यांपर्यंत या घराण्यांतील सर्व पुरुषांस ही विद्या संपादन करावी लागत असे. त्याप्रमाणें बहुतेक सर्व गादीचे मालक या कलेंत निपुण असत. शेवटले बाजीराव यांस तर या जमाखर्च लिहिण्याचा फारच नाद असे. आपल्या खजिन्यांतून ज्या रकमा खर्ची पडत व जमा होत असत त्यांचा हिशेब गुपचिप तऱ्हेनें सर्व दिवसाचा ते रात्रीं मांडून ठेवीत असत. हा कचा खर्डा स्वतः करून ठेवण्याचें कारण काय तें बरोबर समजत नाहीं. बाजीरावसाहेब पुण्यांतून गेल्यावर इंग्रेजांनीं पेशव्यांचा वाडा ताब्यांत घेऊन तपासण्यास आरंभ जेव्हां केला, त्या वेळीं त्यांच्या पलंगाखालीं चोवीस वर्षांचा हिशेब उत्तम तऱ्हेनें लिहून ठेवलेला सांपडला. बाजीरावसाहेबांचें अक्षर उत्कृष्ट होतें असाही लौकिक आहे.

सन १८१८ इसवींत पेशवाई बुडाल्यावर इकडे इंग्रेजी अंमल सुरू झाला. ही नवीन राज्यपद्धति जरी पुष्कळ प्रकारांनीं पूर्वीपेक्षां भिन्न होती तरी जमाखर्चांची पद्धति पूर्वींच्याच धाटणीवर ठेवणें प्राप्त झालें. पुढें या पद्धतींत कांहीं तरी सुधारणूक व्हावी असें राज्यकर्त्यांस वाटलें. परंतु या बिकट विषयाची सुधारणा करतो कोण ? शेवटीं दक्षिणभाग आणि उत्तरभाग रेविन्यु कमिशनर या उभयतांची कमिटी बसून या विषयाची सुरुवात करण्याविषयीं विचार ठरला.

त्या वेळीं दक्षिणभाग रेविन्यु कमिशनरचे दप्तरदार रा॰ रामराव नरसिंह ताडपत्रे हे होते. यांनीं सरकारच्या आज्ञेवरून गांवचे नमुन्यांची चोपडी तयार केली. हींत कीर्द, खतावणी, व दुसऱ्या प्रकारच्या सर्व हिशेबी कागदांची उत्तम तऱ्हेनें माहिती दिली होती. जमाखर्चाचा मुख्य कागद जी कीर्दवही तिची परिस्फुटता चांगल्या तऱ्हेनें करून सर्व गांवचा हिशेब चोख रीतीनें राहावा ह्मणून नगदी व मुलकी मिळून एकंदर बेवीस नमुने तयार केले

होते. सन १८२७ चा कायदा जसा फार जुना व नामी ह्मणून ह्मणतात व तोच बहुत दिवसपर्यंत चालू राहिला, त्याचप्रमाणें वरील नमुन्यांची गोष्ट झाली. सर्व आबालवृद्धांस ते पसंत होऊन ती पद्धति सर्वांनीं स्वीकारली होती. व्यापारी लोकांनीं देखील तिचें अनुकरण केलें होतें. पेशवाईंत लहानपणीं मुलांस ज्याप्रमाणें अक्षर तयार झाल्यावर जमाखर्च लिहिण्यास शिकवीत असत, त्याप्रमाणें रामरावजींचे नमुने इंग्रेजींत मुलांकडून पाठ करवीत असत. असो; पुढें हे नमुने बदलून दुसरे करावे असें सरकारानें ठरवलें. या ठरावाचा उल्लेख व नंबर होपसाहेबांनीं आपल्या नमुन्याचे पुस्तकाचे आरंभीं सादर केला आहे.

सन १८६९ सालीं पुणें येथें बुधवारच्या वाड्यांत वरील विचाराकरतां कमेटी बसली. त्या कमेटींत हुषार व जुने अनुभवशीर अशा गृहस्थांचीच योजना केली होती. बहुतेक मामलेदार त्या वेळीं येथें जमले होते. त्या कमेटींतील मामलेदार यांनीं आपल्या पंचवीस तीस वर्षांचे अनुभवांवरून असें सांगितलें कीं, चालत आलेल्या वहिवाटींत फेरबदल करणें हें घोंटाळ्याचें होईल. हें त्यांचे सांगणें दुराग्रहामुळें सरकारानें मान्य केलें नाहीं. शेवटीं सन १८७० सालीं सुरतेचे कलेक्टर टी. सी. होप यांनीं 'मुल्की हिशेबाची पद्धति' ह्मणून नमुन्याचें पुस्तक तयार केलें. होप साहेबांनीं कायद्याचीं एक दोन बिलें करण्याचें जसें यश घेतलें त्याचप्रमाणें हेंही यश घेतलें. या होपच्या नमुन्यांपूर्वीं गॉर्डन् साहेबाचे नमुने एक वर्षभरच चालले होते, परंतु ते धुळीवरील सारवण केव्हां नाहींसें झालें हें कळलें देखील नाहीं. होप साहेब आपल्या या पुस्तकांत प्रथम असें ह्मणतात कीं, 'तालुक्यांत खतावण्या राहत होत्या व हुजुरांत किरकोळ हिशेब राहत होते त्यांऐवजीं कितीएक नमुने करण्याचा आमचा अभिप्राय पुणें येथें सन १८६९ सालीं सप्टेंबर् महिन्यांत बसलेल्या कमिटीनें मंजूर केला.' ही 'पद्धति' करण्यांत होप साहेबांचें बरेंच चातुर्य दिसून येतें. पहिल्यांदा नवीन चालू होण्यास इवा थोडासा घोंटाळा वाटला, परंतु आतां त्याचाही फारसा बोभाटा राहिला नाहीं. हें जरी खरें आहे, तरी पुष्कळ दिवस ज्या वृद्ध लोकांनीं पेशवाई राज्याचा अनुभव घेतला त्यांस इंग्रेजी राज्यापासून जें बरें वाईट मनाला वाटण्याचा त्यांस संभव आहे तसाच कांहीं प्रकार होपच्या नमुन्यांचाही आहे. असो, येथपर्यंत या पद्धतीला मुळापासून कसकसें वळण मिळत गेलें तें कथन केलें. आतां आमच्या टीकाविषयक पुस्तकाविषयीं मात्र दोन शब्द लिहिणें राहिलें आहे तें आतां लिहूं.

हें पुस्तक कर्त्यांच्या हेतूप्रमाणें 'सहाव्या इयत्तेची परीक्षा देऊं इच्छिणारांस' खरोखरीच उपयोगाचें असें झालें आहे. त्याचप्रमाणें 'या विषयावर अनेक पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, परंतु त्यांत एकही स्वल्प रीतीनें माहिती करून देण्याजोगें नाहीं' असें जें लोटलीकर यांचें मत आहे त्याचप्रमाणें आमचेंही आहे. यांत 'कोणास न्यूनाधिक्यें आढळल्यास अवश्य कळवावीं ह्मणजे त्यांचा पुढील आवृत्तीचे वेळीं विचार केला जाईल' असें लिहिलें आहे त्यावरून कांहीं सूचना येथें करून हें मत आटपतों.

या पुस्तकास वाढवण्यास अजून पुष्कळ जागा राहिली आहे. या पुस्तकाचा उप-

योग 'इतर हिशेबी लोकांस' व 'व्यापारी लोकांसही' आहे असें जें ह्मणणें आहे तें व्यर्थ आहे. तसें होण्यास हें पुस्तक पुष्कळ वाढवून यास यापेक्षां वेगळेंच रूप दिलें पाहिजे. या 'जमाखर्चाचे पद्धती'चें अध्ययन करून कोणीं ह्मटलें कीं, मी पेढीवरील किंवा दुकानावरील मुनिमाचें काम चालवीन तर हें असंभवनीय आहे. त्याचा विलक्षण घोटाळा होऊन जाऊन त्यास वाटेल कीं, मीं अध्ययन केलेल्या पुस्तकांत इकडील माहितीचा एक शतांश देखील आला नाहीं व आपणांस 'जमाखर्चाचे पद्धती'पेक्षां अजून पुष्कळ शिकणें राहिलें आहे.. शाळेंत असतां वाटत होतें कीं, ही 'जमाखर्चाची पद्धति' शिकल्यावर आपल्यास पाहिजे तेथील हिशेबी काम चोख रीतीनें समजेल; परंतु ती व्यर्थ भ्रांति होती. अशी त्या अध्ययन करणाराची स्थिति होऊन जाईल. तर हें पुस्तक पुनरपि वाढवतेवेळीं माटे यांचा अभिप्राय असेल त्या पद्धतीनें वाढवून आमचे इकडील जुन्या हिशेबाचें पुनरुज्जीवन केल्याचें कर्त्यांनीं यश घ्यावें. या आवृत्तीचे वेळीं पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावना गाळून टाकण्याचें कारण नव्हतें.

सुबोधपत्रिकाकर्त्यांच्या यांतील अभिप्रायाप्रमाणेंच आमचा या पुस्तकावर अभिप्राय आहे. 'सहाव्या इयत्तेची परीक्षा देऊं इच्छिणारांस' या लहानशा चोपडीचा बराच फायदा झाला आहे असें दिसतें, आणि ह्मणूनच 'इतक्या थोड्या वेळांत या लहानशा पुस्तकाची पहिली व दुसरी आवृत्ति सर्व संपल्यामुळें ही तिसरी आवृत्ति' छापण्याचा प्रसंग रा० लोटलीकर यांस आला. तसेंच 'डायरेक्टर साहेब बहादुर' यांचा उदार आश्रयही वरील उत्कर्षास कांहींसा कारण झाला आहे. यावरून रा० लोटलीकर यांनीं असें समजूं नये कीं, परीक्षेचे तयारीस या पुस्तकाची माहिती पुरून उरण्याजोगी असेल. मागें रामरावांच्या नमुन्यांवरून मुल्कीकडील परीक्षा देऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठीं माटे यांनीं 'सवाल जबाबाचें' पुस्तक कसें केलें होतें तें पाहिलें तर आमच्या ह्मणण्याविषयीं खात्री होईल.

असो; एकंदरीनें या पुस्तकांत नवीन मंडळीस समजूत होण्याजोगा कांहीं भाग सुबोध असल्यामुळें लोटलीकर यांचा मूळ हेतु तडीस गेला. यांत अशुद्धें पुष्कळ राहिलीं आहेत, त्यांतून चवऱ्या पृष्ठांत व त्या पृष्ठांतील खालच्या भागांत तर चुका फारच आहेत, त्या पुढें दुरुस्त व्हाव्या. किंमतही जी तिसऱ्या आवृत्तीस फार ठेवली आहे ती पुढें कमी करावी, व पुढील प्रयत्नाचे वेळीं यांतील जुन्या माहितगार मनुष्यांचें साह्य घ्यावें, ह्मणजे त्यांचें कर्तृत्व सफल होईल.

# काव्येतिहास—संग्रह*

कष्टं शिष्टक्षतिकृति कलौ कार्श्यमृच्छन्ति विद्याः ।१

'विश्वगुणादर्श'—वेंकटाध्वरी†

अंक ४९ (१) मासिक पुस्तकांचा फैलाव. (२) काव्येतिहाससंग्रह. (३) याच्या उद्देशावर येणारे आक्षेप. (४) पहिला-इतिहासावर. (५) दुसरा-मराठी कवितेवर. (६) तिसरा-संस्कृत कवितेवर (७) वरील तिन्ही विभागांविषयीं पृथक् विचार. (८) पुस्तकांविषयीं अभिप्राय. (९) उपसंहार.

१ आलीकडे दोन चार वर्षांत आमच्या भाषेंत पुष्कळ नवीं नवीं मासिक पुस्तकें निघूं लागलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या अंकांत‖ आह्मीं जें लिहिलें होतें कीं, वर्तमानपत्रांची स्थिति आलीकडे सुधारून मासिक पुस्तकें मागसल्यासारखीं झालीं आहेत, ती स्थिति दिवसांदिवस जात चालली आहे. पूर्वी एकादें दुसरें मासिक पुस्तक असे, व त्यांतच पाहिजेत ते विषय येत असत. पण हल्लीं लोकांत ज्ञानाचा प्रसार पुष्कळ झाल्यानें हरएक प्रकरणाचें निरनिराळेंच पुस्तक होऊं लागलें आहे. 'वेदार्थयत्न' 'षड्दर्शनचिंतनिका' 'वैद्यकसंग्रह', 'सिद्धपदार्थशास्त्र,' 'शिल्पकलासंग्रह', 'एंजार्नियरींग विषयाचें पुस्तक', 'उपयुक्त ज्ञानसार', 'अबलामित्र', 'सर्वसंग्रह', इत्यादि§ नांवांवरून वरील गोष्टीची प्रचीति येईल.

---

* हें मासिक काढण्याची मूळ कल्पना शास्त्रीबोवांची. पण कल्पनेचे उत्पादक जरी ते असले तरी सुरू करण्याच्या वेळीं साने—मोडक—चिपळूणकर या तिघांनींहि पन्नास रु. प्रत्येकीं भांडवल घातलें होतें. पण तिघांचें पुढें न जमल्यामुळें १८८१ अखेर शास्त्रीबुवांनीं संबंध सोडला. त्या वेळीं प्रत्येकास सुमारें चारशें रुपये मिळाले. जो भाग ज्यानें संपादिला असेल त्याच्या दोनशें प्रती त्यास संपादकीय हक्काबद्दल मिळत. 'सम्पादक'

१. "हर हर! शिष्टांचा ऱ्हास करणारा जो कलि त्यांत विद्यांचा उत्तरोत्तर अपकर्ष होत चालला आहे!"

† वेंकटाध्वरी हा १७ व्या शतकांत होऊन गेला. याचा बाप रघुनाथ दीक्षित, आजा अप्पयगुरु. हा अप्पयदीक्षित 'कुवलयानंद' नामक अलंकारग्रंथाचा कर्ता नव्हे. वेंकटाध्वरी कांचीपुराजवळ 'अर्शनफल' नांवाच्या अग्रहारांत (इनाम जमिनींत) राहत असे. हा नीलकण्ठदीक्षिताचा समकालीन होता. यानें इ. स. १६४० सालीं रसालंकारपूर्ण असा विश्ववैचित्र्यदर्शक विश्वगुणादर्शचम्पू लिहिला. यांत अर्थालंकारांपेक्षां शब्दालंकारांना ज्यास्त महत्त्व दिलें असून भाषा थोडी क्लिष्ट वाटते. या ग्रंथांत कृशानु वस्तुमात्रांत दोष काढतो, व विश्वावसु त्या दोषांचें निराकरण करतो. याचे "हस्तिगिरिचम्पू." 'लक्ष्मीसहस्रं काव्यम्' असे आणखींहि प्रसिद्ध ग्रंथ आहेत. विश्वगुणादर्शांत निंदावर्णनच ज्यास्त भडक केल्यामुळें देवीच्या कोपानें डोळे गेले ते 'लक्ष्मीसहस्रम्' या काव्यामुळें देवीला प्रसन्न करून घेऊन यानें परत मिळविले अशी आख्यायिका आहे. 'सम्पादक'

‖ पृष्ठें ७–८ पाहा. 'सम्पादक'

§ वेदार्थयत्न, प्रारंभ १८७६ सम्पादक के. शंकर पांडुरंग पंडित, मुंबई.

[ पुढें चालू ]

अभिप्राय देण्यास घेतलेलें वरील पुस्तकही वरच्याप्रमाणेंच देशहिताचें एक काम उचलून त्या संबंधाची न्यूनता पूर्ण करण्यास निर्माण झालेलें आहे.

२. वरील मासिक पुस्तकाचें प्रसिद्धिपत्रक गेल्या डिसेंबर महिन्यांत आमच्या पुस्तकाच्या तिहिरी* अंकाबरोबर जोडलें होतें हें आमच्या वाचकांस माहीत असेलच. या पत्रकांत प्रकृत 'संग्रहा'चा उद्देश, त्याची व्यवस्था, वगैरे§ सर्व गोष्टींचा यथास्थित उल्लेख केलेला होता. त्याबरहुकूम सदरील पुस्तकाचें आजवर आठ अंक छापून प्रसिद्ध झाले आहेत. ते पुस्तक-प्रकाशकांनीं आमच्याकडे पाठवल्यावरून त्यांवर व या एकंदर उद्योगावर आमचें मत प्रगट करतों.

३. आतां प्रथमतः या उद्योगाविषयीं सामान्यतः विचार करून नंतर प्रस्तुत पुस्तकांतील तीन सदरें जी महाराष्ट्र देशाचा इतिहास, मराठी कविता, व संस्कृत कविता त्यांविषयीं वेगळें वेगळें लिहूं. प्रस्तुत उद्योग हा पुनरुज्जीवनासारखा किंवा जीर्णोद्धार करण्यासारखा आहे हें उघडच आहे. जे जुने ग्रंथ सध्यां कांहीं खटपट न केली तर ठार बुडून जाणार आहेत त्यांस वांचवण्याचा प्रस्तुत यत्न होय. आतां हा यत्न करण्याचें येवढें काय खोळंबलें आहे,—जुन्या काळच्या हाकिकती व जुनीं काव्यें हीं राखून ठेवून काय करायाचें आहे,—असा प्रश्न कित्येक समंजस लोक कदाचित् करतील. जें गेलें मेलें त्याची आठवण करण्यांत काय फायदा आहे, जें चाललें आहे तें खरें, तसेंच इंग्रजीसारखी कविता आयती

---

षड्दर्शनचिन्तानिका (१८७७) सं. कै॰ महादेव मोरेश्वर कुंटे, बी. ए., पुणें.
सिद्धपदार्थशास्त्र (१८७८) त्रैमासिक.
शिल्पकलासंग्रह (मे १८७७–जून १८७८) सं. व्ही. ए. धैर्यवान, प्रकाशक, धुरंधर, पुणें. एंजिनियरिंग विषयाचें पुस्तक (१८७६).
अबलामित्र (१८७६–१८८३) सं. रावजी हरि आठवले, रत्नागिरी.
सर्वसंग्रह (१८६०) सं. कै. माधव चंद्रोबा.
" (१८७६–७७) गोंधळेकर. 'सम्पादक'

§ उद्देश—(१) अप्रसिद्ध जुनी मराठी कविता (२) अप्रसिद्ध संस्कृत काव्यें आणि (३) जुन्या मराठी बखरी यांचें प्रकाशन करणें.

स्वरूप—वरील तिहींपैकीं प्रत्येक विषयास सोळा पृष्ठें देण्यांत येत, एकूण ४८ पृष्ठांचें मासिक होतें. कठिण शब्दांचें स्पष्टीकरण व अवांतर माहिती यांकरितां जागोजागीं तीनहि प्रकरणांत टिपा देण्यांत येत.

सम्पादक—साने (बखर बाजू), मोडक (मराठी कविता), विष्णुशास्त्री चिपळूणकर (संस्कृत कविता) असे तिघे.

व्यवस्थापक—कृष्णाजी रघुनाथ ऊर्फ तात्या केळकर. 'सम्पादक'

* तिहिरी किंवा तिहेरी अशा दोन्ही तऱ्हांनीं हा शब्द लिहितात. जुलै-आगस्ट-सप्टेंबर १८७७ या तीन महिन्यांच्या ५ डिसेंबरला एकदम निघालेल्या तिहेरी (४३–४५) अंकाचा उल्लेख येथें आहे. हें प्रसिद्धिपत्रक रा. जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए. व काशीनाथ नारायण साने, बी. ए. यांच्या सह्यांवर छापलें होतें. 'सम्पादक'

वाचायाला असतां व तिच्या स्फूर्तीनें आलीकडील नवीन विद्वान् उत्कृष्ट उत्कृष्ट काव्यें रसिकजन-रंजनार्थ स्वभाषेंत रचीत असतां, हजारों वर्षांमागलीं जुनीं संस्कृत काव्यें हुडकून काढा, तीं समजण्याकरतां संस्कृत भाषेचा पृथक् व्यासंग करा, व शेंकडों वर्षांमागली अज्ञान व अरसिक महाराष्ट्र-कवींनीं केलेली कविता पुन: उदयास आणा,—यांत काय होईल आहे ! हे प्रश्न केवळ काल्पनिक आहेत असें कोणी समजूं नये. पुष्कळांच्या वरच्यासारख्या समजुती आहेत व तसे उद्गारही पुष्कळांनीं स्वत: ऐकले असतील. तर प्रस्तुतसारख्या पुस्तकाचा उपयोग ध्यानांत घेण्याकरतां वरील शंकांचें अगोदर निरसन केलें पाहिजे.

४. प्रस्तुत मालेच्या सहाव्या अंकांत $ वरच्यांपैकीं पहिला जो इतिहासाविषयींचा आक्षेप त्याविषयीं बराच विचार केला आहे. त्यावरच येथें आणखी थोडा विस्तार करतों. इतिहास म्हणजे मेलेल्यांची किंवा गत गोष्टींची कथा होय हें उघडच आहे; पण यावरून त्याचा अभ्यास निरर्थक हें मात्र ठरत नाहीं. पाहा कीं, सॉक्रेटीस् मरून आज दोन हजारांवर वर्षें होऊन गेलीं; सध्यां सारें भूमंडळ जरी शोधलें, तरी त्याचा गोत्रज, वंशज किंवा कोणी कसलाही संबंधी एकही सांपडणार नाहीं. खुद्द आथेन्स् येथें गेलें तरी त्याचें राहण्याचें ठिकाणही सांपडेल किंवा नाहीं याचा वानवाच दिसतो.[१] त्याचें शरीर तर केव्हांच मातीबरोबर मिळून पार झालें असेल ! दुसरें उदाहरण रोम व कार्थेज यांच्या लढाईचें § घ्या. याही लढाईस आज दोन हजारांवर वर्षें लोटलीं; व दोन्हीं शहरांचें वैभव नष्ट झाल्या-

---

$ पृष्ठें ५८–५९ पाहा. 'सम्पादक'

१. "येवढा विख्यात जो ग्रीस देश त्याच्या परम विख्यात शहरांचीही आज काय स्थिति आहे ती पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. हा जुन्या 'कोर्स ऑफ् रीडिंग्'च्या ७० व्या पृष्ठांत समग्र सांपडेल. एक फ्रेंच् मुशाफर एका माहितगारास बरोबर घेऊन स्पार्टा शहर धुंडीत असतां तें शेवटीं अशा प्रकारें दृष्टीस पडलें—

"Yonder, at Magoula" said the Cicerone, pointing to a white cottage with some trees about it, at a considerable distance in the valley. Tears came into my eyes when I fixed them on this miserable hut, erected on the forsaken site of one of the most renowned cities of the universe, now the only object that marks the spot where Sparta flourished, the solitary habitation of a goat herd, whose whole wealth consists in the grass that grows upon the graves of Agis* Leonidas !

* Agis-Leonidas हे मासिडन्च्या फिलिप्ला व अलेक्झांडर्ला दाद न देणाऱ्या स्पार्टा संस्थानचे राजे होते. AgisIV यानें Leonidas II ला पदच्युत करविलें. व खि. पू.२४४–२४० पर्यंत राज्य केलें. लायकर्गस्च्या संस्थांची पुनः स्थापना करण्याचा यत्न केला पण पदच्युत लिओनिडासनें परत येऊन याला कैद करून तुरुंगांत अडकवून ठार मारविलें. क्लिओनिडासनें खिस्तपूर्व २५६ ते २३६ पर्यंत राज्य केलें. 'सम्पादक'

§ (Second Punic War) दुसरें प्यूनिक् युद्ध—खि. पू. २१९–२११. 'सम्पादक'

सही किती काळ लोटून गेला ! कार्थेज * तर वरील लढाई आटपल्यावर पन्नास वर्षांनींच धुळीस मिळून गेलें; व पुढें कितीक राष्ट्रें तो सारा प्रदेश एकामागून एक तुडवीत गेलीं. रोमची तरी कालांतरानें तशीच धूळधाण झाली; ‡ व सध्यां जरी तें शहर कायम आहे तरी हा त्याचा दुसरा जन्म म्हटला पाहिजे. पूर्वीची भाषा, पूर्वींचा धर्म, पूर्वींचा रीतरिवाज, पूर्वींची लोकव्यवस्था, वगैरे सर्व कांहीं नाहींसें झालें आहे. तेव्हां असल्या दोन शहरांच्या त्रेतायुगांतल्या लढाईचा वृत्तांत हा सध्यां इसापनीतींतल्या पशुपक्ष्यांच्या युद्धासारखाच होय ! म्हणजे वस्तुतः पाहतां इसापानें वर्णिलेल्या युद्धाचा प्रस्तुत काळीं चाललेल्या रहाटीशीं जितका संबंध आहे तितपतच वरील महायुद्धाचाही होय. नुसता वरवर जो विचार करणारा आहे त्यास वरील दोन्ही सिद्धांत अत्यंत मान्य होऊन सॉक्रेटीसचें चरित्र व कार्थेजची लढाई ही लिहिणारे व वाचणारे दोघेही मूर्ख असें वाटल्यावांचून राहणार नाही. पण अंमळ

---

* Carthage हें विख्यात शहर आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्याजवळ सिसिली बेटाच्या दक्षिण टोंकाच्या नैर्ऋत्येस ( हल्लींच्या ट्यूनिस् प्रांतांत ) दीडशें मैलांवर होतें. रोमपूर्वी शंभर वर्षें या नगराची स्थापना झाली होती. रोम खि. पू. ७५२ मध्यें रोम्युलसनें वसविलें. रोमशीं भीषण झुंज खेळल्यावर सर्वनाश होण्याचे वेळींहि सात लाख लोक कार्थेजमध्यें राहत असत. कार्थेजचें साम्राज्य त्या वेळीं हर्क्युलिसच्या स्तंभांपासून Great Syrtis च्या आखातापर्यंत, म्हणजे आधुनिक जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीपासून सिद्रा ( Sidra ) च्या आखातापर्यंत पसरलें होतें. अर्वाचीन मोरोक्को, अल्जीरिया, ट्यूनिस्, त्रिपोली या आफ्रिकेंतील प्रांतांचा बराच भाग कार्थेजच्या साम्राज्यांत होता. 'सम्पादक'

† ( Third Punic War ) तिसऱ्या प्यूनिक् युद्धांत ( खि. पू. १५०—खि. पू. १४६ ) वीस मैल घेराचें कार्थेज शहर पडलें. या शहराभोंवतीं तीन तट होते. सर्वांत बाहेरचा तट साडेसहा फूट जाड असून सर्वच ४५ फूट उंच होते. आंत सहा सहा मजल्यांचीं घरें होतीं. शहर काबीज केल्यावर रोमन् लोकांनीं शहरास आग लावली. सहा दिवस अहोरात्र आगीचा भडाका चालू होता. शेवटीं कार्थेजिनियन् सेनापति हस्ड्रुबाल् ( Hasdrubal ) प्रतिपक्षाच्या प्रमुख सेनापतीस ( Scipio ) एकटाच शरण गेला. त्यामुळें त्याच्या नऊशें अनुयायांस चीड येऊन ज्या देवळांत ते टिकाव धरून होते त्यासच त्यांनीं निराशेनें आग लावली. हस्ड्रुबालच्या पत्नीलाहि भ्रताऱ्याच्या भ्याडपणाची चीड येऊन तिनें त्याची तीव्र निर्भर्त्सना करून मुलांसह आगींत उडी घातली. नऊशें अनुयायांपैकीं पुष्कळ जळून मेले. थोडे सांपडले त्यांस शत्रूंनीं हत्तींच्या पायीं देऊन ठार मारलें. प्रत्येक घर, तट वगैरे जमीनदोस्त करण्यांत आलें. सात शतकें उज्ज्वल भाग्य लाभलेल्या कार्थेजच्या कपाळीं अखेर हे सोहाळे लिहिले होते ! 'सम्पादक'

‡ रोम्यूलसनें ( Romulus ) खि. पू. ७५२ मध्यें ( Tiber ) टायबर् नदीच्या डाव्या तीरावर चौकोनी आकाराचें व भोंवतीं तट असलेलें रोम शहर वसविलें. गॉल् ( Gauls ) लोकांनीं खि.पू. ३९० सालीं लुटून त्याचा पूर्ण विध्वंस केलाच होता. पण ऑगस्टसनें फिरून नवी रचना केली. तरीहि दुर्दैवानें नीरोच्या कारकिर्दीत ( इ. स. ६४ ) आग लागून दोन तृतीयांश शहर अग्निमुखीं पडलें. पण त्यानें अधिक डौलदार इमारती उभारल्या. इ. स. ४५५ सालीं मॅक्झिमसच्या तीन महिन्यांच्या कारकिर्दीत Vandal लोकांनीं इटलीवर स्वारी करून रोम लुटलें. चवथ्या मिकोलसच्या मृत्यूनंतर आलेल्या अराजक बेबंदशाहीच्या सहा महिन्यांच्या काळांत जी बादवी माजली तींत रोमच्या भवितव्य पुनः नासधूस झालीच. 'सम्पादक'

खोल जर विचार केला तर कोणाच्याही ध्यानांत येईल कीं वरील महापंडित हा लोक सोडून गेल्यास जरी आज दोन हजार वर्षें होऊन गेलीं, व कार्थेजचें युद्धही जरी केवळ मर्मकथाच होऊन बसलें आहे तरी दोहोंच्या वृत्तांतापासून होणारा जो वास्तविक उपयोग तो इतक्या काळानेंही लवमात्र सुद्धां कमी झाला नाहीं. कोट्यवधि योजनें दूर असणारे जे तारागण त्यांचा स्वयंभू प्रकाश जसा इतक्या अगणित अंतरावरूनही आपणांकडे सतत पोंचून जगाच्या आरंभापासून मार्गदर्शक होत आला आहे त्याप्रमाणेंच आजपर्यंत सान्या देशांत ज्या ज्या ईश्वराच्या विभूति वेळोवेळां प्रगट होऊन पुन: निजधामास गेल्या त्यांचें चारित्रही लोकांस उन्नतिप्रदच होत गेलें आहे. वरील चरित्र व वरील इतिहास वाचून थोरो-दात्त पुरुषांचा महिमा कोणाच्या हृदयावर ठसत नाहीं, व कोणाच्या मनास सदाचरणा-विषयीं, स्वदेशप्रीतीविषयीं स्फुरण होत नाहीं ! तर याप्रमाणें जे म्लवृत्तांत अतज्ज्ञ जनांस बाह्यत: केवळ नीरस वाटतात त्यांच्या आंत नारिकेलपाकन्यायानें अत्यंत आल्हाद्कारक व उत्साहप्रद असा रससंचय असतो ।[1]

---

१. थोर पुरुषांच्या चरित्रानें उन्नत झालेल्या स्थलांचें दर्शन घडलें असतां सहृदय प्रेक्षकांची चित्तवृत्ति कशी होते हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. जॉन्सन् व बॉस्वेल् यांनी मिळून स्कॉट्लंड् देशाच्या पश्चिम भागावर सफर केली हें मागें (अंक ३७ कलम ४) सांगण्यांत आलेंच आहे. याच प्रवासांत ऐओना‡ नांवाच्या एका बेटावर गुरुशिष्य उतरले असतां त्या स्थलाचें वर्णन जॉन्सन् नें पुढें येणेंप्रमाणें लिहून ठेवलें:—

"We were now treading that illustrious island which was once the luminary of the Caledonian regions,§ whence savage clans and roving barbarians derived the benefits of knowledge and the blessings of religion. To abstract the mind from all local emotion would be impossible if it were endeavoured, and would be foolish if it were possible. Whatever withdraws us from the power of our senses, whatever makes the past, the distant, or the future predominate over the present, advances us in the dignity of thinking beings. Far from me and my friends be such frigid philosophy as may conduct us indifferent and unmoved over any ground which has been dignified by wisdom, bravery, or virtue. That man is little to be envied whose patriotism would not gain force on the planes of Marathon†, or whose piety would not grow warmer among the ruins of Iona* ! "

*Journey to the Hebrides.*

‡ स्कॉट्लंडांतील राजांचें प्राचीन कबरस्थान. 'सम्पादक'

§ Caledonian Canal—from Moray Firth to Loch Linne, in scotland, 62½ miles long, was opened in 1822. *'Editor*

† ग्रीसमध्यें ॲटिका प्रांतांत ॲथेन्सच्या ईशान्येस अठरा मैलांवर; येथें Miltiades नें इराणी सैन्यावर प्रचंड-जय मिळविला (खि. पू. ४९०). 'सम्पादक'

* Ancient burial place of Scottish kings. *'Editor'*

पण हें केवळ सामान्यत: झालें. कोणत्याही देशाच्या इतिहासाच्या वाचनापासून कोणता लाभ आहे हें वर सांगितलें. मग यावरून आपला जिशीं अत्यंत निकट संबंध, जिचें वैभव तें आपलें वैभव, जिचें दूषण तें आपलें दूषण, जिची आपणांस सर्वांत अधिक माहिती, जी आपलें जन्मस्थान, त्या भूमीचा वृत्तांत समजल्यापासून तर किती फायदा आहे हें काय सांगावें! इतर देशांचा इतिहास व आपल्या देशाचा इतिहास या दोहों-मधील भेद झटला झणजे अंतरालांतील अवघ्या इतर तारागणांत व आपापल्या§ ग्रहमालेचा जो अधिपति¶ त्यांत जितका आहे तितका होय. समजा कीं, आपण वसंत ऋतूंतल्या एकाद्या निरभ्र रात्रीं गच्चीवर हवा खात बसलों असतां एकाएकीं आपल्या असें नजरेस आलें कीं, दहा पांच तारे आपण पाहतां पाहतां अकस्मात् जागच्या जागीं गडप झाले, तर त्याबद्दल आपणांस काय वाटणार आहे! त्यांचें व आपलें अंतर कोट्यानूकोटी कोस असल्यामुळें त्यांचा आपला कांहींच संबंध नाहीं. तेव्हां वरील प्रलयापासून फार झालें तर येवढेंच होईल, कीं त्या तेजोमय गोलांवर व त्यांच्या आकर्षणांत असलेल्या इतरांवर जर प्राण्यांची वस्ती असेल तर त्यांचा निःपात झाल्याबद्दल आपणांस क्षणमात्र विषाद वाटेल. तसेंच वरील नष्ट झालेल्या ताऱ्यांत व्याध,* अगस्त्य ‖ यांच्यासारखे कांही असले तर आकाशाची शोभा कमी झाल्याबद्दल आकाशप्रेक्षकांस वाईट वाटेल, व ज्योतिष्यांस आपले नकाशे नीट करावे लागतील. पण याच्या पलीकडे या गोलावरील लोकांस वरील प्रलयापासून दुसरी कोणतीही बाधा पोंचणार नाहीं. पण तोच प्रसंग आमच्या सूर्यावर येऊं द्या; म्हणजे एका सूर्याबरोबर प्रकाश गेला, उष्णता गेली, पर्जन्य गेला, धान्यें गेलीं, सर्व कांहीं नाहींसें झालें! तर देशांतराच्या इतिहासांत व स्वदेशाच्या इतिहासांत इतका फेर आहे. पाहा कीं, रोम व कार्थेज यांच्या युद्धांत सोफोनिस्बा† नांवाच्या सरदारकन्येची गोष्ट आहे, आणि इकडे

---

§ 'आपापल्या' या शब्दाऐवजीं 'आपल्या' असा शब्द पाहिजे. 'सम्पादक'

¶ सूर्य. 'सम्पादक'

* ऐतरेय ब्राह्मण १३, ९ मध्यें व्याध–मृग–रोहिणी यांची एक चमत्कारिक कथा आहे तिचा सारांश असाः—'प्रजापतीनें आपली कन्या द्यु (कित्येकांच्या मतें उषा) हिचा अभिलाष केला. ती रोहित (हरिणी) झाली. हा ऋश्य हरिण होऊन तिच्यापाशीं गेला. हें त्याचें अकृत देवांनीं पाहिलें. पण त्याला शासन करण्याचें कोणाहि एकट्याच्या अंगीं सामर्थ्य नसल्यानें सर्वांनीं शरीरें एकत्र करून भूतवत् ऊर्फ पशुमान् यास त्यांनीं उत्पन्न केलें. व त्यानें ऋश्याला विद्ध केलें. विद्ध झाला तो वर गेला त्याचें नांव मृग, रोहित झाली ती रोहिणी, व विद्ध करणारा तो (मृग–)व्याध. रोहिणीमागें मृग, व मृगामागें व्याध लागला आहे असें आकाशांत दिसतें. 'सम्पादक'

‖ दक्षिण गोलार्धांतील नक्षत्र. साधारणपणें भाद्रपद संपतां संपतां या ताऱ्याचा उदय होतो. हा शरदृतुसूचक असून याच्या उदयानंतर समुद्र शांत होतो, वादळें नाहींशीं होतात व पृथ्वीवरील प्रत्येक सृष्टपदार्थ प्रसन्न स्वरूप धारण करतो. 'सम्पादक'

† Sophonisba ही कार्थेजिनिअन् सेनापति हस्द्रूबाल् (Hasdrubal) याची मुलगी. हस्द्रूबालनें तिच्या अगदीं बाळपणीं तिचा वाङ्निश्चय पूर्व न्यूमिडिआ (Numidia)-चा राज-

[पुढें चालू]

भीमसिंगाची बेटी कृष्णाकुमारी‡ हिचा वृत्तांत आहे; तिकडे सीजराचा$ वध आहे, इकडेही

पुत्र मॅसिनिसा (Masinissa) याशीं केला. दुसऱ्या प्यूनिक् युद्धांत पश्चिम न्यूमिडिआचा राजा सायूफॅक्स् (Syphax) याला आपल्या बाजूस ओढण्याकरितां रोमन् सेनापति सिपिओ (Scipio) आणि हस्द्रुबाल हे दोघेहि प्रतिस्पर्धी गेले. पण सिपिओच्या दाक्षिण्यापेक्षां हस्द्रुबालच्या मुलीच्या सौंदर्यावरच सायूफॅक्सचें मन अधिक खिळलें. सोफोनिस्बा लग्नेच त्यास देऊन टाकण्यांत आली. पुढें झालेल्या युद्धांत मॅसिनिसाच्या मदतीनें सिपिओनें सॉयूफॅक्सचा पराजय केला. सिर्टा राजधानी काबीज केल्यावर सोफॉनिस्बा मॅसिनिसाच्या हातीं लागली. तिच्या लावण्यानें तो वेडावून गेला. व ती आपली वाग्दत्त पत्नी होती हें स्मरतांच त्यानें तिजशीं तावडतोब विवाह केला. पण सिपिओनें त्याची याबद्दल निर्भर्त्सना करून सोफॉनिस्बा ही युद्धांतली कैदी असल्यानें तिला आपल्या स्वाधीन करण्याचा हुकूम केला. तिचा अपमान होऊं नये म्हणून व सिपिओशीं अडदांडपणा करणें अशक्य असल्यानें सायूफॅक्सनें तिजकडे विषाचा प्याला पाठविला व तिनेंहि तो तावडतोब पिऊन टाकला.

'सम्पादक'

‡ कृष्णाकुमारी—हें 'राजस्थानसरोवरास शोभविणारें मृदुमृदुल कमल' इ. स. १७९२ सालीं मेवाडाधिप उदेपुरचा महाराणा भीमसिंह याच्या वंशांत निर्माण झालें. ही मुलगी मारवाडचा राणा भीमसिंह यास द्यावी असें तिच्या पित्यानें ठरविलें. पण दुर्दैवानें मारवाडचा राणा वारला. जयपूरचा राणा जयसिंह याची मागणी पुढें मान्य करण्यांत आली. पण मृत राण्याच्या मानसिंह नामक भावानें 'मला मुलगी द्या, नाहींतर युद्धास तयार व्हा' असा निरोप पाठविला. ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारनींहि मानसिंहाचा पक्ष घेतला, कारण त्यांचें जयपूरवाल्यांशीं वितुष्ट होतें. भीमसिंहानें प्रथम दाद दिली नाहीं. पण शिंद्यांच्या सैन्याचे डेरे पाहिल्यावर भीमसिंहानें तह केला. अर्थात् जयसिंहाची निराशा झाली. त्यानें सैन्य तयार केलें. त्याची मानसिंहाशीं भीषण लढाई झाली. मानसिंहाचा पराभव झाला. पण जयसिंहाचेंहि फार सैन्य नष्ट झालें. फिरून दोघांनींहि सैन्य जमवून उदेपुरावर चाल केली. त्यावर तिच्या पित्यास मोठा पेंच पडला. मुलीच्या सौंदर्याच्या पायीं राज्याची राखरांगोळी मानसिंह—जयसिंह यांच्या साटमारींत होऊं नये म्हणून या लावण्यलतिकेलाच नष्ट करण्याचें तिच्या पित्यानें ठरवून विषाचा पेला तिजकडे पाठविला. तिनें तो लीलेनें प्राशन केला. दुसरा पाठविला तोहि खलास झाला. अखेर तिसरा प्याला प्राशन केल्यावर कृष्णाकुमारीची कोमल काया करपून पतन पावली. 'क्षत्रिय-कन्या मृत्यूला भीत नसतात. शरीर नाशवंत असून मरण्याकरतांच जन्म घेतें. मग वृथा शोक कां?' अशी आपल्या आक्रोशणाऱ्या आईची समजूत करून, परमेश्वरापाशीं पित्याला दीर्घायुष्य मागून, राज्याच्या उत्कर्षाआड येणाऱ्या आपल्या लावण्यसंपन्न कायेचा बळी देण्यास तयार होणारी बाला कृष्णाकुमारी सोफॉनिस्बापेक्षां अधिक उज्ज्वल चारित्र्याची नव्हे काय?

'सम्पादक'

$ सीजराचा वध:—ज्यूलिअस् सीजर् [ जन्म, जुलै १२ खि. पू. १००; वध मार्च १५, (Ides of March) खि. पू. ४४. ] हा विख्यात रोमन् सेनापति व वक्ता होता. सतराव्या वर्षी याचें लग्न सिन्नाची (Cinna) कन्या कॉर्नेलिया (Cornelia) हिशीं झालें. डिक्टेटर् सला (Sulla) याच्याकडून कॉर्नेलिआचा खून करण्याबद्दल आलेला हुकूम न मानल्यामुळें पळून जाणें यास भाग पडलें. सलाच्या पश्चात् परत आल्यावर वयाच्या बाविसाव्या वर्षी यानें वक्तृत्वनैपुण्याबद्दल ख्याति मिळविली. लोकप्रीत्यर्थ केलेल्या आत्यंतिक दानधर्मामुळें लवकरच खासगी इस्टेट संपून यास कर्ज झालें. लोकप्रीतिसंपादनामुळें क्रमानें (Questor) क्वेस्टर, (Praetor) प्रेटर्, (Consul) कॉन्सल् असा

[ पुढें चालू ]

नारायणराव* पेशव्यास मारेकऱ्यांनीं मारला आहे; तिकडे नेपोलियन् बादशाहाची जंगी

---

चढत्या मानाच्या जागा मिळवून पाँपे व क्रॅसस् यांसह यानें पहिलें ट्रायम्वीरेट् ( Triumvirate ) ऊर्फ राज्याधिकाऱ्यांचें त्रिकूट बनविलें. हाच त्यांतील प्रमुख होता. पाँपेला दिलेली सीजर्‌ची बहीण ज्यूलिया हिच्या मृत्यूमुळें सीजर्-पाँपे यांच्यामधील स्नेहभावाच्या सांखळीचा दुवा तुटला. सीजर्‌ला गॉल्‌मध्यें विजय मिळाल्यावर तर सरदार-पक्षास मिळून संस्थानांतील प्रमुख होण्याच्या खटपटीस पाँपे लागला व त्यानें सेनेटकडून 'सीजर्‌नें फौजेस रजा न दिल्यास त्यास देश-शत्रु मानावें' असा ठराव करून घेतला. सीजर्‌नें तो धाब्यावर बसविला व सैन्य कायम ठेवून पाँपेचा पराजय केला. पाँपेचेंच सैन्य येन लढाईंत बैठेस सीजर्‌ला मिळालें व पाँपेला पळ काढावा लागला. अशा रीतीनें विजयमालिका मिळवून व सर्व शत्रूंचा निःपात करून सीजर् रोमन् साम्राज्याचा प्रभु झाला. तरीहि उन्मत्त न होतां सर्व शत्रूंना त्यानें माफी दिली. ल्युपर्केलिया ( Lupercalia )च्या उत्सवांत त्यास देण्यांत आलेला मुकुट थोडेंसें प्रतिकूल लोकमत दिसून आल्यामुळें त्यानें नाकारला. या उत्कर्षाबरोबरच मत्सराचा सरदारांच्या मनांत प्रवेश होऊन त्यांनीं सीजर्‌चा खून करण्याचा कट कॅसियस्‌च्या प्रमुखत्वाखालीं केला. कटवाल्या साठांपैकीं बहुतेक सर्व सीजर्‌चे स्नेही व त्याच्या कृपेमुळेंच उत्कर्ष पावलेले लोक होते. कटवाल्यांनीं हल्ला केला; कॅस्कानें पहिला वार केला; सीजर्‌नेंहि स्वसंरक्षणार्थ तरवार उपसली. पण कटवाल्यांत आपला प्रियतम स्नेही ब्रूटस् नंगी तरवार घेऊन उभा आहे हें पाहतांच सीजर्‌नें तोंड झग्यानें झांकून घेतलें व 'Tu quoque, Brute!' ( तूं सुद्धां आहेस, ब्रूटस्! ) असे उद्गार काढले. पाँपेच्या पुतळ्याच्या पायीं सीजर् जखमी होऊन मरून पडला. ब्रटस् व कॅसियस् यांनीं प्रजासत्ताक राज्य स्थापण्याच्या पवित्र हेतूनें महत्त्वाकांक्षी सीजर्‌चा खून केला असें त्याचे पक्षपाती म्हणतात, पण त्यांत फारसा अर्थ नाहीं. 'सम्पादक'

* नारायणरावाचा खून ( इ. स. १७७३ ):—मराठी साम्राज्याचा भाग्यसूर्य मध्यान्हीं येतो न येतो तोंच पेशवे थोरले माधवराव वारले ( सन १७७२ ). त्यांच्यामागून गादीवर आलेल्या अल्प-वयस्क नारायणरावानें कारस्थानी सखारामबापूचें मन दुखविलें. नागपूरच्या निपुत्रिक जानोजी भोसल्यानें मरणापूर्वीं राघोबाच्या पक्षाचा आपला भाऊ मुधोजी याच्या रघूजी नामक मुलास दत्तक घेतलें होतें. पण नारायणरावानें मुधोजीचा भाऊ साबाजी हा आपल्या पक्षाचा असल्यानें त्यास जहागीर दिली. शिवाय गादीवर येतांच नारायणरावानें फंदफितुरीच्या संशयानें राघोबादादासहि कैदेंत टाकलें होतेंच. अशा अनेक कारणांनीं नाखुष झालेल्या या लोकांनीं गुप्त कट केला. खरकसिंग, सुमेरसिंग, व महंमद इसफ या तिघां जमादार गारद्यांस पांच लाख रुपये देऊं करून 'नारायणरावास धरावें' असा राघोबाच्या सहीचा हुकूम देण्यांत आला. पण राघोबाची महत्त्वाकांक्षी बायको आनंदीबाई व तिचा खिजमतगार तुळ्या पवार यांनीं एक घोटाळा करून हुकुमांतील 'ध' चा 'मा' केला. तिनें गारद्यांस आणखी लांच देऊं करून त्यांजकडून येकभंडारहि उचलून घेतला. भाद्रपद शु. त्रयोदशी शके १६९५ ( ता. ३० आगस्ट ) रोजीं शनवारवाड्यांत येऊन गारदी पगार मागूं लागले. नारायणरावानें दोनप्रहरीं दरबारांत येण्यास सांगितलें पण तें न ऐकतां गारदी लगट करूं लागले. नारायणरावानें पळून जाऊन राघोबाच्या कमरेस मिठी घातली व तो प्राणदानाची याचना करूं लागला. राघोबानें मारूं नका म्हणून सांगितलें तेव्हां त्याच्यावरहि वार केला. हाताला व कपाळाला जखम होतांच राघोबानें नारायणरावास सोडलें; तोंच तुळ्या पवारानें पाय ओढून त्यास खालीं पाडलें. तेव्हां स्वामिनिष्ठ खिजमतगार चापाजी टिळेकर नारायणरावाच्या अंगावर पडून त्याला न मारण्याबद्दल गारद्यांस विनवूं लागला; तेव्हां गारद्यांनीं दोघांसहि यमसदनास पाठविलें.

'सम्पादक'

स्वारी* रशियाची खोड मोडून सगळें युरोपचें राज्य एकछत्री करण्याकरतां निघाली आहे; इकडे शिवाजीनें शंभर वर्षांपूर्वी सुरू केलेल्या मंदिरावर कळस बसवण्याकरतां भाऊसाहेबांचा जरीपटका§ असंख्य महाराष्ट्र-वीरांनी वेढलेला हातसाता दिल्लीपदावर निघाला

* नेपोलिअन्‌ची रशियावर स्वारी (१८१२):—जिकडे तिकडे विजयी झालेल्या नेपोलिअन्‌नें रशियन् राजकन्येबद्दल घातलेली मागणी कबूल करूनहि रशियाचा बादशहा अलेक्झांडर् हा चुकवा-चुकव व चालढकल करूं लागल्यानें नेपोलिअन् अलेक्झांडर्‌वर रागावला होताच. दोघांमधील हें वितुष्ट वाढतच चालल्यामुळें नेपोलिअन्‌नें ऑस्ट्रियाला नामशेष न करतां त्याशीं सख्य करून ऑस्ट्रियाची राजकन्या मेरिया लुइसी हिशीं विवाह केला (१८१०); हेतु हा कीं रशियाविरुद्ध लढण्याची वेळ आल्यास ऑस्ट्रियाचा उपयोग व्हावा. १८१० सालीं त्यानें ओल्डेन्‌बर्ग् हें संस्थान खालसा केलें. येथील राजा अलेक्झांडर्‌चा आप्त होता. पश्चिम गॅलिशिया प्रांतहि खालसा करून नेपोलिअन्‌नें वॉर्सॉच्या राजास दिला, त्यामुळें रागावून ३१ डिसेंबर १८१० रोजीं नेपोलिअन्-विरुद्ध धोरणाचा जाहीरनामा अलेक्झांडर्‌नें काढला. तेव्हां नेपोलिअन्‌नें रशियाची खोड मोडण्या-साठीं सुमारें पांच लाख सैन्य जमा केलें. या सैन्यांत त्याच्या प्रचंड साम्राज्यांतील प्रत्येक राष्ट्राचे लोक होते. नेपोलिअन् प्रथम सारखे विजय मिळवीत रशियाची राजधानी मॉस्को येथपर्यंत जाऊन थडकला. पण आतांपर्यंत माघार घेणाऱ्या रशियन् सैन्यानें मॉस्कोला आग लावून तें उध्वस्त करून सोडलें. रशियाच्या तीव्र थंडींत उपयोगीं पडणारें निवाऱ्याचें स्थान जें मॉस्को शहर तें अशा रीतीनें उजाड झाल्यामुळें नेपोलिअन्‌नें आपलें सैन्य मागें परतविलें. बर्फ आणि कोसॅक् स्वारांच्या छोट्या छोट्या टोळ्यांकडून अडचणींत गांठून होणारे हल्ले अशा दुहेरी माऱ्यांत नेपोलिअन्‌च्या प्रचंड सैन्याची वाताहत झाली. येथेंच नेपोलिअन्‌च्या सद्दीची परमावधि झाली असून तिला उतरती कलाटणी मिळाली हें ओळखून युरोपियन् राष्ट्रांतील देशाभिमानी मुत्सद्दी या संधीचा फायदा करून घेण्यासाठीं आपापल्या राष्ट्रांतील लोकांस नेपोलिअन्‌विरुद्ध उद्युक्त करूं लागले. प्रशियानें पुढाकार घेतला. नेपोलिअन्‌चें दैव उलटून अखेर त्याला सेंट् हेलेना बेटांत हद्दपार करण्यांत आलें, व तेथेंच त्याचा सहा वर्षांनीं १८२१ मध्यें अंत झाला. 'सम्पादक'

§ भाऊसाहेबांचा जरीपटका दिल्लीवर निघाला आहे—अहमदशहा अबदालीच्या पहिल्या स्वारीच्या वेळीं (१७५६-१७५७) राघोबानें लाहोरवर स्वारी केली, मराठ्यांचा भगवा झेंडा हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर फडकला आणि मराठी घोडे अटक नदीचें पाणी प्याले. काबूल, कंदाहारहि जिंकण्याचा राघोबाचा बेत होता. पण पावसाळा जवळ आला आणि पेशव्यांकडून दक्षिणेंत परत येण्याबद्दल पत्रें आल्यामुळें, राघोबा परत गेला. पुढें १७५९ सालीं अबदालीनें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली व शिंद्याचा पराभव केला (१७६०). तेव्हां पुण्याहून सदाशिवराव भाऊ यांस बाळाजी बाजीराव पेशव्यांनीं पाठविलें. भाऊसाहेब मथुरेस आल्यावर त्यांनीं बळवंतराव मेहेंदळे व शिंदे-होळकर यांस दिल्ली घेण्यासाठीं पुढें पाठविलें. त्याप्रमाणें दिल्ली काबीज झाली व सदाशिवराव भाऊ आल्यावर श्रावण शुद्ध पंचमी शके १६८२ रोजीं दिल्लीचा किल्लाहि मराठ्यांच्या हातीं आला. भाऊसाहेबांनीं दिल्लीच्या 'दिवाण इ आम' राजवाड्यांतील छत काढलें. त्याची किंमत तीन लाख रुपये भरली. हा काळ मराठेशाहीच्या भाग्योदयाच्या परमावधीचा होता. व येथूनच त्याला उतरती कळा लागण्यास प्रारंभ झाला. पहिला तडाखा म्हणजे पुढील सालीं झालेला पानि-पतचा पराजय! 'सम्पादक'

आहे; तिकडे ऑगस्टस् § बादशाहा रोमक्ष पत्तनाच्या सिंहासनावर बसून व्हर्जिल् ‡ हॉरेस* यांच्या वाग्विसरांत आनंदभरानें वाहवत आहे, इकडे शकांचा आपल्या प्रतापकिरणांनीं विध्वंस करून विराजमान झालेला जो विक्रमादित्य † तो कालिदासप्रभृति * कविवरांचा प्रत्यक्ष

---

§ ऑगस्टस् बादशाहा—मूळ नांव Caius Octavianus. बापाचें नांव Caius Octavius; आईचें Atia, ज्यूलियस् सीजर्‌ची बहीण; याचा जन्म खि. पू. ६३ सालीं २३ सप्टेंबर रोजीं झाला. हा पहिला रोमन् बादशाहा होय. रोमन् लोक व सेनेट् यांनीं ऑगस्टस् ही पदवी त्याला खि. पू. २७ सालीं दिली. तो ॲपोलोनिआ (Apollonia) येथें विद्याभ्यास करीत असतां चुलता ज्यूलियस् सीजर् याचा खि. पू. ४४ मार्च मध्यें खून झाल्याचें कळतांच इटलींत गेला. सैन्यानें त्याचें स्वागत केलें. प्रजासत्तावादी (Republican) पक्षाला मिळून ॲंटनीचा प्रथम पराभव करून रोमला आल्यावर हा कौन्सल् निवडून आला. ॲंटनीशीं लवकरच तह होऊन, ऑगस्टस्, ॲंटनी व लेपिडस् असे तिघे पांच वर्षेंपर्यंत रोमन् साम्राज्याचे मालक झाले. आपले शत्रु म्हणून यांनीं सुमारें अडीच हजार लोक ठार मारले व त्यांची इस्टेट जप्त केली. यांतच पांचशें सेनेटचे सभासद आणि सुप्रसिद्ध सिसरो यांचेहि बळी पडले. ॲंटनीला ऑगस्टस्नें आपली बहीण दिली. पण त्याचें मन क्लिओपाट्राकडे आकृष्ट झाल्यामुळें ऑगस्टस्ची बहीण ऑक्टेव्हिआ हिला त्यानें टाकलें. आपल्या अरेरावी वर्तनानें ॲंटनी रोमन् लोकांस अप्रिय झाला होताच. सेनेटनें क्लिओपाट्राविरुद्ध युद्ध पुकारलें. खि. पू. ३१ मध्यें ॲंटनीला ऑगस्टस्नें पळवून लावलें. पुढल्या वर्षी ॲंटनी व क्लिओपाट्रा यांनीं आत्महत्या केली. व ऑगस्टस् एकटा रोमन् साम्राज्याचा मालक झाला. हा ४५ वर्षे शांततेनें राज्य करून २९ आगस्ट १४ इसवी रोजीं वारला. सुप्रसिद्ध होरेस (Horace) व व्हर्जिल् (Virgil) या महाकवींना याचा आश्रय असे. 'सम्पादक'

‡ व्हर्जिल्—(खि. पू. ७०-खि. पू. १९) सैन्यानें याची जमीन बळकावल्यामुळें दाद मागण्यासाठीं हा तेराव्या वर्षी रोमला गेला. तेथें काम झाल्यावर यानें Ecloges लिहिलें. त्रेचाळिसाव्या वर्षी Georgics लिहिलें. व नंतर Æneid नामक द्वादश खंडात्मक महाकाव्य लिहिण्यास सुरुवात केली. ट्रॉय् शहराच्या नाशानंतर देशोधडीला लागलेल्या Æneas ची कहाणी या काव्यांत वर्णिली आहे. आपल्या उत्तर आयुष्यांत या कवीनें रोम येथें खूप पैसा मिळविला.

'सम्पादक'

*. होरेस (Horace) चें नांव Flaccus Quintus Horatius. (खि. पू. ६५-खि. पू. ८) व्हर्जिल्‌चा स्नेही. प्रख्यात रोमन् कवि. औपरोधिक फटके लिहिण्यांत याचा हातखंडा असे. विचार-सौंदर्य व मनोहारि विनोदलेखन हे याच्या काव्याचे विशेष होत. 'Satires,' 'Epodes' व 'Odes' यांमुळें याची कीर्ति अजरामर झाली आहे. 'सम्पादक'

† विक्रमादित्य—(इ. स. ३७५-४१३) इ. सनाच्या प्रारंभापासून नष्ट झालेलें गुप्तवंशाचें वर्चस्व चवथ्या शतकांत पुनः स्थापन झालें, इ. स. ३२०-४८० पर्यंत राज्य करणाऱ्या समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, कुमारगुप्त व स्कंदगुप्त या चार पराक्रमी राजांनीं नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व हिंदुस्थानभर एकछत्री राज्य स्थापलें. चंद्रगुप्तानें विक्रमादित्य ही पदवी धारण करून अयोध्येस राजधानी नेली. 'संवत्' सुरू करणारा उज्जनीचा विक्रमादित्य आंध्रांची सत्ता जोरांत असतां खि. पू. ५८-५७ च्या सुमारास होऊन गेला. हा कोठल्या वंशाचा हें खात्रीलायक समजण्याइतका इतिहास अद्यापि उपलब्ध नाहीं. तथापि यानें शकांचा पराजय केला. दुसऱ्या चंद्रगुप्तानेंहि माळवा,

(पुढें चालू. कालिदासप्रभृति* ही टीप पुढील पानावर)

वाग्देवीच्या वीणावादनपर हस्तास व नेत्रकमलांसही स्तिमित करणारा जो बीणारव त्यास लुब्ध होऊन ऐकत आहे ! वस्तुतः पाहतां वरील दोन्ही वृत्तांत हे समसमान आहेत. पण दोहोंचें एतद्देशीयांच्या मनावर कार्य किती भिन्न होतें ! दोन्ही गतवृत्तांत असतां दुसरे स्वदेशांत घडले असल्यामुळें त्यांची जणों काय प्रत्यक्षता आपणांस भासते. सारांश, अगस्त्याच्या किंवा व्यासाच्या प्रकाशांत आणि उन्हांत किंवा चांदण्यांत जितपत अंतर तितपतच द्वीपांतरींच्या इतिहासांत व स्वदेशाच्या इतिहासांत होय !

मग असला इतिहास जर नष्ट झाला, तर त्यापरती देशाची हानि कोणती ! आमच्या पूर्वजांनी गेल्या शेंदीनशें वर्षांत येवढाले दिग्विजय गाजवून भारतवर्षाच्या पूर्वीपार चालत आलेल्या कीर्तीत येवढी जी भर घातली, व शेकडों स्थलांचा महिमा चिरकाळ राहीसा करून टाकला, तें सर्व आमच्या मूर्खपणानें व हयगयीनें जर होऊन न झाल्यासारखेंच झालें तर केवढी शोचनीय गोष्ट होय ! युरोपांतल्या देशांत एकंदर देशाच्या इतिहासाविषयीं तर राहोच, पण प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, शहरांचीं वर्णनें, धर्म, कलाकौशल्य, ग्रंथसंग्रह, इत्यादिकांचा इतिहास यांविषयींही लोकांस जिज्ञासा असून ती तृप्त करणारास हवा तितका लोकाश्रय मिळतो. पण इकडे कशी बहार आहे पाहा ! ' विद्यामृता ' चा, ' देशसुधारणे ' चा व ' आर्यजननी ' चा आज कित्येक वर्षें चोहोंकडे घोष चालून त्यानें दाही दिशा घुमूं लागल्या असतां ' आर्यजननी ' चा स्वतंत्र इतिहास तर लांबच, पण त्याचा नुसता पाया ज्या जुन्या बखरी त्यांसही आश्रय मिळतांना जेमतेम पडते; कवींचीं चरित्रें व त्यांच्या गुणदोषांचें विवरण हें तर दूरच, पण अगोदर त्यांचीं काव्येंही आमच्या देशबंधूंस आश्चर्य वाटत नाहींत ! एकंदरींत सध्यांची आमची स्थिति किती विलक्षण तऱ्हेची आहे पाहा ! नूतन विद्येनें आमची नजर सगळ्या भूमंडळावर फांकली असून कामस्काटका कोठें आहे, टिंबक्टू शहराची वस्ती किती आहे, माजिलनची सामुद्रधुनी कोणी शोधून काढली; वगैरे खडाम् खडा आह्मांस पुसून घ्या; पण वस्तीच्या ठिकाणाहून दहा वीस कोसांवर नेऊन सोडलेंत तर परत आपल्या जागीं येण्याची आह्मांस मारामार पडेल ! आपल्या आजापणजांचें नांव वेळेनुसार आठवायाचें नाहीं, रामायणांतील महाभारतांतील अति प्रसिद्ध कथा किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील ठळक ठळक गोष्टीही माहीत नसतील; पण ग्रीस व रोमच्या इतिहासांतील शक विचारा, किंवा इंग्लंडची वंशावळ म्हणायाला सांगा, म्हणजे विल्यम्‡

---

गुजराथ, सुराष्ट्र ( उर्फ काठेवाड ) हे फार शतकें परकी शक राजांच्या अमलाखालीं असलेले प्रांत जिंकले. 'सम्पादक'

* कालिदासप्रभृति—विक्रमादित्याच्या दरबारीं नऊ विद्वद्रत्नें होतीं अशी आख्यायिका आहे. त्यांचीं नांवें:—

(१) कालिदास महाकवि (२) अमरसिंह कोशकर्ता (३) ब्रह्मगुप्त ज्योतिषी (४) धन्वंतरी वैद्य (५) वररुचि वैयाकरण (६) क्षपणक फलज्योतिषी (७) वराहमिहिर गणिती (८) शंकु शिल्पकार (९) वेतालभट्ट मांत्रिक; पण हीं नांवें समकालीन पुरुषांचीं नसल्यामुळें मागाहून जुळविण्यांत आलीं असावीं. 'सम्पादक'

‡ इंग्लंडचा पहिला वुइल्यम् ( William I ) राजा. हा मूळचा नॉर्मंडी परगण्याचा ड्यूक.

राजापासून तों तहत केसर् इ हिंद्पर्यंत || तळक आपणाही ! मोरोपंताची साधान्य आर्या लागण्याची नाहीं; तुकारामाचें साधारण अवतरण कळांत याक्याचें नाहीं, पण इंग्रेजी कवितेंतलीं काय ती सर्व माहिती ! याप्रमाणेंच धर्मांचीही गोष्ट. आतां कोणतेंही ज्ञान संपादन केलें तरी तें प्रशस्तच होय हें खरें; पण आपल्या घरच्या गोष्टींची गैरमाहिती असून माहिती काय ती हजारों कोसांवरच्या मुलखांची हें हास्यपद होय यांत संशय नाहीं, शिवाय जे आपल्या घराची दुरुस्ती करणार व खास सुधारणेची कळा आणणार त्यांस तर वरच्यासारखा विद्याव्यासंगी अंधेर अगदींच उपयोगी नाहीं. तर मॉरिस् साहेब सांगतील तो आमचा इतिहास, मेकॉलेबीवा सांगतील ती आमची नीति, डॉ॰ विल्सन् सांगतील तो धर्म, ही लज्जास्पद स्थिति आजपर्यंत जी चालत आली तीच पुढें चालू नसावी असें ज्यांच्या मनांत असेल त्यांनीं ह्या प्राचीन विद्येच्या उज्जीवनार्थ जे प्रकृत पुस्तकासारखे उद्योग आमच्या कांहीं देशबंधूंनीं हातीं धरले आहेत त्यांचा चांगला पुरस्कार करणें अत्यंत आवश्यक होय.

५. दुसरें सदर महाराष्ट्र-कविता. याकरही पुष्कळांचे, व विशेषतः विद्वान् म्हणवणारांचे, कित्येक आक्षेप आहेत. यांपैकीं कांहींविषयीं यापूर्वी प्रसंगोपात्त विवेचन केलेलें आहे.[1] यास्तव येथें त्यांविषयीं सामान्यतः निरूपण करतों म्हणजे बस आहे. तथापि ही गोष्ट महत्त्वाची आहे कीं, इंग्रेजी विद्येचा प्रसार आमच्या लोकांत प्रथमतः होऊं लागला तेव्हां लवकरच तिचा एक मोठा परिणाम असा दृष्टीस पडूं लागला कीं, एतद्देशीय धर्मावरून लोकांची श्रद्धा उडत चालली; आणि धर्मच काय, पण जें जें स्वदेशीय तें सर्व अप्रयोजक, मूर्ख, वेडगळ असें असलेंच पाहिजे ही एक जबरदस्त कल्पना लोकांच्या मनांत खिळून राहिली. अद्यापही ती निघाली आहे असें नाहीं; पण तिचे वेडे आतांकडे बरेच सैल पडत चालले आहेत. तर हीच कल्पना वरील कवितेस अर्थांतच बाधक झाली. त्यांतून दुसरें असें कीं,

---

एड्वर्ड दि कन्फेसर् याच्या पश्चात् आपण कायदेशीर वारस आहों म्हणून इंग्लंडच्या गादीवर यानें हक्क सांगितला. यानें दुसऱ्या हॅरोल्डशीं हेस्टिंग्स् येथें लढाई केली. या लढाईंत हॅरोल्ड् पडला, व पुढें वुइल्यम्ला 'वेस्टमिन्स्टर् ॲबे' मध्यें राज्याभिषेक झाला. विजयी वुइल्यम् ( William the Conqueror ) या नांवानें हा प्रसिद्ध आहे. हा इंग्लंडचा आद्य राजा समजतात. येथूनच इतिहास शिकवण्यास प्रारंभ होतो.

'सम्पादक'

‖ ता. १ जानेवारी १८७७ रोजीं भरलेल्या दिल्ली दरबारांत व्हिक्टोरिया राणीनें (–'Kaisar Hind'–) हिंदुस्थानचा कैसर ही पदवी धारण केल्याचें जाहीर झालें. 'सम्पादक'

1. सदरील पुस्तकाचा १२ वा व ४६ अंक पाहा.‡ माजी 'शालापत्रका'चा शेवटल्या वर्षाचा एप्रिलचा अंक वाचिला असतांही कांहीं आक्षेपांचें निरसन सांपडेल. या निरसनाचा लवकरच काय परिणाम झाला तो मागें ( अंक २७* ) सांगण्यांत आलाच आहे.

‡ पृष्ठ ११९, व पुढें मोरोपंताची कविता हा विषय येईल त्यांत अंक ४६ या कलमें २, ३, ४ व ६ पाहा. 'सम्पादक'

* पृष्ठ १४० टीप १ पाहा. 'सम्पादक'

मराठी कवितेचा बहुतेक सर्व विषय धर्मोचाच. तेव्हां ज्या लोकांचें मन मुळींच धर्मावरून उडालें त्यांस तदनुकूल किंवा तत्प्रतिपादक जी कविता ती कशी पसंत व्हावी ? आतां खरोखरीं पाहतां अर्वाचीन पाश्चात्य विद्येनें ज्यांची दृष्टि परम सूक्ष्म व परम विमल झाली त्यांच्या हें लक्षांत यावयाला पाहिजे होतें कीं, कवितेची योग्यता जी ठरते ती तींतील विषयाच्या खरेखोटेपणावरून ठरत असते असें नाहीं. प्रतिपादित अर्थ अत्यंत समंजस व केवळ सत्य असला ह्मणजे कविता उत्तम झाली आणि असमंजस व असत्य असला ह्मणजे नादान झाली असें मुळींच नाहीं. कारण तसें असतें तर युक्लिड्§ हा कविसार्वभौम व होमर¶ हा कुकवींतला अत्यंत अधम असा ठरला असता. कां कीं, युक्लिड्नें जी सिद्धांतांची इमारत बांधली ती आज दोन हजारांवर पृथ्वीच्या सूर्यासभोंवतीं प्रदक्षिणा झाल्या तरी जशीच्या तशी अजून कोरी करकरीत आहे. येवढालीं रोमच्या सारखीं राज्यें उभारलीं जाऊन उलथून गेलीं पण वरील इमारतीस येवढीशी चीर ह्मणाल का टवका उडालेला ह्मणाल तर कोठेंही सांपडायाचा नाहीं. तर वरील भूमितिप्रवर्तकाची कृति इतकी सत्यानें ओतप्रोत भरलेली आहे ! आतां तसेंच युरोपीय कवींच्या आजोबांनीं रचलेल्या आद्यकाव्याकडे¶

§ युक्लिड्—(Euclid) खिस्तपूर्व तिसऱ्या शतकांतील विख्यात ग्रीक् गणिती. युक्लिड् हा इजिप्तचा राजा पहिला टॉलेमी (Ptolemy 323 B. C.–285 B. C.) याच्या वेळीं होऊन गेला असें प्रोक्लस् (इ. स. ४१०–४८५) Proclus नांवाचा ग्रंथकार म्हणतो. याच्याविषयीं अधिक माहिती उपलब्ध नाहीं. यानें भूमितीवर Elements नांवाचा तेरा भागांचा ग्रंथ लिहिला. शिवाय Introduction to Harmony, Optics, Phænomena (of celestial spheres) वगैरे ग्रंथहि याचेच आहेत. 'सम्पादक'

¶ होमर्—ग्रीक् महाकवि. इलियड्, ऑडिसी (Iliad, Odyssey) वगैरे ग्रंथांचा कर्ता. याचीहि विशेष माहिती उपलब्ध नाहीं. याचा काल खि. पू. ८५० असावा. कोणी तो खि. पू. १००० पर्यंतहि मागें नेतात. 'सम्पादक'

¶ होमर् (Homer) कृत इलियड् (Iliad=Poem of Ilion or Troy) नामक चोवीस सर्गांचें काव्य. आशिया मायनरच्या वायव्येस असलेल्या (Mysia) मिसियामधील इलियन् उर्फ ट्रॉय् नगरीच्या वेढ्याचें वर्णन या काव्यांत आहे. ट्रॉयचा राजा प्रायम् (Prium) याच्या पॅरिस् (Paris) उर्फ अलेक्झांडर् नामक मुलानें स्पार्टाचा राजा मेनेलॉस् (Menelaus) याची पत्नी त्रिभुवनसुंदरी लावण्यलतिका हेलन् (Helen) हिला पळवून नेलें. परंतु तिच्या लग्नाच्या वेळीं तिचा बाप टिंडेरिअस् (Tyndarius) यानें, तिच्या स्वरूपामुळें वेडावून जाऊन तिला मागणी घालण्यास आलेल्या अनेक सरदारांकडून अशी शपथ घेवविली होती कीं हेलन्च्या विवाहानंतर तिला तिच्या पतीपासून कोणी हिरावून नेईल तर त्याचा साऱ्यांनीं मिळून सूड घ्यावा. त्याप्रमाणें मायसिने (Mycenae) चा राजा ॲगमेनॉन् (Agamemnon) यानें या साऱ्या लोकांस जमवून अनेक जहाजांतून ट्रॉयवर हल्ला चढविला. दहा वर्षेंपर्यंत वेढा देऊन ग्रीक् सैन्य बसलें तरी ट्रॉय् पडेना, अगर समोरासमोरचें घनघोर युद्धहि होईना. कारण ग्रीकांकडे आकिलीस् नामक इतका पराक्रमी वीर होता कीं ट्रोजन् वीरांतील महापराक्रमी हेक्टर् (Hector) याला सुद्धां त्याच्यापुढें येण्याची छाती होईना. अखेर दहाव्या वर्षी ग्रीकांचा सेनापति ॲगमेनॉन् याच्याशीं

[ पुढें चालू. ]

उलटा,—म्हणजे काय गोंधळ आहे पाहा! कोठला आकिलीस* आणि कोठला हेक्टर्§— या नांवांचे मनुष्य तरी या पृथ्वीच्या पाठीवर कधीं जन्मास आले होते कीं नव्हते कोण जाणे! तर असल्यांच्या माकड कथा आपल्या आजांपणजांपासून चालत आलेल्या या खुळ्यानें खऱ्या मानून भलें थोरलें चोवीस सर्गांचें बाड रचून ठेवलें! त्यांतूनही 'बाबावाक्यं प्रमाणम्' या अडाणी न्यायानें त्यानें वरील सर्व हकीकतही खरी मानली समजा; पण हें हो

---

तंटा झाल्यामुळें अकिलिस् युद्धपराङ्मुख झाला, व ग्रीकांच्या बाजूनें लढावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें तेव्हां ट्रोजन् सैन्यास चढाई करण्याची संधि मिळाली. याच ठिकाणीं इलियड्ला प्रारंभ होतो: "Sing, goddess, the wrath of Achilles!......what it did, and how at last it was turned away." ही इलियड्ची केन्द्रीभूत कल्पना. पण तदनुषंगानें ट्रॉयूच्या वेढ्याचें रसभरित वर्णन होमर्नें केलें आहे. ज्याचें पारडें अनिश्चितपणें एकदां ग्रीकांकडे तर एकदां ट्रोजनांकडे कसें वारंवार झुके, केव्हां या बाजूचा तर केव्हां त्या बाजूचा वीर प्रतिपक्षीय वीराला कसें कंठस्नान घालीत असे व देवदेवतादि कोणी एका बाजूनें कोणी दुसऱ्या बाजूनें या युद्धांत कशा सामील झाल्या याचें वर्णन पहिल्या पंधरा सर्गांत आहे. पुढें ग्रीक् लोक हैराण झाल्यानें अकिलीसूचें मन वळविण्याचा प्रयत्न त्याचा मित्र पॅट्रोक्लस् (Patroclus) करतो पण अकिलीस् स्वतः न जातां पॅट्रोक्लस्ला आपलें चिलखत देऊन पाठवितो. अखेर पॅट्रोक्लस्ला हेक्टर्नें ठार मारल्याचें समजतांच अकिलीस् उद्विग्नता सोडून युद्धास प्रवृत्त होतो व हेक्टर्ला ठार मारून त्याचें प्रेत घेऊन जातो. पुढें त्याचा बाप प्रायम् तें मागावयास आल्यावर अकिलीस् हेक्टर्चें प्रेत त्याच्या ताब्यांत देतो व हेक्टर्चे अंत्य संस्कार होईतों युद्ध थांबवितो. येथें इलियड् संपतें.

'सम्पादक'

* Achilles—इलियड्मधील नायक. हा फीएनिक्स् (Phoenix) पासून वक्तृत्व व युद्धकला शिकला; व वैद्यक चिरॉन् (Chiron) पासून शिकला. ट्रॉयूच्या युद्धांत सामील होऊन यानें पन्नास जहाजांतून ट्रॉयवर सैन्य नेलें, ख्रीसीज् (Chryseis) व ब्रीसीज् (Briseis) या दोन मुली अकिलीसूच्या हातीं सांपडल्या. पैकीं ख्रीसीज् अॅगॅमेनॉन्ला (Agammnon) देऊन दुसरी अकिलीसूनें आपल्या ताब्यांत ठेवली. ख्रीसीज्च्या बापानें आपली मुलगी परत मागितली तेव्हां अॅगॅमेनॉन्नें त्याला शिव्या देऊन घालविलें. पण ग्रीक् सैन्यांत पुढें आजार पसरला तो यामुळें अशा समजुतीनें सेनापति अॅगॅमेनॉन्नें ती मुलगी परत दिली. पुढें अकिलीसूच्या ताब्यांतील मुलगी ब्रीसीज् अॅगॅमेनॉन्नें बळकावली. अकिलीस् विषण्ण व युद्धपराङ्मुख झाला. अखेर पॅट्रोक्लस् पडतांच युद्धांत सामील होऊन यानें हेक्टर्ला मारलें. पण ट्रॉय् ताब्यांत येण्यापूर्वींच अकिलीस्हि प्रायम्च्या कन्येवर लुब्ध होऊन अपोलोच्या देवळांत लग्नसंबंधीं बोलणें करीत असतां पॅरिस्नें मर्मस्थानीं मारलेल्या विषारी बाणास बळी पडला.

'सम्पादक'

§ हेक्टर्:—ग्रीको-ट्रोजन् युद्धांतील ट्रोजन् वीर. अॅगॅमेनॉन्ला ख्रीसीज् परत द्यावी लागल्यामुळें अकिलीसूच्या ताब्यांतील ब्रीसीज् नामक मुलगी पळवून नेण्याची त्यानें अकिलीस्ला दहशत घातली. पण अथेना ऊर्फ मिनेर्व्हा देवतेच्या इच्छेनुसार अकिलीसूनें आपण होऊनच ब्रीसीज्ला अॅगॅमेनॉन्च्या स्वाधीन केलें. व विषण्ण होऊन युद्धांतून अंग काढून घेतलें. पण आपला स्नेही पॅट्रोक्लस् हा पडतांच खवळून जाऊन अकिलीसूनें ट्रोजन् सैन्यास ट्रॉयूच्या तटांच्या आंत पिटाळून लावून बाहेर उरलेल्या एकट्या हेक्टर्चा पाठलाग करून शहराभोंवतीं तीन प्रदक्षिणा झाल्यावर त्याला गांठलें व अंगांत भाला भोंसकून ठार मारलें. हेक्टर् हा प्रायम् व हेक्यूबा यांचा मुलगा. यानें अकिलीसूचा पराक्रमी मित्र पॅट्रोक्लस् याला यमसदनास पाठविलें.

'सम्पादक'

काय !—आकाशांतला सूर्य उठला, ग्रीक् लोकांच्या कंपूवर बाणांची वृष्टि करायाला लागला, शुक्राची चांदणी निघाली, लागली सीता राजपुत्राची व त्याच्या प्रियकरणीची गांठ घालून द्यायाला; मंगळ खालीं उतरला, लागला ग्रीक् लोकांशीं लढायाला; बुध स्वर्गांहून निघाले, आले प्रायम् राजाच्या शिबिरीं आपल्या यजमानाचा निरोप घेऊन; आकिलीस् उठला तो दोन नद्यांशींच लढायाला लागला ! वरील सर्व प्रकार* ज्यानें वर्णिले त्यास जर खुळा म्हणूं नये तर मग खुळा तरी कोण ? पण चमत्कार पाहा काय आहे तो, कीं या कवींतल्या वृद्ध कपीस वेड्यांच्या इस्पितळांत पाठवण्याची कोणी तजवीज न करतां कवित्वमंदिरांत त्यास उलटें अग्रासन दिलेलें आढळतें। त्याप्रमाणेंच, 'उंदरांची सभा', 'पशुपक्ष्यांचें युद्ध', 'खटला उभा करणारीं मांजरें' या गोष्टी ज्यानें लिहिल्या; किंवा मांब्यांतून पहिल्यानें धुराचा अपकारा निघाला आणि मग सगळ्या धुराच्या लोटाचा एक राक्षस† बनला; एकजण भुयारांतल्या बागेंत शिरला तों जिकडे पाहतो तिकडे सारीं झाडें आपलीं हिऱ्यामाणकांनीं‡ लादलीं आहेत असें त्यानें पाहिलें, असल्या वार्तांचें ज्यानें एक जबरदस्त बाड रचून ठेवलें, त्याचे ग्रंथही वेडगळ म्हणून जे उकिरड्यावर झुगारून द्यावयाचे ते उलटे मोठमोठ्या शहाण्यांनीं आजपर्यंत उराशीं बाळगले ! असो; वरच्या सारखे विचार आमच्या अर्वाचीन पंडितांनीं जर कांहीं मनांत आणले असते तर: महाराष्ट्र—कवितेची आजपर्यंत जी उपेक्षा झाली, व 'सर्वसंग्रहा'सारखी सात वर्षांची इमारत एकाएकीं जी खचली, तसला प्रकार झाला नसता. सारांश, ज्याप्रमाणें बुद्धबळांच्या डावांत लांकडाच्या तुकड्यांस हत्ती, घोडा, उंट हीं नांवें दिल्यानें वेडगळपणाचा आरोप माथीं बसण्याची शंका नको, किंवा रंगभूमीवर स्त्रीचा अभिनय पाहत असतां त्या पात्राच्या स्त्रीपुंस्त्वाची मीमांसा करायाला पाहिजे असें नाहीं, त्याप्रमाणेंच कवि, नाटककार, कादंबरीकार, वक्ते इत्यादिकांची करामत पाहून तल्लीन होतांना आपणासमोर दिसतें आहे हें सर्व खरें आहे कीं सर्व भास आहे हेंही मनांत आणण्याची बिलकुल गरज नाहीं. 'भारत', 'इलियड्' किंवा 'प्याराडैज लॉस्ट्' हीं वाचतांना आपल्या आनंदास वरील संशयवृत्तीनें व्याघात करणारा मार्मिक हा, 'शाकुंतल' नाटकांतील नायक स्वनिर्मित चित्रांतल्या भ्रमराशीं बोलायास लागून आपल्या हृदयवल्लभेच्या समागमाचें सुख अनुभवीत असतां त्यास जागें करणाऱ्या विदूषकाप्रमाणेंच महामूर्ख होय !

६. तिसरें सदर संस्कृत कविता. यावर सांगण्यासारखे आक्षेप वाचण्यांत किंवा ऐकण्यांतही येत नाहींत. याचें कारण उघडच आहे कीं जोन्स्,+ विल्सन्,‡ कोलब्रुक्§ सार-

---

* ग्रीकों—ट्रोजन् युद्धांत देवतांनीं भाग घेतला होता त्यासंबंधीं हे इलियड्मधील उल्लेख आहेत.

† ( Arabian Nights' Entertainments ) अरबी भाषेंतील ( एक हजार आणि एक रात्रीं चालू असलेल्या ) सुरस व चमत्कारिक गोष्टींपैकीं आठव्या रात्रीं सुरू झालेल्या मासे धरणाऱ्या कोळ्याच्या गोष्टीचा येथें उल्लेख आहे. ‡ हा उल्लेख अल्लादिनाच्या ( Aladdin or the Wonderful Lamp ) गोष्टीसंबंधीं आहे. हीहि गोष्ट अरेबियन् नाइट्स्मधीलच आहे.

'सम्पादक'

+ जोन्स्—( Sir William Jones ) १७४६-१७९४. जन्म लंडन् येथें, १७६४ सालीं

[ विल्सन् ‡ व कोलब्रुक् § या टिपा पुढील पानावर पाहा ]

ष्यांनीं आमच्या गीर्वाण कवींचा महिमा मागेंच गाऊन त्यांची कीर्ति साऱ्या जगभर पसरविली, व त्यांचीं नांवें होमरप्रभृतींच्या पटांत सामील करून टाकलीं. त्यामुळें एतद्देशीय दूषकांचीं तोंडें तर मुळींच बंद होऊन स्वदेशनिंदेचें जें त्यांचें व्रत तें या ठिकाणीं तरी त्यांस तसेंच ठेवून द्यावें लागलें. तिकडील जी रसज्ञ मंडळी तिजपैकीं मेकॉले व मिल्ल् या दोघां बहाद्दरांनींच आमच्या कवींस कीर्तिमंदिरांतील अत्युच्च स्थलांवरून ढकलून देण्याचा काय तो यत्न केला; पण डोंगराशीं टक्कर घेणाऱ्या मदोन्मत्त हत्तींप्रमाणें वरील महारसिकांनीं दंतभंग मात्र करून घेतला! बाकी त्यांच्या शुष्क आक्षेपांनीं आमचे कविवर आपल्या अढळ पदापासून कितपत ढळले ह्मणाल तर त्यांच्या कृतीचे भोक्ते युरोपांत दिवसांदिवस वाढतच आहेत, व त्यांस मोठमोठ्या कायब्ररीं ( ऱ्या ! सं० ) तून त्यांच्या योग्यतेनुरूप उच्च स्थानही मिळत आहे! तेव्हां या संदरावर विशेष लिहावयास नकोच.

---

ऑक्सफोर्डच्या युनिव्हर्सिटी कॉलेजांत पौर्वात्य भाषांचें अध्ययन सुरू करून अरबी व पर्शिअन् भाषांत यानें प्राविण्य संपादिलें. नादिरशहाच्या पर्शिअन् भाषेंतील चरित्राचें यानें १७७० सालीं फ्रेंच् भाषेंत भाषांतर केलें. १७८३ सालीं याला कलकत्त्यास (Fort William) न्यायाधीश नेमलें. यानें जानेवारी १७८४ मध्यें बंगाल एशियाटिक् सोसायटी स्थापली, संस्कृताचें अध्ययन सुरू केलें व १७८८ सालीं हिंदु व मुसलमानी कायद्यांचें भाषांतर (Digest of Hindu Muhamadan Law) करण्याचें प्रचंड कार्य सुरू केलें. पण तें त्याच्या हातून संपूर्ण झालें नाहीं. तें पुढें कोलब्रूकनें चालू केलें. यानें शाकुंतल नाटक, हितोपदेश, गीतगोविंद व वेदाचे कांहीं कांहीं भाग यांचें भाषांतर केलें आहे. अश्रांत मेहनतीमुळें हा कलकत्त्यास आजारी पडून मेला. ईस्ट् इंडिया कंपनीनें त्याचा पुतळा कलकत्त्यास उभारला व आणखीहि एक स्मारक लंडन् येथील सेंट् पॉलच्या कॅथेड्रलमध्यें उभारलें. 'सम्पादक'

‡ विल्सन् (H. H. Wilson 1786–1860) जन्म लंडन् २६ सप्टेंबर. ईस्ट् इंडिया कंपनीचा शस्त्रवैद्य ह्मणून १८०८ सालीं हिंदुस्थानांत आला. १८११ सालीं बंगाल एशियाटिक् सोसायटीचा चिटणीस कोलब्रूकच्या शिफारशीवरून यास नेमण्यांत आलें. १८१३ सालीं यानें मेघदूताचें भाषांतर केलें. १८१९ सालीं याचा पहिलाच संस्कृत-इंग्रेजी कोश प्रसिद्ध झाला. या कोशाहून अधिक चांगला फक्त बोथ्लिंग् (Bothlingk) याचा कोश आहे. व त्यालाहि याचाच आधार आहे. १८२७ सालीं सहा संस्कृत नाटकांचें पूर्ण भाषांतर व तेविसांचे सारांश यानें प्रसिद्ध केले. हा कलकत्ता कॉलेजमध्यें Superintendent of Sanskrit Studies होता. इंग्रेजी हीच भाषा हिंदी शाळांत शिक्षणाचें माध्यम (Medium) असावी या धोरणास याचा विरोध होता व त्याबद्दल याच्यावर टीकेचा भडिमारहि झाला. १८३२ सालीं ऑक्स्फोर्ड् विद्यापीठांत Boden Chair of Sanskrit त्याला मिळाली. 'सम्पादक'

§ कोलब्रूक् (Henry Thomas Colebrook 1765–1837) पंधरा वर्षांचा असतांच गणित व वाङ्मय यांत याची विलक्षण प्रगति झाली होती. १७८२ सालीं यास हिंदुस्थानांत लेखक नेमण्यांत आलें. अकरा वर्षें हिंदुस्थानांत राहिल्यावर यानें संस्कृताचें अध्ययन सुरू केलें. जोन्सचें हिंदु धर्मशास्त्राच्या भाषांतराचें अपुरें राहिलेलें काम याजवर सोंपविण्यांत आल्यावरून 'मिताक्षरा' व 'दायभाग' या दोन प्रकरणांचें भाषांतर यानें केलें. लॉर्ड् वेल्स्ले यानें याला कलकत्याच्या कॉलेजांत संस्कृत व हिंदु लॉ या विषयांचा प्रोफेसर् नेमलें; यानें न्यायाधिशाचीहि जागा मिळविली. एशिॲटिक् सोसायटीचा हा एक डायरेक्टर् होता. संस्कृत व्याकरण (१८०३) व वेदांवर एक निबंध (१८१५) हे याचे आणखी दोन ग्रंथ होत. 'सम्पादक'

७. याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकावर कित्येक अनभिज्ञ व अरसिक लोकांचे जे आक्षेप निघणारे आहेत त्यांचें निराकरण केलें. आतां त्याविषयीं विशेषत: प्रत्येक विभागाच्या संबंधानें लिहूं. या तिन्ही सदरांवर पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत बरेंच दिग्दर्शन केलें आहे. त्यावरच येथें अंमळ विस्तार करतों.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशकांनीं इतिहासाच्या उपोद्घातांत म्हटलें आहे कीं, ग्रांट् डफ् यास जी सामग्री मिळाली होती तींतील कित्येक लेख त्यानें रचलेल्या एकंदर इतिहासायेवढाले होते. या गोष्टीचा कोणाला चमत्कार वाटायाला नको. असें पाहा कीं, एकट्या जॉनसनचें व एकट्या स्कॉटचें चरित्र जर ग्रांट् डफ्च्या इतिहासाच्या चौपट पांचपट झालें आहे, मेकॉलेनें रचलेल्या पांच मोठमोठ्या भागांत जर नुसता पंधरा वर्षांचा काय तो इतिहास आला आहे, व सामान्यत: कोणी मनुष्य कोठें पांचपन्नास कोस जाऊन आला तर तेवढ्यांतही आपल्या स्नेही मंडळीस चार घटका सांगत बसण्यासारख्या जर गोष्टी बहून घेतात, तर केवळ क्षुद्र स्थितीपासून साऱ्या हिंदुस्थानाच्या सार्वभौमत्वापर्यंत चढलेल्या अवघ्या राष्ट्राचा इतिहास सामान्य प्रतीच्या पांचसातशें पानांत यावयाचा म्हटला म्हणजे कोळ्याच्या गोष्टींतल्या प्रचंड राक्षसास लहानशा भांड्यांत कोंडून भरला होता त्यासारखीच अवस्था व्हावयाची! शिवाय कोणत्याही राष्ट्राचा इतिहास म्हटला म्हणजे केवळ राजांचे वृत्तांत व लढायांच्या हकिकती दिल्यानें होत नाहीं. वरील शब्दाचा अर्थ किती व्यापक आहे हें मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे.¹ तेव्हां या व्याप्तीप्रमाणें म्हटलें म्हणजे

---

१. अंक १. ‡ व्हॉल्टेर् नामें करून फ्रान्स देशांत जो महाविख्यात पंडित गेल्या शतकांत होऊन गेला त्यानें इतिहासाच्या व्याप्तीचें यथार्थ निरूपण¶ करून त्याप्रमाणें स्वत: इतिहास रचले. याविषयीं माहिती पाहिजे असल्यास ती बकलच्या§ दुसऱ्या भागाच्या १ ल्या खंडांत सांपडेल.

‡ कलम पाहिलें पृष्ठ ५४ पाहा. 'सम्पादक'

§ History of Civilization in England in three vols. by Henry Thomas Buckle. 'सम्पादक'

¶ Voltaire म्हणतो: 'I wish to write a history, not of wars, but of society; and to ascertain how men lived in the interi or of their families and what were the arts which they commonly cultivated......My object is the history of human mind, and not a mere detail of petty facts; nor am I concerned with the history of great lords, who made war upon French kings; but I want to know what were the steps by which men passed from barbarism to civilization.' दरबारी कारस्थानें, प्रधानमण्डळांतील फेरफार, राजांचें दैव, या गोष्टींचें नव्हे तर मानवजात कोणकोणत्या भिन्न परिस्थितींतून वाट काढून उन्नतिमार्गाकडे गेली व या उन्नतीचा विकास कसकसा होत गेला याचें पायरीपायरीनें निरीक्षण करणें हाच खरा इतिहास होय असें व्हॉल्टेअरचें मत होतें. Montesquieu, Turgott वगैरे व्हॉल्टेअर्

[ पुढें चालू ]

महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत पुढील सर्व गोष्टी आल्या पाहिजेत. प्रथमारंभीं मराठे लोकांची स्थिति शिवाजीमहाराजांच्या पूर्वीं कशी होती, त्यांस पुढें जें येवढें वैभव प्राप्त झालें त्यास कारणभूत असे त्यांच्या अंगीं मूळचे गुण कोणते व कितपत होते व वरील राज्य-स्थापकानें त्यांचा विकास कोणते प्रकारानें केला, हिंदुधर्माची स्थिति त्या वेळेस कशी होती व तिनें यवनांच्या अपकर्षास कितपत साह्य केलें, इत्यादि गोष्टी मूळ उपोद्घातांत आल्या पाहिजेत. नंतर मावळे लोकांचें वर्णन, शिवाजीचे संवगडे तानाजी, बाजी, येसाजी यांचे वृत्तांत, शिवाजीचें शिक्षण, सैन्यव्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार, आरमारी फौजेची तयारी, अवरंगजेबाचा दरबार, मोगली लष्कर, भगवा झेंडा, रामदासाचा राजनीतिपर व धर्मपर उपदेश, तुकारामबोवांचें कीर्तन, वामनाचें पांडित्य व कवित्व† परभू लोकांचें शौर्य, इत्यादि गोष्टी शिवराजाच्या वृत्तांतांत दाखल झाल्या पाहिजेत. नंतर संभाजीपासून शाहू-पर्यंतच्या इतिहासांत सैन्यव्यवस्थेंत व राज्यव्यवस्थेंत झालेले फेर, कलुश्याचें वर्चस्व,

---

(Voltaire) चे समकालीन इतिहासकारहि याच मताचे अनुयायी होते. यावरून इतिहासाच्या कल्पनेंतील हा फरक व्यक्तिगत लहरीमुळें उत्पन्न झाला नसून तो त्या कालाचाच महिमा होता असा तर्क करण्यास हरकत नाहीं. Mallet (१७५५), Mably (१७६५) वगैरे इतिहासकारांचीहि अशींच मतें होतीं. राजापेक्षां लोकच अधिक महत्त्वाचे, एका व्यक्तीचीं (मग ती व्यक्ति कितीहि थोर असो,) कृत्यें राष्ट्राचे रीतिरिवाज व स्वभाव आणि आवडीनावडी यांहून महत्त्वाचीं असूं शकणार नाहींत असें मत प्रचलित झालें हा त्या कालाचाच महिमा होय. 'सम्पादक'

† शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकाअखेर वामन शेषे नामक, वासिष्ठ गोत्रोत्पन्न, ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण जातीचा, अति विद्वान् कवि विजापुरांत होऊन गेला. फारसी भाषेंत प्रावीण्य मिळविल्यानें बादशहाची याच्यावर मर्जी बसली. पण बादशहाचे मनांत एकदां याला बाटवावें असें आलें. हें कळतांच विजापूर सोडून भिक्षा मागत काशीस जाऊन यानें संस्कृत भाषेचा व वेदशास्त्रांचा अभ्यास केला. हा मध्वमतानुसारी असून याच्या पत्नीचें नांव गिराबाई होतें. वाद करून जयपत्रें घेत हा सत्या हिंदुस्थानभर हिंडला. हा दिग्विजयार्थ हिंडे तेन्हां बरोबर उंटभर पोथ्यापुस्तकें घेई अशी आख्यायिका आहे. याला एका सच्चिदानंद यतीनें दर्शन देऊन 'भार्गवीवारुणी' विद्या सांगितली त्यामुळें वामनास साक्षात्कार झाला. या प्रसंगाची हकीकत शके १५९५ सालीं लिहिलेल्या याच्या 'निगमसार' ग्रंथांत वर्णिली आहे, भूलोकभाषेंत [ मराठींत ] संस्कृत गीतेचें अनुपमेय समश्लोकी [ अनुष्टुप् छंदांत ] भाषांतर यानें रचिलें. हें इतकें उत्कृष्ट साधलें कीं मोरोपंतानें त्यांतीलच शब्द घेऊन आपली गीतेवरील आर्याटीका लिहिली. वामनानें गीतेवर 'यथार्थदीपिका' नामक सुमारें बावीस हजार ओंव्यांचा आणखी एक प्रचंड ग्रंथ लिहिला. वामनपंडितास प्रेमळ पण भोळी अंधभक्तिहि अमान्य होती व शब्दांची ओढाताणहि नापसंत होती; अर्थवाद, विपरीतार्थप्रतिपादन यांचा तर त्याला तिरस्कार वाटे. म्हणून जशी आहे तशीच गीता समजून देण्यासाठीं त्यानें 'यथार्थदीपिका' लिहिली. या ग्रंथांत वामनाच्या 'कवना'चा प्रचंड प्रवाह धों धों वाहत असून कवित्वाचा व विद्वत्तेचा सुंदर मिलाफ झाला आहे. वामनाचीं गंगालहरी, गजेंद्रमोक्ष, शतकत्रय, राधाविलास, राधासुधा, वगैरे उत्तम आणि मनाचे श्लोक, वामनी बोध, नाममहिमा वगैरे साधारण काव्येंहि आहेत. हा वैशाख शुद्ध षष्ठी शके १५९५ रोजीं समाधिस्थ झाला असें म्हणतात. कित्येकजण शके १६१७ मानतात. निश्चित माहिती उपलब्ध नाहीं. 'सम्पादक'

फिरंग्यांची सत्ता, बेगम साहिबांची हकीकत व शाहूचें आपल्या शत्रूच्या घरीं वाढणें, शिद्या यवनांची पूर्वस्थिति व उत्कर्ष, ब्राह्मणांच्या व मराठ्यांच्या झटापटी, बाळाजीचें चातुर्य व वक्तृत्व, त्याचे दोघे बच्चे याज्ञिकीच्या किंवा कारकुनीच्या कामांत फार झालें तर चाकरमार व्हावयाचे ते हानिबल§ व हसडूबल¶ यांसारखे महावीर बनून शत्रूंचे काळ कसे होऊन राहिले तो प्रकार, दोघां भावांची परस्पर प्रीति, मस्तानी व समशेरबहाद्दर, शूद्र अधिपतींचा *अभ्युदय, महाराष्ट्रांतील जातिभेदजन्य वैमनस्य मोडून सर्वांचा कट करण्याविषयी पेशव्यांचा कटाक्ष, शाहूच्या गळ्यांतील केवळ ताईत बनून गेल्यामुळें त्यानें अंतकाळीं सर्व राज्याधिकारांचें त्यांस केलेलें समर्पण, इत्यादि गोष्टींचा या दुसऱ्या भागांत अंतर्भाव झाला पाहिजे. यापुढें तर मराठ्यांचा इतिहास ह्मणजे साऱ्या हिंदुस्थानाचाच इतिहास; कां कीं चारी मुलखांत त्यांचे सत्ताधारी कायम होऊन राहिले. तेव्हां नदीचें पात्र रुंदावत आतां

§ हानिबल् (Hannibal) जन्म खि. पू. २४७. हा केवळ नऊ वर्षांचा असतां याचा बाप हॅमिल्कर् बार्का (Hamilcar Barca) यानें आजन्म रोमशीं शत्रुत्व पत्करण्याची याच्याकडून शपथ घेवविली.व हानिबल्च्या मनावरहि या शपथेचा इतका परिणाम झाला कीं त्यानें ही शपथ आजन्म पाळली. १८ वर्षांच्या अल्प वयांतच यानें इतका पराक्रम करून दाखविला कीं, खि. पू. २२९ मध्यें त्याचा बाप मरतांच त्याला सेनापति नेमण्यांत आलें. खि. पू. २२१ मध्यें त्याचा मेहुणा हस्डुबल् याचा खून झाल्यावर तो एकमतानें मुख्य सेनापति निवडण्यांत आला. इतकें त्याच्या सैनिकांचें त्याच्यावर प्रेम होतें. सागंटम्ला वेढा घालून यानें काबीज केल्यामुळें हस्डुबल्नें रोमशीं केलेला तह मोडला या सबबीवर रोमन् लोकांनीं हानिबल्ला आपल्या स्वाधीन करण्याची केलेली मागणी नाकारण्यांत आल्यानें दुसरें प्यूनिक् युद्ध झालें. हानिबल्नें अनेक जय मिळविले पण रोम शरण आलें नाहीं. दलदलींतून जात असतां याचें बरेंच सैन्य नष्ट झालें व याचेंहि डोळे येऊन एका डोळ्यानें हा अंधळा झाला. येथून दैवानें उलट खाल्ली. हस्डुबल् त्याच्या मदतीस आला पण पराभव होऊन तो लढाईंत पडला. पुढें हानिबल् फक्त संरक्षक धोरण ठेवून चार वर्षें जागा धरून बसला. पण अखेर झामा (Zama) जवळ झालेल्या लढाईंत हानिबल्चा पूर्ण पराभव होऊन कार्थेजचा पूर्णपणें नक्षा उतरला. तदनंतर कांहीं वर्षांनीं त्याला सिरियामध्यें पळून जावें लागलें. पुनः तेथूनहि एशियांत पळून जाणें त्याला भाग पडलें. पण रोमन् लोकांनीं त्याचा सारखा पिच्छा पुरविल्यामुळें विष खाऊन खि. पू. १८३ च्या सुमारास त्यानें आत्महत्या केली. 'सम्पादक'

¶ हस्डुबल् (Hasdrubal)—कार्थेजिनिअन् सेनापति हॅमिल्कर् बार्का याचा जांवई आणि मुलगा या दोघांचेंहि हेंच नांव होतें. पहिला सासऱ्याच्या पश्चात् खि. पू. २२९ या वर्षी सेनापति झाला. यानें नवें कार्थेज वसविलें, व रोमन् आणि कार्थेजिनिअन् राज्यांची मर्यादा इबेरस् (The Iberus) नदी ठरवून घेणारा प्रसिद्ध तह यानेंच घडवून आणला. यानें पूर्वी ठार मारलेल्या एका सरदाराच्या गुलामानें याचा खून केला. याच्या मागून हानिबल् सेनापति झाला. दुसरा (हस्डुबल्) हानिबल्चा भाऊ होता हें वर सांगितलेंच आहे. हानिबल्नें इटलीवर स्वारी केली त्या वेळीं हा सेनापति ह्मणून स्पेनमध्यें राहिला. खि. पू. २०७ मध्यें यानें आल्प्स् पर्वत ओलांडून इटलीवर स्वारी केली. पण त्याचा पराभव झाला, सैन्य नष्ट झालें व तोहि लढाईंत पडला. त्याचें डोकें कापून हानिबल्च्या तंबूंत टाकण्यांत आलें. 'सम्पादक'

* शिंदे, होळकर वगैरे. 'सम्पादक'

जातां समुद्रसंगमाच्या स्थानीं जसें अफाट होऊन सागराशीं एकात्मक होऊन जातें, त्याप्रमाणें वरील काळाच्या इतिहासांत अवघ्या भारतवर्षाच्या इतिहासाचा अंतर्भाव होतो! यापुढें छत्रपतींचें किंवा पेशव्यांचें घराणें हें मागील सूत्र सुटून शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पवार, बुंदेले, पटवर्धन इत्यादि शाखांच्या पृथक् विस्तारांत शिरावें लागतें. तेव्हां या सर्वांचें यथातथ्य वर्णन झटलें झणजे पुन: वरच्यासारखा प्रत्येकाचा अवांतर परिवार आला. सारांश, मराठ्यांचा इतिहास झणजे शिवाजीचे, बाजीरावाचे, किंवा यशवंतरावाचे पराक्रम वर्णिले किंवा नाना फडनविसाच्या राज्यकारणाचें वर्णन केलें झणजे झालें नाहीं; तर वरील वीरांच्या मोहिमींबरोबर व मुत्सद्यांच्या मसलतींबरोबरच रामशास्त्रीबोवांचा* न्यायमनसुबा, रामचंद्रबाबाची† जमाबंदी, बखतरामाची ¶कारागिरी, दयारामाची सावकारी, गंगाविष्णूची‡ वैद्यक्रिया, काशीनाथोपाध्यायांचा ×'धर्मसिंधु', भवदेवमिश्राचें पांडित्य, अमृतरायाचें

---

* नारायणरावाचा वध करून राज्य बळकावणाऱ्या सत्ताधीश रघुनाथरावानें 'नारायणरावास धरावें' असें पत्र दिल्याचें कबूल केलें. पण 'ध'चा 'मा' कोणीं केला हें माहीत नाहीं असें सांगून घडल्या अपराधाचें प्रायश्चित्त विचारतां 'यास देहान्त प्रायश्चित्तच पाहिजे' असा निस्पृहपणें निकाल सांगून रामशास्त्री रघुनाथरावाच्या राज्यांत पाणी पिण्यास सुद्धां न राहतां तडक वांईकडे निघून गेले. 'सम्पादक'

† सावंताच्या वाडीकडील राहणारा, अरवलीचा कुळकर्णी; याचें पूर्ण नांव रामचंद्र मल्हार शेणवी. बाजीरावानें यास राणूजी शिंद्याची दिवाणगिरी सांगितली. राणूजीच्या पश्चात् जयापा त्यास दिवाण करीना. सदाशिवरावांस कांहीं नजराणा देऊन पेशव्यांकडे वशिला लावण्याचा याचा प्रयत्न होळकर आड आल्यानें फसला. पेशव्यांनीं जयापाची दिवाणगिरी याला दिली नाहीं. होळकर व सदाशिवराव भाऊ यांचें वांकडें पडलें. रामचंद्रबाबा नानासाहेब पेशव्यांचा द्वेष करूं लागला. व भाऊंनीं त्यास खुद्द आपला दिवाण केलें. राज्यकारस्थानांत बराच भाग घेऊन महादाजीपंत पुरंदऱ्याकडील कारभार भाऊंस मिळवून देण्याची यानें खटपट केली. राज्याचें वसुलाचें कामांतहि सदाशिवराव भाऊंस याचा फार उपयोग झाला. 'सम्पादक'

¶ लाला बखतराम हा प्रख्यात मूर्तिकार होता. 'सम्पादक'

‡ श्रीगणपतिभक्त पेशवे थोरले माधवराव हे हैदरावर स्वारी करण्यास गेले असतां प्रकृति बिघडल्यामुळें कृष्णातीराहूनच परत फिरले. शके १६९४ च्या उन्हाळ्यांत प्रकृति पुन: बिघडली तेव्हां थेऊर येथें गणपतिचरणाजवळ जाऊन स्वारी राहिली. हिंदुस्थानांतून मोठमोठे नामांकित वैद्य आणविले. तेरदाळकर, रणछोड नाईक, रूपेश्वरबावा वगैरे वैद्य आले होते. त्यांतच प्रसिद्ध वैद्य गंगा विष्णुहि आले होते. यांचें पथ्य फार अवघड असे. सर्वांनीं 'राजयक्ष्मा' असें रोग—निदान केलें. रोज ताप भरे, असह्य वेदना होत. अखेर याच दुखण्यांत माधवरावांचा १८ नोव्हेंबर १७७२ (कार्तिक वद्य अष्टमी) रोजीं अंत झाला. 'सम्पादक'

× काशीनाथोपाध्याय ऊर्फ बाबा पाध्ये हे शेवटच्या बाजीरावाच्या कारकिर्दीत होऊन गेले. यांच्या वडिलांचें नांव अनंतोपाध्याय. हे कऱ्हाडे ब्राह्मण असून पंढरपूर येथें राहत असत. सर्वमान्य धर्मसिंधु ग्रंथ यांनींच १७९१ सालीं लिहिला. हे मोठे विद्वान् व भगवद्भक्त होते. वारकरी लोक यांस बरेंच मानीत. कर्नाटकांतील कृष्णाचार्य वगैरे मंडळी यांच्या शिष्यवर्गांत होती असा यांचा

[ पुढें चालू ]

कीर्तन, मोरोपंताची आर्यावाणी, जोशीबोवांचा तमाशा, व्यंकटनरसीचें * गाणें, बाळंभट-दादाची$ कुस्तेगिरी, वगैरे सर्व प्रकार त्यांत इत्थंभूत आले पाहिजेत. त्याप्रमाणेंच त्यावेळची

---

लौकिक आहे. मल्लाप्पा वासकरांनीं यांच्याच संमतीनें तुकाराम महाराजांचा साडेचार हजार अभंगांचा गाथा कायम केला. यांच्या वंशजांस रत्नागिरी जिल्ह्यांतील गोंवली गांव अग्रहार म्हणून मिळाला. धर्मसिंधूखेरीज प्रायश्चित्तेन्दुशेखर, वेदस्तुति-टीका हे यांचे आणखी ग्रंथ होत. 'सम्पादक'

* अत्यंत कुरूप पण कमालीच्या गोड गळ्याची नरसी नांवाची सुप्रसिद्ध कलावंतीण पेशवाईच्या अखेरीस होऊन गेली. कर्नाटकांतील पंडित विश्वगुणादर्शचम्पूकार वेंकटाध्वरी याचें नृत्यकौशल्य पाहून ती त्याची शिष्या बनली व तिनें आपल्या नांवामागें आपल्या गुरूचें नांव जोडलें. होनाजी बाळ वगैरे तमासगीर तबल्यावर लावण्या ह्मणत त्यामुळें संगीतोपकरणांचा अपमान होतो असें वाटल्यामुळें आपल्या गान-कौशल्यानें शेवटच्या बाजीरावास खुष करून तमाशांत तबला वापरूं नये असा त्याजकडून तिनें कायदा करून घेतला. त्यावर होनाजी बाळानेंहि लावण्यांतील असभ्यता काढून टाकून अहिली कामाठीण या वारांगनेच्या द्वारां कुलीनांच्या घराण्यांतहि त्यांचा ( लावण्यांचा ) प्रवेश करून दिला. चिंतामणराव पटवर्धन नरसीच्या नादीं लागले असून पटवर्धन संस्थानांतून तिला वेतन असे असें ह्मणतात. 'सम्पादक'

$ बाळंभट्ट जनार्दनभट्ट देवधर, जन्म अदमासें सन १७७७ ते १७७९. मृत्यु सन १८५२, ( भाद्रपद शुद्ध तृतीया शके १७७४ ). यांचें घर नाशिक जिल्ह्यांत गोदावरीकांठीं कोठुरें येथें होतें. हे उत्तम वैदिक, परम पवित्र आचरणाचे कर्मनिष्ठ सात्त्विक सशक्त ब्राह्मण असून प्रसंगच येत गेल्यामुळें पहिलवान ह्मणून पुढें आले. पण याहि बाबींत त्यांनीं हिंदुस्थानभर कीर्ति मिळविली. आज त्यांच्या शिष्यसंप्रदायाच्या शाखा हिंदुस्तानांतील बहुतेक प्रमुख शहरीं असून पुण्यांतहि त्यांचे वेळीं स्थापन झालेल्या तीन तालमी अद्याप शनवार पेठेंत आहेत. हरिपंत बरवे, गोपाळराव सोहनी, कासमभाई व काशिचे कोंडभट्टनाना हे यांचे प्रमुख शिष्य. यांचे वडील पेशव्यांचे आश्रित वैदिक होते. सवाई माधवरावांचे कारकिर्दींत बाळंभट्ट अल्पवयी असतांच पुण्यांतील प्रसिद्ध पहिलवान सदोबा तेली याशीं कुस्ती खेळून त्यांनीं सदोबाला चीत केलें. निजामदरबारचे दोन पहिलवान अली व गुलाब हे पंजाब वगैरे हिंदुस्थानच्या प्रमुख भागांतून अजिंक्यपत्रें घेत घेत पुण्यास येऊन थडकले. दुसऱ्या बाजीरावांच्या पदरच्या पहिलवानांनीं सहा महिन्यांची मुदत घेतली पण कोणीच तयार होईना या मुदतींत बाळंभट्ट कोठूरपासून १७-१८ कोसांवर वणी गांवीं गेले व तेथील सप्तशृंग पर्वतावरील देवीपुढें एकतीस दिवस त्यांनीं सप्तशतीच्या पाठांचें अनुष्ठान केलें. ते या मुदतींत फक्त फलाहार करीत. वर्दी प्रसन्न होऊन प्रत्यक्ष बजरंगानें माकडाच्या रूपानें येऊन तीन दिवस यांस मल्लविद्येचें शिक्षण दिलें. अखेर मातोश्रींचा आशीर्वाद घेऊन बाळंभट्ट पुण्यास आले. शनवारवाड्यापुढच्या पटांगणांत अलीशीं तासभर कुस्ती खेळून गळ्यांत यमपाश (खोडा) घालून त्यांनीं त्यास चीत केलें. तो रक्त ओकूं लागतांच गुलाबनें माघार घेऊन पराजय कबूल केला बाजीरावानें मिरवणूक काढून त्यांस घरीं पोंचविलें व सन्मान करून नेमणूक करून दिली व राजघराण्यांतील मुलांस तालीम शिकवण्यास सांगितलें. रेसिडेंट एल्फिन्स्टन् साहेबासहि यांनीं आपल्या मल्लविद्याकौशल्यानें चकित करून सोडलें होतें. १८११-१२ चे सुमारास यांचें लग्न झालें. यांस राम, लक्ष्मण व नारायण अशीं तीन अपत्यें झालीं. त्यांनींहि पुढें वडिलांचें नांव चालू ठेवलें. १८१८ सालीं आठ लक्ष रुपयांच्या नेमणुकीवर बाजीरावास भागीरथीतीरीं ब्रह्मावर्तास पाठविलें तेव्हां बाळंभट्टहि तिकडे गेले. पंजाबी मल्ल सुल्तानसाहेब यांशीं चौदा दिवस कुस्ती खेळून त्यास यांनीं चीत केलें व पुढें हिंदुस्थानभर शिष्यवर्गासह हिंडून दिग्विजय केला. ब्रह्मावर्तास फेंपऱ्या अपस्मारानें आजारी असतां यांनीं गंगेंत जलसमाधि घेतली. 'सम्पादक'

लोकस्थिति कशी होती,—ह्मणजे बापलेक, नवराबायको, बहीणभावंडें, धनीचाकर, गुरुशिष्य इत्यादिकांचे परस्पर संबंध कसकसे होते; धर्मावर लोकांची कितपत श्रद्धा होती, त्यांचें आचरण कसें होतें; मेकॉलेप्रभृति तत्त्ववाद्यांच्या मताप्रमाणें सर्व येथून तेथून लबाड व मूर्ख होते किंवा कसें; त्याप्रमाणेंच शुभवर्तमानाची बातमी किंवा एकेश्वराचें वर्तमानही त्या वेळेस कानीं येण्याचा संभव नसून उलटा मूर्तिपूजेचा व पुराणांचा अंमल मात्र जारीनें सुरू होता, मग घरोघर व्यभिचार, लांडीलबाडी, मारामाऱ्या हे प्रकार सुरू असत किंवा काय; लोकांत कोणत्या विद्यांचा कितपत अभ्यास सुरू असे, व अभ्यासाची रीति कशी होती; मुसलमानी विद्येचा, भाषेचा, व रिवाजाचा कितपत प्रचार होता; मुल्लासाहेबांच्या पवित्रशास्त्रानें हिंदुधर्माच्या अंधकारांत सत्याचा प्रकाश कितपत पाडला होता, व 'न काशी मक्का वा शिवशिव न हिंदुर्न यवनः'§ ही स्थिति‡ कितपत दृष्टीस पडत असे; याप्रमाणेंच लोकांतील उत्सव, रीतरिवाज, पेहेरावाच्या तऱ्हा, वगैरे सर्व कांहीं वरील इतिवृत्तांत समाविष्ट झालें पाहिजे. मराठे लोकांविषयीं अमुक प्रकारची एक माहिती यांत मिळत नाहीं असें जोंपर्यंत राहील तोंपर्यंत 'महाराष्ट्र देशाचा इतिहास' अपूर्णच समजायाचा !

आतां हें खरें कीं, वरील मानानें पाहिलें असतां संपूर्ण इतिहास असा कधींही मनुष्याच्या हातून तयार व्हावयाचा नाहीं; कां कीं सर्व प्रकारची माहिती कोणाला असणार आहे ? व ती सर्व मिळावी तरी कशी ? पण असें आहे ह्मणून इतिहासाचें यथार्थ स्वरूप सांगणें बरोबर नाहीं असें मात्र होत नाहीं. आकाश अनंत आहे ह्मणून आपल्या आढ्याला आभाळ लागलें आहे असें ह्मणून कसें चालेल ? वामनाचा श्लोक सर्वविश्रुतच आहे—

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ।

हाच न्याय धरून अर्वाचीन पाश्चात्य इतिहासकारांनीं कोणत्याही राष्ट्राचा इतिहास

---

§ १९ व्या म्हणजे जुलै १८७५ च्या अंकांत सुभाषित या सदराखालीं हा सर्व श्लोक व त्याचा अर्थ देऊन पुढील टीप जोडली होती:—

वरील पद्यावरून हल्लींप्रमाणेंच गेल्या शतकांत धर्माच्या संबंधानें बरीच चलबिचल झाली असावी असें दिसतें. म्हणजे आलीकडे तीस चाळीस वर्षें जसा ख्रिस्तप्रभूचा प्रभाव गाजत आहे तसाच यापूर्वी मक्केच्या पैगंबराचाही चोहोंकडे गाजत असावा असें अनुमान होतें. वरील श्लोकांतील वर्णन [''संध्या-नमाज, मुंज-सुंता, रोजा-एकादशी, काशी-मक्का यांपैकीं कशाचीच फिकीर नसणें''] सं० थोडासा फरक केला असतां सध्यांच्या काळीं शेंकडों मनुष्यांस पुरतेपणीं लागेल. कित्येकांची तर आत्म्याच्या तारणाविषयीं अशी जबरदस्त आतुरता दृष्टीस पडते कीं, सकाळीं विकच्छ होऊन मुल्लासाहेबांबरोबर निमाजाचें पठण, दुपारीं पंढरीच्या पताकेसमोर तुकाराम महाराजांचा गाथा, तिसरें प्रहरीं योगाभ्यास, सायंकाळीं पाळंधांचीं सुरस पद्यें, आणि रात्रीं वेळेनुसार ईश्वर-पुत्र-शरीर-भोजन ! तेव्हां एकंदर मतलब काय कीं, सरतेशेवटीं ईश्वर ज्या द्वारानें हाक मारील तिकडून आंत घुसायाला तयारी ! 'सम्पादक'

‡ काशीयात्राहि नको, मक्केलाहि पण जुमानणार नाहीं, एकूण धड ना हिंदु ना मुसलमान अशी केविलवाणी स्थिति. 'सम्पादक'

लिहितांना केवळ राजकारणाच्या उलाढालींविषयींच न लिहितां लौकिक स्थितीचें यथावत् स्वरूप उतरण्याविषयींही नेहेमी प्रयत्न केलेला आढळतो.[1] आतां डफ् साहेबांच्या ग्रंथांत वरील प्रकार कितपत आढळतो हें आमच्या वाचकांस सांगायास नकोच. आज पन्नास वर्षांत आमच्या महाराष्ट्राविषयींच्या माहितीचा ग्रंथ म्हटला म्हणजे काय तो त्यांचाच एक तयार झालेला आहे. त्यांत जो एकदां मजकूर आला आहे, व जीं मतें प्रगट झालीं आहेत, तीं कायम. तीं ताडून पाहण्यास दुसरा कोणताही ग्रंथ नाहीं. आतां येवढें एक बरें आहे कीं, आमचे इतिहासकार मेकॉलेच्या तालमीपैकीं नसल्यामुळें त्यांनीं आपल्या ग्रंथांत आपली फुशारकी व रिकामें अद्वातद्वा कांहीं तरी तर्कट जें भरून टाकायाचें तें न करतां आमच्या पूर्वजांचे बरेच गुण ओळखले आहेत,[2] व मिळवलेल्या विपुल सामग्रीचा यथार्थ उपयोग करून ती यथास्थित दिली आहे. पण वर जी अवांतर प्रकारची माहिती सांगितली तीतलें त्यांच्या बखरींत कोठें अक्षरही सांपडायाचें नाहीं. तर ती प्राप्त होण्याविषयीं जे उत्सुक असतील त्यांची इच्छा प्रस्तुत पुस्तकावरून* पूर्ण होणार आहे. यांत पूर्वींचे जे जे लेख मिळतील ते सर्व छापण्याचा संकल्प असल्यामुळें वरील जिज्ञासा तृप्त होण्याचा हाच एक मार्ग आहे हें उघड आहे. याशिवाय वरील इंग्रेजी इतिहासांतील जागोजागच्या खांचाखोंचा भरून काढण्यास व तो तपासण्यास वरील जुने लेख उपयोगी पडणारे आहेत व भाषाज्ञानाच्या दृष्टीनेंही ते इष्ट आहेत हें उघडच आहे. सदरील पुस्तकांत पहिलें

---

१. आलीकडील साऱ्या लहानमोठ्या इतिहासांत वरील नवी पद्धति दृष्टीस पडते. त्यांतून गिबन् व मेकॉले यांच्या इतिहासांत तर ती भरपूर आढळते. मेकॉलेच्या अवांतर निबंधांचा, कवितांचा वगैरे जो एक तिसरा भाग छापलेला आहे त्यांत 'इतिहास' या विषयावर एक सविस्तर निबंध लिहिलेला आहे; त्यांत वरील पद्धतीच्या यथार्थ स्वरूपाचें प्रतिपादन केलें आहे. हा निबंध वरील ग्रंथकर्त्यानें पूर्ववयांत लिहिला आहे तेव्हां यावरून स्पष्ट कळून येतें कीं, स्वदेशाचा इतिहास लिहिण्याविषयीं स्फूर्ति त्यास तेव्हांपासून होत होती!

२. डफ् साहेबांनीं आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतच वरील अभिप्राय§ प्रगट केला आहे. प्राच्य राष्ट्रांचा इतिहास लिहिणारांनीं डफ् साहेबांचेंच व्रत चालवलें असतें तर किती बरें होतें!

§डफ्नें लिहिलें आहेः—"There being differences of opinion as to whether the writer of history should always draw his own conclusions or leave the reader to reflect for himself, I may expect censure or approbation according to the taste of parties. I have never spared my sentiments when it became my duty to offer them; but I have certainly rather endeavoured to supply facts than to obtrude my own commentraies and though I am well aware that, to gain confidence with one-half of the world, one has only to assume it, I trust that I shall not have the less credit with the other for frankly acknowledging a distrast in myself." 'EDITOR'

* काव्येतिहाससंग्रह पुस्तकावरून. 'सम्पादक'

प्रकरण जो इतिहास त्याच्या उपोद्घातांत वरील उपयुक्ततेच्या संबंधानें बराच मजकूर लिहिलेला आहे.

बाकीचे दोन भाग जे मराठी व संस्कृत कविता त्यांविषयीं कांहीं विशेष सांगावास पाहिजे असें नाहीं. पहिलीचा बराच अंश रा॰ माधव चंद्रोबा यांच्या हातून प्रसिद्ध झालेला आहे, व कित्येक 'ज्ञानेश्वरी' सारखे ग्रंथ भाविकजनांच्या आश्रयानेंही अनेक वेळां छापून निघाले आहेत. त्याप्रमाणेंच आलीकडे बाबू जीवानंद विद्यासागर§ यांनीं आपल्या छापखान्यांतून अनेक संस्कृत ग्रंथ छापून काढून सर्व संस्कृतज्ञांस सुलभ करून टाकले आहेत. तरी वरील कवितांचें कोठार अजून किती खल्लास व्हावयाचें आहे हें पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत सांगितलेंच आहे. प्रकृत मासिक पुस्तकांत आलीकडे त्यांस सांपडलेल्या तिन्ही ग्रंथांच्या यादी दिलेल्या असतात त्यांवरून, हरदासांच्या म्हणण्यांत प्रसंगवशात् जीं अश्रुतपूर्व प्रकरणें येतात त्यांवरून, व आमच्या पुस्तकाच्या २८ व्या अंकांत छापलेल्या यादीवरून,‖ महाराष्ट्रकविता अद्याप किती प्रसिद्ध व्हावयाची आहे याची कल्पना वाचकांस बरीच करतां येईल. त्याप्रमाणेंच सुमारें पंधरा वीस वर्षांपूर्वी छापलेलें जें 'कविचरित्र' त्यांत प्रत्येक ग्रंथकारांच्या कृतींचा उल्लेख करून शेवटीं जी एकंदर विल्हेवार याद दिली आहे तिजवरून व इतर अनेक संस्कृत ग्रंथांच्या यादीही छापलेल्या आढळतात त्यांवरून या दुसऱ्या भागाचा विस्तारही करून येईल. तर हे दोन्ही रसातळास मिळून नाहींसे न व्हावे, व इतक्या मोठमोठ्या ग्रंथकारांच्या परिश्रमाचें अमूल्य फळ होऊन न झाल्यासारखें न व्हावें असें जर आमच्या देशबंधूंस वाटत असेल तर तीही तजवीज सदरील मासिक पुस्तकांत होत असून रसिकांची विविध काव्यास्वादनाविषयींची उत्कंठाही यांत पूर्ण होणार आहे.

८. येथवर प्रस्तुत पुस्तकाच्या स्वरूपाविषयीं विवरण झालें. आतां त्याच्या विषयींच खुद्द जें लिहावयाचें तें अर्थातच फार लिहिण्यासारखें नाहीं; एकादा स्वतंत्र ग्रंथ असला म्हणजे त्याच्या भाषासरणीविषयीं, त्यांतील मजकुराच्या खरेखोटेपणाविषयीं, वगैरे लिहिणें अवश्य येतें; पण येथें तें अर्थात् कांहींच नाहीं. प्रस्तुत प्रकाशकांचा उद्योग केवळ प्रकाश-

---

§ कलकत्त्यास यांनीं काव्यसंग्रह नामक प्रचंड ग्रंथ प्रसिद्ध केला. याचे तीन खंड असून त्यांत अप्रसिद्ध संस्कृत काव्यांचें प्रकाशन केलें आहे. 'सम्पादक'

‖ एका लेखकानें पाठविलेली त्याजपाशीं असलेल्या मोरोपंतांच्या एकशेंचार काव्यांची यादी एप्रिल १८७६ च्या अंकांत देऊन त्यांपैकीं फक्त पंचवीसच माधव चंद्रोबांच्या 'सर्वसंग्रहांत' छापलीं असल्यामुळें महाराष्ट्रकवींचें किती ऋण त्यावेळीं फेडावयाचें राहिलें होतें हें दाखविण्यासाठीं छापलेल्या प्रकरणांवर फुल्या मारल्या होत्या. आतां मोरोपंतांचे समग्र ग्रंथ छापून निघाले आहेत.

'सम्पादक'

१. जागोजागच्या पुस्तकसंग्रहांच्या यादी छापलेल्या आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं पाहिल्या असतीलच. एक याद काशीस निघणाऱ्या 'पंडित' नामक पत्रास जोडली असून ती आज कित्येक अंक सारखी चालली आहे. मुंबईस तर जुन्या संस्कृत ग्रंथांचें एक मोठें दुकानच आहे. त्यांचीही याद छापलेली आहे. हींत ६५१ संस्कृत ग्रंथ आहेत. त्यांपैकीं कित्येकांपुढें (दुष्प्राप्यम्) असा शेरा आहे. यावरून ते ग्रंथ किती टोकांवर आले आहेत हें सांगावयास नकोच!

नाचाच होय; जे जुने ग्रंथ आजपर्यंत अप्रसिद्ध राहिले ते सर्वांस सुलभ करून द्यावयाचे येवढेंच त्यांचें काम. त्यांचा असा या पुस्तकांतील मजकूर ह्मटला ह्मणजे ग्रंथारंभीं प्रसंगवशात् प्रस्तावना दिली तर ती व पृष्ठांखालच्या टिपा. यास्तव इतर पुस्तकांत बाह्य व्यवस्थेच्या संबंधाचा विचार जो केवळ अप्रधान असतो तोच येथें प्रधान होय. पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत वरील माहिती दिलीच आहे. यास्तव ती व्यवस्था आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अंकांत दृष्टीस पडते कीं नाहीं येवढें सांगितलें ह्मणजे बस झालें.

पूर्वसंकल्पाप्रमाणें या पुस्तकांतील प्रत्येक प्रकरणाच्या पृष्ठांवर निरनिराळे अंक घातले आहेत; तेव्हां एक एक प्रकरण जसजसें पुरें होईल तसतसें तें निराळें बांधून संग्रहास ठेवतां येईल. तसेंच तिन्ही भागांतील मजकुरावर जागोजाग टिपा दिल्या आहेत. जुन्या बखरींची भाषा हल्लींच्या भाषेहून पुष्कळ प्रकारें निराळी असल्यामुळें मूळ रचना कायम ठेवून क्वचित् स्थलीं फेरफार केल्यास तो कंसानें दाखवला आहे. अप्रसिद्ध शब्दांचे प्रसिद्ध पर्याय देऊन ठिकठिकाणीं ग्रंथांतरींची वगैरे अवांतर माहिती भरीस घातली आहे. जागोजाग ग्रांट् डफ् साहेबांच्या बखरीचा व मूळ लेखाचा विरोध किंवा दोहोंतील न्यूनाधिक्य हें दाखवलें आहे. याप्रमाणें मराठी व संस्कृत कवितेंतही दुर्बोध शब्दांची व्याख्या करून दोघां मराठी कवींचें यथोपलब्ध वृत्त दिलें आहे. आलीकडे दोन तीन अंकांत नवीन उपलब्ध झालेल्या ग्रंथांच्या यादीही मलपृष्ठावर दिलेल्या आहेत. असा क्रम ठेवल्यानें शोधक लोकांस शोध करण्यास सवड होणार आहे, व सदरील पुस्तक घेणारांसही प्रकाशकांपाशीं किती संग्रह होत चालला आहे हें कळल्यानें त्याच्या योग्यतेविषयीं व शाश्वतीविषयीं आश्वासन दिल्यासारखेंही होणार आहे.

सदरील पुस्तकास घेणारांच्या सोयीकरतां जरी मासिक पुस्तकाचें स्वरूप दिलें आहे, तरी वस्तुतः पाहतां त्यांत एक एक ग्रंथ संग्रहास ठेवतां येईल अशा रीतीनें प्रसिद्ध करण्याचाच उद्देश असल्यामुळें त्याचा कागद व छापणी हीं दोन्ही तशींच ठेवलीं आहेत. कागद बराच जाड असून छापणीही सुरेख आहे. पहिल्या पहिल्या अंकांचा सांचा मात्र एकसारखा नसल्यामुळें व ते अगोदरच कापून ठेवल्यामुळें पुढें एकंदर ग्रंथ बांधतांना पंचाईत पडणार आहे; पण पुढील अंकापासून एक सांचा राखण्याची व पानें जशींच्या तशींच बांधण्याची तजवीज ठेवली आहे, असें दिसतें. सातवा व आठवा हे अंक तर फारच सुरेख निघाले आहेत. तर हाच क्रम पुढें सुरू ठेवण्याविषयीं व वरील अंकांत अशुद्धेंही कोठें नजरेस येत नाहींत तर त्याविषयींही तशीच खबरदारी पुढें ठेवण्याविषयीं पुस्तकप्रकाशकांस आह्मी सूचना करतों.

१. सदरील पुस्तक हें दोघां उपपदधाऱ्यांच्या परिश्रमाचें फळ होय, ही हल्लींच्या काळाला एक मोठी लक्षांत ठेवण्यासारखीच गोष्ट होय. कांहीं काळापूर्वीं सुधारणा ऐन शिखरास जाऊन पोंचल्याचें जें मान दिसत होतें त्यास आतां कल पडून लोकांच्या मनानें उलट खाल्लयाचीं जीं चिन्हें आलीकडे चोहोंकडे दृष्टीस पडूं लागलीं आहेत त्यांपैकींच हेंही एक होय. इंग्रेजी ग्रंथांचीं पुरश्चरणें करतां करतां ज्यांचे एकदांचे गंगेंत घोडे न्हाले, व या

न्हाण्याबरोबर आपली अडाणी जन्मभाषा, वेडगळ आचार, अप्रयोजक व कुत्सित धर्म, या सर्वांचें पार क्षालन करून टाकून सुधारणेचीं शुद्ध तत्त्वें ज्यांनीं अंगीकारली, त्यांनीं मराठी बखरी छापणें व वामनमेरोपंतांचे ग्रंथ प्रसिद्ध करणें हें दहापंधरा वर्षांपूर्वी केवढें विलक्षण वाटलें असतें ! हल्लीं ज्याप्रमाणें एकादा बी. ए. चड्डीकाच्या भिडवून अखाड्यांत खम ठोकून उभा राहिला असतां लोकांस आचंबा वाटेल, किंवा एकादा एम्. ए. पुरा याज्ञिक बनून स्वाहाकाराला बसला असतां पाहणारे तोंडांत बोट घालून राहतील, त्याप्रमाणेंच महाराष्ट्रदेशीय वीरांवर व कवींवर कीर्तिचामरें उडवून आपल्या युनिवर्सिटीच्या झग्यास कलंक लावणाऱ्या किताबवाल्यांचाही सर्वांस कांहीं काळापूर्वी अतिशय चमत्कार वाटला असता ! झगेवाल्यांचीं कामें ह्मटलीं ह्मणजे त्यांनीं सांजसकाळ लायब्ररीचें दर्शन चुकूं देऊं नये; कधीं काळीं कोठें सभा झाली तर अध्यक्षस्थान पतकरून तेथून आपलें बिनचूक मत सर्वांच्या पुढें झोकून द्यावें,—तेंही बहुधां इंग्रेजींतच, पण अज्ञ श्रोत्या मंडळीची दया आलीच तर घेडगुजऱ्या भाषेंत; मराठी लेखणीला तर कधीं शिवायाचें नाहींच, फार मेहेरबानी झाली तर एकाद्या ग्रंथावर इंग्रेजींत अभिप्राय द्यावयाचा. त्यांतून चान्सलर् साहेबांनीं बोळवणी करतांना दिलेल्या गुरुमंत्राची कोणास कधीं आठवण होऊन स्वदेशसेवा करण्याचें मनांत आलेंच, तर ती सेवा अशी छोटेखानी व्हावयाची नाहीं, तर नवे धर्म, कवितेच्या नव्या शाखा, पार्लमेंटास अर्ज, समग्र शास्त्रोदधीचें मंथन,—असल्या कांहीं तरी दांडग्या प्रकरणावर उद्योग सुरू व्हावयाचा ! खरेंच; ज्या मंदराचलानें अवंघ्या महोदधीस गरगर फिरायास लावून लक्ष्मी, पारिजात, चंद्र यांसारखीं रत्नें ढवळून बाहेर काढावीं त्यानें क्षुद्र नवनीताकरतां दह्याच्या माथणींत कसें शिरावें ? ज्या गजेंद्रानें सार्वभौम राजा जींत बसला आहे अशी अंबारी पाठीवर घ्यावी, त्यानें क्षुद्र पशूंप्रमाणें सामान्य व्यवहाराचीं कामें कशीं करावीं ? मोठ्या अफाट दर्यांवरून भर तुफानांत चालून ज्या महानौकांनीं एका देशाची संपत्ति दुसऱ्या देशांत नेऊन भरावी, त्यांच्याकडून भिकार लहान नावांची कामगिरी कशी घडावी ? तेव्हां आजपर्यंत युनिवर्सिटींत निपजलेल्या प्रचंड मंडळीकडून बारीकसारीक देशहिताचीं कामें झालीं नाहींत हें नीटच आहे. पण आह्मांस लिहिण्यास संतोष व अभिमान वाटतो कीं, प्रस्तुत पुस्तक चालवणाऱ्या आमच्या विद्यालयबंधूंनीं वरच्यासारख्या अस्मानभराऱ्या मारण्याचें मनांत न आणतां आपल्या शक्तीप्रमाणें ही अल्प देशसेवा करण्याचें योजून ती बिलकुल कसर न करतां ते दर महिन्यास बजावीत आहेत. तर आतां आमच्या देशबंधूंस शेवटीं येवढीच प्रार्थना आहे कीं, त्यांच्या ठायीं या आर्यभूमीविषयीं जर खरी प्रीति व पूज्यबुद्धि वसत असेल, आपल्या पूर्वजांविषयीं खरें ज्ञान करून घेण्याची जर त्यांची इच्छा असेल, स्वभाषेच्या अभ्युदयाविषयीं जर ते कळकळ बाळगीत असतील व अनेक कवींचीं वाग्रत्नें जीं साऱ्या देशभर केरांत लोळत आहेत व कोंदणाविना ज्यांची प्रभा व्यर्थ होऊं पाहत आहे त्यांचा संग्रह करून काव्यरसाच्या अनुपम आस्वादास आपणांस व आपल्या संततीस जर अक्षयीं अंतरायाचें नसेल, तर या नव्या उभारलेल्या इमारतीस अर्थद्वारां व शोधद्वारां मदत करण्यास त्यांनीं बिलकुल अनमान करूं नये. प्रस्तुत उद्योग हा

मोठा अवडंबर असल्यामुळें त्यास वसवतें लोकांचें आनुकूल्य त्यांस पडेल तसतसें पुस्तक वाढवण्याचाही प्रकाशकांचा पूर्ण मनोदय आहे हें सांगून लेखणी ठेवतों.'

## नवीन पुस्तकें.

वैयाकरणकिरातादपशब्दमृगाः क यान्तु संत्रस्ताः ।
यदि नट-गणक-चिकित्सक-वैतालिक-वदन-कन्दरा न स्युः ॥[2]

अंक ५१—नवीन पुस्तकें—( अभिप्राय )—

आमच्याकडे कांहीं दिवसांपूर्वी 'अपभ्रष्टशब्दचंद्रिका' व 'ज्ञानेश्वरीपरिभाषा' हे दोन ग्रंथ त्यांच्या कर्त्यांनीं पाठवले. यास्तव वरील ग्रंथकारांचे आभार मानून सदरील पुस्तकांविषयीं आह्मी आपलें मत वाचकांस कळवितों.

अपभ्रष्टशब्दचंद्रिका—हा ग्रंथ रा० प्रभाकर रामचंद्र पंडित यांनीं केला आहे. हे बडोदें येथील 'व्हर्नॅक्युलर् कॉलेज ऑफ् सायन्स' नामक पाठशाळेंतील गुरु आहेत. या ग्रंथाचा उद्देश त्याच्या नांवावरून व्यक्त होतच आहे, की संस्कृत, फारसी वगैरे भाषांतून अपभ्रंशरूपानें जे शब्द मराठींत आले आहेत त्यांचा यांत संग्रह केला आहे. या ग्रंथांत आरंभीं अपभ्रंशाचे ५२ नियम दिले आहेत. पुढें कोशांत वर्णक्रमाचें व्यवस्था आहे. आरंभीं अपभ्रष्ट शब्द, नंतर मूळ शब्द, पुढें अपभ्रंशाच्या नियमांचा आंकडा, आणि शेवटीं कोठें कोठें मूळ संस्कृत शब्दाचा धातु व अर्थ, व कोठें अपभ्रष्ट शब्दावर विशेष व्याख्या. वर्णक्रमाचे सदरील ग्रंथांत सुमारें १००० शब्दांची व्युत्पत्ति केली आहे.

प्रस्तुतसारख्या ग्रंथाची सांप्रत काळीं फार अवश्यकता आहे हें उघड आहे. हल्लीं महाराष्ट्रभाषेकडे सर्वांचें लक्ष लागून तिच्या अभिवृद्ध्यर्थ अनेक प्रकारें उद्योग चालू आहे.

---

१. प्रस्तुत पुस्तकाच्या मलपृष्ठावर छापलेल्या ज्ञालेले म्हणून जे ग्रंथ जाहिरातींत दिलेले आहेत त्यांवरूनच पाहतां ४८ पृष्ठांच्या भागांचें एक्या वर्षाला सोडावी केवढा आहे त्याची कल्पना थोडी-बहुत वाचकांस होईलच. दोनच उदाहरणें वरील उल्लेखाच्या प्रत्यर्थ देतों. तुकारामाचें 'गाथा' छापणें चालू आहे व मोरोपंतांच्या 'मंत्ररामायणा'चाही कांहीं भाग निघाला आहे; पण हे दोन्ही ग्रंथच समग्र निघण्यास हल्लींच्या मानानेंही दोन वर्षांच्या वर तरी लागतील !

२. "वैयाकरणरूप किरातापासून जर पळालेले जे अपशब्दरूप मृग त्यांनीं परतीं कोठें जावें ? जर नट, ज्योतिषी, वैद्य व बंदिजन यांचीं मुखें या गुहा त्यांस नसत्या तर."

वास्तव तिचे घटकावयव ज्या संस्कृत, प्राकृत, फारसी, व अरबी भाषा त्यांतून तिचा शब्द-संग्रह कसकसा निष्पन्न झाला हें समजणें या काळीं अत्यंत आवश्यक होय. मूळ धातूंचें किंवा मूळ शब्दांचें ज्ञान झालें असतां साधित शब्दांचें व अपभ्रंशांचें ज्ञान किती सुलभतेनें होतें हें सर्व भाषाभिज्ञांस माहीत आहेच. शिवाय ज्याप्रमाणें मूळ खोडावर नजर ठेवली असतां फांद्यांचा विस्तार तेव्हांच ध्यानांत येतो येवढेंच नाहीं, तर त्यांचा परपस्परांशीं व मुळाशीं कसा संबंध आहे हेंही लक्षांत येतें, त्याप्रमाणेंच धातु व मूळ शब्द यांचीही गोष्ट होय. एक धातु समजल्यानें त्यापासून निघालेल्या अनेक शब्दांचें ज्ञान होतें व या शब्दांतील प्रत्येकास त्याचा त्याचा अर्थविशेष कसा प्राप्त झाला हेंही समजण्यास मार्ग होतो. अपभ्रंशांचीही अशीच गोष्ट आहे. अपभ्रंशांचे सामान्य नियम एकदां कळले ह्मणजे शेंकडों शब्द जे अगदीं पारखेसे वाटत होते ते एकदम परिचितसे भासूं लागतात. चिरवियुक्त आप्तजनांची भेट होऊन संबंधाची पूर्वपीठिका एकदां समजली असतां ती जशी आजन्मांत विसरण्याचा संभव राहत नाहीं, त्याप्रमाणें चालू भाषेंत वहिवाटणाऱ्या शब्दांची परंपरा एकदां समजण्यांत आली ह्मणजे तीही स्मरणांतून सहसा न जाई अशी मनांत दृढ होऊन जाते. शिवाय या अपभ्रंशांत राष्ट्राचे मनोव्यापारही कधीं कधीं प्रतिबिंबित झालेले दृष्टीस पडतात. वास्तव मन्वंतरींच्या प्राण्यांचे अस्थिपंजर जसे भूगर्भशास्त्रज्ञांस उपयोगी, तसेंच वरील शब्दही भाषाविवेचकास होत. त्यांत कधीं प्राचीन इतिहास, कधीं प्राचीन प्रचार, कधीं प्राचीन समजुती, यांचा ठसा उमटून राहिलेला त्याच्या नजरेस येतो!

तेव्हां हें अपभ्रंशशास्त्र जरी व्याकरणाचीच शाखा होय तरी तें त्यासारखें नीरस व रुक्ष नाहीं हें सहज ध्यानांत येईल. ही शाखा पल्लवांनीं सुशोभित होऊन फळांनीं लादण्यासारखी आहे. हल्लींचे प्रख्यात पदार्थविज्ञानवेत्ते प्रोफेसर § हक्स्ले यांनीं इंग्लंडांतील एका मजूर लोकांच्या सभेपुढें जसें 'खडू'वर व्याख्यान दिलें, आणि नुसत्या खडूवरून हजारों वर्षांमागील पृथ्वीची स्थिति, तींत कालगत्या झालेले फेरफार, वगैरे विषयांवर पुष्कळ निरूपण केलें,[1] त्याप्रमाणेंच प्राचीन शब्द कालप्रवाहाच्या बरोबर लोटत लोटत येतां हल्लीं

---

§ प्रोफेसर् हक्स्ले ( Thomas Henry Huxley 1825–1895 ). विख्यात शास्त्रवेत्ता व संशोधक. डार्विन्चा 'Origin of Species' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर हक्स्ले उत्क्रांतिवादी बनला. हा रॉयल् सोसायटीचा अध्यक्ष ( १८८३ ) व प्रिव्ही कौन्सिलरहि ( १८९२ ) झाला. 'Man's place in Nature' हा याचा प्रमुख ग्रंथ असून शिवाय याचे कित्येक किरकोळ निबंधहि प्रसिद्ध आहेत. 'सम्पादक'

१. 'Lay Sermons, Essays and Reviews' या नांवाचें पुस्तक वरील ग्रंथकारानें निराळें छापलें आहे त्यांत वरील व्याख्यान सांपडेल. यांत वरील शास्त्रज्ञानें आपल्या श्रोत्यांस असें सिद्ध करून दिलें कीं, खडूची उत्पत्ति समुद्राच्या तळाशीं होते, व तेथें तो बनून राहण्यास पुष्कळ काळ लागतो. आतां सध्यांची स्थिति पाहिली तर खडू हा पर्वतावरील प्रदेशांत सांपडतो, तेव्हां फार काळापूर्वीं मोठमोठे पर्वतही समुद्रांत बुडालेले होते असें अनुमान होतें. हें अनुमान पवित्रशास्त्रास किती विरुद्ध आहे हेंही वरील व्याख्यात्यानें शेवटीं सांगितलें आहे. तेव्हां एका खडूच्या खड्यावर केवढा विषु रचला गेला पाहा!

त्यांस प्राप्त झालेल्या रूपांतरावरून पुष्कळ व्याख्यान करतां येणार आहे. या भाषाशास्त्राकडे आलीकडे युरोपीय संस्कृतज्ञांचें किती लक्ष लागत चाललें आहे, हें• मोक्षमुल्लर साहेबांच्या Lectures on the Science of Language •( भाषाशास्त्रावर व्याख्यानें ), यासारख्या ग्रंथांवरून स्पष्ट होत आहे. त्याप्रमाणेंच इंग्रेजी भाषेंतील शब्दांवर ट्रेंच्* साहेबांचे Study of Words ( शब्दांची व्याख्या ), Select Glossary ( निवडक शब्दांवर व्याख्यान ), वगैरे ग्रंथ जे आलीकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरूनही प्रस्तुतसारख्या विषयावरील ग्रंथ किती व्यापक व चित्तवेधक करतां येणार आहे याचें सहज अनुमान होतें. असा ग्रंथ करूं जाणाराच्या अंगीं पुढील गुण जितपत असतील त्या मानानें वरील गुण ह्मणजे व्यापकत्व व•चित्तवेधकता हे त्यांत येणार आहेत. हे गुण चालू भाषेचें ज्ञान, संस्कृत, फारसी व अरबी यांची माहिती, इतिहासादि विषयांशीं परिचय, आणि विशेषतः लौकिक भाषाप्रकार व लोकव्यवहार यांकडे निरंतर लक्ष पुरवण्याची संवय, शिवाय सामान्य बहुश्रुतपणा आणि सुबोध व मनोवेधक अशी ग्रंथरचना करण्याची हातोटी, हे होत. आमच्या पुस्तकांतच कधींमधीं 'भाषापरिज्ञान' या सदराखालीं जो मजकूर येत गेला आहे, त्यावरून ट्रेंच् साहेबांनीं केलेल्या ग्रंथांच्या नमुन्यावर महाराष्ट्रभाषेंत ग्रंथ होण्यास किती साधन आहे, हें भाषामर्मज्ञांच्या लक्षांत आलेंच असेल.

सदरील पुस्तकाची जाहिरात जेव्हां आमच्या दृष्टीस पडली, तेव्हां पुढें होणारा ग्रंथ वरील कलमांत दाखवलेल्या नमुन्याचा होईल असें आह्मांस वाटत होतें. रा• पंडित यांस फारसी व अरबी भाषांची माहिती कितपत आहे हें ठाऊक नाहीं, पण त्यांस संस्कृताचें ज्ञान चांगलें आहे असें दिसतें. तेव्हां या ज्ञानाचा उपयोग करून महाराष्ट्रभाषेंतील शब्दांविषयीं व प्रयोगांविषयीं पुष्कळ शोध करून चांगला व्यापक, उपयुक्त, व चित्तवेधक असा संग्रह ते विद्यार्थ्यांस व सामान्यतः सर्व विद्याप्रिय जनांस अर्पण करतील• अशी आमची अपेक्षा होती. पण प्रकृत ग्रंथावरून पाहतां वरील अपेक्षा व्यर्थ होती असें ह्मणणें भाग येतें.

---

* ट्रेंच् ( Richard Chenevix Trench 1807–1886 ) केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांतून ग्रॅज्युएट् झाला ( १८२९ ). Study of Words हा याचा ग्रंथ १८५१ सालीं प्रसिद्ध झाल्यामुळें भाषाशास्त्री ह्मणून याची ख्याति झाली. Winchester वुइंचेस्टर् Diocesan Training School च्या विद्यार्थ्यांपुढें दिलेलीं व्याख्यानें या पुस्तकांत थोड्याफार सुधारणा करून छापलीं होतीं. या ग्रंथाचा असें दाखविण्याचा हेतु होता कीं एकेकट्या शब्दांत ऐतिहासिक आणि नैतिक सत्यसिद्धांतांचा त्याचप्रमाणें मनोविकार व कल्पना यांचा प्रचंड संग्रह भरून राहिला आहे. ( In words even taken singly 'there are boundless stores of moral and historic truth, and no less of passion and imagination, laid up' ) व हें अनेक योग्य उदाहरणें दाखल करून या ग्रंथांत सिद्ध करून दाखविलें आहे. याचे आणखी ग्रंथ ह्मणजे 'English Past and Present' (1855) 'A Select Glossary of English Words' ( 1859 ) हे होत. इंग्रेजी कोशांतील दोष व उणिवा या विषयावर एक निबंध यानें १८५७ सालीं वाचला व त्यामुळें Oxford New English Dictionary चें काम सुरू झालें. 'सम्पादक'

'चंद्रिका' कर्त्यांचा उद्देश फक्त मोलस्वर्थ, मॉनियर् विल्यम्स्,|| विल्सन्, क्यांदी,‡ इत्यादि कोशकर्त्यांच्या परिश्रमाचें एकीकरण करून व प्राकृत भाषांचा प्रख्यात जैन वैयाकरण हेमचंद्र¶

---

|| मॉनियर् विल्यम्स् ( Sir Monier Williams ) मुंबईस १२ नोव्हेंबर १८१९ सालीं जन्मला. ऑक्स्फर्ड् येथें १८३७ मध्यें मॅट्रिक् झाल्यावर सिव्हिल् सर्व्हिसच्या उमेदवारांत निवडून आला. पण आपल्या आईच्या फार आग्रहावरून (कारण तिचा एक मुलगा हिंदुस्तानांत वारला होता.) हा मार्ग सोडून तो इंग्लंड्ला परत आला व त्यानें युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें संस्कृतचें अध्ययन सुरू केलें. तो १८६० पर्यंत अनेक ठिकाणीं संस्कृत, पर्शियन् व हिंदी या भाषांचा प्रोफेसर् होता. १८६० सालीं तो मॅक्स् मुल्लर्चा प्रतिस्पर्धी असून ऑक्स्फोर्ड येथें संस्कृतची Boden Professorship ची जागा त्याला मिळाली. संस्कृत–इंग्रेजी आणि इंग्रेजी-संस्कृत कोश ( १८७५ ), Indian Wisdom ( 1875 ), Anthology from Sanskrit Literature, व शाकुंतल नाटकाचें भाषांतर ( १८५३ ) हे त्याचे ग्रंथ. शिवाय हिंदी धर्मांचा अभ्यास करून ब्राह्मणधर्म, बौद्धधर्म, हिंदुधर्म या विषयांवरहि त्यानें पुस्तकें लिहिलीं. ऑक्स्फोर्ड् येथें Indian Institution ची स्थापना त्यानें केली. या संस्थेची कोणशिला १८८३ मध्यें युवराजाकडून बसविण्यांत आली व इमारतीचें काम १८९६ सालीं पुरें झालें. ११ एप्रिल १८९९ रोजीं तो मृत्यु पावला. प्रकृति खालावली असतांहि मरेपर्यंत संस्कृत भाषाशास्त्राचें त्याचें अध्ययन चालूच होतें.

‡ मेजर् टी कँडी ( जन्म १८०६, मृत्यु महाबळेश्वरीं १८७७. ) यानें १८२२ सालीं ईस्ट् इंडिया कंपनींत नोकरी धरली; १८३१ सालीं इंग्रेजी–मराठी कोश संपादिला; १८३२–१८३५ पर्यंत मराठी–इंग्रेजी कोशाचे कामीं मोलस्वर्थूला मदत केली; पण मोलस्वर्थ् आजारी पडून विलायतेस गेला व तेथेंहि प्रकृति लवकर सुधारेना म्हणून हस्तलिखितें त्यानें हिंदुस्थानांत पाठवून दिलीं. तेव्हां मुंबई-च्या गव्हर्नर्च्या सांगण्यावरून यानें १८४०–१८४७ पर्यंत खपून तो कोश पुरा केला. १८७३ च्या द्वितीयावृत्तीचे वेळीं दहा हजार रुपये याला मिळाले. हा १८५१–५५ पर्यंत पुण्याच्या पाठशाळेचा प्रिन्सिपाल् होता. १८५५ सालीं याला मराठी ट्रान्स्लेटर् नेमण्यांत आलें. जुनीं क्रमिक पुस्तकें २–६ यानेंच तयार केलीं होतीं. 'सम्पादक'

¶ हेमचंद्र:—जैन संन्यासी. मूळचें नांव चांगदेव, बापाचें नांव चाचिग व आईचें पहिनी. जन्म कार्तिक शुक्ल पौर्णिमा संवत् ११४५ ( सन १०८९ ). हा फक्त पांच वर्षांचा असतांना देवचंद नामक साधूनें धार्मिक सेवेकरितां पहिनीजवळ याची मागणी करून तिला मोठी रकम देऊं केली, पण पैसा न घेतांच तिनें मुलगा देऊन टाकला. माघ शु. चतुर्दशी रविवार रोजीं हा जैन उपदेशक झाला व सोमचंद्र असें नवें नांव त्यास देण्यांत आलें. बारा वर्षें अध्ययन केल्यावर हा आचार्य झाला व त्याला हेमचंद्र हें नांव मिळालें. अनहिलपट्टण येथें जयसिंह ऊर्फ सिद्धराज नामक कट्टा शिवभक्त राजा होता. त्याचें राज्य अबूपासून गिरनारपर्यंत व पश्चिम समुद्रापासून माळव्यापर्यंत पसरलें होतें. तो विद्येचा फार भोक्ता होता. त्यानें हेमचंद्रास आश्रय दिला. दरबारांतील ब्राह्मण प्रतिस्पर्ध्यांशीं भांडण्यांत हेमचंद्रानें फार कौशल्य प्रकट केलें. ११४३ सालीं जयसिंह वारल्यावर त्याचा पुतण्या कुमारपाल गादीवर आला व हेमचंद्रानें त्याला जैनमतानुयायी बनविलें ( संवत १२१६ मार्गशीर्ष शुक्ल द्वितिया. ) अजयपाल नामक कुमारपालाच्या मागून झालेल्या राजाचा प्रधान यशःपाल यानें लिहिलेल्या मोहराज-पराजय या नाटकांत कुमारपालाचें धर्मांतर हाच विषय आहे. जयसिंहाच्या विनंतीवरून सिद्धहेम-चन्द्राभिधस्वोपज्ञशब्दानुशासन हा सुमारें ४५०० सूत्रांचा व्याकरणग्रंथ व कुमारपालाच्या सांगण्यावरून योगशास्त्र हा ग्रंथ यानें लिहिला. चौऱ्याऐंशीव्या वर्षी प्रायोपवेशन करून यानें देह ठेविला. भाष्टि

[ पुढें चालू. ]

याचें साहाय्य घेऊन रा. तळेकर* यांच्या इंग्रेजी कोशाप्रमाणें किंवा रे. बाबा पदमनजी† यांच्या मराठी कोशाप्रमाणें एक लहानशी इमारत उठवून द्यावयाची येवढाच असावा असें दिसतें मग असल्या कार्याला प्रस्तुत ग्रंथकारासारख्यानें श्रम करायाला पाहिजे होते, किंवा ते सिद्ध झाले असतां त्याची शिफारस करण्यास जुन्या पंडितांस तसदी देण्याची गरज होती, असें. आह्मांस वाटत नाहीं. मोल्स्वर्थ् वगैरेंच्या कोशांचें चाळन करून अपभ्रष्ट शब्दांची याद करण्याचें काम कोणीही सहज करूं शकता. एकादा ख्रिस्ती 'दीक्षित', किंवा 'सह्याद्रिखंड'-कार एकादा फिरंगी डॉक्टर्,¶ अगर 'गुलामगिरी' कार एकादा बहादरही दररोज चार घटका खपता तर दोन तीन महिन्यांत असली हवेली रचून देता! असो; आतां हा ग्रंथ जसा तयार झाला आहे तसाच घेऊन त्यांतील गुणदोषांचें विवरण करूं.

हें पुस्तक जर वर सांगितलेल्या कोशाप्रमाणें विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरतांच केलें असेल तर त्यावर अपूर्णतेचा आरोप सक्रुद्दर्शनींही येणार आहे हें उघड आहे. मोल्स्वर्थ्चा कोश येवढा

---

काव्याच्या धर्तीवर द्व्याश्रयमहाकाव्य नांवाचा याचा व्याकरणोदाहरक पद्यग्रंथहि आहे. याच्या शब्दानुशासन नामक व्याकरणाचा शेवटचा अध्याय सर्व व्याकरणाच्या चतुर्थांशाइतका मोठा असून त्यांत त्या वेळीं उत्कर्षांत असलेल्या प्राकृत, शूरसेनी, पैशाची, मागधी व अपभ्रंश अशा पांच बोलभाषांचें ( संस्कृत नाटकांत स्त्रिया व हलक्या दर्ज्याच्या पात्रांच्या तोंडीं घालण्यांत येणाऱ्या भाषा ) व्याकरण आहे. कल्पकतेचा अभाव व अनुकरणप्रियतेची कमाल या दोन दोषांमुळें याचा व्याकरणग्रंथ मागें पडून १५ व्या शतकानंतर त्याची लोकप्रियता नाहींशी झाली. 'सम्पादक'

* श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर हे कँडीच्या हाताखालीं असून कँडी साहेबाचा त्यांच्यावर फार लोभ असे. यांनीं १८४७ सालीं इंग्रेजी–मराठी कोश व १८६६ सालीं संस्कृत व्याकरण हे ग्रंथ लिहिले. हे बेळगांवच्या सरदार शाळेंतील संस्कृताध्यापक व पुढें खानदेश जिल्ह्याचे डेप्युटी एज्युकेशनल् इन्स्पेक्टर् होते. 'सम्पादक'

† बाबा पदमनजी ( जन्म बेळगांव १८३१, मृत्यु १९०६. ) मूळचा हिंदुधर्मीय; आडनांव मुळे. ( सुरतेच्या कांसारांपैकीं. ) शिक्षण मिशन् स्कूल् बेळगांव, व एल्फिन्स्टन् स्कूल् मुंबई, या दोन ठिकाणीं झालें. ख्रिस्ती धर्माची सत्यता व. हिंदुधर्माच्या ईश्वरप्रणीतत्वाची अशक्यता यांबद्दल खात्री होऊन १८५४ सालीं हा ख्रिस्ती झाला. यानें पुण्याच्या फ्री चर्च मिशन् स्कूलमध्यें सोळा वर्षें शिक्षकाचें काम केलें. १८६० सालीं कँडीच्या इंग्रेजी–मराठी कोशाचा शब्दरत्नावलि नांवाचा संक्षेप यानें प्रसिद्ध केला. १८७७ पासून २५ वर्षें बायबल व टॅक्ट् सोसायट्यांत काम केल्यावर यास पेन्शन् मिळालें. बाबा ह्मणजे मराठी ख्रिस्ती सारस्वताचा जनक. यानें शंभरांवर पुस्तकें लिहिलीं आहेत. 'सम्पादक'

¶ J Gerson Da Cunha हे फिरंगी डॉक्टर् वैद्यक, भूगोलशास्त्र, प्राणिशास्त्र ( Zoology ), जीवनशास्त्र ( Biology ), सृष्टिविज्ञानशास्त्रें ( Natural Sciences ) वगैरे अनेक विद्याशाखांत निष्णात असून रॉयल् एशियाटिक् सोसायटीच्या मुंबईशाखेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते. ' स्कंदपुराणान्तर्गतं सह्याद्रिखण्डम् ' हा पश्चिम हिंदुस्थानची पौराणिक, भौगोलिक व ऐतिहासिक माहिती देणारा ग्रंथ यांनीं संपादिला व मुंबईच्या थॅकर् कंपनीनें तो १८७७ सालीं प्रसिद्ध केला. या ग्रंथाचें इंग्रेजी भाषांतरहि यांनींच केलें असून शिवाय डेंगू तापावर आणि हिंदुस्तानांत पोर्तुगीजांनीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार कसा केला या विषयावरहि यांनीं ग्रंथ लिहिले आहेत. 'सम्पादक'

मोठा असतां त्याचा येवढासा संक्षिप्त ग्रंथ कसा संभवेल ? वरील दोन कोशांच्या खालोखाल तरी तो असला पाहिजे. कोणास अमुक शब्द कशाचा अपभ्रंश आहे हें समजून घेण्याची इच्छा झाली, आणि तो यांत सांपडला नाहीं, तर याचा काय उपयोग ? त्याप्रमाणेंच अपभ्रष्ट शब्दांचें ज्ञान व्हावें हाच जर याचा उद्देश आहे तर अठरा कारखाने, अठरा धान्यें, अठरा पुराणें, नऊ रत्नें चौदा विद्या, चौसष्ट कला, वगैरेंच्या* यादी ज्या यांत दिल्या आहेत, व 'कार्तिकस्वामीच्या भिडेचा',§ 'कफल्लक',‡ इत्यादि शब्दांची यांत जी व्याख्या केली आहे तीही सर्व केवळ अप्रस्तुत होय. अपभ्रंशशास्त्राशीं वरील माहितीचा बिलकुल संबंध नसल्यामुळें इतकी जागा या पुस्तकांत व्यर्थ अडली आहे असें ह्मटलें पाहिजे.

आतां दुसऱ्या पक्षीं असें जर ह्मटलें, कीं अपभ्रंशाचे नियम भाषाज्ञानेच्छु विद्यार्थ्यांच्या मनांत चांगले भरावे ह्मणून हा ग्रंथ केला आहे, तर इकडूनही त्यावर अनेक दूषणें येतात. पहिलें मोठें दूषण तर हें, कीं यांतील निम्मेशिम्मे शब्द अत्यंत मूढ विद्यार्थ्यांच्याही लक्षांत येण्यासारखे आहेत. 'ओंठ', 'तीक्ष्ण', 'कठिण', 'कर्दळी', 'कल्होळ', 'कोकिळा', 'खार', 'कापूर', 'दुकाळ', 'दीपमाळ', 'निळा', 'पद्धत', 'मीठ', 'मध', 'मरणें', 'मोर', 'रात्र', 'लक्ष्मी', 'हरण', 'विख', 'शिंग', 'साप', इत्यादि शब्द कशाचे अपभ्रंश होत यांविषयीं कोणी कधींही बुचकळ्यांत पडणार आहे काय ? ज्यानें महाराष्ट्रभाषेचा यत्किंचितही व्यासंग केला असेल, किंवा सामान्य संस्कृत शब्द ज्यांच्या कधींमधीं कानावरून गेले असतील त्यांसही वरील अपभ्रंशांची व्युत्पत्ति तेव्हांच करतां येईल. याप्रमाणेंच 'चार' ( चत्वार ), 'आठ' ( अष्ट ), इत्यादि संख्यावाचक विशेषणांची एकदां व्युत्पत्ति समजली ह्मणजे सगळ्या पाढ्याची पृथक् पृथक् व्युत्पत्ति देण्याचीही गरज दिसत नाहीं. तसेंच

---

* तोफे, पील (=हत्ती), उष्टर, शिकार, रथ, जवाहीर, जामदार, शिराईत, नगार, दारू, वैद्य, लक्कड, मुद्बक (=स्वयंपाक) कुणबिणी, खाजगत, थट्टी (=गोखाना), फरास व इमारत, हे अठरा कारखाने, गहूं, साळ, तूर, जव, जोंधळा, वाटाणा, लांक, चणा, जवस, मसूर, मूग, राळे, तीळ, हरीक, कुळीत, सावा, उडीद व चवळी हीं अठरा धान्यें. ब्रह्म, पद्म, विष्णु, शिव (किंवा वायु), लिंग, गरुड, नारद, भागवत, अग्नि, स्कंद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वराह, मत्स्य, कूर्म व ब्रह्मांड हीं अठरा पुराणें. प्रवाल, पद्मराग, पुष्पराग, हिरा, मरकत, मोती, पाच, इंद्रनील, गोमेद व वैडूर्य हीं नऊ रत्नें. चार वेद, सहा वेदांगें, पुराणें ( अठरा मिळून ), मीमांसा ( पूर्वोत्तर दोन्ही मिळून), न्याय व धर्मशास्त्र अशा चौदा विद्या. 'सम्पादक'

§ कार्तिकस्वामीच्या भिडेचा:—विद्याहीन, गुणहीन, ब्रह्मकर्म वगैरे कांहीं न करणाऱ्या नांवाच्या ब्राह्मणाला ही संज्ञा आहे, कारण कार्तिकस्वामीच्या दर्शनमात्रेंकरून सात वेळ ब्राह्मण जन्म मिळतो अशी पौराणिक आख्यायिका आहे. यावरून देवाच्या शिफारशीनें ( लायकी नसतांहि ) ब्राह्मणत्व पावलेला असा अभिप्रेत अर्थ. 'सम्पादक'

‡ 'कफल्ल' नामक आदिचोराला महादेवाचा असा वर होता कीं त्याचें स्मरण करणारांस चोरांपासून भय होणार नाहीं. त्यावरून लोक निजतांना ' कफल्लक ', ' कफल्लक ', असें ह्मणूं लागले, यावरून ज्याच्याजवळ चोरून नेण्यासारखें कांहींच नाहीं व ह्मणून ज्याला चोरांचें भय वाटण्याचें मुळींच कारण नाहीं अशा अतिदरिद्री माणसांस ही संज्ञा पडली असावी. 'सम्पादक'

'आईतवार', 'ऐतवार', 'अखातीज',* 'कल्युग', 'उडू',¶ 'धजा', 'शिणगार',$ 'चिकस्या',† 'वर्णशंकर',‡ हे शब्दही केवळ अडाणी लोकांच्या बोलण्यांतच येणारे असल्यामुळें त्यांचा समावेश प्रस्तुत पुस्तकांत शोभत नाहीं; आणि त्यांतून वरील शब्दांची मूळपीठिका तर इतकी सहज उमगण्यासारखी आहे कीं, तिचें ज्ञान होण्यास 'चंद्रिके'चें साहाय्य कोणासही लागेलसें दिसत नाहीं. याखेरीज वर सांगितलेल्या यादी–ह्मणजे आठ प्रधान, आठ सिद्धी, आठी आधिकार, पांच हत्यारें, पांच गौड, नऊ रस, दहा ग्रंथ, चौदा रत्नें, बत्तीस गुण, चौसष्ठ कला, इत्यादि.× या यादींचा 'चंद्रिके'शीं अगोदर मुळींच संबंध नाहीं; आणि त्यांतून त्या कोठेंही सांपडण्यासारख्या नसून प्रस्तुत ग्रंथकारानें जर प्रथमतःच लोकांस जाहीर केल्या असत्या तर एकपरी त्या चालवून घेता आल्या असत्या; पण मोलस्वर्थ् साहेबानीं पन्नास वर्षांपूर्वी खटपट करून त्या मिळवल्या असतां त्या आयत्या उतरून घेण्यांत मातब्बरी ती कोणती !

आतां प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य भाग जे अपभ्रंश ते कितपत खरे आहेत व ते कोणत्या तऱ्हेनें दिले आहेत याविषयीं विचार करूं. एक तर कोठें कोठें परस्पर विरोध आढळतो. जसें 'हौद'† हा शब्द शेवटल्या (९९) पृष्ठांत 'ऱ्हद' शब्दापासून निघाला आहे ह्मणून सांगितलें आहे, पण पृष्ठ ४५ यांत पाहतां वरील संस्कृत शब्दाचा अपभ्रंश 'डोह' ह्मणून सांपडतो. पृष्ठ ९३ यांत 'सांज' शब्द 'संध्या' शब्दाचा अपभ्रंश होय असें सांपडतें; तोच शब्द ९५ व्या पृष्ठांत 'सायम्'‡ याचा अपभ्रंश ह्मणून आढळतो. आतां खरोखर पाहतां 'हौद' हा यवनी शब्द आहे; व 'डोह' हाच 'ऱ्हद' शब्दाचा अपभ्रंश होय. तसेंच 'संध्या' शब्दाचा अपभ्रंश, 'मध्यगृह' (माजघर), 'वंध्या' (वांझ), याप्रमाणें 'सांज' हा होय;

* अखा–तीज=अक्षय–तृतीया [क्षि=नाश होणें.] या दिवशीं केलेलीं कृत्यें अक्षय–अखंड राहतात.] 'सम्पादक'

¶ ध्रूव, विभु. $ शृंगार. † चिकित्सा–[कित्=रोग बरा करणें.] ‡ वर्णसंकर. 'सम्पादक'

× प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री, वजीर, न्यायाधीश,न्यायशास्त्री व सेनापति असे आठ प्रधान. अणिमा, गरिमा, लघिमा, महिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व व वशित्व अशा आठ सिद्धि. जल (पाणी पुरविणें), स्थल, ग्राम, कुललेखन (कुळकर्णी), मल्लासन (वर्तक), दंडविधिनियोग (न्याय), पौरोहित्य (धर्माधिकार) व ज्योतिष असे आठ अधिकार. ढाल, तरवार, धनुष्य, बंदूक व भाला अशीं पांच हत्यारें. गौड, कनोजे, मैथिल, मिश्र व आदिगौड हे पांच गौड. शृंगार, वीर, करुणा, रौद्र, भयानक, हास्य, बीभत्स, शांत व अद्भुत हे नऊ रस. संहिता, पद, क्रम, ब्राह्मण, व्याकरण, शिक्षा, ज्योतिष्, कल्प, छंद व निरुक्त हे दहा ग्रंथ. लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरि, चन्द्रमा, कामधेनु, ऐरावत, अप्सरा, सप्तमुखी अश्व, विष, हरिधनु, शंख व अमृत हीं चवदा रत्नें. 'सम्पादक'

† हौद हा पर्शियन् 'होज' शब्दाचा अपभ्रंश होय. 'सम्पादक'

‡ सांज हा शब्द ९५ व्या पानांत नजरचुकीनें पडला आहे. मागें ९३ व्या पानावर आला असल्यानें तो तेथें नकोच. वर्णक्रमावरून हें सहज लक्षांत येईल असें चंद्रिकाकारांनीं उत्तर दिलें आहे. 'सम्पादक'

'सायम्' हें अव्यय होय. 'फाटणें' हें धातुसाधित 'स्फटनं' यापासून निघालें आहे; पण 'फाडणें' हें 'पाटन' यावरून निघालें आहे; असें ६६ व्या पृष्ठांत सांपडतें; पण ज्यापक्षीं 'फाडणें' हें 'फाटणें' याचेंच प्रयोजक रूप होय, त्यापक्षीं दोहोंची व्युत्पत्ति कोणत्या तरी एका धातूपासून* झाली पाहिजे हें उघड आहे; मूळरूप एका धातूपासून व प्रयोजक रूप दुसऱ्यापासून मानणें असमंजस होय. 'जो' हा 'यः' याचा अपभ्रंश दिला असून 'याचा' व 'यानें' ही रूपें 'यस्य' व 'येन' यांचीं अनुक्रमेंकरून दिलीं आहेत. 'य'चा 'ज' अपभ्रंश होतो हें जर खरें आहे, तर 'यस्य' व 'येन' यांचीं रूपें 'ज्याचा', व 'ज्यानें' हीं होत हें उघड आहे. 'याचा' व 'यानें' हीं रूपें 'अस्य' व 'अनेन' या दर्शक सर्वनामांचीं होत. 'पांथस्त' हा शब्द 'पांथस्थ' याचा अपभ्रंश म्हणून सांगितला आहे; पण संस्कृत शब्द 'पांथ' असा आहे,‡ 'पांथस्थ' नव्हे; 'खटाटोप', 'शेंपूट' व 'थवा' हे शब्द, 'घटाटोप', 'शेप' व 'जात' यांचें अपभ्रंश होत असें सांगितलें आहे. पण 'घटाटोपो भयंकरः' याचा अर्थही कांहीं होत नसून 'फटाटोपो भयंकर' असा मात्र पाठ आढळण्यांत आहे.+ 'शेप' या शब्दाचा 'शेपूट' असा दिढीनें अपभ्रंश कसा झाला हें समजत नाहीं; शिवाय 'शेप' हा प्राकृत शब्द तर †धावयाचाच नाहीं, कारण प्राकृत शब्दाचा प्राकृत अपभ्रंश होणें संभवत नाहीं; तेव्हां तो संस्कृतच घेतला पाहिजे; पण संस्कृत अर्थ काय आहे† हें कोशांत पाहिलें

---

* या बाबतींत चंद्रिकाकर्त्यांचें म्हणणें कीं, फाट व फाड हे धातु वेगवेगळेच मानणें भाग आहे. जसें:—तो मुलगा फाटला (उन्मत्त झाला) आहे. आणि कुव्यसन लावून तो मुलगा एका माणसानें फाटविला आहे. यांपैकीं दुसऱ्या वाक्यांत 'फाटविला' या शब्दाऐवजीं 'फाडला' असा शब्द घालून चालेल काय? याचप्रमाणें, चरणें–चारणें–चरविणें; सरणें–सारणें–सरविणें; दबणें–दाबणें–दाबविणें; टळणें–टाळणें–टाळविणें; यांमध्यें तिसरें पहिल्याचें प्रयोजक व दुसरें स्वतंत्र क्रियापद मानलें पाहिजे हें थोड्या विचाराअंतीं लक्षांत येईल. सरणें=संपणें; सरविणें=संपविणें; सारणें=मागें किंवा बाजूला करणें, असे अर्थ होतात. 'सम्पादक'

‡ पांथ=प्रवासी लोक त्यांत राहतो तो पांथस्थ व याचा अपभ्रंश पांथस्त असें चंद्रिकाकारांचें उत्तर आहे. 'सम्पादक'

\+ घटा=हत्तींचें युद्धांतील संघट्टण, व त्यासारखा आटोप म्हणजे संरंभ अथवा त्वरा (आकार). अजायुद्धांत आकार भयंकर व सार थोडें किंबहुना शून्यच. म्हणून घटाटोपो भयंकरः हाच पाठ अधिक युक्त. असा खुलासा करून चंद्रिकाकार "अजायुद्धं मुनिश्राद्धं प्रभाते मेघडम्बरः। दम्पत्योः कलहश्चैव घटाटोपो भयङ्करः॥" हें अवतरण देतात; पण तें कोठून घेतलें त्याचा पुनः खुलासा नाहींच! कारण चवथा चरण 'घटाटोपो भयङ्करः' असा नसून 'परिणामे न किञ्चन' असा सुभाषितरत्नभाण्डागारांत आढळतो. संबंध श्लोक असा:—

निर्विषेणापि सर्पेण कर्तव्या महती फटा (फणा)। विषं भवतु मा भूद्वा फटाटोपो भयङ्करः॥
पंचतंत्र १, २०४.

[फटाटोप (फटा + आटोप)=फडीचा विस्तार, फडी पसरणें, फडी काढणें,] विषहीन सापानें सुद्धां फडी काढणें जरूर आहे; कारण, विष असो वा नसो सापानें नुसती फडी पसरली तरी बघणाराला भीति वाटते. 'सम्पादक'

† या शब्दाचे (१) शिस्न (२) शेंपूट असे दोनहि अर्थ कोशांत (वामन शिवराम आपटे यांच्या) सांपडतात. 'सम्पादक'

असतां कोणासही कळणार आहे ! 'जात' याचें 'धवा' हें रूप कसें बनलें हें 'चंद्रिके'तील २१ व्या नियमावरूनही कळत नाहीं. हा शब्द 'स्तव (—क)' शब्दाचा अपभ्रंश असावा असें आह्मांस वाटतें. 'खरवड', 'सचोटी' व 'बदक' यांचे मूळ शब्द 'खरवृत्त', 'सत्योक्ति' व 'कादंब' असे दिले आहेत. यांत पहिला शब्द तर निवळ मराठीच आहे असें आह्मांस वाटतें. 'खोटसाळ' मनुष्यास 'खरवड' असें जें ह्मणतात तें संस्कृतांतील 'खरवृत्त' शब्दाचा अपभ्रंश करून त्याची योजना वरील प्रयोगांत करतात असें नव्हे,§ तर तो केवळ लाक्षणिक प्रयोग होय. 'सत्योक्ति' शब्दाचा अर्थ 'खरें बोलणें' असा आहे, मग यावरून 'सचोटी'‖ हें भाववाचक नाम कसें सिद्ध होईल ! 'बदक' शब्द मोल्स्वर्थकृत कोशांत अरबी ह्मणून सांपडतो; वास्तव 'हंसा'पासून बदक निपजण्याचा जितपत संभव तितपतच 'कादंब'¶ शब्दापासून 'बदक' शब्द निघण्याचाही होय ! 'अदबशीर'* शब्दाची व्युत्पत्ति अरबी शब्द 'अदब' व संस्कृत 'शील' अशी केली आहे; व 'कामगार' हें संस्कृत 'कर्मकार' यावरून निघालें आहे असें सांगितलें आहे. पण 'शीर' व 'गार' हे दोन्ही अरबी किंवा फारसी भाषेंतील प्रत्यय होत असें आह्मांस वाटतें; व तसें मानलें ह्मणजे पहिला घेडगुजरी$ समास करण्याचें व दुसऱ्याची संस्कृत व्युत्पत्ति मानण्याचें प्रयोजन उरत नाहीं. याप्रमाणेंच 'गदळ' (कदर्य),‡ 'विघा' (विग्रह),+ 'बारदान' (बहिर्धान),† 'डोल्य' (दोला),ꕥ 'सोंग'

§ खर ( कठिण ) आहे वृत्त ( वर्तन, स्थिति ) ज्याचें. 'ओदनखरवृत्तम्'=भाताची बुडीं बसलेली खरपोडी. 'हविर्हि स्निग्धं हि दुग्धखरवृत्तम्' खरवृत्ताचा व्याकीपुरीच असाहि पर्याय-शब्द आहे. तो भागवतांत जडभरताख्यानांत घेतला आहे. खरवड याचा 'वाईट मनुष्य' हा लाक्षणिक अर्थ होय, मुख्यार्थ नव्हे असें चंद्रिकाकार उत्तरीं सांगतात. 'सम्पादक'

‖ धातूपासून प्रत्यक्ष व धातूला कर्तरि प्रत्यय ( तृ ) लावून झालेल्या विशेषणापासून होणारीं भाववाचक नामें समानार्थक असतात. कर्तृता ( कर्तेपणा ) व कृति ( करणें ) या शब्दांचें प्रवृत्तिनिमित्त तुल्य आहे. ह्मणून 'सत्योक्ति' हाहि 'क्तिन्' प्रत्ययानें भाववाचक शब्दच होतो असा चंद्रिकाकारांचा जबाब आहे. 'सम्पादक'

¶ कादंब व बदक हा एकच पक्षी होय. आधार:—'कादम्बः कलहंसः स्यात्' या अमराच्या कांड २ वर्ग ५ मधील तेविसाव्या श्लोकावरील टीकेंत 'कादम्बः कलहंसः हे कले मधुरवाक् स चासौ हंसश्च तस्य बदक इति प्रसिद्धस्य.' असें ह्मटलें आहे. ह्मणून वर्णव्यत्ययानें 'कादंब' याच 'बदक' हा अपभ्रंश होय असें चंद्रिकाकार समर्थन करतात. 'सम्पादक'

* अदब=सभ्यता, शीर-शील=स्वभाव ह्मणून अदबशीर=सभ्य स्वभावाचा. 'सम्पादक'

$ घेडगुजरी समासः—असे समास करण्याची लोकांची प्रवृत्ति आहे त्यास काय उपाय ? जसें:-हिंदु=काळा हा पर्शियन् शब्द व स्थान हा संस्कृत शब्द मिळून हिंदुस्थान हा शब्द झाला व तो सर्वांस वापरण्यांत आहे. ( निबंधमाला अंक ४२ पृष्ठ ४१० ओळ १३ वी पाहा. ) हिंदुस्तान ( स्तान =स्थान, जागा असा फारसी भाषेंत अर्थ होतो. ) असा प्रयोग चांगला खरा, पण लोक करूं लागतील तेव्हां ! असें चंद्रिकाकारांचें ह्मणणें आहे. 'सम्पादक'

‡ कदर्य—( =क्षुद्र ) गदळ; कारण अंगास झीज लावून न घेणें हें अमंगळपणाचें मूळ होय. 'सम्पादक'

+ विग्रहः—विघा; मोल्स्वर्थच्या कोशांतहि अशीच व्युत्पत्ति दिली आहे. 'सम्पादक'

[पुढें चालू. बहिर्धान† डोल्यꕥ पुढच्या पानावर पाहा.]

(सु+अंग),* 'भंडारी'‡ (मंड+हारी), 'भगरा'§ (भंगुरः), 'विस्तु'¶ (वीतिहोत्र) इत्यादि अनेक व्युत्पत्ति ज्या 'चंद्रिका'कारांनीं दिल्या आहेत; व 'बडोदें'$ (वटोदर), 'बेळगांव'‖ (वेणुग्राम), 'भडोच'× (भृगुकच्छ), 'जाधव'‡‡ (यादव), 'जोहार'♠ (योद्धारः) अशा ज्या

---

†बहिर्धान—बारदान; 'धा' पासून ( करणी ल्युट् प्रत्ययानें ) धान=जेणेंकरून धारण होतें तो पदार्थ. 'बहिस्,' या अधिकरणशक्तिप्रधान अव्ययाला समासांत शक्तिमत्त्व आलें आहे. ह्मणून बहिर्धान=बाहेरून धारण करणारा. ( भाधारार्थ प्रौढ मनोरमा व भर्तृहरिकृत वाक्यप्रदीप हे ग्रंथ पाहा. ) अशींच आणखी उदाहरणें प्रातःकल्पम्, दोषाभूतं दिनम्, दिवाभूता रात्रिः हीं होत. ह्मणून बारदान=बाहेरचें आवरण अगर आच्छादान किंवा वेष्टन. 'सम्पादक'

॥दोला—डोला; 'डग् डग्' बोलतो ह्मणून डोला; जसा डोल्हारा. 'सम्पादक'

*स्वंग (सु+अंग)—सोंग=चांगलें अंग. देवाचें सोंग=देवासारखें उत्तम अंग करून दाखविणें. 'सं.'

‡( मंड+हारी )—भंडारी [ मंड=फेस. हारी-हृ=काढणें. ]=ताडी माडी काढणारे लोक. 'शौण्डिको मण्डहारकः' असें अमरसिंह ह्मणतो. 'हृ' पासून 'ण्वुल्' प्रत्ययानें 'हारक' आणि ताच्छील्यार्थक 'णिनि' प्रत्ययानें 'हारी' असे शब्द होतात. 'सम्पादक'

§भंगुरः—भगरा=लाडू वगैरेंचा चुरा ( भञ्ज्=मोडणें, चुरा होणें ). आमर्दनार्थक 'भञ्ज्' या अकर्मक धातूपासून 'भञ्ज भासमिदो घुरच्' या सूत्राप्रमाणें ताच्छील्यार्थक 'घुरच्' प्रत्यय लागला आहे. भञ्जच होणारा तो भगरा. 'सम्पादक'

¶विस्तु—'वीतिहोत्र' मधील 'त' चा लोप व मग 'ह' चा 'स' होऊन 'विस्तु' हा शब्द झाला असावा. 'सम्पादक'

$वटोदर—बडोदें; ( वटाः उदरे यस्य किंवा वटयुक्तः पद्रः अशी व्युत्पत्ति होय.) 'सीतापुरं च श्रीक्षेत्रं सिहोली मुद्गली तथा । ज्येष्ठलज्जं श्रियःस्थानं दंताली वटपद्रकम् ॥' वगैरे ५५ गांवें दाशरथि-रामानें मोढ उपनामाच्या ब्राह्मणांस दान केल्याचा दाखला गुजराथेंत आढळणाऱ्या धर्मारण्य ग्रंथांत सांपडतो. हीं गांवें थोडया भिन्न ( अपभ्रष्ट ) नांवांनीं बडोद्याजवळ अजूनहि प्रसिद्ध आहेत. वडांची झाडी आसपास फार होती; म्हणून वटोदर, वटपद्र, अशीं नांव होतीं. 'सम्पादक'

‖वेणुग्राम—बेळगांव. 'विजय हनुमंतनोनी स्वामि विजय हनुमंतनोनी । तिरंगी वंदुरामना पाद ह्यरगी घलो अंजनेया तरुळे गुरु तवनु शिखिर विठ्ठल गीचु म्यरधो वेणुपुर दल्ली वासागी ॥' या कर्नाटकी काव्यांत प्रासाकरतां वेणुग्रामबद्दल वेणुपुर म्हटलें आहे. जसें हस्तिपुर=गजनगर=करिग्राम. कालिदास नागपुरासंबंधीं 'अथोरगाख्यस्य पुरस्य नाथम् ॥' असा उल्लेख करतो. 'सम्पादक'

×भृगुकच्छ—भडोच, 'रेवातीरवकच्छोऽयं मम नाम्नातिविश्रुतः । अत्र कच्छे मया स्थानं करोतु जगदीश्वरः ॥......कच्छपाधिष्ठितं ह्येतत्तस्य पृष्टिगतं शुभम् ॥' असें भृगु म्हणतो. रेवामहात्म्य अध्याय २९०, ७० व ७६ पाहा. त्याचप्रमाणें अध्याय ३०४ मध्यें 'ओंकारः प्रथमस्तत्र शूलभेदस्तथा परः । रेवौरासंगमस्तद्वच्चतुर्थं कोरिलपुरम् ॥ ३१ ॥ पंचमंगुक्कतीर्थं वै षष्टं च भृगुकच्छकम् । महर्षेः सप्तमः पुण्यो रेवासागरसंगमः ॥३२॥ अशीं सात नर्मदाकांठचीं क्षेत्रें दिलीं असून अद्यापहि तीं त्याच नांवांनीं प्रसिद्ध आहेत. 'सम्पादक'

‡‡ यादव-जाधव. शिवाजी राजांनीं 'पंचकुली मराठे', 'पञ्चदशकुली मराठे' असे मराठ्यांचे उत्तम मध्यम भावदर्शक भेद केले आहेत त्यांत 'जाधव' हे 'यादव' होत असें ह्मटलें आहे. सं०

♠योद्धारः—जोहार; महार ( मृताहार ) लोकांनीं रामराम ( नमनाचिन्ह ) करण्याच्या प्रसंगीं

[पुढें चालू]

कित्येक मूळपीठिका दिल्या आहेत त्या तरी कितपत यथार्थ होत हेंही सांगणें कठिणच आहे ! 'जातो' (याति), 'तरतो' (तरति) ही व्युत्पत्तिही अशुद्धच आहे. शालापत्रकांत प्रसिद्ध झालेल्या निबंधांत मराठी क्रियापदांची उपपत्ति§ कशी केली आहे हें आमच्या पुष्कळ वाचकांस माहीत असेलच.

प्रस्तुत पुस्तकांत दुसरा हा दोष दृष्टीस पडतो कीं, जेथें विशेषेंकरून विस्तार करायाला पाहिजे होता तेथें तो मुळींच केला नाहीं. 'खटाटोप,' 'किंतु,' †'यःपलाय,'¶'मनःपूतं समाचरेत्,' 'अजागळ,' इत्यादि शब्दांवरील व्याख्यान अगदीं कोतें आहे. "खटाटोपो भयंकरः–घटाटोपी भयंकर," "किंतु–किंतु = परंतु," "यःपलाय स जीवति–यः पलायते स जीवति = जो पळेल तो जगेल", "अजागळ–अजागलस्तन (बोकडाच्या गळ्याला असणाऱ्या स्तनासारिखा निरुपयोगी मनुष्य)", "मनःपूतं समाचरेत्—मनास पवित्र वाटेल तें करणें; यथेच्छ वर्तन करणें* असा अर्थ नव्हे," येवढ्याच व्याख्यानावरून वरील शब्दांचें ज्ञान विद्यार्थ्यास काय होणार ? 'खटाटोपाचें' मूळ 'घटाटोप' सांगितल्यानें त्यास्त काय समजलें? वरील शब्द प्रचारांत कसा आला हें समजण्यास संपूर्ण श्लोक दिला

---

'योद्धारः' असें संबोधून मात्र बोलावें असें प्राचीन इतिहासांत क्वचित् आढळतें. त्यावरून त्याचा हा अपभ्रंश कल्पिला आहे. सध्यां महार वगैरे लोक आपणाहून वरिष्ठांस सलाम करतांना 'जोहार' म्हणतात. पूर्वी राजसेवक राजांस 'योद्धारः' असें संबोधून बोलत. 'सम्पादक'

§ संस्कृतांत धातूंस 'ति' प्रत्यय लागून वर्तमानकाळीं कर्तरि रूपें 'पतति,' 'त्यजति' अशीं होतात. तद्वतच 'अत्' प्रत्ययानें वर्तमानकाळीं कर्तरि विशेषणें 'पतत्' 'त्यजत्' अशीं होतात. दोहोंचा अर्थ अगदीं बरोबर असून एकाच्या जागीं दुसऱ्याचा प्रयोग चालतो. बालभाषेंत हलन्त (व्यंजनान्त) शब्द नसल्यानें तसलें संस्कृत शब्द अजन्त (स्वरान्त) करून बालभाषेंत घेतात. व विशेषणांस लिंग-वचन-भेदाप्रमाणें विकार पावून व अपभ्रंशाच्या नियमाप्रमाणें मधल्या 'त' चा 'ड' होऊन 'पडतो,' 'पडाते', 'पडत' अशीं रूपें सिद्ध होतात, असें शास्त्रीबोवांचें शालापत्रकांतील मत आहे. 'सम्पादक'

† उपसर्गेऽन्यचक्रे च दुर्भिक्षे च भयावहे ॥ असाधुजनसंसर्गे यः पलायेत जीवति ॥१॥ असा मूळ श्लोक आहे, या म्हणीच्या उपपत्तीची वृद्ध गृहस्थांच्या तोंडची एक गोष्ट अशी:—एकदां बापलेंक एका नदीकांठीं सायंकाळीं संध्या करीत बसले होते. चिरंजीवांची संध्या आधीं आटपल्यामुळें शेजारच्या मळ्यांतील ऊंस चोरून आणण्यासाठीं स्वारी गेली. इतक्यांत शेतकरी येतोसा पाहून मुलास सावध करण्यासाठीं संध्या चालू असतांच वडिलांनीं मोठ्यानें पुढीलप्रमाणें श्लोकबद्ध धोक्याची सूचना दिली. व कळविलें कीं, "अरे अरे नीळकण्ठा । नको करूं धसा फसा । शेंडी दिसते खालीं बसा । दश तुला दश मला । दश गृहींच्या ब्राह्मणीला । पंच पंच पिल्लुकां । शेंडा बुडखा रेडुकां । दक्षिणेस खिडिका । यः पलाय स जीवति ।"

¶ दृष्टिपूतं न्यसेत्पादं, वस्त्रपूतं जलं पिबेत् । सत्यपूतं वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥ मनुस्मृति ६. ४६ पाहा. पाहून पाऊल टाकावें, गाळून पाणी प्यावें, खरें असेल तेंच बोलावें, विचार करून (योग्य–पवित्र वाटेल तसेंच) वागावें. ['विचारोनि बोले, विवंचोनि चाले' रामदास.] असा अर्थ. पण मूळ अर्थ कांहींहि असला तरी व्यवहारांत 'स्वैर वर्तन करणें' या अर्थीच हें वाक्य रूढ झालें आहे खरें. 'सम्पादक'

पाहिजे होता. 'किंतू'चा मराठींत कोणत्या अर्थी* प्रयोग होतो तो कोशकारानें मुळींच सांगितला नाहीं; वरील मालिकेवरून प्रकृत शब्द उभयान्वयी अव्यय होय असें अपरिचितास वाटेल. 'यः पलाय' हे तुटके शब्द मराठींत कसे आले हें वाचकांस कळण्यास 'पंचोपाख्यानां'तील धूर्त कोल्ह्याची गोष्ट सांगणें जरूर होते.' अजागळ' याचा अर्थ 'निरुपयोगी' असा मूळचा खरा, पण हल्लींचा अर्थ‡ निराळा आहे; यास्तव तो देऊन त्याची उपपत्ति करायास पाहिजे होती. याप्रमाणेंच 'मनःपूतं समाचरेत्' या शब्दांचा अर्थ निश्चित करून त्यावर आमच्या कोशकारानें आपला शिक्का ठोकून दिला आहे खरा; पण याचा कितपत उपयोग होईल हें सांगणें नको. मराठीच काय पण एकंदर भाषांची प्रवृत्ति 'मनःपूतं समाचरेत्' या प्रकारची आहे. त्यांस वैयाकरणांनीं किंवा कोशकारांनीं आपला स्वैरक्रम सोडून मर्यादेनें वागण्यास सांगणें ह्मणजे नद्यांच्या ओघांवर व पर्वतांच्या रांगांवर रूळ व कंपास चालवणें होय. ज्या आमच्या देशभाषेनें येवढे धुरंधर क्यांडी साहेब तिचें चाळीस वर्षें नियमन करीत असतां त्यांसही दाद दिली नाहीं, व जी त्यांच्या मेजरीच्या तरवारीस लवमात्रही वचकली नाहीं, ती 'वटोदर'निवासी† एतद्देशीय अध्यापकाची कदर कोठून जुमानणार ![1]'

याप्रमाणें सदर्हू पुस्तक जसें व्हावयास पाहिजे होतें तसें मुळींच झालें नाहीं. विद्यार्थ्यांस व जिज्ञासु जनांस कोणत्या प्रकारचा ग्रंथ विशेष उपयुक्त होईल हें नीट मनांत आणून किंवा अर्वाचीन पद्धत जाणणाऱ्या कोणा विद्वानाचा सल्ला घेऊन प्रस्तुत ग्रंथकारानें जर उद्योग आरंभला असतां, तर बरें झालें असतें. एक तर यांतला फाजील भाग निघाला असता; आणि त्याच्या जागीं उपयोगाची व मौजेची माहिती आली असती. आतां हल्लीं आहे, अशा प्रकारचेंही पुस्तक निरुपयोगी आहे असें नाहीं. त्यापासून सर्वांस व विशेषतः नवीन विद्यार्थ्यांस बराच उपयोग होणारा आहे. अपभ्रंशाचें सामान्यतः सर्वव्यापक नियम यावरून त्यांच्या मनावर बरेच ठसतील; व पुष्कळ शब्दांची व्युत्पत्तिही त्यांस कळेल. त्याप्रमाणेंच

---

* संशय, शंका, या अर्थी. जसें: त्याच्या मनांत किंतु आला. 'सम्पादक'

‡ निष्काळजी, गचाळ, गबाळग्रंथी. 'सम्पादक'

† बडोद्यास राहणाऱ्या. 'सम्पादक'

१. वरील पंडिताची महाराष्ट्रभाषेवर केवढी जरब होती हें त्यांचे रिपोर्ट पाहिलें असतां कळून येणार आहे. हे एज्युकेशनल् रेकर्ड् पत्रांत कोठें कोठें आढळतात. सुमारें पंधरा वीस वर्षांपूर्वी Hints to Composition (ग्रंथकर्त्यांस सूचना) या नांवाचें एक लहानसें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्यांत 'इसापनीतीं'तील वगैरे कांहीं प्रयोग शुद्ध केले होते. याच सुमारास त्यांचा व 'ज्ञानप्रसारक' मंडळीचा एक मोठा वाद झाला तोही पाहण्यासारखा आहे. त्या वेळचे विद्याभिमानी डॉय्‌रेक्टर् मे० हॉवर्ड् साहेब यांनीं उभयपक्षींचा वाद प्रतिवाद (Correspondence on the subject of the Dnyan prasarak) 'ज्ञानप्रसारका'वरून झालेला पत्रव्यवहार, या नांवानें पुढें लवकरच महाराष्ट्रभाषाविवेचकांच्या प्रीत्यर्थ प्रसिद्ध केला.

कांहीं ठिकाणीं माहितीही बरीच मिळेल. उदाहरणार्थ 'कनोज '‡, 'कफल्लक', 'कोटस्थ कीटायते '§, 'खडाष्टक',* 'बसवण्णा '¶, 'परोक्ष '†, हे शब्द पाहा.

हल्लींच्या स्थितींत वरील पुस्तकाची बरीचशी ज्यास्त तारीफ करवत नाहीं. तर सरतेशेवटीं प्रस्तुत ग्रंथकारास आह्मी अशी सूचना करतों कीं, सदरील ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आल्यास त्यांनीं पूर्वोक्त आक्षेपांकडे लक्ष पुरवावें. तसें करून या पुस्तकांत हवी तशी सुधारणा केली असतां त्यांचे एतद्देशीय विद्यार्थ्यांवर व सामान्यतः सर्व वाचकांवरही मोठे उपकार होतील यांत संशय नाहीं.

**ज्ञानेश्वरीपरिभाषा**–हें पुस्तक रा॰ रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं केलें आहे. या ग्रंथकर्त्यांचें नांव आमच्या वाचकांच्या माहितींतलेंच आहे. अंक ४२ यांतील ग्रंथपरीक्षेंत आलेला 'प्राचीन भारतवर्षीय ऐतिहासिक कोश' या पुस्तकाचे हे कर्ते होत.॰ प्रस्तुत विषयावरच विशेष व्यापक असा 'हंसकोश' नांवाचा ग्रंथ याच ग्रंथकारानें सुमारें वीस वर्षांपूर्वीं रचून प्रसिद्ध केला होता. तो हल्लीं अनुपलब्ध आहे.

वरील 'परिभाषा' हा नव्याच मासल्याचा ग्रंथ आहे. इंग्रेजींत ज्यांस Companion volume ( जवळ ठेवायाचा किंवा जोडीचा ग्रंथ ) ह्मणतात त्यासारखा हा आहे. 'ज्ञानेश्वरी' चें जो अध्ययन करील त्यास उपयोगीं पडण्याकरतां हा तयार केला आहे. रा॰ रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं कांहीं महिन्यांपूर्वीं 'ज्ञानेश्वरी' ची नवीन आवृत्ति आपल्या छापखान्यांत काढली. तेव्हां तिजबरोबर ही 'परिभाषा' ही तयार करवून छापली. ही नवीच योजना मनांत आणून ती वरील वाकबगार गृहस्थाकरवीं पूर्ण केली, याबद्दल रा॰ गोंधळेकर यांची तारीफ करणें रास्त आहे.

---

‡ मूळ कान्यकुब्ज (कन्या आहेत कुब्जा म्हणजे कुबड्या, बांकड्या ज्याच्या राजाच्या). पूर्वीं या नगरच्या कुशनाभ राजाच्या शंभर मुलींनीं वायूची विषयवासना पूर्ण न केल्यामुळें वायूनें त्यांस कुबड्या केलें. म्हणून त्या नगरीस हें नांव पडलें. 'सम्पादक'

§पाहा:—'गजानां कोटिस्तु कीटायते।' म्हणजे कोटि गज ज्याच्यापुढें कीटकाप्रमाणें (किड्यासारखे) आहेत त्याची शक्ति काय वर्णावी! म्हणून अतिबलिष्ठासंबंधीं ही म्हण वापरतात. 'सम्पादक'

* 'षडष्टक' पासून. ज्योतिःशास्त्रांत वधू-वर, सेव्य-सेवक, गृह-गृही या जोडप्यांपैकीं ( केवळ वधू-वरच नव्हेत ) एका कुंडलींतील जन्मराशि दुसरींतील जन्मराशीपासून आठवी असली ( मग दुसरी पहिल्या राशीपासून सहावी होते ) म्हणजे षडष्टक योग मानतात. उदाहरण:—मेष व वृश्चिक या ज्यांच्या जन्मराशि आहेत त्यांचा षडष्टक योग असतो. याचे दोन प्रकार आहेत, प्रीति-षडष्टक आणि मृत्यु-( ऊर्फ वैर-) षडष्टक. 'सम्पादक'

¶ नंदीला जंगम लोकांनीं दिलेलें नांव. [ बसु–बैल; अण्णा–मानदर्शक शब्द.] 'सम्पादक'

मार्गे. पण 'अपरोक्ष' हा शब्द चुकीनें 'परोक्ष' या शब्दाऐवजीं वापरण्यांत येतो. अपरोक्ष याचा खरा अर्थ 'डोळ्यांसमोर' असा आहे. 'सम्पादक'

१. वरील शब्दाची प्रस्तुत पुस्तकांतील व्याख्या बरोबर आहे, तरी तींत मुद्द्याची गोष्ट मुळींच गाळली आहे. ती ही कीं, वरील योग ल्याच्या वेळेस मुलाचा व मुलीचा पाहत असतात; केवळ वराचा व वधूचा कोणी पाहत नाहीं. मोल्स्वर्थ साहेबांस वरील शब्दाची व्युत्पत्ति समजली

( पुढें चालू )

ही 'परिभाषा 'सरासरी मूळ ग्रंथाच्या येवढीच झाली आहे. हिचा सांचाही तेवढाच धरून ती पोथीप्रमाणेंच आडवी छापली आहे. प्रत्येक पृष्ठांत 'ओवी', 'कठिण शब्द'

---

नाहीं. त्यांच्या कोशांत पुढील शब्दापुढें 'खडा'–'अष्टक' असे त्याचे अवयव देऊन A free formation असा शेरा दिला आहे. पण हा 'दांडगाईचा समास' नव्हे हें 'चंद्रिके'तील व्याख्या-नावरून ध्यानांत येईल. वरील कोश प्रस्तुत पुस्तकाबरोबर ताडून पाहतां इतर कित्येक प्रमादही आमच्या लक्षांत आले ते येथें प्रसंगवशात् देतों. 'कस' शब्दाची व्युत्पत्ति 'कषाय' म्हणून दिली आहे;* पण खरी व्युत्पत्ति 'निकष' असावी. 'घरदार' हें 'घर' आणि 'दार' यांपासून झालें,‡ म्हणजे हा समाहार द्वंद्व होय, असा कोशकाराचा अभिप्राय दिसतो. आमचें मत§ 'भाषापरिज्ञान' या सदराखालीं पूर्वी (अंक १८) दिलेंच आहे. 'अणीक' हा शब्द 'अनेक' याचा अपभ्रंश म्हणून दिला आहे. पण दोहोंतील अर्थभेदावरून पाहतां वरील अभिप्राय खरा असेलसें दिसत नाहीं. अपभ्रंशांच्या नियमांवरून व अर्थसादृश्यावरून 'अन्यक' ही व्युत्पत्ति यथार्थ दिसते. 'कळी'चें संस्कृतांत 'कली' असें दीर्घ रूप कोठेंही आढळत नाहीं, नेहमीचें रूप 'कलिका'ꣳ हें होय. 'कष्टाळू' याचें मूळ संस्कृत रूप 'कष्टालु' असें दिलें आहे; पण 'कष्ट' शब्दाचा संस्कृतांत 'श्रम' या अर्थी कधींही प्रयोग होत असलसें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां 'कष्टालु' तर दुरापास्तच. 'आई'चें मूळ 'अंबा' म्हणून दिलें आहे. आमच्या मतें 'मातृ'—'माई–आई' अशी व्युत्पत्ति होय. 'चंद्रिके'त 'आर्या' असें मूळ रूप दिलें आहे; पण याचा अपभ्रंश 'आजी' हा असावा. 'जोहारा'चें मूळ 'योद्धारः' दिलें आहे. पण ही व्युत्पत्ति प्रस्तुत शब्द उच्चारणारे जे 'महाआरे' त्यांच्या व्युत्पत्तीचेंच मार्दव दिसतें! टीकाविषयक ग्रंथांत वरील सर्व व्युत्पत्ति प्रस्तुत महाकोशाच्या आधारावरूनच दिल्या आहेत हें उघडच आहे.

* कषेण सोदकघर्षणादिपीडनेन आयः आगमो यस्य इति कषायः॥ मेथीचा कस, ती उकडून पिळल्यावर निघणारा कडूपणा हा होय. क्षार घालून पिळल्यावर कुसुंभाचा कस (रंग) निघतो. अशा रीतीनें पिळल्यावर उकडलेल्या पदार्थांतील बाकी राहणारा निकस भाग होय. 'निर्यासेऽपि कषायोस्त्री' असें अमर म्हणतो. व त्यावरील टीकेंत 'निर्यास' म्हणजे 'क्वथरस' असें स्फुट केलें आहे.

‡ गृह+दार यांचा समाहार असा चुकीचा खुलासा 'चंद्रिका'कारांनीं केला आहे.

§ घरदार—यासंबंधीं शास्त्रीबोवांचें म्हणणें असें:—

"या शब्दांचा अर्थ 'घर' आणि 'दार' असा सकृद्दर्शनीं असावासा वाटतो. पण ही चूक आहे; कारण 'दार' याचा अर्थ जर 'कवाड' असा घेतला, तर घर या शब्दाच्या अर्थांतच वरील अर्थही आला नाहीं काय? अवयवीचा दर्शक जो शब्द त्यांतच अवयवांचाही बोध होतो हें उघड आहे. वास्तव 'दार' याचा अर्थ......'स्त्री' होय. 'घरदार' हें मूळ संस्कृत 'गृहदारा' याचा अपभ्रंश होय. कदाचित् 'दार' हें रूप 'दाराः' या संस्कृत पुल्लिंगी शब्दाचें महाराष्ट्रभाषारीत्या झालेलें अनेकवचनही असेल. मराठींत अकारांत पुल्लिंगी नामांचें बहुवचन अकारांतच राहत असतें......(मोरोपंतांचा प्रयोग "ते 'राजदार' जैसे तैसे हेही म्हणूनि हा रडले॥" स्त्रीपर्व १. आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच.) पण सध्यां मराठींत वरील शब्दाचें अर्थांतर होऊन 'घरदार' म्हणजे जिनगी, मालमत्ता, इस्टेट (?) असा अर्थ झाला आहे. जसें, 'अहो, त्याच्यापाशीं आतां काय उरलें आहे? घरादाराचें पार वाटोळें करून आतां अगदीं कफल्लक असामी बनली आहे!'" 'सम्पादक'

ꣳ 'सर्वधातुभ्य इन्' या 'उणादि' सूत्रानें 'कल' धातूपासून 'इन्' प्रत्ययानें 'कलि' असें रूप

आणि ' अर्थ ' अशीं तीन तीन सदरें पाडलीं असून अनुक्रमानें बहुतकरून प्रत्येक ओवींतील शब्द दिले आहेत. तेव्हां ही ' परिभाषा ' सर्व प्रकारें 'ज्ञानेश्वरी'ची सहचारिणी किंवा परिचारिका झाली आहे असें म्हटलें असतां चालेल.

प्रस्तुत पुस्तकाची उपयुक्तता स्पष्टच आहे. 'ज्ञानेश्वरी' हा कालआजचा ग्रंथ नाहीं. इंग्रेजी भाषेचा आद्यकवि चॉसर त्याच्याही कांहीं मागले आमचे ज्ञानोबा होत. यवनी अमलाची रात्र ज्या वेळेस पुरती अर्धीही लोटून गेली नव्हती, व शेजारच्या पुण्यग्रामाचे अधिपति तर काय, पण त्यांच्या यजमानांचे कुलपति उदयास येण्यासही कित्येक शतकांचा ज्या वेळेस अवधि होता, त्यावेळेस महाराष्ट्र-कवींचे व सन्मणिमंडलाचे कुलगुरु जन्मले. यांचा इतिहास सध्यां अर्थातच केवळ दंतकथाशेष राहिला आहे. यांची कीर्ति मात्र आजपर्यंत सारखी चालत आली आहे; ती भाविक लोकांत कितपत आहे ती आळंदीच्या वार्षिक यात्रेवरून दिसतच आहे, व रसिकजनांत कितपत आहे याचें प्रमाण प्रौढ हरदासांचीं कीर्तनें होत.[1] यांचे ग्रंथ ' ज्ञानेश्वरी ' व ' अमृतानुभव ' हे दोन आहेत; यांपैकीं पहिलाच अत्यंत प्रसिद्ध आहे. याचें अध्ययन करण्याची सोय सदरील पुस्तकाच्या द्वारें झाली आहे ही फार चांगली गोष्ट झाली. कां कीं, दिवसांदिवस वरील जुन्या ग्रंथांचें सतत परिशीलन केलेला तर काय, पण नुसते ते वाचलेलाही गृहस्थ मिळणें दुरापास्त होणार. तेव्हां ही अनुकूलता आहे तोंपर्यंत अशीं कामें जितकीं उठतील तितकीं चांगलीं !

' ज्ञानेश्वरी ' च्या अध्ययनापासून अनेक लाभ होण्याजोगे आहेत. एक तर ' महाभारता' चें सार जी ' भगवद्गीता ', जिचें माहात्म्य या देशांत तर प्राचीन काळापासून

---

होतें. त्यापासून 'सर्वतोक्तिन्नर्थादित्येके' येणेंकरून वैकल्पिक 'ङीष्' प्रत्ययानें 'कली' आणि स्वार्थी 'कन्' प्रत्ययानें 'कलिका' असेंहि रूप होतें. पण मुख्य रूपें 'कलि' किंवा 'कली' हींच होत. "षट्सन्तः' 'षट्सन्तः' ह्याविषयीं 'ड: सि धुट्' ह्या सूत्राची प्रवृत्ति करण्यासाठीं महाभाष्यकारानें केलेल्या व्याख्यानाप्रमाणें 'कली' असाच शब्दोच्चार अधिक प्रशस्त होय. 'कलिः स्त्री कलिकायां ना शूराजिकलहे युगे' या मेदिनी कोशांतील अवतरणांत सुद्धां मूळ रूप 'कलि' हेंच आढळतें. तारानाथ पंडितांनीं कलकत्त्यास छापलेल्या शब्दस्तोममहानिधि व बृहदभिधान ह्या कोशांत व एच्. एच्. वुइल्सन्च्या कोशांत देखील 'कलि' शब्दाचीं तीनहि रूपें अशाच व्युत्पत्तीनें पृथक् पृथक् साधून दाखविलीं आहेत. 'सम्पादक'

१. ज्ञानेश्वराचे व तुकारामाचे जे सांप्रदायी आहेत त्यांच्या कीर्तनांत वरील ग्रंथाचें प्राबल्य विशेष दिसून येतें. नुकते निवर्तलेले भाऊ काटकर वगैरे मंडळी बरच्यांपैकीं होत. यांच्या कीर्तनाच्या संबंधानें येथें पुढील गोष्ट लिहिणें अवश्य वाटतें कीं, ती कानीं पडली असतां जी चित्तवृत्ति होते ती आमच्या आलीकडील सुधारलेल्या धर्मव्याख्यानांनीं फारकरून थोडीच होते ! आम्हीं ब्रह्मो बाबूंनं मोठ्या सद्गदित स्वरानें केलेल्या प्रार्थना ऐकल्या आहेत, व त्यांची उपासना पाहिली आहे; प्रार्थनासमाजाचे वार्षिक उत्साह* व त्या वेळचे पवित्र उपदेश हेही पाहिले व ऐकले आहेत; पण बरच्यांतला रंग येथें कांहींच वठत नाहीं असें आमच्या अनुभवास आलें. मग याची मीमांसा काय असेल ती असो !

* येथें 'उत्सव' असा शब्द पाहिजे. 'सम्पादक'

अतिशयित आहे, व जिच्या योग्यतेचें प्रमाण दुसरें नको,—बिचाऱ्या व्यासावर युरोपीय पंडितांनीं आलीकडे जो चोरीचा वाजें आणला आहे तोच बस आहे,'—त्या 'भगवद्गीते' वर प्रस्तुत ग्रंथांत मनोरम व्याख्यान आहे. तेव्हां तिचें स्वरूप मनांत यथास्थित बिंबेल हा एक लाभ. दुसरा भाषेच्या दृष्टीनें. आलीकडील पंडितांस भाषाशास्त्राची फार आवड वाटूं लागली आहे; व नदीचा प्रवाह पाहत पाहत मुळापर्यंत जाणें यांत जशी मौज तशीच भाषेचा ओघ समग्र पाहण्यांतही आहेच; तर प्रस्तुत ग्रंथ हा वरील शास्त्राच्या अध्ययनासही

१. आमच्या आधकर्त्यांनीं ज्याप्रमाणें 'मूळ स्वभाव जाईना' या न्यायानें होमरवर *दरवडा घालून त्यास लुटलें, त्याप्रमाणेंच 'भारत'वाल्यानेंही '¶नव्या करारां'तून सगळा मजकूर उपटून 'भगवद्गीता' रचून दिली, हीं दोन अत्यंत समंजस मतें आलीकडे निघालीं आहेत. एकंदरींत आमच्या पाश्चात्य बंधूंचा हा महासिद्धांत ठरून गेला आहे कीं, इकडे जें कांहीं म्हणून बरेंसें सांपडेल तें तिकडूनच उपटलेलें असायाचें; इकडच्या लोकांच्या वांट्याला अकल ती आली कधीं ! मेकॉले साहेबांस आमच्या इकडील ग्रंथांचें केवढें अगाध ज्ञान होतें हें पूर्वी अनेक वेळां सांगण्यांत आलेंच आहे; तरी पुढील वाक्यांतील त्यांचा कटाक्ष पाहा !— [ इंग्रजी उतारा ५०४ पानावर पाहा. ]

* हें मत डॉ. आल्बर्ट् वेबर् (Albrecht Weber) या पंडिताचें असून त्याच्या निबंधाचें इंग्रेजी भाषांतर इंडिअन् अँटिकरीच्या (Indian Antiquary) पहिल्या पुस्तकांत प्रसिद्ध झालें असून १८७३ सालीं तें स्वतंत्र पुस्तकरूपानें मुंबईच्या थैकर् आणि कंपनीनें प्रसिद्ध केलें आहे. रामायण व इलियड् या दोन काव्यांत अगॅमेम्नॉन्-सुग्रीव, पॅट्रोक्लस्-लक्ष्मण, नेस्टर्-जांबुवंत, ऑडिसीअस्-हनुमान्, हेक्टर्-इंद्रजित यांमधील विलक्षण सादृश्य मोनिअर् वुइल्यम्सनें शोधून काढलें, व त्यावरून Hipolyte Fauche या रामायणाच्या फ्रेंच् भाषेंत भाषांतर करणाऱ्या विद्वानानें वेबर्च्या उलट सिद्धांत प्रतिपादिला आहे कीं, रामायणावरूनच होमर्नें इलियड्ची कल्पना घेतली. उलट वेबर् म्हणतो कीं 'अलेक्झांडर्च्या स्वारीच्या वेळेपासून हिंदु व ग्रीक् यांचा संबंध होता. वाल्मीकीनें इलियड् वाचलें होतें असें जरी म्हणतां येणार नाहीं तरी त्याच्या कथानकाचा सारांश त्याला कर्णोपकर्णी ऐकून माहीत असावा असा तर्क करण्यास मुळींच हरकत नाहीं.' मोनिअर् वुइल्यम्स्च्या मतें रामायण ख्रि. पू. पांचव्या शतकांत झालें असावें व म्हणून तो हे सादृश्यदर्शक भाग प्रक्षिप्त व दोन्ही ग्रंथ स्वतंत्र मानतो. वेबर्नें केलेला कालाचा घोंटाळा पाहिला (तो म्हणतो बुद्धानंतर ९०० वर्षेपर्यंत राम हें नांव हिंदुस्थानला माहीत नव्हतें. पण राम हा सातवा अवतार तर बुद्ध नववा! याच्या मतें कृष्ण सुद्धां रामापूर्वी होऊन गेला !) म्हणजे त्याच्या मताचा फोलपणा सिद्ध करण्याची गरजच राहत नाहीं. ग्रीक् लेखक डायन् क्रिसॉस्टोमस् (Dion Chrysostomos) याचेंहि मत 'होमर्ची नक्कल अगर भाषांतर रामायण होय' असेंच होतें.

'सम्पादक'

¶ हें मत डॉ. लॉरिन्सर् नामक प्रख्यात जर्मन् पंडिताचें होय. यानें १८६९ सालीं प्रसिद्ध केलेल्या गीतेच्या जर्मन् भाषांतराच्या प्रस्तावनेंत दोन्ही ग्रंथांतील विलक्षण अर्थसादृश्याचीं सुमारें शंभर उदाहरणें दाखल केलीं आहेत. या भागाचें इंग्रेजी भाषांतर इंडिअन् अँटिकरीच्या दुसऱ्या पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे. अनेक पाश्चात्यांचेंहि मत असेंच आहे. पण भक्तिपर भागवतधर्माचा उदय ख्रि. पू. १४ शतकें झाला असल्यामुळें व संन्यासपर बौद्ध धर्मांत प्रवृत्तिपर भक्तितत्त्वांचा प्रवेश श्रीकृष्णप्रणीत गीतेमुळेंच झाला हें बौद्ध ग्रंथकारांसच मान्य असल्यामुळें लॉरिन्सर् साहेबांचें तत्त्वज्ञान उकट त्यांच्यावरच उलटून गीतेंतूनच बौद्धधर्माच्या द्वारें हीं सदृश दिसणारीं तत्त्वें ख्रिस्ती बायबलांत घेतलीं असलीं पाहिजेत असें सिद्ध होतें. 'सम्पादक'

उपयोगी आहे. सहाशें वर्षांपूर्वी आमची भाषा कशी होती, ह्मणजे संस्कृत व प्राकृत या दोन मागल्या पिढ्या सुटून तिच्या स्वैर गतीस आरंभ झाला असतां तिचें स्वरूप कसें होतें तें या ग्रंथावरून पाहण्यास सांपडणार आहे. तिसरा लाभ प्रस्तुत ग्रंथाचें मनोरमत्व. ज्ञानोबानीं शेवटल्या महाराष्ट्र-कवीप्रमाणें|| मूळ ग्रंथाशीं भीत भीत दुरून न वागतां ' आपल्या अधिकाराप्रमाणें त्याशीं पुष्कळ सलगी केली आहे. किंबहुना बहुधा मूळ हें आधारमात्र करून वरील सर्व रचना आपली स्वतःचीच केली आहे. बाराव्या अध्यायांतील मूळच्या एका श्लोकावर १४७ ओव्या झाल्या आहेत, हें पहिल्या ' नवनीता ' वरून[2] पुष्कळांस माहीत असे-

---

" Voltaire seems, at this time, to have meditated a history of the conquest of Bengal. Had the plan been carried into execution, we have no doubt that Voltaire would have produced a book containing much lively and picturesque narrative, many just and humane sentiments poignantly expressed, many grotesque blunders, many sneers at the Mosaic Chronology, much scandal about the catholic missionaries and much sublime theo—philanthrophy, *stolen from the New Testament, and put into the mouths of virtuous and theosophical Brahmins*."

—Lord Clive.

खरेंच, यहुदी लोकांसारख्या परम ज्ञानसंपन्न व ईश्वरकृपाविशिष्ट लोकांस जें ज्ञान करून आयतें प्राप्त झालें, तें ब्राह्मणांसारख्या अधम व मूर्ख लोकांस कसें मिळावें ? आमच्या गोवळकोंड्याच्या वगैरे खाणींतून जरी हिरे निघालेले आपण प्रत्यक्ष पाहिले, तरी त्यांची मूळ उत्पत्ति कॉर्नवॉल प्रांतांतील कोळशाच्या खाणींच होत असें पक्कें समजावें ! !

वरील दोन्ही मतांचें यथास्थित खंडन एका प्रसिद्ध नवीन पंडिताकडून* इंग्रजी भाषेंत झालें आहे हें आमच्या बहुश्रुत वाचकांस माहीत असेलच.

* दोन्ही मतांचें सप्रमाण खंडन के. न्या. काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांनीं केलें आहे.

पहिल्या मताचें खंडन Students' Literary & Scientific Society या संस्थेंत २ सप्टेंबर १८७२ रोजीं झालेल्या व्याख्यानांत व दुसऱ्याचें खंडन १८७५ सालीं प्रसिद्ध झालेल्या तेलंगकृत गीतेच्या पद्यात्मक इंग्रजी भाषांतराला जोडलेल्या प्रस्तावनेंत केलें आहे. पहिल्या मताचें खंडनपर व्याख्यान ' Was the Ramayan copied from Homer ?' या नांवानें पुस्तकरूपांत १८७३ सालीं प्रसिद्ध झालें आहे. 'सम्पादक'

|| मोरोपंत; हा शब्दालंकारकुशल 'आर्यापति' असूनहि भगवद्गीतेचें भाषांतर करतांना (याच भाषांतराला लिहिलेल्या प्रास्ताविक आर्या जरी सयमक आहेत तरी) याला यमक, प्रास वगैरे सर्व गुंडाळून ठेवून निर्यमक रचना करावी लागली. 'सम्पादक'

१. अंक ४६ प्यारा ४ टीप (पुढें, मोरोपंताची कविता हा विषय येईल त्यांत) पाहा.

२. 'नवनीता'ची नुकतीच दुसरी आवृत्ति निघाली आहे हें कोणाकोणास माहीत असेलच. या आवृत्तींत वरील अध्याय पाहूं गेल्यास पाहणाराची निराशा होईल. या आवृत्तींत पुष्कळ चांगल्या सुधारणा केल्या आहेत, पण बिचाऱ्या मुकुंदराजास व ज्ञानेश्वरास मुळींच फांटा दिला आहे ही

(पुढें चालू.)

ल्च; शिवाय मूळ ग्रंथ सगळा ७०० असून ' ज्ञानेश्वरी ' १००० आहे यावरूनही वरील विस्तार स्पष्टच आहे. पण या विस्ताराची मौज अशी आहे कीं, त्याचा बिलकुल कंटाळा न येतां उलटें त्याकडे चित्त वेधूनच जातें. आह्मांस पूर्वी ' नवनीता 'च्या पहिल्या व दुसऱ्या भागांवरूनच काय ती प्रस्तुत कवीची माहिती होती; पण सदरील 'परिभाषे'च्या परीक्षार्थ मूळ ग्रंथाची कोठें कोठें जी आह्मीं उगीच चाचणी पाहिली तिजवरूनही त्याच्या वाणीच्या लावण्याच्या छटा आमच्या डोळ्यांत भरल्या व समग्र ग्रंथाच्या वाचनाविषयीं उत्कृष्ट इच्छा उद्भवली. आमच्या येथील एका मित्रानेंही तोच आपला अनुभव आह्मांस सांगितला. तर आह्मी आमच्या वाचकांसही आनंदानें कळवतों कीं, कवित्वाच्या तरंगांत मौजेनें लोटत जाऊन उपमादृष्टांतादि कमळें ज्यांस लीलेनें खुडायाचीं असतील त्यांनीं प्रस्तुत ' परिभाषा'-रूप तुंबीफलाचा आश्रय करून महाराष्ट्र-भाषेच्या आद्यकवीच्या वाक्तरंगिणींत उडी घालावी. हिचें आजपर्यंत अपरिचितत्वास्तव जें दुरवगाहत्व वाटत होतें तेंही प्रत्यक्ष अनुभवावरून पुष्कळ अंशीं मिथ्याच अशीही आमची खात्री झाली. ज्यास संस्कृत व्युत्पत्तीचें अंग आहे, त्यासही असाच अनुभव येईल असें आह्मांस वाटतें.

सदरील ' परिभाषे'विषयींच खुद्द आणखी ज्यास्त लिहिण्यासारखें अर्थात् कांहीं नाहीं. मूळ ग्रंथांत जेवढे शब्द अडण्यासारखे आहेत तेवढे प्राय: सर्व यांत आहेत. जे शुद्ध संस्कृत शब्द, कीं ज्यांच्या अर्थाची संस्कृतज्ञ वाचकांस गरज नाहीं, ते सुद्धां सामान्य वाच-कांच्या सोयीकरतां यांत सामील केले आहेत. तेव्हां प्रस्तुत ग्रंथाच्या साह्यानें बहुधां कोणा-चाही 'ज्ञानेश्वरींत' प्रवेश होईल असें वाटतें. येवढें मात्र आहे कीं, प्रस्तुत ग्रंथप्रकाशकानें जी 'ज्ञानेश्वरी' ची आवृत्ति काढली आहे तीच जवळ असली पाहिजे. आह्मी एका जुन्या हस्त-लिखित पोथीवरून ' परिभाषें' तील शब्द पाहूं लागलों तों कशास कांहीं मेळ बसेना. जो शब्द ' परिभाषें'त एका ओवींत आढळावा तोच आमच्या प्रतींत पांचपन्नास ओव्या पुढें

---

मोठी सुधारणा झाली आहे§ असें आम्हांस वाटत नाहीं, वेदांताचा भाग जर महाराष्ट्रकवितेंत येवढा पुष्कळ आहे तर 'मराठी कवितांच्या वेच्यां'त त्याच्या भागमूलही उमगूं नये हें अंमळ विचित्रच खरें ! बाराव्या अध्यायांत विचाऱ्या ज्ञानोबानें साधूंचीं लक्षणें दिलीं होतीं. त्यांत येवढें दुर्बोध काय होतें तें कळत नाहीं. शिवाय येवढ्या चारशें पानांच्या ग्रंथांत कोठें कोनाकोपऱ्यांत थोडासा वेदांत आला असता तर 'नवनिता'च्या स्वादास कांहीं हीनत्व आलें असतें किंवा त्याचे पौष्टिक धर्म कांहीं कमी झाले असते असेंही आमचें मन घेत नाहीं.

§ १८५४ सालीं नवनीताची पहिली आवृत्ति छापली. १८७३ पर्यंत सात पुनर्मुद्रणें झालीं. १८७८ सालीं पुन: छापण्याचे वेळीं त्या वेळचे विद्याखात्याचे डायरेक्टर चॅट्फील्ड् यांनीं ' कठिण वेंचे सर्व काढून टाकावे' असें सुचविल्यावरून मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांचे (त्यांत सर्व वेदांतच असल्या-मुळें अर्थ समजण्यास कठिण असे) वेंचे काढून टाकले. १८८२च्या सुधारून वाढविलेल्या आवृत्तींतहि हे वेंचे गळलेच. पण १८८६ सालच्या आवृत्तीचे वेळीं कित्येक एज्युकेशनल् इन्स्पेक्टरांचें मत हे वेंचे फिरून नवनीतांत प्रविष्ट करावे असें पडल्यानें ज्ञानेश्वरींतील बारावा व तेरावा हे अध्याय पुनः नवनीतांत दाखल झाले ते आजतागायत कायम आहेत. 'सम्पादक'

आढळावा. उदाहरणार्थ १४ व्या अध्यायांत ' हरिखाचा ' ( आनंदाचा ) हा शब्द छापील प्रतींत ४१४ व्या ओवीत; हस्तलिखित प्रतींत ४३१ व्या ओवींत आहे; १५ व्या अध्यायांतील ५३२ व्या ओवींतला ' अनारिसा ' ( वेगळा ) हा शब्द आमच्या प्रतींत ५५६ व्या ओवींत सांपडतो; ' निष्कर्षु ' ( शेवट ) व ' वाक्यपूजा ' ( वाक्यरूपें पूजा ) हे शब्द वरील दोन प्रतींत अनुक्रमेंकरून ५२९ व ५५१ आणि ५९९ व ६२९ अशा ओव्यांतून सांपडतात; सतराव्या अध्यायांत ' खेंव ' ( आलिंगन ) हा शब्द एका प्रतींत ४१७ व्या व दुसरींत ४४१ व्या ओवींत सांपडतो. त्याप्रमाणेंच शेवटली प्रसिद्ध ओवी—

शकें बारार्शे बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंद बाबा आदरें । लेखकु जाहला ॥

ही 'परिभाषे'त १८९१ वी व हस्तलिखित प्रतींत १९५५ वी सांपडते. तर याप्रमाणें रा० गोंधळेकरांच्या आवृत्तींत व इतर प्रतींत पुष्कळ फरक पडण्याचा संभव दिसतो. आमच्या प्रतींत एकंदर ग्रंथ ९४८७ इतका आहे; तो वरील आवृत्तीहून ४६० ओव्यांनीं ज्यास्त आहे.शिवाय 'परिभाषे'तील कांहीं शब्द आमच्या पोथींत न सांपडल्यावरून व कोठें निराळीं रूपें आढळल्यावरून असेंही वाटतें कीं, प्रस्तुत ग्रंथांत पाठभेदाचा प्रकारही पुष्कळ असावा. तर रा० गोंधळेकर यांस आमची अशी सूचना आहे कीं, 'ज्ञानेश्वरी'ची आवृत्ति पुनः काढणें झाल्यास तींत वरील अधिक ग्रंथाचा व पाठांतरांचा त्यांनीं समावेश करावा. ठिकठिकाणच्या पांच सहा प्रती एकत्र केल्या असतां वरील दोहोंचा उलगडा होणार आहे. एका प्रतीहून दुसऱ्या प्रतींत ४६० ओव्यांची जर भर दृष्टीस पडते आहे तर येवढा ग्रंथ बुडूं देणें हें कवीची व कवितेच्या भोक्त्यांची मोठीच हानि करणें आहे !

सरतेशेवटीं सदरील पुस्तकाच्या छापणीबद्दलही दोन शब्द लिहिल्यावांचून राहवत नाहीं. ठशांच्या छापाविषयीं मुंबईच्या गणपत कृष्णाजींची जशी पहिल्यापासून प्रसिद्धि आहे, त्याप्रमाणेंच आलीकडे रा० गोंधळेकर यांचीही शिळाछापाविषयीं झाली आहे, यांच्या छापखान्यांत शिळेवरील काम जसें सुबक निघतें तसें दुसऱ्या कोठेंही निघत नाहीं. प्रस्तुत 'परिभाषा' जाड कागदावर चांगली स्वच्छ छापली असल्यामुळें तिजकडे वाचकांची प्रवृत्ति सहजवृत्त्या होणार आहे. मूळ ग्रंथाचीही अंगभूत वेधकता अशीच वाढली असेल यांत संशय नाहीं. तर भाविक जनांस व रसिक भाषाविवेचकांस वरील दोन्ही ग्रंथांविषयीं शिफारस करून हें परीक्षण आटपतों.

# पत्राचें उत्तर.

† न पादपोन्मूलनशक्ति रंहः शिलोच्चये मूर्छति मारुतस्य ।[१]

' रघुवंश '—कालिदास.

अंक ६१—( १ ) सदरील अंकाचा विषय. ( २ ) सदहूं पत्र न छापण्याचीं कारणें. ( ३ ) ' अपभ्रष्टशब्दचंद्रिके' वर पहिला आक्षेप—अव्याप्ति. ( ४ ) दुसरा आक्षेप—अतिव्याप्ति. ( ५ ) तिसरा आक्षेप—पुनरुक्तता. ( ६ ) चवथा आक्षेप—अस्थानगत विस्तार. ( ७ ) उपसंहार.

१. या अंकांत पूर्वसंकेताप्रमाणें ' विविधज्ञानविस्तारा 'च्या एप्रिल–मे–जून‡ महिन्यांच्या त्रैमासिक अंकांत आलेल्या पत्राचें उत्तर द्यावयाचें आहे. सदरील पत्र ' अपभ्रष्टशब्दचंद्रिके'च्या कर्त्यानें प्रथमतः आमच्याकडे पाठवलें होतें; पण तें छापण्याचें आह्मीं नाकारल्यावरून तें वरील मासिक पुस्तकाकडे पाठवण्यांत आलें.

२. आमच्या पुस्तकांत जे अभिप्राय प्रगट होत असतात त्यांस अनुकूल किंवा प्रतिकूल असे कोणत्याही तऱ्हेचे लेख आमच्याकडे कोणीं पाठवल्यास ते छापून प्रसिद्ध करण्याची व अवश्य वाटल्यास आमचा त्यांवर पुनः अभिप्राय देण्याचीही आमची मूळपासून वहिवाट आहे हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. मग असें असतां ' चंद्रिके 'च्या तर्फेनें आलेल्या वरील पत्रासच आह्मीं नकार कां लावला हें वाचकांच्या सहजच मनांत येईल. यास्तव वरील निषेधाचीं कारणें येथें अगोदर लिहिलीं पाहिजेत.

सदरील पत्र न छापण्याचें पहिलें मोठें कारण हें होय कीं, तें अतिशयित लांब असून शास्त्रीय भाषेनें लिहिलेलें आहे; व शिवाय त्यांतील विषयही वाचकांस चित्तवेधक होण्यासारखा नाहीं. आमचे वाचक अगोदरच ' नवीन पुस्तकें ' हें सदर पाहिलें ह्मणजे 'कंटाळतात. ही गोष्ट आह्मांस प्रथमतः माहीत नव्हती; पण कित्येकांच्या पत्रांवरून ती समजण्यांत आली. एके रीतीनें पाहतां हा कंटाळा येणें हें स्वाभाविकही आहे; कां कीं अनोळखी मनुष्याची तजबीर पाहण्यापासून जसा विशेष आनंद होत नाहीं, त्याप्रमाणेंच ज्या पुस्तकाची आपणांस मुळींच माहिती नाहीं त्याच्या अत्यंत यथार्थ परीक्षणापासूनही काय चित्तरंजन होणार ? मग मूळ ग्रंथपरीक्षणाची जर ही गोष्ट, तर त्या परीक्षणाचें परीक्षण कितीसें वाचकांस पसंत पडेल हें सांगायासच नको ! त्यांतून सदरील पत्राचा विषय ह्मटला ह्मणजे परम रुक्ष जें व्याकरण त्याच्या संबंधाचा होय; आणि त्यांतही 'चंद्रिका'कारांची लिहिण्याची

---

† सर्ग २ श्लोक ३४ पाहा. 'सम्पादक'

१. "वाऱ्याचे अंगीं झाडें उपटून टाकण्याचें जरी सामर्थ्य असलें तरी पर्वतावर त्याची शक्ति चालत नाहीं !"

‡ सन १८७८. 'सम्पादक'

२. वादविषयक पत्राच्या खालीं जरी 'अच्युत अनंत चिपळोणकर' अशी सही आहे तरी हें

( पुढें चालू )

पद्धति जुन्या शास्त्रीय तऱ्हेची ! तेव्हां अशा प्रकारचें पत्र साऱ्या अंकभर पाहून आमच्या वाचकांस कितपत संतोष झाला असता हें सांगण्याची जरूर नाहीं. तर आमचा नेहमीचा शिरस्ता मोडून पत्र माघारीं पाठवण्याचें हें पहिलें मोठें कारण होय.

दुसरें कारण असें कीं, सदरील पत्रांत मुद्द्याचा मजकूर थोडा असून पाल्हाळ व वितंडवाद भारी आहे. मूळ उपक्रम जो केला आहे तोच अगोदर मोठा मौजेचा आहे. झालें काय, कीं प्रस्तुत पत्रकार हें 'अपभ्रष्टशब्दचंद्रिके'चा प्रकाश व 'निबंधमाले'च्या ५१ व्या 'अंकरत्ना'चा प्रकाश यांचें तारतम्य पाहत असतां त्यांचा एकाएकीं डोळा लागला; डोळा लागतांच स्वप्नसृष्टीस आरंभ झाला ! या स्वप्नांत त्यांनीं काय पाहिलें व काय ऐकलें ह्मणाल,तर 'एक अतिप्राचीन तरुण शास्त्रपंडित व एक अतिअर्वाचीन प्रौढवक्ता ह्या दोघांचा प्रसंगवशात् लीलाविवाद उद्भवला' आहे व हा लीलाविवाद आपण 'उदासीन व तटस्थ' होत्साते ऐकत आहों, असें त्यांस दिसलें. बरें, या गंमतीच्या विवादाचा विषय काय होता ह्मणाल तर 'चंद्रिका' व 'अंकरत्न' ! पुढें काय झालें कीं, आमचे पत्रकार वरील दोघां महा-पंडितांची भवतिनभवति ऐकण्यांत जों अगदीं चूर होऊन गेले आहेत तों एकाएकी ते 'नित्यव्यवसायाच्या चटक्यानें' जागे झाले. जागे होतांच त्यांची दृष्टि कलमदानाकडे जाऊन त्यांच्या मनांत कल्पना आली कीं आपले उपनामधारी निबंधमालाकर्ते यांजकडे हें आपलें स्वप्न उकलण्याकरतां पाठवावें. मग या स्वप्नसृष्टींत झालेल्या वादाचें दिग्दर्शन करून एक लांबलचक पत्र त्यांनीं आमच्याकडे रवाना केलें. पुढें कोणती व्यवस्था झाली हें वर सांगि-तलेंच आहे.

आतां आमच्या पुस्तकाच्या ५१ व्या अंकांत 'चंद्रिके'वर जी आह्मी टीका केली होती तिचें निराकरण करण्याची जर प्रस्तुत ग्रंथकारास इच्छा होती तर वरील येवढ्या द्राविडी प्राणायामाची काय जरूर होती हें आह्मांस कळत नाहीं. आपले काय प्रत्याक्षेप असतील ते आपल्या सहीनिशी जर त्यानें आमच्याकडे पाठवले असते तर ते प्रस्तुत स्वप्न-वादापेक्षां आह्मांस कमी ग्राह्य झाले असते असें नाहीं. 'चंद्रिका' हें पुस्तक जर स्वप्नसृष्टींत लिहिलेलें नाहीं, व त्यावर आह्मीं जो अभिप्राय प्रगट केला तोही जर जागृतावस्थेंतच लिहिला, तर मग आमच्या आडनांवाचा एक परम मित्र उभा करून त्याला स्वप्न पाडून त्यांत आपण शिरून व आह्मांला शिरवून वादप्रसंग उपस्थित करायाचा, आणि मग त्याचा सारांश आह्मांस पत्ररूपानें कळवायाचा, येवढा खटाटोप कशाकरतां बरें केला ? जागृतीं-तल्या लेखाचें विवेचन जागृतींतच होण्यास कोणती आडकाठी होती ? पण प्रस्तुत ग्रंथक-र्त्यांचा कदाचित् असा मतलब असावा कीं आपण साक्षातच जर वादाची गांठ घातली तर केवळ स्वाभिमानानें आपला पक्ष सिद्ध केल्याचा आपणावर आरोप येईल; तर आपण केवळ

---

पत्र कोणीं लिहिलें असावें याविषयीं बहुधां कोणीही भ्रमांत पडणार नाहीं. 'चंद्रिकाकारांचा हेतु असा आहे कीं',—'चंद्रिकाकारांचा मनोरथ असा आहे',—'चंद्रिकाकर्त्यांचें हार्द मर्म आहे तें असें'— इत्यादि उल्लेखांवरून स्पष्ट दिसत आहे कीं, सदरील पत्राचे लिहिणारे ग्रंथकारच होत. वास्तव आम्हीं आपलें उत्तर नामधारी पत्रकारास न लिहितां मुख्य ग्रंथकारासच उद्देशून लिहिलें आहे.

'उदासीन व तटस्थ' राहावें, आणि 'या अतिअर्वाचीन प्रौढवक्त्या'शीं भांडण्यास आपला मित्र पुढें करावा! ही 'चंद्रिका'कारांची युक्ति मोठी चातुर्याची आहे खरी; पण तींत येवढेंच वाईट आहे कीं, सदरील पत्रांत मधें मधें अनेक ठिकाणीं 'खंडाळ्याचा घाट', 'काजळाची तिटली' वगैरे *जे अप्रस्तुत व अप्रयोजक उल्लेख आले आहेत त्यांवरून आमच्या 'अतिप्राचीन तरुण शास्त्रपंडिता'च्या 'औदासीन्या'ची तादृश प्रतीति होत नाहीं!

असो; तिसरें कारण प्रस्तुत पत्रांत जो असभ्यतेचा प्रकार आढळतो तो होय. 'चंद्रिका'कारांस अर्वाचीन विद्येचा जर संस्कार असता, व वादविवादाची खरी पद्धत माहीत असती, तर प्रतिपक्ष्याचें खंडन कसें करावें, व उदासीनपणाचें घेतलेलें पांघरूण शेवटपर्यंत कसें राखावें हें त्यांस समजलें असतें. त्यांस आम्हीं 'सत्ययुगांत झुगारून दिलें' आहे तें पसंत नाहीं; पण त्यांच्या वादरीतीवरून पाहतां त्यांजवर वरील युगाचीच झांक बहुधा दृष्टीस पडते. आम्ही आपल्या प्रतिपक्ष्यांचेही अभिप्राय पुस्तकांत घेत असतों येवढें समजल्यावरून कोणत्याही तऱ्हेचा मजकूर आमच्याकडे खपला जाईल अशी प्रस्तुत ग्रंथकाराची समजूत झाली. आपलें लिहिणें युक्तीस कितपत अनुसरून आहे, व दुसऱ्याच्या घरीं आपण जाऊन वाद करणार तर तेथेंही शिष्टाचाराची उपेक्षा आपणास करतां कामा नये, या गोष्टी आमच्या 'अतिप्राचीन पंडिता'च्या मुळींच लक्षांत आल्या नाहींत. आपण जर एकादें पुस्तक प्रसिद्ध केलें तर त्यावर हवा तसा अभिप्राय प्रगट केल्यानें कोणी गुन्हेगार होत नाहीं. आणि त्यांतून टीकाकारानें जर प्रांजलपणें आपले गुणदोष दाखवले आहेत तर त्याबद्दल क्रोधास चढून त्या क्रोधावेशांत आपण आहों कोठें व बोलतों आहों काय याचें भान विसरून जाऊन दुसऱ्याच्या घरांत अविनीतत्व प्रगट करणें ही शिष्टजनरीति नव्हे येवढेंही पंडितमजकुरांस कळलें नाहीं. असो; तर येथें त्यांस व इतःपर ज्या कोणांस असा प्रसंग येईल त्यांस कळण्याकरतां अशी सूचना करून ठेवतों कीं, आपले अभिप्राय आम्हांस कळवण्याची आम्हीं सर्वांस मोकळीक दिली आहे, व कोणाचे कसेंही अभिप्राय असले तरी ते प्रसिद्ध करण्यांत व वाटल्यास आमचा अभिप्राय पुनः प्रगट करण्यांत आमच्याकडून कधीं अनमान होणार नाहीं; पण या मोकळिकीमध्यें दोन अटी आहेत हें पक्कें समजलें पाहिजे. एक अट ही कीं, मजकूर छापण्यालायक असला पाहिजे, म्हणजे त्यांत चारचौघांस पसंत पडेल असें सयुक्तिक प्रतिपादन असलें पाहिजे—मग पक्ष कोणताही असला तरी फिकीर नाहीं. आणि दुसरें असें कीं, ज्या अर्थी आमच्या परवान्यानें शत्रूकडचा वकील आमच्या गोटांत येणार त्या अर्थी आपला व आमचा बोज ठेवण्याकडेही त्यानें लक्ष पुरवलें पाहिजे. अविनीतत्व हें दुसऱ्याच्या उपमर्दास जसें कारण होतें तसेंच आपल्या प्रतिष्ठेसही उणेपणा आणतें हें वरील वावदूकानें विसरतां कामा नये!

तर वादविषयक पत्र आमच्याकडे आलें असतां त्याचा आम्हांकडून अव्हेर कां झाला याचीं वर दाखवल्याप्रमाणें कारणें होत. आतां या पत्रांतील कोटिक्रमाविषयीं विचार करूं.

१. 'अपभ्रष्टचंद्रिके'वर आमचा पहिला मोठा आक्षेप हा होता कीं, प्रस्तुत पुस्त-

कास जर कोश हें नांव दिलें आहे तर कोशाचा पहिला गुण जो व्यापकता तो यांत पाहिजे होता. या आक्षेपावर 'चंद्रिका'काराचें ह्मणणें काय आहे, कीं आमचा कोश जर तुह्मी अपूर्ण ह्मणतां तर मग भट्टोजी दीक्षितांची 'सिद्धांतकौमुदी', अमरसिंहाचा 'अमरकोश', हेही ग्रंथ अपूर्ण असें तुह्मांस ह्मणावें लागेल. शिवाय कोश ह्मटला ह्मणजे त्यांत ज्या वस्तूंचा समावेश असेल त्यांची 'त्वरित उपस्थिति' व्हावी इतक्या प्रकारची त्यांत 'व्यवस्था मात्र अपेक्षित असते.' 'संकलित वस्तूंचा आधार' येवढाच 'कोश' शब्दाचा शास्त्रोक्त अर्थ; तेव्हां या पाणिनीय अर्थाप्रमाणें पाहतां आमच्या पुस्तकास 'कोश' हें नांव यथार्थच आहे. आणि त्यांतून 'अपभ्रष्ट' शब्दांचा व्यापक असा ग्रंथ तर होणेंच नाहीं, कारण प्रत्येक संस्कृत शब्दाचे अनेक अपभ्रंश आहेत.‡ 'इंद्रादयोऽपि यस्यान्तं न ययुः शब्दवारिधेः '( शब्दसमुद्राचा इंद्रादिकांसही पार लागला नाहीं ! ); खेरीज 'आकाशाचा वामनाप्रमाणें अंत सांपडेल तरच पक्ष्यानें उडावें, अथवा समुद्राचें गांभीर्य मंदराचलाप्रमाणें समजेल तरच मनुष्यानें पाण्यांत पोहावें' असाही कांहीं अर्थ नाहीं ! 'चंद्रिका'कर्त्यांनीं आपल्या पुस्तकाच्या तर्फेनें हा जो आह्मांवर कोट्यांचा भडिमार केला आहे तो पाहून आह्मांस परम विस्मय होतो ! या कोट्या स्वप्नांतर्गत 'लीलाविवादां'तील आहेत ह्मणून ठीक आहे; नाहीं तर त्यांची उपपत्ति करणेंही आह्मांस दुर्घट झालें असतें. मनुष्याच्या मनांत एकीकडून कोपानें प्रवेश केला कीं दुसरीकडून विवेचनशक्तीची निष्क्रांति होते, शब्दशास्त्राचा आणि तर्कशास्त्राचा नैसर्गिक विरोध असावा, सत्ययुगांत 'युक्ती'चें तेज फार मंद होतें, किंवा शब्दांच्या अपभ्रंशांत सतत व्यापृत झालेल्या बुद्धीवरही भ्रंशनाचा कांहीं संस्कार घडत असेल,—अशी कांहीं नवी उपपत्ति करणें आह्मांस एरवीं भाग पडलें असतें ! ' कौमुदी ' कार भट्टोजि कोणीकडे आणि विजयी ब्राह्मणांच्या तडाक्यांतून परमोत्कृष्टत्वास्तव वांचलेला अन्वर्थनामा 'अमरकोश'ही* कोणीकडे ! या दोन बड्या प्रकरणांस 'चंद्रिका'कारांनीं आपल्या तर्फे साक्षी देण्याची विनाकारण तसदी दिली या गोष्टीचा आह्मांस फार खेद वाटतो. वरील दोन ग्रंथांची आह्मांस थोडीबहुत माहिती आहे, तिजवरून पाहतां त्यांचें सादृश्य प्रस्तुत अपभ्रंशकोशास विशेष उपयोगीं पडेल असें आह्मांस वाटत नाहीं. ' कौमुदी ' त विद्यार्थ्यांच्या निर्वाहापुरतें व्याकरण आहे; व

‡ संस्कृत भाषा ही महाराष्ट्रभाषेची माता आहे म्हणून प्रायः ते सर्व असंख्य अपभ्रंश या भाषेंत येण्याचा संभव आहे. पतञ्जलि महाभाष्याच्या प्रथमान्हिकांत म्हणतो कीं अध्ययनकर्ता इन्द्र, अध्यापक बृहस्पति, व दिव्य वर्षसहस्रांचा अवधि; तरी सुद्धां शब्दपारायणाचा पार आला नाहीं. तेव्हां पूर्ण व्यापक ग्रंथ अशक्य असें चिपळोणकरांचें म्हणणें. 'सम्पादक'

* अमरसिंह हा कर्ता; इ. स. ३७५ च्या सुमारास होऊन गेला. हा चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या दरबारीं होता. याच्या त्रिकांडात्मक कोशांत सुमारें दहा हजार शब्द आले आहेत. हा बुद्धमतानुयायी अगर जैन असावा. यानें आणखीहि अनेक ग्रंथ लिहिले होते. पण पांचव्या शतकांत ब्राम्हणी अमदानींत झालेल्या जैनांच्या छळांत अमरकोशाशिवाय सारे नष्ट झाले. तथापि हा कोश इतका उत्तम झाला कीं जैन पंडित सुभूतिचंद्र, बौद्ध पंडित आशाधर, नाचिरात, व ब्राह्मण पंडित क्षीरस्वामी, मल्लिनाथ, अप्पयदीक्षित अशा सर्वजातीय विद्वानांनीं अमरकोशावर टीका लिहिल्या आहेत. महेश्वर, भानुजी दीक्षित व क्षीरस्वामी यांच्या टीका फार प्रसिद्ध आहेत. 'सम्पादक'

'अमरां'तही तोच प्रकार आहे, ह्मणजे सामान्य काव्यादि ग्रंथांत येणाऱ्या शब्दांचें त्यांत संकलन आहे. प्रस्तुत ग्रंथकारानेंही प्रस्तावनेंत ह्मटलें आहे कीं, 'मुलांस शिकवितांना शिक्षक लोकांस अपभ्रष्ट शब्दांची व्युत्पत्ति सांगण्यास अडचण पडूं नये ह्मणून हें अल्प किंमतीचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे.' आतां वरील दोन चिरप्रसिद्ध संस्कृत ग्रंथांचें सादृश्य शोभण्यास व प्रस्तावनागत प्रतिज्ञेची परिपूर्ति होण्यास सदरील अपभ्रंशकोश कशा तऱ्हेचा पाहिजे होता याचा अंमळ विचार केला असतां आमच्या आक्षेपाची यथार्थता कोणाच्याही लक्षांत येईल. भट्टोजींनीं 'मनोरमा', 'कौस्तुभ' वगैरे ग्रंथांत व्याकरण विषयावर अधिक उपपादन केलें आहे खरें; पण तें नसल्यानें 'कौमुदी'स अपूर्णत्व येतें असें नाहीं. वरील उपपादन केवळ पंडितगम्य असल्यामुळें विद्यार्थ्यांकरतां रचलेली जी 'कौमुदी' तींत त्याचा त्यांनीं समावेश न करतां स्वतंत्र ग्रंथांच्या रूपानेंच तें प्रगट केलें हें ठीक आहे. जोंपर्यंत मूळ संकल्पाप्रमाणें दीक्षितांच्या कृतीनें विद्यार्थ्यांच्या व्याकरणसंबंधीं अडचणी सर्व दूर होताहेत, व तिजवरून ज्याची उपपत्ति होत नाहीं असें संस्कृत भाषेंतील एकही रूप राहत नाहीं तोंपर्यंत 'कौमुदी'चें पूर्णत्व पौर्णिमेच्या गरगरीत चंद्राप्रमाणें अर्थात् सिद्धच आहे. आणि असें आहे ह्मणूनच दीक्षितांच्या पांडित्ययशाची मूर्तिच होऊन बसलेली जी 'कौमुदी' तिच्या देदीप्यमान तेजापुढें पूर्वींचीं अल्पतेजें प्रत्याख्यात होत्सातीं निष्प्रभ होऊन गेलीं. पण आज दोनतीनशें वर्षे सहस्रावधि चकोर तिचें पान करून तृप्त झाले, आणि गीर्वाण भाषेचा दुर्गम व गहन प्रदेश तिजमुळें प्रकाशित होत्साता सर्वांस सुगम झाला! मग असल्या जड पारड्याबरोबरही आमचा वटपद्रनिवासी* कोशकार टक्कर मारणार काय? कोण जाणे बोवा! बाणभट्टाचें श्लेषचातुर्य लढवून आमच्या अंकाची व आपल्या चंद्रिकेची जशी त्यांनीं 'दोषाकरप्रकाशत्वधर्मेंकरून' सांगड घालून दिली,१ †त्याप्रमाणेंच 'कौमुदी' व 'चंद्रिका' 'दीक्षित' व 'पंडित' या नामचतुष्टयाच्या लटपटीत पायावर वरील टोलेजंग इमारतही त्यांनीं कशावरून उठवून दिली नसेल? असो; तर प्रस्तुत पत्रकाराचा पहिला जो मुद्दा, कीं 'कौमुदी' अपूर्ण आहे तशीच 'चंद्रिका'ही अपूर्ण आहे, हा बरोबर नाहीं; कां कीं, पहिल्या ग्रंथानें

---

* बडोद्यास राहणारा.—वटपद्र=बडोदें [वटयुक्तः पद्रः वटपद्रः] 'स्फायि तंचि' इत्यादि उणादि सूत्रानें 'पद' धातूहून 'रक्' प्रत्यय होऊन 'पद्र' शब्द झाला आहे. 'पद्रो ग्रामः' अशी कौमुदीकर्त्यांची व्याख्या आहे. गुजराथी लोक बडोद्यास 'वडोदरा' असेंच म्हणतात. 'सम्पादक'

१. 'दोषाकरप्रकाश' या शब्दाचे दोन अर्थ घ्यावयाचे; एक 'दोषाकर' म्हणजे 'चंद्र' त्याचा प्रकाश; आणि दुसरा अर्थ, 'दोषाच्या आकराचा प्रकाश म्हणजे दोषराशीचें प्रकटीकरण.' हे अर्थ अनुक्रमेंकरून 'चंद्रिका' व 'निबंधमाला अंक ५१' यांस लागू करायाचे. आमच्या प्रतिपक्ष्यानें 'चंद्रिके'चें व अंकाचें साहचर्य घालून देण्यास येवढा श्लेष जुळवण्याची कशाकरतां खटपट केली हें समजत नाहीं. त्यांची 'निरंतर संगति' तर विधात्यानेंच निर्मिली आहे!

† "अपभ्रष्टशब्दचंद्रिका म्हणजे दोषकरप्रकाश, ह्या प्रकाशास आपल्या ह्या रत्नाच्या दोषाकरासारिख्या प्रकाशाची निरंतर संगति झाली तेव्हां समानशील मित्रांप्रमाणें ह्यांत अतिशयित ऐक्य व्हावयाचें हें उघड आहे." असें अच्युतराव चिपळोणकरांचें म्हणणें. 'सम्पादक'

संस्कृत विद्यार्थ्यांस व्यवहारापुरतें व्याकरणाचें पूर्ण ज्ञान होतें यास्तव त्यास अपूर्ण म्हणतां येत नाहीं; आणि 'चंद्रिके'च्या पक्षीं पाहतां तिच्या प्रस्तावनेंत केलेला संकल्पही तिच्या योगानें सिद्ध होत नाहीं यास्तव ती अपूर्णच होय. 'मुलांस शिकवतांना शिक्षक लोकांस अपभ्रष्ट शब्दांची व्युत्पत्ति सांगण्यास अडचण पडूं नये' ही जर ग्रंथकाराची प्रतिज्ञा होय, तर अर्थात् मराठी ग्रंथांतून सामान्यतः आढळणाऱ्या सर्व संस्कृत, फारसी, व अरबी, अपभ्रंशांचा यांत समावेश होणें अवश्य होतें; पण तसें यांत आढळत नाहीं. ग्रंथकारास जे शब्द वाटले व जेवढे त्यास एकदां आढळले तेवढ्यांचाच संग्रह करून त्यानें तो लोकांस अर्पण केला आहे. व्यापकतेचा विचार फार करून त्यांच्या मनांतही आला नसावा.§ आतां हें खरें आहे कीं, वरील प्रतिज्ञेच्या शेवटीं 'अल्प किंमतीचें हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे' असे शब्द आहेत; व या शब्दांवरून 'चंद्रिके'च्या कर्त्यास अव्यापकतेच्या दोषांतून मुक्त होण्यास पुष्कळ जागा आहे. पण सदरील पत्रांत त्यांनीं "संश्लेषार्थक 'कुश' धातूपासून अधिकरणशक्तिप्रधान 'घञ्' प्रत्ययानें 'कोश' शब्द निष्पन्न झाला आहे" वगैरे जें पांडित्य केलें आहे तें त्यांस बाधक होऊं पाहतें. त्याप्रमाणेंच 'इंद्रादयोऽपि यस्यान्तं न ययुः शब्दवारिधेः', 'अनन्तपारं किल शब्दशास्त्रम्', 'आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं' इत्यादि वचनांचा आश्रय करून त्याखालीं दडण्याचा जो त्यांनीं असमंजसपणाचा यत्न केला आहे त्याच्या योगानेंही वरील सबबीस थारा राहत नाहीं!

४. तर याप्रमाणें प्रस्तुत अपभ्रंशकोशावर अव्याप्तीचा जो आम्हीं पहिला आक्षेप केला होता त्याच्या संबंधानें विचार झाला. आतां दुसरा आक्षेप अतिव्याप्तीचा;—म्हणजे अशा तऱ्हेच्या पुस्तकांत जितका मजकूर असायास पाहिजे तितक्याहून यांत अधिक घुसडून दिला आहे, हा यावर दुसरा दोष होय. 'अपभ्रष्टशब्दचंद्रिकें'त अठरा कारखाने, अठरा धान्यें, अठरा पुराणें, नऊ रत्नें, चौदा विद्या, चौसष्ट कला, इत्यादिकांच्या यादी आम्हीं जेव्हां पाहिल्या तेव्हां आम्हांस आश्चर्य वाटलें, व मोलस्वर्थचा कोश चाळतांना त्या ग्रंथकारास आढळल्यावरून त्यानें आपल्या कोशांत त्या उतरून घेतल्या असाव्या असा आमचा सहजच तर्क झाला. पण हा तर्क खोटा असें आतां आम्हांस कळतें. एकूण या यादींची खरी हकीकत अशी, कीं 'स्फुट श्लोक, दोहरे, संस्कृत कोश, वात्स्यायनसूत्र,' इत्यादि, ग्रंथांतून त्या आमच्या कोशकारांनीं घेऊन आपल्या अल्पवयस्क वाचकांस सादर केल्या. असें असेल तर तरुण विद्यार्थ्यांनीं प्रस्तुत ग्रंथकारांचे फारच आभार मानिले पाहिजेत. कां कीं, मोलस्वर्थच्या कोशांतून अपभ्रंशांची याद मिळवीत असतां वरील यादी जर त्यांनीं आयत्या घेतल्या असत्या तर त्यांत इतकें विशेष नव्हतें; पण ज्यापेक्षां त्यांनीं हातचें काम अर्धेंच टाकून वरील वात्स्यायनसूत्रादि ग्रंथ चाळण्याची तसदी घेतली, त्या अर्थीं या श्रमांबद्दल तर त्यांची विशेषच प्रशंसा केली पाहिजे. रा० पंडित यांच्या इतकें आमचें संस्कृत ग्रंथांत अव-

§ चंद्रिकाकर्त्याचें म्हणणें असें कीं "ज्या बालकांस हा ग्रंथ उपयुक्त व्हावा असा कर्त्याचा उद्देश आहे त्या बालकांस हा परिपूर्ण आहे." 'सम्पादक'

लोकन नसल्यामुळें वरील यादी आह्मांस माहीत नव्हत्या, व त्या मिळवण्यास मोलस्वर्थ यास बरीच खटपट पडली असावी असें आह्मांस वाटलें, हें आह्मी कबूल करतों; पण या श्रमास कारण वरील कोशांतील उल्लेख होय.[1] असो; पण सदरील यादींच्या संबंधानें जो आह्मीं आक्षेप काढला होता तो तसाच राहिला आहे. तो अर्थात् हाच कीं, त्या प्रस्तुत ग्रंथांत शोभत नाहींत. आमच्या पत्रकारानें या यादींच्या तर्फेनें असा पुरावा आणला आहे कीं, 'वस्त्र' शब्दाचा मुख्यार्थ जरी 'आच्छादनाचें साधन' इतकाच आहे तरी 'त्यास चांगले रेशमी किंवा जरीचे काठ लावूं नये' असें नाहीं ! हें समाधान आह्मांस अंमळसें विलक्षण वाटतें. यावरून आमच्या पत्रकाराची 'चंद्रिका'कारांचे ठायीं किती निष्ठा आहे, किंवा 'चंद्रिकाकारां'स आपल्या कृतीच्या निर्दोषत्वाविषयीं किती पूर्ण विश्वास आहे, येवढें मात्र स्पष्ट दिसून येतें; कां कीं एरवीं असली जाडी कोटि कोणी पुढें आणील असें आह्मांस वाटत नाहीं ! या कोटीवरून आह्मांस येथील भिक्षागृहाची* आठवण होते. हें जो पाहावयास जातो त्यास नदीकांठची हवा, बगीचा, फुलझाडांचीं चक्रें, फिरण्याकरतां बांधलेल्या शानदार दगडी वाटा, वगैरे प्रकार पाहून मोठें समाधान वाटतें व ज्या उदार यहुदी गृहस्थानें अंधळ्यापांगळ्यांच्या सोयीकरतां येवढा खर्च केला त्याची मोठी धन्य वाटते; पण या नंदनवनाच्या भोक्त्यांकडे जों जावें तों कोणी आपल्या कोठडींत कुडकुडत पडले आहेत, कोणाचीं अन्नाविणें खपाटें वळलीं आहेत, कोणी औषध मिळत नाहीं ह्मणून हाका मारताहेत, असा प्रकार नजरेस येतो. त्यावरून कोणाही समंजस मनुष्यास सहजच वाटणार

---

१. 'चौसष्ट कला' या शब्दाच्या शेवटीं वरील कोशांत पुढील उल्लेख आढळतो—

"Other, and in some articles, very diverse enumerations are made of the SIXTY-FOUR ARTS; and of the articles given above there are different arrangements, and of some widely different explanations. The Hindus are fast forgetting their ancestral classifications and settlement and will be well content to accept the carefully compiled catalogue now presented."

* अनाथपंगुगृह ( David Sassoon Infirm Asylum ) नारायण पेठेच्या (लकडी) पुलाजवळ, ७१ सदाशिव पेठ, पुणें शहर. येथील ससून हॉस्पिटल् १८६३ सालीं बांधण्यास उदारहस्तानें मदत करणाऱ्या डेव्हिड् ससून् नामक दानशूर यहुदी गृहस्थानें नव्या पेठेंतील विठ्ठलमंदिरापासून पश्चिमेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या टोंकास नदीकांठीं एका बागेंत हें अनाथपंगुगृह बांधलें. १९१२ पर्यंत यांत महारोग्यांचीहि सोय होत असे. पण पुढें त्यांची व्यवस्था येथून जवळच कोंढव्यास केली व येथें फक्त अंधळे, पांगळे असे दीन अनाथ लोकच राहिले. यांत नऊ खोल्या असून त्या बांधण्याचा खर्च ज्या ज्या उदार गृहस्थांनीं दिला त्यांचीं नांवें त्यांवर कोरलीं आहेत. येथें सुमारें पाऊणशें लोकांची राहण्याची सोय आहे. याची व्यवस्था एका कमिटीकडे असून तिचा अध्यक्ष पुण्याचा कलेक्टर् असतो. येथील लोकांस केयांप्रमाणें नियमित पण थोडेंसें अधिक चांगलें अन्नवस्त्र देण्यांत येतें. शास्त्रीबोवांनीं वर्णन केलेलें येथील नंदनवनाचें सौंदर्य सध्यां नष्ट झालेलें आहे.

'सम्पादक'

आहे कीं, अंधळ्याला बगीचा काय होय ? लंगड्याला मोठें संगमरवरी रस्ते बागेंतून केले असले ह्मणून काय करायाचे आहेत ? वस्तुतः पाहिलें तर वरील प्रकार ह्मणजे त्या विपन्न लोकांची थट्टाच केल्यासारखी नव्हे काय ? तर हेंच सादृश्य इकडे प्रस्तुत कोशाकडे घेऊन विचार केला असतां कोणासही सहज कळेल कीं, 'चंद्रिका'कार रेशमाच्या व जरीच्या कांठांच्या भानगडींत जे पडले तें नीट नव्हे. पोरांस थंडीवाऱ्याच्या निवाऱ्याकरतां जर आंगडें टोपडें करायाचें, तर तें लांडें झालें तरी फिकीर नाहीं, पण त्यास कलाबतूचे कसे व गोंडे लावा असें कोणीं ह्मटल्यास तें शोभेल काय ? आमच्या पत्रकारानें दुसरे ठिकाणीं सदरील यादींविषयीं आणखी असें लिहिलें आहे कीं, "ज्या मुलांस इंग्रजी भाषा समजत नाहीं किंवा मोलस्वर्थाचा कोश घेण्यास सामर्थ्य नाहीं त्यांसहि त्या कळाव्या" ह्मणून त्या टीकाविषयक पुस्तकांत घातल्या. हें समाधानही वरच्याच्या तोडीचेंच आहे. मुलांच्या कर्मणुकीकरतां किंवा माहितीकरतां वरील भर जर सदरील पुस्तकांत घातली, तर यासारख्याच किंवा याहूनही चांगल्या अशा दुसऱ्या शेंकडों गोष्टीही घालतां आल्या नसत्या काय ? मग त्याही यांत सामील करायाच्या होत्या. ग्रंथकाराची इच्छा हेंच जर ग्रंथविस्ताराचें प्रमाण, तर मग मर्यादा तरी कोणती मानावी ?

५. प्रकृत पुस्तकावर आमचा तिसरा आक्षेप असा होता कीं, त्यांतील पुष्कळ शब्द अत्यंत मूढ विद्यार्थ्यांच्याही लक्षांत येण्यासारखे आहेत. यावर प्रस्तुत पत्रांत येणेंप्रमाणें पांडित्य केलेलें आढळतें—" मूढ म्हणजे विवेकशून्य, त्यास आणखी अत्यंत असें विशेषण दिलें ह्मणजे व्युत्पत्तिमर्यादेनें ज्ञानाविषयीं अगदीं अंधळा असा अर्थ होतो. असा जो मनुष्य आहे तो विद्यार्थी ह्मणवत नाहीं. कदाचित् मालाकारांनीं ह्मटला तरी ज्ञानाविषयीं अगदीं अंधळ्यास डोंगरायेवढ्या ढोबळ शब्दाचेंहि ज्ञान कोठून असणार ! इ० इ०. " 'चंद्रिका'-कारांची वाद करण्याची जी जुनी पद्धत आहे तिचें स्वरूप वरील पांडित्यप्रकारावरून वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. ' अत्यंत मूढ विद्यार्थी ' या तीन शब्दांची किती चोख मिमांसा वर केली आहे पाहा ! सुमारें दहा वर्षांपूर्वी या शहरीं जो मोठा पंडितसमाज‡

‡महाराष्ट्रांतील ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णु परशुराम पंडित हे पुनर्विवाहाचे मोठे पुरस्कर्ते होते. यांनीं १८६९ सालीं घडवून आणलेल्या एका पुनर्विवाहामुळें मोठी खळबळ उडून या विवाहांत भाग घेणाऱ्या अकरा मंडळींवर सामाजिक बहिष्कार पुकारण्यांत आला. तेव्हां याविरुद्ध कडक जाहीरनामे काढून पंडितांनीं गांवोगांव चिकटविले. व विधवाविवाहाची सशास्त्रता पटवून देण्यासाठीं वाटेल त्याशीं वाद करण्यास आपण तयार आहों असें जाहीर केलें.कऱ्हाडमधील विठोबा अण्णा दप्तरदार यांस हा जाहीरनामा पाहून वाद करण्याची इच्छा झाली, व शंकराचार्यांनींहि अनुज्ञा दिल्यावरून ते पुण्यास निघाले. वाटेंत वांईस यांचीं व्याख्यानें झालीं. पुण्यास आल्यावर वादाच्या अटी वगैरेचें बोलणें सुरू झालें, पाच्छापूरकरांच्या वाड्यांत अण्णांचीं व्याख्यानें सुरू झालीं तेव्हां पंडितांनींहि उलट सरबत्ती मांड्यांच्या वाड्यांत सुरू केली. पुढें या दोघांनीं मुंबईसहि वक्तृत्व गाजविलें. १८७० च्या मार्च महिन्यांत पुनर्विवाहाचा वाद निकालांत काढण्यास श्रीशंकराचार्य पुण्यास आले. ड्यूक् ऑफ् एडिंबरोच्या स्वागतार्थ सरदार व संस्थानिक जमले होते. शंकराचार्यांनीं अनेक संस्था—

[ पुढें चालू ]

मिळाला होता त्यांत जसा एका सर्वप्रसिद्ध स्मृतिवचनांतल्या ‘ पति ’ शब्दाचा कीस निघत होता व एका स्वकपोलकल्पित अवग्रहावर शब्दविग्रह चालत होता, त्यासारखीच आमच्या वटपत्रनिवासी प्रतिपक्ष्याची वरील शब्दत्रयावर उडवलेली छान होय ! साखरेची साल काढण्याचा हा प्रकार पाहून कदाचित् जुन्या पंडितमंडळीस संतोष होण्याचा संभव आहे, पण ज्या अर्थी सदरील पत्र ‘ चंद्रिका ’ कर्त्यांनीं आमच्या पुस्तकाच्या वाचकांकरतां लिहिलें त्या अर्थी त्यांचा वरील खटाटोप या अर्वाचीन मंडळीच्या संबंधानें पाहतां व्यर्थच होय असें म्हटलें पाहिजे. सदरील ग्रंथकारानें वरील शब्दत्रयाच्या विवेचनाच्या अंतीं आम्हांस एक सर्टिफिकिटही दिलें आहे, कीं, ‘ निबंधमालेमध्यें विशेषणें मात्र योजलेलीं असतात, परंतु त्यांचें सर्वांशीं अर्थस्वारस्य पाहिलेलें नसतें ! ’ खरें आहे, ‘ अत्यंत मूढ विद्यार्थी ’ हे शब्द कागदावर नमूद करतांना त्या बिचाऱ्यांवर बडोदें मुक्कामीं येवढा ‘अवच्छेदकावाछिन्ना’

---

निकांकडून आश्रित पंडित व शास्त्री यांस आणविलें. हा वाद संस्मरणीय झाला. अनेक ठिकाणांहून सुमारें दोनशें महाराष्ट्रीय मंडळी वाद ऐकण्यास आली होती. शंकराचार्यांसमोर फाल्गुन वद्य एकादशीपासून चैत्र शुद्ध प्रतिपदेपर्यंत नऊ दिवस हा वाद दीक्षितांच्या वाड्यांत चालला होता. पुनर्विवाहपक्षीय पंच कृष्णशास्त्री चिपळूणकर, रावजीशास्त्री आगाशे, रघुनाथशास्त्री शेंडे, केशवशास्त्री गाडगीळ, व व्यंकटशास्त्री माटे हे असून विष्णुशास्त्री पंडित हे प्रमुख गोलंदाज होते व त्यांना माधवरावजी रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, आणि जनार्दन सखाराम गाडगीळ हे मदत करीत होते. विरुद्धपक्षीय पंच भिकुशास्त्री गोडबोले, दिनकरशास्त्री खांबेटे, अप्पाशास्त्री खाडिलकर, भिकाचार्य ऐनापुरे व गणेशशास्त्री कोल्हटकर हे असून नारायणाचार्य गजेंद्रगडकर ( विष्णुशास्त्री पंडितांचे हे सहाध्यायी व गुरुबंधु आज त्यांचे प्रतिपक्षी होते ! ) व विठोबा अण्णा दप्तरदार हे जोड गोलंदाज होते. पंचांचीं मतें समसमान पडल्यास निर्णयार्थ ग्वाल्हेरचे गोपाळाचार्य कऱ्हाडकर यांस सरपंच नेमण्यांत आलें होतें. अखेर सहा विरुद्ध चार मतांनीं पुनर्विवाहप्रतिपक्षीयांचा जय झाला. व शंकराचार्यांनीं मुंबईच्या पुनर्विवाहप्रवर्तकांस प्रायश्चित्ताचें शासन फर्माविलें. केरूनाना छत्रे वगैरे पुनर्विवाहपक्षीय दीडदोनशें लोकांनीं श्रींना शरण जाऊन प्रायश्चित्त घेतलें. व पुनर्विवाहाचें मंडण जाहीरपणें करून तो पक्ष न सोडणारे फक्त सातजण उरले ! या सातांपैकीं गोपाळराव देशमुखांनाहि पुढें तीनच महिन्यांत प्रायश्चित्त घेणें कौटुंबिक अडचणीमुळें भाग पडलें. व होतां होतां विष्णु परशुराम रानडे, विष्णुशास्त्री पंडित व माधवरावजी रानडे हीं तीनच माणसें टिकून राहिलीं. पैकीं विष्णुपंत रानडे लवकरच म्हणजे ८ आगस्ट १८७१ रोजीं वारले. पंडितांनीं तर १८७४ सालीं स्वतः विधवेशीं लग्न केलें व ‘ बोले तैसा चाले ’ अशी खंबीरता प्रकट केली. तेहि १८७६ सालीं नवज्वरानें वारले. माधवराव रानडे यांनींहि प्रायश्चित्त न घेतां १८७३ सालीं दुसरें लग्न ( मात्र विधवेशीं नव्हे ) केलें, व वडिलांकरितां अर्धा मतत्याग ( विधवाविवाहासंबंधीं ) त्यांस करावा लागला तरी दुसऱ्या अर्ध्या भागांत ( प्रायश्चित्त न घेणें ) त्यांनीं जय मिळविला. पण पुढें दुसऱ्या एका प्रसंगीं ( चहाग्रामण्य–प्रकरण १८९२ ) स्नेह्यांच्या कमकुवतपणास्तव प्रायश्चित्ताची मानहानि त्यांसहि पत्करावी लागलीच.

या साऱ्या प्रकरणाच्या मुळाशीं असलेले पुनर्विवाहित मोरोबा कान्होबा यांनीं लग्नानंतर एक वर्षहि होण्याच्या आंतच सपत्नीक १७ फेब्रुवारी १८७१ रोजीं जीव दिला ! यांचा विवाहसमारंभ १८७० च्या २६ मार्च रोजीं झाला होता. ‘सम्पादक’

चा प्रयोग होईल हें आमच्या स्वप्नांही आलें नव्हतें. आमचे प्रतिपक्षी जसे शब्दशास्त्रांत परम प्रावीण्य पावून " संश्लेषार्थक ' कुश् ' धातूपासून अधिकरणशक्तिप्रधान ' घञ् ' प्रत्ययानें ' कोश ' शब्द निष्पन्न झाला आहे " इत्यादि प्रकारें प्रत्येक शब्द पाणिनिनिर्मित तुळेंत तोलून मग त्याचा शास्त्रोक्त रीतीनें प्रयोग करतात, तसें करण्याचा आह्मांस सोयही नाहीं व अवश्यकताही वाटत नाहीं. आमची लिहिण्याची पद्धति इतक्या तऱ्हेची असली ह्मणजे बस आहे, कीं तिच्या योगानें आमचा अर्थ आमच्या वाचकांच्या ध्यानांत चांगल्या रीतीनें उतरेल. मग आमचे प्रयोग क्यांडीसाहेबांच्या शिस्तीबरहुकूम नसले किंवा बडोदें कालेजांतील सूक्ष्मदर्शक यंत्रांत ते ओबडधोबड दिसले तरी आह्मी विशेष पर्वा करीत नाहीं.[१] ' अत्यंत मूढ विद्यार्थी ' या तीन शब्दांनीं आह्मांस जो अर्थ वाच्य होता त्याचा आमच्या वाचकांस चांगला बोध झाला असेल याविषयीं आह्मांस बिल्कुल संशय वाटत नाहीं. 'अत्यंत मूढ विद्यार्थी ' ह्मणजे ' बुद्धीनें अगदीं जड असणारा मुलगा ' अशासही ' साप ', ' विख ', ' दुकाळ, ' ' मोर ', ' ओक्ष ', ' ऐतवार ', इत्यादि शब्दांची व्युत्पत्ति समजण्यास ' चंद्रिके'कडे जावें लागेल असें आह्मांस वाटत नाहीं. ' सर्प ', ' विष ' इत्यादि संस्कृत शब्द सर्वांच्या कानावरून जाणारे असल्यामुळें ज्यास अपभ्रंश ह्मणजे काय हें माहीत असेल त्यास त्यांची व्युत्पत्ति करण्याची कधींही पंचाईत पडणार नाहीं.*

वरील आक्षेपासारखेंच हेंही दूषण आह्मीं प्रस्तुत पुस्तकावर दिलें होतें कीं, ' चार ' ( चत्वार ), ' आठ ' ( अष्ट ) इत्यादि संख्यावाचक विशेषणांची एकदां व्युत्पत्ति दिली ह्मणजे मग सगळ्या पाढ्याची पृथक् पृथक् व्युत्पत्ति देण्याची गरज नाहीं. यावर प्रस्तुत पत्रांत समाधान आलें आहे तें इतकेंच आहे कीं, नियम सांगून त्यांची उदाहरणें सांगणें तीं अध्यापकानें हवीं तितकीं सांगावीं, त्यांची मर्यादा ' विवक्षु—सापेक्ष होय. ' हें समाधान प्रस्तुत पुस्तक जर कोशरूप नसून व्याकरणरूप असतें तर ठीक झालें असतें; ह्मणजे व्याकरणांत जशीं नियमापुढें अनेक उदाहरणें दिलीं असतात तशीं यांत असून तीं विद्यार्थ्यांस शिकण्यास उपयोगीं पडतीं. पण प्रस्तुत पुस्तक कोशासारखें वरचेवर पाहण्याकरतां केलें आहे; व यांत सगळे अपभ्रंश दिले आहेत अशीही कोशकाराची प्रतिज्ञा नाहीं, यास्तव 'चोवीस', 'चवतीस', 'अठ्ठावीस', 'अडतीस' वगैरे साऱ्या संख्यावाचकांचीं मूळ रूपें दिल्यानें

१. ' खिस्ती दीक्षित ' हे शब्द ' वंध्यापुत्र,' 'षंढवीर' यांसारखे केवळ अनर्थक होत असें आमच्या आक्षेपकांचें ह्मणणें आहे. सदहू 'पंडितां'स जर अर्वाचीन पद्धति माहीत असती किंवा क्रोधवन्हीच्या धूमपटलानें त्यांची दृष्टि जर व्याप्त न होती, तर त्यांस कळलें असतें कीं वरील शब्द अवतरणचिन्हांतर्गत होत, यास्तव ते निबंधकर्त्यांचे नसून दुसऱ्या कोणाचे घेतलेले आहेत. खिस्ती धर्मातील बाप्तिस्मा विधीस ते लोक ' दीक्षा ' म्हणत असतात. व वरील विधि ज्याचा झाला त्यास 'दीक्षित' म्हणतात !

* यासंबंधीं पत्रलेखकाचें म्हणणें असें " ज्या विषयाचें प्रतिपादन करावयाचें तत्संबंधीं अप्रसिद्ध गोष्टी दाखवितांना प्रसिद्ध गोष्टीहि दाखविणें भाग येतें. कारण, साधारण प्रसिद्ध गोष्टीहि कित्येकांस अप्रसिद्ध असतात. अतएव वैद्यकांत, ओळखीकरितां औषधींचें पंचांग सांगितलें असतें; पदार्थांची रुचि सांगतांना मनुष्यमात्राच्या भक्षणांत येणाऱ्या पदार्थांचीहि रुचि सांगितलेली असते." 'सम्पादक'

विशेष उपयोग घडला नसून इतर अपभ्रंशांस मिळण्यासारखी जागा मात्र त्यांनीं अडवली असें ह्मणणें भाग आहे.

६. आमचा चवथा आक्षेप असा होता कीं, प्रस्तुत पुस्तकांत जेथें विस्तार करायाला पाहिजे होता तेथें तर तो मुळींच केला नाहीं. 'चंद्रिकें'त कांहीं शब्दांचें व्याख्यान येणें-प्रमाणें आढळतें—" खटाटोपो भयंकरः—घटाटोपो भयंकरः" "यः पलाय स जीवति—यः पलायते स जीवति (जो पळेल तो जगेल)" इ० इ० हीं व्याख्यानें कोतीं आहेत हें आमच्या ग्रंथकारास स्वाभिमानास्तव किंवा त्याच्या पक्षकारास मित्रनिष्ठेस्तव न वाटेल तर न वाटो, पण एरवीं कोणाही तिन्हाईत मनुष्यास सहज दिसण्यासारखें आहे कीं, "खटाटोपो भयंकरः" याचें व्याख्यान "घटाटोपो भयंकरः" असें केल्यानें शिक्षकांस किंवा विद्यार्थ्यांस काय बोध होईल न कळे! निदान पक्षीं प्रस्तुत पत्रांत वरील शब्दांवर जेवढें व्याख्यान केलें आहे तेवढें$ तरी मूळ ग्रंथांत असायाला पाहिजे होतें. पण तें कांहीं नाहीं. सदरील पत्राच्या झोंकावरून 'चंद्रिकाकारां'चा असा मानस दिसतो कीं, आह्मीं आपल्या कोशांत जें जें केलें आहे तें तें सर्व पूर्ण विचार करूनच केलें आहे, त्यांत उणें अधिक करण्याचा किंवा सुचवण्याचा कोणासही अधिकार नाहीं. पाणिनीय कृतीस जसें अर्धमात्रेचें लाघवही दुःसह, त्याप्रमाणेंच आमच्या अर्वाचीन भट्टोजीस व अमरसिंहासही कोणत्याही तऱ्हेचें दूषण बिलकुल खपणार नाही. त्यांतून आमचें 'पाहणें' तर मुळीं 'गोष्पद—प्रमाणांतच.' यास्तव प्रस्तुत महापंडितानें सुचवल्याप्रमाणें जांवईशोधाची गोष्ट§ पक्की ध्यानांत ठेवणें व 'मौनमपंडितानाम्' * या वचनावर दृष्टि देऊन लेखणी चालवणें हेंच आह्मांस उचित होय!

प्रस्तुत पत्रांतील मुख्य मुख्य मुद्द्यांविषयीं वर विचार झाला. आतां याखेरीज अनेक शब्दांच्या व्युत्पत्तीविषयीं जी आमच्या प्रतिपक्ष्यानें चर्चा केली आहे तिजविषयीं येथें विशेष विचार करणें नलगे. आह्मीं जितक्या शब्दांविषयीं आक्षेप काढले होते त्यांपैकीं कांहीं-विषयीं प्रस्तुत पत्रकारानें मुळींच नांव काढलें नाहीं; कांहीं चुका ह्मणून कबूल केल्या आहेत, पण त्या चुका ह्मणून आह्मांस न कळल्याबद्दल आमच्या पदरांत चूक घातली आहे; कांहीं व्युत्पत्तींचें अशा चमत्कारिक रीतीनें समर्थन केलें आहे कीं ज्यापासून लिहिणारा-खेरीज इतरा कोणाचेंही समाधान होईलसें वाटत नाहीं; आणि कांहीं व्युत्पत्तींचे आधार सप्रमाण दाखवले आहेत. याशिवाय पत्राचा बाकीचा भाग 'चंद्रिके'सारख्या महाग्रंथावर

---

$ मागें पृष्ठ ४९५,+टीप पाहा. 'सम्पादक'

§ एका मूर्ख जांवयास एका कठिण कवितेचा अर्थ विचारला. तो त्यास लागेना; तेव्हां कविता चुकली आहे असें सांगून त्यांनीं तींत फिरवाफिरव करून उलट अशुद्ध मात्र करून ठेवली. यावरून ज्ञानाच्या धर्मेडोंत सुचविलेला 'मूर्खपणाचा फरक' असा अर्थ. 'सम्पादक'

* पत्रलेखक म्हणतात, "आपल्यास जो विषय पुरता माहीत नाहीं त्याविषयीं कसें वागावें ह्याविषयीं 'मौनमपंडितानाम्' हें वाक्य माळाकारांस दृष्टिविषय अथवा कर्णविषय झालें असतें तर अशा विषयाचें विष घेऊन ते फसते न हें निःसंशय होय." 'सम्पादक'

लेखणी उचलल्याचें धाष्टर्य आमच्या हातून झाल्याबद्दल आह्मांवर प्रहार करण्यांत, व ' हो ! हो !! हो !!! झालें समाधान ' वगैरे सत्ययुगी महापंडितांस तादृश न शोभणारा विनोदप्रकार करण्यांत गेला आहे.

७. 'अपभ्रष्टशब्दचंद्रिके'वर जी आह्मीं टीका केली होती तिजवरील प्रतिटीकेवर आमचे विचार वर प्रगट झाले तेवढे बस झाले. आतां प्रस्तुत विषयाच्या संबंधानें पुनः थोडेंसें लिहून हें प्रकरण आटपतों. मराठींत इतर अनेक ग्रंथांची जशी उणीव आहे तशीच अपभ्रंशकोशाचीही आहे. मोलस्वर्थच्या कोशांत महाराष्ट्रभाषेंतील शब्दांचा बहुतेक समावेश झालाच असेल यांत संशय नाहीं. तर याच कोशाचा आधार धरून प्रत्येक मराठी शब्दाची व्युत्पत्ति जर दिली तर मोठें काम होईल. मोलस्वर्थचा आधार धरायाचा ह्मणजे त्याचें प्रामाण्य स्वीकारायाचें असें नव्हे; तर फक्त त्यांतील शब्दांचा अनुक्रम धरायाचा. सदरील कोशकारानें शब्दव्युत्पत्तीचा भाग बराच आटपला आहे, पण त्यांत दोन सुधारणा होणें अवश्य आहेत. एक तर साऱ्या शब्दांच्या व्युत्पत्तीविषयीं प्रयत्न करायाला पाहिजे; दुसरें अरबी व फारसी शब्दांची व्युत्पत्ति त्या भाषांच्या लिपीनें न देतां महाराष्ट्रलिपीनें द्यावयास पाहिजे; आणि तिसरें असें कीं कांहीं कांहीं ठिकाणीं व्युत्पत्ति चुकलेली आहे ती नीट करायाला पाहिजे. तर अशा तऱ्हेचा एक व्यापक कोश झाला असतां फार उपयोग होणार आहे. अथवा हें न होईल तर ट्रेंच् साहेबांच्या ग्रंथाच्या नमुन्यावर तरी एकादा ग्रंथ व्हावा. अशा ग्रंथाच्या योगानें अपभ्रंशांच्या नियमांचें ज्ञान होऊन खेरीज अनेक प्रकारची चमत्कारिक व उपयोगाची माहितीही विद्यार्थ्यांस करून देतां येईल. सदरील पुस्तकांत येणारें ' भाषापरिज्ञान ' यांत अशाच प्रकारचा विषय असतो हें आमच्या वाचकांस माहीत आहेच.

---

## नवीं पुस्तकें.

जयाची वदे पूर्ण वेदान्त वाणी । कसें हो ह्मणावें तयालागिं वाणी ॥ वामन.

अंक ५३—(१) नवीन पुस्तकें. (२) 'तुकारामबावाचे अभंगांतील निवडक वेंचे.' (३) 'अमोलिक वैद्यकचातुर्य.' (४) 'शकावली.' (५) अशा तऱ्हेच्या पुस्तकांची अवश्यकता.

१. ' तुकारामबावाचे अभंगांतील निवडक वेंचे,' 'अमोलिक वैद्यकचातुर्य' आणि 'शकावली' या तीन पुस्तकांविषयीं या खेपेस अभिप्राय देतों. पहिलीं दोन पुष्कळ दिवसांपूर्वी आह्मांस पोंचलेलीं आहेत; तिसरें मात्र नुकतेंच पोंचलें.

२. **तुकारामबावाचे अभंगांतील निवडक वेंचे**—हें अठ्ठावीस पानांचें लहानसें पुस्तक आहे. तुकारामाच्या साडेचार हजार अभंगांचा गाथा फार मोठा, त्याची

किंमतही फार, ह्मणून एक आणा किंमतीचें हें पुस्तक कोणीं रचून कवितेच्या भोक्त्यांस व भक्तिपर जनांस अर्पण केलें आहे. इंग्रेजी भाषेंत Beauties ( सुंदर स्थलें ) या नांवांचीं पुष्कळ मोठमोठ्या ग्रंथकारांचीं व विशेषत: कवींचीं पुस्तकें आढळतात. नुसता शेक्सपीयर घेतला, तर त्याच्या काव्यकमलवनाचा मकरंद आजपर्यंत किती मधुकरांनीं काढून मधाच्या शिशा तयार करून दिल्या असतील! असा मकरंदसंचय इकडेही पुष्कळ होण्यासारखा आहे. आमच्या संस्कृत कवितेच्या अपार भांडारांत, व महाराष्ट्रकवितेचाही आजपर्यंत जितका संग्रह झाला व पुढें होत आहे त्यांत, रसिक मधुव्रतानें भरारी मारली असतां दलांच्या सौंदर्यानें, रजांच्या सौरभानें व मरंदाच्या माधुर्यानें तो किती गोंधळून जाणार आहे! तर अशा प्रकारचीं पुस्तकें एतद्देशीय रसिकांकडून रसज्ञ जनांस या काळीं अर्पण होणें फार योग्य होय. कां कीं, हल्लीं संस्कृताचा चोहोंकडे बराच प्रसार झाला आहे व होत आहे; व महाराष्ट्रभाषेकडेही लोकांचें लक्ष बरेंच लागत चाललें आहे. अशा प्रकारच्या ग्रंथांनीं लोकाभिरुचि वृद्धिंगत होण्यास मोठें साहाय्य होतें. एक तर थोड्या किंमतींत कवीच्या कवित्वाचें सार प्राप्त होतें; दुसरें, समग्र ग्रंथ वाचण्याचे श्रम वांचतात, आणि तिसरें असें कीं, असे निवडलेले भाग पाहिले असतां रसज्ञसंमत स्थलें कोणतीं तीं समजल्यानें वाचकांस काव्यांतील सारासारभाव कळूं लागतो. शिवाय बहुश्रुत वाचकांस व लिहिणारांस असला संग्रह भाषणसमयीं किती उपयोगीं पडण्यासारखा असतो, व ग्रंथरचनेस तो किती शोभावह होय; तसेंच वाचलेल्या ग्रंथांची उपस्थिति चांगली राहण्यास त्याचा किती उपयोग आहे, हेंही सर्वांच्या सहज लक्षांत येणार आहे. तर याप्रमाणें अशा संक्षेपरूप ग्रंथांचा अनेक प्रकारचा उपयोग आहे.

आतां सदरील पुस्तकाविषयीं पाहिलें तर त्याच्या अत्यल्प किंमतीच्या मानानें त्यांत बराच संग्रह आहे व वेंचेही एकंदरींत बरे असून कांहीं चांगले चित्तवेधकही आहेत; तरी वर सांगितलेल्या इंग्रेजी नमुन्याच्या धाटणीवर ह्मटलें ह्मणजे हा ग्रंथ फार निराळ्या तऱ्हेचा झाला पाहिजे. एक तर तुकारामबोवांच्या कवित्वाचें समग्र स्वरूप ह्मटलें ह्मणजे तें कितीही थोड्यांत आणलें तरी असल्या लहानशा पुस्तकांत त्याचा समावेश होण्याचा संभव नाहीं. शेंकडों प्रकारचे उद्गार ज्याच्या प्रासादिक वाणीच्या द्वारें प्रगट झाले त्याच्या कवितेचा सारभूत अंश छोट्याशा पंचवीस पानांत येणें ह्मणजे सागरानें अत्यंत संकुचित होऊन मूषकांजलींत समाविष्ट होऊं पाहण्यासारखेंच होय! तर एक विस्ताराच्या संबंधानें प्रस्तुत पुस्तकावर आक्षेप येणारा आहे. दुसरा आक्षेप विषयवैचित्र्याच्या संबंधानें. हें वैचित्र्य प्रस्तुत कवींत पुढील प्रकारचें आढळणारें आहे. त्याच्या अभंगांचे विभाग भक्तिपर अभंग, बोधपर अभंग, मनोरंजनपर अभंग, इतिहासपर अभंग असे करतां येतील. आणि या सर्व सदरांत जर निवडक वेंच्यांचा संग्रह केला तर असें पुस्तक सर्वांस प्रिय होण्याजोगतें होईल. जे जुन्या पद्धतीचे निवळ भक्तिमार्गी आहेत त्यांस पहिलें सदर पसंत पडेल, आलीकडील समाजवाल्यांस व बुभुत्सु† जनांस दुसरें मान्य होईल, रसिकांस व बहुश्रुत लोकांस

† जिज्ञासु. 'सम्पादक'

तिसरें आवडेल आणि इतिहासाच्या भोक्त्यांस व चरित्रपरांस सवर्थे प्रिय होईल. तुकारामाची वाणी विद्वान् अविद्वान्, भक्त अभक्त, लहान थोर; वगैरे सर्वांस मान्य असल्यामुळें वरील संग्रह जर मिळतो आहे तर चार आठ आण्यांकडे कोणी बघेल असें आह्मांस वाटत नाहीं.

अशा संग्रहांत विवक्षित स्थलीं टिपाही दिल्या असाव्या. जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांतून हल्लीं प्रचारांतून गेलेले बरेच शब्द आढळतात; यास्तव त्यांवर व समयविशेषी इतर संबंधाच्याही टिपा असणें जरूर आहे. त्याप्रमाणेंच आरंभीं कवीविषयीं कांहीं माहिती असल्यासही चांगली. आमच्या देशाच्या दुर्दैवेंकरून हा भाग असल्या पुस्तकाच्या आरंभीं जोडण्यास प्रायः थोडेंच साधन सांपडेल; तरी जी माहिती असेल ती व ग्रंथांविषयीं कांहीं विवेचन हें असल्यास विद्यार्थ्यांस व बहुश्रुत जनांस पुढील वेंच्यांची अधिक गोडी लागेल हें उघड आहे.

तर अशा प्रकारची स्वदेशसेवा करण्याचें जे कोणी रसिक व विद्वान् मनांत आणतील त्यांनीं वरील सूचनांकडे लक्ष पुरवावें अशी विनंति करून हा लेख पुरा करतों.

३. **अमोलिक वैद्यकचातुर्य**—हें पुस्तक रा॰ रा॰ बाळकृष्ण दिनकर वैद्य यांनीं रचलें आहे. हें कांहीं वर्षांपूर्वीं दक्षिणा प्रैज कमिटीकडे पाठवलें असून कमिटीकडून ग्रंथकारास बक्षीस मिळालें. पुढें रा॰ रा॰ पांडुरंग गोपाळ डांक्टर यांनीं तें छापवून प्रसिद्ध केलें. सदरील पुस्तक 'आयुर्वेदशोधक मंडळी'स अर्पण केलें असून मुंबईच्या दोन तीन प्रसिद्ध नेटिव डॉक्टरांचे अभिप्राय यास जोडले आहेत.

सदरील ग्रंथकाराची जी आह्मांस कांहीं माहिती आहे तिजवरून वाचकांस कळवतों कीं, रा॰ वैद्य हे एतद्देशीय वैद्यकाशीं बरेच परिचित असून औषधक्रिया चालवीत असतात. नेटिव डॉक्टरांच्या सहवासानें त्यांस इंग्रेजी वैद्यकाचीही कांहीं माहिती झाली आहे. शिवाय ग्रंथरचनेचाही त्यांस अभ्यास असून सदरील ग्रंथाखेरीज आणखी एक दोन ग्रंथांबद्दल त्यांस वर सांगितलेल्या कमिटीकडून बक्षिसें मिळालीं आहेत. शिवाय सामान्यतः बहुश्रुतपणाही यांच्या अंगीं बरा आहे. सदरील ग्रंथावरूनही वरील गोष्टी वाचकांच्या ध्यानांत येणारच आहेत. याचा उद्देश त्याच्या नांवावरून स्पष्टच आहे, कीं प्रसंगविशेषीं वैद्यानें चमत्कारिक उपाय योजून रोग्यास रोगमुक्त कसकसें केलें आहे तें यांत सांगितलें आहे. असें असतां प्रस्तुत पुस्तक केवळ वैद्यलोकांच्याच उपयोगीं पडावें ह्मणून केलें आहे असें नाहीं. ग्रंथकार प्रस्तावनेंत लिहितो—

"आतां जर या पुस्तकाचा विषय असा आहे तर हें वैद्य लोकांच्याच उपयोगीं आहे असें होईल. पण तसें नाहीं. ज्या ज्या वेळेस वैद्यानें हे दुर्घट प्रसंग युक्तीनें निभावले आहेत, त्या त्या वेळची ती ती युक्ति ज्यानें वैद्यशास्त्र मुळींच पाहिलें नाहीं पण केवळ चतुर, काल्पनिक व धूर्त असा मनुष्य हि योजूं शकेल, अशी आहे. या पुस्तकाची रचना कल्पित, मनोरंजक गोष्टींच्या रूपानें केली आहे. यांत प्रसंगीं वैद्यकाचे शास्त्रार्थ दर्शविले आहेत आणि ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्यांतील आलेले बहुतेक मोठमोठे भयंकर प्रसंग, औषधाच्या

जोरानें नाहीं तर केवळ युक्तीच्याच बळानें निभावले आहेत. क्वचित् एकादे प्रसंगीं मात्र थोडीशी औषधाची मदत घेतली आहे.'

तेव्हां प्रस्तुत ग्रंथ हा वैद्यकाच्या विषयावर जरी आहे तरी एकंदरींत पाहतां गोष्टींचें पुस्तक हेंच त्याचें वस्तुतः स्वरूप होय. वैद्यकाच्या दृष्टीनें पाहतां यांतील मुख्य कल्पना जी, कीं मनोव्यापारांचें शरीरावर कार्य घडतें व तो व्यापार बंद झाल्याशिवाय रोग्यास बिलकुल गुण पडायाचा नाहीं, ती सर्वथा खरी आहे. हर्ष, शोक, भय, विस्मय इत्यादि मनोविकारांचें प्राबल्य किती आहे व त्यांचा व्यापार शरीरावर किती दृष्टीस पडतो, ह्मणजे रोग उत्पन्न होण्यास व तो झाला असतां वाढण्यास किंवा हटण्यास वरील चित्तक्षोभाचे प्रकार किती कारणीभूत होतात, हें बहुधा कोणासही सांगायास नकोच. पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या उदाहरणांवरून किंवा थोड्या कल्पनेनें वरील गोष्टींचा प्रत्यय कोणासही येईल. प्रस्तुत पुस्तकांतील बहुतेक गोष्टींचें संविधानक याच तात्पर्यावर रचलें आहे. आतां केवळ मनोरंजक पुस्तक येवढ्याच संबंधानें जर प्रकृत ग्रंथाचा विचार केला, तर यांतील सर्व गोष्टींत चातुर्याचा विशेष प्रकार दिसून येत आहे असें नाहीं. कांहीं गोष्टी सर्वांच्या ऐकण्यांतल्याच आहेत व कांहीं सामान्य प्रतीच्याच आहेत. बाकी सात आठ मात्र खरोखर चांगल्या कल्पनेच्या असून वाचकांस थक्क करून टाकण्यासारख्या आहेत. भाषेच्या संबंधानें पाहिलें तर ग्रंथरचनेची शैली यांत चांगल्या प्रकारची दिसून येते; ह्मणजे प्रत्येक कथेचा उपक्रम, उपसंहार व एकंदर मांडणी सुबोध व चित्तवेधक केली असून शब्दरचनाही ज्या ज्या ठिकाणीं जसजशी असावी तसतशी त्या त्या ठिकाणीं आहे. प्रसंग पाहून वैद्याच्या भाषणांत संस्कृत श्लोक व हकिमाच्या बोलण्यांत मुसलमानी भाषा व एकदोन ठिकाणीं मुसलमानी बेअरही[1] घातले आहेत. तेव्हां एकंदरींत हें पुस्तक बहुश्रुतपणा व मनोरंजन इच्छिणाऱ्या वाचकांच्या संग्रहास पात्र होय.

या पुस्तकांतील दोन गोष्टींत शृंगाराचा विषय आहे यावरून कोणाच्या मतें ग्रंथकारावर दोष येईल; पण हा दोष दोन प्रकारांनीं उडणारा आहे. एक तर वैद्यकाच्या विषयास शृंगारवर्णन माफ आहे. वैद्य व न्यायाधीश या दोघांस या संबंधानें किती मुभा असते हें सर्वांस माहीत आहेच. दोघांच्याही विषयांचा स्त्रीपुरुषव्यवहाराशीं संबंध येत असल्यामुळें वैद्यकग्रंथांत व कायद्याच्या पुस्तकांत स्पष्टोक्तीच्या अवश्यकतेमुळें बीभत्सतेचा प्रकार सहजच येतो. तेव्हां तद्विषयक ग्रंथांतही तो प्रकार क्वचित् आल्यास नवल नाहीं. मनोविकारांचें सामर्थ्य जो वर्णन करूं लागेल त्यानें षड्रिपूंतल्या थोरल्या दादांच्या त्रिजगद्विश्रुत प्रभावाचें सर्वथा विस्मरण केल्यास कसें चालेल! तेव्हां प्रस्तुत ग्रंथकारानें पंचाविसांपैकीं दोन गोष्टींत वरील प्रकार आणला आहे याजबद्दल त्याजवर दोष मुळींच येत नाहीं असें आह्मांस वाटतें. त्यांतून वरील दोन गोष्टींतील वर्णनही मर्यादेस सोडून नसल्यामुळें, व कामाच्या झपाट्यांत सांपडलेल्या स्त्रियेस व पुरुषास अमार्गावरून नीट वाटेवर आणल्या-

1. पद्य किंवा सुभाषित. याच शब्दापासून 'शाईर' (कवि) हा शब्द निघाला असावा असें वाटतें.

त्याच प्रकार त्यांत वर्णिला असल्यामुळें प्रस्तुत दोषाची छटाही या ग्रंथावर राहत नाहीं असें म्हटलें पाहिजे. असो; तर वैद्यकाची कांहीं माहिती, चित्तवेधक कथा, व चांगल्यापैकीं भाषासरणी, हीं ज्यांस पाहिजे असतील त्यांस या पुस्तकाच्या संबंधानें आह्मी शिफारस करतों.

४. **शकावली**—हें पुस्तक नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वीं रा० रा० जगन्नाथ प्रभाकर सरंजामे यांनीं प्रसिद्ध केलें. ही शकावली 'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या वडामोडीं-चीच फक्त आहे असें मुखपत्रावरून व प्रस्तावनेवरून कळतें. त्याप्रमाणें हींत सुलतान महंमदापासून तों मोगलाईच्या अखेरपर्यंत व शिवाजी महाराजांपासून तों परवांचे गाईकवाड मल्हारराव यांजपर्यंत घडून आलेल्या इतिहासप्रसिद्ध गोष्टींचें शकवार टिपण दिलेलें आहे. इंग्रेजांच्या कारकिर्दीचा भाग निराळाच करणें आहे यास्तव त्यांच्या संबंधाच्या गोष्टी या पुस्तकांत सर्व घातल्या नाहींत असें ग्रंथकारानें प्रस्तावनेंत सुचवलें आहे. ज्यांना संबंध मराठ्यांच्या संबंधानें आलाच तेवढ्या गोष्टी मात्र सदरील पुस्तकांत घेतल्या आहेत.

'शकावली' ही पुस्तकाची तऱ्हा आमच्या भाषेंत नवीच आहे. यासारखें एक पुस्तक मात्र यापूर्वीं पाहिलेलें आह्मांस आठवतें. तें 'ऐतिहासिक कालक्रम' हें होय. इंग्रेजी भाषेंत अशीं पुस्तकें आहेत हें सांगायास नकोच. तीं सदरील ग्रंथापेक्षां फारच मोठीं असून त्यांत इंग्लंड् देशांतल्याच काय, पण सगळ्या देशांतील गतगोष्टींचें टिपण असतें; शिवाय केवळ राज्यप्रकरणी हकिकतीच त्यांत नसून हरएक प्रकरणाविषयींची शकवार माहितीही असते. याखेरीज प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेंत सांगितलेल्या शिवापूरकर देशपांड्याच्या रोजनिशीप्रमाणें[1] इंग्रेजींत पेपीज् व एविलिन् या दोघांनीं* लिहून ठेवलेल्या रोज-

---

१. या रोजनिशींत पेशवाईंत झालेल्या गोष्टींची चांगली तपशीलवार माहिती होती असें समजतें. वरील दोन्ही इंग्रेजी रोजनिशा तर इतिहासग्रंथच बनून राहिल्या आहेत; एविलिन्च्या ग्रंथाविषयीं असें लिहिलें आहे कीं, तो कांहीं सांकेतिक चिन्हांनीं लिहून ठेवला होता; व त्यामुळें तो शंभर दीडशें वर्षें तसाच लोळत पडला असून शेवटीं कोणीं मोठ्या मेहनतीनें तो उकलला आणि प्रसिद्ध केला!

* Samuel Pepys सॅम्युअल् पेपिस् (१६३३–१७०३) विख्यात इंग्रेजी लेखक; हा दुसरा चार्लस् व दुसरा जेम्स् यांच्या कारकिर्दींत आरमारखात्याचा चिटणीस होता. याचें आरमारविषयक ज्ञान नमुनेदार होतें. Memoirs relating to the Navy हा याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. पण याहूनहि विख्यात याची डायरी आहे. ती शॉर्ट्हँड् पद्धतीनें लिहिली असल्यानें पडून राहिली. पण जॉन् स्मिथ्नें १८१९–२५ पर्यंत खपून ती डायरी लावण्याचा प्रयत्न केला व १८२५ सालीं लॉर्ड् ब्रेब्रूकनें तिचें प्रकाशन केलें. डायरीचे बारीक अक्षराचे सहा व्हॉल्यूम् असून तिच्यांत परिस्थितीचें यथातथ्य चित्र रेखाटलें आहे. पेपिसूचें कुटुंब आपल्या नांवाचा उच्चार पीप्स् (Peeps) असा करीत असे.

John Evelyn जॉन् एविलिन् (१६२०–१७०६) इंग्लिश् डायरिस्ट्. याचें बहुतेक आयुष्य प्रवासांतच गेलें. हा कॉलेजांत गेला पण पदवी मिळेपर्यंत शिकला नाहीं. याचे Sylva,

[ पुढें चालू. ]

निशा सर्वप्रसिद्ध आहेत. हे दोघे ग्रंथकार सुमारें दोनशें वर्षांपूर्वी इंग्लंडांत होऊन गेले. यांच्या रोजनिशांत दुसरा चार्लस् व दुसरा जेम्स् यांच्या कारकिर्दीत घडलेल्या गोष्टींचें वर्णन आहे. यांचें महत्त्व किती आहे याविषयीं एक प्रमाण बस आहे कीं, मेकॉलेनें आपल्या सर्वमान्य इतिहासास वरील टिपणांचें पुष्कळ साह्य घेतलें आहे.

रोजनिशी असणें हें व्यक्तिमात्राच्या संबंधानें पाहतां जसें कर्मणुकीचें साधन असून फायदेशीर आहे, त्याप्रमाणेंच राष्ट्राच्या संबंधानेंही शकावली ही मनोरंजनावह व लाभदायक होईल हें उघडच आहे. अशा शकावली जर प्राचीन काळापासून अखंडित असत्या तर केवढी मौजेची गोष्ट होती! पण हा प्रघात आमच्याकडे पहिल्यापासून नव्हताच यामुळें म्हणा, अथवा कालगतीनें व राष्ट्रविप्लवांमुळें असले लेख उच्छिन्न झाल्यानें म्हणा, जुन्या माहितीचें साधन हल्लींच्या काळाला फार करून उरलेंच नाहीं. ही महाहानि लक्षांत आणून इतःपर आपण सावध असलें पाहिजे. यापुढील काळाची व पूर्वींचा जेवढा अजून आटोक्यांत येईल तेवढ्याची खबरदारी ठेवून तो मागल्याप्रमाणें नष्ट होऊं देतां कामा नये. तर याप्रमाणें वरील पद्धतीच्या पुस्तकांची हल्लीं अवश्यकता आहे हें उघड आहे.

आतां प्रस्तुत 'शकावली'पासून वर सांगितलेलें कार्य कितपत होणार आहे याचा जर विचार केला, तर तींत अनेक न्यूनता असल्यामुळें तें हवें तसें होणार नाहीं हें उघडच आहे. एक तर सदरील पुस्तक लहान असल्यामुळें त्यांत विषय फार थोडा आला आहे. सुमारें ८०० वर्षांची हकीकत शिळाछापाच्या अघळपघळ अक्षरांच्या पन्नास पृष्ठांत कशी येईल? गेल्या पंचवीस सत्तावीस वर्षांत इतक्या गोष्टी घडल्या असतां त्यांची सारी माहिती काय ती वर सांगितल्यासारख्या अवघ्या दोन पानांत आली आहे. आतां ग्रंथकारास आपल्या तर्फेनें दोन सबबी सांगतां येतील हें खरें आहे. एक तर ही कीं, आठ आणे किंमतीच्या पुस्तकांत इतका मजकूर कसा आणायाला सांपडेल? ही सबब खरी आहे; कां कीं, आमच्या देशांत पुस्तकांचा फार खप नसल्यामुळें व कोणत्या पुस्तकाचा किती खप होईल याचाही सुमार करवत नसल्यामुळें, शिवाय ज्यांस पुस्तकें तयार करण्याचें सामर्थ्य व इच्छा त्यांस द्रव्याची अनुकूलताही बहुधा तितपतच असल्यामुळें, वरच्यासारखी अडचण उत्पन्न होते. पण ही अडचण उत्पन्न होते म्हणून पुस्तक कसें असायाला पाहिजे हें सांगण्यास बाध नाहीं, व तें सांगितलेंही पाहिजे. दुसरी सबब ही कीं, ही 'शकावली' 'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या घडामोडींची' असें मुखपृष्ठावरच वाचकांस कळवलें आहे; तेव्हां या दोन सदरांखेरीज माहिती सदरील पुस्तकांत अर्थात् यावयाचीच नाहीं. या सबबींत आम्हांस फारसें हांशील दिसत नाहीं. कां कीं, वरील 'घडामोडीं'त जर महाराष्ट्र-

---

Liberty and Servitude असे अनेक ग्रंथ आहेत. पण डायरीमुळें ते मागें पडले. १८१८ पर्यंत याची डायरी हस्तलिखित स्वरूपांतच राहिली. १६४१ पासून १६९७ पर्यंतची हकीकत क्वार्टो सांच्याच्या सातशें पृष्ठांत आली आहे. १६९७ पासून मृत्यूपर्यंतच्या हकिकतीची पुरवणी मागाहून काढली. (H. B. Wheatley) म्हीटले साहेबानें १८७९ मध्यें पूर्ण स्वरूपांत तिचें प्रकाशन केलें.

'सम्पादक'

करवीरचें जन्ममरण, जंगबहादुराचा मृत्यु, कृष्णाबाईचा† पूर, उमाजीनाइकाचें बंड, कोंकणांतील वादळ, मृगनक्षत्राचा पाऊस, वगैरे अनेक गोष्टी खपल्या जातात, तर इतर लोकप्रसिद्ध गोष्टींचाही त्यांत समावेश कां होऊं नये? मुसलमान व पारशी यांचा दंगा, पुनर्विवाहाच्या शास्त्रार्थाबद्दल झालेला वाद, दयानंदजींचीं व्याख्यानें व गर्दभाचार्यांचा छबिना, साबरमतीचा¶ विलक्षण पूर, गुडघेमोडीचा नवा आजार, ब्यांकेचा खटला, बायजाबाईचें लक्षभोजन व चोहांकडे उदक मुळ्याच्या एकदम ग्वाल्हेरीस तारा, वगैरे गोष्टींचा उल्लेखही वरच्यांच्यासारखाच येथें असतां तर शोभला नसता असें नाहीं. पण या सर्वांपेक्षां आश्चर्याची गोष्ट ही कीं, सन १८५७ साल आमच्या देशांतच काय पण साऱ्या जगभरही येवढें दणाणलें असतां, व त्या सालच्या हकिकतींवर शतावधि ग्रंथ इंग्रेजी भाषेंत झाले असतां, 'शकावली'त पुढील दोन ओळी मात्र त्या सालाच्या वांट्यास आल्या आहेत—

" १८५७, १७७९ (शके)—कोलापूरचे चिमासाहेब महाराज यांस बंडाचे संशयावरून कंपनी सरकारनें कराचीस नेऊन ठेविलें."

'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या घडामोडी' अशी मर्यादा जरी 'शकावली'-कारानें आपणाकरतां रेखून घेतली असली तरी पहिल्या सदरांत दिल्लीस झालेली गडबड व दुसऱ्यांत ब्रह्मावर्त, झांशी, ग्वाल्हेर, नरगुंद या ठिकाणचे बंडावे हे येत नाहींत काय? साऱ्या हिंदुस्तानांत येवढी धामधूम झाली असतां व अनेक राज्यांची उलथापालथ झाली असतां एका करवीराकडेच आमच्या ग्रंथकाराची नजर पोंचून ती तेथेंच कशी ठरून राहिली याचा आह्मांस चमत्कार वाटतो! या चमत्काराची उपपत्ति पुढील उताऱ्यांवरून होणारी आहे असें आह्मांस वाटतें—

"१८५० १७७२—पौष शुद्ध १२ रोजीं [ ता० २८ जानेवारी सन १८५१ ] बाजीराव रघुनाथ पेशवे ब्रह्मावर्तांत मरण पावले. त्यांचें वय सुमारें ७५ वर्षांचें होतें. त्यांचें पेनशिन ह्यांचे 'दत्तक चिरंजिवां'कडे कंपनी सरकारानें चालविलें नाहीं........."

"१८७६ १७९८—मुंबई व मद्रास इलाख्यांत दुष्काळ पडला. इंग्रेज सरकारानें जमिनीचा धारा रयतेस माफ केला नाहीं. लोकांचे हाल फार झाले. 'कांहीं' लोक मेले."

"१६२९ १५५१——या सालांत दक्षिणेंत दुष्काळ पडला. माणसें 'फार' मेलीं........—"

" १७९२ १७१४—. . ... ... महादजी शिंदे दिल्लीची नालकी घेऊन पुण्यांत आले. या सालांत पुणें प्रांतांत दुष्काळ पडला. पायलीची धारण झाली. माणसें 'फार' मेलीं. "

---

† १२ जुले १८५३ रोजीं कृष्णेस मोठा पूर येऊन वांईंतील दोन आळ्या वाहून गेल्या. 'सम्पादक'

¶ २३ सप्टेंबर १८७५ रोजीं या पुरामुळें अमदाबादेंत पाणी शिरून माधवपुरा, लष्करबाजार व नदीकांठचीं कित्येक घरें वाहून गेलीं. पाणी शहरांत दोन दिवस टिकून होतें. या जलप्रळयानें वीस लक्षांचें नुकसान झालें. 'सम्पादक'

या उताऱ्यांवरून 'शकावली' च्या कर्त्याची लेखणी केवळ सर्वप्रसिद्ध वृत्तांतांचा उल्लेख कर्तव्य असतांही अडखळते हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच !

रा॰ सरंजामे यांनीं इंग्रेजी पुस्तकांचा नमुना पाहून मग जर या पुस्तकाच्या रचनेस ते लागते, तर वरील गोष्टी त्यांच्या सहज लक्षांत येऊन चुकल्या असत्या. राज्यांच्या घडामोडींची हकीकत जितकी महत्त्वाची तितकीच इतर लौकिक गोष्टींचीही होय. गेल्या जानेवारीच्या अंकांत$ महाराष्ट्राच्या इतिहासाच्या वास्तविक स्वरूपाविषयीं जें आह्मीं निरूपण केलें आहे त्यावरून अर्वाचीन इतिहासकारांचा हा महासिद्धांत वाचकांच्या बराच लक्षांत येईल. त्यास अनुसरून ह्मटलें ह्मणजे वरच्यासारख्या अनेक लौकिक वृत्तांतांचें टिपण सदहू पुस्तकांत असणें जरूर होतें. प्रस्तुत पुस्तक पाहतां प्रथमतः आह्मांस असें वाटलें कीं, त्याच्या कर्त्यास जुनी माहिती मिळवण्याची पुष्कळ दिवसांपासून हौस असल्यामुळें व ती त्यानें पुष्कळ मिळवून ठेवली असल्यामुळें या 'शकावलीं'त सुद्धां ती बरीच घातली असेल. पण पुस्तक सबंध वाचून पाहतां तसें फारच थोडें आढळलें, ग्रांड्डफ्चा इतिहास, किंबहुना "महाराष्ट्र देशाचें वर्णन' यावरूनही कोणी सहज आपल्या स्मरणार्थ जसें टिपण करून ठेवावें त्यासारखेंच सरासरी हें पुस्तक आहे. या भागांत पुस्तककारानें निराळी माहिती दिलेली ह्मटली ह्मणजे काय ती येवढीच आहे कीं, पेशव्यांच्या बायकांचीं नांवें बहुतेक सगळ्यांचीं दिलीं आहेत, सगळ्या सालांचे शक दिले आहेत, कोठें प्रसंगविशेषीं महिना, तिथि व क्वचित् वारही दाखल केला आहे, आणि टिपांत वगैरे कोठें कोठें कांहीं नवा मजकूर सांपडेल. मराठ्यांच्या कारकिर्दीच्या पूर्वीच्या भागांत बरीच नवीन माहिती दिली आहे; पण हाही भाग पुष्कळ मागल्या काळचा असल्यामुळें त्याविषयीं कोणास विशेष जिज्ञासा होईल असें वाटत नाहीं.

एकंदरींत पाहतां ज्यास हिंदुस्तानच्या इतिहासाची विशेष माहिती नसेल त्यास प्रस्तुत पुस्तकापासून थोडक्यांत बरीच माहिती होईल, व ज्यास तो अगोदर अवगत असेल त्यास यांत कांहीं नवी माहिती मिळेल. तरी ग्रंथकाराच्या बहुश्रुतत्वाप्रमाणें व शोधाप्रमाणें हें काम उठलें नाहीं असें आह्मांस वाटतें. सदरील पुस्तकास 'शकावली'चें रूप दिल्यानें हा घोटाळा झाला आहे. तो असा कीं, ग्रंथकारापाशीं जी नवी माहिती होती ती 'शकावलीं'त खुद्द सामील करतां न आल्यामुळें टिपांच्या दाखल व परिशिष्टांच्या दाखल ती पुस्तकास जोडावी लागली. शिवाय 'शकावली' या रूपानें पाहतांही हा ग्रंथ पूर्ण झाला नाहीं. एक तर इंग्रेज लोकांची शंभर सवाशें वर्षे या देशांत येवढी उलाढाल चालली असतां व शेवटीं त्यांस सार्वभौम अधिकार प्राप्त झाला असतां त्यांचा येवढा महत्त्वाचा भाग या 'शकावलीं'तून अजीच वेगळा झाला आहे; शिवाय 'राज्यांच्या घडामोडीं'शीं ज्यांचा मुळींच संबंध नाहीं अशा गोष्टी तींत येऊन त्याही सगळ्या आल्या नाहींत. 'हें पुस्तक गतगोष्टींचें पंचांग आहे असें ह्मटल्यास चालेल' असें ग्रंथकर्त्यानेंच प्रस्तावनेंत ह्मटलें आहे; पण

---

$ अंक ४९, पृष्ठें ४७९-४८४, विशेषतः पृष्ठ ४८३ पाहा. 'सम्पादक'

हें पंचांग असें चमत्कारिक आहे कीं, 'तिथिर्वारं च* नक्षत्रं योगं करणमेव च' हें लक्षण यावर पूर्ण लागू पडत नाहीं. कोठें नक्षत्र आहे तर योग नाहीं, योग आहे तर वार नाहीं, अशी याची त्रुटित अवस्था आहे. 'मुसलमानी व मराठी राज्यांच्या घडामोडीं'त जंगबहादुराचा मृत्यु येतो तर लॉर्ड मेयो साहेबांचा कां येऊं नये ? कृष्णानदीचा पूर येतो, तर पर्वतीचें तळें एका रात्रींत भरून वाहिलें व पाण्याचा दुष्काळ पडणार होता तो ऐन अखेरीस सुकाळ झाला ही गोष्ट कां येऊं नये ! उमाजी नायकाचें बंड यतें तर तिमिंगिलाचार्यांनीं सोनारांस द्विजत्व देऊं केल्यानें त्यांचीच चांदी होण्याचा समय आला होता व त्यांस 'ब्रह्मपुरी'-तून पलायन करावें लागलें, ही गोष्ट किंवा नुकताच सुलतान महमदाचें अल्लोपनिषत् उपदेशण्यास जो महापंडित पुण्यास आला होता त्यावर हजारों मूर्तिपूजकांनीं कर्दमास्त्राचा प्रयोग करून ' आठ महिन्यांचा उन्हाळा व चार महिन्यांचा पावसाळा ' या न्यायानें दोन महिन्यांची सद्धर्मोन्नति एका चार घटकेंत पार चेपून टाकली हीही गोष्ट कां येऊं नये ? असो; तर 'शकावली' हें रूप पुस्तकास दिल्यानें ही दुहेरी अडचण आली आहे. यास्तव आमची प्रस्तुत ग्रंथकर्त्यांस अशी सूचना आहे कीं, त्यानें 'शकावली'चा नाद मुळींच सोडून द्यावा. एक शक सांपडतो आणि एक सांपडत नाहीं अशी शकावली काय कामाची ? चार शब्द सांपडतात आणि चार सांपडत नाहींत असा कोश जसा निरुपयोगी, किंवा हिंग मिळतो आणि जिरें मिळत नाहीं असें वाण्याचें दुकान जसें कुचकामाचें, त्याप्रमाणेंच बऱ्याचशा सारखें पुस्तकही होय. तर रा. सरंजामे हे जर 'लोकहितवादीं'चें अनुकरण करून 'ऐतिहासिक गोष्टी' किंवा 'जुनी माहिती' असें कांहीं नांव देऊन ग्रंथरचना करतील, व इंग्रेजी इतिहासांतून न आढळणाऱ्या गोष्टींचें ज्ञान आपल्या देशबंधूंस करून देण्याची तजवीज करतील, तर त्यांच्या श्रमांचें खरें चीज होणार आहे. इंग्रेजी भाषेंत अशा माहितीचीं स्वतंत्र पुस्तकें रचलेलीं असतात. हल्लींचे प्रख्यात प्रधान डिझ्राएली यांचा बाप§ मोठा शोधक असून त्यानें Curiosities of Literature. ( ग्रंथकारांविषयींच्या ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी ) अशा प्रकारचे दोन तीन मोठे सर्वमान्य ग्रंथ केले आहेत हें

---

* 'तिथिर्वारश्च' पाहिजे. 'सम्पादक'

§ Isaac Disraeli ( १७६६–१८४८ ) हा जातीचा ज्यू होता. याचा बाप व्हेनीस् सोडून इंग्लंड्ला आला, व खूप संपत्ति मिळवून गबर झाला. आयझॅक् बालपणापासून पुस्तकांतला किडा असे. अर्थातच तो श्रीमान् व्हावा असें वाटत असल्यामुळें त्याच्या आईबापांस हें आवडत नसे. यानें चवदाव्या वर्षी व्हॉल्टेअर् ( Voltaire ) वाचला. पुढें लवकरच रूसोचे ग्रंथ त्याला फार आवडूं लागले. १७९० सालीं Defence of Poetry हें याचें पहिलें पुस्तक बाहेर पडलें. बाय्यत्तर वर्षेपर्यंत याचें आयुष्य अध्ययन व विद्याव्यासंग यांत गेलें. या वर्षी त्याचे डोळे येऊन अंधू झाल्यामुळें त्याचा हा व्यासंग सुटला. Curiosities of Literature शिवाय Amenities of Literature, Miscellany of Literary and Historic Anecdotes हे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पण सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणजे Essay on the Literary Character (1715) हा होय.

'सम्पादक'

आमच्या कांहीं वाचकांस माहीत असेलच. यांत जुन्या इतिहासाच्या संबंधाची जी माहिती मोठा शोध करून वरील ग्रंथकर्त्यांनें जमा केली आहे ती केवढ्या योग्यतेची आहे, याची प्रचीति एका गोष्टीवरून येणार आहे कीं, सर् वॉल्टर् स्कॉट्च्या कित्येक मनोरम कादंबऱ्या वरील आधारावर रचल्या गेल्या आहेत! तर प्रस्तुत ग्रंथकारानें अशा तऱ्हेचा जर उद्योग केला, तर 'शकावली'चा बहुतेक भाग सर्वांस माहीत असणाऱ्या किंवा सहज सांपडणाऱ्या गोष्टींनीच जो भरला आहे, तें नाहींसें होऊन सर्वांनीं संग्रह करून ठेवण्यासारखें पुस्तक तयार होईल अशी आह्मांस उमेद आहे.

५. याप्रमाणें वरील तिन्ही ग्रंथांचें परीक्षण झालें. 'तुकारामबावाच्या अभंगांतील वेंचे', 'अमोलिक वैद्यकचातुर्य' व 'शकावली' अशीं परस्परांहून अत्यंत विसदृश पुस्तकें अभिप्रायास एकदम घेतलीं हें कोणास सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण हे तिन्ही ग्रंथ एके रीतीनें पाहतां एकाच स्वरूपाचे आहेत. तें स्वरूप हें कीं, हे बहुश्रुतत्वाचे वर्धक होत. असले ग्रंथ कोणत्याही देशांत पुष्कळ असणें हें इष्ट होय; त्यांतून जेथें विद्येचा प्रसार नुकताच होऊं लागला आहे, तेथें तर ते अल्प मूल्यानें प्रसिद्ध होणें हें अत्यंत आवश्यकच होय. इंग्लंड देश हल्लीं सुधारणेंत अग्रगण्य आहे व मोठमोठे विद्वान् तेथें सहस्रावधि असून सामान्य लोकांतही विद्येचा प्रसार पुष्कळ झाला आहे, तथापि तेथेंही सर्व शास्त्रांतील प्रमेयांचीं लहान लहान पुस्तकें, मोठमोठ्या इतिहासांचे संक्षेप, कवींच्या व गद्यकारांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे, मनोरंजक चुटके, नकला, चमत्कारिक माहिती, शहरांचीं वर्णनें, म्हणी, नानाविषयांवर कोश, वगैरे शेंकडों तऱ्हेचीं पुस्तकें हरहंमेश छापलीं जातात व खपतात. उघडच आहे कीं, कोणत्याही देशांत पाहिलें तरी विद्येच्या परम पदवीला पोंचलेले लोक एकंदरींत फारच थोडे असतात; कां कीं, तितका व्यासंग, तितकी बुद्धि, तितक्या सोयी या थोड्यांसच असणें संभवतें. बाकी एकंदर जनसमूह पाहिला तर, एक तर बुद्धीच्या मानानें कमी व शिवाय संसारकृत्यांत सदोदित रावलेला; तेव्हां अशा एकंदर लोकांच्या शिक्षणार्थ व रंजनार्थ ह्मटलें ह्मणजे वरच्यासारखींच पुस्तकें पाहिजेत. या पुस्तकांत पुढील गुण असले पाहिजेत. एक, थोडी किंमत; दुसरें, थोडा विस्तार; तिसरें, सुबोधपणा—ह्मणजे ज्यास त्या विषयाची पूर्वीची माहिती थोडी किंबहुना मुळींच नाहीं त्याच्याही लक्षांत त्यांतील निरूपण भरावें अशा तऱ्हेची त्यांची रचना असावी. आमच्या भाषेंत आजपर्यंत पाहतां वरील प्रकारचे ग्रंथ कांहीं झाले आहेत; तरी ते एकंदरींत पाहतां व्हावे तसे चांगले झाले नाहींत हें एक, आणि शिवाय त्यांची विशेष योग्यता कोणी न मानल्यामुळें त्यांचा प्रचारही ह्मणण्यासारखा झाला नाहीं. ज्यांस इंग्रेजीच्या नमुन्यावरून ग्रंथरचनेची माहिती होण्याचा संभव व ज्यांच्यावर एकंदर देशाची फार दिवसांपासून भिस्त, त्यांच्या हातून आपल्या देशबांधवांच्या हितार्थ वरील उद्योग व्हावयाला पाहिजे होता, पण तो न होण्यास अनेक कारणें झालीं. एक देशभाषेविषयीं अप्रीति, व तिजमुळें अर्थात् तिच्या व्यासंगाचा अभाव; आणि दुसरें हें कीं, कोणास कधीं काळीं तसली प्रेरणा झालीच तर ग्रंथ जो रचायाचा तो वाचकांकडे नजर पुरवून करायाचा नाहीं, तर आपल्याकडे पाहून आपणासाठीं करायाचा.

ह्मणजे आपले अल्पज्ञ जे देशबंधु त्यांस तो कितपत समजेल किंवा रुचेल याविषयीं तादृश विचार नाहीं तर आपल्या विद्वत्तेला साजण्यासारख्या बऱ्या विषयावर बऱ्या तऱ्हेनें तो झाला पाहिजे ! असो; गेली गोष्ट ती गेलीच; पण इतःपर पुढें तरी आमच्या नवीन मंडळीनें आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावण्याविषयीं झपावें. मिल्टन्‌नें व्याकरणाचा पूर्वभाग जो शब्दविचार त्यावर ग्रंथ लिहिला, कालिदासानें उत्तरभागांतील विषयावर 'श्रुतबोध' रचला, शंकराचार्यांनीं 'चर्पटपंजरी'सारखे चुटपुटते लहानसान ग्रंथ केले, मोरोपंतानें आस्ता-वर ह्मणण्याकरतां 'ओंवीरामायण' रचलें, परवांचे बाळ गंगाधर शास्त्री यांनीं 'बालव्याकरण' मुलांकरतां तयार केलें, इत्यादि उदाहरणांवरून पाहतां बराच बोध घेण्यासारखा आहे. थीबन्‌ लोकांचा प्रख्यात सेनापति इपामिनॉंडस्‌ * याची त्याच्या देशबंधूंनीं जेव्हां रस्ते झाड-णाऱ्या लोकांवर एके प्रसंगीं नेमणूक केली, तेव्हां ती त्यानें संतोषानें पतकरून ह्मटलें कीं, 'या कामानें जर मला थोरवी येण्यासारखी नाहीं तर माझ्या योगानें याला प्रतिष्ठा आणण्या-करतां मी झटेन.' असाच दुसऱ्या एका प्रसंगीं त्यानें ह्मटलें कीं, 'मोठें काम हातीं घेऊन तें वाईट रीतीनें बजावण्यापेक्षां हलकेंच घेऊन तें चांगल्या रीतीनें बजावणें यांत भूषण आहे.' तर आमच्या देशांतील विद्वज्जनांनीं याच्प्रमाणें देशहिताचा उद्योग केला असतां फार उप-योग होणार आहे. प्रस्तुतच्या काळांत वर सांगितल्यासारखे ग्रंथ हलके मानले जाणार नाहींत इतकेंच नव्हे, तर त्यांचीच अतिशयित अवश्यकता आहे. लहान मुलांस जशी पंच-पक्वान्नें कांहीं कामाचीं नाहींत तर बोंडल्यांतलें दूधच त्यांस पाहिजे, त्याप्रमाणें नुकती अक्षर-ओळख होऊन विद्यांगणाचा नुकता उंबरठा उतरून जे पलीकडे गेले त्यांच्या करतां अर्थानें सुलभ ह्मणजे समजण्यास सोपी व थोड्या पैशानें मिळणारी अशीच पुस्तकें झालीं पाहिजेत. तर असलें खाद्य तयार करण्याकडे ग्रंथकारांनीं व देशहितेच्छूंनीं चांगलें लक्ष पुरवावें हें त्यांस उचित होय.

---

*Epaminondas, पोलिम्निस्‌ ( Polymnis) चा पुत्र. कुलीन पण गरिबींत जन्मला व याचा सारा जन्म गरिबींतच गेला. खि. पू. ३८५ सालीं त्यानें पेलोपिडास्‌ ( Pelopidas ) याचा युद्धांत प्राण वांचविल्यामुळें या दोघांची मैत्री आमरण टिकली. खि. पू. ३७१ सालीं ल्यूक्ट्रा ( Leuctra ) येथें स्पार्टन्‌ लोकांचा पराजय करून ग्रीसमधील त्यांचें वर्चस्व यानें नष्ट करून टाकलें; व चार वेळां लागोपाठ जय मिळवून ग्रीसमध्यें थीब्स्‌ ( Thebes ) लोकांचें वर्चस्व स्थापलें. चवथ्या विजयप्रसंगींच झेनोफोन्‌ ( Xenophon ) चा मुलगा ग्रिलस्‌ ( Gryllus ) याच्या हातून इपामिनॉंडस्‌ पडला. त्याच्या मृत्यूबरोबर ग्रीसवरील थीब्स्‌ लोकांचें वर्चस्वहि नष्ट झालें.

'सम्पादक'